

# वेदव्यास पं. सातवळेकर

पु. पां. गोखले

वेदव्यास

# पंडित सातवळेकर

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले

उ षा प्र का श न, पा र डी

प्रकाशिका :
सौ. लतिका सातवळेकर
उषा प्रकाशन
पारडी ( जि. बलसाड )

★

२५ सप्टेंबर १९६७

★

मूल्य : बारा रुपये

★

मुद्रक :
वसन्त श्रीपाद सातवळेकर
भारत मुद्रणालय, स्वाध्याय मंडळ,
पारडी ( जि. बलसाड )

समर्पण

देह आणि देव यांच्यामध्ये

देश आहे

हे न विसरणाऱ्या जीवननिष्ठांना

पंडितजींची ही वाङ्मयी-पूजा

सादर केली आहे.

—पु. पां. गोखले

# प्रारंभी सांगितले पाहिजे तेच !

**वि**कसित व्यक्तित्वाचे एक प्रमुख लक्षण माणसाच्या अंत:करणातील कृतज्ञता ही मानली जाते. व्यक्तिच्या काय, किंवा राष्ट्राच्या काय, स्वयंसिद्ध मोक्षास म्हणजेच स्वातंत्र्यास **' न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते । '** ते ज्ञानदान करणाऱ्या गुरु-जनांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याकरता प्राचीन भारतीयांनी गुरुपौर्णिमेची प्रथा पाडली होती. आपल्या आयुष्याचा देता आला तेवढा सारा क्षण नि क्षण ज्यांनी लोक-शिक्षणार्थ वेचला, अशा कर्तव्यकठोर, न्यायनिष्ठुर पण वत्सलच वत्सल असलेल्या लोक-शिक्षकाचे चरित्र जरा तरी पाहिल्याने, **' आपण त्यांच्या समान व्हावे, हाच सापडे बोध खरा । '** तो बोध घेऊन **' यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते । '** किंवा **' यद्देवा अकुर्वन् तत् करवाणि ॥ '** या न्यायाने, त्या थोरांचे थोडे तरी अनुकरण करण्याने त्यांची कृतज्ञ पूजा तर साधेलच, पण शिवाय त्यांची परंपरा राहून राष्ट्राची सामूहिक शक्ति तेजस्वीपणे प्रवाही राहील.

या दृष्टीने पंडितजी **श्रीपाद दामोदर सातवळेकर** यांच्या चरित्राचे व चारित्र्याचे शब्दचित्रण करण्याचा येथे प्रयत्न केला आहे. तो त्यांना समजून घेऊन केला आहे. तसे करताना प्रो. बाल्फरसनाचा सल्ला अनुसरला आहे. कोणत्याही महाभागाची आलोचना करतेवेळी जिला मनोमन सहानुभूति ( Imaginative sympathy ) म्हणतात त्या विशाल, उदात्त व उदार दृष्टीचा विसर पडता कामा नये. त्या सहानुभूतीच्या अभावी आलोचनाविषय झालेल्या महाभागाशी तादात्म्य कसे व्हावे ?

तसा प्रयत्न करताना भर्तृहरीच्या वचनाची सत्यता अधिकाधिकच पटत गेली. त्या कविवराने म्हटले की—

**दाक्षिण्यं स्वजने, दया परिजने, शाठ्यं सदा दुर्जने ।**<br>
**प्रीतिः साधुजने, नयो नृपजने, विद्वज्जनेष्वार्जवम् ॥**<br>
**शौर्यं शत्रुजने, क्षमा गुरुजने, नारीजने धूर्तता ।**<br>
**ये चैवं पुरुषाः कलासु कुशलास्तेष्वेव लोकस्थितिः ॥**

**सत्यं, शिवं, सुंदरम्** या त्रयीवर उभारलेला समाज जर अपेक्षित असेल आणि तसेच राष्ट्र घडावे ही जर आकांक्षा असेल तर व्यक्तिच्या जीवनात मानवनिर्मित दुःख, दैन्य अगर अस्वस्थता असू नये, म्हणून नेतृत्वाने अथवा सांघिक रीत्या योग्य व शास्त्रशुद्ध प्रयत्न व्हावयास हवेत, हे उघड आहे. पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकर यांना त्यांच्या चित्रकारीवर पैसा चांगला मिळाला; तेवढाच धंदा ते करीत राहिले असते, तर पुढेमागे ते पुंजीपतिही झाले असते; पण पैशाने अगर वैदिक ऋचांच्या आधाराने, प्रचलित राजकारण–समाजकारणात नेतृत्व केल्याने त्यांच्या अंतःकरणाचे समाधान नव्हते. आपल्या समाजासाठी, आपल्या राष्ट्रातील जनतेच्या ऐहिक व पारमार्थिक उत्क्रांतिसाठी किंवा आपल्या राष्ट्रातील उच्च संस्कृति आपल्या देशबांधवापुढे ( व पर्यायाने जगापुढेही ) मांडून त्या संस्कृतीच्या अंतरोत्थित प्रेरणा-बलावर लोकांनी सांघिक, सामुदायिक वा सहकारी तेज दाखवावे यासाठी, परिश्रमच परिश्रम करावेत याही गोष्टीत विचारवंत माणसाला समाधान वाटत असते.

त्यासाठी पंडितजींनी चित्रकारी तर सोडलीच, पण दहा दहा वर्षांच्या अंतराने कराव्या लागणाऱ्या स्थलांतराचे वेळी मांडलेला संसाराचा मांडही सोडून ते पुढे गेले. व्यक्तिगत भाव–भावना आणि राष्ट्रीय ध्येये किंवा कौटुंबिक लागेबांधे आणि कठोर-कर्तव्यबुद्धि यामध्ये आपले व्रत तडीला नेऊनच, होईल तेवढी तडजोड होते. आपले व्रत किंवा ' सतीचे वाण ' निर्धाराने चालवून दुसरे टाकावेच लागते, हा अनुभव घरापासून परदेशी झाल्यावर जेवढा पदरी पडतो, तेवढा तो आप्तस्वकीयांच्या सान्निध्यात पडत नाही. ध्येयनिष्ठ कर्तृत्वाचा कस हा तलवारीच्या धारेवरचा प्रवास व प्रयास असतो. आईबापांच्या सेवेचे व्रत घेणाऱ्या पुंडलिकाला त्या व्रतापैकी सगळी दिव्ये करताना, त्रिभुवनांचा मालक पुढे ठाकला तरी त्याला एका विटेवरी ' अठ्ठावीस युगे ' तिष्ठत ठेवावा लागतो; तर ' पांडुरंग होऊ पहाणाऱ्या ' तुकारामाला ' **पांडुरंगी जेणे घडे अंतराय । हो का बापमाय त्यजावी ते ।** ' हे पत्करावे लागते. स्मरण-शक्ति, ग्रहणशक्ति, कर्तृत्व आणि वक्तृत्व या चारी सामर्थ्यांच्या किंवा भुजांच्या फरकाफरकाने मनुष्यामनुष्यातील कार्यक्षमतेत बदल होतो व त्यांची कार्यक्षेत्रे अलग होतात. आपल्या त्या चतुर्भुज कार्यक्षमतेला एकनिष्ठपणे वेदवाङ्मयाचा प्रसार आणि वैदिक संस्कृतीचे संगोपन, संवर्धन गाणि संरक्षण याकामी जुंपावयाचे ठरवून, पंडित-जींनी जेव्हा कामास सुरूवात केली, तेव्हापासून त्यांनी आपली निष्ठा असिधारा-व्रतानेच सांभाळली आहे. अधिकारी व्यक्तींनी स्वतः वेदाध्ययन करून आपल्यापुढील पिढीला त्यासंबंधी उत्तेजन दिले पाहिजे. वेद म्हणजे ज्ञान, विविध संपूर्ण ज्ञान. त्याने ऐहिक आणि पारमार्थिक जीवनातील—

**हा बंध हा मोक्ष । जाणणे जे अलौकिक ।**
**कदा नव्हे अनुमानिक । पंडित देख या नाव ॥ १ ॥**
**ज्यासी शान्ति आणि समाधान । साचार बंध–मोक्षाचे ज्ञान ।।**

— एकनाथी भागवत ( १९।५।१९–२१ )

स्वच्छ व स्पष्ट झाले पाहिजे.

ही प्रेरणा पंडितजींच्या वैदिकग्रंथ–भाषांतरात, किंवा त्या वेदांच्या, उपनिषदांच्या, भगवद्गीतेच्या स्वयंप्रज्ञेने करीत राहिलेल्या विवरण–विवेचनाच्या मूळाशी आहे. फार काय, त्यांनी मासिकांचे केलेले संपादन, लिहिलेले संकीर्ण लेख आणि प्रकाशित केलेले वैदिकेतर विषयावरील स्वतःचे ग्रंथ यांच्याही मूळाशी वरील प्रेरणाच आहे. अशी निदान माझी तरी समजूत आहे.

त्या प्रेरणेतून पंडितजींनी प्रतिपादन केलेले एकमेव सूत्र सांगावयाचे झाले तर '**नायमात्मा बलहीनेन लभ्यः ।**' हेच सांगता येईल '**देवो दुर्बलघातकः**' हेही त्याच्याच बरोबर लक्ष्यात वागावून सबल तर व्हावयाचे, पण त्या सामर्थ्याचा सात्त्विकपणे सदुपयोग करूनच समाजसेवाभावाने आणि राष्ट्रसेवाभावाने थोर व्हावयाचे, असा आपल्या जीवनाचा शिरस्ता माणसाने राखला पाहिजे.

ज्याला थोर व्हावयाचे आहे त्याला आघात सोसलेच पाहिजेत. '**जया अंगी मोठेपण । तया यातना कठीण ।**' म्हणजे थोरपण आल्यावरही आघात वाटणीस येतात. कित्येकाना तर सर्वप्रकारे सुखाची राखरांगोळी करून घ्यावी लागते. सर्व आयुष्य हे परमहंसाचे गान मानले पाहिजे. जेव्हा हृदयाला जखम होते तेव्हा सिंह गंभीरतम गर्जना करतो, मस्तकावर प्रहार होतो तेव्हा नागराज फणा उभारतो आणि मनुष्यसुद्धा जेव्हा अंतःकरणात विव्हळ होतो, तेव्हाच आत्मतेज प्रगट करतो.

आज सर्व बाजूंनी वैदिकधर्मावर हल्ले होत आहेत घरातून आणि बाहेरून. म्हणून सनातन धर्म चैतन्ययुक्त, अहिंदूंना हिंदू करणारा, त्यासाठी '**विश्वचि माझे घर । ऐशी मति जयाची थोर ।**' अशा वृत्तीचे धर्मोपदेशक देशोदेशी पाठविणारा, जे बळजबरीने म्हणा किंवा दुसऱ्या कशाने म्हणा वैदिकधर्माच्या बाहेर गेले असतील, त्यांना परत हृदयाशी धरणारा आणि नवनव्या परजातींना पचवून टाकणारा असा वैदिकधर्म झाला पाहिजे. त्यासाठी वैदिकधर्मानुयायी म्हणजेच भारतीय हिंदु तेवढा एक, प्रथम संघटित झाला पाहिजे, अशी स्वामी विवेकानंदांपासून बॅ. सावरकरांपर्यंत सगळ्यांची दीर्घसूचना होती. '**दीर्घसूचनेचे नर । झाले आहेत, पुढे होणार । देणे ईश्वराचे ॥**' असे समर्थ रामदासांनी म्हणून ठेवले आहे. म्हणून उपनिषदात सांगितल्याप्रमाणें 'शक्तीची उपासना' केली पाहिजे. वेद आणि वेदांत या सर्वांचे रहस्य 'शक्तीची उपासना' या दोन शब्दात साठविलेले आहे. शक्तीच्या उपासनेचे पौष्टिक असे आहे की—

> **मूकः परापवादे परदारनिरीक्षणेऽप्यन्धः ।**
> **पंगुः परधनहरणे स जयति लोकत्रये पुरुषः ॥**
> **( परनिंदनी मुका जो, परदारप्रेक्षणी तसा अंध ।**
> **पंगू परधनहरणी, पसरे सर्वत्र तद्यशोगंध ॥ )**

ही सर्व जाणीव ज्यांनी मनी धरली त्यांचे चरित्र लोकांच्या नीतिशिक्षणास सहाय्यकच होईल यात काय नवल ? स्वराष्ट्रातील व परराष्ट्रातील गतकालीन व

विद्यमान् थोर पुरुष व श्रेष्ठ विभूति यांच्या चरित्रांचे तरुण पिढीकडून परिशीलन करवून त्यांचे ठिकाणी उच्च मनोवृत्ति जागृत करणे व तरुणांचे शील बनविणे या मार्गाने नीतिशिक्षण फारच परिणामकारक रीतीने साधता येते. याच दृष्टीने वैदिक-धर्म-निष्ठ पं. सातवळेकरांचे चरित्र प्रबोध, प्रयत्न, प्रचीति या त्रयीसाठी उपयुक्त ठरेल.

पंडितजींचे सार्वजनिक कार्यक्षेत्रातील मूळपुरुष म्हणून विष्णुबुवा ब्रह्मचारी ( १८२५–७१ ) यांची साहजिकच आठवण होते. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या हिंदुधर्मा-वरील आक्रमणाला प्रारंभी पायबंद घालणारे ते स्वतंत्र विचाराचे एक हिंदु मिशनरी. यांचे पूर्ण नाव विष्णु भिकाजी गोखले. हे सप्तशृंगीच्या डोंगरावर तपश्चर्या करण्यास गेले असता याना ' पाखंड मताचे खंडन करून वैदिकधर्माचा प्रसार करण्याचा ' आदेश मिळाला. मुंबईस ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या आक्षेपाना हे आपल्या व्याख्यानातून सडेतोड उत्तरे देत असत. पुढे १८५७ च्या उठावात त्यांना व्याख्याने देणेस बंदी केली तेव्हा त्यांनी वेदोक्त धर्मप्रकाश हा ग्रंथ लोकापुढे मांडला. ते जातीभेद मुळीच पाळित नसत. १८५६ मध्ये भावार्थसिंधु हा ओवीबद्ध ग्रंथ त्यांनी लिहिला. पुढे त्यानी भगवद्‌गीतेवरील सेतुबंधनी टीका लिहिली. हे काम चालू असता ते काळ-पुळीने मरण पावले. त्यादिवशी शनिवार माघ वद्य १४ शिवरात्र होती. ' देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांसी तुटी ।। ' असे त्यांचे आचरण असे. स्वपुरुषार्थ-पूर्वकच त्यांनी एकांतिक ईशकरुणापूर्वक साधनेस हात घातला. आत्मप्रयत्नपूर्वक मनन-निदिध्यासास आपणास अंगुष्टमात्र सिंधुरारुण शक्तितेज दिसले असे बोवा नमूद करतात. युक्ति, अनुभव व शास्त्रयुक्त बोलत असल्याने त्यांना कोणी जिंकू शकत नसे. बोवास खुशामतीचे वावडे ! कर्मकांड, स्पृश्यास्पृश्य, जातिनिर्बंध ते मानीत नसत. अखिल मानवजातिस वनस्पत्याहारच युक्त असून तेच ईश्वरी मनोगत असल्याचे ते पटवून देत. कथनीप्रमाणे करणी हे त्यांच्या चरित्राचे ध्रुववाक्य ! वेदोक्तधर्मप्रकाश या आपल्या ग्रंथात त्यांनी वेदोक्त धर्माचाच साकल्याने विचार केला आहे. म्लेंच्छमतांचे खंडन सदर ग्रंथात आहे. बोवा साकार व निराकार देव स्वरूप मानीत. अपरोक्षानुभूतिपर्यंत बोवानी मजल मारली होती. बोवानी लबाडीचे धर्मांतरास चांगलाच सामना दिला.

अठराशे सत्तावनचा उठाव विझून सर्वत्र ब्रिटिशसत्तेची जरब बसल्यानंतर आपापसातील कलहाने आणि युगानुयुगे चालत आलेल्या अज्ञानाने अप्रागतिक व विस्कळित झालेल्या, स्वातंत्र्यास मुकलेल्या व राष्ट्रीय उन्नतीच्या सर्व बाबतीत अत्यंत अधोगतिस पोहोचलेल्या आपल्या हिंदुस्थानदेशाच्या विचारी पुरुषास, राज-कीय वातावरण सर्वतोपरी अंधकारमय दिसले असते व सद्‌भाग्यरवीचा पुनः उदय होईल हे अशक्यच वाटले असते. पुष्कळ जित राष्ट्रात लोकांची मनःप्रवृत्ति अशा तऱ्हेची होऊन ती शतकेच्या शतके निद्रित, जवळ जवळ मृतवत्, राहिल्याची आणि काही तर अंती नामशेष झाल्याचीही उदाहरणे जगाच्या इतिहासात नमूद आहेत.

कित्येक राष्ट्रात नुसते आतल्याआत जळण्याचा व प्रसंगी दंगेधोपे करण्याचा आणि चीत झाले म्हणजे पुन: पहिल्यापेक्षा अधोगत होऊन जाण्याचा प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो. आपल्या हिंदुस्थानातही तशी भीति नव्हती असे नाही. म्हणजे ज्यावेळी लोकात विद्येचा प्रसार नव्हता, वर्तमानपत्रे बहुतेक नव्हती, सभा भरवणे म्हणजे मोठे कार्य केल्यासारखे मानले जाई, सरकारी नौकरी म्हणजे मोक्षासाठी सापडलेले विमान वाटे, सरकारी कचेरीतील कारकुनी ही सुद्धा मिजासखोर बादशहात वाटे, त्यावेळी ब्रिटन-मधील प्रजापक्षाच्या धर्तीवर आपल्या देशातही प्रजापक्ष निर्माण करावा, अधिकाऱ्यां-च्या अन्यायप्रमादावर टीका करून स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नसली तरी, सुराज्य साधू पाहणारी व प्रजेसाठी अधिकाधिक हक्क संपादन करणारी चळवळ उभी करून हिंदुस्थानची कारभारपद्धति प्रजासत्ताक होईल अशी घडवीत रहावे, हे ज्या आमच्या लोकमान्य पुढाऱ्यांनी ठरविले, त्यांच्या दूरदृष्टीची व शहाणपणाची खरोखर धन्य होय. सहारा वाळवंटाचे रमणीय उद्यान करण्यासारख्या त्यावेळी त्या कल्पना वाटल्या असतील ! आणि म्हणूनच ऐतिहासिक आठवाबरोबर त्या भविष्य-भेदी पुढाऱ्यांबद्दलची आपणा सर्व भारतीयांची कृतज्ञता सदैव जागृतच असली पाहिजे. पूज्य दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, लालमोहन घोष, सुरेंद्रनाथ बानर्जी अशी त्या वंदनीय पुढाऱ्यांची नावे आठवताच कृतज्ञतेने मान लवल्याशिवाय रहातच नाहीं. या मंडळींनी स्वदेशसेवेचे मातबर व्रत चालविले आणि प्रचारिलेही. त्यातूनच १८९३ साली एक नवीन युग सुरू झाले. शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेत वैदिकधर्म व भारतीय संस्कृति यांची उदात्तता स्वामी विवेकानंदांनी जगाला पटविली; बाबू अरविंद घोष आय्. सी. एस्. ची परीक्षा खुंटीवर टांगून हिंदुस्थानात येऊन ' जुन्या जागी नवे दिवे ' दाखवू लागले; लोकमान्यांनी गणपति–शिवाजी उत्सव सुरू करून लोक-जागृतीने स्वराज्यासाठी भूकतहान वाढविली; संसदीय मनोवृत्तीने राज्यकारभारा-तही लोकांना स्वत्व प्रगटविण्याची संधि हवी नि तशी संधि मिळाल्यास भारतीय-जनता कार्यक्षमच असल्याचा अनुभव येईल, असा उघड दावा महर्षि रानड्यांचे अनुयायी पटवू लागले आणि सर्व अनर्थांचे मूळ जी परकीय सत्ता ती सपशेल उखडून टाकल्याशिवाय गत्यंतर नाही अशा भावनेने १८५७ ची उत्थानतंत्रे अमलात आण-णारांचाही तरुणवर्ग उदयास आला. अशा सर्वांगानी भारतराष्ट्राचा उठाव होत असता, त्यातील आपण कशातच भाग घेणार नाही, अशी करंटी मनोवृत्ति कोणत्या जातीवंत तरुणाची राहील तरी का ? ऐनभराने हें सर्व प्रवाह आपला प्रभाव विसाव्या शतकाच्या पहिल्या दीड पावणेदोन दशकात पाडीत राहिले असता, लोक-मान्यांच्या चतुःसूत्रीतील राष्ट्रीय शिक्षण वैदिकसंस्कृतीच्या आविष्काराने करीत रहावयाचे व्रत सातवळेकरजींनी पतकरले आणि पावणेसहा तपे चालविले. त्यातील अडीच तपांचा लोकजागर त्यांनी महाराष्ट्रात राहून चालविला नि वैदिक संस्कृतीचा मोठेपणा दिगंत केला. त्यांची ओळख करून देण्याघेण्याचे 'महाराष्ट्रपरिचयाने' च नव्हे, तर ' महाराष्ट्रजीवनाने ' ही फारसे मनावर घेतले नाही ! इतके पंडितजी प्रसिद्धिपराङ्मुख सेवाव्रती राहिले. असेच प्रसिद्धिपराङ्मुख पण सिद्धिसाठी अखंड

व अस्खलित तपश्चर्या करणारे मुनिच समाजसामर्थ्याचे पाठकणे असतात. त्यांचा परिचय करून घेण्यात समाजसामर्थ्याचा साक्षात्कार साक्षेपाने होत असतो.

अशा तपोनिधींची चरित्रे—

सावधपणे श्रोता । तल्लीन होउनि तत्त्वता ।
इतिहासाची शुद्ध कथा । सादरता जो परिसे ॥ ५५० ॥
सार्थक एक एक पद । पारसता होय अंतर शुद्ध ॥ ५५२ ॥
( एकनाथी भागवत अ. ५ )

अशी वाचावयास मिळणे परम भाग्याचेच. पण तसे चरित्र लिहिणे सोपे का आहे? तथापि, तसे चरित्रकार पंडिजींच्या बाबत आजपर्यंत कोणी पुढे न आल्याकारणाने, दुधाची तहान ताकावर तरी भागवावी या न्यायाने पंडितजींच्या शतसंवत्सरीचा मुहूर्त साधून, प्रस्तुत चरित्राच्या लेखनाचे धाडस केले आहे.

हे धाडस करण्यास माझे स्नेही व पुण्याचे एक सालस म्हणून प्रसिद्ध असलेले ' हरि-वरदा ' या प्रचंड ग्रंथाचे प्रकाशक श्री दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर यांची प्रेरणा व पंडितजींचे चिरंजीव श्री वसन्तराव यांची अनुमति प्रोत्साहक ठरली. पू. पंडितजी आत्मवृत्त लिहावयाच्या खटाटोपात पडणार नाहीत; पण त्यांनी वेगवेगळया प्रसंगांनी आपल्या अनेकविध लिखाणातून आपले अनुभव नमूद केले आहेत व मतेही दिली आहेत. त्यांचा उपयोग करून पंडितजींचे चरित्र मी लिहावे, म्हणजे चरित्राबरोबर आत्मचरित्राचाही आस्वाद वाचकांना लाभेल, अशी सूचना पंडितजींच्या स्नुषा सौ. लतिकाबाई व चिरंजीव श्री वसन्तराव या उभयतांनी केली. ती मी स्वीकारली आणि प्रसिद्ध वा आख्यात गोष्टींची साखळी जुळवण्यासाठी व ' अज्ञात ' ते ज्ञात करून घेण्यासाठी पंडितजींची मुलाखत घेण्याचे ठरविले. पू. पंडितजींनी मुलाखत दिली आणि बहुधा त्यांच्या आत्मचरित्राचा मी ' लेखकू जाहलो. '

या सर्व व्याप-आटोपात चरित्र लिहिल्याचे व कळल्याचे समाधान झाले तरी, कृपीने कालवलेले पीठच दूध म्हणून मुलास दिले, ते कृपणपण तर चरित्रास येणार नाही ना ? अशी भीति मला मनोमन वाटतच होती. तेव्हा, पंडितजींवर कोल्हापूर खटला होण्यास कारण झालेला होता तो त्यांचा दुर्मिळ लेख, प्रस्तुत दाते-सूचिमंडळाचे संचालक श्री काळे यांच्या कृपेने व श्री. शंकरराव बर्वे यांच्या सहकाराने मिळविला; पंडितजींच्या संबंधाने पंजाबच्या थोर नेत्यांच्या चरित्रातून आलेले उल्लेख अभ्यासले; विलेपार्ले येथील श्री. शहाणे व श्री. पाटील यांच्याकडून पंडितजींच्या चित्रकलेसंबंधी माहिती मिळविली; पंडितजींच्या संस्थानी प्रजापरिषदेतील सेवेचा मागोवा श्री शासाहेब ( विश्वनाथ अनंत ) पटवर्धनांच्या पुस्तकातून घेऊन आटपाडीचे श्री. दर्शने यांच्याकडूनही माहिती मिळविली; पंडितजींनी आपल्या स्नुषा सौ. कुसुमताई यांना दिलेली मुलाखत मुंबईच्या आर्टजर्नलमध्ये प्रसिद्ध झाली ती व पंडितजींच्या सहधर्मचारिणी सौ. सरस्वतीबाई आणि स्नुषा सौ. लतिकाताई यांनी प्रसंगोपात लिहिलेल्या आठवणी निरीक्षिल्या. या व अशाच तऱ्हांनी पंडितजीं-

च्या चरित्राची सामुग्री जमवून, ती ती सामुग्री पुरविणाऱ्या लहानथोर व प्रत्यक्षा-प्रत्यक्ष सहाय्यकांविषयी कृतज्ञबुद्धि राखून आणि पंडितजींच्या उद्‌गारापासून सर्वच सामुग्रीचा समन्वयसहकार स्वतःच्या विवेकभावे घालून मी पंडितजींचे चरित्र तर सजविले.

' आपरितोषाद् विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम् । ' हे जेथे कविकुलगुरूला प्रमाण आहे, तेथे माझ्यासारख्याचा काय पाड ? म्हणून त्याबाबतीत पहिले आद-बीचे पाऊल म्हणून लहानथोर कुटुंबियांसह पंडितजींना घेऊन त्यांचेसमोर मी चरित्राचे वाचन केले, त्या मंडळींच्या पसंतीनंतर पुरुषार्थाच्या वाचकापुढेही ते मांडले. त्यानाही पंडितजींच्या चरित्राची कुतूहलपूर्वक उत्सुकता होतीच. तिची तृप्ति होत असलेली पाहूनच, मी साधलेली पंडितजींची ही वाङ्‌मयी पूजा पुस्तकरूपाने ' उषा–प्रकाशन ' जनतेच्या हाती देत आहे, याबद्दल मी त्या संस्थेचाही कृतज्ञ आहे. आणि अशी कृतज्ञता प्रगट करीत असताही, पंडितजींचे चरित्र लिहिण्यास मी हात घातला तो ' प्रांशुलभ्ये फले लोभादुद्‌बाहुरिव वामनः । ' आहे, याची मला पक्की जाणीव आहे. पंडितजींनी स्वराज्यचतुःसूत्रीच्या काळात ज्या चळवळी व लोक-जागृति केली, त्याच काळात भगिनी निवेदिता या स्वामी विवेकानंदांच्या अध्या-त्मकन्येने तसेच लोकसेवेचे कार्य बंगालमध्ये नावारूपास आणले होते; कारण सामा-जिक, राजकीय, आर्थिक, औद्योगिक चळवळी धार्मिक चळवळीपासून भिन्न आहेत, हे पृथक्करणाने जीवन समावून घेण्यासाठी आवश्यक असले, तरी एकाच जीवनाचे ते वेगळे वेगळे परिस्थितिसापेक्ष प्रवाह आहेत; पण त्यांचा आत्मा एकच आहे. ' एकं हि सद्विप्रा बहुधा वदन्ति । ' चा तो प्रत्यय आहे. म्हणून सर्व प्रवाह मिळून एकजिनसी जीवन समजून घेतले पाहिजे आणि ते चरित्रात चित्रित केले पाहिजे. अनेकविध प्रवाहाचे जीवन माझे आहे, ते आहे तसेच रंगव, म्हणून पंडितजींसारख्यांनी वॉलपोलप्रमाणे एकाद्याला सांगितले तरी, महात्मा गांधींच्या महादेवभाईप्रमाणे अगर भगवान् कृष्णांच्या उद्धवाप्रमाणे पंडितजींचा भक्त चरित्रकार, आपल्या दृष्टीची किरणे त्या चरित्राची चमक वाढविण्यास वापरणारच नाही, अशी शाश्वति कोठे आहे ? मग, माझ्यासारख्याचे काय सांगावयाचे ? म्हणून या चरित्रातील उदात्त, भव्य, दिव्य, उत्कट, प्रशंसनीय जे काही आढळेल ते स्वतः पंडितजींचे आहे व त्याची चमक चरित्रसाधना पुरविणाऱ्या सर्व स्नेहांकितांच्या व सहानुभूतिकांच्या सहकाराची आहे. माझे काही असले तर ' वेडे वाकुडे गाईलें । परि जिव्हाळ्याने ते केले ॥ ' एवढेच आहे. चरित्रसाधना पुरविणारात आटपाडीचे दे. श्री. वि. गो. दर्शने, औंधचे भाऊसाहेब चितारी आणि एकवेळचे औंधसंस्थानातील एक शिक्षणाधिकारी श्री धोंडोपंत कुलकर्णी, पुरुषार्थाचे कार्यकारी संपादक ( अरेरे, आता १२ एप्रिल १९६७ पासून त्यांच्यामागे ' कै. ' हे अक्षर लिहिण्याची पाळी आली ! ) श्री. के. र. काशीकर अशी जिव्हाळ्याची मंडळी आहेत. अशांच्या सहाय्याने निर्माण होणारे वाङ्‌मय वाचकातून ' मानव ' निर्माण करणारे हवे. एका डोळ्याने स्वतःमध्ये संपूर्ण विश्वाचा

साक्षात्कार अनुभविणारा आणि दुसऱ्या डोळ्याने अफाट विश्वसागरातील एक चंचल तरंग एवढेच स्वतःचे मूल्यमापन करणारा असा चिरंतन मानव आपल्या वाचकातून निर्माण करणारे वाङ्मय वा साहित्य हेच खरे 'आत्म्याच्या' साक्षात्काराचे साहित्य अमरपणे होऊ शकेल. तेवढा यशोगिरी चढण्याचे सामर्थ्य माझ्यासारख्याच्या लेखणीत कोठून असणार ? तरीही जीवनाची गति ( इति ) श्री सरळपणाच्या समरसतेतून निर्माण होणारी आहे, ही मुंडकोपनिषदाची सांगी पंडितजींच्या चरित्रकथनातून वाचकाना उमगली तरी माझे समाधान होईल. पंडितजींच्या जीवनाचे ते रहस्य आहे, अशी माझी तरी समजूत आहे.

परिस्थितीच्या परिघातील बिंदुबिंदुवर जीवनात काम करावे लागले तरी माणसाचा ध्येयभूत केंद्रबिंदु सुटता कामा नये. ध्येयकेंद्रापर्यंत प्राप्तकर्तव्याची त्रिज्या पोहोचलीच पाहिजे. तेजस्वी जीवनच त्यामुळे साध्य होते. पंडितजींनी थिऑसफिस्ट म्हणून, आर्यसमाजी म्हणून, स्वदेशीचे व राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते म्हणून, उग्र क्रांतिचे व असहकाराचे संचारक म्हणन, संपादक म्हणून, संघटक म्हणून किंवा 'बहूपाध्य स्वराज्याचे' मंत्रविशारद म्हणून, परिस्थितीच्या परीघातील कोणत्याही बिंदूवर ठाण मांडले असले तरी वैदिकजीवनाच्या तेजस्वी केंद्रबिंदुपर्यंत ते सरळ त्रिज्या तर मारीत आले आहेतच, पण '**वेदान्तीचा अर्थ आम्हासीच ठावा।**' म्हणणाऱ्या सन्त तुकारामाप्रमाणे वैदिकजीवनाच्या आरपार असलेल्या तत्त्वज्ञानाचे शुद्धाचरण विकासवादाने ते करीत आले आहेत; म्हणूनच पंडितजी वेदव्यास ठरले. '**व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्**' असे म्हणतात. '**वेदोच्छिष्टमखावद्विज्ञानमपि।**' असे पंडितजींनी आपल्या अनेक लेखातून दाखविले आहे. या अर्थानेही पंडितजी वेदव्यास आहेत. '**नरदेहाचे पवित्र मंदिर। तयात राहे श्रीजगदीश्वर॥**' हा पंडितजींनी वेदसंदेश घेतला व जगाला दिला.

वेदव्यास पंडितजी सातवळेकर अखिल-भारतीय नरश्रेष्ठांच्या मालिकेतील वैदिकसंस्कृतीचे भाष्यकार ऋषि म्हणूनच इतिहासाने शिरोधार्य मानले आहेत. त्यांचे पवित्र विचार ( ऋग्वेद ), पवित्र कर्म ( यजुर्वेद ), पवित्र उपासना ( सामवेद ) या साधनत्रयीतून निर्माण झालेली त्यांच्या आत्म्याची पवित्र शक्ति ( अथर्ववेद ) यांचे वर्णन जाणीवेने अनुभवपूर्वक करणारा ( '**यो अर्थज्ञ इत सकलं भद्रमश्नुते।**' ) असा पंडितजींचा खरा चरित्रकार असावयास हवा. ते भाग्य लाभेपर्यंत उपरि उल्लेखित सर्व उपकारकांच्या सहाय्याने तयार झालेल्या प्रस्तुत चरित्रावर समाधान मानून घेणे सर्वानाच '**स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधी जन्मति।**' असे म्हणत म्हणत तरी, भागच आहे. पुरुषार्थात हे चरित्र प्रसिद्ध होत असताना, अनेक जिज्ञासूनी, अभ्यासकानी व रसिकानी प्रशंसोद्गार काढले आहेत हे खरे; पण '**परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं। निजहृदि विकसन्तः**' अशा सन्तहृदयांचा तो साक्षात्कार आहे, हे मी कृतज्ञतापूर्वक जाणतो, हे काय सांगावयास हवे ?

—**पुरुषोत्तम पांडुरंग गोखले**, कराड

# तोंड - ओळख

' वेदव्यास पं. सातवळेकर ' या चरित्रग्रंथाचे छपाईच्या व अभ्यासाच्या सोयीसाठी दोन भाग केले असून, पहिला भाग हा ' **जीवनौघ** ' आहे; दुसरा ' **विविधदर्शन** ' आहे. दोन्ही भागांचे पृष्ठांक वेगवेगळे आहेत. त्यातील क्रम असा—

## भाग १ ला


**पंडितजींच्या जीवनिकेची तालिका** :– [ पृ. १ ते ३ ]

१८६७ ते १८९७ पृ. १, १९०० ते १९३९ पृ. २, १९४३ ते १९६६ पृ. ३.

**१ तरावया गावे** :– [ पृ. ५ ते ७ ]

भारतवर्षाच्या सेवेसाठी अस्मिता पृ. ५, सातवळेकरांची जन्मभूमि पृ. ६, ज्ञानेश्वरी जयन्ति तीच सातवळेकर जयन्ति पृ. ७.

**२ प्रगतीचा ओघ अन् कर्तव्याचे स्मरण** :– [ पृ. ८ ते १६ ]

आईचा नवस पृ. ८, ऐतिहासिक घटना पृ. ९, नवा लोकजागर कोलगावापर्यंत पोहोचला होता पृ. १४.

**३ वडिलार्जित वळण व वारसा** :– [ पृ. १७ ते २२ ]

सातवळेकर कुटुंबाची प्रतिष्ठा पृ. १७, घरच्या उत्पन्नाचे काय झाले ? पृ. १९, वडिलांचा संसार पृ. २१, मित्र असावा तर व्यंकटभट हळब्यासारखा पृ. २२.

**४ जन्माचा होरा** :– [ पृ. २३ ते ३१ ]

श्रीपादाचे जातक पृ. २३, जन्मलग्नकुंडली पृ. २४, नवमांश कुंडली, राशिकुंडली पृ. २६–२७, विंशोत्तरीय महादशा पृ. २८, सदावसं तु पौरुषम् हीच मनोवृत्ति पृ. ३१.

**५ सुखाचा म्हटलेला बालपणीचा काळ** :– [ पृ. ३२ ते ३८ ]

पंडितजींचे बालपण पृ. ३२, प्राथमिक शिक्षण पृ. ३३, संस्कारांचे महत्त्व पृ. ३४, माध्यमिक शाळेत फक्त सहा दिवस पृ. ३४–३५, भिक्षुकी व संस्कृत व्याख्यानमंडळ पृ. ३५, बुद्धिच्या चमकेला वाव पुण्यामुंबईस पृ. ३६, अंतरी असाव्या नाना कळा। पृ. ३७, प्राथमिक विद्यार्थ्यास स्वावलंबनाचे शिक्षण पृ. ३७, पंडितजींची चित्रकला ! पृ. ३८.

**६ विद्यार्जनाचा समाप्तिकाल; रोजगाराची सुरवात** :– [ पृ. ३९ ते ४८ ]

चित्रकलेच्या शिक्षणाची मातब्बरी पृ. ४०, पुस्तकांची जपणूक आणि स्वावलंबन–स्वाभिमानाची संपत्ति पृ. ४१, व्हॅन्‌रॉथ व रविवर्मा यांचे चित्रण पृ. ४२, पंडितजींचे समकालीन चित्रकार पृ. ४२, औंधाचा आजार व यमाईचे तीर्थ पृ. ४३–४४, कला सुरलोकतां याति। पृ. ४५, मुंबईतील योगप्रदर्शनाची फटफजिती पृ. ४६, धंद्यासाठी हैदराबाद पृ. ४७–४८.

**७ हैदराबादची हालचाल** :– [ पृ. ४९ ते ६७ ]

आर्यसमाज, थिऑसफी व पंडितजी पृ. ४९–५२, निजामाविरुद्ध कट व क्रांतिकारकांचे आश्रयस्थान पृ. ५३, नवे वारे पृ. ५४, स्वदेशीवरील व्याख्याने रेसिडेंटला झोंबली पृ. ५५, हैदराबाद संस्थान व निजामी मिजास पृ. ५६, सुरतेची कॉंग्रेस पृ. ५७, जयपूरची जेवणे पृ. ५७–५८, वैदिकधर्माची श्रेष्ठता पृ. ५९, रायपूरच्या समांस यज्ञास विरोध पृ. ६०, सयाजीमालेत ग्रंथप्रकाशन पृ. ६०, सन् १८९३ पासून नवा कालखंड पृ. ६१, वैदिक राष्ट्रगीत सरकारने जाळले पृ. ६२–६७.

**८ लिहिले ते उताला आले** :– [ पृ. ६८ ते ८३ ]

' वैदिक यज्ञसंस्था ' मुळे महात्मा मुनशीराम यांचे सातवळेकरावर लक्ष पृ. ६८, गुरुकुल खरोखर ऋषींचा आश्रम पृ. ६९, गुरुकुलासंबंधी इंग्रजांचा संशय पृ. ७०, सिंधी प्राध्यापक आणि वाघ पृ. ७१, सप्ततीर्थावरील पाणलोट पृ. ७१, गुरुकुलातील जीवनास धक्का पृ. ७२, वैदिक प्रार्थनांची तेजस्विता पृ. ७३ ते ८३.

**९ डोंगर पोखरून उंदीर ?** :– [ पृ. ८४ ते ९४ ]

विसाव्या शतकाचे पहिले दशक पृ. ८४, कोल्हापुरी कारभार पृ. ८५, कोल्हापूरचा खटला पृ. ८६, गुरुकुलाला पोलिसगराडा पृ. ८८; गुरुकुलातील शिक्षण राष्ट्रीय पृ. ८९, बिजनोरच्या तुरुंगात पृ. ९०, पुणे स्टेशनवर दंगल व कोल्हापुरास छत्रपतीभेट पृ. ९१, पंडितजी निर्दोषी सुटले, पंडित-

राव नौकरीला मुकले पृ. ९२, महाराष्ट्र–हिंदुस्थानातील दडपशाहीचे परिणाम पृ. ९३.

१० लाहोरचे लाक्षागृह :– [ पृ. ९५ ते १०३ ]

पंजाबातील परिस्थिती पृ. ९५, गुरुकुल विद्यार्थ्यांचा सेवायोग पृ. ९६, लाहोरचा जामानिमा पृ. ९७, लाहोर स्टेशनवर निरोप पृ. १०१, पंडितजी म्हणजे सातवळेकर पृ. १०२, लोकांच्या हृदयसिंहासनावर टिळक पृ. १०३.

११ हिमालयाच्या कडेवर :– [ पृ. १०४ ते ११० ]

सर्वं यज्ञे प्रतिष्ठितम् पृ. १०४, अमरनाथच्या यात्रेत पृ. १०५, बाणासुराचा कैलास पृ. १०७, गंधर्वलोक पृ. १०८, मूकं करोति वाचालं, वाचालं मूकतां नयेत् पृ. १०९, हिमालयवर्णन पृ. ११०.

१२ औंधातील राजकारण :– [ पृ. १११ ते १२५ ]

औंध संस्थान पृ. १११, सातवळेकरांची चौकशी पृ. ११२, लोकमान्य व महात्माजी, पृ. ११३, औंध दरबारचा पंडित व घटनात्मक सुधारणा पृ. ११४, औंधची स्वराज्यघटना पृ. ११५, रक्षकदले व बेचाळीसची चळवळ पृ. ११६, औंधातील पंडितजींची कृतिमूर्ति पृ. ११७, ' राज्य हवे गरीबांचे ' पृ. ११८, औंध विधिमंडळात पंडितजी पृ. ११९, भोरमधील दडपशाही व चळवळ पृ. १२१, कोल्हापुरात एकजिनसी हुकूमशाही पृ. १२२, ग्रामपंचायती सर्वोदयी स्वराज्याचे बीज पृ. १२४.

१३ राष्ट्रीय स्वयंसेवकसंघात पंडितजी :– [ पृ. १२६ ते १२९ ]

पाहून पारखून संचालक पृ. १२६, संघावर वल्लभाई पटेलांचे प्रेम पृ. १२७, संघाचे स्वरूप पृ. १२८, संघाच्या प्रेरणा पृ. १२९

१४ तीन परिषदा :– [ पृ. १३० ते १४९ ]

सातारा जिल्हापरिषद पृ. १३०, आटपाडीची औंध प्रजापरिषद पृ. १३६, दक्षिण महाराष्ट्र संस्थानी प्रजापरिषद पृ. १३६.

१५ लोकजागर, लोकशिक्षण :– [ पृ. १५० ते १५७ ]

स्वाध्यायमंडळाची स्थापना पृ. १५०, पशुहननपूर्वक सोमयागास विरोध पृ. १५१, पुरुषार्थादि मासिके पृ. १५१, ओंकारमांधाताहून आदेश पृ. १५२, दिव्यदृष्टि पृ. १५३, लाकडे विकणारीण प्रवचनकार पृ. १५४, वैदिक संस्कृतीचा उच्छेद झाल्याने नामुष्की पृ. १५५, लोकशिक्षणाने वाचकांची मनोवृत्ति उंचावली पृ. १५६.

१६ काळाची कराल करणी :– [ पृ. १५८ ते १६५ ]

वेदप्रकाशन पृ. १५८, जर्मनीने जागतिक युद्ध पेटवले पृ. १५९, चले जाव–चलो दिल्ली पृ. १६०, औंधसंस्थानचा किल्ला चांगला होता पृ. १६१, विलीनीकरणावर आले पृ. १६२, जग हादरले पृ. १६३, जे का व्यर्थ

परार्थ हानि करिती, ते कोण की दुर्मति पृ. १६४, चर्चचे जागी वेदमंदिर पृ. १६५.

**१७ औंधचा उन्मेष पारडीतही प्रसन्न :–** [ पृ. १६६ ते १७८ ]

वेदसंस्कृतीच्या प्रचार प्रभावासाठी स्थलांतर पृ. १६६, पारडीचे स्वाध्यायमंडळ पृ. १६७, स्वाध्यायमंडळाचे कार्य पृ. १६८, पारडी अशी आहे पृ. १६९, ख्रिस्ती जाळे पृ. १७६.

**१८ स्वाध्यायमंडळाचा रजतमहोत्सव :–** [ पृ. १७९ ते १८८ ]

रुद्रस्वाहाकार पृ. १७९, पंडितजींचे प्रतिष्ठामूल्य पृ. १८१, स्वाध्याय-मंडळाचा इतिहास पृ. १८३, वेदमंदिराचे उद्‍घाटन पृ. १८४, संस्कृत भाषेचे महत्त्व पृ. १८५.

**१९ गायत्रीजपाचे अनुष्ठान व महायज्ञ :–** [ पृ. १८९ ते २१७ ]

धकाधकीचा मामला पारडीस सोडला पृ. १८९, गायत्रीमंत्राचे अनुष्ठान, पृ. १९०, गायत्री महायज्ञ पृ. १९९, संस्कृत संमेलनात काय घडले ? पृ. २००, वैदिक परिषद् पृ. २०१, पंडितजींचे संस्कृत भाषण पृ. २०२, हिंदी भाषण पृ. २०९, वैदिक जीवनाचे पुण्यरहस्य पृ. २१७.

**२० धन्य संसार जाहला :–** [ पृ. २१८ वे २३२ ]

लाहोरची प्रसिद्धि पृ. २१८, पंडितजींचा विवाह पृ. २१९, परस्परं भावयन्तः श्रेयः परम् । पृ. २२०, अतिथिदेव पंडितजी पृ. २२३, सासर–माहेर एकच बाई ! पृ. २२४, सौ. सरस्वतीबाईंची टापटीप पृ. २२५, पंडितजींचा परिवार पृ. २३०.

**२१ पंडितजींचा लोकगौरव :–** [ पृ. २३३ ते २७४ ]

कीर्तीचा आकर्षणबिन्दु पृ. २३३, पंडितजींना पदव्या पृ. २३४, नव्व-दीचा सत्कार पृ. २३५, पंडितजींनी वेदगीत सामान्यापर्यंत पोचविले पृ. २३७, पंडितजींनी चरित्राचा आढावा घेतला पृ. २३८, वैदिक मंत्रांचे नवे बोध पृ. २४०, ऋषिजीवनाची मूर्ति पृ. २४७, शंभराव्या वर्षात पदार्पण पृ. २५०, वेदांची प्रतिष्ठा पृ. २५३, विविध कर्मशील जीवन पृ. २५५, इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः । पृ. २५७, राष्ट्रीय जीवनाचा मृत्यू पृ. २५९, पंडितजींचा डीवेल्ट व गुजरातराज्य यांजकडून सत्कार पृ. २६२; पुण्यातील सत्कारसंभावना पृ. २६७.

**२२ पंडितजींच्या प्राज्ञोक्ति :–** [ पृ. २७५ ते ३०८ ]

❁ ❁ ❁

## भाग २ रा


२३ पंडितजींचे व्यक्तित्व व व्यक्तिमत्व :– [ पृ १ ते १० ]

सोनवांच्या अंगाला सोन्याचा स्पर्श पृ. १, गुणसंपदेने समाजजीवन भूषवावे पृ. २; वक्तृत्वापासून सर्व गोष्टीत स्वयंशिस्त पृ. ४, धर्मजागृतीचे कार्य करावे असे सारखे वाटे पृ. ६, माणसाची पारख व पारखीसारखे मार्ग-दर्शन पृ. ७, सहकार–समन्वयी स्वभाव पृ. ८, शंभरीचे जीवन म्हणजे काय ? पृ. ९.

२४ शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् :– [ पृ. ११ ते १८ ]

आरोग्याचे उपाय पृ. ११, अनुभवाचे दहा नियम पृ. १२ योगाचा अर्थ व उपयोग पृ. १३, इच्छाशक्तीचा प्रभाव पृ. १७, आसने व सूर्य-नमस्कार पृ. १८.

२५ चित्रकार पंडितजी :– [ पृ. १९ ते ३६ ]

चित्रकला व्यवसाय ठरला होता पृ. १९, सातवळेकरांचे सहाय्यक चितारी पृ. २०, जुन्याप्रमाणे नव्याचे ज्ञान हवे पृ. २१, चित्र काढणे म्हणजे हे पृ. २२, चित्रकारांचे वर्ग पृ. २४, पंडितजींचे वैशिष्टच पृ. २५, भारतीय चित्रकला प्रवृत्ति पृ. २६, कलेची रसिकाला साद पृ. २७, चित्रकलेच्या पद्धति पृ. २८, पंडितजींचे बारकाव्याने चित्रण नजरेत पृ. २९, पंडितजींचे शिष्य पृ. ३३, इंग्रजी कोर्टात दाद मागणे नाही पृ. ३४, वेदाकडे का वळणे पृ. ३५.

२६ राजकारणी पंडितजी :– [ पृ. ३७ ते ४८ ]

परिस्थितीचे परिणाम पृ. ३७; धी, श्री आणि स्त्री क्रांति घडविताल पृ. ३९, राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी व बहिष्कार पृ. ४०, ब्रिटिश रियासतीचा रोष पृ. ४१, वैयक्तिक जीवन समाजसन्मुख पृ. ४५, पंडितजींच्या राजकीय जीवनाचा बोध पृ. ४७.

२७ लोकभ्रमान्तक पंडितजी :– [ पृ. ४९ ते ६० ]

चिपळूणकर परंपरा पृ. ४९, विंचवावर मंत्र पृ. ५०, भुताटकी पृ. ५२, पशुहत्येस विरोध पृ. ५५, पंडितजींचा विजय पृ. ६०.

२८ स्वाध्यायमंडळाचे कार्य :– [ पृ. ६१ ते ६७ [

वेदवाङ्मयाचे प्रकाशन व चारशेहून अधिक पुस्तकांचे प्रकाशन पृ. ६१,

उपनिषदांचा स्वतंत्र दृष्टिकोनातून विचार पृ. ६५; संस्कृतभाषेच्या प्रचारार्थ पुस्तके व परीक्षासत्रे पृ. ६५, देवतासंहितांचे संकलन पृ. ६६.

२९ संपादक पंडितजी :– [ पृ. ६८ ते ७६ ]

संपादन पृ. ६८, पुरुषार्थाचे विशेष पृ. ६९, बुद्धिवादाधिष्ठित दृष्टिकोन पृ. ७०, कार्यक्षमतेची तयारी पृ. ७१, ' वाणी ' ची प्रतिष्ठा पृ. ७२, ' जिविचे तुटो देऊ नयेत । ' पृ. ७३, खेडूत लोकशिक्षण पृ. ७४, पत्रकाराचा धंदा पृ. ७६.

३० सातवळेकर साहित्याचे सिंहावलोकन [ पृ. ७७ ते ९१ ]

साहित्याचा अफाट विस्तार पृ. ७७, साहित्याचे वर्गीकरण पृ. ७८, ' न लगे पांग बहुज्ञतेचा ' पृ. ७९, देशकालपरिस्थितीशी सामंजस्य पृ. ८०, मातृभाषेप्रमाणेच राष्ट्रभाषेत पृ. ८१, सामान्याला दीपस्तंभासारखे व विद्वान् विचारवंताना विद्युत्प्रभेसारखे सातवळेकर साहित्य पृ. ८२, ठळकग्रंथ पृ. ८२, मामूलं लिख्यते किंचित् तरी स्वतंत्र विचारसरणीने पृ. ८८, पंडितजींचे प्रमुख ग्रंथ पृ. ८९.

३१ समकालीनात पंडितजी : [ ९२ ते १०४ ]

बेझंट, रहिम पृ. ९३, बेनेट–कुर्ट–कृष्णलाल–मोहनलाल–के. नागेश्वरराव–वैद्य पृ. ९४, गणपतराव जोशी-पिल्सहस्की पृ. ९५, रामपालसिंग–भिसे–सन् यत् सेन्–बाल्डविन् पृ. ९६, अभेदानंद–सारडा–निवेदिता पृ. ९७, ' सहवीर्यं करवावहै ' प्रणालीचे पालक पृ. ९८, पलुस्कर–पिंगळे–परमानंद पृ. ९९, लजपतराय–विजापूरकर–हरकिसनलाल–भार्गव पृ. १००, टेंभेस्वामी–सरोजिनी नायडू–वामनराव जोशी–अँड्रयूज पृ. १०१, काणे–गोपीराज–हंसराज–दुनीचंद–चित्राव–चट्टोपाध्याय पृ. १०२, केशवराव–तुळजापूरकर पृ. १०३, परस्पर सहकार व सामाजिक विवेकोत्थान पृ. १०३, पाश्चात्यसंस्कृति परिचयाचा परिणाम पृ. १०४.

३२ वेदसेवा व वेदोक्तसंदेश :– [ पृ. १०५ ते १३५ ]

राममोहन रॉय व न्यायमूर्ति पृ. १०५, दयानंद विवेकानंद पृ. १०६, राष्ट्रधर्माच्या बाजू पृ. १०७, वाणीमागे करणीची पुण्याई आवश्यक पृ. १०८, पंडितजींची वेदसेवा पृ. १०९, वैदिक समाजव्यवस्था पृ. ११०, ' पितृदेव मनुष्याणां वेदचक्षुः सनातनम् । ' पृ. १११, मॅक्समुल्लरची देणगी आणि वेदसेवेची परंपरा पृ. ११३, हिंदुस्थानातील बायबल पृ. ११४, महाराष्ट्रातील वेदार्थयत्न पृ. ११६, वेदार्थ करण्यात पंडितजींनी कोणासच गुरु केले नाही. पृ. ११७, राष्ट्रीय पंडित पंडितजी पृ. ११८, पंडितजींचे वेद प्रतिपादन पृ. ११९, वैदिक काळचे पुरोहित राजकारण करीत पृ. १२०, शरीर हीच इंद्रसभा पृ. १२१, वेदांचे रक्षण ब्राह्मणांनी केले पृ. १२२, वेदांचा परिस्थितीसापेक्ष प्रबोध पृ. १२३, मानवाची पूर्णता हेच वेदाचे कार्य पृ.

१२४, मानवता पूजनाचे व्रत पृ. १२५, जगाला देण्यासारखी भारतीय संस्कृति पृ. १२८, जीवन संस्कृतीची मूलतत्त्वे पृ. १३१, पंडितजींचे पूर्वसूरी पृ. १३२, राष्ट्रदेवो भव पृ. १३४.

३३ उपनिषदांचे उत्कीर्तन :– [ पृ. १३६ ते १४४ ]

उपनिषदे म्हणजे काय ? पृ. १३६, उपनिषदांचे विवेचक पृ. १३७, अविद्या विध्वंसिनी ब्रह्मविद्या पृ. १३८, गीतोपनिषद् पृ. १४२, उपनिषदांचा केंद्रबिन्दु पृ. १४४.

३४ गीतेतील पुरुषार्थप्रबोधक पंडितजी :– [ पृ १४७ ते १६५ ]

गीताधर्म पृ. १४५, गीतेतील एकोणतीस विषय पृ. १४६, संसार हा संग्राम आहे पृ. १५१, गीतेचे निश्चित मार्गदर्शन पृ. १५२, गीतेतील समन्वय पृ. १५४, गीता मते योग पृ. १५६, गीता पुरस्कृत कर्मयोग पृ. १५७, नराचा नारायण होणे हे मनुष्यजन्माचे साध्य पृ. १५९, गीता पुरुषार्थ-बोधिनी पृ. १६२, उद्धरेदात्मनात्मानम् ही गुरुकिल्ली पृ. १६४.

३५ रामायण-महाभारतातून राष्ट्रनिर्माण :– [ पृ. १६५ ते १७७ ]

वाल्मीकि रामायणाच्या अपेक्षा पृ. १६६, रामायणाचा काव्यमय अर्थ पृ. १६९, महाभारत हा सर्वप्राचीन विद्यांचा प्रतिनिधीभूत ग्रंथ पृ. १७०, पंचम वेद महाभारत पृ. १७२, भरतखंड कसे झाले ? पृ. १७३, व्यास म्हणजे विल्हेवारी व विस्तार करतो तो पृ. १७४, स्वाभिमान, स्वावलंबन व शील राष्ट्रीय जीवनात चमकले पाहिजे पृ. १७६, धर्मशास्त्रविवेचक ग्रंथ म्हणजे स्मृति पृ. १७७.

३६ पंडितजींची धर्मश्रद्धा :– [ पृ. १७८ ते १९० ]

दीर्घायुष्याचे आधार पृ. १७८, पंडितजींचा व्यास पृ. १७९, भारतीय संस्कृतीची महान् तत्त्वे पृ. १८०, सेक्युलॅरिझम् पृ. १८१, त्रिनेत्र शंकरा-प्रमाणे गुरु पृ. १८२, आर्यधर्मप्रसाराच्या खुणा पृ. १८४, ईश्वरपूजेचा विधि पृ. १८६, धर्मस्थापनेचे प्रयत्न पृ. १८७, धारणाद्धर्म इत्याहुः । धर्मो-धारयते प्रजाः ॥ पृ. १९०.

३७ लोकदृष्टीतून पंडितजी [ पृ. १९१ ते २०० ]

मूल्यमापनाच्या तऱ्हा पृ. १९१, प्रतिक्षण ब्राह्मण्यसंस्काराने पृ. १९२, अवि-कल काव्यकला पृ.१९३, वैदिकसंस्कृति-संस्कृत पृ.१९४, प्रकाण्ड विद्वान् पृ. १९५, तनमनधनाने पुरुषार्थी पृ. १९६, चित्रकार, क्रांतिकारक, योगासनाचे शिक्षक; विशाल विचारातील निर्भयपणा व साधी राहणीचा समाजसुधारक पृ. १९७, ऋषितुल्य पृ. १९८, राष्ट्रीय जीवनसंग्रामात जेतृत्व यावे ही आकांक्षा पृ. १९९, स्तुतीने किंवा निंदेने ' हुराळे ना, उराळे ना । ' असा स्थितप्रज्ञ पृ. २००.

३८ पंडितजी सातवळेकरांची यशोलोचना :– [ पृ. २०१ ते २०५ ]

जीव हा चिच्छक्तिचा अमृतपुत्र पृ.२०१, पंडितजींच्या चरित्राचे सिंहाव-लोकन पृ.२०२, न हि कल्याणकृत् कश्चित दुर्गतिं तात गच्छति । उलट ब्रह्मर्षि होतो हे प्रबोधन पृ. २०७.

भाग : १ :


# वेदव्यास पंडितजी सातवळेकर

## जीवनौघ



पंडितजींची काही उल्लेखनीय रेखाचित्रे









# पंडितजींच्या जीवनिकेची तालिका

१८६७ सप्टेंबर १९ ( भाद्रपद कृष्ण ६ शके १७८९ ) सावंतवाडी संस्थानातील कोलगाव येथ जन्म.

१८७५ नृसिंहवाडीस मौंजीबन्धन व सावंतवाडीस शिक्षणासाठी श्री मामा पेंढरकर यांजकडे वास्तव्य.

१८८२ मराठी ६ वी उत्तीर्ण. आर्थिक अडचणीमुळे, सहा दिवस हायस्कूलात बसल्या-नंतर इंग्रजी क्रमिक शिक्षणास रजा.

१८८३ भाषान्तर–पाठमालेवरून लुकतुके यांचेकडे इंग्रजी शिक्षण सुरू.

१८८४ वे. चिन्तामणशास्त्री केळकर यांचेकडे संस्कृतचे अध्ययन सुरू.

१८८८ सावंतवाडीस संस्कृतवाग्वर्धिनीचे आधारस्तंभ.

१८८९ माणगावचे साधले यांची कन्या काशीताई यांच्याशी विवाह. ( २ ) सावंतवाडीच्या चित्रशाळेत चित्रकलेच्या पात्रतासिद्धीची तयारी.

१८९२ मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ् आर्टस्‌मध्ये प्रवेश, ( २ ) ढोंगी योग्याची शास्त्रीय फजिती, ( ३ ) वैदिक ऋचांचा अर्थसंदर्भ सातवळेकरानी लावला तो लो. टिळकानी केसरीच्या अग्रलेखांत घेतला. ( ४ ) लोकमान्यांचे अनुयायी, ( ५ ) चित्रकलेतील प्राविण्याबद्दल सातवळेकराना मेयो–मेडल्.

१८९४–९७ दरसाल तीन वार ते एक महिना औंध येथील श्रीमंत पंतप्रतिनिधी यांच्याकडील उत्सवातील नाटकाचे पडदे रंगविले व दुसरीही चित्रे केली.

१९०० (निजाम) हैदराबादेस प्रयाण व चित्रकलेच्या दुकानास आणि सार्वजनिक कार्यास नियमित सुरवात.

१९०५ 'विवेकवर्धिनी' विद्यालयाची स्थापना. (२) चित्रकलेमुळे निजाम सातवळकरांचा चाहता. (३) हैदराबादच्या थिऑसॉफिकल सोसायटीचे व आर्यसमाजाचे मार्गदर्शक सभासद, (४) वेदाध्ययनाच्या दृष्टिकोनातून स्वदेशी प्रचार.

१९०७ वैदिक राष्ट्रगीत मुंबईस मराठीतून व अलाहाबादेस हिंदीतून पुस्तकरूपाने प्रसिद्ध की ताबडतोब इंग्रजसरकारने जप्त केले. (२) हैदराबादेतून हद्दपारीचे हुकूम निघण्यापूर्वीच तेथून झटक. (३) सुरत काँग्रेसमध्ये लोकमान्यांच्या गोटात. (४) कांगडीच्या गुरुकुलात चित्रकलेचे व वेदवाङ्मयाचे शिक्षक.

१९०८ कोल्हापूरच्या विश्ववृत्तात 'वैदिक प्रार्थनांची तेजस्विता' हा लेख व त्याबद्दल खटला. (२) खटल्याची वार्ता कळताच हजर होण्यासाठी गुरुकुलातून दक्षिणेत उतरले पण मित्रांचे सल्ल्यावरून 'गुप्त' राहिले. (३) कोकोनाडाकडील पीठापुरम् संस्थानचे चित्रकार.

१९०९ कोल्हापुरास राजद्रोहाच्या खटल्यासाठी खुनीदरोडेखोरासारखे कैदी पण शेवटी निर्दोषी म्हणून सुटका. (२) लाहोर येथे चित्रकारीचे दुकान थाटले.

१९१०–१९१७ पंजाबच्या शहराशहरातून वेदवाङ्मयाधारे व्याख्याने. (२) होमरूल लीगच्या नि गदरचळचळीच्या कार्यकर्त्यास प्रोत्साहन. (३) राज्यपाल ओडवायरने हद्दपारीचा हुकूम काढण्यापूर्वी, भागीदाराकडे चित्रकारीचे दुकान सुपूर्त करून गुंगारा.

१९१८ औंधास वास्तव्य. (२) वैदिक संस्कृतिची सेवा करण्यासाठी स्वाध्याय–मंडळाची स्थापना.

१९१९ वैदिकधर्म हे हिंदी मासिक सुरू.

१९२० सातारा जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष.

१९२४ पुरुषार्थ मासिक सुरू. (२) वेदसंहितांच्या शुद्ध प्रसिद्धीकरणाची तयारी.

१९२७ औंधसंस्थानात ग्रामपंचायतीना रूप देण्याच्या १९२२ पासूनचे प्रयत्नात यश. (२) शिवाजीचा त्रिशतसांवत्सरिक जन्मोत्सव.

१९३० सातारा जिल्हा–परिषदेचे अध्यक्ष.

१९३९ महात्मा गांधीनी मंजूरी देऊन औंधसंस्थानात सुरू झालेल्या ग्रामपंचायतीवर अधिष्ठित अशा प्रजातंत्राच्या कारभाराचा सुधारणा–कायदा बनविण्यात बॅ. अप्पासाहेब पंतांच्या बरोबरीने पंडिजींचा हात असल्यामुळे, पूर्वी औंध

विधिमंडळाचे पंडितजी सभासद असत ते आता सुधारणा कायद्याचे व्यवहार-शुद्धिसाठी पर्यविक्षक व मार्गदर्शक.

१९४३ व्हाइसरॉयचे प्रतिनिधीकडून आळसंद गावी ग्राम संरक्षक दलाची अनपेक्षित कसौटी.

१९४५ ब्रिटिश रियासतीत चाललेल्या चलेजावच्या चळवळीतील गुप्त्याना आश्रय, आधार व मुद्रणसहाय्य केल्याचे तीन वर्षानंतर समाधान.

१९४८ गांधीवधोत्तरच्या ब्राह्मणविध्वंसनाच्या लाटेचा तडाखा पण त्यातून निसट. ( २ ) संस्थानाच्या विलीनीकरणानंतर औंधाहून पारडीस. ( ३ ) पारडीस गुजराथी मासिक सुरू.

१९५४ स्वाध्याय मंडळाचा रजत महोत्सव.

१९५५ गायत्री–महायज्ञ.

१९५९ संस्कृत पंडित म्हणून राष्ट्रपतीकडून १५०० रु. चे वर्षासन.

१९६६ जन्मशताब्दिच्या प्रारंभोत्सवाचे समारोह.

: १ :

# तरावया गावे !

भारताच्या सेवेसाठीच आपली अस्मिता आहे असे महाराष्ट्राच्या इतिहासाने मानले आहे. त्या संदर्भातच महाराष्ट्राने भारताला दिलेल्या दैदिप्यमान नररत्नात वेदमहर्षि पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांची गणना आहे. वैशिष्टचपूर्ण व्यक्तिमत्त्व, सुदृढ व निकोप शरीरयष्टि, प्रशान्त व धीरगंभीर मुद्रा, दुर्दम्य उत्साह, अखंड कार्यव्यापृतता, निर्व्याज ऋजुता, अव्यभिचारी स्नेहशीलता, जाज्वल्य वैदिकधर्मनिष्ठा, विशुद्ध व रेखीव जीवनक्रम, विरुद्धाविषयीही संयमशील आदर इत्यादींचे मूर्तिमन्त प्रतीक म्हणून महामहोपाध्याय सातवळेकरांची सर्वत्र प्रसिद्धि आहे.

' भारतवर्षाची सेवा हाच ज्यांचा धर्म व व्यवसाय असे निःसंशय म्हणता येईल अशा दुर्लभ विभूतीत पंडित सातवळेकरांची गणना करावी लागेल. पं. सातवळेकर हे आधुनिक काळातील वेदाचार्य होत. त्यानी हातीं घेतलेले वेदोद्धाराचे व्रत हा एक महायज्ञ आहे. ' असा लोकनायक माधवरावजी अणे यांच्यावर ज्यांच्या चरित्र–चारित्र्याचा ठसा आहे, त्यांचे ते चरित्र 'काही तरावया गावे।' असा ओढा मनाला लागला तर नवल काय ?

'साहसे श्रीः प्रतिवसति।' अगर 'साहस शून्य तर हाती शून्य' (Nothing Venture, Nothing have) या संस्कृत–इंग्रजी वचनापैकी कशाचेही मूर्तिमंत प्रतीक म्हणून महाराष्ट्राच्या जडण-घडणीच्या वैचारिक शिल्पकारात कोणाकडे चटकन् विवेकी मंडळींची नजर वळत असेल तर त्यात चलाख, तल्लख, वामनमूर्ति, पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर या वेदोनारायणाचे स्थान फार अग्रेसर आहे.

**सदा सर्वदा देव सन्निध आहे । कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ॥**

या समर्थ वचनाचा प्रत्यय–बोध हवा असणारानी पं. सातवळेकरांच्या चरित्राचे मनन केल्याशिवाय राहूच नये. ' भरंवसा देवावर अन् ना कुणाची डर ' ( Trust in God and be not daunted ) हेच प्रबोधन ते मनन देईल. आदर्श जीवनच राष्ट्राच्या भावी संतानामध्ये बलवती आशा उत्पन्न करून तिला कर्तव्यमार्गावर राखत असते.

भारताचा पश्चिम किनारा आणि त्यालगतचा भूभाग ( मुंबईचा परिसर अपवाद धरून ) बहुधा खडकाळ व दरिद्री म्हणूनच इतिहासानुभवाने नमूद केला आहे. त्या भूभागातील रत्नागिरी जिल्ह्याने बुद्धिमंतांची जी रत्ने भारतभूमीला पुरवली त्यानी भारतीय इतिहास घडविला आहे. सह्याद्रिच्या दक्षिणेच्या टोकास हिरण्यकेशी नदी माधवगिरीच्या बाजूने वहात जाते. त्यावरील पठाराच्या पायथ्याने दक्षिणकडे जाणारा मार्ग ज्या खिंडीतून खालच्या बाजूने जातो, त्या खिंडीत पाऊल टाकताच, निसर्गाचे भव्य स्वरूप निदर्शनास येते. तो फोंडाघाटाचा रमणीय प्रदेश म्हणजेच भूतपूर्व सावंतवाडी संस्थान. १८१२ सालापासून पंढरपूरचा तह होऊन दक्षिण महाराष्ट्रातील छत्रपतींचे आणि पेशव्यांचे हस्तक संस्थानिक हे छत्रपतींच्या गोतावळचा संस्थानिकासुद्धा ब्रिटिश रियासतीचे ताबेदार झाले होते. तरीसुद्धा सावंतवाडी संस्थान तेथपासून एक शतकाच्यावर काळ प्रत्यक्ष ब्रिटिशसत्तेखालीच होते. ब्रिटिश सरकारच्या ट्रस्टीशिपखाली असल्यामुळे म्हणा, किंवा ज्याला ' संस्थानी अंमल ' म्हणतात, तशा प्रकारच्या मनःपूत दडपेगिरीच्या कारभाराचा परिचय नसल्यामुळे म्हणा, १९२४ पर्यंत संस्थानात राजकीय वा प्रजाकीय चळवळ मुळीच नव्हती. सावंतवाडी संस्थान हे बेळगाव जिल्ह्याला लागून होते; संस्थानचे उत्पन्न साडेसहा लाख रुपये व लोकसंख्या दोन लाखपर्यंत होती. तिकडील प्राणिमात्र स्वाभाविकच भव्य व तेजःपुंज शरीरयष्टीचा, प्रत्युत्पन्नमतीचा, आणि निरलस उद्योगशीलतेचा आढळतो. त्या शीलजागृत प्रदेशातच स्वच्छ आणि टापटिपीचे असे सातवळेकरांचे घराणे नाव करून राहिले आहे. सावंतवाडीपासून दीड मैलावर असलेल्या कोलगावी स्थायी झालेल्या सातवळेकर घराण्याच्या शाखेतील दामोदरभट्ट व सौ. लक्ष्मीबाई या सत्त्वशुद्ध दम्पतीच्या पोटी शके १७८९ भाद्रपद कृष्ण षष्ठीस म्हणजे १९ सप्टेंबर १८६७ ( संवत् १९२४ ) गुरुवार रोजी जो कुलदीपक जन्मास आला, तोच श्रीपाद पुढे आपल्या वैदिक घराण्याची तेजस्वी परंपरा चालवित पंडितजी सातवळेकर म्हणून जगास माहित झाला. जेथे जाईल तेथे व जे काम हाती घेईल त्यात अखरचे यश मिळविणाऱ्या जीवनिकाच नवजीवनाचा संदेश देण्यास समर्थ असतात. त्यातीलच सातवळेकरांची जीवनिका एक होय, याचा प्रत्यय पाहण्यासारखा आहे. वेदोपनिषदे म्हणण्या–विवरण्याचा अधिकार मूळ त्रैवर्णिकास असता, त्यात कालाच्या वक्रगतीने काटछाट झाली. म्हणून **' सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः '** भगवान् श्रीकृष्णाने अर्जुनास—

**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ।**

असे आश्वासन देणारी गीता सांगितली. तीच गीता आर्य, वैदिक वा हिंदु-धर्माचा एकमेवाद्वितीय ग्रंथ ठरली; तरीही संस्कृतभाषेमुळे वेदापासून सर्वांनाच कृपणता चिटकली. म्हणून—

**' माझा मराठाचि बोल कौतुके । अमृतातेही पैंजा जिंके । '**

अशा आत्मविश्वासाने गीतेच्या **' भाष्यकाराते वाट पुसतु '** म्हणून ज्ञानेश्वरानी जनसामान्यासाठी ज्ञानेश्वरी लिहिली. ती शके ' बाराशे बारोत्तरे ' मध्ये. ती एकनाथानी शुद्ध करून शके १५०६ मध्ये भाद्रपद वद्य षष्ठीस दिली. भागवत सांप्रदायी या तिथीस ज्ञानेश्वरी–जयंति मानतात. या जयन्तिस जन्मलेल्या सातवळेकरानी वेदभाष्य केले, हा योगायोग होय.

: २ :

# प्रगतीचा ओघ अन् कर्तव्याचे स्मरण

नमो महद्भ्यो नमः शिशुभ्यो नमो युवभ्यो नम आवटुभ्यः ।
ये ब्राह्मणा गामवधूर्तलिंगाः चरन्ति तेभ्यः शिवमस्तु राज्ञाम् ॥
( भागवत ५।१३।२३ )

**एवढ्या** विनम्र भावनेच्या कोलगाव ( जि. रत्नागिरी ) येथील सात्त्विक भट घराण्याचे नाव सातवळेकर हे केव्हा आणि कसे रूढ झाले, हे एक राहून गेलेले गूढ आहे. एवढेच नव्हे तर, दामोदरपंतांच्या पत्नी लक्ष्मीबाई याना झालेली पहिली पहिली मुले अतिअल्पवयीन का ठरावी, हे कोडे तत्कालीन बालमृत्यूंच्या प्रचलित संख्येकडे नजर गेली तरच थोडे उलगडते. स्त्रीजन्माची तृप्ति मातृत्वाशिवाय नाही आणि मातृत्वाची पूर्ति शिशुसंगोपनातील गुणवत्तेशिवाय नाही. ती मनीषा तृप्त व्हावी म्हणून लक्ष्मीबाईनी नरसोबावाडीचे दत्तात्रयास नवस केला की, ' मुलगा होवो, मी त्याची मुंज, देवा, तुझ्या पादुकाजवळ करीन. ' आणि मुलगा झाल्यावर त्याचे नाव नवसातील महती आपल्या लक्ष्यात रहावी आणि मुलाचे संगोपन झाल्यावर त्याने कसे व्हावे, याची पूर्वसूचनाच जणो, असे मुलाचे नाव ' श्री–पाद ' ठेवले.

मनुष्य जन्माला येतो तो कोठे, का, कसा, पूर्वयोजनेप्रमाणे येतो की नाही, हे पूर्वजन्म, पुनर्जन्म मानणाऱ्या हिंदूनाही बिनचूक गणिताने जगास अजून तरी समजाविता आलेले नाही. ' अन्ते मतिः सा गतिः । ' अशा सारखी काही वचने सापडतात; पण त्या ' अन्ते मतिः ' ची जाणीव असणाराना पुढल्या जन्मी जाणारा आत्मा अमुक अमुकच प्राणी होईल हे जसे सांगता येत नाही, तसेच जन्मलेल्या

मुलाच्या जातकलक्षणावरूनही त्याची पूर्वजन्मीची ' अन्ते मतिः । ' अमुक अमुकच असली पाहिजे, असेही गणित करता आलेले नाही. एवढेच नव्हे तर ' **कर्मानुगो गच्छति जीव एकः ।** ' या वचनाचाही उलगडा गणिताच्या बिनचूकपणाने पूर्व-जन्म-पुनर्जन्माचे बाबत कोणी करून दाखविलेला आढळत नाही. येऊन जाऊन, डोळयादेखत घडणाऱ्या जीवनक्रमांचा आढावा घेऊन व दृढभाजक काढून एवढेच निश्चित करण्यात आले आहे की मनुष्य प्रथम परिस्थितीचे प्रयोगशाळेत आकार घेत असतो आणि स्वताचा आकार घेत असताच, त्याला आक्रमशक्ति अशी येत जाते की त्या आक्रमशक्तीच्या प्रयोगशाळेत परिस्थितीला नवा आकार देऊन स्वताचा, समाजाचा, राष्ट्राचा अगर जगाचाही इतिहास तो घडवू शकतो; म्हणूनच कर्णाच्या—

' दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् । '

या वचनास अमरत्व आले आहे. पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्याही जीवनाचा चित्रपट डोळयापुढे आणल्यावर, जाणीवपूर्वक जीवनव्यवहार ते करू लागण्यापूर्वी कोणत्या परिस्थितीने त्यांची प्राथमिक घडण घडविली, याचा स्थूल विचार तरी केल्याशिवाय राहवत नाही. परिस्थितीच्या पाळण्यात मुलाचे पाय कसे दिसतात हे पाहणे जितके मनोरंजक तितकेच प्रबोधकही असते. जेथे राजकीय व्यवस्था, ब्रिटिशांचा विश्वस्तनिधि म्हणून एक शतकाच्यावर होती, त्या सावंतवाडी संस्थानातील कोलगावापर्यंतही, भारताच्या व महाराष्ट्राच्या घडणीतील ऐतिहासिक घटनांचा परिणाम जाऊन पोहोचला होता. त्या गोष्टींचा आढावा आपण मनश्चक्षूपुढे आणू लागलो तर आपणास काय आढळते? चंद्रगुप्त-हर्षानंतरच्या महानिद्रेसारख्या भारतीय इतिहासातील रजपूत-शिखांचे पराक्रम आणि शिवसमर्थ महाराष्ट्रराज्य यांच्यासारखी सुखस्वप्ने पार विरून गेलेली होती व विपरीतकाळ आला होता. पहा की—

सतराव्या शतकाच्या अरुणप्रभेपासून, किंबहुना १४९८ त वॉस्को डि गामाचे पाय हिंदुस्थानच्या किनाऱ्याला लागल्यापासून ' हिंग-जिरे-मसाला, चार शिंगे कशाला ?' करीत आलेले युरोपचे तागडीतुकाप्पा हिंदुस्थानात हळूहळू ओसरीवरच्या भटाप्रमाणे आपले पाय पसरू लागले होते आणि तागडीच्या संरक्षणार्थ तलवार व तलवारीच्या बळकटीसाठी लहानमोठे तख्त, येथे प्रस्थापित करण्यास धजावले होते. डच, फ्रेंच, पोर्तुगीज व इंग्रज यानी थोडेफार यश आपापल्यापरी मिळवता मिळवता, इंग्रजानी सर्वांवर मात केली; आणि १७५७ चे प्लासीच्या लढाईपासून पुढेमागे सगळया हिंदुस्थानला आपल्या अंकित करण्याचा डाव इंग्रजच साधणार हे इतिहासाचा ओघ बोलून चुकला.

इंग्रजांचे हिंदुस्थानावरील सार्वभौमत्व हे एकोणिसाव्या शतकाच्या उदयोन्मुख

अवस्थेत मूर्तस्वरूप धारण करू लागले होतेच. तथापि ते मुकाट्या मुकाट्या सहन करावे, अशी सगळ्या हिंदुस्थानातच वृत्ति नव्हती. ती हिंदुस्थानचा इतिहास रंगविणाऱ्या महाराष्ट्रात कशी असणार ? चतुरसिंग भोसले, उमाजी नाईक प्रभृतींच्या छोट्यामोठ्या आवृत्त्या वरचेवर, ठिकठिकाणी व प्रसंगाप्रसंगाने निघत होत्याच. कोल्हापूरकडे जी गडकऱ्यांची बंडे झाली, त्यात शेजारधर्म म्हणून का होईना, रत्नागिरी जिल्ह्याला भाग घ्यावाच लागला होता. वानगीपुरतेच बोलावयाचे झाले तरी सावंतवाडीकडील गडांचे देता येते. इंग्रजांच्या विश्वस्तपणावर सावंतवाडी संस्थानची भाग्यरेखा जेथे सर्वस्वी अवलंबून होती, तेथे सावंतवाडी जवळच्या मनोहरगडापासून दोनशे यार्डावर असलेल्या मनसंतोषगडापर्यंत काय चालले होते ? या दोन किल्ल्यात एक मोठे खोरे आहे. मनसंतोषगडावर जाण्याकरता पूर्वी खडकातून पायऱ्या खोदल्या होत्या. पण आपल्या पायऱ्याना पाय लावणारे भलतेच लोक आहेत आणि—

**' असुनि खास मालक घरचा, म्हणति चोर त्याला । '**

अशी अवस्था आपल्याला येऊ पहात आहे, हे लक्ष्यात आल्याबरोबर १८४४ च्या गडकऱ्यांच्या बंडात मनोहर गडाबरोबरीने मनसंतोषगडही सामील झाला होता. सावंतवाडीच्या ईशान्येस चौदा मैलावर रांगणा अथवा प्रसिद्धगड; याच्या दक्षिणेच्या एका पंचवीसशे फूट उंचीच्या डोंगरावर असलेला मनोहरगड पांडवानी बांधला असल्याची समजूत आहे; तरी '**मामनुस्मर युध्य च।**' यापेक्षा पांडवानी दुसरी आपली नामोनिशाणी तेथे राखल्याचे दिसत नाही ! गडकऱ्यांच्या बंडात दोन महिने हा किल्ला प्राणपणाने लढला होता. अखेरीस पोफॅमने त्याचा पराभव केला व १८४५ मध्ये जनरल डिलामोटी याने हा ताब्यात घेतला व पुढे वाडीकरास परत दिला ! हे सगळे खरे असले, तरी नवीन येणाऱ्या पारतंत्र्याला प्रतिकार करण्याची त्या किल्ल्यांची उबळ डोळ्याआड कशी करून चालेल ? ती उबळ इंग्रजांच्या जागत्या पहाऱ्यात उठाव घेत होती ना ? रेडी ऊर्फ यशवंतगड हा मजबूतीचा किल्ला १८१७ मध्ये सावंतांच्या ताब्यातून पोर्तुगीजानी घेण्याचा प्रयत्न केला असता तो न साधल्यामुळे इंग्रजानी १८१९ मध्ये तो ' चाच्यांचा ' बंदोबस्त करण्यासाठी संभाजी सावंतापासूनच घेतला होता की !

त्यानंतर १८५७ चा स्वतंत्र होण्याचा सार्वत्रिक उठाव भारतात झाला. त्यात यश न आल्याने, परमेश्वरी अधिष्ठान नाही म्हणून आपली चळवळ फसली, अशी समजूत—

**' ध्येयं वा साधयेत्, देहं वा पातयेत् । '**

हे न साधलेल्यांची झाली आणि ते अक्षरशः तपश्चर्येला लागले व घरी म्हणून परतले नाहीत ! सामान्य जनता तर—

**' दिधली स्थिति देवाने, तीतच सुख मान रे । '**

अशा वृत्तीची झाली. १८१८ त पेशवाई गेल्यानंतर साताराची मुख्य मराठेशाहीची गादी तीस वर्षे टिकली हे खरे; पण इंग्रजानी अनेक कुलंगडी उत्पन्न करून, प्रतापसिंह महाराजाला जे १८३९ त हलविले होते, त्याबद्दल रंगोबापूजीनी इंग्लंडात पार्लमेंटामध्ये प्रतापसिंहावरील अन्याय उघडा करून न्याय मागितला असताही, इंग्रजानी आपले ते पाऊल १८४८ पर्यंत मागे घेतलेच नव्हते ! त्यामुळेच १८५७ च्या उठावात रंगो बापूजीनी भाग घऊन दख्खन हलविण्याचा प्रयत्न केला होता. त्याचा शेवट होऊन रंगो बापूजीही 'परमेश्वरी अधिष्ठान' शोधावयास लागल्यावर, लष्करी पेशा व त्या पेशाची ताजी मिळकत ही नाहीशी होऊन, केवळ जमीनजुमल्याच्या व सावसावकारीच्या उत्पन्नावर सर्व भिस्त येथून तेथून सर्व थरांचे लोकांची पडली ! दिवसेदिवस तेही उत्पन्न अधिकाधिक अनिश्चित होऊ लागले. पुढे पुढे ते अपुरे पडू लागल्यावर वाण्याची उचापत आणि सावकाराचे कर्ज कपाळी येत गेले ! कर्जास व्याज पंचवीस टक्केपर्यंत सुद्धा द्यावे लागे !

भटाभिक्षुकाविषयी रावबाजीपासूनच एकतऱ्हेची हीनबुद्धि प्रचलित झाली होती. लोकांच्या व कचेऱ्यांच्या जागा आणि मंडईचा रस्ता एकच असल्यामुळे बाजाराचे दिवशी रस्त्यातून जावे तर गुराढोरांचा उपद्रव, कडेने जावे तर भटाभिक्षुकांचा उपद्रव ! कारकुनी पेशाच्या ब्राह्मणांची स्थिति मात्र अशी नव्हती. जुना कारकुनी फड गेला, त्याच्याऐवजी इंग्रजी ऑफीस आले इतकेच ! इंग्रजी अमदानीच्या पहिल्या काळात साहेबलोक आपल्या हेडक्लार्क, शिरस्तेदारावर फार अवलंबून असत.

इंग्रजानी पेशवाईनंतर नव्या पद्धतीचे शिक्षण होतकरू पिढीस देण्यास सुरवात केली. राज्यकारभार सुयंत्रित चालण्यास नोकर हवे होते; व्यापारातूनच राज्यावर आलेल्या इंग्रजाना आपला व्यापार चालवावयाचा होताच ! बौद्ध व मुसलमान यांच्याप्रमाणेच इंग्रज राज्यकर्त्यांच्या भरंवशावर मिशनरी शांततेने ख्रिस्ती-धर्मप्रसार न चालवितील, तरच नवल !

यावर उपाय म्हणून उत्तरभारतात ब्रह्मोसमाज व आर्यसमाज निघाले तर महाराष्ट्रात प्रार्थनासमाज निघाला. त्यापेक्षाही विष्णुबुवा ब्रह्मचारी यानी हिंदुधर्मावरील मिशनऱ्यांचे हल्ले परतविण्याची मोठीच कामगिरी केली.

अशा परस्परविरोधी मंडळीकडूनसुद्धा जे लोकशिक्षण होते, त्यातून समाजाला स्वतंत्र विचारांची दिशाही सुचते. पंडितजी सातवळेकरांचा जन्म होण्यापूर्वी स्वतंत्र होण्याचा सशस्त्र उठाव झाला होता; पण त्यांची मुंज होण्याच्या सुमारास १८७४ मध्ये निघालेल्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेने बरीच खळबळ उडवून दिली; आणि पंडितजी दहावर्षाचे होण्याचे सुमारास, देशीभाषेतील वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करणारा कायदा गव्हर्नर जनरल लॉर्ड लिटन् यानी जारी केला

*

होता. दरम्यान १८७३ साली ज्योतिराव फुल्यानी, ब्राह्मणेतर शिक्षणाच्या मार्गास लागावेत व ब्राह्मणांची ' गुलामगिरी ' त्यानी काढून टाकावी, म्हणून सत्यशोधक समाज काढला होता.

लोकशिक्षणासाठीच १८४९ साली पुण्यास ज्ञानप्रकाश सुरू झाले होते तर पंडितजींच्या जन्मापूर्वी तीनच वर्षें म्हणजे १८६४ सालीं मुंबईस इंदुप्रकाश सुरू झाले होते. इंदुप्रकाशचे संपादक विष्णु परशुराम पंडित हे ज्योतिराव फुल्याप्रमाणेच सातारा जिल्ह्याचे सुपुत्र होते आणि त्यानी १८७० साली श्रीशंकराचार्यांच्या पुढे पुनर्विवाहासंबंधाने वादविवाद सभा घडवून आणली होती. धर्मश्रद्धेस पंख फुटून ती उडू लागली होती.

पंडितजींच्या जन्मापर्यंत ( १८६६ पर्यंत ) दळणवळणाच्या सोयी फारच कमी होत्या. १८७२ साली विलायतेत पार्लमेंटरी कमेटी नेमली जाऊन हिंदुस्थानच्या जमाखर्चाची चौकशी व्हावयाची होती; तिजपुढे साक्ष देण्यासाठी महाराष्ट्रीय प्रतिनिधी पाठविण्याची पुण्याच्या सार्वजनिक सभेने तयारी केली होती; पण प्रायश्चित्ताच्या अडचणीमुळे विलायतेस कोणी गेले नाही ! याच सुमारास विलायतेत हिंदूंचे देवालय बांधण्याची कल्पना निघाली होती; पण जशी माणसे तसे त्यांचे देव ! १८६१ सालीच मुंबईहून कोकणाकडे आगबोट सुरू झाली तरी आठवड्यातून एकादीच बोट जावयाची ! कोकणपट्टीचा प्रवास मचव्यातूनच करावा लागे. कोकणकिनाऱ्याची सडक झालीच नव्हती.

पेशवाईनंतर काही दिवस जुन्या खानदानी लोकास लोक व सरकार दोघेही मानीत. नवीन शिक्षणाच्या शाळा सुरू झाल्यावर हा जमाना बदलला. १८३७ पासून १८७४ पर्यंत दोन–तीन पिढ्या सुशिक्षितांच्या झाल्या. गोपाळराव हरि देशमुख, महादेव गोविंद रानडे ही महाराष्ट्रातील पहिल्या दोन पिढ्यांची प्रातिनिधिक नावे ! विद्या, नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, व्यवस्थित आचरण व गृहस्थिति यांचा एकमेकाशी जो नित्यसंबंध असावा लागतो व जो असल्याखेरीज विद्वान् लोकही पुढारीपण घेऊन राष्ट्राचा उद्धार करू शकत नाहीत, तोच संबंध इंग्रजी शिक्षणाने त्या दोन पिढ्यात तोडून टाकला होता. त्यामुळ समाजस्थितीतील केवळ दोषाकडेच परकीय शिक्षक व मिशनऱ्याप्रमाणे, भारतीय सुशिक्षितही बोटे करीत होते. पण १८७४ पासून विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या रूपाने जी तिसरी पिढी उदय पावली, तिला केवळ धार्मिक आणि सामाजिक सुधारणेने राष्ट्राचे उन्नतिला जोर येणार नाही, असे स्वच्छ दिसून आले. पोक्त विचार, दृढ व सतत अभ्यास, सदाचरण, नीतिधैर्य आणि स्वार्थत्याग यांची जोपासना समाजात झाली तरच काही उपयोग, अशी या नव्या पिढीची खातरजमा झाली. नुसत्या बुद्धिमत्तेपेक्षा पुढारीपणास वरील गुणांची आवश्यकता निकडीची असल्याकारणाने विष्णुशास्त्र्यांच्या

टीकेचा रोख व्यक्तिमात्रापेक्षा अव्यवस्थितपणाच्या आवडंबरावर व मदावरच विशेष होता. माधवराव रानड्यानी साधे सर्वांगसुंदर राजकारण उभे केले होते. त्याला १८७६–७७ च्या दुष्काळाच्या निमित्ताने वासुदेव बळवंत फडक्यानी, पुनः १८५७ उभारण्याचे ठरवून जरी धक्का दिला होता, तरी लौकिक राजकारणाचे पाऊल पुढे पडावयाचे तर ते ठामपणे पडण्यास धीमेपणाने एकाचढ एक राजकारणी चळवळीच्या लाटा उठल्या पाहिजेत, हे विचारवन्ताना स्पष्ट झाले होते; म्हणूनच विष्णुशास्त्री चिपळूणकरानी सरकारी नौकरी सोडून ज कार्य आरंभिले होते, ते टिळक–आगरकरानी स्वताच्या शिक्षणसमाप्तीच्या दिवशीच अंगिकारले होते.

पाश्चिमात्य राष्ट्राच्या विस्तारास व स्थैर्यास बायबल हे प्रामुख्याने उपयोगी पडले आहे. १८५७ च्या भारतीय उठावाचे दमन करणाऱ्या इंग्रजानी भारतात आपल्या राज्याचा यथेष्ट विस्तार केला होता. त्यानंतर त्या राज्याला स्थैर्य आणण्याच्या उद्योगाला इंग्रज लागले. भारताला ख्रिस्ती करून सोडण्याच्या इराद्याने पाद्र्यांचे तांडेच्या तांडे भारताकडे येऊ लागले; जणु एकादा सम्राट् पृथ्वी पादाक्रांत करावयास आपली सैन्यदलेच रवाना करीत आहे! लॉर्ड क्लाइव्हनंतर शिक्षण प्रसाराच्या आडोशाने लॉर्ड मेकॉलेनेच बाडगे इंग्रज भारतीयाना बनविण्याचा व्यूह रचला होता. १८३५ तच मेकॉलेने आपल्या वडिलांना लिहिलेल्या पत्रातच आशा केली होती की पंचवीस वर्षात सारा बंगाल ख्रिस्ती होईल! तेथे आस्तिक हिंदु औषधालाही राहणार नाही!! औरंगझेबाच्या तलवारीने मोंगलांच्या आठ नऊ वर्षांच्या शासनकालात घडले नाही, ते मेकॉले पाव शतकात सहजासहज घडेल अशी आशा करीत होता. ब्रह्मोसमाज व प्रार्थनासमाज यानी ती लाट थोपवून धरली, तर आर्यसमाज त्या लाटेला 'चीनी भिंतीसारखा' च प्रत्ययाला आला! तेव्हा १८८३ सालापासूनच पाद्र्यानी ब्रिटिशशासनाचे कान भरले की आपल्यापेक्षा ब्रिटिश शासनालाच आर्यसमाज घातक आहे!!

या सर्वांचे कारण एकच संभवते की १८०२ च्या वसईच्या तहानंतर आपण 'जिंकली' असे जे इंग्रजांना वाटत होते, ते केवळ वाटणेच राहिले होते! चतुरसिंग भोसल्यापासून वासुदेव बळवंत फडक्यापर्यंत इंग्रजाना येथून हलविण्याचे प्रयत्न फसले असले, तरी १८५७ च्या उठावानंतर १८५८ साली जो व्हिक्टोरियाराणीचा जाहीरनामा निघाला होता, त्यानेही लोकांची अस्वस्थता गेली नव्हती. १८५९ सालीच, राजा राममोहन रॉय प्रभृतिनी सुरू कलेल्या शान्तिमय आन्दोलनाची प्रत्यंतरे येऊ लागली. विद्यालयांत आणि विद्यालयाच्या बाहेरच्या परिस्थितीत जिकडे तिकडे लोकोद्धाराच्या चळवळीचे जाळे पसरले होते. उजळ माथ्याने जगावयाचे असेल आणि इतर राष्ट्रांच्या स्पर्धेत टिकावयाचे असेल तर समाजव्यवस्थेत दिसतील ते दोष काढून टाकले पाहिजेत! याबाबत लोकभ्रमाबद्दल ओरड करणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळूणकरापासून सर्व विचारवन्तांची खात्री होती. म्हणून जगाच्या

प्रगतीचा ओघ कसा चालला आहे, याचे ज्ञान मिळून तरुणांना आपल्या कर्तव्याचे स्फुरण सातत्याने होत राहिले पाहिजे, अशा उपायांकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले. सतीबंदी ( १८२९ ), धर्मांतरिताला मूळ घराण्यातील वारसा हक्क ( १८३२ व १८५० ), ठगीला आळा (१८३६), विधवा विवाहाचा कायदा ( १८५६ ), इंडियन पीनलकोड ( १८६० ) असे कायदे करून इंग्रजी राजवट आपल्या प्रजाहित-दक्षतेची चुणूक दाखवित दाखवित लोकमानसाला मदत करीत होतीच. जगन्नाथ-नाना शंकरशेट यांच्यासारख्या स्वजनांच्या सुधारणेसाठी सरकारला हितावह सल्ला-मसलत व पदरचा पैसा देऊन चिरस्मरणीय कामगिरी करणाऱ्या लोकपुढाऱ्याची येथे साहजिकच कृतज्ञतेने आठवण होते. ' **नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता** ' असलेले नाना हिंदु अथवा वैदिक आर्यधर्माचे केवढेही अभिमानी असले तरी वेदान्ताचे तत्त्वज्ञान हरिदास–पुराणिकांच्या कीर्तन–प्रवचनात गुरफटून बसले होते, हे नाकबूल करण्यात काही अर्थ नाही.

भारत म्हणजे हिंदुस्थान या देशातील सर्वच काही अवाढव्य ! दरसाल एक नवे न्यूयॉर्क शहर बसेल अशी म्हणजे ऐंशीलक्ष लोकसंख्येची वाढ होणारा हा देश; दीडवाराचा कापडतुकडा प्रत्येकाला सरासरीने वाटून द्यावयाचा म्हटला तर १९६६ सालीही भारतीय गिरण्यांच्या उत्पादनाचीही बेअब्रू होईल, असा बह्वांग नग्न देश; दोन वेळा पोटभर जेवण घालावयाचे म्हटले, तर कुबेरालाही भीक लागून घेतलेल्या व्रताबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी आणणारा देश; आठ दिवसातील रोजचे रोज चोवीस तास प्रवास रेल्वेने करावयाचा ठरवूनही एका सीमेपासून दुसऱ्या सीमेच्या पार व्हावयास कठीण अशा लांबीरुंदीचा देश; कमी–अधिक प्रमाणात साडेआठशे भाषा व त्यांच्या उपभाषा यानी गजबजलेला देश; तीनशेहून अधिक जाति-जमाती आणि त्यांचे रीतिरिवाज यांच्या विविधतेने रंगीबेरंगी बनलेला देश; व तीन कोटीहून अधिक आदिवासी–वनवासी रहिवासी असलेला देश; इत्यादि इत्यादि प्रकारानी ज्याचे वर्णन बाहेरचे, उपरे वा पाहुणे करीत असतात, त्या देशाचे एक-जिनसी भवितव्य, वैदिककाळापासून चालत आलेल्या समर्थ तेजस्वी परंपरांचा वारसा चालवून, पीळदारपणे सकस बनविणे ही तोंडची बात नव्हे. पण त्यासाठी जीवापाड अट्टाहास करणारे देशभक्त कमी पडलेले नाहीत.

पुण्याच्या सार्वजनिक काकानी स्वदेशीचा पुरस्कार सक्रिय करण्यास सुरवात केली. ही पंडितजींच्या चिमणाईतील गोष्ट असून ते १८७७ च्या राजदरबारला खादी पेहरून गेले होते. त्यावेळी पंडितजींचे वय दहा वर्षांचे होते. त्यापूर्वी तीन वर्षे म्हणजे निबंधमालेच्या जन्मसाली ( १८७४ मध्ये ) सार्वजनिक सभेने ब्रिटिश पार्लमेंटकडे हिंदुस्थानात ' जबाबदार राज्यपद्धति ' सुरू करण्याबद्दल अर्ज केला होता. हिंदुस्थानचे प्रतिनिधी विलायतच्या पार्लमेंटात असावेत, आणि हिंदी राज्यकारभाराचे प्रश्न त्यांच्या संमतीने सोडवून अंमलबजावणी करावी, अशा अर्थाचा तो अर्ज हजारो

लोकांच्या सह्या घेऊन पाठविण्यात आला होता. जबाबदार राज्यपद्धतीच्या मर्यादित मागणीचा पण लोकशाहीचे अप्रत्यक्ष लोकशिक्षण साधणाऱ्या धोरणाचा आवाज, महाराष्ट्राच्या आणि पर्यायाने भारताच्या निःशब्द राजकीय वातावरणात उठताच, सरकारी सूत्रधारांचे कान व डोळे टवकारून टवकारून भविष्याचा वेध घेऊ लागले.

पुढील १८७५ या वर्षी पुण्यास व इतरत्र वेदशास्त्रोत्तेजक सभा निघून वेदाचे अर्थ समजून घेऊन करावे, सार्थ वेद पाठ करणाऱ्या ब्राह्मणानी इतरास वेदोक्तधर्माचे शिक्षण देऊन धार्मिक क्रियाकर्मातील प्रचलित घोटाळे दूर करावेत, असा त्या सभांच्या उद्देशपत्रिकातून उद्‌घोष होता.

तात्पर्य, एकोणिसाव्या शतकाची पहिली पंचविशी स्वराज्याचा ऱ्हास व परकीय सत्तेची स्थापना यात गेली; दुसऱ्या पंचवीशीत परकीय सत्तेचा विस्तार घडला; हिंदी कार्यकर्तृत्वाचा फडशा उडाला व लोक किंकर्तव्यमूढ झाले असताही नाना शंकरशेठ सारखे काही आशेचे किरण थोडे थोडे चमकू लागले. तिसऱ्या पंचविशीत तर ब्रिटिश राजसत्तेचे नवतेज आणि देशातील कळाहीन जीवन यातील विरोध परवशतेमुळे तत्कालीन जाणकाराना विशेषच तीव्रतेने भासू लागला; परकीय सत्तेचे पवाडे गाणाऱ्या भाटांचा एक वर्गच निर्माण झाला; त्यातही १८५७ साली एका बाजूने परकीय सत्ता उलथून टाकण्याचा एक जोरदार प्रयत्न झाला, पण तो चचला; दुसऱ्या बाजूने देशात विद्यापीठांच्या स्थापना होऊन एक ज्ञानसंपन्न अशी नवीन पिढी निर्माण होऊ लागली; परवशतेचे भेसूर स्वरूप तिच्या निदर्शनास आले. एकोणिसाव्या शतकाच्या चवथ्या पंचविशीच्या मध्यास १८८५ साली काँग्रेसची स्थापना होऊन लोकचळवळीस मूर्तस्वरूप येऊ लागले. ब्रिटिशापासून पुष्कळ चांगल्या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत; त्यामुळें हिंदुस्थानला आपली प्रगति निश्चित करून घेता येईल; आणि त्या प्रगतीच्या जोरावरच आपल्या पूर्वापार सांस्कृतिक वैभवानिशी व कर्तृत्वानिशी हिंदुस्थान जगातील पुरोगामी राष्ट्रांच्या मांडीला मांडी लावून बसू शकेल, असा न्या. रानडेपिढीचा कयास होता. पण म्हणून त्याना हिंदुस्थानच्या मानेवरील परकीय सत्तेचे जू मंजूर होते, असे मानण्याचे कारण नाही. पुढच्या पिढीतील तरुण देशभक्त अधिकच जागरूकतेने सरकारी अरेरावी, राज्यकर्त्यांचे अंधानुकरण, खुषमस्करी व लोकविलक्षण वागणुकीचे व्यर्थ चाळे यांच्यावर तुटून टीका करू लागले.

अशा संधिकालात पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकरांचा जन्म होऊन, त्या राष्ट्रीय परिस्थितीचे व तिच्यावरील उपायांच्या योजनांचे पडसाद, पंडितजींच्या बालपणातही त्यांच्या वडीलधाऱ्या मंडळीपर्यंत उमटू लागले होते. आणि १८८५ साली काँग्रेसची स्थापना होऊन १८८९ साली ( लो. ) टिळक व ( ना. ) गोखले काँग्रेसमध्ये आपल्या तेजाची नवकिरणे फैलावू लागण्याच्या सुमारास सातवळेकरही सावंतवाडीतील आपला शिक्षणक्रम संपवून खुराड्यातून बाहेर पडून—

**आकाश–अंत न कळूनिहि अंतरिक्षी। शक्तीनुसार करतात विहार पक्षी॥**

तर आपणही तसेच का करू नये, या उमाळयाने मुंबईस चित्रशाळेत नाव दाखल करून बसले होते. कारण पंडितजींनीच सांगितले आहे की, 'केसरीची पहिली तीन–चार वर्षे सोडून दिली तर त्यापुढे मी सतत केसरीचा वाचक आहे व तेव्हापासून केसरीचे धोरण राजकीय कार्यक्षेत्रात इतर वृत्तपत्रापेक्षा काकणभर पुढे राहिलेले आहे.' (केसरी–प्रबोध खंड १ पान ६२ 'केसरीची स्वराज्य–चतुः-सूत्री–पहा.). आगरकरानी म्हटल्याप्रमाणे सर्वत्र प्रसृत झालेला केसरी सावंत-वाडी संस्थानातही केवढा लोकसंपर्क करून राहिला होता, याचे प्रत्यंतर पं. सातवळेकर यांच्या स्वताच्याच लेखणीने वरीलप्रमाणे दिले असल्याकारणाने त्यासंबंधी अधिक लिहिणे नलगे ! !

: ३ :

# वडिलार्जित वळण व वारसा

पंडितजी सातवळेकरांच्या जन्माआधीपासून ते द्विज होईपर्यंत म्हणजे त्यांची मुंज होईपर्यंत आणि थोडे पुढे म्हणजे त्यास जगाची, जीवनाची आणि जीवनिकेची जाणीव येईपर्यंत, भारतीय परिस्थितीच्या प्रगतिचा ओघ लक्ष्यात आल्यावर, स्वता सातवळेकरांच्या कौटुंबिक पूर्वाजिताचाही साहजिकपणे विचार करणे येते.तेव्हा चटकन् लक्ष्यात येऊन चुकते की सातवळेकरांचे घराणे वैदिक; त्याच्याकडे कोलगाव, कुणकेरी व सावंतवाडी या तीन गावाची जोसकी; पुरोहितपणा करताना घराण्याचे वैशिष्टय सर्वसंबंधिताना पूर्ण परिचित झालेले असे की, म्हणावयाच्या मंत्रातील व ऋचातील संस्कृत शब्दांचे उच्चार स्पष्ट आणि जलद करण्यात सातवळेकर मंडळी कोणाला हार जाणारी नव्हत; आणि चार पैसे दक्षिणा मिळवण्यासाठी चार चार मैल मजल मारायला मागेपुढे न पाहणारी ती मंडळी !

अशा वासिष्ठ गोत्रीय सातवळेकर ( भट ) घराण्यातील लौकिक सांभाळून पंडितजींचे प्रपितामह दिवसभर स्वाध्याय व जपजाप्य करून धार्मिक कार्यात वेळ घालवित. सातवळे–कर भट घराण्याचे मूळ गाव जे सातवळे ते कोकणात आणि कदाचित् रत्नागिरी जिल्ह्यातच असले तरी ते कधी पाहिले–आठवले असे कोणी मनुष्य ज्ञात इतिहासात तरी या घराण्याच्या नाही. तथापि सातवळेकरानी कोलगावात ठाण मांडल्यापासून गावात कुठेही धार्मिक विधि होवो, त्या कार्याचे उत्पन्न अर्धेलीने सातवळेकरानाच मिळे. कोलगावात त्याकाळी ब्राह्मणांची घरे बावीस, आठ क्षत्रियांची, आणि तितकीच वैश्य–शूद्रांची. देवमंदिरे मात्र अनेक. त्यात कलेश्वर ऊर्फ कलोबा ही मुख्य देवता. दुसरी देवता म्हणजे सान्तेरी. या दोनही देवतांची पूजाअर्चा आस्थेने करणे हे गावकरी आपले कर्तव्य मानीत. जीवन कुशलतेने जगण्याची कला

साधली म्हणजे कलेश्वराची कृपा झाली आणि गुणापासून गणनापर्यंत व क्षेत्रापासून कर्तृत्वापर्यंत सर्व सान्त, मर्यादित आहे, म्हणून मर्यादशीलपणेच आपली कर्तव्ये करीत रहावी असे प्रबोधन सांतेरी करी. त्या प्रबोधनाचा कृपाप्रसाद घेऊन पंडितजींचे व्यवहारचतुर प्रपितामह वे. शा. सं. कृष्णराव आपल्या सौभाग्यवती गृहलक्ष्मीसह कोलगावीसुद्धा प्रतिष्ठेने राहिले. त्यांचाच वारसा पंडितजींचे पितामह अनंतराव यानी चालविला आणि पंडितजींच्या आजीबाई सरस्वतीकाकू यानी सौजन्याने समाजाचा दुवा घेतला. अनंतराव सातवळेकराना दामोदरपंत, कृष्णराव आणि सीतारामपंत असे तीन चिरंजीव. पैकी दामोदरपंत हे पंडितजींचे पिताजी. त्यांची दोन लग्ने झाली. प्रथम पत्नीचे नाव सौ. गोपिकाबाई सातवळेकर. त्यानी या जगाचा निरोप घेतल्यावर, वालावल येथील भट घराण्यातील वधू निवडली. तीच सौ. लक्ष्मीबाई सातवळेकर पंडितजींची आई होय. वालावलचे हे भट घराणे अत्रि–गोत्री असून पंडितजींच्या मातामहांचे नाव बाळकृष्णपंत होते आणि पंडितजींच्या मामांचे नाव कृष्ण असे होते. कोलगाव आणि वालावल या दोन्ही ठिकाणच्या भट घराण्यात त्या काळच्या सामाजिक प्रथेप्रमाणे, कुलपरंपरांची जागृत जाणीव रहावी म्हणून, आजोबांचे नाव नातवास ठेवावे अशी दक्षतेची जपणूक आढळते. पंडितजींच्या एका चुलत्यांचे नाव कृष्णराव हे त्यांच्या प्रपितामहावरून जसे ठेवलेले दिसते तसेच मामांचे कृष्णराव हे नाव आईमामांच्या आजोबांचे नावावरून; आणि स्वता आईमामांच्या वडिलांचे नाव जे बालकृष्ण तेही आईमामांचे पणजोबा बाळकृष्णपंत यांच्या नावावरून ठेवलेले आढळते. घराण्याचा लौकिक सांभाळण्यात आणि आपल्या सौजन्याने व कर्तृत्वाने समाजाकडून '**भला रे भला**' म्हणवून घेण्यात, त्या त्या मंडळीनी आपले जीवन '**अलौकिक नोहावे लोकाप्रती ।**' या व्रताने चालविले असले पाहिजे, हे उघड आहे. पंडितजी आपल्या वयाच्या बावीसाव्या वर्षी मुंबईला चित्रशाळेत येऊन दाखल झाल्यावरच, पंडितजींचे वडील आपल्या वयाच्या सत्त्याऐंशीव्या वर्षी व आई तिच्या वयाच्या साठाव्या वर्षी वारली; आणि तेव्हापासून पंडितजी श्रीपादराव सातवळेकर व त्यांचे बन्धु सीतारामपंत आणि कृष्णराव ऊर्फ सखारामपंत याना आपापल्या पायावर उभ राहून वडिलमातुश्रीनी लावलेले वळण '**संस्मृत्य संस्मृत्य**' आपापले जीवन घडवावे लागले.

कारण वडिलार्जित असे जे काही कोलगावला होते, त्याचा इतिहास काही एका प्रसंगाने पंडितजींनीच नमूद केला आहे. तो पहाण्यापूर्वी हे स्पष्ट केले पाहिजे की प्रामुख्याने तांदुळाचे उत्पन्न देणारी जमीन सातवळेकर घराण्याकडे होती व बहुधा तिची मेहनतमशागत सातवळेकर मंडळी स्वताच करीत. दामोदरभट सातवळेकराना चार मुलांच्या पाठीवर श्रीपाद हा मुलगा होऊन तो मुंजीला येईपर्यंत कोलगावची सातवळेकर मंडळी व विशेषत: दामोदरभट आपली जमीन आपणच कसत असत. चांगला दोन वर्षांचा होईपर्यंत श्रीपादा ( पंडितजी ) ला आपले डोके वरच

करता येत नसे. ज्या वयात नागाच्या फणीसारखे डोके वर काढून पालथी निजलेली मुले भोवताली टकटक पाहतात, त्या वयात डोईजड श्रीपाद, कंपासाच्या सळईचे टोक कागदावर स्थिर ठेवून, कंपासाची पेन्सिल जशी फिरवतात, तसे आपले डोके स्थिर ठेवून आपले शरीर फिरवी. वयाच्या चवथ्या वर्षी खांद्यावर डोके नीट पेलून श्रीपाद सातवळेकर हिंडू–फिरू लागला आणि पाचव्या वर्षाच्या शेवटी या पोराला काही स्मरणशक्ति व धारणाशक्ति खास आहे, असे लोकाना पटू लागले; कारण तेव्हा तो बरोबरीच्या इतर मुलापेक्षा कित्येक स्तोत्रे अस्खलित पाठ म्हणून दाखवू लागला. सात वर्षाअखेर लेखन, वाचन तो करू लागेपर्यंत, घरच्या उत्पन्नाचे काय झाले. पहा—

**पंडितजीच सांगतात—**

'अर्ध्या गावावर आमचा जोशीपणाचा अधिकार असल्याने आमच्या कुळाचा मान गावात फार होता. गावात आम्हास 'आडेकर' म्हणत. याचे कारण आमच्या घराजवळ १०।१२ एकर आमराई होती व त्यात उत्तम आंबे, काजू, नारळ, फणस या झाडांची बाग होती व कुंपण कळकांचे केले होते. कळकांच्या कुंपणास 'आडा' म्हणतात; म्हणून आम्हास 'आडेकर' म्हणत.

'आमचे घर स्मशानाला लागून होते. काजरकोंड या नावाचा ओढा होता. तेथे कोलगावचे स्मशान होते व तेथेच आमचे घर व आमची बाग होती. जोशीपणाचे उत्पन्न, देवस्थानी इनामी जमिनीचे उत्पन्न व खासगी जमिनीचे उत्पन्न मिळून पुरेसे उत्पन्न होते. घरात नेहमी २।३ पाहुणे येत व घरातली १०।१२ मंडळी मिळून घर भरलेले असे. घर बरेच मोठे चौसोपी व २० खोल्यांचे असे माडीचे होते. जनावरे असत व ५।६ गाई नेहमी दुभत्या असत. म्हैस नव्हती. गाईचे दूध–तूप नेहमी घरी भरपूर असे. माझे वडील दामोदरभट्ट, आजोबा अनंतभट्ट, पणजोबा कृष्णभट्ट, सर्वांची ऋग्वेदी वैदिक परंपरा होती. घरी अध्ययन–अध्यापन ऋग्वेद व त्यासंबंधीचे याज्ञिक ग्रंथ यांचे चालत असे. घरी पाहुणे येत व हवे तितके दिवस राहत असत. दोन दोन वर्षे राहिलेले पाहुणेही मला माहित आहेत. ३।४ महिने राहण्याला काहीच हरकत नव्हती. पाहुण्याचा त्रास कधीही कोणालाही वाटत नव्हता; कारण कशाचीच ददात नव्हती.

'अक्कलकोटहून कृष्णभट हळबे या नावाचा एक हुशार तरुण आमच्या आजोबांच्या वेळेस आला. हा आला तेव्हा सुमारे १६ वर्षे वय याचे होते. हुशार, कर्तृत्ववान्, व्यवहारचतुर, हवे ते काम करण्यात कुशल असल्यामुळे थोड्याच दिवसात याचा पाहुणेपणा जाऊन तो घरचा कौटुंबिक बनला. अक्कलकोटास त्याचा सर्वस्व नाश होऊन उठाव झाला होता. अर्थात् निराधार स्थितीत तो आमच्या घरी येऊन स्थिर झाला असल्यामुळे त्याला इतरत्र जाण्याचे काहीच

कारण नव्हते; म्हणून तोही आमच्या घराला आपले घर मानून घरातील माणसाप्रमाणे परकेपणा सोडून आपलेपणाने वागू लागला. यामुळे आजोबाचे मन त्यावर बसले व ते त्यावर पुत्रवत् प्रेम करू लागले.

' आजोबा आजारी पडून अत्यवस्थ झाले त्यावेळी त्यांचे वय ९६ वर्षांचे होते. माझे वडील लहान होते, म्हणून आजोबानी या कृष्णभट हळब्याना जवळ बोलावून माझ्या वडिलांचा हात त्यांच्या हातात देऊन, ' याचा व सर्वांचा संभाळ कर ' असे सांगून प्राण सोडला. यावेळी कृष्णभट हळब्यांचा आमच्याच घरी गोव्यातील मुलीशी विवाह झाला होता.

' अशा रीतीने घराचे सर्व कर्तृत्व या कृष्णभट हळब्याकडे आले व घरसंसाराचे व गावकीच्या व्यवहाराचे सर्व काम यानी उत्तम रीतीने व फारच दक्षतेने, व्यवस्थितपणाने चालविले.

' कृष्णभट हळबे फारच हुशार होते. घरचे काम उत्तम रीतीने ते करीत. शेतीचे उत्पन्नही त्यानी उत्तम व्यवस्थेने वाढविले व सरकारदरबारामध्येही त्यानी ओळख करून घेतली व सरकारी अधिकाऱ्याशी चांगले वळण बांधले.

' आमचे वडील दामोदरभट्ट हे १७।१८ वर्षांचे झाले होते. घरचे शिक्षण वेदाध्ययन व कर्मकांडाचे अध्ययन त्यांचे झाले होते. त्यास बालबोध लिहिता–वाचता येत होते. मोडी मुळीच येत नव्हते व त्यांचा विश्वास कृष्णभट हळबे यांच्यावर वडिल भावाप्रमाणे असीम होता. कृष्णभटानीं ज सांगावे ते त्यानी पूर्ण विश्वास ठेऊन करावे, अशी श्रद्धा त्यांची होती.

' या परिस्थितीचा फायदा घेण्याचे कृष्णभट हळबे यानी ठरविले. ' तुम्ही आमच्या घरची व्यवस्था उत्तम प्रकारे ठेवली यासाठी ही जमीन मी स्वखुषीने तुम्हास बक्षीस दिली आहे ' अशा प्रकारची बक्षीसपत्रे त्यानी आमच्या वडिलांची सही घेऊन रजिस्टर करून घेतली; इतकेच नव्हे तर अर्धे घरही असेच घेतले. केवळ देवस्थानच्या जमिनी तेवढ्या बक्षीसरूपाने घेता येत नव्हत्या. यामुळे त्या आमच्या वडिलांच्या नावावर राहिल्या; बाकी सर्व जमिनी, सर्व जागा व अर्धे घर इतके सर्व त्यानी आपल्या नावावर करून घतले. वडील विश्वासाने रजिस्टर पुढे सही करीत. कागदात काय आहे ते त्यास समजत नसे व तेही त्यात काय आहे ते विचारीत नसत. शवटचा कागद तयार झाला त्यावेळी कारकुनानी यास ( वडिलास ) एका बाजूला नेऊन सर्व सांगितले व या कागदावर सही करू नका असेही सांगितले. पण वडिलानी म्हटले की ' ज्या अर्थी सर्वस्व गेले आहे त्याअर्थी हेही जात असेल तर जाऊ दे. एका ब्राह्मणाचा तरी संतोष होऊ दे. ' असे म्हणून या शेवटच्या कागदावरही त्यानी सही केली व यावेळी आमचे वडील सर्वस्वास मुकले ! अर्ध्या गावचे मालक यावेळी अगदी निष्कांचन बनले ! कारण

सर्व पैसा अडका, कपडेलत्ते, भांडीकुंडी, दागदागिने सर्व त्यांच्या ( हळब्या ) कडे होते व देवस्थानच्या जमिनीचे उत्पन्न काम करील त्यास मिळणारे होते. यामुळे भर तारुण्यात वडिलाना अशी निष्कांचन स्थिति आल्याने फार मोठ्या चिंतेने त्यास घेरले होते.

' यापूर्वी वडिलांचे लग्न होऊन पहिला मुलगा झाला होता व बाळंतपणातच बाळंतिणीचा अंत झाला होता. ५ वर्षांनी हा मुलगाही निवर्तला. नंतर वडिलांचे दुसरे लग्न झाले. मुलगी वालावलीच्या उपाध्यांची केली होती. हिलाही ४।५ मुले झाली व ती सर्व मेली ! मूल वर्ष दोन वर्षे रहावे व मरावे असे चालले होते. माझ्या जन्मापूर्वी नरसोबावाडीच्या दत्ताला नवस केला होता– ' तुझ्या पायाजवळ आणून याची मुंज करू.' असा नवस होता. माझी जन्मपत्रिका बारशाच्या वेळी पुजली व वाचून दाखविली. त्यात १६ व्या वर्षी अपमृत्यु लिहिला होता. हे ऐकून वडिलाना राग आला व त्यानी ती पत्रिका घेतली व फाडून टाकली. त्यामुळे माझी जन्मपत्रिका राहिली नाही. वडील म्हणाले– ' १६ व्या वर्षी मरणार हे अधिक दुःखदायी आहे. आमच्या नशिबी पुत्रसुख नाही, हेच खरे ! ' माझा जन्म कोलगाव येथेच झाला.

' मी लहानपणी अत्यंत अशक्त होतो व माझ्या अशक्तपणामुळे व रोगीपणामुळे घरातील मंडळीस फारच त्रास होत असे. मी लहानपणी आजारी पडे व माझ्या बिछान्यासभोवती घरची मंडळी चिंता करीत बसत. अशा देखाव्यांचे मला अजून स्मरण आहे. मी आजारलो नाही असा एक आठवडाही जात नसे. नाना प्रकारच्या ज्वरादिक पीडा मला सतावीत असत.

' मी चार वर्षांचा असेन. घरात हिंडू फिरू लागलो होतो. या सुमारास कृष्णभट हळबे आजारी पडले व २५ दिवसांच्या आजाराने ते निवर्तले. मरतेवेळी त्यांचे देहावसान आमच्या वडिलांच्या मांडीवर झाले. कारण त्यांचे दत्तक चिरंजीव व्यंकटेशभट हळबे हे महाडास जाऊन भिक्षुकी करीत असत. दत्तक मुलाचे व दत्तक वडिलांचे कधीही पटले नाही. वडिलांचा पूर्वी दिलेला व्यवहार या दत्तक मुलास मुळीच आवडत नसे; म्हणून हे दत्तक चिरंजीव सहकुटुंब सहपरिवार महाडास रहात असत व तेथे त्यानी भिक्षुकीच्या धंद्यावर बरीच संपत्तिही प्राप्त केली होती व ते तेथे आनंदात संसार करीत होते.

' वडील वारल्याचे पत्राने वृत्त कळून ते येईपर्यंत १५।२० दिवस लागले. त्या कारणाने कृष्णभटांची उत्तरक्रिया आमच्या वडिलानी ३०० रु. कर्ज काढून केली. कारण त्यांच्या लग्नाच्या बायकोने पैसा दिला नाही. दत्तक चिरंजीव आले व त्याना जेव्हा आईचे हे वर्तन समजले, तेव्हा त्यानी तिची पुष्कळच निर्भर्त्सना केली व ४।८ दिवसानीच ते परत महाडास गेले. आईचे व दत्तक मुलाचे कधीही पटले नाही.

' इकडे कृष्णभटांच्या बायकोने घराला कुलपे घातली व सर्व भांडीकुंडी आपली आहेत, तुमचे येथे काही नाही असे म्हणावयास प्रारंभ केला ! तिच्या बाजूने तिचे भाऊ व शंभुपंत म्हणून वकील हे भांडत असत. आमच्या वडिलांची बाजू घेणारेही २।३ सज्जन होते. पुढे आपसात तडजोड होऊन १३०० रुपये रोख तिला देऊन अर्धे घर, नारळीची व आंब्याची बाग व अर्धी भांडी हे आमच्या ताब्यात आले. हे १३०० रुपये वडिलानी कर्ज काढूनच त्या बाईला दिले होते. ही रक्कम तिच्या भावानी लांबवली व बाईला एक पैसाही ठेवला नाही ! ! !

' वकिलाच्या सल्ल्याने बाईने आपल्या भावावर फिर्याद केली. एक वर्षाने भावाकडून वरील रक्कम वकिलाने वसूल केली व ती वकिलानेच स्वाहा केली ! अर्थात् वर्ष दोन वर्षानी बाईजवळ अर्धे घर व जमिनीशिवाय काही एक राहिले नाही. दागदागिने भावानी लांबविले. पैसे वकिलाने खाल्ले. जमिनीचे उत्पन्न फिर्यादी व कोर्ट–खर्च यासाठी खर्च झाले. पतिने ऐश्वर्य मिळविले पण पत्नीला ते भोगता आले नाही.

' दोन वर्षानी व्यंकटेशभट हळवे आले. ते व आमचे वडील बालपणापासून जीवश्च कंठश्च स्नेही. त्यास त्यांच्या वडिलांची सर्व कृत्ये माहित होती व ती त्यास मुळीच पसंत नव्हती; म्हणूनच तर ते यावेळी वडिलांचे पाप धुण्यासाठी आले होते. त्यानी वकिलांची सल्ला घेऊन अर्ध्या जमिनी आमच्या वडिलास तत्काळ बिनशर्त परत केल्या व कर्ज काढून दिलेली रक्कमही सव्याज त्यानीच फेडून टाकली !

' खरोखर, या व्यंकटेशभटाच्या या उदारपणाला सीमाच नाही. अर्धी जमीन त्यानी ठेवली हे खरे, पण सगळी जमीन मिळाली असता केवळ मित्राचे वाटोळे होऊ नये एवढ्याचसाठी बिनशर्त अर्धी जमीन परत करणे व सर्व कर्ज फेडून टाकणे हे काही कमी उदारपणाचे नाही. मित्र असावा तर तो असा असावा, असेच मी म्हणेन.

' वडिलानी दिलेली बक्षीसपत्रे व पुनः परत दिलेल्या जमिनीचे कागद व कर्ज-फेडीचे कागद हे सर्व मी वाचून पाहिले आहेत व जमिनी गेलेल्या व जमिनी आलेल्या हे सर्व व्यवहार मला माहित आहेत. म्हणूनच मी व्यंकटेश भट हळव्याना देवमाणूस मानीत आहे.

' पुढे बऱ्याच वर्षानी ( व्यंकटेशभटांची ) दत्तक आई आमच्याच घरी अति-सार होऊन वारली व तिचे शेवटचे अन्त्यविधिचे कृत्य आमच्या वडिलासच करावे लागले. कारण दत्तक मुलगा जवळ नव्हता.

' या परिस्थितीत मी लहानाचा मोठा होत होतो. हे व्यवहार मला जरी त्या-वेळी समजत नव्हते, तरी ते सर्व माझ्यापुढे जागेच्या व घराच्या वाटण्या झाल्या मुळे व पुढे कागदपत्र स्वतः पाहिल्यामुळे मला समजून आले. '

: ४ :

# जन्माचा होरा !

डोंगरावर ज्याप्रमाणे कोठे खडक, कोठे दरा, कोठे काटेरी झुडुप, कोठे झरा, कोठे मुलामय हिरवळ तर कोठे आश्रयाकर्षक छाया देणाऱ्या वृक्षाची भुरळ, असे सारे काही आढळते, तसेच बहुधा मनुष्याचे आयुष्य असते. तथापि, मातृपद यावे पण पदरी आलेली देवाघरची फुले हातोहात सुकून जावीत, असा प्रसंग ज्या माउलीवर येत असेल, तिच्या अंतःकरणाची कालवाकालव कशी होत असेल, त्याची कल्पनासुद्धा न करणेच बरे ! !

' तिकडील शिशुपणचेच गडे । जण रूप नवे नजरेस पडे ॥ '

असे रसिक रमणीयतेने जिवाभाच्या मैत्रिणीला सांगता सांगताच, '**राजहंस माझा निजला** । ' म्हणण्याची पाळी आल्यावर, अंतःकरणातील वात्सल्याची फल्गुनदी झाल्याशिवाय कशी राहिल ? सौ. लक्ष्मीबाई सातवळेकराना चार मुलगे होऊनही त्यांच्यावर वरीलसारखे दुर्दैव ओढवल्यावर, त्यांच्या हळव्या हृदयाने नृसिंहवाडी येथे ' श्रीपाद श्रीवल्लभ यतिवर ' म्हणून नांदलेल्या दत्तात्रयावताराच्या चरण-कमलाकडे धाव घेऊन, मार्कंडेयाच्या आयुष्याचा मुलगा मागितला असला, तर त्यांच्या अंतःकरणात फल्गु होऊन पडलेल्या वत्सलतेच्या ओलाव्यास ते साजेसेच नाही काय ?

सौ. लक्ष्मीबाईंच्या नवसाला पावून १७८९ प्रभवनाम संवत्सरे भाद्रपद कृष्ण ६ स त्याना मुलगा झाला. त्याचे नाव लक्ष्मीबाईनी श्रीपाद असे ठेवले. त्या दिवशीचे जातक पाहून कोण्या ज्योतिषाने भविष्य वर्तविले की मुलाला सोळाव्या वर्षी नसला तरी अठराव्या वर्षी धोका आहे ! ! ते ऐकून त्या घरात थोडीफार वैतागवाडी झालीच असणार ! वयाची ती कालमर्यादा ओलांडून गेल्यानंतर पंडितजींच्या


स्वावलंबी जीवनाला सुरवात झाली आणि १९५३ सालापर्यंतच त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे व सहवासाचे भाग्य संबंधिताना लाभेल, असे जे दुसरे भविष्य बोलले जात होते, तेहि लटके पडून पंडितजींचा लाभ संबंधिताना व जगाला होत असता असताच, पंडितजी ' शतायु ' होऊ लागले. हे सर्व पाहिले म्हणजे इच्छाशक्ति व तपश्चर्या यांच्या जोरावर—

लिखितमपि ललाटे प्रोञ्झितुं ' नृः ' समर्थः ।

असेच म्हणावे लागते. या भविष्य वर्तवण्याच्या बाबत कोणाला खरे–खोटे ठरविण्याला मूळ पंडितजींची पत्रिका आधाराला हवी, तीच मुळात नाही, अशीच खरी वाण आहे. ' श्रीपादा ' च्या जातकावरून त्याचा सोळाव्या वा अठराव्या वर्षी काळ होणार आहे, असे भाकित कोणी तरी बोलून दाखविल्यावर, दामोदरभटानी आपल्या नशिबी पुत्रसौख्यच नाही, अशा वैतागाने, ' श्रीपादा ' ची पत्रिकाच टरकावली, असेही ऐकिवात आहे. ते खरे असेल तर, वैताग कालौघात विरघळल्यानंतर स्वता दामोदरभटानी, अन्यथा दुसऱ्या कोणा ( हळव्यांच्या सारख्या ) हितचिंतकाने स्मृतिने अगर कोणी तरी श्रीपादरावजींचा चेहरामोहरा व हस्तरेषा पाहून होरा करून, पंडितजींचे म्हणून एक जन्मटिपण करून ठेवलेले जुन्या कागदपत्रात ( वसन्तरावजी या पंडिजींच्या वडील चिरंजीवास ) आढळले, ते असे—

' ग्रहदर्शन. शके १७८९ श्रीमुखनामसंवत्सरे भाद्रपद कृष्ण ६ भृगुवासरे सूर्योदयात् गतघटि १५ पळे २५.


जन्मलग्न कुंडली




आता १७८९ शकेची पंचांगे काढून पाहिली तर हे टिपण जुळत नाही. यात भाद्रपद कृ. ६ ला भृगुवासर दिला आहे, पण तो गुरुवार आहे, आणि संवत्सराचे

नावही वेगळेच आहे. त्यामुळे वसंतरावजीना सापडलेल्या टिपणातील 'योग उत्कृष्टातील उत्कृष्ट असूनसुद्धा पंडितजींची कुंडली तीच असे म्हणण्याचे धाडस ज्योतिर्विदांना होईना. ज्योतिर्विद उद्धव विष्णु रुईकर, त्यांचे चिरंजीव भालचंद्रपंत आणि पंचांगकर्ते विसापूरकर यांच्या सल्ल्यावरून, शक–तिथि ( तारीख ) वेळेवरून पंडितजींची एक पत्रिकाच नव्याने तयार करण्याची कल्पना सुचली. त्याप्रमाणे पितापुत्र रुईकर ज्योतिर्विदानी तयार केलेली सांग पत्रिका येथे ज्योतिषाच्या अभ्यासकाना उपयुक्त ठरेल म्हणून दिली आहे व त्याचबरोबर पुण्याच्या ग्रहनक्षत्र–फलादेश–संशोधन-मंडळाचे श्री श्री. के. केळकर, बी. ए. ( ऑनर्स ) यानी तयार केलेली कुंडलीही देत आहोत. आकाशातील ग्रह जन्मस्थ वा जन्मभरीचे कसे राहतील यावर विसंबून माणसाने आयुष्य काढू नये हे खरे; आणि पंडितजी तसे वागलेही नाहीत हे खरे; पण जन्मकुंडलीतील ग्रहमानावरून मनुष्याच्या पिंडप्रकृतीतील विशेष अजमावता येतात हे काही खोटे नाही. श्री केळकर यानी कोलगाव ( अक्षांश १७–८ उ. ), रेखांश ( ७३–१९ पू. ) दुपारी १२–३० मि. वेळ धरून ( पंडितजींचा जन्म दुपारी १२ ते १ च्या दरम्यान झाला असे बोलले जाते त्यावरून ) अयनांश चित्रा २१°–५९' –४४ " कुंडली मांडली आहे ती अशी—

जन्म कुंडली



## नवमांश कुंडली





याच्याच जोडीला श्री रुईकरानी तयार केलेली कुंडलीही पहाण्यासारखी आहे. ती त्यानी कोलगाव ( अक्षांश उत्तर १५–५४ ), ( रेखांश पूर्व ७४–०० ) धरून केलेली आहे.


**सूर्योदयात् घटी १५ पले २५** लोकलटाईम क. **१२ मि. ०० समये जन्मकालः ॥ जन्म समये** —कृत्तिका **नक्षत्र** ॥ —चतुर्थ चरण ॥ वृषभ —**राशि** ॥ —अन्त्य **नाडी** ॥— मेष **योनि** ॥ राक्षस **गण** ॥— वैश्य **वर्ण** ॥ **नाक्षत्र नाम**— एकेशशर्मा **व्यावहारिक नाम** — श्री. श्रीपादराव ॥ **घातवार**— शनिवार ॥ **इति** ॥

श्री. रा. पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर

## लग्न कुंडली



## राशि कुंडली




श्रीशके १७८९ प्रभवनाम संवत्सरे विक्रम संवत् १९२३ बहुधान्य नाम संवत्सरे दक्षिणायने वर्षा ऋतौ भाद्रपद मासे कृष्ण पक्षे षष्ठी तिथौ घटी ४३ पले ४० अनंतरं सप्तम्यां तिथौ गुरुवासरे कृत्तिका नक्षत्र घटी १७ पले ५ अनंतरम् रोहिणी नक्षत्रे—इंग्रजी तारीख १९ सप्टेंबर १८६७ इत्यादि.

अंशात्मक ग्रह

| | | |
|---|---|---|
| रवि | कन्या | ३—५७ |
| चन्द्र | वृषभ | ९—४७ |
| मंगळ | तूळ | ४—०० |
| बुध | कन्या | ८—०० |
| गुरु | कुंभ | ७—०० |
| शुक्र | कन्या | ३—३० |
| शनि | तूळ | २८—०० |
| राहू | सिंह | ४—०० |
| केतु | कुंभ | ४—०० |
| हर्शल | मिथुन | २०—०० |
| नेपचून | मीन | २२—०० |
| लग्न | वृश्चिक | २२— ५ |
| दशम | सिंह | २६—३० |
| अयनांश | | २१—५९—२१ |

टीप : वरील मिति आणि ग्रहांचे अंश निरयन दृक्प्रत्ययी प्रत्यक्ष गणित करून तयार केले आहेत.

*

भाषाशास्त्राचा सखोल अभ्यास, ध्येयवादी, थोर कलावंत, आयुर्दाय आणि क्रांतिकारकत्व यादृष्टीने फलज्योतिषाच्या अभ्यासूना पंडितजींची कुंडली विशेष अभ्यासनीय वाटेल. पंडितजींच्या कुंडलीत महापुरुष–लक्षण आहे. दशमबिंदूच्या जवळ कन्याराशीत बुध दशमात आहे. हा भद्रयोग आहे. भद्रयोग करणारा दशमातील स्वगृहीचा बुध शुक्राच्या युतीत असून शुक्र सिंहासनयोगात आहे. भद्रयोग असता मनुष्य दीर्घायु, कुशाग्रबुद्धीचा—

विद्वानात हिरा चकाकत विद्वानात हिरा।

आणि वक्ता होतो. रविशुक्र अंशात्मक युति कलेच्या दृष्टीने चांगली असते. पंडितजींची कुंडली चंद्रलग्नाकडून सोडविण्याचा प्रयत्न केल्यास उत्तम सुटेल. त्यांच्या कुंडलीत गुरु कुंभ या शास्त्रीय राशीत असून लग्नेश मंगळाच्या संपूर्ण त्रिकोण योगात आहे. गुरु पंचमेश आहे. गुरु आणि मंगळ नवमांशात बलवान् असून दशवर्गात अनुक्रमे गोपुरात आणि सिंहासनयोगात आहेत. पंचमेश गुरु इतका बलवान् असल्यामुळे पंडितजी बौद्धिक वा बुद्धिवादी संप्रदायाचे आहेत. लाभेश बुध स्वगृहीचा आणि शुभग्रहयुक्त हा ' पुष्कर ' नामक शुभयोग आहे. हा योग सुशील दर्शविणारा आहे. दशमस्थानांत राहूसारखा ग्रह सिंहराशीत आहे. कर्तबगारी दर्शविणारा व यशोदायी हा योग आहे. धार्मिक कार्ये व तीर्थयात्रा यांचाही तो द्योतक आहे. व्ययस्थानांत शनिमंगळ पापग्रह आहेत ते बंधन योग दर्शवितात. भाग्याधिपति चंद्र सप्तम स्थानांत बलवान् आहे. हा ' चंद्रचूड ' नामक शुभयोग उदार स्वभावाचा द्योतक आहे. प्रापंचिक सुखाचाही तो सूचक आहे.

पंडितजींच्या कुंडलीचे रहस्य मंगळ, गुरु, बुध व शुक्र या ग्रहाना जे नवमांश आणि इतर वर्गबल मिळाले आहे त्यात आहे. लग्नेश मंगळ सिंहासन–योगात व तुला या चर राशीत आहे. अष्टमेश बुध स्वगृहीचा गोपुरांशी आहे. हे सर्व योग उत्तम आयुर्दायदर्शक आहेत. लग्नाधिपति व्यय स्थानात तूळराशीत शनियुक्त असल्याने दृढनिश्चयी, कष्टाळू, निस्पृह व मितव्ययी स्वभाव राहतो. एकादश स्थानातील रवि–बुध–शुक्र युति धार्मिक विषयामधील संशोधनकार्य घडवन आणते. या कुंडलीतील विंशोत्तरीय महादशा या—

**विंशोत्तरीय मानाने क्रमवारीने महादशा काल खालीलप्रमाणे** वयवर्षे

| | | | |
|---|---|---|---|
| रवि महादशा : | २ महिने | : सप्टेंबर आणि आक्टोबर १८६७ | |
| चन्द्र महादशा : | १० वर्षे | : नवेंबर १८६७ ते आक्टोबर १८७७ अखेर | १० |
| भौम महादशा : | ७ वर्षे | : नवेंबर १८७७ ते आक्टोबर १८८४ अखेर | १७ |
| राहू महादशा : | १८ वर्षे | : नवेंबर १८८४ ते आक्टोबर १९०२ अखेर | ३५ |
| गुरु महादशा : | १६ वष | : नवेंबर १९०२ ते आक्टोबर १९१८ अखर | ५१ |

| | | | |
|---|---|---|---|
| शनि महादशा : | १९ वर्षे | : नवेंबर १९१८ ते आक्टोबर १९३७ अखेर | ७० |
| बुध महादशा : | १७ वर्षे | : नवेंबर १९३७ ते आक्टोबर १९५४ अखेर | ८७ |
| केतु महादशा : | ७ वर्षे | : नवेंबर १९५४ ते आक्टोबर १९६१ अखेर | ९४ |
| शुक्र महादशा : | २० वर्षे | : नवेंबर १९६१ ते आक्टोबर १९८१ अखेर | ११४ |
| रवि महादशा : | ६ वर्षे | : नवेंबर १९८१ ते आक्टोबर १९८७ अखेर | १२० |

वर दर्शविल्याप्रमाणे जन्मकाली आरंभी २ मास रवि महादशा आहे. वय वर्षे १० अखेर चन्द्र महादशा काल आहे. आक्टोबर १८७७ पर्यंतचा हा काल सुखावह समृद्धीकारक राहील. पत्रिकेत चन्द्र उच्च राशीत बलवान आहे.

**उच्चाधिरुढस्य दशा जडांशोः कुलानुसारं हि ददाति राज्यम् ।**
**योषाविभूषात्मजगोतुरंगगजाप्तिसौख्योपचयं जयं च ॥**

अशाप्रकारे सर्वत्र यशदायक सुख–समृद्धिकारक असा हा चन्द्रमहादशाकाल आहे.

वयवर्षे ११ नंतर वयवर्षे १७ अखेर ( सन १८७७ ते १८८४ ) भौम महादशा काल आहे. लग्नेश मंगळ व्यय स्थानात पापग्रहयुक्त आहे. त्यामुळे या दशाकालांत शारीरिक मानसिक स्वास्थ्य कमी राहते. **पित्तासृग्ज्वरपीडनं तु सततं ।** यानुसार पित्तविकार उष्णविकार यांनी त्रास राहणे शक्य असते.

वयवर्षे १८–१९–२० सुमारास दिनवर्ष पद्धतीने चन्द्र तृतीयस्थानी येत आहे. हा सप्तमाचे आणि सप्तमेश शुक्राचे त्रिकोणी येत आहे. खेरीज १९ वे वयवर्ष सप्तम स्थानात पडते. या दृष्टीने वयवर्षे १९–२० सुमारास विवाहयोग येतो.

वयवर्षे १८ पासून वयवर्षे ३५ अखेर राहू–महादशा–काल आहे. सन १८८४ ते १९०२ सुमाराचा हा महादशा काल महत्त्वाचा आहे. पत्रिकेत राहू दशम स्थानात आहे. अनेक तऱ्हेचे व्यवसाय राहतात. काही काल नोकरीपेशाहि राहतो.

**अतीवरोगं परदेशवासम् । विवादबुद्धिं कुरुते फणीशः ॥**

यास अनुसरून शारीरिक मानसिक स्वास्थ्य कमी राहते, वारंवार फिरावे लागते, वादविवादाचे प्रसंगहि निर्माण होतात. असे काहीसे या राहू महादशाकालाचे फल आहे.

वयवर्षे ३६ पासून वयवर्षे ५१ अखेर गुरु–महादशा–काल आहे. जन्म पत्रिकेत गुरु चतुर्थ स्थानात असून याजकडे धनस्थान आणि पंचम स्थान यांचे स्वामित्व आहे.

**स्थानप्राप्तिं वित्तयानांबराप्तिम् । राजस्नेहं चित्तशुद्धिं विभूतिम् ॥**
**ज्ञानाचारं पुत्रदारादि लाभम् । देवाचार्यः स्वे विपाके करोति ॥**

या गुरुमहादशाकालात कौटुंबिक सौख्य चांगले राहील. व्यवसायक्षेत्रातहि स्थैर्य येईल. भरभराट, मान, कीर्ति, यश लाभेल.

वयवर्षे ५२ पासून वयवर्षे ७० अखर शनि–महादशा–काल आहे. पत्रिकेत शनि व्यय स्थानात बलवान असून याजकडे तृतीय आणि चतुर्थ स्थान यांचे स्वामित्व आहे.

भवेद्दशायां हि शनैश्चरस्य नरः पुरग्रामकृताधिकारः ।
धीमांश्च दानाधिकतातिशालि नानाकलाकौशलसंयुतश्च ॥

अतिशय बुद्धिमानपणा राहतो, दानादि धार्मिक कार्यें घडून येतात, कलाकौशल्यादि कामे घडतात. अशी या दशेची फले आहेत. तृतीयेश शनि व्यय स्थानात चर राशीत असल्याने या दशाकालात प्रवास बरेच घडून येतात.

वयवर्षे ७१ ते ८७ या अवधीत बुध–महादशा–काल येत आहे. पत्रिकेत बुध लाभस्थानात स्वगृहीचा आहे; आणि अष्टम स्थानाचेहि आधिपत्य या बुधाकडे आहे.

स्वकीयदाये गुरुबंधुमित्रैरर्थार्जनं कीर्तिसुखं करोति ।

याप्रकारे हा सन १९३७ ते १९५४ दरम्यानचा बुध–महादशाकाल लाभदायक आणि समृद्धीचा राहील. व्यवसायक्षेत्रातून यश चांगले राहील. मोठे मित्र, स्नेही लाभतील, आणि त्यांचेहि सहकार्य उत्तम राहील. अष्टम स्थानाचेहि आधिपत्य बुधाकडे येत असल्याने शारीरिक मानसिक स्वास्थ्य हानिकारक घडामोडीहि या बुध–महादशाकालात अनुभवास येतील.

वयवर्षे ८० ते ८२ सुमारास दिनवर्ष पद्धतीनुसार चन्द्र षष्ठस्थानी म्हणजे मूळ शनि मंगळासमोर येत आहे. यामुळे या दरम्यानचा काल बराचसा तापदायक जाणवणारा आहे.

वयवर्षे ८८ पासून वयवर्षे ९४ अखेर केतु महादशा काल आहे. पत्रिकेत केतु हा चतुर्थ स्थानात आहे. यामुळे या दशाकालात स्वास्थ्य कमी राहील. काही ना कांही प्रकारे दगदग, चिंता राहण्याची शक्यता आहे.

किंचित्सुखी च शिखिनः परिपाककाले ।

यानुसार या केतु–महादशेत सुख कमी राहील.

वयवर्षे ९५ पासून म्हणजे सन १९६१ नंतर शुक्र–महादशा–काल येत आहे. हा काल २० वर्षाचा आहे. पत्रिकेत शुक्र हा सप्तम स्थान आणि व्यय स्थान यांचा स्वामी असून लाभस्थानात बलहीन राशीत आहे. त्यामुळे हा शुक्र–महादशा–काल शारीरिक, मानसिक स्वास्थ्याचे दृष्टीने साधारण स्वरूपाचा राहील.

सौम्यभौमासिताः पापाः शुभौ गुरुनिशाकरौ ।
सूर्याचान्द्रमसावेव भवेतां योगकारकौ ॥
जीवो निहन्ता सौम्याद्या हन्तारो मारकाह्वयाः ।
तत्तत्फलानि विज्ञेयान्येवं वृश्चिकजन्मनः ॥

श्री केळकर यानी १८ सप्टेंबर १९६६ रोजी स्वच्छच सांगून टाकले आहे की "श्री. दा. सातवळेकर यांच्या वृश्चिक लग्नाच्या पत्रिकेत दशमबिंदुनजीक रवि-बुध-शुक्र आध्यात्मिक युतीत असल्याकारणाने, चित्रकार म्हणून त्यानी जीवनाला सुरवात केली. त्यातही ध्येयवाद होता. पंचमेश गुरु कुंभेत व लग्नेश मंगळाच्या त्रिकोणात असल्याकारणाने वेदसंशोधन, वेदग्रंथप्रसिद्धि व वैदिक संस्कृतिजन्य वाङ्मयाचे प्रसिद्धीकरण हे जीवनध्येय साकार झाले. लग्नेश मंगळ सिंहासनयोगात, अष्टमेश बुध गोपुराशी, आयुष्यकारक शनि तुळेत असल्यामुळे शंभरीचे दीर्घायुष्य लाभले. "

ते काही असले तरी पंडितजी '**मदायत्तं तु पौरुषम् ।**' अशाच मनोवृत्तीचे आहेत. एवढेच नव्हे तर—

**वटवृक्षासम वर्षंगणतिने जरी वाढला विस्तार । महति न पावे मुळी नर ॥**

हे ते पुरेपूर जाणतात. आयुष्य कर्तृत्वाने मोजावयाचे असते तरच ते ऐतिहासिकपणे अमर व अमृत होते.

ø ø ø

: ५ :

# सुखाचा म्हटलेला बालपणीचा काळ

**पंडितजींचा** जन्म एका सात्विक वैदिक घराण्यात झाला. नवसाने झालेला मूलगा हा ! प्रकृतीने प्रारंभी दुबळाच होता. त्यामुळे सातवळेकर कुटुंबियानी त्याला तळहाताच्या फोडासारखा जपला, यात शंका घेण्यासारखे काहीच असण्याचे कारण नाही. त्याचे बालपण कसे गेले, 'आठवडेकरी' झालेल्या त्या मुलाचे औषधपाणी आईवडिलानी बहुधा 'आजीबाईंच्या बटव्यातून' केले असले तरी केव्हा, कोणत्या आजारावर काय औषधपाणी झाले याची माहिती असणारे व देणारे पंडितजींचे वडीलधारे माणूसच आता नाही. त्यामुळे पंडितजी मुंज झाल्यावर सावंतवाडीस जाऊन तेथील माठेवाडचात मामा पेंढरकरांच्या हाताखालीच आपला 'श्रीगणेशा' गिरवू लागले, एवढचा मोघम माहितीशिवाय अधिक माहिती इतरत्र मिळत नाही; म्हणून मग स्वता पंडितजींकडून त्यांच्या स्वताच्या काही स्मरणाने व त्याना त्यावेळच्या वडीलधाऱ्या माणसाकडून कळालेली माहिती म्हणून, ते जी माहिती देत असतात तीच घेऊन पुढे चालले पाहिजे. पंडितजींना ल्हानपणची जी जी काय माहिती आहे ती माहिती घेतली तर अधिक चांगले, म्हणून ते सांगतात, तेच समजून घेणे बरे ! ते सांगतात—

'माझ्या पाठीमागची भावंडे नवसाशिवाय जगली. माझी माझ्या पाठीमागची बहीण जन्मापासून अंगापिंडाने सशक्त व धडधाकट होती. चवथ्या वर्षी तिला शिमग्यातील वाघाच्या सोंगाची भीति घरातील एका बाईने दाखविली व त्यामुळे ती घाबरून जी बेशुद्ध झाली, ती पुन: शुद्धीवर आलीच नाही. दर पाच मिनिटानी भीतीने अंग कापवीत २४ तासातच ती निवर्तली. हा मृत्यु माझ्यासमोर झाला. तो हृदयद्रावक देखावा अजून माझ्यासमोर आहे.

' यानंतर माझ्या आईला दोन मुलगे झाले. एक कृष्णा ऊर्फ सखाराम व दुसरा सीताराम. चि. सखाराम घरची व्यवस्था पहात राहिला व सीताराम पुण्यास बी. ए. पर्यंत शिकून अमेरिकेस जाऊन स्वकष्टाने पैसा मिळवून, सायन्स-मध्ये डॉक्टर होऊन दक्षिण हैदराबादला विवेकवर्धिनी शिक्षणसंस्थेचा प्रिन्सिपॉल झाला.

' लहानपणची आठवण मला बरीच आहे. तिसरे वर्षी मी आईचे दूध पीत असे. ते मी पिऊ नये, यासाठी अनेक उपाय ती करीत असे. माझ्या पाठीमागच्या प्रत्येक भावंडामध्ये बरोबर ५ वर्षांचे अन्तर आहे. माझ्या मागची मुले माझ्या आईला लवकर होत होती, असे म्हणतात.

' चवथ्या वर्षी मी अक्षरे शिकलो. त्यावेळी धुळीच्या पाटचा असत. लाकडी फळीवर धूळ पसरून त्यावर लिहावे लागत असे. यामुळे मूळाक्षरे न म्हणता ' धुळाक्षरे ' म्हणत. शाळमध्येही या धुळीच्याच पाटचा होत्या.

' पाचव्या वर्षी मी चांगले वाचावयास लागलो. दिवसा आणि संध्याकाळी वडील अनेक स्तोत्रे, पाढे वगैरे शिकवीत. सर्व पाढे, अकरकी, एकोत्री, पावकी, निमकीपासून औटकी हे सर्व माझे पाठ झाले होते. त्याचप्रमाणे पूजेचे मंत्र व फल-ज्योतिषाला लागणाऱ्या व गावातल्या कामास उपयोगी पडणाऱ्या सारण्या मला तोंडपाठ येऊ लागल्या होत्या. रामरक्षा, महिम्न आदि पौराणिक स्तोत्रे मला येत होती. महिम्नाचा अभिषेक देवावर केला असता त्यावेळी ३।४ आणे मिळत असत. हे अध्ययन असे द्रव्यप्राप्तिचे त्यावेळचे एक साधन होते '

नरसोबावाडीच्या दत्ताला नवस केल्याप्रमाणे श्रीपाद अशक्त असूनही सात वर्षे जगला, म्हटल्यावर नवसाप्रमाणे त्याची मुंज नरसोबाचे वाडीस केलीच पाहिजे, असे दामोदरपंतास साहजिकच वाटले. मग छोटा श्रीपाद, त्याची आई, घरची दोन मोठी माणसे अशी एका बैलगाडीतून सारी निघाली. वडील कंदील घेऊन पायीच गाडी-बरोबर चालत होते. रोज सकाळी आठाला प्रवासास सुरवात व रात्री ९ ला सोयीस्कर ठिकाणी मुक्काम, असे करीत करीत पाच दिवसानी कोलगावाहून नरसोबाचे वाडीस मंडळी आली. मुंज होऊन श्रीपादाच्या गळचात यज्ञोपवीत पडले व दिवसातून दोन वेळा संध्या व अग्निहोत्रहि करणे श्रीपादास भाग पडले. वाडीहून कोल्हापूरमार्गे कुलदेवतेचे दर्शन करून घरी परतल्यावर दोन महिन्यानी एका सुमुहूर्तावर श्रीपादाचे समा-वर्तन ऊर्फ सोडमुंज झाली.

मग स्वावलंबनाची जबाबदारी वाढलीच. श्रीपादराव स्वताचे कपडे व भांडी स्वताच धुवू लागले; अंथरूण पांघरूण घालणे, वापरणे व काम झाल्यावर नीट घडी करून जेथल्या तेथ ठेवणे ही मामुली कामे तर ते नियमितपणे करू लागलेच; पण त्याशिवायही त्यांचे शिक्षण कसे झाले, ते सांगताना, ते लिहितात की—

' पूर्वजन्मीचे संस्काराप्रमाणेच अनुवंशिक संस्कारही मुले सुधारण्यास वा

बिघडण्यास कारण होतात. त्याकाळी ब्राह्मण वेदपाठी असत. ब्राह्मणकुळात मुलगा पाच वर्षांचा झाल्याबरोबर, त्याला प्रातःकाळी स्नान करून बारा सूर्य-नमस्कार घालावे लागत. तसेच मला पाचव्या वर्षी सूर्यनमस्कार सुरू झाले. सूर्यनमस्कार हा एक दशयोगी आसनांचा व्यायाम आहे. पण या काळी व्यायामाचे महत्त्व समजण्याची अक्कल माझ्यात आली नव्हती. तथापि सूर्याची उपासना म्हणून तो एक व्यायाम सुरू झाला. काही तरुण हे सूर्यनमस्कार बाराशेपर्यंत रोज घालणारे असत. त्यांचे शरीर अत्यंत बळकट असे. काही शंभर, काही पाचशे, असे रोज सूर्यनमस्कार घालणारे सुद्धा माझ्या लहानपणी असत. पण ( बाराहून ) अधिक सूर्यनमस्कारांचा व्यायाम करून आपली शरीरयष्टि सुधारण्याकडे माझी प्रवृत्ति झाली नाही.

' आठव्या वर्षी मी मराठी शाळेत सावंतवाडीला जाऊ लागलो व माझा अभ्यास पाहून मला दुसऱ्या यत्तेत बसता आले. एव्हापासून मराठीची ६ वी इयत्ता होईपर्यंत माझा पहिला व दुसरा नंबर सुटला नव्हता.

' या वेळी मीच काय तो ८ वर्षांच्या वयाचा होतो. या वेळी २०।२० वर्षांची मुले दुसऱ्या वा तिसऱ्या यत्तेत असत. माझ्याबरोबर शेख महम्मद नावाचा एक काजीचा मुलगा, चांगला दाढीमिशा आलेला, दुसऱ्या यत्तेत होता. तो २५ वर्षांचा तरी असावा. कारण तो अरबी कुराण वाचीत असे व वाचता वाचता रडत असे. रडण्याचे कारण त्याच्या धर्माच्या संचालकांचा पराभव व कत्तल झालेले वर्णन ! !

' चवथ्या यत्तेत श्री विठोबा पाटणकर म्हणून शिक्षक होते. त्यानी विद्यार्थ्यास छडी मारली तर ती त्याने पकडावी व ती त्या मास्तरास सोडविता येऊ नये. अशी अवस्था झाल्यावर त्यानी ' सोड रे, सोड रे ' म्हणून गयावया करावे; मग विद्यार्थ्याने ती छडी सोडावी ! सहाव्या यत्तेतील मुलांची मुले बिगरयत्तेत शिकत, असा तो वेळ होता !

' चवदाव्या वर्षी मी मराठी ६ वी पास झालो व मराठी शाळा सोडली. यावेळी इंग्रजी शाळेत जावे असे मनात आले. यावेळी श्री पाणंदीकर हेडमास्तर सावंतवाडी हायस्कूलमध्ये होते. ते प्रेमळ, शान्त व विद्यार्थ्यांस हरएक प्रकारचे सहाय्य करणारे होते. कित्येक विद्यार्थ्यांसाठी ते आपल्या पगारातून फी देत व कित्येकास पुस्तकेही देत. हेच पुढे डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकरांचे जावई झाले. यावेळी इंग्रजी शाळेची फी दरमहा फक्त आठ आणे होती. मला वडिलानी स्पष्ट सांगितले की ' आम्हास इंग्रजी नको व इतकी डोईजड फी आम्हास देता येणार नाही. ' मी इंग्रजी शिकून बिघडू नये अशी त्यांची मनापासून इच्छा होती.

' मी श्री पाणंदीकरांना भेटलो. त्यानी फी माफ होणार नाही असे स्वच्छ

सांगितले. यामुळे इंग्रजी शाळेत मी फक्त ६ दिवसच होतो. माझे इंग्रजी शिक्षण असे सहा दिवसातच संपले. यामुळे मला राग आला व इंग्रजी घरच्या घरी शिकण्याचा निश्चय केला व मित्राकडून क्रमाने १ ते ४ रॉयल रीडर्स आणून घरी इंग्रजीचा अभ्यास चालविला. श्री बळवंतराव लुकतुके तेथे सावंतवाडीस होते. त्यानी मला हावर्डचे पहिले पुस्तक शिकवले. ते अशा रीतीने शिकवले की तेवढ्या ज्ञानाने रॉयल रीडरे मला वाचता येऊ लागली. काही अडले तर मी दुसऱ्यास विचारी. याप्रमाणे एक वर्षात चार रीडर्स माझी झाली व कामापुरते इंग्रजी मला येऊ लागले. पुढे मी वाचन सुरू ठेवले व त्यामुळे मला कामचलाऊ इंग्रजी आले. साधा पत्रव्यवहार व कोणत्याही विषयावरील इंग्रजी पुस्तक समजेल एवढे माझे इंग्रजी ज्ञान घरीच २।३ वर्षांत झाले. पण व्याख्यान देण्याची तयारी व्हावी इतके इंग्रजी मात्र मला आले नाही.

' घरी काही ऋग्वेदसूक्ते, भिक्षुकीला लागणारे प्रयोग वगैरे झाले होते. त्यावेळी हायस्कूलमध्ये संस्कृत शिक्षक श्री चिंतामणशास्त्री केळकर होते. त्यांच्याजवळ कौमुदी, मनोरमा, शेखर इतके माझे व्याकरण झाले होते. यावेळी मी ' संस्कृत व्याख्यानमंडळ ' काढून साप्ताहिक व्याख्याने संस्कृतमध्ये दिली जावी व संस्कृतमध्ये वादविवादही होत रहावे, असे केले होते. आमच्या मंडळात त्यावेळी ७।८ मंडळी होती; ती संस्कृत व्याख्याने देत.

' सावंतवाडीला ड्राइंग–शाळा सुरू झाली. तेथे मी जाऊन चित्रकला शिकू लागलो. पहिल्या दोन परीक्षा तेथे झाल्या व सन १८९० ला मी मुंबईस आर्टस्कूलमध्ये दाखल झालो. '

वडील दामोदरपंत याना चित्रकलेचे वरदान होते आणि त्या निसर्गाच्या वरदानाचा वडिलार्जित वारसा श्रीपादरावाकडे आला होता. म्हणूनच सावंतवाडीस १८८७ साली औद्योगिक शाळा निघताच, श्रीपादरावांचा कलामोहर बहरला व दरवळूही लागला.

कोलगाव व सावंतवाडीस असा अभ्यास चालू असता श्रीपाद दामोदरांची बुद्धि गुंगारे मारू लागली होती. वेदाभ्यासी ' अलक्ष्मीर्मे नश्यतु । ' अशी प्रार्थना तर करीत असतो आणि द्रोणाचार्य तर म्हणतात की ' ब्राह्मण म्हणजे दारिद्र्यच ! ' कसा काय मेळ घालावयाचा ? सावंतवाडीस आपले एक नातेवाईक मामा पेंढरकर यांच्याकडे रहात असता, त्या दोन्ही गोष्टींच्या समन्वयसमाधानासाठी पृच्छा करीत राहणे हा श्रीपादाचा छंदच होता. १८७५ मध्ये सावंतवाडीस आल्यापासून वरीलसारखे छंद श्रीपादाने कमी केले नव्हते. सावंतवाडीस त्यावेळी वर्षास एक रुपाया खोलीभाडे असल्याकारणाने ड्राइंगचा छांदिष्ट श्रीपाद घरी कोलगावी जाण्यापेक्षा सावंतवाडीसच राहून आपली हौस पुरवून घेई. घरी गेलाच तर हटकून गणपतीला व होळीला जावयाचा. तेथे सुद्धा सावंतवाडीप्रमाणे आमराईतील व शेजारच्या बागेतील

*

झाडाकडे टक लावून पहात बसावयाचे आणि खाली कागदावर चित्ररूपाने त्याचे प्रतिबिम्ब उमटवावयाचे ! असा खाक्या चाले. जे झाडासंबंधी तेच दुसऱ्या निसर्ग-रमणीय देखाव्यासंबंधी. स्वारीची ही भाव-समाधि अशी लागे की जेवावयाची वेळ झाली तरी श्रीपादाला त्याचे भान नसे आणि आईने हाक मारली तरी कागदावर चित्र बरोबर उमटल्याशिवाय स्वारी उठत नसे.

श्रीपादाची मराठी सहावी झाल्यापासून त्याचे सोळावे वर्ष वडील मातोश्रींच्या डोळ्यापुढे तरळू लागले होते. मन चिन्ती ते वैरी ना चिन्ती ! कुंडलीतील अपमृत्यू-च्या योगाने त्यांची मने कातर झाली होती. तरीही त्या उभयतांचा परमेश्वराच्या कृपेवर कमालीचा विश्वास असल्याकारणाने, श्रीपादाच्या जन्मापूर्वी नवस केल्या-प्रमाणे, श्रीपादाच्या सातवे वर्षी, त्याची मुंज नरसोबाचे वाडीस करून त्याला देवा-जवळ दीर्घायुष्य मागितले होते. महाराष्ट्राच्या स्वाभिमानशुद्ध चैतन्यमय काल-खंडाला याच १८७४ साली विष्णुशास्त्री चिपळूणकरानी सुरवात केली होती. आई-वडिलानी श्रीपाद-श्रीवल्लभ-यतिवराला मागितलेला प्रसाद प्राप्त होत आहे, हे वर्गात नेहमी पहिला वा दुसरा क्रमांक ठेवणाऱ्या श्रीपादरावानी सावंतवाडीस ( संस्कृत वाग्वर्धिनी ) संस्कृत व्याख्यानमंडळ काढल्याचे ऐकल्यापासून, माता पितराना पटू लागले. प्रसंगवशात् सावंतवाडी येथे संकेश्वरमठाचे शंकराचार्य आले असता, वीस वर्षाच्या श्रीपादरावांचे ' धर्म ' या विषयावर संस्कृतमध्ये अस्खलित व्याख्यान झाले व शंकराचार्यांनी त्याबद्दल शाबासकी दिली. हे समजल्यावर वडि-लांचा संतोष काय पुसावा ? त्यावेळी श्रीपादराव सतराव्या वर्षात होते. तेव्हा त्यांचा मृत्युयोग टळला अशी सर्वच आप्तेष्ट आणि हितचिंतक यांची खात्री झाली. आता—

' प्राप्ते तु शोडषे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् । '

एवढीच वडीलधाऱ्यांची जबाबदारी होती. दामोदरभटानी त्यालाही सुरवात केली. श्रीपादरावानी गावकीच्या कामातील वडिलांचा भार थोडा फार हलका करावयास प्रारंभ केला. विशेषतः रात्री आठ साडेआठ वाजता डोंगरकपारी चढून उतरून कोठे पूजा-पोथी सांगावयास जावयाचे असेल, आणि ते उरकून रात्री एक-दीडला घरी परतणे होणार असेल, तर तो त्रास वडिलाना आता होऊ नये याची दक्षता श्रीपादराव घेऊ लागले होते.

हे सर्व असावे तसेच असले तरी, तेवढ्याने बुद्धीच्या चमकेला व कर्तृत्वाच्या प्रसरणाला वाव कोठे होता ? तो वाव मिळवण्यासाठी पात्रतासिद्धी प्राप्त करून घेऊन कार्याला लागण्यास सावंतवाडीच्या बाहेर पडणे जरूर होते. महत्त्वा-कांक्षी बुद्धिमत्तेचा उमलता तरुण आपली कळी आणि कला प्रगटवू, उमलवू, विकसवू पहावयास, वयाच्या विसाव्या वर्षाअखेर करीत आलेल्या भिक्षुकीतून बाहेर पडू पहात होता. त्याला वत्सल हृदये कशी आडविणार ? भिक्षुकीपेशावर उदरनिर्वा-

हाची शाश्वति त्याकाळीसुद्धा विरघळत चालली होती. श्रीपादरावानी साध्य केलेल्या चित्रकलेशिवाय प्रतिष्ठित उदरनिर्वाहाचा मार्ग दिसत नव्हता. तो मुंबईसारख्या मोहपुरीशिवाय कोठे सुगम होणार ? शिक्षणानिमित्त व व्यवसायानिमित्त मुंबईकडे धाव घेण्याचा शिरस्ता कोकणच्या त्या वेळच्या मंडळीत पडलाच होता. त्याशिवाय—

' अंतरी असाव्या नाना कळा। '

हे साधणारच नाही, अशी सर्वसाधारण समजूत होती. तीस अनुसरून श्रीपादरावानी आपले तोंड मुंबईकडे वळवले. त्या १८९० साली ' फोटोवरून हाताने मला मोठी चित्रे काढता येत होती व त्यामुळे पसेही मिळत होते.प्रत्येक चित्राला १० रु. मिळत व ते फार आहेत असे वाटे. ' असे श्रीपादरावानीच सांगून ठेवले आहे. तेव्हा जरूर तर ' काहो मेळवी मग शिके । ' असा प्रसंग आला तर न डगमगता आपण तो निभावू, अशा आत्मविश्वासाने श्रीपादराव मुंबईस जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स-मध्ये दाखल झाले. स्वावलंबन नि स्वाभिमान ही गरीबांची श्रीमंती असते. ती ज्याच्याजवळ आहे तो ' फुकट तू दवडी न घडीघडी ' म्हणून कामास लागतो व यशस्वी होतो.

सावंतवाडीस श्रीपादराव सातवळेकर शिकावयास राहिले ते मामा पेंढरकर या सात्त्विक व गरीब वृत्तीच्या मुलींच्या शाळेतील शिक्षकाकडे ! श्रीपादराव दुसरीत असताना त्यांच्या वर्गात कुराण पढणारा अहमदखान काझी हा बावीस वर्षांचा मुलगा असे. हिंदूंच्या मुलाना आईवडिलानी शिकविलेली स्तोत्रे धड येत नसत; म्हणून काझीची ती धर्मनिष्ठा पंडितजींच्या मनात स्वधर्मनिष्ठेची ' लावणी ' करण्यास कारणीभूत झाली. पाणंदीकरांचेकडून इंग्रजी शाळेत नादारी मिळत नाही व आपणास फी द्यावयास परवडत नाही, अशा स्थितीत श्रीपादरावांच्या मनात अंकुर धरू लागलेल्या स्वधर्मनिष्ठेला पाणी घालून श्रीपादरावानी आता उत्तम पौरोहित्य करावे, असे वडिलानी सुचविले. पण वेदाध्ययन आवडले तरी भिक्षुकीच्या दक्षिणेसाठी हात पसरणे श्रीपादरावाना पसंत नव्हतेच नव्हते ! म्हणून चिंतामणशास्त्री केळकरांच्या हाताखाली आपल्याबरोबर शिकणाऱ्या गुरवाच्या मुलासह दोन तीन साथ्याना घेऊन श्रीपादरावानी संस्कृतभाषा–प्रसारिणी या नावाची संस्था स्थापन केली. तेथे ही मंडळी संस्कृतातून बोलू-चालू–वादविवाद करू लागली. या कमाईचा उपयोग श्रीपादरावाना पुढील आयुष्यात पुष्कळच झाला.

सावंतवाडीस श्रीपादराव चित्रकलाचतुर झाले होते. त्यांचे वडील दामोदरपंत घरातल्या भिंतीवर उत्तम उत्तम चित्रे चितारीत आणि रंगवीत. भारतीय परंपरेच्या चित्रकलेतील छटा, ज्योतिष आणि मातीच्या मूर्ति बनविण्यातील कौशल्याइतक्याच त्याना प्रिय असत. म्हणून वेदपठणाची वडिलांची शक्ति संस्कृतमध्ये भाषण करण्यातील निपुणतेने वाढवून जशी श्रीपादरावानी वारसा म्हणून चालविली, तशीच सावंतवाडीचा रेसिडेंट वेस्ट्रॉप याने तेथे तांत्रिकशाळा काढताच तीत प्रवेश मिळवून

वडिलांची चित्रकलानिपुणता श्रीपादरावनी वारसाहक्कानेच उचलली. तांत्रिकशाळेतील मालवणकर–गुरुजींची स्केचेस् काढण्याची हातोटी श्रीपादरावानी आपलीशी केली. इतकी की छोटया चित्रावरून झपाटयात मोठे हुबेहुब चित्र करून देऊन श्रीपादराव सहज पाच रुपये मिळवीत. रुपयास २५ ते २७ शेर तांदूळ मिळण्याच्या त्या काळात पाच रुपये प्राप्ती ही मातबर प्राप्ति मानली जाई. सावंतवाडीच्या तांत्रिकशाळेत तीन वर्षांच्या अवधीत अशी पात्रतासिद्धि मिळवल्यावरच ' श्रीपादरावानी मुंबईस जाऊन ' ज्याचे नशीब त्याच्या हातात ' या अनुभवसिद्ध म्हणीचे प्रत्यंतर पाहण्याचा मनसुबा केला आणि त्याप्रमाणे त्यानी मुंबईची वाट धरली.

: ६ :

# विद्यार्जनाचा समाप्तिकाळ; रोजगाराची सुरवात

सावंतवाडीच्या तांत्रिकशाळेतून दोन परीक्षा चित्रकलेत दिलेला विद्यार्थी मुंबईस ती कला पुढे शिकण्याकरता जावा, ही मूळ कल्पना त्या तांत्रिकशाळेतील शिक्षकांची. तिला घरचा विरोध पैसे उचलून देण्याच्या अडचणीमुळे ! पण लोकांचे फोटो, प्रतिमा एन्लार्ज करून देऊन आपण स्वावलंबी होऊ असा आत्मविश्वास श्रीपादरावानी दाखविला आणि श्रीपादरावांच्या शिक्षणासाठी दरमहा दहा रुपये देणगी देणारे एक उदार गृहस्थ दामोदरपंताना भेटले, तेव्हा त्यानी श्रीपादरावास परवानगी दिली. परवानगी मिळताच वेंगुर्ला बंदरावरून एक रुपाया भाडे खर्चून आगबोटीने श्रीपादराव मुंबईस आले. मुंबईस ग्रँटरोड भागात, स्लीटर रोडवर अभ्यंकरांचे चाळीत, श्रीपादरावांच्या वडिलांचे स्नेही बाळकृष्णपंत बाबा जांभेकर म्हणजे ( पुढे उद्योगपति झालेल्या ) लक्ष्मणराव किर्लोस्करांचे मेहुणे रहात होते. त्यांच्याकडे श्रीपादरावानी तळ दिला. कस्टमखात्यातील मनमिळाऊ अधिकारी म्हणून बाबा जांभेकरांचा लौकिक होता; आणि ते श्रीपादरावाना सावंतवाडीस इंग्रजी शिकविणाऱ्या बळवंतराव लुकतुक्यांचेही स्नेही होते. गोरगरीब विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणाऱ्या जांभेकरानी श्रीपादरावाना ठेवून घेतले आणि श्रीपादरावानी तेथील जिन्याखालील त्रिकोणाकृति पोकळीत आपली वळकटी—बैठक टाकून, जांभेकरांच्या बिऱ्हाडात आपण अडगळ न होऊ अशी काळजी घेतली.

मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ् आर्टस्‌मध्ये जॉन् ग्रिफिथ्स ( १८६८–१८९५ ) हे ( पंडितजीपेक्षा एक वर्षाने लहान असलेले गृहस्थ ) प्राचार्य होते. तेथे बरोबर अकराला शिकावयास जाण्यापूर्वी, श्रीपादराव रोज सकाळी स्नान वगैरे आटोपून आपल्या व्यवसायासाठी चार घरे हिंडत आणि साडेदहापर्यंत परतून, व जेवण करून, शाळेच्या मार्गाला लागत. याशिवाय फुरसत सापडल्यास संस्कृत लेखनवाचन करीत वा जांभे-

करांच्या कुटुंबात समरस होत. जांभेकर पुढे ठाकूरद्वारजवळच्या धसवाडीत मंडलिकांचे बंगल्यात रहावयास आले. त्यांच्याबरोबर श्रीपादरावही आले. आपल्या मुंबईतील शिक्षणासंबंधाने पंडितजीनी स्वताच सांगितलेली हकीकत आपण आता समजून घेऊ या—

' घराकडून १० रु. म. ऑ. नी दरमहा येत. ६ रु. खाणावळ, १ रु. रेल्वेपास, १ रु. शाळेची फी, २ रु. किरकोळ व्यय असा हिशोब बसलेला होता. याशिवाय १०।५ रु. फोटो मोठे करून मिळत व सर्व खर्च भागे. त्यावेळी ६ रु. मध्ये जे उत्तम जेवण मिळे तसे आज ( १९६७ ) ५० रु. दरमहामध्येही मिळणार नाही. सहा रु. मध्ये दही, दूध, तूप भरपूर मिळे; सणावाराला हवे तितके उत्तम मिष्टान्न मिळे. अशी सुबत्ता होती.

' घरी कोलगावी जन्मापासून ८ व्या वर्षापर्यंत राहिलो; सावंतवाडीस वयाच्या २३ व्या वर्षापर्यंत राहिलो. यावेळी तेथे धार्मिक वातावरण बरे होते. अक्कलकोटच्या स्वामींचे शिष्य येऊन सावंतवाडीच्या आत्मेश्वराचे देवळात राहिले होते. संध्याकाळी त्यांची देवपूजा, भजन वगैरे चालत. देवतार्चन त्यांचे फार मोठे होते. त्यामुळे त्यांचे प्रस्थ वाढत गेले व ३।४ महिन्यात संध्याकाळच्या भजनास २००० पर्यंत लोक येऊ लागले !! भजनानंतर जो प्रसाद मिळे तो कातलेले खोबरे व साखर पसा भरून मिळे ! इतका प्रसाद २००० भक्तास देता येईल इतके नारळ दररोज तेथे भक्त आणीत व इतके नारळ दररोज फुटत असत !

' मी या भजनात पायात घुंगूर बांधून नाचत असे व घरीही दत्ताच्या पादुकाजवळ नाचून भजन करीत असे. मला लहानपणापासून दत्ताची भक्ति करावी असे वाटे. यावेळीच टेंबेस्वामी साधु म्हणून प्रसिद्धीस येत होते. त्यांच्यासाठीही माणगावास–सावंतवाडीहून सात मैलावर–त्यांच्या दर्शनास लोकांची यात्रा व गाडया येऊन जाऊन जंगलात रस्ते बनले होते, दुकाने–वसती होती, इतकी यात्रा जात येत असे. मीही श्री टेंबेस्वामींच्या दर्शनासाठी कित्येक वेळा गेलो होतो. यावेळी सावंतवाडी ते माणगाव या ७ मैलांच्या प्रदेशात कमीत कमी २।३ शे साधु आले होते ! वडापिंपळाच्या झाडाखाली धुमी लावून हे साधु बसत व तेथे लोकांची गर्दी जमे व त्यांचा योगक्षेम यात्रेकरूकडील देणगीने चाले. असे ३।४ महिने चालले होते. पुढे अक्कलकोट स्वामींच्या शिष्याने कसले तरी अनुष्ठान केले व त्यामध्ये २०।२५ हजार माणसाना जेवण घातले. भात, आमटी व खीर भरपूर देण्यात आली होती. हे अनुष्ठान संपल्यावर हे शेकडो साधु जे कोणीकडे निघून गेले ते पुन्हा सावंतवाडीस आले नाहीत. यानंतर मी मुंबईस आलो व त्यामुळे मुंबईतील वातावरणाने माझा भजनाचा नाद सुटला.

' माझे उपनयन वयाच्या ( सात पूर्ण ) आठव्या वर्षी नरसोबाच्या वाडीस दत्ताच्या पादुकाजवळ झाले होते. उपनयनविधि यथासांग वडिलानी केला. त्यावेळी या क्षेत्रात फार मोठा ब्राह्मण–समुदाय होता व दत्तमंदिराजवळ संध्याकाळी फार मोठी गर्दी जमत असे. कोलगाव ते नरसोबावाडीपर्यंतचा प्रवास बैलगाडीतून झाला. कित्येक दिवस जाण्यायेण्यात खर्च झाले. येतेवेळी कोल्हापुरच्या अंबाबाईचे–आमच्या कुलस्वामिनीचे दर्शन झाले व अशा रीतीने उपनयन होऊन आम्ही सर्व परत आलो. परत आल्यावर मोठ्या जेवणावळी रीतिप्रमाणे घातल्या. '

हे सर्व झाले. पण मराठी शिक्षण झाल्यावर ' आठ आणे फी देता येणार नाही म्हणून इंग्रजी शाळेत पाठविले नाही. ' याचे कारण ' पैसा उचलून देणे कठीण पडत असे. दक्षिणा आणा, दोन आणे मिळण्याचा संभव असेल तर २।३ मैल चालत जाणे योग्य वाटत असे. आषाढी द्वादशीचे दिवशी बारा ब्राह्मण कुमाराना एक पै दक्षिणा मी घेतली आहे. आम्ही १०।१२ ब्राह्मणकुमार द्वादशीला बाहेर पडत असू व ११ वाजेपर्यंत हिंडले म्हणजे पै पै दक्षिणा मिळे. अशाप्रकारे दुपारपर्यंत प्रत्येकास ३।४ आणे दक्षिणा मिळे व हे त्यावेळी पुष्कळ मिळालेसे वाटे. पैशाचे हे महत्त्व त्यावेळी होते.

' मला स्वताला मराठी ६ वी इयत्ता संपेपर्यंत वर्षभर अभ्यास करावा, पुस्तक नव्यासारखे जपून ठेवावे व वर्षाच्या अन्ती ते विकावे व दक्षिणेचे आलेले पैसे त्यात भरीला घालून पुढच्या यत्तेची पुस्तके घ्यावी, असे करावे लागत होते. यामुळे मला पुस्तके जपून वापरण्याची सवय लागली. ती पुढे उपयोगी पडली. अभ्यासले गेले तरी माझे पुस्तक या सवयीमुळे नासत नाही. '

अशा स्वावलंबन–स्वाभिमानाच्या श्रीमंतीसह ' मुंबईत चित्रशाळेत ( आर्टस् स्कूल ) शिकत असताना मला दुसऱ्या वर्षापासून स्कॉलरशिप् मिळाली. याशिवाय, फोटो मोठे करण्याचे पैसे मिळत. यामुळे घरून पैसे येण्याची जरूरी दुसऱ्या वर्षापासून राहिली नाही. याप्रमाण दुसऱ्या वर्षापासून माझे मुंबईतील वास्तव्य स्वावलंबनाने चालू झाले. शाळेतील बक्षिसे, पदके सर्व मिळाली. प्रदर्शनात मुंबई, पुणे, मद्रास व सिमला येथेही बक्षिसे मिळाली. यामुळे चित्रकार मला होता आले व पैसा मिळवणे कठीण पडले नाही.

' त्या प्रशाळेत मी तीन वर्षे गुंगलेला विद्यार्थी होतो. मी सर्वांना हवेहवेसे झालेले मेयो–मेडल् दोनदा पटकावले व लटकावलेही. एकदा चित्र रंगवण्यात व दुसऱ्यान्दा शिल्पकलेत. त्यानंतर माझी त्या प्रशाळेत शिक्षक म्हणूनच नेमणूक झाली ! ! त्या प्रशाळेत मि. ग्रिफिथ्स ( प्रिन्सिपॉल् ) अगर मि. ग्रीनवुड ( व्हाइस प्रिन्सिपॉल् ) वर्गात क्वचित्च हजर असत. तेथे शिकवायचे, शुद्ध दुरुस्त करावयाचे अगर करून दाखवावयाचे असे काही नसे. विद्यार्थ्यांनी परि-

श्रम घेऊन परस्पर–सहकाराने शिकावे अशीच अपेक्षा असे. मी निरीक्षणानेच चित्र–रंगत शिकलो. सभोवार नजर फेकावयाची आणि मनात येईल त्या गोष्टी-संबंधी ब्रश चालवावयाचा. प्राचार्यांचा गडी काही थोडा वेळ आम्हाला आप· ल्या धन्याच्या स्टुडिओमध्ये चित्ररंगती पहावयास सोडी. बस्स !

' मला आठवते, तसे दोन प्रसंगी मात्र आम्हाला बाहेरच्या चित्ररंगती पहावयाची संधि मिळाली. एकदा एक कलावंत, मला वाटते, मि. व्हॅन् रॉथ् यानी आमच्या प्रशाळेस भेट दिली.

' आमचे जीवनिक चित्रण चालले होते. त्याला तो काळसर कित्ता इतका आव-डला की त्याचा स्वताच अभ्यास करण्याची त्यास स्फूर्ति झाली. त्याने चित्रणाला सुरवात करण्यापूर्वी, कॅन्व्हस्‌वर लिन्सिड् ऑईल्‌चा हात मारला. हे आम्हास नवे होते. त्याने स्पष्ट केले की त्या तेलाचा हात मारल्याने ब्रश जलदच जलद व सफाईने मारण्यास मदत होते. मोठे आणि रुंद ब्रश घेऊन तो चित्र काढी. पुढे आम्हास कळले की मि. व्हॅन् रॉथ हा मोठा सुप्रसिद्ध प्रतिमा–चित्रकार होता. त्याला काठेवाडच्या महाराजाकडून थोडी प्रतिमाचित्रणाची कामेही मिळाली.

' माझ्या स्मृतीतील दुसरा ठळक प्रसंग म्हणजे भले चित्रकार राजा रवि-वर्मा मुंबईस आल्यावेळचा. देशाच्या कलाक्षेत्रात त्यांचे नाव अगोदरच गाजले होते. ते चित्रण करीत असताना त्यांची कला पाहण्याची व त्यांचे तंत्र समजावून घेण्याची आमची इच्छा होती. आम्ही भीत भीतच त्याना गाठले, आणि काय सांगावे, आमची आस्था पाहून त्यानी मान्यता दिली. ती संस्मरणीय स्वानुभूति होती. निश्चितार्थी हस्तकौल्याने त्यांचे चित्रण चाले. त्यांचा आत्मविश्वास बिन-तोड, निरुपम !

' माझे समकालीन कितीतरी विद्यार्थी. ते पुढ प्रसिद्ध चित्रकार म्हणूनही गाजले. धुरंधर, पीठावाला, रांगणेकर यांची नावे चटकन् आठवतात. आगासकर एकाद्या दुसऱ्या वर्षाने माझ्या मागे होते. सर्वांत त्रिनिदादे निःशंकपणे तल्लख बुद्धिमत्तेचे होते. रांगणेकर मोठे चतुर विद्यार्थी होते पण त्यानी अगदी ऐन उमेदीतच चित्रकलेचा नाद सोडला. कलाक्षेत्रातील अंधाऱ्या भवितव्याने त्यांची निराशाच झाली !

' त्रिनिदादे सफाईदार आणि जलदीने काम करीत. मी एक उदाहरणच सांगतो. आम्ही एका परीक्षेला बसलो होतो. त्याना यावयास उशीर झाला. नियम म्हणजे नियम म्हणणारे असे कडक सुपरवाझर होते आणि ते त्याना ( त्रिनिदाद्याना )प्रवेश देईनात. तेव्हा त्रिनिदादे कसे म्हणतात की, ' महाराज, माझ्या उशीराने नुकसान कुणाचे ? मला जादा वेळ द्या, असे मी चुकूनही म्हणणार नाही. ' आणि त्यानी आपली वाट कापली. ते आत आले नि त्यानी

आपले चित्रण सुरू केले. आणि आम्ही सर्वच आश्चर्यमूढ झालो की त्यानी नियमित वेळेपेक्षा अर्धा तास अगोदर आपला 'पेपर' दिला. ते खरोखर स्वयंप्रज्ञ होते.

'यावेळी श्री बाळासाहेबपंत ( प्रतिनिधि औंध ) मुंबईस कॉलेजमध्ये शिकत होते. त्यास चित्रकलेचा नाद लहानपणापासून होता. ते मला वारंवार बोलवीत व माझी पद्धति निरीक्षण करून पहात. त्यांच्या समक्ष बसून मला चित्र प्रारंभापासून अखेरपर्यंत पूर्ण करावे लागे. ते मला औंधासही बोलावीत व तेथे माझी सर्व सुट्टी घालवावी लागे.

'१८९७ च्या सुट्टीचा सर्व वेळ माझा औंधास गेला. या दिवसात मला तेथे विषमज्वर आला. ६२ दिवसपर्यंत १०४ ते १०५ डिग्री सारखा ज्वर होता. नॉर्मल आलाच नाही. इतका ताप असताही बेशुद्धि किंवा दुसरी काही व्यथा झाली नाही. त्या पौषी पूर्णिमेजवळच्या दिवसात तेथे यमाईदेवीची पूजाअर्चा विशेष प्रकारे होत असते. पहाटे ४ वाजल्यापासून ६ वाजेपर्यंत ही पूजा चालते. माझ्या ज्वराच्या ६२ व्या दिवशी श्रीमंत महाराज ( श्री बाळासाहेबांचे वडील ) देवीची पूजा करीत होते. अर्धी पूजा होताच देवीचे तीर्थ एक वाटी भरून आपल्या ब्राह्मणाकडे त्यानी दिले व 'तो तरुण तेथे तापाने फडफडत आहे त्यास आत्ता नेऊन दे' असे सांगितले. सरासरी ५ वाजता पहाटे ते तीर्थ घेऊन तो ब्राह्मण मजकडे आला व श्रीमंत महाराजांचा निरोप सांगून त्याने ते तीर्थ मला दिले. मीही मोठ्या श्रद्धेने ते पेलाभर तीर्थ तात्काळ पिऊन टाकले.

'हे तीर्थ म्हणजे दूध, दही, तूप, मध, साखर व केळे यांचे मिश्रण असते. त्या ६२ दिवसांच्या ज्वरानंतर हे तीर्थ यावेळी अत्यंत मधुर लागले. या माधुर्याचे स्मरण मला आहे. आश्चर्याची गोष्ट ही की, याच दिवशी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत ताप उतरून, मला घाम येऊन माझे सर्व शरीर ज्वर–रहित झाले. तीर्थ घेतल्यापासून १२ तासाच्या आतच हे सर्व झाले ! ! ! पण एकदम ताप उतरल्यामुळे अशक्तता फारच आली व उठून उभे राहून चालण्यास मला १० दिवस लागले ! ! !'

याच संबंधात बाळासाहेब पंतप्रतिनिधींच्या चरित्रात आणखी माहिती मिळते, ती अशी–

'सोनबांची मूळ प्रकृति अशक्त. श्रीमूळपीठावर जाणे त्याना झेपत नव्हते. आमच्या बरोबरची चालही त्यांच्या शक्तिबाहेर होत असे. आमची रोजची निघाल्यापासून दौड. तीस ते पलायन म्हणत. ती पाहून तर ते आमच्या हातून हे पलायन कधीही व्हावयाचे नाही असे वारंवार म्हणत असत. अशक्त प्रकृति-मुळे पटवर्धनांच्या घरचे अन्न त्यांना सोसले नाही की काही जास्त झाले, कुणास ठाऊक ! सोनबा फार आजारी पडले. रावजी शिवराम गोंधळेकर दवाखान्या-

वरील डॉक्टर फार घाबरले. सोनबा फार आजारी आहेत, औषधाचा उपयोग होत नाही, घाम येत नाही, पाच साडेपाचपर्यंत ताप दुपारी असतो, सकाळी फार तर तीनपर्यंत उतरतो, काही खात नाही, शुद्ध जवळ जवळ नाहीच, असे डॉक्टर रोज आम्हाला सांगत असत. परका माणूस येथे येऊन आजारी पडला त्याची अर्थात् आम्हाला व तात्यासाहेब ( पंत ) याना काळजी वाटू लागली. दहा-पंधरा दिवस आजाराचे गेल्यावर आम्ही ही गोष्ट वडीलमातुश्रीना सांगितली. त्यानंतर तात्या पागे ( पटवर्धन ) भेटले किंवा काही कामासाठी वडिलाकडे गेले म्हणजे–अहो त्या चितान्याचे कसे काय आहे ?–म्हणून वडील विचारीत. एकदा पटवर्धन म्हणाले– महाराज, सोनबाला शुद्ध नाही, ताप फार आहे. इतक्यात महाराज आमचे वडील म्हणाले– उद्या पहाटे काकड आरतीच्या वेळी तुम्ही या आणि श्री आईचे तीर्थ सोनबासाठी न्या; म्हणजे श्री कृपा करील. त्या-प्रमाणे दुसऱ्या दिवशी तात्या पटवर्धन पहाटे चार वाजता श्रीयमाई काकड–आरतीचे वेळी श्रींचे देवालयात गेले.... पंचामृताचे तीर्थ खुद्द यजमानसाहेबानी आपल्या हाताने श्रीचे पायाजवळ ठेवून तात्या पागे यानी भांडे आणले होते त्यात दिले व चितान्यास प्यावयास द्या म्हणून सांगितले.... तात्या पटवर्धनानी तीर्थ नेले. सोनबा म्हणून हाक मारली, सोनबानी ओ दिली. तात्यानी त्यास तीर्थ पाजले.... ते जगदंबेचे तीर्थ खुद्द महाराजानी हातानी दिलेले, मधुर गोड प्याल्याबरोबर एकदम हुशारी वाटल्यासारखे झाले व मी बराच झालो, असे खुद्द सोनबा नंतर बरे झाल्यावर आम्हास सांगत. श्रीच्या प्रसादाचा महा-पुरुषाच्या हाताचा हा गुण यात आम्हाला कधीच शंका वाटली नाही.'

यापुढे पंडितजीच लिहितात—

'औंध–आजारानंतर एक महिन्याने मी मुंबईस आलो. मुंबईस आल्यावर हाच ताप पुन: उलटला व २६ दिवस हाच ज्वर आला. त्यात शेवटचे ६ दिवस पूर्णपणे बेशुद्धि होती. डॉ. वेलणकरांचे औषध सुरू होते. ते रात्रभर बसून असत. सहा दिवसानी डोळे उघडले व शुद्धि आली. या मुदतीत मला एक स्वप्न पडले. ते दृश्य माझ्या डोळ्यापुढे आहे.

'आकाशात मेघ काळेकुट्ट आलेले आहेत व त्यातून एक ऋषि, ज्याची पांढरी दाढी गुडघ्यापर्यंत लोंबत आहे व तसेच केस पाठीवर मोकळे पसरले आहेत, त्या ऋषीने वरदहस्त माझ्या डोक्यावर ठेवला आणि म्हटले– 'बाळा, भिऊ नकोस. तू मरत नाहीस. अजून तुला पुष्कळच कार्य करावयाचे आहे.' इतके शब्द मी स्पष्ट ऐकले व मी जागा झालो. त्या दिवसापासून मला आराम पडू लागला व १०।१२ दिवसात मी चांगला बरा झालो.

'सन १९०० मध्ये मला मुंबईच्या आर्टस् स्कूलमध्ये शिक्षकाची नौकरी मिळाली. पण मी ती वर्ष ६ महिन्यानीच सोडली व निजाम हैदराबादेस जाऊन

तेथे चित्रकाराचे काम करावे असे ठरविले. '

आपला व्यवसाय नि ध्येय म्हणून ' चित्रकला–मनोहारित्वात निपुणता ' ठरवून श्रीपाद दामोदरानी अभ्यास आणि व्यवसाय केला.

' कला सुश्लोकतां याति यत्र तिष्ठति पंडितः । '

असा अनुभव येऊ लागला. त्यानी जे. जे. स्कूल ऑफ् आर्टस्‌मध्ये तर पहिला क्रमांक पटकावलाच पण शेवटच्या परीक्षेत रौप्यपदकही मिळविले. त्यांची काही स्केचेस् प्रिन्सिपॉल ग्रिफिथ्स यांच्या पसंतीस इतकी आली की त्यानी ती पन्नास–पन्नास रुपयास विकत घेतली. चित्रकलेबरोबर फोटोग्राफी, एन्लार्जमेंट आदि करून कलाही श्रीपादरावानी हस्तगत केल्या आणि दरमहा चाळीस रुपयांची प्राप्ति ते खात्रीशीर करू लागले. त्यांच्या सर्व शिक्षकास त्यांचे केवढे तरी कौतुक होते त्यामुळे ! चित्रशाळेतील ( आर्टस् स्कूल ) मधील आपल्या शिक्षणासंबंधात सातवळेकर सांगतात—

' आम्ही जीवनचैतन्याचा, जुन्या चित्रांचा आणि प्रशान्त जीवनाचा अभ्यास करीत असू. संयोगीकरणा ( Composition ) सारखा दुसरा ( अवघड ) विषय नाही. दरशनिवारी आम्हास समयसाध्य रेखाचित्रणाचा वर्ग असे. एका दमात चित्र संपवावयाचे असे आणि त्या कसावर आमची प्रगति ठरविली जाई. '

आपल्या जिज्ञासु स्नुषा सौ. कुसुमताई ( माधवराव ) सातवळेकर याना पंडितजीनी दिलेल्या व बॉम्बे आर्ट सोसायटीच्या आर्ट जर्नल ( एप्रिल १९६६ ) मध्ये प्रसिद्ध झालेल्या मुलाखतीत सातवळेकरानी आपल्या सूनबाईना आर्टस् स्कूलमधील आपल्या शिक्षकीचीही माहिती दिली आहे. ते म्हणतात—

' जे. जे. स्कूलमध्ये माझी शिक्षक म्हणून नेमणूक झाली त्यावेळी दरमहा पन्नास रुपयाइतका मला राजेशाही पगार मिळे ! ! जीवनच त्यावेळी अगदी वेगळे–आगळे होते. गरीबीचे, साधे, भुइसपाट असे ते असे; पण हातच्या कामाशी आम्ही जीवेभावे गाठ घालीत असू, आणि दुसऱ्या कशाबद्दलही कशी की कशी काळजी करीत नसू ! ' मेयोमेडल दोनदा पटकावल्यावरच ' माझी त्या प्रशाळेत शिक्षक म्हणून नेमणूक झाली होती. मी ते काम सोडून जाणार आहे असे जेव्हा मी सांगितले, त्यावेळी मि. ग्रीनवुडला पुष्कळच वाईट वाटले. त्याला माझे काम पसंत पडू लागले होते; पण हैदराबादेस जाऊन चित्रकार म्हणून जीवनिकेस सुरवात करावी असे मी ठरविले होते. बेताबाताने कलाकारांची परिस्थिति सुधारत होती. चैतन्यसदृश पूर्णप्रतिमेला एक हजार रुपये मिळत. '

विद्या म्हणजे जीवनसाधना. ' विद्या असते शाळेत ! ' म्हणूनच राष्ट्राची रचना

त्याच्या शाळेशाळेच्या वर्गावर्गातून होत असते, अशी इंग्रजीभाषेत म्हण पडली आहे. पण शाळा म्हटली की तेथे स्वयंनिर्मित वा वडीलधाऱ्यानी अगर गुरुजनानी लावलेली शिस्त असली पाहिजे; आणि त्या शिस्तीतून ' विद् ' या संस्कृत धातूच्या सर्वार्थानी मार्गदर्शन होऊन शिकणाराना आपले अस्तित्व, व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्व दाखवत आले पाहिजे; त्याचप्रमाणे त्यांच्या ज्ञानात सारखी भर पडत गेली पाहिजे आणि त्याना काही कमाई करता आली पाहिजे. विद्या अर्थवती हवी असे संस्कृत सुभाषिताने ठासून सांगितले आहे. त्याचे मर्म वरील कसोटीने पाहणारास सहजच ' जिशी विद्या व तिशी धन ' ही मराठी म्हण आठवेल. श्रीपाद दामोदर सातवळेकराना हे सर्व साधावयास बत्तीशी उलटणे आले, हे आतापर्यंतच्या विवेचनावरून स्पष्टच आहे. चित्रकलेच्या बाबतीतील त्यांचे व्यक्तिमत्व, आणि ज्ञानसंपन्नता व कमाईची कार्यक्षमता त्याना स्वताला व त्यांच्या शिक्षक, मित्र आणि आप्तेष्टाना कळून चुकली होती. एवढाही उशीर त्यांच्या वैदिक ज्ञानासंबंधी लागला नव्हता. सातवळेकरच लिहून गेले आहेत की—

' घरातच संस्कृतचे अध्ययन महाभाष्यापर्यंत झाले होते. त्याकारणाने मी संस्कृतमध्ये भाषण करू शकत होतो. मी मुंबईस आल्यावर ३।४ वर्षानंतर तेथे एक योगी आला होता व त्याने एका थिएटरमध्ये आपले खेळ चालू केले होते. ' मी योगबळाने तोंडाच्या द्वारा कपडा गिळून गुदद्वाराकडून तो काढून दाखवतो ' असे त्याने विज्ञापनात छापले. मी त्याचे हे विज्ञापन वाचताच योगावरची मुंबईस मिळणारी सर्व पुस्तके आणली, अभ्यासली व त्यास आह्वान दिले. आम्ही दिलेले फडके त्याने चौघासमक्ष तोंडात घालावे व गुदद्वाराचे वाटेने काढावे व मग काय ते खेळ करावे, असे आह्वान मी दिले होते. असे घडणे शक्य नव्हते. नाटकगृहात त्याचा खेळ होता. गर्दी खूपच होती. ' धौति ' प्रयोगाचे वर्णन योगावरील पुस्तकात असले तरी ' **मुखप्रवेशपश्चात् गुदद्वार-बहिर्गमनं वस्त्रस्य** ' कोठेच नव्हते. त्या कारणाने तो योगी काहीच करू शकला नाही. तेथे माझीच सरशी झाली. माझा पक्ष खरा ठरला व त्याचा खोटा ठरला. त्या आव्हानामुळे संस्कृतज्ञ म्हणून माझा परिचय मुंबईत वाढला व लहानपणी घरी शिकलेल्या संस्कृतच्या अभ्यासाकडे माझे पुनः लक्ष अधिक वेधले. वेद, उपनिषदे, गीता आदि ग्रंथांचे वाचन व मनन त्यामुळे पुनः सुरू झाले. ( एवढेच नव्हे ! ) त्या आव्हानाच्या दिवसापासून योगाची आसने करण्यात मला गोडी वाटू लागली व मी आसन, प्राणायाम आदि करू लागलो. या व्यायामाचे योगाने माझे स्वास्थ्य सुधारू लागले. माझे शारीरिक वजन पंचविसावे वर्षी ८७ पौंड होते ते तिसावे वर्षी ११० पौंड झाले. '

ठरल्याप्रमाणे १९०० च्या शेवटी व १९०१ च्या प्रारंभी सातवळेकर हैदराबादेस आले व त्यानी आपला स्टुडिओ तेथे स्थापला. पैसेही मिळू लागले आणि स्वतः

निजामसाहेबांची सातवळेकरांच्या चित्रकलेवर भक्तिही बसली. मुंबई, पुणे, मद्रास, सिमला येथे भरलेल्या चित्रप्रदर्शनातून निजामसाहेबानी सातवळेकरांच्या चित्रकलेतील वास्तवतेबद्दल, सौंदर्याबद्दल व रेखीवपणाबद्दल झालेली प्रशंसाही ऐकली होती व ती खरी असल्याचा प्रत्ययही सातवळेकरांच्या स्टुडिओतून येणाऱ्या कामावरून निजामसाहेबापासून सर्वांना येऊ लागला होता.

आणि यात काही नवलही नव्हते. कारण तशी कीर्ति श्रीपादराव सातवळेकर मुंबईस असल्यापासूनच मिळवित आले होते. मुंबईस बाबा जांभेकरांचे गणपतीच्या आराशीत जलरंगातील विविध देखावे आणि व्यक्तिचित्रे लक्ष्मणरावजी किर्लोस्करांच्या बरोबर आलेल्या अमेरिकन सायकलकंपनीच्या प्रतिनिधीने पाहिल्याबरोबर विकत घेतली होती व श्रीपादरावांची करामत अमेरिकेपर्यंत पोहोचविली होती. त्यामुळेच विसाव्या शतकात सर्व हिंदुस्थानात भारी असलेल्या हैदराबाद संस्थानात आपल्या कलेला व व्यवसायाला मनसोक्त वाव मिळेल असा विश्वास वाटल्यामुळेच श्रीपादरावानी ते संस्थान आपली कर्मभूमि करण्याचे ठरविले होते. त्यानी श्री देऊसकर यांच्या सहकार्याने हैदराबादेस आपला स्टुडिओ थाटला.

धंद्याच्या दृष्टीने सातवळेकराना या शहराचे महत्त्व वाटले. याचे कारण तेथे भारतीय संस्थान म्हटल्याबरोबर जेवढी मिजासखोरीची कल्पना येते, तेवढी सगळी मिजासखोरी तेथे होती. लहरी श्रीमंतांची उधळपट्टी तेथे जशी होती, तशीच खुषमस्करीवर खैरात तेथे होतच असे. सातवळेकराना या दोन्हीपैकी कशाचीच गरज नव्हती. त्याना कलाप्रेमी प्रसन्नमर्जीचा गुणगौरव हवा होता, स्वतंत्र विचारसरणीला साजेसे व्यक्ति-स्वातंत्र्य हवे होते आणि स्वावलंबन–स्वाभिमानाचा राजरस्ता योगक्षेम चालविण्यासाठी हवा होता. या सर्वांची रेलचेल त्याकाळी हैदराबाद संस्थानात होती. निसर्गाने तशी परंपरा व इतिहासाने तशी वहिवाटच हैदराबाद संस्थानात अगोदरच प्रचलित होती. हैदराबाद हे हिंदुस्थानांतले सर्वात मोठे संस्थान. निजामसरकारच्या या राज्याचे क्षेत्रफळ ८२३१३ चौरस मैल व लोकसंख्या ७३९८९७२३ च्या सुमारात होती. हे बहुकोनाकृति संस्थान दख्खनच्या पठाराचे केंद्र. समुद्रसपाटीपासून १२५० फूट उंच असलेल्या या संस्थानचे भूगर्भशास्त्रदृष्टया व मानववंश–शास्त्रदृष्टया दोन भाग होतात. पश्चिमोत्तर भागात कापूस पैदा करणे काळ्या जमिनीमुळे सोपे आहे. कानडी व मराठी असे ते द्विभाषिक होते. दुसरा भाग पूर्वदक्षिणाभिमुख. इकडे तांदूळ भरपूर पिकतो. लोक मुख्यत्वेकरून तेलगू बोलतात. बालाघाट, सह्याद्रि व क्रांडिकल गुहा ही इकडील आकर्षणे होत. या संस्थानात गोदावरी व कृष्णा या मुख्य नद्या असून त्याना मिळणाऱ्या तुंगभद्रा, पूर्णा, वैनगंगा, मांजरा, भीमा या लहान नाहीत. सर्व संस्थानात औरंगाबाद जिल्हा फारच सुंदर आहे. त्यात अजंठा व वेरूळ ही लेणी व वनश्री विपुल आहे. हैदराबाद संस्थानातील खनिज संपत्ति, मुख्यत्वेकरून सोने, कोळसा व हिरे ही होय. सोने

धारवाडी पद्धतीने लिंगसुगुर येथे सापडते. हिरे कर्नूल येथे मिळतात व कोळसा शिंगरेणी येथे. संस्थानचे हैदराबाद हे राजधानी शहर कृष्णेस मिळणाऱ्या मुसा नदीच्या उजव्या तीरावर आहे. हिंदुस्थानातील हे चौथे मोठे शहर. हे सन् १५८९ साली महम्मदकूली नावाच्या पाचव्या कुतुबशाही राजाने स्थापले. याचे पहिले नाव भागानगर होते. १६८७ त मोंगलानी हे प्रथम काबीज केले. नंतर निजामाने आपली राजधानीच तेथे थाटली. या शहरातील मोठ्या इमारतीत ' चार मिनार ' ही इमारत अत्यंत प्रेक्षणीय आहे. त्या खालोखाल चार कमान व चार सुका या इमारती पाहिल्याच पाहिजेत अशा आहेत. दार–उसशिफा, गोषामहाल, जानमशीद, मक्का मशीद या पाहल्याशिवाय राहवणारच नाही. त्या बहुतेक सुलतान महम्मद कूली कुतुबशहा याने बांधलेल्या आहेत. नवीन इमारतीत निजामसरकारचे राजवाडे व कॉलेजे प्रेक्षणीय आहेत. हुसेनसागर व मीरअलम ही शहरातील दोन तळीही रमणीय असून या शहरात एक विश्वविद्यालय, तीन कॉलेजे, अनेक प्रशाळा, रोमन कॅथॉलिक चर्च, सार्वजनिक उद्याने, हायकोर्ट, कोठी वगैरे संस्थाच संस्था होत्या व आहेत. एवंगुणविशिष्ट सौंदर्यसंपन्न शहरात येऊन राहिल्यावर सातवळेकरांची चित्रकारी आणि जीवनिका ' सौंदर्य फुलली ' तर नवल काय !

: ७ :

# हैदराबादची हाल-चाल !

श्रीपाद दामोदर सातवळेकरांचा चित्रकारीचा धंदा हैदराबादेस सुरू झाल्यावर त्यांचा संबंध निजामसाहेब आणि नवाबमंडळी यांच्याशी जसा आला तसा हैदराबादमधील कर्त्या व नेत्या मंडळीशीही आला. अशा मंडळीतील सहवासामुळे काही काही सार्वजनिक संस्थामध्येही सातवळेकरांचे जाणे येणे घडू लागले. आपल्या धंद्यातून फुरसत मिळाली की सातवळेकर आपल्या वडिलार्जित वेदाध्ययनाला उजळणी देतच असत. केशवराव ( कोरटकर ) वकील यांच्यामुळे सातवळेकराना हैदराबाद येथील आर्यसमाजाचा संपर्क वरचेवर घडू लागला. वैदिकधर्माचे पुनरुज्जीवन करण्याच्या प्रेरणेने स्वामी दयानंद सरस्वतीनी काढलेल्या आर्यसमाजाच्या हैदराबाद–शाखेतही वेद आणि इतरही संस्कृत ग्रंथ सातवळेकराना साहजिकच आढळले. तेथे हिंदी व इंग्रजी या भाषातून वेदविषयक चर्चा चालत. या सर्वांचा आणि जोडीस स्वतः सातवळेकरांच्या वैदिक ज्ञानाचा एकजिनसी आढळ झाल्यामुळे, सातवळेकर आर्यसमाजाचे सभासद झाले. एवढेच नव्हे, तर प्रसंगाप्रसंगाने ते प्राचीन भारतीय संस्कृतिसंबंधी व्याख्याने देऊ लागले.' सत्यार्थ प्रकाश ' व ' ऋग्वेदादि भाष्यभूमिका ' या दयानंदांच्या ग्रंथांचे त्यानी मराठीत भाषान्तर केले. त्यावर श्रीमंत सयाजीराव बडोदेकरही खूष झाले. आर्यसमाजात त्यामुळे सातवळेकराना प्रतिष्ठा लाभू लागली. इतकी की धोरण ठरविणाऱ्या श्रेष्ठीत त्याना मानाचे स्थान मिळू लागले.

आर्यसमाज हा हिंदुस्थानातील एक अर्वाचीन धर्मपंथ स्वामी दयानन्द ( पंजाब ) या औदिच्य ब्राह्मण–श्रेष्ठाने स्थापन केला. त्यांचा सत्यार्थप्रकाश हा ग्रंथ आर्यसमाजी प्रमाण ग्रंथ म्हणूनच मानतात. वेदांचे पुनरुज्जीवन करून वेदातील धार्मिक, विद्याविषयक आणि यज्ञसंबंधी पद्धति प्रचलित करणे हा स्वामी दयानंद सरस्वतींचा

व आर्यसमाजाचा मुख्य हेतु. स्वामींचा वेदार्थ वेदभाष्य या ग्रंथात आढळतो. आर्य-समाजास मूर्तिपूजा मान्य नाही. तो जातिभेद मानीत नाही. अन्यधर्मीयास शुद्धीच्या द्वारे व परधर्मात गेलेल्या हिंदूस ' भ्रातृमिलापा ' च्या ( हा धर्मांतरित हिंदूच्या शुद्धीला स्वामी श्रद्धानंदानी दिलेला उजळा ) द्वारे, आर्य करून घेताना समाजास वैदिकधर्मीयांचे संख्या–सामर्थ्य वाढविल्याचा आनंद होत असतो. गोरक्षण, अनाथ बालिकाश्रम, बालविवाह–प्रतिबंध, पतित–परावर्तन, शास्त्राभ्यास समाज करतो. तेव्हा 'माझी व आर्यसमाजाची मते' म्हणून सातवळेकरानी जे स्पष्टीकरण जनतेला सादर केले आहे, त्याचा अभ्यासही इष्ट ठरेल. सातवळेकर लिहितात—

'मी आर्यसमाजामध्ये स. १९०१ पासून १९१८ पर्यंत आत राहून कार्य केले. तसेच १९०२ पासून १९०७ पर्यंत मी थिऑसफीमध्ये राहून कार्य केले. हैदरा-बादमध्येच मी या दोन्ही संस्थात काम करू लागलो होतो.

' थिऑसफीचे ठराविक सिद्धांत नाहीत. धर्मग्रंथांचा विचार करणारी ती संस्था आहे; म्हणून सिद्धांत कोणतेही जरी मानले, तरी त्यामुळे सदस्य होण्यास या संस्थेत प्रत्यवाय नाही; म्हणून मला येथे बरेच उदार वातावरण मिळाले होते. यांच्या स्पष्टीकरणाच्या पद्धतीने मला पुष्कळ धर्मग्रंथाच्या वचनांचा उलगडा करता आला.

' पण आर्यसमाजाचे सिद्धांत व नियम ठरलेले होते. त्यांच्याबाहेर कोणास जाता येत नव्हते. स्वतंत्र विचाराना व स्वतंत्ररीतीने संशोधनाला येथे वाव नसे. मी तर स्वतंत्र रीतीने वेद, उपनिषद्, गीता आदि ग्रंथांचा विचार करणारा असल्यामुळे माझ्या प्रतिपादनात पुष्कळ वेळा भिन्नता येत असे. यामुळे आर्य-समाजी लोकात जे कट्टर होते, ते मला पक्का आर्यसमाजी समजत नसत आणि मतभेदाच्या गोष्टी वारंवार घडत असताही मी याच कारणाने आर्यसमाजात राहिलो की वेदज्ञाता माझ्याइतका दुसरा कोणीही त्यावेळी हैदराबादेत नव्हता.

' लाहोरला आल्यानंतरही माझ्या व आर्यसमाजाच्या मतामध्ये हा भेद राहि-लाच व यामुळे कट्टर आर्यसमाजी लोकामध्ये माझी कधीच गणना होऊ शकली नाही. तथापि माझ्या वेदज्ञानामुळे माझी प्रतिष्ठा आर्यसमाजात वाढत गेली व तिला त्याच कारणाने धक्का बसला नाही.

' या मतभेदाची स्पष्टता व्हावी म्हणून माझी मते व आर्यसमाजाची मते या संबंधाने थोडेसे दिग्दर्शन येथे करणे योग्य आहे. ते असे—

' १ एकत्व, द्वैत व त्रैत – भारतामध्ये अद्वैत व द्वैत असे दोन वाद प्रचलित आहेत. आर्यसमाजाने त्रैतवाद पुरस्कारला आहे. वेदामध्ये—

तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः। ( वा. य. ४०।७; ईश ७ )

**एकं सत्, विप्रा बहुधा वदन्ति ।**

( ऋ. १।१६४।४६; अथर्व. ८।१०।२८; निरु. ७।१८ )

'एकच सत् वस्तु आहे, या एका सत् वस्तूलाच ज्ञानी लोक अग्नि, वायु, इंद्र आदि नावानी वर्णित असतात. हे एकत्व पाहणाराला शोक व मोह होत नाहीत.' असे या एका सत् वस्तूचे वर्णन वेदमंत्रात केले आहे. ही एकच सत् वस्तु अग्नि, वायु आदि रूपानी आम्हास दिसत आहे. या अशा अनेक वचनावरून वेदमंत्रानी 'एकत्वा' चा सिद्धांत प्रतिपादन केला आहे असे मला वाटते. क्षर, अक्षर व पुरुषोत्तम ही त्या एका सद्वस्तूची व अनुभवास येणारी तीन रूपे आहेत. जसे साखरेच्या खड्यात खडा फुटणारा म्हणून 'क्षर', गोडी न तुटणारी म्हणून 'अक्षर' आणि हे दोनही भाव एकेठिकाणी दिसले म्हणजे तो खडा पुरुषोत्तमाचे रूप आहे असे समजावे. या संबंधाचे विशेष विवेचन मी माझ्या गीताटीका पुरुषार्थ–बोधिनीत अनेक ठिकाणी केले आहे. अर्थात् वेदामधील 'एकत्व' सिद्धांतात त्रैत आहे, द्वैत आहे व अद्वैतही आहे. पण ही दृष्टी स्वीकारण्यास आर्यसमाजाचे पंडित व सामान्यतः आर्यसमाजी तयार नाहीत. शुद्ध त्रैत खरे, म्हणजे 'प्रकृति–जीव–परमेश्वर' हे तीन पदार्थ सनातन निरनिराळे आहेत. असे हे मानीत आहेत.

**त्रयं यदा विन्दते ब्रह्ममेतत् ।** ( श्वे. उ. )

'प्रकृति, जीव व परमेश्वर हे तीन पदार्थ जेव्हा एक होतात, तेव्हा त्याला ब्रह्म म्हणतात.' असे तिघांचे एकीकरण हे ब्रह्म आहे, असे उपनिषद् म्हणत आहे. तसेच—

**सर्वं खलु इदं ब्रह्म ।** ( छां. उप. )

**अयं आत्मा ब्रह्म ।** ( मांडूक. उप. )

'हे सर्व म्हणजे प्रकृति–जीव–ईश्वर हे सर्व ब्रह्मच आहे. हा आत्माही ब्रह्म आहे.' ही उपनिषद्वचनेही या स्पष्ट अर्थाने त्यास मान्य नाहीत. मला हे सर्व या स्पष्ट अर्थाने मान्य आहे. हा माझ्या मतामध्ये व आर्यसमाजाच्या मतामध्ये भेद आहे. आर्यसमाजाचा पहिला नियम असा आहे– 'सर्व सत्य विद्या आणि जे पदार्थ विद्यांच्या योगाने जाणले जातात, त्या सर्वांचे आदि मूल परमेश्वर आहे.' या नियमात विद्या आणि जाणावयाचे पदार्थ या सर्वांचे आदि मूल एकच परमेश्वर आहे असे एक तत्त्वाचेच प्रतिपादन केले आहे; पण याचाही ते निराळा अर्थ करतात. असो. हा सिद्धांताविषयीचा मतभेद आहे.

'२ **श्राद्ध**– आर्यसमाज मेलेल्यांचे श्राद्ध करावे असे मानत नाही. पण मला अथर्ववेदाच्या १८ व्या कांडात श्राद्ध विधान आहे असे वाटते. मी 'यम व पितर' हे पुस्तक प्रसिद्ध करून माझे मत प्रसिद्ध केले. त्याचे खंडन करण्यासाठी एक स्वतंत्र पुस्तक लिहून श्रीआर्य–सार्वदेशिक–सभा दिल्ली या संस्थेने हजार रु. खर्च

*

करून ते प्रसिद्ध केले, पण ते सयुक्तिक खंडण आहे असे मला वाटत नाही.

' असे अनेक मतभेद आहेत. इतके असताही मी आर्यसमाज ही संस्था हिंदूना अत्यंत उपकारक आहे असे समजत आहे. आर्यसमाजाच्या मतामध्ये थोडा फरक होऊन जर या आर्यसमाजाचा भारतभर प्रसार होईल, तर हिंदुजाति बलवान् होईल यात मला शंका वाटत नाही. सध्याच्या कालामध्ये ऋषि दयानंद सरस्वती हे फार थोर पुरुष होऊन गेले. त्यानी हिंदुसमाजामधील सर्व दोष शोधले व ते दूर करून या समाजाला बलवान् करण्यासाठी काय केले पाहिजे ते दाखवून दिले. हे यांचे हिंदुसमाजावर फार मोठे उपकार आहेत. '

श्रीपाद दामोदर सातवळेकर हे आर्यसमाजाच्या श्रेष्ठीत गणले जाऊन सुद्धा, जसा आपला एक हातचा म्हणून राखून होते, तसाच दुसऱ्याही एका संस्थेबाबत त्यांचा खाक्या होता. ही दुसरी हैदराबादेतील संस्था म्हणजे थिऑसाफिकल सोसायटीची शाखा होय. ' माझे रामायण ' कर्ते दत्तो अप्पाजी तुळजापूरकर या लोकमान्य टिळकांच्या भक्ताचे सहवाससंपर्काने श्रीपाद दामोदर सातवळेकरांचा संपर्क थिऑसफिकल सोसायटीशी येऊ लागला आणि योगविद्येतील सातवळेकरांच्या गतिमुळे, थिऑसाफिकल सोसायटीतही सातवळेकराना सल्लागाराची श्रेष्ठता प्राप्त झाली होती. तथापि तुळजापूरकर काय, किंवा सातवळेकर काय, थिऑसॉफिस्ट म्हणून स्वताला कधीच मानीत नसत. कारण—

थिऑसफी हा एक अर्वाचीन धर्मपंथ अकारण मानण्यात येतो. त्या ग्रीक शब्दाचा अर्थ स्थूलमानाने आत्मवाद किंवा आत्मज्ञान होतो. मनोऱ्यावरून सर्व क्षेत्राकडे पाहता येते, तसे सर्व विषयाकडे पाहण्याचा थिऑसफी हा एक दृष्टिकोन आहे. अदृश्य सृष्टीचे अवलोकन–निरीक्षण करून जे अदृश्य सृष्टीचे शास्त्र निर्माण होते, त्याला खरोखरी धर्म म्हणतात, असे थिऑसफीचे सांगणे आहे. मूलभूत गोष्टींचा विचार केला तर त्या सर्व धर्मात एकच आहेत, अशी थिऑसफीची शिकवण आहे. त्यामुळे जगातील धार्मिक वैमनस्ये मोडण्याबाबत थिऑसफीचा पुष्कळसा उपयोग होण्यासारखा आहे. थिऑसफीचे दोन मूलभूत महत्त्वाचे मुद्दे असे की सृष्टीतील सर्व व्यापारांच्या व घडामोडीच्या पाठीशी एक सुबुद्ध व प्रभावी योजना असून सर्व सृष्टि त्या योजनेनुसार विकासमार्गाने पुढे जात आहे; आणि मानव्याच्या पराकोटीस गेलेले श्रीकृष्णादि जीवन्मुक्त होऊन गेले, त्यांच्याशी जरूर ती पात्रता असल्यास, माणसाला आजही शिष्य म्हणून संबंध जोडता येतो.

थिऑसफीकल सोसायटी १८७५ साली मॅडम् एच्. पी. ब्लॅव्हट्स्की व कर्नल ऑल्कॉट यानी स्थापली. जगातील सर्व सुधारलेल्या देशात तिच्या शाखा आहेत. विश्वबंधुत्वाची सुरवात करणे, धर्म, तत्त्वज्ञाने व शास्त्रे यांचा तुलनात्मक अभ्यास करणे व सष्टीतील नि मनुष्याच्या अंतर्यामातील गूढ गोष्टींचे संशोधन करणे, हे या सोसायटीचे तीन उद्देश आहेत.

आर्यसमाज आणि थिऑसॉफिकल सोसायटीत सातवळेकरांची वजनदारी वाढत असल्याचे पाहिल्यावर, स्वता सातवळेकर हैदराबाद–जीवनासंबंधी हकीकत सांगतात, ती लक्षपूर्वक पाहण्यासारखी आहे—

' मी ठरल्याप्रमाणे १९०१ च्या प्रारंभी हैदराबादेस येऊन माझा चित्रकारीचा धंदा तेथे सुरू केला. पण हे वर्ष हैदराबादला चांगले नव्हते. इंग्रजी रेसिडेंटाशी मिळून हिंदु–मुसलमान अशा थोर थोर शेपन्नास अमीरउमराव व मोठे हुद्देदार यानी असा कट केला होता की या निजामाला पदच्युत करावे; त्याच्या लहान मुलाला गादीवर बसवावा. लॉ. कर्झनसाहेबाकडे हा अर्ज गेला. लॉ. कर्झनला निजामाकडून वऱ्हाड घ्यावयाचा होता, म्हणून निजामला खूष करण्यासाठी त्याने हा अर्ज निजामला दाखवला व या अर्जातील थोर थोर लोकाना एकदम पकडून हद्‌पार करावे असा सपाटा यावेळी निजामाने सुरू केला. यामुळे अमीर उमरावाकडून चित्रकारीचे काम मिळणे अशक्य झाले. सर्वच वातावरण अस्थिर झाले.

' येथे आल्यावर येथील थोर थोर मंडळींच्या संमतीने एक व्यायामशाळा, एक मुलामुलींची शाळा व एक व्याख्यानमंडळ, अशा तीन संस्था सुरू केल्या. श्री केशवराव ( कोरटकर ) वकील, वामनराव नाईक या मंडळींचे सहाय्य पुष्कळच होत होते.

' आम्हाला म्हटल्या घटकेला दहा हजार रुपये आणून–मिळवून देणारी ही मंडळी त्यावेळी आमचेजवळ होती. ( पुढे १९०९ साली डिसेंबरात झालेल्या ) जॅक्सन–खून–खटल्यातील अनंत कान्हेरे आणि ( १९५५ साली ) पुण्यास स्वारगेटाजवळ असलेले सन्त स्वामी शिवानंद आमच्याकडील आखाड्यातच तयार झालेले होते.

' व्यायामशाळेत हैदराबाद, बंगाल, मध्यप्रांत वगैरे प्रदेशातील क्रांतिकारकांचे देखील आश्रयस्थान होते. 'युगान्तर'–संघटनेचे सभासद निर्धास्तपणे हैदराबादेस रहात. एकवेळ तर बाराशे क्रांतिकारक हैदराबादेस होते. लोकांची संपन्नता व रुपयास बत्तीस शेर तांदूळ मिळण्यासारखी स्वस्तता, त्यामुळे ते जमत असे.

' खुद्द हैदराबादेसही तरुणांचे संघटन चांगले होते. विवेकवर्धिनीच्या आखाड्यात तीनशे–साडेतीनशे जवान रोज खेळत असत. काही मंडळीनी दारू, बॉम्ब, तयार करण्याकडेही लक्ष पुरवले होते. कसलाही बेत करावयाचा झाला की हाकेसरशी शंभर शंभर तरुण एकत्र जमत. '

एवं गुणविशिष्ट शाळा म्हणजे देशभक्ताचे अतिथिगृहच होते. काळाच्या ओघात वाढत वाढत जाऊन आज ' विवेकवर्धिनी कॉलेज ' तेथे बनले आहे व शेकडो विद्यार्थी या संस्थेचा लाभ घेत आहेत. माझे तिसरे बन्धु डॉ. सीतारामपंत याच कॉलेजचे प्रिन्सिपॉल. ' आणि संचालक सूत्रधार झाले होते.

' व्याख्यानमंडळाचे कार्य जोरात चालले होते. हैदराबादेत व निजामराज्यातील

मोठमोठ्या गावात 'स्वदेशी' वरील व्याख्यानाची झोड सुरू केली. डॉ. अघोरनाथ चट्टोपाध्याय ( श्रीमती सरोजिनीदेवी [ नायडू ] चे वडील ) अध्यक्ष असत; मी व्याख्याता असे; व बाकी सभा बोलावणे व अन्य योजना करणे हे सर्व केशवराव वकील करीत. श्री ( दत्तो अप्पाजी ) तुळजापूरकर वकील ही यात पुढाकार घेत.'

श्रीपाद दामोदर सातवळेकर हैदराबादेस येऊन राहण्यापूर्वीच त्यानी एक वैदिक ऋचांचा अर्थ असणारा लेख लोकमान्यांच्याकडे धाडला होता. त्याचा समावेश लोकमान्यानी केसरीच्या एका अग्रलेखातच केल्यामुळे, वेदानुवादाबद्दल जसा सातवळेकराना आत्मविश्वास आला होता, तसाच त्यांच्यावर लोकमान्यांच्या राजकीय चळवळीतील लोकजागरपूर्वक राष्ट्रीयत्वाचा विकास करण्याच्या स्वाभिमानी व स्वावलंबी धोरणाचा प्रभावही पडला होता. त्यामुळे श्रीपाद दामोदर सातवळेकर लोकमान्यांचे अनुयायीही झाले होते. हैदराबादेस सातवळेकराना जे स्नेही–सहकारी भेटले तेही लोकमान्यांचे चहाते असल्याकारणाने सातवळेकर त्यांच्याशी समरस होऊन गेले. व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव प्लेग–दुष्काळानी ग्रस्त झालेल्या प्रजेवर १८९७ साली लादला गेल्यामुळे जनता चिडली होती आणि प्लेग बंदोबस्ताच्या नावाखाली पुण्यास रँडसाहेबानी जो धुमाकूळ घातला होता, त्याचे प्रायश्चित्त म्हणून राज्याभिषेक–हिरकमहोत्सवाचे दिवशीच पुण्यास चाफेकर बन्धूनी रँड या पुणे–कलेक्टराला परलोकवासी केले होते. त्या चाफेकरबन्धूपैकी बाळकृष्ण हैदराबादेकडे 'गुप्त' असताना, त्याची काळजी लोकमान्यांच्या सन्देशावरून केशवराव कोरटकर करीत व घेत असत. हे हैदराबादेस गेल्यावर सातवळेकरांच्या कानावर आलेले होते. चाफेकरबंधुसारख्यांच्या अनाचाराना उत्तेजन मिळते ते केसरीच्या लेखामुळे मिळते, अशा मुद्यावर १८९७ साली लोकमान्यांच्यावर ब्रिटिशसरकारने राजद्रोहाचा पहिला खटला भरला होता. त्यात झालेल्या शिक्षेतील सहा महिन्यांची सूट ( पुनः राजद्रोह घडल्यास ती सुटीची शिक्षा पुन्हा भोगावी लागेल, या शर्तीवर ) वेदव्यासंगी टिळकांबद्दल आदरयुक्त सहानुभूति बाळगणाऱ्या मॅक्समुल्लरसाहेबांच्या स्वयंप्रेरित मध्यस्थीने टिळकाना मिळाली होती. आणि तरीही '**पुनश्च हरिः ॐ**' म्हणून लोकमान्यांची जी राष्ट्रीय चळवळ सुरू झाली ती परिस्थितिसापेक्ष उत्तेजक बाणेदारपणाचीच होती. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी चाललेल्या बोअरवॉरमधील 'गनिमी काव्याची लढाई' ही कृष्णाजीपंत खाडिलकरांची लेखमाला तरुण मनावर परिणाम करीत होती. आणि ? युरोपियन राष्ट्रापैकी रशियासारख्या अरेरावी राष्ट्राला आशियातील लंगोटीएवढे जपान राष्ट्र यशस्वी सामना देत होते. याने भारतीय तरुण शहारून जात होते. याच सुमाराला लोकमान्यानी गीतेवर निष्काम कर्मयोगी भाष्य करण्याचा मानस जसा प्रगट केला, तशीच स्वराज्याची चतुःसूत्रीही लोकापुढे ठेवली. 'यावच्चंद्र–दिवाकरौ' हिंदुस्थानवर राज्य करण्याचा ताम्रपट काही परमेश्वराने इंग्रजास दिलेला नाही, असे काँग्रेसच्या जन्मापूर्वी केसरीतून बजावणारे टिळक बोअरवॉरनंतर आणि रूसोजपानी युद्धातील

आशियाला आत्मविश्वास देणाऱ्या आशादायक घटनांचे दर्शन झाल्यानंतर स्वराज्याची चतु:सूत्री लोकापुढे मांडून बसले.

डॉ. पट्टाभिसीतारामय्यानी म्हटल्याप्रमाणे लोकमान्य निम्मे बोलत आणि बाकीचे निम्मे, लोक आपोआप समजत. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ही चतु:सूत्री लोकमान्यानी सांगितली. तीमधील परकीय सत्तेच्या व पारतंत्र्याच्या प्रतिकाराची मेख तरुणानी चटकन् ओळखली. हैदराबादेसही सातवळकर मग डॉ. अघोरनाथचट्टोपाध्यायांच्या उत्तेजनाने स्वदेशीचा प्रचार व प्रसार जीवाभावाने करू लागले. सातवळेकर सांगतात कीं– ' आमची स्वदेशीची चळवळ एवढी प्रभावी होती की हुजूर रामचंद्ररावांचे चिरंजीव जरीच्या मौल्यवान टोप्या वापरावयाच्या ऐवजी चार चार आण्यांच्या साध्या टोप्या वापरू लागले होते.

' ही व्याख्यानांची झोड स. १९०४ ते ६ पर्यंत चालली होती. ही व्याख्याने रेसिडेंटाला पसंत पडली नाहीत व त्याने निजामाला सांगून डॉ. चट्टोपाध्याय, केशवराव वकील, मी व तुळजापूरकर या चौघाना हद्दपार करावे असा घाट घातला. निजामसरकारचा राग आमच्यापैकी कोणावरही नव्हता, पण रेसिडेंटच्यापुढे त्याचे काही चालत नव्हते. शेवटी १९०५ साली एक रात्री निजामसरकारचे रीडर हुजूर रामचंद्रराव मजकडे आले व मला म्हणाले की, ' तुम्हाला निजामसरकारचा असा निरोप आहे की, तुम्ही चित्रकलेचे काम येथे करावे व पैसे मिळवावे हे निजामसरकारला प्रिय आहे, पण तुम्ही स्वदेशीवर जी व्याख्याने देता ती रेसिडेंटाला आवडत नाहीत. यासाठी तुम्हाला हद्दपार करावे असा त्याचा लकडा आमच्या मागे लागला आहे व जर ही व्याख्याने तुम्ही चालू ठेवली तर आमच्या मनात नसताही तसा हुकूम सरकारला करावा लागेल. यासाठी तुम्ही ही व्याख्याने बंद करावी हे उत्तम. '

' हे निजामसरकारचे सांगणे मला खासगी रीतीने सांगण्यात आले. मी त्यास उत्तर दिले की– ' आम्ही स्वदेशीवर व्याख्याने देतो. निजामच्या प्रजेमध्ये यामुळे व्यापारवृद्धि होत आहे. यात प्रजेचे हित आहे म्हणून आम्ही हे करणार ! सरकारने काय करणे असेल ते करावे.'

' असे उत्तर गेल्यावर आम्हा चौघांची हद्दपारी निश्चित होणार असे ठरले. आमची चौघांची यासंबंधी बोलणी झाली. त्यात असे ठरले की निजामचा हुकूम येण्यापूर्वीच मी हैदराबाद सोडावे. मीच येथून निघून बाहेर गेलो म्हणजे बाकीच्यांची हद्दपारीही बंद होईल. त्याप्रमाणे मी हैदराबाद स. १९०७ मध्ये सोडले. श्री तुळजापुरकरानी मुंबईस येऊन वकिली सुरू केली. यामुळे बाकीचे दोघे तेथे राहू शकले. माझ्या जाण्याने हद्दपारीचा हुकूम बजावला गेला नाही.

' भृगुपत्रिका काढून देणारा युक्तप्रांतातील एक पंडित हैदराबादला त्यावेळी आला होता. त्याच्याकडून २० . देऊन श्री बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांची

व माझी पत्रिका काढविली होती. त्यात श्री बाळासाहेब हे द्वितीय पुत्र असले तरी त्यास वयाच्या ४१ व्या वर्षी राज्य मिळेल असे होते. ते त्याना ४३ व्या वर्षी मिळाले. माझ्या पत्रिकेत १०।१० वर्षांनी स्थानत्याग व कारावास लिहिला होता. त्याप्रमाणे सरासरी मानाने घडत आले. काही ठिकाणच्या वेळात १।२ वर्षांचे अंतर पडलेले आहे.

'हैदराबाद राज्य हे क्रांतिकारकाना अगदी सोईस्कर राज्य होते. कितीही क्रांतिकारकानी यावे व हवे तितके दिवस रहावे, हत्यारे जमवावी, परेडी कराव्या, नवे नवे बेत करावे व हवे ते प्रयोग करावे ! हैदराबाद संस्थानामध्ये अशा क्रांतिकारकाना हवे तितके दिवस राहता येत असे. आजूबाजूच्या खेडेगावात कोण किती दिवस राहिले तर त्याचा कोणास पत्ताही लागणे शक्य नव्हते. हव्या त्या प्रकारची हत्यारे मिळून इटाली व जर्मनीतूनही निरनिराळ्या युक्त्यानी हत्यारे येत ती ज्याची त्यास पोचवली जात. शेपन्नास माणसे गुप्तपणाने रहावी, अशा सोई होत्या. खेडेगावात पूर्वीच्या वळणाची मराठवाड्यातील अनुभवी घराणी होती. त्यांच्या स्वाधीन माणूस केला की तो सुखाने हवे तितके दिवस राहत असे. पुणे, नासिक वगैरे ठिकाणी झालेले कट हे प्रथम हैदराबाद राज्यात शिजून तयार झाले व नंतर ते तेथून जेथे काम करावयाचे, तेथे गेले.

'कमी अधिक मानाने माझा संबंध याशी होता. म्हणजे पाठीमागच्या फळीतील रक्षक या दृष्टीने आमचा संबंध असे. काही बंगाली क्रांतिकारीही हैदराबाद राज्यात येऊन राहिलेले होते व येऊन जाऊन असणारेही काही असत. हैदराबाद राज्यातील मोठी शहरे सोडली तर लहान गावे व डोंगराळ प्रदेश अशा क्रांति-कारकासाठी जसा पाहिजे तसा होता. याचा फायदा क्रांतिकारी घेत असत.

'या वेळचे निजामशहा युरोपियनला भेटावयाचे वेळी अगदी सेकंदाने बरोबर रहात, पण इतराना भेटणे भयंकर त्रासदायक असे. त्यांची आगगाडी स्वतंत्र व स्टेशनही स्वतंत्र होते. एकदा त्यांची आगगाडी २६ दिवस स्टेशनात तयार होऊन राहिली होती. त्यांच्या बरोबरीचे जाणारे स्टेशनातच २६ दिवस ताटकळत बसून निजून होते. या गाडीसाठी त्याना ६२००० रु. रेल्वे कंपनीस द्यावे लागले. एक वेळ वार्षिक दरबार होता. दरबारातील मानकरी ८ दिवस दरबारात बसून होते, म्हणजे सर्व व्यवहार तेथेच करावा लागे. ९ व्या दिवशी स्वारी आली. अशी अंदाधुंदी होती. निजामाचा हजाम दरमहा २०० रु. पगाराचा माणूस होता. दाढीमिशा असल्यामुळे न्हाव्याला फारसे काम नसे. पण २०० रु. पगार असताही २।२ दिवस ताटकळत उभे रहावयाला कंटाळून तो नौकरी सोडून चालता झाला होता. अशीच स्थिति सर्व राज्यभर होती. या स्थितिमुळे त्या

राज्यात क्रांतिकारी लोक सुखाने रहात असत.

' आम्ही काँग्रेसला बहुतेक जात असू. श्री केशवराव वकील, वामनराव नाईक व मी असे आम्ही तिघे एकत्र असू. केशवराव मवाळ गटात व आम्ही दोघे टिळकांच्या जहाल गटात असू. पण आमचे राहणे एकत्र होत असे. सुरतेच्या काँग्रेसमध्ये मद्राशाना जवळचे स्थान होते. तेथे श्री अरविंद घोष, टिळक वगैरे सभा भरवीत व आधी एक महिना दादासाहेब खापरडे तेथे जाऊन राहिले होते व गुजराती भाषा शिकून त्या भाषेत व्याख्याने देऊन तेथे टिळकपक्षाला अनुकूल मत त्यानी बनविले होते !

' मुख्य मंडपात आम्ही मद्रास गटात असल्यामुळे आमच्या बसण्याच्या खुर्च्या अगदी पहिल्या रांगेत होत्या. लो. टिळक अध्यक्षांच्या प्रस्तावाला विरोध करणार होते म्हणून त्यास सत्वर प्लेटफॉर्मवर जाता यावे म्हणून ते आमच्या रांगेतच बसले व वेळ येताच क्षणार्धात वर चढून विरोध करण्यास उभे राहिले ! पुढे काँग्रेस उधळली गेली, खापडचांचा जोडा फेकला गेला. हे सर्व प्रत्यक्ष आम्ही पाहिले व शेवटी लाठीचा प्रहारही थोडा मिळवला.

' दुसऱ्या दिवशी फक्त मवाळांची सभा झाली. तिला केशवराव वकील गेले. ते पहिल्या दिवशी आमच्या रांगेत बसले होते म्हणून त्यास प्रवेश मिळाला नाही. आम्हाला तर त्या सभेत प्रवेश मिळणे शक्य नव्हते. यावेळी मी टिळकपक्षात होतो व त्यांचा कार्यक्रम मी हैदराबादेत चालवीत होतो. या कारणानेच मजवर हद्दपारीचा प्रसंग ओढवला होता.

' हैदराबादमधून हरिद्वारला जाऊन तेथे गुरुकुलात कायमपणाने रहावे असे ठरवून निघालो. पण मध्ये जयपूरच्या महाराजाकडून काही चित्रांचे काम मिळाले. म्हणून ५।६ महिने जयपूरला थांबावे लागले. तेथे काही दुसरी चित्रे ( काढण्याचे ) काम केले व आता पुढे हरिद्वारला जाऊन रहावे असे ठरल्यासारखेच होते. या उद्देशाने जाण्याची तयारी केली. तेव्हा तेथे एका सरदाराचा व माझा उत्तम परिचय झाला होता. त्याने जेवावयास बोलावले.

' साडे १० वाजता जेवणाची वेळ होती. सरदाराची गाडी आली व मी त्या गाडीतून त्यांच्या वाड्यात गेलो. एका दालनातून दुसऱ्यामध्ये अशी ५ दालने ओलांडून सहाव्या दालनात जेथे सरदारसाहेब बसले होते, तेथे नोकराने मला पोचविले. ते सरदारसाहेब एका पंधरा फूट चौरस खोलीच्या दारात खुर्चीवर नागवी तलवार हातात घेऊन माझी वाट पहात बसले होते. मी पोचताच सरदारी थाटाचा प्रणाम करून मला त्या भोजनाच्या खोलीत जावयास त्यानी सांगितले.

' या खोलीत उत्तम चौरंगावर चांदीच्या प्रशस्त व विस्तीर्ण ताटात २।३ शर तांदुळाच्या भाताची भव्य रास शोभत होती. बसावयास व टेकावयास

उत्तम पाट असून बसावयाच्या पाटावर उत्तम आसन घातलेले होते. जवळ पाणी पिण्याचा कलश व पिण्याचे पात्र सर्व चांदीचे होते. या चौरंगाच्या तीनही बाजूंना सुमारे ४०।५० मोठमोठे चांदीचे वाटगे होते. काहीमध्ये भाज्या, काहीत मोरंबे, काहीत लोणची, काहीत रायती, काहीत चटण्या, काहीत भजी, काहीत अनेक प्रकारची पक्वान्ने व मिष्टाने होती व याशिवाय जे काय खाण्याचे शाकाहारी पद्धतीने करता येते, ते सर्व या वाटग्यात होते. प्रत्येक वाटग्यामध्ये निदान तीस–चाळीस तोळ किंवा अधिकच प्रत्येक पदार्थ होता. ४।५ सेवक भिंतीजवळ उभे होते. जे पाहिजे ते या वाटग्यातून चमच्याने काढून देण्यासाठी ते उभे होते. कारण जेवणाराचा हात १२ फूटापर्यंत पोचणे शक्य नव्हते.

' आम्हाला अशा जेवणाचा कधीही परिचय नव्हता. घरचा यजमान व पाहुणे एका पंक्तीस अथवा भिन्न पंक्तीत बसून काय केले असेल ते घ्यावे व जेवावे हे आम्हास माहित; पण येथे तर २।३ शेर तांदळाच्या भाताची रास ताटात वाढलेली व ३०।४० वाटगे भरून निरनिराळे पदार्थ समोर चारही बाजूस ठेवलेले ! सरदारसाहेब नागवी तलवार घेऊन द्वारात बसलेले. अशा स्थितीत माझा बळी तर येथे होणार नाही ना, अशी शंका मनात आली, भयही वाटले. बळी जाण्याची पाळी आली तर, सातव्या दालनातून माझा शब्द बाहेर कोणालाही ऐकू जाणार नाही अशी स्थिति होती. पण करणार काय ?

' थोडा वेळ मिळावा म्हणून मला हातपाय धुवावयाचे आहेत, पाण्याची खोली दाखवा असे मी म्हटले. तो सरदारांच्या आज्ञेने तेथे पाय धुवावयास पाणी, गंगाळ, टावेल सर्व आले ! म्हणजे विचार करण्यास मला वेळ हवा होता तो मिळाला नाही. तसेच हातपाय धुवून त्या खोलीतील पाटावर जाऊन बसलो.

' एवढ्या भाताच्या राशीला उच्छिष्ट बनविण्याचे धैर्य होईना. दोनचार मिनिटे ध्यानस्थ बसून विचार केला व ताट मागवले. तत्काल चांदीचे ताट आले. त्यात चमच्याने थोडा भात काढून घेण्याचा यत्न केला. इतक्यात समोरच्या एका सेवकाने म्हटले की, ' पंडितजी, हमारे पेटपर क्यों मार रहे है ? ' हे मी एकताच मला समजले की हे अन्न उच्छिष्ट झाले तरच ते या सेवकास मिळणार. लगेच मी निराळा भात काढून न घेता त्याच ताटात काय खाता येईल ते खाऊन जेवण उरकले व बाकीचे राहिलेले सर्व अन्न त्या सेवकानी वाटून घेतले.

' या एका जेवणासाठी सरदारसाहेबानी शंभर रुपये तरी खर्च केलेले असावे. असा जेवणाचा प्रसंग कोणावरही आला नसेल !

' जयपूरला दुसरा एक प्रसंग आला होता. तेथे सम्राटजी म्हणून महाराष्ट्रीय विद्वान् घराणे ३०० वर्षापूर्वी जयपूर महाराजानी अश्वमेध केला होता, त्यावेळी तेथे मुख्य अध्वर्यु म्हणून जाऊन तेथेच सरकारच्या आश्रयास राहिले होते. त्यानी आपल्या येथे काही हव्यकव्य होते म्हणून मला जेवावयास बोलाविले. वेळ

१०॥ वाजताची होती. जयपुरास महाराष्ट्र क्लब होता. ती मंडळी येणार होती, म्हणून त्या क्लबात १० वाजता मी गेलो. तेव्हा ते म्हणाले– आज दुपारचे व रात्रीचे जेवण जेवा व मग आपण रात्रौ १०॥ वाजता येथन निघू. त्याप्रमाणे केले. आम्ही ११॥ वाजता सम्राटजीकडे पोचलो. त्यावेळी स्वयंपाक चाललेला होता. सर्व मंडळी जमण्यास उशीर होता. मंडळी जमली व पहाटे ३॥ वाजता आम्ही जेवावयास बसलो व घरी ५॥ वाजता आलो. यावेळी सम्राटजी आपल्या घरच्या बायकास सांगत होते की– आज महाराष्ट्रकी मंडळी आ गई है, इसलिये तुम् मराठी बोलो. म्हणजे यांचे मराठी विसरल्यासारखे झाले होते; पण स्त्रियानी तरी मराठी बोलावे अशी उत्कट इच्छा होती ! ! !

' मी निजाम हैदराबादेस १९०१ मध्ये प्रारंभीच गेलो. तेथे जाताच केशवराव वकीलांचा परिचय लगेच झाला व लगेच तेथील आर्यसमाजात माझा प्रवेश झाला. मला संस्कृत येत होते. षड्दर्शने, स्मृति, गीता, वेद, उपनिषदे आदि वाचल्यामुळे पंडित म्हणून आर्यसमाजात वावरण्यास मला मुळीच अडचण पडली नाही. आर्यसमाजात माझी धर्मावर प्रवचने होऊ लागली. स्वा. दयानंद सरस्वतींनी वैदिकधर्म हा उत्तम धर्म आहे व त्यात सामाजिक, राजकीय व आध्यात्मिक उन्नतिचा पूर्ण कार्यक्रम प्रतिपादाला आहे, असे जे म्हटले होते, त्याचा माझ्या मनावर फार परिणाम झाला व माझा आर्यसमाजी वाङ्मयाचा अभ्यास येथे जारीने सुरू झाला. वैदिकधर्म हा पूर्ण मानवधर्म आहे, अशी माझी खात्री झाली व त्याप्रमाणे माझी व्याख्याने तेथे होऊ लागली. हैदराबाद संस्थानातही व्याख्यानासाठी मला जाण्याचे प्रसंग वारंवार येऊ लागले.

' हैदराबादला थिऑसॉफिकल सोसायटीही होती. श्री नारायणस्वामी ऐय्यर यासारखे कसलेले वक्ते येऊन थिऑसॉफिकल सोसायटीतर्फे व्याख्याने देत व मी त्या व्याख्यानालाही जात असे. हिंदुधर्मातील बहुतेक सर्व आचार–विचारांचे शास्त्रीय युक्ति–प्रयुक्तिने व आधुनिक शास्त्रांच्या प्रमाणाने ते समर्थन करीत. ते मला आवडे व यामुळे मी थिऑसफीचाही सदस्य झालो. दोनही संस्थांची व्याख्याने मी ऐकत असे व दोघांचीही पुस्तके वाचीत असे. त्यामुळे माझ्या विचारावर दोनही संस्थातील चांगल्या विचारांचा उत्तम ठसा कायमपणाने बसला.

' थिऑसफीच्या अंतर्वर्तुळामध्ये माझा प्रवेश झाला व अंतर्वर्तुळातील अनुष्ठानही मी करू लागलो,

' आर्यसमाज व थिऑसफी या दोन संस्था परस्परास आवडत नसत. पण दोनही संस्थांच्या ग्रंथांच्या अभ्यासाने मला फार लाभ झालेला आहे, हे मी कधीही विसरणार नाही. पण यामुळे माझ्याविषयी आर्यसमाजामध्ये मात्र फारच गैरसमज पसरला व माझे नाव आर्यसमाजातून काढून टाकावे असा ठरावही आर्यसमाजाच्या अंतरंगसभेत आला. केशवराव वकिलानी तो स्वीकारला जाऊ नये

*

अशी पुष्कळच खटपट केली. तथापि काही ज्वलज्जहाल सदस्यांच्या मनात पुष्कळ दिवसपर्यंत माझ्याविषयी संशय राहिलाच. पण माझ्या धर्मविषयक व्याख्यानांच्या प्रभावामुळे हे सर्व संशय दूर होत गेले व सर्वानुमते मी आर्यसमाजाचा प्रमुख पंडित आहे असे मानण्यात येऊ लागले.

'वामनराव नाइकांच्या बंधूनी रायचूरला सोमयाग केला. तेथे मी गेलो होतो. त्या यागात तीन बकऱ्यांचा वध केला. यामुळे यज्ञात पशुवध इष्ट की अनिष्ट यासंबंधाने वादविवाद सुरू झाला. आर्यसमाजातर्फे निर्मांस यज्ञाचा पुरस्कार करणारा मी होतो. सनानन धर्मातर्फेही काही विद्वान् समांस यज्ञाचे प्रतिपादन करीत होते. व्याख्याने व वृत्तपत्रातील लेख यामुळे या शास्त्रार्थाला मोठ्या युद्धाचे स्वरूप आले. आर्यसमाजाने उत्तरेकडून शास्त्रार्थी पंडित आणले. सनातन धर्मी लोकानीही पंडिताची जमवाजमव केली. सभेला ५।५ हजार लोक जमत व शेवटी निर्मांसवादी पक्ष जोरदार आहे हे सर्व जनतेच्या निदर्शनास स्पष्टपणाने येऊन चुकले.

' शास्त्राच्या सभा मोठमोठ्या होऊ लागल्या व जेव्हा मारामारी होईल असे दिसले तेव्हा पोलिसानी सभावर बंदी घातली. यामुळे शेवटी शास्त्रार्थ होऊ शकला नाही ! जनतेवर मात्र जो निर्मांसवादी पक्षाचा म्हणजे आर्यसमाजाच्या पक्षाचा प्रभाव बसला तो मात्र कायम झाला. जनताच निर्मांसपक्षाला अनुकूल होती.

' यानंतर जेव्हा शास्त्रार्थ झाला नाही तेव्हा मी ' वैदिक यज्ञसंस्था ' या नावाची हिंदीत तीन पुस्तके प्रसिद्ध केली. '

'यावेळी माझे काही लेख ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध झाले. विषय जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था व अस्पृश्यता–निवारण असा होता. धर्मग्रंथांच्या आधारे यात किती प्रगति होऊ शकते ती मी दाखविली होती. हे लेख श्री सयाजीराव महाराजांच्या वाचनात आले व ज्ञानप्रकाशच्या संपादकांच्या मार्फत लगेच त्यांचे पत्र मला आले व त्यात त्यानी मला या विषयावर एक विस्तृत ग्रंथ लिहावयास सांगितले. या प्रेरणेने मी ' स्पर्शास्पर्श ' हा ग्रंथ लिहिला. याबद्दल मला बडोदे सरकाराकडून ५०० रु. पारितोषिक मिळाले व तो ग्रंथ प्रसिद्धही झाला. पुढे त्याचा हिंदी अनुवादही प्रसिद्ध झाला.

'यानंतर श्री सयाजीरावानी आर्यसमाजाचे ग्रंथ मराठीत करण्याचे काम मला सांगितले. ' सत्यार्थ प्रकाश ' व ' ऋग्वेदादि भाष्यभूमिका ' तसेच ' योग-तत्त्वादर्श ' ही पुस्तके मी मराठीत अनुवादिली. त्यांचे प्रकाशन मुंबईच्या श्याम-राव कृष्ण मंडळीने केले व पुढे त्यांच्या कित्येक आवृत्त्याही झाल्या. यासाठी श्री सयाजीरावाकडून द्रव्यसहाय्य मिळाले.

' हैदराबादला राहण्यासाठी आम्ही एका नबाबाचे घर भाड्याने घेतले होते.

ते भुताटकीचे होते असा समज होता. रात्री तेथे भुते नाचत व दुसऱ्या मजल्या-वरील कपाटे व टेबले खाली फेकली जात, म्हणून १५ वर्षात कोणीही तेथें राहत नव्हता. आत रान वाढले होते. १०।१२ वर्षांत दरवाजा कोणी उघडला नव्हता. तेव्हा या घरासाठी आम्ही नबाबाला भेटावयासाठी गेलो. तेव्हा त्यानेही या घरात तुम्ही राहू नका, असे आम्हास बजावले. मी सांगितले की, मी गायत्री मंत्राचा जप करीत असतो; माझ्याजवळ मंत्रसामर्थ्य आहे. तेव्हा मला भूत काही करणार नाही. शेवटी ते घर २० रु. दरमहाच्या भाड्याने आम्हास मिळाले. पहिला दरवाजा हत्तीवर बसून आत जाता येईल असा मोठा होता. सुताराना आणून तो उघडला. आतील दरड व अडगळ काढून टाकण्यासाठी व आतील स्वच्छता करून सफेदा लावण्यासाठी सुमारे ६०० रु. खर्च झाला. १५ दिवसां-च्या खटपटीनंतर आम्ही त्या घरात रहावयासाठी गेलो. हे घर म्हणजे एक मोठा महाल होता. हजारबाराशे माणसांची सभा भरेल अशी दोन पटांगणें आत होती. सुमारे ३० खोल्या होत्या. जागा ऐसपैस होती. या घरास ५०० रु. भाडेही दरमहा थोडे होते. भुताच्या कृपेने २० रु. दरमहाला ते घर आम्हाला मिळाले. आम्ही तीन कुटुंबे तेथे रहात होतो. गालिचाचा कारखाना पण तेथे होता. मी हैदराबाद सोडल्यावर काही वर्षे ती जागा आमच्याकडे होती; पण एकही दिवस आम्हाला भुताने त्रास दिला नाही. मुले, बायका, पाहुणे, राहुणे सर्व येथे येत व रहात. आमचे येथील राहणे अत्यंत आनंदाचे व उत्कर्षाचे झाले.

' एक तर भूत म्हणून तेथे काहीच नव्हते. अथवा मी यावेळी गायत्रीमंत्राचा जप विशेषरीतीने दररोज करीत होतो, यामुळे असेल, पण आमच्या येथील मुक्कामात आम्हाला भुताचा म्हणून त्रास मुळीच झाला नाही.

' आमच्या ताब्यात ते घर तेरा वर्षे होते. मी सोडल्यानंतरही तेथे आमचे मित्र रहात असत. तेरा वर्षे लोटल्यावर नबाबाला वाटले की आता तेथे रहाव-यास हरकत नाही; म्हणून मग तोच स्वतः त्या घरात येऊन राहिला. अशा रीतीने भुताटकीचे घर आमच्या वास्तव्याने पवित्र बनले ! '

सावंतवाडी सोडून श्रीपाद दामोदर सातवळेकर मुंबईस आर्टस् स्कूलमध्ये गेले, हे जसे त्यांच्या आयुष्यातील स्थित्यंतर तसेच, देशातहि त्याकाळी स्थित्यंतर घडत होते. १८७४ पासून विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेने प्रवर्तिलेल्या व पुढे केसरी–सुधारकानी उत्थान दिलेल्या कालखंडाची बोधचिन्हे प्रगट होऊ लागली होती. विष्णुशास्त्री चिपळूणकरानी 'लोकभ्रम' उडविण्यास प्रारंभ केला आणि महात्मा ज्योतिराव फुल्यानी राजकीयाप्रमाणेच धार्मिक गुलामगिरी उडविण्यासाठी सत्यसमाज काढला, त्यांची परिणती जशी विज्ञानमय पाश्चात्य संस्कृति आत्मसात् करून घेऊन, भारतीय संस्कृतिला उद्यमरतिची जोड स्वावलंबी प्रयत्नवादाने दिली पाहिजे, या विचारधारेत झाली, तशीच राजकीय पारतंत्र्याची चीड रुजू लागून पूर्वार्जित

संस्कारेतिहातील उज्ज्वल–उत्कटांचा अभिमान धरून आपल्या काळाला साजेल अशी करणी करण्याकडेही प्रवृत्ति होऊ लागली. त्यातून १८९३ यावर्षी नव्या कालखंडाची प्रसादचिन्हेच उमटू लागली. सातारा जिल्ह्यातील बाळव्यासारख्या गावी छोट्या काँग्रेसच्या निमित्ताने इंडियन नॅशनल काँग्रेसचे सेक्रटरी ए. ओ. ह्यूम जसे आले तसेच उदयोन्मुख राष्ट्रीय पुढारी ( लो. ) टिळक व ( ना. ) गोखलेही हजर राहिले; शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेत हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून जाऊन ' **हे विश्वचि माझे घर ।** ' अशी शिकवण देणाऱ्या भारतीय वेदान्ताची ओळख विवेकानंदानी जगाला करून दिली; दादाभाई नौरोजी ब्रिटिश पार्लमेंटात निवडून आले आणि ' ब्रिटिश रियासतीमुळेच भारतीय दारिद्र्याची समस्या उत्पन्न झाली आहे हे त्यानी ब्रिटिश पार्लमेंटाच्या व म्हणूनच जगाच्या निदर्शनास आणले; आणि बाबू अरविंद घोष आय्. सी. एस्. मधील ' घोड्यावर बसण्या ' ची परीक्षा, परकीय सत्तेच्या रौप्यशृंखला हातात नकोत म्हणून, मुद्दाम नापास करवून घेऊन हिंदुस्थानात परतले आणि ' जुन्या जागी नवे दिले ' या आपल्या इंदुप्रकाशमधील लेखमालेमुळे अर्ज–आर्जवानी राष्ट्रीय जीवनाचा गाडा चालविणाऱ्या ' भल्या बुद्धिच्या सागराना ' धक्के देऊन बसले; सार्वजनिक लोकशाही जीवनाची प्रणाली निर्माण करून त्याला आध्यात्माची जोड द्यावी म्हणून ( लो. ) टिळकानी गणपत्युत्सवाचा उपक्रम आखला व त्याला ऐतिहासिक कर्तृत्वाने स्वराज्याची जोड देणाऱ्या शिवाजीच्या जन्मोत्सवाचा पायंडा पाडण्याचा मनसुबा आखला. लोकमान्यांच्या अशा राष्ट्रीय उत्थापनाची परिणति स्वराज्याच्या चतुःसूत्रीत झाल्यावर, स्वदेशीच्या प्रचारार्थ, आर्यसमाजात ' पंडितजी ' म्हणून संबोधले गेलेले सातवळेकर जसे वैदिक ऋचांच्या आधारे व्याख्याने देत असत, तसेच त्यानी सार्वजनिक जीवनाला अध्यात्माची जोड मिळत जावी म्हणून प्रथम कोल्हापूरच्या ' विश्ववृत्तातून ' व नंतर पुस्तकरूपाने मुंबईस ' वैदिक राष्ट्रगीत ' प्रसिद्ध केले होते. ब्रिटिश सरकारने ते व आलाहाबादला हिंदीमधून प्रसिद्ध झालेले त्याचे प्रतिबिंब निदर्शनास येताच, ' घ्यावया जसा बली ' वाघ झडप घालतो, तशीच झडप घालून त्याच्या सर्व प्रति जप्त केल्या व जाळल्या.

हे पहा ते—

## वैदिक राष्ट्रगीत

कोणत्याहि राष्ट्राच्या अथवा कोणत्याहि जातीच्या राष्ट्रीय आकांक्षा पहावयाच्या असतील तर त्या त्याच्या ' राष्ट्रगीता ' वरून समजून येऊ शकतील. राष्ट्रगीत हे जनतेच्या राष्ट्रीय आकांक्षेचे द्योतक असते. असे हे वैदिक ' राष्ट्रगीत ' अथर्ववेदाच्या बाराव्या कांडात पहिलेच सूक्त आहे. याचा विनियोग सूत्रकारांनी असा दिलेला आहे—

**ग्रामपत्तनादिरक्षणार्थम् ।** ( कौ. ५।२ )

**पार्थिवीं भूमिकामस्य** ( न. कल्प १७ )

पार्थिव्यां महाशान्तौ अस्य सूक्तस्य विनियोगः । पुष्टिकामः ( ३३ ),
पुत्रधनादिसर्वफलप्राप्त्यर्थं ( ३८–५० ),
व्रीहियवान्नकामः ( ४२ ),
मणि–हिरण्यकामः ( ४४–४५ ) ( कौ. ३७ )

या सूक्ताचे एकंदर ६३ मंत्र आहेत. त्यांपैकी निरनिराळ्या मंत्रांचे गट निरनिराळ्या वेळी म्हणण्यासाठी आहेत. काही मंत्र ग्राम, पत्तन, नगर, राष्ट्र यांच्या रक्षण करण्याच्या वेळी म्हणण्यासाठी आहेत. काही मंत्र पृथ्वीवर महाशांति स्थापन करण्याच्या वेळी म्हणण्यासाठी आहेत. अर्थात् ज्यावेळी फार अस्वस्थता माजली असेल त्यावेळी राष्ट्रात शांति स्थापन करणाऱ्यानी हे मंत्र म्हणावे. पोषण व्हावे, धन, अन्न व पुत्र यांची प्राप्ति व्हावी अशी इच्छा करणाऱ्यानी काही मंत्र म्हणावे, असे मंत्रांच्या गटानुसार या राष्ट्रगीताचे वर्गीकरण आहे.

हे एकच राष्ट्रगीत आहे हे खरे, पण ते सर्वच्या सर्व एकदम व सर्व वेळी म्हणावयाचे नसून वेळ व आवश्यकता यांच्या अनुरोधाने यातील मंत्रांचे गट ज्या वेळेला जो योग्य असेल तो म्हणावयाचा आहे. ही व्यवस्था कौशीतकी सूत्राच्या पूर्वीपासून चालत आलेली होती, ती या सूत्रकाराने लिहून ठेवली आहे.

मुख्यतः '**ग्रामपत्तनादि रक्षणार्थ**' हे राष्ट्रगीत म्हणावयाचे आहे. ग्रामपत्तनादिमध्ये राष्ट्ररक्षणाचा अंतर्भाव झालेला आहे. आपण आज जें राष्ट्रगीत म्हणतो ते ग्राम, पत्तन, नगर, राष्ट्र यांच्या रक्षणाच्याच वेळी म्हणतो असे नसून कोणत्याहि उत्सवाच्या शेवटी ते आपण म्हणत असतो. अमुक मंत्र अमुक प्रसंगी म्हणावे असा जो सूक्तविनियोगकारांनी विनियोग लिहिला आहे तो महत्त्वाचा आहे. मंत्रांच्या अर्थाच्या अनुरोधाने हा आहे. ज्यावेळी संस्कृत भाषा प्रचारात होती, त्यावेळी कोणत्या मंत्राचा गट कोठे म्हणावा हे समजण्यासारखे होते.

अस्तु. अशा रीतीने हे राष्ट्रगीत वैदिक काळात प्रचलित होते. याचा विचार आज आपणास करावयाचा आहे. आजची राष्ट्रगीते चारपाच मिनिटात गाऊन संपणारी आहेत व हे गीत तर ६३ मंत्रांचे आहे. हे एवढे मोठे असल्यामुळेंच हे राष्ट्रगीत नव्हे असा जो यावर कित्येकांचा आक्षेप आहे, त्याचे निरसन करण्यासाठी निरनिराळे मंत्रांचे गट निरनिराळ्या प्रसंगी म्हणण्यासाठी आहेत हे लक्षात घेतले, म्हणजे सूक्ताचा मोठेपणाचा आक्षेप दूर होऊ शकतो.

आता या सूक्ताची अथर्ववेदामध्ये ठेवण कशी आहे ती पहा—

अथर्ववेद १० वे कांड सूक्त ( १ ) कृत्यानाशन; ( २ ) केनसूक्त ( ब्रह्मविद्या ); ( ३–६ ) शत्रुनाशन, विजयप्राप्ति; मणिधारण; ( ७-८ ) ज्येष्ठ ब्रह्म; ( ९–१० ) गौरक्षण.

अथर्ववेद ११ वे कांड सूक्त ( १ ) ब्रह्मौदन ( अन्न ); ( २ ) रुद्रसूक्त ( युद्ध-देवता वर्णन ); ( ३ ) ओदन ( अन्न ); ( ४ ) प्राण; ( ५ ) ब्रह्मचर्य; ( ६ ) कालचक्र; ( ७–८ ) ब्रह्मवर्णन; ( ९–१० ) युद्ध, शत्रुनाशन.

अथर्ववेद १२ वे कांड ( १ ) मातृभूमि सूक्त ( राष्ट्रगीत )

हा सूक्ताचा अनुक्रम पाहण्यासारखा आहे. ब्रह्मविद्या, प्राणविद्या, ब्रह्मचर्य, कालचक्र या वर्णनामध्ये अन्न व युद्धसूक्ते आहेत, व युद्धसूक्ते झाल्याबरोबर हे मातृभूमीचे सूक्त अर्थात् राष्ट्रगीत आलेले आहे. ही सूक्तांची ठेवण लक्षपूर्वक पाहण्यासारखी आहे. या सूक्तक्रमावरून असे स्पष्ट दिसून येत आहे की, युद्ध करणेच असेल तर ते ब्रह्मविद्या जाणणारानीच ठरवावे. ब्रह्मविद्येच्या योगाने पवित्र, शांत व समवृत्तीने युक्त झालेल्या मनाने ते ठरवले जावे. युद्धपिपासु लोकानी ते ठरवू नये. ब्रह्मविद्येच्या सूक्ताच्या मध्ये युद्धसूक्ते व नंतर राष्ट्रगीत अशी रचना करण्यात जर काही हेतु असेल तर तो हाच असला पाहिजे.

आज युद्ध ठरवणे ज्यांच्या हातात आहे त्याना अध्यात्मविद्येचा गंधहि नसतो. यामुळे युद्धामागून युद्धे निपजत आहेत. जर यावेळी सर्व राष्ट्रातील तरुणाना ब्रह्मज्ञानाची ओळख करून दिली जाईल व या ब्रह्मविद्येच्या विचाराने यांची मने पवित्र होतील, तर युद्धांचा अनर्थ टळू शकेल किंवा बराच कमी होऊ शकेल. आता आपण या राष्ट्रगीताचा विचार करू.

## मातृभूमीची कल्पना

या सूक्तामध्ये अनेक मंत्रात मातृभूमीची स्पष्ट कल्पना आहे, हे पहा—

( १ ) **माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः ।** ( अथर्व. १२।१।१२ )

( २ ) **भूमे मातः निधेहि मा भद्रया सुप्रतिष्ठितम् ।** ( अथर्व. १२।१।६३ )

( ३ ) **सा नो भूमिर्विसृजतां माता पुत्राय मे पयः ।** ( अथर्व. १२।१।१० )

( ४ ) **मातरं भूमि धर्मणा धृताम् ।** ( अथर्व. १२।१।१७ )

' ( १ ) माझी माता भूमि व मी त्या मातृभूमीचा पुत्र आहे. ( २ ) हे मातृभूमे ! मला उत्तम रीतीने सुरक्षित व कल्याणकारक परिस्थितीमध्ये ठेव ( ३ )ती आमची मातृभूमि पुत्ररूपी अशा मला दूध आदि पेये देवो ( ४ ) आमच्या मातृभूमीचे धर्माने धारण होते. '

या वचनांमध्ये ' मातृभूमि ' ची कल्पना अगदी स्पष्ट शब्दात वर्णिली आहे. अनेकांची ही भूमि माता आहे हे दाखविण्यासाठी—

( १ ) **सा नः माता भूमिः ।**

( २ ) **पुत्राय मे पयः विसृजतां ।** ( अथर्व. १२।१।१० )

( १ ) ती ( नः ) आमची मातृभूमि, ( २ ) ' ती माझ्यासारख्या एक एका

पुत्राला दूध आदि पेय देवो.' याठिकाणी 'आमची मातृभूमि' हा शब्दप्रयोग राष्ट्रातील सर्व लोकासाठी आहे. असे प्रयोग या राष्ट्रगीतात अनेक मंत्रात आलेले आहेत, पहा —

नः पृथिवी ( मंत्र १-३, ५, ३६ इत्यादि ).

नो भूमिः ( मंत्र ३-४, ६, ८-९, १३, १८, २२, ३२,३४, ४०-४१ इत्यादि.)

आम्हा सर्वांची ही मातृभूमि आहे, असा या वचनाचा अर्थ आहे. आमची मातृभूमि आम्हा सर्वांची आहे हा सामुदायिक, संघटित एकत्वाचा भाव येथें आहे. हाच भाव राष्ट्रीय ऐक्याचा पोषक आहे. ' माझा भारत ' म्हणण्यापेक्षा ' आमचा भारत ' म्हणण्यामध्ये जो विशेष राष्ट्रीय ऐक्याचा भाव आहे तोच भाव ' नः माता भूमिः ' या वचनामध्ये स्पष्ट आहे. आमच्या मातेचे उत्तम संरक्षण करणे हे तिच्या सुपुत्राचे कर्तव्यच आहे. जो कुपुत्र असेल तो कदाचित् आपल्या मातेचे संरक्षण करणार नाही. पण जो सुपुत्र असेल तो आपले जीवन-सर्वस्व अर्पण करून आपल्या मातेची प्रतिष्ठा सुरक्षित ठेवील यांत संशयच नाही.

## मातृभूमीची सेवा

मातृभूमीची सेवा करण्याचा आदेश या राष्ट्रगीताचा मंत्र देत आहे, तो मंत्र आता पहा—

**यार्णवेऽधि सलिलमग्र आसीद् यां मायाभिरन्वचरन् मनीषिणः ।**
**सा नो भूमिस्त्विषिं बलं राष्ट्रे दधातूत्तमे ।।** ( अथर्व. १२-१-८ )

' जी आमची मातृभूमि एक वेळ महासागराच्या पाण्यात बुडालेली होती, ज्या मातृभूमीचे मननशील लोक आपल्या अतुलनीय कौशल्यमय राजनीतीच्या योजनानी सेवा करीत आले आहेत, ती आमची मातृभूमि आमच्या उत्तम राष्ट्रामध्ये तेज आणि बल धारण करून वाढवो. '

या मंत्रात ' मनीषिणः यां मायाभिः अन्वचरन् । ' मननशील लोक ज्या मातृभूमीची कौशल्ययुक्त योजनानी सेवा करीत असतात, हे वाक्य फारच महत्त्वाचे आहे. ' माया ' शब्दाचा अर्थ दोन प्रकारानी होत असतो. ( १ ) कुशलता, कार्य करण्यामधील प्रवीणता, चातुर्य; ( २ ) कपटकुटिलता, कपटपटुता, डावपेच, राजनीतीचे प्रावीण्य, शत्रूला परास्त करण्यासाठी योजावयाची नीति, असे दोन्ही प्रकारचे भाव याठिकाणी अभीष्ट आहेत.

शत्रूचा नाश जर सरळ उपायानी होत असेल तर सरळ उपायानी शत्रूचा नाश करावा; तसा तो होत नसेल तर कपटाने राजनीतीनेही करावा. शत्रूला येथे जिवंत ठेवावयाचा नाही हे मुख्य कर्तव्य आहे.

भगवान् रामचंद्राना रावणाला मारावयाचे होते. देशोद्धारासाठी हे करणे अत्यंत आवश्यक होते. रावणाची शक्ति कमी करण्यासाठी त्याचा मित्र वाली याला

मारणे अत्यंत आवश्यक होते. तो वाली सैन्यासह असल्यामुळे सहज मारला जाणे शक्य नव्हते, म्हणून त्याला झाडाआड लपून रामाने मारले. तसेच पांडवानी भीष्म, द्रोण, कर्ण या शत्रूच्या वीरांचा नाश कपटाने केला. हे सर्व उपाय '**मायाभिः अन्वचरन्**' यामध्ये येतात.

## मातृभूमीचे धारण

कोणत्या गुणानी मातृभूमीचे धारण होऊ शकते व कोणते दुर्गुण वाढले म्हणजे मातृभूमीचे रक्षण होऊ शकत नाही, या विषयीचा उल्लेख या राष्ट्रगीताच्या पहिल्याच मंत्रात केलेला आहे. तो अत्यंत महत्त्वाचा मंत्र आता पहा—

**सत्यं बृहदृतमुग्रं दीक्षा तपो ब्रह्मयज्ञः पृथिवीं धारयन्ति ।**
**सा नो भूतस्य भव्यस्य पत्न्युरुं लोकं पृथिवी नः कृणोतु ॥** ( अथर्व. १२।१।१ )

'सत्य, ऋत्, उग्रत्व, दाक्षिण्य, तप, ब्रह्म आणि यज्ञ हे गुण मातृभूमीचे धारण करीत असतात. ही आमची मातृभूमि आमच्या भूतभविष्याच्या घडामोडींचा आधार आहे. ही आम्हाला आमच्या देशात विस्तृत कार्यक्षेत्र देवो.'

ज्या राष्ट्रीय सद्‌गुणानी आपल्या मातृभूमीचे उत्तम प्रकारे संरक्षण होऊ शकते, ते सद्‌गुण या मंत्रात प्रथमच क्रमाने दिलले आहेत. त्यांचा विचार आता आपण करू—

( १ ) **सत्यं**–राष्ट्राचे संरक्षण करणारा मुख्य गुण 'सत्य' हा आहे. विचार, उच्चार व आचरण सत्य असले पाहिजे.

( २ ) **बृहत् ऋत**–विशेष सरळपणा, सरळ स्वभाव, व्यवहारातील सरळपणा.

( ३ ) **उग्रं**–उग्रता, वीरता, शौर्य, धैर्य, शत्रूशी युद्ध करण्याचे सामर्थ्य.

( ४ ) **दीक्षा**–दक्षता, दाक्षिण्य, सावधपणा, निर्दोष कार्य करण्याचा गुण, कर्तव्यामध्ये शैथिल्य येऊ न देणें.

( ५ ) **तप**–सत्कार्य करावयाचे असता आवश्यक तेवढे शीत–उष्ण सहन करणें. हानिलाभ सहन करणें. सत्कर्म करीत असता जें कष्ट सहन करणें आवश्यक असेल तेवढे कष्ट आनंदाने सहन करणे.

( ६ ) **ब्रह्म**–ज्ञान प्राप्त करणे, ज्ञानविज्ञानामध्ये शक्य तेवढी उन्नति प्राप्त करून घेणें, राष्ट्रामध्ये ज्ञान व विज्ञान समतोलपणें वाढविणें.

( ७ ) **यज्ञ**–यज्ञ करणे, यज्ञीय जीवन बनवणें.

यज्ञामध्ये तीन मुख्य कर्तव्यें असतात. ( पूजा ) श्रेष्ठाचा सत्कार, ( संगतिकरण ) आपसांतील संघटन व ( दान ) दीनांची दीनता दूर करण्यासाठी दान देणे. असा हा यज्ञ 'सत्कार–संगति–दानात्मक' आहे. प्रत्येक यज्ञामध्ये हे साधलेच पाहिजे. थोरांचा सत्कार, आपसातील संघटना हे दोन्ही भाग सर्वांस समजण्यासारखे

आहेत. दीनता दूर करण्यासाठी दान कसे द्यावे ते समजणे आवश्यक आहे. ज्ञान नसल्यामुळे येणारी दीनता दूर करण्यासाठी ज्ञान दिले पाहिजे. बल नसल्यामुळे येणारी दीनता दूर करण्यासाठी, बल वाढविण्यासाठी जें आवश्यक असेल ते केले पाहिजे. धन नसल्याने येणारी दीनता दूर करण्यासाठी धनाचे दान करावे. धन, भूमि, घर, कूप, बैल आदिकांचे दान या धनामध्ये येते. कर्मामध्ये कौशल्य नसल्याने येणारी दीनता दूर करण्यासाठी कौशल्य वाढेल असे करावे. असे हे दीनता दूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या दानाचे प्रकार आहेत.

सध्याच्या यज्ञ-विधीमध्ये कर्मविधीलाच अधिक महत्त्व प्राप्त झाल्यासारखें आहे. यज्ञाच्या खऱ्या उद्देशाचे कोणालाच महत्त्व वाटत नाही हे दुर्दैव आहे !

असो. या दृष्टीने विचार केला तर हे सहजच कळून येईल की, हे सात गुण राष्ट्राच्या संरक्षणाला अत्यंत उपयोगी आहेत. सत्य, सरलता, वीरता, दक्षता, ज्ञान, विज्ञान व यज्ञरूप जीवन हे गुण जनतेमध्ये वाढतील असे केले पाहिजे. हेच राष्ट्रीय शिक्षण आहे. ज्या शिक्षणाने हे राष्ट्रीय गुण अंगी वाढतात तेच राष्ट्रीय शिक्षण आहे.

: ८ :

# लिहिले ते उताला आले ! !

**हैदराबादेस** आपल्या पाठीमाग काय झंघट आहे, याची कल्पना असलेले पंडितजी खरे वैदिक ! दैन्य व निराशा हे शब्दच त्याना ठाऊक नाहीत ! उत्कट, भव्य असेल त्याकडे लोकाना खेचावे व लोकांचे शाश्वत कल्याण करावे, हा त्यांचा बाणा.

**देहीति वचनं कष्टं, विद्यायां व्यसनं सदा ।**

हॅम्लेटमध्ये पोलोनियसने आपल्या मुलाला उपदेल्याप्रमाणे— ' **जे पानावरती पडेल समयी नेमस्त ते भक्षणे ।** ' अशा साध्या वृत्तीचे पंडितजी.

पंडितजी सातवळेकर म्हणजे वैदिकवृत्तीचे चिरतरुण. घड्याळाच्या काट्याप्रमाणे दिनचर्या. अनियमितपणा मिळालाच तर तो लोकसेवेच्या कार्यमग्नतेत ! त्यांचे अंतरंग–बहिरंग दर्शन सदैव प्रसन्नच. साधेपणा आणि नम्रता त्यांचे रोमरोमात भरलेला. अशी ही लोकमान्यांच्या गोटात वावरणारी मूर्ति सुरतकाँग्रेसच्या यात्रेकरूत पाहिल्यावर, पंडितजींना आपल्या गुरुकुलात कायम घ्यावे, असे महात्मा मुन्शीरामांच्या मनात आले. त्या अगोदर कितीतरी दिवस पंडितजी सातवळेकरांच्या ' वैदिक यज्ञसंस्था ' प्रभृति हिंदी लिखाणामुळे कांगडी गुरुकुलाचे मुन्शीराम ( पुढे स्वामी श्रद्धानंद ) यांचे पंडितजींच्याकडे लक्ष होते. मुन्शीरामजींच्याच चरित्राचा विचार केला तर पंडितजीच सांगतात कीं– ' हे सरदारांच्या–सारखेच जालंधरात वकील होते. त्यांची मिजासही सरदारांच्या मिजासीसारखीच होती. आणि त्यांचा हुक्का भारीच किमतीचा होता. त्यात तंबाखु टाकून आपल्या जागेवर बसून ते पीत असत.

' श्री महर्षि दयानंदजीनी यांच्या जीवनात परिवर्तन केले आणि हे त्यामुळे सरदाराचे संन्यासी झाले. गंगेपलिकडे कांगडी गावात गुरुकुल होते. आश्रम आणि गुरुकुलाची इमारत साधीसुधी होती व अध्यापकांच्यासाठी झोपड्याच

होत्या. त्यापैकीच एका झोपडीत मी राहू लागलो. आणि गुरुकुलाच्या ब्रह्मचाऱ्यांना चित्रकला शिकवू लागलो.

'यावेळी गुरुकुल खरोखर ऋषींच्या आश्रमासारखेच होते. गुरुकुलात रात्रीच्या वेळी वाघ येत. जंगली हत्ती देखील कित्येक वेळा येत. कोल्ह्यांची येजा तर रोजचीच गोष्ट होती. ब्रह्मचारीगण लाठ्यानी वाघाला पळवून लावीत.

'प्रातःकाळी चार वाजता सर्व उठत. जंगलात जात. स्नानादिक करून वेदपाठ करीत. संध्यावंदन सूर्योदयाचे सुमारास होई. वेदघोषाने प्रातःकाळचा वेळ घुमून जात असे

'मला हा जीवनक्रम पसंत पडला. पण माझ्या पत्नीला धनपतिचे भिक्षुकपति होणे पसंत नव्हते. पण ती काय करू शकत होती ? तीसुद्धा आनंदाने तेथे राहू लागली आणि कोणत्याहि प्रकारे तिने आपले असमाधान व्यक्त केले नाही.

'माझा एक मुलगा होता. त्याचे नाव नारायण होते. तोही आमच्याबरोबरच होता. आता मी गुरुकुलाचा आश्रमवासी झालो होतो. शहरी राहणी आता सुटली होती. याकारणाने त्याला गुरुकुलात दाखल केले. आणि त्याचे शिक्षण गुरुकुलाच्या इतर ब्रह्मचाऱ्याबरोबर सुरू झाले.

'गुरुकुलात यावेळी स्वतंत्रतेचे वातावरण होते. महात्मा मुन्शीरामजींचे वजन पंजाब प्रांतभर सर्वत्र होते. गुरुकुल त्यानीच काढले होते आणि दौरा करून सर्व पंजाबींचे मन त्यानी आकर्षित करून घेतले होते. गुरुकुलाच्या वार्षिक उत्सवात मोठमोठे धनिकदेखील पंजाबी, गवताच्या छपराखाली दोनतीन दिवस मुक्काम करीत. लाखलाख रुपये गुरुकुलास दानरूपाने देऊन जात. त्या गुरुकुलाच्या वार्षिक उत्सवाचे दृश्य मोठे आकर्षक असे.

'सरकारी अधिकारी त्याचप्रमाणे पोलिस अधिकारी उत्सवाचेसाठी येत. पण महात्मा मुन्शीरामजी त्यांची काही खास सरबराई करीत नसत. दुसऱ्या यात्रिकासारखीच त्यानाही गवताच्या झोपडीतच वसती करावी लागे. महात्माजी सांगत की– 'हा आश्रम आहे; येथे राजा आणि रंक सारखेच.'

'महात्मा मुन्शीरामजी कधी सरकारी अधिकाऱ्यास गुरुकुल पहाण्यासाठी बोलवीत नसत. आणि बोलावल्यावाचून राज्यपाल किंवा राजप्रतिनिधी गुरुकुलात येऊ शकत नसत. असेच काहीं वर्षे चालले. पण महात्माजीनी कोणासच बोलावले नाही.

'शेवटी संयुक्त प्रांताच्या राज्यपालानी 'मी गुरुकुल पाहण्यासाठी येत आहे,' असे पत्र लिहिले. त्याचें उत्तर 'या' असे लिहिणेच आले. तरी ले. गव्हर्नर आले आणि त्याना संस्कृतात मानपत्र केळीच्या पानात लपेटून दिले व तुळशीचे कषाय (तुलसी टी) त्याना देण्यात आले. त्याना आश्रमवासियासारखेच सर्व खाण्यापिण्याचे पदार्थ देण्यात आले.

' जातेवेळीं त्यानी सांगितले की व्हाइसरॉय साहेबाना गुरुकुल पहावयाचे आहे. त्याना तुम्ही बोलावा. हे संयुक्तप्रांताच्या राज्यपालाचें सांगणें एकून महात्मा मुन्शीरामजी गप्पच बसले. पण शेवटी त्याना आमंत्रण धाडणे आले. ते आले. चांगले स्वागत केले गेले. मानपत्रही तसेच केळीच्या पानातून दिले. व्हाइसरॉयांचे भाषणही उत्तमच झाले. तुळशीचा चहा सर्वांना देण्यात आला. जातेवेळी व्हाइसरॉयानी राजाराणींचे चित्र गुरुकुलात लावण्यासाठी दिले. ते पुस्तकालयात लावणेंही आले. अशा तऱ्हेने इंग्रज आपल्या युक्त्या करीत आणि गुरुकुलाचे आचार्य देखील जेथपर्यंत आपले स्वातंत्र्य सांभाळता येईल, तेथल्या पल्ल्यापर्यंत आपली स्वतंत्रता कायम राखीत होतेच.

' इंग्रज अधिकाऱ्याना असा संशय होता की या गुरुकुलात राजद्रोही तरुण तयार केले जातात. राज्यपाल, त्याचप्रमाणें राजप्रतिनिधि यानाहीं तोच संशय होता. यासाठी रेव्ह. अँड्रयूज यांना राजप्रतिनिधीनी गुरुकुलात राहण्यासाठी पाठविले होते. ' ब्रह्मचाऱ्याना इंग्रजी शिकवण्यासाठी मी आलो आहे' असा बहाणा त्यानीं केला होता. ते ब्रह्मचाऱ्यातच रहात, त्यांच्यातच भोजन करीत व आश्रमवासीयासारखेच वागत. इंग्रजीभाषा शिकवीत; पण आले होते गुप्तचरासारखे. गुरुकुलाचे ब्रह्मचारी राजद्रोहाचे काम करतात की नाही हे पाहण्यासाठी ते आलें होते. वर्षभर ते गुरुकुलात राहिले आणि त्यानी रिपोर्ट केला की येथें राजद्रोह नाही. यामुळे इंग्रजांचा थोडासा संशय दूर झाला. पण वारंवार गुप्त पोलिसांचा त्रास गुरुकुलाला होतच होता. पण ( स्वामी श्रद्धानंदजी ) मुन्शीरामजींच्या चतुराईने सगळे त्रास कोठल्या कोठें जात ! !

' यावेळी बंगालमध्ये बॉम्ब करणाऱ्या तरुणांची संघटना जोर करून राहिली होती. त्या संस्थेचे कार्यकर्ते चारी बाजूकडील प्रांतातून पोहोचले होते. हरिद्वारातसुद्धा त्यांचा एक अड्डा होता. तेथून गुरुकुलाच्या प्रौढ ब्रह्मचाऱ्यापर्यंत त्यांचे संकेत व पुस्तके पोहोचली होती. त्यांचे प्रयत्न दांडगे होते. महाविद्यालयाचे सर्वच्या सर्व तरुण त्यात सामील नव्हते. पण दहापाच विद्यार्थ्यांजवळ बॉम्बचें ते ग्रंथभाण्डार पोहोचले होते.

' ही बातमी पोलिसला कळली, आणि एकदम तपास होईल, अशीहि माहिती मिळाली. जसे गुप्त पोलिसांचे जासूद आमच्यात काम करीत असत, तसेच गुरुकुलाचे हितचिंतक गुप्त पोलिसांच्या कचेरीतही असत. यामुळेंच चारपाच दिवसात जे होणार होते, त्याची खबरसुद्धा गुरुकुलात पोहोचत असे व ब्रह्मचारीगण आपल्या खोल्या स्वच्छ करून ठेवीत. त्याचप्रमाणे जें शिक्षक शंकित होते, त्यानासुद्धा सूचना मिळत असे. मींसुद्धा संशयास्पद शिक्षकांपैकीच एक होतो. मला आठवण आहे की एका रात्रौ आम्ही सगळी बॉम्ब बनविण्याच्या शास्त्राची पुस्तके जमिनींत गाडून टाकली होती आणि सगळ्या खोल्या स्वच्छ करून

ठेवल्या होत्या.

' ब्रह्मचारीगण शूर, राष्ट्रसेवेस तत्पर, त्याचप्रमाणे चांगले कार्य करण्यासाठी नेहमी अग्रेसर राहणारे होते. जंगलात राहिल्याकारणाने ते निर्भयही होते. एकदा सिंधकडील एक प्राध्यापक आले होते. त्याना घेऊन सगळ्या ब्रह्मचाऱ्यासमवेत सुट्टीच्या दिवसात आम्ही जंगलात गेलो होतो. वेळ सकाळची नऊ वा दहा वाजण्याची होती. गुरुकुलापासून आम्ही तीन चार मैलावर दाट जंगलात पोहोचलो. जंगलात गवत मोठे उंच वाढले होते. एका छोटयाशा टेकडीवर गवतात एक वाघ लपून बसला होता. दुर्दैवाने हे सिंधी प्राध्यापक त्या बाजूकडे गेले आणि समोर वाघ उभा राहिला. बिचारे प्राध्यापक एकटेच वाघाच्या समोर गेले होते. त्यातून त्यानी खाल्लेल्या भीतीला परिसीमाच नव्हती. शेजारच्याच झाडावर जीव वाचविण्याकरिता ते कसेबसे चढले. पायात बूट होते ते पायातून गळून पडले. वर प्राध्यापक, खाली वाघ ! प्राध्यापक ' वाघ ! वाघ ! ' म्हणून आरडत राहिले. कोणी ब्रह्मचाऱ्यानी तो आरडा ऐकला आणि पाचसात मिनिटातच लाठ्या घेऊन सर्व ब्रह्मचारी तेथे पोचले आणि त्यानी वाघाला पिटाळले. प्राध्यापकांच्या डोळ्यापुढे वाघ एके वाघच होता. चहूबाजूस त्यास वाघच वाघ दिसू लागला होता. ब्रह्मचाऱ्यानी त्याना खाली उतरवून घेतलें; तरी ते ' वाघ ! वाघ ! ' असेच ओरडत राहिले. पुऱ्या दोन तासानी प्राध्यापक ताळ्यावर आले. तरीसुद्धा त्यांचे डोळ्यापुढे वाघच उभा होता. त्यांची शुश्रुषा झाली. तरी झोपेतही ते ' वाघ ! वाघ ! ' असे किंचाळत होतेच. दोन तासानंतर ते शुद्धीवर आले. गुरुकुलातील ब्रह्मचारी कसे निर्भय होते व शहरी प्राध्यापक कसे होते, याचा हा नमुना आहे.

' गुरुकुल कांगडी गावापासून चार मैलावर सप्ततीर्थ नावाचे गंगेच्यामध्ये एक स्थान आहे. स्थान मोठें रमणीय आहे. चाळीस पन्नास ब्रह्मचाऱ्यांचें बरोबर आम्ही हे स्थान पाहण्यास गेलो होतो. जाताना आम्ही पायीच चालत गेलो. तेथे आम्ही दहा वाजता पोहोचलो. संध्याकाळपर्यंत तेथे राहिलो. तेथेंच फराळ केला. संध्याकाळी चार वाजता तेथून परत फिरलो. दिवस उन्हाळ्याचे होते. गंगामाई वाढू लागली आणि सकाळी जेथे जमीन होती तेथे संध्याकाळी जोराने पाणलोट येऊन राहिले व ते अधिकाधिकच वाढू लागले.

' गंगेत पोहण्याचा अभ्यास मला नव्हता. माझ्यासारखेच आणखी चार पाहुणे होते. आम्ही सगळ्यानी कच खाल्ली. पण ब्रह्मचारी म्हणाले– ' भिऊ नका ! आम्ही तुम्हा सगळ्याना पलिकडे पोहोचवू ! ' ब्रह्मचारी गंगेच्या पुरात पोहणारे होते. दोघे दोघे ब्रह्मचारी एकेका हाताने पोहू लागले व दुसऱ्या हाताच्या आधाराने आमच्यासारख्याना सांभाळून नदीपार आणू लागले. एक मैलाची मजल होती, पण प्रवाहामुळें त्याना ( ती ) पार पाडणे सोपे नव्हते. ब्रह्मचारी नसते तर

आमचा तो काळ 'काळ'च ठरता ! त्या ब्रह्मचाऱ्यानीच आम्हाला वाचविले होते.

'एक वेळ गुरुकुलात आम्ही होतो. भाद्रपद महिना होता. पाऊस पडत होता. कनखलच्या जवळचे सरकारी धरण फुटले. पाणी गुरुकुलाच्या चारी बाजूनी भरू लागले. चारी बाजूनी समुद्रच भरला जणु ! त्याला भरतीच येत होती. त्यावेळी गुरुकुलाची इमारतही पडली होती. तरी ब्रह्मचारी आनंदीच होते. ते पोहून जाण्यास तयार होते. पण आठ–दहा तासानंतर पाऊस थांबला. पाणीहि ओसरू लागले. सारे ठीक झाले. पण अशा आपत्तीतही ब्रह्मचाऱ्यांचा उत्साह कायम होता.'

अशा मूर्तिमंत–चैतन्यमय आश्रम असलेल्या गुरुकुलात पंडितजी सातवळेकर त्यानीच वर सांगितल्याप्रमाणे रमले होते. निसर्गसान्निध्यात आपली चित्रकला त्याना मर्मोद्‌बोधक आणि वास्तवातही सौंदर्यसंपन्न, तशीच ध्वनिसंकेतानी व आकर्षकपणे प्रेरक करावयास वाव होता. त्याचप्रमाणे आपल्या वेदविद्येचा परिणतप्रज्ञेने तेजस्वी आविष्कार करून तरुण पिढीच्या कृतज्ञतेने कीर्तिही मिळवणारे आचार्य ते ठरले असते. मुन्शीरामजींच्याच सूचनेप्रमाणे पंडितजी आपल्या कुंचल्यातून कांगडीतील रम्य दृश्ये चितारीत. आणि त्यांच्या कुंचल्याबरहुकूम गुरुकुलातील ब्रह्मचारी विद्यार्थी चित्रे चितारू लागले होते. महर्षि स्वामी दयानंदजींचे मोठे तैलचित्र खास गुरुकुलाकरता पंडितजीनीच तयार करून दिले. त्याचप्रमाणे स्वामी विरजानंदजी यांचेही एक मोठे तैलचित्र पंडितजीनी तयार केले होते. पंडितजीना तेथे योगसाधनेलाही वाव मिळत गेला. प्राणायाम, ध्यानधारणा, स्वाध्याय, चित्रकला आणि ब्रह्मचारी विद्यार्थीवर्गासह समरस जीवन, यातच पंडितजीचा सर्व दिवस जात असे.

अशा चाललेल्या आनंदी–आनंदाच्या जीवनास एकदम एक धक्का आला. पंडितजीनी कोल्हापूरच्या विश्ववृत्तात ' वैदिक प्रार्थनांची तेजस्विता ' हा लेख लिहिला होता. त्याबद्दल इंग्रजसरकारने खटला उभारण्याचे ठरविले असल्याचे पंडितजींनी वृत्तपत्रातून वाचले. आपल्यावरही पकडवॉरंट निघाले आहे असेही त्याना समजले. तेव्हा, हैदराबाद सोडताच, आपल्याला बोलावून घेणाऱ्या राष्ट्रीय संस्थेवर काही संकट येऊ नये, या विचाराने त्यानी महात्मा मुनशीराम यांच्याशी विचारविनिमय करून सपत्नीक हरिद्वार सोडले. कारण मुनशीरामांचे बोलावण्यावरून सातवळेकर गुरुकुलात गेले होते. तेथे बाराव्या कक्षेला ते ' रोचक, शंकाविमोचक ढंगसे ' निरुक्त शिकवीत. चित्रकलाशिक्षकही ते होते. तेच सांगतात—

' मी गुरुकुलामध्ये १९०८ मध्ये जाऊन चित्रकलाशिक्षक म्हणून स्थानापन्न झालो. लगेच ' वैदिक प्रार्थनांची तेजस्विता ' हा लेख लिहिला व तो कोल्हापुरास प्रसिद्ध होत असलेल्या प्रो. विजापूरकरांच्या ' विश्ववृत्त ' मासिकांत प्रसिद्ध झाला. प्रसिद्ध होताच त्याकडे मुंबईसरकारचे लक्षच वेधले. माझे हैदराबादहून प्रसिद्ध झालेले ' वैदिक राष्ट्रगीत ' मुंबईसरकारने जप्त करून त्याच्या सर्व प्रति जाळून टाकल्याच होत्या. ( त्या पुस्तकाच्या २००० प्रति पैकी ५०० प्रति मला वाटता

आल्या. १५०० प्रति सरकारने जप्त करून जाळल्या ! ) अशारीतीने माझे नाव इंग्रजांच्या काळच्या यादीत होतेच. 'वैदिक प्रार्थनांची तेजस्विता' हा लेख प्रसिद्ध होताच त्या लेखात 'सेनाखासखेल, समशेरबहाद्दुर व गोब्राह्मण प्रतिपालक' या नावाचा उल्लेख असल्याने प्रथम बडोदेसरकार श्री सयाजीरावाना या लेखाकडे पहा, असे सांगण्यात आले. पण सयाजीरावाना माझा परिचय असल्याने त्यानी माझ्यावर खटला करण्याचे नाकारले. नंतर कोल्हापूर शाहूमहाराजाना मुंबई-सरकारने सांगितले.' त्यानी खटला भरला. पंडितजींचा खटल्यास पात्र झालला लेख हा :—

## × वैदिक प्रार्थनांची तेजस्विता

'**आ**पल्या शत्रूंनी आपणास दुःख दिले असता किंवा आपली हानि केली असता, त्याची सव्याज फेड न करता किंवा त्यांचा सूड न उगवता, न्यायाच्या दिवसाची वाट पहात, माशा मारीत स्वस्थ बसावे' असे काही नेभळे लोक प्रतिपादन करीत असतात ! व कित्येक लोकांची अशी समजूत आहे की, अशा तऱ्हेचा नेभळेपणा हा उच्च सद्गुण आहे ! ! पण अनुभवाने व वैदिक उपदेशाच्या जोरदारपणाने वरील विधाने माणुसकीला विघातक आहेत इतकेच नव्हे, तर ती धर्मापासून व आत्मोन्नती-पासून च्युत करणारी आहेत, असे म्हटल्याशिवाय राहवत नाही.

आपल्या दैदीप्यमान प्राचीन इतिहासाकडे थोडीशी जरी नजर फेकली, तरी आपणास वैदिक उपदेशाची तेजस्विता त्यात ओतप्रोत भरलेली दिसेल. स्वार्थी, अधार्मिक, नास्तिक व आततायी वेन राजाला मारतेवेळी त्या काळात ऋषीमहर्षींनी परमेश्वरावर न्याय करण्याचा भार टाकला नव्हता, तर तो त्यानी आपल्या हातात घेतला होता. स्वराज्याचा अपहार करणाऱ्या व पारतंत्र्याच्या घनघोर नरकात लोळण्यास लावणाऱ्या परस्वापहारक दुष्ट शत्रूंची दाणादाण करून, पुरुषार्थाने स्व-राज्यस्थापना करण्यासाठी आपल्या पुत्रास जोरदार उपदेश करणाऱ्या विदुलेने व तो इतिहास लिहिणाऱ्या व्यासानी जो वैदिक आदर्श आपल्या नेत्रापुढे ठेवला होता, तो '**उसने फेडूं नयेचि सोसावे**' या नेभळट व अधार्मिक समजुतीहून भिन्न होता.

---

×[ **विश्ववृत्त**— मार्च १९०८ ( समर्थ छापखाना कोल्हापूर ) वर्ष २ रे अंक ३ रा. पान १ ते १६ वर प्रसिद्ध झालेला व राजद्रोहाच्या खटल्यास कारणीभूत झालेला पंडितजी सातवळेकरांचा लेख. हा केसरीसंस्थेचे भूतपूर्व ग्रंथपाल, इतिहास—संशोधक, व दाते सूचिमंडळाचे प्रस्तुत प्रमुख श्री. दि. वि. काळे यांच्या सौजन्याने व त्यांचे सहाय्यक श्री शंकरराव बर्वे यांच्या सहाय्याने उपलब्ध झाला. त्याना कृतज्ञतेने धन्यवाद.—ग्रंथकार ]

' उद्यम, साहस, धैर्य, बल, बुद्धि व पराक्रम हे सहा अत्युच्च सद्गुण ज्याच्या अंगी असतील, त्याला अप्राप्य असे त्रिभुवनात काही नाही. ' असे दैववादी बनलेल्या रामचंद्राला जोरदार वाणीने उपदेश करून त्याला परमपुरुषार्थी बनवू इच्छिणाऱ्या वसिष्ठ महर्षींनी जे आत्मविश्वासाचे तत्त्व सर्व लोकांच्या उद्धारासाठी प्रतिपादिले आहे, ते लोकानी आपत्काळी ' उगीच बैसावे ' म्हणून नव्हे. श्रीकृष्ण भगवानाने सर्व वैदिक सिद्धांताचे सार काढून व उपनिषदांचे मंथन करून जें भगवद्गीतारूप नवनीत काढले व स्वराज्यभ्रष्टतेमध्ये आनंद मानून व अरण्यात जाऊन कंदमुळे, फळे खाऊन राहणाऱ्या अर्जुनाला ' आपल्या सापत्नांचा व त्याना मदत करणाऱ्या गुरूंचाहि निःपात कर, नेभळेपणा सोड व युद्धाची तयारी करून ऊठ ' इत्यादि जो उपदेश गीतेच्या द्वाराने केला, तो शत्रूनी दिलेला त्रास सोसावा म्हणून नव्हे; तर सर्वांनी आपल्या शत्रूची खोड मोडण्यास नेहमी सज्ज असावे म्हणूनच होय.

स्वसंरक्षण करावे, स्वावलंबी बनावे, आपला अपमान करून घेऊ नये, आपली उन्नति करून घेत असावे, या सर्व गोष्टींचा मनुष्याच्या सामान्य धर्मामध्ये समावेश होत असतो. ' सर्वतः आत्मानं गोपायीत । ' या श्रुतीमध्ये आत्मरक्षणाचे प्राधान्य वर्णिले आहे व त्या आधारानेच सर्व स्मृतिकार व धर्मशास्त्रकार यानी आततायीवधाला मुळीच दोष नाही व ज्याअर्थी त्या वधामध्ये दोषच नाही, त्याअर्थी आततायींचा वध करणाराला प्रायश्चित्त घेण्याची गरज नाही असे ठरविले आहे. पहा—

अग्निदो गरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहः ।
क्षेत्रदारापहारी च षडेते आततायिनः ॥ विष्णुस्मृति ॥
पिशुनं चैव राजसु ॥ कात्यायनः ॥
उद्यतानां तु पापानां हन्तुर्दोषो न विद्यते ॥ कात्यायनः ॥
शस्त्रं द्विजातिभिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुध्यते ॥ कात्यायनः ॥
आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन् ।
नाततायिवधे दोषो हन्तुर्भवति कश्चन ॥ मनु. ॥

' अग्नीने जाळणारा, विष पाजून मारणारा, शस्त्राने घात करणारा, धनाचे अपहरण करणारा, देशाचा अपहार करणारा, स्त्रियाना पळवणारा, राजाला चुगल्या सांगणारा हे सर्व आततायी होत. अशा प्रबळ होणाऱ्या पापिष्ठांना ठार मारलें असताहि काही दोष लागत नाही. याना प्रतिबंध करण्यास किंवा ठार मारण्यास जेव्हा क्षत्रिय, वैश्य सिद्ध नसतात, त्यावेळी ब्राह्मणानीहि हातात शस्त्र धरून धर्माचे रक्षण करावे. वरील प्रकारचे आततायी समोरून येताना दिसले असता काही विचार न करता त्याना ठार मारावे. त्यांच्या वधाने मारणाराला काही एक दोष लागत नाही.' इत्यादि भावार्थ वरील कात्यायन, विष्णु व मनु यांच्या स्मृतीच्या वचनांचा आहे.

तो पाहिला म्हणजे ‘ उसनें फेडू नयेचि सोसावें ’ या नेभळचा उपदेशापेक्षा अगदी उलट उपदेश त्यांनी सर्व लोकांना केलेला आढळतो. वरील वाक्यातील प्रत्येक अक्षरात तेजस्वीपणा खेळत असलेला विचारी माणसास आढळेल यात शंका नाही. यावरून आर्यांच्या प्राचीन इतिहासातील गोष्टी व स्मृतीचा उपदेश यांचे, शत्रूचे समूळ निर्दलन करण्याच्या कामी, पूर्ण ऐक्यमत्य आहे असे दिसते.

वेदामध्ये व ब्राह्मणग्रंथामध्ये शत्रूचा बीमोड करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या आज्ञा अनेक आहेत. पण आज त्या आज्ञांचे निरीक्षण करावयाचे नसून प्रार्थनांचे निरीक्षण करावयाचे आहे; ते एवढ्यासाठीच की, वैदिक प्रार्थनांचा एकंदर झोक कोणत्या बाजूला उपासकांची मनोवृत्ति नेत आहे ते वाचकाना समजावे व मनुष्यमात्राला त्या वैदिक आदर्शाप्रमाणे काम करण्यास उत्तेजन यावे. असो. आता आपण प्रथमतः सामान्य प्रार्थनेचा विचार करू—

आ ब्रह्मन् ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायताम् ।
आ राष्ट्रे राजन्यः शूर इषव्योऽतिव्याधी महारथो जायताम् ॥
दोग्ध्री धेनुर्वोढाऽनड्वानाशुः सप्तिः पुरन्धिर्योषा जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवाऽस्य यजमानस्य वीरो जायताम् ॥
निकामे-निकामे नः पर्जन्यो वर्षतु । फलवत्यो न ओषधयः पच्यन्ताम् । योगक्षेमो नः कल्पताम् ॥ ( यजु० २२।२२ )
भाष्यम्– नः राष्ट्रे इति सर्वत्र संबन्धः । नः राष्ट्रे अस्मद्देशे ॥

अर्थ– हे ब्रह्मन् ! हे परमात्मन् ! आमच्या राष्ट्रामध्ये ब्रह्मज्ञानी अर्थात् सर्वज्ञानसंपन्न ब्राह्मण होवोत; आमच्या देशातील क्षत्रिय अत्यंत पराक्रमी, शस्त्रास्त्रांनी लढणारे, अचुक नेम मारणारे व शत्रूच्या हजारो लोकाशी लढणारे ( महारथी ) वीर होवोत; आमच्या राष्ट्रात दूध देणाऱ्या गाई, सामान वाहून नेण्यास समर्थ असे बैल, वेगवान् घोड, व सर्वगुणसंपन्न स्त्रिया होवोत; युद्धाची इच्छा करणारे विजयी होवोत; यजमानाचा पुत्र ( सभेयः ) सभेमध्ये जाण्यास योग्य अर्थात् विद्वान व ( वीरः ) शूर निपजो; आमच्या देशात योग्य समयी पर्जन्यवृष्टि होवो; व त्यायोगाने सर्व औषधि–धान्यादिक उत्तम फलयुक्त होवोत; व आमच्या राष्ट्रामध्ये आमचा योगक्षेम उत्तम रीतीने होवो.

ही राष्ट्रीय प्रार्थना मनुष्यमात्राच्या व हरएक राष्ट्राच्या पूर्ण व उच्च उद्देशाची द्योतक आहे. मनुष्याच्या उन्नतीला कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, कोणत्या राष्ट्रीय सद्गुणानी राष्ट्राचे सौभाग्य वृद्धिगत होत असते ते सर्व या मंत्रात स्पष्टपणाने आलेले आहे. ज्ञान, शौर्य, वीर्य, धनधान्यादिक संपत्ति यांच्यावर राष्ट्रीय उत्कर्षाची मदार आहे. तेव्हा हे गुण आपल्या देशात पूर्णपणाने वृद्धिगत झाले पाहि-

जेत, ही प्रत्येक नागरिकाच्या मनातील जबरदस्त इच्छा या मंत्रात सुरेखरीतीने वर्णिली आहे. स्वावलंबनाला कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे, ह्याचे ज्ञान या मंत्रावरून होऊ शकते व या सद्‌गुणांचा कोणत्या कृतीमध्ये परिणाम झाला पाहिजे हे अथर्ववेदातील राष्ट्रगीतामध्ये ( पृथ्वीसूक्तात ) स्पष्टतया दिलेले आहे. पहा—

**यो नो द्वेषत् पृथिवि यः पृतन्याद् यो अभिदासान् मनसा यो वधेन ।**
**तं नो भूमे रन्धय पूर्वकृत्वरि ॥** ( अथर्व. १२।१।१४ )

**अर्थ–** हे आमच्या मातृभूमि ! जो आमचा द्वेष करीत असेल, जो आमच्यावर सैन्य पाठवून आमचा नाश करू इच्छील, जो आम्हाला गुलाम बनवीत असेल, जो मनाने व वधाने आम्हाला त्रास देण्याची खटपट करील त्याचा समूळ नाश कर.

मागच्या मंत्राची व या मंत्राची संगति लागली असता सर्व मनुष्यानी लक्षात ठेवण्याजोगा भावार्थ निघतो. मागील मंत्रात अशी प्रार्थना आहे की, ' आमच्या देशात विद्वान् ब्राह्मण; धैर्यवान्, शूर व तेजस्वी क्षत्रिय; उत्तम गाई; बैल, घोडे व शेती यानी युक्त असेलेले ( धनधान्यसंपन्न वैश्य ) होवोत. ' व या मंत्रात अशी इच्छा प्रदर्शित केली जात आहे की, ' आमचा द्वेष करणारे, आम्हावर सैन्याने हल्ला करणारे, आम्हाला गुलाम बनवणारे व मनाने आमचे अहित इच्छिणारे या सर्वांचा नाश होवो. ' प्रायः या दोन मंत्राची व्यवस्था पाहिली असता असे आढळेल की, पूर्वीच्या मंत्रातील पदानी जे सद्‌गुण आपल्या राष्ट्रात वाढवावे असे दर्शविले आहे, ते सद्‌गुण एवढ्यासाठीच वाढवावयाचे की, त्याच्यायोगाने या मंत्रात वर्णिले-ल्या शत्रूंचा नाश करता येईल. उघडच आहे की, ज्या विद्वानाला, आपल्या राष्ट्राचा होत असलेला शाब्दिक द्वेष शब्दशास्त्राच्यायोगाने व युक्तीने खंडिता येत नाही व सभांमध्ये व लेखामध्ये आपल्या राष्ट्राची उत्तमता स्थापित करता येत नाही, त्या विद्वानाचा राष्ट्राला काय उपयोग आहे ? तसेच जे क्षत्रिय शत्रूच्या सैन्याचा व दुनियेतील गुलामीचा बीमोड करीत नाहीत त्यांच्या छत्रपतित्वाचा व समशेर-बहाद्दरत्वाचा त्यांच्या राष्ट्राला काय उपयोग आहे ? व जे वैश्य अन्यदेशीय लोकां-च्या मनातील आपल्या राष्ट्राविषयीची स्पर्धा ओळखून त्या सर्वांच्या पुढे आपले घोडे घालीत नाहीत त्यांच्या घरी गाई, बैल, घोडे व धन–धान्य मुबलक व्हावे असे राष्ट्राची महत्त्वाकांक्षा वाढविणारे पुरुष का म्हणतील ? तात्पर्य, जे सद्‌गुण, आपल्या राष्ट्रात वाढावे अशी इच्छा परमेश्वरास या प्रेमळ भक्तानी आपल्या पहिल्या मंत्रात केली, त्या सद्‌गुणांचा उपयोग कोणत्या कार्यात झाला पाहिजे हे दुसऱ्या प्रार्थनेच्या मंत्राने दाखविले आहे.

ज्ञानाशिवाय क्षात्रतेज व्यर्थ आहे व क्षात्रतेजाशिवाय व तेजस्वितेशिवाय ज्ञान व्यर्थ आहे, हे इतिहासज्ञ लोक मानीत आहेत. एकाच मनुष्याला याप्रमाणे विचा-रशक्ति व बाहूंचे सामर्थ्य याची आवश्यकता आहे; दोहोंची जोडी असेल तेथेच

सौभाग्यवृद्धि निश्चयाने होईल; म्हणून या दोहोंची प्रार्थना एकसमयावच्छेदाने वेदात अनेक ठिकाणी केलेली असते, त्यापैकी एक दोन मंत्र—

**मदेम शतहिमाः सुवीराः ।** ( अथर्व. १९।१२।१ )
**तत् त्वा यामि सुवीर्यं तद् ब्रह्म पूर्वचित्तये ॥** ( अथर्व. २०।९।३ )
**भाष्यम्-यामि याचामि । पूर्वचित्तये अपूर्वप्रज्ञानाय ॥**

अर्थ– उत्तम वीरानी युक्त होऊन आम्ही शंभर वर्षेपर्यंत आनंदित व उन्नत व्हावे. ( हे परमेश्वरा ! ) तुझ्याजवळ प्रार्थना करतो की, ते ( सुवीर्य ) सतेज क्षात्रबळ व ते ओजस्वी ज्ञानबळ आमच्यात पूर्णत्वाने वसो.

या प्रार्थनामंत्रामध्ये ( १ ) विद्वत्व, ( २ ) क्षात्रत्व, ( ३ ) पूर्णायुत्व यांच्या प्राप्तीच्या प्रबल इच्छा दिसून येत आहेत. या तीन इच्छा जेथे प्रबल आहेत व तदनुरूप कार्ये जेथे घडत आहेत तो समाज जिवंत आहे असे म्हणण्यास काही हरकत नाही; पण जर कोठे ( १ ) गुलामीसाठी ज्ञानाचा व्यय, ( २ ) दास्यवृद्धीसाठी क्षात्रत्वाचा क्षय व ( ३ ) व्यसनामध्ये आयुष्याचा लय होत असेल तर तो समाज व्याधिग्रस्त झालेला आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. रुग्ण समाजामध्ये पुनः तेजस्विपणा आणण्यासाठी अनेक उपचार व अनेक पथ्ये रोगाच्या कमीअधिक तीव्रतेप्रमाणे योजून ज्ञान, क्षात्र व आयु याचा बहिःप्रवाह बंद करून त्याना अंतर्मुख करावे लागते. ज्यावेळी समाजातील हरएक व्यक्तीच्या मनात जरी न आला तथापि बऱ्याच व्यक्तीच्या मनात ' मी माझ्यासाठी नसून समाजासाठी, देशासाठी किंवा राष्ट्रासाठी आहे व माझे सर्व व्यवहार त्यासाठीच झाले पाहिजेत ' हा विचार जागृत झाला पाहिजे. या विचारानेच देशातील शक्तींची प्रवृत्ति अंतर्मुख होते. जितक्या अंतःकरणात ही शक्ति ज्या मानाने वाढेल त्या मानाने त्या राष्ट्रात जिवंतपणा येईल. ही विचारजागृति राष्ट्रात रहावी म्हणून प्रत्येक मनुष्याने कोणताही पदार्थ स्वीकारण्याच्या वेळी पुढील मंत्रातील भाव लक्षात ठेवावा—

**ऊर्जे त्वा बलाय त्वौजसे सहसे त्वा ।**
**अभिभूयाय त्वा राष्ट्रभृत्याय पर्यूहामि शतशारदाय ॥**
( अथर्व. १९।३७।३ )

**भाष्यम् - ऊर्जे अन्नाय । अभिभूयाय शत्रुजयाय ॥**

अर्थ– हे पदार्था ! तुला अन्न, बल, ओजस्विता, सहनशक्ति, शत्रूचे निर्दलन, राष्ट्राचे पोषण व शतायुषित्व इतक्या गुणासाठी स्वीकारतो.

हा मंत्र जरी पदार्थाला उद्देशून आहे, तथापि त्यातील भाव सहज समजण्यासारखा आहे. या मंत्रावरून अनेक बोध ध्यानात ठेवण्यासारखे आहेत. ( १ ) ज्या पदार्थाचा स्वीकार करावयाचा असेल तो अन्नरूप व बलवर्धक असला पाहिजे.

दारू, भांग, अफू, चरस, गांजा, तंबाखू, वारयोषिता इत्यादि अनेक पदार्थ–ज्यांचा राष्ट्राच्या अवनतीच्या काळी सार्वत्रिक प्रसार होतो ते–अन्नरूपही नसतात व बलोत्पादकहि नसतात; पण आपणाजवळील द्रव्यवीर्यादिकांचा वहिःप्रवाह करण्यास कारणीभूत होतात. असे पदार्थ वर्ज केले पाहिजेत व साहाय्यकारी पदार्थच घेतले पाहिजेत. ( २ ) ओजस्विता व सहनशक्ति राष्ट्रपोषणाला आवश्यक आहे. शीतोष्णादि द्वंद्वे सहन करण्याची शक्ति अंगी असलेला मनुष्यच ज्ञान व ओज यांच्यायोगाने जनसमाजाला उन्नत करू शकतो. यासाठी अशा गोष्टींचा संग्रह केला पाहिजे की ज्याच्यायोगाने ज्ञान, तेज व सहनशक्ति याची वाढ होईल. ( ३ ) उत्तम अन्न खाऊन लोक पुष्ट झाले, तालीम करून बलवान् बनले, पुस्तकें वाचून ज्ञानी झाले व अनेक प्रकारानी सहनशील बनले, ही व्यक्तिशः उन्नति झाली. पण व्यक्तीच्याच केवळ उन्नतीवर राष्ट्रोन्नति नाही. व्यक्तिव्यक्तीमध्ये ज्ञान, शौर्य, बळ व सहनशक्ति हे गुण असूनहि राष्ट्रे अवनत झालेली आपण इतिहासात पाहतो; याचे कारण इतकेच की या मंत्राच्या उत्तरार्धात वर्णिलेल्या दोन गुणांचा त्या व्यक्तीमध्ये अभाव असतो. म्हणून आपले राष्ट्र जिवंत व्हावे अशी इच्छा करणाऱ्यानी ' शत्रूचा नाश व स्वराष्ट्राचे पोषण ' करण्यासाठी पूर्वोक्त गुणांचा व्यय केला पाहिजे. असो. याप्रमाणे या मंत्रावर विचार केला असता अनेक गोष्टींचा बोध होण्यासारखा आहे. ' राष्ट्राच्या अवयवीभूत मनुष्यानी जे काही करावयाचे ते अन्न मिळावे, बल वाढावे, ज्ञान व तेज यांची वृद्धि व्हावी, सहनशक्ति अंगी यावी, शत्रूचा पराभव करून राष्ट्राला उन्नतीच्या शिखरावर नेवून पोचविता यावे व कोणीहि अल्पायु निपजू नयेत एवढ्यासाठीच होय. ' हा भाव वरील मंत्राचा स्पष्ट आहे. केवढा हा उदात्त उपदेश ! स्वहित व राष्ट्रहित यांची सांगड व व्यवस्था किती उत्तम रीतीने या मंत्रात वर्णिली आहे ते विचारी वाचक यावरून जाणतील. असे उदात्त व सनातन उन्नतीच्या तत्त्वानी भरलेले वेदमंत्र अनेक आहेत, पण केवळ पठणामध्येच त्यांचा उपयोग न होता त्यातील अर्थाची अम्मलबजावणी जेव्हा जारीने होईल तेव्हाच मनुष्यमात्राची उन्नति होऊ शकेल.

या मंत्रातील ' राष्ट्र–भृत्याय ' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. ' राष्ट्राच्या भृत्यत्वासाठी ( राष्ट्रभृत्याय त्वां पर्यूहामि । ) मी या पदार्थाचा स्वीकार करतो ' हा भावार्थ या शब्दात आहे. ' या पदार्थाचे सेवन करून माझी शक्ति व आयुष्य मी वाढवीन व माझ्या देशाच्या आमरण राष्ट्रसेवेमध्ये विनियोग करून मी राष्ट्रभृत्य ( देशसेवक ) बनेन. ' हा सरळ भाव वरील मंत्रात आहे. राष्ट्रीय ऐक्याची कल्पना, राष्ट्रसेवेची कल्पना, देशसेवेसाठीं आत्मार्पण करण्याची कल्पना आर्यांच्या वाङ्मयात नाही असे म्हणणाऱ्या पाश्चात्यानी व त्याना अनुसरणाऱ्या स्वकीय लेखकांनी वरील मंत्रात वर्णिलेली ' राष्ट्र–भृत्य 'त्वाची कल्पना डोळे उघडून पहावी. राष्ट्राशी आपला संबंध दृढ आहे, स्वहित राष्ट्रहितामध्ये विघात करणारे नसावे

वगैरे उच्च कल्पना वेदामध्ये सर्वत्र आहेत. वधूवराना उद्देशून जो उपदेशपर मंत्र म्हटला जातो तो पाहिला असता वरील म्हणण्याची पुष्टि होईल—

अभि वर्धतां पयसाऽभि राष्ट्रेण वर्धताम् ।
रय्या सहस्रवर्चसेमौ स्तामनुपक्षितौ ॥ ( अथर्व. ६।७८।२ )

अर्थ– ही वधूवरे दूध पिऊन पुष्ट होवोत, ती स्वराष्ट्रासह वृद्धिगत होवोत, ती अनेक प्रकारच्या संपत्तीनी युक्त होवून व तेजस्वी बनून कधीहि अवनत न होवोत.

मद्यप्राशनादि अनेक दुष्ट व्यसने कुटुंबात नसावी हे दाखविण्यासाठी ' स्त्री-पुरुषानी दूध पिऊन पुष्ट व्हावे ' असे मंत्रात म्हटले आहे. हा वैदिक उपदेश सर्व-काळी सर्व मनुष्यांच्या उन्नतीला सहाय्यकारी होणारा आहे. ' स्त्रीपुरुषानी राष्ट्रा-सह वाढावे ' या उपदेशामध्ये राष्ट्रोन्नति–विघातक असे कोणतेच कृत्य करू नये असे दाखविले आहे.

राष्ट्राच्या उन्नतीत आपली उन्नति समजावी असे ज्या वैदिककाळची स्त्रीपुरुषे मानीत होती व राष्ट्राचे स्वयंसेवक बनण्यासाठीच आपण अन्नादिकाचे ग्रहण करतो असे ज्या काळचे लोक मानीत होते, त्याकाळी राष्ट्रीयत्वाची कल्पना नव्हती, राष्ट्र-साठी म्हणून काही आपले विशिष्ट कर्तव्य आहे असे प्राचीनकाळचे लोक समजत नव्हते, आर्यांच्या सनातनधर्मामध्ये ' राष्ट्रीय–स्वयं–सेवका ' ची कल्पना नाही, असे काही विद्वानानी प्रतिपादन करून ' राष्ट्राभिमान, राष्ट्रसेवा ' या कल्पना परकीय आहेत असे स्वदेशीच्या युगातही भासवावे हे आश्चर्य आहे ! ! पहा—

उपस्थास्ते अनमीवा अयक्ष्मा अस्मभ्यं सन्तु पृथिविप्रसूताः ।
दीर्घं न आयुः प्रतिबुध्यमाना वयं तुभ्यं बलिहृतः स्याम ॥
( अथर्व. १२।१।६२ )

भावार्थ– हे पृथिवि ! ( हे माझ्या देशा ! )–तुझ्यापासून उत्पन्न झालेले आम्ही सर्व जन आरोग्यसंपन्न, क्षयादि रोगरहित व पूर्णायुषी होऊन तुझ्यासाठी आत्मसर्वस्वाचे बलिदान करणारे आहो.

अशा रीतीने प्राचीन आर्यलोक राष्ट्रभृत्य बनत असत, देशहितासाठी आत्म-समर्पण करीत असत, व आपल्या देहाचा बली देत असत. अशा राष्ट्रहितैकतत्पर लोकानी—

स मे राष्ट्रं च क्षत्रं च पशूनोजश्च मे दधत् ।
( अथर्व. १०।३।१२ )

' तो परमेश्वर आम्हाला राज्य, क्षात्रतेज, उत्तम ज्ञान, पशू वगैरे देवो ' अशी जर प्रार्थना केली, तर त्या प्रार्थनेचा अव्हेर परमेश्वर कधी तरी करील काय ?

आळशी व आत्मघातकी लोकांच्या प्रार्थनेला परमेश्वराजवळ मान नाही; पण उत्साही, उद्योगी, तेजस्वी लोक जेव्हा आपण कर्तव्य करून परमेश्वराची प्रार्थना करतात, तेव्हा ती त्यांची प्रार्थना तो तत्काळ पूर्ण करतो. असो. आतापर्यंत दिलेल्या मंत्रावरून वाचकांच्या लक्षात येईल की, राष्ट्रसेवेचे बाळकडू वैदिकधर्मात आहे; पण ते पेटाऱ्यात बांधून न ठेवता उगाळून घेतले पाहिजे, व तान्ह्या लेकरांना पाजले पाहिजे. आता प्रार्थनामंत्रात आलेल्या राष्ट्रभृत्याच्या इच्छा काय काय आहेत व काय काय असाव्या, ते पाहू—

**असमं क्षत्रमसमा मनीषा ।** ( ऋ. १।५४।८ )

'निःसीम शौर्य व अतुल बुद्धि' या दोहोंची इच्छा राष्ट्रसेवक करीत असतात. सामान्य मनुष्य आपल्या किंवा राष्ट्राच्या उत्कर्षासाठी पुष्कळ द्रव्याची इच्छा धरतात; कारण हे दोन गुण ज्या व्यक्तीत किंवा राष्ट्रात असतील तेथे लक्ष्मी आपोआप चालत येईल. यात तिळप्राय शंका नाही. अशा तऱ्हेने उत्साही 'राष्ट्र-भृत्य' शत्रुवर चाल करून जाण्याच्या वेळी काय म्हणत असतात ते पहा—

**उत्तिष्ठत सं नह्यध्वमुदाराः केतुभिः सह ।**
**सर्पा इतर जना रक्षांस्यमित्राननु धावत ॥**

( अथर्व. ११।१०।१ )

**अर्थ**– उठा, तयार व्हा, हे उदार लोक हो ! व इतर रक्षक जन हो ! आप-आपल्या ( **केतुभिः** ) पताकासह शत्रूवर चाल करा.

शत्रु आपल्या राष्ट्रावर आले असता व आपल्या मालमत्तेचे अपहरण करीत असता जे ख्यालीखुशालीमध्ये व चैनीमध्ये आपल्या वेळाचा, बुद्धीचा व पैशाचा अपव्यय करतात ते हीन होत; पण जे आपल्या तन–मन–धनाचा राष्ट्रकार्यात पाहिजे तेव्हा व्यय करण्यास तत्पर असतात ते 'उदार' होत. या उदार लोका-वरच राष्ट्राच्या वैभवाची स्थिति अवलंबून असते. अशा उदार लोकानी आपआपल्या राष्ट्रीय ध्वजपताकांसह आपल्या देशाच्या अमित्रांवर चाल करून त्यांचा फन्ना उडवावा, हा भाव या मंत्रात आहे. या मंत्रातील 'अमित्र' हा शब्द लक्षात बाळगिला पाहिजे. जो आपले हित करतो व आपला मान राखतो तो मित्र होय व जो आपलें अहित करतो व आपली अमान्यता करतो तो अमित्र होय. अशा आपले अहित व आपली हानि करणारावर चाल करून जाण्यास व राष्ट्रोद्धारा-साठी सर्व उदार राष्ट्रभृत्यानी आपल्या सर्वस्वाचा बलि अर्पण्यास सदा जागृत व तयार असले पाहिजे, हा भाव '**उत्तिष्ठत** ( उठा ) व **संनह्यध्वम्** ( उद्युक्त व्हा ) ' या दोन पदानी दाखविला आहे. असो. लढाईवर जाण्याच्या वेळी प्रोत्सा-हन देणारा पुढील मंत्र आहे—

**तेषां सर्वेषामीशाना उत्तिष्ठत संनह्यध्वं मित्रा देवजना यूयम् ।**
**इमं संग्रामं संजित्य यथालोकं वि तिष्ठध्वम् ॥** ( अथर्व. ११।१२।२६ )

अर्थ– हे आमच्या मित्रांनो ! तुम्ही प्रत्यक्ष देवजन आहात, व त्या सर्वांचे तुम्ही स्वामी आहात; तर उठा, तयार व्हा, व या युद्धामध्ये विजय मिळवून इष्ट लोकांची प्राप्ति करून घ्या.

या मंत्रामध्ये असे सांगितले आहे की, जे लोक पूर्वीच्या मंत्रात वर्णिल्याप्रमाणे राष्ट्रभृत्य–राष्ट्रीय स्वयंसेवक– असतात, तेच मित्र खरोखर ' देवजन ' होत. राष्ट्रावर आलेली आपत्ति नाहीशी करण्यासाठीं आपले बलिदान करणारे लोक खरोखर देवच होत यात शंका नाही. तसेच लढाईच्या वेळी हरएकाने आपआपले कर्तव्य बजावण हे इहलोक व परलोक या दोनही लोकांच्या प्राप्तीचें साधन आहे हेहि वरील मंत्रातील पदांनी स्पष्ट दाखविले आहे. या वैदिक उपदेशाला उद्देशूनच श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेमध्ये '**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।**' ' ( लढाईत मेलास तर स्वर्ग मिळेल व विजय मिळविलास तर पृथ्वीचे राज्य मिळेल )' असा उपदेश केला आहे. राष्ट्रोन्नतीसाठी आत्मार्पण करण्याने सर्व सुखाची द्वारे खुली होतात हे सर्वांनी लक्ष्यात ठेविलें पाहिजे. असो. धर्म हा अशा गोष्टीला नेहमीं प्रोत्साहन देत असतो. खऱ्या धर्माने मनुष्य कधीहि निराश व निरुत्साही होणार नाही. लढाईवर जाणाऱ्या लोकानी केवढी इच्छा आपल्या मनात धरली पाहिजे, हे पुढील मंत्रावरून समजेल—

**सहस्रकुणपा शेतामामित्री सेना समरे वधानाम् । विविद्धा ककजाकृता ॥**
( अथर्व. ११।१२।२५ )

**अर्थ–** ( आजच्या ) युद्धामध्ये ( आमच्याकडून ) वध पावलेले शत्रुसैन्यातील हजारो मुडदे, ( आमच्या शस्त्रास्त्रांच्या घातानीं ) छिन्नभिन्न झाल्यामुळे विद्रूप झालेलें, समरांगणावर पडोत.

शत्रुच्या सैन्याची पुरी दाणादाण करण्याची इच्छा प्रत्येक वीराने धरली पाहिजे हा भाव वरील मंत्राचा आहे. तसेच—

**उत्कसन्तु हृदयान्यूर्ध्वः प्राण उदीषतु ।**
**शौष्कास्यमनु वर्ततामामित्रान् मोत मित्रिणः ॥** ( अथर्व. ११।९।२१ )

अर्थ– ( आमच्या शस्त्रास्त्राच्या आघाताने ) शत्रूंची हृदये फाटोत व त्यांचे प्राण निघून जावोत. ( घायाळ होवून रक्तस्राव झाल्यामुळे ) त्यांच्या तोंडाला कोरड पडो. हे सर्व शत्रूला होवो व आमच्या हित करणारांना न होवो.

लढाईमध्ये किंवा अन्यप्रसंगी हरतऱ्हेने शत्रूला जर्जर करावे; पण जे शत्रू नसतील

त्यांच्या वाटेला जाऊ नये, इत्यादि बोध वरील मंत्रापासून निघू शकतो. शत्रूच्या नाशाची किती जबरदस्त इच्छा वेदमंत्रात आहे हे जर पहावयाचे असेल तर त्यानी पुढील मंत्र पहावा—

**ये रथिनो ये अरथा असादा ये च सादिनः ।**
**सर्वानदन्तु तान् हतान् गृध्राः श्येनाः पतत्रिणः ॥** ( अथर्व. ११।१०।२४ )

**अर्थ–** रथात बसलेल्या, रथाशिवाय येणाऱ्या, पायानी चालणाऱ्या व घोड्यावरून येणाऱ्या सर्व, ( आमच्याकडून ) मारल्या गेलेल्या शत्रूला गिधाड, श्येन वगैरे पक्षी खावोत.

वेदातील उपदेश नेहमीं जोरदार व वीरश्री उत्पन्न करणारा असतो. त्यात तेजस्वीपणा व ओजस्वीपणा ओतप्रोत भरलेला असतो. मनुष्यमात्राला ज्या ज्या कर्तव्याची स्मृति पाहिजे आहे ती ती वेदमंत्रानी स्वाध्याय करणाराला दाखविली आहे. आजच्या निबंधामध्ये वेदातील उपदेशपर मंत्रांचे आंदोलन विशेषतः करावयाचे नसून वैदिक प्रार्थनेमध्ये किती तेजस्विता आहे व उन्नति इच्छिणाऱ्या व्यक्तीने व राष्ट्राने त्यापासून काय शिकावे ते पहावयाचे होते. त्याचे थोडेसे दिग्दर्शन येथ केले आहे. यावरून विचारी वाचकास वैदिकधर्माच्या तेजस्वितेची कल्पना होईल. वैदिकधर्म हा ' शत्रूने एका गालावर मारले असता दुसरा गाल पुढे करावा, ' असला नेभळा उपदेश करींत नाही, किंवा ' मला दररोजची भाकर दे ' अशींहि परमेश्वराची प्रार्थना करण्यास सांगत नाही. आतताई माणसावर दया करू नका, ज्ञान, वीर्य व संपत्ति मिळवून आपला उत्कर्ष करून घ्या, आपल्या तनमनधनाचा राष्ट्रकार्याकडे व्यय करा, जनतेला पीडणाऱ्या सर्व शत्रूचा नाश केल्यानेच आपले कर्तव्य संपले असं समजू नका, तर ज्याप्रमाणें समाजाच्या व राष्ट्राच्या शत्रूचा नाश करावयाचा, हे मनुष्याचे कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें मनुष्यमात्राच्या शत्रुचा नाश करून सर्व मनुष्याना सुखाचा अनुभव घेण्यास लावणे हे तुमचे कर्तव्य आहे. ' **सर्वभूतहिते रतः** ' होणे हे मनुष्याचे कर्तव्य आहे असे वैदिकधर्म सांगत आहे. सर्व भूतांच्या हितामध्ये शत्रूचेहि हित करावे असे होईल, पण अविचारी माणसाशिवाय तसे कोणीहि म्हणणार नाही. ' **वारय अमित्रान् ।** ' लोकाचे अहित करणाऱ्यांचा नाश करून लोकाना सुखी करणे हे तत्त्व सर्व भूतांचे कल्याण करण्यामध्ये आहे व एवढ्यासाठीच दुष्टांचे निर्दलन करून सुष्टांचे पालन करणाऱ्या विभूतींचे माहात्म्य वर्णिले जाते.

या वैदिक उपदेशाला स्मरूनच श्रीरामचंद्राने रावणादि राक्षसांचा निःपात करून सज्जनांचे संरक्षण करण्याच्या वेळी जनतेच्या शत्रुभूत राक्षसांवर दया केली नाहीं. श्रीकृष्णाने लोकाना गांजणाऱ्या कंसाचा, कालियादिकांचा व दुर्योधनादि अन्यायी लोकांचा संहार करतेवेळी माघार घेतली नाही. याचे कारण वेदाच्या तेजस्वी उपदेशाचे स्मरण हेच होय. किंवा दुसऱ्या दृष्टीने पहावयाचे असल्यास शत्रूंचा लवकर

नाश करणे हेच त्यांच्यावर उपकार आहेत; कारण लोकाना गांजणाऱ्या, त्रास देणाऱ्या, मनुष्यमात्रांच्या शत्रूना जोपर्यंत जिवंत ठेवावे, तोपर्यंत ते लोकावर जुलूम करून आपल्या पातकांचे रांजण भरून ठेवीत जाणार; एवढ्यासाठीं त्यांच्या हातून जास्त पातके इतउत्तर होऊ नयेत व सज्जनाला त्यांच्याकडून पीडा होवू नये असे इच्छिणारांनीं जुलमी लोकाना अर्थात् 'अमित्रा' ला जगातून लवकर नाहीसे केले पाहिजे. हा त्या दुष्टावर परोपकारच आहे. जे लोक पुनर्जन्म मानीत नाहीत त्याना हा उपकार त्यांच्यावर कसा होतो हे समजणार नाही; पण पुनर्जन्मवाद्याना ही अमित्रावर उपकार करण्याची पद्धति समजण्यास कठीण पडणार नाही. मनुष्य मात्रावर–शत्रूवर व मित्रावर उपकार करण्याची हीच रीति आहे. या रीतीच्यायोगाने सर्वांचे हित होते. हे हित मनुष्यानीं साधावे हा वेदाचा उद्देश आहे. जे मनुष्य अमित्रांचा नाश करून व मान्यांचा संभाळ करून आपले कर्तव्य करतील ते इहपरलोकी उच्च गति मिळवितील यात शंका नाही. परमेश्वर ही तेजस्वी बुद्धि सर्वांच्या अंतःकरणात प्रदीप्त करो व त्यायोगें सर्वांच्या केंद्रीभूत प्रयत्नानी व्यक्तीचे किंवा राष्ट्राचेच नव्हे तर सर्व संसारातील दुःख दूर होवो.

*

: ९ :

# डोंगर पोखरून उंदीर ?

सशस्त्रक्रांतिने स्वराज्य मिळवू पाहणारा कोल्हापूरचा शिवाजी क्लब हणमंतराव कुलकर्णी नेपाळात गेल्यावर गारठला, तरी एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी नाशकास अभिनव भारतसंस्थेचा जन्म झाल्यापासून, व विशेषत: रूसोजपानी युद्धात जपानने विजय मिळवल्यापासून भारताचे राजकारण तेजाळलेच. युरोपियन राष्ट्रावर जय मिळविणाऱ्या जपानचे जाहीर अभिनंदन लोकमान्यानी केले व भारतीय लोकशाही स्वातंत्र्यासाठी स्वराज्याची चतु:सूत्री जाहीर केली. तिला कलकत्त्याच्या ( १९०६ ) काँग्रेसमध्ये दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखाली राष्ट्राची मान्यता मिळाली. आदलेच वर्षी काशीच्या काँग्रेसचे अध्यक्षपदावरून ना. गोखले यानी 'माझ्या देशबांधवांच्या आकांक्षाना मी मर्यादाच मानीत नाही' असे जाहीर केले होते. त्यापुढे १९०७ च्या स्टुटगार्ड परिषदेत मॅडम कामा बाईनी स्वतंत्र हिंदुस्थानचा एक ध्वजही जगास सादर केला होता. शक्य तर सशस्त्र बंड उभारूनही राष्ट्राचे स्वातंत्र्य मिळवण्याचा हक्क कोणत्याही राष्ट्रास असतो, हे जाणून १९०५ साली रशियनकॉन्सलची भेट घेण्याच्या मिषाने स्वदेशी माल उत्पादन करण्यास यंत्रांची चौकशी करता करता, लोकमान्यानी बडोद्याच्या माधवराव जाधव या तरुणाला लष्करसंचालनाचे शिक्षण मिळण्याची व्यवस्था स्वित्सलँडमध्ये केली होती. या सर्व घटनानी इंग्रजसरकारास स्वस्थता नव्हती. मग कोल्हापूरसारख्या राजनिष्ठ संस्थानात ती कोठून ?

संस्थानातील लोकशाहीचा लढा या आपल्या पुस्तकात श्री विश्वनाथ अनंत तथा शासाहेब पटवर्धन यानी म्हटले आहे की– 'सन १९०८ व १९०९ या दोन वर्षात कोल्हापूरमध्ये आकस्मिकपणे राजद्रोहाचे व बाँबप्रकरणाचे पीक आल्याचा बोभाटा शाहु छत्रपति व त्यांचे हस्तक यानी अँग्लोइंडियन पत्रांच्या मदतीने विलायतेत उघडपणे केला व त्यानिमित्ताने आपल्या राजनिष्ठेचे फायदेशीर प्रदर्शन करून

कोल्हापूर संस्थानातील सनदशीर राजकीय चळवळ चालविणाऱ्या व निरुपद्रवी असे सात्विकवृत्तीच्या शिक्षणाचे किंवा उद्योगधंद्यांचे उत्तेजनार्ह कार्य करणाऱ्या भल्या भल्या नागरीकावर राजद्रोहाचे आणि अत्याचार–प्रवर्तनाचे खटले भरले, व त्याना दीर्घ मुदतीच्या सक्तमजुरीच्या कठोर शिक्षा देववून त्याना जगातून उठविण्याची शिकस्त केली; ज्यांच्यावर मनाजोगती सूडबुद्धीची निष्ठुर शिक्षा ठोठावण्यासारखा पुरावा मिळू शकला नाही, त्या सन्मान्य, निरपराधी नागरिकाना उघड वा गुप्त फर्मानानी करवीर इलाख्याबाहेर हद्‌पार करून टाकण्यात आले ! यावेळी विश्ववृत्त मासिकावर राजद्रोहाचा खटला भरून ' कचाट्यात धरण्यात आले.

हरिद्वारहून विश्ववृत्तावरील खटल्यासाठी दक्षिणेत येताना वाटेत पंडितजी आपल्या इष्टमित्राना व वकीलाना भेटले. त्या सर्वानीच त्याना जणु संगनमत केल्यासारखा सल्ला दिला की पंडितजीनी आपण होऊन स्वता सरकारच्या पिंजऱ्यात जाऊ नये. ज्याच्या पोटात दुखते तो ओवा हुडकतो. सरकारी बकासुराला पंडितजी हवे असतील तर त्या बकासुराच्या वॉरंटाचे हात काही आखूड नाहीत ! संकटाला डरू नये, तोंडच द्यावे; पण आपण होऊन ते ओढवून कशासाठी घ्यावयाचे ? राजकारणात आणि राजदरबारात वावरणाऱ्या वकीलमंडळींचा असा सल्ला पडत गेल्याप्रमाणे, पंडितजींचे मनही मग द्विधा होऊ लागले. आपल्या लेखाच्या मुद्रकप्रकाशकाना पकडले असता, आपल्या लेखामुळे त्यांच्यावर आलेली तोहमत उघडच्या डोळयानी पहात व आपली कातडी बचावीत राहणे कितपत योग्य, याचा निर्णय त्यांच्या गनिमीकाव्याशी परिचित नसलेल्या मनाकडून होईना. तेव्हा थेट कोल्हापुरास एकदम न जाता, बेळगावास आपले सुहृद मोरोपंत मराठे यांचा सल्ला शेवटी ऐकण्याचे त्यानी ठरविले.

' वैदिक प्रार्थनेची तेजस्विता ' या लेखात अथर्ववेदातील मातृभूमि सूक्ताचे विवेचन करण्यात आले होते. ते असे—

**यो नो द्वेषत् पृथिवि यः पृतन्याद्योऽभिदासान्मनसा यो वधेन तं नो भूमे रन्धय पूर्वकृत्वरि ॥**

अर्थात् ' हे आमच्या मातृभूमे, जे आमचा द्वेष करतात, आमचे ज शत्रु स्वताच्या सैन्यासह आमच्यावर स्वारी करून आम्हास जिंकू इच्छितात, जे आमचा नाश व्हावा म्हणून टपून बसले आहेत, ज आम्हांस परतंत्र आणि गुलाम बनवू इच्छितात, जे मनानेसुद्धा आमचे अनिष्ट इच्छितात, त्या आमच्या सर्व शत्रूंचा पूर्णपणे नाश कर. ' यापुढे या लेखात ' समशेर बहाद्दरांचा व सेनाखासखेलांचा काय उपयोग ? ' असे वाक्य होते.

त्याचा दुरुपयोग करून इंग्रजांनी आपल्याला नको असलेल्या लोकांचा काटा काढण्याचे ठरविले. विसाव्या शतकाचे पहिले दशक हा पारतंत्र्याचा काळ असा होता की स्वातंत्र्याच्या वृत्तीला सूचकतेनेही पोषक अशा तेजस्वी विचारांचा स्पर्श लोकांच्या मनास होऊ द्यावयाचा नाही, अशी जेते व त्यांचे हस्तक यांची जिद्द होती. सुमारे एक तपभर त्या जिद्दीला खवखव होती. सन १८९४।९५ च्या सुमारास

क्रिकेटपटु लॉर्ड हॅरिस यांची कारकीर्द मुंबई इलाख्यात गाजली. १८९३ पासून राजकीय चळवळीला उत्स्फूर्त स्वरूप येऊ लागले होते. १८९५ साली लॉर्ड 'हॅरिसांची आरती' होताना, मुंबई युनिव्हर्सिटीचा पदवीदान समारंभ दुहेरी झाला. त्यामुळे विद्यार्थ्यांत बरीच खळबळ उडाली. वातावरण बरेच दुमदुमले. बराचसा छात्रवर्ग १२ फेब्रुवारीच्या पदवीदानसमारंभास हजर न राहता, दुसऱ्या म्हणजे १९ फेब्रुवारीच्या समारंभास हजर राहिला. त्यात प्रा. शिवराम महादेव परांजपे, विष्णु गोविंद तथा अण्णासाहेब विजापूरकर होते. त्यामुळे त्या दोघावर सरकारी परकीय सत्तेचा रोष सुरू झाला. एकदा दावाग्नि पेटल्यावर ओले-वाळले, कुजके-तजेले सर्वांचीच राख होते. विश्ववृत्तातील पंडितजींचा लेख म्हणजे परकीय सत्तेला शिकारीचीच संधि वाटली. तिने किरण साधले. पंडितजी सातवळेकरानीच नमूद केले आहे की–

'कोल्हापूरकरांच्या डोळ्यात प्रो. विजापूरकर सलत होते. त्यांला दाबून टाकण्यासाठी कोल्हापूरकर खटला भरण्यास तयार झाले व प्रो. विजापूरकर; ( मुद्रक विनायक नारायण ) जोशीराव, प्रो. ( वामन मल्हार ) जोशी व मी अशा चौघांवर वारंटे निघाली. पहिले तिघे स्वतः हजर झाले व त्यांच्यावर खटला भरला. किंकेडसाहेबाला मुद्दाम बाहेरून जज्ज म्हणून बोलावण्यात आले व खटला सुरू झाला.

'गुरुकुलात जाऊन मला ५।६ महिनेही झाले नव्हते. इतक्यात या लेखाने माझ्यावर वारंट सुटले हे पाहून गुरुकुलाच्या व्यवस्थापकाना बरे वाटले नाही. मी हजर होण्याच्या इच्छेने निघालो व निघताना पुनः एक लेख लिहिला त्यात कोल्हापूरकराना शंखासुर म्हणून त्यांचा उपहास केला होता व मी स्वतः हजर होत आहे असे लिहिले होते. हा लेख इंदुप्रकाश या ( यन्देशेटजींच्या मुंबई येथील ) दैनिकात छापल्यामुळे तो वाचून कोल्हापुरकराना फारच क्रोध चढला व तसे होणे स्वाभाविकही होते. अशा वेळी असा लेख लिहिणे हे योग्यही नव्हते. पण तारुण्याचा उन्माद असतो व असे करवतो. मी फरारी असल्याचा मुंबईसरकारचा दावा होता.

'हरिद्वारहून निघालो तो अहमदनगर, पुणे व बेळगाव येथील माझ्या स्नेह्यास भेटलो व हजर होण्यास कोल्हापुरास जात आहे असे सांगितले. सर्व स्नेह्यानी, वकिलानी व इतर सज्जनानी–स्वता हजर होऊ नये, आपले काम करीत रहावे, पकडतील तेव्हा पकडू देत ! – अशी संमति दिली. त्याप्रमाणे मी कोल्हापुरास न जाता बेळगावजवळ अनगोळ या गावी मराठे या नावाच्या एका श्रीमंत जमीनदारांच्या येथे राहिलो. बेळगावास मोरोपंत मराठे या नावाचे माझे एक स्नेही वकील होते. त्यांच्या सल्ल्याने पुढे काय करावे ते वेळ प्रसंग पाहून ठरवावे असे यावेळी ठरले.'

कुरुंदवाड धाकट्या पातीच्या हुकमतीखालचे हंगिरगे गावात पंडितजी अनगोळ

गावचे श्री मराठे यांच्या घरी ' श्रीदास ' या नावाने रहात. त्यांचेवर ब्रिटिश सरकारचे धरणे होते. ब्रिटिशसरकारने कुरुंदवाड संस्थानमार्फत पंडितजीना धरण्याची तयारी केल्याची कुणकुण कानी येताच, पंडितजी शेजारचे शेजारीच कुरुंदवाड थोरल्यापातीचे गाव आहे तेथे जात. अशा प्रकारे बरेच दिवस पंडितजीनी राज्यकर्त्यांना झुलविले. बेळगावच्या परिसरात तीनचार संस्थानांच्या सरहद्दी; त्या त्याना बऱ्या सोईच्या होत्या. परकीय सत्तेच्या हालचाली आपणास कळाव्या, आपल्या हालचाली परकीय सत्तेला कळल्या तरी आपणावर बेसावधपणे पकडले जाण्याचा प्रसंग येऊ नये आणि सामनेवाल्याला हुलकावणी देऊन सुरपाटी फोडावी, हा गनिमी काव्याचा पेच पंडितजी खेळत होते. तो यावेळी कल्पनेच्या पलिकडें यशस्वी झाला; आणि जरूरच पडली तर नव्या काळाला साजेसा शिवाजीचा गनिमी कावा आपण नव्याने लढवू असा आत्मविश्वास आला. पंडितजी मग सांगतात—

' प्रो. विजापूरकरांचा खटला चालू झाला व त्याना ३. वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा होण्यास ६ महिने लागले. तोपर्यंत मी अनगोळासच होतो. या मुदतीत मी श्रीमद् भागवत, महाभारत व वाल्मीकि रामायण ही अभ्यासली व ज्ञानप्रकाशात काही लेखही प्रसिद्ध केले.

' प्रो. विजापूरकरांच्या खटल्याचा निकाल झाल्यावर काय करावयाचे हा प्रश्न उत्पन्न झाला. मुंबई, पुणे व हैदराबादला जाणे व राहणे अशक्य होते. गुरुकुलात जाऊन राहणेही अशक्य होते. यासाठी मद्रासच्या बाजूला जावे असे ठरविले व गोदावरी जिल्ह्यातील पिठापूरम् या गावी गेलो. हे गाव कोकोनाडाहून ६ मैलावर आहे. ( तेथे ) जाऊन पीठापुरंच्या महाराजाना भेटलो. त्याना माझे चित्रकलेचे नमुने दाखवले. ते त्याना पसंत पडले व त्यानी वडिलांच्या तैलचित्राचे वगैरे बरेच काम दिले. नॉर्दर्न सरकार्स म्हणून जो प्रांत आहे तोच हा प्रांत होय. येथें फारच श्रीमंत राजे आहेत, पण यास शासनाधिकार मुळीच नाही. राजधानीमध्ये सुद्धा यास कोणी विचारीत नाही. पण एकएकाचे उत्पन्न १०।२० लाख रु. वर्षाला असते ! यामुळे हा प्रांत चित्रकारांना चांगला, असे वाटल्यावरून यापुढे येथेच रहावे असे ठरविले. पहिल्याच वर्षात पिठापुरंच्या राजेसाहेबानी सुमारे ५।६ हजार रु. चे चित्रकाम दिले. ते करून पैसे घेतले व जेव्हा हिशोब केला तेव्हा समजले की गेल्या दोन वर्षात जे कर्ज झाले होते, ते फिटून फक्त ३०० रु. च माझ्याजवळ शिल्लक राहिले !

' यावेळी गुरुकुलात जावे असे पुनः मनात आले. यामुळे या प्रदेशात बस्तान बसत असताही येथे पुनः यावे असे ठरवून मी कलकत्त्यावरून गुरुकुलात गेलो. स्वामी श्रद्धानंदाना भेटलो. सर्वांना आनंद झाला.

' पण येथील पत्रे वाटणारा पोस्टमन् हा सरकारी हेर होता. त्याने मी आल्याची बातमी कलेक्टरला दिली व त्याचे पकड–वारंट घेऊन ३०० शिपाई, १० घोडेस्वार

व ५० बंदुकवाले पोलिस असे आले व चारही बाजूनी त्यानी गुरुकुलाला वेढले. स्टेशनच्या रस्त्यावर स्टेशनपर्यंत पोलिस ठेवले. दुपारी एक वाजण्याच्या सुमारास सर्व वेढा पूर्ण करून त्यांचा मुख्य घोडेस्वार गुरुकुलात आला व 'पंडितजीना स्वाधीन करा' असे गुरुकुलाच्या चालकाना त्याने सांगितले. हे सर्व इतक्या त्वरेने झाले की सर्वांनाच याचे आश्चर्य वाटले. मी आल्यापासून ४८ तासातच ही घाड आली. इतकी इंग्रजाची सूत्रे झटपट फिरत असत! गुरुकुलावरही सरकारचा रोष होताच.

पहा—

'गुरुकुलका सरकारसे बिलकुल स्वतंत्र होना ही उसके सन्देहके लिये पर्याप्त था। आर्यसमाज पर राजद्रोही होनेका जो सन्देह था, उससे भी गुरुकुलके सम्बन्धमे इस सन्देहको विशेष पुष्टि मिली। उस सन्देहकी उत्पत्तिके इतिहासमें न जाकर यहाँ एक गुप्त सरकारी लेखकी पंक्तियाँ इसलिये दी जाती है, जिससे उस सन्देहका रूप पाठकोंके सामने आ जाय।—'आर्यसमाजके संगठनमे अभी तो महत्त्वपूर्ण विकास हुआ है। वह वास्तवमे सरकारके लिये बहुत बडे संकटका स्रोत है। वह विकास है गुरुकुल–शिक्षा–प्रणाली। इस प्रांतमे आर्यसमाजकी धर्मके रूपमे आलोचना करते हुए भी उसकी ओर निर्देश करना आवश्यक है। इस प्रणालीमे चाहे कितनेही दोष क्यों न हों, किंतु भक्तिभाव और बलिदान भी उच्च भावसे प्रेरित जोरीले धर्मपरायण व्यक्तियोंका दल तैय्यार करनेका यह सबसे सुगम और उपयुक्त साधन है, क्योंकि यहाँ आठ बरसकी ही आयुमे बालकोंको मातापिताके प्रभावसे भी बिलकुल दूर रखकर त्याग, तपस्या और भक्तिभावके वायुमंडलमे उनके जीवनको कुछ निश्चित सिद्धान्तोंके अनुसार ढाला जाता है, जिससे उनके रगरगमे श्रद्धा और आत्मोसर्गकी भावना घर कर जाती है। यदि इस प्रकारकी शिक्षाका क्रम आर्यसमाजके सुयोग्य और उत्साही नेताओंकी सीधी देखरेखमे बालकोंकी उस सत्रह वर्षकी आयु–तक बराबर जारी रहा, जो कि मनुष्यके जीवनमे सबसे अधिक प्रभावशाली समय है, तो इस पद्धतिसे जो युवक तयार होंगे, वे सरकारके लिये अत्यंत भयानक होंगे। उनमे वह शक्ति होगी, जो इस समयके आर्यसमाजी उपदेशकोंमे नहीं है। उनमे पैदा हुआ व्यक्तिगत दृढविश्वास और अपने सिद्धान्तके लिये कष्ट सहन करनेकी भावना, अपितु समय आने पर प्राणोंतकको न्यौछावर कर देना, साधारण जनतापर बहुत गहरा प्रभाव डालेगा। इससे उनको अनायास ही ऐसे अनगिनत साथी मिल जायेंगे, जो उनके मार्गका अवलम्बन करेंगे और उनसे भी अधिक उत्साहसे काम करेंगे। वह याद रखना चाहिये कि उनका उद्देश्य सारे भारतमे एक ऐसे जातिधर्मकी स्थापना करना होगा, जिससे सारे हिंदु एक भ्रातृभावकी शृंखलामे बंध जायेंगे। वे सब दयानन्दके सत्यार्थप्रकाशके ग्यारहवे समुल्लासकी इस आज्ञाका पालन करेंगे कि श्रद्धा और प्रेमसे अपने तन–मन–धन सर्वस्वको देशहितके लिये अर्पण कर दो।'

या सरकारी लेखातच गुरुकुल कांगडीचा संबंध पुढे असा दाखविला आहे—

' सरकारके लिये सबसे अधिक विचारणीय प्रश्न यह है कि इस समय आर्य-समाजके गुरुकुलमे शिक्षा प्राप्त करनेवाले उपदेशकोंका शिक्षा समाप्त करनेके बाद सरकारके प्रति क्या रुख होगा ? इस समय उपदेशकोंकी अपेक्षा वे किसी और ढांचेमे ढले हुए होंगे। जिस धर्मका वे प्रचार करेंगे, उसका आधार व्यक्तिगत विश्वास एवं श्रद्धा होगी, जिसका जनतापर सहजमे बहुत प्रभाव पडेगा। उनके प्रचारमे मक्कारी, सन्देह, समझौता, और भयकी गंध भी न होगी और सर्वसाधारणके हृदयपर उसका सीधा असर पडेगा। पंजाबकी पुलिसकी रिपोर्टोंमे यह दर्ज है कि सन् १८९९ मे जब लाला मुन्शीराम अमृतसरके पंडित रामभजदत्तके साथ गुजरात, सियालकोट और गुजरांवालाका दौरा करते हुए धनसंग्रह कर रहे थे, तब उन्होंने सरकारकी निन्दा शरारतसे भरे हुए शब्दोंमे अन्य बातोंके साथ यह कहते हुए की थी कि सिपाही कितने मूर्ख हैं जो सत्रह–अठारह रुपयोंपर भरती होकर अपना सिर कटवाते हैं। गुरुकुलमे शिक्षित होनेके बाद ऐसा करनेवाले आदमी सरकारको नही मिलेंगे। कांगडीमे मनाये जानेवाले गुरुकुलके वार्षिकोत्सवपर कोई साठसत्तर हजार आदमी प्रतिवर्ष इकट्ठा होते हैं। कई दिनोंतक यह उत्सव होता है। पुलिस, स्वास्थ्यरक्षा आदिका सब प्रबंध गुरुकुलके अधिकारी स्वयं करते हैं। बंगालमे मेलोंपर जिस प्रकार स्वयंसेवक सब प्रबंध करते हैं, वैसे ही यहाँ ब्रह्मचारी स्वयंसेवकोंका सब काम करते हैं। संग-ठनकी दृष्टिसे यह काम बिलकुल त्रुटिरहित है। उत्सवपर इकट्ठा होनेवाले लोगोंका उत्साह भी आश्चर्यजनक होता है। बडी बडी रकमें दानमे दी जाती हैं और अच्छी संख्यामे उपस्थित होनेवाली स्त्रियां आभूषणतक देती हैं। विचारणीय विषय यह है कि गुरुकुलसे निकले हुए इन संन्यासियोंका राजनीतिके साथ क्या संबंध रहेगा ? इस संबंधमे गुरुकुलकी, महाशय रामदेवकी लिखी हुई, एक रिपोर्टकी भूमिका बडी रोचक है। उसके अन्तमे लिखा है कि गुरुकुलमे दी जानेवाली शिक्षा सर्वांशमे राष्ट्रीय है। आर्यसमाजियोंका बायबिल ' सत्यार्थप्रकाश ' है। जो देशभक्तिके भावोंसे ओत-प्रोत है। गुरुकुलमे इतिहास इस प्रकार पढाया जाता है, जिससे ब्रह्मचारियोंमे देश-भक्ति की भावना उद्दीप्त हो। उनमे उपदेश और उदाहरण दोनोंसे देशके लिये उत्कट प्रेम पैदा किया जाता है। इसमे कुछ भी सन्देह नही कि गुरुकुलमे यत्नपूर्वक एसे राजनीतिके संन्यासियोंका दल तैयार किया जा रहा है, जिसका मिशन सरकारके अस्तित्वके लिये भयानक संकट पैदा कर देगा। गुरुकुलकी दीवारोंपर ऐसे चित्र लगे हुए है, जिनमे अंगरेजी राजसे पहलेकी भारतकी अवस्था दिखाई गई है। लखनऊके सन १८५७ के राजविद्रोहके चित्र भी लगाये गये है। बिजनौरके डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. एफ्. फोर्डने जोन ऑफ् आर्कका भी वह बडा चित्र गुरुकुलमे लगा हुआ देखा था, जिसमे वह अंगरेजोंके विरुद्ध सेनाका संचालन कर रही हैं।'

( स्वामी श्रद्धानंद— लेखक **सत्यदेव विद्यालंकार** पृ. ३४१ ते ३४६ ).

गुरुकुलावरील रोषाचे हे स्वरूप लक्ष्यात घेऊन, पंडितजी काय म्हणतात ते पाहू या—

' गुरुकुलाचे सर्वच विद्यार्थी तरुण, सशस्त्र व राष्ट्रीय वृत्तीचे होते. त्यानी सांगितले की, ' हम पंडितजीको नही देंगे। ' हे खाली चालले होते. मी वर विश्रांति घेत होतो. तेथून पोलीस, घोडेस्वार वगैरे मी पाहिले. इतक्यात माझ्या तपासासाठी ही सरकारची तयारी आहे हे मला समजून आले. मी गुरुकुलाच्या ब्रह्मचाऱ्यांना सांगितले की, ' मी पोलिसांच्या स्वाधीन होतो. यासाठी तुम्ही कोणी काही एक पोलिसाना प्रतिबंध करू नये. ' त्यानी माझे ऐकले व मी पोलिसांच्या स्वाधीन झालो. लगेच पोलिसानी हातात हातकड्या व दंडास दोऱ्या बांधून मला कलेक्टरच्या कचेरीत नेले. माझ्यावर खून करणे व राजद्रोह करणे असे दोन आरोप होते म्हणून मला पोलिसठाण्यात रात्रभर ठेवून बिजनोरच्या तुरुंगात दुसऱ्या दिवशी नेले व तेथे बेड्या ठोकून ठेवण्यात आले.

' बिजनोरचा जेल फारच मोठा होता. ५।६ शे कैदी तेथे होते असे स्मरते. खुनाच्या कैद्यात आमची वस्ती झाली. रात्रौ आठ वाजता सर्वांची गणती होई व सर्वांच्या पायबेड्यातून एक मोठा साखळदंड ओवण्यात येई व तो दोहीकडे मोठी कुलपे लावून पक्का करण्यात येई. दरएक साखळदंडास ३०।३० कैदी असे रात्रभर बांधून ठेवले जात. लघ्वी, शौच झाले तर त्यासाठी तेथें परळ असत. दर तीन तासानी सर्व कैद्यांची मोजदाद होत असे व रात्रौ दीड वाजता सर्वास उभे करून मोजणी होई. इतका कडेकोट बंदोबस्त असताही लोखंडी बेंडी तोडून, खिडक्यांचे गज ओढून, भितीवरून उड्या टाकून कैदी पळून जात. अशा धाडसी लोकात मला एक महिना रहावे लागले.

' कोल्हापुरातून ओळखणारा आला. त्याने ओळखले व माझी रवानगी कोल्हापुरास झाली. जाताना पायबेडी काढली. पण कोल्हापुरास जाईपर्यंत हात-बेडी व दंडास दोऱ्या होत्या. त्यांचे प्रदर्शन प्रत्येक मोठ्या स्टेशनवर होई. हा वेळ असा होता की अशा राजद्रोही कैद्याचा चहूकडे सन्मानच होत असे. आम्ही बिजनोरहून निघालो ते आग्र्यावरून कल्याणपर्यंत येईपर्यंत बहुधा प्रत्येक स्टेशन-वर दूध, फळे, मिठाई आम्हाला लोक आणून देत व कोणी तरी येऊन विचारपूस करीत असे. गुरुकुलात पकडलेला राजद्रोहाचा कैदी ह्यावेळी सन्मानाचा विषय होता. कोणी तरी पुढील स्टेशनवर तार करी व पुढील स्टेशनवर कोणी तरी येत असे व तेथे सन्मान होत असे. आमच्याबरोबर तीन पोलिस होते. त्याना हा सन्मान पाहून फारच आश्चर्य वाटे ! पण त्यानाहि हे ( सत्काराचे ) पदार्थ फुकट खावयास मिळत, यामुळे तेही आनंदात असत.

' बिजनोरच्या तुरुंगात एक महिना काढावा लागला. यावेळीही तेथील कोणी सज्जनाने माझ्यासाठी काही रक्कम देऊन मला रोज रात्रौ उत्तम दूध पिण्यासाठी

मिळावे अशी व्यवस्था केली होती. यामुळे अन्नाच्या संबंधाने तेथे मला फारसा त्रास झाला नाही व तेथे माझी कामे इतर कैदी स्वेच्छेने करीत व मी ' पंडित ' आहे, यामुळे मला सुख व्हावे अशासाठी ते सर्व कैदी प्रयत्न करीत असत.

' रेल्वेचा प्रवास करीत कल्याणवरून आम्ही पुण्यास आलो व मिरजेच्या गाडीत बसलो. तेथे या पंजाबी पोलिसांची भाषा कोणास समजेना. मला बोलण्याची मनाई होती. तेथे पुण्याच्या कालेजातील तरुण विद्यार्थी आले व मी ज्या कम्पार्टमेंटमध्ये बसलो होतो, तेथे ते बसू लागले. पोलिसानी त्यास मनाई केली. अशात जी बोलाचाली झाली, त्यात पोलीस व विद्यार्थी यात कुस्ती झाली व विद्यार्थ्याने पोलिसाला गळचाला धरून, गचांडी देऊन खाली पाडले. गर्दी जमली. स्टेशनचे अधिकारी आले. तेव्हा त्यास मी सांगितले की,' मी कैदी आहे. हे आरक्षक आहेत. याचा विचार करून काय ते करा. ' एवढयावर हे भांडण मिटले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही कोल्हापुरास पोचलो व माझी स्थापना फौजदार–कचेरीत झाली. बेडया, हातकडया, दंडाच्या दोऱ्या हे सर्व येथून पुढे राहिले नाही.

' दुसऱ्या दिवसापासून खाणावळीतून उत्तम जेवण येऊ लागले. वाचावयास वेदाची भाष्ये व वृत्तपत्रे मिळू लागली ! तिसऱ्या दिवशी श्री छ. शाहूमहाराजानी आपल्या राजवाडयात नेऊन तेथे सुमारे ३ तास गप्पा मारल्या. मला चहा–बिस्किट खावयास घातली.

'तुम्ही आपल्या वकिलास बोलवा व बचावाचे काम करावयाचे ते करा ' असे सांगितले.

'मी थिऑसफीच्या अंतर्वर्तुळात अनुष्ठानी सभासद असल्याने माझ्या संबंधाने, श्री अनि बीझांटबाईने महाराजास स्वताच्या सहीचे पत्र पाठवून माझ्या संबंधाने सहानुभूतीचे वर्तन करावे असे लिहिले होते. यामुळे माझा वशिला मोठया लोकापर्यंत आहे असे महाराजास कळून चुकले होते. श्री सयाजीराव महाराजाशी माझ्या ग्रंथलेखनामुळे संबंध आहे हेही कोल्हापूरच्या महाराजाना कळले होते. त्यामुळे माझा निवास तेथे सुखाचा व्हावा असे तेथे वायुमंडळ बनले होते.

' शिवाय मराठे क्षत्रिय आहेत म्हणून त्याना वेदोक्ताचा अधिकार आहे या संबंधाने माझे ५।७ लेख इंदुप्रकाशात प्रसिद्ध झाले होते. हे लेख महाराजास आवडण्यासारखे होते. अशा अनेक कारणानी व माझा कोल्हापूरशी संबंधच नसल्यामुळे माझ्याविषयी तेथे प्रतिकूल वातावरण नव्हते.

' प्रथम माझा खटला श्री भास्करराव जाधव यांच्या कोर्टात चालला. त्यानी खुनाचा आरोप नाशाबित करून त्यातून मुक्तता केली व राजद्रोहाच्या आरोपाची चवकशी करण्यासाठी खटला सेशन कमिट करून वर पाठविला. श्री पंडितराव न्यायाधिशाच्या कोर्टात दुसरा राजद्रोहाचा आरोपही सिद्ध झाला नाही. म्हणून

त्यानी पण निर्दोष ठरवून मला सोडून दिले. '

कोल्हापूर कोर्टात पंडितजीनी जबाब दिला होता की—

' न्यायमूर्ति, मी वेदांचा पुजारी, निस्सीम कट्टा भक्त. त्यांची आज्ञा अशी की, देश परतंत्र झाला असता, क्षत्रियाला जागा करून त्याच्याकडून देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हे खऱ्या ब्राह्मणाचे काम. मी ब्राह्मण. आपण म्हणता ते सर्व मी लिहिले. क्षत्रियाला जागा करण्यासाठी ! मला त्याबद्दल यत्किंचित्‌ही पश्चात्ताप झाला नाही, होत नाही, होणार नाही. आपण खुशाल वाटल तो निकाल द्यावा. ' आणि पंडितजी सांगतात की— ' पण इतके घडण्यास कोल्हापुरात एक वर्ष लागले. माझी सुटका होताच तत्काळ स्टेशनवर येऊन आधी बेळगाव गाठले. कारण तेथे कोल्हापुरास पुनः पकडले जाण्याचा संभव होता, असे कित्येक बोलत असत ! !

' श्री पंडितरावानी आपल्या निकालपत्रात पूर्वीच्या किंकेडसाहेबांच्या निकालावर खरमरीत टीका केली असल्यामुळे, त्याना न्यायाधिशाच्या नोकरीस मुकावे लागले. वास्तविक हा त्यांच्यावर अन्याय झाला यात शंका नाही. प्रो. विजापूरकर, जोशीराव व जोशी यानाही माझ्या लेखामुळे निष्कारण त्रास झाला. पण तो वेळच तसा होता.

' आता जावे कोठे व कोठे रहावे हा प्रश्न माझ्यासमोर उभा होता. हैदराबादेहून हद्दपारी, कोल्हापुरात हा खटला, मुंबई–पुणे ही शहरे तर मला पहिल्यापासूनच प्रतिकूल, कारण माझी पुस्तके सरकारने जाळली व माझ्या लेखासाठी कोल्हापुरचा खटला भरला गेला; ते मुंबई इलाख्याच्या त्या दोन राजधान्यात ठरून ! यासाठी पंजाबमध्ये जावे व तेथे रहावे असे ठरविले व श्री स्वामी श्रद्धानंदांच्या संमतिने १९०९ च्या शेवटी लाहोर गाठले ! '

पुणे–मुंबईस राहण्याची जशी पंडितजीना सोय नव्हती, तशी महाराष्ट्रातही कोठल्या महत्त्वाच्या ठिकाणी राहण्याची सोय नव्हती. कोल्हापूरच्या शिवाजी क्लबाचे हातपाय मोडून पडले होते; नाशिकला १९०९ च्या डिसेंबरात शारदा नाटकाच्या प्रयोगाचे वेळी जॅक्सनचा खून झाला होता व त्यामुळे देशात सगळीकडे दडपशाहीचे आणि धरपकडीचे वातावरण माजले होते. सातारा जिल्ह्यात औंध बाँबकेस निघाली होती; कीचकवध नाटक पौराणिक असले तरी राजकीय परिस्थितीचे रूपक आहे, असे बाँबेक्रॉनिकलमध्ये प्रसिद्ध होऊन मराठी रंगभूमीवर सर व्हॅलेंटाईन चिरोल यास रोज रात्रौ लॉर्ड कर्झनचा खून होत आहे, असा भास झाला व तो त्याने लंडन टाइम्समध्ये लिहून दाखविताच कीचकवधावर बंदी आली ! ! सांगलीच्या देवलानी लिहिलेल्या शारदा नाटकातील **' जो लोककल्याण साधावया जाण । '** या व **' अन्य धर्मी भूपाल आर्यभूचा '** या पदाना, त्यांचप्रमाणे प्रभावती नाटकातील **' देशभक्ता प्रासाद बंदिशाळा । '** या दिण्डीला बंदी घालण्यात आली.

सांगलीच्या सामाजिक नाटकमंडळीच्या आणि साताराच्या स्वदेश हितचिंतक मंडळींच्या ड्रॉप् पडद्यावर दिल्लीच्या बादशहापुढे व्यापारास परवानगी मागणारा, शिवराज्याभिषेकाचे वेळी गुडघे मोडणारा ॲक्सिडन्, पेशव्यांच्या दरबारात विनम्रपणे मुजरा करणारा आणि शेवटी भारताचा सम्राट झालेला इंग्रज रंगविलेला असताही त्या पडद्यावर बंदी आली ! ! मग बेळगावकर स्त्रीसंगीत मंडळीच्या दण्डधारी नाटकात दण्डधारीची वेशभूषा लोकमान्य टिळकासारखी करूनच श्रीमती व्यंकम्मा ही येत असे ! त्याही नाटकाला बंदी झाली ! ! शाळेत मुले व शिक्षक स्वदेशी वापरतात की काय, हे पाहण्यापासून त्यांच्या चहाड्या सरकारात करण्यापर्यंत सरस्वतीच्या सेवकानाही तोबरे मिळत असत.

जी स्थिति महाराष्ट्रात होती, तीच सर्व हिंदुस्थानात होती; पण लोकमान्यांची रवानगी मंडालेला झालेली होती आणि म्हणून तरुणाना पाठिशी घालील अगर पाठ थोपटील असा पुढारी महाराष्ट्रात नव्हता. बंगालचे अरविंदबाबू पाँडिचरीला जाऊन बसले होते आणि बंगालच्या पिस्तुलबाज तरुणाना ब्रिटिशसरकारने अंदमान दाखवले होते ! ! ! मद्रास वगैरे प्रांत सरकारी जुलमाच्या वरवंट्याखाली दबले होते. तरीही लाला लजपतराय पंजाबात होते आणि तरुणांची तयारी अमेरिकेत ' गदर ' चळवळीसाठी होत होती, तरी आर्यसमाजाचे कार्य पंजाबात चालू होते. म्हणून पंडितजी पंजाबात गेले.

पंडितजीना यावेळी दोन आघाड्याना तोंड द्यावयाचे होते. एक पोटापाण्याचा उद्योग पहावयाचा होता. चित्रकारी हा त्यांचा त्याबाबत हुकमी पत्ता होता. जयपूरपर्यंत त्यांच्या चित्रकारीची कीर्ति गेलीच होती. हैदराबादेतील लौकिकामुळे, त्यांच्या चित्रकारीविषयी पंजाबातील मुस्लिमानाही विश्वास होता. दुसरे, त्याना ध्येय सोडावयाचे नव्हते. वैदिक ऋषींचा आदेश घराघरातील जाणत्या माणसापर्यंत पोहोचला पाहिजे, अशी त्याना आच वाटत होती. लाहोरला आर्यसमाज असल्याकारणाने, वेदाभ्यास आणि वेदविवेचनासह वेदप्रचार तेथून करणे त्याना सुलभ वाटले. पूर्वीसारखे कांगडीच्या गुरुकुलात जाऊन उद्याचे उमलते नागरीक सुसंस्कृत करता–करता, प्रस्तुतच्या नागरीकानाही जागर देऊन पंडितजीना आपला चरितार्थ चालविता आलाही असता ! महात्मा मुन्शीरामानी व गुरुकुलाच्या विद्यार्थ्यांनी पंडितजींचे हार्दिक स्वागतही केले असते ! पण आपल्या संपर्कामुळे ब्रिटिशसरकार कदाचित् गुरुकुलाची पाळेमुळे, तळेगावच्या समर्थ विद्यालयासारखी खणून काढील, असाच अधिक संभव होता. आपल्यामुळे दुसरा कोणी गोत्यात येऊ नये म्हणून खासगत व्यवहारातही जपणारे पंडितजी राष्ट्रीय बाण्याने चालणाऱ्या त्या सांस्कृतिक संस्थेवर संकट येण्याचा संभव तरी का निर्माण होऊ देतील ?

म्हणून ॐ असे सर्वोत्कृष्ट नाव ज्याने परमेश्वराला दिले त्या मुंडकोपनिषदाचा,

विश्पला ही स्त्री युद्धात पाय गमवून बसली तर तिला लोखंडाचा पाय बसवून युद्धास समर्थ केले अगर अंधळचाला दुसऱ्याचा डोळा बसवून त्याला तारुण्यसुलभ संसार थाटून दिला, अशा विज्ञानमय कथा सांगणाऱ्या ऋग्वेदाचा, आणि कर्मफल-त्याग–योगाने संसार नेटका करण्याचा आदेश देणाऱ्या हिंदुधर्माचा वेदवाङ्मयाधारे व्यासंग आणि प्रचार निर्भेळ स्वातंत्र्याने करता यावा, म्हणून पंडितजींनी लाहोरास आपल्या चित्रकारीचा स्वतंत्र धंदा उभारला आणि आर्यसमाजाशी निगडित होऊन जीवाने ध्यास घेतलेला वेदानुवादही प्रभावीपणे चालविला.

ø ø ø

: १० :

# लाहोरचे लाक्षागृह

कोल्हापूर खटल्याला बगल देऊन त्यानी जयपूरच्या जुन्या राजवाड्यातील चौथ्या मजल्यावर 'घोड्यावरील बाजीराव' चितारला होता, त्यातील रेखाविशेषाने पंडितजी लाहोरात येऊन राहण्यापूर्वीच त्यांची चित्रकारी पंजाबात घोडदौडीने गाजलेली होती, ती आता पंडितजीना उपयोगी आली. शिवाय तेथील आर्यसमाजही मदतीस होताच !

आर्यसमाज पण ब्रिटिश सरकारच्या नजरबंदीकक्षेतून बाहेर होता, असे मानण्याचे कारण नाही. लोकातील काही मंडळीदेखील आर्यसमाजविरुद्ध होतीच. त्यापैकीच आत्माराम सनातनी अतिअश्लील भाषेत आर्यसमाजाविरुद्ध प्रचार करीत असल्यामुळे, त्याला धडा देण्याकरता १९०२ मध्ये अलाहाबादमध्ये व १९०५ मध्ये कराचीत सरकारतर्फे खटले चालले. त्यातील कराचीच्या खटल्यात आत्माराम सनातनीने आपल्या बचावात असे सांगून टाकले की आर्यसमाज हा राजद्रोही असून, 'सत्यार्थप्रकाश' राजद्रोहाला उत्तेजन देणारा ग्रंथ आहे. त्याची डाळ शिजली नाही ! पण श्यामजी कृष्णवर्मा हे इंग्लंड व फ्रान्समध्ये ज्या चळवळी करीत होते त्यांच्या राजकारणाचा दोष आर्यसमाजाच्या माथ्यावर लादण्यात आला. लाला लजपतराय देशपार करण्यात आले होते, त्यातील ( १९०७ ) संशय हे त्याचे प्रत्यंतर मानण्यात आले ! सरदार अजितसिंहांचा आर्यसमाजाशी काही संबंध नसताना, त्यानी वसाहतविधेयकाविरुद्ध उठाव करताच, त्याना आर्यसमाजी म्हणून संबोधण्यात आले ! भाई परमानंदांच्या घरी झडती झाल्यावर आर्यसमाज 'कटवाला' असल्याबद्दल सरकारला काडीमात्र संशय उरला नाही. सर व्हॅलेंटाईन चिरोलच्या लांबड्या नाकाला स्वामी दयानंदानी गोवधबंदीसाठी केलेले प्रयत्न ब्रिटिशविरोधी दुर्गंधिच भासले ! १९०७ च्या रावळपिंडी येथे झालेल्या दंगलीदंग्यात पकडलेले आर्यसमाजी

निर्दोषी सुटले तरी आर्यसमाज पंजाब व संयुक्तप्रांतात राजद्रोही आंदोलन करीत असतो असा आरोप ' शिरोल ' या पत्राने केलाच ! सोळाव्या शतकात प्रारंभी गुरु नानकानी सुरू केलेल्या धार्मिक चळवळीतून पन्नास वर्षात जशी हरगोविंदसिंगाच्या हाती ती राजकारणी संघटना झाली, तशीच आठवण आर्यसमाज देतो, असे पारतंत्र्याचे पाईक प्रतिपादू लागले ! दयानंद कॉलेजात लाहोर येथे एका बंगाली प्राध्यापकाची नियुक्ति आणि जंगलातील एकान्तात गुरुकुलाची स्थापना, यांचाही अर्थ वरील संदर्भातच लावला गेला.

आर्यसमाजावर आणि त्याच्या कार्यकर्त्यावर नि त्यांच्या मार्फतीने वा सहकाराने चाललेल्या संस्थावर सरकारचा राग होता. सरकारी मदत न घेता, गुरुकुल कांगडीला चालले, याचा परकीय सत्तेला कितीहीं राग असला तरी, स्वतंत्रपणे स्वसंस्कृतिमूलक राष्ट्रीय शिक्षण घेणाऱ्या गृरुकुलातील ब्रह्मचारीमंडळीनी शिक्षणाबरोबच राष्ट्रसेवा चालविली होती, हे विसरून चालणार नाही. १९०७ च्या दुष्काळात त्या ब्रह्मचाऱ्यानी आपण दूध प्यावयाचे बंद करून ते पीडिताना दिले; १९०८ साली दक्षिण हैदराबादेतील दुष्काळग्रस्ताना कांगडीच्या ब्रह्मचाऱ्यानी धान्य व पैसा गोळा करून पाठविला; १९११ मध्ये गुजराथी बान्धवाना तसाच मदतीचा हात त्यानी दिला; १९१३ मध्ये आफ्रिकेत महात्मा गांधीनी चालविलेल्या सत्याग्रहासाठी ना. गोखल्यानी देशभर मदत मागितली असता, आपले एक वेळचे जेवण कमीकरून व हरिद्वारच्या दुधियाधरणावर मोलमजूरी करून, कांगडीच्या ब्रह्मचाऱ्यानी पंधराशे रुपये आफ्रिका सत्याग्रहास दिले. ना. गोखल्याना गुरुकुलाविषयी जिव्हाळा वाटे तो त्यातील विद्यार्थीमंडळींच्या सेवाभावामुळेच. म्हणूनच त्यानी अलाहाबाद काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष सर वेडर्नबर्न यांच्या कानावर गुरुकुलाचा इतिहास घालून, कलकत्त्याच्या बड्या लाटांची समजावणी साधली होती. गुरुकुलावरील सरकारी रोष त्या समजावणीने कमी होईल, अशी आशा अर्थात्च कोणी बाळगली नव्हती ! पण प्रयत्न–कर्तव्यबुद्धिने यापेक्षा पारतंत्र्यात काय करावे ? १९१३ तही गुरुकुलावर पोलिसांची करडी नजर होती, याचे ना. गोखल्याना अतिशय दुःख होई ! अशा स्थितीत आपल्यापासून चुकूनदेखील गुरुकुलाला त्रास होऊ नये म्हणून पंडितजी सातवळेकर लाहोरसारख्या दूर ठिकाणी रहात असले, तरी प्रसंगानुसार गुरुकुलात जात. महात्मा गांधींचा आणि पंडितजींचा तेथेच दृढतर परिचय झाला.

लाहोर येथें चित्रकार व वैदिक विद्वान् म्हणून पंडितजी जाऊन राहिल्यावर डॉ. सत्यपाल, डॉ. किश्चलू, लाला लजपतराय, लाला हरकिसनलाल वगैरे साथी पंडितजीना मिळाले. त्यांची चित्रे काश्मीर, पतियाळा, जयपूर, ग्वाल्हेर येथे जशी अभिनंदनीय ठरली, तशीच त्यांची व्याख्यानेही मुलतान, रावळपिंडी, पेशावर या गावी आणि पंजाबभर लोकमानसावर आपला शिक्का मोर्तब करून बसली.

पचौनि पक्वता जे जे पावे । त्यालागी पाक ऐसे म्हणावे ।
तस्मात शुभाशुभ कार्य आघवे । पाक जाणावे श्रुतिगदि ते ॥
( हरिवरदा ७१–१०४ ).

आर्यसमाज–धर्मानुसार राज्यशासनात परिवर्तन घडावे, गुरुकुले स्थापून तरुण पिढी तयार करावी, या पिढीस व जनतेस वैदिकधर्माचे तत्त्व समजावून द्यावे व आर्यांचे चक्रवर्ती राज्य स्थापावे ( **समुद्रपर्यन्तायाः पृथिव्या एकराट्–ऐतरेय ब्राह्मण** ) असे स्वामी दयानंदांचे मत आदर्श असलेल्या आर्यसमाजात उत्तम पंडित म्हणून 'हैदराबादच्या यज्ञविषयक शास्त्रार्थामुळे' सातवळेकर गाजले असल्यामुळे, लाहोर गाठल्यावर 'पहिल्याच सप्ताहामध्ये माझी व्याख्याने आर्यसमाजामध्ये व इतरत्रही होऊ लागली. जो आर्यसमाजामध्ये प्रसिद्ध त्यास पंजाबभर प्रसिद्धि असा त्यावेळी अर्थ होता. त्यामुळे सहा महिन्यात पंजाबभर माझी प्रसिद्धि उत्तम पंडित म्हणून झाली' असे स्वता पंडितजीनीच सांगून टाकलेआहे. ते आणखीही सांगतात की—

'इकडे चित्रकलेचा स्टुडिओ व त्यातच फोटोग्राफीही सुरू केली. या धंद्यात द्रव्य मिळवावे व ते ग्रंथलेखनात व प्रकाशनात खर्चावे असे त्यावेळी मी ठरविले. त्यावेळी माझ्या चित्रकलेवर मला दरमहा दीड हजार रुपयेपर्यंत मिळत. काश्मीर, पतियाळा आदि संस्थानातून कामे मिळू लागली व फोटोग्राफीचा धंदाही उत्तम चालू लागला. फोटोग्राफीची मासिके अमेरिकेतून मागवून नव्या नव्या तऱ्हा फोटोमध्ये सुरू केल्यामुळे कलेच्या दृष्टीने दोनही धंदे आमचे नीट चालले.

'यावेळी लाला लजपतराय व त्यांच्यापेक्षाही ज्वलज्जहाल क्रान्तिकारी पुढारी पंजाबमध्ये होते, व पंजाब असा ( प्र ) देश आहे की एकदा का लोकाना उत्तेजित केले, तर मग ते लोक काय करतील याचा नियमच नाही. सूफी अंबाप्रसाद, लाला हरदयाळ वगैरे मंडळी याच वेळी पंजाबमध्ये होती व ती फार ज्वलज्जहाल म्हणून प्रसिद्ध होती.

'एक वेळ १९१२ साली नवंबरमध्ये लाहोरास मोठी सभा भरली, व त्यात या ज्वलज्जहाल मंडळींची भाषणे झाली. ही सकाळची सभा होती. ९ वाजेपर्यंत ही सभा दोन तास चालली व लोक इतके भडकले की तेथून जे लोक निघाले ते त्यानी प्रथम मिशनस्कूल जाळून भस्म केले. माल–रोडवर येऊन तेथील युरोपियनांची दुकाने तोडून, मोडून, जाळून टाकली. दुपारपर्यंत सुमारे ५० हजारांचा जमाव अशा रीतीने चालला होता. पुढे गोळीबार झाला व शांतिची स्थापना झाली. या मुदतीत युरोपियन दुकानांचे सुमारे १५ लाखांचे नुकसान झाले असावे !

'पंजाबमध्ये असताना माझी नेहमी आर्यसमाजात व्याख्याने होत. आर्यसमाजाच्या वार्षिक उत्सवात व गुरुकुलाच्या उत्सवात माझी व्याख्याने होत असल्याने पंजाबभर माझी प्रसिद्धि सहज झाली. वेदामध्ये राज्यशासन, समाजशासन,

राज्यक्रांति, प्रजेची उत्क्रांति, राजाची पदच्युति, विजयाची तयारी अशासारख्या विषयाना पोषक मंत्र हवे तितके असल्यामुळे, माझ्या व्याख्यानातून हे असे नवे विचार येत. यामुळे माझ्या व्याख्यानाची आवड लोकामध्ये वाढली. मी वेद व धर्म याशिवाय केवळ नुसत्या राजकीय विषयावर मुद्दामच कधीही बोलत नसे. कारण वेदमंत्रांच्या आधाराने हवे ते विषय हाताळता येत असल्याने इतर विषयावर बोलण्याचे कारण पडत नसे.

' ला. लजपतराय हे सनदशीर पण ज्वलज्जहाल पक्षाचे म्हणून पंजाबमध्ये प्रसिद्ध होते. भाई परमानंद हे आत-बाहेर एक असे जे सत्य असेल ते उघड बोलणारे होते. यामुळे त्यांच्या अनुयायांचा पक्ष बनू शकला नाही. ला. हरदयाळ, सूफी अंबाप्रसाद वगैरेंचा क्रांतिकारी पक्ष होता व हे यावेळी जनतेला उत्तेजक भाषेने हवे ते करण्यास प्रवृत्त करीत. दंगेधोपे, अव्यवस्था माजवावी, म्हणजेच त्यातून नवी राज्यव्यवस्था निर्माण करता येते, असे यांचे मत होते. शेवटी लाला हरदयाळना इंग्रजसरकारने हद्दपार केले व ते यामुळे अमेरिकेस निघून गेले. '

स्वामी दयानंदांचे आर्यसमाज-ध्येय आरंभी दिल्याप्रमाणे असल्यामुळे, पंडितजी सांगतात की—

' गुरुकुले व आर्यसमाज यावर इंग्रजसरकारची अत्यंत क्रूरदृष्टि होती. मला या आर्यसमाजात राहून या पद्धतीने राष्ट्राला उन्नत करणे पसंत होते व यामुळे माझे दौरे पंजाबमध्ये सुरू झाले होते.

' गुरुकुलाच्या उत्सवात २५००० जनसमुदाय येत असे व तीन दिवस उन्हातान्हात राही. लाख, दोन लाख रु. बसलेल्या बैठकीला जमत. श्री स्वा. श्रद्धानंद सरकारी अधिकाऱ्यास बोलवीत नसत. तरुणपिढीला एकांतात १२ वर्षे ठेवून विशिष्ट शिक्षण देत. हे तरुण वाघ व हत्ती याशी झुंज देण्यास भीत नसत, हे पाहून इंग्रजसरकार अस्वस्थ होत असे !

' मी गुरुकुलात शिक्षक होतो, माझ्यावर राजद्रोहाचा खटला भरला, माझी वैदिक पुस्तके सरकारने जप्त केली व मी अशा संस्थातून व्याख्याने देऊन वैदिक राज्यस्थापनेचा प्रचार करतो यामुळे माझ्यावर सरकारची अवकृपा होऊ लागली. याकारणाने सरकारी चित्रकाम मला मिळेनासे झाले व अन्य रीतीनेही मला प्रतिबंध होऊ लागले.

' यावेळी पंजाबांत बँका, इन्शुअरन्स कंपन्या, अन्य कारखाने काढून औद्योगिक जीवन वाढवावे असे ठरवून तसे करून दाखविणारी ला. हरकिसनलाल ही फार मोठी व्यक्ति होती. यानी पंजाबमध्ये बँका वगैरे काढून हजारो तरुणाना काम दिले. सरकारला यांचे कामही पसंत नव्हते.

' डॉ. सत्यपाल हे दुसरे राजकीय गटातील पुढारी होते. हिंदुमुसलमानांचे ऐक्य घडवून आणावे व प्रजेची शक्ति संघटनाने वाढवून स्वराज्य स्थापावे अशा

मताचे हे होते. यांच्याबरोबर डॉ. किश्चलू हे मुसलमान पुढारीही होते. हे मुसलमानांना हिंदूशी मित्रता करण्यास प्रोत्साहन देतात, हे सरकारला खपत नव्हते.

' माझा गट आर्यसमाजाचा होता. पण आर्यसमाजाची शक्ति यावेळी पंजाबमध्ये फार वाढती होती व त्या आर्यसमाजाच्या चळवळीत मी सामील झाल्याने इंग्रजसरकारला मी आवडत नव्हतो. वास्तविक माझा राजकीय आंदोलनाशी काहीएक संबन्ध नव्हता.

' निरनिराळ्या कारणानी ला. लजपतराय, ला. हरकिशनलाल, डॉ. सत्यपाल व किश्चलू यांवर सरकारची अवकृपा वाढू लागली व त्यात माझे नावही सरकारने निष्कारण गोवले होते. वास्तविक फक्त ला. लजपतरायच राजकीय चळवळ करणारे होते. बाकीचे तिघे कधीही राजकीय चळवळीत पडत नसत व मी तर फक्त धार्मिक चळवळच करीत होतो. पण सरकारने या पाचाना पकडण्याचे ठरविले. लाला लजपतराय अमेरिकेत निघून गेले.

' आमच्या घरावर सन १९१७ मध्ये ऑक्टोबर महिन्यात सरकारानी पहारे बसविले. कोण, केव्हा येतो, केव्हा जातो, याची नावनिशी टिपली जाऊ लागली. राहते घर व स्टुडिओ या दोनही ठिकाणी रात्रंदिवस पहारा सुरू झाला ! दर तीन तासानी पहारेदार पोलीस बदलले जात. वरील चारही गृहस्थावर असा पहारा चालू होता. ला. लजपतराय पंजाबचे अनभिषिक्त राजे होते. राजकीय चळवळीचे स्वप्राण होते. त्यांच्यावर सरकारी रोष होणे स्वाभाविक होते. पण तेअमेरिकेत गेले होते. पण ला. हरकिसनलाल द्रव्यदृष्टीची थोर व्यक्ति, राजकीय उलाढाली करणाराशी बोलावयासही तयार नसत. डॉ. सत्यपाल हे जातीतील सलोखा वाढविणारा सामाजिक कार्य करणारा व किश्चलू तर नुसता त्यांच्याबरोबर राहणारा. मी तर आर्यसमाजाच्या धार्मिक क्षेत्राबाहेर कधीही फारसा न गेलेला. ला. लजपतराय गुरुकुलात आले होते त्यावेळीच मी व ते एका प्लॅटफॉर्मवर आलो होतो. असे हे बाकीचे राजकीय चळवळ न करणारेही ओडवायर–सरकारला नावडते झाले होते. याचे मला अजूनही आश्चर्य वाटत आहे ! निष्कारण सरकारी शक्तीचा अपव्यय अशा रीतीने या ओडवायरने चालविला होता.

' ला. लजपतराय व मी परस्परास भेटत असू व बोलत असू. पण वक्तृत्वाची क्षेत्रे निराळी होती. राष्ट्रोन्नति हे जरी ध्येय समान असले तरी कार्यपद्धति अगदी भिन्न होती. तथापि ओडवायरानी आम्हाला पकडून तुरुंगात ठेवावयाचे ठरविले.

' सरकारी कचेऱ्यात आमची माणसे असत व त्यामुळे आत काय होत आहे हे आम्हास कळे व घरावर पहारे बसल्यामुळे आमच्याविरुद्ध काही तरी घडणार हे आमच्या ध्यानी आलेच होते.

' मला पकडले तर बायकामुलाकडे पहाणार येथे परप्रांतात कोण ? हा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला. बाकीच्या सर्वांची परिस्थिति त्याना अनुकूल होती.

*

त्यांच्या घरची मंडळी तेथे सुरक्षित राहणे शक्य होते. पण माझी स्थिति तशी नव्हती. तेव्हा काय करावे, कोठे जावे हा प्रश्न मला सहज सुटण्यासारखा नव्हता. या सर्व परिस्थितीचा विचार करून पंजाब सोडावे असे मी ठरविले व त्याप्रमाणे चालू दुकान माझ्या एका शिष्यास ला. हेमराज सबरवाल यास विकले व मी पंजाब सोडण्याचे ठरविल्याचे माझ्या मित्रास कळले.

' माझ्या पंजाबी मित्रास माझ्या या निश्चयाने फारच वाईट वाटले. मी जे आर्यसमाजाचे कार्य–काम करीत होतो, ते करणारा त्या तोलाचा तेथे दुसरा पंडित कोणी नव्हता. पण माझ्या परिस्थितीचा विचार करता दुसरा उपायही नव्हता. यामुळे माझा पंजाब सोडण्याचा बेत ठरला.

' पंजाबी मनोवृत्ती उत्साही, साहसी व ठरेल ते कार्य त्वरेने करणारी असल्यामुळे मला ती आवडली व पंजाबभर मोठ्या शहरात माझे हजारो स्नेही बनले. पंजाबी स्नेही म्हणजे जिवाला जीव देणारे असतात. दिलदारपणा हा त्यांच्या आचरणात स्पष्टपणे दिसून येतो. मी जरी बहुतेक प्रांतात राहिलो तरी पंजाबप्रमाणे मला दुसरीकडे समरसता अनुभविता आली नाही. यामुळे मी पंजाबात लाहोरच्या उपनगरात जागा घेऊन तेथे घर बांधून स्थायीपणाने राहणार होतो. पण सरकार मला तेथे राहू देईल असे दिसेना. त्यामुळ पंजाब सोडण्याशिवाय मला दुसरा इलाज दिसून आला नाही.

' १०।१२ वर्षांची मुले शाळत जाताना अथवा परत येताना रस्त्यात थोडीशी बोलाचाली झाली की दोनही मुले रस्त्यातच पाट्यापेन्सिली फेकून दण्ड थोपटून द्वन्द्वयुद्धास तयार होत. असे द्वन्द्व सुरू झाले तर गाड्यांच्या रहादारी बंद केल्या जात व वाटेने जाणारे लोक दोनही बाजूला उभे राहून मध्ये गोल समरांगण त्या द्वन्द्व खेळणाऱ्या मुलास मोकळे ठेवीत. एका बाजूचे लोक एका मुलास व दुसऱ्या बाजूचे लोक दुसऱ्या मुलास उत्तेजन देऊन लढवीत. ते चांगले थकेपर्यंत कोणीही त्यास सोडवावयाचा यत्न करीत नसत. इतकेच नव्हे तर तेथे त्याना निरनिराळे पेच घालावयास सुचवीत. अशी द्वन्द्वे रस्त्यात पंजाबमध्ये मी कितीतरी पाहिली आहेत. लहानपणापासून अशी वीरवृत्ति वाढविण्याकडे सर्वांचा कल असे व हा मला मनापासून आवडत असे.

' रस्त्यातील टांगे व गाड्या एक तर अशा वेळी दुसऱ्या रस्त्याने लोकच घालवीत, नाही तर अर्धा रस्ता मोकळा ठेवीत. पण मुलाना सोडवीत नसत. अशा शेकडो गोष्टी पंजाबमध्येच दिसून आल्या.

' आर्यसमाजातील निवडणुकी होण्यात वास्तविक भांडणाचे काही एक कारण नाही. पण स्वा. श्रद्धानंद हे गुरुकुलपक्षाचे पुढारी व ला. हंसराज हे कॉलेजपक्षाचे पुढारी. यांच्या पक्षामध्ये निवडणुकीच्या वेळी लाठ्या घेऊन मारामाऱ्या होत व विद्वानांच्या सभातही रक्तपात होईपर्यंत मारामाऱ्या होत. हे मी पंजाब-

मध्ये कितीतरी ठिकाणी पाहिले आहे.

' मी पंजाब सोडणार हे ठरताच श्री कृष्णजीनी आपल्या प्रकाश नावाच्या ऊर्दू पत्रात माझ्या जाण्यासंबंधाने कित्येक लेख लिहिले व माझ्या पंजाबमधील कामाची पुष्कळ प्रशंसा केली. माझी पाठवणूक विशेषप्रकारे करावी असेही सुचविले. याप्रमाणे लाहोरास सार्वजनिक सभा होऊन माझा सन्मान केला व त्याचप्रमाणे लाहोर स्टेशनवर माझे ५।७ शे स्नेही मला पोचविण्यासाठी आले. त्यानी निदान ८०।९० तरी हार आणून ते मला घातले ! इतके घालणे शक्य नसल्याने पहिले हार काढून दुसरे घालावे लागले ! असा थाट क्वचित्‌च कोणाचा होतो. म्हणून लाहोर स्टेशनवर हा एक अपूर्व समारंभ झाला. आम्ही हे हार सर्व डब्यात वाटून टाकले.

' सरकारी पोलीस आमच्या डब्यात दिल्लीपर्यंत होते. दिल्लीला उतरून मी दुसऱ्या गाडीने मुंबईस आलो. त्यामुळे दिल्लीच्या पुढे पोलीस दिसले नाहीत. मी मुंबईस येऊन एकदम औंधास येऊन राहिलो. कारण मला औंधच्या श्री बाळासाहेब पंतानीच औंधास येऊन राहण्यास लिहिले होते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून लाहोर हे अनेक नामवन्त महाराष्ट्रीयांचे कार्यक्षेत्र होऊन राहिले होते. सुप्रसिद्ध गायनाचार्य पं. विष्णु दिगंबर पलूसकर यानी गांधर्व महाविद्यालय ही संस्था लाहोरास स्थापली, वाढविली व लोकप्रिय केली. सर्वश्री सप्रे व आठवले यानी हिंदी केसरी हे पत्र चालवून लोकमान्यांच्या राजकीय विचारांचे लोण पंजाबपर्यंत व पंजाबी जीवनात पोहोचविले ते लाहोरातूनच ! पंडितजी सातवळेकरांची चित्रकला तर लाहोरात लोकप्रिय झालीच. पण तिच्याही पेक्षा त्यांच्या वेदविद्येचा प्रभाव लाहोरातूनच पडावयास सुरवात व्हावी, अशी नियतीची योजना होती. हैदराबादेस असताना आर्यसमाजात वेद व इतर संस्कृत ग्रंथांचे खोल मनन करून वैदिकधर्माचे पुनरुज्जीवन करू पहाणाऱ्या आर्यसमाजाचे सभासद सातवळेकरजी झाले होते. महर्षि दयानंद सरस्वती यानी पंजाबात आर्यसमाजद्वारा वैदिकधर्माची प्रतिष्ठापना करून ख्रिस्ती व इस्लामी यांचा आक्रमक धर्मप्रसार थोपवून धरला होता व वेदोक्त धर्माने प्रत्याक्रमण करण्यास काहीच हरकत नाही, अशी शिकवण देऊन ठेवली होती. ' **कृण्वन्तो विश्वमार्यम्।** ' हे वैदिकधर्माचे व म्हणून आर्यसमाजाचे जर ब्रीद तर देवपंथी पंडितजी सद्‌धर्म–प्रसारक बनून असद्‌धर्माचे निर्मूलन करण्यास अहर्निश झटू लागले व ' जगातील इतर सर्व धर्म हे स्वतंत्र धर्म नसून त्यांचेही मूळ संशोधन करू गेल्यास वेदातच गवसेल ' असे पंडितजी प्रतिपादू लागले, यात नवल काय ? पंडितजींच्या वेदावरील निष्ठेमुळे, गाढ व्यासंगामुळे आणि हरकिसनलाल, रामभुजदत्त चौधरी, साईदास प्रभृतीपासून सर्वांशी मिळून मिसळून वागण्याच्या सर्वसंग्राहक वृत्तिमुळे ते लाहोरातील आर्यसमाजी विद्वानात व अभ्यासकात लौकरच

सर्वांचे आवडते झाले. अनारकलीच्या रस्त्यावर एका ड्राइंगमास्तराला भागीदार करून ' सातवळेकरआर्ट स्टुडिओ ' स्थापन करणारे व ' सुखप्रकाश ' बंगल्यात राहणारे पंडितजी आपल्या दोन्ही–चित्रविद्या व वेदविद्या यानी पंजाब, पेशावर, काश्मीर, हिमाचल प्रदेश, दिल्ली–हरिद्वारपर्यंत नावलौकिकास चढले. इंग्रज, मुसलमान, मोठमोठे अधिकारी, मिशनरी, त्याना इतके ओळखून राहिले की पंडितजी म्हणजे सातवळेकर असे जनमनात समीकरणच दृढ होऊन राहिले. ' वैदिक सांस्कृतिक तेजस्वी आर्यधर्म व आपले आजचे कर्तव्य ' अशा सारख्या व्याख्यानानी दहा वर्षे झंजावातासारखा पंडितजीनी संचार केला.

लाहोरास मुक्काम केल्यावर पंडितजी आर्यसमाजात जाऊ लागले होते, त्याचप्रमाणे लाहोरच्या बच्छोवाली विभागातील आर्यसमाज–मंदिरात जाऊ लागले होते. त्यांची व्याख्याने तेथे सुरू झाल्यावर, पूर्वीच्या तीस चाळीस श्रोत्यांच्या जागी चारशे तरी श्रोते जमू लागले. त्यानंतर सर्व पंजाबभरही त्यांची व्याख्याने होत राहिली. त्यांचे विषय वेदाधारे राजशासन, समाजशासन असे असत आणि त्या संबंधात बोलले गेलेले वेदवाङ्मय त्याकाळी चालू असलेल्या राष्ट्रीय उत्थानाला उत्तेजक असे.

त्याकाळी मोर्लेमिंटो सुधारणांच्या प्रसववेदनापासून प्रेसॲक्टसारख्या काळचा कायद्याच्या अंमलबजावणीनंतर, दिल्लीला राजधानी आणली आणि वंगभंग रद्द झाला. तरीसुद्धा राष्ट्रीय मनोवृत्तीची आंदोलने चालण्यात खळ पडलाच नव्हता. उलट, लाल–बाल–पाल या राष्ट्रीय त्रिमर्तींना लोकांच्या डोळ्याआड दीर्घकालपर्यंत केल्यामुळे, लोकप्रक्षोभ शिगेला गेला होता. त्याचे पर्यवसान १९११ च्या दिल्लीदरबारानंतर लॉर्ड हार्डिंज यानी नव्या दिल्लीत १९१२ साली प्रवेश केला तेव्हाही आले. अखेर १९१४ साली केसरीकंदन सुरू झाले व लो. टिळक सुटून आले तरी—

**न गणसि मज जातो तुच्छ मानूनि तूते ।**

असे म्हणण्यापर्यंत राष्ट्रीय चळवळ गेली.

लाहोरच्या मुक्कामाच्या दहा वर्षांत दरसाल ऑगस्ट–सप्टेंबरमध्ये पंडितजीनी हिमालयातील हरिद्वारापर्यंतच्या निसर्गयात्रा केल्या आणि निसर्गरमणीयतेतील गूढे पाहिली, चितारली व उकलून पाहण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाण काँग्रेस अधिवेशनाच्या वार्षिक यात्राही पंडितजी सहसा चुकले नाहीत. लोकमान्य टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतरच्या काँग्रेस अधिवेशनाला ते बिनचूक हजर राहिले. १९१४। १९१५ च्या मद्रास–मुंबई येथील अधिवेशनाप्रमाणे लखनौ येथे १९१६ साली भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. बॅ. जिनाशी लोकमान्यानी समझौता घडवून आणला होता. त्या लखनौपॅक्ट ( समझोत्या ) ला काँग्रेस–अधिवेशनात राष्ट्राची संमति मिळाली. त्याच्या अगोदरच जुलै महिन्यात

लोकमान्यांची एकसष्टी राष्ट्रीय पातळीवर साजरी होऊन दिल्लीच्या सिंहासनावर पंचम जॉर्ज बादशहा बसले असले आणि नंतर तेथे राजप्रतिनिधी नांदत असले तरी, लोकहृदयाच्या सिंहासनावर लोकमान्य टिळकच विराजमान होते, हे त्या टिळकांच्या साठीसमारंभाने सिद्ध केले होते. लोकमान्यांचा शब्द त्यावेळी राष्ट्र वेदाइतका प्रमाण मानी. त्या लोकमान्य टिळकानी ' इंग्लंडची अडचण तेच हिंदुस्थानचे संधिसाधन ' हे जाणून भारतीय तरुणाना भारतसंरक्षण-सैन्यात सामील होण्याचा सपाटा चालविला होता. कैसरीकंदनाच्या तीव्र झालेल्या त्या जागतिक धुमाळीत भारतीय पौरुष चमकावे म्हणून लोकमान्य प्रयत्नवादी असतानाच, ते परकीय राज्यकर्त्यांना सवाल टाकित होते की-कोठे आहे तो भारत की ज्याचे संरक्षण भारतीय तरुणानी करावयाचे आहे? लोकमान्यांच्या या वृत्तीतील वर्म जाणणारे पंडितजी सातवळेकर लखनौस लोकमान्याशी एक तासभर ' गुफ्तगूँ ' करीत होते. तेथे दक्षिण आफ्रिकेचा व चंपारण्याचा लढा नैतिकदृष्ट्या जिंकून आलेले महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांचाही पंडितजीसमवेत विचारविनिमय होऊन लोभ दृढ झाला.

पंडितजींच्या या हालचाली ब्रिटिशसरकारच्या डोळ्यात सलल्या! पंजाबचे राज्यपाल त्यावेळी ओडवायरसाहेब होते. त्यानी टिळकगांधीप्रमाणेच पंडितजींच्या पाळतीवर गुप्तचर ठेवलेच होते. लोकमतावर लोकमान्यांचे अधिराज्य; त्यांच्या तंत्रात बॅ. जिना व मुस्लीमलीग गेल्यावर, हिंदुमुस्लीमसमाजांच्या समझौत्यासंबंधी बोलताना Luck now at Lucknow असे लोकमान्य उद्गारले होते. त्याचा अर्थ बरोबर इंग्रजराज्यकर्त्यांच्या अंतःकरणास भिडला होता. हिंदी राष्ट्राचे भाग्य आता उजळावयाचे म्हणजे इंग्रजी राज्याचे भाग्य काय व्हावयाचे, याचे गणित लोकमान्यांच्या त्यावेळी तेजीत असलेल्या होमरूल-चळवळीने मांडले होते, ते स्पष्टपणे दिल्लीच्या लाटापासून प्रांतिकसत्ताधारी लाटापर्यंत सगळ्याना खवखवून सोडित होते. अशा टिळकांच्या गोटात वावरणारा पंडित सातवळेकर पंजाबचे राज्यपाल ओडवायर यास अवजड वाटू लागला. वेदांच्या धार्मिक नावाखाली राजद्रोहाचे वणवे सातवळेकर पेटवतात, अशी ठाम समजूत इंग्रजांची झाली. म्हणून १९१७ पासून पंडितजीवर ' घरी, दारी, वाटेवरि, सुखसंवाद घडता । ' गुप्तचरांचे कडक पहारे ठेवले ! ! !

पांडव लाक्षागृहात रहावयास गेले आणि कौरवानी ते जाळले ! पण पांडव निसटले ! पंडितजीना लाहोरास गेल्यावर इंग्रजी राज्याचा तोच अनुभव आला !

ø ø ø

: ११ :

# हिमालयाच्या कडेवर !

' सर्वं यज्ञे प्रतिष्ठितम् । ' असे गीतेने सांगितले आहे. ज्याठिकाणी श्रेष्ठांचा सत्कार, समाजाचे संघटन व पतितोद्धार होतो, पूजा, दान व संगतिकरण जेथे साधते, अथवा समाजाबद्दल, राष्ट्राबद्दल वा मानवतेबद्दल पूर्ण आदर ठेवून सार्वजनिक हिताचे कार्य जेथे होते, तेथे यज्ञच आहे. हे यज्ञतत्त्व आणि तदंगभूत प्रतिष्ठा सार्वदेशीय आहे, सर्व कालीन आहे, हे निसर्गलीलानी नित्यशः प्रत्ययाला येते. परस्परांच्या आदानप्रदानावर, देवाण–घेवाणावर, केवळ मनुष्यसमाजच नव्हे, तर अखिल सृष्टि आधारून राहिली आहे, हे वैज्ञानिकानाही कबूल आहे. आईच्या आत्मयज्ञाने संतान वाढते; हवा–पाणी–माती यापासून आहार घेऊन वृक्षलता जीवजंतूंचे पोषण करतात; जीवजंतु स्वताच्या बलिदानाने वृक्षलताना खत देतात; सूर्य गृहनक्षत्राना, पृथ्वीला प्रकाश आणि उष्णता देतो; गृहमंडळातील घटक परस्परांच्या स्नेहाकर्षणाने सौरमंडळ धारण करते; समुद्रापासून मेघ उत्पन्न होतो, तर मेघापासून समुद्र होतो. जगच्चक्राचे असे प्रवर्तन निसर्गसंपर्काने मनावर अमरपणे ठसते. अशाच अमरानंदासाठी पंडितजीनी हिमालयी यात्रा केल्या. तेच काय सांगतात पहा—

' पंजाबच्या ९ वर्षांच्या मुक्कामात श्रीनगर, अमरनाथ, गुलमर्ग, कैलास, चंबा आदि अनेक यात्रा केल्या. बहुधा दरवर्षी ऑगष्ट महिन्यात कोणत्या तरी यात्रेला जावे व सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये परत फिरावे, असे होत असे.

' अमरनाथच्या गुहेत दीडपुरुष उंचीचे शिवलिंग बर्फाचे बनत असते. पर्वतातील पाणी झिरपून ते पाणी बाहेर येताच त्याचे बर्फ बनते व हे लिंग बनत असते. यासंबंधाने कोणीतरी आधी १।२ महिने या गुहेत राहून खरोखरच हे लिंग आपोआप बनते की हे पंडे लोक आधी येऊन बनवितात, ते पाहिले पाहिजे.

' अमरनाथाची गुहा ७।८ हजार माणसे सहजच बसतील एवढी मोठी आहे व येथे थंडीचा कहरच असतो. जवळ अमरगंगा २।३ शे फूट उंचीवरून पडत असते. आम्ही कपडे उतरून या अमरगंगेत स्नान केले. स्नान म्हणजे क्षणार्धात या धबधब्याखाली जाऊन परत यावयाचे. आंग पुसून तत्काळ कपडे घालावयाचे असतात. बर्फाच्या पाण्याचे हे स्नान उत्साह वाढविते यात शंका नाही.

' काश्मीर सरकारातून या यात्रेची व्यवस्था दरवर्षी होत असते. यात्रेबरोबर जाणेच सोईस्कर असते. पण आम्ही चित्रे काढावी व फोटो घ्यावे यासाठी प्रथम १।२ दिवस निघून मागेही १।२ दिवस राहिलो होतो. पण असे राहणे इष्ट नसते. हिंस्र पशु असतात व पाण्याचे प्रवाह एकदम येतात. यासाठी यात्रेकरूंनी श्रीनगरहून सरकारी स्वारीबरोबरच जावे हे उत्तम होय.

' वाटेत शीशनाथ या नावाची बर्फाची शिखरे व खाली तलाव असलेले स्थान फारच प्रेक्षणीय आहे. येथे १०।१० मैल फुलांचे गालिचे असल्याप्रमाणे सुंदर दृश्ये दिसतात, ती फारच मनोहर असतात.

' माझी ही यात्रा १९१४ मध्ये झाली. या अमरनाथच्या गुहेमध्ये यात्रेपासून जे उत्पन्न होते त्याचे भागीदार हिंदु पंड्याबरोबर मुसलमानही आहेत. हे मूळचे हिंदु गुरव किंवा पंडे असावे. मुसलमान झाले, तरी त्यांचा हक्क काश्मीर सरकार व तेथील ब्राह्मण मानीत आला आहे. हे एका बाजूला बसतात व जमलेल्या रकमेतून आपला भाग घेऊन जातात.

' काश्मीरमध्ये सर्व मजूर बहुतेक मुसलमानच आहेत. येथील बहुतेक सर्व मजूर, इतकेच काय पण हिमालयातील सर्व मजूर अत्यंत प्रामाणिक आहेत सर्व हिमालयामध्ये कोठेही चोरी होतच नाही. प्राचीन हिंदी सभ्यता अजून येथे दिसते.

' काश्मीरमध्ये श्रीनगरजवळच्या टेकडीवर श्रीमच्छंकराचार्यांचे पवित्र स्थान आहे. याला ' तख्त सुलेमान ' असे म्हणण्याचा सध्या प्रघात मुसलमानांनी पाडला आहे. काश्मीर हे स्वर्गासारखे सुंदर नंदनवन आहे. लोकही अंगापिंडाने सुंदर, सशक्त, थोराड व शीलवान आहेत. हिंदूंची पवित्र स्थानेही शेकडो आहेत पण त्या सर्वांना यावनी नावे यवनाकडून देण्यात आलेली आहेत. हिंदूंचे स्वाभाविक औदासीन्यच याला कारण आहे.

' काश्मीरमध्ये गुलमर्ग आदि अनेक पर्वतस्थाने अशी आहेत की ती युरोप-अमेरिकेतील प्रवाशांना आवडू शकतात. काश्मीरला १९१४ मध्ये प्रथम मी गेलो तो जम्मूपासून १६७ मैल पायी प्रवास केला. १० दिवस लागले. यावर्षी अतिवृष्टीने सर्व पूल तुटून गेले होते. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी फार कष्ट झाले. एका ओढ्यात आमचे खेचर पडले व सर्व बिछाने आणि ट्रंका पाण्याने भरून चिंब झाल्या. रात्रभर थंडीमध्ये फारच त्रास झाला.

' एका मुक्कामात आमच्या पूर्वी तेथे किस्तवाडचा एक सरदार येऊन उतरला

होता. किस्तवाडचे लोक फारच थोराड असतात. हा सरदार ६ फूट उंच व भक्कम जवान होता. त्याच्याबरोबर १४ वर्षांचा नोकर होता. हाही ५॥ फूट उंच व भक्कम होता. उतरावयाचे जागेत या सरदाराने आपले सामान प्रथम आणून लावले होते व कोणासही तेथे येऊन देत नव्हता. एका प्रवाशाने तेथे जाण्याचा प्रयत्न केला, तेव्हा सरदाराने त्याच्या एक थोबाडीत लगावली. त्यामुळे त्याचे डोळे पांढरे होण्याची पाळी आली ! तेव्हां आम्ही बाहेर अंगणातच आमच्या खाटा मांडल्या. आम्ही चौघे व एक स्वयंपाकी असे पाच असामी होतो. फारच उकडत होते.

' रात्रीचा ८ चा सुमार होता. जवळच एकाला विंचू चावला. त्यामुळे तो तळमळू लागला. तेथे मी गेलो. थोडी राख घेतली व हस्तस्पर्शाने तो विंचू १० मिनिटात उतरला. कळवळणारा माणूस आनंदाने आपले काम करू लागला. हे त्या सरदाराने पाहिले. तेव्हा मी मांत्रिक आहे असे त्यास वाटले. आम्हा सर्वांस आत या व निजा असे आग्रहाने त्याने म्हटले. पण उकडत होते यामुळे आम्ही बाहेरच निजलो. रात्रौ १ वाजता फार मोठा पहाडी पाऊस आला. त्यावेळी त्या सरदाराने आपल्या नोकराकरवी आमचे सर्व सामान आत नेववून आमचे बिछाने घालवून निजण्याची उत्तम सोय करून दिली ! हा प्रभाव त्या विंचवामुळे झाला ! नाही तर आम्हाला त्याने विचारलेही नसते.

' उधनपूरचा मुक्कामही असाच लक्षात राहण्याजोगा झाला. आम्ही ओढ्यात उतरून पलिकडे जाणार होतो. इतक्यात दुरून एक वृद्ध माणूस ओरडला की, ' थांबा, मागे सरा, महापूर येत आहे ! ' आम्हाला पाणी थोडे आहे त्यामुळे आम्ही पायी जाऊ असे वाटत होते व पाणी खरोखरच दोन फुटापेक्षा अधिक नव्हते.

' आम्ही मागे सरलो व एका छपराखाली बसलो. हळूहळू ८।१० मिनिटात तेथे सुमारे ५०।६० यात्रेकरू आले व पाणी वाढू लागले. अर्ध्या तासात हत्ती सुद्धा वाहून जातील इतका प्रचंड महापूर आला. तो कमी होण्यास २४ तास लागले ! तोपर्यंत रात्रभर त्याच झोपडीत रहावे लागले. ही झोपडी म्हणजे वर छप्पर, खाली पाणी व त्या पाण्यावर फळ्या घातल्या होत्या. त्या फळ्यावरच आमचा मुक्काम रात्रभर होता. सर्व यात्रेकरू असेच बसले होते. ' जय अमरनाथ ' म्हणून मधून मधून ते सर्व मोठ्याने जयघोष करीत असत ! आम्ही जर त्या अनुभवी वृद्धाचे ऐकले नसते तर खात्रीने आम्ही त्या नदीत वाहून गेलो असतो. हिमालयातील ओढे असे असतात. पाण्याचा वेगही असह्य असतो. यासाठी माहीतगार माणूस बरोबर असावा हे उत्तम होय.

' हिमालयात रामपूर म्हणून एक संस्थान आहे. त्याची राजधानीही रामपूर आहे. हे बाणासुराचे स्थान. बाणासुराची राहण्याची जागा आजही येथेच दाखव-

तात. इकडे ' उषे ' ची मंदिरे फार आहेत. बाणासुराची जेथे गादी होती तेथे सध्या शाळा आहे. याच ठिकाणी आमची वस्ती आठ दिवस होती. समोर कलास दिसतो. बाणासुर वृद्ध झाला, खऱ्या कैलासपर्यंत जाणे होईना, म्हणून बाणासुरासाठीं शंकरानी आपली वस्ती येथे केली; अशी आख्यायिका येथे प्रसिद्ध आहे. ज्या पर्वतात हे कैलास नावाचे शिखर आहे त्यावरच बर्फ नसते. बाकी सर्व पर्वत बर्फाच्छादितच असतो. या पर्वतावर चढण्याचा आम्ही प्रयत्न केला; पण वरून बर्फाचे गोळे येऊ लागल्याने चढणे भयानक वाटले व अर्ध्यावरूनच आम्हांला परत फिरावे लागले. खरा कैलास येथून १५० मैलावर जवळच्या कठीण चढाईच्या रस्त्याने आहे, असे येथील लोक सांगतात.

' या पर्वतावर सायंकाळी ४ ते ६ या वेळात सूर्यकिरण पडतात. त्या सूर्यकिरणांची परावर्तने होऊन जी शोभा दिसते ती प्रत्यक्षच पाहिली पाहिजे.

' ढग येऊन हा पर्वत आच्छादित झाला म्हणजे २।३ दिवसही काही एक दिसत नाही; पण उघडा असला की ४।४ दिवस स्वच्छ दिसत असतो. त्याचे अद्‌भूत दृश्य चित्रित करावे म्हणून रंगसामान घेऊन चित्रित करण्यास आम्ही प्रारंभ केला. अर्ध्या तासाच्या आत कोठून तरी ढग आले व जो पडदा पडला तो दोन दिवस उघडला नाही ! उघडला त्यावेळी संध्याकाळचे ४॥ वाजले होते. बाकी सर्व आकाश मेघाच्छादितच होते. कैलासशिखर दिसावे एवढाच भाग मोकळा होता. यावेळी जी शोभा दिसली तिचे वर्णन शब्दानी करता येणे शक्य नाही. हिरे, माणके, पाचू आदि रत्नांच्या माळा व झालरी चमकत आहेत असे वाटले. सुमारे एक तासभर हे दृश्य दिसत होते. मग ते पुनः पड्याआड गेले ! ! यावेळी आम्ही चित्र काढले. पण ती चमक व दैदिप्यमान कांति चित्रात येणेच शक्य नाही !

' याठिकाणी अमेरिकन मिशनरी आपल्या बायकोसह २५ वर्षे राहिलेला आहे. सर्व हिमालय ख्रिस्ती करावा अशी त्याची महत्त्वाकांक्षा आहे. त्यानेही मला सांगितले की गेल्या १०।१२ वर्षात असे दृश्य दिसले नाही.

' हा अमेरिकन पाद्री ख्रिस्तीधर्मप्रसारासाठी इतक्या गहन हिमालयात २५ वर्षे ( १९१४ पर्यंतची ) राहिला आहे ! लोक येतात. शेपन्नास रु. नेतात व ख्रिस्ती होतात. महिना दोन महिने झाले की बकरा कापून जातीला भोजन घालतात व पुनः हिंदु झालो, म्हणतात ! असे २५ वर्षे चालले आहे. त्याच्या रविवारच्या प्रार्थनेस त्याचे निमंत्रणावरून मी गेलो होतो. पण कोणी न आल्याने प्रार्थना झाली नाही व मी दोन तास बसून परत आलो !

'बाणासूर, उषा यांच्या ज्या कथा आहेत, त्या या भागातील आहेत. येथील स्थाने पाहून या कथांचा अभ्यास करणे योग्य आहे. आम्ही याच रस्त्याने तिबेटात गेलो. पण तो वेळ ( कैसरीकंदन ) युद्धाचा असल्याने आम्हाला पुढे

*

प्रवेश करता आला नाही.

' मग पुढील वर्षी बुद्धभिक्षूंच्या बरोबर आम्ही खऱ्या कैलासपर्यंत गेलो. तो प्रवास तर फारच बहारीचा होता ' नवयुग ' नावाचे मासिक मुंबईस चालू होते त्यात या यात्रांचा विस्तृत वृत्तान्त आलेला आहे.

' चंबा म्हणून एक स्थान हिमालयामध्ये अचंबा करण्यासारखे आहे. चंबा हो ह्याच नावाच्या संस्थानची राजधानी होय. या गावाजवळच उंच उंच गगनचुंबित हिमाच्छादित पर्वतशिखर आहे. सर्व पर्वतच्या पर्वत वर्षानुवर्ष बर्फाच्छादितच असतो. यांची शोभा अवर्णनीयच आहे. या पर्वतामुळे याठिकाणी अतोनात थंडी असते. या थंडीमध्ये शरीरात शक्ति फारच येते. २५।३० मैल चालले तरी मुळीच थकवा येत नाही. ऊन ऊन चहा पीत असता मिशावर बर्फाचे गोळे होतात व आधणाचे पाणी अंगावर ओतले तरी ते अंगावर थंडच होत असते. रोज स्नान करणे यामुळे कठीण असते.

' याठिकाणी आम्ही मेघमंडळाच्यावर गलो होतो. त्यामुळे आमच्या अंगावर कोरडे बर्फ बारीक कापसाच्या तंतूसारखे पडे. झाडले म्हणजे ते निघून जाई. पण कपडे ओले होत नसत !

' हा गंधर्व–लोक होय. आम्ही या गंधर्व लोकातून खालच्या मृत्युलोकातील माणसे पावसातून छत्र्या घेऊन चालली आहो, पाऊस येथे मुसळधार, धो धो पडत आहे, पण आम्ही हे दृश्य पहात असून आमच्या गंधर्वलोकात मात्र पावसाचा एकही थेंब नाही. अशी दृश्ये येथून अनेक वेळा पाहिली. इतक्या उंचीवर जे बर्फ पडते त्याचाच खाली पाऊस होता हे येथे स्पष्ट दिसते.

' आम्ही सरकारी बंदिस्त घरात होतो. तथापि खोलीतील शेकोटीत ३ मण देवदाराची लाकडे खोलीत ऊब राहण्यासाठी दर रात्रीस जाळावी लागत व ५।६ कांबळी पांघरावी लागत. इतकी लाकडे जळत असताही मध्यरात्री वरच्या कांबळ्यास हात लावला तेव्हा ते कांबळे बर्फासारखे थंड लागले ! रात्री दोन फूट बर्फ जमिनीवर पडलेला दिसला. देवदारूची लाकडे येथ फुकट जंगलात गेले की हवी तेवढी मिळतात. यामुळे लाकडाचा खर्च काही एक येत नाही.

' ज्वालामुखी होशियारपूर जिल्ह्यात आहे. तेथे मंदिर आहे व आत आठदहा लहानमोठ्या ज्वाला आहेत. त्या पाहण्यासाठी हजारो यात्रेकरी येत असतात. होशियारपूरपासून टांग्याने जावे लागे. सध्या मोटारची सोय झाली आहे. जमिनीत राकेलतेल आहे. त्याचा धूर वर येतो व तो पेटतो. याचे नाव ज्वालादेवी. या ज्वालेची पूजा येथे होत असते. सप्तशतीचा पाठ येथे होत असतो. शांकरांचे हे दैवत आहे. मोठी ज्वाला एक फूट–दीडफुटाची आहे. काही ज्वाला अगदी लहान आहेत.

' या ज्वालामुखीला ' छोटी माई ' म्हणतात. बडी माई रशियांत बाकू म्हणून

एक राकेलचेच स्थान आहे तेथे आहे. येथें दोनचार फुटांच्या ज्वाला आहेत. या ठिकाणचे देऊळही हिंदुमंदिर आहे व येथील पुजारीही पंजाबी हिंदूच आहे.

' सतराव्या शतकात या देवळाची दुरुस्ती झाली होती. त्याचा लेख देवनागरी लिपीत या देवळात आहे. याचे फोटो मी पाहिले आहेत. ही ' थोरली माई ' व पंजाबच्या ज्वालामुखीच्या देवळात जी आहे ती ' धाकटी माई. ' हे स्थान खरोखर पाहण्यासारखे आहे.

' येथे शिलाजीत वगैरे मिळते. सुगंधी धूप व धूपाच्या वड्या येथे उत्तम मिळतात.

' अशी हिमालयातील अनेक रमणीय स्थाने पंजाबात असताना पाहिली आहेत.

' रामपूरच्या अलिकडे रोगी म्हणून गाव आहे. तेथं कस्तुरीमृग होते व मृगाच्या नाभीची कस्तुरी येथे मिळत असते. येथे कस्तुरीचा मक्ता आहे.

' आमचा रस्ता व मुक्कामाच्या जागा पर्वतावरून व मध्यावरून असत व नदी दरीतून जाई. यामुळे पाणी पिण्यास मिळत नसे. वरचे बर्फाचे पाणीच मिळे. नदीजवळ द्राक्षांच्या बागा असत. तेथे माणूस पाठवून द्राक्षे मागविली. मनुष्य सकाळी खाली गेला तो संध्याकाळी वर आला. चार आणे मजूरी दिली. बारा आण्यांची द्राक्षे मोठ्या पाटीभर आली. मुंबईला या द्राक्षाना ४० रु. तरी पडतील. आम्ही पाच माणसे ती द्राक्षे ५।६ दिवस खात होतो व काही वाटूनही टाकली. अशी स्वस्ताई येथे आहे. या द्राक्षांचे मद्य करून पितात. '

रसिकतेने संशोधक नजरेच्या पंडितजी सातवळेकरांचा निसर्गसंपर्क जो हिमालयाच्या आसमंतात घडला, त्याची कल्पना पंडितजींनी वरीलप्रमाणे दिली आहे. पंडितजींच्या त्या निसर्गसहवासाची आनंदलहरी अनुभवावयाची असेल तर १९१५ च्या ' नवयुग ' मासिकातील मूळ प्रवासवर्णने वाचली पाहिजेत. आणि तरीही आपण स्वता हिमालयात जाऊन तो निसर्गसंपर्काचा आनंदीआनंद एकदा तरी आपलासा करावा, एवढीच स्फूर्ति त्या लेखानी येईल. हिमालयाचे अनुल्लंघनीयत्व आणि—

**मूकं करोति वाचालं, वाचालं मूकतां नयत् ।**

या हिमालयाच्या परिणामक्षमतांचा अनुभव प्रत्यक्षच घ्यावयास हवा ! हिंदुस्थानच्या उत्तरेकडील त्या प्रचंड पर्वतश्रेणीत जितकी उंच शिखरे आहेत, तितकी दुसरीकडे कोठेही नाहीत. प्राचीन भूगोलवेत्ते या पर्वतराजीना हमॉस, हिमॉस, किंवा हिमोदास म्हणून संबोधीत. आपली वायव्य मर्यादा जी सिंधुनदी, तिच्यापासून काश्मीरमधल्या नंगा पर्वताच्या शिखरापासून पूर्वेकडे वीस रेखांशापर्यंत हिमालय पसरलेला आहे. याच्या एकतृतीयांश भागाचाच पत्ता आतापर्यंत मानवजातीला लागलेला आहे. अगदी वायव्येकडील बाजूस जम्मू व काश्मीर यांचा अर्धाअधिक भाग हिमालयातच आहे. दुसऱ्या पंजाबातील भागात कांग्रा जिल्हा व सिमला–डोंगरीतील संस्थाने समाविष्ट आहेत. पाच हजार मैलापर्यंत या हिमालय पर्वतात पशु-

पतेश्वराबद्दल प्रसिद्ध असलेले नेपाळ संस्थान मुरलेले आहे. हिमालयाच्या पश्चिम भागाचे तीन भागापैकी मधल्या भागात अत्यंत उत्तुंग शिखरे असून तेथून नद्या उगम पावत नाहीत. ह्या श्रेणींच्या उत्तरेस दुसरी श्रेणी आहे. ती श्रेणी हिंदुस्थान व तिबेट या दोन देशांची मर्यादा गणली जाते व हीच जलविभाजक आहे. या पर्वतावरील चिरकाल हिमरेषा पंधरा ते सोळा हजार फूट असते. हिमालयात पश्चिमेकडील बाजूला पाच हजार फूट उंचीवर बर्फ पडते. हिमनद्या या मर्यादेच्या खाली बारा हजार फुटावरून वाहू लागतात. उत्तरहिंदुस्थानचे जीवित या हिमनद्यावरच अवलंबून आहे. नंगापर्वत, नंदादेवी, त्रिशूल, पंचचुल्ही, नंदकोट, गौरीशंकर, धवलगिरी, गोसइस्थान, कांचनगंगा वगैरे एकोणतीस हजारपासून तेवीस हजार फुटावरील शिखरे आपल्या उंचीनी पहाणाराच्या मनाची उंची वाढत असते. हिमालयात, काश्मीरमधील लडाखपासून भूतानपर्यंत दिसून येणारी माणसे इंडो–चिनी वंशाची असून त्यांची भाषा तिबेटी व धर्म बौद्ध आहे. चौदाव्या शतकात सुलतान शिकंदर या मुसलमान बादशहाने आपला धर्म लोकावर बळजबरीने लादल्यामुळे कामीर-मधील नव्वद टक्के लोक मुसलमान झाले; पण जम्मू वगैरे ठिकाणी हिंदुधर्मच जोरात चालत आलेला आहे. हिंदुलोकांची भाषा पहाडी आहे. हे लोक तांदूळ, गहू, जवस, मरुआ, अमरंथ ही धान्ये पिकवतात. ज्या दरीत हवा उष्ण व दमट आहे, त्याठिकाणी मिरची, हळद, आले वगैरे पदार्थ होतात. पण भूकंपाचे धक्के वरचेवर बसतात; चौदाहजार फूट उंची पावेतो वनस्पतींची उत्पत्ति होते; दहा हजार फूट उंचीपर्यंत वाघ वगैरे हिंस्र पशु आढळतात; बारा हजार फूट उंचीपर्यंत पक्षी व वानरे संचार करताना पाहण्यात येतात. हिमालयपर्वतावरील बद्रिकाश्रम, मानस–सरोवर, गिरधरपर्वत, श्रीशैल, श्रीमल्लिकार्जुन, श्रीकृष्णा–भीमासंगम, पाताळगंगा, कर्दळीवन अशी बाबा बुडणगिरीपर्यंत यात्रा करण्याची चाल हिंदूमध्ये आज कित्येक वर्षे असली तरी हिमालयात आधुनिक दृष्टीचे संशोधक १८५० नंतरच शिरले. १८५५ साली श्लॅगीन्ट्वीट बंधु २२,३२९ फूटापर्यंत वर गेले होते. सर्वे ऑफ् इंडिया खात्यातील बाबू शरच्चंद्रदास यानी हिमालयसंशोधनाचे काम कसोशिने केले. संशोधकांच्या मदतीसाठी दिल्लीस एक हिमालय–क्लबही आहे. तरीही '**शिवो भूत्वा शिवं यजेत् ।**' या वचनाप्रमाणे निर्मळपणा आणि निर्मळपणाच अंतर्बाह्य होऊन हिमालयात हिंडावे आणि तेथील शुद्ध, सात्विक, कल्याणप्रद असेल तेच सेवावे, यातच खरा आनंद आहे.

: १२ :

# औंधातील राजकारण

**पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकर** पंजाबातून थेट औंधास आले. औंध हे सातारा जिल्ह्यात साताऱ्यापासून आग्नेयेस सव्वीस मैलावर असलेले गाव. एका छोटया संस्थानची राजधानी. साताऱचे छत्रपति घराण्याचे प्रतिनिधी संस्थानिक हे. त्यांच्या राजधानीच्या पूर्वेस व उत्तरेस टकडया असून गाव खोलात आहे. १९१८ साली व नंतर १९४८ साली संस्थान विलीन होईपर्यंत संस्थानचे क्षेत्रफळ पाचशे एक चौरस मैल होते; लोकसंख्या नव्वद हजार होती; एकंदर वसूल तीन लाखापासून बारा लाखांच्यावर होता. संस्थानचे पंतप्रतिनिधी हे मूळचें किन्हईचे कुलकर्णी. परशुराम त्रिंबक कुलकर्णी यास छत्रपति शाहू ( १७०७ ते १७४९ ) यानी प्रतिनिधिपदाची सनद वंशपरंपरेने दिली. त्यावेळी राजापुरापासून दाभोळपर्यंत कोकणपट्टी धरून सातारा, वाई, मेढें, माण, खटाव, मिरज, कोल्हापूर वगैरे प्रदेश प्रतिनिधींच्या जहागिरीत येत. पुढे कोल्हापुरचे राज्य निराळे होऊन प्रतिनिधीच्या इलाख्यातून कोल्हापूर, पन्हाळा, विशाळगड हे भाग वेगळे सरले आणि विजापूर जिल्ह्याचा थोडा भाग, खानापूर व आटपाडी भाग आले. इंग्रजानी १८१२ ला पंढरपूरचा तह केल्यावर औंध संस्थान म्हणून बहात्तर गावेच उरली. एका गावचा वसूल करून प्रतिनिधी पुढच्या गावी जाईपर्यंत जमा केलेला वसूल खर्ची पडावा, असे हें श्रीमंत संस्थान इंग्रजानी ठेवले होते ! ! राजधानी औंधमध्ये जुने दोन तलाव असून राजवाडयाच्या डाव्या बाजस प्रतिनिधीच्या कुलदेवते ( यमाई ) चे सुंदर देऊळ आहे. गावाजवळ आठशे फूट उंचीचे टेकडीवर यमांईचे प्राचीन देऊळ असून त्याला मूळपीठ म्हणतात. या देवळास तटबंदी असून प्रतिनिधींनी जवळच एक प्राचीन पदार्थ संग्रहालय तयार केलेले आहे.

पंतप्रतिनिधी कलारसिक असल्यामुळे, १८९५ ते १८९७ मध्ये श्रीपाद दामोदर

सातवळेकर औंधास त्यावेळच्या हौशी नटांचे पडदे रंगवून देण्यास आले होते. चित्र-कलेच्या अभ्यासाठी मुंबईस असताना श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधींची झालेली ओळख स्नेहादरात परिणत झाल्यामुळेच १९१८ साली पंडितजी औंधास आतां येऊ शकले. एरवी ते अवघडच झाले असते. कारण विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात पुण्यापासून कोल्हापूरपर्यंत इंग्रजी राज्य उलथून पाडण्यासाठी जे तरुणमंडळींचे स्फोटक प्रयत्न होते, त्या वाऱ्यातून औंधही सुटले नव्हते; तेथील माधवराव हिंगे प्रभृति मंडळीनी दहशतवादांचा अवलंब करून क्रांतिसंघटनाही मांडली होती. औंधबॉम्बकेस ही त्याकाळी गाजली होती. आता, पंडितजीचेच म्हणणे आपण ऐकलेले बरे—

' सन् १९१८ च्या मे महिन्यात मी औंधास आल्यावर वेदांच्या अनुवादाचे कार्य सुरू केले. मुंबईच्या निर्णयसागर व मुंबईवैभव यामध्ये पुस्तकांची छपाई करीत असे व लेखन औंधास होत असे. विक्रीही औंधासच पोस्टाच्या मार्गाने केली जात असे. पंजाब व युक्तप्रांतात आर्यसमाजामुळे माझी परिचित माणसे पुष्कळच होती. त्यामुळे माझी पुस्तके तेथे विकली जाण्यास अडचण पडत नव्हती. गुरुकुलाच्या वार्षिक उत्सवाला जावे व त्यावेळी जाताना व येताना निरनिराळया शहरात हिंडावे. असे केल्याने वेदप्रकाशनाला देणग्याही मिळत व विक्री होई व सर्व व्यवहार नीट रीतीने चालण्यास अडचण पडत नसे. '

' पंजाबसरकार मी कोठे गेलो याचा शोध करीत होते. ६ महिन्यानी मी औंधास आहे असा शोध त्यास लागला. तेव्हा मुंबईसरकारमार्फत औंध दरबारकडे चवकशी झाली. विचारणा झाली की पं. सातवळेकरासारख्याना संस्थानात का राहू दिले जात आहे ? यावेळी ला. हरकिसनलाल, डॉ. सत्यपाल व किश्चलू याना पकडून अटकेत ठेवले होते. मी तातडीने निघालो म्हणून पकडलो गेलो नाही. औंध दरबारला मी फक्त वेदांचा अनुवाद छापीत आहे हे माहित होते, तेव्हा त्यानी इंग्रज सरकारला उत्तर दिले की–' पं. सातवळेकर हे येथे वेदांचा अनुवाद करून तो प्रसिद्ध करीत आहेत. कोणतीही इतर चळवळ करीत नाहीत. ' या जबाबाने यापुढे हे प्रकरण पुढें पेटले नाही. पण मुंबईसरकारकडे माझे हैदराबादचे वास्तव्य, कोल्हापूरचा खटला व पंजाबामधील वास्तव्याचा वृत्तांत पोचला होता. या वृत्तांतात खरे म्हटले तर राजद्रोही असे काहीच नव्हते. तथापि जे काय होते तेही सरकारला पसंत नव्हते. इंग्रज सरकारला धार्मिक चळवळसुद्धा नको होती.'

' महात्मा गांधी १९१४ मध्ये हिंदुस्थानात येऊन कार्य करू लागले होते. तोपर्यंत माझ्यापुढे लो. टिळकांची शिकवण होती. माझ्या हातून जे होईल ते मी लोकमान्यांच्या मार्गाने करीत होतो. लोकमान्याना माझ्या कार्याची माहिती होती व मधून मधून कारणपरत्वे मी त्यास भेटतही होतो. गुप्त कट, शस्त्रांची जमवा-जमव, सशस्त्र उठाव, व प्रतिसहकार याच चळवळी या वेळपर्यंत होत्या. काँग्रेसला मी जात असे. यामुळे काहीतरी मोठा उठाव व्हावा असे रात्रंदिवस मनाला

वाटत असे. '

'सन् १९१५ व १६ या दोन वर्षात गुरुकुल–भूमीमध्ये महात्माजी दोनदा दोन दोन दिवस येऊन राहिले होते. यावेळी त्यांची सेवा रात्रंदिवस करण्याचे काम मला मिळालेले होते. यामुळ निवांतपणे पुष्कळच बोलावयास मिळाले. गुरुकुला-सारख्या संस्था काढाव्या, तरुण पिढीला नव्या विचारानी तयार करावे, नवे विचार तरुण पिढीत मुरल्याशिवाय राष्ट्र वर येणार नाहीं, गुप्तकट नकोत, शस्त्रे नकोत, आम्ही दृढ निश्चयाने सरकारला वळवू व आम्ही म्हणत आहो ते करावयास लावू असे हे यावेळी प्रतिपादन करीत. अजून यांचा कार्यक्रम लोकास कळला नव्हता. पण यात काही नवे तेज आहे असे मात्र मला वाटू लागले व या थोडयाशा सहवासाने माझे मन महात्माजींच्या हालचालीकडे लागले व आकर्षिले गेले. '

' मी हरिद्वारलाच महात्माजीना विचारले की, ' तुमची मते लो. टिळकाना पसंत आहेत काय ? ' त्यावर ते म्हणाले की, ' मी त्याना समजावून सांगण्याचा पुष्कळच प्रयत्न केला. पण माझ्या पद्धतीवर त्यांचा विश्वास बसत नाही ! ' हे स. १९१६ मध्ये झाले. महात्माजी टिळकाशी विरोध टाळीत होते व आपल्या सत्याग्रहाच्या पद्धतीने आपली चळवळ हळूहळू चालवीत होते. स. १९२० मध्ये लोकमान्य दिवंगत झाले व त्याचवेळी त्यानी सत्याग्रहाच्या चळवळीची घोषणा केली व पुढे त्यांची चळवळ वाढत गेली. '

'पंजाबमध्ये ला. लजपतराय प्रथम प्रतिकूल होते. पण पुढे अनुकूल झाले. सर्व आर्यसमाजी कॉंग्रेसमध्ये आले व यामुळे पंजाबमध्ये आर्यसमाजाचा जोर कमी कमी होऊ लागला. बहुतेक आर्यसमाजाचे पुढारी महात्माजींचे अनुयायी बनले. आर्यसमाजाची चळवळ इंग्रजाना नकोच होती. या कारणाने सरकारलाही हे बरे वाटले. '

' पंजाबचे औद्योगिक जीवनाचे नेते ला. हरकिसनलाल मात्र महात्माजीना मिळाले नाहीत. यामुळे पुढे त्यांचा हळू हळू अधःपात होत होत, करोडपति बनलेल्या या लालाजीना शेवटच्या समयी अत्यंत हालअपेष्टा भोगाव्या लागल्या व तशा स्थितीत त्यांचा अंत झाला ! '

' पं. मोतीलाल नेहरू व जवाहरलाल हे महात्माजीशी समरस होऊन काम करू लागले. त्यांची सार्वजनिक महती वाढू लागली.

' इकडे बंगालमध्येही क्रांतिकारक चळवळीचा या महात्माजींच्या चळवळीने अंत झाला व ते सर्व महात्माजीना येऊन मिळाले. अशा रीतीने सशस्त्र चळवळीचा अंत १९३० पर्यंत पूर्णपणाने झाला व राष्ट्रापुढे एकमेव महात्माजींचे तत्त्वज्ञान राहिले व ते वाढू लागले. यामुळे मीही यापुढे महात्माजींचा भक्त म्हणून काम करू लागलो. '

' औंधात येऊन राहिल्यानंतर साताऱ्यास भरलेल्या प्रांतिकमध्ये काँग्रेस अधिवेशनाचा कार्याध्यक्ष म्हणून मला निवडले. त्यामुळे वर्षभर सातारा जिल्ह्यात व आजूबाजूला हिंडून महात्मा गांधीजींच्या नव्या तत्त्वप्रणालीची जागृति करण्याचे काम मला करावे लागले. बहुतेक गावात यासाठी मी हिंडलो. यामुळे मुंबई-सरकारचा असा ग्रह झाला की औंधचे राजेसाहेब पं. सातवळेकराना पोसतात व त्यांच्याकडून इंग्रजी मुलखात काँग्रेसची चळवळ पसरविण्यास मदत करतात. हा आरोप अक्षरशः खोटा होता. पण मुंबईच्या गवर्नराने औंधकराना मुद्दाम बोलावून घेतलें व याबद्दल जाब विचारला. राजेसाहेबांचा यात काहीच संबंध नव्हता. तथापि त्यास गवर्नरासमोर फारसे बोलणे शक्य नव्हते. '

' ही गवर्नराची भेट घेऊन आल्यावर औंधच्या राजेसाहेबानी माझ्यावर ' आठ दिवसात औंध सोडून बाहेर जा, ' अशी नोटीस बजावली. याला उत्तर मी असे दिले की, ' मी औंध संस्थानच्या बाहेर कोणत्याही चळवळीत भाग घेणार नाही. जे काय करावयाचे ते संस्थानच्या प्रजेच्या उन्नतिसाठी करीन.' याप्रमाणे तडजोड झाली व मला औंध सोडावे लागले नाही. या तडजोडीमुळे माझ्या चळवळीची मर्यादा दक्षिणी संस्थानाइतकीच राहिली व या क्षेत्रातही काही कमी काम होते असे नाही. '

' दक्षिणी संस्थानात प्रजापरिषदा स्थापन केल्या व सर्व दक्षिणी संस्थानांची जी परिषद् होती तिला सजीव करण्याचा यत्न चालवला. औंध संस्थानातील ७२ गावे जागृत करण्याचे कार्य काही लहान नव्हते. '

' औंध दरबारचा मी मुख्य पंडित बनलो व औंधच्या प्रातिनिधिक सभेचा सभासद झालो. औंधमध्ये औंध, आटपाडी, गुणदाळ याठिकाणी औंधप्रजापरिषदेची अधिवेशने भरवली व महात्माजींचा सूत, चर्खा, हातमाग, ग्रामोद्धार, ग्रामपंचायत यांच्या सुधारणा करण्याचा कार्यक्रम सुरू केला. या सर्व कार्यक्रमामध्ये श्रीमंत राजेसाहेब प्रजेची सुधारणा करण्याच्या कामी नेहमी पुढाकार घेत असत. त्यामुळे घटनात्मक सुधारणा करण्यासाठी औंधास कोणतीच अडचण आली नाही. प्रत्येक पाच–सात वर्षात ग्रामपंचायतीचे अधिकार वाढविणे, सर्व प्रतिनिधि लोकनियुक्त करणे, या सुधारणा होत गेल्या व पूर्ण स्वराज्य यावयाचे एवढेच शिल्लक राहिले. औंध संस्थानात ज्या सुधारणा होत त्यांचा परिणाम अन्य संस्थानावर होत असे. '

' स. १९४३ मध्ये जमखंडी येथ अखिल महाराष्ट्र संस्थान परिषदेचे अधिवेशन झाले. तेथे श्री अणे हें नियोजित अध्यक्ष होते. सर्व प्रतिनिधि जमले. २ दिवस झालें तरी अध्यक्ष पोहोचू शकले नाहीत. तेव्हा सर्व जमलेल्या प्रतिनिधिनी मला अध्यक्ष बनवले व रात्रौ १ वाजता परिषदेचे अधिवेशन सुरू झाले. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत अधिवेशन समाप्त करावयाचे होते. सर्व कार्य जसे व्हावयाचे तसे

झाले. या परिषदेत दक्षिणी संस्थानांच्या कारभाराचे परीक्षण करावे असे ठरविले. वर्षभर सर्वसंस्थानांत अध्यक्ष म्हणून मला फिरता आले. दुसऱ्या वर्षी श्री बाळासाहेब खेर हे सांगलीला परिषद् भरली तिचे अध्यक्ष झाले व मी उपाध्यक्ष झालो. पुनः वर्षभर उपाध्यक्ष म्हणून सर्व संस्थानात हिंडता आले. पुढल्यावर्षी भोरला ही परिषद् भरली व तेथे श्री मावळंकर अध्यक्ष, नानासाहेब चापेकर, गुप्ते अशांच्या समितीने भोर संस्थानच्या कारभाराचे परीक्षण करून रिपोर्ट करावा असा ठराव पास झाला. चाचणीचे काम सुरू झाले तेव्हा सर्व संस्थानिक घाबरले व मजकडे अनेक प्रकारची प्रलोभने येऊ लागली. पण आमच्या समितीमध्ये प्रलोभनाला बळी पडेल असा कोणीच नव्हता. यामुळे या मावळंकर–समितीचा रिपोर्ट भोरसंस्थानच्या कारभारासंबंधाने प्रसिद्ध केला व या कार्याचा अध्यक्ष म्हणून तो मी प्रकाशितही केला. क्रमाने इतर इतर संस्थानांचे रिपोर्ट प्रसिद्ध व्हावयाचे होते.'

'इकडे औंध संस्थानात मीठ करण्याची अनुज्ञा महात्मा गांधींनी दिली. त्यामुळे जमिनीतून मीठ काढण्याचे काम मिळाल्यामुळे औंधातील ४।५ उठलेली गावे पुनः वसली. महात्माजींच्या मीठसत्याग्रहापासून औंध संस्थानने असा लाभ करून घेतला. महात्माजीकडे यासंबंधाने मला वारंवार जावे लागे. त्यामुळे व त्यांचा कार्यक्रम संस्थानभर चालू असल्यामुळे महात्माजींना औंध संस्थानची व माझीही माहिती झाली. शाळामध्ये खादी निर्माण होऊ लागली. दरबारचा पोशाख खादीचा ठरला. श्रीमंत महाराज खादीशिवाय दुसरे काही वापरीत नसत. यानंतर आपल्या संस्थानाला पूर्ण स्वराज्य द्यावे असे ठरवून त्या स्वराज्याची घटना करून ती महात्माजीना दाखविण्यासाठी जे औंधचे प्रतिनिधि वर्ध्यास गेले ते श्री अप्पासाहेब पंत, मॉरिस फ्रीडमन् व मी असे तिघे गेलो होतो. महात्माजीनी महाराजासाठी होणारा खर्च कमी करा, हे झाले म्हणजे मग मी बोलेन असे म्हटले. यासाठी स्वतः महाराज वर्ध्यास गेले व तेथे खर्चाची कलमे ठरली व महात्माजींच्या संमतीने स्वराज्य–घटना तयार झाली.'

'ही घटना संस्थानला लागू करण्यात आली. ही संस्थानच्या इतिहासात फारच मोठी क्रांति झाली. या सर्व कार्यामध्ये मोठा भाग श्रीमंत व अप्पासाहेब यांचा व अल्पसा भाग माझा होता.'

'औंध संस्थानाचा मान यामुळे वाढला व काही वेळ मी प्रातिनिधिक सभेचा अध्यक्ष राहिल्यामुळे माझाही मान वाढला. स. १९३९ मध्ये हे सर्व झाले.'

'संस्थानात संरक्षकदल कायद्याने सुरू झाले. १६ ते ४५ वर्षांचे सर्व लोक यात दाखल होते. त्यांचा नियामक मी होतो. ७२ गावात हे दल स्थापन झाले. गावात, ग्रामपंचायतेत, अथवा शाळेत, घंटी असे. ती वाजविली विशेषप्रकारे, की सर्वांनी घंटीच्या जागीं यावे, असा संकेत असे. औंधात ५।७ वेळा प्रसंग उप-

स्थित झालें. घंटी वाजवताच सुमारे ३०० स्वयंसेवक जमा होत व औंधावर आलेले भय दूर होत असे. असे हे रक्षकदल सर्व संस्थानभर सुरू झाले. यामुळे औंधसंस्थान अधिक सुरक्षित झाले, असे लोकच बोलू लागले. दंगाधोपा, चोरी-डाका काही नाही. यामुळे इंग्रजीतील कुटुंबे संस्थानात येऊन राहू लागली. हे व्हाइसरॉयाना समजले. त्यानी आपला निरीक्षक पाठविला. त्याने प्रत्यक्ष ही व्यवस्था पाहिली व ' असे संरक्षकदल सर्व भारतात झाले, तर आम्हा इंग्रजाना येथून जावे लागेल ' असे उद्‌गार काढले. या दलामुळे इंग्रजसरकारचा समज संस्थानाविषयी बरा झाला नाही. पण महात्माजींची शक्ति वाढत होती व इंग्रजांची शक्ति कमी होत होती, यामुळे या संरक्षकदलाला धक्का लागला नाही. '

' मला ग्रामपंचायतींचा निरीक्षक म्हणून दर आठवड्यास संस्थानात हिंडावे लागे. यावेळी ग्रामपंचायत, संरक्षकदल वगैरे सर्वांचे निरीक्षण करावे लागे. या निरीक्षक समितीचा मी अध्यक्ष, दोघे नामदार, डॉक्टर व स्त्रीसभासद अशांची समिती फिरत असे. यामुळे ग्रामपंचायतीचे व संरक्षकदलाचे कार्य उत्तम होत होते. '

' १९४२ ची महात्माजींची चळवळ सुरू झाली. चहूकडें अडवणूक होऊ लागली. औंधसंस्थानने आपल्या संस्थानात या चळवळ्या लोकाना फार मोठा आश्रय दिला होता. हजारो लोक इंग्रजी मुलखात चळवळ करीत व औंधसंस्थानात आश्रयास येऊन रहात. औंधास माझ्या घरी या चळवळ्यांच्या नेत्यांची वसतीच असे. सभा माझ्या घरीच होत कार्यक्रम तेथेच ठरत. माझ्या छापखान्यातच पत्रके छापली जात. हे सर्व मुंबईसरकारला कळत असे. पण पुरावा मिळत नसे. सातारा जिल्ह्यात ही चळवळ मोठ्या स्वरूपात झाली. त्याला कारण औंधसंस्थानचें सहाय्य होय. हे सर्व महात्माजीना समजत असे व त्यांचा अभयहस्त औंधसंस्थानवर व मी औंधचा म्हणून माझ्यावर होता. '

' शेवटी भारतात स्वराज्य स्थापन झाले. गांधीवधाची दुर्दैवी घटना घडली. या कारणाने महाराष्ट्रात उत्पाती चळवळ सुरू झाली. या चळवळीमध्ये न घडावे ते महात्माजींच्या नावाने घडले. पुढे संस्थाने विलीन झाली. औंधसंस्थान विलीन झाले त्या त्यावेळच्या सभेत कलेक्टरसाहेबांच्या अध्यक्षतेखाली माझे भाषण झाले. संस्थानचा आधार तुटल्यामुळे औंधासारख्या आडवळणी गावी राहण्यात लाभापेक्षा हानिच अधिक हे पाहून मी औंध सोडण्याचे ठरविले. पुणे–मुंबईपासून बडोद्यापर्यंत जागा पाहिल्या व शेवटी पारडीची ख्रिस्ती मिशनची जागा पसंत केली. तेथे सर्व स्वाध्यायमंडळ आणून कार्य सुरू केले. '

पंडितजीनी अगदी थोडक्यात रेखाटलेले आपले हे औंधमधील वास्तव्याचे चित्र पाहिल्यावर कोणाही विचारवंतास पटेलच पटेल की—

पंडितजींच्या व्यक्तिमत्वाने औंधचा परिसर चांगलाच गाजला. राजकीय, सामाजिक व धार्मिकक्षेत्रे प्रफुल्लित झाली. औंधास त्यानी पूर्णपणे वेदांच्या संशोधनकार्यास स्व-

तःला वाहून घेतले. नावाने हिंदु आणि परंपरेने वेदानुयायी अशा कोटचवधि जनांच्या घरात वेदसंहितेचे ग्रंथ निश्चयाने आढळावयाचे नाहीत, ही किती लज्जास्पद गोष्ट आहे ? म्हणून वेदग्रंथांच्या प्रकाशनाला श्रीमंत बाळासाहेब व पंतप्रतिनिधींनी सर्वतोपरी हातभार लावला. राजसाहेबांच्या सर्वंकष दृष्टीमुळे संगीत, चित्रकला, नाटच आदि सर्व कलाना तेथ उत्तजन मिळत असे. बाहेरचे कलावान् औंधास येत, प्रदर्शने भरत, स्पर्धा होत आणि सर्व कलाबद्दल लहानापासून थोरापर्यंत सर्वांना अमूप व अमाप आपलेपणा निर्माण होई. पंडितजीनी वेदसंशोधनाला जरी वाहून घेतले तरी कलावंत जीवनाकडे पाठ फिरवूनच बसण्याइतके ते अरसिक होणेच शक्य नव्हते. अगदी चित्रकला हातावेगळी केल्याचे ते व लोक बोलत, तरीही आठवडयातून रविवारी थोडा वेळ चित्रे हाती घेतच ! चित्रकलेची आता रजा घ्यावयाची अशी त्यानी भीष्मप्रतिज्ञा केली व बेताबेताने त्यानी ती पार पाडलीही ! पण त्याच भीष्मप्रतिज्ञेतून ' भीष्मप्रतिज्ञेचे ' त्यांचे चित्र निर्माण झाले होते, ही गोष्ट ' संसारातही अद्भूत आणि रम्य असतातच; पहाणारा मात्र पाहिज. ' या सुप्रसिद्ध सुभाषिताचे प्रत्यंतर ठरली आहे. पंडितजींच्या घरात त्यानी व पुढे त्यांच्या चिरंजीव माधवरावानी काढलेली अनेक नयनरम्य चित्र लावलेली दिसत. वेदाभ्यासाच्या गंभीर कार्यात रमणारी पंडितजींची प्रतिभा निसर्गातील सुंदरतेचे आकंठ रसपान करते हे त्यांची चित्र पाहताच जाणवते. अनेक सुंदर कलाकृतीना त्यांच्या कुशल कुंचल्याने कला–जगतात अमर करून टाकले आहे. सागरासारखे घनगंभीर ज्ञान व नाना रंगांची उधळण करणाऱ्या मनोहारि पुष्पांच्या ताटव्यासारखी चित्रकला यांचा पंडितजींच्या ठिकाणी दुर्मिळ व मनोज्ञ असा संगम जसा झाला आहे, तसेच त्यांच्या औंध येथील तीस वर्षांच्या जीवनक्रमाचेही आहे. संकटाना तोंड देण्याचे धैर्य, काम करून फलनिष्पत्तिपासून निराळे राहण्याची धूर्तता, क्रांतिकारक संघटनेचे संरक्षण करण्याची कुशलता, प्रचाराची प्रखरता वगैरे हैदराबाद–लाहोर येथे प्रगट झालेले स्वभावविशेष घेऊनच पंडितजी औंधास आले होते आणि—

आहे तरी सर्वाठायी । पाहो जाता कोठेच नाही ।।

हा त्यांच्यातील राजकारणी रामदासाचा बाणाही सुटलेला नव्हता. त्यामुळे पंडितजीच सांगतात त्याप्रमाणे—

' १९२० साली मला ( पंडितजीना ) सोमणानी ( लोकप्रिय भाऊसाहेब सोमण सातारा ) जिल्हा काँग्रेसकमेटीचा अध्यक्ष केले. माझे दौरे सुरू झाले. ' आणि ते साताऱ्च्या मॉयसीसारख्या कलेक्टराच्या डोळयावर आल्यावर, त्याने औंध संस्थानाधिपतीना छेडताच, संस्थानी प्रजेची व वेदांचीच सेवा करण्याच्या अभिवचनावर निभावून गेले ! ! पुढे सातारा जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष अष्टपुत्रे वकील झाले आणि पंडितजी प्रथम औंधसंस्थानच्या प्रजाजनांच्या सेवेस लागले. १९२१ पासून संस्थानच्या अर्थसंकल्पावर लोकधुरीणांची सल्लामसलत

घेण्याची सुरवात पंतप्रतिनिधींनी केली. तिचे उगमस्थान पंडितजींच्या स्नेहपूर्ण विधायक सल्लामसलतीत होते, हे आता देवच बोलून चुकला आहे. त्यामुळे तर १९२२ पासून ग्रामपंचायतींच्या संघटना उभारण्यास औंधसंस्थानभर पंडितजींनी सुरवात केली. पंडितजींच्या अशा पाऊलटाकीतून आणि त्यांच्या वेदाभ्यासातून ग्राम-सुधारणांचे आराखडे जेव्हा तयार होऊ लागले, त्यावेळी सोलापूरचे श्री त्र्यं. ना. आत्रे यांच्या ' गावगाडा ' या पुस्तकातील मार्मिक उहापोहाचाही उपयोग झालेला दिसतो. त्या पुस्तकात ग्रामसंस्थेचे संपूर्ण चित्रण आहे. ते वास्तव आणि हृद्य असल्या-मुळे जुन्या ग्रामसंस्था व इंग्रजांच्या कायद्याने निर्माण केलेल्या ग्रामसंस्था यांच्या तुलनात्मक अभ्यासाने नवीन काळास साजेसे नवीन स्वरूप कसे द्यावे याच्या कल्पना सर्वत्र वाढीस लागलेल्या दिसतात. सातारा जिल्ह्याच्या ब्रिटिश रियासतीत परचुरे शास्त्री यानी सातारा तालुक्यातील ' खेडेगावच्या यात्रा ' सुरू केल्या होत्या आणि पुढे तो उपक्रम कऱ्हाड तालुक्यातील ' तराळकी ' म्हणून चालू झाला. विसाव्या शतकाची पहिली पंचविशी उलटावयाच्या सुमारास हे सर्व घडत असता, ' आमचा गाव–बदलापूर ' कर्ते श्री. ना. गो. चापेकर हे औंधास हायकोर्ट जज्ज म्हणून आल्या-वर खेडेगावाची तपशीलवार पहाणी करण्याचे चालते बोलते शास्त्रच औंधापर्यंत येऊन पोहोंचल्यासारखे झाले. तेव्हा औंधसंस्थानातील ग्रामपंचायतींना व ग्रामव्यव-स्थेला हळूहळू बाळसे येत असता, त्यांचे कालानुरूप आदर्श स्वरूप कसे असावे आणि प्रत्येक गाव आणि पर्यवसानाने ग्रामसमूह व एकंदर संस्थान अन्नस्वावलंबी, वस्त्रस्वावलंबी, संरक्षणस्वावलंबी कसे होईल याचा तीव्रतेने विचार होऊ लागला. एवढ्यातच नव्या दृष्टीचे औंधचे राजपुत्र अप्पासाहेब पंत बॅरिस्टर होऊन आले, ते ' **राज्य हवे गरीबांचे ।** ' ही घोषयात्रा करीत आले. तिच्यातून, औंधसंस्थानची घडण झाली. हे पहा तिचे चित्र—

' सर्व दक्षिणी संस्थानांच्या नव्हे तर भारतीय संस्थानी राजवटीत औंध संस्थान आघाडीवर होते. संस्थानात कोठे राजकीय सुधारणांचा उच्चार होण्यापूर्वी म्हणजे १९२१ मध्ये औंधचे प्रगमनशील अधिपति बाळासाहेब पंतप्रनिधि याना संस्थानच्या अंदाजपत्रकाबाबत प्रजाधुरीणांचा सल्ला घेण्यास सुरवात करून राजकीय सुधारणांचा पाया घातला. अशा तऱ्हेची प्रथा सुरू करणारे हेच पहिले संस्थानिक होत; आणि पुढील अठरा वर्षांच्या काळात आपल्या संस्थानात जबाबदार राज्यपद्धतींची स्थापना करणारा हा पहिलाच राजा होय. १९३९ मध्ये ग्रामपंचायतीवर अधिष्ठित असलेली संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यात येऊन प्रजला पूर्ण स्वराज्य देण्यात आले. श्रीमंत बाळासाहेब औंधकर याना त्यांचे सुपुत्र बॅ. अप्पासाहेब पंत यांचे विधा-यक सहकार्य लाभल्यामुळे राजेसाहेबाना आपल्या संस्थानात संपूर्ण जबाबदार राज्य-पद्धति स्थापन करणे सोपे झाले. औंधच्या राज्यघटनेला महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू आदि महामनांचा आशीर्वाद लाभलेला होता. औंधातील हा नवा प्रयोग यशस्वी

होईल की नाही याची शंका कित्येकाना वाटत होती, पण अनुभवाने ती फोल ठरली. ग्रामपंचायतींचा कारभार चांगला झाला. औंधसंस्थानच्या राजकीय सुधारणांच्या कामी श्री लक्ष्मणराव किर्लोस्कर, पंडितजी सातवळेकर, बॅ. अप्पासाहेब पंत यांचे श्रम कारणी पडले. औंध–प्रातिनिधिक सभांची अधिवेशने वेळेवर होत असूनही १९३१–१९३७ च्या दरम्यानच्या काळात औंध–प्रजापरिषदेची चार अधिवेशने झाली, आणि लोकांच्या स्थानिक तक्रारीना वाचा फोडण्यात आली.' ( दक्षिण महाराष्ट्रातील विलिनीकरणाची कथा ).

पंजाबच्या ओडवायरी अरेरावीतून औंध येथे स्नेहसंबंधाच्या पदराने आश्रय घेऊन बसलेले पंडितजी औंधसंस्थानच्या राज्ययंत्रणेला नुसते ' **हितं मनोहारि च दुर्लभं** वचः । ' ऐकवत बसले नाहीत. तर आपल्या स्नेहसंबंधातून ' **अप्रियस्यापि पथ्यस्य श्रोता वक्ता च दुर्लभः।** ' म्हटले गेलेले अनुभवामृत त्यानी औंध येथे साकार व साक्षात् करून दाखवले. औंध येथील विधिमंडळात पंडितजी निवडून येत. तेव्हा विधिमंडळाच्या चतुष्कोणातही लोकप्रतिनिधीने कसे काम करावे याचा धडा त्यानी घालून दिला.

औंध संस्थानात प्रातिनिधिक सभेची अधिकार–वाढ होऊन १९२६ साली कायदे करण्याचे व राज्यकारभारासंबंधी सर्वसाधारण ठराव मांडण्याचे अधिकार मिळाले. या वर्षापासून सभेची बैठक डिसेंबर व जून महिन्यात भरण्याची प्रथा सुरू झाली. १९२६ च्या पहिल्याच सभेत पंडितजी सातवळेकर यानी ' काटकसर करून बचत होईल ती रक्कम व अनावश्यक लोक कमी करून बचत होईल ती रक्कम ( संस्थानच्या ) कर्जफेडीकडे देण्याबद्दल सुचविले.' ( संस्थातील लोकशाहीचा लढा पृ. ८६ ). ' संस्थानचे उत्पन्न जर पूर्वीपेक्षा वाढलेले आहे, तर अशी हलाखीची स्थिति का ? ' असा रोकडा सवाल त्यानी टाकला. ' सत्तर हजार रुपये वाढलेले आहेत व त्यांचा विनियोग कर्जफेडीकडे होणार म्हणून आश्वासन आहे, पण तसे होणे शक्य दिसत नाही, असे स्पष्ट मत त्यानी मांडले. पंडितजी सातवळेकर यानी कारभार ( चौकशी ) कमिशन नेमण्याची एका ठरावाने मागणी केली व तो ठराव पास झाला. याशिवाय पंडितजीनी मार्गदर्शनाचेही काम केले होते. १९२६ च्या डिसेंबरचे बैठकीत पंडितजी सातवळेकरानी आपल्या भाषणात स्पष्टपणे सांगितले की, ' लोकप्रतिनिधींना हे पक्के समजून चुकले आहे की, आपले कोणी ऐकत नाही. लोकांनी ज्यावेळी आम्हाला निवडून दिले, त्यावेळी त्यानी हेच विचारले की, तुम्हाला मागच्या तीन वर्षी निवडून दिले ते जमीनसारा दीडपट करण्यासाठीच की काय ? गुदस्त साली ठरल्याप्रमाणे अर्थसंकल्पानुसार खर्च न होता पसतीस हजार रुपये जास्त खर्च झाला व प्रातिनिधिक सभेच्या संमतिशिवाय जमीनसारा दीडपट वाढविला. तो काय म्हणून ? '

सन् १९२९ च्या डिसेंबर महिन्यात ' १९३० च्या औंधसंस्थानच्या नवीन राज्य-


घटनेचे विधेयक ( बिल )' सभेपुढे आले. पंडितजी सातवळेकर यानी ' बिलाप्रमाणे अंमल बजावणी झाली, तर येथे रामराज्य होईल ' म्हणून त्याची मुक्तकंठाने स्तुति केली.

सन् १९२८ व १९३५ साली इन्कम् टॅक्सबिल आले असता त्यास अ. वि. पटवर्धन, ल. का. किर्लोस्कर, ओगले, दर्शने यांचेप्रमाणेच पंडितजींनी विरोध केला. कारण संस्थानात दर–डोई कर सरासरीने साडेसहा रुपयेपर्यंत पडत होता ! ' गेल्या पाच वर्षांच्या सरासरीने संस्थानचे उत्पन्न अचूक कसे ठरवावे व त्यापैकी कर्जफंड नि गंगाजळीसाठी रकमा निराळ्या काढून शिल्लक रकम सर्व खात्यामध्ये खर्चाच्या वाटणीसाठी ठेवावी ' अशी पंडितजीनी भलावणी केली. सन् १९३३ मध्ये पंडितजीनी शेतसारा कसा कमी करता येईल यासंबंधी विचार व्हावा म्हणून तज्ज्ञांची कमेटी नेमण्यासंबंधी ठराव मांडला. पण तो तहकूब झाला. १९३४ मध्ये पंडितजी पुन्हा निवडून आले. तेव्हा १९३७ मधील आटपाडी महालातील दुष्काळामुळे दोन हजार शेतकऱ्यांचा मोर्चा २९ ऑगष्ट १९३८ रोजी औंधास आला असता, अप्पासाहेब पंत, रामभाऊ इंगळे व पंडितजी सातवळेकर त्यास सामोरे गेले. लोकप्रतिनिधि म्हणून मोर्चा काढणाराचे म्हणणे व दुष्काळाची कहाणी त्यानीं जिव्हाळ्याने ऐकून घेतली व पीडितांच्या दुःखविमोचनाच्या विधायक कार्यास त्यानी प्रारंभ केला.

औंध संस्थानच्या छोट्याशा कार्यक्षेत्रात पंडितजीनी वरील तऱ्हानी बजावलेली कामगिरी खरोखर—

> **आचार्यो ब्रह्मणो मूर्तिः, पिता मूर्तिः प्रजापतेः ।**
> **भ्राता मरुत्पतेर्मूर्तिः, माता साक्षात् क्षितेस्तनुः ॥**
> **दयाया भगिनी मूर्तिः, धर्मस्याऽत्माऽतिथिः स्वयम् ।**
> **अग्नेरभ्यागतो मूर्तिः सर्वभूतानि चात्मनः ॥**

या भागवतातील ( षष्टस्कंध अ. ७।२९–३० ) श्लोकांची आठवण करून देते. संस्थानची आणि त्यातील पंडितजीसारख्यांची वरील तऱ्हेची कामगिरी यांची मूर्ति लहान असेल, पण त्यांची कीर्ति जी थोर झाली ती, त्या संस्थानचे व कामगिरीचे धोरण कालोचित व कर्तव्यप्राप्त होते म्हणूनच ! चंद्र किंवा सूर्य यांच्या तेजाची बरोबरी काजव्याच्या दीपिकेला आहे, असें कोणीच म्हणणार नाहीं, हे जरी खरे असले तरी, सूर्याबरोबरीने चंद्रालाही आपल्या तेजाची प्रौढी मारता येत नाही. शिवाय, '**परतस्तु तेजोबलम्** ' असलेल्या चंद्रापेक्षा काजव्याची पार्श्वदीपिका खासच कमी तेजस्वी असली तरी ती चंद्रापेक्षा स्वयंसिद्ध आहे, हा अभिमान काय कमी आहे ? औंध संस्थानासंबंधी विचार मनात आला म्हणजे, इतर संस्थानासंबंधी विचार तुलनात्मक दृष्टचा आल्याशिवाय रहात नाहीत. त्या पार्श्वभूमीवर औंध-संस्थान आणि त्यातील पंडितजीसारखें कार्यकर्तें यांची कामगिरी कितीतरी उठावदार आढळते. पहा की—



ब्रह्मसमाज मंदिर, अनारकली, लाहोर




पं. सातवळेकरांचा लाहोर येथील स्टुडिओ १९१२



पंडितजी १९१३



सौ. सरस्वतीबाई १९१३



मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये असतांना. वेरूळ सफर : १८९०




औंध येथील रहाते घर व स्वाध्याय मंडळ १९२५



पंडितजी : १९३३




स्वाध्याय मण्डळ — भारत मुद्रणालय, पारडी : १९४८



मुंबईचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश व पंडितजी १९५७




९० व्या वाढदिवसप्रसंगी
मुंबई मुक्कामी : डॉ. मुनशी,
डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर
आणि पंडितजी : १९५७



स्वाध्याय मंडळाच्या कर्मचाऱ्यांसमवेत, औंध : १९२३




औंध येथील रहाते घर : १९२१



घर, पारडी : १९४८



वेदमंदिर, पारडी : १९५४





सौ. सरस्वतीबाई व चि. वसंत, लाहोर १९१५

◀ लाहोर येथे पंडितजी १९१५




पंडितजी : १९१४



पंडितजी : १९३०



पंडितजी : १९१८



पंडितजी : १९३३

औंधसारखे प्रगमनशील व आघाडीवर असलेले एक संस्थान महाराष्ट्रात असताना, त्याच प्रदेशात भोरसारखे प्रतिगामी संस्थान पहावयास सापडले. भोरातील चळवळ १९२१ मध्ये जी सुरू झाली, तीच मुळी सभाबंदीचा कायदा मोडून ! आणि हा कायदा कोणी मोडला ? तर न. चिं. केळकर व वामनराव पटवर्धन यांच्यासारख्या संस्थानी चळवळीच्या सात्विक प्रवर्तकानी ! यावरून भोरातील राजवट कशा तऱ्हेची होती याची कल्पना येईल. भोरातील प्रजापक्षीय लढा हा अत्यंत तेजस्वी असून, खालसातील कोणत्याही चळवळीस मागे टाकील. गोपीनाथपंत पोतनीस, भाऊसाहेब शेटच हे भोरातील चळवळीचे कणधार. या नेत्यांची आपल्या अनुयायावर इतकी छाप होती की, त्यांच्या हाकेसरशी हजारो मावळे डोंगरकपारी तुडवीत ठरलेल्या ठिकाणी येत असत. पोतनीसाना भोरदरबारचा अनेक वेळा पाहुणचार घ्यावा लागला. इतरही अनेक कार्यकर्ते राजबंदी झाले होते. पण या दडपशामुळे भोरची प्रजा नामोहरम झाली नाही. प्रजापरिषदेला विरोधीपक्ष म्हणून ज्यानी लोकपक्ष काढला आणि ज्या लोकपक्षाला दरबारी पाठिंबा होता, त्या धुरिणास व लोकपक्षासुद्धा सचिवांच्या कारवाईची इतकी शिसारी आली की, त्यानी प्रजासभेचा आश्रय घेतला. चंद्रशेखरराव आगाशे व ग. मा. पानसे हे अशापैकी होत. भोरप्रजापरिषदेची १९२२ ते १९३९ च्या कालखंडात बारा अधिवेशने झाली. १९२८ मध्ये परिषदेच्या दडपणामुळे विधिमंडळ स्थापले गेले. पण सचिवांची राजकीय वृत्ति अत्यंत आकुंचित व कृपण असल्यामुळे, राजकीय सुधारणांच्या बाबतीत ते संस्थान मागासलेलेच राहिले. आपल्या संस्थानातील सुबुद्ध, शहाण्या, संघटनाकुशल अशा पुढाऱ्यांचा सल्ला सचिवानी घेतला असता, तर भोरचा कायापालट झाला असता. पण प्रजाजनांचा दुवा मिळविण्याचे भाग्य काय वाटेवर पडलेले असते ? ब्रिटिश साम्राज्याच्या धोरणास आणि रेसिडेंट साहेबासारख्या ब्रिटिशसाम्राज्याच्या प्रतिनिधीचे स्वभावलहरीस नौकरशाहीपेक्षाही संस्थानिक जपत असत. कारण त्यांची मर्जी खप्पा झाली तर संस्थानातील आपले अधिकार टिकतील की नाही अशी शंका ठिकठिकाणचे संस्थानिक व कालौघ आकलन ना झालेले त्यांचे खरेखोटे सल्लागार याना नेहमी येई. नवा डलहौसी निदान आपल्याबाबत तरी निर्माण होऊ नये म्हणून जपता जपता, ब्रिटिश अधिकाऱ्यांची मर्जी सांभाळण्याकरता, त्यांच्या जुलूमशाहीच्या एकापेक्षा एक वरचढ आवृत्त्या संस्थानिक काढू लागल्यावर लोकप्रियता मिळवण्याची पात्रता राजेसाहेबांच्या ठायीं कोठून येणार ? त्यामुळे भोरांत सत्याग्रह व कायदेभंगाचे जेवढे प्रकार घडले आणि दडपशाही झाली, तेवढी द. महाराष्ट्रातील कोणत्याहि संस्थानात झाली नाही.

दक्षिण महाराष्ट्रीय संस्थानात वाडी जहागिरीसकट जी अठरा संस्थाने आहेत, त्यात कोल्हापूर हे सर्वात मोठे संस्थान होय. कोल्हापूर ही छत्रपति शिवाजी महाराजाची गादी असल्याने कोल्हापूर संस्थानाबद्दल एक विशेष प्रकारचा आदर व

आपुलकी कोल्हापुरच्याच काय, पण महाराष्ट्रीय जनमनात रुजलेली आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी कोल्हापुरात राजकीय चळवळ आली, पण दडपशाही करून ती मारून टाकण्यात आली. या वेळेच्या चळवळींतील प्रमुख बळी म्हणजे कै. प्रो. विजापूरकर, कै. प्रो. वा. म. जोशी व पं. सातवळेकर हे होत. जेव्हा जेव्हा राजकीय जागृति करण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा तेव्हा तो निर्घृणपणे दडपून टाकण्यात आला. कै. श्री. सर शाहूमहाराज छत्रपति हे अत्यंत कर्तबगार होते. पण त्याना राजकीय जागृतीचे वावडे ब्रिटिश सरकारच्या रेसिडेंटला खूष ठेवण्यासाठी तर होतेच; पण आपण इंग्लंडच्या आठव्या हेन्रीसारखे जे वागतो, त्याचा बभ्रा हे लोकचळवळे करतील व त्यायोगे आपणास कदाचित् कमीपणा येण्याचा संभव, म्हणूनही होते. कोल्हापुरात त्यानी व कै. सर राजाराम महाराजानी शिक्षणाचा प्रसार केला, सामाजिक समतावादाचा पुरस्कार केला, पण राजकीय सुधारणांच्या बाबतीत मात्र आपल्या प्रजेला त्यानी अज्ञानी व मागासलेले ठेवले. इतर महाराष्ट्रीय संस्थानात थोडचा फार राजकीय सुधारणा प्रजेच्या पदरात पडल्या. औंधसारख्या छोटचा संस्थानात संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति अंमलात आणली गेली. पण कोल्हापुरात मात्र एक–जिनसी हुकूमशाहीच छत्रपतीनी चालू ठेवली. कोल्हापूरच्या या निरंकुश राजसत्तेवर १९३८ मध्ये फार जोराचा प्रहार भाई माधवराव बागल यानीं केला. ता. ६।२।१९३९ रोजी जयसिंगपूर येथ कोल्हापूर प्रजापरिषदेची रीतसर स्थापना झाल्यावर पुढे दरबार व परिषद् याच्यामध्ये झगडा सुरू झाला. श्री. रत्नाप्पा कुंभार या चांगल्या संघटकाचा लाभ कोल्हापूर परिषदेस झाल्यामुळे फारच थोडचा काळात कोल्हापूर परिषद् ही प्रभावी संस्था झाली. ता. १५–४–१९३९ रोजी कै. डॉ. पट्टाभि सीतारामय्य याच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूर परिषदेचे पहिले अधिवेशन घ्यावयाचे ठरलें. तरी ते ( औंधसंस्थानच्या प्रजापरिषदा संस्थानहद्दीत भरत, तसे ) कोल्हापूर संस्थानच्या हद्दीत भरविण्याची सोय नव्हती ! म्हणून ते अधिवेशन कोल्हापूरपासून तीस मैलावर सांगली नजिकच्या कुपवाड माळावर भरले होते ( संस्थान हद्दीत प्रजापरिषद् भरवण्यास बंदी होती ). परिषदेच्या कार्याला आता यश येण्याचे प्रमुख कारण म्हणजे मागीलप्रमाणे राजकीय चळवळीचे पुढारी ब्राह्मण नव्हते, तर भाई बागलाप्रमाणे छत्रपतीच्या रक्ताचे म्हणजे मराठे होते. भाई माधवराव बागल हे खंदे वक्ते असून त्याच्या वक्तव्याचा श्रोतृगणावर फारच उत्तम परिणाम होत असे. ते बहुजन–समाजाच्या भाषेत आणि त्याच्या जीवनाशी समरस होता येईल अशा थाटाने बोलत असल्यानें, ते थोडचाच काळात लोकप्रिय पुढारी झाले. सभाबंदीचा हुकूम मोडल्यामुळे ते व त्यांचे सहकारी याना दरबारी रोषास बळी पडावे लागले. त्याचा परिणाम परिषद् जास्तच लोकप्रिय होण्यात झाला. भाई बागल व श्री. रत्नाप्पा कुंभार याच्या जोडीने कोल्हापूरच्या दुर्गम राजसत्तेला खिंडार पाडले हे निर्विवाद. कोल्हापुरची पहिली परिषद् भरविण्याच्या खटाटोपात कोल्हापूर प्रजेला अडचणीच अडचणी आहेत हे कळल्यावर संस्थानी प्रजा व ब्रिटिशहद्दीतील प्रजा स्वतंत्र हिंदु-

स्थांनात एकच होणार हे जाणून श्री. शंकरराव देव, ह. मो. जोशी व वा. वि. शिखरे यानी भाई बागलाना बरीच मदत केली होती.

अक्कलकोट संस्थानात १९२३, १९२४ व १९२९ या तीन वर्षी प्रजापरिषदाची अधिवेशने झाली. परिषदेबावत दरबारचे धोरण सहानुभूतीचे तर नव्हतेच उलट दडपशाहीचे होते. कार्यकर्त्यांना फारच त्रास देण्यात आला, त्यामुळे पुढे बरीच वर्षे परिषद् भरलीच नाही. मात्र १९३८ च्या दसऱ्याच्या मुहूर्तावर अक्कलकोट दरबारने राजकीय सुधारणा देण्याचे जाहीर केले.

मुधोळची राजवट दडपशाहीबद्दल प्रसिद्ध. कै. नानासाहेब मसूरकरांसारख्या सत्प्रवृत्त कार्यकर्त्यास या दडपशाहीची चांगलीच झळ बसली होती. त्यावेळचे राजेसाहेब १९३७ मध्ये निधन पावल्यावर मूधोळातील राजकीय जीवनास प्रारंभ झाला. मुधोळची पहिली परिषद् भरवावयास, लोकजागृति करून आणि संस्थानी प्रजेबद्दल जिव्हाळा बाळगणाराचा सहकार साधून थोडाथोडका नाही, तीन एक वर्षाचा काळ लोटला व ता. १८–४–१९४० रोजी डॉ. नागनगौडा याच्या अध्यक्षतेखाली मुधोळ राजकीय परिषद् झाली.

जंजिरा व सावनूर या दोन मुसलमान अधिपतींच्या संस्थानापैकी जंजिरा संस्थानात १९२६, १९२७ व १९३२ मध्ये परिषदेची तीन अधिवेशने झाली. त्यामुळे दरबार खवळून जाऊन तेथ दडपशाही करण्यात आली, आणि कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकण्यात आले. त्यामुळे पुढे चळवळीचे पाऊल मागे पडले ते पडलेच. सावनूर संस्थानात कोणतीच राजकीय चळवळ झाली नाही.

—( **संस्थानाच्या विलिनीकरणाची कथा** )

आपल्याच रक्तमासाच्या प्रजेबद्दल बेफिकीर, बेगुमान आणि बेमुर्वत असलेल्या अशा संस्थानी राजवटीच्या मानाने औंधसंस्थान कमालीचे प्रागतिक होते, हे अभ्यासकाला मान्यच करावे लागते. त्यायोगे पंडितजी सातवळेकरासारखे प्रजाजनाचे मार्गदर्शक आणि गुणग्राहकतेने लोकप्रतिनिधींच्या म्हणण्याला मान देणारे व कालोचित असा संस्थानचा कायापालट कर्तव्यबुद्धीने करावयास तयार असलेले संस्थानिक या दोघाबद्दलचाही आदर वाढल्याशिवाय रहात नाही.

औंधसंस्थानात १९३२ सालीच पूर्ण जबाबदार राज्यपद्धति चालू झाली होती. फलटण व सांगली या दोन संस्थानात द्विदल राज्यपद्धति चालू होऊन लोकपक्षीय मंत्री संस्थानच्या शासनात अंशभागी झाले होते. मिरज व मिरजमळा येथे कमीजास्त अधिकाराची विधिमंडळे आलेली होती. कुरुंदवाड ( धाकटीपाती ) मध्ये राजकीय सुधारणाचे आश्वासनच होते. कोल्हापूर व कुरुंदवाड ( थोरलीपाती ) येथे राजकीय सुधारणाचे आश्वासनही नव्हते. अशा स्थितीत ग्रामस्वावलंबी जबाबदार राज्यपद्धति जी १९३९ पासून औंधसंस्थानात सुरू झाली, तिला महात्माजीनी आशीर्वाद

*

दिल्यापासून ब्रिटिशसरकार चमकून होतेच; पण पंडितजीसारख्यांच्या देखरेखी-खाली चाललेली ग्रामरक्षकदले पाहून व्हाइसरॉयाच्या प्रतिनिधीला काय वाटले, ते पंडितजींच्याच शब्दात मागे आलेच आहे.

परकीय सत्तच्या प्रतिनिधीला काही वाटो न वाटो, आपले आपल्यापुढे तरी साध्य काय ? याचाही आवाका असा की, ग्रामपंचायतीचे स्वराज्य याचा स्पष्ट अर्थ, हाच की शेतकरी, कामकरी, खेडूत हा आपले गाव स्वावलंबी व समृद्ध करण्यासाठी बेकारीबाहेर पडला पाहिजे. उत्पादन–विकास करण्यास, निदान पूर्वोत्पादनात घट येऊ द्यावयाची नाही ही दक्षता घेण्यास केवळ धनार्जनाचा लोभ उपयोगी पडत नाही. दारिद्र्याला सरावलेली त्यांची शेवाळलेली मनोवृत्तीच पालटली पाहिजे. त्यासाठी सुखी, समृद्ध जीवनाचीं सचेतन विचारसरणी त्याच्यामध्ये रुजवून अभिलाषा आणि महत्त्वाकांक्षा याचे व्याप–आटोप मांडण्यास त्याना प्रवृत्त केले पाहिजे. तसे करताना खड्याची निमशहरे झाली तरी हरकत नाही. त्यासाठी समृद्ध जीवनाची साधने, त्या साधनाच्या उत्पादकानी खेडूतांच्या दाराशी नेऊन ठेवली पाहिजत आणि खेंडूतांच्या उत्पादनातून स्वतःच्या दैनंदिन गरजास आवश्यक तो माल घेतला पाहिज. सह-कारी सर्वोदयी समाजरचना ज्याला आजकाल संबोधले जाते, त्याचे बीज ग्राम-पंचायतीचे स्वराज्य या कल्पनेत होते. ग्रामीण विभागातील औद्योगिक क्षेत्रे नव्याने जिवंत वा जागृत करून तेथील श्रमिकाचे उत्पन्न गणितश्रेणीने वाढविलेच पाहिजे. औंधसंस्थानचा तो प्रभावी सुधारणा–कायदा आणि त्याची अंमलबजावणी हाच, पुढे १९४२–४५ मध्ये चलेजावच्या चळवळीत जो सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार स्थापण्याचा प्रामाणिक प्रयत्न झाला, त्याचा मूळ कित्ता ठरला होता. या औंधच्या राज-कीय सुधारणासंबंधी पंडितजींचा अभिप्राय स्वागतार्ह वाटल. ते म्हणतात की—

' संस्थानी राज्ये नि कुश होती. निरंकुशतेचा वाईटपणा जनतेस कळून चुकला होता. ही संस्थानिकांची निरंकुशता कमी व्हावी व प्रजेच्या पुढाऱ्याना राज्यकारभारामध्ये काही अधिकार मिळावे यासाठी संस्थानी प्रजेमध्ये चळ-वळीही चालू होत्या. त्या चळवळीना जो परिणाम औंधसंस्थानात घडून आला तो विशष लक्षपूर्वक पाहण्यासारखा होता.

' औंधसंस्थानातील चळवळीचा रागरंग पाहून औंधच्या विचारशील राजे-साहेबानी आपल्या प्रजेस जे हक्क दिले ते असे—

( १ ) प्रत्येक गावात लोकनियुक्त ग्रामपंचायत असावी.

( २ ) ग्रामपंचायतीत गावातील सर्व खटल्यांचा निवाडा करावा.

( ३ ) ग्रामरक्षकदल प्रत्येक गावात स्थापावे व त्याप्रमाणे प्रत्येक रात्री गावात पहारा द्यावा व ग्रामसंरक्षण करावे.

( ४ ) गावाची स्वच्छता व इतर आरोग्यसाधनानी करावयाची कामे या ग्रामरक्षकानी करावी.

( ५ ) गावाचे सर्व खटले व इतर कामे यथायोग्य करण्याचा अधिकार संरक्षकदलाला असावा.

' त्याप्रमाणे घडले. गावागावात विलक्षण समाधान उत्पन्न झाले. '

चाललेला राज्यकारभार आपल्या प्रतिनिधीमार्फत चालला असून तो आपल्याच कल्याणकरता चालू आहे, असा प्रजेपैकी प्रत्येकाला संतोष असणे, हाच स्वराज्याचा जिवंत जिह्वाळा होय.

: १३ :

# राष्ट्रीय स्वयंसेवकसंघात पंडितजी

पंडितजी सांगतात—

' सन् १९३६ मध्ये माझा प्रवेश राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सातारा येथे झाला व याचवेळी मी या संघाची प्रतिज्ञा घेतली व औंधसंस्थानातील शाखांचा प्रमुख व औंधशाखेचा संघचालक म्हणून मी काम करू लागलो. हिंदुजातीला बलवान् करणारा रा. स्व. संघ आहे हे मला या संघात १६ वर्षे काम करून पटले आहे. या संघाचे कार्य पाहण्यासाठी मी सर्व हिंदुस्थानभर हिंडलो आहे. क्वेट्टा, पेशावर, रावळपिंडी, मुलतान, अमृतसर, लाहोर, सियालकोट, जम्मू, होशियारपूर, पतियाळा, दिल्ली आदि शाखांचे कार्य पाहून मला फारच समाधान झाले. पंजाबचा उत्साह अवर्णनीय असे. पंजाबमध्ये या संघाने अशा शेकडो गोष्टी करून दाखविल्या आहेत व त्यामुळे आपली कर्तबगारी त्याने सिद्ध केली आहे. फाळणीनंतर पळवापळवीच्या वेळी हजारो स्वयंसेवकांनी शौर्याची शर्थ करून हजारो हिंदूंचे प्राण वाचवले आहेत. याकामी दीडशे स्वयंसेवक प्राणास मुकले आहेत. हे अपूर्व सेवेचे कार्य त्यांनी केले आहे.

' उत्तरप्रदेश, बिहार, बंगाल, मध्यप्रदेश, राजस्थान, काठेवाड, गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशातील संघशाखा मी समक्ष जाऊन पाहिल्या आहेत. सर्वांत मला पंजाबी स्वयंसेवकाचे काम मनापासून आवडले. इतके हिंडून व फिरून प्रत्यक्ष पाहून मी आपली पक्की खात्री करून घेतली की संघ हा हिंदूंना संघटित करणारा आहे.

' अशी खात्री करून घेऊनच मी संघाचे कार्य करू लागलो. औंधची आमची शाखा सर्व सातारा जिल्ह्याच्या शाखामध्ये विशेष महत्त्वाची शाखा समजली जात असे.

' महात्माजींच्या वधानंतर काही एक संबंध नसताना सरकारने संघावर निर्बंध घातला. यावेळी पुष्कळांना बंदीवास भोगावा लागला. हे फारच वाईट झाले. प्रत्यक्ष महात्मा गांधींच्या चिरंजीवानी रेडियोवर गांधीवधाच्या तिसऱ्याच दिवशी असे प्रसिद्ध केले की जर संघाच्या स्वयंसेवकांस महात्माजींचा वध होणार हे माहित असते, तर त्यानी आपल्या प्राणांचा बळी देऊन महात्माजींचे संरक्षण निःसंशय केले असते.

' संघ पूर्णपणे निर्दोष होता. इतकेच नव्हे तर दिल्लीला झालेल्या मोठ्या भारतसरकारविरुद्धच्या यावनी कटापासून भारताच्या काँग्रेससरकारचे संरक्षण करण्याच्या कामी फारच मोठे सहाय्य संघाने केले होते. हे सर्व वल्लभभाई पटेलांना प्रत्यक्ष माहित होते. यामुळे त्यांचे मनःपूर्वक प्रेम संघावर होते. हे सर्व मी प्रत्यक्ष पाहिल्यामुळे संघाच्या निर्दोषीपणाबद्दल माझी खात्रीं झाली होती.

' महात्माजींच्या वधानंतर जी महाराष्ट्रात स्वार्थी लोकानी खळबळ केली, त्यामुळ महाराष्ट्रात बरीच स्थित्यंतरे झाली व माझ्या वैदिक प्रकाशनामध्ये मोठा व्यत्यय येऊ लागला. यामुळे मी औंध सोडून पारडी जि. बलसाड येथे येऊन राहिलो.

' येथे संघ नसल्यामुळे माझा संघाशी प्रत्यक्ष संबंध राहिलेला नाही. पण यामुळे संघावरील माझे प्रेम मुळीच कमी झालेले नाही. '

पंडितजीनीं संघाचे काम एकदा करावयाचे ठरवल्यावर त्यांचे सायंकाळी ठीक सहा कधी चुकले नाहीत. ठराविक मार्गाने यावयाचे, एक तास थांबून घरी परत जावयाचे. कोणाची प्रकृति बिघडली असे संघस्थानावर समजले तर लगेच वा दुसऱ्या दिवशी त्याच्या घरी जात. औषध सांगत संग्रही असले तर नोकराबरोबर पाठवूनही देत. औंधसारख्या अडीच तीन हजार वस्तीच्या गावात पंडितजी संघाच्या तीन मातबर शाखा चालवीत. त्यातील एक हरिजन–वस्तीत होती.

सातारा जिल्ह्याच्या उत्तरभागाच्या संघांचे दिवाळी–शिबीर औंधच्या विमान-तळानजीकचे जागेवर एकदा भरले. झपाट्याने त्याला छावणीचे स्वरूप आले. औंधच्या म्युझियममधील महाराणा प्रताप नि शिवछत्रपति यांचे पुतळे ध्वज-स्तंभानजिक प्रस्थापण्यात आले. त्यामागे मोठे तंबू नि राहुट्या. शिबिराचे उद्‌घाटन झालें त्यावेळी श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधीही हजर होते. शिबिराचा शिस्तबद्ध कार्यक्रम वेळापत्रकाप्रमाणे चालला असता, दुसऱ्या दिवशी सायंकाळी आकाश ढगानी भरून आले. रात्रौ झोपेचा बिगुल झाला. संघचालकासमवेत पंडितजी आपल्या नियोजित तंबूत पहुडले. अन् काय ? रात्रौ एक वाजता मुसळधार पावसाने सगळी-कडे व शिबिराचे पाणी पाणी केले !

तरी पण गोंधळ–गडबड नावाला नाही ! वळकट्या बांधून स्वयंसेवक सापडेल त्या आडोशाला उभे होते. उघडीप झाली अन् रात्रीच औंध–गावात गटशः

जाण्याचा सर्व स्वयंसेवकाना इशारा मिळाला. ते निघाले. आघाडीला पंडितजी होते. औंधबँकेच्या मॅनेजरला हाक देऊन त्यानी पंचवीस जणांची व्यवस्था तेथे केली. मग धर्मशाळा, देवळे अन् शाळा भरल्या. विभागप्रमुखाना कामे देऊन पंडितजी घरी गेले. सकाळी ठीक साडेसहा वाजता परत कार्यालयात हजर. शिबिराच्या कार्यक्रमात खंड नाही !

असाच एक काटेकोर प्रसंग सांगण्यासारखा आहे. औंधसंघशाखेच्या एका उत्सवाच्या निमित्ताने श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधीना ठीक साडेपाच वाजता कार्यक्रमास निमंत्रिले होते. संघस्थानावर सर्व तयार झाले. पंडितजी बिनचूक हजर झाले. श्रीमंत येतानाही दिसेनात ! तरी ठरल्या ठीक वेळेस ध्वजारोहण झाले, प्रार्थना झाली, ' आराम ' अशी आज्ञा मिळाली. एवढ्यात घोड्यांच्या टापा ऐकू आल्या. ' सावधान ! दक्ष ! ' झाले ! प्रणाम झाला. श्रीमंतानी विचारले– आम्ही येण्याआधी ध्वज फडकावला ?

ठीक वेळेची कल्पना देऊन पंडितजी उत्तरले– ' वॉटर्लूच्या लढाईत नेपोलियनाचे सैन्य मिनिट उशीरा आले म्हणून त्याचा पराभव झाला ना ? '

मग वेळापत्रकाप्रमाणे कार्यक्रम पार पडले. पंडितजीनी ही तरुणाना व समाजाला जेव्हाचे काम तेव्हा आणि ज्याचे काम त्याने करण्याची शिस्त लावली व स्वतःला लावून घेतली, तीच १९३९ नंतर औंधसंस्थानात ग्रामरक्षकदले संघटित करण्यास उपयोगी पडली आणि तिने व्हाइसरॉयांच्या प्रतिनिधीचे तोंडून ' मग येथें इंग्रजांचे काय काम ? ' असे काहीसे वैतागाचे व काहीसे वास्तव रसिकतेचे उद्‌गार काढविले. राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाचे कार्य आपण का अंगिकारले, हे पंडितजीनी स्वतःच स्पष्ट केले आहे. हैदराबाद आणि लाहोर येथे युगांतर व गदर चळवळींचे कार्यकर्ते ' उदंड करावे परी गुप्तरूपे । ' या तत्त्वावर कसे लष्करी शिस्तीने संघटित होत हे पंडितजीनी पाहिले होते. गृहस्थाश्रमी म्हणून—

**आल्या अतिथा आश्रय द्याया, मागेपुढती पाहु नको ।**

म्हणून त्यानी त्या संघटनाला झाली तेवढी मदत केली होती आणि वैदिक ऋचांच्या आधाराने त्या संघटनांचे जे अभिप्रेत ध्येय होते, त्याचे समर्थनही पंडितजीनी उघड उघड व्याख्यानातून केले होते. त्यातून सवयींचा स्वभाव झालेला पंडितजींचा संघटनाकुशल नेतृत्वाचा दिमाख प्रत्यक्ष उदाहरणाने लोकपरिचित करावयास राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाचे द्वारा अप्रतिबंध संधि आहे, असे पंडितजींच्या लक्ष्यात आले आणि आपल्या संस्कृतिसेवेला ते सर्व पोषक आहे, असे हेरून त्यानी औंधसंस्थानात संघाची धुरा खांद्यावर घेतली.

स्वतःच्या इच्छेने राष्ट्रसेवा करू इच्छिणाऱ्या हिंदुलोकांची एक संघटित संस्था म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवकसंघ ! ही संस्था डॉ. केशव बळिराम हेडगेवार ( १८९०

ते १९४० ) यानी शके १८४७ ( सन १९२५ ) च्या विजयादशमीच्या मुहूर्तावर नागपूर येथे संस्थापिली. हिंदुस्थानसारख्या प्राचीन हिंदुराष्ट्रामध्ये जर नवचैतन्य निर्माण करावयाचे असेल, तर सर्व हिंदूची एक प्रचंड संघटना होणे आवश्यक आहे, या त्याच्या मनोमन खात्रीमुळे, तशा संघटनेस सर्व आयुष्य वहावयाचे ठरवून डॉक्टरानी संघाची उभारणी केली. संघाचा ध्वज भगवा असून स्वयंसेवकां• कडून कडक शिस्त पाळली जाते. तीसाठी नियम असतात. हिंदूंची संस्कृति समजावून देण्यासाठी बौद्धिके असतात. हिंदूंच्या व हिंदू संस्कृतींच्या अस्तित्वावरच घाला येतो आहे, असा कोठे संशय आल्यास संघाचे दूरदर्शी संचालक संघाकडून संरक्षक फळी उभी करतात; त्यानी तशीं करावीच या अपेक्षेने तर डॉ. हेडगेवार यानी संघ काढला. १९३२ मध्ये मध्यप्रांत सरकारचा त्यामुळेंच संघावर रोष झाला होता. इतर प्रांतिक सरकारानीही मध्यप्रांताचे अनुकरण केले होते. आणि तरीही संघाचे कार्य वाढतच गेले. गुरुदक्षिणेंच्या रूपाने पैशाची व स्वयंसेवकांच्या रूपाने तरुणांची भरती कधीच अधुरी ठरली नाही ! ! संघाने हिंदुजनतेचा विश्वास संपनाद केला तसा समाजसंजीवनाच्या नव्या नव्या तरुणाना आकर्षित करणाऱ्या विचारसरण्या पचनी पाडण्याची चिकित्साप्रणाली अंगिकारली तर एक लक्षांच्यावर स्त्रयंसेवक समाविष्ट असलेली ही संघटना प्रबळच प्रबळ ठरेल, हीं भीति राजकीय नेतृत्वाने वेडावलेल्यास पण वाटत असते. वास्तविक तसे असावयाचे काहीच कारण नाही. कारण संघाला राजकारणाच्या पक्षीय धकाधकीच्या मामल्याशी काही कर्तव्य नसून, अजिंक्य अशा भारतीय वैदिक संस्कृतीचें हे राष्ट्र प्रज्ञाहत होऊ नये आणि जागतिक व्यवहारात सन्मानाने नांदावे, हेच त्या संघटनेला मुख्यतः पहावयाचे आहे

: १४ :

# तीन परिषदा

संस्थानी प्रजेच्या सेवेपेक्षा मी अधिक काही हालचाल करणार नाही, असे आश्वासन देऊन विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकांत पंडितजी औंधास स्थिर झाले. 'कूर्म गुरु करून' संस्थानी प्रजेच्या सेवेला लागलेल्या पंडितजींच्या सेवेचा विस्तार हळू हळू सर्व दक्षिण महाराष्ट्रांतील सर्व संस्थानी-प्रजेंच्या सेवेपर्यंतही वाढत गेला. मनूच्या माशाप्रमाणे वाढत गेलेल्या पंडितजीच्या सेवाभावाला व सेवा योगाला हेही पक्के ठाऊक होते की शेवटी ब्रिटिश रियासतीतील भारतीय आणि संस्थानी रियासतींतील भारतीय एकच असून ' विसरा म्हणुनी कसे विसरते रक्ताचे नाते । प्रेमाचे नाते ? ' आणि म्हणूनच १९२० साली महात्मा गांधीच्या असहकार-योगाला साजेसा सातारा जिल्हा पुढे जात रहावा म्हणून लोकप्रिय भाऊसाहेब सोमणानी विनंति करताच, पंडितजीनी जिल्हा काँग्रेस-कमेटीची धूरा अंगावर घेतली होती. तिचीच पुनरावृत्ति १९३० साली महात्माजीनी अन्याय्य कायद्यांचा भंग करण्याची मोहिम सुरू केली, तेव्हा झाली. महात्माजीनी मिठाचा सत्याग्रह करण्याकरता ब्रिटिश सरकारला जाहीर आव्हान देऊन मोर्चा काढला. महात्माजीच्या त्या विश्वलक्षवेधक आणि सर्व भारतव्यापक होऊ पहाणाऱ्या राष्ट्रीय आन्दोलनाला संघटित, शिक्षित व शिस्तीच्या सहनशीलतेची कमाल करणाऱ्या स्वयंसेवकांची आवश्यकता होती. महाराष्ट्राच्या कायदेभंग-मंडळाने तसे स्वयंसेवक तयार करण्याकरता लष्करी छावण्यासारखी शिबिरे सुरू करण्याचे मनावर घेतलें होते. पण भारतात उदय पावणारे भावी स्वराज्य जर लोकशाही स्वराज्य व्हावयाचे आहे तर त्याची साधनाही लोकसंमत असावी. कारण कसलाही लढा हा जनताजनार्दनाच्या अनंतहस्तानी दिलेल्या सहाय्यानेच यशस्वी होतो. सातारा जिल्हा महात्माजींच्या नव्या लढ्यात लोकसंमतीने उभा आहे, हे जग-

जाहीर करण्याचा एकमेव मार्ग सातारा जिल्हापरिषदेत तशी जाहीर संमति घेणे हा होता. त्या जिल्हा परिषदेचे नेतृत्व स्वीकारण्याबद्दल पंडितजी सातवळेकराना विनंति करताच ' उणे पडो देऊ नये। कोणा एकाचे ॥ ' या समर्थ–शिकवणी-प्रमाणे पंडितजीनी सातारा जिल्ह्याच्या हाकेला साद दिली आणि ते सातारा जिल्हापरिषदेच्या वार्षिक अधिवेशनाचें अध्यक्ष होऊन जबाबदारीस तयार झाले.

शनिवार ता. ५ एप्रिल १९३० रोजी ५ वी साताराजिल्हापरिषद् सातारा येथे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये भरली. प्रतिनिधि व प्रेक्षक यांची तुडुंब गर्दी होती. परिषदेच्या मंडपात लो. टिळक, महात्मा गांधी, दादाभाई नौरोजी आदि राष्ट्र-पुरुषांचे स्फूर्तिप्रद चित्रदर्शन होत होते. स्वागताध्यक्ष श्री गो. वा. जोशी यांच्या भाषणांत महात्मा गांधींच्या दांडी–मोर्चाची महति गाऊन, महाराष्ट्र–क्रांतिकारकांचे स्फूर्तिदाते शिवरामपंत परांजपे आणि सातारा जिल्ह्यातील दिवंगत कार्यकर्ते यांच्याविषयी शोक प्रगट केला होता; सातारा व वाई तालुक्यात झालेल्या ग्राम-सेवेचा गौरव होता; जतींद्रनाथांचा अन्नत्याग, बॅ. सेनगुप्त व वल्लभभाई पटेल यांच्या कारावासाबद्दल अभिवादन होते आणि साताऱ्यास होणाऱ्या सत्याग्रही शिबिराची कार्यवाही यशस्वी करून महात्माजींच्या सत्याग्रही युद्धात तरुणानी व स्वातंत्र्यप्रेमीनी अहमहमिकेने सामील व्हावे, असे आवाहन होते. शेवटी ' गांधी-सांप्रदायाचे चाहते पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकर यानी परिषदेचे अध्यक्ष स्थान स्वीकारावे ' अशी स्वागताध्यक्षानी विनंति केली.

स्वागताध्यक्षांच्या सूचनेस लोकप्रिय भाऊसाहेब सोमण, सांगलीचे समन्वयी विठ्ठलराव जोशी आणि कऱ्हाडचे शेट गणपतरावजी बटाणे यानी अनुमोदन दिले व पंडितजी अध्यक्षस्थानी बसल्यावर त्यांचा हार घालून सत्कार करण्यात आला. त्यावर बाबुराव भिडे यानी परिषदेस आलेलें यशश्चिंतनपर संदेश आणि बाबुराव वैद्य यानी परिषद्पूर्व सालात झालेल्या जिल्ह्यातील कार्याचा आढावा परिषदेस सादर केले. त्यानंतर पंडितजी सातवळेकर यानी वेदवाणीने परमेश्वरास व मातृ-भूमीस वंदन करून आणि राष्ट्रपुरुषांच्या मागे जाण्यातील जबाबदारीची जाणीव करून परिषदेस मार्गदर्शन केलें, ते असे—

' दुर्दैवाने जी सहज न सुटणारी बंधने तुझ्या गळ्याभोवती घट्ट बांधलीं आहेत ती मी मोकळी करतो. या बंधनातून सुटल्यानंतर तुला बल, दीर्घायु, तेज यांची प्राप्ति होईल व तुला आनंदकारक असे पुष्कळ अन्न खावयास मिळेल. यासाठी तू तेजाची वृत्ति धारण कर व हे बांधणारे पाश तोडून मोकळा हो. ' ( अथर्व वेद ).

### पांचामुखी परमेश्वर

पांचामुखी परमेश्वर असतो असे म्हणतात. त्यावर माझा विश्वास आहे. सर्व जनता ही पंचमुखी परमेश्वराचीच रूपे आहेत. ही पाचमुखे सध्या निरनिराळ्या

दिशेस आहेत. ज्ञानी, शूर, व्यापारी, कारागीर हे चार शिक्षित व पाचवा अशिक्षित असे पाच प्रकारचे लोक आपल्या राष्ट्रात आहेत. ही आमच्या उपास्य देवतेची पाच तोंडे आहेत. ही तोंड एका दिशेला असली म्हणजे सर्व शक्ति एकवटते. ही शक्ति एकवटली जावी व एक दिशेने ही सर्व शक्ति एका सत्कार्याला लागावी यासाठी आपले प्रयत्न चालू आहेत व आज या दिशेने काय करता येईल, याचा विचार करण्यासाठी आपण सर्व जमलो आहोत.

## साताऱ्याचे महत्त्व

या कार्यासाठी साताऱ्यासारखे दुसरे योग्य शहर मिळणे शक्य नाही. कारण एका काळी या शहराने आपल्या शक्तीचे उत्तम एकीकरण केले होते, ही गोष्ट इतिहासामध्ये प्रसिद्ध आहे. सातारा हा शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या समोर छत्रपति शिवाजी महाराज या लोकोत्तर विभूतीचे चित्र उभे राहते. महाराजांच्या पूर्वीच्या काळीही आपल्या जनताजनार्दनाची तोंडे निरनिराळ्या दिशांना विखुरलेली होती पण ती सर्व एका दिशला आणण्याचे श्रेष्ठ कार्य शिवाजी महाराजांनी केले व त्यामुळे त्याना स्वराज्यस्थापनेचे यश मिळविता आले. हा एकीकरणाचा मंत्र आपणास सिद्ध करता येईल तर सर्व कार्य साधणार आहे. सातारा शहरचा इतिहास आपणास हा मंत्र खात्रीने दाखवील.

## त्याग व आत्मसमर्पण

आपले सर्व थोर पूर्वज ' स्वार्थत्यागाशिवाय दुसरा उपाय नाही ' हा एक दिव्य संदेश आपणास सांगत आहेत. देशासाठी स्वार्थत्याग व धर्मासाठी आत्मसमर्पण हे दिव्य धडे शिवाजी व राजाराम महाराज यांनी घालून दिले आहेत. जर आपण या संदेशांचे मनन करू तर आजचा मार्ग आपणास खात्रीने दिसेल. आपल्या इतिहासज्योतिषाकडून आपल्या भावी मार्गावर भरपूर प्रकाश पडो अशी परमेश्वरापाशी प्रार्थना करून आज आपल्या कार्यास आपण लागू या.

## विचार क्रांती

राष्ट्रीय सभा कार्य करावयास लागून आज साडे तीन तपे झाली. इंग्रजी राज्य ईश्वरी दयेने हिंदुस्थानास लाभलेले आहे अशी कल्पना एक वेळ होती. पुढे दहावीस वर्षांनी विदेशी राज्य येथ आले ही परमेश्वरी कृपा नसूनही एक प्रकारची जळू आहे अशी कल्पना उदित झाली. आज महात्मा गांधी याच राज्यास, ईश्वराचे राज्य न समजता सैतानाचे राज्य म्हणू लागले आहेत हा चमत्कार काय आहे हे आपण पाहिले पाहिजे. चाळीस वर्षांपूर्वी ज्या राज्यपद्धतीचे गोडवे लोक गात, त्याच राज्यपद्धतीचा आता लोकास तिटकारा का आला ? याचा विचार जबाबदार अधिकाऱ्यानी केला पाहिजे. आज तुरुंगवास पत्करण्यास हजारो लोक पुढे येत आहत. यांतील मर्म काय आहे याचा नीट नीट विचार सरकार करील तर

सरळ मार्ग सरकारला दिसल्याशिवाय राहणार नाही. इंग्रजी राज्याने सर्वत्र बेकारी व अस्वस्थता माजली आहे. या अस्वस्थतेने देशभर संपाचे वणवे पेटले आहेत. लोकमान्यानीं स्वदेशीच्या व्रताने बेकारीचा प्रश्न सुटेल असे सांगितले होते. पण स्वदेशीव्रत अतिव्यापक असल्यामुळे ते परिणामकारक रीतीने पाळले जाईना म्हणून महात्माजीनी हे व्रत एकमुखी व मर्यादित करून शुद्ध खादीची चळवळ सुरू केली. खेडेगावच्या संघटनेत खादीचे महत्त्व फार आहे ही गोष्ट बार्डोलीच्या उदाहरणाने लोकाना पटलेली आहे. लोकाची उपासमार कमी करण्यासाठी आम्हा सर्वांना खादीची निपज वाढवण्यावर आपली शक्ति खर्चिली पाहिजे. खादीच्या व्रताने बेकारी टळेल, उद्योग मिळेल व शांतता राहील, व स्वराज्य प्राप्तीसाठी लोकांची संघटना होईल.

### स्वराज्याची आकांक्षा

हिंदुस्थानात इंग्रजी शिक्षण सुरू झाले त्यावेळी या शिक्षणाने हिंदीलोकांना स्वराज्याची इच्छा झाली तरी ती इष्टच आहे असेच त्यावेळी इंग्रज म्हणत. मग स्वराज्यासाठी खटपट करणारे महात्मा गांधी सरकारला नावडते का होतात ? स्वराज्य देतो असे एका तोंडाने सांगून दुसऱ्या तोंडानें असला दिवस हिंदुस्थानवर कधींही उगवू नये यासाठी खटपट करणारे सरकारी बडे नोकर खरे राजद्रोही की, सरकारी वचनाप्रमाणे हिंदी जनतेस लवकर स्वराज्य मिळावे म्हणून आटोकाट यत्न करणारे व आत्मयज्ञ करणारे लोक राजद्रोहीं ? याचा विचार सरकारने शांतपणाने केला आहे काय ?

आज महात्मा गांधीवर सरकारचा फार रोष आहे. महात्मा गांधीनी सरकारला केवढे साहाय्य केले याची सरकारला कल्पना आहे काय ? हिंसावादी क्रांतिकारकाची चळवळ आज महात्मा गांधीनी थोपवून धरली आहे. अशा सहाय्यकर्त्या महात्माजींना जर कोणी पूर्ण स्वातंत्र्यवादी बनविले असेल तर ते सरकारनेच व राष्ट्रीय सभेलाही सरकारनेच स्वातंत्र्यवादी बनविले आहे. जव्हा खरे सज्जन हालअपेष्टात पडतात व दुर्जन विलासात गर्क होतात तेव्हा राज्यपद्धतीमध्ये फरक झाला पाहिजे असे सर्वास वाटू लागते. आजची वेळ अशाच प्रकारची आहे.

### आमचा मार्ग

आज आपला मार्ग आपणासच आखला पाहिजे. आपला मार्ग आत्मिकबलाचा आहे, आत्मिकबल म्हणजे मानसिकबल—आंतरिकबल होय. आपणामध्ये शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आत्मिक अशा अनेक शक्ति आहेत. स्थूलशक्तीपेक्षा सूक्ष्मशक्तीचे बल फारच मोठे असते. यासाठी बाह्य स्थूल पाशवी शक्तीशी युद्ध करावयास आपणास अंतःशक्तीचा उपयोग केला पाहिजे. हेच बल आपणास वाढवले पाहिजे. तथापि आपणास आपल्या शरीराकडे दुर्लक्ष करून चालावयाचे नाही.

सत्याग्रही लोकानी आपले शरीर कणखर व शीतोष्ण सहन करण्यास समर्थ बनवले पाहिजे. सध्याचे युद्ध दुसऱ्याशी हाणमारी करावयाचे नाही हे खरे; पण यात स्वतः कष्ट सहन करावयाचे आहेत; इतकेच नव्हे तर कष्ट देणाराचे मन पवित्र कर असे परमेश्वराजवळ त्याचे अभीष्ट चिंतावयाचे आहे. शरीराच्या सहनशक्तीबरोबर मनाचीही समवृत्ति व शांतवृत्ति राहील असे शिक्षण मनाला मिळाले पाहिजे. हीच मनाची अहिंसावृत्ति होय. मनामध्ये व वाणीमध्ये हिंसा येऊ नये हे उत्तमच आहे. पण तितके तप जरी न झाले तरी सध्याचे असले राजकीय युद्ध अहिंसेनेच आपणास शेवटपर्यंत चालविता येईल व अहिंसेनेच आपणास विजय मिळेल असा पक्का भरवसा तरी पाहिजे. तसेच कायावाचामनाने आपण हिंसा करीत गेलो तर युद्धात नुकसान होईल व आपले ध्येय साधणार नाही असा मनाचा निश्चय झाला पाहिजे. आज जी आपणास अहिंसा पाळावयाची आहे ती आपले स्वराज्य मिळे-पर्यंतच आवश्यक म्हणून पाळावयाची–अहिंसेचे पथ्य हे पारतंत्र्य रोग बरा होई-पर्यंतच पाळावयाचे आहे–हे पथ्य पाळले गेले तरच स्वातंत्र्य मिळेल नाहींतर यासाठी जे लोक अहिंसेचे पथ्य बाळगणार नसतील त्यांनी या युद्धापासून दूर रहावे पण क्षेत्रात येऊन इतराच्या तपस्येचा भंग करू नये. हाणामारीस जसे लष्करी शिक्षण लागते तसेच या सात्विक युद्धास सात्विक बाण्याचे शिक्षण घेतले पाहिजे. या युद्धास लागणारे दहा गुण आहेत ते पतंजली महर्षींनी योगदर्शनात सांगितले आहेत ते खालीप्रमाणे—

अहिंसा, सत्य, अस्तेय, चोरी न करणे, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, ( त्यागवृत्तीने रहाणे ) शुद्धता, संतोष, शीतोष्ण सहन करण्याची शक्ति, पवित्रतेचा अभ्यास व ईश्वरनिष्ठा हे गुण अवश्य पाहिजेत. या गुणाला व्यावहारिक स्वरूप देऊन राज-कारणातही महात्माजींनी अग्रस्थान दिले आहे. एवढ्या वैयक्तिक तयारीनेही आपले काम भागेल असे नाही. काही सामाजिक दोषही आपण घालविले पाहिजेत. सर्व चालू असलेल्या सामाजिक सुधारणा झाल्या पाहिजेत. असा माझ्या म्हणण्याचा उद्देश नाही. निदान अस्पृश्यता निवारण झाली पाहिजे. किती एक लोक असे म्हणतात की तुम्ही काय सर्व जगास साधु बनविणार आहात ? युद्धाचे शिक्षण देणारे सर्व जगास शूर बनवीत नाहीत तर मग आमच्यावर तरी सर्व जगास साधु बनविण्याची जबाबदारी कशी येणार ? आपणास शेकडा एक या प्रमाणात जरी अशी माणसे लाभली तरीही आपले काम खात्रीने होईल. या देशात सत्पुरुषानी व साधुसंतांनी आजपर्यंत जे काम केले आहे त्यामुळे अशी माणसे मिळणे येथे अशक्य नाही. आपण प्रयत्न करण्यास उभे रहा म्हणजे कल्पनेपेक्षा लगेच यश येईल. या मार्गासंबंधा-च्या शंकाकुशंका आता सोडून द्या. फक्त कामाला लागा म्हणजे बाकीचे सर्व व्हाव-याचे ते आपोआप होईल. आम्हास आज परमेश्वर अनुकूल आहे. आपणास केवळ निमित्तमात्र बनून निश्चयाने खटपट करावयाची आहे. आजचा मार्ग म्हणजे असहकारितेचा मार्ग होय. आपसात पूर्ण सहकारिता व विरोधकाशी असहकारिता

हा आपला मार्ग आहे.

### कायदेभंग

कायदेभंग अतिव्याप्तीने थोडासा इष्टच आहे. जे कायदे स्वराज्य झाल्यानंतर राहावयाचे नाहीत, तेच कायदे मोडावयाचे. सर्वच कायदे मोडावयाचे नाहीत. आपल्या स्वराज्यात मिठाचा कायदा, दारूचा कायदा व परदेशी कापडाचा सुळसुळाट ही असणार नाहीत. म्हणून एवढ्यापुरते कायदे मोडावयाचे.

### सातारा जिल्ह्याचे कर्तव्य

सध्याच्या चळवळीत सातारा जिल्ह्याने काय करावे याचाही विचार करण्यासाठी आपण येथे जमलो आहोत. हा इतिहास लिहिण्याचा किंवा वाचण्यांचा काळ नसून इतिहास करण्याची वेळ आहे. आपला सातारा जिल्हा कर्तृत्ववान् पुरुषांच्या परंपरेतील आहे .आपल्या जिल्ह्याचा इतिहास स्वराज्यस्थापनेच्या दृष्टीने उज्ज्वल आहे. जिल्ह्याचे अंतःकरण तयारच आहे. फक्त पुढारी लोकानी कंबरा कसल्या पाहिजेत. ( १ ) आपणास जे काय करता येईल ते करण्यास सुरवातच करावी; ( २ ) सतत जिवंत व व्यापक चळवळ चालू राहील अशी कायम योजना आखावी; ( ३ ) खादीची निपज कमीच आहे, ती जोरात व जोमाने झाली पाहिजे; ( ४ ) केवळ राष्ट्रकार्यास वाहून घेणारे लोक तयार करीत राहिले पाहिजे आणि ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद व हिंदुमुसलमान–वाद पार संपविलेच पाहिजेत.

हे व्यापकदृष्टीचे लोक हो, हे मित्रवृत्तीचे लोक हो, व हे विद्वान् हो, तुम्ही व आम्ही सर्व मिळून विस्तृत व बहुताकडून पालन केल्या जाणाऱ्या पूर्ण स्वराज्यासाठी यत्न करू या.

परमेश्वर आपणांस यश देवो. वन्दे मातरम् । '

रविवार ता. ६ एप्रिल रोजी सकाळी परिषदेचे अधिवेशनाचा समारोप करताना पंडितजींचे तेजस्वी भाषण झाले, [ असा उल्लेख ७ एप्रिलचे समर्थादि पत्रात आहे पण भाषण दिलेले नाही. त्यामुळे, त्यास आपण पारखे झालो आहो. ]

सातारा जिल्हापरिषदेचे अध्यक्ष म्हणून पंडितजी सातारा जिल्ह्यात फिरू लागले पण सातारा जिल्ह्याचे कलेक्टर यावेळी मॉयसी किंवा बास्कर विल हे १९२०–२२ सालाप्रमाणे १९३० साली नसले तरी एक मुसलमान सद्‌गृहस्थ होते. ब्रिटिश अधिकाऱ्यापेक्षाही पंडितजीसारख्या आर्यसमाजी कलाच्या वेदोनारायणाबद्दल त्यांच्या कपाळाची शिर अधिक उठावयाची. तशी ती लवकरच उठली आणि पंडितजीना आपल्या हालचाली फिरून संस्थानी प्रजेमध्ये प्रभातफेऱ्या काढून भारतीय उत्थानाची जाग देत देत १९२० सालापासून चालत आल्याप्रमाणे सं. प्रजेच्या सेवेप्रीत्यर्थच समर्पाव्या लागल्या. साताराजिल्हापरिषदेच्या धाकट्या बहिणीचा संसार त्यानी लगेच थाटला.

आटपाडी येथे १९३१ च्या मे महिन्यात औंधप्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन अ. वि. पटवर्धन यांचे अध्यक्षतेखाली भरले. स्वागताध्यक्ष पंडितजी सातवळेकर होते. त्यानी आपल्या भाषणात इतर अनेक गोष्टीबरोबर संस्थानातील स्वराज्यात कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत याचा प्रामुख्याने विचार केला.

( १ ) बेकार लोकास भरपूर काम व भरपूर मजुरी मिळावी.
( २ ) प्रजेवर फाजीलकरांचा बोजा पडू नये.
( ३ ) लाचलुचपतीशिवाय सर्वास सहज न्याय मिळावा.
( ४ ) सर्वास सुशिक्षितपणा वाटावा.
( ५ ) अधिकाऱ्यांच्या लहरीवरच आमची सुरक्षितता आहे अशी शंका प्रजेमध्ये राहु नये.
( ६ ) दारू, गांजा, भांग व अफू या व्यसनांची दुकाने संस्थानात नसावीतच.
( ७ ) परदेशी कापडास संस्थानात बंदी असावी.

वगैरे मुद्दे पंडितजी सातवळेकरानी आपल्या भाषणात मांडले.

परिषदांचे स्वागताध्यक्ष वा अध्यक्ष होण्यात कर्तव्यबुद्धीपेक्षा मानाची व मिरवणुकीची ती साधने आहेत अशा दृष्टीचे पुढारी पंडितजी नाहीत आणि तसे होणे हा त्यांचा पिंडच नव्हे; म्हणून सेवा–सातत्यावर त्यांचे लक्ष असे. ' आपण असल्याने विशेष शोभा येणार आहे ' असे लोकमतातील स्थानविशेष पंडितजींच्या मनालाच येत नसत. म्हणून औंधसंस्थानातील व अनुषंगिक दक्षिण महाराष्ट्रातील प्रजाजनांची सेवा सातत्याने करण्यावर भर देत असताही, आटपाडी परिषदेनंतर पंडितजींनी दक्षिणी संस्थानप्रजापरिषदेचे अध्यक्षस्थान १९४३ साली प्राप्त कर्तव्य म्हणूनच स्वीकारले.

१९४२ या वर्षाचे अखेरीस दक्षिणेतील संस्थानात राजकारणाची जी विशिष्ट परिस्थिति निर्माण झाली, ती लक्षात घेऊन व तसेच अखिल राष्ट्रातील चाललेल्या आंदोलनाचे निरीक्षण करून संस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन होण्यासाठी पुनः एकवार सामुदायिक रीत्या संघटितपणे व शक्य तर सर्व संस्थानातील जनतेने एकसमयावच्छेदेकरून खटपट करावी, तीसाठी संस्थानी प्रजापरिषदेचे ( १३ वे ) अधिवेशन भरविण्यात यावे व त्यामार्फत प्रयत्न झाल्यास त्या कार्यास महत्त्व येईल, संस्थानिकांचे धोरण कळेल, लोकांची शक्ति अजमावता येईल व कार्याची दिशा नक्की होईल, असे ठरले.

१३ डिसेंबर १९४२ च्या सांगली संमेलनात ठरल्याप्रमाणे साबडे समितीने आपल्या कामास लगेच सुरवात करून प्रत्येक संस्थानात जबाबदार राज्यपद्धतिचे व संघराज्य व समाईक हायकोर्ट यांच्या योजनांचे आराखडे तयार करून ते प्रसिद्ध केले. या योजना संस्थानी दरबारांकडे पाठवून त्यावर अभिप्राय देण्याची विनंति

साबडे समितीने त्यांना केली. दि. ७–२–१९४३ रोजी भरलेल्या सांगली संस्थान-प्रजापरिषदेच्या मंगळवेढ्याच्या अधिवेशनात वरील योजनांस सर्वसामान्यपणे मान्यता देण्याचा ठराव पास करण्यात आला. वृत्तपत्रानीहि या योजनांचे चांगले स्वागत केले आणि बहुमोल सूचना केल्या. मद्रासच्या ' हिन्दु ' या मातबर दैनिकाने साबडे समितीच्या योजनेबद्दल फार चांगला अनुकूल अभिप्राय व्यक्त केला. ( The Sabde committee plan is federal in character, and unlike the Political Department's hotch potch, is so designed as to take full account of the rights, interests and obligations of all the parties affected–the rulers, the citizens, and the states alike.– 20-4-1943 ). पण संस्थानी दरबारांनी मात्र साबडे समितीच्या योजनांचा फारसा आदर केला नाही. साबडे समितीची स्थापना एका संमेलनात झालेली होती; त्या-पेक्षा व्यापक संघटनेमार्फत तिचे काम चालले तर जास्त चांगले, असे वाटल्यावरून दक्षिणी संस्थान लोकसभेचे तेरावे अधिवेशन ता. ३–५–१९४३ रोजी जमखिंडी येथे पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले. लोक नायक माधवराव अणे यांची अध्यक्ष म्हणून प्रथम नियुक्ति करण्यात आली होती, पण आयत्यावेळी ते न येऊ शकल्याने पं. सातवळेकर यांना अध्यक्षस्थान देण्यात आले. या अधिवेशनात दक्षिणी संस्थानांच्या संयुक्तीकरणाच्या कारभाराची योजना चर्चिली जावयाची असल्याने जमखिंडीस फार मोठ्या प्रमाणात संस्थानी कार्यकर्ते जमले होते. दक्षिणी संस्थानापैकी काही संस्थानांचा मुलूख कानडी भाषिकात विभाग-लेला असल्याने संयुक्तीकरण योजनेमुळे आपल्यावर काय परिणाम होणार याबद्दल त्याना साशंकता वाटत होती. संस्थाने राहावी असे म्हणणाऱ्याचा एक मोठा गट तयार झाला होता. यामुळे जमखिंडीचे अधिवेशन हे राजकीयदृष्टचा तप्त वाता-वरणात भरले होते. जोवर आमची छोटी संस्थाने राहणार आहेत, तोवर त्यांचा कारभार लोकहितदृष्टचा कसा चालेल ? हा प्रश्न साबडे समितीपुढे होता. ज्या-वेळी भाषावार प्रांतरचना होईल, त्यावेळी मराठी व कानडी मुलूख त्या त्या राज्यात समाविष्ट होण्यास साबडे समितीचा विरोध नव्हता; व अशा तऱ्हेचा स्पष्ट खुलासा साबडे समितीचे अध्यक्ष कै. अ. वा. साबडे यांनी अधिवेशनात केल्यामुळें विरोधकां-च्या विरोधातील वाराच खलास झाला.

## जमखंडीत झेंडावंदनाचा कार्यक्रम

श्री. गोविंदराव कणबूर यांच्या हस्ते जमखंडी–शहर–काँग्रेसभवन नावाच्या सार्व-जनिक ट्रस्टच्या प्रशस्त जागेमध्ये पार पाडण्यात आला. पंडित सातवळेकर यांनी टाळ्यांच्या गजरात अध्यक्षस्थान स्वीकारिले. दुपारी ४ वाजल्यापासून संध्याकाळी ७ वाजेपर्यंत विषयनियामक समितीचे काम चालले होते. ११।३० पर्यंत रात्री विषयनियामक समितीचे काम पार पडले.

## खुले अधिवेशन

सर परशुरामभाऊ नाटयमंदिरात रात्रौ ११।३० वाजता खुल्या अधिवेशनास सुरुवात झाली. नाटयमंदिराच्या प्रवेशद्वारालगत उभ्या केलेल्या भव्य व सुंदर कमानीवर दक्षिणी संस्थान–लोकसभा अधिवेशन १३ वे अशी सुवर्णाक्षरे उठून दिसत होती. नाटयमंदिराचे आवार लतापल्लवानी व आम्रमंजिऱ्यानी सुशोभित केले होते. अधिवेशनाची वेळ रात्रीची असल्यामुळे नाटयमंदिर व मंदिराबाहेरील भागही विजेच्या दिव्यानी प्रकाशित झाला होता. त्यामुळे तो फारच शोभून दिसत होता.

सभास्थानी सुमारे १००० वर लोकप्रतिनिधि व प्रेक्षक उपस्थित होते. नाटय–मंदिराबाहेरही सुमारे २००० वर लोकसमुदाय होता. ध्वनिक्षेपक यंत्रामुळे व्याख्याने सर्वांस सहज ऐकूं जाणे शक्य होते. रात्रीची वेळ, शिवाय नियोजित अध्यक्ष लोकनायक माधव श्रीहरी अणे हे न आल्यामुळे निरुत्साहाचे वातावरण उत्पन्न झालें असताही इतके लोक उपस्थित होते–सांगली, तेरदाळ, रबकवी, शहापूर, शिरहट्टी, मंगळवेढे, कवठे, उगार, जमखंडी, कुंदगोळ, बनहट्टी, सांवशी, हुन्नूर, कोल्हापूर, इचलकरंजी, तोरगल, मलकापूर, अक्कलकोट, कुरुंदवाड, तिकोटा, औंध, किर्लोस्करवाडी, गुणदाळ, आटपाडी, बिद्री, फलटण, सावंतवाडी, भोर, मुधोळ, महालिंगपूर, लोकापूर, रामदुर्ग, बुधगांव, जत, मिरज, मालगांव, ग्वाल्हेर, इंदूर, मुंबई, पुणे, विजापूर, बेळगांव व जमखंडी संस्थानातील पुष्कळ खेडयांतून बरेचसे शेतकरी दिसून येत होते. दक्षिणी संस्थानातील १५ संस्थानांचे कार्यकर्ते या अधिवेशनास उपस्थित असल्याचेहे दृश्य निःसंशय अभिनव होते.

पं. सातवळकर यांनी या परिषदेचे अध्यक्ष-स्थान स्वीकारावे अशी विनंती श्री लाहोटी यांनी केली आणि मोजक्या शब्दात पंडितजींचा सर्वांना परिचय करून दिला.

श्री. लाहोटी यांच्या सूचनेला अनुमोदन देताना सांगलीचे श्री. विठ्ठलराव जोशी म्हणाले, 'पंडितजी वैदिक वाङ्मयाचे गाढ पंडित जरी असले, तरी राजकारणातही त्यांचा तितकाच मोठा अधिकार आहे. पंडितजींनी वैदिक वाङ्मयाच्या प्रसिद्धीकरिता अनंत सायास सोसले आहेत. राजकीय वाङ्मयप्रसिद्धीतही पंडितजींचे पाऊल अग्रगामी आहे. स्वाध्याय-मंडळाची अवाढव्य संस्था प्रत्येक औंधास जाणारा प्रवासी पाहतोच. स्वराज्याचा अनुभव घेत असलेले पंडितजी दक्षिणी संस्थानातील आम्हा राजकीय कार्यकर्त्यांना आपल्या अनुभवाचा आज फायदा देणार आहेत, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. लोकनायकांची उणीव थोडया फार फरकाने पंडितजी भरून काढतीलच. स्वराज्याविषयी त्यांना जेवढी उत्कट तळमळ आहे, तेवढाच त्यांचा स्वराज्यातील खाचाखोचांचा अनुभवही फार मोठा आहे. पंडितजींनी अध्यक्षस्थान स्वीकारावे.'

श्री. जोशी यांच्या भाषणानंतर श्री. हब्बू वकील विजापूर व श्री. मसूरकर वकील मुधोळ, श्री. भास्करराव मराठे मिरज यांनी अनुमोदन दिल्यावर पंडितजींनी

टाळ्यांच्या गजरात अध्यक्षस्थान स्वीकारले व स्वागताध्यक्षांनी त्यांना पुष्पहार समर्पण केला. रा. साबडे यानी परिषदेस संदेश आले होते, त्यांची नावे सांगितली.

संदेशवाचन झाल्यावर अध्यक्ष पंडित सातवळेकर यांनी आपल्या भाषणास सुरुवात केली. दीड तासपर्यंत खडया आवाजात, अत्यंत मनोवेधक व उत्कट तळमळीचे आणि स्फूर्तिप्रद असे त्यांनी भाषण केले—

## अध्यक्ष पं. श्री. दा. सातवळेकर यांचे भाषण

' सभ्य स्त्रीपुरुषहो !

आपण याठिकाणी अत्यंत महत्त्वाचा निर्णय दक्षिणी संस्थानातील प्रजाजनांकडून मिळविण्यासाठी जमलो आहो. आपले नियोजित अध्यक्ष ना. लोकनायक माधवरावजी अणे रेल्वेच्या गैरसोईमुळे वेळवर येऊ शकले नाहीत, ही खरोखरच दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांच्या जाग्यावर आपण मला बसविले आहे, पण त्यांच्या जागी बसून त्यांचे काम हाती घेण्यास माझे मन संकोचामुळे मागे सरत आहे. लोकनायक जसे व्हॉइसरायापासून तो संस्थानिकांपर्यंत अप्रतिहत गतीने पोचू शकतात, तशी अप्रतिहत गति मजमध्ये नाही, अर्थात् त्यांची योग्यता मजमध्ये नाही; पण स्वराज्यासाठी करावयाचे कर्तव्य कोणत्याही व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे. व्यक्तीमुळे ते अडून राहता नये. याचसाठी हे आपण आरंभलेले कार्य अडू नये, म्हणून मी हे कर्तव्य करण्यासाठी आपली आज्ञा शिरसामान्य करून पुढे आलो आहे व आपल्या आज्ञेप्रमाणे जशी सेवा मजकडून होईल, तशी ती करण्यास मी तयार झालो आहे.

### क्रान्तीचा समय

सध्याचा समय क्रान्तीचा समय आहे. महत्त्वाच्या घडामोडी यावेळी सर्व जगभर होत आहेत. यावेळी आपण हालचाल करणार नाही, असे जरी कोणी म्हटले, तरी ते शक्य नाही. कालाचा प्रवाह मोठ्या वेगाने चालला आहे, त्याबरोबर आपणास गेलेच पाहिजे. जर आपण प्रयत्न करून पुढे जाल, तर उन्नति करून घ्याल; मागे सराल तर अवनतीच्या गर्तेत पडून नाश पावाल व आहे तेथेच राहण्याचा यत्न कराल, तर सडून जाल. आपणास उन्नत व्हावयाचे असेल, तर कालाचे महत्त्व जाणून योग्य मार्गाने प्रगति करणे भाग आहे. आपण जे येथे जमलो आहो, ते जागच्या जागी राहून सडून जाण्यासाठी नाही व मागे पडून नाश पावण्यासाठीही नाही. आपली उन्नति लवकर कशी करून घ्यावी, याचा निश्चय करण्यासाठीच आपण येथे जमलो आहो व आपला निश्चय असा पक्का आहे की, आपण स्वराज्य–योजनेचा निर्णय केल्याशिवाय येथून उठणारच नाही !

### आपला दृढ निश्चय

यावेळी रात्रीचे साडेबारा वाजून गेले आहेत, सर्वांच्या डोळ्यात झोप आलेली आहे, आपले प्रिय व नियोजित लोकनायक अध्यक्ष आलेले नाहीत, अशा सर्व अडचणी

व आपत्ती आल्या असताही आपण जे येथे दृढ निश्चयाने बसला आहात, त्यावरून स्वराज्य प्राप्त करून घेण्याचा आपला निश्चय ढळणार नाही, हे उघड होत आहे. या अधिवेशनासाठी या जमखंडीच्या लोकांनी जितका त्रास सोसला आहे, तितका दुसऱ्या कोणत्याही अधिवेशनाच्या वेळी सोसावा लागलेला नाही. आपत्तीस न जुमानता स्वराज्यासाठी येतील ते कष्ट आनंदाने सोसण्यास आपण तयार आहा, यावरूनच स्वराज्य आपणापासून फारसे दूर नाही, हे सिद्ध होत आहे.

ईश्वर जेव्हा आपणावर संकटे आणतो, तेव्हा तो आपली परीक्षा करीत असतो. त्या परीक्षेत आपण उतरलो तर पुढील सुख आपणास निःसंशय प्राप्त होऊ शकते. पण जर आपण त्या संकटास कंटाळलो, तर मात्र ते सुख मिळणे शक्य नसते.

संस्थानात स्वराज्य स्थापावे व अशा स्वराज्य–शासित अनेक संस्थानांचे मिळून एक महाराज्य बनवावे, या उद्देशाने आपण येथे जमला आहात. आपणास या कामी मदत करण्यासाठी म्हणून लोकनायक निघाले, ते रूळावरून गाडी घसरून तिकडे संकटात पडले आहेत. इकडे आपण त्यांची मार्गप्रतीक्षा करीत आहो. याकामी हे जे कष्ट सर्वांस होत आहेत, ती एक आपली परीक्षाच आहे. या असल्या आपत्ति किंवा याहीपेक्षा अधिक कष्ट आपणास सोसावे लागले तरी त्या सर्व कष्टांस न जुमानता, स्वराज्यप्राप्ति हा एकच आपला ध्येयबिन्दु आहे असे म्हणून ज्यावेळी त्याच्या प्राप्तीसाठी सुखदुःखाची पर्वा न करता आपण आपले जीवनही अर्पण करण्यास तयार होऊ, त्याच वेळी आपणास स्वराज्य प्राप्त होईल.

## संस्थानांचे भवितव्य

दक्षिणी संस्थानांच्या भवितव्यासंबंधाने सध्या थोरामोठ्यांची मनेही मोठी साशंक झालेली आहेत. त्यांचे अस्तित्व भविष्यकाली टिकेल की नाही, अशासंबंधी भय उत्पन्न करणारी भयंकर आर्थिक परिस्थिति सध्या निर्माण झाली आहे. या परिस्थितीस टक्कर देऊन या दक्षिणी संस्थानांनी स्वराज्याच्या सरळ मार्गाने जाऊन जनतेच्या शक्तीचा पाठिंबा प्राप्त करून सन्मानाने जगावे, यासंबंधीची विशेष योजना आपण आखीत आहा व तिच्या संबंधाने दक्षिणी संस्थानातील जनतेचा कौल घेण्याची आपली इच्छा आहे.

## जमखंडीचे भाग्य

सर्व दक्षिणी संस्थानांच्या भवितव्याचा हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे व या अशा महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करण्याचा हा अवसर संस्थानांच्या इतिहासमध्ये सुवर्णाक्षरानी लिहून ठेवण्यासारखा आहे. यासंबंधीचा निर्णय घेण्याचे स्थान जमखंडी हे ठरले, हे जमखंडीचे भाग्यच होय. ही परिषद् मिरजेस बोलावली होती; पण काही राजकीय परिस्थितीमुळे व अन्य अनपेक्षित कारणामुळे जमखंडी हे स्थान निश्चित करणे भाग पडले. यामुळे हा मान जमखंडीस मिळाला आहे. ही सुवर्णसंधी

आपणास मिळाली आहे. यासाठी आपसातील भांडणे निष्कारण वाढवून ही आलेली मानाची संधि आपण गमावू नये, अशी माझी आपणास विनंति आहे.

प्रत्येक संस्थानामध्ये जबाबदारीचे पूर्ण स्वराज्य स्थापन व्हावे व अशा स्वयं-शासित संस्थानांचे मिळून एक मोठे संयुक्त संस्थान बनवावे, हे आपल्या योजनेमधील मुख्य सूत्र आहे. हे आपले ध्येय आहे व ते सिद्ध होईपर्यंत आपण प्रयत्नकरीत राहणार, असा हा आपला निश्चय आहे.

दक्षिणी संस्थानांचे भवितव्य निश्चित रूपाने ठरवण्याची योजना कायम करण्याचा मान जमखंडीने मिळविला आहे. तो आता जमखंडीकडून दुसरा कोणीहि हिरावून घेऊ शकत नाही व अशा महत्त्वाच्या परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारून संस्थानी जनतेची सेवा करण्याचा अवसर आपण मला दिला आहे. हा मान माझा नसून तो औंध संस्थानचा आहे, असे मी समजतो आहे; कारण औंध संस्थानने जबाबदारीचे पूर्ण स्वराज्य आपल्या प्रजेस देऊन आपलेच कार्य सर्वांत आधी करून दाखवले आहे. म्हणूनच आपण मला या मानाच्या जागेवर बसण्यासाठी बोलाविले आहे.

## घटना बनत जाते

स्वराज्याची घटना आज शेकडो वर्षे इंग्लंडमध्ये बनत आहे, असे म्हणतात. ते म्हणणे फारच अर्थपूर्ण आहे. घटना कागदावर कितीही उत्तम बनवली असली, तरी ती आपण जशी राबवाल, तशीच ती आपणास लाभदायक होणे शक्य असते. घटना राबवीत असता जो अनुभव येत जातो, त्या अनुभवाने घटनेमध्ये खरी सुधारणा होत जाते. ' घर बांधून पहावे ' असे जे म्हणतात, तोच न्याय येथेही लागू आहे. घटना राबवून जो दररोज अनुभव येतो, तो ज्यानी आज घेतलेला नाही, त्यास घटनेमधील सुधारणा कशी करावी, ते नीटपणाने समजणार नाही.

बुद्धिमान् विचारकानी आपल्या बुद्धिबलाने करता येईल तेवढा मागचा–पुढचा विचार करून शक्य तितकी उत्तम घटना बनवावी, हे योग्यच आहे; पण ती तशी बनली म्हणजे मग शब्दांचा काथ्याकूट करीत न बसता ती घटना 'राबवावयास लागावे व ती राबवीत असताना जो अनुभव येत जाईल, तो विचारात घेऊन व जनतेचे हित साधावयाचे आहे हे नीट लक्षात ठेऊन अनुभवाने घटनेत सुधारणा करीत जावे. अशा रीतीने पाच पन्नास वर्षांत परिस्थितीप्रमाणे घटना सुधारत जाईल व तीच खरी सुधारलेली घटना होईल.

## सावधपणा पाहिजे

स्वराज्य–घटना मिळाली म्हणून तेवढ्यानेच कार्यभाग होतो असे नाही. इतिहासाच्या वाचकास हे माहित आहे की, आयर्लंडमध्ये पूर्ण स्वराज्य होते; पण तेथील लोकप्रतिनिधींनीच असा ठराव लांच खाऊन केला की आम्हाला निराळे स्वराज्य

आता नको आहे. आमचे काही प्रतिनिधि इंग्लंडच्या पार्लमेंटात असले म्हणजे पुरे आहेत. असा ठराव करून यानी असलेले स्वराज्य आपल्या हातानी तोडून टाकले. ते पुनः प्राप्त करण्यास आयर्लंडला १०० वर्षे प्रचंड खटपट करावी लागली !

यावरून स्वराज्य प्राप्त झालेले असले तरी ते चालविण्यास स्वराज्याचा विकास करणारी माणसे पाहिजेत, ही गोष्ट उघड होते. नाहीतर लाचखाऊ माणसे आत येऊन स्वराज्य–शासनाचा विचका करावयास चुकणार नाहीत. यावरून लक्षात येईल की, स्वराज्याचे सुख जनतेच्या पदरात पूर्णपणाने पडावे अशी जर इच्छा असेल, तर त्यासाठी तत्त्वनिष्ठेने व त्यागबुद्धीने फार मोठे यत्न झाले पाहिजेत. हे सर्व प्रयत्न करण्याचा निश्चय करून स्वराज्य प्राप्त करून घेण्याच्या इराद्यानेच आपण सर्व येथे जमला आहा, असे मी समजत आहे.

## विदेशी स्वराज्य

कित्येक असे समजतात की, जबाबदार स्वराज्याची कल्पना ही विदेशी आहे. हे स्वराज्याचे कलम युरोपमधून इकडे आणून ते हिंदी राज्यावर जोडावयाचे आहे. आपणापैकी जर कोणी असे समजत असतील, तर त्यानी तो विचार एकदम दूर करावा. आम्हाला ज्या स्वराज्याची येथे जोपासना करावयाची आहे, ते स्वराज्य याच भूमीमध्ये उत्पन्न झालेले व याच भूमीमध्ये वाढलेले असून, आम्ही आमच्या येथील गरजांप्रमाणेच त्याची यापुढची वाढ करणार आहो. आमचे स्वराज्य आमचे आम्हीच वाढवले पाहिजे. आमच्यासाठी ते दुसऱ्यानी वाढवावयाचे नसते. दुसऱ्यानी जे वाढवले जाईल, ते परराज्य होईल.

प्रत्येक देशाची परिस्थिति भिन्न असते, पौर्वात्य व पाश्चात्य देशातील लोकांच्या विचारसरणीत व राहणीत महदंतर आहे. हे अंतर त्यांच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय विचारसरणीत व्यक्त होणे अगदी स्वाभाविक आहे. हिंदुस्थान हा देश तर विशिष्ट संस्कृतीसाठी व धर्माच्या विशेष ध्येयासाठी हजारो वर्षापासून सुप्रसिद्ध आहे. यासाठी आम्हास जे स्वराज्य येथे स्थापावयाचे आहे, ते आमच्या अंतर्गत निजस्फूर्तीस अनुरूप असे आमचे आम्ही स्थापून वाढवावयाचे आहे. दुसऱ्याची जर आम्ही नक्कल केली, तर ती नुसती माकडचेष्टा होईल. म्हणून मी म्हणत आहे की, आज घटना साधारणतः युक्तियुक्त असली तर ती पुरे आहे. ती आम्ही राबवीत असताना सुधारू व तशा सुधारणा आमच्या गरजांप्रमाणे होत गेल्या तर त्या आम्हास अधिक लाभदायक होतील.

## ऋषींची घोषणा

आपल्या प्राचीन ऋषिवाङ्‌मयात ऋषिलोक स्वराज्याचा विचार करीत असलेले व स्वराज्याचे सिद्धांत घोषणा करून सांगत असलेले दिसत आहेत, त्यांचेही आपण येथे मनन करावे—

( १ ) स विशोऽनु व्यचलत् । तं सभा च समितिश्च सेना च सुरा च अनुव्यचलन् ॥
( अथर्ववेद )

( २ ) सभा च मा समितिश्चावतां प्रजापतेर्दुहितरौ संविदाने ।
येना संगच्छा उप मा शिक्षात्, चारु वदानि पितरः संगतेषु ॥ ( अथर्ववेद )

( ३ ) राष्ट्री विशमत्ति, तस्माद्राष्ट्री विशं घातुकः ॥ ( शतपथ–ब्राह्मण )

' ( १ ) जो ( राजा ) प्रजेला अनुसरतो त्यालाच सभा, समिति, सेना व खजिना यांची अनुकूलता लाभते. ( २ ) सभा व समिति यानी अशा राजाचे रक्षण करावे व या सभांच्या सभासदानी राजाला योग्य शिक्षण द्यावे. ( ३ ) अनियंत्रित राजा हा प्रजेला खाऊन टाकतो, म्हणून तो प्रजला घातक आहे. '

हे राजकीय महासिद्धांत अथर्ववेद व शतपथब्राह्मण यांच्या काळी ऋषीनी निश्चित केले होते, हे आजही आपणास दिसत आहे. राजा जर लोकमताला अनुसरला तरच त्यास लोकसभा, लोकसमिति, सैन्याचे बल व खजिना ही अनुकूल होतील. सैन्य व खजिना यामुळेच कोणताही राजा अत्याचारी बनू शकतो. पण जर यावर जनतेचा अधिकार असला तर अशा देशातील राजा अनावर होणार नाही. लोकसभा स्वतंत्र असावी व तिच्या आधीन खजिना व सैन्य असणे योग्य आहे व लोकसभेने राजाला राज्यव्यवहाराचे योग्य शिक्षण द्यावे; म्हणजे राज्यात कोठे काय चालले आहे, प्रजाजनास काय त्रास होत आहे, वगैरेसंबंधी योग्य ते सांगावे. अशा प्रकारे लोक-सभांच्या अनुकूलतेने वागणारा राजा राष्ट्राला भूषणभूत होतो. अनियंत्रित राजा हा प्रजेला खाऊन टाकतो, म्हणून तो प्रजेला घातक आहे.

## ग्रामसभा हा स्वराज्याचा पाया

ऋषीनी निदान पांच हजार वर्षापूर्वीच हे स्वराज्यविषयक सिद्धांत निश्चित केले होते. यामध्ये ग्रामपंचायती हा स्वराज्याचा पाया असल्याचे स्पष्ट दिसत आहे. वरील मंत्रातील ' **सभा** ' ही ग्रामसभाच होय. ' **समिति** ' ही राष्ट्रसभा आहे. ग्राम-पंचायत हा याप्रमाणे आपल्या स्वराज्याचा मूलभूत घटक आपल्या देशात प्राचीन कालापासून मानला गेला आहे. बौद्धकालाच्या अखेरपर्यंत गावोगावीं या पंचायती होत्या व त्या जोरदारही होत्या. मुसलमानी व मराठी अंमलातही त्या जगून राहिल्या, पण इंग्रजी अंमलात मात्र त्या मुद्दाम नामशेष करण्यात आल्या. या ग्रामपंचायती हाच आमच्या स्वराज्याचा मूलभूत घटक होऊ शकतो. वैदिक कालापासून ग्राम–पंचायतीचे संस्कार आमच्या समाजावर झालेले आहेत. या आमच्या आंगवळणी पडलेल्या संस्था आहेत. प्रायः सर्व पौर्वात्य देशात व प्रायः सर्व कृषिप्रधान देशात ग्रामपंचायतीच त्यांच्या जीवनाचा एक भाग झाल्या आहेत, असे आपणास अनादि कालापासून आढळून येईल. आधुनिक सुधारणेच्या कालात नवी व्यवस्था अंमलात आणणाऱ्या रशियानेही 'सोव्हियेट व्हिलेज रिपब्लिक्स ' ची जाळी विणली आहेत. ही या देशातील व्यवस्था खरोखरच आपण लक्षपूर्वक पाहण्यासारखी आहे.

## कारखानदार देश

युरोप देशचा बहुतेक भाग कारखानदारी व्यवस्थेने व्यापला आहे. औद्योगिक संघ वरील कारणाने तेथे स्थापलेले आढळतात. यांची वृत्तपत्रे व मजूर–संघ हे त्या देशात प्रबल झाले आहेत. यामुळे त्यांचे सामाजिक व राजकीय जीवन अगदी निराळे झालेले आहे. या कारणाने राजकीय निवडणुकी व राजकीय संस्था अगदी निराळ्या पायावर त्यानी उभारल्या आहेत. त्या त्यांच्या जीवनक्रमास साजेशा आहेत; पण आपल्या देशातील सात लक्ष खड्यात राहणारा मुख्य शेतकरी–वर्ग या युरोपच्या जीवनाशी पूर्णतया अपरिचित आहे. याचसाठी युरोपची नक्कल करून त्या धर्तीवर जर आम्ही आमच्या स्वराज्याची उभारणी केली, तर ती आमच्या जीवनाशी अगदी विसंगत होईल. म्हणूनच आम्ही म्हणत आहो की, आमची स्वराज्याची योजना आमच्या परिस्थितीप्रमाणे आमची आम्ही ठरवली पाहिजे व आमच्या उन्नतीबरोबर आमच्या गरजाप्रमाणे ती आमच्या परिस्थितीतूनच वाढत गेली पाहिजे

यावरून आपल्या लक्षात येईल की, आमच्या स्वराज्याचा पहिला पाया 'ग्राम-पंचायत' हा असला पाहिजे व ग्रामपंचायतीत कार्य करणारे, प्रत्यक्ष गावची सेवा-करीत असलेले पुढील समितिसाठी मिळत गेले पाहिजेत. आमच्या स्वराज्याचा असा हा आराखडा आहे व फार प्राचीन काळापासून हा आमच्या परिचयाचा आहे, म्हणूनच हा आम्हास पचेल.

प्रत्येक गावात एक ग्रामसभा असावी. तिला त्या गावचा सर्व भारभार चाल-विण्याचे अधिकार घटनेप्रमाणे मिळालेले असावे. या ग्रामपंचायतीत आलेले लोकांचे पुढारी गावची सेवा करावी, या एकाच उच्च हेतूने प्रेरित होऊन काम करीत आहेत, अशी आपण कल्पना करा व आपल्या एखाद्या संस्थानातील सर्व गावे अशा रीतीने स्वयंशासित झाली आहेत, असे घटकाभर माना.

## स्वराज्याची शाळा

समजा, एखाद्या संस्थानात १०० गावे आहेत व ती ग्रामपंचायतीच्या द्वारे स्वयं-शासित आहेत. हरेक ग्रामसभेमध्ये ७ सभासद असले तर १०० गावात मिळून ७०० लोक राष्ट्रसेवेस लागलेले आपणास दिसतील. गावाचे काम करता करताच ते काम कसे करावे, ते समजू शकते. पाण्यात पडल्यावाचून पोहता येणे शक्यच नसते. पुष्कळ दिवस संवय नसल्यामुळे हे पंच प्रथम चुका करतील; पण काम करता करता त्यांची सुधारणा होत जाईल व आज चुका करणारे थोड्या दिवसानी त्यात प्रवीणही होतील. ग्रामपंचायत ही राष्ट्रीय शिक्षणाची शाळा आहे व त्या ठिकाणी प्रात्यक्षिक रीतीने राजकीय शिक्षण मिळत राहते. यामुळे अनुभवाच्या बलाने दर-रोज सुधारणा होणे त्यात शक्य होते.

## अनुभवाचे शहाणपण

अशा अनुभवाने शहाणे होत जाणारे पंचच पुढील तालुकासमिति, प्रांत-समिति व राष्ट्रसभेमध्ये जातात. अनुभवी मनुष्यच पुढे सरकत जातो व तो पुढील अनुभव घेऊन त्याच्या पुढे जात असतो. अशा रीतीने तो राजाचा प्रधान अथवा मंत्रीहि होऊ शकतो. खालपासूनच्या सर्व कामाचा यास अनुभव असल्यामुळे त्यास सर्व ठिकाणच्या खाचाखोचा समजत असतात व अशा रीतीने संस्थानभर ग्रामपंचायती व प्रांतसमित्यांचे जाळे विणले गेले, म्हणजे ते आमच्या राहणीस, विचारसरणीस व परंपरेस साजण्यासारखे स्वराज्य होईल व जसा अनुभव येत जाईल, तसे ते विकासही पावेल.

याच्या विरुद्ध एकदम निवडणूक करून कामाला अपरिचित, ग्रामीण जीवनाशी अनोखा माणूस मंत्री-पदावर आला, तर तो जनतेच्या गरजाना अगदी अपरिचित असल्याने, तो कितीहि जरी थोर असला, तरी जनतेला सुख देऊ शकणार नाही. प्रत्यक्ष ग्रामीण जीवनाशी एकजीव झालेले गावात येणाऱ्या जडचणीत जशी योग्य सुधारणा करू शकतात, तशी सुधारणा सर्वथा अपरिचित मनुष्याकडून कधीहि होणे शक्य नाही, हे सर्वांस सहज समजण्यासारखे आहे. म्हणूनच आम्ही आग्रहाने म्हणत आहो की, आमचे स्वराज्य आम्ही योजनापूर्वक आंखूया व आमचे आम्हीच ते वाढवू या.

एकदा निवडणुकी लढवल्या व एकदा कौन्सिलात आपले प्रतिनिधि पाठवले, म्हणजे तीन किंवा पाच वर्षे निवडणूक करणारास काही एक काम नसते. पुनः निवडणूक लढवावयाच्या वेळी काय ती धामधूम करावी व जनतेस नाना प्रकारच्या भुलथापा देऊन निवडणुकीत यश मिळवावे, एवढेच स्वराज्याचे सूत्र ज्याना प्रिय वाटते, त्यांच्या ग्रामपंचायतीच्या द्वारे जनतेला राजकीय शिक्षण प्रत्यक्ष देण्याचे महत्त्व काय आहे, ते ध्यानी येत नाही, असे दुःखाने म्हणावे लागते. पाचदहा वर्षांनी या दोन प्रकारच्या योजनामधील कोणती योजना जनतेमध्ये राजकीयदृष्टि वाढवणारी आहे, ते सहज समजू शकेल. आमच्या अनुभवाने आम्ही हे सांगू शकतो की ग्रामपंचायतीचे जाळे विणून त्यातून जे स्वराज्य विकसित होत जाते, त्या स्वराज्यात वावरणारे लोकच जसजसा काल जाईल, तसतसे राष्ट्रीय दृष्टीने विकसित होत जातात; म्हणूनच ग्रामपंचायतीच्या पायावर उभारलेले स्वराज्य जनतेस अधिक हितकारी आहे, असे म्हणणे योग्य होईल.

## जनसेवा करण्याची संधि

ग्रामपचायतीवर आधारलेल्या स्वराज्यात पुष्कळ मनुष्यांस पुष्कळच काम करावे लागते, हे खरे आहे व नुसत्या निवडणुकीने कौन्सिले लढवली म्हणजे कौन्सिलात थोडेसे काम केले म्हणजे झाले, म्हणजे यामध्ये काम कमी हेही खरे आहे. पण स्वराज्य म्हणजे ' **संपत्ति निर्माण करणाऱ्या जनतेची सेवा करून त्या सर्व जनतेचे सुख**

वाढविणे ' असा अर्थ असेल, तर त्यासाठी पुष्कळानी पुष्कळच प्रयत्न केले पाहिजेत व जनतेतील पुष्कळ लोकात राष्ट्रीय दृष्टीचा विकास शक्य तितका अधिक केला पाहिजे, हे उघड आहे.

## स्वराज्याने निर्भय होता येते

खरे स्वराज्य मिळाले व ते वापरता आले तर मग राज्यपदावर कोणता मनुष्य आहे, याची चिंता करण्याचे कारण नाही. लोकप्रिय मंत्र्याकडे राज्यकारभाराची पूर्ण सत्ता राहिली व ते मंत्री लोकमतास जबाबदार असले म्हणज मग राजा कोणीहि असो, तो केव्हाही जनतेस त्रास देण्यास समर्थ होत नाही. संस्थानिक आपआपल्या जाग्यावर सुखाने राहोत; संयुक्त संस्थानांचा एकंदर राज्यकारभार जबाबदारीच्या स्वराज्यव्यवस्थेने चालू लागला, म्हणजे मग राज्यपदावर कोण आहे, यासंबंधी विचार करण्याचे प्रयोजन नाही. स्वराज्यशासनाचे तत्त्व ज्याना समजले असेल, ते ' संस्थानिक जावोत ' असे म्हणणार नाहीत, पण ते स्वराज्य घेण्याचाच विचार करतील. स्वराज्य लाभले म्हणजे निर्भयता अंगी येते. आज जे संस्थाने असल्याने भयभीत झालेले दिसत आहेत, त्यांचे भय स्वराज्य जवळ आले म्हणजे खात्रीने दूर होईल.

## सहेतुक योजना

सध्या आपणापुढे जी योजना आहे, ती काही अंशी अपूर्ण आहे, हे खरे आहे; पण ती अपूर्णता त्यात मुद्दामच ठेवलेली असावी, असे वाटते. सध्या ज्या स्वराज्याचा आपण विचार करीत आहो, त्याला तीन बाजू आहेत. एक साम्राज्य सरकारची, दुसरी संस्थानिकांची व तिसरी प्रजेची. या तीन दुव्यापैकी प्रजेचा दुवा थोडासा कमजोर दुवा आहे, हे ओळखून घटना करणारानी इतर दोन बाजूनी अडचणी उपस्थित होऊ नयेत, यासाठी हे दोष मुद्दाम ठेवलेले असावे, असे वाटते व यामुळेच ते अपरिहार्य आहेत, असेही घटना–लेखकास म्हणता येईल. या दृष्टीने या योजनेचा विचार लोकानी करावा. विकारवशतेने या समितिच्या योजनेकडे कोणीहि पाहूं नये.

साबडे–समितीची योजना काळजीपूर्वक व विशेष हेतूने केलेली आहे, असे ती पाहिली असता स्पष्ट दिसून येईल. आजच अडथळे उत्पन्न होऊ नयेत, यासाठी ठिकठिकाणी घर्षण–प्रतिबंधक योजना त्यात आहेत. जी घटना घेऊन राजाजवळ जावयाचे आहे, तीमध्ये राजाना पेन्शन देण्याची भाषा लिहिता येईल काय ? याचा व्यवहाराच्या दृष्टीने आपण विचार केला पाहिजे. ही घटना घेऊन तुम्ही राजाजवळ जाऊ शकता व राजानी साम्राज्य सरकारास विचारले असताही तिकडून प्रतिकूल दडपण येणार नाही, अशी योजना यात आहे. एकदा संयुक्तीकरण झाले, म्हणजे घटना राबवता राबवता जसजशी प्रजेची शक्ति वाढेल, तसतसे आपले अधिकार वाढत जातील व शेवटी पूर्ण जबाबदार स्वराज्यशासन सर्व संयुक्त संस्थानात सुरू

करता येईल, असा आत्मविश्वास या साबडे–समितीस वाटत असल्याची साक्ष या घटनेवरून दिसून येत आहे. या दृष्टीनेच आपण सर्व प्रतिनिधींनी या योजनेकडे पहावे.

## जीवनाचे समर्पण

काही विशिष्ट परिस्थितींमुळे हे फार मोठ्या जबाबदारीचें अध्यक्षपद मी स्वीकारले, ते येथे मिळणाऱ्या मानासाठीं नसून ते तुमची व परंपरेने सर्व संस्थानातील प्रजेची सेवा करण्याची संधि मिळावी, यासाठीच होय. माझ्या अध्यक्षत्वाखाली संस्थानांतर्गत स्वराज्याचे व संयुक्त संस्थानांच्या स्वराज्याचे हे झाड, आपण सर्वांनी मिळून येथे लावले आहे. हे यश आपले आहे. मी फक्त येथे निमित्तमात्र आहे.

स्वराज्यशासन आमच्या योजनेप्रमाणे सुरू झाले, तर त्यात सर्व प्रजाजनांची सर्वांगीण उन्नति करून दाखवता येईल, यासंबंधीचे माझे एक मनोराज्य आहे. ते मनोराज्य कृतीमध्ये उतरण्याची शक्यता आज तुमच्या सहाय्याने येथे उत्पन्न झालेली आहे, म्हणूनच मी आज येथे म्हणू शकतो की, माझे राहिलेले आयुष्य जर संस्थानातील स्वराज्य माझ्या मनोराज्याप्रमाणे व्यवहारात येण्याच्या प्रयत्नासाठी अर्पण करता आले, तर त्या योगाने मी कृतकृत्य होईन. माझे जीवन या स्वराज्यासाठी अर्पिले जाऊन ते पवित्र होवो, हीच माझी इच्छा आहे.'

भाषणांनंतर चार वर्षांत दिवंगत झालेल्या कार्यकर्त्यांबद्दल दुखवट्याचा ठराव अध्यक्षानीच मांडला.

२ दक्षिणी संस्थान लोकसभेचे सर–चिटणीस दे. भ. बाळकृष्णपंत शिखरे मिरज–संस्थानच्या कारागृहात एकांतवासाची खडतर शिक्षा भोगीत आहेत, त्याना मिरज दरबारने लागलीच बंधमुक्त करावे. हे दोन ठराव झाल्यावर—

दक्षिणी संस्थानातील धान्यपुरवठ्याच्या संबंधाचा ३ रा ठराव संमत झाल्यावर काही जाणकारानी संघराज्य व जबाबदार राज्यपद्धति याच्या योजनाबाबत काही विधायक सूचना केल्या. या सर्व सूचनांचा विचार करण्याकरता साबडे समितीची वाढ करण्याचे ठरून त्याप्रमाणे पुढील ठराव पास करण्यात आला– ( १ ) प्रत्येक संस्थानातून ताबडतोब संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति सुरू झाली पाहिजे. ( २ ) साबडेसमितीने द. सं. संघराज्य योजनेचा जो आराखडा तयार केला आहे, त्यांत अनेक दुरुस्त्या करण्याची जरुरी वाटत आहे. या आराखड्यात योग्य त्या दुरुस्त्या करून तो परिपूर्ण करण्यासाठी या समितीत भास्करराव मराठे ( मिरज ), वि. अ. मसूरकर ( मुधोळ ), हणमंतराव कौजलगी व हब्बू ( विजापूर ) व बी. एन्. दातार ( बेळगाव ) या सदस्यांची भर साबडेसमितीत घालण्यात येत आहे. शिवाय साबडेसमितीस अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार देण्यात येत आहे. या समितिने चार महिन्यात आपले इतिवृत्त सादर करावयाचे आहे.

*

शिवाय फेडरेशनचा एक भाग म्हणून सर्व दक्षिणी संस्थानांचे संयुक्त हायकोर्ट व काही खात्यांचा संयुक्त कारभार घडवून आणण्यासाठीं तात्काळ प्रयत्न करण्यात यावा. ( ३ ) सांगली, जमखिंडी, औंध व फलटण या चार संस्थानातील सोपीव खात्यांचा कारभार लोक–नियुक्त मंत्र्यांच्या हातात आहे. या मंत्र्यानी आपापल्या संस्थानाधिपतींची सोपीव खात्यांचा कारभार समाइकीने चालविण्याबाबत संमति आहे की नाही, याबद्दल लोक–सभेच्या कार्यकारी मंडळाकडे एक महिन्याच्या आत कळवावे.

लोकसभेचे हे जमखिंडीचे अधिवेशन अनेक तऱ्हेने महत्त्वाचे ठरून विधायक कार्याच्या दृष्टीने पुढे पाऊल टाकण्याच्या बाबतीत निश्चित प्रगति झाली, व याचे सर्व श्रेय पं. सातवळेकर व अनंतराव सावडे यांच्या योजकतेला आहे. या अधिवेशनात कानडी–मराठीचा भाषिकवाद प्रकर्षाने प्रकट झाला आणि दक्षिण संस्थानांचा जो मुलूख दोन्ही भाषिकात विखुरलेला आहे, तेथे चळवळ करताना कोणत्या बाबतीत व कशी सावधगिरी बाळगावयास पाहिजे याची जाणीव झाली. अशा नाजूक परिस्थितीत संस्थानी चळवळीला सावडे यांचे लाभलेले मार्गदर्शन फार मोलाचे ठरले. या अचूक मार्गदर्शनाचा लाभ संस्थानिकानी न करून घेतल्यामुळे त्यानी अपेक्षेपेक्षा आपले मरण आपल्या हाताने लवकर ओढवून घेतले असे म्हणण अप्रस्तुत ठरणार नाही. [ 'संस्थानांच्या विलीनीकरणाची कथा '–वि. अ. पटवर्धन ]

याप्रमाणे विषयनियामक समितीमध्ये पास झालेले चारही ठराव खुल्या अधिवेशनांत मांडून, निर्णय जाहीर केल्यावर अध्यक्ष पंडित सातवळेकर यानी आपले—

## समारोपाचे भाषण

करण्यास सुरुवात केली. यावेळी त्याचा कंठ भरून आला होता, तरी देखील उत्कट उत्साहामुळे त्यांची ओघवती वाणी अनिरुद्ध चालू लागली.

ते म्हणाले, ' पहाट होत चालली आहे. इतका वेळ शांत चित्ताने आपण हजारो लहान–थोर स्त्रीपुरुष बसून राहिलेले आहात. माझ्यापुढे ही परमेश्वराची स्वरूपे आहेत, असे मला वाटते. या तुम्हा जमखंडीवासी परमेश्वरस्वरूपी जनतेची सेवा करण्याची मला आपण संधि दिल्याबद्दल मी आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. जमखंडीकरांचे मातृभाषा–प्रेम अत्यंत अवर्णनीय आहे. मी त्यांचे अंत:करणपूर्वक अभिनंदन करतो.

' मातृभाषेसाठी प्रत्येकाने अशीच खटपट केली पाहिजे; पण स्वराज्यासाठी प्रत्येकाने याहीपेक्षा अधिक खटपट केली पाहिजे. रशियामध्ये भिन्न भिन्न भाषांचे लहान लहान गट आहेत; पण ते एकमेकावर कधीच आक्रमण करीत नाहीत. स्वराज्य मिळताच जमखंडीसही तेच दृश्य दिसेल व स्वराज्यात कोणीही कोणावर आक्रमण करणार नाही व करूही शकणार नाही.

' माझ्या काही मित्रानी स्वराज्यासाठी इतकी घाई का, असा प्रश्न विचारला आहे. मला त्याबद्दल अत्यंत विषाद वाटला. स्वराज्य संपादन करण्याच्या बाबतीत मला अधिकात अधिक घाई करावीशी वाटते. इंग्लंड, रशिया, अमेरिका, जपान, जर्मनी या देशामध्ये अशा प्रकारचे प्रयत्न झाले आहेत. तेथे कोणीही स्वराज्यासाठी घाई का करता, असा प्रश्न विचारीत नसतात; कारण स्वराज्यासाठी सर्वांसच आतुरता असणे योग्य आहे. फक्त जे मृतप्राय लोक असतील, त्यासच स्वराज्याची घाई नसणे शक्य आहे. पण तसे मृतप्राय येथे कोणी नाहीत, म्हणून आम्हा सर्वांस स्वराज्याची फारच घाई झाली आहे. या घाईने आमच्या काही चुकाही होतील, पण स्वराज्याचा अधिकार म्हणजे चुका करण्याचा अधिकार होय. चुका करूनच सुधारणा होत जाते. आज आपण स्वराज्याची योजना चार महिन्यावर पुढे ढकलून, आपली सुधारणा आपण स्वतः आपल्या प्रयत्नानी करण्याचा प्राप्त झालेला एक सु–अवसर दूर केला आहे.

' आज येथे काही राजाचे प्रतिनिधि प्रकट रीतीने उपस्थित झाले आहेत. काही गुप्त रीतीनेही हजर आहेत. आमच्या या सभेची हकीगत आपापल्या अधिपतींच्याकडे ते कळवितीलच. आपल्या या स्वराज्य लांबीवर टाकण्याच्या सूचनांचे परिणाम काय होतील ते पहा.

' गेल्या चार महिन्यातील राजकीय परिस्थितीची मला बरीचशी माहिती आहे. त्या माहितीवरून मी म्हणतो की, आपण शक्य त्या त्वरेने आजच्या आजच ही स्वराज्य–घटना स्वीकारण्याचा प्रयत्न केला पाहिज होता.

' सावडे–समितीने केलेली घटना व्यवहार्य आहे. त्या घटनेतील पहिला भाग संस्थानाधिपतीना अनुकूल आहे. सावडेसमितीने जाणूनबुजून तशी ती घटना केली आहे; पण त्याचवेळी त्या घटनेचा दुसरा भाग पहा. तो संस्थानी जनतेलाहि तितकाच अनुकूल आहे. तुम्हाला त्यामुळे अंतर्गत पूर्ण व जबाबदारीचे स्वराज्य मिळणार आहे. तो भाग तुम्ही आपल्या लक्षात घ्या; पण त्याकडे आपण लक्ष दिले नाही व कानडी–मराठी–वादासारखे दुहीचे प्रकार येथे आपण केलेत व जवळ आलेले स्वराज्य चार महिन्यापुढे फेकलेत. आपल्यामध्ये दुही आहे. आपले बळ विभागलेले आहे. त्याचे परिणाम आपणाला भोगावे लागणार आहेत. जे झाले ते झाले. आता चार महिन्यानी तरी सावडे–समितीची घटना सुधारून पुढे येताच त्या घटनेप्रमाणे तत्काळ अम्मलबजावणी व्हावी, असा आग्रह धरा.

' वेळ फार झाला. आपण शांत हृदयाने माझे बोलणे ऐकून घेतल्याबद्दल आपणा सर्वांचे मी पुनः एकवार आभार मानतो. '

अध्यक्षांचे समारोपाचे भाषण संपल्यावर आभार–प्रदर्शन व राष्ट्रगीत होऊन सभेचे काम संपल्याचे स्वागताध्यक्ष श्री. लाहोटी यानी जाहीर केले.

वंदे मातरम्

: १५ :

# लोकजागर, लोकशिक्षण

**आज-उद्या** भारताला जर कशाची जरूर असेल तर ती पुरुषार्थी पराक्रमाची. मनाच्या या खात्रीमुळेच औंधास आल्यावरही पंडितजींनी सार्वजनिक अशा नित्य आणि नैमित्तिक चळवळीत भाग घेतला, तरी तो त्यांच्या जीवनाचा वा जीवनध्येयाचा आता मुख्य केंद्रबिन्दु नव्हता. पुरुषार्थी पराक्रमाची ओजस्वी प्रेरणा देण्याचे सामर्थ्य ज्या वेदात आहे, त्या वेदांचे महत्त्व आणि अर्थ तरुण–पिढीपर्यंत जितके पोहोचवता येतील तितके पोहोचवावे, अशी तळमळ पंडितजींना लागली होती. अथर्व–वेदातील मातृभूमि–गीताच्या प्रभावाचा प्रत्यय एकदा पंडितजींनी घेतला होता. त्यामुळे–

**संसार साधुनी परमार्थाचा लाभ जयाने केला । तो नर भला, भला, भला ।।**

हे खरे असेल तर वेदार्थयत्न आणि वेदार्थ जनतेत रुजविण्याकरता व्यापक लोक-शिक्षणाच्या साधनाला हात घातल्याशिवाय गत्यंतर नाही, असे पंडितजींच्या मनाने घेतले आणि त्या दृष्टीने ठाम पावले टाकीत टाकीत त्यानी औंधास ' स्वाध्याय–मंडळाची ' स्थापना १९१८ सालीच केली.

स्वाध्याय–मंडळाच्या कार्याला काही स्वरूप येण्याच्या ऐनसुमारासच औंध येथे सन १९२५ साली पाचवड ता. वाई, जि. सातारा येथील श्री धुंडिराज गणेश ऊर्फ बापूदीक्षित बापट यानी एक सोमयाग केला व तो पशुहननपूर्वक केला. तो संगीन पहाऱ्यात होणारा यज्ञ असला तरी त्यास तत्त्वतः विरोध करणे पंडितजींना आपले कर्तव्यच वाटले. कारण यज्ञात पशुहनन करावे अशी वेदांची आज्ञाच नाही. त्या-मुद्यावर तर पंडितजींनी हैदराबादेस असताना रायचूर येथे झालेल्या यज्ञास कडाडून विरोध केला होता. आता सांगलीस जैनमंडळींच्या विरोधामुळे दीक्षितांच्या यज्ञास

परवानगी न मिळाल्यामुळें, तो औंधास होऊ घातल्यावर, लोकशिक्षणार्थ 'शास्त्रार्थ' 'करण्याचे आव्हान देऊन पंडितजींना त्या यज्ञास विरोध करणे कर्तव्यच वाटले. तसा त्यांनी केला; कारण 'यः क्रियावान् स पंडितः।'

पंडितजी विरोधास उभे राहिल्यावर खरे म्हटले तर विद्वच्चर्चेने शास्त्रार्थ व्हावयासच हवा होता, पण दीक्षितांचे पुरस्कर्ते त्याच नेमक्या गोष्टीला तयार झाले नाहीत.

**अशुभस्य कालहरणं, कालं विघ्नेन योजयेत् ।**

अशा क्लृप्त्या पुढें येऊ लागल्या आणि वृत्तपत्रातून मग उलटसुलट लेख आणि उखाळ्या पाखाळ्या यांची राळ उडाली. संगीन पहारा मिळवून होणाऱ्या यज्ञाच्या पुरस्कर्त्यांचा विवेक कचखाऊ होता, या पंडितजींच्या मुद्याला कोणीच सरळ उत्तर दिले नव्हते. त्यामुळे, जनसामान्यापासून विचारवंत समाजधुरीणापर्यंत सर्वमंडळी पंडितजींचा शास्त्रार्थच प्रमाण मानीत होती व आहेत. जनसामान्यांला एकनाथी भागवत ( एकादशस्कंध ) अध्याय ५ ओव्या २६० ते २७२ चा आधारही होता.

पंडितजींच्या कृतिप्रधान लोकशिक्षणाच्या प्रसंगापकी हा एक अपूर्व प्रसंग होता.

लोकशिक्षणाच्या नित्याच्या प्रणाली व उपक्रमांच्या संबंधात पंडितजींनीच लिहून ठेवले आहे की—

'औंधमध्ये येऊन वेदांचा अभ्यास व वेदांचे अनुवाद करावे व ते लोकापुढे ठेवावे, हा मुख्य उद्देश होता. यामुळे माझा अधिक वेळ या कामात जात असे. जो वेळ उरेल तो मी संस्थानच्या सेवेसाठी अर्पण करीत असे.

'माझे जे पंजाबमध्ये सुमारे ९ वर्षे राहणे झाले व त्यावेळामध्ये व्याख्यानादिकामुळे जो धर्मप्रचार मी पंजाबमध्ये केला, त्याचा लाभ औंधमध्ये आल्यानंतर जे वेदानुवाद मी केले ते हिंदीमध्ये केल्याने मला मिळाला. पंजाब, युक्तप्रांत व मध्यप्रांत या भागात ते विकले जात व या प्रकाशनाला तेथूनच धनाची सहाय्यता येई. दोन तीन वर्षात अशा रीतीने सुमारे दीड लाख रुपयांची सहाय्यता पंजाबमधून आली व त्यामुळे मला प्रकाशनही बरेच करता आले.

'वा. यजुर्वेदाचे ५।६ अध्याय अनुवादासह छापले. अथर्ववेदाचा सरहस्यानुवाद छापला. हा अथर्वानुवाद जवळ जवळ २५०० पानांचा ग्रंथ २५ रु. किंमतीचा प्रकाशित झाला. याशिवाय 'वैदिकधर्म' नावाचे मासिक औंधला आल्यावर सुरू केले ते आजपर्यंत सतत चालू आहे. त्यानंतर मराठी 'पुरुषार्थ' मासिक सुरू केलें तेही आजपर्यंत चालू आहे.

'श्रीमद् भगवद्गीतेवर पुरुषार्थ–बोधिनी नावाची विस्तृत टीका लिहायास घेतली व ती मासिकरूपाने प्रसिद्ध करण्याचे ठरवून 'भगवद्गीता' मासिक हिंदी व मराठी अशा दोनही भाषामध्ये सुरू केले. यासंबंधाने एक महत्त्वाची गोष्ट नमूद करण्यासारखी आहे, ती ही—

' भगवद्गीतेवर मी टीका लिहावयास घेतली हे खरे व तीमध्ये नव्या दृष्टीने विचार झालेला असल्यामुळे ती टीका लोकास पसंतही पडू लागली हेही खरे. पण त्यातील **दिव्यदृष्टि व विश्वरूपदर्शन** हे काय आहे ते मला समजत नव्हते व जे समजत नाही त्यावर मी टीका लिहिणार कशी ? यामुळे मी प्रतिदिवशी ईश्वराची प्रार्थना करीत असे, की– हे ईश्वरा, मी टीका लिहावयास घेतली आहे खरी, पण मला विश्वरूपदर्शन व दिव्यदृष्टि हे काय कोडे आहे, ते समजत नाही. यासाठी हे कोडे कसे उलगडेल ते योग्य रीतीने मला उलगडवून सांग. नाहीतर, दहाव्या अध्यायाच्या पुढे ही टीका लिहून होणार नाही.

' अशी प्रार्थना मी न चुकता दररोज करीत असे. अशा रीतीने ५ अध्याया-वरील टीका संपत आली. इतक्यात ओंकारमांधाता या क्षेत्रातून एका सत्पुरुषाचे एक कार्ड मला आले. त्यात पुढील ओळी होत्या—

**' नर्मदे हर ! तुम आकर मुझे यहां मिलो, तुमको जो चाहिये वह यहा मिलेगा। जो व्यय आनेसे होगा, उससे कई गुना अधिक लाभ होगा। '**
**विज्ञानशाला, ओंकारमांधाता.                                        मायानंदचैतन्य.**

' हे पत्र मला आले. पण जन्मापासून साधुसंतांच्या नादी मी म्हणून लागत नसे. यामुळे ८ दिवस हे कार्ड तसेच टेबलावर पडून राहिले. तसेच आणखी चार दिवस गेले व मग मनात आले की जाऊन तर पहावे, की काय होते ते. असे ठरवून मी निघालो. दोन दिवसांच्या प्रवासानंतर मोरटक्की स्टेशनवर पोचलो व तेथून टांग्याने ओंकारेश्वराजवळ पोचलो. तेथून पायी दोन मैल चालावयाचे होते, म्हणून सामानासाठी हमाल केला व विज्ञानशाळेजवळ पोचव असे त्यास सांगितले. तो हमाल म्हणाला की ' वह भ्रष्ट है। ' हे ऐकून मला फार वाईट वाटले ! इतका खर्च करून इतका लांब आलो तो काय भ्रष्टाच्या दर्शनासाठी ? मी त्यास विचारले की– ' त्याला भ्रष्ट का म्हणतोस ? ' तो उत्तरला की– ' उसने परस्त्री रखी है। ' मला हे ऐकून फारच वाईट वाटले. इतक्यात आम्ही विज्ञानशाळेजवळ पोचलो. तो एक बाई तेथें हिंडत असलेली दिसली. तेव्हा मनाने घेतले की तो हमाल म्हणत होता ते खरे. ही कदाचित् असेल ! या विचाराने मन फारच विरस झाल.

' मी सुमारे ९ वाजता विज्ञानशाळेत जाऊन पोचलो. श्री मायानंदचैतन्य महाराज तेथें धुमी पेटवून तिच्याजवळ गांजाची चिलीम ओढीत बसले होते. वेष वैराग्याचा होता. मला गांजा–तंबाकूचा मनापासून कंटाळा होता. पण हे गांजा ओढीत असत. मी त्यास नमस्कार केला तेव्हा त्यानी विचारले की, ' जेवणार कोठे ? ' मी म्हणालो की, ' स्नान करून ओंकारेश्वर गावात जाईन व तेथील खाणावळीत जेवण करीन. ' त्यावर ते सन्त म्हणाले, ' दुपारचे २ मैल ये जा

करण्यापेक्षा येथेंच जेवा. ' मी म्हटले ' ठीक आहे. ' मी नर्मदानदीवर स्नान केले. गुरुसेवा घडावी म्हणून काही घागरी पाणी आणून भरले. संध्या केली. इतक्यात त्यानी ' जेवण तयार आहे ' असे म्हणून मला बोलावले.

' जेवण त्या धुमीवर लोखंडी तिकटण ठेवून त्यावर पातेले ठेवून एकदोन पदार्थ ते शिजवीत असत. फार पदार्थांचा बोबाळ नसे. मी जेवावयास बसलो व दोनचार घास घेतले, तो जेवणाला अपूर्व स्वाद आहे असे मला आढळले ! असा स्वाद इतक्या सहज शिजविलेल्या अन्नात उत्पन्न कसा झाला, याचे मला अजूनही आश्चर्य वाटत आहे ! ! सद्‌गुरुचा प्रसादच तो होता ! अशा अपूर्व रुचीने जेवण झाले. तो स्वाद मला अजूनही आठवत आहे.

' जेवण झाल्यावर ते मला म्हणाले की, दोन दिवसांच्या जाग्रणाचा त्रास दूर करण्यासाठी आता तुम्ही दोन तास निजा. त्यांची झोपडी म्हणजे नर्मदेच्या वाळवंटात चार खांब उभारून त्यावर थोडे छप्पर घातलेले होते. बाजूला फळचा व पत्रे लावले होते. खाली रेतीच होती. त्याच रेतीवर मी बिछाना पसरला व दोन तास निजलो. त्यानंतर ते मला म्हणाले की, ' ही दोन पुस्तके वाचा. ' ती मी एका तासात वाचली व त्यांच्याजवळ जाऊन बसलो व दिव्यदृष्टि वा विश्वरूपदर्शनासंबंधाने काय उपदेश देणे असेल तो द्या, असे म्हटले.

' त्यानंतर त्यानी सुमारे एक तास गीतेतील व इतर ग्रंथातील यासंबंधाचे उल्लेख सांगून दिव्यदृष्टि ही अशी असते व विश्वरूपदर्शन असे असते, असे समजावून सांगितले.

' वेद, उपनिषद्, गीता यातील वचने मजकडे होतीच. फक्त त्यांची उपपत्ति कशी लावावयाची ते समजणे बाकी होते. ती उपपत्ति यावेळी त्यानी मला समजावून दिली व ' यापुढे विचार करा म्हणजे सर्व समजून येईल. ही मोडणी तुम्ही लावीत जा म्हणजे कोठेंही कठीणता राहणार नाही ' असे ते म्हणाले.

' हे त्यांचे म्हणणे अक्षरशः खरे होते. वेदादि ग्रंथातील वचने जरी जवळ असली, तरी ही उपपत्ति समजल्याशिवाय त्यांची संगति मला लावता येत नव्हती. ती रीति आज त्यांच्याकडून समजली, त्यामुळे जी वचने परस्परविरोधी आहेत, असे आम्हास इतके दिवस वाटत होते, तीच वचने परस्परविरुद्ध नाहीत, तर ती एकाच मोठ्या सिद्धांताचा आविष्कार करीत आहेत अशी खात्री पटली. एक प्रकारचा आनंदही वाटला व येथे आल्याचे सार्थक झाले असेही वाटले. एक तासाच्या त्यांच्या समजावण्याने ती त्यांची विचारपद्धति मी आपल्या गीतेच्या टीकेमध्ये ठिकठिकाणी दाखवली आहे. सातव्या अध्यायानंतरच्या टीकेमध्ये जेथे जेथे विश्वरूप ईश्वराची कल्पना वर्णिली आहे, तेथे मी या ज्ञानाचा उपयोग केला आहे.

' या विज्ञानाश्रमामध्ये यांचे एक शिष्य धंद्याने डॉक्टर राहत असत. त्यांची पत्नी व लहान मुलगा येथेच निराळ्या झोपडीत रहात असत. याच बाई मी आल्याबरोबर मला प्रथम दिसल्या. त्यांची निराळी झोपडी होती व त्यांचा व स्वामीजींचा काही संबंध नव्हता.

' येथे प्रतिदिवशी सायंकाळी ६ वाजता उपदेश होत असे. त्यात दिव्यदृष्टि व ईश्वराचे विश्वरूप समजावून दिले जात असे. हा उपदेश ऐकण्यासाठी एक लाकडे विकणारी बाई प्रतिदिवशी येत असे. एक वर्ष स्वामींचा उपदेश ऐकल्या-नंतर तिच्या अंतःकरणात दिव्यदृष्टीचा प्रकाश पडला. नंतर तिने लेखनवाचन शिकून गीता वाचावयास व अर्थ समजून घेण्यास प्रारंभ केला. एक वर्षामध्ये ती गीतेवर व दिव्यदृष्टि यावर प्रवचने करू लागली व ती इतकी शास्त्रशुद्ध होऊ लागली की मोठमोठे विद्वान्ही ती ऐकून तिच्यापुढे मान झुकवू लागले ! पुढे मोठमोठ्या सभामध्ये इतर विद्वानानी विचारलेल्या वेदान्तविषयक प्रश्नांची उत्तरे या बाईने द्यावी; पण जेव्हा ही बाई प्रश्न करी तेव्हा त्या प्रश्नांची उत्तरे कोणासही देता येऊ नयेत ! असे प्रसंग सभामध्ये वारंवार उद्‌भवू लागले. या कारणाने शास्त्रीमंडळींनी था बाईचा व स्वामींचा अनैतिक संबंध आहे असा बोभाटा करण्यास प्रारंभ केला ! ! वास्तविक तसा प्रकार येथे काही एक नव्हता व असणेही शक्य नव्हते. हा सर्व वृत्तांत मला तेथील माझ्या मुक्कामात कळून आला व पंडितांच्या मत्सराबद्दल अत्यंत वाईटही वाटले.

' सध्या ही विज्ञानशाळा चालू आहे व वरेच प्रचारक चारही बाजूला या दिव्यदृष्टीच्या ज्ञानाचा प्रचार करीत आहेत. पण जनतेच्या समजूतीत व आचर-णात ही दिव्यदृष्टि केव्हा येईल ते काही आज सांगता येत नाही. '

वेदवाङ्मयातील वैदिक जीवनाचा ध्यास लागून पंडितजींनी त्या वाङ्मयाचा अभ्यास चालविल्याबरोबर पंडितजींचे श्वासनिश्वास वेदच बोलू लागले. परिणा-मतः स्वाध्याय-मंडळामार्फत मोठ्या प्रमाणावर उभारलेल्या सहकारी संस्थेला किंवा सरकारला जे करता येणे नाही ते वेदप्रकाशनाचे काम पंडितजींनी करून दाखविले. वैदिकसंहितांचा मराठी व हिंदी अनुवाद स्वताच्या भाष्यासह पंडितजींनी प्रसिद्ध करण्यात किती जिकीर आणि परिश्रम घेतले, याची नुसती कल्पना केली तरी विद्वत्तेला जनसेवेस राबविण्याचे त्यानी केलेले दिव्य पाहणारांची मान आदराने लववेल. चारी वेदांच्या प्रमाणेच वाल्मीकी रामायणाचा मराठी व हिंदी व महाभारताचा हिंदी अनुवाद पंडितजींनी सटीक प्रसिद्ध केला. त्याचप्रमाणे मनुस्मृतीचेही संशोधन त्यानी केले. आपल्या पुरुषार्थबोधिनी या गीतेवरील टीकेत आणि उपनिषदादिकांच्या प्रबोधनात पंडितजींनी रूढ परंपराना धक्का दिला असून भारतीय संस्कृति व्यव-हारशुद्ध होऊन नांदावी म्हणून ब्रह्मज्ञानाबरोबरच अध्यात्माधिष्ठित मानवी व्यवहार

सर्वच क्षेत्रात भारतीयानी स्वावलंबनाने, स्वाभिमानाने आणि स्वतेजाने केले– साधले पाहिजेत, असे पंडितजींच्या लेखनप्रकाशनातील लोकशिक्षणाचे धोरण आहे. कोणाही प्रयत्नवादी अभ्यासकाला सहाय्यक व्हाव्या म्हणून पंडितजींनी ऋग्वेदादि ग्रंथांच्या सूचि, उपमा–सूचि व भगवद्गीतेच्या श्लोकांची अंत्याक्षरसूचि करून ठेवून एक अपूर्वाई केली आहे.

भारतात गाईचे महत्त्व केवढे होते व आहे हे स्पष्ट करण्याकरता पंडितजींनी लिहिलेले ' गोमेध ' हे पुस्तक देखील स्वाध्याय–मंडळाचे भूषणास्पद प्रकाशन असून त्यांचा गोज्ञानकोश कृषिवाणिज्य हे शास्त्र शिकणाराना मार्गदर्शक ठरेल. ब्राह्मणग्रंथ व आरण्यकेही पंडितजींनी प्रसिद्ध केली आणि ' सोमरस ' हे स्वतंत्र पुस्तक लिहून यज्ञीय ब्राह्मण मद्य पीत हा भ्रम सपशेल निपटून काढला.

वेदाचे संस्कृत सोपे करून सांगण्याकरता पंडितजींनी संस्कृत–स्वयं–शिक्षक ही पुस्तकमाला लिहिली आणि संस्कृतभाषा शिकविण्यासाठी स्वाध्याय–मंडळामार्फत शिक्षणवर्ग काढून भारतात व आफ्रिकेतसुद्धा संस्कृतची परीक्षाकेंद्रे उभारली. अशा तऱ्हेने आपली सेवाभावी विद्वत्ता व प्रयत्नवाद पंडितजींनी समाजसन्मुख केला व आपल्या राष्ट्रभक्तिला नवीन निर्माणकार्यास उपयोगात आणली.

पंडितजींनी हे सर्व आरंभले याचे कारण भारताची धार्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक व व्यावहारिक व्यवस्था पाहून त्यांचे मन अस्वस्थ झालेले होते. वैदिक-कालातील आर्य ऊग्र, शूर, तेजस्वी होते. त्यांचेच आपण वंशज अडीच हजार वर्षे नसले तरी मीरकासीमच्या स्वारीपासून दीडहजार वा बाराशे वर्षे तरी विधर्मी-लोकांच्या दास्यात व आपापसातील दुहीत का खितपत पडलो ? असा विचार पंडितजींना शल्यासारखा बोचत होता. त्यांच्या निरीक्षणाने व मेंदूने एकच उत्तर दिले की वेदकालीन संस्कृतीचा उच्छेद झाला असल्याकारणाने, आपल्या राष्ट्राला ती नामुष्की येत आहे. ती घालविण्यासाठी लोकशिक्षण करावयाचे साधन म्हणून वैदिक-धर्म हे हिंदी मासिक पंडितजींनी १९१९ साली सुरू केले. वेदोक्त धर्माशिवाय त्या मासिकात कोणताच विषय यावयाचा नाही, हा कटाक्ष अव्याहत चालू आहे. वेदातील मंत्र व त्यातील ओजस्वी उपदेश प्रत्येक महिन्यास जनतेच्या पुढें येऊ लागल्या-कारणाने वैदिकधर्माचे श्रेष्ठत्व मनी मनी बिंबू लागले. त्याच उद्देशाने पण मराठी वाचकाकरता १९२४ च्या लोकमान्य–पुण्यतिथीस पुरुषार्थ मासिक सुरू करून त्यात विचारस्वातंत्र्याला थोडीशी मोकळिक दिली. कोणत्याही कारणाने वाचकांच्या हलक्या व हलकट प्रवृत्तीस उत्तेजन मिळू नये अशी काळजी मुखपृष्ठावरील चित्रा-पासून सगळ्या बाबतीत कटाक्षाने घेण्यात ही मासिके अग्रेसर राहिली आहेत. भगवद्गीता मासिकही त्यानी तीन वर्षे चालवून पुरुषार्थप्रबोधिनी गीता विशद केली.

पंडितजींनी ' वैदिकधर्म ' मासिक सुरू केले, तो काळ जालियनवालाबागेतून उद्भवलेल्या प्रक्षोभाचा होता. त्या प्रक्षोभातून राष्ट्रात असहकार व त्याचबरोबर

स्वदेशीव्रताने वस्त्रस्वावलंबन यांची चळवळ जोरात चालू होती. विधिमंडळावरील राष्ट्रीयांच्या बहिष्कारामुळे ती मवाळापेक्षा गचाळानी भरली आणि नादानांला हाताशी धरून नौकरशाही देशभर नंगा नाच घालू लागली. तेव्हा बाहेरच्याप्रमाणे विधि-मंडळाच्या चार भिंतीच्या आखाडयातही नौकरशाहीशी दोन हात करणाऱ्या राष्ट्री-याना विधिमंडळात बसण्याची हरकत कॉंग्रेसने बाजूस सारली. मग, नौकरशाहीची फजिती काय विचारावी ? मध्यवर्ती सरकारचा एक अर्थसंकल्पच फेटाळला गेला आणि दिल्लीच्या राष्ट्रीय चावडींत विठ्ठलभाई पटेल ( अध्यक्ष होऊन ) बसला. अशा काळात पंडितजींनी पुरुषार्थ सुरू केला. छत्रपति शिवाजीमहाराजांच्या त्रिशतसांवत्स-रिक जन्मोत्सवाची पर्वणी साधून १९२७ मध्ये पुरुषार्थाने काढलेला शिवांक तरुणाना स्फूर्तिदायक ठरला आणि त्यापुढे परिस्थितिसापेक्ष चिकित्सक आणि उत्था-पक लेख येत राहिल्याने पंडितजींनी मनी धरलेला लोकशिक्षणाचा हेतु सफल होत जाऊन स्वाध्याय-मंडळाचे जुन्या वैदिक वाङ्मयाचे नवकालोचित संपादन व मासिकद्वारे होणारे लोकशिक्षण करण्यात पंडितजीनी स्वतःबरोबर पत्रकार सृष्टिला, प्रकाशनव्यवसायाला आणि सामान्य वाचकांच्या मनोवृत्तीला उंच पातळीवर नेले. १९३०–१९३२ च्या अन्याय्य-कायदेभंगाच्या चळवळीपूर्वी १९२७ साली राष्ट्राने सायमन कमिशनवर घातलेला बहिष्कार, ' तूर्त आणि ताबडतोब हे स्वराज्य पाहिजे ' म्हणून नेहरूरिपोर्टाच्या रूपाने सर्वपक्षसंमत मागितलेल्या सुधारणा, त्या फेटाळल्या गेल्या म्हणून १९३० साली पंडित जवाहरलाल नेहरूनी केलेली स्वातंत्र्याची घोषणा, १९३१ साली दुसऱ्या गोलमेज परिषदेस गांधी–अर्विन–करार होऊन कॉंग्रेसचे एक-मेव प्रतिनिधि म्हणून जाऊन ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या सज्जनपणाचे त्यानी केलेले वस्त्रहरण, १९३४ साली संसदीय मनोवृत्तीने धर धरला असल्याचे मान्य करून १९३५ च्या सुधारणा मोडण्याकरताच राबविण्याचा कॉंग्रेसने घेतलेला निर्णय आणि या सर्वापेक्षाही १९३८ साली भारताच्या आठ प्रांतात राज्यपालानी लुडबुड न करण्याच्या आश्वासनावर, झालेली कॉंग्रेसची मंत्रिमंडळे आणि फिरून १९३९ साली हिटलरी होरपळ ऊर्फ दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाल्यावर, युद्धप्रतिबंधा-च्या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात कॉंग्रेसने आरंभलेला वैयक्तिक सत्याग्रह, या ब्रिटिश रियासतीत घडणाऱ्या गोष्टींचा संस्थानावर, संस्थानी प्रजेवर व राज्यकारभाराच्या अडणीवर होणारा साहजिक परिणाम लक्ष्यात घेतला, तर या काळात पंडितजींनी आणि त्यांच्या साथ्यानी औंधसंस्थानात व संस्थानी प्रजेत जो राजकीय जागर केला आणि ग्रामपंचायतींचे स्वराज्य साकार करण्याकरता, मागील प्रकरणातून सांगितल्या-प्रमाणे परिश्रम केले त्याना घोसदार उठाव येतो, हे मुद्दाम म्हणून सांगण्याची आव-श्यकताच नाही ! परकीयांच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष सत्तेचे उच्चाटन आणि स्वकीय सत्तेचे संस्थापन असा हा दुहेरी आटयापाटयांचा सूर धरण्याची जबाबदारी स्वीकारून चळवळींची वाटचाल करीत असताच, लोकशिक्षणाने त्या वाटचालीला पोषक व

प्रेरक मनोवृत्ति समाजात मजबूत राखण्याकरता, नियतकालिकांचे संपादन निष्ठेने बिनचूक करीत रहावयाचे आणि भारतीय संस्कृतीची अमरमूल्ये दृढ व्हावीत म्हणून हजारो पानांचे ग्रंथही लिहून प्रसिद्ध करीत रहावयाचे, हे खरोखर 'मनोजव, मारुततुल्यवेग, जितेन्द्रिय, बुद्धिमतां वरिष्ठ,' अशा वज्रहनुमानाला शोभणारेच काम नाही काय ? ते पंडितजींनी घडविले याबद्दल औंधसंस्थानातील प्रजाजनांप्रमाणेच वैदिकधर्म–पुरुषार्थाचे समंजस वाचक आणि सार्वजनिक जीवनाचे नि इतिहासाचे अभ्यासक पंडितजींना धन्यवाद दिल्याशिवाय खास राहणार नाहीत.

: १६ :

## काळाची कराल करणी ! !

**औंध येथे कायमचे राहून वेदाच्या गूढ** अर्थाचे सुबोध स्पष्टीकरण हिंदी व मराठी या दोन भाषांत तरी प्रथम प्रकाशित करावे, असे ठरविल्यावर पंडितजींनी औंध गावाबाहेर पण लगतच जागा खरेदी केली. त्या जागेवर राहण्यासाठी घर, येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्या मंडळीसाठी अतिथिगृह आणि आपल्या वेदप्रकाशनास आवश्यक असलेले मुद्रणमंदिर पंडितजींनी बांधले. भारतमुद्रणालय उभे होताच १० जानेवारी १९१९ रोजी, टिळकपंचांगाप्रमाणे असलेल्या मकरसंक्रमणाच्या सुमुहूर्तावर " **यजुर्वेदाचा ३६ वा अध्याय** " हिन्दीमध्ये " **सच्ची शान्तिका सच्चा उपाय** " या नावाने प्रकाशला. या पहिल्या प्रकाशनाची किंमत अवघी आठ आणे ठेवण्यात आली होती. त्याच्या दोन हजार प्रतींपैकी काही भारतातील प्रसिद्ध विद्वान्, सर्व आर्यसमाजशाखा, धर्मसभा वगैरेना किंमत तेवढी पाठवून देण्याच्या विनंतिसह धाडल्या. आयते मिळाल्याचे मोल कोणाला कळते ? फक्त आठदहा जणानी पंडितजींची विनंति मानली, पण हरिद्वारच्या एका सज्जनाच्या रूपाने परमेश्वराचा वरदहस्त पंडितजींना लाभला. वेदप्रकाशनाच्याच कार्यासाठी दोन हजार रुपयांचा चेक त्यांचेकडून आला, तेव्हा पंडितजींना केवढीतरी कृतज्ञता वाटली असेल ! याच सुमारास इचलकरंजीचे अधिपति बाबासाहेब घोरपडे यांनी आपल्या राजधानीत वेदावर पंडितजींची सात व्याख्याने करविली. तेथे कुरुंदवाडचे घनपाठी ऋग्वेदी पंडित येडूरकरशास्त्री होते, त्यांच्याशी इचलकरंजी नरेशांनी पंडितजींची ओळख करून दिली. त्यांचा उपयोग पंडितजींना वेदप्रकाशनास कमालीचाच झाला. पंडितजींनी वेदातला प्रत्येक मंत्र दोन ओळीमध्ये, चरण मांडून, स्पष्ट व शुद्ध छापला. ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद असे छापून झाल्यावर, म्हैसूरहून सामवेदाचे

तज्ज्ञ आणवून पंडितजींनी त्याचीही छपाई केली. सामवेद म्हणजे " **गानयोनि मंत्रसंग्रह.** " पण त्यातील ऊहगान व उह्यगान एवढ्यांचेच शास्त्रशुद्ध आरोहावरोहा-सुद्धा माहितीने गायन करणारे मिळू शकले. बाकी सामवेदातील गानकलेला वाचा फोडणारा कोणी भेटत नाही. पंडितजींच्या या वैदिक ग्रंथाचे ग्राहक तीस ( १९१९ ते १९४८ ) वर्षात बलुचिस्तानापासून कलकत्त्यापर्यंत आणि नेपाळपासून कन्या-कुमारीपर्यंत सर्वत्र सांपडले. जसे पंडितजींच्या वेदांचे तसेच त्यांच्या एकंदर ४०९ पुस्तकांचेही स्वागत सर्वत्र झाले.

पंडितजींची अशी ही सांस्कृतिक लोकशिक्षणाची तपश्चर्या चालू असता, ' **स्वभावो दुरतिक्रमः** ' या न्यायाने काही व देशकालपरिस्थितीच्या दाबाने काही, राजकारणा-सुद्धा सर्व चळवळीत पंडितजी अपरिहार्य तेवढा भाग घेतच होते. १९४३ मधील जम-खिंडी येथे भरलेल्या दक्षिण महाराष्ट्र संस्थानी परिषदेपूर्वीच, असा एक दबाव येत होता की, १९४२ च्या ' छोडो हिंद ' चळवळीत संस्थानिकानी ब्रिटिश सार्वभौमत्व झुगारावे आणि आपण भारतीय इतिहासाच्या कर्तृत्ववन्ताचे मेंगे वारस नाही, हे जगाला फिरून एकदा दाखवावे. वरील तऱ्हेची उघड मागणी मिरज व कोल्हापूर संस्थानांच्या प्रजापरिषदानी केली होती. १९४१ सालीच फलटणने द्विदल राज्य-पद्धतीस प्रारंभ करून १९४२ त जबाबदार राज्यपद्धति सुरू केली होती आणि मिरजेला मागे राहवत नव्हते.

कारण सप्टेंबर १९३९ च्या १ तारखेस जर्मनीने पोलंडवर स्वारी केली आणि जागतिक शांततेचा भंग झाला. हिटलरी होरपळ ( दुसरे जागतिक महायुद्ध ) सुरू झाली. ब्रिटिश साम्राज्याचा एक महत्त्वाचा घटक हिंदुस्थानला मानून चालले तरी, त्याला न विचारताच इंग्लंडने हिंदुस्थानासही युद्धमान राष्ट्र म्हणून जाहीर केले. ती दिल्लीच्या मध्यवर्ती विधिमंडळास तुच्छतेची वागवणूक आहे, असे कॉंग्रेसने मानले व १९३९ च्या नोव्हेंबरपासून प्रांतोप्रांती अधिकार–संन्यास केला व युद्धप्रयत्नापासून अलिप्त राहण्याचे ठरविले. तेव्हा फक्त चार प्रांतात मुस्लिम मंत्रिमंडळांची राजवट चालू राहिली. १९३५ च्या सुधारणा कायद्यातील त्र्याण्णव–कलमी राज्यकारभारच देशभर चालू झाला. जर्मनीने जागतिक युद्ध पेटविल्यानंतर १९४० च्या एप्रिलमध्ये रामगड येथे भरलेल्या कॉंग्रेसने ठराव केला की संपूर्ण स्वातंत्र्यापेक्षा कोणत्याही तऱ्हेने कमी असलेली राजकीय सुधारणा हिंदुस्थानच्या लोकांना परवडणार नाही. सदर ठरावास अनुसरून मग कॉंग्रेसजनांची पावले पडू लागली. ब्रिटिश सरकारचेही युद्धप्रयत्न यशस्वी वाटचाल करण्याच्या दृष्टीने जोरदारपणे साहजिकच चालू होते. " युद्धफंड " सक्तीचा नाही म्हणून जनतेस समजावून सांगण्याच्या गटपरिषदाही सातारा जिल्ह्यात धूमधडाक्याने चालू होत्या. हिटलरी होरपळीचे गांभीर्य १९४० च्या मध्यापासून

उग्रस्वरूप धारण करीत असताच सातारा जिल्ह्यात भारताचा पोलादीपुरुष वल्लभ-भाई पटेल यांच्या हातून जूनच्या पहिल्या आठवड्यात लोकलबोर्डावर राष्ट्रीय झेंडा फडकला. राष्ट्रातील अशाच काही घडामोडीमुळे ८ ऑगष्ट १९४० रोजी व्हाइस-रॉयानी युद्धानंतर लवकरच हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्य मिळेल अशी घोषणा केली होती. तिचा सप्टेंबर १ रोजी सर्वत्र निषेध झाला होता. १९४१ च्या जूनमध्ये २२ तारखेस हिटलरी होरपळीला आकस्मिकपणे निराळेच वळण लागले. जर्मनीने रशियावर स्वारी व चढाई केली. त्यानंतर सहा महिन्यात जपानने पर्ल हार्बर घेतले व १८ डिसेम्बर रोजी जर्मनीची बाजू धरली. त्यामुळे अमेरिकाही प्रत्यक्ष युद्धात पडली व १९४१ च्या अखेर इंग्लंडच्या बाजूस रशिया, चीन व अमेरिका ही राष्ट्रे आली. ब्रह्मदेशातही अंदमानप्रमाणेच जपान हातपाय पसरू लागल्यामुळे युद्ध हिंदुस्थान-च्या अगदी दाराशी येऊन ठेपल्यासारखे झाले. अखेर हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर विजगापट्टण व कोकोनाडा येथे बॉम्बफेक झाल्यामुळे हिंदुस्थानातच युद्ध सुरू होण्याचा सुमार दिसू लागला. शत्रूला परिणामकारक विरोध करण्यास तारीख–तागायत साधनसामुग्रीप्रमाणे जनतेच्या हार्दिक पाठिंब्याची आवश्यकता असते. सर्व घडामोडी हिंदुस्थानच्या प्रातिनिधिक कारभाराच्या काबूत राखून व सोपवून भारतीय स्वातं-त्र्याचा पाया घालणारी कार्यप्रणाली सुरू व्हावयास हवी होती. पण १९४२ च्या मार्च–एप्रिल महिन्यात इंग्लंडहून क्रिप्स हिंदुस्थानात आले. त्यानी आणलेल्या योजनेचा रोख दुहीची बीजे पेरण्यात होता; म्हणून भारतीय पुढाऱ्यानी निक्षून सांगितले की कसल्याही आक्रमणाविरुद्ध हिंदुस्थानचे संरक्षण करण्यास आम्ही बद्ध-परिकर आहोत. क्रिप्सयोजनेला वाटाण्याच्या अक्षदा दिल्यानंतर, महात्मा गांधी जे इंग्रजसरकारकडून अपेक्षाभंग होत गेल्याने, अस्वस्थ होत गेले, त्या त्यांच्या अवस्थेतूनच हिंदुस्थानने शेवटची पायरी चढावी, असा उमट झाला. वेळवखत पाहून जपान इंग्लंडवर मात करणार असा रंग दिसू लागताच, महात्माजींच्या प्रेरणेने 'छोडो हिंद' ची चळवळ १९४२ च्या नऊ ऑगष्टपासून काँग्रेसने आरंभली. इंग्रजशाहीला काँग्रेसने दिलेला हा इशारा देशगौरव सुभाषचंद्र बोसनी भारतीयाना दिलेल्या 'चलो दिल्ली' या उत्थापनाचा प्रतिध्वनि होता, त्या दोहोंचीही चमक युद्धजन्यपरिस्थिती-तून होती.

जगाचा जमानाच पालटला ! जगात व हिंदुस्थानात एक क्रांति होत असल्याचा प्रत्यय येऊ लागला. 'चले जाव' ची चळवळ 'चलो दिल्ली' चा यशोमार्ग आखीत असल्याचेच सिद्ध मानण्यात येऊ लागले. भारतीय संस्थानांचे अस्तित्व कालविपर्यस्त म्हणूनच ऐतिहासिक उत्क्रांतिवादाचे अभ्यासक मानीत होते. इंग्लंडमधल्या मुत्सद्यांचे लक्ष 'प्रथम सुखरूपता' या तत्त्वावर खिळले असल्याकारणाने, 'ब्रिटिश सरकारने संस्थानिकाना लेखीटाकी जरी दोस्त म्हणून संबोधले असले तरी, रेसिडेंटच त्यांचा

खरा भाग्यविधाता व्यवहारतः होता. पण १९४० पासून संस्थानी प्रजाजन उघडपणे लोकशाही स्वराज्यासाठी एवढे अधीर होते की, ' चले जाव ' च्या चळवळीला त्यानी कमालीबाहेर उधाण आणले. तेव्हा ब्रिटिश सरकारचीच जेथे धडगत नाही, तेथे त्यांच्या जिवावरच चरणाऱ्या आपणाला स्थान कोठचे ? हे मनात आणून संस्थानिकांचीही वाणी निराळ्या तऱ्हेने फुलू लागली.

या काळात पंडितजी औंध संस्थानात होते. श्रीमंत औंधकरानी १९३९ पासूनच आपल्या प्रजेला ग्रामाधिष्ठित लोकशाही स्वराज्य देऊन टाकले होते. ते यशस्वीपणे चालले असल्याची देखभाल पंडितजी करीत होते. औंधच्या राजेसाहेबांच्या पावलावर बाकीच्या संस्थानिकानी पाऊल टाकले असते, तर अखिल भारताच्या स्वराज्याच्या प्रश्नाला वेगळे, आगळे, विलोभनीय स्वरूप आले असते. कारण औंध संस्थानातील ग्रामसंरक्षकदले ब्रिटिश अधिकाऱ्यांचाही हेवा-विषय ठरली होती ! सनदी स्वातंत्र्याचा अप्रतिहत वापर हाच कोणत्याही प्रगतीचा राजरस्ता होऊन बसतो; म्हणून ब्रिटिश राजवटीतील कित्येक नागरिक औंधसंस्थानात आधारवड पहात होते. इतर संस्थानिकानी औंधकरासारखे काही केले नाही आणि दक्षिणेतील संस्थानी प्रजाजनांच्या चळवळीस १९४० पासून चढलेले तेज १९४६ त ऐनजिनसी संस्थानांचे विलीनीकरण अपेक्षू लागले, हे त्यांच्या लक्ष्यात आले नव्हते ! काळाची ही पाऊल-टाक औंधसंस्थानात ओळखली गली होती. चले जाव – चलो दिल्लीच्या चळवळीना ब्रिटिश सरकारचे मांडलिक औंधसंस्थान काही एक मदत करीत नव्हते. तरी तेथील ' गरीबांचा कैवारी ' राजपुत्र अप्पासाहेब पंत त्या चळवळीच्या श्रेष्ठीशी व गुप्तपणे नि भूमिगत होऊन प्रतिसरकार निर्माण करू पाहणाऱ्या ब्रिटिश रियासतीतील आन्दोलकाशी देशभक्तीची सहानुभूति आणि राजारधर्माचा सहकार सांभाळून होते. हैदराबादला युगांतर संघटनेच्या कार्यकर्त्यांना आणि लाहोरास पंजाबातील ' गदर ' धोरणाच्या कार्यकर्त्यांना संसारदक्ष व वेदधर्मानुयायी पंडितजी सातवळेकराकडे जसे गृहस्थाश्रमाला साजेसे आतिथ्य मिळत असे, तसेच औंध येथेही स्वाध्यायमंडळामार्फत वेदप्रकाशन करणाऱ्या पंडितजीकडे चले जाव - चलो दिल्लीच्या आन्दोलकाना मिळत असे. किंबहुना पंडिजींच्या सावलीला ते आन्दोलक सुखरूप जेवतखात आणि आपली निवेदने-पत्रके मुद्रित करून घेऊन चळवळीला बिनबोभाट उठाव आणीत – आणवीत. केवळ औंध नव्हे, तर सारे आटपाडीमहालासकट औंधसंस्थान वनवासी रामांचा अत्रिआश्रम होता किंवा अज्ञातवासी पांडवांचे विराटनगर झाले होते. त्यामुळेच १९४३ च्या मे चे प्रारंभी पंडिजींच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जमखिंडी येथील प्रजापरिषदेच्या अधिवेशनापासून संस्थानी प्रजेमध्येसुद्धा विजेची चमक निर्माण झाल्यासारखे झाले. संस्थानिकाना काळाची पावले ओळखावयास सांगणाऱ्या लॉर्ड लिन् लिथगो यांच्या उपदेशाप्रमाणे दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानिकानी बॅ. जयकरा-

कडून एक समाईक हायकोर्टाची योजना आखून घेतली. ती औंध व फलटण यानी ताबडतोब मान्य केली. कारण शून्यापेक्षा साक्षात्कार बरा ! त्यानंतर सहा संस्थानानी व १९४४ मध्ये कोल्हापूर संस्थानाने समाईक हायकोर्टास होकार भरला. पण संस्थानिकांच्या मर्जी सांभाळावयास काळ आता खोळंबत नव्हता ! १९४५ चे शेवटी सांगलीसंस्थान प्रजापरिषदेने शेजारचे बिगरसंस्थानी भागात संस्थाने विलीन व्हावीत असा ठरावच केला. बाकी संस्थानीप्रजा तसाच सूर काढू लागल्या. लहान लहान संस्थाने विलीन व्हावीत किंवा त्यांनी फेडरेशन बनवावे असा सल्ला लॉर्ड वेव्हेल यानी या वेळेस पुढे केला. त्यातील दुसऱ्या सूचनेप्रमाणे १९४६ चे मार्च महिन्याचे पहिले तारखेस कोल्हापूर, औंध, फलटण आणि मिरज यानी औंधकरांचे आधिपत्याखाली एक हायकोर्ट स्थापन केले. पण संपूर्ण स्वातंत्र्याकडे भारतीय राजकारणाची वाटचाल जसजशी होऊ लागली तसतशी दक्षिणी संस्थानास आपले संघराज्य बनविण्याची बुद्धि होऊ लागली व ८ आक्टोबर १९४६ रोजी पुणे येथील हिंद-सेवक-समाजाच्या कचेरीत शंकरराव ( दत्तात्रय ) देवाना मदतीस घेऊन आपापल्या पंतप्रधानांच्यामार्फत संघराज्याचा एक आराखडा संस्थानिकानी तयार करवला. विलिनीकरणाची ही नांदी आहे, असेच प्रजापरिषदेचे पुढारी समजले. तेवढ्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज म्हणून कोल्हापूरकरानी आज्ञापत्रके काढली ! ! कोल्हापूरचा वरचष्मा कोणासच नको होता. फलटण व जमखिंडी या संस्थानानी मग एकदमच विलिनीकरणाला संमति देऊन टाकली.

इकडे ब्रिटिश राजवटीतील अकरा जिल्ह्यात १९४२ पासून प्रतिसरकार स्थापण्याचा थोडाफार प्रयत्न झाला. त्यात सातारा जिल्हा होता. साताऱ्याच्या प्रतिसरकार-स्थापनेला औंधसंस्थानातील ग्रामपंचायतीवर आधारलेला १९३९ चा लोकशाही कायदा आणि ग्रामसंरक्षकदलांची कार्यक्षमता हा कित्ता होता. त्यामुळेच जे अल्पस्वल्प यश आले, त्याने " जय सातारा " गाजला. इतक्या नसल्यातरी अशाच स्वरूपाच्या चळवळी हिंदुस्थानभर ज्या झाल्या त्यानी १९४२ च्या डिसेंबरपासून १९४५ अखेर हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीला स्वास्थ्य नव्हते.

तेव्हा हिटलरी होरपळीचा शस्त्रसंधि झाल्यावर हिंदुस्थानात विधिमंडळांच्या निवडणुकी झाल्या आणि मध्यवर्ती सरकारासुद्धा प्रांतिक सरकारातून काँग्रसचे नेते राज्यसूत्रे हाती घेऊन बसले. संस्थानिकांचे फेडरेशन या कल्पनेतील रम्यता २३ ऑगष्ट १९४६ ला जवाहरलाल नेहरूनी भारतीय सरकारची सूत्रे हाती घेतल्यापासून संपलीच होती ! इंग्रजानी हिंदुस्थान सोडून जाणार ( १९४८ जून अखेर तरी ! ) ही घोषणा केल्यापासून आणि भारताच्या घटना–समितीवर संस्थानी प्रजेचे प्रतिनिधि घेणार अशी नेहरूनी द्वाही फिरवल्यानंतर विलिनीकरणाचाच सर्वत्र उद्घोष झाला.

त्यातून अखंड भारताचा ध्यास वर्षानुवर्षे घेऊन बसलेल्या देशभक्तावर फुटल्या छातीने पाकिस्तान–निर्मितीस संमति देण्याचा प्रसंग गुदरल्यावर, अखंड हिंदुस्थान दुराष्ट्र होऊन पण इंग्रजांच्या कचाटयातून सुटत आहे एवढयाच समाधानाने १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा उत्सव साजरा झाला. त्यात संस्थानी प्रजा व सस्थानिकही सहभागी झाले. आणि पुढे ? " त्यजेदेकं कुलस्यार्थे, ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् । ग्रामं जनपदस्यार्थे, आत्मार्थं पृथ्वीं त्यजेत् ॥ " या सूत्रानुसार १९४४ पासून पावले टाकित आलेल्या दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानिकानी आपल्या फेडरेशनमध्ये २६ जानेवारी १९४८ रोजी विलिनीकरणाचा ठराव केला आणि ९ मार्च १९४८ रोजी सर्व संस्थानांच्या विलिनीकरणाचा दिवस उगवला ! ! ( जागृत सातारा पहा. )

ऑगष्ट १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. तथापि १९४७ च्या अखेरीस पाकिस्तान आणि भारत यांच्यामध्ये पंचावन्न कोटी रुपयांच्या देवाणाचा प्रश्न उपस्थित झाला. महात्मा गांधींनी त्याबाबत निश्चयात्मक मत देताच त्यांच्याबद्दल काही तरुण मेंदूपिसाट झाले. मतभेद प्रगट होतच होते. तरीही भारतसरकारने महात्माजींच्या शब्दाला मान देऊन पाकिस्तानला पंचावन कोटी रुपये दिले. या घटनेने बहकलेल्या, वेडावलेल्या नथुराम गोडसे नावाच्या एका तरुणाने दिल्ली येथे ३० जानेवारी १९४८ रोजीच्या प्रार्थनासभेत महात्माजीवर गोळी झाडली ! ! !

जग हादरले ! भारताचा राष्ट्रपिताच गेला ! सर्व दलित–पतितांचा कैवारी उद्धारकर्ता आणि मानव्याच्या आचारशुद्ध उदाहरणाने भारतीय संस्कृतीचा गौरव ठरलेला असा जो नव्या जगाचा भक्त प्रल्हाद ठरला, त्या ( तारीख ३० जानेवारी १९४८ रोजी ) महात्मा गांधींचा खून झाला. तत्पूर्वीच सांगली, मिरज, मिरजमळा, भोर, फलटण, रामदुर्ग, कुरुंदवाड. जमखंडी, अक्कलकोट, जत, मुधोळ, कुरुंदवाड–धाकटीपाती या बारा संस्थानांचे विलीनीकरण राजा व प्रजा यांचे संमतीने होण्याचे ठरले. सावनूर व सावंतवाडी येथे कसलीच हालचाल नव्हती आणि तेथे विलिनीकरणास विरोध होण्याचा संभव नव्हता. कोल्हापूर, सावंतवाडी, जंजिरा व औंध या संस्थानानी विलिनीकरणास अजून संमति दिली नव्हती. औंधसंस्थानची राज्यघटना ग्रामपंचायतीवर अधिष्ठित असल्याने गेली नऊ वर्षे ( १९३९ ते १९४८ ) औंध संस्थानचे अधिपति व प्रजा आपापली वैशिष्ठ्ये राखण्याची इच्छा धरून बसली असल्यास नवल नाही. औंधचे अधिपति जुन्या जमान्यात वाढलेले होते. त्याना भारतीय इतिहासातील कर्तृत्वाची प्रतीके म्हणून संस्थानांचा व संस्थानिकांचा अभिमान होता. त्याचबरोबर त्यांच्यामध्ये भरपूर राष्ट्रीयत्व व व्यापकदृष्टि होती. कोणत्याही चांगल्या योजनेला त्यांचा पाठिंबा असे. त्यामुळे त्यांचा व त्यांच्या प्रजेचा औंध संस्थान स्वतंत्र ठेवण्याचा आग्रह समजणे अशक्य नव्हते. औंधात सार्वमत घेऊन विलिनीकरणाचा

निर्णय घेतला जाईल, असे औंधच्या राजेसाहेबानी ता. २९ जानेवारी १९४८ रोजीच जाहीर केले होते. पण दुसराच दिवस दुर्दैवाचा निघाला ! ! ! औंधसंस्थानचे ग्रामराज्य ज्यांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने साकार झाले, त्या महात्माजींचा खून झाल्याची वार्ता येताच राजा–प्रजा सर्वांनाच आकाश कोसळून पडल्याचे दु:ख झाले ! मग सार्वमताचा आग्रह धरण्यात आला नाही आणि विलीनीकरणास औंध-राजवटीने संमति दिली.

महात्मा गांधींच्या स्मृतीला श्रद्धांजली वाहण्यासाठी ठिकठिकाणी सभा झाल्या. तशा औंध संस्थानात व औंधातही झाल्या. श्रीमंत पंतप्रतिनिधीनी महात्माजीबद्दल व्यक्त केलेला शोक अंत:करणातील उमाळ्याचा मानला गेला. तो केवळ पंतप्रतिनिधी सत्ताधारी त्यावेळी होते म्हणूनच, केवळ नव्हे ! पण पंडितजी सातवळेकरासारख्या-नी व्यक्त केलेली महात्माजीबद्दलची कृतज्ञता कृत्रिम मानण्यापर्यंत जात्यंधांची मजल गेली ! जनता शोकसागरात बुडून गेली. सर्वास मेल्यापेक्षा मेले झाले ! ! त्यावेळी बुद्धिवाद कोण करणार ?

पण महात्माजींचा खून झाला म्हणून अंगाचा तिळपापड झालेल्या काही आततताई-ना, खुनाचा बदला घेतलाच पाहिजे या भावनेने घेरले होते. पुण्यामुंबईच्या तसल्या माणसानी कायदा हातात घेतला हे वृत्तपत्रातून वाचल्यावर सगळ्या महाराष्ट्रात त्याचे अनुकरण झाले. ता. १ फेब्रुवारीपासून त्या प्रक्षोभाच्या आविष्काराला सुरवात झाली. जातीय प्रवृत्तीची मुळच ब्राह्मण समजून ( महात्माजींचा खुनी ब्राह्मण असले-मुळे )ती जातच खुडून टाकण्याची महत्त्वाकांक्षा पेट घेऊन बसली. जातीय संस्थांचा अभिमान बाळगणारे मुसलमानही त्यात ब्राह्मणेतर म्हणून सामील झाले. हिंदूतील तशा लोकाना मात्र बाहेर तोंड काढण्याची सोय नव्हती. त्यातच " **जे का व्यर्थ परार्थहानि करिती ते कोण की दुर्मति ।** " असणारानी, आपले वैयक्तिक हेवेदावेही उगवून घेतले ! ज्यांची घरे पेटवावयाची, त्यानी महात्माजींच्या खुनाबद्दल पेढे वाटले, घरी गोड करून खाल्ले असल्या खोट्यानाट्या हुली आणि कावुरे उठविण्यात आली. अहिंसेच्या परमात्म्याच्या नावे मूर्तिमंत हिंसा थयथयाट घालू लागली. त्या थय-थयाटाने माय–गाय काही पाहिले नाही ! ! १९४८ साली गांधीवधाचे निमित्ताने महाराष्ट्रात जी जाळपोळ व नासधूस झाली, त्यावेळी पंडितजीनाही झळ पोहोचा-वयास आली होतीच; कारण पंडितजी १९३६ पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघात काम करीत नव्हते काय ? परंतु श्रीमंत पंतप्रतिनिधीनी कटाक्षाने त्याना संरक्षण दिले. एरवी, पंडितजीनी वेदसेवेचे जे प्रचंड कार्य केले ते सर्व " **अग्नये स्वाहा** " झालेच असते ! असुरानी पूर्वी वेद पळविल्याच्या आणि बुडविल्याच्या कथा पुराणात आहेत. आमच्याच देशबांधवानी पंडितजीसारख्या वेदसेवकास देशोधडीस जाण्याची पाळी येऊ दिली ! पंडितजीनी धीर सोडला नाही. आणि ! — पंडितजीनी औंध सोडले ! !

पंडितजीनी महाराष्ट्र--गुर्जर प्रदेशांच्या सरहद्दीवर वलसाड नजीक पारडी येथे आपल्या स्वाध्याय--मंडळाच्या उद्योगाची नव्याने उभारणी केली. पारडी हे गायकवाडी गाव. त्यावर मराठी छाया पुष्कळ ! हिटलरी होरपळीच्या उत्तरार्धात " चले--जाव आणि चलो दिल्लीच्या " चळवळीनी भारत आता स्वतंत्र झाल्याशिवाय रहात नाही, अशी चिन्हे दिसू लागताच, ख्रिस्ती धर्मप्रचारकाना वाटू लागले की, इंग्रजी राज्याचा आश्रय गल्यामुळे आपल्या धर्मप्रचाराच्या कार्याला स्वतंत्र भारतात पूर्वी· सारखा वाव मिळणार नाही ! म्हणून पारडीच्या पाद्रयानी पुण्यातील जॉन् स्मॉल् मेमोरिअल् हॉल् भाड्याने देऊन टाकला व पारडी येथील ख्रिस्तमंदिर, रहावयाचा वास्तु व सुंदर कलमी आंब्याचा बाग असलेला जमिनीचा डाग विक्रीस काढला. पण विक्री होण्यापूर्वी त्या पाद्रयानी ख्रिस्तमंदिर स्वतःच उतरवून काढले होते. त्याच्या पायावरच मग पंडितजीनी चौदा हजार रुपये खर्चून वेदमंदिर बांधले आहे. त्या पाद्रयाच्या जागेत पंडितजीना हवे होते ते शान्त वातावरण मिळाले, म्हणूनच त्यानी ती जागा खरेदी केली, आणि घरासमोर सुंदर फुलझाडांची बाग तयार केली. निलगिरीची झाडे कोठे कशी लावावयाची, विटा कशा लावावयाच्या, तुळशीची रोपे कशी उभारावयाची याचा उद्योग बारीक लक्ष घालून पंडितजीनी वयाच्या ब्याऐंशिव्या वर्षी केला ! ! बागेतील फुलाफळापानांच्या रंगसंगतींचा सौंदर्यास्वाद घेत राहणारी पंडितजींची कलावन्त दृष्टी नवनवोन्मेषशालिनी आहे. यात कोणी शंका तरी घेईल काय ?

: १७ :

# औंधचा उन्मेष पारडीतही प्रसन्न !

लोकशिक्षणासाठी स्वाध्यायमंडळाचे काम तीस ( १९१८–१९४८ ) वर्षांत भूमितिश्रेणीने वाढत गेले आणि व्यवहारसुलभतेच्या अडचणी व्यापाच्या आटोपाच्या मानाने वाढूच लागल्या. तेव्हा एका बाजूच्या त्या गावाची रजा घेऊन पुण्यामुंबईसारख्या डगळ व सोयींच्या गावी हलावे की काय, असा विचार पंडितजींच्या मनात येत असता, औंध संस्थानाने स्वाध्यायमंडळाच्या कार्यास लावलेल्या हातभाराबद्दलची कृतज्ञता गैरसोयीकडे दुर्लक्ष करण्याचाच आग्रह धरीत होती. पण संस्थानी राजकारण स्वतंत्र भारतात विलीनीकरणाच्या लाटेवर आरूढ झालेले आढळताच, पंडितजीनी आपल्या त्या तीस वर्षांच्या कर्मभूमीचा, जड अंतःकरणाने पण वेदसस्कृतीच्या प्रचारप्रभावाच्या व्यवहारशुद्धीसाठी, निरोप घ्यावयाचे नक्की केले.

पंडितजींच्या स्थलान्तरनिर्णयाचे स्वागत करून त्यांचे पूर्वपरिचित जिव्हाळ्याचे पंजाब, दिल्ली, नागपूर, बडोदे, हैदराबाद वगैरे प्रदेश " **पुनरागमनाय** " आग्रह करीतच होते. तिकडे आर्थिक सहाय्य भरपूर मिळल आणि वेदादिकांचे प्रकाशन प्रफुल्लतेने फैलावेल, याबद्दल पंडितजीना विश्वास होता; पण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीत आणि आपले आदर्श पुढारी लोकमान्य टिळक यांच्या कर्मभूमीत म्हणजे पुण्यात स्वाध्यायमंडळाचे काम नेटाने करावे, असेच लाख वेळा पंडितजींच्या मनात येत होते. दरमहा साडेसातशे रुपयेपर्यंत भाडे देण्याचा हिय्या करून देखील, १९४८ साली पंडितजीना पुण्यात हवी होती तशी जागा मिळ शकली नाही. " **प्रारब्धस्यान्तगमनम्** " तर आवश्यक. स्वाध्याय मंडळाच्या " कार्याचा प्रवाही तुंबता नये । " ही अंतरीची तळमळ; म्हणून पुणे झाले उणे तरी तळेगाव, लोणावळा, मुंबई, नाशिक, आणंद, बडोदा, अहमदाबाद येथेपर्यंत पंडितजींची स्वारी फिरली. तेथे

कोठे पाय ठेवायला जागा गवसेना ! मात्र तशा फिरतीत, पारडी येथे इमारतींसह एक जमिनीचा डागच्या डाग विक्रीला निघाल्याची वार्ता त्यांना कळली. तेव्हा एक्क्याऐंशी वर्षांचे पंडितजी तेथे गेले आणि आणि प्रत्यक्ष पाहून ती जागा पसंत करून बसले.

छापखाना व कामकरी यासाठी पुरतील एवढ्या इमारती, सर्व क्षेत्र अठरा एकरांचे, आमराई, भरगच्च तीन विहिरी अशा सर्व सोयी पंडितजींना तेथे आढळल्या. या जागेचे विश्वस्त श्री सेठ हरगोविंद धरमसी काचवाले, मुंबई, श्री वेणीभाई आर्य, बडोदा व सेठ श्री गिरिधरभाई भारतीय ही मंडळी होती. पंडितजींच्या स्वाध्याय-मंडळाचे वेदानुवाद-कार्याला ही जागा द्यावयास ते विश्वस्त आनंदाने तयार झाले. त्याप्रमाणे १ जुलै १९४८ रोजी स्वाध्यायमंडळ पारडीच्या त्या जागेत डेरे देऊन बसले. वेदानुसंधानाच्या कार्यास सुरवात करण्यापूर्वी पंडितजींनी येथे यथाशास्त्र भूशांति, वेदपाठ, होमहवन केले. स्वाध्यायमंडळाचे सर्व साहित्य औंधाहून पारडीस आणण्यास आलेल्या अठरा हजार रुपये खर्चासह, पारडीच्या जागेत स्वाध्यायमंडळ आपले काम व्यवस्थित करू लागण्यास जवळ जवळ साठ हजार रुपये खर्च आला असे म्हणतात !

पारडीच्या स्वाध्यायमंडळाचे प्रांगणात शिरताच मुख्य प्रवेशद्वाराजवळ एक नवीनच बांधलेली टुमदार बैठी इमारत दृष्टीस पडते. तेच पंडितजींचे वेदमंदिर ! या वेदमंदिराचा कळस सुवर्णाचा असून तो नारळासारखा आहे. वेदमंदिर पंचाहत्तर फूट लांब व वीस फूट रुंद असून त्याला तीन दारे व दहा खिडक्या आहेत. आत एका बाजूस व्यासपीठ आहे. आतील गाभाऱ्यात काचेच्या लांब कपाटात वेदविषयक ग्रंथ नीट लावून ठेवण्यात आले आहेत. त्याचबरोबर झेंद अवेस्ता, कुराण हेही ग्रंथ येथे असून ते पारशी धर्मगुरु डॉ. होरमस डिअर कयोजी मिर्झा व बजाना राज्याचे नबाबसाहेब यांजकडून देणगी म्हणून आलेले आहेत. वेदमंदिराच्या व्यासपीठावर दर-वर्षी स्वाध्याय मंडळाची श्रीगणेशमूर्ति विराजमान होते. वेदमंदिराचे भिंतीवर सूर्य-नमस्कारांचे, योगांचे व मानवी देहातील तेहत्तीस कोटि देवतांची नावे दाखविणारे तक्ते लटकलेले आहेत. वेदमंदिराचे उद्घाटन १९५४ साली शिक्षणमंत्री दिनकरभाई देसाई यांचे शुभ हस्ते १० जानेवारीस झाले. या वेदमंदिरात दर शनिवारी सायंकाळी ठीक पाच वाजता सामुदायिक प्रार्थना होते व पंडितजी ती पाऊण एक तास अव्याहत चालवित आले आहेत.

वेदमंदिरापासून पंचवीस तीस पावलावर वेदाध्ययन करू इच्छणाऱ्या विद्यार्थ्यासाठी व पाहुण्यासाठी अतिथिगृह ( चार खोल्यांचे ) असून पुढे डाक घर आहे. त्यासमोरच स्वाध्यायमंडळाच्या भारत मुद्रणालयाची इमारत असून पंचवीस-तीस तरी कर्मचारी

कामकाजात गर्क दिसतात. मुद्रणालयात खास जर्मनीहून आणवलेली यंत्रसामुग्री असून १९२० सालीच ती औंधास आणवलेली होती.

वेदमंदिराच्या समोरील आम्रवाटिकेत एकमजली प्रशस्त इमारत दिसते ते पंडितजींचे निवासस्थान होय. त्याचे नाव आनंदाश्रम. आश्रमासमोर फुलबाग आहे. तीत रंगीबेरंगी गुलाब असून पंडितजींच्या कलावंत दृष्टीने ती बाग तयार झालेली आहे.

औंधाहून पारडीस आपण कसे आलो यासंबंधात स्वतः पंडितजींनीच आपल्या वाचकांस एकदा निवेदन केले आहे, त्यात म्हटले आहे की—

" तीस वर्षांच्या अवधिमध्ये स्वाध्यायमंडळाकडून बहुतेक सर्व संहिता शुद्ध, सुंदर व स्वस्त छापून प्रसिद्ध झाल्या. प्रारंभी यात स्वस्ताईची परम अवधी आम्ही गाठली होती. चारही वेदांच्या संहिता आम्ही केवळ पाचच रुपयास प्रथमतः ग्राहकास दिल्या !! याप्रमाणे वेदांचे ग्रंथ इतके स्वस्त, इतके सुबक व इतके शुद्ध देण्याचे कोणी मनातही आणले नव्हते व तसे करणे कोणास शक्यही नव्हते. कारण हे काम आम्ही हानि सोसूनच केले होते.

" मूळ वेदांच्या सर्व संहिता, दैवतसंहितेचे तीनही भाग– आर्षेय संहितेचे भाग, महाभारत, रामायण, भगवद्गीता व योगसाधनांचे ग्रंथ यांचे सरासरी दोनशे रुपये मूल्याचे प्रकाशन या अवधिमध्ये स्वाध्यायमंडळाने केले व एवढ्या अवधिमध्ये सिंध, पंजाब, बलुचिस्तानापासून कलकत्त्यापर्यंत व नेपाळपासून कन्याकुमारीपर्यंत हजारो ग्राहकानी या वैदिक प्रकाशनाचा लाभ घेतला.

" औंधमध्ये .... राजेसाहेबांनी स्वाध्यायमंडळासाठी सरकारी जमीन फुकट देऊन वर प्रथमतः सहा हजार रुपये वेदमुद्रणासाठी स्वाध्यायमंडळास दिले व वेळोवेळी प्रोत्साहन देऊन, अडचणी दूर करून बहुमोल साहाय्य केले, त्याची निष्कृति होणे शक्य नाही.

" सोयी व गैरसोयी या दृष्टीनी तुलना केली तर—

१. औंधला रेल्वेस्टेशन रहिमतपूर हे असून ते १४ मैल दूर आहे. पारडी गावाला पारडी हे स्टेशन केवळ दोन मैलच आहे.

२. रहिमतपूर मुंबईपासून दोनशेवीस मैल असून रेल्वेने ११ व बसने १ असा बारा तासांचा प्रवास आहे; पण मुंबईहून पारडी ११४ मैल असून केवळ ५ तासांचा रेल्वेचा प्रवास आहे. मुंबई हे धंद्याचे केंद्र असल्याने हा एक मोठा लाभ आहे.

३. रहिमतपूरप्रमाणे पारडीवर प्यासेंजर तेवढ्या थांबतात. मेल व एक्स्प्रेस गाड्या गाठणे असेल तर पारडीहून ७ मैलावर बलसार स्टेशन आहे तेथे जावे. पारडीहून प्रत्यही ८।१० बसेस बलसारला जात येत असतात.

४. वाहतूक व मालाची चढउतार पारडीवर ( रहिमतपूरपेक्षा ) कित्येकपट अधिक आहे.

" औंधला भवानी–अंबाबाई–चे प्रसिद्ध देवस्थान आहे. तसेच पारडीस भवानीचे स्थान गावात असून दुसरे ३॥ मैलावर असणाऱ्या पर्वतावर आहे. औंधची यात्रा पौषीला भरते व यात्रेकरू सुमारे ५०।६० हजार येतात व १५ दिवस यात्रा जाऊन येऊन असते. पारडीला पारनेरा पर्वतावरील अंबाबाईची यात्रा आश्विन शुद्ध अष्टमीला एक दिवसच असते व त्या दिवशी १५।२० हजार यात्रेकरू पर्वतावरील मंदिरातील देवीचे दर्शन घेण्यासाठी जमत असतात.

" पारडी येथे पार नदी आहे. ती येथून ३ मैलावर समुद्राला मिळते. यामुळे पारडीच्या खालचे पार नदीचे पाणी खारे असून वरचे पाणी गोडे आहे. समुद्राची भरती येथपर्यंत येते, पण ती वरच्या बाजूपर्यंत पोचत नाही. या नदीवर आगगाडीचा एक पूल असून दुसरा लोकाना जाण्यायेण्यासाठी आहे. रेल्वेचा पूल खाऱ्या पाण्यावरून आहे व माणसे जाण्यायेण्याचा पूल गोडच्या पाण्यावरून आहे. रेल्वेच्या पुलावर भरतीचे पाणी कधीच येत नाही. पण माणसांच्या रहदारीसाठी बांधलेल्या पुलावरून पावसाळी चार महिन्यात कित्येकवेळा पाणी चढल्यामुळ रहदारी बंद पडते. यावेळी या पुलावर ८।१० फूट पाणी चढते. मोठमोठे वृक्ष वाहून येतात व कित्येक तास रहदारी बंद पडत असते. रेल्वेचा पूल लोखंडी असून दुसरा सिमेन्टचा आहे.

" पार नदी जवळ वसल्यामुळे या गावाला पारडी हे अभिधान प्राप्त झालेले आहे. नदीचे पाणी जवळच्या पर्वताच्या पायथ्याला लागून जात असल्यामुळे त्या पर्वताला पारनेरा ( पार–नीरा ) असे म्हणत असतात. पारनेरा हा इतिहासप्रसिद्ध किल्ला आहे. हा मोरोपंत पिंगळे यानी आपल्या ताब्यात १६७६ च्या एप्रिल महिन्यात घेतला. तो शंभर वर्षे मराठ्यांच्या ताब्यात होता.

" पार नदीच्या दुतर्फा एक मोठा रंग व रसायन यांचा कारखाना होणार आहे. ( आता हा झाला आहे व तो आशियात मोठा आहे. ) या कारखान्यामागे मोठमोठे धनपति असल्यामुळे आजचे ८ हजार वस्तीचे पारडीगाव 'उद्या'नगर होऊन ४।५ पट वस्तीचे बनेल. या कारखान्याला पारडी व बलसाड ही स्टेशने लाभणार असल्यामुळे वहातुकीच्या दृष्टीने लोकांची फारच मोठी सोय होणार आहे.

" पारडीचे आंबे व चिकू जगभर प्रसिद्ध आहेत. या भूमीमधील रसाने त्याना विशेषच मधुरता येते. येथे आंब्यांच्या व चिकूंच्या अनेक वाटिका आहेत. इकडच्या शेपन्नास मैलातील गावास उद्यान–नगराचे सौंदर्य प्राप्त झाले आहे. येथील तांदूळ, मूग, डाळ, चणे हेही सुप्रसिद्ध आहेत. तांदुळास चांगला भाव येत असतो.

" पारडीहून बलसाडला जाताना १४६ मैल ६ फर्लांगाचा दगड मागे पडल्यावर तीस चाळीस पावलावर मुख्य रस्त्याला डावे बाजूस पारनेरला जावयाचा रस्ता फुटतो. तिथे उजव्या हाताला एक पुरुषभर उंचीची तोफ तोंड वर करून पुरलेली आहे. तेथपासून किल्ल्याच्या वेशीपर्यंत लहानमोठ्या ४१० पायऱ्या आहेत. किल्ल्याचे प्रवेशद्वार पूर्वाभिमुख आहे. आत शिरताच उजव्या हाताला एक दर्गा आहे. तेथून १०।१५ पायऱ्या वर चढून गेले की किल्ल्यावरील देवीचे देवळात आपण पोहोचतो. येथेही सहा तोफा सभामंडपाकडे जावयाच्या रस्त्याच्या उजव्या हाताला पुरलेल्या आहेत ... देवीचे देऊळ लहानसेच आहे. विशेष म्हणज मूर्ति गाभाऱ्याच्या मधोमध बसविलेल्या नसून, डावीकडील कोपऱ्यात आहेत. त्यांच्यासमोरील गजांच्या खिडकीतून दर्शन घेण्याची सोय आहे. ... शेंदूर लावलेले तीन देवींचे एका शेजारी एक, अगदी जवळजवळ तीन मुखवटे आहेत.. त्यांची नावे डावीकडून उजवीकडे या क्रमाने अंबिका, चंडिका व नवदुर्गा अशी आहेत. ... दररोज दुपारी नवचंडीचा एक पाठ पूजेचे वेळी वाचला जातो व मग नैवेद्य होतो. देवीला नारळ ठेवले जातात. कोणत्याही प्राण्याचा बली दिला जात नाही. दर आश्विन शुद्ध ७ ला येथे नवचंडीचा सहस्रपाठ करून हवन केले जाते. त्याच दिवशी यात्रा जमावयास सुरवात होते. दर चैत्र शुद्ध ७ मीलाही नवचंडीचा सहस्रपाठ होऊन हवन होते. यावेळीच काय ते देवींचे अलंकार त्यांच्या अंगावर चढविण्यात येतात ... काही वर्षापूर्वी दागिन्यांच्या आशेने देवळावर चोरी झाली, असता तो लगेच उमगली. चोरानी ( ते मुसलमान होते ) दरवाजे फोडून मंदिरात प्रवेश केला; पण दागिने मिळाले नाहीत; काही भांडी मिळाली; ती त्यांनी किल्ल्याच्या तटबंदीबाहेर लपवून ठेवली. एकाने घंटा हातात घेतली पण ती त्याच्या हाताला चिकटली; आणि दिङ्मूढ होऊन सरळ रस्त्याने खाली आला व पकडला गेला; त्यानेच लपविलेली भांडीही दाखविली.

" ही देवी मुंबईच्या प्रभु लोकांची कुलदेवता आहे व विलेपार्ले मुंबई येथील कोठारी ( महाराज ) सुमारे शेपन्नास लोक घेऊन दोनतीनदा चैत्र शुद्ध ७ ला आले होते.

" तीन देवींच्या समोर बाजूला शेंदूरचर्चित हनुमानाची मूर्ति आहे असा सार्वत्रिक समज आहे. पण नीट निरखून पाहता ती गणपतीची असावी. ... देवीच्या देवळाचा सभामंडप लहानसाच असून त्यात फार तर ७०।८० माणसे बसू शकतील. गाभाऱ्याच्या उत्तरेला एक दरवाजा असून त्यावर संगमरवरी पांढरी पाटी आहे—

" आ बारसारव कठेराने पगथीया स्व. गंगास्वरूप बाई जमना ते सोनी गोवर्धनदास लक्ष्मीदासनी विधवा नावनी तेमना भतीजा सोनी छगनलाल मथुरादास बलसाडवालाए कराव्या छे। ( ता. ९, १०, ४५ मंगळवार ) "

" इंग्रजानी मुद्दाम किल्ला पाडून त्याची नासधूस केली, असे (सातव्या पिढीच्या) पुजाऱ्याने सांगितले. बॉम्बेगॅझेटियरमध्ये पुष्टीच मिळते.

" पारनेरा किल्ला दक्षिणोत्तर पसरलेला असून त्याच्या सभोवती तटबंदी आहे. पूर्वपश्चिम रुंदीच्या सुमारे तिप्पट त्याची लांबी आहे. ...देवीचे देऊळ किल्ल्याच्या उत्तरेकडील टोकाला असून दक्षिणेकडील टोकावरून खाली उतरावयास साधी पायवाट आहे. तटबंदीला ६।७ बुरुज चौकोनी खोल्यासारखे असून पश्चिम तटबंदीच्या आत सात टाकी किंवा विहिरी असून पाणी पिण्यासारखे नाही. दक्षिणेकडील दुसऱ्या टाकीपर्यंत दोन लोखंडी शिड्या असून ते पाणी पिण्यालायक आहे. किल्ल्याच्या दक्षिण टोकाला दोनचार मोठ्या दगडानी बनलेल्या कपारीत कोणीतरी शेंदूर फासून एक देवी बनविली आहे ! बाहेरच्या बाजूने एक घंटा व समोर नारळ फुटल्याचे स्पष्ट होते. किल्ल्याच्या मध्यभागी सुमारे १५ पावले रुंद व १२५ पावले लांब असा दोन पुरुष उंचीचा उंचवटा आहे. या उंचवट्याच्या दक्षिण नि उत्तर टोकाला मोठ्या खोल्या असल्याचे पडक्या भिंतीवरून दिसते. बांधकामाच्या विटांची प्रमाणे ३×७×१२ अंगुळे अशी आहेत. किल्ल्यावरून फार लांबपर्यंतचा देखावा छानपणे दिसतो.

" हा पारनेरा किल्ला आरोग्यवर्धक जलवायु मिळविण्याच्या दृष्टीने चांगला प्रसिद्ध आहे. ... हा २०'–३०' अक्षांश उत्तर व ७२'–५९' रेखांश पूर्व अशा जागी आहे. बलसाडहून ४ मैल व मुंबईहून १२० मैल आहे. याची उंची ४०० हात फार तर असेल. राजकारण व युद्ध या दृष्टीने याचे फार महत्त्व आहे. ... मूळचा हिंदुराजाने बनविला होता. ... प्रथम हा धर्मपूर-संस्थानच्या अधीन होता. १५ व्या शतकात यावर महंमद बेगराने ( १४५९–१५११ ) अधिकार स्थापित केला. नंतर अहमदाबादच्या बादशहांच्या राज्यात अव्यवस्था माजली. सन् १५५८ व १५६८ मध्ये पोर्तुगीजानी हा आपल्या ताब्यात ठेवला होता. दुसऱ्यावेळी किल्ल्याच्या भिंती तोडून नासाडी केली ! १६७६ मध्ये मोरोपंत पेशव्याने हा ताब्यात घेऊन त्याची डागडुजी केली. यापुढे १०० वर्षे हा मराठ्यांचे आधीन राहिला. १७४० मध्ये ले० वेल्स्लीने हा घेतला. पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कित्येक वर्षे काही सैन्य येथे रहात असे. ... सन् १८५७ नंतर या किल्ल्याचा पूर्णपणे नाश इंग्रजानीच केला.

" सन् ६६९–६९१ मध्ये जयसिंह वर्मा ( धाराश्रय )याचा तृतीयपुत्र नागवर्मा राज्य करीत होता. त्याच्या अधीन नासीकच्या पश्चिमेचा प्रदेश, बलसाड, पेंठ, पारडी, दक्षिण गुजराथ हे देश होते. तोच हा पारडी तालुका होय. २०'–३०' अक्षांश व ७२'–४८' रेखांशावर पारडी हे गाव आहे. या गावात १५०० घरे व आठ सहस्र जनसंख्या आहे. लोकसंख्या प्रत्यही वाढत आहे. मामलेदारांची कचेरी किल्ल्यावरअसते. या गावात– खून, दरोडे उभ्या वर्षात क्वचित्‌च होतात. जनता आपापल्या कामात तत्पर असते... रिकामी–पण निरुद्योगी माणसे कमी... पारडीनगर तलावाच्या काठी वसले आहे. तलावाचा सरासरी २–२॥ मैलांचा घेर आहे. यात

*

श्वेत व लाल कमळ भरपूर असल्याने तो फार सुंदर दिसतो. या तलावामध्ये एक सुंदर बेट आहे

" पारडी गाव सुमारे १॥ मैल लांब आहे; पण रुंदीला अगदी थोडे आहे. वर तलाव व खाली गाव वसल्यामुळे तलावाचे पाणी जमिनीत मुरते व गावातील विहिरीत येते. हेच पाणी सर्व लोक पितात. तलावाच्या पाण्यात सर्व प्रकारचे मल फेकतात. त्यामुळे या गावात मलेरिया, हिमज्वर, यकृत अशा व्याधीचे रोगी पुष्कळ दिसतात. गावात ३।४ डॉक्टर व तितकेच वैद्य संपन्न स्थितिमध्ये आहेत.

" स्वाध्यायमंडळाचे स्थान गावापासून १ मैलावर असल्याने येथे वरील विकार नाहीत. . . .

" पारडीमध्ये सर्व धर्मियांची मंदिरे आहेत. त्यामध्ये—

( १ ) श्री बेचरा माता– ही येथील कासार लोकांची देवी आहे. तांब्यापितळेच्या भांड्यांचा व्यापार करणारास ' कंसारा ' उर्फ कासार म्हणतात. देवालय मध्यवस्तीत स्वच्छ व आल्हाददायक आहे.

( २ ) एकलिंगी महादेव– हे स्थान स्वयंभू समजले जाते. हे मंदिर तलावाच्या किनाऱ्यावर बरेच विस्तीर्ण आहे. बहुतेक सार्वजनिक सभा येथेच होत असतात. स्वच्छ व चांगले रमणीय स्थान आहे.

( ३ ) रू-वालेका महादेव– पूर्वी कापसाचा व्यापार करणाऱ्या एका सेठजीनी बांधलेले मंदिर लावाच्या किनाऱ्यावर लहानसेच आहे.

( ४ ) पाळण्यातील ठाकूरजी– या मंदिरातील श्रीकृष्ण नेहमी पाळण्यात निजलेले असतात. बालपणचे उपचार म्हणून याना प्रत्येक सप्ताहाच्या शेवटी थोडे एरंडेलही देण्यात येते !

( ५ ) बलभीम मारुतिराय– पारडीमध्ये एक हनुमान् टेकडी आहे. हे मारुतीचे स्वयंभू स्थान मानतात. श्रावण महिन्यात हजारो भाविक लोक याच्या दर्शनासाठी येतात. भक्त हिंदु आहेत तसेच ते पारशी, ख्रिस्ती व मुसलमानही आहेत. पारशामध्ये श्रावण महिन्यात सवामण तेल नियमाने देणारे आहेत. पूजा करणाऱ्या पंडिताला त्या तेलावरच दोन सहस्र रुपये मिळतात. देवस्थानला भातशेत, आंब्याची बाग आहे. या देवाची एक उत्तम पाण्याची विहीर आहे. हनुमान् टेकडीची उंची फार तर पसतीस हात असेल.

" या हिंदु देवस्थानाशिवाय मुलमानांच्या दोन मशिदी आहेत. एक दर्गाही आहे. शक्य ते करून मशिदी स्वच्छ ठेवलेल्या असतात. बहुधा प्रत्येक मुसलमान आपल्या

जातीय उन्नतिसाठी मशिदीला काहीतरी देतच असतो. ख्रिस्ती लोकांचेही एक मोठे प्रचारकेंद्र पारडीला आहे. तसेच या प्रांतातही यांच्या शाखा पुष्कळ असून ख्रिस्ती कळपात हिंदूना ओढण्यासाठी त्यांचे अतोनात प्रयत्न चाललेले असतात. पारशांचीही अग्यारी – अग्निशाळा – येथे आहे. येथून थोड्या अंतरावर उदवाडा – संजाण येथे यांची पवित्रभूमि आहे. पारशांचा 'शान्तिस्तंभ' ही येथे आहे. येथे त्यांचे मृतदेह पक्ष्याना अर्पण केले जातात. पारडीस आर्यसमाजीही पुष्कळ आहेत पण साप्ताहिक अधिवेशने मात्र होत नाहीत ! पार्लेबिस्किट कंपनीचे मालक श्री सेठ मोहनलालजी हे पारडीचे राहणारे व चांगले भाविक वेदान्ती; त्यानी येथे एका लहानशा टेकडीवर लाख रुपये खर्चून बंगला बांधला आहे. त्यात १०।५ संन्याशांची राहण्याजेवणाची सोय आहे. ४।५ शं श्रोते बसावे, प्रवचने–कीर्तने–धर्मचर्चा व्हावी असे त्यानी हे स्थान बनविले आहे. त्या 'जंगलमे मंगल' स्थानालाच निर्वाणधाम म्हणतात.

"पारडीहून सरासरी दोन मैलावर 'गंगाजी' म्हणून एक अत्यंत रमणीय निसर्गसुंदर स्थान आहे. येथे स्मशान आहे व तेथे शंकराचे एक उत्तम मंदिर असून जवळच्या उंचवटयावर पिंपळाचे झाड आहे. त्याच्या मुळातून एक बोटाएवढा झरा सारखा वहात आहे. या पाण्याची पुढे तीन कुण्डे बनली आहेत. महाशिवरात्रीला येथे मोठी जत्रा भरत असते. ती २।३ दिवस असते. १०।१५ हजार लोक जमतात. ...

"बटनांचा कारखाना येथे बराच मोठा आहे. पुष्कळ रुपयांचा माल येथे तयार होऊन देशावर जातो. लाकडांचा कारखाना, डाळींचा कारखाना, तांदुळाच्या पिठाच्या गिरण्या, तांब्यापितळेच्या भांड्यांचा कारखाना, असे येथे बरेच कारखाने गिरण्या, आहेत.

"पारडीमध्ये पेशव्यांचा किल्ला आहे. यामुळे या गावाला 'किल्ला–पारडी' असे म्हणतात ... हा किल्ला ज्या पहाडीवर आहे ती ६० हात उंच असेल. किल्ल्यावरून चार मैलावर असलेला समुद्र दिसतो व जहाजेही दिसतात. या किल्ल्यावर एक विहीर आहे. ती फारच खोल असल्याने तिला 'पाताल कूआँ' असे म्हणतात. येथील ७।८ पिढ्यांचे रहिवासी व येथील मोठे महाराष्ट्रीय जमीनदार बाबुराव बोरवणकर हे एकवेळ या विहिरीत उतरले. त्यावेळी पेशवाईच्या वेळची हत्यारे बाहेर निघाली.

"पारडीला महाराष्ट्रीय घराणी पुष्कळच पिढ्यापासून येऊन स्थिर झाली आहेत—

( १ ) बोरवणकर– तलावाच्या दुसऱ्या बाजूस यांची वाडी व घर आहे. येथील महाराष्ट्रीय रहिवाशामध्ये हे फार मोठे कुटुंब आहे.

( २ ) वैद्य–
( ३ ) आगरकर– } ही घराणी तीन पिढ्यापासून येथे आहेत.

( ४ ) कानिटकर– या घराण्याला इकडे येऊन ४० वर्षे झाली. वैद्य, आगरकर, कानिटकर हे तिघेही पारडी हायस्कूलमध्ये उत्तम शिक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत.

( ५ ) केसकर– या घराण्याची वाडी येथे आहे.

( ६ ) सावे– या घराण्याने फार मोठ्या प्रमाणामध्ये आंब्याची लागवड व भातशेती चालविली आहे.

( ७ ) शेजवलकर, ( ८ ) भाटवडेकर, ( ९ ) मालणकर, ( १० ) चौणकर, ( ११ ) धोंडे, ( १२ ) हटकर अशी १००।१२५ असामींची महाराष्ट्रीय कुटुंबे सोनारकाम, बँकातील नोकऱ्या करणारी व मळेवाली आहेत. ( १३ ) स्वाध्याय-मंडळाच्या सातवळेकराबरोबर १५।२० कुटुंबे पारडीस आली होती.

" येथे दसऱ्याचा सण सर्व हिंदु साजरा करीत असतात. गुजरातेत बहुधा प्रत्येक नगरात घरोघरी संध्याकाळी घरच्या बायका घराचे आंगण सारवून रांगोळ्यांनी सुशोभित करतात. पारडीमध्ये या रांगोळ्या एक हात चौरसपासून तो १० हात चौरस इतक्या मोठ्या दिसून येतात. रात्रौ ८ ते १२ पर्यंत प्रत्यही नवरात्रामध्ये गल्लो-गल्लीतील स्त्रिया व मुली यांचा गरबा नाच होतो व त्यावेळी या गाणे म्हणत असतात. या गाण्यामध्ये देवीने प्राचीनकाळी जे पराक्रम केले व राक्षसांचे निर्दालन केले, ते कथाप्रसंग वर्णिलेले असतात, इतिहासातील वीर–रस–प्रधान प्रसंग असतात व आधुनिक युगातील प्रसंगही असतात. शिवाजी महाराजांच्या विजयाचे व चिमणाजी अप्पाने वसई लढविली व पोर्तुगीजांचा पराभव केला, ते प्रसंग गुजराती कवींनी वर्णावे हे नि:संशय कौतुकास्पद आहे. दरेक चौकात केळीचे खांब पुरतात व पुरुषपुरुष उंचीच्या पितळेच्या समया पेटवतात. अन्य तऱ्हेची आरासही करतात व बहुतेक स्त्रीपुरुष जमून विजयाचा आनंद प्रकट करीत असतात. दसऱ्याच्या दिवशी स्त्रीपुरुष चांगला पोशाख करून शिवेच्या बाहेर जातात. तेथे ब्राह्मणलोक शमीपत्रे घेऊन बसलेले असतात. त्यांचे पूजन करून ब्राह्मणास दक्षिणा देतात व घरी येतात.

' ५०।५५ वर्षापूर्वी ( १९१३–१४ ) अमेरिकन पाद्रयानी ख्रिस्तीधर्म प्रसारासाठी आपले प्रार्थनामंदिर बांधले व आणखी ५।६ चाळी बांधून येथे ख्रिस्तीधर्म प्रसाराचे मोठे केंद्र स्थापन केले. येथील चाळीमध्ये बाटलेले लोक सुमारे १००।१२५ रहात. अमेरिकन पाद्री ४।५ असत. धूमधडाक्याने येथे व आजूबाजूला त्यांचा खूब प्रचार होत असे. येथे येशूच्या कळपात मेंढरे जमा झाली म्हणजे मग त्याना मोठ्या कळपात दुसरीकडे पाठविण्यात येत असे. असा क्रम ३०।३५ वर्षे चालला. पुढे त्यांच्या मनात ही जागा विकावी असे आले. तेव्हा ही जागा आर्यसमाजी लोकानी ' आर्यकन्या महाविद्यालय ' काढण्यासाठी विकत घेतली. त्यावेळी या सर्व जागेबद्दल विश्वस्तांनी ८० हजार रु. दिले. नंतर त्यानी आपल्या सोयीसाठी काही रक्कम येथे खर्चही केली. पाद्रयानंतर आर्यसमाजीयाकडे ही जागा ३।४ वर्षे राहिली. या वेळात आर्यकन्या महाविद्यालय बनू शकले नाही.

' स्वाध्यायमंडळ जुलै ( १९४८ ) मध्ये येथे आले व हळूहळू तेव्हापासून औंधाहून सामान आणून येथे कार्य सुरू केले. जेथे हिंदुधर्माचा नाश करण्याचे मिशनऱ्यांचे कार्य सुरू होते, त्याच जागी वैदिकधर्माच्या अथवा हिंदुधर्माच्या जागृतीचे केंद्र आता स्थापन झाले आहे.

' अजूनही या जागेला ' मिशनभूमि, मुक्तिफौज ' या नावाने ( १९४८ ) ओळख तात ! ... आम्ही या स्थानाचे नामाभिधान ' आनंदाश्रम ' असे ठेवले. तेव्हापासून येथे वेदध्वनि निघू लागला आहे.

' या भूमीमध्ये ख्रिस्तमंदिर ( चर्च ) होते. विकत घेणाऱ्या पूर्वोक्त आर्यसमाजीयानी या मिशनऱ्यास असे सांगितले की तुम्ही ही सर्व जागा व ही सर्व घरे विकत आहा, त्यात हे प्रार्थनामंदिरही असू दे. तुमच्या धर्माचे चिन्ह क्रूस व आणखी जे काय असेल ते तुम्ही काढून न्या, पण इमारत येथे राहू दे.

' यावर पाद्रयानी असे उत्तर दिले की आमचे धर्ममंदिर अत्यंत पवित्र आहे. त्याचे दगड व त्याच्या विटाही पवित्र आहेत. त्यावर अन्य धर्माच्या लोकांचा अधिकार स्थापन झालेला आम्हास मुळीच खपणार नाही. म्हणून त्यानी त्या प्रार्थनामंदिराचे दगड, विटा, चुना सर्व काही उकरून नेले. पायासुद्धा खणून नेण्याचा प्रयत्न केला. जे लोक याप्रमाणे दगडमातीमध्ये प्रभुमंदिर आहे असे समजतात त्यांच्या ज्ञानाविषयी काय बरे बोलावे ? त्यांच्या या कृत्यामध्ये स्वधर्माबद्दल जो आग्रह आहे व जो पीळ आहे तो मात्र वर्णन करण्याजोगा आहे.

' येथील ख्रिस्तमंदिर स्वतः पाद्रयानीच तोडून ते पायापासून उखडून नेले. त्याठिकाणी ' वेदमंदिर ' उभ करावे अशी कल्पना जर कोणाच्या मनात आली तर ती योग्यच होईल. यात द्वेषाचा भाग नसून जागेचा योग्य उपयोग केल्याचे श्रेय आहे.

' स्थानपरिवर्तनासाठी स्वाध्यायमंडळ ही संस्था फार मोठ्या खर्चात आली.... औंधची घरे सुमारे ६०।६५ हजार रु. किंमतीची तेथेच सोडून इकडे यावे लागले. ' [ १९४८ मधील हे वर्णन आहे. ]

वैदिकजीवन–सिद्धांताचा पुनरुद्धार करून, वेदघोषित सार्वभौम मानवधर्म, जो शांतता, बंधुता व एकता पुरस्कारतो, तो प्रचारण्यासाठी वेदानुसंधान व वेदानुवाद करणाऱ्या स्वाध्यायमंडळाचे कार्य औंधास तीस वर्षे चालले, तसेच अठरा वर्षांच्या वर पारडीतही चालू आहे. एक्क्याऐंशी वर्षांपासून पारडीस पंडितजी आता तेवढ्याच कार्यात लक्ष घालतात. आता पूर्वीसारखा अशक्ताला न सोसणारा, धकाधकीचा मामला असलेला राजकारणाचा वाटा आता ते उचलत नसले तरी स्वराज्याचे सुराज्य व्हावेच व्हावे, ही तळमळ त्याना आहे. म्हणूनच १९४७ साली देशाचे विभाजन झाले, पाकिस्तान आले, जातीय दंगे माजले, हिंदूना अनेक दृष्टींनी झळ लागली, त्यावेळी पंडितजींचे अंतःकरण दुःखाने अतिसंतप्त झाले ! म्हणून देशाच्या उद्धारा-

साठी प्राणावर उदार होण्याचे त्यानी मनावर घेतले होते. ' अखंड हिंदुस्थान व पाकिस्तान योजना ' असे जाहीर पत्रक काढून त्यानी आपली एक योजना मांडली होती. पण—

' **ऊर्ध्वबाहुर्विरोम्येषो, न कश्चिच्छृणोति माम् ।** ' असे म्हणण्याची भगवान् व्यासांवर जेथे पाळी आली होती, तेथे पंडितजीनाही तशी पाळी आली, तर अस्वाभाविक काय आहे ? अर्थात् जग आहे तसेच घेऊन चालले पाहिजे, असा विचार आपल्या वाढत्या वयोमानाप्रमाणे करून, ' **प्रारब्धस्यान्तगमनम्** ' शक्य तेवढे जास्तीत जास्त साधावे, म्हणून वेदानुवाद एके वेदानुवादच करीत रहावयाचे आणि अनुषंगाने सुराज्य कसे होईल व व्हावे, याच्या वेदोक्त वाटा दाखवित रहावयाचे, अशा आपल्या कार्याच्या मर्यादा, पारडीस आल्यापासून, पंडितजींनी आखून घेतल्या व त्याप्रमाणे त्यांचा अखंड कर्मयोग चालू आहे.

**" तत्त्वार्था तत्त्वज्ञाना विवरण करुनी होय तो शुद्ध जाणा ।**
**सिद्धान्ती निश्चयाचा भवगजरिपुचा केसरी पूर्ण राणा ॥**
**तो की साधू निजाचा, सहजगुण असा स्वात्मभावार्थ त्याचा ।**
**सत्संगे साधकाचा शिणचि परिहरे बोध बोधी निजाचा ॥ "**

स्वाध्यायमंडळाचे वेदानुवादादि काम स्वतः चालवून, ग्रंथ व मासिकादिकांच्या मुद्रण–प्रकाशन–वितरणादिक कामे, श्रमविभागणीच्या तत्त्वावर, आपले थोरले चिरंजीव वसन्तराव यांच्याकडे पंडितजी पारडीस आल्यापासून सोपवून राहिले आहेत. तरी त्यांच्या अंतःकरणाला एक बोच आहे आणि त्यांनी ती केसरीच्या ८ मार्च १९५३ चे अंकांत व्यक्त केली होती ती तशीच आहे. ते सांगतात—

' इंग्रजी सरकार भारतात राहणार नाही असे जेव्हा नक्की ठरले,... त्यावेळी सुमारे २२ मिशने बंद करण्यात आली व त्यांची मालमत्ता येईल त्या रकमेस विकण्यात आली ! ... पारडी येथील मिशनची जागा... जवळ जवळ २०० आंब्यांच्या झाडांची मोठी बाग–मिळून निदान दोन लाख रुपये किंमतीची... आम्हास फक्त एक लाख रुपयास दिली.... गेल्या चाळीस वर्षात कमीत कमी ५० हजार हिंदु या जागेत बाटवले गेले होते.... आम्ही या जागेचे आनंदाश्रम असे नामाभिधान केले व ते प्रसिद्ध होण्यास चार वर्षे लागली....

' भारताला स्वराज्य मिळाले. काँग्रेससरकार स्थानापन्न झाले. काँग्रेससरकारने आपले धोरण जाहीर केले ते असे की– ' आमचे सरकार सेक्युलर ( धर्मनिरपेक्ष ) राहील व धर्मप्रचाराला सर्वांना मोकळा मार्ग असेल. ' ही घोषणा ( १९५० ) होताच, जवळ जवळ त्याच आठवड्यात सर्व मिशनऱ्याना धीर आला. आमच्या जागेपासून फक्त दोन फर्लांगावर आंता ख्रिस्त्यानी नवी जागा विकत घेतली. तेथे मोठा दवाखाना काढण्याचे त्यानी ठरविले. हिंदुस्थानात स्वराज्य मिळण्यापूर्वी एकंदर

ख्रिस्तीप्रचारक वीस हजार होते ते स्वराज्यप्राप्तीनंतर पंचवीस हजार केले गेले ... प्रत्येक पाच मैलांच्या टापूत ख्रिस्तीप्रचारकाची पोहोच आहे. पारडी येथे २० रु. व २५ रु. च्या प्रचारिका दहा आहेत. ५० व १०० रु. चे प्रचारक सहा आहेत.

'येथील उच्चवर्णीय हिंदु लोकांना खालच्या 'काली प्रजेमध्ये' ख्रिस्तीलोक किती काम करीत आहेत याची काही एक कल्पना नाही.... हे औदासीन्य गुजराथेतच आहे, असे नसून ते तसे सर्व प्रांतात आहे...दरसाल पंधरा लाख रुपयांचा खर्च एक मिशनची संस्था करते.... मिशनऱ्यांच्या संस्थांचा एवढा व्याप चालविण्यासाठी लागणारे धन ख्रिस्तीजनतेकडूनच मिळत असते.... निपुत्रिक माणसे आपली सर्व संपत्ति मिशनला देत असतात. धंद्यामध्ये जो लाभ होईल, त्यातील भाग मिशनच्या कार्यासाठी देतात. अशा अनेक पद्धति आहेत.

'स्वाध्यायमंडळ संस्थेला औंधहून पारडीस यावे लागले. त्यावेळी या संस्थेच्या हितचिंतक अशा सुमारे चाळीस धनिकांची मुंबईत सभा भरली. सर्व विचार होऊन तेथे जमलेल्या सज्जनानी तीन लाख रुपयांचे आकडे घातले व पारडीला मोठ्या प्रमाणा-वर हिंदुधर्म-ग्रंथप्रकाशनाचे कार्य करावे, असे तेथे ठरले. त्यानंतर बाजाराची अस्थिरता निर्माण होऊ लागली व या वर्गणीपैकी एकही पैसा वसूल होऊ शकला नाही ! ही भूमि मिशनऱ्याकडून विकत घेण्यासाठी एकलाख रुपये काढले होते, तेही कर्जरूपाने स्वाध्यायमंडळाच्या डोक्यावर बसले. किरकोळ खर्च सुमारे पन्नाससाठ हजार रुपये करावा लागला. औंधास ज्या संस्थकडे स्वतःचे पन्नाससाठ हजार रुपयांचे भांडवल होते ते तिचे जाऊन उलट दीडलाख रुपयांचे कर्ज झाले. त्याचे सहा टक्केप्रमाणे व्याज द्यावे लागते ! मिशनऱ्यांची व आपल्या संस्थांची स्थिति अशारीतीने तुलना करून पाहण्यासारखी आहे. पारडी हे गाव मध्ये असून एका बाजूला उदवाडा ( ४ मैल ) व दुसऱ्या बाजूला बलसाड ( ६ मैल ) अशी मिशनऱ्यांची केंद्रे आहेत.

'इकडे गुजराथमध्ये धर्मश्रद्धा आहे व दानही लोक देतात. अहमदाबादेत संन्यास-मंदिर, वेदमंदिर, गीतामंदिर यासाठी १४ लक्ष रुपये खर्च झाले आहेत, पण तेथे प्रचारकार्य होत नाही. हिंदुजातीवर जे आज मिशनऱ्यांच्या प्रचारतंत्रामुळे महासंकट उत्पन्न झाले आहे, त्याला आळा बसावा अशासाठी कोठेहो काहीही होत नाही ! !

'मिशनऱ्याकडे हव्या त्या पातळीवरची हवी तेवढी माणसे हवी तेथे काम करण्या-साठी मिळतात ! हिमालयासारख्या दुर्गम प्रदेशात उत्तम श्रेष्ठदर्जाचे डॉक्टर २०।२० वर्षे ख्रिस्तीधर्मप्रचारासाठी रहात आहेत.... अशी कामे करण्यासाठी आपल्यांजवळ योग्य माणसे नाहीत. आपले उत्तम डॉक्टर पैसा मिळवण्यात गर्क झालेले आहेत...निकृष्ट कामापासून तो उच्च कामापर्यंत हव्या त्या कामासाठी योग्य माणसांचा पुरवठा हिंदुसमाजात का घडू नये याचा विचार हिंदूनी करावयास पाहिजे... वैयक्तिक प्रयत्नानी मिशनऱ्यांच्या चळवळीस आळा बसणार नाही ! ( विष्णुबुवा ब्रह्मचारी प्रत्येक ठिकाणी कसे भेटणार ? ) त्यासाठी मध्यवर्ती ठिकाणी

एक मोठी संस्था याच कामासाठी निघावी व तिने अखिल भारतामध्ये हिंदुधर्माचे संरक्षण करण्यासाठी व परधर्मात गेलेल्यास शुद्ध करून पुन: हिंदुधर्मात घेण्यासाठी जे काय करावे लागेल ते करावे. असे झाले तरच हे संकट टळू शकेल. '

यानंतरही १९५३ च्या मे महिन्यात केसरीत पंडितजींनी ' हिंदूवर विधर्मीयांची आक्रमणे ' ऊर्फ ' सतत पोखरले जाणारे घर ' म्हणून तीन लेखांक लिहिले. त्यात मुस्लीमसंस्था बाटवाबाटवी किती गुप्तपणाने मध्यप्रदेशात व इतरत्रही करीत असतात, याचा पंडितजींनी स्फोट केला. आणि इशारा दिला की ' हिंदु आज उदासीन आहेत. तसेच ते पुढेही राहिले तर २।३ शे वर्षात नामशेष होतील ! ' श्री निष्कलंकी नारायणपंथ अशी नावे धारण करून आणि अथर्ववेदी वगैरे स्वतःला म्हणवूनही काही सलोखापंथी लोक मुस्लीमधर्माचा प्रचार करतात. याचा अनुभव लाला लजपतराय यानाही एकदा आल्याचा दाखला देऊन पंडितजी बजावत आहेत की ' **असंगाशी संग नको ! तेथे प्राणाशी गाठ असते.** ' हे हिंदूनी लक्ष्यात ठेवले पाहिजे.

१८

# स्वाध्यायमंडळाचा रजतमहोत्सव

पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यानी औंधासच सुरू केलेले व पुढे पारडीस चालू ठेवलेले स्वाध्यायमंडळ हे त्यांच्या कार्याचे मूर्त प्रतीक होय. म. गांधीजींनी एकदा पंडितजींचा 'आपके प्रचारकार्य पर मैं तो हमेशा मुग्ध रहा हूँ।' या शब्दात गौरव केला होता. वैदिक वाङ्मयाचे संशोधन व प्रकाशन हे पंडितजींचे जीवनकार्य. वैदिकऋषिप्रमाणे पंडितजी अनुभवसंपन्न आहेत. त्यांच्या स्वाध्याय-मंडळाचे औंधमधील स्थापनेपासून जो कार्यदृष्टीने रजतमहोत्सव साजरा करण्याचा मुहूर्त लाभला तो ९ व १० जानेवारी १९५४ हा होय.

शनिवार ता. ९ जानेवारी रोजी पूर्वेकडे अरुणराज आपले सोनेरी किरण पृथ्वीतलावर पसरवू लागला. सर्व वातावरण चैतन्यमय होते. प्राचीनकालीन ऋषि-मुनींच्या प्रसन्न आश्रमाचे आधुनिक प्रतीक असलेल्या पंडितजींच्या आनंदाश्रमाचे सुरम्य आम्रवाटिकेत वेदमंत्रांचे पवित्र निनाद होऊ लागले.

मंडपाच्या चारही दिशांच्या चारही द्वारात दोही अंगी वरुणदेवतेच्या नावाने पंचपल्लवयुक्त पूर्ण कलश ठेवले होते. वेद, अग्नि आणि ब्रह्मा यांचेही तीन कलश संस्थापिले होते. विश्वकल्याण आणि विश्वशान्तिसाठी पवमान, पंचसूक्त व स्वाहा-कार सकाळी होऊन दुपारी अरिष्टनिवारणार्थ रुद्रस्वाहाकार झाला. पंडितजींचे ज्येष्ठ चिरंजीव आणि स्वाध्यायमंडळाचे व्यवस्थापक श्री वसंतराव व त्यांच्या धर्मपत्नी सौ. लतिकाबाई यानी प्रथम पुण्याहवाचनपूर्वक आठ वैदिकाना स्वाहा-काराची सुपारी दिली होती. त्यात मुंबईचे वेदमूर्ति आठल्ये, पाटणकर, साने, अमृते, तेलंग, शुक्ल व कुरुंदवाडचे घनपाठी येडूरकर हे ऋक् व शुक्लकृष्ण यजुःशाखीय ब्राह्मण होते.

*

सविधि होमास प्रारंभ पुरुषसूक्ताने झाला. गाईचे शुद्ध तूप, तीळ व समाधि यांच्या आहुति प्रतिऋचेस स्वाहाकारपूर्वक आठही ऋत्विज अग्निस अर्पण करू लागले. पवमान स्वाहाकार तीन तास चालला. समारंभास बडोद्यापासून हैदराबाद-पर्यंतचे महाराष्ट्रीय, सौराष्ट्रीय, राजस्थानीय, कर्नाटकीय स्त्रीपुरुष उपस्थित होते. गुजरातेतील सर्वथरांचे लोक जमले होते. वेदमंत्रांचे श्रवण सर्वांनाच दूरध्वनि-यंत्रामुळे सुलभ होते. मध्यान्हपर्यंत पवमानपंचसूक्त यागाची परिसमाप्ति झाली.

तिसरे प्रहरी रुद्रस्वाहाकारास प्रारंभ झाला. प्रथम शुक्लयजुर्वेदीय पाठाप्रमाणे रुद्रसूक्ताची एकादशनी करून स्वाहाकार झाला. नंतर कृष्णयजुर्वेदी पाठानुसार एकादशनीने झाला. तदनंतर पूर्णाहुति, सातवळेकर कुटुंबियांवर महाभिषेक ऊर्फ अवभृतस्नान व सर्व प्रेक्षकांवर अभिमंत्रित पुण्य जलाभिसिंचन झाले. यावेळी काही श्रद्धाळूनी यज्ञकुंडात नारळ व पत्रपुष्पांजलीअर्पण केली. नंतर मोठ्या समा-रंभाने चारी वेदांच्या संहितांची स्थापना नूतन वेदमंदिराच्या गर्भागारात, मुख्यस्थानी ग्रंथरूप देवता म्हणून, करण्यात आली. ऋत्विजास वस्त्रे व महादक्षिणा अर्पण झाल्यावर, सर्वास प्रसाद देण्यात आला. अशाप्रकारे हा आनंदसोहाळा जयशब्द-घोषात सायंकाळी सहा वाजता समाप्त झाला.

मग स्वाध्यायमंडळद्वारा चालविण्यात येणाऱ्या संस्कृत परीक्षांच्या निरनिराळ्या गावांचे प्रतिनिधि, केंद्रव्यवस्थापक व प्रचारक यांचे स्नेहसंमेलन झाले. पाऊणशे मंडळींचा हा संमर्द होता.

रात्री साडेआठपासून मनोरंजनाच्या कार्यक्रमास पारडीच्या सार्वजनिक हाय-स्कूलातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी चालना दिली. संस्कृत, हिंदी, मराठी व गुजराती नाट्यप्रयोग उत्तम झाले.

रजतमहोत्सवातील वेदमंदिराचे उद्घाटन हा मुख्य कार्यक्रम रविवारी ( १० जानेवारी १९५४ ) सकाळी अननुभूत आनंदी वातावरणात सुरू झाला. सकाळी ब्राह्ममूहूर्तावर वेदमंत्रांचे गायन वेदमंदिरात झाले. मधून मधून उदवाड्याच्या सत्यनारायणबँडचे सुस्वर व सुरेल वादन ऐकू येत होते. आश्रमाच्या मुख्य द्वारापाशी व सभास्थानी सुस्वागतम्च्या दोन मोठ्या कमानी शृंगारण्यात आल्या होत्या. सभामंडपात जागजागी उच्च वैदिक विचारप्रणाली दर्शविणारी सुभाषिते लावण्यात आली होती.

प्रवेशद्वारातूनच नारळाकृति असा वेदमंदिराचा कळस दृष्टीस पडताच ते प्रत्येकाचे श्रद्धास्थान होई. हळूहळू सभामंडप निमंत्रितांनी भरगच्च भरला देखील! सकाळी ९॥ वाजता मुंबईराज्याचे शिक्षणमंत्रि ना. दिनकरराय देसाई यांच्या हस्ते श्री वेदमंदिराचा उद्घाटनसमारंभ झाला. बँडच्या सुस्वर वादनाने आणि पारडी–हायस्कूलातील विद्यार्थ्यांच्या मानवंदनेने पाहुण्यांचे स्वागत झाल्यावर ईशस्तवन,

स्वागतपद्य आणि वेदप्रार्थना झाल्या. आपल्या स्वागतपर भाषणात, मग, पंडितजी सातवळेकर यानी समारंभास आलेल्या सहस्रो शुभसंदेशांपैकी, मध्यवर्ती सरकार-च्या माहितीखात्याचे मंत्री डॉ. केसकर, मुंबईप्रांताचे मुख्यमंत्री ना. मोरारजी देसाई, ना. डॉ. नरवणे, ना. हिरे, ना. चव्हाण, ना. निंबाळकर, ना. डॉ. जीवराज मेहता, श्री बाळासाहेब खेर, श्री अप्पासाहेब पंत, ( परदेशीचे भारतीय कमिशनर ) यांचे संदेश उल्लेखिले व ६५६ रु. दान म्हणून या समारंभास आल्याचे निवेदन केले. त्यात डॉ. बालकृष्ण शर्मा यानी रु. ३००, अहमदाबादचे डॉ. वणीकर यानी रु. २०१ व दे. रामभाऊ मंडलीक यानी रु. १०० पाठविले होते. त्यानंतर पारडीच्या हायस्कूलचे आचार्य श्री रणछोडजी देसाई समारंभाचे स्वागताध्यक्ष म्हणून भाषण करताना म्हणाले की ' विद्या आणि संस्कृतिच्या या अनुपम पर्वणीच्यावेळी आनंदी–आनंदाने आपले स्वागत असो. दक्षिण गुजरातच्या सीमेवरील हा विभाग प्राचीनकाळापासून कोण्या विद्वान् साहित्यिकाची, संतपुरुषाची परंपरा सांगण्यास समर्थ नाही. भारतीय संस्कृति रचनात्मक, मानवकल्याण हे तिचे ध्येय; आजच्या जगात विघातक संस्कृति माणसाला प्रतिदिन स्वार्थांध बनवित आहे. अशा बिकट प्रसंगी आपली प्राचीन भारतीय संस्कृतिच मानवजातीचा उद्धार करू शकेल. या भूमीत पं. सातवळेकरजीसारख्या संताची प्राप्ति आम्हाला झाली, हे आमचे सद्भाग्य होय. एका पाश्चात्त्य महान् व्यक्तिने म्हटले आहे ' **आल्या आल्या देखिले, जिंकिलेही ।** ' हेच शब्द पारडीत पंडितजींच्या बाबतच सार्थ आहेत. पंडितजींनी आपल्या अनोख्या व्यक्तिमत्त्वाने सर्वांवर छाप पाडली. या शान्त मूर्तीचे जीवन एक ध्येयपाठ आहे. सात्त्विक आणि आशावादी जीवनाचा मन, बुद्धि आणि शरीर यावर कसा परिणाम होतो याचा पंडितजी हे प्रत्यक्ष दृष्टान्त आहेत. ८० वर्षांच्या या ' युवान् वुड्ढा ' ने आपली संस्था औंधाहून पूर्णत्वाने पारडीस आणली. ताठ देहयष्टि, दैदिप्यमान मुख, तेजस्वी बुद्धि, बुलंद व निनादयुक्त वाक्प्रहार, अगाध कार्यशक्ति, अपार उमेद आणि अनंत आशा यानी भरलेली जीवनदृष्टि हे सर्व पंडितजींच्या अखंड यौवनाचे पुरावे आहेत. एकवेळ-च्या भौतिक कलाकाराचे एका आध्यात्मिक कलाकारात झालेले परिवर्तन म्हणजे पंडितजी. त्यांच्या चित्रकारीचे मूल्य द्रव्यांकित होते. त्यांची वेदसिद्धी अमूल्य आहे आणि ती विशाल मानवी समाजासाठी आहे.

' पंडितजी आपल्या या आश्रमात आपल्या धर्मग्रंथाचे मनन आणि दोहन करून ते लोकोपयोगी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वेदोपनिषदातील तत्त्वज्ञानाचा लाभ आम जनता घेऊ शकेल असे साहित्य निर्माण करावे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. संसाराची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी मनुष्याला ब्रह्मज्ञान होणे अत्यंत आवश्यक आहे; कारण यामुळेच आपणास आदर्श जीवन जगता येईल, असा पंडितजींचा सिद्धांत आहे. मनुष्य मनात आणील तर तो येथेच स्वर्ग निर्माण करू शकेल असे पंडितजी मानतात. आपल्या धर्मग्रंथात असलेले अपार ज्ञानभांडार आणि तत्त्वज्ञान यांच्या प्रचाराने

भारतीय संस्कृतीला नवीन तेजस्वी स्वरूप देऊन तिचा कायाकल्प करण्याचा भगीरथ प्रयत्न पंडितजी करीत आहेत.

'संस्कृत म्हणजे संस्कृतीची भाषा–एकेकाळची बहुजन समाजाची भाषा, कालान्तराने प्रगाढ विद्वानांची भाषा झाली आहे आणि त्यामुळेच विशाल व अमूल्य ज्ञान-भांडाराला आम जनता मुकली आहे. पंडितजींनी संस्कृतभाषेचा उद्धार करण्यासाठी कमर कसली आहे. ही भाषा सुलभतेने समजू शकेल आणि शिकताही येईल म्हणून पंडितजींनी 'संस्कृत–स्वयं–शिक्षका' ची योजना आखली आणि संस्कृतच्या परीक्षासाठी प्रबंध केला आहे. तिचा लाभ २००० केंद्रे भारतवर्षात घेत आहेत. अकरा हजार विद्यार्थी परीक्षांचा लाभ घेतात.

'आदर्श मनुष्यजीवन होण्यास उच्च संस्कारयुक्त व्यवहारी शुद्ध जीवन तर आवश्यक आहेच, पण त्याहिपेक्षा कार्यक्षम देहमंदिराचीही अत्यंत जरूरी आहे. शरीरसौष्टवाचा नाश ! पंडितजींसारख्या प्रखर संस्कृतिप्रचारकाला ही गोष्ट फार दिवसापासून बोचत होती आणि यांनी कित्येक वर्षांपासून यौगिक व्यायाम आणि सूर्यनमस्कार यांच्या प्रचाराचे आपल्या या राष्ट्रीय आपत्तिच्या निवारणासाठी प्रयत्न चालविले आहेत. त्यांना धर्मवीर म्हटले तर ते असत्य होणार नाही. खरा धर्म म्हणजे काय हे त्यांनी बुद्धिला पटणाऱ्या रीतीने समजावून दिले आहे. पंडितजींना कर्मवीरही म्हणता येते. 'बलवान् व्हा' हा या ऋषीचा संदेश आहे. भविष्यकाळात करावयाच्या योजनात वेदमहाविद्यालयाची योजना आणि अनेक धर्मग्रंथांच्या संस्करणाची योजना या मुख्य आहेत. वयाच्या ८६ व्या वर्षी संस्कृतीच्या या उद्धारकाला संन्यासी बनून 'भिक्षां देहि' करीत आसेतुहिमाचल हिंडण्याची पाळी यावी ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. एका गुजराती कविनी महान् व्यक्तीविषयी म्हटले आहे, ते पंडितजींनाही लागू पडते. तो कवि म्हणतो—

'पडछंद काया मन आरपार,
तेजस्वी पौरुष भर्या परात्पर,
त्यागी, विरागी, सत्, निष्ट सेवक
ने अन्य ना श्रेयमहीं प्रवर्तक
ओ हो ! कशो वदनपे दिसतो दिमाक !
रे फूरतो भ्रमरथी उरनो चिराग्
आ होठने अधर वे नभ पृथ्वी जेवां,
चूमंत दिव्य मणि–मौतिक रम्य केवां.
मौक्तिको चूमता तात
प्राणनो पांगरो तमे
आत्माना तेजनी वर्षा
झीलता धन्य सौ अमे'

यानंतर स्वाध्यायमंडळाचा इतिहास व कार्य यासंबंधीच्या आपल्या भाषणात पंडितजी म्हणाले—

' इंग्रजसरकारला वेदज्ञानाचे भय वाटले. या कारणाने माझी ३।४ प्रांतातून सरकारने उचलबांगडी केली. भारताच्या निरनिराळ्या आठ प्रांतात हिंडून लोकांची धार्मिक व सामाजिक दृष्टचा परिस्थिति अवलोकन केल्यानंतर आलेल्या अनुभवांचा निष्कर्ष म्हणजे स्वाध्यायमंडळ आहे.

' एकही चूक नसलेले अत्यंत शुद्ध असे सामवेदाचे प्रकाशन जर्मनीमध्ये १२५ वर्षांपूर्वी झाले. ज्यावेळी आकाशामध्ये ' बलून्स ' उडवून अर्वाचीन विमानविद्यचे प्रारंभिक प्रयोग चालू होते, त्यावेळी जर्मनीमध्ये वेदांच्या आधारावर एक लेख प्रकाशित झाला. त्यामध्ये असे प्रतिपादन करण्यात आले होते की गॅस न भरता पक्ष्यासारखे उडणारे विमान तयार करता येईल. वेदामध्ये ' वि ' म्हणजे पक्षी हा शब्द विमानाला लावलेला आहे. या आधाराने हा लेख जर्मनीत प्रसिद्ध झाला होता. हल्लीच्या इंग्लंड–जर्मनीमधील लष्कराच्या नियमित फौजा व त्यांचे ७, २१, ६३ असे भिन्न भिन्न विभाग हे सर्व ऋग्वेदाच्या मरुत्‌देवतांच्या मंत्रात सांगितलेल्या पद्धतीपेक्षा किंचित् देखील वेगळे नाहीत. सात सात सैनिकांच्या सात रांगा व प्रत्येक रांगेत दोहीकडे दोन पार्श्वरक्षक अशी ही सेनेच्या लहानात लहान तुकडीची रचना मरुत्सूक्तात आहे. हार्वर्ड युनिव्हर्सिटीने छापलेली वेदवाङ्मयाची अनुक्रमणिका आज जगतात अधिकृत आहे. सेंट पीटर्सबर्ग येथे रशियाने वेद व महाभारत यांच्या संशोधनासाठी एक संस्थाच स्थापन केली आहे. जगतात अन्य कोणत्याही ठिकाणी उपलब्ध नसलेली अथर्ववेदातील पिप्पलादसंहितेची प्रत काश्मीरच्या ग्रंथालयात आहे, असा सुगावा लागल्यावर जर्मनांनी त्याठिकाणी येऊन प्रत्येक पानन्‌पानाचे फोटो काढून आज त्याचे पुस्तक प्रकाशित केले आहे. त्याचे मुद्रण व प्रकाशन वाखाणण्यासारखे आहे. त्या पुस्तकाच्या एका प्रतीची किंमत ४०० रु. आहे. आमच्या श्रीनगरच्या ग्रंथपालाने म्लेंच्छानी फोटो काढले म्हणून ती प्रत परत ग्रंथालयात ठेवण्यास नकार दिला. किती पराकोटीची ही मूर्खता ! अखंड गति राहू शकते किंवा नाही, याचे उत्तर ती राहू शकते. हे आमच्या पारद यंत्राच्या सहाय्याने दाखविले आहे. ते शास्त्रज्ञानी प्रयोग करून पहावे. स्वित्सर्लंडमध्ये विज्ञानाचे संशोधन करणाऱ्या एका जर्मनाची वायअस्त्र, पर्जन्यास्त्र आदि अस्त्राबद्दल स्पष्टीकरण विचारणारी पत्रे मला अजून येत असतात. इतके महत्त्वपूर्ण ज्ञानाचे भांडार असलेल्या वेदवाङ्मयाबद्दलच्या संशोधनसंबंधात भारतातील उदासीनता पाहून मला अत्यंत दुःख झाले.

' मी चित्रकलेवर बडा श्रीमंत झालो असतो, परंतु मला अंतःसंदेश मिळाला की, ' हे ब्राह्मणपुत्रा, धर्मसेवा कर. ' आणि आज मी ती सेवा करीत आहे. दारिद्रय पतकरीन पण या वेदवाङ्मयाचा प्रसार करीन, असा निश्चय केला व स्वाध्याय-

मंडळाच्या कार्यास सुरवात केली. ब्रह्मचर्यकाळीच वेदवाङ्मयाच्या पठणाने–मननाने दीर्घजीवन, सुप्रजा व निरोगी जीवन निर्माण होऊ शकते. 'अहं इन्द्रो न परिजिग्ये।' मी अजेय आहे, मी पाहिजे ते करू शकतो अशा मंत्राच्या सतत उद्‌घोषाने १००।१२५ वर्षेपर्यंत दीर्घजीवन जगून माणूस फार मोठे कार्य करू शकेल. भारतात आज भावात्मक ( Positive ) विचार निर्माण होण्याची आवश्यकता आहे.'

यानंतर अध्यक्षाना अर्पण करावयाचे मानपत्र वाचून पंडितजींनी ते अर्पणही केले. मॅक्समुल्लरने संपादित केलेल्या वेदवाङ्मयातील एक पाठ चुकीचा आहे, असे प्रतिज्ञेवर सांगणाऱ्या श्री सखारामशास्त्री येडूरकर यांच्या वेदमंत्रांच्या पाठान्तराचे व स्मरणशक्तीचे प्रयोग पाहून सर्वजण आश्चर्याने थक्क झाले. अकरा हजार मंत्रातील केवळ क्रमांक सांगितल्यावर बरोबर तो मंत्र म्हणणे, निरनिराळ्या सूक्तातील मंत्र उलटेसुलटे म्हणणे अशा तऱ्हेचे प्रयोग व वेदविद्येची महत्ता जाणून कोणीही नम्र न झाला तरच नवल ! याचवेळी शेट विक्रमसिंह शूरजी वल्लभदास यानी आपल्या दानशूर पिताजींची परंपरा चालवून सामवेद छापण्यासाठी पाच हजार रुपयांचे दान जाहीर केले. स्वाध्यायमंडळाने यापूर्वी दोनवेळां चारही वेद छापलेले आहेत.

याचवेळी वेदमंदिरात ठेवण्यासाठी पारशी धर्मगुरु डॉ. होरमस डियर करोजी मिर्झा व वजाना राज्याचे नबाबसाहेब यांच्याकडून अनुक्रमे 'आवेस्ता' व 'कुराण' हे धर्मग्रंथ अर्पण करण्यात आले. पंडितजींनी त्यांचा स्वीकार करून त्यांचा अभ्यास केला जाईल असे सांगितले.

त्यानंतर अध्यक्षानी वेदमंदिराचे उद्‌घाटन केले. वेदमंदिराच्या आतील चौथऱ्यावर काढलेले चार वेदासहित व्यासमहर्षिंचे सुंदर रांगोळीचित्र पाहून प्रत्येकजण चित्रकार अमृतलाल भट्ट ( बलसाड ) यांचे सहर्ष कौतुक करीत होता. पारडीचे एक सज्जन गुलाबभाई देसाई यानी जगातील प्रमुख रोगाचे औषध स्वाध्यायमंडळाचे द्वारा पंडितजींनी शोधून काढल्याचे सांगून पंडितजींना अभिवादनपूर्वक सुयश चिंतिले.

मग, आपल्या अध्यक्षीय भाषणात ना. दिनकरराव देसाई म्हणाले, 'आज वेदमंदिराचे उद्‌घाटन केल्याचा मला अत्यानंद होत आहे. येथे पवित्र मानवधर्माचा प्रचार करण्यात येईल; सकाळी येथे येणाऱ्याना शारीरिक व्यायाम शिकवण्यात येईल; सायंकाळी मानसिक विकासासाठी प्रवचने होतील. जातपात, वर्ण आणि धर्म हा भेदाभेद न मानता सर्वसाधारण जनतेच्या उद्धारासाठी हे सर्व कार्य होत राहील, हे ऐकून मला आनंद होत आहे. भारतदेश पुष्कळ काळ परकीयांचा ताबेदार राहिल्यामुळे आपल्या समाजात कित्येक विकृति निर्माण झाल्या आहेत. मुख्य विकृति म्हणजे स्वतःवरील अविश्वास. यामुळेच आपली संस्कृति, आपला धर्म व आपल्या प्राचीन विद्या यांचे महत्त्व जेव्हा स्वामी विवेकानंदासारख्या थोर पुरुषानी अमेरिका–युरोपमध्ये सांगितले व मॅक्समुल्लर प्रभृति परकीयानी ते मान्य केले तेव्हा ते आमच्या लक्ष्यात आले.

'काही थोर विद्वानानी कोणत्याही पारितोषिकाची इच्छा न धरता, स्वत: अत्यंत दारिद्र्यात राहूनही आमच्या वेदादि विद्यांचे जतन करून ठेवले तसे दुसऱ्या कोणत्याही देशातील विद्वानानी केले असेल असे वाटत नाही. मुंबईसरकार अशा विद्वानांला सहाय्य करण्यास सिद्ध आहे. पंडितजींनी वेदउपनिषदांचे गंभीर सत्य सामान्यजनाना समजावण्याचे कार्य केले ते अत्यंत स्तुत्य आहे. कविवर्य टागोरानी म्हटले आहे की, उपनिषदात जेवढे ज्ञान आहे तेवढे जगातील दुसऱ्या कोणत्याही पुस्तकात नाही. वेद आणि उपनिषदांचे संशोधन होऊन त्यांचा प्रचार सर्वसाधारण जनतेत झाला पाहिजे. म्हणजेच जनतेत आत्मविश्वास निर्माण होईल. या दृष्टीने स्वाध्यायमंडळाच्या कार्याचे आम्ही अभिनंदन करतो. स्वाध्यायमंडळाने संस्कृत शिकण्यासाठी जी रीत प्रचारली आहे ती अभिनंदनीय आहे. पंडितजींच्या शुभ प्रयत्नांचे फळ पुढच्या पिढीला मिळावे व पंडितजी आपल्या सर्व प्रयत्नात यशस्वी व्हावेत अशी मी सदिच्छा व्यक्त करतो.'

शेवटी पारितोषिक-वितरण -समारंभ झाला. वेदमंदिराचे इंजिनियर श्री विठ्ठलभाई रामजीभाई व स्वाध्यायमंडळातील कर्मचारी याना पारितोषिके देण्यात आली. श्री सुशीलचंद्रजी देसाई यानी समारंभास उपस्थित असलेल्यांचे आभार मानले.

दुपारी ( रविवारी ) चार वाजता नागपूरचे प्राध्यापक श्रीमान् श्री. भा. वर्णेकर यांच्या अध्यक्षतेखाली संस्कृत संमेलन पार पडले. स्वागताध्यक्ष सेठ विक्रमसिंहजी यानी प्रास्ताविक भाषणात म्हटले की—

'प्राचीन भारतीय संस्कृतीचे गौरवपूर्ण चित्र संस्कृत साहित्यातच आहे. स्वाध्यायमंडळ अखिल भारतात पवित्र देवनागरीचा प्रचार करीत आहे याने मला आनंद होत आहे. एकेकाळी भारताच्या सम्राटांच्या व आचार्यांच्या घरात शुकसारिकादेखील संस्कृत बोलत. आमच्या राष्ट्रीय जीवनाचा तो सुवर्णदिन होता. सर्व भारतभर पुन: संस्कृतभाषेचे अभ्युत्थान होऊन घराघरातून या पवित्र भाषेचा प्रचार व्हावा आणि हा सुदिन लवकरच उगवावा.'

यानंतर स्वाध्यामंडळाने चालविलेल्या संस्कृत परीक्षांचे मंत्री आपल्या भाषणात म्हणाले की, 'संस्कृतच्या परीक्षाना साडेतीन वर्षापूर्वीच सुरवात केली असली तरी त्यामागे ३०।३५ वर्षापूर्वी पंडितजींनी तयार केलेली संस्कृतची पाठ्यपुस्तके व त्यांची अन्य तपस्या उभी आहे. पहिल्या वर्षी या परीक्षाना अखिल भारतातून ८०० विद्यार्थी बसले होते. चार वर्षानंतर ४०० केंद्रातून ११००० विद्यार्थी बसले. जनतेचा संस्कृतभाषेबद्दल आदर वाढत आहे याची ती साक्ष आहे. इंग्रजीने झालेल्या कुसंस्काराना दूर करण्यास संस्कृतभाषाच केवळ उपयोगी ठरेल. यावर्षी हैदराबादच्या मध्यतुरुंगातून ३० ते ५४ वयाचे तीस कैदीसुद्धा या परीक्षाना बसले होते. काश्मीरमधील ७ वर्षांच्या बालिकेपासून मध्यप्रदेशातील ७४ वर्षांच्या वृद्धापर्यंत सर्व वयांचे स्त्रीपुरुष, बालबालिका या परीक्षाना बसतात. जोहान्सबर्ग, झांजीबार या आफ्रिकेतील ठिकाणीही स्वाध्यायमंडळाची संस्कृत-प्रचाराची केंद्रे आहेत.

परदेशातून संस्कृत प्रचारकांची मागणी होत आहे. भारतात संस्कृत संमेलनाकरता शंभर लोकसुद्धा जमत नाहीत, परंतु जोहान्सबर्ग येथ संस्कृत परीक्षेच्या प्रमाणपत्र वितरण–समारंभाला शेकडो लोक उपस्थित राहतात.

भारतीय जीवनात ओतप्रोत भरून राहिलेल्या संस्कृतभाषेबद्दल लोकात अभिरुचि निर्माण व्हावी यासाठी सरकारने या परीक्षाना मान्यता द्यावी, या संमेलनास आमच्या केंद्रांचे १५० च्या वर प्रतिनिधि आले आहेत. त्यांचे मी अभिनंदन करतो.'

संदेशवाचनानंतर पंडितजी आपल्या संस्कृत भाषणात म्हणाले– 'संस्कृतभाषेच्या प्रचाराकरता संमेलनादि प्रयत्न करावे लागतात हेच आश्चर्य आहे. संस्कृत सोडून हिंदुत्व व हिंदुधर्म कुठला राहणार ? मद्रासमध्ये निर्माण झालेल्या, स्वतःला अनार्य म्हणविणारांच्या चळवळीवर व आर्यअनार्य हा विद्वेष दूर करण्यावर संस्कृत-भाषेचा प्रचार हा एकच उपाय आहे. सहा महिनेपर्यंत संस्कृतचे अध्ययन केल्यानंतर दहा वर्षांचा बालकसुद्धा महाभारत वाचून समजू शकतो, असा माझा अनुभव आहे.'

अध्यक्षांच्या परिचयानंतर, भवितव्यम् या संस्कृत साप्ताहिकाचे व राष्ट्रशक्ति या मराठी साप्ताहिकाचे संपादक वर्णेकर मातृभूमीची व परमेश्वराची संस्कृत-मध्ये प्रशस्ति–प्रार्थना गाऊन म्हणाले की– 'स्वाध्यायमंडळाच्या रजतजयन्ति-महोत्सवाचे वेळी या संस्कृतसंमेलनाचे अध्यक्षपद मला देऊन आपण जो माझा बहुमान केलात याबद्दल मी आपला निरंतर ऋणी आहे. आपल्या भारतात सर्व-प्रांतीय व सर्वपक्षीय समाजाच्या श्रद्धेची जी अत्यल्प स्थाने आहेत, त्यापैकी संस्कृत-भाषा हे एक अत्यंत महत्त्वाचे श्रद्धाकेंद्र आहे. 'अर्थार्थी भक्तानी' जितक्या भावाने देवाची स्तुति केली त्याहूनही अधिक भक्तिभावाने विद्यादेवीच्या 'ज्ञानार्थी' भक्तानी संस्कृतभाषेची स्तुति केली आहे. संस्कृतभाषा आणि तदन्तर्गत विद्या ही आमच्या ऊर्जस्वल भारतीय संस्कृतीची प्राणशक्ति आहे. ही प्राणशक्ति जागृत केल्या-वाचून आजच्या भारतीय समाजाचे अधःपतन थांबणार नाही. आज युरोप–अमेरिके-पासून भारताने शिकण्यासारख्या काही गोष्टी अवश्य आहेत, पण भारताजवळून-ही साऱ्या जगाने शिकसारखे काही असेल तर ते संस्कृतभाषा व तदन्तर्गत शास्त्रे, दर्शने व विद्या होत. भारताचे हे वैशिष्ठ्य परकीयाना मान्य आहे. १२ फेब्रुवारी १९५३ रोजी केलेल्या, काशी येथील संस्कृत महाविद्यालयाच्या दीक्षान्त भाषणात फिन्लंडचे राजदूत ह्यूनोव्हाल्यान् यानी याच मताचा उल्लेख केला. ते म्हणाले की—

'पाश्चात्यदेशैर्विभिन्नविषयकं विशिष्टज्ञानं भारताय प्रदेयमस्ति । परं स्वतंत्रभारतेनापि पाश्चात्यदेशेभ्यो योगदानं कर्तव्यं वर्तते । वैज्ञानिक–प्रगति-प्रवाहे पाश्चात्यदेशैः स्वीयमाध्यात्मिक–स्वरूपं विस्मृतम् । सुसंपन्नस्य परं-परागतस्य संस्कृतवाङ्मयस्य मुखेन भारतमाध्यात्मविद्याया एकं बहुमूल्यं कोशं बिभर्ति । यं देशोऽयमेकीभूतस्य विश्वस्य राष्ट्रैरन्यैः सहोपभोक्तुमर्हति ।'

' जगातील विद्वानानी मान्य केलेले संस्कृतभाषेचे हे आंतरराष्ट्रीय महत्त्व दुर्लक्षिले तरी स्वातंत्र्यप्राप्तिनंतर हिंदीभाषेला राष्ट्रभाषेचे स्थान देण्यात, भारताच्या घटनाकारानी संस्कृताधिष्ठित व संस्कृतानुप्रणित हिंदीलाच बहुमान दिला आहे. तथापि १९५१ साली मुंबईराज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री ना. खेर यानी मुंबईच्या राज्यकारभारात हिंदीभाषेचा समावेश व्हावा या दृष्टीने एक विधेयक आणले असता, त्यास प्रादेशिक भाषाभिमानाच्या भूमिकेवरून तीव्र विरोध झाला होता. भाषावार प्रांतरचनेसाठी होत असलेल्या अतिरेकी प्रचाराचा एक अपरिहार्य दुष्परिणाम एक प्रकारची परकेपणाची भावना अभावितपणे निर्माण करण्यात होत आहे. प्रादेशिक भाषाभिमान उद्दीपित झालेले, अप्रगल्भ बुद्धिचे व संकुचित मनाचे लोक स्वभाषेचा अभिमान अन्य भाषेसंबंधी किंवा अन्य भाषाभाषी समाजबांधवाविषयी विरोध किंवा विद्वेष करून व्यक्त करीत असतात. त्यांतच हिंदीभाषेविषयी एक प्रकारची अनादराची किंवा विरोधाची भावना अहिंदी भाषाभाषी प्रांतातून अंकुरित होत आहे. ही वृत्ति राष्ट्रसंघटनेच्या दृष्टीने अत्यंत अवांछनीय नाही काय ?

'अशा परिस्थितीत विविधभाषीय भारतीय समाजाला एकत्र आणणारी संजीवनी, त्याचप्रमाणें सर्व प्रादेशिक भाषांचे शब्ददारिद्र्य केवळ कटाक्षाने नष्ट करण्यास समर्थ असलेली महालक्ष्मी म्हणजे संस्कृतभाषा ही आजही भारतात विद्यमान आहे, हे आपले मोठे भाग्य समजले पाहिजे. भारतातील सर्वच प्रादेशिक भाषा संस्कृतोद्भव व संस्कृतप्रचुर असल्याने त्यात ६५ ते ८५ टक्के संस्कृत शब्द आहेत म्हणून सर्व भाषा एकरूपच आहेत. भारतात आज खऱ्या अर्थाने जर कोणती जिवंत भाषा असेल तर ती संस्कृतच होय. अखिल भारतवर्षाचा एकभाषी प्रदेश म्हणून विचार करू जाता, संस्कृत हीच अखिल भारतवर्षाची मातृभाषा आहे. भारतात संस्कृतसारखी ज्ञानविज्ञानसंपन्न, सर्वव्यापी, सर्वान्तर्यामी, नवशब्दप्रसवक्षमा अशी भाषा नसती तर, धर्म, संस्कृति, परंपरा इत्यादि अनेक दृष्टीनी तत्त्वतः भारत एकच आहे, असे कसे सांगता आले असते ? म्हणून केंद्रीय शासनातर्फे व सर्व प्रांतिक शासनातर्फे संस्कृत भाषेच्या प्रचाराचे जितके जास्त प्रयत्न होतील तितके ते अत्यंत आवश्यक आहेत.

' अन्य देशातील विद्वान् भारत हे संस्कृतभाषेचे, तदन्तर्भूत ज्ञानविज्ञानाचे माहेरघर असे समजतात. पण दुर्दैवाने आमच्या सुशिक्षित समाजाची अवस्था **'घरी कामधेनू पुढे ताक मागे ।'** अशी झालेली आहे. संस्कृतच्या अज्ञानामुळे स्वदेशाचा राज्यकारभार आणखी काही वर्षे तरी इंग्रजीतच चालू राहिला पाहिजे, अशी नतद्रष्ट इच्छा करणारे करंटे या देशात धडपडत आहेत.

' जनतेचे कर्तृत्व व सरकारचा पाठिंबा यांची सांगड जमली तरच कोणतेही कार्य वेगाने फलद्रूप होते. तशी सांगड बसण्याची शक्यता ज्या काळात नव्हती अशा वेळी संस्कृतभाषा व विद्या यांचे संरक्षण करण्याचे कार्य पराकाष्ठेच्या प्रतिकूल परिस्थितीत ज्या महाभागानी केले त्यानी एका अर्थाने या राष्ट्राचे प्राणरक्षणच केले. त्यांची संस्कृतभक्ति ही अत्यंत श्रेष्ठ स्वरूपाची देशभक्ति होती.

*

' महाराष्ट्रात निबंधमालेच्या पूर्वी पाचसहा वर्षे बंगालमधील पंडित हृषिकेश भट्टाचार्य यानी विद्योदय नामक संस्कृत मासिकपत्रिका काढून नियतकालिकांचा श्रीगणेश केला. हृषिकेश भट्टाचार्यांच्या कर्तृत्वापासून स्फूर्ति घेऊन नियतकालिके चालविणारात कांचीच्या प्रतिवादी भयंकर मठाचे अधिपति अनंताचार्य यांची मधु-भाषिणी, मद्रासच्या कृष्णम्माचारींची सहृदया, कोल्हापूरच्या अप्पाशास्त्री राशि-वडेकरांची संस्कृतचंद्रिका, शांतिनिकेतनचे पं. विधुशेखर यांचे मित्रगोष्टी वगैरेंची कामगिरी चिरस्मरणीय आहे. भारताच्या सनातन राष्ट्रभाषेची सेवा हानिलाभाची पर्वा न करता, संस्कृत वाङ्मयाचा प्रवाह अविच्छिन्नपणे चालू ठेवणाऱ्या पंडितांची सर इतर कोणत्याही कार्यास येणार नाही. अशा गुरुकुल–परंपरेचे आधुनिकीकरण ज्या संस्थानी केले त्यामध्ये स्वाध्यायमंडळ प्रभृति संस्थांचे कार्य स्पृहणीय आहे.

' संस्कृतभाषेचे राष्ट्रीय व सांस्कृतिक महत्त्व ओळखून तिच्या सार्वत्रिक प्रचारार्थ अनेक व्यक्तीनी व संघटनानी जे प्रयत्न केले त्यांचे फळ म्हणूनच भारताचा हा ज्ञान-निधि आपणापर्यंत येऊन पोहोचला. संस्कृतभाषेची उपासना सर्वतोपरी वाढीस लागणे हे राष्ट्रीय महत्त्वाचे कार्य आहे. याकामी प्रत्येक गावी स्वाध्यायमंडळाची शाखा स्थापन झाली पाहिजे व शक्य असेल तर प्रत्येक गाव संस्कृत प्रचाराच्या दृष्टीने ' किल्ला पारडी ' बनले पाहिजे. '

मा. अध्यक्षांच्या भाषणानंतर आठ ठराव पास झाले. त्यात ' माध्यमिक शाळातून आठव्या श्रेणीपासून संस्कृत अनिवार्य विषय करावा. स्वाध्यायमंडळाच्या संस्कृत परी-क्षाना सरकारने मान्यता द्यावी ' अशा तऱ्हेचे प्रस्ताव होते. शेवटी राष्ट्रगीत होऊन संमेलनाचे कामकाज मोठ्या उत्साहात पूर्ण झाले.

त्यानंतर रात्रौ ८॥ ते १० पर्यंत मनोरंजनाचा कार्यक्रम झाला. त्यात कन्यागुरु-कुल, बडोदा येथील विद्यार्थिनी सरलाकुमारी देसाई यांचे कत्थकनृत्य, दिनकर के. देसाई यांचे बन्सीवादन आणि दलवीर लालुभाई सिकलीकर यांचे व्हायोलियनवादन अप्रतिम झाले. बलसाड गुजरातीशाळेच्या मुलींचे गरबा नृत्य व स्वाध्यायमंडळातील कामगार भगवान इंगळे नि काशीनाथ कोठावळे यांचे राष्ट्रगीतही संस्मरणीय झाले.

अशारीतीने दोन दिवसात स्वाध्यायमंडळाचा रजतमहोत्सव उत्साहपूर्ण आनंदात साजरा झाला.

१९

# गायत्री जपाचे अनुष्ठान व महायज्ञ

**पंडितजींनी** पारडी येथे येऊन नवी विटी नवे राज्य सुरू केले नाही. औंधास जे वेदानुवादाचे आणि मासिकांच्या द्वारा लोकजागृतीचे कार्य चालविले होते, तेच नव्या वातावरणात नव्या उत्साहाने पण परिपक्व व परिणत प्रज्ञेने पुढे चालविले. औंध येथे असताना ते जो 'धकाधकीचा मामला' संस्थानी राजकारणापुरताच बहुशः करीत, तो पारडी येथे त्यानी हातावेगळाच केला आणि वैदिकज्ञानाच्या जोरावर लोकशक्ति जागृत करण्याचे व राखण्याचे व्रत तेवढे पुढे चालविण्यास जुने आराखडे आणि नव्या योजना सुरू केल्या. वेदमहाविद्यालयाचे उभारणीचा आराखडा जसा त्यानी आखला तसाच आनंदाश्रमाचे हद्दीत, ( पूर्वी चर्च होते त्याच जागेवर ) वेद मंदिर उभारून त्याचे उद्घाटन स्वाध्यायमंडळाच्या रजतमहोत्सवाचे निमित्ताने साधून संस्कृतसंमेलनही साधले. त्यापुढे वैदिकज्ञानाचा तपश्चर्यापूर्वक प्रत्यय जनतेला यावा म्हणून पंडितजी चिंतन करू लागले.

वेदमंदिराचे उद्घाटन झाल्यावर २४ जानेवारी १९५४ रोजी श्रीमच्छंकराचार्य श्री १००८ योगेश्वरानंदतीर्थ पुरी मठ यानी वेदमंदिरात योगासने, प्राणायाम व सूर्यनमस्कार वगैरे योगसाधनाच्या शिक्षणाचा कार्यारंभ केला. सुमारे शंभर विद्यार्थी भाग घेऊ लागले. ता. २ जुलै १९५४ रोजी स्वाध्यायमंडळाचे संस्कृत प्रचारकार्याबद्दल हैदराबादच्या मराठी ग्रंथसंग्रहालयात अकरा संस्थानी स्वाध्यायमंडळाचा गौरवही केला. याप्रसंगी हैदराबादेस जसे पंडितजी हजर होते, तसेच १९५४ यावर्षी मुंबईच्या विद्याभवनाचे दीक्षान्तपदवीदानाचे अध्वर्यु म्हणूनही हजर होते. या दोनही ठिकाणची पंडितजींची हिन्दीत व संस्कृतमध्ये झालेली भाषणे 'पुढीलानी' अभ्यासण्यासारखी प्रबोधक ठरली आहेत. याच १९५४ च्या डिसेंबर महिन्यात सत्यसनातन

मानवधर्माच्या जागृतीने सामर्थ्यवान् बनणाऱ्या भारताकडून विश्वशान्तिची स्थापना करण्यासाठी गायत्रीमंत्र जपाचे अनुष्ठान करण्याचा पंडितजींनी संकल्प सोडला. त्या संबंधात पंडितजींनी काढलेले पत्रक पुढीलप्रमाणे होते—

' गायत्रीमंत्राचा जप करण्याची परंपरा फार प्राचीनकाळापासून या भारतामध्ये चालू आहे. ' गाय–त्री ' चा अर्थ ( **गायन्तं त्रायते** ) ' जी जप करणाराचे संरक्षण करते ती ' असा आहे. यासाठी इष्टसिद्धि व्हावी म्हणून गायत्रीमंत्राच्या जपाचे अनुष्ठान करण्यात येत असते.

' ज्याचे उपनयन झाले आहे, तो द्विज सकाळसंध्याकाळ प्रतिदिवशी दोन वेळ संध्या करतो आणि प्रत्येक वेळच्या संध्येमध्ये गायत्रीमंत्राचा कमीत कमी १० वेळ जप करतोच. आपल्या भारतामध्ये असे उपनयनाचे अधिकारी द्विज दोन कोटी आहेत. जर त्यानी प्रतिदिवशी १२ वेळच गायत्रीमंत्राचा जप केला तर सर्वांचा मिळून जप २४ कोटी होईल. जर हा जप सर्वांनी संघटित होऊन एका विचाराने व एका उद्दिष्टाच्या सिद्धीसाठी केला, तर प्रतिदिवशी एक महागायत्रीपुरश्चरण होऊ शकेल; पण हा प्रतिदिवशी केला जाणारा जप एका विचाराने, एका नियमाने व एका उद्दिष्टाच्या सिद्धिसाठी होत नाही, यामुळे याचे दृश्य फळ काही एक दिसून येत नाही.

' मानवी मनामध्ये फार मोठी शक्ति आहे. जो विचार मानवी मनामध्ये येतो, तो विचार मनाच्या विश्वव्यापक अंतस्तरामध्ये पसरतो, आणि जर या विचाराच्या पाठिशी मानवांची संघटित प्रबळ इच्छाशक्ति असेल, तर त्यांची सिद्धि अवश्य होतेच. या अनुभवाने म्हटले आहे की—

**मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ।**

मनुष्याच्या बंधन व मोक्षाचे कारण त्याचें मन आहे.

' मनुष्यामध्ये स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण अशी एकात एक व्यापणारी शरीरे आहेत. यापैकी कारणशरीर हे मन आहे. या मनाचे दोन विभाग आहेत. ( १ ) जागृतिमध्ये काम करणारे मन व ( २ ) दुसरे सुषुप्ति अवस्थेमध्ये कार्य करणारे मन. योगसाधनाने जागृतिमध्ये काम करणारे मन स्तब्ध केले जाते. हे स्तब्ध होताच सुषुप्तिमध्ये कार्य करणारे मन आपोआप जागृत होते व ते आपली अद्भुत शक्ति प्रकट करू शकते. याचे वेदमंत्रात असे वर्णन आले आहे—

**यज्जाग्रतो दूरमुदैति दैवं तदु सुप्तस्य तथैवैति ।**
**दूरंगमं ज्योतिषां ज्योतिरेकं तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ।** ( वा. यजुर्वेद ३४।१ )

' हे मन जागृतिमध्ये दूर जाते तसेच ते सुषुप्तेमध्येही दूर जात असते. हे मन तेजांचे तेज आहे. हे माझे मन शिवसंकल्प करणारे होवो. '

'मन जर शुभसंकल्प करील तर त्याला शुभ फळ मिळेल व जर ते अशुभ कामना करील तर तेच मन त्या अशुभ कामना करणाऱ्याचा नाश करील. यासाठी मनाला सतत शुभ कामना करीत ठेवणे अत्यंत इष्ट आहे. जे विचार वारंवार मनात भरले जातात, ते विचार मनाच्या अंतःस्तरामध्ये सांडले जातात व ते विचार जसे असतील तसे फळ त्याला ते देत असतात.

'जितके अधिक लोक एका वेळी एका विचाराला आपल्या मनात धारण करतील व आपली इच्छाशक्ति त्या विचारांच्या पाठीशी लावतील, तितका त्यांचा दृश्य परिणाम अधिक स्पष्ट दिसून येईल. याच तत्त्वावर जप करण्याची पद्धति आधारलेली आहे. जर अनेक लोक मिळून एका विचाराने, एका नियमाने व एका ध्येयाच्या सिद्धीसाठी मंत्राचा जप त्याच्या अर्थाच्या मननासह करतील, तर खास सिद्धि प्राप्त होईल. अनेकांची संघटित मननशक्ति किती केंद्रित होते यावर सिद्धि अवलंबून असते.

' जगामध्ये सध्या भीतीचे वायुमंडल वाढत आहे. सर्व राष्ट्रे युद्धाच्या तयारीला लागलेली आहेत. प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राविषयी साशंक झालेले आहे. सर्व मानवांच्या मनाचा अन्तःस्तर अशा या भीतीच्या कल्पनानी व्यापलेला आहे.

' हे भय दूर करण्यासाठी जर आम्ही आमची आध्यात्मशक्ति जागृत केली व बहुसंख्य लोकामध्ये निर्भय शान्तिचे पवित्र कल्याणकारी आध्यात्मिक ज्ञान प्रसृत केले, तर या प्रयत्नाने या निर्भय शान्तिचे वायुमंडल इतके प्रभावी होईल की त्याच्यापुढे भीतीचा विचार समूळ नाहीसा होऊन जाईल, युद्धचमान राष्ट्रातील सर्वसाधारण जनतेची मने प्रेमळ शांतीने भारली जातील व मनुष्याना खऱ्या शान्तिचा परम आनंद अनुभवता येईल. हे स्थित्यंतर घडवून आणण्यासाठीच हे अनुष्ठान आहे.

' वेदमंत्रांत दैवीशक्ति आहे. याविषयी पुढील मंत्र पहा—

**ऋचो अक्षरे परमे व्योमन् यस्मिन् देवा अधि विश्वे निषेदुः।** ( ऋग्वेद १।१६४।३९ )

' वेदमंत्राच्या अक्षरामध्ये दैवीशक्ति रहात आहेत. ' यासाठी योग्यरीतीने जप केला तर त्यातील दैवीशक्ति अनुकूल होऊन सिद्धि मिळू शकते. मनुष्याच्या सर्वशक्तिमंत्रजपाच्या अनुष्ठानात हाच भाग मुख्य आहे.

'आम्ही संघटित प्रयत्न करून या मानसिक महाशक्तिचा राष्ट्रीय महत्कार्याच्या सिद्धीसाठी उपयोग करू इच्छित नाही. आमचे उद्दिष्ट विश्वशान्ति स्थापन करणे हे आहे.

' जगाचे शान्तिची स्थापना करण्यासाठी सर्वात प्रथम ऋषिप्रणीत शुद्ध सत्यसनातन मानवधर्माची जागृति करून अध्यात्मज्ञानाचा प्रचार या भारतदेशामध्ये केला पाहिजे व या अध्यात्मशक्तिने भारताला विश्वशान्ति–स्थापनेचे कार्य करण्यास योग्य व सामर्थ्यवान् बनवले पाहिजे. अध्यात्मज्ञानशक्तिने संपन्न झालेला भारत जगामध्ये खरी शान्ति स्थापन करण्याचे कार्य करील. ' या भारताच्या कर्तव्याचा भार जसा

भारताच्या सर्व सुपुत्रावर आहे, तसाच तो माझ्यावरहि आहे, या संबंधाचे आपले कर्तव्ययोग्य रीतीने करण्याचे सामर्थ्य माझ्यामध्ये यावे यासाठी मी दीर्घायु, आरोग्य, ऐश्वर्य, बल, ज्ञानविज्ञान यांनी संपन्न बनावे व हे विश्वशांतिचे कार्य लवकर व्हावे यासाठी आपली तनमनधनाची शक्ति त्या कार्यासाठी अर्पण करावी. असे करण्याची वेळ आली असता मी मागे राहू नये, असे बल माझ्यामध्ये यावे व या योगाने विश्वामध्ये शान्तिस्थापन करण्याच्या कामी भारताला उत्तम यश मिळावे.' याच एका उद्देशाने आम्ही संघटित होऊन हे गायत्रीमंत्रजपाचे अनुष्ठान करण्याची इच्छा करीत आहो. हे सांघिक अनुष्ठान करण्याचा अर्थ असा आहे—

' हे गायत्रीजपाचे अनुष्ठान करणारानी आपापल्या घरी राहूनच ठरलेल्या नियमाप्रमाणे, ठरलेल्या वेळी ठरलेला जप करावा. प्रत्येक महिन्याला जपकर्त्याने आपली जपसंख्या इतकी झाली, असे लिहून आमच्या कार्यालयाला कळवावे. व्यक्तिशः पत्रव्यवहार करण्यापेक्षा गावाचे अथवा ग्रामविभागाचे जपांच्या केंद्रांचे संचालक ' आपल्या केंद्रामध्ये इतका जप झाला ' असे दरमहा लिहून कळवतील, तर ते अधिक चांगले होईल. असे आमच्याकडे लिहून आले म्हणजे आम्ही सर्व जपांच्या केंद्राना लिहून कळवू की, या महिन्यात एकूण जपसंख्या इतकी झालेली आहे. प्रत्येकाची नाववार जपसंख्याही शेवटी प्रसिद्ध करण्यात येईल.

' गायत्रीमंत्रामध्ये २४ अक्षरे आहेत म्हणून गायत्रीमंत्राच्या जपाची संख्या २४ लक्ष झाली पाहिजे—

**लभतेऽभिमतां सिद्धि चतुर्विंशतिलक्षतः । चतुर्विंशतिलक्षं तु यज्ञकल्पमतं यथा ॥**
( याज्ञवल्क्य )

**कल्पोक्तैव कृते संख्या त्रेतायां द्विगुणा भवेत् ।**
**द्वापरे त्रिगुणा प्रोक्ता कलौ संख्या चतुर्गुणा ॥** ( वैशंपायनसंहिता )
**षण्णवतिलक्षसंख्याजपं कलौ पुरश्चरणम् ।** ( गायत्रीपुरश्चरणपद्धति )

' कलियुगामध्ये चारपट जप केला पाहिजे. म्हणजे ९६ लक्ष जपाचे एक अनुष्ठान कलियुगामध्ये करावयाचे असते. अशी २४ पुरश्चरणे झाली म्हणजे जवळ जवळ २४ कोटी जप होतो. यात मानवसुलभ स्खलनादि दोष निराकरणार्थ जपहि आला. अनुष्ठान करावयास सुलभ जावे म्हणून २४ लक्ष जपाचे एक एक अनुष्ठान करावे व क्रमाने अशी अनुष्ठाने एकामागून एक करीत जावे व एकेक अनुष्ठान होताच तसे जपकर्त्यास कळवावे, म्हणजे त्यास विश्वास येईल. अशी १०० अनुष्ठाने झाली म्हणजे २४ कोटी जप होईल, असे योजले आहे. हे सिद्धीस जाणे ईश्वराधीन आहे. तसेच ते आपल्यासारख्या अनुष्ठानकर्त्यांच्या सहकार्यावरही अवलंबून आहे.

' जर १०० जपकर्ते मिळाले व प्रत्येकाने १००० जप केला तर प्रतिदिवशी एक लक्ष जप होईल व २४ दिवसात २४ लक्षांचे एक अनुष्ठान होईल. अशी क्रमाने

अनुष्ठाने होत राहिली तर २४ कोटी जप होण्यास ७ वर्षे लागतील जप करणारे अधिक मिळाले तर वेळ कमी लागेल. जप करण्याचे नियम हे आहेत—

' [ १ ] गायत्रीमंत्राचा जप करण्याची उत्तम वेळ सकाळी ब्राह्ममुहूर्तावर ९ वाजेपर्यंतची आहे. ९ ते १२ पर्यंतची मध्यम आहे. १२ वाजल्यानंतरची गौण आहे.गायत्री मंत्रजपाचे अनुष्ठान सूर्याच्या तेजातील आध्यात्मिक जीवनसत्त्व आपणामध्ये आणून आपले आध्यात्मिक सामर्थ्य वाढविण्यासाठी आहे. १२ वाजेपर्यंत सूर्याचे तेज वाढत जाते म्हणून या वेळात अनुष्ठान करणे उत्तम होय. दुपारनंतर तेज कमी होत जाते म्हणून तो समय गौण आहे. तथापि क्रमाने अनुष्ठान करणारानी आपली इष्टसंख्या पूर्ण होईपर्यंत दुपारीसुद्धा जप करीत रहावे

[ २ ] जप करणाराने, ब्राह्ममुहूर्ती उठून, प्रातर्विधी उरकून स्नानसंध्यादि आपले दैनिक अनुष्ठान करून, मग या नैमित्तिक जपास प्रारंभ करावा. एक हजार जप करण्यास दीड ते दोन तास लागतात.

[ ३ ] जप करणाराने प्रतिदिवशी कमीत कमी १०८ वेळ तरी गायत्रीमंत्राचा जप करावा. जितका अधिक होईल तितका तो अधिक उत्तम होय. २००, ३००, ५००, १०००; अधिक करता येईल तितका तो करावा.

' जपाचे तीन प्रकार आहेत ते असे—

**यदुच्चनीचस्वरितैः शब्दैः स्पर्शाद्यदाक्षरैः ।**
**मंत्रमुच्चारयेद्वाचा जपयज्ञः स वाचिकः ॥ ३ ॥**
**शनैरुच्चारयेन्मंत्रं मन्दमोष्ठौ प्रचालयेत् ।**
**अपरैरश्रुतः किञ्चित्स उपांशुजपः स्मृतः ॥ ४ ॥**
**विधाय चाक्षरश्रेण्यां वर्णाद्वर्णं परात्परम् ।**
**शब्दार्थचिन्तनं भूयः कथ्यते मनसो जपः ॥ ५ ॥**
**वाचिकस्त्वेक एव स्यात् उपांशुः शत उच्यते ।**
**सहस्रं मानसः प्रोक्तो मन्वत्रिभृगुनारदैः ॥ ६ ॥** ( शौनकः )

[ ४ ] मोठ्या स्वराने स्पष्ट उच्चारण करून जो जप केला जातो तो ' वाचिक जप ' होय. ( २ ) मंत्राचे उच्चारण व्हावे पण जवळ बसलेल्या मनुष्याला ऐकू न यावे अशा हळू स्वराने जो जप केला जातो, त्याला ' उपांशु जप ' असे म्हणतात. ( ३ ) मंत्राच्या अर्थाचे मनन करीत मनातल्या मनात जो जप केला जातो त्याला ' मानस जप ' असे म्हणतात. ( ४ ) **' जपस्तदर्थभावनं '** ( योगदर्शन ) जप म्हणजे ( **मौनी मंत्रार्थमनुस्मरन् जपेत्** ) मौन धारण करून मंत्राच्या अर्थाचे मनन होय. वाचिक, उपांशु व मानस यात मागच्यापेक्षा पुढचा अधिक श्रेष्ठ ( शतगुणित श्रेष्ठ ) आहे. अर्थाच्या मननासह जप करण्यास वेळ अधिक लागतो. जो जप ज्याला साधेल तो त्याने करावा. ( ५ ) जप करण्यासाठी आपल्या घरात जे सर्वात उत्तम, रमणीय व उपद्रवरहित स्थान असेल ते पसंत करावे. प्रतिदिवशी जपाचे स्थान बदलू

नये. जपाची जागा व वेळ ठरलेली असावी. या स्थानाला सात्त्विक भावना वाढविणाऱ्या मंत्रानी व चित्रानी सजवावे. उपासनेच्या विरुद्ध भावना वाढविणारे पदार्थ तेथे नसावे.

**मनःसंतोषणं शौचं मौनं मंत्रार्थचिंतनम् । अकामत्वमनिर्वेदो जपसंपत्तिहेतवः ।।**

' मन प्रसन्न असावे, पवित्रता असावी, मौन धारण करावे, मंत्राच्या अर्थाचे मनन करावे, स्वार्थपरायणता नसावी, खिन्नता नसावी म्हणजे जप सिद्ध होतो. ' शुद्धता, स्वच्छता व सात्त्विकता तेथे जितकी अधिक राखता येईल तितकी ती तेथे ठेवण्याची दक्षता जपकर्त्याने ठेवावी. तेथे सुगंधित धूप जाळावा. चंदन व सुगंधित पदार्थांचे हवन तेथे व्हावे. तेथे बसण्याने मन प्रसन्न व्हावे अशी व्यवस्था तेथे केलेली असावी. जपकर्त्याने आपल्या परिस्थितीच्या अनुरोधाने आपल्या जपस्थानाची सजावट करावी. तेथे बसल्यानंतर आपण विशेष अनुष्ठानासाठी तेथे बसत आहो, असे तेथे बसणारास वाटावे.

[ ५ ] ' गायत्रीमंत्राचा छंदर्षि असा आहे—

**तत्सवितुरिति मन्त्रस्य विश्वामित्र ऋषिः, सविता देवता, गायत्री छन्दः ।**

**ऋषिः**— गायत्रीमंत्राचा विश्वामित्र ऋषि आहे.' **विश्वामित्रः सर्वमित्रः ।** ' विश्वामित्र म्हणजे सर्वांचा मित्र. जपकर्त्याने सर्वांचा मित्र होण्याचा यत्न करावा. आपल्या मनातील द्वेषभाव दूर करून सर्वांशी मित्रभावाने वागण्याचा यत्न करावा. विश्वामित्राची मनःस्थिति जपकर्त्याच्या मनामध्ये अंशतः तरी उतरावी.

**क्रोधं लोभं तथा निद्रां निष्ठीवनविजृंभणे । दर्शनं च विनीचानां वर्जयेज्जपकर्मणि ।।**

जप करताना क्रोध, लोभ, निद्रा, थुंकणे, खाकरणे, जांभई येणे, नीच आचरण करणारांची भेट घेणे हे वर्ज्य करावे.

**देवता**— गायत्रीमंत्राची देवता सविता आहे.

**सविता वै देवानां प्रसविता ।** ( शत. ब्रा. १।१।२।१७ )

सर्व विश्वाचा प्रसव आपणामधून करणारा सविता आहे. परमात्म्याने—

**एकोऽहं बहु स्याम् ।** ( छां. उ. ६।२।३; तै. उप. २।६।१ )

' मी एक आहे, आता अनेक बनतो ' असा संकल्प केला. तेव्हा त्याचा प्रकृतीशी संबंध होऊन जो पहिला आविष्कार झाला तोच हा सूर्य होय. या सूर्यापासून पृथिवी व पृथिवीपासून वृक्ष, पशु व मनुष्य झाले. याप्रमाणे सूर्य हा सर्वांचा प्रसविता आहे.

**यो असौ आदित्ये पुरुषः सो असौ अहम् ।।** ( वा. यजु. ७०।१७ )

' जो सूर्यमंडलामध्ये पुरुष आहे तो मी आहे. ' सूर्यापासून पृथ्वी व पृथिवीपासून मी जपकर्ता झालो आहे, हे जपकर्त्याने जाणावे. सूर्य पिता आहे व मी त्याचा पुत्र आहे. पित्यापासून पुत्राने शक्ति प्राप्त करावयाची आहे.

**सूर्य आत्मा जगतः तस्थुषः च। ( ऋ. १।११५।१ )**

सूर्य स्थावरजंगमाचा जीवनदाता आहे. सूर्यातील अद्‌भूत जीवनशक्ति जपकर्त्याने प्राप्त करावयाची आहे. गायत्रीमंत्राचा जप करण्याचे वेळी जपकर्त्याने मनात अशी भावना करावी– ' सूर्यामध्ये जी शक्ति आहे ती प्राप्त करून मी सामर्थ्यवान् बनत आहे. ' असा भाव मनामध्ये धरला म्हणजे जपकर्त्याच्या मनाचा संबंध सौरशक्तिशी होतो व ती शक्ति जपकर्त्यामध्ये येऊ लागते. तसेच—

**सूर्यः चक्षुः भूत्वा अक्षिणी प्राविशत्।** ( ऐ. १।२ )

' सूर्य नेत्राचे रूप घेऊन माझ्या डोळ्यात येऊन राहिला आहे. ' असा हा सूर्य पिता असून जपकर्त्याचा नेत्र हा त्याचा पुत्र आहे. जपकर्त्याचा असा हा सूर्याशी पिता-पुत्र संबंध आहे. सूर्योदयानंतर अर्ध्या तासाने सूर्यावर थोडावेळ दहापाच निमेष दृष्टि स्थिर करण्याचा अभ्यास केला असता डोळ्यांचे आरोग्य वाढते. याप्रमाणे नाभिस्थानी पृष्टवंशामध्ये सूर्यचक्र आहे. त्यात सूर्यशक्ति राहते व त्यामुळे प्रथम क्रिया उत्तम होते. सूर्यचक्र–वेधासाठी योगसाधनामध्ये प्राणायाम सांगितला आहे व सूर्यनमस्काराचा व्यायामही याचसाठी आहे. जपकर्त्याने १२ वेळ तरी कमीत कमी प्राणायाम करावा व निदान १२ वेळ तरी कमीत कमी सूर्यनमस्कारांचा व्यायाम घ्यावा. साधारणशक्तिच्या मनुष्याने १०८ वेळ सूर्यनमस्कार घातले तर ते अधिक नाहीत.

सूर्यातपस्नान वस्त्ररहित शरीराने केले तर तेही सौरशक्ति शरीरामध्ये वाढविते. अशा रीतीने जपकर्ता आपला संबंध सूर्याशी ठेवून आपणामध्ये सौर जीवनशक्ति वाढवू शकतो. गायत्रीमंत्राच्या देवतेपासून जपकर्त्याचा असा हा लाभ होऊ शकतो.

**छन्दः**– गायत्रीमंत्राचा छंद गायत्री आहे. जी जप करणाराचे ( गाय–त्री ) संरक्षण करते ती गायत्री होय जपकर्त्याने आपणामध्ये सूर्याची संरक्षकशक्ति वाढवून निर्बलांचे रक्षण करण्याचा छन्द आपणास लावून घ्यावा.

गायत्रीमंत्राच्या ऋषि–देवता–छंदाचे असे हे तात्पर्य जपकर्त्याने जपाच्यावेळी ध्यानात ठेवावे.

**प्रणवो पूर्वमुच्चार्य भूर्भुवः स्वस्ततः परम् ।गायत्रीं प्रणवं चान्ते जप एष उदाहृतः ।।**
( कौशिक )

याप्रमाणे जपाचा मंत्र होतो तो असा आहे—

**ॐ भूर्भुवः स्वः । तत् सवितुर्वरेण्यम्**
**भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ।। ॐ ।।**

हा जपाचा मंत्र आहे. जपकर्त्याने आपल्या मनामध्ये या मंत्राच्या अर्थाचे मनन केले पाहिजे. या मंत्राच्या अर्थाचे संपूर्ण ज्ञान होण्यापूर्वी मोठा ग्रंथ लिहावा लागेल. पण येथे आम्ही अगदी आवश्यक तेवढा अर्थ संक्षेपाने देणार आहो.

' ( **ओं = अ + उ + म्** ) १ अ ( **आदि भवति** ) पहिल्या स्थानावर विराजतो. २ उ ( **ज्ञानसंतति उत्कर्षति** ) ज्ञानाने उत्कर्ष करून घेतो. ३ म ( **सर्वं मिनोति** ) हा सर्वांचे मोजमाप घेऊन सर्वांचे आकलन करतो. प्रथम स्थान प्राप्त करावे, उत्कर्ष करून घ्यावा व ज्ञानाने सर्व परिस्थितीचे आकलन करावे. ( ओंकाराचा हा अर्थ मानूनच उपनिषदामध्ये वाचकानी पहावा ). ४ ( **भू सत्तायां** ) आपले अस्तित्व टिकावे. ५ ( **भुवः अवकल्कने चिंतने च** ) मनन करावे. ६ ( **स्वः स्वर् स्वर्गः सुवर्गः** ) उत्तम वर्णामध्ये श्रेष्ठ स्थान मिळवावे. आपले अस्तित्व रहावे, ज्ञान प्राप्त करून त्याचे मनन करावे व उत्तम वर्गाच्या लोकामध्ये आपणास स्थान प्राप्त व्हावे यासाठी जपकर्त्याने यत्न करावा. ७ ( **सवितुः देवस्य तत् वरेण्यं भर्गः** ) सर्व जगत् आपणामधून प्रसविणाऱ्या देवाच्या त्या श्रेष्ठ तेजाचे आम्ही सर्व मिळून ( **धीमहि** ) ध्यान व धारण करतो. ८ ( **यः नः धियः प्रचोदयात्** ) हे तेज आम्हा सर्वांच्या बुद्धिला श्रेष्ठ कार्य करण्याची प्रेरणा करो.

**' यो देवः सवितास्माकं धियो धर्मादिकर्मणि ।**
**प्रेरयेत्तस्य तद्भर्गस्तद्वरेण्यमुपास्महे ।। '**

सौर तेजाचे धारण आपणामध्ये करावयाचे आहे. या अनुष्ठानाची पद्धति वर दिली आहे. जपकर्त्याने या मंत्राचा हा भाग आपल्या मनात धारण करावा व जप करावा.

' जपकर्त्याने आपल्या मनामध्ये वरील मंत्रातील भाव राष्ट्रीय दृष्टीने विचार करून त्याचे मनामध्ये धारण करावे. तो राष्ट्रीयभाव असा आहे– ' १ माझे भारतराष्ट्र राष्ट्रमालिकेमध्ये प्रथमस्थानी रहावे, २ त्याचा उत्कर्ष व्हावा व ३ आमच्या या भारतराष्ट्राला राष्ट्रमालिकेमध्ये उत्तम मान्यता प्राप्त व्हावी. त्याला सर्व परिस्थितीचे नीट आकलन व्हावे, ४ माझ्या भारतराष्ट्राचे स्वतंत्र अस्तित्व रहावे, ५ ते ज्ञानसंपन्न व्हावे व ६ त्याची श्रेष्ठता सर्व श्रेष्ठ राष्ट्रामध्ये वाढावी, ७ सृष्टि उत्पन्न करणाऱ्या देवाचे श्रेष्ठ आध्यात्मिक तेज आपले राष्ट्र धारण करो, ८ या आध्यात्मिक तेजाने तेजस्वी बनलेले आमचे राष्ट्र जगामध्ये स्थायी शान्ति स्थापन करण्याच्या श्रेष्ठ कार्यामध्ये पूर्णपणे यशस्वी होवो. '

वेदमंत्रांचा भाव वैयक्तिक व सामूहिक, तसेच राष्ट्रीय क्षेत्रामध्ये अशा पद्धतीने पहावयाचा असतो. हा भाव जपकर्त्याने मनात धरावा व जप करावा.

[ ६ ] ' जप करणाराने जप करण्याच्या दिवसात वेदग्रंथ, उपनिषद् , श्रीमद्भगवद्गीता, रामायण, महाभारत आदि धर्मग्रंथांचा अर्थज्ञानपूर्वक प्रतिदिवशी तास, अर्धा-तास तरी अभ्यास करावा. निदान प्रतिदिवशी एक मंत्र अथवा एक श्लोक तरी अर्थ-ज्ञान–मननपूर्वक वाचावा.

[ ७ ] ' जप करणाराने जप करण्यासाठी पूर्वदिशेकडे तोंड करून बसावे. जपाचा प्रारंभ केल्यापासून त्या दिवसाचा जप संपेपर्यंत आसन सोडून मध्येच इकडे तिकडे हिंडू नये. शरीराला पीडा होऊ लागली तरच आवश्यक तेवढी हालचाल करावी.

बसण्यासाठी आसन तीन बोटे जाड, नरम व सुखाने पुष्कळ वेळ बसता येईल असे असावे.

[ ८ ] ' जप करणाराने जप करण्यापूर्वी व जपसमाप्तिनंतर प्रतिदिवशी दोन वेळ परमेश्वराची मनोभावाने प्रार्थना करावी. ही प्रार्थना ' विश्वशांति स्थापणे हा आमचा उद्देश ' या शीर्षकाखाली पूर्वीच दिली आहे. परमेश्वर आपल्यासमोर आहे व तो आपली प्रार्थना ऐकत आहे, अशा भावनेने व श्रद्धेने ही प्रार्थना करावी. ही प्रार्थना ज्याची त्याने आपल्या मातृभाषेमध्ये करावी. पण त्या प्रार्थनेचा भाव वर दिल्याप्रमाणे असावा.

[ ९ ] ' जपाच्या दिवसामध्ये शक्य तो यत्न करून वाईट विचार, अभद्र शब्दोच्चार व कुत्सित आचार, व्यवहार, तसेच वैयक्तिक व सामूहिक दुराचार जपकर्त्याने करू नयेत. शक्य तो यत्न करून सदाचाराने वागण्याचा यत्न करावा.

**गच्छतस्तिष्ठतो वापि स्वेच्छया कर्म कुर्वतः ।**
**अशुचेर्वा विना संख्यां तत्सर्वं निष्फलं भवेत् ॥**

' भटकणे, उभे राहणे, इच्छस येईल ते करणे, अस्वच्छ असणे व न मोजता जप करणे, असे केल्याने कर्म निष्फळ होते; म्हणून सावधपणाने जप करावा. जप करताना पानतंबाख खाण, विडी ओढण असे काही करू नये. '

[ १० ] ' जप करणाराने जपाच्या दिवसात पडणारी स्वप्ने व येणारे अनुभव न चुकता लिहून ठेवावे.

[ ११ ] ' रोग, प्रवासादि अपरिहार्य कारणाशिवाय कोणत्याही कारणाने जपानुष्ठानामध्ये खंड पडू देऊ नये. एकदा अनुष्ठान सुरू केले म्हणजे ते पूर्ण होईपर्यंत चालतच राहिले पाहिजे. आपल्या आळसाने त्यात खंड पडता कामा नये.

[ १२ ] ' जपाच्या दिवसामध्ये जपकर्त्याने शक्य होईल तेवढा यत्न करून मनाचा व इंद्रियांचा संयम करावा.

[ १३ ] ' जितका जप झाला असेल, त्याच्या दशांश हवन केले पाहिजे. जर जप २४००० झाला, तर २४०० हवन झाले पाहिजे. हवनासाठी असा मंत्र म्हणावा—

**ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् स्वाहा ॥**

हवनासाठी गाईचे शुद्ध तूप, तीळ, तांदूळ, सुगंधी सामग्री, चंदन, सप्त दुग्धवस्त्रांच्या, विशेषता पलाश, औदुंबर यांच्या समिधा यांचा उपयोग करावा. गाईच्या शुद्ध तुपाशिवाय दुसरे कोणतेही तूप वापरू नये यज्ञाने गोरक्षण होते ते असे. जपानंतर जपकर्त्याने यथाविधि अग्नि प्रदीप्त करून हवन करावे.

जपकर्ता आपल्या ठिकाणी हवन करण्यास असमर्थ असेल तर त्याने आम्हास लिहावे म्हणजे आम्ही त्याच्या जपाच्या प्रमाणाने दशांश हवन येथे करू. याचसाठी आम्हास असे कळवले पाहिजे की, ' इतका जप येथे झाला असून, इतके हवन झाले आहे अथवा हवन झालेले नाही. '

**होमाशक्तौ जपं कुर्यात् होमसंख्या चतुर्गुणम् ॥**

[ १४ ] ' ज्याना हवन करता येत नसेल त्यानी होमाहुतिच्या चौपट जप अधिक करावा. उदाहरणार्थ १००० जप करणाराने दशांश म्हणजे १०० हवन करावयाचे आहे, ते होत नसेल तर ४०० जप अधिक करावा. असे केले म्हणजे त्यास हवन करण्याची आवश्यकता नाही.

[ १५ ] ' प्रत्येक सहा महिन्यानी अथवा एका वर्षाने जपकर्त्यांचे संमेलन पारडी येथे स्वाध्यायमंडळाच्या आनंदाश्रमामध्ये भरविण्यात यावे. यामध्ये जपानुष्ठान करणारानी यावे व सर्वांनी मिळून अनुष्ठान, त्यातील अडचणी व त्यांचा परिहार कसा करावा याचा विचार करावा.

[ १६ ] ' जपकर्त्याच्या सर्व शरीरावयवांचा उपयोग या अनुष्ठानात होत आहे हे या ठिकाणी पूर्वी दाखविले आहे. तोंडाने जप, कानानी त्याचे श्रवण, डोळ्यानी सूर्यावर त्राटक, शरीराने सूर्यनमस्कार, सूर्यातपस्नानाने सर्व शरीर, मंत्रार्थाच्या मननाने मन, बुद्धि, चित्त, हवनाच्या सुगंधाने नाक, हवन करण्यात हात, संयमाने इतर इन्द्रिये, अशा रीतीने मनुष्याच्या बहुतेक इन्द्रियांचा व अवयवांचा उपयोग या अनुष्ठानात होत आहे.

जपकर्त्याने जप हा केलाच पाहिजे. बाकीच्या अनुष्ठानापैकी जे करता येईल ते करावे. जे करता येणार नाही, किंवा जे होऊ शकत नसेल अथवा जे समजत नसेल ते करू नये व तसे आम्हास कळवावे.

[ १७ ] ' कमीत कमी जेथे तीन जपकर्ते मिळतील त्याठिकाणी जपानुष्ठानाचे केंद्र स्थापन केले जाईल. जितके अधिक जपकर्ते मिळतील तितके ते अधिक चांगले. जेथे केंद्र स्थापले जाईल तेथे त्याचा एक संचालक व बाकीचे त्याचे सहाय्यक असतील.

[ १८ ] ' अनुष्ठानासंबंधाने कोणास काही माहिती हवी असेल तर ती त्यानी आम्हास विचारावी. आम्ही त्याना माहिती पुरवू.

[ १९ ] ' प्रथम सर्व माहिती मिळवावी, नंतर विचार करावा, व नंतर अनुष्ठानास प्रारंभ करावा. विकारवश होऊन एकदम कसे तरी अनुष्ठान सुरू करू नये. सुरू केल्यानंतर ते मध्ये बंद करता नये.

[ २० ] ' हे पत्रक पोचल्यावर आपल्या इष्टमित्राशी या अनुष्ठानासंबंधाने आपण विचार करावा. आपल्या गावी अनुष्ठान करणारे किती मिळतात ते पहावे. जे जप करण्यास तयार असतील त्यांची नावे व पत्ते लिहून ते आमच्याकडे कळवावे.

[ २१ ] ' होमहवन अन्नसंतर्पण, तसेच सर्व अनुष्ठान योग्यरीतीने पार पाडावे अशी योजना आम्ही करीत आहो. हवनादि कार्ये द्रव्यानेच साध्य होणारी आहेत. या भारत राष्ट्राच्या अभ्युदय व विश्वशान्ति–साधक महान् कार्यामध्ये ज्याना आपण द्रव्यद्वारा भाग घ्यावा अशी पवित्र इच्छा होईल, त्यानी ' ज्याचा द्रव्यांश त्याचा

पुण्यांश ' हे जाणून जी आर्थिक सहाय्यता करणे असेल ती खालील पत्त्यावर पाठवावी.

' भारतामध्ये सत्य सनातनधर्माची जागृति होवो. या धर्मजागृतीने भारताचे आध्यात्मिक तेज वाढो व त्याच्याकडून विश्वशान्तिची स्थापना होवो.

( व्यक्तिमध्ये ) शान्ति ( राष्ट्रामध्ये ) शान्ति ( व विश्वामध्ये ) शान्ति स्थापन होवो.

निवेदनकर्ता **श्री. दा. सातवळेकर**

मंत्री, जपानुष्ठान समिति, स्वाध्यायमंडळ, **आनंदाश्रम, किल्ला पारडी** ( जि. सुरत ) '

हे पत्रक निघून दोन वर्षे गेली. इंग्रजाविरुद्ध भारतीयानी उभारलेल्या पहिल्या सशस्त्र उठावाचे शतसांवत्सरिक स्मृति–मांगल्याचे वर्ष उगवले. मंगल पांड्यानी ज्या दिवशी पारतंत्र्यविनाशाचा मुहूर्त साधला त्या १० मे पासून १५ ऑगष्ट १९५७ अखेर इतिहासाच्या अभिमान्यापासून स्वतंत्र भारताच्या सरकारी यंत्रणेपर्यंत तो शतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्याचे आराखडे आखले जाऊ लागले. याच सुमारास पंडितजींनी प्रवर्तिलेल्या गायत्रीजपाचे अनुष्ठान पाच पुरश्चरणे होण्यापर्यंत फुलले–डवरले होते.

वैशाख कृष्ण ५।६।७, शके १८७९ दिनांक १८, १९ व २० मे १९५७ रोजी मग, पारडी येथे गायत्री–महायज्ञ–समारंभ झाला. स्वाध्यायमंडळाच्या प्रशस्त प्रांगणात उभारलेल्या सुशोभित मंडपात श्रीगायत्री महायज्ञाचे अनुष्ठान मोठ्या समारंभाने चालले. प्रथमदिनी प्रातःकाली ठीक ७।। वाजता पंडितजींचे ज्येष्ठपुत्र श्री वसन्तराव व स्नुषा सौ. लतिकाबाई यांचे हस्ते पुण्याहवाचनपूर्वक चतुःशाखीय विद्वान् वैदिकास प्रार्थनापूर्वक यज्ञकर्म चालविण्याच्या अधिकाराची सुपारी देण्यात आली. हे गायत्री-यज्ञानुष्ठान, पंडितजींनी घडविलेल्या सहा गायत्रीपुरश्चरणांच्या सांगते करता होते. हवनीय द्रव्ये मिळवून एकूण एक लाखावर आहुती तीन दिवसात यज्ञकुंडातील अग्नीत ब्राह्मणांच्या हस्ते समर्पण करण्यात आल्या. सकाळ व दुपार मिळून, सहा तास हा कार्यक्रम चाले. प्रतिदिवशी हवनसमाप्तिसमयी, आरती व वेदघोष होई. रात्री वेदमंदिरावर विद्युद्दीपांची रंगीबेरंगी रोषनाई केलेली असे. तिसरे दिवशी सायंकाळी, पूर्णाहुति–समारंभ प्रेक्षणीय असा झाला. या वेळी यज्ञकर्त्या वैदिकास दक्षिणा व अधिकारपरत्वे वस्त्रादि आहेर देण्यात आले. हवन चालू असता चारही वेदांचे यज्ञमंडपात पठण चाललेले असे. या सर्व ब्राह्मणास प्रतिदिवशी यथोचित गौरविले गेले. त्यात गुजरात, महाराष्ट्र, आंध्रप्रांतीयही विद्वान् होते. असे गायत्री–अनुष्ठान एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेले आपण पूर्वी कधी पाहिलेले नव्हते, असे म्हणणारे अनेक श्रद्धावान् प्रेक्षक आढळले. एक गायत्रीपुरश्चरण म्हणजे २४ लाख गायत्रीमंत्राचा जप. पंडितजींच्याकडे सहा गायत्रीपुरश्चरणे म्हणजे यज्ञपूर्वकालपर्यंत १,४७,७५००० ( एककोटी, सत्तेचाळीस लक्ष, पंचाहत्तर हजार ) जपाची संख्या आलेली होती. अनुष्ठान करताना ' **विश्वशांत्यर्थ** ' असाच संकल्प होता.

या अनुष्ठानप्रसंगी पुरीचे श्रीमच्छंकराचार्य श्री योगेश्वरानंदतीर्थ यांची उपस्थिति महत्त्वपूर्ण होती. पूर्णाहुति–समारंभात श्रींचाही समारोहपूर्वक पूजागौरव करण्यात आला.

गायत्री महायज्ञ चालू असता, शेजारीच दुसऱ्या स्वतंत्र मंडपात वैशाख कृ ५ ( मे १८ ) प्रातःकाळी ८॥ ते १० नागपूरचे सुप्रसिद्ध गीर्वाणप्रवीण प्राध्यापक श्री श्रीधर भास्कर वर्णेकर यांच्या अध्यक्षतेखाली संस्कृतभाषा–संमेलन भरले होते. प्रथमारंभी मिरजेचे श्री द. र. देवधरशास्त्री यानी दोन समयोचित वेदमंत्र संगीत रागदारी पद्धतीने गाऊन संमेलनाचे मंगलाचरण केले. गुर्जरकन्यकानी ' **जय जय महेश–गौरीगणनायके ।** ' हे मंगल पद्य संस्कृतात गाऊन दाखवले. नंतर पंडिजींनी स्वागताध्यक्ष म्हणून सर्वांचे स्वागतपर भाषण संस्कृतातच केले. संस्कृत भाषेच्या प्रशंसेबरोबरच पंडितजींनी राष्ट्रपति राजेन्द्रबाबू, पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, चक्रवर्ति राजगोपालाचारी, म. गांधी, मौ. आझाद प्रभृति महाशयांचे संस्कृतभाषे-संबंधातील स्तुतिपर उतारे वाचून दाखवले.

**' एषा अजरा सुरभारती अनेकानां भाषाणां दिव्या जनयित्री, पोषयित्री, च । अतः संस्कृतभाषा मृता इति प्रवादः स्वयमेव मृतः । '**

असे ठासून सांगितले. अनेक भाषावाद व तज्जन्य अनवस्था, एकलिपीप्रसाराची आवश्यकता, प्रचारास पुरेशा संस्कृतभाषाज्ञानी विद्वानांची उणीव, शासकवर्गास या संबंधात कर्तव्याची जाणीव, इत्यादि मुद्यांचा परामर्श घेऊन पंडितजींनी अध्यक्षांची योजना ओळखपूर्ण सुचविली. चांदोदचे श्री छगनलालजी यानी अनुमोदन दिल्यावर प्रा. वर्णेकर अध्यक्षस्थानावरून चालू असलेल्या गायत्रीमहायज्ञाची महति व सांघिक अनुष्ठानाचे महत्त्व गाऊन आपल्या संस्कृत भाषणात म्हणाले—

**लभतेऽभिमतां सिद्धिं चतुर्विंशतिलक्षतः । चतुर्विंशतिलक्षं तु यज्ञकल्पं मतं यथा ॥
तथा च ।**

**यो यमर्थं प्रार्थयते तदर्थं घटतेऽपि च। अवश्यं तमवाप्नोति न चेच्छ्रान्तो निवर्तते ॥**

इत्यादि याज्ञवल्क्य, वैशंपायनादि स्मृतिसंहिताकारांचे अनुष्ठानप्रशंसापर अभिप्राय सांगून वेदरक्षणार्थ, पिढ्यानुपिढ्या वेदविद्या सस्वर व अक्षरन् अक्षर कंठगत करून रक्षिली यासाठीसांग वेदाध्ययन करणाऱ्या वैदिकाना मी प्रशंसापूर्वक धन्यवाद देतो.

**संस्कृतभाषा एव राष्ट्रभाषा । अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥**

**जीवभूता नाम चैतन्यमयी तथा च जगद्धारणकर्मणि यथा पराप्रकृतिः समर्था वर्तते तथैव इयं संस्कृतभाषा भाति । अन्याश्च प्रादेशिन्यः भाषाः अपराप्रकृति-सदृशाः असमर्थाः सन्ति राष्ट्रभाषापदवीं गन्तुम् ।**

म्हणून संस्कृतभाषा राष्ट्रभाषा होण्याच्या दृष्टीने प्रत्येक राज्यसरकारने व मध्यवर्ती सरकारने संस्कृतमहाविद्यालये स्थापन केली पाहिजेत.

दोन प्रहरी प्रस्ताव पास झाले त्यात राज्यसरकाराना संस्कृत महाविद्यालये स्थापन करण्याची विनंति, प्रशालातून व विद्यापीठातून संस्कृतचा अभ्यास आवश्यक करण्यास विनंति, संस्कृतभाषाप्रेमीनी संस्कृत ही राष्ट्रभाषा म्हणून प्रचार करण्याची अपेक्षा, देवनागरी ह्या एकलिपीचा प्रचार वगैरे मुख्य होते. त्यावर श्री शेंडेशास्त्री ( पुणे ), प्रा. आठवले ( अहमदाबाद ), छगनलाल भट्ट ( चांदोद ), चक्रवर्ती प्रभृतींची भाषणे झाली. अध्यक्षांनी समारोप केल्यावर पंडितजींनी आभार मानले व संम्मेलन समाप्त झाले.

दिनांक १९ व २० मे १९५७ रोजी दुपारी ३ ते ६ वाजेपर्यंत वैदिक परिषदेचे अधिवेशन साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांच्या अध्यक्षतेखाली साजरे झाले. याप्रसंगी प्रथम श्री देवधरशास्त्री यांचे संगीत रागदारीत वेदमंत्रांचे गायन झाले. नंतर स्वागताध्यक्ष पं. सातवळेकर यांचे हिंदीत भाषण झाले. या भाषणात त्यानी वैदिकधर्माचे स्वरूप, वैदिकधर्माचे राज्यशासन, पुरोहिताचे महत्त्व व त्याचे कर्तव्य, नृशरीराचे महत्त्व, यज्ञ, रक्षक, यक्ष, देव व त्यांचे विश्वव्यापी यश, व्यक्तिवाद व समाजवाद यांचा समन्वय इत्यादि विषयावर चर्चा करून वेदधर्माच्या आचरणाची उपयुक्तता दाखवून दिली.

अध्यक्ष साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास हे मग आपल्या भाषणात म्हणाले– ' प्रकांडपंडित व आजन्म वेदविद्येचा व्यासंग करणाऱ्या श्री सातवळेकर यांच्या आज्ञा प्रतिपालनार्थ मी अध्यक्षपदाचा स्वीकार केला आहे. भारताच्या वैभवशाली भूतकालापासून आपल्या राष्ट्रीय अस्मितेचे स्वरूप ओळखून आपली जीवनमंदिराची स्थिर भूमिका निश्चित करणे हे आपल्या राष्ट्राचे ध्येय आहे. आपले राष्ट्र वैदिक राष्ट्र आहे. इतिहासकालामध्ये भिन्न भिन्न समयी, जरी या राष्ट्रास भारतीय राष्ट्र, हिंदुराष्ट्र, आर्यराष्ट्र, अशा संज्ञा योजल्या असल्या तरी वस्तुतः हे वैदिकराष्ट्र आहे. यामुळे वेदांच्या अभ्यासावाचून या राष्ट्राच्या अस्मितेचे–सत्य स्वरूपाचे–ज्ञान होणे असंभव आहे. भारतीयांचा धर्म, नीति, भारतीय जीवनाचे यथार्थ स्वरूप वेदाभ्यासानेच कळेल. सर्व विद्यांचे उगमस्थान वेद आहे. फार काय ? वेदविरोधी बुद्धधर्माचे पंडित ही वेदाभ्यास करणे अवश्य मानतात. तात्पर्य, भारतीय राष्ट्राच्या अस्मितेचे आमूलाग्र परिणत स्वरूप वेदांतच आहे. ' आपल्या विधानाच्या पुष्टचर्थ अनेक वेदवचने, मनुस्मृतीचे आधार व लो. टिळकांच्या 'आर्क्टिक होम' मधील एक उतारा दाखवून अध्यक्ष पुढे म्हणाले– ' वैदिक संस्कृति इतकी श्रेष्ठ असता, या राष्ट्राचे दुर्भाग्य असे की, आम्ही स्वतंत्र झालो असूनही वैचारिक दृष्टचा पाश्चात्यांचे दास बनलो आहो. ही आमची गुलामी संतापजनक असून, ती पाहून, जस्टिस् वुड्रॉफसारख्या पाश्चात्य पंडिताने आमची निर्भर्त्सना केल्याचेही सर्वांस माहित आहे ( येथे त्यानी वुड्रॉफचा

उताराच वाचला ! ) भारतीय आर्य हे भारतात बाहेरून आले, या भ्रमासारखा दुसरा भ्रम नाही. आदर्श गृहजीवन आणि चातुर्वर्ण्य–निर्माणद्वारा आदर्शसमाजरचनाही वैदिक धर्मामुळे साध्य झाली आहे.

( १ ) सर्वत्र एकच एक चैतन्यमय भरला आहे. 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म', ( २ ) सगळ काही परब्रह्मच आहे, ( ३ ) सगळे गतिमान आहे, ( ४ ) सगळे ज्ञानमय आहे, ( ५ ) गति नियमबद्ध आहे, ( ६ ) विश्वाचे घटक परस्पराश्रयी आहे, ( ७ ) योग व यज्ञ, ( ८ ) अनुभूतिवाद, ( ९ ) साधनांची बहुविधता, ( १० ) **कृण्वन्तो विश्वमार्यम्** ( ११ ) ईशस्वत्ववाद, ( १२ ) चातुर्वर्ण्यात्मक समाजरचना, ( १३ ) भौतिक आणि आधिदैविक सामर्थ्य इत्यादि मूलतत्त्वांचा उहापोह करून श्री हरदासानी आपले ओजस्वी भाषण संपविले.

दि. २० मे च्या दुपारी वैदिकधर्म–परिषद पुढे चालून तीत श्री विष्णुशास्त्री पंडित, पं. वारेशास्त्री ( नाशिक ), श्री शेंडेशास्त्री, प्रा. आठवले आदींची भाषणे व अध्यक्षीय समारोप होऊन वैदिकपरिषद् संपली.

या तीन दिवसात रांगोळीप्रदर्शन, कीर्तन, गायनवादन, विद्यार्थिनींचे नाटचप्रयोग, नृत्य, जादूचे खेळ इत्यादि मनोरंजक कार्यक्रमही संस्मरणीय झाले.

पंडितजींनी आपल्या नव्वदीच्या भरात आणि इंग्रजाविरुद्धच्या पहिल्या सशस्त्र उठावाचे शताब्दिच्या वर्षात गायत्री–महायज्ञ आणि त्यानिमित्ताने संस्कृतभाषासंमेलन व वैदिकधर्मपरिषद् घेतली. त्यांचे 'वृद्ध युवा' म्हणून जाहीर रीतीने जनसामान्यापर्यंत जाऊन भिडलेले हे कर्तृत्व 'संस्मृत्य संस्मृत्य' नवीन पिढीने पंडितजीसारखेच ध्येयमग्न कार्यरतीने कर्तृत्ववन्त व कीर्तिवन्त व्हावे, हाच खरा धडा आहे. त्याचबरोबर त्यांची या प्रसंगाने झालेली संस्कृत व हिंदी भाषणे हृदयसंपुटात साठवून ठेवण्याचा प्रयत्नही तरुणानी करणे महत्त्वाकांक्षेच्या दृष्टीने त्यांच्या उत्साहास साजेसे ठरणारे आहे. त्यांचे संस्कृतभाषा–संमेलनप्रसंगी स्वागताध्यक्ष म्हणून झालेले संस्कृत भाषण असे—

**' अयि भो महाभागाः,**

**अद्य अत्र अस्य द्वितीयस्य संस्कृतभाषासम्मेलनस्य कार्यं शीघ्रं संपादयितुं समुत्सुकाः, नानास्थानेभ्य आगताः सर्वे प्रतिनिधयः प्रेक्षकाः, अन्ये च सर्वे सज्जनाः ! अहं भवतां सर्वेषां स्वागतं करोमि । तदेतत् सत्यं, यद् भवद्भिः सर्वैः आगमनसमये मार्गे महान् कष्टोऽनुभूतो भवेत् । अत्रापि च ग्रीष्मकालस्य प्रारंभिको नवतरः चंडः प्रतापो वर्तते । तस्य सहस्ररश्मेः प्रखरतरप्रचंड–किरणानां असह्य एव तापो भवति एषु दिनेषु अत्र ।**

**सर्वमेतदसह्यमपि सुसह्यमिति मन्वानाः सर्वे भवन्तः संस्कृतभाषायाः समुन्नत्यर्थं अहर्निशं निरलसं यावत् शक्यं यतमानाः, अस्मिन् प्रियतमे भारते वर्षे**

संस्कृतभाषायाः प्रसारः नगरे नगरे, ग्रामे ग्रामे, गृहे गृहे च कथं शीघ्रातिशीघ्रं स्यात् इत्येतदर्थं प्रयतमानाः स्वकीये स्थाने एतदर्थं अहर्निशं नानाप्रयत्नान् कुर्वन्तः, सर्वे भवन्तः संस्कृतभाषैव भारतराष्ट्रस्य सुरभारती राष्ट्रभाषा, राष्ट्र-शासनभाषा च भवत्विति उद्देश्यं मनसि धारयन्तः, अत्र समुपाविष्टाः सर्वे, अस्माकं आदरस्थानीया एव, इत्यत्र च विद्यते कश्च न संदेहः ।

शोभनमेवैतत्, यत् सस्कृतभाषा इदानीं सर्वेषां विदुषां समादरणीया संजाता, अतः सा संस्तूयते सर्वैर्विद्वज्जनैः । भारतराष्ट्रस्य राजपुरुषा अपि, ये शासन-कर्मणि नियुक्ताः, ते तामेव सुरभारतीं श्रद्धापूर्वेण मनसा प्रशसन्ति। तेषां तानि कानिचित् प्रशंसावचनानि इदानीमत्र शृणुत ।

श्रीमन्तो भारतराष्ट्रस्य राष्ट्रपतयः राजन्द्रप्रसादमहाभागाः संस्कृतभाषाया एवं प्रशंसां कुर्वन्ति– ' संस्कृतभाषाया अध्ययनं सर्वैः किमर्थं कर्तव्यं इति प्रश्ने कृते सति, तस्य उत्तरं अहं एवं ददामि । संस्कृतभाण्डागारे बहुमूल्यानि महान्ति रत्नानि सन्ति । अस्माकं भारतीयसंस्कृतेः आदिस्रोतः अस्या एव भाषातो निःसृतः संतोषयति सर्वेषां जनानां ज्ञानपिपासाम् । स ज्ञानस्रोतः यथापूर्वं तथैवाद्यापि सम्यक्तया संचलति, तर्पयति च सर्वेषां जिज्ञासाम्। अस्माकं मनसि निश्चितरीत्या एतत् वर्तते, यदस्मिन् घोरतरे करालकाले शान्तिस्थापनार्थं यदि किंचिन्महत्त्वपूर्णं साधनं प्राप्तुं शक्यते, तर्हि तत् संस्कृतग्रंथभाण्डारे एव प्राप्तुं शक्यते। सर्वस्य दुःखस्य निवारकं महौषधं संस्कृतभाषायामेव संभाव्यते। तस्य प्रयोगेण त्रस्तानां संत्रस्तानां दुःखं दूरीभविष्यति, इत्यत न कोऽपि सन्देहः । एतद् दुःखदूरीकरणरूपं सर्वौषधं भारतीये ग्रंथभांडारे यथापूर्वं तथा इदानीमपि प्राप्यते तथैव तदागामिनि भविष्यकालेऽपि प्राप्तुं शक्यते । एष गरिमा संस्कृत-भाषाया एव वर्तते । अत एव एषा संस्कृतभाषा सर्वैरध्येतव्या ' इति ।

पं. जवाहरलाल नेहरूमहोदया भारतराष्ट्रस्य महामंत्रिणः संस्कृतविषये एवं कथयन्ति– ' यदि कश्चन पुरुषो मां पृच्छेत्, भारतस्य का विशाला संपदिति, तथा च भारते श्रेष्ठतमं धनं किमस्तीति अस्य प्रश्नस्य उत्तरं अहं एवं ददामि। भारतस्य अद्वितीया संपत् संस्कृता भाषा एव अस्ति। तथा संस्कृतभाषायां यद-पूर्वं साहित्यं वर्तते, तत्सर्वं भारतस्य अतुलनीया महामूल्या संपदस्ति । अत्र य आध्यात्मिकः प्रवाहो वर्तते, स एव भारतस्य उत्तराधिकारो वर्तते । एष यावत्कालपर्यंतं भारते प्रवहिष्यति, तावत्कालपर्यन्तमेव भारतस्य प्रतिष्ठा सर्वेषु लोकेषु सुप्रतिष्ठिता भविष्यति इति ज्ञातव्यम् । यथैषा संस्कृभाषा भूतकाले अभ्युदय–निःश्रेयस–साधिका आसीत् , तथैव सा इदानीमस्ति, भविष्यकालेऽपि च सा तथैव स्फूर्तिदायिनी स्यास्यति। अतोऽहमिच्छामि संस्कृतभाषाया अध्य-यनाय अस्माकं भारते यथा उत्तमं प्रोत्साहनं मिलिष्यति तथा सर्वैः करणीयम्। तथा च तत्रस्थ साहित्यग्रंथानां संशोधनार्थमपि सदा विद्वद्भिः महान् प्रयत्नो

*

विधेयः ' इति ।

श्रीमन्तः चक्रवर्तिनो राजगोपालाचार्या भूतपूर्वा भारतस्य राष्ट्रपतयः एवं संस्कृतभाषां प्रशंसन्ति– ' एषा सुवर्णस्य उपरि पुनः सुवर्णस्यैव उपलेपकरणं, यथा सुपुष्पस्य उपरि सौंदर्यसंवर्धनार्थं केनचित् चित्रकारेण किंचिन्चित्रीकरणं, यथा सुगंधितस्य पुष्पस्य उपरि पुनः सुगंधितस्य तैलस्य प्रोक्षणं, यथा इंद्रधनषो मध्ये कस्यचिदन्यस्य वर्णस्य लेपनं यथा एतत् सर्वं व्यर्थं, तथा हास्यास्पदं च वर्तते, तथैव अस्माभिः कृता संस्कृतभाषाया प्रशस्तिरपि व्यर्था एव भाति । अतः तस्या श्रेष्ठत्वं स्वतःसिद्धं नैसर्गिकं, दिव्यं च वर्तते । ' इति ।

स्वर्गीया महात्मनो गांधिमहाभागाः संस्कृतभाषाया एवं प्रशस्ति अकुर्वन्– ' अहं तु पूर्वकालिनोऽस्मि, यस्मिन्काले जनाः संस्कृतभाषाध्ययने श्रद्धां धारयन्ति स्म । संस्कृतस्य अध्ययने यावान् समयो गच्छति, स कालापव्ययो जातः इति नाहंमन्ये । ममैतन्मतम् यथैषा संस्कृतभाषा सर्वासां भारतप्रांतीयभाषाणां जननी, तथा च एषा भाषा प्रांतीयभाषाणामध्ययनाय असंशयं सहाय्यकारिणी वर्तते । अतोऽवश्यं अध्येया एका भाषा सर्वैर्भारतीयैः । एषा संस्कृतभाषा सा भाषा वर्तते, यस्यां अस्माकं पूर्वजाः पुरुषा मानवधर्मस्य मननमकुर्वन् , तथा च मानवधर्मसिद्धान्तानां सम्यक् लेखनपि अस्यां भाषायामेव तैः कृतम् । अतो मन्मते कोऽपि भारतीयो बालकः, संस्कृतभाषायाः सामान्यज्ञानेन हीनो मा भवतु । ' इति ।

श्रीमन्तो मौलाना आजादमहोदया एवं संस्कृतस्य प्रशस्ति कुर्वन्तिः– ' एषा संस्कृता भाषा भारतस्य प्राचीनैर्दर्शनादिशास्त्रैः साहित्यग्रन्थैश्च परिपूर्णा वर्तते । अतोऽस्माभिः सर्वैः अस्या पठने पाठने च विशेषेण प्रभावो विधेयः, येन संस्कृत-भाषाभिज्ञा मनुष्या अस्मिन् भारते विशषेण प्राप्नुयुः । ' इति ॥

एवं भारते वर्तमाना सर्वे महान्तो विद्वांसो राष्ट्रशासनाधिकारिणश्च भारतस्य सुरभारतीं मुक्तकंठेन प्रशंसन्ति, येन अस्याः सुरभारत्याः दिव्यं सौंदर्यं प्रकटो भवति । असंशयं अस्यां संस्कृतभाषायां अभिनवाः अध्यात्मशास्त्रग्रंथाः, अधिभूतविद्याग्रंथाः अधिदैवतविद्या ग्रंथाश्चानेकाः सन्ति, ये ग्रंथाः प्राचीनानां मनोविज्ञानेन सह अस्माकं मनांसि संबोधयन्ति । योगशास्त्रग्रंथा आसनप्राणायामाभ्यां मानवानां आरोग्यं संवर्धयन्ति । प्रत्याहारध्यानधारणासमाधिभिः परमात्मनः साकं अनुष्ठातुः आत्मानं संयोजयन्ति, अनष्ठाता च तेन परमं आनन्दं आत्मनि अनुभवति कृतकृत्यतां च भजते । अत्र प्रत्यक्षानुभूतिसर्वस्वं वर्तते ।

एवं नानाशास्त्राणि अस्यां भाषायां वर्तन्ते, येषां ज्ञानेन मनुष्याः कृसकृत्या भवन्ति । अत एव सर्वे महान्तः पुरुषा एतां भाषां प्रशसन्ति ।

न केवलं भारतीयाः, परं विदेशीया अपि संस्कृतां भाषां प्रशंसन्ति। संस्कृत-भाषाज्ञानेनैव युरोपीयनैः युरोपीयभाषाणां निरुक्तिः सम्यक्तया निर्मिता, या इदानीं तनेषु कोशेषु सर्वैर्व्याहृतास्ति। एवं संस्कृता भाषा सर्वैः प्रशंसयितुं योग्या उपयोगिनी च भाषा वर्तते। भारतस्य प्राचीनतम इतिहासो यदि ज्ञातुं कैश्चिदपि इष्यते, तर्हि तेन संस्कृता भाषा अवश्यं अध्येया।

वेदानां उदात्तानुदात्तस्वरितादीनां उच्चारणं वर्णानां च यथास्थानत उच्चारणं यथा ऋषिकालीनैः विद्वद्भिः कृतं, तथैवास्मिन् कालेऽपि क्रियते। महति-काले व्यतीते ऽपि उच्चारणपरिवर्तनं न जातं, एतदस्या भाषायाः सनातनतां दिव्यत्वं च प्रकटीकरोति, न कुत्रापि अन्यत्र एतद् द्रष्टुं शक्यम्।

भरतीयैः वैदिकैः वेदान् कंठस्थीकृत्य तेषां संरक्षणं कृतम्। शत्रूणां आक्रमणे जातेऽपि, शत्रुभिःप्रज्वलितेऽपि ग्रंथसंग्रहे अनेकानां ग्रंथानां रक्षणं यैः कृतं ते धन्याः। स्वकीयं संपूर्ण जीवनं संप्रदाय राष्ट्रीयग्रंथानां संरक्षणं एभिः कृतं इत्यस्य सदृशं उदाहरणं अन्यस्मिन् देशे नैव प्राप्तुं शक्यम्।

युरोपीयैः सहस्रशो ग्रन्थाः तत्रस्थेषु ग्रंथालयेषु सुरक्षिताः कृत्वा संरक्षिताः। एते ग्रंथा अस्मादेव भारतात् तैः नीताः। तैस्ते तत्र सुरक्षिता इति तेषां महन्तः उपकाराः सन्ति। जर्मनदेशे, अमेरिकादेशे, आंग्लदेशेऽपि शतशः पुरुषाः संस्कृतभाषामधीत्वा वेदादिग्रंथानां संशोधनं कुर्वन्ति, ते नानाग्रंथानां प्रकाशन-मपि कुर्वन्ति, तेषामेतत्कार्यं प्रशंसनीयमेव वर्तते।

भारतीयानां आर्याणां गृहे धार्मिका संस्कारा भवन्ति। तेषु संस्कृतैव भाषा प्रयुज्यते। प्रत्येकस्य हिंदुजातीयस्य अन्ये सर्वे संस्कारा भवन्तु वा न भवन्तु, परन्तु प्रायशः सर्वेषां विवाहसंस्कारस्तु भवत्येव। तस्मिन् संस्कारे संस्कृत-भाषयैव सर्वं संस्कारकर्म भवति। अतः प्रत्येकस्य हिंदुजातीयस्य संबन्धः संस्कृत-भाषयासह अवश्यमेव भवति। एतेन सिद्ध्यति यत् हिंदुगृहे यदा कदाचनरीत्या संस्कृतभाषा संप्रयुक्ता भवति।

पूर्वं कैश्चिदुच्यते स्म यत् संस्कृतभाषा मृतेति। परं तत् तथा इदानीं वक्तुं कैरपि न शक्यते। यतोऽस्मिन् भारते वर्षे संस्कृतभाषायाः महान् प्रचारो जात इदानीम्। अतः संस्कृतभाषा मृतेति प्रवादः स्वयमेव मृत इति ज्ञातव्यम्।

इदानीं अस्यां संस्कृतभाषायां बहूनि मासिकरत्नानि, पाक्षिकाणि, साप्ताहि-कानि च नियतकालिकानि प्रकाश्यन्ते। मृतायां भाषायां के एवं पत्राणि प्रकाशयितुमिच्छन्ति, के च पठिष्यन्ति, के च तेभ्यो बोधं प्राप्स्यन्ति। एवं स्पष्टं भवति यत् न एषा संस्कृता भाषा मृता, नापि भविष्यति, एषा अजरा, अमृता सुरभारती अनेकासां भाषाणां दिव्या जननी, अनेकानां भाषाणां पोषयित्री, न केवलं भारतस्यैवैषा भाषा, प्रत्युत विश्वभाषात्वेन एषा इदानीं सुप्रसिद्धा

वर्तते । विश्वेऽस्मिन् या अनेका भाषाः सन्ति, तासु प्रतिशतकं बहूनि वदन्ति संस्कृतपदानि, संस्कृतोद्भवानि वा पदानि प्रयुज्यमानानि दृश्यन्ते । यथा- ' व्यागन–वाहनं, डोअर–द्वारं, गोंड–गोदः ' इति आदिनि पदानि उदाहरण· रूपेण द्रष्टव्यानि । आंग्लभाषाकोशे तानि सर्वाणि यथास्थाने प्रदर्शितानि । एतेन सिद्धयति यदेषा संस्कृतभाषा सर्वासां विश्वभाषाणां जननी वर्तते। भारतीयभाषाणां तु एषा संस्कृतभाषा जननी अस्ति इति विषये प्रमाणान्तरदानस्य किमपि प्रयोजनं नास्ति ।

अनेकेषु देशेषु अनेका भाषा प्रचलिताः सन्ति । यथा भारते षोडशभाषाः सन्ति । रशियादेशेऽपि दश भाषाः संति, चीनदेशे भाषाद्वयं वर्तते । स्विट्सर्लंडदेशेऽपि तिस्रः भाषाः सन्ति। एतेषां बहुभाषिकाणां राष्ट्राणां राष्ट्रहितेच्छुभिः पुरुषैः राष्ट्रैकत्वसाधनार्थं किं किं कृतं, तदिदानीं अत्र द्रष्टव्यम् ।

चीनदेशे एकलिपिप्रसारेण राष्ट्रस्य ऐक्यं तत्रस्थैः राष्ट्रभक्तैः साधितम् । उत्तरचीनस्य भिन्ना भाषा, दक्षिणचीने विभिन्ना एव अस्ति । एवं सर्वस्य अखण्डस्य चीनस्य एका एव लिपिः वर्तते । अतः पत्रे लिखिते, वृत्तपत्रे वा प्रकाशिते, सर्वे चीनदेशीया जना तत्सर्वं पठितुं समर्था भवन्ति। उत्तरीयदक्षिणाख्यचीनविभागयोः मनुष्या यदा एकत्र समायान्ति, तदा एकस्य भाषणं द्वितीयः ज्ञातुं न शक्नोति । परं एकेन लिखितं पत्रं अन्यः सुखेन पठितुं, तस्य अर्थं च ज्ञातुं समर्थो भवति। एवं एकलिपिप्रसारेण चीनदेशस्य राष्ट्रैक्यं साधितम् । एकलिपिप्रसारस्य एतत् महात्म्यं राष्ट्रहितसंवर्धने वर्तते ।

भारतेऽपि एकलिपिप्रसारेण अनेकासु भाषासु विद्यमानास्वपि राष्ट्रीयं ऐक्यं साधयितुं शक्यमस्ति। एका लिपिस्तु देवनागरीति प्रसिद्धा लिपिः सुंदरा वर्तते। देवनागरीलिपिप्रसारेण साकं संस्कृतभाषाप्रसारस्तु भारतीयराष्ट्रस्य ऐक्यसंवर्धनाय अत्यंतं उपयुक्तः इति सर्वैः ज्ञातव्यम् ।

देवनागरीलिपिस्तु सर्वेषु प्रान्तेषु प्रचलितास्ति । सर्वासु भारतीयभाषासु प्रतिशतकं षष्टि वा सप्तति शब्दाः संस्कृतस्य प्रयुज्यमाना दृश्यन्ते । अतः सर्वैः प्रांतीयैः संस्कृता भाषा सुगमतया ज्ञातुं शक्या । अतः भारतस्यैक्यसाधनार्थं संस्कृतभाषायाः तथा देवनागरीलिप्याः प्रसारः अवश्यं कर्तव्यः ।

स्विट्सर्लंड—देशे तिस्रः भाषाः सन्ति । ताः सर्वा राज्यव्यवहारभाषात्वेन तत्रास्थेन राज्यशासनेन स्वीकृताः । एतेन तस्य देशस्य ऐक्यं साधितम् । स्वित्सर्लंददेशः अल्पः । भाषाश्च तिस्रः एव । अतः तत्र सुगमतया राष्ट्रैक्यस्य साधनं शक्यं अभवत् । भारतस्य तु महान् विस्तारः, भाषा अपि षोडश, लिप्यस्तु तथैव विभिन्नाः। एताः सर्वा भाषा न केनापि अध्यातुं शक्याः । अतः अत्र सर्वासां भाषाणां या जननी, सर्वाभिः भाषाभिर्या नूतनसंज्ञानिर्माण आश्रणीया, सर्वैः या संस्तूयते, सा संस्कृता भाषा भारतस्य ऐक्यसंवर्धनार्थं

सर्वैः अस्य अस्माकं राष्ट्रस्य राष्ट्रभाषा, राज्यव्यवहारस्य च भाषा स्वीकर्तव्या। अत्र संमतिवैचित्र्यं भवितुं न शक्यम् ।

सर्वाः भारतीयाः भाषाः संस्कृताश्रयेणैव परिपुष्टा भवन्ति । सर्वासु भारतीयभाषासु नूतनाः संज्ञाः संस्कृतभाषातः एव निर्माय संगृह्यन्ते । अतः सर्वैरादरणीया एषा संस्कृतभाषा सर्वासां भाषाणां जननी, मातृवत्पूजनीया आदरणीया सर्वैः । मातृभाषाश्रयो न कथमपि केनापि तिरस्करणीयो भवितुं शक्यः । अतः सर्वेषु भारतीयप्रान्तेषु संस्कृतभाषा मातृभाषयासाकं पठनीया, राष्ट्रभाषा वा राज्यशासनभाषा वा संस्कृतभाषैव सर्वैः स्वीकर्तव्या । एतेन सर्वेषां प्रान्तानां एकत्वं सम्यक्तया सेत्स्यति । देवनागरी लिपिरपि सर्वत्र आवश्यकीया कर्तव्या।

वैदिके समये वा भगवतः व्याकरणकर्तुः पाणिनेः समयेऽपि काऽपि लिपिर्नासीत् इति प्रवादः कैश्चित् उद्घुष्यते वारंवारम् । परं अमूल एव प्रवाद इति प्रतीयते । यतः भगवान् पाणिनिः लोपस्य लक्षणं 'अदर्शनं लोपः ।' ( अष्टाध्यायी १-१-६० ) इति कृतवान् । प्रसक्तस्य अक्षरस्य अदर्शनं लोपसंज्ञकं भवति । प्रसक्तस्य अक्षरस्य यदा दर्शनं भवति तदा तदक्षरं लेखरूपेण तत्र विद्यते, तदा तद्द्रष्टुः दृष्टिपथमागच्छति । यदा तदक्षरं तत्र न दृष्यते तदा तस्य लोपः जातः इति कथ्यते वैय्याकरणैः। अतः अनेनैव सूत्रेण सिद्ध्यते यत् पाणिनीये काले अक्षराणां लेखनं आसीत् तेन अक्षराणां दर्शनं अदर्शनं च भवितुं शक्यम् आसीत् । अतः तदा लेखनकला आसीत् ऋग्वेदेऽपि तथैव दृश्यते—

उत त्वः पश्यन् न ददर्श वाचम् । ( ऋ. १०।७१।४ ) 'कश्चन निरक्षरोऽज्ञानी पुरुषः लिखितां वाणीं पश्यन्नपि अपश्यन्निव। तत्रस्थं भावं ज्ञातुं असमर्थः अतः उच्यते स वाचं पश्यन्नपि न ददर्श । वाचः नेत्राभ्यां दर्शनं तु लिखितेषु अक्षरेषु एव भवितुं शक्यम् । नान्यथा । एतेन ऋग्वेदकाले लिपिरासीदिति स्पष्टं भवति । अथर्ववेदेऽपि लिखितस्य वेदग्रंथस्य उल्लेखो वर्तते । यथा— यस्मात् कोशाद् उदभराम वेदं तस्मिन् अन्तरवदध्म एनम् । ( अथर्व. १९।७२।१ )

'यस्मात् कोशात् स्थानात् वेदं उदभराम, तस्मिन् अतः एनं वेदं अवदध्म।' अत्र वेदस्य लिखितग्रंथरूपत्वं स्पष्टमेव उल्लिखितं दृश्यते । यस्याः मंजूषायाः मध्यतः वेदग्रंथं उदभराम, ऊर्ध्वं निष्कामयामः, कर्मसमाप्त्यनंतरं तस्यामेव मंजूषायां तं वेदं पुनः वयं अवदध्मः, स्थापयामः । एतेन वेदग्रन्थो लिखित आसीदिति कः प्रतिषेद्धुं समर्थः । सुरभारत्याः सुरलिपिरेव देवनागरीति नाम्ना इदानीं प्रसिद्धा अस्ति ।

एषा देवनागरीलिपिः भारतस्य लिपिः कर्तव्या, संस्कृतभाषा च भारतस्य राष्ट्रभाषा राज्यव्यवहारभाषा च कर्तव्या । एनं विषयं अधिकृत्यैव सर्वैः

भवद्भिः अत्र संमीक्ष्य विचारः कर्तव्यः । निर्बन्धश्च प्रदातव्यः ।

कैश्चिन्महाभागैरुच्यते । यदिदानीं संस्कृता भाषा बहुभिर्ज्ञातुं न शक्यते, अतः सा इदानीमेव राष्ट्रभाषापदवीं आरोढुं न समर्थेति । परं द्रष्टव्यम्, आंग्लराज्ये आंग्लभाषा, राज्यशासनव्यवहारस्य भाषा राज्यशासकैः बलात् कृतासीत् । सा प्रतिशतकं पंचकैरपि नैव ज्ञायते च ।

इदानीं स्वराज्यप्राप्त्यनंतरमपि भारते राज्यव्यवहारस्य भाषा आंग्लभाषैवास्ति, यद्यपि सा प्रतिशतकं पंचकैरपि ज्ञातुं न शक्यते । यदि एवं विधा बहुभिरज्ञाता आंग्लभाषा भारतस्य राज्यभाषा भवितुं शक्या, तर्हि संस्कृतभाषा तु ततोऽप्यधिकैर्ज्ञायते, अतः सा असंशयं राज्यभाषा भवितुं योग्या इत्यत्र किमर्थं सन्देहः क्रियते ? विद्यमान राज्यव्यवहारेणैव सिद्ध्यति यत् बहुभिरज्ञाता परदेशीया भाषापि राज्यव्यवहारभाषा भवितुं शक्या, तर्हि संस्कृता भाषा केन कारणेन प्रतिषेद्धुं शक्या ? तत्र किमपि योग्यं कारणं नास्ति । अतोऽस्माभिरुच्यते संस्कृतभाषा अद्यैव राज्यव्यवहारभाषा कर्तव्येति ।

संस्कृतभाषा राज्यशासनस्य व्यवहारभाषेति स्वीकृता चेत् सा भाषा सत्वरं भारते सर्वत्र प्रसृता भविष्यति । सत्वरं बहवो जनाः तां ज्ञास्यन्ति ।

संस्कृतभाषायाः प्रसारे संजाते, प्रांतभाषाकारणेन ये नाना कलहाः समुत्पन्नाः, ते सत्वरं विनश्यन्ति । तथा संस्कृतभाषया सर्वेषु प्रांतीयेषु जनेषु प्रबलं ऐक्यं प्रस्थापितं भविष्यति । राष्ट्रीयं बलं च संवर्धितं भविष्यति ।

प्राचीने भारते आवेदकालात् बुद्धोत्तरकालपर्यन्तं संस्कृतभाषैव राष्ट्रभाषा आसीत् । ताम्रपटादीनां भाषा प्रायशः संस्कृता एव दृश्यते । एतेनैव कारणेन सर्वासु भारतीयासु भाषासु बहवः संस्कृताः शब्दाः प्रयुज्यमाना दृश्यन्ते । अत एव एषा संस्कृतभाषा आंग्लभाषापेक्षया शीघ्रतरं भारतराष्ट्रस्य राष्ट्रभाषा राज्यशासनभाषा च भवितुं शक्या ।

अस्याः संस्कृतभाषायाः प्रचारार्थं ये भद्राः पुरुषाः सततं यतमानाः, तदर्थं यावच्छक्यं कार्यं च कुर्वन्ति, तैः अत्र सम्मिलितैः अस्मिन् विषये स्वकीया अनुकूला संमतिः देया ।

अस्य सम्मेलनस्य अध्यक्षस्थानार्थं सर्वैः स्वागतकारिणी–सभायाः सदस्यैः निर्वाचिताः, श्रीमन्तो विद्वद्वर्याः श्रीधर भास्कर वर्णेकर महाभागाः सन्ति । तेषां संस्कृतभाषा पुरस्कारविषयकीं योग्यतां सर्वे भारतीया जानंति, अतस्तद्विषये नास्ति काचिदपि विशेषेण कथनस्य आवश्यकता । ते अस्य सम्मेलनस्य अध्यक्षपदं अलंकुर्वन्तु इति अहं सूचयामि, तत् सर्वैरनुमोदनीयमिति प्रार्थयामि सर्वानत्रोपस्थितान् सभासदान् । '

आता वैदिकधर्मपरिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून पंडितजींनी केलेले विद्वत्ताप्रचुर भाषण हिंदीत आहे ते असे—

' सभ्य स्त्रीपुरुषो ! '

आज ' वैदिकधर्म परिषद् ' का अब अधिवेशन शुरू हो रहा है। आप सब सदस्य इस परिषदको यशस्वी करनेके लिये बडी दूर दूरसे आ गये हैं। वैशाखकी गर्मी भी है। तथापि यह सब सहन करके आप बडे उत्साहसे परिषदके कार्यमें भाग लेना चाहते हैं, इस कारण मैं आपका हार्दिक अभिनंदन करता हूँ।

' वैदिक धर्मपरिषद् ' का प्रयोजन क्या है ? इसका यहाँ थोडासा निर्देश करना अनुचित नही होगा। मनुस्मृतिमें कहा है कि– ' **वेदोऽखिलो धर्ममूलम् ।** ' ( मनु २।६ )

' धर्मका मूल वेद है। ' वेदसे सब धर्म फैला है। इस धर्ममूलका बडा वृक्ष हुआ है। शाखाएं टहनियां चारों ओर फैल रही है। विस्तार बडा हुआ है। इसलिये इस धर्मके मूलकी ओर जनताका दुर्लक्ष्य हो रहा है। इस दुर्लक्ष्यको दूर करके जनता धर्ममूल वेदका विचार करे, ऐसा करनेकी आवश्यकता उत्पन्न हुई है। वेदके धर्मसे वैदिक समयमें कैसा मनुष्य बनता था, इसका वर्णन मनु महाराज करते हैं—

**सेनापत्यं च राज्यं च दण्डनेतृत्वमेव च। सर्वलोकाधिपत्यं च वेदशास्त्रविदर्हति ॥**
( मनु१२।१०० )

**चातुर्वर्ण्यं त्रयो लोकाः चत्वारश्चाश्रमाः पृथक् ।**
**भूतं भव्यं भविष्यं च सर्वं वेदात् प्रसिद्ध्यति ॥** ( मनु१२।९७ )

' ( १ ) सेना संचालन, युद्ध, ( २ ) राज्यशासन, ( ३ ) दण्डदान, अपराधियोंको दण्डदान, न्यायाधीशका कार्य, ( ४ ) सर्व लोकोंका आधिपत्य अर्थात् लोकशासन, ( ५ ) चार वर्णोंकी सुव्यवस्था, ( ६ ) तीनो लोकोंकी व्यवस्था, ( ७ ) चार आश्रमोंकी व्यवस्था, ( ८ ) भूत, भविष्य और वर्तमानकालमें होनेवाले सब शासनसंबंधी कार्य वेदशास्त्र जाननेवाला उत्तम रीतीसे कर सकता है। ' वह राष्ट्रसंबंधी सब कार्य है। आज जो वैदिक ज्ञान है, वह इन बातोंको नहीं सिद्ध कर सकता। आज केवल होम, हवन, यज्ञ ही वेदके सहारे किये जा रहे हैं, पर सेनारचना, दुर्गोंकी सुव्यवस्था, नगररक्षण, युद्ध, युद्धमें सेनासंचालन, शस्त्र–अस्त्रोंकी व्यवस्था, शस्त्रास्त्रनिर्माण आदि कार्य वेदमें है, ऐसा आज कोई नहीं समझता।

मनु तो राज्यशासक था। वह कहता है कि वेदसे राज्यशासनव्यवस्था सिद्ध होती है, मनुके राज्यशासनमें सेनापतिपदपर वेदवेत्ता रखा जाता था, न्यायाधीशके कार्यपर वेदका ज्ञाता बैठता है, और जो राज्यशासनके ओहदे है, उनपर भी वेदके ज्ञाता ही नियत किये जा सकते थे। परंतु आज वेदवेत्ताओंको कोई यह कार्य नहीं दे सकते। आज जो एम्. ए., एल्एल्. बी. का मान है, उससे अधिक मान प्राचीन समयमें

वेदवेत्ताओंका था और वे उस समय ये सब कार्य करते भी थे। वहाँ गणेशपुराणका थोडा अंश देखिये—

'काश्यपकी पत्नी अदिति थी। इनकी इच्छा हुई कि मुझे ऐसा पुत्र हो कि जो विजयी हो। उसको विनायक पुत्र हुआ। उस विनायकका उपनयन कश्यपके गुरुकुलमें हुआ। उपनयनमें उसने जो भिक्षा माँगी, उसमें सबने शस्त्रअस्त्र दिये और उपदेश किया कि—

'**उपादिशद् दुष्टनाशं कुरु शीघ्रं विनायक।**' (गणेश २।१०।३०)

'विनायक! तू शीघ्र ही दुष्टोंका नाश कर।' उपनयनके पश्चात् उसका वेदाध्ययन कश्यपके गुरुकुलमें हुआ।

काशीराजके पुरोहित कश्यप थे। कश्यप अन्य यज्ञमें रुके रहनेके कारण काशी-राजका पौरोहित्य करनेके लिये ब्रह्मचारी विनायक गया। इस समय वह १८ वर्षका तरुण था। परन्तु वह यज्ञयाग, नगररक्षण, सेनासंचालन, शस्त्रनिर्माण आदिमें प्रवीण था। काशीराजके राज्यमें आकर उन्होने सैन्यकी रचना की, दुर्गोंकी सुव्यव-स्था की, स्त्रियोंकी सेना तैयार की, नगररचनाका उत्तम प्रबंध किया। और जिस समय राक्षसोंका आक्रमण हुआ, उस समय विनायकने अपने उत्तम नेतृत्वसे काशी राजाका विजय हो और राक्षसोंका पूर्ण पराभव हो ऐसा प्रबंध किया।'

सेनासंचालन, शस्त्रास्त्रसंग्रह, युद्धव्यवस्था आदि कार्य राजाका पुरोहित करता था, यह बात यहाँ दीख रही थी। गुरुकुलमें पढनेवाला ब्रह्मचारी गुरुकुलकी पढाईमें ही यह विद्या सीखता था। हम वेदमें देखते है—

**संशितं म इदं ब्रह्म संशितं वीर्यं बलम्।**
**संशितं क्षत्रं अजरं अस्तु जिष्णुःयेषामस्मि पुरोहितः॥ १॥**
**सं अहं एषां राष्ट्रं स्यामि सं ओजो वीर्यं बलम्।**
**वृश्चामि शत्रूणां बाहून् अनेन हविषाहम्॥ २॥**
**नीचैः पद्यन्तां अधरे भवन्तु ये नः सूरिं मघवानं पृतन्यात्।**
**क्षिणामि ब्रह्मणामित्रान् उन्नयामि स्वान् अहम्॥ ३॥**
**तीक्ष्णीयांसः परशोः अग्नेः तीक्ष्णतरा उत।**
**इंद्रस्य वज्रात् तीक्ष्णीयांसो येषामस्मि पुरोहितः॥ ४॥**
**एषामहं आयुधा संस्यामि एषां राष्ट्रं सुवीरं वर्धयामि।**
**एषां क्षत्रं अजरं अस्तु जिष्णु एषां चित्तं विश्वेऽवन्तु देवाः॥ ५॥**
**प्रेता जयता नर उग्रा वः सन्तु बाहवः।**
**तीक्ष्णेषवोऽबलधन्वनो हत उग्रायुधा अबलानुग्रबाहवः॥ ६॥**
**अवसृष्टा परापत शरव्ये ब्रह्मसंशिते।**
**जयामित्रान् प्रपद्यस्व जह्येषां वरं वरं मामीषां मोचि कश्चन॥ ७॥**

(अथर्व. ३।१९)

१ मेरा यह ज्ञान तेजस्वी है। २ मेरा यह वीर्य और बल तेजस्वी है। ३ तेजस्वी क्षात्रसामर्थ्य अविनाशी है। ४ जिनका मैं जय प्राप्त करनेवाला पुरोहित हूँ, उनका तेज फैलेगा। ५ मैं इनका राष्ट्र तेजस्वी बनाता हूँ। ६ मैं इनके राष्ट्रका सामर्थ्य, बल और पराक्रम अधिक तेजस्वी करता हूँ। ७ इस हविसे मैं शत्रुओंके बाहूओंको काटता हूँ। ८ जो हमारे धनी और ज्ञानियोंपर सेनासे चढाई करते हैं वे नीचें गिरें, वे अवनत हो। ९ मैं अपने ज्ञानसे शत्रुओंको क्षीण करता हूँ। १० मैं ज्ञानसे स्वकीयोंको उन्नत करता हूँ। ११ जिनका मैं पुरोहित हूँ उनके शस्त्रास्त्र फरशीसे, अग्निसे तथा इन्द्रके वज्रसे अधिक तेजस्वी बनता हूँ। १२ मैं इनके आयुधोंको तीक्ष्ण बनाता हूँ। १३ मैं इनका राष्ट्र उत्तम वीरोंसे युक्त करके बढाता हूँ। १४ इनका क्षात्रतेज जयशाली और बढनेवाला हो। १५ सब देव इनके चित्तका संरक्षण करें। १६ हे वीरो! शत्रुपर हमला करो। १७ विजय प्राप्त करो। तुम्हारे बाहु उग्र हो। १९ तीक्ष्ण बाणवाले, उग्र आयुधोवाले, उग्र बाहुवाले वीरो! शत्रुके निर्बल धनुष्यवाले बलहीन सैनिकोंको मारो, काटो। २० हे ज्ञानसे तीक्ष्ण बने शस्त्र! तू छोडनेपर शत्रुपर जा, गिर। २१ शत्रुओंको जीतो। २२ शत्रुओंका घात करो, आगे बढो। २३ इन शत्रुओंके श्रेष्ठ श्रेष्ठ वीरको मार डाल। २४ इनमेंसे किसीको मत छोड।

ये सब वाक्य पुरोहितके कर्तव्यको बता रहे हैं। इससे सिद्ध होता है कि मनुने जो कहा वह सत्य था। अर्थात् हमें वेदका अर्थ ठीक तरह समझना चाहिये। वासिष्ठ मन्त्रोंमेंसे यह मन्त्र यहाँ देखने योग्य हैं—

**दण्डा इव इत् गो अजनास आसन् परिच्छिन्ना भरता अर्भकासः।**
**अभवच्च पुरएता वसिष्ठः आदित्–तृत्सूनां विशो अप्रथन्त॥** ( ऋ. ७।३३।६ )

१ गौओंको चलानेवाले कोमल डंडोके समान भरतलोग मृदु, आपसमें झगडनेवाले और राष्ट्रबुद्धिके थे। २ तृत्सुओका पुरोहित वसिष्ठ हुआ। ३ इससे तृत्सुओंकी प्रजाकी उन्नति हुई।

वसिष्ठ पुरोहित हुआ और उसने राष्ट्रमें वीर्यवान् ज्ञान फैलाया जिससे उस राष्ट्रकी प्रजा अभ्युदय प्राप्त करनेमें समर्थ हुई। पूर्वस्थानमें दिया सूक्त भी वसिष्ठका सूक्त है। उस प्रकारके प्रयत्नसे राष्ट्रकी उन्नति हो सकती है, यह तो स्पष्ट ही है। अर्थात् पुरोहित राष्ट्रका अभ्युदय करता था, प्रजाको शूरवीर बनाता था, युद्धके लिये अपने शस्त्रास्त्र शत्रुके शस्त्रास्त्रोंसे अधिक तीक्ष्ण बनाता था। और राष्ट्रको प्रभावशाली बनाता था।

रामेश्वरकी यात्रा करनेके लिये जानेवाले लोग धनुष्कोटिमें धनुष्यबाण पुरोहितोंको दानमें देते हैं, दक्षिणा भी देते हैं। यह प्राचीन राष्ट्रीय पद्धतिका अवशेष है। रामचन्द्रजीने रावणका पराभव किया और फिरसे राक्षसोंका उपद्रव भारतको न

हो, इसलिये रामेश्वरमें वीरभद्रकी स्थापना की। वहाँ सेना रखी और इस सेनाको देनेके लिये धनुष्यबाण, दक्षिणा, तथा गंगोदक आदि पुरोहितोंके पास देनेका रिवाज सुरू किया। वह रिवाज आजतक चला आ रहा है। वह सेना गयी उसकी जरुरियात नहीं रही, परन्तु रिवाज आजतक जैसेंका वैसा रहा है। इस समय नकली धनुष्यबाण देते हैं। प्राचीन कालमें असली देते थे।

इस रिवाजसे भी पता लगता है कि पुरोहित शस्त्रअस्त्रोंका संग्रह करके अपने पास रखते थे और समयपर सैनिकोंको देते थे। रामायणमें हम देखते हैं कि ऋषियोंके आश्रमोंसे शस्त्रास्त्र रामचन्द्रको मिले हैं। ऋषियोंने शस्त्रास्त्र निर्माण भी किये थे, जो रामचन्द्रको प्राप्त हुए थे।

इससे स्पष्ट होता है कि वैदिक ऋषि सेनापतिका कार्य, युद्धकी तैयारी, सेना-संचालन, राष्ट्रके अभ्युदयके कार्य करनेकी शिक्षा गुरुकुलोंमें प्राप्त करते थे और राजपुरोहित बनकर राष्ट्रसुधार भी कर सकते थे। अर्थात् वेदमें यह राष्ट्रके अभ्युदय करनेकी विद्या है। हमें उचित है, कि वह हम देखें और अपनावे।

आज अपने शरीरको पीप–विष्टा–मूत्रका गोला माननेकी प्रवृत्ति हैं। पर वेद इसी शरीरको दिव्य ऋषियोंका आश्रम करके वर्णन कर रहा है, देखिये—

**सप्त ऋषयः प्रतिहिताः शरीरे सप्त रक्षंति सदं अप्रमादम्।**
**सप्तापः स्वपतो लोकं ईयुः तत्र जाग्रतो अस्वप्नजौ सत्रसदौ च देवौ ॥**
( वा. यजु. ३४।५५ )

१ प्रत्येक शरीरमें सात ऋषि रहे हैं। २ ये सात ऋषि इस यज्ञशालाका प्रमाद न करते हुए रक्षण करते हैं। ३।४ जब ये सात नदियाँ सोनेवालेके स्थानको वापस आती हैं, तो उस समय, वहाँ न सोनेवाले और सदा इस यज्ञशाखामें रहनेवाले दो देव जागते हैं।

यह वर्णन इस शरीरका है। इस शरीरमें सात ऋषि तपस्या करनेके लिये बैठे हैं। 'ऋषि' का अर्थ '**ऋषिर्दर्शनात्**।' दर्शन करनेवाले, देखनेवाले है। दो आंख, दो कान, दो नाक और एक मुख ये सात ऋषि बाह्य जगत्को देखनेवाले हैं। वे देखते हैं इसलिये वे ऋषि कहलाते हैं। इनके नाम भी ऋषि ही हैं—

**इमावेव गौतमभारद्वाजौ अयमेव गौतमोऽयं भरद्वाजः। इमावेव विश्वामित्र-जमदग्नि अयमेव विश्वामित्रोऽयं जमदग्निः इवामेव वसिष्ठकश्यपौ अयमेव वसिष्ठो, अयं कश्यपो, वागेव, अत्रिः वाचा ह्यन्नमद्यतेऽत्ति हे वै नामैतद्यदत्रि-रिति सर्वस्य अत्ता भवति।** ( बृ. उ. २।२।४ )

'सीधा कान गौतम है और बाया कान भरद्वाज है। सीधा आंख विश्वामित्र और बाया आंख जमदग्नि है। दाया नाक वसिष्ठ है और बायां नाक कश्यप है।

और वाणी अत्रि है। क्योंकि मुखसे अन्न खाते है। जो खाता है वह अत्रि है। अत्ति ही अत्रि है। '

गौतम, भरद्वाज, विश्वामित्र, जमदग्नि, वसिष्ठ, कश्यप और अत्रि ये सात ऋषि अपने सिरमें सात इन्द्रियोंके रूपोंमें हैं। ये बाहरके विश्वको देखते हैं। आंख देखते हैं, कान सुनते हैं, नाक सूंघता है, मुख अन्न खाता है अर्थात् ये बाहरसे ज्ञानका अनुभव लेते हैं। अर्थात् यह शरीर ऋषिओंका आश्रम है। ऋषिओंके आश्रमकी कल्पना कितनी उच्च और परिशुद्ध है, इसका विचार कीजिए। और उसके साथ पीपविष्टा–मूत्रका गोला यह शरीर है, यह कल्पना रखिये। और कौनसी कल्पना आदरणीय है वह देखिये।

इसी मंत्रमें सात नदीयाँ सोनेवालेके लोकमें जाकर मिलती है, ऐसा कहा है। ये सात नदियाँ वे ही सात इन्द्रियां हैं। सब नदीओंका यह पवित्र संगम है। वह कल्पना कितनी तेजस्वी है। अच्छी है।

इसी मन्त्रमें '**तत्र जाग्रतो अस्वप्नजी सत्रसदौ च देवौ**।' इस यज्ञभूमीमें दो देव जागते रहते हैं। यज्ञके रक्षणका कार्य कर रहे हैं। वे न सोते हुए पहारा दे रहे हैं। इस यज्ञका रक्षण करनेवाले वे दो देव 'प्राणअपान' हैं। अन्य इन्द्रियोंके समान वे विश्राम नहीं करते। परन्तु सतत शरीरको जीवन देनेका कार्य वे करते हैं।

( १ ) सप्त ऋषिओंका आश्रम, ( २ ) सप्त नदिओंका पवित्र संगम, ( ३ ) दो देवोंका जागता रक्षणकार्य, ये तीनों वैदिक कल्पनाएं कितनी पवित्र है, वे देखिये। तथा—

**तिर्यग्बिलश्चनस ऊर्ध्वबुध्नः तस्मिन् यशो निहितं विश्वरूपं।**
**तत्रासत ऋषयः सप्त साकं ये अस्य गोपा महतो बभूवुः॥**

१ ऊपर जिसका नीचला भाग है, ऐसा तिरके मुखवाला एक लोटा है। २ इसमें विश्वरूप यश रखा है। ३ यहाँ सात ऋषि साथ साथ बैठे हैं। ४ वे सात ऋषि इस बडे विशाल शरीरके रक्षक हैं।

इस मन्त्रमें भी सप्त ऋषि इस मस्तकमें साथ साथ बैठे हैं, ऐसा कहा है। ये पूर्वोक्त आंख, नाक, कान, मुख वे ही हैं। वे ऋषि यहाँ तपस्या कर रहे हैं। इस मस्तकमें विश्वरूपी यश भरा है। यही मस्तिष्क और मगज है। इसमें जितना विश्वका रूप भासमान होता है, इतना ही विश्व उसके लिये रहता है। इसमें जो ये सात ऋषि हैं, वे इस शरीरके रक्षक हैं।

यह मस्तिष्कमें जो मगज है उसका उत्तम वर्णन है। यह सिर नीचे तिरचा मुख करके रखा हुआ लोटा है। यह शरीररूपी देवोंका मन्दिर है और इस मन्दिरपर वह 'कलश' रखा है। इस शरीरको देवोंकी नगरी कहा है। देखिये—

अष्टाचक्रा नवद्वारा देवानां पूरयोध्या ।
तस्यां हिरण्ययः कोशः स्वर्गो ज्योतिषावृतः ।। ३१ ।।
तस्मिन् हिरण्यये कोशे त्र्यरे त्रिप्रतिष्ठिते ।
तस्मिन् यद्यक्षं आत्मन्वत् तद् वै ब्रह्मविदो विदुः ।। ३२ ।।
प्रभ्राजमानां हरिणीं यशसा संपरीवृताम् ।
पुरं हिरण्ययीं ब्रह्मा विवेशापराजिताम् ।। ३३ ।। ( अथर्व. १०।२ )

१ आठ चक्र यहाँ लगे हैं और जिसमें नवद्वार हैं ऐसी यह देवोंकी पुरी अयोध्या है।

इस शरीरके पृष्टवंशमें मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूरक, सूर्य, अनाहत, विशुद्धि, आज्ञा और सहचार ये आठ चक्र हैं। वे बडे शक्तिके केंद्र हैं। इनपर मनकी एकाग्रता करनेसे विशेष शक्ति प्राप्त होनेका अनुभव आता है। यह आठ चक्रों व नवद्वारोंवाली अयोध्या नगरी यह शरीर ही है। इसमें सब चक्र पृष्टवंशमें हैं। और नवद्वार दो आंख, दो कान, दो नाक, एक मुख मिलकर सात हुए और गुदद्वार और मूत्रद्वार मिलकर नवद्वार हुए। इसमें नाभि और ब्रह्मान्ध्र ये दो मिलाये तो ग्यारह द्वार होते हैं। इसका वर्णन ऐसा उपनिषदोंमें आता है—

पुरमेकादशद्वारं अजस्य अवक्रचेतसः । ( कठ उपनि. )

' ग्यारह द्वारोंकी नगरी अजन्मा आत्माकी है। ' पूर्वोक्त वर्णनमें यह वर्णन भी देखने योग्य है। यह जीवात्माकी नगरी है।

२ इस शरीरमें सुवर्णके समान तेजस्वी कोश है, वही तेजसे भरपूर भरा स्वर्ग ही है।

अर्थात् इस शरीरमें ही हृदयमें स्वर्ग है। जिसमें ये सातों ऋषि उत्तम तप करते हैं, वे संयमी और निग्रही रहते हैं, उनका अंतःकरण तेजस्वी स्वर्ग है। परन्तु जिनके ये इन्द्रिय असंयमी और अनिग्रही होंगे, वे पतित होंगे। अर्थात् हम अपनी साधनासे हमारा स्वर्गधाम यहीं बनाते हैं और जो साधना नहीं करते उनका नरकस्थान भी यहीं होता है। इस तरह हम अपना स्वर्ग बनाते हैं। यह सब तपस्वी जीवनपर अवलंबित है।

३ उस तीन अरोंवाले, तीन सहारोवाले सुनहरी कोशमें जो आत्माके साथ यक्ष रहता है, उसको ब्रह्मज्ञानी ही जानते है।

अर्थात् इस हृदयस्थानमें आत्मा और परमात्मा रहते हैं जिसको ब्रह्मज्ञानी जानते हैं। यह स्थान आत्माके रहनेका है।

४ दुःखका हरण करनेवाली तेजस्वी यशसे घिरी अपराजित पुरीमें ब्रह्मा प्रवेश करता है।

इस मन्त्रमें भी आत्मा, ब्रह्मा आदिका प्रवेश वर्णन किया है और यह देवोंकी नगरी है। अर्थात् देवताएं इस नगरीमें रहती है ऐसा कहा है। अर्थात् वह मनुष्य शरीर देवोंकी नगरी है। इसमें सब देव रहते हैं।

देवोंकी नगरी पवित्र रहती है। ऋषिओंका आश्रम पवित्र होता है। यह वेदका वर्णन शरीरकी पवित्रताका वर्णन है।

हमारा धर्म **' यतो अभ्युदय-निश्रेयससिद्धिः स धर्मः '** जिससे अभ्युदय और निःश्रेयसकी सिद्धि होती है, उस अनुष्ठानका नाम धर्म है। जहाँ सच्चा धर्म है वहाँ ऐहिक अभ्युदयकी सिद्धि होनी ही चाहिये।

**विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह। अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥**
( वा. यजु. ४०।१४ )

' आत्मज्ञान और प्राकृतिक विज्ञान इन दोनोंको जो जानता है, वह प्राकृतिक विज्ञानसे ऐहिक दुःख दूर करके आत्मज्ञानसे अमरत्व प्राप्त करता है।' यह वैदिक मार्ग है। यह सत्य मार्ग है। सत्यधर्म यही है। प्राकृतिक विज्ञान उपयोगी है, इससे अभ्युदयकी सिद्धि होती है। यदि प्राकृतिक विज्ञानका आश्रय नहीं किया तो ऐहिक दुःख दूर नहीं हो सकते। वही भारतमें हो गया है।

विद्या आत्मविद्याका नाम है। और अविद्या प्रकृति-विद्याका नाम है। दोनोंके सामंजस्यसे उन्नति है। भारतने गत हजार वर्षोंसे अभ्युदयसाधक प्रकृतिविद्याकी ओर दुर्लक्ष किया, इस कारण राष्ट्रीय पारतंत्र्य, दासता आदि दुःख भोगने पडे हैं।

वेद और उपनिषदोंमें परा विद्या और अपरा विद्या इन दोनोंका समन्वय कहा है। जिनका अर्थ विद्या और अविद्या, आत्मविद्या और प्रकृतिविद्या है। अविद्याका अर्थ अज्ञान नहीं है। प्रकृतिविद्या है।

परा और अपरा वे दोनों विद्याएं मनुष्यको प्राप्त करनी चाहिये। वेदमें कहा है—
**अन्धं तमः प्रविशन्ति ये अविद्यामुपासते। ततो भूय इव ते तमो य उ विद्यायां रताः ॥**
( वा. यजु. ४०।१२ )

जो प्रकृतिविज्ञानकी ही केवल उपासना करते हैं वे अन्धकारमें जाते हैं, परन्तु जो केवल आत्मविद्यामें ही रमते है, वे उससे भी गहरे अन्धेरेमें जाते हैं।

यह वेदकी शिक्षणपद्धति है। प्रकृतिविज्ञानकी केवल पढाई जो करते हैं वे दुःखी होते हैं, परन्तु जो केवल आत्मज्ञानमें ही रमते हैं, वे उससे भी अधिक दुःखमें जाते हैं। इसलिये आत्मज्ञान और प्रकृतिविज्ञानकी पढाई समप्रमाणसे राष्ट्रमें होनी चाहिये।

यह वेदका सन्देश कितना महत्त्वका है, इसका विचार पाठक कर सकते हैं। भारतकी शिक्षाप्रणालीमें इन दोनोंकी ज्ञानविज्ञानकी-पढाई होनी चाहिये। तथा—

**अन्धं तमः प्रविशन्ति ये असंभूतिं उपासते।**
**ततो भूय इव ते तमो य उ संभूत्यां रताः ॥ ९ ॥**
**संभूतिं च विनाशं च यस्तद्वेदोभयं सह।**
**विनाशेन मृत्युं तीर्त्वा संभूत्यामृतमश्नुते ॥ ११ ॥** ( वा. यजु. ४० )

जो व्यक्तिवादकी ही केवल उपासना करते हैं वे अन्धकारमें जाते हैं, तथा जो समाजवादमें ही केवल जाते हैं, वे उससे भी गहरे अन्धेरेमें जाते हैं। समाजवाद और व्यक्तिवाद ये दोनों साथ साथ उपयोगी हैं, ऐसा जो जानते हैं, वे व्यक्ति उपासनासे दुःखको दूर करके समाज–उपासनासे अमरत्व प्राप्त करते हैं।

व्यक्ति मरता है पर समाज अमर रहता है। हिंदु व्यक्ति मरता है पर हिंदुस्थान अमर रहता है। '**संभूति**' संघभावसे रहना, संघभावकी उपासना करना यह एक विचार धारा है और ( **अ–संभूति** ) व्यक्तिभावकी उपासना करना दूसरी विचार-धारा है। व्यक्तिस्वातंत्र्य और समाजवाद, वे दो वाद हैं। वैदिक समयमें उपरके मन्त्रोंका भाव देखनेमें स्पष्ट पता लगता है, कि उस समय दोनो प्रकारके जीवनोंका सामंजस्य उन ऋषिओंने साधन किया था। वैयक्तिक जीवनसे व्यक्तिकी व्यक्तिका साधन वे करते थे और समष्टि जीवनसे वे सुसंघटित रहते थे।

गायत्री मन्त्रमें—

**भर्गो देवस्य धीमहि, धियो यो नः प्रचोदयात् ।**

'परमेश्वरके दुःख विनाशक तेजका हम ध्यान करते हैं, जो हम सबकी बुद्धि-योंको प्रेरणा करता है।' इस गुरुमन्त्रमें सामुदायिक उपासना है। यह संघीय जीवनकी सूचना है। इस तरहकी उपासनासे संघटित जीवन करके सांघिक बल बढाना और वैयक्तिक उन्नतिके साधनके कर्मोंसे व्यक्तिका करना यह ध्येय वैदिक समयके ऋषियोंके सन्मुख था।

व्यक्तिवाद और समाजवादका समविकास इस रीतिसे होता था। आज व्यक्ति-स्वातंत्र्यवादी व्यक्तिका स्वातंत्र्य बढाकर संघभाव न रहनेसे दुःखी होते हैं, जैसे भारतीय दुःखी हो गये हैं। व्यक्तिका पावित्र्य बढाते बढाते यहाँ नाना फिरके हो गये और संघशक्ति हिंदुओंमें नहीं रही। यह व्यक्तिवादकी पराकाष्टाका दुष्परिणाम है।

यूरोपमें, जर्मनीके राष्ट्रीय समाजवादके तथा रूसके साम्यवादमें व्यक्तिसत्ता करीब नष्ट हो गयी, इस तरह व्यक्ति दब गई और समाजवादकी संघशक्ति पर-मावधितक बढ गयी।

इस रीतीसे व्यक्तिवाद अत्यधिक बढनेसे भी संघशक्ति क्षीण होनेसे दुःख है और संघवाद अत्यधिक बढनेसे भी व्यक्ति दब जानेके कारण हम कहते हैं कि वैदिक समयका व्यक्तिविकास और संघटनाके समविकासका तत्त्व ही श्रेष्ठ है। इस तरह हम यदि ये वेदके सिद्धान्त अपनायेंगे तो हमें वह वैदिक जीवन अधिक सुखी करेगा ऐसा ही निःसन्देह प्रतीत हो रहा है।

इसलिये हमें वेदकी ओर झुकना चाहिये वही इस परिषद् द्वारा जनताको बताना है।

जगत्के विषयमें जो दुःखमयताका भाव है वह वेदमें नहीं है, मानवी शरीरके विषयमें वेदका मत श्रेष्ठ है, अध्यात्मज्ञान और भौतिकविज्ञानका समन्वय करनेका वेदका कथन आज भी उपयोगी है, व्यक्तिस्वातंत्र्य और सांघिक बलके सामंजस्यके

संबंधके वेदके विचार निःसन्देह हितकारक है । आज हमारी उन्नति रुकी है इसका कारण यह है कि हम वेदविरुद्ध मत अपनाकर बैठे हैं।

आप सब इस विषयका विचार करेंगे और वेदमुद्रण, वेदज्ञान प्रसार करनेका तथा वेदप्रचारक तैयार करनेकी स्थायी योजना आप बनायेंगें ऐसी मैं आशा करता हूँ।

इस परिषदके अध्यक्ष श्री बाळशास्त्री हरिदास वेदविद्याके उत्तम ज्ञाता हैं, तथा उनके अनेक स्थानपर हुए उत्तम व्याख्यान वेदविद्याके व्याख्यान अनेक पुस्तकोंके रूपमें प्रसिद्ध हुए हैं । स्वागतसभाने एकमतसे उनको इस वैदिकधर्म-परिषदके लिये अध्यक्ष स्वीकार किया है । आपकी शुभ संमतिके लिये इनका नाम आपके सामने रखता हूँ। ”

गायत्री-महायज्ञाच्या पूर्वतयारीत पंडितजींनी गायत्रीमंत्राचे जपानुष्ठान सर्व देशभर संघटित केले आणि त्या समष्टि-जीवनाची सांगता संस्कृत संमेलन व वैदिक-धर्मपरिषद् भरवून केली. 'जुने ठेवणे मीपणे ते कळे ना' हे पंडितजींनी जसे पटविले, तसेच संस्कृतपरिषदेच्या भाषणांत पंडितजींनी एकजिनसी एकराष्ट्रयित्वासाठी भर द्यावयाच्या उपायाचा उहापोह करून संस्कृत ही राष्ट्रभाषा होऊ शकेल हे प्रमाणसिद्ध दाखवले. भारताचे एकराष्ट्रीयत्व एकभाषा-लिपीने सुगम होईल हे सुचवून वैदिक धर्मपरिषदेत पंडितजींनी व्यष्टि-समष्टि-समन्वयी जीवनाची म्हणजेच राष्ट्रहित वा समाजकल्याण हे श्रेष्ठ मानून मन, मेंदू व मनगट याच्या जोरावर व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगावयाचे, पण ते समाज-समर्पण बुद्धीने चालवावयाचे आहे, हे वैदिक जीवनाचे पुण्य रहस्य आचारशुद्ध राखण्यास आवाहन केले; कारण जीवन हाही एक महा-यज्ञच आहे.

: २० :

# धन्य संसार जाहला

**लाहोरास पंडितजी** आपला धंदा थाटून होते, त्यावेळी त्यांच्या सत्यप्रिय सचोटीने ते सातवळेकर ऐवजी "सत्य वेलकरजी" असे प्रसिद्ध होते. त्यातून एक चमत्कार आणखी निर्माण झाला. त्यांना "सत्ता ल्वॅकरजी" असें आडनाव देऊन एकाने पत्र धाडले होते. पण कला, चळवळ आणि सचोटीचा धंदा यामुळे पंडितजींना ते पत्र बिनचूक मिळाले. पंडितजी असे प्रसिद्ध तर त्यांचे बंधु सितारामपंत फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असल्यापासून "वज्रहनुमान" वस्ताद म्हणून प्रसिद्ध असत. पुढे ते अमेरिकेत रसायनशास्त्रामध्ये डॉक्टरेट मिळवून आले व हैदराबादच्या विवेकवर्धिनी संस्थेचे सूत्रधार झाले. पंडितजी व डॉक्टर सातवळेकर यांच्या मधील भाऊ श्रीकृष्णराव ऊर्फ सखारामपंत कोलगावचे वडिलार्जित घर पाहून असत. ते १९६६ च्या मार्चातच दिवंगत झाले. तरीही एकंदरीने पंडितजींच्या व्यापाचा व संसाराचा विचार करता पंडितजींचे जीवन समाधानीच होय असे म्हटले पाहिजे.

पंडितजींच्या अफाट कार्यात मोठाच हातभार त्यांच्या गृहलक्ष्मी सौ. सरस्वतीबाईंचा आहे. त्यानी हाडाची काडे करून पतिसेवा केली. पंडितजी बावीस वर्षांचे असतांना ( १८८९ ) म्हणजे मुंबईस आर्ट्स् स्कूलमध्ये जाण्यापूर्वी पंडितजींचा विवाह झाला होता. तेव्हापासून पंडितजींना मिळालेली धर्मपत्नीची साथ तुलनेसाठी कस्तुरबानी महात्मा गांधीना दिलेल्या साथीची आठवण देते. पंडितजी सांगतात की—

"माझा विवाह झाला तो समय असा होता की नवऱ्याने वधू पहावयाची नाही व वधूवरास परस्परांचे दर्शन विवाहानंतर झाले तर होई. आधी कोणाचीही संमति कोणीही विचारीत नसत. अशी संमति विचारणे हे सभ्यतेच्या विरुद्ध

समजले जात असे. विवाह ठरला एवढेच मला समजले. मी मिळवता झाल्यावर विवाह करावा असे मला वाटत होते. पण मला बोलणे शक्य नव्हते.

" दोनही बाजूच्या वडील माणसानी विवाह ठरवला. मुहूर्त ठरला. सकाळी पुण्याहवाचन झाले. सात मैलावर माणगाव गावात साधल्यांच्या घरच्या मुलीशी विवाह व्हावयाचा होता. या घराण्यात संत टेंबेस्वामी दत्तभक्त झाले असल्याने साधले घराण्याचा मान वाढला होता.

" मला घोडयावर बसवले व बाकी माणसे बहुतेक चालत होती. बायकाही चालतच होत्या. त्यावेळी सात मैल चालण्याचे आम्हास काहीच वाटत नव्हते. संध्याकाळी उतरण्याच्या ठिकाणी उतरलो. संध्याकाळी विवाह झाला. रात्री जेवण झाले. इतके होण्यास रात्रीचे बारा वाजले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी आमची मंडळी परत यावयास निघाली. घरी परत आम्ही सकाळी १०–१०॥ वाजता पोचलो. मला घोडयावर बसता येत नव्हते. त्यामुळे तोल जाई व जवळचे लोक हसत. खेडेगावचे रस्तेही उंच, सखल, चढाव असे अडचणींचे होते. त्यामुळे जाताना व येताना घोडयाचा प्रवास मला नकोसा झाला. पण घरच्या मंडळींची हौस होती. त्यामुळे माझा इलाज नव्हता. मी ७ मैल सहजच चाललो असतो. पण नवऱ्याने घोडयावरूनच गेले पाहिज.

" येतेवेळी मैलभर सपत्नीक घोडयावर बसावे लागले होते. हे तर फारच कठीण होते. नवरदेव घोडयावरून पडू नये म्हणून दोन बाजूला दोघे पार्श्वरक्षकही होते.

" जवणावळ बरीच मोठी, म्हणजे हजार पाने झाली होती. पक्वान्ने त्यावेळी नसत. वडे व काकवी, तसेच गुळाची खीर ही पक्वान्न त्यावेळी असत. साखर दिसत नसे. गुळाचे खाणे असे. कोणी प्रवासातून आला तर गूळ व पाणी देत. चहा व कॉफी माहीतही नव्हती.

" यावेळी पत्नीचे वय १२ वर्षांचे होते. घरकाम करीत असे. येथे येऊनच ती लिहावयास व वाचावयास शिकली.

" मी मुंबईस चित्रकलेचे शिक्षण घेत असे व वर्षातून दोन सुट्टया असत. त्यावेळी घरी जात असे. माझे आई व वडील परस्पराशी कधी बोललेले मी ऐकले नाही. एकदा मामानी येऊन यानी परस्पराशी बोलावे अशासाठी मध्यस्थी केली. त्यावर वडील म्हणाले– ' आमच्या वडिलानी असे कधी केले नाही. यासाठी आम्हास ते पसंत होणार नाही. ' हे त्यांचे बोलणे मी ऐकले आहे.

" जथे आईवडील बोलत नाहीत तेथे सून व मुलगा यांचे बोलणे कसे होणार ?

*

लहानपणापासूनच्या शिस्तीने आम्हालाही कधी एकमेकाशी बोलावे असे वाटत नसे व तसे धैर्यही होत नसे. कधी कोणी बोलले तर टवाळी निंदा गावभर होत असे.

" ४।५ वर्षांनी पहिला पुत्र जन्मला. त्याचे नाव नारायण होते. वडिलांच्या समोर मुलगा घेऊन त्यास हिंडवणे शक्यच नव्हते. काय भाषण होईल ते रात्री व तेही अगदी हळू होई. या प्रकारच्या प्रतिबंधाची कल्पना सध्याच्या तरुणास कधीही येणे शक्य नाही.

" पुढची दोन मुले पंजाबात झाली. आम्ही हैदराबादला रहावयास गेल्यावर आमचे परस्पराशी भाषण होण्यास सुरवात झाली. मी सहकुटुंब मुंबई, हैदराबाद, पिठापूर, जयपूर, गुरुकुल, पंजाब, औंध व सध्या पारडी येथे राहिलो. घरच्या व्यवस्थेत कुटुंबाच्या दक्षतेमुळे मला कधीही त्रास पडलेला नाही.

" प्रत्येक ठिकाणच्या स्थानत्यागाचेवेळी मी आल्यूमिनियमची एकात एक बसणारी ८।१० नवी पातेलीच घेऊन जात असे. तेवढ्यात आमच्या नव्या संसारास प्रारंभ होत असे व आवश्यकतेनुसार भांडीकुंडी वाढत. पण ती जेथल्या तेथेच रहात. पुढच्या मुक्कामी नवा संच असे. "

**धकाधकीचा मामला । सोसवेना अशक्ताला ॥**

अशा आपल्या जीवनिकेत आपली सहधर्मचारिणी सावलीसारखी आपल्या मागे राहिली याची परिपूर्ण जाणीव पंडितजींना आहे. ते लिहितात—

" उत्तम गृहिणी होण्याकरता जे गुण लागतात ते सर्व माझ्या पत्नीमध्ये आहेत. अशी भार्या मला मिळाली म्हणून स्वतःला मी भाग्यवान् समजतो. माझ्या आयुष्यात एवढे चढउतार आले; पण या सर्व प्रसंगातून मला सुख कसे देता येईल याचाच तिने विचार केला. या सर्व गोष्टींचे जेव्हा स्मरण होते, तेव्हा माझ्या मनात तिच्याविषयी आदरपूर्वक कृतज्ञता उत्पन्न होते. "

महाराष्ट्राची उंची ज्यांच्यामुळे मोजावी अशी काही नररत्ने महाराष्ट्राने भारताच्या सेवेला विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून दिली, त्यात गाढ विद्वत्ता, थोर तपस्या, दीर्घोद्योग आणि श्रेष्ठ चारित्र्य यांचा आदर्श असणारापैकी पंडितजी सातवळेकर आहेत. त्यांच्याकडून आपल्या सुखदुःखाच्या वाटेकरणीचा वरीलप्रमाणे होणारा गौरवही " **यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः ।** " या वचनाच्या सार्थकतेची ग्वाही आहे.

आपल्या साडेसहा तपांच्या संसाराचे सिंहावलोकन करून पंडितजींच्या धर्मपत्नी सौ. सरस्वतीबाई सांगतात की —

" आमच्या संसारात अनेक लहानमोठ्या, बऱ्यावाईट, सुखद-दुःखद घटना घडल्या. त्याचबरोबर खुद्द त्यांच्याही स्वभावात अनेक परिवर्तने घडली आहेत. ती पाहून मलाही आज आश्चर्य वाटत आहे. आजच्यासारखा शान्त स्वभाव त्यांचा पूर्वी नव्हता. त्यांच्या तापटपणाची नेहमी एक प्रकारची भीति वाटावयाची.

" लाहोरला आम्ही असतानाची गोष्ट. त्यावेळी वसन्त आणि माधव ही आमची अपत्ये अनुक्रमे अंदाजे ७।४ अशा वयाची होती. दोन्ही मुलांना सांभाळण्यासाठी उत्तर हिंदुस्थानातील छोकरा आम्ही नोकरीस ठेवून घेतला होता. त्याची ह्यांच्या ( पंडितजी ) वर इतकी भक्ति की जोपर्यंत हे घरी येऊन जेवत नाहीत तोपर्यंत तो जेवत नसे. ह्यांच्या फोटोग्राफीच्या व्यवसायामुळे जेवण्याझोपण्याला काही काळवेळ नसे. एकदा १–१॥ पर्यंत हे जेवायला आले नाहीत. त्या छोकऱ्याला बहुतेक भूक लागली असावी. त्याने चणे–कुरमुरे खाल्ले व थोडे बरोबरच्या वसंताला दिले. हे यांनी येता येता बरोबर पाहिले आणि गरजले– ' तू आताच्या आता नोकरी सोडून चालता हो. तुला हजारदा सांगितले, त्या मुलाला काही खायला देत जाऊ नको म्हणून ! मग का दिलेस ? आता तू येथून निघून गेल्याशिवाय, मी जेवणार नाही. ' हे शब्द ऐकून बिचारा ढसढसा रडू लागला. त्याने क्षमा मागितली. पण छे ! हे काही पालटेनात ! शेवटी मी त्या मुलाला सांगितले की– ' तू यावेळी येथून निघून जा. पुनः उद्या नित्याप्रमाणे ये. ' दुसऱ्या दिवशी यांचा राग पूर्णपणे गेला आणि तो छोकराही नित्याप्रमाणे कामावर आला.

" मी त्यांच्यामानाने कितीतरी पटीने कमी आणि खेडवळ. पण या गोष्टीचा चुकूनही त्यांनी उल्लेख केला नाही. उलट तत्परतेने अनेक गोष्टी सांगितल्या, दाखविल्या. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सबंध भारत त्यांनी मला व मुलांना फिरविले. वस्तुतः ' ब्रह्मर्षि ' प्रमाणे संसार करूनही ते त्यापासून अलिप्त ! परंतु मुलांना व मला त्यांनी काहीही कमी पडू दिले नाही. अंगिकारलेल्या कार्यात ते इतके निमग्न होते की खर्चास देण्यापलिकडे ते घरातील दुसरे काहीच बघू शकत नव्हते. ती सर्व जबाबदारी आणि भरीस पाहुण्यांची सरबराई मलाच पत्करावी लागे.

" आमचा सारा परिवार उत्तम, शिक्षित आणि सुव्यवस्थित आहे. स्वतः यांचे शरीरस्वास्थ्यही उत्तम आहे. याचे प्रमुख कारण यांचा नियमितपणा. जीवनातील यांच्या नियमितपणाचा फायदा यांना आणि यांच्या संततीला योग्यप्रमाणात मिळत आहे. तसे पाहिले तर यांचे जीवन अतिशय साधे. आहार साधा. पण व्यायाम मात्र नियमित, त्यात जराहि कधी फरक पडला नाही. बाकी खाण्यापिण्याच्या बाबतीत त्यांना कोणताच चोखंदळपणा नाही. समोर येईल ते बिनतक्रार आणि प्रेमळपणे खावे, इतकेच त्यांना माहीत. हेच का केलेस आणि तेच का केले नाहीस,

असे शब्द मी त्यांच्या तोंडून आजमितीस कधी ऐकल्याचे आठवत नाही. भोळे पणाचा फायदा अनेकजण घेऊन यांना व्यवहारात फसवतात. अशावेळी मी काही म्हणू लागले तर म्हणतात– 'तुला काही कमी आहे का ? 'आणि ते खरे आहे. औंधापेक्षाही चांगल्या अशा सर्वांगसुंदर स्थानी आम्ही आज रहात आहोत.

" येथे ( पारडीस ) आल्यापासून मात्र पाहुण्यांची वर्दळ फारच वाढली आहे. त्यांची सरबराई, द्रौपदीची थाळी हाती असती तरी अपुरी पडती, अशी करता करता माझा जीव मेटाकुटीस येतो. केव्हा केव्हा यांच्याशी मी याबाबत त्रागा करते. तेव्हा हसत हसत माझी समजूत घालीत म्हणतात– ' ब्राह्मणभोजन घालणे काही आम्हाला शक्य झाले नसते. अनायासे ते तुझ्या हातून घडते आहे. पण त्यात काय वाईट ? खरे म्हणजे वर तू त्याना दक्षिणा दिली पाहिजेस. ' आता यावर मी काय बोलणार ?

" आपल्यासाठी कोणाला कष्ट झालेले त्यांना आवडत नाहीत. औंधचे राजे यांना अतिशय मानीत. कधी कधी दरबारातील सेवेसाठी राजे यांना बोलावीत. कदाचित् राजे पूर्वी आले आणि हे मागाहून थोडे उशिरा सभास्थानी गेले तर राजे स्वतः उभे राहून यांचा आदर करीत. असे एक– दोनदा घडल्याचे यांच्या लक्षात येताच, ठरलेल्या वेळेपेक्षा ५–१० मिनिटे पूर्वीच सभास्थानी जाण्याचा नियम यांनी केला. एवढे विद्वान् असूनही त्यांना मान–अपमान या गोष्टीबद्दल काही वाटत नाही. आणि यामुळेच ते आपल्या कार्यापासून विचलित होऊ शकले नाहीत. त्यांचा एक सिद्धांत आहे. ' आपले काम करीत रहा. ज्याना तुमच्या कामाची आवश्यकता भासेल ते स्वतः तुमच्याकडे येऊन तुमच्या कार्याचे मूल्यमापन करून तुमचा सन्मान करतील. '

" औंधास आम्ही संसार थाटला त्यावेळी घरी मी, माझी मुले आणि आले गेले पाहुणे. हे सतत दौऱ्यावर आपल्या कामासाठी. कुठे जातात हे कधी मला सांगत नसत. पण कधी कोणत्या दिवशी येणार हे मात्र नक्की सांगत व त्याप्रमाणे न चुकता येत असत.

" आजपर्यंत आम्हाला कधी काही कमी पडले नाही. औंधापेक्षा पारडीला आल्यावर आमचे घर, बागबगीचा, आमराई, सर्व सुंदर व्यवस्था झाली. अतिथी म्हणजे यांचे परब्रह्म. त्याने आमचेघरी पाऊल टाकले की झाली यांची अतिथिसेवा सुरू ! आंघोळीला पाणी, हात धुवायला पाणी, पुसायला टॉवेल... सर्व घेऊन हे आपले सिद्धच. पाहुणा चहाबाज असला की त्याची फजिती. हे कधी चहाकॉफीला स्पर्श करायचे नाहीत ! मग दुसऱ्याना ते चहा घेता का म्हणून कसे विचारतील ? पण मग एकादा पाहुणा खमंग भेटतो. ' मला चहाच बरा ' म्हणतो. मग मी त्या-

च्या सहाय्याला जाते व चहा देते. एकदा मात्र एक अजब अतिथि भेटले होते आम्हाला.

" ओळखा पाहू ! इतिहासाचार्य राजवाडे. या पाहुण्याची तऱ्हा काही अजबच ! औंधास राजवाडे आमचे घरी आलेले. एवढे बडे विद्वान् म्हणून त्यांची ख्याती. मी रोजच्याप्रमाणें चारी ठाव स्वैपाक केला आणि जेवायला वाढले. पण राजवाड्यानी त्यादिवशी नुसता भातच खाल्ला. घरात फक्त आम्ही दोघेंच. मुलें अगदी लहान. भात किती करणार ? ... म्हणून संध्याकाळच्या जेवणाला मी भात भरपूर टाकला. वाढला. पण हे महाशय भेटले अजबच ! ते म्हणाले– 'छे ! यावेळी मी फक्त पोळ्याच खातो; भात मुळीच नको.' आता सांगा, किती सुग्रण गृहिणी असलीं तरी अशा ऐनवेळी काय करणार ? मग त्यांनी रोज भात, दही, दूध यावरच हात मारायला सुरवात केली. हे खाणारे आणि आमचे हे खायला घालणारे ! जमलाच बेत. मग मी तरी माघारी कशाला घेऊ ?

" पुढे राजवाड्यांना सकाळसंध्याकाळ इतका भात पचला नाही. पोटात मुरडू लागले. तरी पण पीळ जातो की काय ? यांना म्हणाले—

' पंडितजी, माझ्या पोटात वीष गेले असावे ! कसे गेले कोणास ठावुक ! ' आता माझी गच्छंति आली. डॉक्टरानी भात अजिबात खायचा नाही म्हणून सांगितले. पण संध्या काळी पानात भात दिसताच, गेले विसरून सगळे पथ्यपाणी.

" डाळ शिजायला जरा वेळ लागे. पण जेवायला जरा उशीर झाला की राजवाड्यांचे माथे भडकलेच ! त्यांचे तांडव नृत्य सुरू होई. लवकर जेवायला वाढले तरीही मनाला येत नसे ! असे होत गेले तरी हे आपले शांतच. आपल्या अतिथिसेवेत गढलेले ! – माझ्या मामंजीच्या घरीही पाहुणे येत पण असे दुर्वासऋषीसारखे नसत बाई ! यांच्याकडे तर असेच पाहुणे पुष्कळ ! पण हे आपले शांतिब्रह्म !

" **अतिथिदेवो भव** । या उक्तिप्रमाणे ते वागतात. प्रत्येकाला विचारायचे– झाले ना जेवण भरपूर ? अरे, भरपूर खात जा, भरपूर काम करा, लवकर उठता की नाही ! खूप विश्रांति घ्या; खूप खूप खेळा. त्यांच्या दीर्घायुष्याचे तेच रहस्य. तेच सर्वांना प्रेमाने सांगत असतात.

" माणसांचा त्यांना कधीच कंटाळा नाही. मुले खेळोत, दंगामस्ती करोत, त्यांचे काम चालूच असते. भोजनाच्या वेळी मुक्याने जेवणे त्याना पसंत नाही. घर गोकुळासारखे सदा वैभवाने, समृद्धीने भरलेले आहे. त्यातला आनंद ते आपल्या वृद्धापकालीही लुटत असतात.

" अशी आमच्या संसाराची पाऊणशेच्यावर वर्षे गेली. अशीच पुढे ही सौभाग्य-

पणाची अनेक वर्षे जावोत. अशीच मी त्या जगन्माता अंबाबाईच्या चरणी प्रार्थना करीत असते."

सांवतवाडीजवळील माणगावच्या श्री हरिपंत साधले या सुखवस्तु गृहस्थांची तृतीय कन्या काशीताई म्हणजेच पंडितजींच्या सहधर्मचारिणी सौ. सरस्वतीबाई सातवळेकर होत. काशीताई साधले याना दोन वडील बहिणी आऊताई व बनुताई या नावाच्या होत्या आणि बन्धु रामभाऊ साधले. टिळकआगरकरांच्या पिढीपैकी बहुतेकांची लग्ने "अकरा वर्षाच्या मुलीशी झाल्याचा" उल्लेख आगरकरानी एके ठिकाणी केला आहे. पंडितजींच्या पिढीला वधूचे वय बारावर्षापर्यंत झुकले, असे दिसते. सामाजिक स्थितीचा विचार करता, पंडितजींच्या लग्नानंतर दीडदोन वर्षातच "संमतिच्या वयाचा कायदा" झाला, ही गोष्ट लक्ष्यात येते, आणि तरीही पंडितजींच्या "दाम्पत्यसुखाचा ओनामा" पंडितजींनी हैदराबादेस बिऱ्हाड केल्यावरच खऱ्या अर्थाने सुरू झाला. तोपर्यंत "**अस्से माहेर गोड बाई खेळाया धाडिते।**" याचे तरी, मधून मधून का होईना, समाधान लाभले काय ? सौ. सरस्वतीकाकूंचे ऊर्फ काशीताई साधले यांचे तीर्थरूप काशीताईंच्या जन्मानंतर थोड्याच दिवसात गेल्याने, मुलगी चांगल्या पायगुणाची नाही, असे काशीताईंच्या आईचेच मनाने घेतले. मग, मुलीचा राग राग करून, आईने त्यांच्या पालनपोषणाकडे लक्ष दिले नाही ! आईबापांच्या वात्सल्यास अशा तऱ्हेने आचवलेल्या काशीताई ! ! त्यांचे संगोपन मग त्यांच्या आजोळच्या एका बाईनी केले. काशीताई ५।६ वर्षांच्या झाल्या अन् मग त्याना त्यांची वडील बहीण "आवडी" ऊर्फ आऊताई यांनी आपल्या जवळ ठेवून घेतले. तेथे बहिणीच्या हाताखाली व छत्राखाली वागल्यामुळे, त्या बहिणीचा व तिच्या मुलांचा लळा काशीताईंना लागला असल्यास नवल काय ?

लग्न होईपर्यंत त्या बहिणीकडेच होत्या. श्रीपादराव सातवळेकर "**असे पति देवचि ललनाना,**" लाभल्यानंतर, सासरीच त्याना माहेरचे सुख लागावयास सुरवात झाली. नवसासायासाने झालेल्या व लाडात वाढविलेल्या मुलाची बायको व आपली पहिली सून, म्हणून 'मामंजी–सासूबाई' काशीताईंना 'मुली,' म्हणूनच संबोधू लागले. काशीताईंही आपल्या 'मामंजीसासूबाईंना' वडीलमातोश्री सारखेंच मानू लागल्या.

"जमेल ते व झेपेल ते घरकाम करावे, नारळीपोफळीना पाणी द्यावे, मामंजीबरोबर इतरही छोटी कामे करावीत, लहानपणास साजेशा खेळकरपणाने झाडावर चढावे, चिंचा खाव्यात, काजूची बोंडे काढून त्यांचा समाचार घ्यावा आणि मग कौतुकापोटी मामंजींनी रागवावे की– 'अगे, मुलीच्या जातीने असा पोराप्रमाणे धांगडधिंगा घालू नये !' (सौ. सरस्वतीबाईंच्या) जोडीला धाकटा दीर होता, त्यांच्यापेक्षा चार वर्षांनी लहान ! त्यामुळे खूपच खेळावे,

दोघानी मिळून ! जरा धाक काय वाटे तो पंडितजींचा ( श्रीपादरावांचा ) ! अशी ५।६ वर्षे निघून गेली ! त्याना मुलगा झाला. त्याला १-१।। वर्षाचा घेऊन सौ. सरस्वतीबाईंनी कोलगाव सोडले. तेथून त्यांच्या भ्रमंतीला सुरवात झाली. मुंबईला पंडितजी काम करू लागले होते चित्रकलेचे ! तेथे एकदा गेल्यावर, मामंजी व सासूबाईंना भेटायला म्हणून २।३ वेळा कोलगावला केव्हा गेल्या असतील तेवढयाच ! " सासुबाईंच्या हाताखाली लग्नानंतरची आठवण सांगताना त्यांना आता हसू येते ! "

असे सांगून सौ. सरस्वतीकाकूंच्या थोरल्या सूनबाई सौ. लतिकाबाई लिहितात की सरस्वतीकाकू सांगतात ते असे—

" अग, त्यावेळी मला यांच्या पत्रावळीत जेवायाला वाढायच्या सासूबाई ! आतासारखे ताट, ते पण स्टेनलेस स्टीलचे, असते तर ठीक, पण पत्रावळ ती. त्यात जेवणे नको वाटायचं. बरे, मी म्हणायची, पत्रावळी मीच लावणार ना ! मग आणखी एक जास्त लावेन. पण मला त्या उष्टया पत्रावळीत वाढू नका. पण त्यावेळी बायकोने नवऱ्याच्या पानात जेवले पाहिजे, असा रिवाज ! काय करतील मग ?

" कोकणातील पक्वान्ने म्हणजे मोदक, खापरपोळी वगैरे नेहमी करायच्या सासूबाई. पण सूनबाईंना मात्र आवडायची नाहीत ती. लिबलिबित लागायची ती पोळी व मोदकाचा वरचा देठ काढून हळूच पत्रावळीखाली लपवायचा व आतले गूळखोबरे खायचे ! हो, पत्रावळ स्वतःच उचलायची. मग कोणाला कळणार ?

" एका खेडयातून एकदम मुंबईसारख्या शहरात आल्याने ( सौ. सरस्वती-बाईंना ) त्यांना खूपच अवघडल्यासारखे झाले. शिक्षण पण काहीच झाले नव्हते. वय लहान, मुलगा पण लहान. कशाचाच अनुभव नव्हता. पण जिद्द खूप. सर्व स्वयंपाक करून बघायचा. भाकरी, पोळी कोकणात नसल्याने त्या जमायला फार त्रास झाला. पण पंडितजींचा स्वभावच असा की त्यानी कधी एका अक्षराने काहीही म्हटले नाही ! अमुक पदार्थ बिघडला आहे अगर अमुक करावा, ऊँ ! हूँ !! जे पानात पडेल ते खावे उठावे. त्यांचे जेवण झाल्यावर मग जेवताना अगर खाताना आम्हा ( बायका ) ला कळायचे— अरे, आज भाजीत मीठ घालायचे राहून गेले ! आमटी जरा पातळ वाटते ! त्यामुळे मुलाना व नातवंडाना पण स्वयंपाकाला नावे ठेवणे माहीत नाही. अगर विशेष अशा आवडी-निवडी वा नावडी नाहीतच ! यावर सौ. सरस्वतीबाई सांगतात की त्या कधी आजारी पडल्या अगर चटणी वा लोणचे खायचे असले तर पंडितजी म्हणायचे—

'जिभेला लगाम असल्याशिवाय चालतच नाही का ?'

त्या उत्तर द्यायच्या– 'तुमच्या आईने तुम्हाला अमृत पाजले आहे ना ? मग चव, ढव, कशी कळावी ? माझे तसे नाही.'

" मोठ्या अभिमानाने हे सांगत असताना तीन वर्षापूर्वीची ( १९६३ ) आठवण त्यांना झाली. अगदी गहिवरून येऊन त्या म्हणाल्या– ' अग, असे असताना इतक्या वर्षात प्रथमच त्यांनी म्हणावे की जरा लिंबाचे वगैरे लोणचे असले तर मला घाल; चवच नाही तोंडाला ! ' त्यावेळी ती. पंडितजींना बरे नव्हते.

" प्रथमपासूनच पंडितजींनी घरातला सर्व व्यवहार बायकोवर सोपविला होता. अगदी भाजीपाल्यापासून कापडचोपड, लग्नकार्य सर्व त्यांनी ( सौ. सरस्वतीबाईंनी ) केले.

" पंडितजींचे जीवनकार्य वेदानुवादाचे. त्याला सहाय्यक छापखाना ! मग पाहुण्याना तोटा काय ? कोणी त्यांना ( सौ. सरस्वतीबाईंना ) विचारले– काय हो, तुमचे येथे सदा पै–पाहुणे येतात. त्याना काळवेळ, जातपात, लहानमोठे किंवा गरीबश्रीमंत भेद नसतो. त्यांचे सर्वांचे कसे काय करता ? उत्तर काय द्यावे त्यांनी ?– ' माझ्यासारखीच्या हातून काय सहस्र ब्राह्मणभोजन एकावेळी होणार आहे ? आजपर्यंत जे जेवून गेले तेच माझे हातून सहस्रभोजन झाले. ' अशी सोशिक, कर्ती, समाधानी, साध्वी व प्रेमळ पत्नी लाभली म्हणूनच पंडितजी एवढे मोठे कार्य करू शकले.

" मुंबईला आल्यावर जशा त्या ( सौ. सरस्वतीबाई ) स्वयंपाकपाणी शिकल्या, त्याचप्रमाणे लिहिण्यावाचण्यास पण ! पंडितजींनी त्यांना शिकवले.

" आज हैदराबाद, आणखी ७।८ वर्षांनी कांगडी गुरुकुल व लाहोर, तर मग एकदम पीठापुरम् ! त्यातच दोन मुलगे झाले. मध्येच पंडितजींना, १ वर्ष कारागृहात काढावे लागले. पण सर्व संकटाना धैर्याने तोंड देऊन मुलांचे संगोपन त्यांनी केले. पंडितजींच्या फोटोग्राफीच्या व चित्रकारीच्या व्यवसायात, त्यांना त्यांच्याबरोबर सबंध भारताचा प्रवास करता आला, पुष्कळ बघता आले; पण सर्व ठिकाणी त्यांनी गेल्यावर धर्मशाळेत उतरावे व स्वयंपाक स्वतःच करून खावा! ! त्यांनी एक पेटीच केली होती. ३।४ माणसाना पुरेल एवढी भांडी, स्टोव्ह, शिधा ( सर्व तुपापासून मेतकूट लोणच्यापर्यंत ); मुलांच्या करता सर्व बरोबर ठेवायचे. गेल्यावर मग दूध फक्त आणावयाचे !

" त्यांना ( सौ. सरस्वतीबाईंना ) स्वस्थता मिळाली ती १९१८ साली औंधला आल्यावर. तेथे ती. पंडितजींनी घर बांधले व आपले कार्य चालू केले. मुले पण मोठी होत होती; मुलांचे शिक्षण चालू झाले. औंध येथील महाराज

वाङ्मयप्रेमी असल्याने वारंवार व्याख्याने, प्रवचने, कथापुराणें होत. त्यामुळे त्यांचा वेळ चांगला जाऊ लागला. नवीन ओळखी वाढल्या. मोठी माणसे भेटत, घरी येत. त्या खूप सुग्रण असल्याने खुद्द राजेसाहेब पण स्वयंपाकाची व नवीन पदार्थाची स्तुति करीत. क्रोशाच्या सुईने बनविलेले रुमाल, लोकरी स्वेटर त्या सुरेख करीत. दिसायला त्या तितक्या गोऱ्या नाहीत, उंच नाहीत, लठ्ठ नाहीतच. सावळ्या रंगाच्या असून डोळ्यात भरण्यासारख्या होत्या तरुणपणी ! प्रथम भेटीत जरा आदर व भीतिच वाटे. त्याचमुळे माझे लग्न झाल्यावर माहेरच्यांना वाटले –मला आई नाही; आता सासूबाई तर अशा दिसतात. हिचे कसे व्हायचे ? एकदोन वेळा जेव्हा मी सासरी जाऊन आले तेव्हा ओळख पटली. त्याचमुळे माझ्या माहेरची मंडळी अगदी हक्काने येतात व आमच्याकडे राहून जातात. आम्हा दोन सुनांचें, आई काय करील इतके लाड, कौतुक केले त्यांनी. त्याचमुळे आमच्या त्या 'आई.' म्हणून नातवंडे पण त्यांना आजी न म्हणता 'मोठी आई' म्हणायला लागली. मंगलागौरी, डोहाळजेवण, बारसे, सर्व काही त्यांनी खूप हौसेने, थाटाने केले. आईची अगर माहेरची आठवण सुनाना यावी अशी परिस्थिति कधी आली नाही. जरी आम्ही गोल नेसलो, मुलीनी काहीं फॅशन केली तरी त्यांच्या तोंडून नापसंतीचा शब्दही नाही. टेबलावर जेवायला आम्ही सुरवात केली. सुरवातीस जरा जड वाटले त्यांना ! पंडितजींचा प्रश्नच नाही. आम्ही सांगावे अमुक करावे म्हणून अन् ते काही न विचारता तयार ! असे प्रेमळ, शांत, सदासुखी हसतमुखी जोडपे विरळा ! त्यांची मी सून आहे, याचा मला खूप अभिमान वाटतो. माझे भाग्य आहे व पुण्यही आहे.

"ती सौ. सरस्वतीबाईंना मुलीची फार आवड. पण मुलगी नव्हती नशिबात. त्याचमुळे मला वाटते, आम्हा दोघी सुनावर मुलीइतकी नव्हे काकणभर जास्तच माया करतात त्या. जरा कोणाचे दुखलेखुपले की त्यांचा जीव खालीवर होतो. नाती व नातू लाडके असतील यात संशय नाहीच. सुट्टीत नातवंडे आली की मग रोज एकेकाचे आवडते जिन्नस सुरू असतात. ९० वर्षे जवळ जवळ होतील त्यांना, पण उत्साह खूप.

"आम्ही एकदा त्यांना सहज उत्सुकतेने विचारले की. तुम्हाला नाही वाटले तरुणपणी आपल्याला अमुक प्रकारची साडी हवी किंवा दागिना हवा ? तर म्हणतात कशा– हा एक मोठा दगिना मिळाला आहे भाग्याने, तो बस्स आहे.

"सौ. आईची दिनचर्याही अगदी नियमित असते. ३५ वर्षांपासून एक वेळच जेवण घेतात. सकाळी दोनदा व दुपारी एक वेळ चहा. मध्ये खाणे नाही. रात्री फक्त एक कप दूध व कधी तरी १।२ बिस्किटे."

×

सौ. लतिकावहिनी सातवळेकरानी आपल्या ती. सौ. सासूबाईंचे दिलेले हे रोमहर्षक शब्दचित्र विलोभनीय आहे. त्या पुढे सौ. सरस्वतीबाईंच्या प्रसगावधानाची गोष्ट सांगतात ती अशी की– घरची सर्व कामे सांभाळून आठवड्यातून दोनदा व दर पौर्णिमेला औंधच्या मूळपीठदेवीला साडेचारशे पायऱ्या चढून जाणाऱ्या या बाईनी आपल्या काटकपणाची चुणूक घरीसुद्धा धीमेपणाने एकदा दाखविली. त्या लिहितात–

" झाले काय, घराभोवती गवत, झाडे, झुपडे पुष्कळ. वेळ संध्याकाळची. मुले खेळायला गेलेली. अंधार पडू लागला. मागच्यादारी त्या ( सौ. सरस्वतीबाई ) ओटयावर मुलांची वाट पहात बसल्या असताना, पायरीखालून ' लांबडे ' जाताना दिसले. जीव घाबरला. वाटले, आता मुले उडया मारत येतील नि त्याच्यावर पाय पडला तर त्यांचा ? घरात दुसरे कोणी नव्हते. पण मुलांची काळजी आईना स्वस्थ बसू देईना ! तशाच लटपटत उठून काठीने घाव तर त्यानी त्या लांबड्यावर घातला. पण नेम थोडाच होता नक्की ! घाव चुकवून तो फुस्कारून त्यांच्यावर आला. फणी पाहून तर यांचे पुरते अवसान गळाले. पण आता मनाचा निश्चय मात्र पक्का झाला. जनावर दुखावले ते सोडता उपयोगी नाही ! आणि तसेच ५।७ तडाखे मारून शेवटी त्यांनी ( सौ. सरस्वती बाईंनी ) त्या नागाला ठार केले. आणि मग घामाने निथळत, कापत खाली बसल्या. इतक्यात मुले आलीच ! "

सूनबाईनी सासूबाईंच्यासंबंधी दिलेल्या अशा या हकीकती काही समजलेल्या, काही एकलेल्या, काही अनुभविलेल्या अशा आहेत. " **अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक ॥** " अशी सन्तवाणी आहे. तेथे संसार म्हणजे " **हे विश्वचि माझे घर ।** " असा अभिप्राय आहे आणि तिन्ही लोक म्हणजे स्वर्ग–मृत्यु–पाताळ अथवा सत्वगुणी, रजोगुणी व तमोगुणी जीव असा अभिप्राय आहे. पण सौ. सरस्वतीबाईंनी केला त्याप्रमाणे ' **नेटका प्रपंच** ' म्हणजेच संसार आणि तिन्ही लोक म्हणजे आपली नातवंडे धरून तीन पिढ्या किंवा घरची मंडळी, आप्तेष्ट–सगेसोयरे व स्नेही आणि अतिथिअभ्यागत असा मर्यादित अर्थ घेऊन जरी घरोघरीच्या सौभाग्यलक्ष्मी सुखाचा संसार " कोंड्याचा मांडा " करूनही करतील आणि आनंदाने तिन्ही लोक भरतील तर त्या गृहदेवताच ठरतील आणि पंडितजींना करता आली तशी निश्चितपणे पुरुषार्थाची कामगिरी घरोघरीच्या धीराना करावयास येऊन " **चैतन्य घरेघर नांदेल सदा । नांदेल सदा ॥** " हे लक्ष्यात आल्यावाचून रहात नाही. पंडितजींची ही जन्मसावित्री नव्वदीत आली असून पंडितजींच्या सहवासाने प्रसन्न व प्रकृतीने धडधाकट आहे व अजूनही प्रपंचाची कामे दिलदारीने पार पाडत असते. त्यावरून पाहणाराच्या मनात येते की " **गृहिणी गृहमुच्यते ।** " हे वचन मनूने लिहिले तेव्हा त्याच्या डोळ्यासमोर त्याच्या वेळच्या एकाद्या सौ. सरस्वतीबाई सातवळेकरच असाव्यात ! पंडितजींचे नर्मसचिवत्व त्यानी मराठी भाषेप्रमाणेच हिंदी व गुजराथी भाषाही आत्मसात् करण्याने केले आहे.

सौ. सरस्वतीकाकू सातवळेकर काळाच्या ओघात सासूबाई झाल्या. पण सुनांच्या बरोबर त्या आईपेक्षाही प्रेमळपणानेच वागत असल्याकारणाने सुनांना सासर हे माहेराइतकेच " गोड " झाले आहे. पंडितजींच्या थोरल्या सूनबाई सौ. लतिकाबाई सातवळेकर बेळगावच्या नारायणराव कित्तूर यांच्या कन्या ताराबाई. वसंतराव सातवळेकरांच्या धर्मपत्नी म्हणून ता. २ जुलै १९३७ रोजी या घरी आल्या. त्या पंडितजी व सौ. सरस्वतीकाकू यांच्या सहवासात व सेवेतच वाढल्या विकसल्या आहेत. त्याच आपल्या कौटुंबिक जीवनासंबंधी जे सांगतात तेही उद्बोधक व रंजकच आहे.

पंडितजींना घरी त्यांचे चिरंजीव आणि सूनबाई व पुढे अर्थातच नातवंडे " बाबा " म्हणून संबोधितात. या पंडितजींच्या सर्व " मागिलांना " पंडितजींबद्दल केवढा नितान्त आदर आहे, याची कल्पना त्या कुटुंबात दोन घटका काढल्याशिवाय खरोखरच कोणाला यावयाची नाही ! पंडितजींच्या थोरल्या सूनबाई सौ. लतिकाबाई सांगतात की—

" ती. बाबांची सेवा करण्याची मला जी संधि मिळाली ते मी माझे परम भाग्यच समजते. बाबांची तुलना मला भगवान् शंकराशी करण्याचा मोह होतो. बाबा निःस्पृह व भोळे असून वैर, कपट यांच्यापासून ते कित्येक मैल दूर आहेत. अतिशय कठोर अशा टीकेचे प्रहार अत्यंत शांतपण सहन करण्याचे त्यांचे धैर्य असामान्य आहे. एकदा एका वृत्तपत्रात बाबांचा लेख प्रसिद्ध झाला होता. त्याला उत्तर म्हणून एका वाचकाने लिहिलेल्या पत्रात म्हटले होते की बाबानी वेदमंत्रांच्या अर्थाचा अनर्थ करून टाकला असून आजपर्यंत मिळविलेल्या आपल्या लौकिकाला कलंक लावला आहे. ह्या अशासारख्या मजकुराने भरलेले पत्र वाचून बाबा किंचित् हसले. सावकाशपणे ते पत्र एका कोपऱ्यात ठेवून देऊन ते शांतपणे आपल्या दुसऱ्या कामाला लागले.

" बाबांच्या भोळेपणाचा अनेकजण अनेक प्रकारे फायदा घेतात. कधी कोणी पाकिट मारल्याची थाप मारून बाबांच्या कडून मदत म्हणून पैसे उकळतात; कधी आजाऱ्याचे सोंग करून फसवतात. एकदा बाबांनी एका तुरुंगातून सुटून आलेल्याला उपजीविकेचे साधन म्हणून, त्याच्या सत्प्रवृत्तिवर विश्वास ठेवून, त्याला आपल्या प्रकाशनांचा एजंट नेमला. हजारो रुपये खाऊन तो पळाला ! अशाप्रकारे पुनः पुनः घडूनही बाबांची प्रवृत्ति बदलत नाही !

" स्वावलंबनावर बाबांचा अतिशय विश्वास. आजारी अवस्थेतही कोणाची मदत घेण्याची ते शक्य ती टाळाटाळ करतात. स्वतःचे काम स्वतः करण्याचा त्यांचा प्रघात कायम आहे. त्यांनी आपल्या खोलीतच निश्चितपणे रहावे व तेथेच,

खाणे-पिणे मागवून घ्यावे, असे आम्ही सर्व मंडळी सांगतो. त्यावेळी ते सर्व गोष्टी कबूल करतात, पण फलाहाराची वा जेवणाची वेळ झाली की जेवणघरातील खुर्चीवर ते आपले बसलेले ! एकदा त्यांची जांघ अतिशय दुखत होती. त्यामुळे ते बरेच अस्वस्थ झाल्याचे दिसले. डॉक्टरांनी औषध देऊन दोन तीन दिवस संपूर्ण विश्रांति घेण्याचा सल्ला दिला. डॉक्टरांची पाठ वळली मात्र, बाबा अंथरुणातून गायब ! शोधाशोध सुरू झाली. पाहतो तो बाबा आपल्या कचेरीतील खुर्चीवर विराजमान झालेले !

" ती. बाबा प्रसिद्धिपासून दूर पळतात. कित्येकवेळा ते निरनिराळ्या सभासंमेलनांचे अध्यक्ष होतात, पण त्याची माहिती घरातल्याना क्वचितच होते. हिंदी साहित्यसंमेलनाने त्यांना " साहित्यवाचस्पति " ही सन्मान–उपाधि प्रदान करण्याच्या वेळची गोष्ट ! मुंबई येथे त्याकरता एक प्रचंड सभा नियोजकांनी आयोजलेली होती. परंतु बाबांच्या मुंबईला जाण्याच्या दिवसापर्यंत आम्हा कोणालाच या गोष्टीची माहिती नव्हती ! अचानक काही कारणाने अगदी जाण्याच्या दिवशी आम्हाला ती बातमी समजली. त्याबरोबर आम्ही सर्वांनी बाबांच्याबरोबर मुंबईस जाण्याचे ठरवून तयारीला लागलो. तसे बाबा म्हणतात– " काय जरूरी आहे तुमच्या येण्याची ? "

मोकळ्या मनाच्या आदरातिशयाने पंडितजींचे वरील तऱ्हेने शब्दचित्र रेखाटणाऱ्या सौ. लतिकावहिनी आपल्या प्रेमळ सासूच्या पावलावर पाऊल टाकून पंडितजींचे " **अतिथिदेव** " हे व्रत चालवित असतात. पंडितजींच्या आनंदाश्रमाचे नाव सार्थच सार्थ आहे, असेच टिपण त्या गृहकृत्यात साधत असतात. सासूसासऱ्यांची सेवा करण्यात व " **धन्यो गृहस्थाश्रमः** " साधण्यात सौ. लतिकावहिनींची दक्षता कोणालाही बधावयाची नाही. सौ. लतिकावहिनींच्या चार कन्यकाही जाणीवेच्या असून " **विद्या विनयेन शोभते** " या वचनाच्या मूर्ति आहेत. थोरली कु. सुनीता बी. एस्. सी. असून मुंबईला जहांगीर आर्ट गॅलरीत नौकरीस होती, ती यंदाच सौ. याळगी झाली. दुसरी कु. उषा ही बी. एस्. सी. असून दिल्लीच्या लेडी हार्डिंज मेडिकल कॉलेजात एम्. बी. बी. एस्. आहे. ला.तिसरी कन्या कु. आशा मॅट्रिक होऊन हैदराबादेस विवेक–वर्धिनी कॉलेजात आपल चुलत आजोबा व पंडितजींचे बन्धु डॉ. सीतारामपंत यांचेकडे राहून फाइन आर्ट्सच्या शेवटच्या वर्षात शिकत आहे. चवथी कु. क्षमा पारडी येथेच पंडितजींच्या तीर्थरूप सहवासात अकरावीचे शिक्षण घेत आहे.

पंडितजींच्या दुसऱ्या सूनबाई म्हणजे माधवरावांच्या सुविद्य पत्नी सौ. कुसुमताई या हैदराबादच्या वासुदेवराव नाखरे यांच्या कन्या होत. सौ. कुसुमताई याही कलारसिका असून त्यांनी पंडितजींची चित्रकलेसंबंधी जी मुलाखत जे. जे. स्कूल ऑफ्

आर्ट्स्च्या जर्नलमध्ये ( एप्रिल १९६६ ) प्रसिद्ध केली होती, तिजवरुन त्यांच्या कलारसिकतेची व पंडितजीबद्दलच्या आदरातिशयाची स्पष्ट कल्पना कोणासही येईल. त्यांचा थोरला मुलगा चि विकास हा अहमदाबाद येथे नॅशनल डिसाईन-इन्स्टिटयूट-मध्ये ग्राफिक चित्रकलेचे उच्च शिक्षण घेत असून, दुसरा कुमार दीपक पवईच्या आय्. आय्. टी. मध्ये इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहे.

" **सन्तुष्टो भार्यया भर्ता, भर्त्रा भार्या तथैव च** । " असे दाम्पत्यजीवन आणि " **गुणा गुणान् वेत्ति** । " अशा " **गृहरत्नानि बालानि** । " मिळण्याचे भाग्य, यांच्या जोडीमुळे पंडितजींना व त्यांच्या कुटुंबियांना प्रसन्न गृहजीवनाचा लाभ झाला आहे, यात शंका नाही. " **परस्परं भावयन्तः श्रेयं परमवाप्स्यथ** । " या गीतावचनाची व्यवहारशुद्धता पंडितजींच्या गृहजीवनात पहावयास सापडते. तेव्हा पंडितजींच्या कुलदीपकाच्या कर्तृत्वाकडे निरीक्षकांचे लक्ष सहजच वेधते.

पंडितजींना एकंदर तीन पुत्र झाले. पैकी पहिले चिरंजीव नारायणराव, कांगडी येथील गुरुकुलात असताना, विषम ज्वराने वारले. आश्रमीय शिक्षण देऊन त्याला " **स्वतंत्र वनवृत्तिच्या घडिघडी सुखाते करे** " असा तयार करण्याचा पंडितजींचा मानस होता. पण ' **होणारे न चुकेल, होइल जरी ब्रह्मा तया आडवा** । ' असा अनुभव आला; आणि पंडितजींनी व सौ. सरस्वतीकाकूंनी ते दुःख स्थितप्रज्ञाच्या गंभीरतेने गिळले. त्या मनाच्या अवस्थेतच पंडितजींनी " **मृत्युको दूर करनेका उपाय** । " हे आपले पुस्तक लिहिले.

पंडितजींचे दुसरे चिरंजीव वसंतराव. यांचा जन्म २३ जानेवारी १९१३ रोजी लाहोर येथे झाला. १९१८ साली पंडितजी औंधास रहावयास आल्यामुळे वसंतरावांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण औंध हायस्कूलमध्ये झाले. १९३२ साली ते सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजातून पी. ई. झाले व पुढे पुण्याच्या नौरोसजी वाडिया कॉलेजातून १९३५ साली बी. ए. झाले. औंधास वडिलांच्या जवळ राहून ते तेथील सार्वजनिक जीवनात आणि पंडितजींच्या स्वाध्याय-मंडळाचे व्यवस्थापनात बेताबेताने लक्ष घालू लागले. औंधसंस्थानात पंडितजींनी सुरू केलेल्या ग्रामपंचायतींच्या चळवळीत वसंतरावांनी मनापासून भाग घेतला. प्रसंगवशात् ते औंधच्या विधिमंडळाचे सभासद तर झालेच, पण पुढे तालुका समितीचे अध्यक्षही निवडले गेले. औंधच्या ग्रामाधिष्ठित प्रजास्वराज्यराजवटीत ते एकदा सहा महिने शिक्षणमंत्रीही झाले. १९४६ साली ते आरोग्यमंत्री होते. बाहेरच्या अशा सार्वजनिक जीवनाबरोबर ते स्वाध्यायमंडळाचे कामात आणि पुरुषार्थ व वैदिक धर्म या मासिकांचे संपादन-प्रकाशनात लक्ष घालू लागलेच; पण त्याशिवाय स्वतःची म्हणून त्यानी उषा-प्रकाशन संस्था आपल्या द्वितीयकन्येचे नाव देऊन सुरू केली. त्या संस्थेची वीस बावीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

पंडितजी पारडीस आल्यापासून पुरुषार्थ, वैदिकधर्म, अमृतलता इत्यादि मासिकांचे प्रकाशन आणि स्वाध्यायमंडळाच्या पंडितजींनी प्रेरित केलेल्या कामाचा रामरगाडा वसंतरावानी आपल्या अंगावर घेऊन जबाबदारीने चालविला आहे.

पंडितजींचे तिसरे चिरंजीव माधवराव यांचा जन्म १३ ऑगष्ट १९१५ चा लाहोर येथीलच आहे. यांचेही मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण औंधास झाले. लहानपणापासूनच आपल्या वडील–आजोबाप्रमाणे यांचा चित्रकलेकड ओढा. त्यामुळे पंडितजींनी खास लक्ष घालून त्याना काही धडे स्वत:च दिले. १९३२ मध्ये मग ते मॅट्रिक झाल्यावर, मुंबईस चित्रकार केतकर यांचेकडे त्यांनी अधिक प्रगति चित्रकलेत केली. जे. जे. स्कूल ऑफ् आर्ट्स्चे आचार्य श्री सॉलोमन यांच्या नेतृत्त्वाने त्यांनी मग अभ्यास केला व पंडितजींची परंपरा पुढे चालवून एकदम चौथे वर्गात प्रवेश मिळवणाऱ्या माधवरावांनीं १९३५ साली चित्रकलेचा सर्वोच्च डिप्लोमा मिळवून व मेयो–मेडल पटकावून सातवळेकरांची परंपरा राखली. अवघ्या विसाव्या वर्षी म्यूरल डेकोरेशन स्कॉलरशिप मिळवणारा हा उमदा तरुण १९३७ साली इटालीतील फ्लॉरेन्स शहरी प्रो. जोहान्नी बस्तीयानीनी या प्रसिद्ध 'चित्रकाराच्या स्टुडिओत दाखल झाला. तेथून त्याने लंडन–स्लेड स्कूलमध्ये कल्पनाविलासाचा विकास केला व १९४० मध्ये जर्मनी, फ्रान्स वगैरे युरोपिय देशाचा दौरा करून परत अनुभव मिळवला.

परदेशी जाताना माधवरावाना इचलकरंजी शिक्षणविश्वस्तनिधीचा फायदा मिळाला होता. भारतात आल्यावर काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत माधवरावांनी सफर मारली. वडिलांनी हिमालयातील व इतरत्रीची निसर्गसौंदर्ये रंगाधीन केली होती, तोच कित्ता माधवरावानी गिरवून १९४५ साली व १९४७ साली मुंबईच्या ताजमहाल हॉटेलात चित्रप्रदर्शने भरवली. निसर्गदृश्ये जिवंतपणाने रेखाटण्यातील त्यांचा हातखंडा ब्रश असल्यामुळे १९४९ साली त्यांना आफ्रिकायात्रेचा योग जमला. १९४७ पासून माधवराव मुंबईस स्थायी झाले असून १९५४ साली त्यानी चर्नीरोड स्टेशन समोरील केळेवाडीतील ' रामदूत ' इमारतीत आपली इंडियन् आर्ट इन्स्टिटयूट चित्रकलेचे सर्वांगपरिपूर्ण ज्ञान देण्यासाठी स्थापन केली आहे. माधवराव यांची चित्रे डॉ. राजेंद्रप्रसाद, सिक्किमचे राजे, युगांडाचे अधिपति यांची शाबासकी मिळवून बसली आहेत. पण आपल्या कलाकीर्तिचे पाणी पंडितजींच्या चमकेचे आहे, असेच माधवराव मोठ्या अभिमानाने सांगत असतात.

पंडितजींचा " **धन्य संसार जाहला** " आहे तो हा असा.

: ३१ :

# पंडितजींचा लोकगौरव

' न मागे तयाची रमा होय दासी । ' तसेच कीर्तीचे ही आहे.

झिजल्यावाचोनि कीर्ति कैची ? । मान्यता नव्हे की फुकाची ॥

मात्र, झिजणे ते सुद्धा एकाद्या ध्येयासाठी आणि ' अचूक चुके ना कोठे । ' असे लागते. म्हणून सिद्धीच्या पायी स्वत:ला विसरून जाणाराच्या मागे प्रसिद्धि वा कीर्ति येते. ' मरावे परी कीर्तिरूपे उरावे । ' हे समर्थ–वचनसुद्धा, जीव लावून कृति करावी ती इतकी उठावदार करावी की ती लोकांच्या डोळयात व डोक्यात भरावी, मग त्यात कर्त्याला मरण आले तरी चालेल, हे प्रबोधन देते. आम्ही मर–मर मरतो पण आम्हाला कोणी विचारीत नाही, अशा कुरकुऱ्या हुकमी हमालांसाठी कीर्ति नाहीच मुळी ! ध्येयभूत कृतिची जीव लावून भक्ति हा कीर्तीचा आकर्षण–बिन्दु असतो.

पंडितजी सातवळेकरांनी राजकारणापासूनच काय, पण लहानपणी हाती धरलेल्या चित्रकलेपासून वेदानुवादापर्यंत सर्वच गोष्टीत जीव लावून काम केले, म्हणूनच त्याना प्रत्येक कामात यश व लौकिक मिळाला. त्यातही आपल्या आयुष्याच्या शंभरीत वेद आणि वैदिक संस्कृतिचे व्यवहारशुद्ध पुनरुज्जीवन प्रथम भारतात व परिणामत: सगळ्या जगात व्हावे, या शुद्ध बुद्धीने त्यानी वेदसेवा नितान्त भक्तिभावाने केली. तिने कीर्ति पंडितजींच्याकडे चालत आली. मनुष्यसमाजाबद्दलची सहृदयता, स्वत:ची कार्यक्षमता आणि त्याचबरोबर स्वार्थनिरपेक्षता यांच्या तेजोवलयांनीच कीर्ति आकर्षित होते; एरवी नाही.

पंडितजींची सिद्धिशोधकता प्रसिद्धिविन्मुखच आहे. अंतरोत्थित प्रेरणाबलाचे कृतीने अनुसरण करणे, विचारासारखा आचार किंवा आचारासारखाच उच्चार या प्रामाणिकपणाच्या हुंड्या लोकनजरेच्या पेढीवर पटल्या की कीर्ति माणसाच्या

सेवेला लागते. वेदानुवाद आणि त्या वेदांच्या प्रेरणेने परिस्थितिसापेक्ष कार्यक्षम आचरण यांच्यामुळे, ' **अंतरी निर्मळ, वाचेचा रसाळ ।** ' अशा पंडितजींना लोक-मानसात पुरुषार्थादराचे स्थिर स्थान मिळाले आहे. त्या आदरस्थानाचे प्रतीक म्हणजेच त्याना जाणकार संस्थानी गुणग्राहकतेने दिलेल्या पदव्या, आणि चाहत्यांसह जनतेने केलेले जाहीर–सत्कार. त्यांचे समालोचनही प्रबोधक आहे. पहा की—

( १ ) गीतेवरील पुरुषार्थबोधिनी टीका हिंदी, मराठी, कानडी, गुजराथी व इंग्रजीत झाली असून वैदिक सिद्धांतासह गीतासिद्धांताचे विशदीकरण तीत आहे.

भगवद्गीतेमध्ये राजनीतिशास्त्राचे प्रतिपादन आहे, असे पंडितजींचे ठाम मत त्यांनी आपल्या प्रतिपादनाच्या समर्थनार्थ अनेक तर्कसंगत उदाहरणे देऊन सिद्ध केले आहे. त्यांच्या या स्वतंत्र विचारसरणीबद्दलच अमृतसरच्या गीताधर्ममंडळाने त्यांना ' **गीतालंकार** ' ही बहुमानाची पदवी बहाल केली आहे.

( २ ) पंडितजींनी सहस्त्रावधी वर्षापासून लुप्त झालेले वेदवाङ्मयाचे बहुमोल भांडार जनसामान्यासाठी उघडे केले. पंडितजींच्या या वेदविषयक महान् कामगिरीचा गौरव, गोवर्धनमठाचे जगद्गुरु शंकराचार्य यांनी पंडितजींना ' **महामहोपाध्याय** ' ही पदवी देऊन केला आहे. ( सन् १९५० ).

( ३ ) हिंदी साहित्यातील त्यांच्या कामगिरीबद्दल प्रयाग हिंदी साहित्य संमेलनाने त्यांना ' **साहित्यवाचस्पति** ' ही पदवी दिली.

( ४ ) कांगडीच्या गुरुकुल विद्यापीठाने पंडितजींना ' विद्यामार्तंड ' या पदवीने १९६० साली भूषविले असून,

( ५ ) हटयोगीराज देवरहवा बाबा या ११० वर्षाच्या थोर संताने पंडितजींची संभावना ' **ब्रह्मर्षि** ' या थोर संबोधनाने २३ आक्टोबर १९६१ रोजी देवरिया येथील वेदव्यासनगरात केली आहे. यावेळी पंडितजींनी महामना मालवीयजींच्या जन्म-शताब्दि महोत्सवाचे उद्घाटन केले.

( ६ ) भारताच्या राष्ट्रपतींनी १९५९ साली पंडितजींना एक विद्वान् शास्त्री म्हणून दरसाल पंधराशे रुपयांचे वर्षासन सुरू केले आहे. ( ७ ) राष्ट्रभाषासमिती ( वर्धा ) या संस्थेने पंडितजींनी केलेल्या हिंदीभाषेच्या गुणवन्तसेवेबद्दल एक पदक देऊन महात्मा गांधी–पुरस्कार म्हणून पंधराशे एक रुपये रोख दिले. (सन १९५० )

पंडितजींची वाङ्मयसेवा आणि भारतीय प्राचीनसंस्कृतीचा सखोल अभ्यास रशिया व जपानसारख्या दूरदूरच्या देशात मान्यता पावला असून ( ८ ) हिंदुधर्माचा पात्रतासिद्ध प्रतिनिधि म्हणून रशियाने पंडितजींना जागतिक धर्मपरिषदेत निमंत्रिले होते. ( ९ ) तसेच निमंत्रण वैदिकधर्माचे प्रतिनिधी म्हणून जपानमधीलही जाग-तिक धर्मपरिषदेस पंडितजींना होते. ( १० ) जिनीवास भरलेल्या जागतिक परि-षदेसही पंडितजींना बोलावणे येण्याचे राहिले नाही.

( ११ ) पंडितजींना कोणी सन्मानदर्शक पदवी अर्पण करण्यापूर्वी, त्यांची हत्तीवरून मिरवणूक काढून बिहारमध्ये त्यांचा जो सत्कार जनतेने केला त्याच्या भव्यपणाची कल्पना सभासंमेलने व दरबार आणि पदयात्रा वा मिरवणुकी यांच्या-वरून बिलकुल यावयाची नाही. प्रयागची कुंभमेळ्याची गर्दी व नाशिकच्या सिंहस्थ पर्वणीचे वेळी 'न्हाव्याभटा धणी' होणारी यात्रा यांच्या तफावतीप्रमाणेच बिहार-मधील सत्काराबद्दलचे वास्तव आणि कल्पना यात पडेल. कित्येक वेळा वास्तव हे कादंबरीपेक्षाही रमणीय असते, या वचनाचे प्रत्यंतर म्हणजे बिहारचा सत्कार.
( १२ ) त्यापेक्षाही महत्त्वाचा झालेला पंडितजींचा गौरव म्हणजे १९२५ त स्वामी दयानंद सरस्वतींची जन्मशताब्दि मथुरेत साजरी झाली असता, पंडितजींचा 'अथर्व-वेदाचा स्वाध्याय' हा ग्रंथ तेथे प्रसिद्ध झाला, हा होय.

( १३ ) ता. २ जुलै १९५४ रोजी हैदराबादच्या मराठी ग्रंथसंग्रहालयात तेथील विविधसंस्थांच्या वतीने झालेला सत्कार पंडितजींना घरच्या आहेरासारखाच जिव्हा-ळ्याचा वाटला हे अगदीच स्वाभाविक होते.

## ( १४ ) वेदाचार्य सातवळेकर यांचा सत्कार

वेदाचार्य श्री. श्रीपाद दामोदर सातवळेकर यांचा ९० वा वाढदिवस श्री कन्हैय्या-लाल मुनशी ( भूतपूर्व गृहमंत्री मुंबईराज्य व राज्यपाल उत्तरप्रदेश ) यांच्या अध्यक्षते-खाली झालेल्या 'वेदमूर्ति सातवळेकर नवत्यब्दसमिती' तर्फे मुंबईस मोठ्या थाटाने व तितक्याच गांभीर्याने साजरा झाला. धार्मिक समारंभ ऑपेरा हाऊस जवळील शेठ श्री प्रतापसिंह शूरजी यांच्या 'कच्छ कॅसल' या भव्य प्रासादावरील विशाल गच्ची-वर १५ सप्टेंबर १९५७ रोजी सकाळी ठीक ७॥ वाजता सुरू झाला. ही गच्ची लतापल्लवानी सुशोभित करण्यात आली होती. यज्ञविधीत हवन म्हणून उपयोगात आणलेल्या चंदनाचा सुगंध सर्वत्र दरवळून राहिला होता. नभोमंडळही मेघाच्छादित होते. आकाशातील मेघडंबरीखालील यज्ञवेदीजवळ वेदाचार्य पं. सातवळेकर आपल्या सहधर्मचारिणी सौ. सरस्वतीबाई यांचेसह विराजमान झाले होते. त्यांच्या चारी बाजूला बसलेले विद्वान् चतुर्वेदी ब्राह्मण क्रमशः वेदसूक्तांचे गान करून पंडितजींना वैदिक शुभाशीर्वाद देत होते. यज्ञकुंडात चंदनघृतादि हविर्भाग दिला जात होता. तो हविर्भाग घेऊन उन्नत झालेल्या अग्निशिखा अग्निप्रमाणेच तेजःपुंज असलेल्या वेदाचार्यां-च्या समोर पुनः नतमस्तक होत होत्या. प्रसन्न आणि उत्सवमूर्ति पंडितजी स्वतःही वैदिकाबरोबर वेदसूक्तांचे पठण करीत होते. हे सर्वच दृश्य आल्हादसागराला वरचे-वर भरती आणीत होते. या समारंभासाठी म. म. दत्तोपंत पोतदार, म. म. सिद्धेश्वर-शास्त्री चित्राव, डॉ. व्ही राघवन्, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक माधवराव गोळवलकर गुरुजी, उपस्थित होते. त्यांनी शुभाशीर्वादाच्या मंत्राक्षदा टाकल्या.

*

पंडितजी व त्यांच्या सहधर्मचारिणी याना श्रीफल व पुष्पहार समर्पण करून आयुरारोग्य चिंतण्यात आले.

त्यानंतर सकाळी ९ वाजता भारतीय विद्याभवनातील गीतामंदिराच्या सभागृहात काशी विद्यापीठाचे सुविख्यात संस्कृतपंडित डॉ. सूर्यकान्त शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. हा परिसंवाद सुमारे तीन तास चालला. प्रा. वर्णेकर यानी संस्कृतमध्ये परिसंवादाचा उपन्यास केला. वैदिक विचारधारा, वैदिक भूगोल, वैदिक वाङ्मयाचे मूल्यमापन, व्यक्ति व त्यागकल्पना इत्यादि अनेक विषयावर चर्चा झाली. डॉ. श्री वसंतराव राहूरकर, डॉ. चिं. ग. काशीकर, श्री. म. व्यं. सहस्रबुद्धे या पुण्याच्या व डॉ. आपटे ( सागर विद्यापीठ ), प्रा. श्री. भा. वर्णेकर ( नागपूर ) इत्यादि विद्वानांनी यात भाग घेतला होता.

सायंकाळी ५॥ वाजता मुंबई विद्यापीठाच्या दीक्षान्त–सभागृहात डॉ. सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांच्या अध्यक्षतेखाली पंडितजींचा सत्कारसमारंभ अपूर्व थाटाने सुरू झाला. वेदघोष होऊन त्याच्या नादाने सभागृह दुमदुमून गेल्यावर, सत्कार समितीचे अध्यक्ष श्री कन्हैयालाल मुनशी यानी स्वागत केले व म्हणाले– 'भारतराष्ट्र भूतकाल जगले, वर्तमानकाळ जगत आहे व भारताला भविष्यकाळ मानाने जगावयाचा असेल तर त्याला संस्कृतीचाच आधार घेतला पाहिजे. संस्कृति संस्कृताशिवाय राहू शकत नाही. वेदवाङ्मय हा संस्कृतीचा खजिना आहे. पं. सातवळेकर हे वेदप्रणीत जीवन व्यतीत करणाऱ्या ऋषींचेच प्रतीकात्मक आदर्श आहेत.'

पंडितजींना अभिवादन करून श्री कन्हैय्यालाल मुनशीजींनी भाषण संपविले. नंतर कार्यवाह श्री महेंद्र कुलश्रेष्ठ यानी संदेश वाचन केले. डॉ. राधाकृष्णन् , श्री राजगोपालचारी, श्री चिंतामणराव देशमुख, श्री पंजाबराव देशमुख, श्री श्रीप्रकाश, श्री मोरारजीभाई देसाई, श्री पट्टाभिसीतारामय्या, डॉ. जयकर, डॉ. परांजपे, माताजी ( पांडिचरी ) यांचे संदेश महत्त्वाचे होते.

संदेशवाचनानंतर ब्रह्मवृंदानी वेदघोष करून पंडितजींना आशीर्वाद दिला. नंतर अनेक शिक्षणसंस्था, व्यायामशाळा, चित्रकलाकेंद्र, साहित्यसंस्था यांच्या वतीने पंडितजींना पुष्पहार समर्पण करून पंडितजींचा सत्कार करण्यात आला. त्याना पंचवीस हजार रुपयांची थैली अर्पण करण्यात आली !

पं. दीक्षितार यांचे संस्कृतात मग पंडितजींच्या सत्कारात्मक भाषण झाले. डॉ. बोस हे इंग्रजीत व श्री पृथ्वीराज कपूर हे हिंदीत बोलले. 'पंडितजींनी मला वेदग्रंथ आशीर्वाद म्हणून पाठविले. हिंदी भाषान्तरामुळे मला वेदांचा परिचय करून घेता आला. आता मी संस्कृत शिकावयाचा निश्चय केला आहे. कारण संस्कृतच्या प्रकाशानेच वेदांचे खरे दर्शन होईल.' असे उद्‌गार पृथ्वीराज कपूर यानी पं. सातवळेकर सत्कारप्रसंगी काढले.

अध्यक्ष डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर शेवटी म्हणाले—

'स्वातंत्र्यप्राप्तीसाठी पं. सातवळेकरानी अपूर्व त्याग केला आहे. त्यांचे या

पूर्वीचे जीवन ध्येयवादी, प्रवासी, प्रचारकाच्या स्वरूपाचे होते. परंतु त्यानंतर त्यानी वेदवाङ्मयाचे मूळ तात्त्विक अध्ययन केले व आपले सारे लक्ष वेदवाङ्मयाच्या प्रसारावर व संशोधनावर केंद्रित केले. याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. पं. सातवळेकरानी वेदगीत सामान्यापर्यंत पोहोचविले ही त्यांची अतुलनीय कामगिरी असून ती निधर्मी राज्याशी विसंगत नाही.

निधर्मी म्हणविणाऱ्या राष्ट्रालाही धारणेसाठी व ऐक्यासाठी धर्माची नितान्त आवश्यकता आहे. कारण निधर्मी राज्य म्हणजे धर्महीन राज्य नव्हे. जीवनात धर्माचे पर्यायाने आध्यात्मिक मूल्यांचे निःसंशय स्थान आहे. आध्यात्मिक मूल्यांच्या शिकवणीनेच सहिष्णुवृत्ति निर्माण होते व 'जगा व जगू द्या' अशी स्वभाव-घडण निर्माण होते.'

करवीरपीठाचा संदेश घऊन पं. कवीश्वर हे मुद्दाम उपस्थित होते. त्यानी संदेश वाचून पंडितजींचे अभिनंदन केले.

नंतर वेदमूर्ति पं. सातवळेकर यानी उत्तरादाखल भाषण केले. ते म्हणाले—

'माननीय अध्यक्ष महोदय तथा उपस्थित बन्धुभगिनियो,

आपने यह जो मेरा सत्कारसमारंभ किया है, उसके लिए मैं सबका हृदयसे आभारी हूँ। मुझे विश्वास है कि यह सत्कार सातवलेकर नामक व्यक्तिका नहीं है, अपितु वेदके प्रभावी मानवधर्मका है। यदि मैं अपनेको वेदधर्मकी जाग्रतिके लिए समर्पित न करता और अपने चित्रकलाके धंधेसेही धनोपार्जन करता रहता, तो ९० क्या १०० वर्षका होनेपर भी मेरा ऐसा अभिनंदन होनेकी संभावना नहीं थी। यह विशाल समारंभ वास्तवमें आपके हृदयकी विशालता ही प्रकट करता है तथा उनमें वैदिकधर्म और उसके आदर्शोंके प्रति जो विशाल प्रेम है, उसे प्रकट करता है। मैं तो उन ऋषियोंका एक छोटासा संदेशवाहक ही हूँ, जिन्होंने प्राचीन कालमें अभूतपूर्व तपसे इस श्रेष्ठ ज्ञानको उदित किया था। इस ज्ञानके प्रचारमें मैंने जिस प्रकार अपने अबतकके ४० वर्ष अर्पित किये है, उसी प्रकार मेरा शेष जीवन भी उस महत्कार्यमें अर्पित हो जाय, यही प्रार्थना आज फिर, आप सबकी साक्षीमें, मैं प्रभुसे करता हूँ।

मैं वैदिकधर्मकी ओर आकर्षित क्यों हुआ? अपना चित्रकलाका धंधा ही नहीं, राजनीतिक जीवन भी छोडकर मैं क्यों एकान्तनिष्ठासे इस कार्यमें लग गया? ये कुछ ऐसे प्रश्न हैं, जिनका उत्तर मैं आप लोगोंको देना चाहता हूँ। कुछ उदाहरण देकर मैं अपनी बातको समझानेका प्रयत्न करूँगा।

अपने जीकनमें वैदिकधर्मके प्रभावकी कई प्रत्यक्ष घटनाएँ मैंने देखी। सन् १९०६ में मैंने 'वैदिक राष्ट्रगीत' नामक पुस्तक, अथर्ववेदके बारहवे काण्डके प्रथम सूक्तपर लिखी। उसमें उन मंत्रोंका अर्थ और स्पष्टीकरण ही था। इसकी २००० प्रतियाँ बम्बईमे छापी गई और उनमेंसे दो-ढाई सौका पहला बंडल ही मेरे पास पहुँचा था

कि ब्रिटिश सरकारने उसको जप्त कर लिया। इसका हिंदी अनुवाद भी इलाहाबादसे छपा था। उसकी भी ३००० प्रतियाँ जब्त कर ली गयीं। तीन चार महिनेमें ही यह सब चमत्कार हुआ। मेरी समझमें नहीं आया कि वेदकी एक छोटीसी पुस्तकसे सरकारको इतना भय क्यों हुआ। परंतु इस घटनासे इतना तो स्पष्ट हो ही गया कि वैदिकधर्म यदि जनतामें जाग्रत हो तो ब्रिटिश सरकारके लिए भारतमें रहना असंभव हो जायगा।

सन् १९०१ में चित्रकलाके धंधेसे धन कमानेके उद्देश्यसे हैदराबाद गया। उस समय मैं लोकमान्य तिलकका अनुयायी था। इस कारण स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षा, तथा स्वराज्य आदि विषयोंपर व्याख्यान देता था। इसी समय आर्यसमाजसे मेरा संबंध हुआ और ऋषि दयानंदके ग्रंथ मुझे पढनेको मिले। मुझे भाष्य करनेकी उनकी प्रणाली पसंद आयी। क्यों कि उन्होंने वेदमंत्रोंको मानवी व्यवहार की दृष्टिसे अनुवादित किया था। मेरे व्याख्यान भी वेदमंत्रोंके आधारपर होते थे। उस समय जो सभाएं होती थी उनमें स्वर्गीया श्रीमती सरोजिनी नायडूके पिता, श्री अघोरनाथ चट्टोपाध्याय अध्यक्षका स्थान ग्रहण करते थे तथा मेरा काम वक्तृता देना होता था। स्व. केशवराव वकील व्याख्यानोंकी व्यवस्था करते थे। जनताको मेरे व्याख्यान पसंद आते थे और शीघ्र ही पता चला कि राज्यके अंग्रेज रेजीडेंटका ध्यान भी उनकी ओर आकर्षित हुआ है। उसने निजाम सरकारपर दबाव डालकर हम लोगोंको राज्य छोडनेकी आज्ञा निकलवाई। इस तरह वेदज्ञानका प्रचार करनेके कारण ही मुझे हैदराबाद छोडना पडा। इस घटनाका भी मुझपर यही प्रभाव हुआ कि मैं वैदिकज्ञान तथा धर्मकी तेजस्वितापर विश्वास करने लगा।

हैदराबाद छोडनेके पश्चात् मैं स्व. स्वामी श्रद्धानंदके पास गुरुकुल कांगडी चला गया। वहाँके विद्यार्थियोंको मैं वेद तथा चित्रकलाका शिक्षण देने लगा। इसी समय महायोगी श्रीअरविंदके वेद तथा योग आदि विषयक गंभीर लेखोंसे मेरा परिचय हुआ, जिसका परिणाम यह हुआ कि मैंने वेदकी गहराइयोंमें उतरनेका निश्चय किया। मुझे लगा कि गहरे उतरे बिना उसके रहस्योंसे परिचित होना संभव नहीं है। ऋषि दयानंद और श्री अरविंद परस्पर पोषक थे। हैदराबादमें मैं थिऑसफीसे भी परिचित हुआ था तथा उसके अध्ययनसे भी इस समय भारतीय ज्ञानभंडारके प्रति मेरी रुचि बढी।

गुरुकुल आनेपर मैंनें मराठीमें 'वैदिक प्रार्थनाकी तेजस्विता' नामसे एक लेख लिखा, जो कोल्हापुरके 'विश्ववृत्त' मासिकमें छपा। इस लेखके कारण ब्रिटिश सरकार बहुत रुष्ट हुई। उसने राजापर दबाव डालकर हम सब याने पत्रिकाके संपादक, प्रकाशक, मुद्रक तथा लेखकपर राजद्रोहका मुकदमा चलवाया। जरा विचार कीजिये कि वेदविषयक लेखके कारण राजद्रोहका अभियोग। संपादक श्री विजापूरकर, प्रकाशक श्री जोशी तथा मुद्रक जोशीराव तीनों ही ३॥ वर्षतक कैदमें रखे

गये । मैं कोल्हापूरसे दूर था, इसलिये बहुत दिनोंतक पकडा नहीं जा सका । यद्यपि मुख्य अभियुक्त मैं ही था । लेकिन एक दिन मैं भी बंदी बना लिया गया और हथकडीमें कोल्हापूर ले जाया गया । मार्गमें. जगह जगह जनता वेदके लेखकका स्वागत करने स्टेशनोंपर आती थी । डेढ वर्षतक मैं भी जेलमें रहा और मुकदमा चलता रहा । अंतमें हम सब निर्दोष सिद्ध हुए और मुक्त किये गये । इस समय श्रीमती एनी बीसेंट और गायकवाड जैसोंने हमारा समर्थन किया था । परंतु वैदिक प्रार्थनाकी तेजस्विताने जैसे सचमुच प्रकट होकर ब्रिटिश सरकारको प्रभावित किया ।

इसके पश्चात् मैं लाहोर आया । अपना स्टुडिओ खोल कर चित्रकला आदिका काम करने लगा । वहाँके आर्यसमाजोंमें मेरे व्याख्यान होने लगे और शीघ्रही मैं पंजाबके सभी नगरोंमें व्याख्यान देनेके लिए जाने लगा । मैं अधिक तर वेदविषयपर ही बोलता था । पंजाबियोंके साथ मेरा मन मिलने लगा और मैं यहाँ स्थायीरूपसे रहनेका विचार करने लगा ।

उस समय पंजाबमें कुख्यात ओडवायर गव्हर्नर था । उसकी सरकारको मेरे व्याख्यान पसंद नहीं आये । मेरी दूकान तथा घरपर पहरा बिठा दिया गया और आनेजानेवालोंकी निगरानी होने लगी । कई कार्यकर्ता गिरफ्दार भी हुए । मैं वेदपर बोलनेके अतिरिक्त कोई दूसरी बात नहीं करता था । परंतु उसपर भी रोकटोक होने लगी । अंतमें मुझे लाहोर छोडना ही पडा ।

इन सब घटनाओंके कारण मेरे मनपर यह विश्वास जमता ही गया कि वेदमें कोई अंतर्निहित सामर्थ्य है, जो प्रकट होकर यह सब करवाता है । मेरे मनने वेद तथा अन्य धार्मिक साहित्यके ही प्रकाशन तथा प्रसारमें अपना संपूर्ण जीवन समर्पित कर देनेका निश्चय कर लिया । लाहोर छोडते समय यही कल्पना मेरे भीतर जड पकड रही थी ।

अब मैं दक्षिण महाराष्ट्रके सतारा जिलामें स्थित औंध नामक राज्यमें आ गया, जहाँके राजा मेरे परिचित थे । उनकी सहायतासे सन् १९१८ में मैंने 'स्वाध्यायमंडल' की स्थापना की और वेदानुसंधानका कार्य आरंभ किया । वेद प्रचारके लिए हिंदी तथा मराठीमें दो मासिक निकाले जिनका नाम 'वैदिकधर्म' तथा 'पुरुषार्थ' हैं। ये अब भी निकल रहे हैं, तथा इनमें एक गुजरातीका मासिक और जुड गया है, जिसका नाम 'वेदसंदेश' है। इसके अतिरिक्त मैंने हिंदी और मराठीमें 'भगवद्‌गीता' मासिक शुरू करके गीताकी 'पुरुषार्थ बोधिनी' टीका लिखी । इसमें गीताके श्लोकोंके साथ वेदमंत्रोंकी तुलना की गयी है । इस टीकाका अनुवाद हिंदी, मराठी, गुजराती, कन्नड और अंग्रेजीमें हुआ है ।

वेद, उपनिषद, रामायण और महाभारतके अनुवाद हिंदी और मराठीमें किये । इस तरह वेदानुसंधानका कार्य चलने लगा । पाठकोंने आर्थिक सहायता दी । 'स्वाध्यायमंडल' के भी छःसात सौ सदस्य बने । आर्थिक कठिनाई रहतीं थीं क्यों

कि जितना धन होता था, उससे ज्यादा प्रकाशनका कार्य रहता था। आजतक वही स्थिति है। लेकिन कार्य चलता रहा। सन् १९२२ में तो आर्थिक तंगियोंके कारण सब प्रकाशन बंद ही करनेका निश्चय करना पडा। लेकिन ईश्वरकी कृपासे ज्वालापूरके श्री लालचंदजी वानप्रस्थीने २०००) का चेक, बिना माँगे ही भेज दिया। इसके साथ ही स्वामी विश्वेश्वरानंदजीका भी एक पत्र आया। उसमें लिखा था कि यह धन वेदके शुद्ध मुद्रणके लिये है। अपरिचित धनीकी इस सहायताको मैंने ईश्वरकी आज्ञा ही समझा और वेदक पंडितोंको बुलाकर वेदोंका मुद्रण करवाया। इस समय हमनें चारों वेद, डाकव्ययसहित ५) में दिये थे। आज महँगाई इतनी बढ गयी है कि वही चीज हम १५) में भी नहीं दे सकते। तो भी हमने तीनबार चारों वेद छापे और प्रचार किया।

वेदोंका अध्ययन जारी रहा। मंत्रोंसे नये नये बोध प्राप्त होते रहे। यहाँ उनका थोडासा स्वरूप बताता हूँ।

सप्त ऋषयः प्रतिहिताः शरीरे सप्त रक्षन्ति सदमप्रमादम्।
सप्तापः स्वपतो लोकमीयुः तत्र जाग्रतोऽस्वप्नजौ सत्रसदौ च देवौ ॥
( वा. यजु. ३४–५५ )


' प्रत्येक शरीरमें सात ऋषि हैं। ये सातों ऋषि प्रमाद न करते हुए उसका रक्षण करते हैं। ये सात जलप्रवाह जब सोनेवालेके स्थानको जाते हैं, अर्थात् जब मनुष्यको निद्रा लगती है, तब भी दो देव जागते रहते हैं और इस यज्ञशालाका रक्षण करते हैं। '

दो आँख, दो कान, दो नाक और एक मुख–ये सात ऋषि हैं। ये ज्ञान प्राप्त करते हैं तथा उससे इस शरीररूपी यज्ञसत्रका संरक्षण करते हैं। इसी प्रकार शरीरके भीतर चलनेवाले विभिन्न रक्त प्रवाहोंको सात नदियोंका पवित्र स्थान माना है। सोनेके समय भी श्वास और उच्छ्वास नामक दो देव अपना कार्य करते हैं और इनके कारण जीवनकी गति अप्रतिहत चलती रहती है। मानवशरीरका यह वर्णन कितना उत्तम है, यह सभी देख सकते हैं।

शरीरका वर्णन करनेवाले और भी उत्तम मंत्र देखिये—

अष्टाचक्रा नवद्वारा देवानां पूरयोध्या।
तस्यां हिरण्ययः कोशः स्वर्गो ज्योतिषावृतः ॥ ३१ ॥
तस्मिन् हिरण्यये कोशे त्र्यरे त्रिप्रतिष्ठिते।
तस्मिन् यद्यक्षमात्मन्वत् तद् वै ब्रह्मविदो विदुः ॥३२॥ ( अथर्व. १०।२ )

' आठ चक्रों और नौ द्वारोंवाली यह देवनगरी अयोध्या है। इस नगरीमें सुवर्णमय कोश है जो तेजसे व्याप्त स्वर्ग ही है। तीन अरों तथा तीन आधारोंवाले इस सुवर्णमय कोशमें आत्मारूपी यक्ष रहता है, यह बात सभी आत्मज्ञानी जानते हैं। '



पंडितजींचा राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते सन्मान, दिल्ली : १९६०



पंडितजी व सौ. सरस्वतीबाई : १९६५

कार्यमग्न पंडितजी : १९६५





पंडितजी व पूजनीय श्री. मा. श्री. गोळवलकर गुरुजी : १९६६

पंडितजी व गुजरातचे राज्यपाल नवाब मेहदी नवाजजंग, पारडी : १९६०





पुणे येथील सत्कारप्रसंगी २८ एप्रिल १९६७ रोजी सौ. सरस्वतीबाई व पंडितजी यांना सौ. यमुताई किर्लोस्कर ओवाळीत असतांना



पुणे मराठा ग्रंथसंग्रहालयातर्फे पंडितजींचा सत्कार : ३० एप्रिल १९६७



पं सातवळेकर, माननीय श्री. मोरारजी देसाई, व मा. श्री. हितेंद्रभाई देसाई, पारडी : १९६४



पंडितजी व मा. श्री. बलवंतराय मेहता, (मुख्य मंत्री, गुजरात) : पारडी १९६४



पुणे विश्वविद्यालयातर्फे डी. लिट्. पदवीदानप्रसंगी, पारडी. डॉ. माईणकर, पंडितजी व श्री. सरदेशपांडे



आचार्य अत्रे व पंडितजी, पारडी : १९६५



वेदमंदिर उद्घाटनाच्या वेळीं, पारडी : १९५४



मुंबई येथील संस्कृत संमेलनाच्या वेळीं : १९५८.
पं. सातवळेकर, श्रीमत् शंकराचार्य पुरी, श्रीमत् शंकराचार्य द्वारका



तीन बंधु-डॉ. सीतारामपंत, पंडितजी व श्री. सखारामपंत



श्री. पंडितजी व श्री. ना. गो. चापेकर : १९६३

पृष्ठवंशके मूलाधार, स्वाधिष्ठान, आदि आठ चक्र और इन्द्रियोंके नौ छिद्र मिलाकर अयोध्या नामक यह देवनगरी बनती है, जिसमें ३३ देव रहते हैं। इसीके भीतर आत्मारूपी यक्षदेवका निवास है। यह सुवर्णमय कोशसे ढका है। आप देखें कि शरीरका यह वर्णन कितना सुन्दर तथा सत्य है।

अब इस ज्ञानसे पूर्ण पुरुषकी परिभाषा देखिये—

**पुरं यो ब्रह्मणो वेद यस्याः पुरुष उच्यते ॥ २८ ॥**
**यो वै तां ब्रह्मणो वेद अमृतेनावृतां पुरम् ।**
**तस्मै ब्रह्म च ब्राह्माश्च चक्षुः प्राणं प्रजां ददुः ॥ २९ ॥**
**न वै तं चक्षुर्जहाति न प्राणो जरसः पुरा ।**
**पुरं यो ब्रह्मणो वेद यस्याः पुरुष उच्यते ॥ ३० ॥** ( अथर्व. १०।२ )

' जो ब्रह्मकी इस पुरीको जानता है, उसे पुरुष कहते हैं। जो अमृतसे आवृत्त इस ब्रह्मकी नगरीको जानता है, उसे ब्रह्म और ब्राह्म अर्थात् सब देव–आंख, कान, नेत्र आदि– दीर्घ आयु और सुप्रजा देते हैं। जरासे पूर्व उसे ये इन्द्रियरूपी देव नहीं छोडते अर्थात् वह दीर्घजीवि होता है। जो ब्रह्मकी इस पुरीको जानता है, उसे पुरुष कहते हैं। '

यह शरीर देवोंकी नगरी हैं, सात ऋषिओंका पवित्र आसन है, अमृतसे युक्त स्वर्गधाम है तथा इन सबकी स्थितिको जानकर दीर्घजीवन प्राप्त करनेवालोंको पुरुष कहते है, आदि बाते वैदिक दर्शनकी देन है। इनकी महिमा तथा गौरव दर्शनीय है।... देवका दूसरा नाम निर्जर है। जहाँ ये रहते है, जरा पास नहीं जाती। देवोंका गुण अमृत देना है। शरीरमें स्थित देवोंसे हम अमृत प्राप्त करते हैं और दीर्घजीवि होते हैं। प्राचीन ऋषि वे अनुष्ठान करते थे। इसलिए वे अधिक दिन जीवित रहते थे।

शरीरके छिद्रोंको इन्द्रिय नाम दिया गया है। तात्पर्य यह कि जिनसे इन्द्रकी शक्ति प्रकट हो। इन्द्र अर्थात् साक्षात् परमेश्वर । उसकी अग्निरूपी शक्तिसे वाक्, वायुरूपी शक्तिसे प्राण, सूर्यरूपी शक्तिसे आंख, दिशाओंसे कान आदि बने हैं। हृदयमें इन्द्र स्वयं हैं और वहांसे अपनी शक्ति वितरित करते हैं। इसलिये इन्द्रको ' **इदं–द्र** ' कहते हैं। यह अपनी अभिव्यक्तिके लिये शरीरमें विविध सूराख करते हैं तथा उन सबमें एक एक देवको बिठाते हैं। स्वयं बीचमें रहकर उनका नियंत्रण करते हैं। मैं वही इन्द्र हूँ। वेद कहता है—

**' अहं इन्द्रो । न पराजिग्ये । '** ( ऋग्वेद १०।४८।५ )

' मैं इन्द्र हूँ। मेरी पराजय नहीं हो सकती। ' इस आत्मविश्वासका अनुष्ठान, देवताओंकी अपने शरीरमें बसनेवाली शक्तिओंका अनुभव करनेवालेको हो सकता है। ' मैं इन्द्र हूँ और मेरे आधीन ये ३३ देव हैं। मैं इनका संचालक हूँ। इसलिये मेरी

उन्नति निश्चित है '– यह वेदके मंत्रोंमें वर्णित ज्ञान है। इस प्रकार अपने मनकी एकाग्रता जिस देवतापर की जायगी, उसकी शक्ति अपने अधीन होकर अपनी सहायिका बन सकेगी।

हमारे पृष्ठवंशमें आठ चक्र है। यथा–मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूरक, सूर्य, अनाहत, विशुद्धि, आज्ञा, और सहस्राधार। इनपर मनके संयमसे अनेक शक्तिओंकी प्राप्ति होती है।

**ये पुरुषे ब्रह्म विदुः ते विदुः परमेष्ठिनम्।** ( अथर्व. १०।७।१७ )

अर्थात् जो पुरुष शरीरमें ब्रह्म देखते हैं, वे परमेष्ठि प्रजापतिको जानते हैं। देव निर्जर है। उन देवोंको ( **संमनसः देवाः** ) अपने मनके अनुकूल कर लेनेमे मनुष्य वृद्ध होनेपर भी जरा–रहित रह सकता है। अधिक आयु होनेपर भी तरुणवत् रह सकता है। वेदमंत्रोंद्वारा प्रतिपादित यह अनुष्ठान मननीय है।

**अंतरेण तालुके ये एष स्तन इव अवलंबते। सा इंद्रयोनिः।** ( ऐ. उ. )

स्पष्ट कहा गया है कि 'तालुके ऊपर मस्तकमें एक स्तन जैसा लटकता है, वही इन्द्रयोनि है।' इन्द्र रस उसी ग्रंथीसे निकलता है। यही रस शरीरको तरुण रखता है। ऐसी ग्रंथियाँ शरीरमें अनेक हैं। आजकल इन ग्रंथियोंके रस इन्जेक्शनोंके लिये बाजारोंमें भी मिलते हैं। विचारणीय यह है कि अपने मनको इन ग्रंथियोंपर एकाग्र करके जीवनरस प्राप्त करना उत्तम है अथवा इंजेक्शनके द्वारा इस रसका शरीरमें भरा जाना अच्छा है। वैदिकधर्म यह बतलाता है कि इन दैवी ग्रंथियोंपर मनके संयमनद्वारा नियंत्रण किया जाना चाहिये।

सज्जन लोग विचार करें कि हमें अपने शरीरको ' पीप–मल–मूत्रका गोला ' मानकर उसका अपमान करना उचित है अथवा इसे शरीरको देवताओंका मंदिर मानकर उसके अंदर बसनेवाली अनेक दैवीशक्तियोंको अपने मानसिक शक्तिके अनुकूल बनाकर अपना लाभ सिद्ध करना। वेदका कथन है कि अपने शरीरको देवताओंका अधिष्ठान मानो और अपने अंदर निहित दैवीशक्तिओंको अधीन करके अपना लाभ सिद्ध करो।

चारों वर्ण परमेश्वरके शरीरके चार अवयव हैं। यह राष्ट्रीय ऐक्य की उच्च कल्पना वेदने प्रकट की है।

**ब्राह्मणोऽस्य मुखमासीद् बाहू राजन्यः कृतः।**
**ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत॥ १२॥** ( ऋ. १०।९० )

ब्राह्मण इसका मुख, क्षत्रिय इसके बाहू, वैश्य इसकी जंघाएं, और शूद्र इसके पाँव है। विराट् पुरुषके ये चार वर्ण चार अवयव हैं। ये चारों एक ही शरीरके चार अवयव हैं। इतनी एकता की कल्पना वर्णित हुई है। वास्तवमें मानवजातिकी एकताकी कल्पना इसमें निहित है। किन्तु हम व्यवहारमें राष्ट्रपुरुषपर लगाकर

इसे देखते है। मानवजातिकी उन्नतीके लिए ऋषियोंने जो प्रयत्न किये, उसका वर्णन अथर्ववेदके एक मंत्रमें इस प्रकार किया गया है—

**भद्रं इच्छन्त ऋषयः स्वर्विदस्तपो दीक्षां उपनिषेदुरग्रे।**
**ततो राष्ट्रं बलमोजश्च जातं तदस्मै देवा उपसंनमन्तु ॥ ( अथर्व. १९।४१ )**

' सब मानवोंका कल्याण करनेवाले आत्मज्ञानी ऋषिओंने प्रारंभसे तप किया और दक्षतासे आचरण भी किया । उससे राष्ट्र बल–ओजका निर्माण हुआ। इसलिये सब विबुध इस राष्ट्रके सामने विनम्रभावसे सेवाके लिये उपस्थित रहें। '

पष्ट है कि ऋषियोंके प्राथमिक प्रयत्नसे राष्ट्रका निर्माण हुआ और इस राष्ट्रका हित करनेके लिए सब मनुष्य तत्पर रहें। मनुष्योंके प्रयत्नसे राष्ट्रकी उत्पत्ति हुई है। अतएव हमें ऋषि–ऋणसे मुक्त होनेके लिए राष्ट्रसेवा करनी चाहिये। इसी विषयमें और भी उल्लेख है।

**आ यद् वां ईयचक्षसा मित्र वयं च सूरयः ।**
**व्यचिष्ठे बहूपाय्ये यतेमहि स्वराज्य ॥ ( ऋ. ५।६६।६ )**

' हे व्यापक दृष्टिवालो, हे मित्रो, हम सब विद्वान् मिलकर ऐसे विस्तृत स्वराज्यके लिए प्रयत्न करें, जिससे सबका पालन बहुसंख्यकोद्वारा किया जाय।'

इस मंत्रमें ' बहूपाय्य स्वराज्य ' की उच्च कल्पना उत्तम रीतीसे वर्णित हुई है, जिसमें बहुतोंकी संमतिसे प्रजापालन होता है। ऐसे विस्तृत स्वराज्यमें जनताके कल्याण करनेके लिए हम सब ज्ञानी संन्नद्ध हो, वही इस मंत्रमें दर्शाया है। यहाँ स्वराज्यके विशेषण ' **व्यचिष्ट** ' और ' बहूपाय्य ' ये दोनों हैं। चारों वेदोंमें राज्य, राष्ट्र आदि शब्द अनेक बार व्यवहृत हुए है। पर स्वराज्यके अतिरिक्त अन्य किसीके लिए इन विशेषणोंका उपयोग नहीं हुआ है। इससे स्वराज्य की महत्ता स्पष्ट है। राज्य और स्वराज्यमें भेद है और बहूपाय्य स्वराज्य उनसे भी श्रेष्ठ है। वह 'जन–राज्य' है। वेदमें वर्णित १०।१२ प्रकारके राज्य–शासनोंमें स्वराज्यको ही ये संज्ञाएँ दी गई है। वेदने स्पष्टतः स्वराज्यकी विशेषतापर प्रकाश डाला है। यह विचारणीय एवं मननीय है।

यहाँ एक बात विशेष विचार करने योग्य है। उपरोक्त मंत्रमें स्वराज्यकी व्याख्याके साथ साथ ही विधानसभाके सदस्योंकी योग्यताका भी उल्लेख हुआ है।

१ **ईयचक्षाः**– सदस्य संकुचित दृष्टिवाले न हो। उनका दृष्टिकोण बहुत व्यापक होना चाहिये।

२ **मित्रः**– ये आपसमें झगडनेवाले न हों और मित्रवत् व्यवहार करनेवाले होने चाहिये।

*

३ सूरी– सदस्यगणोंको विद्वान् होना आवश्यक बतलाया गया है। अर्थात् इनमें किसी ग्रंथकी टीका या भाष्य करनेकी क्षमता भी होनी चाहिए।

ये तीन कसौटियां ' बहूपाय्य ' स्वराज्यकी विधानसभाके सदस्योंकी है। वर्तमान विधानसभाके सदस्योंकी कसौटी २१ वर्षकी आयु मात्र है। इसीलिए हस्ताक्षर न कर सकनेवाले भी सदस्य बने हुए हैं। वैदिक स्वराज्य और इस कालकी विधानसभाके सदस्योंकी योग्यताकी तुलना आजसे कीजिए। फिर आप स्वयं ही निर्णय करें कि कौनसी पद्धति श्रेष्ठ और श्रेयस्कर है।

वेदमें प्रजाको ही शासक ( राजा ) के अंग और अवयव कहा गया है—

**विशो मे अगानि सर्वतः ॥ ८ ॥**

**विशि राजा प्रतिष्ठितः ॥ ९ ॥** ( वा. यजु. २० )

' प्रजाजनोंके आधारपर राजा रहता है और प्रजाजन ही राजरूपी शरीरके अंगादि व अवयव हैं। '

यह कितनी उत्तम कल्पना है कि प्रजाजन और राजासे मिलकर राज्यशासनका एक शरीर निर्मित हुआ। प्रजाके चुने हुए व्यक्तिओं द्वारा राज्यकार्यका संचालन-शासन और, ऐसे राजा व प्रजाकी राज्यशासनमें एकता स्थापित हुई हो, उसमें अन्याय क्या कमी संभव है ?

ऋषियोंके रूपके पुण्यप्रतापसे ' प्रजा ही राजा ' के सिद्धान्तको लेकर सर्वांगीण उन्नतीके लिये प्रभावशाली शासनकी परंपरा प्रतिष्ठित हुई। इस राज्यशासनकी आधारभित्ति प्रत्येक ग्राममें स्थापित ग्रामसभाएं थी, उनमे राष्ट्रसमितिका निर्माण हुआ तथा शासनतंत्र शुरू हुआ। वेदमें ग्रामसभाका उल्लेख है—

**सा उदक्रामत् सा सभायां न्यक्रामत् । सा उदक्रामत् सा समितौ न्यक्रामत् ॥**

**सा उदक्रामत् सा आमंत्रणे न्यक्रामत् ।** ( अथर्व. ८।१०।८,१०,१२ )

' जनशक्तिकी उत्क्रांतिसभा, समिति और आमंत्रण ( मंत्रिमंडळ ) में परिणत हुई। ' ग्राममे ग्रामसभाका निर्माण हुआ, राष्ट्रमें राष्ट्रसमिति बनी और उसके बाद मंत्रिमंडलका गठन हुआ तथा शासनका कार्य संचलित हुआ। ऋषियोंक तपसे ग्रामोंमें ग्रामसभाएं स्थापित हुईं और ग्रामोंका कार्य विधिवत् चलाया जाने लगा। इसी प्रकार राष्ट्रसमिति व मंत्रिमंडल बने और इनके द्वारा राष्ट्रका शासन होने लगा। ऋषियोंके तपका यही अर्थ है। राज्यशासन शुरू हो जानेपर ऋषियोंकी कामना क्या थी, उसका आभास इससे मिलता है—

**' समुद्रपर्यन्तायाः पृथिव्याः एकराट् '** ( ऐतरेय. )

अखंड पृथ्वीपर एक विधानसे राज्यका संचालन हो, यह ऋषियोंकी आकांक्षा थी। आजके ' यूनो ' या संयुक्त राष्ट्रसंघ और प्राचीन ऋषिकाल ( **पृथिव्याः एकराट्** )

की कल्पना समान उद्देश्यकीसी प्रतीत होती है। हमारे ऋषियोंकी यह महत्त्वाकांक्षा सबके आनंदका विषय है । ये ऋषि उस प्राचीन समयमें भी समस्त पृथ्वीपर एक राज्य तथा सर्वजन सुखार्थकी भावनासे परिपूरित एक ही विधान हो, ऐसी अपेक्षा करते थे, जो हम आज चाहते हैं, विश्वके समस्त राष्ट्र जिसे चाहते हैं । विश्वमें स्थायी शान्ति, सुख और कल्याणकी यह मनोमुग्धकारी कल्पना भारतीय संस्कृतिकी देन है, ऋषियोंके पवित्र तपसे उद्भूत निधि है, वेदादिशास्त्र जिसके प्रमाण हैं ।

वैदिककालमें राज्यका सेनाविभाग भी नियम और अनुशासनबद्ध था । वे सात-सातके पंक्तिमें चलते थे । एक स्थानपर रहते थे तथा उन सबका देश और शस्त्रास्त्र समान होते थे । आज पश्चिमके देशोंमें जैसी सेना होती है, उसी प्रकारकी वैदिककालमें होती थी । आश्चर्यकी बात है कि यहाँ वेदका पठन-पाठन तो होता था, वैदिकोंको दक्षिणा भी मिलती रही परंतु हमारी सेना अनुशासनबद्ध नहीं थी । वेदज्ञानका उपयोग भी हो सकता था, यही पता नही था । इससे सिद्ध होता है कि वेदज्ञानके सच्चे प्रचारकी आवश्यकता है ।

वेदमें हम देखते हैं कि पुरोहित ही सैन्यकी व्यवस्था करता है, सैनिकोंको शिक्षित करता है । तथा किलोंकी रक्षा करता है ।

**संशितं मे इदं ब्रह्म संशितं वीर्यं बलम् ।**
**संशितं क्षत्रं अजरं अस्तु जिष्णुः येषामस्मि पुरोहितः ॥ १ ॥**
**नीचैः पद्यन्तां अधरे भवन्तु ये नः सूरिं मघवानं पृतन्यान् ।**
**क्षिणामि ब्रह्मणामित्रानुन्नयामि स्वानहम् ॥ ३ ॥**
**तीक्ष्णीयांसः परशोः अग्नेस्तीक्ष्णतरा उत ।**
**इन्द्रस्य वज्रात् तीक्ष्णीयांसो येषामस्मि पुरोहितः ॥ ४ ॥**
**एषां अहं आयुधा संस्यामि एषां राष्ट्रं सुवीरं वर्धयामि ।**
**एषां क्षत्रं अजरं अस्तु जिष्णुः एषां चित्त विश्वेऽवन्तु देवा. ॥ ५ ॥**

( अथर्व. ३।१९ )

' मेरा यह ज्ञान तेजस्वी हो, मेरा यह वीर्य और बल तेजस्वी हो, क्षात्रसामर्थ्य अविनाशी हो । जिनका मैं पुरोहित हूँ, उनका तेज बढे । हमारे ज्ञानी और धनी मित्रोंपर जो सेना लेकर हमला करते हैं, वे नीचे गिरे अवनत हों । ज्ञानसे मैं शत्रुओंको क्षीण करता हूँ तथा स्वजनोंको उन्नत करता हूँ। जिनका मैं पुरोहित हूँ उनके शस्त्र अग्नि तथा इन्द्रके वज्रसे भी अधिक तीक्ष्ण बनाता हूँ,। उनके राष्ट्रको वीर्यवान् करके शक्तिशाली बनाता हूँ । उनका क्षात्रतेज अविनाशी है । सब देव उनके चित्तका संरक्षण करें । '

यह पुरोहितका वक्तव्य है। उस समयका पुरोहित यह सब करता था । सेनाकी शिक्षा, शस्त्रास्त्रोंकी व्यवस्था, किले तथा नगरीकी रक्षा, शत्रुपर हमला तथा आक्रमणसे अपने राष्ट्रकी रक्षा आदि उसीके काम थे । क्षत्रिय लडते अवश्य थे परंतु

योजना बनानेवाला पुरोहित ही होता था । कहा गया है—

**दण्डा इव इत् गो-अजनास आसन् परिच्छिन्ना भरता अर्भकासः ।**
**अभवच्च पुर एता वसिष्ठः आदित् तृत्सूनां विशो अप्रथन्त॥ ( ऋ. ७।३३।६ )**

' गौओंको चलानेवाले कोमल दण्डोंके समान भारत देशके लोग कोमल प्रकृतिके तथा आपसमें झगडनेवाले थे । वसिष्ठ इनका पुरोहित हुआ और उनकी उन्नति हुई ।'

मनु कहता है—

**चतुर्वर्ण्यं त्रयो लोकाश्चत्वारश्चाश्रमाः पृथक् ।**
**भूतं भव्यं भविष्यं च सर्वं वेदात् प्रसिध्यति । ( मनु. १२।९७ )**
**सैनापत्यं च राज्यं च दण्डनेतृत्वमेव च ।**
**सर्वलोकाधिपत्यं च वेदशास्त्रविदर्हति॥ ( मनु. १२।१०० )**

चार वर्ण, तीन लोक तथा चार आश्रम और तीन कालोंमें होनेवाले सब कर्तव्य वेदसे सिद्ध होते हैं । सेनापतिका कार्य, राज्यशासन, दण्डनीतिका व्यवहार तथा सब लोकोंपर अधिकारके सभी कार्य वेद जाननेवाला सुगमतासे कर सकता है । '

मनुस्मृतिकी यह साक्षी देखकर प्रतीत होता है कि वेदमें व्यक्तिगत, सामाजिक तथा राष्ट्रीय सभी कर्तव्योंका निर्देश है । इसलिए आजके दिन वेदका अध्ययन तथा संशोधन करनेकी विशेष रूपसे आवश्यकता है । हम अपनी क्षमताके अनुसार कई भाषाओंमें प्रकाशनका यह कार्य कर रहे हैं । और भी बहुतसा कार्य करना शेष है । हमारी इच्छा है कि पाठ्यपुस्तकोंके रूपमें वेदज्ञानको प्रकाशित करें, जिससे उसे सभी बालक अपने स्कूलकी शिक्षाके साथ ही पढ सकें । साथ ही वैदिक सूक्तियोंके संकलन, जो बहुत बोधक तथा उत्साहवर्धक हैं, प्रकाशित किये जाँये । वेदसंबंधी विभिन्न विषयोंपर, जनताकी दृष्टिसे, हम बहुतसे छोटे छोटे व्याख्यान भी प्रकाशित कर रहे हैं, जिनका मूल्य भी बहुत अल्प है ।

यह समस्त कार्य बहुत बडा है । किसी भी एक व्यक्तिके लिये उसे करना संभव नहीं । इसके लिए बहुतसे विद्वान् एकसाथ लगने चाहिए तथा बहुतसा धन भी अपेक्षित है । इस उत्सवसे यह सिद्ध होता है कि वैदिकधर्मके प्रति जनतामें प्रेम बढ रहा है । अखिल भारतके श्रेष्ठ पुरुषोंमें इसका महत्त्व स्वीकृत हुआ है । वह प्रकाशनके ठोस कार्यमें परिणत हो, यही परमेश्वरके निकट मेरी प्रार्थना है । अन्तमें, फिर एकबार, अपने इस अभिनंदनके लिए, मैं आपको हार्दिक धन्यवाद देता हूँ । मैं आशा करता हूँ कि आप सब वैदिकधर्मकी उन्नतिके लिए, जो भारतीय संस्कृतिका मूल है, परंतु जिसे हम आज विस्मृत कर चुके हैं, यथाशक्ति प्रयत्न करेंगे । '

सौ. आशाताई फडके यानी 'आमुचा प्रणाम घ्यावा ' हे कवन म्हणून ते पंडित-जींना अर्पण केले. आभारप्रदर्शनाचे कार्य म. म. द. वा. पोतदार यानी केले व हा संस्मरणीय समारंभ संपला.

## ( १५ ) श्री पं. सातवळेकर यांना डी. लिट्. चा पदवी–दान समारोह

'प्राचीन ऋषीच्या कार्याप्रमाणेच पंडित सातवळेकराच्या जीवनकार्यातून एक स्वतंत्र जीवनदर्शन घडले आहे' अशा आशयाचा महत्त्वपूर्ण विचार डॉ. त. गो. माईणकर यानी पंडितजींच्या पारडी येथील निवासस्थानातील वेदमंदिरांत पुणे-विद्यापीठाने त्याना दिलेले मानचिन्ह प्रदान करण्यासाठी झालेल्या समारंभप्रसंगी रविवार दि. १०।४।६६ रोजी प्रगट केला.

डॉ. माईणकर, पुणे विद्यापीठाच्या वाङ्मयशाखेचे प्रमुख असून ते विद्यापीठाचे प्रतिनिधि म्हणून आले होते. त्यांचे समवेत विद्यापीठाचे डे. रजिस्ट्रार श्री. सर-देशपांडे ही होते.

सदर मंगलप्रसंगीच्या भाषणांत श्री. माईणकर म्हणाले, वेदविद्या प्रदान करणाऱ्या संहितांचे संशोधन व संकलन करण्याचे पंडितजींनी चालविलेले हे कार्य अप्रतिम असून भारतीयशास्त्राच्या अभ्यासात एक अजोड कार्य म्हणूनच ते राहिल हे निःसंशय. पंडितजींच्या या ऋषितुल्य जीवनात संशोधन, देशभक्ति व कला या त्रिवेणीचा सुंदर संगम झाल्याचे अनुभवास येते आणि म्हणून एक अभिमानाचे स्थान म्हणून आम्ही त्यांच्याकडे बघत आहोत. त्याना पुणे विद्यापीठाची पदवी अर्पण करून आम्ही आमचाच गौरव करून घेत आहोत.

मानचिन्ह–प्रदान–समर्पण प्रसंगी बडोद्याच्या महाराज सयाजीराव विश्वविद्या-लयाचे प्रतिनिधि म्हणून डॉ. श्री. भोगीलाल सांडेसरा व गुजरात विद्यापीठाचे प्रतिनिधि या नात्याने नवसारीचे श्री. लालभाई नायक उपस्थित होते.

डॉ. श्री. सांडेसरा या प्रसंगीच्या आपल्या भाषणात म्हणाले, सांस्कृतिक दृष्टया हा कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. पंडित सातवळेकरांचे सारे जीवन ज्ञानसेवेत गेले आहे. संस्कृत साहित्याची सेवा ही त्यांची साधना आहे. या साधनेमुळें प्रजेने त्यांच्या कार्याचा हृदयापासून सन्मान केला आहे. पंडितजींनी ज्या परंपरेच्या सन्मानासाठी आपले जीवन अर्पण केले त्या परंपरेचाच हा सत्कार आहे. प्राचीन ऋषिजीवना-विषयी आपण जे वाचीत आलो आहोत ते आपले संपूर्ण जीवन ज्ञानदानाच्या साधनेत घालवून पंडितजींनी आपल्या जीवनात साकार करून दाखविले आहे.

ही घटना समकालीन असल्याने तिचे महत्त्व फार ध्यानी येत नाही अशी स्थिति असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले, पंडितजींनी अर्धशतकपर्यंत अव्याहतपणे ही साधना निष्ठेने केली आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात कुलगुरुत्व वा विद्यागुरुत्व झाले एवढेच नव्हे तर आर्षद्रष्टेपण निर्माण झाले हे मान्य करावे लागते, आणि त्यामुळें त्यांचा सन्मान करावा तेवढा कमीच आहे.

'लोकाना नीति व अध्यात्मिकतेकडे वळविण्याकरितां पंडित सातवळेकरानी अव्याहतपणे पुरुषार्थ आदरला' असे व्यक्त करून गुजरात विद्यापीठाचे प्रतिनिधि

श्री. लालभाई नायक पुढे म्हणाले, आपल्या कार्यासाठी संस्कृत साहित्याचे संशोधनात्मक महान् कार्य केले, संस्कृतच्या प्रचारासाठी त्यांनी हा सर्व प्रयत्न केला असे नव्हे तर या कार्याद्वारा सुलेह व शांतीने जीवन जगण्याचा धडा त्यांनी जगाला दिला. त्यांच्या या कार्याचा गौरवकरून गुजरात विद्यापीठाच्या वतीने त्याचा आदर करीत असताना मला आनंद होत आहे !!

'श्रद्धेय पंडित सातवळेकर यांचा सत्कार भारताच्या राष्ट्रपतिद्वारा 'भारतरत्न' पदवी अर्पण करून व्हावयास हवा' असे व्यक्त करून मुंबापुरीनिवासी प्रसिद्ध उद्योगपति शेठश्री प्रतापसिंह शूरजीवल्लभदास याप्रसंगी विचार प्रगट करताना पुढे म्हणाले, 'आजचा हा पंडितजींच्या सत्काराचा दिवस न केवळ पारडीकराना, गुजरातला व महाराष्ट्राला गौरवरूप आहे तर साऱ्या भारताला गौरवरूप आहे. स्वार्थाचा विचार सोडून ज्या पंडितजींनी आपले सारे जीवन देशासाठी अर्पण केले अशा भारताची असीम सेवा करणाऱ्या पंडितजींचा सत्कार आज होत आहे. वयाला शंभरी होत आहे तरी ते वेदकार्यात संलग्न आहेत. ज्या संस्कृतात सभ्यतेची मूल्ये रत्नरूपाने भरलेली आहेत. ती रत्ने सर्वसामान्य जनतेला कशी प्राप्त होतील यासाठी ज्या पंडितजींनी जन्मभर पुरुषार्थ आदरला त्याचा पुणे विद्यापीठाने जो हा सत्कार केला आहे त्याद्वारा विद्यापीठाने स्वतःचाच गौरव करून घेतला आहे. उत्कृष्ट ब्राह्मणनिर्मितीच्या वेदकार्यात त्यांनी जे कार्य व पुरुषार्थ केला आहे तो चिरंतन टिकेल. विदेशात अशी व्यक्ति असती तर तिच्यामागे लोक वेडे झाले असते. आपल्याकडे मात्र अद्याप त्यांच्या या कार्याचे महत्त्व समजले नाही असे वाटते !

'यशस्वी जीवन जगण्यासाठी विशिष्ट साधना—मार्गातून त्यास घडवावे लागते त्याकरिता विशिष्ट प्रक्रियेत त्याला सोडावे लागते अशी जीवन घडविणारी एक प्रक्रिया पंडित सातवळेकरांनी आपल्या केवळ साहित्यातून नव्हे तर प्रत्यक्ष जीवनातून आपल्या सन्मुख ठेविली आहे. तिच्या साह्याने पुढील पिढी तरी यशस्वी जीवन जगण्याचा पुरुषार्थ करील अशी परिस्थिति निर्माण करण हे अन्याचे वास्तविक कार्य आहे, ते अंशात्मकतेने पार पाडण्याची जरी प्रेरणा या पावन कार्यक्रमातून झाली तरी या कार्यक्रमाचे चीज झाले असे म्हणावयास प्रत्यवाय नाही !!' अशा आशयाचा विचार व्यक्त करून त्या प्रसंगी श्री. द. ए. देशपांडे पुढे म्हणाले, 'पुणे विद्यापीठाने पंडितजींचा हा सत्कार करून एक आदर्श आपल्या सन्मुख प्रस्तुत केला आहे. अन्यानीं अनुकरण करावे अशी प्रार्थना. संपूर्ण राष्ट्रात पंडितजींच्या साहित्यसाधनेतून व जीवनातून प्रगटले त्या प्रक्रियेचा जोरदार प्रचार व प्रसार करून योग्य 'टेंपो' निर्माण केला तर राष्ट्रासमोर आज जे अनेक कूट प्रश्न उभे आहेत, त्याच्या निराकरणार्थ योग्य मार्गदर्शन मिळेल यात शंका नाही.'

कार्यक्रमारंभी श्री. वसंतराव सातवळेकर यांनी उपस्थिताचा सत्कार केला, शेवटी श्री. श्रुतिशील शर्मा यानी धन्यवाद दिले. या कार्यक्रमासाठी पुण, बडोदा,

मुंबई, बेळगांव, हैद्राबाद, उंबरगाव, डहाणू, वापी, बलसाड, बिलिमोरा आदि सुमारे १७–१८ ठिकाणचे पंडितजींच्या कार्याने चाहते स्त्रीपुरुष नागरिक उपस्थित होते.

## ब्रह्मर्षि पं. सातवळेकरजींनी सत्कारास दिलेले उत्तर

' वैदिक कालातील संस्कृति व सभ्यता अतीव उन्नत होती. भौतिक व आध्यात्मिक या दोन्ही क्षेत्रात त्याकाळचे साहित्य उत्तम स्वरूपाचे होते, केवळ आध्यात्मिक विद्येंतच आमचे ऋषिमुनि विकसित होते असे नव्हे, तर भौतिकशास्त्रातहि ते चांगलेच प्रगत होते ' या विधानाच्या पुष्टयर्थ कित्येक आश्चर्यकारक बाबी ४८–४९ वर्षांच्या वेदविद्येच्या अभ्यासात मला समजल्या ' अशा आशयाचा विचार ब्रह्मर्षि पं. सातवळेकर यानी या सत्कारास उत्तर देत असताना प्रकट केला.

हा सत्कार करणाऱ्याना धन्यवाद देताना ते म्हणाले,' आज माझा जो हा सन्मान होत आहे तो माझा नसून ज्या वेदभगवानाच्या प्रकाशात मी आजपर्यंत कार्य करीत आलो आहे त्याचा आहे. '

' भौतिकविद्याना उन्नत करण्यात वैदिककालीनाचे लक्ष्य सांगताना पंडितजी म्हणाले, ' आपल्या मातृभूमीची उन्नति करणे हे त्याचे एकमेव लक्ष्य होते, प्रत्येक गोष्ट तिच्या चरणी अर्पण करण्यास ते सतत तयार असत. म्हणून वैदिक राष्ट्रगीतात म्हटले आहे ही भूमि आमची माता आहे, आम्ही तिचे पुत्र आहोत. या अर्थाचे सूक्त अथर्ववेदात आहे. '

' **सं श्रुतेन गमेमहि मा श्रुतेन विराधिषि** ' हे परमेश्वरा ! आम्ही नेहमी ज्ञानानुकूल राहावे, ज्ञानविरोधी न व्हावे, शिक्षण हा राष्ट्राचा पाया आहे हे ध्यानी घेऊन ऋषींनी आश्रमाची स्थापना केली होती असे सांगून ते पुढे म्हणाले,' ते आश्रम वस्तुतः विश्वविद्यालयेच होती. '

**तिस्रः क्षपः त्रिः अह अतिव्रजद्भिः नासत्या भुज्युं ऊहथुः पतंगैः ।**
**समुद्रस्य धन्वन् आर्द्रस्य पारे त्रिभी रथैः शतपद्भिः षळश्वैः ॥**

हे अश्विनौ ! सहा घोड्याच्या, शंभर पाय असलेल्या, सागर, रण, नद्या आदीना पार करून जाणाऱ्या या लागलगाट तीन दिवसपर्यंत उडणाऱ्या पक्षाच्या सहाय्याने भुज्युंना उठविले. हे अश्विनौ ? तुमचे तीन चाकाचे रथ, वायुप्रमाणे वेगवान्, त्यापेक्षाहि अधिक म्हणजे मनाप्रमाणे वेगवान् व शीघ्र गतियुक्त पक्ष्याप्रमाणे जाणारे आहेत ' अशा स्वरूपाच्या विमानाची वर्णने वेदात असल्याचे प्रकट करून श्री. पंडितजी पुढे म्हणाले,' शरीरचिकित्सा शास्त्रे ' याशास्त्रातहि ऋषिमुनि निपुण होते, आयुर्वेदाचे आधारे त्याना चांगलीच सफलता प्राप्त झाली.

' हे सर्व ज्ञान संपादन करण्यासाठी हृदयात आवश्यक प्रकाश देणाऱ्या वेदाचा मी ऋणी असून त्या प्रकाशानेच लोकाची सेवा करण्याची ही संधि प्राप्त करून दिली ' असे भावपूर्ण उद्गारहि त्यानी काढले.

## ( १६ ) वेदमूर्ति पं. सातवळेकरांचा शंभराव्या वर्षात प्रवेश

१९ सप्टेंबर १९६६ चा तो पुण्यदिवस. तोहि दोन्ही दृष्टीने पवित्र गणेशोत्सवातील दिवस. गणपति ही वीरश्रीची साक्षात् प्रतिमूर्ति आणि हिंदूची आदर्श देवता '**गणानां गणपति**'. ऋषि पंचमीहि होती त्यादिवशी आणि वेदमूर्ति पं. सातवळेकरांचा शंभराव्या वर्षात आंग्ल वर्षगणनेप्रमाणे प्रवेश होत होता. असा हा पवित्र संगम होता. जरी त्यादिवशी फक्त सत्यनारायणाची सकाळी पूजा करून दुपारी शुभचिंतनपर शुभेच्छा अर्पण करण्याचा छोटासाच समारंभ करावा असे ठरले होते, तरीहि हा छोटासा समारंभ पुष्कळशा हितचिंतकाच्या आणि पाहुण्याच्या आगमनाने जरासा मोठाच झाला.

त्यादिवशी सकाळपासूनच स्वाध्यायमंडळाचे आवार शुभचिंतनपर मधुर शब्दानी गुंजायमान झाले होते.

सकाळी ८ वाजता दीर्घायुष्य इच्छिणारा यज्ञ सुरू झाला. पंडितजी आणि त्यांच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई यांनी उत्साहाने यात भाग घेतला. यज्ञकर्म स्वाध्यायमंडळातील पंडित श्रुतिशील शर्मा यानी केले. या यज्ञाच्या वेळी श्री पंडितजींच्या मुखाने वेदमंत्राचे उच्चारण ऐकण्याचे सौभाग्य अनेकाना लाभले. गंभीर स्वराने उच्चारलेल्या वेदमंत्राच्या ध्वनीने प्राचीनकालीन ऋषीच्या तपोवनाची आठवण सर्वांना झाली.

यानंतर सत्यनारायणाची पूजा झाली आणि नंतर 'गणपति' ची पूजा आरती झाली. या यथासांग पूजाविधिने सर्वांच्या अंतःकरणांत भक्तिरसाची गंगा जणू वाहू लागली. संध्याकाळी ४॥ वाजता स्वाध्यायमंडळाच्या वेदमंदिरात श्री पंडितजींच्या सन्मानार्थ एक सभा झाली. सभेला बाहेरूनहि बरीच मंडळी आली होती. वेदमंदिर स्त्रीपुरुषांच्या उपस्थितीने भरून गेले होते.

वैदिक राष्ट्रगीत '**आ ब्रह्मन् ब्राह्मणो**' या वेदगीताने सभेची सुरुवात झाली.

वदिक प्रार्थनेनंतर अहमदाबादचे प्रसिद्ध वकील आणि जनसंघाचे नेते श्री वसन्तराव गजेन्द्रगडकर, दक्षिण गुजरातभागाचे संघप्रचारक श्री केशवराव देशमुख, उंबरगावचे श्री दत्तात्रेय ए. देशपांडे, व अमळनेर येथील संस्कृत विद्यामंडळाचे संचालक डॉ. दा. वि. गर्गे यांनी श्रद्धांजली वाहिली.

'आम्ही अमळनेरला संस्कृत विद्यामंडळाची स्थापना केली, त्यांच्या मागे श्री पंडितजींचीच प्रेरणा आहे. एकलव्याने ज्याप्रमाणे गुरु द्रोणाचार्यांची प्रतिमा बनवून आपल्याला शस्त्रास्त्र विद्या मिळविली, त्याचप्रमाणे आम्ही श्री पंडितजींचा फोटो ठेवून शाळेची स्थापना केली आणि आज विद्यामंडळ अत्यंत चांगल्या रीतीने चालत आहे. ही परमात्म्याची कृपा आणि श्री पंडितजींचा आशीर्वाद याचे फळ आहे.'

याप्रमाणे बोलून त्यानी विद्यामंडळाच्या वतीने रु. १०१ = भेट अर्पण केली.

नंतर डहाणू येथील हायस्कूलातील संस्कृतचे शिक्षक श्री भंडारी आणि मुंबईचे विख्यात पत्रपंडित श्री श्री. रा. टिकेकर यानी शुभकामना प्रकट केल्या.

तदनंतर संस्थेचे पंडित श्री श्रुतिशील शर्मा यानी श्री पंडितजींच्या आयुष्यातील काही आठवणी सांगितल्या.

शेवटी सन्मानाचे उत्तर देताना श्री पंडितजींनी आपल्या दीर्घजीवनाच्या प्रमुख गोष्टीबद्दल सांगितले. ते म्हणाले—

' प्राचीनकाळी बहुतेक सर्व १०० वर्षांच्या वर आयुष्याचे होते. आज भौतिक विचाराचा पगडा वाढला आहे, त्यामुळे आयुर्मर्यादा कमी झाली आहे. आपण जर अध्यात्माची कास धरली तरच आपले आयुष्य निरोगी आणि दीर्घ होईल. हाच एक उपाय आहे. '

यानंतर राष्ट्रगीत होऊन सभा समाप्त झाली.

( २ )

भारताला ललामभूत असलेले प्रसिद्ध वेदव्याख्याते पं. डॉ. श्री. दा. सातवळेकर यांच्या वयाला भाद्रपद वद्य ६ ला ( ता. ६–१०–६६ ) भारतीय कालगणनेनुसार १०० वे वर्ष लागले. यानिमित्त स्वाध्यायमंडळ, पारडी येथे एक सुंदरसा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रातःकालची मंगल वेळ. सगळीकडे उत्साह आणि आनंद भरून राहिला होता. मंडळाच्या बागेतील फुललेल्या फुलांबरोबर लोकाचीहि मने आनंदोत्साहाने फुलली होती. सर्वांचा उत्साह ओसंडून वहात होता.

मंडळाच्या आवारात एक विशाल मंडप घालण्यात आला होता. त्यात मध्यभागी एक वेदि होती. बरोबर साडे आठ वाजता तेथील आसपासचे सर्व वातावरण महाराष्ट्रीय वेदपाठी याच्या वेदमंत्रानी निनादित झाले. प्राचीन भारतीय तपोवनाचीच यामुळे सर्वांना आठवण झाली. यासाठी मुद्दाम मुंबईहून पांच वेदपाठी ब्राह्मणाना आमंत्रिले होते. वेदपाठ सुरू असतानाच, शतायुषी पंडितजी समोरून येताना दिसले, आणि ते येताहेत असे पाहून ब्राह्मण–उपाध्यायानी स्वस्तिवाचनास आरंभ केला. सकाळी ८॥ ते १२ पर्यंत वेदपाठ आणि होम–हवनाचा कार्यक्रम होता. पंडितजींचे ज्येष्ठ चिरंजीव श्री वसंतराव यांनी आपली पत्नी सौ. लतिकाबाई यासह यज्ञाचे यजमानपद पंडितजींच्या अनुज्ञेने स्वीकारले होते. या यज्ञकर्माचे नाव ' वर्षवर्धापन कर्म ' होय. यावेळी मुंबईहून आलेल्या पाच वेदपाठी ब्राह्मणानी आणि गुजरातेचे प्रख्यात संत परम पूज्य श्री रंगअवधूत महाराज यानी मुद्दाम आपले प्रतिनिधि म्हणून पाठविलेले श्री चंद्रकान्त शुक्ल यानी आपल्या सुस्वर वेदपाठामुळे सर्व वातावरण अगदी पवित्रतम केले.

अशाप्रकारे यज्ञाचा सर्व कार्यक्रम यथासांग पार पडला. यज्ञाच्या वेळी मुद्दाम परम पूजनीय सरसंघचालक श्री गुरुजी हे उपस्थित राहिले होते आणि त्यांनी त्यात

भाग घेतला. हवनाच्या पूर्णाहूतीनंतर पंडितजी व त्याच्या पत्नी सौ. सरस्वतीबाई यांना लोकानी पत्रपुष्प अहेर देऊन त्यांच्या विषयीचा आपला आदरभाव व श्रद्धा प्रकट केली.

नंतर भोजनानंतर संध्याकाळी ठीक ५ वाजता सन्मानसभेच्या कार्यक्रमास सुरूवात झाली. अध्यक्षस्थान श्री गुरुजींनी विभूषित केले होते. अगोदरच पवित्र असलेल्या भूमीवर पावित्र्याची भर टाकणाऱ्या वैदिक मंत्रानी या सभेस सुरूवात झाली. नंतर श्री वसंतराव यांनी सर्वांचे यथोचित स्वागत केले. ते म्हणाले—

' श्री पंडितजी–जन्मशतीच्या शुभप्रसंगी या संस्थेच्या आवारात आपणां सर्वांचे स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे. परमपूजनीय गुरुजींचा सर्व वेळ देशसेवेच्या कार्यात सर्वस्वी लागलेला असतो, हे मला पूर्ण माहित आहे. असे असताहि, ते आमच्या नम्र विनंतीला मान देऊन येथे आले, याबद्दल मी त्याचा अत्यंत ऋणी आहे. '

' श्री पंडितजींचे वेदभाष्य हे त्यांच्या स्वतःच्या मननाचा आविष्कार आहे. त्यांचे भाष्यग्रंथ हे कोणाहि दुसऱ्या भाष्यकाराच्या ग्रंथावर आधारित नाहीत. यामुळे त्यांचे ग्रंथ हे सर्वाहून निराळे असे आहेत. त्यांच्या वैशिष्टयाचे कारण वेदज्ञानाची गहनता हेच आहे. '

यानंतर संदेशवाचन झाले. त्यावेळी भारताचे राष्ट्रपति, उपराष्ट्रपति, प्रधानमंत्री, श्री स. का. पाटील, श्री यशवंतराव चव्हाण, डॉ. पी. वी. चेरियन्, श्री नित्यानंद कानूनगो, श्री हितेन्द्रभाई देसाई, श्री शेठ जुगलकिशोर बिरला आदि नेत्यांचे शुभ-संदेश वाचून दाखविण्यात आले.

नंतर स्वाध्यायमंडळाच्या कार्यकर्त्यांकडून श्री पंडितजींना एक मानपत्र अर्पण करण्यात आले. मानपत्र अर्पण करताना परीक्षामंत्री श्री डाह्याभाई पटेल यानी सांगितले की, ' श्री पंडितजींनी आजपर्यंत आपल्या आयुष्यात जे प्रचंड कार्य केले, त्याची कल्पना करणे अशक्य आहे. त्यांचे जीवन क्रांतिकारी, देशभक्त, गीताभक्त, वेदभक्त या सर्व पैलूंनी परिपूर्ण आहे. त्यांच्या जन्मशताब्दीच्या शुभप्रसंगी हे सन्मानपत्र अर्पण करताना आम्ही सर्व परमात्म्यापाशी त्यांना आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य प्राप्त होवो, अशी प्रार्थना करतो. '

पं. श्रुतिशील शर्मा यानी मंडळाच्या आतापर्यंत झालेल्या व सध्या चालू असलेल्या कार्याची माहिती सांगून पुढील कार्यक्रमाची थोडक्यात कल्पना दिली. ऋग्वेद व महाभारत याच्या हिंदी अनुवादाची तयारी चालू झाली आहे. संस्कृत लोकप्रिय करण्यासाठी एक संस्कृत पाठशाला उघडण्याची योजना आहे. परंतु सरस्वती व लक्ष्मी या दोघींची उपासना बरोबर होऊ शकत नाही. तरी देखील ' **क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे.** '

यानंतर मराठीतील एक प्रसिद्ध लेखक श्री सदानंद चेंदवणकर यांनी पंडितजींच्या मराठीत लिहिलेल्या चरित्रग्रंथाचे प्रकाशन झाल्याचे श्री गुरुजींनी जाहीर केले. चरित्रग्रंथाची थोडक्यात ओळख श्री द. ए. देशपांडे यांनी करून दिली. ते म्हणाले– ' सर्व महापुरुषांची चरित्रे मनुष्याला प्रेरणादायक असतात. त्या महापुरुषांनी आपल्या जीवनात किती मोठ्या संकटाना कसे तोंड दिले, हे वाचून सर्वसाधारण मनुष्यहि त्याचप्रमाणे संकटातून आपला मार्ग काढण्याचा प्रयत्न करतो. याच दृष्टीने थोरांची चरित्रे लिहिली आणि वाचली जातात. '

यानंतर पंढरपूरजवळील माचणूर येथील प्रसिद्ध संत बाबा महाराज यांनी पंडितजींच्या कार्याचा गौरव करताना सांगितले—

' पंडितजींना इतर कोणत्याहि पदव्या देण्याऐवजी मी तर त्यांना ' वेदज्योति ' च म्हणतो. ज्योतीचे जे कार्य तेच पंडितजींनी केले आहे. या ज्योतीवर अनेकांनी आपले दिवे लावून घेतले आहेत. '

' आजचा हा प्रसंग शुभ अवसर आहे, त्याचप्रमाणे उत्साहवर्धक आहे. उत्साह याचा अर्थ काय ? आंतर्चेतना जागृत करणारी भावना म्हणजेच उत्साह. सुप्तशक्तीची जागृति होणे अत्यावश्यक आहे. अशी जागृति निर्माण करण्यासाठी परमेश्वराने वेळोवेळी अवतार घेतले आहेत. भगवद्गीतेत सांगितले आहे की ' **यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्** ' अशीच परिस्थिति आजच्या काळात आहे. पंडितजींच्या कार्यातून आपण उत्साह घेतला पाहिजे.

' पंडितजींनी वेदाच्याच अभ्यासास का सुरूवात केली ? मला तरी असे वाटते की पंडितजी वेदाध्ययनाकडे वळले असावेत ते वेदानी भारताच्या सर्वोच्च संस्कृतीची स्पष्ट कल्पना दिली आहे म्हणून. वेद हे सर्व जगाचे भाग्य आहे. वेद हे मानवी जीवनाची ज्योत आहेत. आत्म्याला परमात्म्याजवळ नेणारे वेद आहेत. त्या वेदांचे अध्ययन करून पंडितजी वेदस्वरूप झाले आहेत. वेदात सांगितलेली ही संस्कृति, ही सभ्यता जेव्हा नष्ट होते तेव्हा माणूस मरतो; नाही तर तो अमरच आहे. या दृष्टीने पाहिल्यास पंडितजी हे एक आदर्श पुरुष आहेत–फक्त भारताचेच नव्हे तर संपूर्ण विश्वाचेच ते आदर्श पुरुष बनतील. पण केव्हा ? या वेदज्योतीचा प्रकाश आम्ही जगभर फैलावू तेव्हा ! या ज्योतीचे तेज आम्ही प्रज्ज्वलित करू तेव्हा ! फक्त पंडितजींना वंदन करून भागणार नाही. त्यांच्यासारखे अनेक पंडितजी या देशात होवोत हीच इच्छा ! आज सर्वजण धन व दौलतीच्या पाठीमागे लागलेले दिसतात, परंतु धन व दौलत यापेक्षा संस्कृतीची आवश्यकता माणसाला आहे. काही आदर्शाची आवश्यकता आहे. हे आदर्श आम्हाला वेदानी दिले, म्हणून पंडितजी वेदाची भाषांतरे करण्यास प्रवृत्त झाले असावेत, अशी माझी कल्पना आहे.

' पंडितजींनी हे रोपटे लावले आहे. त्याची वाढ करणे, हे आमचे कर्तव्य आहे. त्याचे पालन पोषण न करता त्याला फळें लागतील असे मानणे हे मूर्खत्वाचे द्योतक आहे. याप्रसंगी पंडितजींचे मी शुभचिंतन करून मी माझे वक्तव्य संपवितो. '

महाराज सयाजीराव विद्यापीठाचे डॉ. अनंत गणेश जावडेकर पंडितजींच्याबद्दल आपल्या शुभेच्छा व्यक्त करताना म्हणाले—

' पंडितजी हे संस्थारूप आहेत. त्यांची संस्था व आयुष्य समाजाच्या समुत्कर्षाला आवश्यक आहेत. जितके ग्रंथ एखादा लिहील तितके त्याचे आयुष्य मानले जाते; या दृष्टीने पाहिल्यास पंडितजींचे आयुष्य आज ४ शतकांचे आहे. पंडितजी ज्या वैदिक वाङ्मयाकडे वळले त्या वैदिक वाङ्मयातील संस्कृति ही पुरातन आहे, परंतु पुरातनत्त्व म्हणजे मागासलेपणा नव्हे. ती वैज्ञानिक ( Scientific ) आहे. प्रवृत्ति आणि निवृत्ति या दोन्ही मार्गांचा पंडितजींच्या ठिकाणी उत्कृष्ट संगम आहे. '

गुजरातमध्ये अत्यंत ख्याति पावलेले परमपूज्य श्री रंगावधूत महाराज प्रत्यक्ष येऊ शकले नाहीत; परंतु पंडितजींना त्यांनी आपल्या शुभेच्छा आपले प्रतिनिधि श्री चंद्रकांत शुक्ल यांच्याकरवी पाठविल्या होत्या. श्री शुक्ल यानी महाराजांचा संदेश वाचून दाखविला.

यानंतर प. पू. श्री गुरुजींनी आपल्या अमोघ वाणीने आपले विचार प्रकट केले—

## परम पूजनीय श्री गोळवलकर गुरुजींचे भाषण

' आज आपण पंडितजींची जन्मशताब्दि साजरी करण्यासाठी आणि त्यांना दीर्घायुष्य प्राप्त व्हावे, अशी इच्छा व्यक्त करण्यासाठी येथे एकत्र आलो आहोत. वेदामध्ये जी ' **जीवेम शरदः शतम्** ' ची इच्छा व्यक्त केली आहे, त्याप्रमाणे शंभर वर्षांचे आयुष्य, इतकेच नव्हे तर, असे म्हटले तरी चालेल की शंभर वर्षांच्या कर्ममय जीवनाची ही इच्छा आहे. जीवनातील आरंभीची २५–३० वर्षे अशीच कशीतरी व्यतीत होतात. त्याच्या नंतर १०० वर्षांचे कर्मशील जीवन प्राप्त झाले पाहिजे.

### अदीनाः स्याम् शरदः शतम्

आणि तेहि अदीन राहून कर्ममय जीवन असले पाहिजे. वेदाच्या वरील वाक्याचे हेच तात्पर्य आहे. श्रीकृष्ण वसुदेव–देवकीचे आठवे पुत्र होत आणि ते कृष्ण १२० वर्षांचे कर्ममय जीवन जगले. त्यावेळी त्यांचे आईवडील जीवंत होते, तर त्यांच्या माता-पित्याचे आयुष्य १४० वर्षांच्यापेक्षा अधिक असले पाहिजे. वेदांच्याप्रमाणे शंभर वर्षांचे कर्मशील जीवन प्राप्त केले पाहिजे. यासाठी दृढ असा मनाचा संकल्प पंडित-जींनी केला आणि त्यांच्या दीर्घायुष्याचे कारण हाच दृढ संकल्प हे आहे. आज आम्ही ते शंभराव्या वर्षात पदार्पण करीत आहेत, याप्रसंगी त्यांना दीर्घायुष्य प्राप्त व्हावे अशी शुभेच्छा प्रकट करण्यासाठी एकत्र झालो आहोत. येथे काही त्यांच्या

पुत्रासमान आहेत, तर काही नातवासमान आहेत, तर काही पणतु शोभतील असे आहेत. असे आम्ही सर्व लोक येथे एकत्र झालो आहोत. मृत्युला दूर ठेवणाऱ्या पंडित-जींच्या त्या आदर्शाबरोबरच, ज्याप्रमाण पंडितजींचे सर्व जीवन कर्मशील राहिले आहे, त्याचप्रमाणे आम्हीहि आपले जीवन कर्ममय करण्याचा प्रयत्न करू, असा दृढ निश्चय करूया.

## विविध-कर्मशील जीवन

जीवनाच्या अनेकविध क्षेत्रात त्यांच्या कर्मशील जीवनाचा आदर्श आमच्यासमोर दृष्टीस पडत आहे. दुसऱ्या लोकांच्या जीवनात एक एकच विषय दृष्टीस पडतो. एकेका विषयाच्या आदर्शाच्या भिन्न भिन्न प्रकाराची उदाहरणे आम्हास मिळतात. जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रगति करून आपल्याला मार्गदर्शन करणारे आणि सर्व क्षेत्रात महत्त्वाची सफलता प्राप्त करणारे लोक कमीच असतात. कोणी राजनीतिच्या क्षेत्रात, कोणी युद्धकलेच्या क्षेत्रांत पुढे गेलेले आपणास दिसून येतात. कोणी अध्यात्माच्या क्षेत्रात, कोणी चित्रकलेच्या क्षेत्रात, तर कोणी ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात प्रवीणता प्राप्त करतात. अशा प्रकारे कोणत्या तरी एका गुणाचा विशेषत्वाने विकास करणारे अनेक लोक आहेत. अशा लोकाबद्दल काही सांगणे तितकेसे अवघड वाटत नाही; परंतु जेव्हा आम्ही पंडितजींबद्दल विचार करू लागतो, तेव्हा आम्हाला जरा पंचाईत पडते, कारण येथे विविधता आहे. कोणता गुण घेऊन सांगावे आणि सर्व गोष्टी घेऊन किती सांगावे, असा प्रश्न समोर उभा रहातो.

## आत्मीयतेची अनुभूति

एका क्रांतिकाऱ्याचे, त्याचप्रमाणे गहन अध्ययनपूर्ण, दीर्घ ज्ञानसंपन्न निरनिराळ्या पंथानी युक्त असे दीर्घ जीवन पंडितजींमध्ये आम्हास दृष्टीस पडते आणि ते पाहून मन स्तिमित होते. कोणत्या कोणत्या गोष्टीवर विचार करावा, असा प्रश्न मनात येतो. आबालवृद्ध अशा सर्व लोकांना मार्गदर्शन करण्याची क्षमता पंडितजीमध्ये आहे. त्यांच्या सान्निध्यात आल्यावर प्रत्येकाला हाच अनुभव येतो की, पंडितजींत शारीरिक दृष्टीने तसेच सामाजिक-मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने-सर्वप्रकारे मार्ग-दर्शन करण्याची क्षमता आहे. याचबरोबर पंडितजींच्या स्वभावात-अंतःकरणात जी आत्मियतेची अनुभूति आहे, तशी अगदी थोडचा लोकात दिसून येते. कोणी उपदेश-काची भूमिका घेतो तर, कोणी इतराना कमी प्रतीचे समजून त्यांच्याकडे दयार्द्र दृष्टीने पहातो, परंतु आत्मीयतेने सर्वांत मिळून मिसळून वागून, मोठ्याच्या बरोबर मोठे होऊन, लहानाच्या समोर लहान होऊन कार्य करणारे कमीच असतात, पण पंडितजीमध्ये ही आत्मियता आपणास दिसून येते. त्याच्या प्रत्येक कार्यात आपणास हे पहाता येते.

उदाहरणार्थ- लहान मुलाना संस्कृत शिकविण्याचा विचार त्यांच्या मनात आला,

तेव्हा त्यांनी एक शिक्षणक्रम तयार केला आणि त्यात क्रमाक्रमाने सर्व संस्कृत भाषेचे ज्ञान, आपोआप कसे मिळविता येईल, हे सहज समजावून दिले. लोकांच्या स्वास्थ्य रक्षणासाठी आसनाचे चित्रपट तयार केले. सूर्यनमस्काराच्या प्रत्येक कृतिचे ज्ञान चार्ट तयार करून समजावून दिले. इतकेच नव्हे तर, प्रात्यक्षिक रूपानेहि कृतीची योग्य माहिती देण्यासाठी त्यांनी तत्परता दाखविली. एकदा संघशाखेवर त्यांनी पाहिले की मुले योग्य रीतिने सूर्यनमस्कार घालीत नाहीत, नमस्कारातील प्रत्येक आसन जसे व्हावयास पाहिजे. तसे घाईमुळे होत नाही. यासाठी त्यांनी मुलाना उपदेश नाही केला, तर लगेच धोतराचा काचा मारून स्वतः सूर्यनमस्कार घालून दाखविले. अशाप्रकारचे प्रत्यक्ष मार्गदर्शन जीवनाच्या सर्व क्षेत्रात त्यांनी केले आहे. शारीरिक क्षेत्रात, कलेच्या क्षेत्रात, ज्ञानवर्धनाच्या क्षेत्रात इत्यादि अनेकविध क्षेत्रात पंडितजींची गुणसंपदा एकत्रित झाली आहे. मनुष्याला सतत पुढे चालविण्याची अद्भुत गुणकला पंडितजीमध्ये दृग्गोचर झालेली दिसून येते. पुष्कळ कार्यकर्ते म्हणतात की आम्ही आता म्हातारे झालो आहोत, पण पंडितजी म्हणतात की आताच इतकी घाई काय आहे ?

## कर्म सोडू म्हटल्याने सुटत नाही

पंडितजींनी वेदाचे अध्ययन केले आणि केवळ अध्ययनच करून ते गप्प बसले नाहीत तर त्याप्रमाणे त्यांनी आपले सर्व जीवन व्यतीत केले. उत्तमप्रकारे सत्कर्म करणे, योग्य काम करणे आणि कर्मशील राहणे, हा त्यांच्या जीवनाचा सिद्धांत आहे. मी कधीहि कार्य करण्याचे बंद करीत नाही हे त्यांचे सांगणे आहे. आपल्यात कर्माचा त्याग करणाऱ्याएका साधुची कथा आहे. तो साधु घर सोडून फक्त एक लंगोटी घेऊन अरण्यात गेला. एकदा जेव्हा प्रातःकाळी उठून तो स्नान करण्यास गेला तेव्हा त्याला आपली लंगोटी नाही हे आढळून आले. ती उंदरानी नेली होती, म्हणून शेजारच्या एका घरातून तो मागून घेऊन आला; परंतु पुन्हा उंदीर त्याची लंगोटी घेऊन गेले. दुसऱ्यांदा पुनः मागून काम भागविले, परंतु उंदराना आता ती संवयच झाली होती. किती दिवस लोकांच्याकडे मागावे आणि लोक तरी किती दिवस देतील ? म्हणून उंदराच्या पासून लंगोटीचे रक्षण करण्यासाठी त्याने मांजर पाळले. पण जेव्हा एक एक असे उंदीर नाहीसे होऊ लागले तसे मांजर अशक्त झाले. आता यासाठी काय करावे ? तेव्हा मांजरासाठी दूध मागू लागला परंतु दूधहि किती दिवस मागायचे ? लोकानी सांगितलें की गाय पाळा. गाववाल्यानी एक गाय आणून दिली. गाईच्या चाऱ्याची व्यवस्था करावी लागली आणि चाऱ्यापाण्याच्या कामासाठी एक स्त्री ठेवली. कालांतराने तिच्यापासून मुलेहि झाली. तात्पर्य, अशाप्रकारे कर्म सोडण्यामुळे कधी कधी अशी बंधने निर्माण होतात की ती सुटत नाहीत. कधी स्वेच्छेने तर कधी दुसऱ्यासाठी आपल्याला त्याचा जो उपभोग घ्यावा लागतो, त्याचे बंधन आम्हाला सोडता येत नाही. त्याच्यापासून सुटका नाही. कर्म सोडल्याने मोक्ष प्राप्त होईल, असे

मुळीच नाही. जगाचा त्याग केल्यावर मोक्ष प्राप्त होईलच हेहि सांगता येत नाही. गीतेत सांगितले आहे—

इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।

यात ' इहैव ' वर जोर आहे, म्हणून या जगातच मन आणि इंद्रिये यांच्यावर विजय मिळविला पाहिज. अर्थात् ज्याचे मन प्रत्येक परिस्थितीत सम अवस्थेत आहे, मन ज्याच्या आधीन आहे, तोच सफल होऊ शकतो. ' सुखदुःखे समे कृत्वा ' सुख-दुःखात ज्याने अत्यंत निश्चल राहण्याचे साधले आहे, त्यालाच सफलता मिळते. सुखदुःखात, संपत्ति-विपत्तीत अविचल रहाण्याचा हा गुण पंडितजीत आहे. त्यांच्या जीवनात असे प्रसंग अनेकवेळा आले. एक वेळ नाही, अनेक वेळा संकटे आली आणि निरनिराळ्या कारणांनी आली. एक वेळ इंग्रज सरकाराकडून आणि दुसऱ्या वेळी जनतेत निर्माण झालेल्या क्षोभाने. यावेळी भीषण परिस्थिति निर्माण झाली आणि तीहि जीवनाच्या वृद्धावस्थेच्या कालात. एक वेळ असे झाले की जीवनभरची संपूर्ण कमाई खलास झाली. वृद्धावस्थेत एका ठिकाणाहून दुसऱ्या स्थानी जावे लागले, परंतु कोणाहिबद्दल त्यांच्या मनात राग निर्माण झाला नाही. पुनः एकदा शून्यापासून आरंभ करण्याचा प्रसंग आला, तरीहि त्यांच्या मनात कोणाविषयीहि कटुता निर्माण झाली नाही. त्यांनी अशा बिकट परिस्थितीतहि अविचल राहून शांत मनाने काम केले आणि सफलता मिळविली. शून्यापासून सुरुवात करून आपल्या कार्याला पुनः आजचे भव्य स्वरूप आणले आहे. असे कर्ममय जीवन पंडितजींचे आम्हा सर्वासमो आहे. या जगात राहून मन साम्यावस्थेत ठेवण्याचा वरील आदर्श त्यांच्या जीवनात सार्थतेने प्रतीत झाला आहे, हे त्यांनी आपल्या उदाहरणाने दाखविले आहे.

अशाप्रकारे त्यांच्या जीवनातील अनेकविध गुणांचा जेव्हा मी विचार करू लागतो, तेव्हा मी हतबुद्ध होतो. जर मी त्या सर्वाबद्दल बोललो तर ते आजच्या विषयाशी असंबद्ध होईल असे वाटते; म्हणून आपणा सर्वांच्या वतीने मी परमात्म्याला अशी प्रार्थना करतो की त्याने पंडितजींना दीर्घायुषी बनवावे. त्यांच्या अंतःकरणाची कल्पना अदीन राहून शंभर वर्षाचे कर्मशील जीवन जगण्याची आहे- ' अदीनाः स्याम शरदः शतम् । ' माझी हीच प्रार्थना आहे की आम्हाला सदैव त्यांचे मार्गदर्शन प्राप्त होवो आणि प्रत्यक्ष दर्शन घेऊन मार्गदर्शन मिळावे. ज्याप्रमाणे पंडितजींचा संकल्प आहे त्याप्रमाणे ते वेदाचे कार्य संपन्न करीत आहेत.

## आमचे कर्तव्य काय ?

येथे जे हे वेदोद्धाराचे कार्य होत आहे, ते चिरंजीव होण्यास सहाय्य करण्याचा आम्ही संकल्प करावा. वेद भारताच्या प्राचीन ज्ञानाचे भांडार आहेत. पंडितजींचे कार्य त्याच विश्वासाने आम्हास प्राप्त झाले आहे. वेदच आमच्या ज्ञानाचे, आमच्या

संस्कृतिचे मूळ आहेत; म्हणून हे जे सर्व गोष्टीचे मूल आहेत, त्याचे आकलन झाले पाहिजे. जर या मूलभूत गोष्टीचे ज्ञान झाले, याला नीट स्वरूप दिले गेले तर पुष्कळच गोष्टी सरळ होतील. इतर सर्व गोष्टी बाजूस ठेवून वेदाचे अध्ययनच पंडितजींनी का केले ? याचा जर आम्ही विचार केला तर त्यामागे मूलभूत गोष्टीला सुदृढ बनविण्याची भावनाच आहे, हे आपणास दिसून येईल.

## आमचेच आदर्श लुप्त

परकीय शासनामुळे आमच्या परंपरेचे जे विभंजन झाले, त्या कारणाने आपल्या देशात निराशा आणि दुःख फैलावले. जेव्हा निराशा आणि दुःख यातून श्रेष्ठ जीवनाचा काही आशादायी किरण दिसला नाही, तेव्हा आपल्या देशात अनेक प्रकारच्या साधनापद्धति सुरू झाल्या. मागील कालखंडात अनेक परकीय आघातानी पूर्णपणे संत्रस्त झालेल्या लोकानी परमेश्वराच्या गुणगानास सुरूवात केली. या निराशामय वातावरणात जेव्हा श्रेष्ठ जीवनाची आशाच उरली नाही तेव्हा जीवनाच्या अनेक पद्धति सुरू झाल्या. आचार्यांनी शिष्य–परंपरा निर्मून ' **वेदाना माना** ' हेच सांगितले. जे वेद सांगतात ते करा. परंतु निरनिराळ्या पंथामुळे सामाजिक फाटाफूट झालेली होतीच. पंडितजींनी विचार केला की याने कार्यभाग होणार नाही. आपण मूलभूत तत्त्वाकडेच चलू या, अर्थात् वेदाना अनुरूप, वेदाच्या अनुकूळ कर्ममार्गाचा अवलंब करू या. ' जे वेदात लिहिले आहे त्यानुसारच वागा. ' ही जी नम्रता पूर्वकालीन आचार्यात होती ती त्यांच्यानंतरच्या आचार्यात राहिली नाही. पूर्वकालीन आचार्यात शिष्यपरंपरा करूनहि त्यांच्यात वेदाबद्दल, त्यांच्या थोरवीबद्दल आदरभाव, नम्रभाव होता. परंतु नंतरचे आचार्य आणि त्यांची शिष्यपरंपरा यात तो राहिला नाही. आम्ही जें सांगतो ते माना असे ते म्हणू लागले.

## छिन्न–भिन्न समाज

हे केव्हापासून झाले ? याचा आरंभ युद्धापासून झाला असे म्हणतात. काहीहि असो.

आज येथे असंख्य आचार्य आहेत, त्यांचे असंख्य संप्रदाय आहेत, हे दिसत आहे. आज या अनेक संप्रदायात समाज विभागला गेला आहे. याचा परिणाम म्हणजें आमचे ऐहिक जीवन छिन्न–भिन्न झाले आहे. शिष्य–परंपरा, मत-पंथ, जाति–उपजाति इत्यादि अनेक प्रकारांनी विभाजित झालेला हा समाज तुटलेल्या–फुटलेल्या रूपात दिसत आहे. अशा छिन्नभिन्न स्थितीत ऐहिक जीवनाची उत्कृष्टता संभवत नाही. यासाठीच त्या मूलभूत तत्त्वाचे योग्य ज्ञान प्राप्त करून खऱ्या जीवनाची प्रतिष्ठापना करावयास हवी. त्याच्याबद्दल अभिमान जागृत करून तदनुरूप जीवनाची प्रतिष्ठापना करावयास हवी. ज्ञानसंपन्न, सुव्यवस्थित आणि कर्ममार्गी समाजाची स्थापना करण्याचा महान् राष्ट्रभक्तिने परिपूर्ण असा आदर्श आपल्यापुढे ठेवून पंडितजींनी वेदाचा उद्धार करण्याचे कार्य आपल्या हाती घेतले.

## राष्ट्रीय जीवनाचा मृत्यु

आज तर आपल्या देशात स्वत्वाबद्दचा अभिमानच नष्ट झाला आहे. स्वत्वाबद्दलचा अभिमान नष्ट झाल्यावर राष्ट्राचे पतन होते. ज्या राष्ट्रातील स्वत्वाबद्दलचा अभिमान नष्ट होतो, त्याचा विनाश अटळ आहे. तो अवश्यमेव होणारच! आज जर आपण आपल्यातील नोकरी–चाकरी, शिक्षण–व्यवस्था, उद्योग–व्यापार इत्यादीतील मान्यवर लोकांच्या जीवनाकडे पाहिले तर त्यांच्या जीवनांत वेदाच्या परंपरेचा, शास्त्राचा काही परिणाम झाला आहे असे दिसून येत नाही; उलट त्यांच्यावर परदेशी आदर्श आणि परदेशी संस्कृतीचा प्रभाव पडलेला दिसत आहे. जेंव्हा राष्ट्रात परकीय आदर्शांना प्रतिष्ठा प्राप्त होते आणि जेव्हा आपल्या मूल सांस्कृतिक भावना नष्ट होतात, तेव्हा राष्ट्रीय जीवनाचा मृत्यूच होतो, असे समजलें पाहिजे. आज कोणी रशिया, जर्मनी, अमेरिका, इंग्लंड, जपान, चीन या देशांचा आदर्श स्वीकारण्याच्या भाषा बोलत आहेत. येथील सर्वात मोठा समाज त्यांच्या आदर्शांकडे आपलेपणाने पहात आहे, आपल्या देशाच्या आदर्शांकडे पहात नाही. हा राष्ट्रीय–जीवनाचा मृत्यु आहे. भूमि तीच राहील, परंतु ज्या राष्ट्रीय जीवनाबद्दल आमचा देश प्रसिद्ध आहे, तो रहाणार नाही. आमच्या देशाचे मोठे मोठे पुढारीहि परदेशीयांचा आदर्श समोर ठेवीत आहेत. कोणी म्हणतात की रशियाच्या परंपरेचे अनुसरण केलें पाहिजे, तर कोणी म्हणतात अमेरिकेच्या परंपरेचे अनुसरण करावे. आपले काहीहि नाही. परकीयांचे अनुकरणच राहिले आहे. ही पराश्रयबुद्धि केवळ विचारांचीच नाही, जीवनपद्धतीच्या अनुकरणाचीच नाही, तर ती अन्नधान्य-खाद्य वस्तुपर्यंत येऊन पोचली आहे. आज आम्ही आपल्या हातानी जेवूहि शकत नाही. आपल्या जेवणासाठी आम्हाला विदेशियांचे पाय धरावे लागतात. ही किती लज्जास्पद गोष्ट आहे? किती भ्रष्टता आहे ही? जो परदेशाला जाऊन येतो त्याचा आदर होतो, असे कोणी म्हणतात. कधी कधी असेहि ऐकावयास मिळते की, ते परदेशाला जाऊन आले, जसे काही मोठे कार्य करून आले आहेत. बहुतेक यामुळेच आपल्याला अमेरिकेहून गहू येतो.

## जसे अन्न तशी बुद्धि

माझ्या माहितीप्रमाणे, आणि हीं माहिती मी नेहमी सत्याचा निकष लावूनच काढून घेण्याचाच प्रयत्न करतो, विदेशाहून आपल्या देशात जे धान्य येते ते तेथील पशूहि खात नाहीत. असे हे दुर्गंधयुक्त सडलेले धान्य कोटयवधि रुपये खर्च करून आपल्या देशात येते. ज्याचे अन्न खावे, त्याच्याच प्रमाणे बुद्धि होते. भ्रष्ट लोकांचे धान्य खाऊन तेहि नासलेले धान्य खाऊन आमची बुद्धिहि भ्रष्ट होत आहे; त्याप्रमाणे जीवन व्यतीत करण्याची वृत्ति बनत आहे. अशाप्रकारे राष्ट्रीय जीवनावर कुठाराघात करण्याची भयंकर स्थिति उत्पन्न झाली आहे, या स्थितीला दूर करण्यासाठी

*

पुनः मूलभत तत्त्वाना सुदृढ करण्याची आवश्यकता आहे, यासाठी Go Back to the Vedas ही घोषणा करावी लागेल. वेदांकडे चला, त्यांना आपला आदर्श माना.

## ‘ एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति ’

काही लोकानी वेदाना ‘ धनगराचे गीत ’ म्हटले आहे. यावर विश्वास ठेवण्याची आपल्याला जरूर नाही, कारण हे वाक्य कोणा ख्रिस्ती माणसाने म्हटले आहे. आणि ते काहीही म्हणोत, कारण ते आमच्याविषयी काय जाणू शकणार ? वेदामध्ये निरनिराळ्या देवतांच्या भिन्न भिन्न प्रकारच्या स्तुति आहेत. इन्द्र, वरुण, मातरिश्वा इत्यादि अनेक देवतांच्या स्तुति त्यात येतात; परंतु त्याचबरोबर त्यात ‘ **एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति** ’ असे म्हटले आहे. इन्द्र, वरुण इत्यादि देवता एकाच ब्रह्माची निरनिराळी नावे आहेत, आणि त्याना संबोधून निराळ्या प्रकाराने स्तुति केली आहे. स्तुति करण्यासाठी जे शब्द सुचले ते त्यात प्रकट झाले आहेत. एकाच ब्रह्माची ही भिन्न भिन्न स्पष्टीकरणे निरनिराळ्या लोकासाठी आहेत. याचबरोबर वेदामध्ये जीवनाची एक श्रेष्ठ पद्धतिहि आहे.

वेदांच्या उद्धारासाठी, त्यांच्या रक्षणासाठी भगवान् स्वतः जन्म घेतात, असे सांगितले जाते. तर मग धनगराच्या गीताच्या रक्षणासाठी अथवा आपली स्तुति करविण्यासाठी ते अवतार घेतात काय ? अशा अनावश्यक गोष्टीसाठी अवतार घेण्याची जरूरच काय ? या उद्धाराचा हेतु हा आहे की ते अनेक गूढ आणि महत्त्वपूर्ण अर्थानी भरलेले आहेत आणि त्यात जीवनाच्या प्रत्येक पैलूचे मार्गदर्शन आहे. यात आपण पाहिले तर सरळ शब्दप्रयोग आहेत, परंतु अशा शैलीत त्यांचा प्रयोग केला आहे की, त्यातून गूढ अर्थ दिसून येतो. त्यात आयुर्वेद आहे, गणित आहे, विज्ञान आदि सर्व काही आहे, असे पंडितजी सांगतात. जीवनाच्या सर्व बाजूंचे त्यात सुंदर विवेचन केले आहे. यासाठी त्यांचा अर्थ योग्य रीतीने समजवून घेण्याची आवश्यकता आहे. नाहीतर आम्हाला त्याचा उलगडा होणार नाही. हे केवळ स्तुतिमात्र नाहीत, देवतांच्या गुणांचे वर्णनच केवळ नाहीत, पण अनेक प्रकारच्या शब्दांच्या रचनेने त्यांचा अर्थ समजून घेतला तर त्यातून अनेकविध शास्त्रांचे ज्ञान होते. असे ज्ञान कसे होऊ शकते ? एक असा ग्रंथ मी पाहिला आहे. तो एकी कडून पाहिला तर त्यात भगवद्गीता लिहिलेली आहे. अक्षर वरपासून खालपर्यंत वाचले तर चंडीग्रंथ दृष्टीस पडतो. तिरपे पाहिले तर दुसरेच शास्त्र आढळून येते. एक एक अक्षर सोडून पाहिले तर वैद्यकीय ज्ञान मिळते. त्यातून काय काय निघेल याचा पत्ता लागत नाही. असा चमत्कार मी त्या हस्तलिखित ग्रंथात पाहिला आहे

## आधुनिक वेदोद्धारक

वेदामध्ये असा चमत्कार नसेलहि, पण एकएका शब्दाचे अनेक अर्थ निघण्याने ते ज्ञानाचे भांडार आहेत आणि त्यांच्यापासून विविध शास्त्रांचे ज्ञान प्राप्त करता येणे शक्य आहे. यांच्या विविध अंगांचे अध्ययन करून त्या ज्ञानसंपदेला सर्वसाधारण

जनतेपर्यंत पोचविणे, हे एक मोठे कार्य आहे आणि हे महान् कार्य पंडितजी गेली अनेक वर्षे करीत आहेत. ज्याप्रकारे पंडितजी वेदोद्धाराचे कार्य अविरत करीत आहेत, हे कार्य स्वयं अवताराचेहि कार्य आहे. म्हणजेच वेदाचेच ज्ञान जे आज दुर्लभ झालेले आहे, ते सर्व साधारण जनतेपर्यंत पोहोचविणे. पंडितजींच्या या कार्यासाठी आपण सर्वांनी त्यांच्या आदर्शाकडे पहावे आणि त्या कार्याला प्रगत करावे. मी परमेश्वराला हीच प्रार्थना करतो, की ज्या वेदोद्धाराच्या कार्यात पंडितजी कार्यमग्न आहेत, त्याच्या निरनिराळ्या अंगाना पूर्ण करण्याचे जे महान् कार्य ते करीत आहेत, ते पूर्ण करून, ते त्यांच्या आधारे निर्माण झालेले स्वाभिमानपूर्ण राष्ट्रीय-जीवन आणि त्यांच्या आधारे उभ्या राहिलेल्या या भारतराष्ट्राला पुनः अखिल जगताचे गुरुपद प्राप्त करणारा झालेला पाहण्याचा सुअवसर त्यांना प्राप्त होवो. आपणा सर्वांच्या बरोबर श्रद्धेय पंडितजींच्या चरणी वरील कामनेसह आपला प्रणाम अर्पित करून, मी आपले भाषण संपवितो. '

## पंडितजींनी सन्मानाला उत्तर देताना म्हटले—

' वेदांच्या विषयी मी जे काही कार्य केले त्याचा गौरव आज आपण केला आहे. मी हा माझा वैयक्तिक गौरव समजत नाही तर वेदांबद्दल, वेदकार्याचा हा गौरव होत आहे असे मी समजतो. आपण वेदाबद्दल जो हा आदरभाव दाखविण्याचे कार्य केले, ते पाहून मला आनंद होत आहे.

वेदातील विविध ज्ञानाच्या संपादनाचे कार्य वर्तमानकाळी जे झाले आहे व होत आहे, ते जर्मनीतच. तेथे वेदांच्या उद्धाराचे कार्य करणारी एक संस्था निघाली आहे. माझ्याकडे त्यांची पत्रे येतात. ते वेदाना इतके मानतात आणि ते वेदाध्ययनात इतके गुंग आहेत की ते आपली उन्नति सतत करून घेत आहेत; परंतु आमच्या येथे वेदांचे रक्षणकर्ते ब्राह्मण आज वेदासंबंधी जितका आदर जर्मनलोक दाखवितात, तितका आदरभाव दाखवीत नाहीत. याचे कारण काय ? जर्मनीहून येणाऱ्या पत्राने एक कारण समजले आहे. सैन्यरचनेचे वर्णन जसे वेदात आहे, तसे अन्यत्र कोठेही नाही, असे ते समजतात. देवाची प्रार्थना करणारे वेद आहेत असे आम्ही समजतो, तर ते भौतिक ऐश्वर्य प्राप्त करून देणारेही वेद आहेत, असे मानतात, भौतिक ऐश्वर्य वाढविण्यासाठी ज्या गोष्टी केल्या पाहिजेत, त्याही वेदाच्या आधारे सिद्ध होऊ शकतात, असे ते समजतात. ज्याप्रमाणे रशियात सैन्याची रचना आहे, त्या प्रकारची रचना वेदात आढळते. दरवर्षी तीन लाख रुपये वेदपाठी ब्राह्मणांना वेदरक्षणासाठी पेशवे देत असत, परंतु तशी सैन्याची रचना मात्र तीन लाख रुपये देणाऱ्या पेशव्याना माहित नव्हती आणि त्या ब्राह्मणांनाही नव्हती. हे असे का झाले ? आमच्या येथे आमचे स्वतःचे वेद असूनही त्याच्याकडे ज्या एका विशिष्ट दृष्टीने पाहणे आवश्यक होते आणि त्याच्याकडे जसे लक्ष्य देणे आवश्यक होते, तसे केले गेले नाही. वेदांचा एक एक एक शब्द घेऊन जर्मनलोक जसा विचार करतात, त्याचा अर्थ

लावतात, तसे कार्य आमच्याकडे झाले नाही, होत नाही. भारताचा उद्धार जर करावयाचा असेल तर तो वेदांच्या कथनानुसार सैन्याची व्यवस्था, समाजरचना, शिक्षणपद्धति आदिद्वारा १०–१५ वर्षांच्या अवधीत होईल, असे मी समजतो.

वेदांच्या म्हणण्याप्रमाणे मनुष्याची आयुर्मर्यादा किती असली पाहिजे ? ती १२० वर्षांची आहे. परमात्म्याने आपल्याला १२० वर्षांचे आयुष्य दिले आहे तर आपण १२५, १३० वर्षेपर्यंत जगण्याची महत्त्वाकांक्षा, इच्छा धरली पाहिजे. श्रीकृष्ण भगवानानी आपल्या जीवनमर्यादेत किती महत्त्वाचे कार्य केले, हे आपण पहा. त्यांचा मृत्यु १२० व्या वर्षी झाला. त्यावेळी त्यांचे आईवडील जिवंत होते. तेव्हा साधारणपणे पाहता त्यांचे वयोमान १४०–१४६ वर्षांचे तरी असले पाहिजे.

यासाठी प्रयत्न केला तर १२० वर्षापेक्षाही अधिक वर्षे आम्ही जिवंत राहू शकतो, हे आमची शास्त्रे सांगत आहेत. माझी तर आपणास प्रार्थना आहे की ज्या ज्या प्रकाराने शक्य असेल त्या त्या प्रकाराने आपल्या शास्त्रग्रंथांच्या अध्ययनाकडे लक्ष देऊन, त्यात सांगितलेले गुण संपादन करण्याचा प्रयत्न करावा आणि त्याप्रमाणे १२० वर्षांचे आनंदपूर्ण आयुष्य जगावे. इतकेच नव्हे तर १२५, १३० वर्षेही आनंदाने रहावे. भारतवर्ष अशाप्रकारे दीर्घायु आणि निरोगी लोकांनी युक्त व्हावा आणि यासाठी वैदिक ज्ञानाचा प्रचार व्हावा हीच माझी सदिच्छा. ती परमेश्वराने पूर्ण करावी अशी माझी त्याच्या चरणी प्रार्थना आहे. ॐ शान्तिः'

यानंतर आभारप्रदर्शन होऊन कार्यक्रम राष्ट्रगीताने समाप्त झाला. रात्रौ ख्यातनाम श्री सुधीर फडक्यांचा गीतरामायणाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास ठिकठिकाणहून ५०० मंडळी आली होती.

### ( अ ) सातवळेकरांचा ' डी वेल्ट ' ने गौरव केला !

फ्रांकफुर्ट, दि. ३० ऑक्टोबर १९६६ पश्चिम जर्मनीतील डी वेल्ट या सुप्रसिद्ध दैनिकाने पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्या कार्याची माहिती त्यांच्या छायाचित्रासह देऊन त्याचा गौरव केला आहे.सध्या प. जर्मनीत फ्रांकफुर्ट येथे आंतराष्ट्रीय पुस्तकप्रदर्शन चालू आहे. त्यानिमित्त काढलेल्या खास पुरवणीत पं. सातवळेकरासंबंधी माहिती देऊन डी. वेल्टने फारच मोठी समयसूचकता दाखविली आहे. पुणे येथील पत्रकार श्री. व्यं. न. कुलकर्णी यानी ही माहिती वरील वृत्तपत्राकडे पाठविली होती.

### ( आ ) गुजरात राज्याच्या नागरिकांतर्फे अहमदाबाद येथील सत्कार

### ' वेदमूर्ति पं. सातवळेकर '

#### यांचा शताब्दि सत्कारसमारंभ

दिनांक २३ डिसेंबर १९६६ ला गुजरात एक्सप्रेसने पं. **सातवळेकर** अहमदाबादेला दुपारी ४ वाजता पोचले. स्टेशनवर स्वागत–समितीच्यावतीने शेठ श्री **चतुर्भुजदास चिमनलाल** यांनी त्यांचे स्वागत करून हार घातला. न्यू स्वदेशी

मिल्सचे मॅनेजर शेठ श्री **श्रीकृष्णजी अग्रवाल** हे अत्यंत सरळ मनाचे आतिथ्यशील सज्जन अहमदाबादच्या मुक्कामात पंडितजींची व्यवस्था पहात होते.

दिनांक २३ डिसेंबरला संध्याकाळी पं. **सातवळेकर** यांनी **' गुजरात समाचार '** या प्रसिद्ध दैनिकाला खास मुलाखत देताना सांगितले– ' जर भारतवर्षाचा उद्धार कोणत्या धर्माने व्हावयाचा असेल तर तो केवळ वैदिकधर्मच आहे; कारण तो सार्वभौम आणि सार्वकालिक आहे. वेदांमध्ये मानवजातीच्या कल्याणाचा सर्वोत्तम आणि सर्वांगीण उपदेश केला आहे. सर्व जगताच्या कल्याणासाठी वेदच मार्गप्रदर्शन करू शकतात.

' खरे पाहिले तर हिंदुमुसलमान हे एकच आहेत. दोन्ही धर्म मूलतः एकाच रस्त्याने जाऊन एके ठिकाणी मिळतात. कुराणशरीफाची पहिली आयत ' **ॐ अग्ने नय सुपथा राये अस्मान्** ' या वेदमंत्राचा शब्दशः अनुवाद आहे.

' वेदांत गाईचे नाव ' **अघ्न्या** ' आहे. याचा अर्थ ' मारण्यास अयोग्य ! ही गाय वेदात देवांची माता म्हणून संबोधिली आहे. गोवधप्रतिबंधासाठी श्रीमत् शंकराचार्यांची मागणी धर्मानुसार आहे आणि ती पूर्ण झालीच पाहिजे.

' दीर्घायु होण्याची इच्छा करणाऱ्याने दररोज व्यायाम आणि प्राणायाम केला पाहिजे, आणि गाईचे दूध प्यावे. '

दि. २४ डिसेंबरला सकाळीं गुजरात विश्वविद्यालयाचे उपकुलपति श्री **उमाशंकर जोशी** यांच्या आमंत्रणानुसार विश्वविद्यालयाच्या सभागृहात पंडितजींचे भाषण झाले.

श्री **जोशी** यांनी स्वागत करताना सांगितले– क्रियाशीलता पंडितजींच्या जीवनाचे वैशिष्टय आहे. पंडित सातवळेकरांनी वेदासंबंधी जे कार्य केले आहे, ते अद्वितीय आहे.'

यानंतर ' **माझी जीवनश्रद्धा** ' या विषयावर बोलताना श्री पंडितजींनी सांगितले—

' हैद्राबादेत रहात असताना वेदांच्या काही मंत्रांचा अर्थ मी पुस्तकरूपाने छापला. ते पाहून ब्रिटिश घाबरले आणि त्यानी त्या पुस्तकाच्या सर्व प्रति जप्त करून जाळून टाकल्या. मी जसजसा वेदाच्या अध्ययनात मग्न होऊ लागलो, तसतसे मला वेदांचे महत्त्व पटले; आणि शेवटी आपले सर्व जीवन वेदांच्या प्रचारासाठीच अर्पण करण्याचा मी निश्चय केला.

मनुष्याचे वैदिकधर्माच्या मते पूर्ण आयुष्य १२० वर्षांचे आहे. इतकी वर्षे प्रत्येकाने जगलेच पाहिजे. ऋषींनी दाखविलेल्या मार्गाने जो जाईल, तो खचित इतकी वर्षे जगेलच. दीर्घजीवनाच्या अनेक उपायात प्राणायाम, व्यायाम आणि संयमित जीवन ही आवश्यक आहेत. '

दि. २४ डिसेंबरला संध्याकाळी ५ वाजता दिनेश मेमोरियल हॉलमध्ये प्रारंभी चारहि वेदातील मंत्रांनी विद्वान् घनपाठी ब्राह्मणांनी ' वैदिक प्रार्थना ' केली.

**प्रा. बी. सी. गज्जर** यानी समारंभास आलेले शुभसंदेश वाचून दाखविल्यावर, गुजरात विश्वविद्यालयाचे उपकुलपति श्री **उमाशंकर जोशी** म्हणाले– ' श्री पंडितजींचे

जीवन एक आदर्श जीवन आहे. त्यांनी जे काही सांगितले, त्याचे प्रथम त्यांनी आपल्या जीवनात प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यांनी आपले सर्व आयुष्य वेदभगवानाच्या सेवेला अर्पण केले आहे. सांप्रतच्या वातावरणात वेदांची अत्यंत आवश्यकता आहे.'

यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक परम पूजनीय श्री **मा. स. गोळवलकर गुरुजी** यांनी आपली सुमनांजलि अर्पण करताना सांगितले—

' वेदांच्या तत्त्वज्ञानाने कर्मनिष्ठा निर्माण होते आणि निर्भयवृत्तीही उत्पन्न होते, तशीच पौरुषसंपन्न जीवन जगण्याची प्रेरणा मिळते. वेदांनी ' **बलं उपास्व** ' हा संदेश दिला. आमची एक स्वतंत्र भाषा आणि संस्कृति आहे, हे आम्ही विसरलो आहोत. आत्मविस्मृति आणि स्वाभिमानशून्यता यांच्या महाप्रलयात पं. सातवळेकरांचे वैदिकज्ञानप्रचाराचे कार्य प्राचीनकालीन जलप्रलयातील मनुच्या माशाप्रमाणे तारणारे झाले आहे.

' वेदांनी आपणास निर्भय बनण्याचा आदेश दिला आहे. आपल्या विजिगीषु पूर्वजांनी पुष्कळ वैभव प्राप्त केले. वेद आपल्याला संसारविमुख किंवा त्यातून निवृत्त होण्याचा उपदेश करीत नाहीत. जगताच्या उद्धारासाठी जीवन अर्पणाऱ्या ऋषींच्या जीवनाचा आदर्श वेदांनी दाखविला आहे. पंडितजींनीहि गीतेवर ' पुरुषार्थ बोधिनी टीका ' लिहून गीतेचा खरा अर्थ विशद केला आहे. '

तदनंतर पं. सातवळेकरांनी केलेल्या वेदसेवेबद्दल बोलताना शेठ **श्रीकृष्णजी अग्रवाल** यांनी म्हटले—

'गेली २००० वर्षे जवळ जवळ आमची क्रियाशून्य अशीच गेली आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात भारतीय संस्कृतीचे उत्थापन होईल आणि आमचे राष्ट्रीय चारित्र्य उच्च स्तरावर येईल अशी आशा वाटत होती; पण हे काही झाले नाही. याचे कारण एकच–आणि ते ' वेदांची उपेक्षा. '

'ज्यामुळे आमचे जीवन धन्य होईल, यशस्वी होईल, असे हे वेदज्ञान भगवती भागीरथीच्या जलाप्रमाणे पवित्र आहे. जर आपणास मानाने जीवन जगावयाचे असेल तर आपल्याला वेदांना आपलेसे केले पाहिजे. श्री पं. सातवळेकरांचे कार्य माझ्या म्हणण्याचे प्रतीक आहे. परमेश्वराने त्यांचे ध्येय पूर्ण करावे हीच प्रार्थना. '

गुजरातचे मूकसेवक आणि महात्मा गांधींचे सच्चे अनुयायी श्री **रविशंकर महाराज** यांनी आपल्या भाषणात सांगितले—

'आपल्या शंभर वर्षाच्या आयुष्यात पंडितजींनी आपल्या शरीराचा आणि मनाचा कशाप्रकारे उपयोग केला, हे आपणास त्यांच्या आदर्शापासून शिकावयाचे आहे. त्याचप्रमाणे जीवन आणि ज्ञान यांचा सर्वांगपूर्ण उपयोग करून त्याची अभिवृद्धि कशी होईल, हे पहाणेहि आमचेच काम आहे. '

यानंतर सत्कारसमितीचे अध्यक्ष, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश आणि बनारस हिंदु विश्वविद्यालयाचे भूतपूर्व उपकुलपति श्री **एन्. एच्. भगवती** यांनी पं.

सातवळेकरांचे कार्य आणि जीवन याचा संक्षिप्त परिचय देताना म्हटले--

' पंडितजींनी वेदांच्या प्रकाशनाच्या द्वारे जी देशसेवा केली आहे ती अमर आहे. त्यांनी केलेल्या कार्यासाठी पुढील पिढी त्यांची ऋणी राहील. साधे आणि सात्त्विक जीवन व्यतीत करणाऱ्या या थोर पुरुषाच्या अंतःकरणात सदैव समाज आणि राष्ट्र यांचाच विचार असतो. ध्यान, धारणा, सतत अध्ययन आणि वेदसेवा यामुळे पंडितजी साक्षात् वेदमूर्ति झालें आहेत. पंडितजींनी शंभराव्या वर्षात पदार्पण केले आहे. यासाठी आम्ही त्याना शतशः प्रणाम करतो.

' वैदिकधर्म आणि साहित्य याचा प्रचार सतत चालू राहील हे पहाण्याचे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. '

नंतर विविध संस्थांतर्फे पं. सातवळेकरांना फूलहार घालण्यात आले.

यानंतर सत्कारसमितीचे कोषाध्यक्ष श्री पी. व्ही. मंगळवेढेकर यांनी पं. सातवळेकर यांना अर्पण करावयाचे मानपत्र वाचून दाखविले. ते असे--

**प्रातःस्मरणीय श्रीमान् पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकरजींच्या चरणीं--**

आपल्या जीवनाच्या पूर्वार्धात, भारतभूमीच्या स्वातंत्र्यसंग्रामात, प्रथम क्रान्तिवीर या रूपाने आणि नंतर एक सत्याग्रही सैनिक रूपाने आपण जे किमती समर्पण दान केलेत, ते भारतीय युवकवर्गासाठीं सदैव प्रेरणादायी राहील.

भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीच्या प्राणासमान, विशेषतः साङ्गवेदसाहित्याचा तलस्पर्शी अभ्यास करून, या साहित्याचा तेजस्वी आणि प्रेरक संदेश भारतभर पोहोचविण्यासाठी, संस्कृत, हिंदी, गुजराती आणि मराठी भाषेत शेकडो प्रवचने करून, तसेच अनेक विद्वत्तापूर्ण लेख लिहून आपण गेल्या साठ वर्षांत जे भगीरथ प्रयास केले, त्यासाठी प्राचीन भारतीय संस्कृतीचे असंख्य उपासक आपले ऋणी आहेत.

आज सारे जगत्, दोन विचारधारांच्या झगड्यात सांपडल्या कारणाने आपले समतुलत्व घालवून बसले आहे. या दोन विचारधारांपैकी एक आहे-पश्चिमेत प्रतिष्ठा मिळालेला मानवताधर्माच्या चमकदार नावाने युक्त इंद्रियसुखवाद; आणि दुसरा आहे, भारतात हजारो वर्षांपासून प्रतिष्ठित असलेला संन्यासधर्माचा आश्रय घेऊन प्रबळ झालेला जीवनपराङ्मुख निष्क्रियतावाद. या दोन्ही विचारधारांच्या प्रचंड वेगाने दुनियेतील विचारकांची मने चलबिचलित झालेली आहेत. अशा विषम परिस्थितीत अभ्युदय तथा निःश्रेयस या दोहोंचे मिलन करणाऱ्या वैदिकधर्माचा तेजस्वी संदेश, आपण, जगतातील व्याकुल जनतेच्या सन्मुख देऊन, तिची प्रतिष्ठा पुनः ठिकाणावर आणण्याचा जो महान् प्रयत्न केला आहे, त्यासाठी, हे साक्षात् कृतधर्मा महर्षे ! केवल भारतच नाही पण सर्व जगत् आपले ऋणी आहे.

निष्कलंक चारित्र्य, महान् त्याग, प्रगाढ पांडित्य, वेदविद्येची अखंड उपासना, प्राणायामादि योगव्यायामाने मिळविलेले स्पृहणीय आरोग्य, तथा दीर्घायुष्य इत्यादींनी

समृद्ध आणि भव्योदात्त झालेल्या आपल्या जीवनाविषयी, आपला उत्कट आदर दाखविण्यासाठी, भारताच्या सर्व शिक्षित प्रजेने महामहोपाध्याय, डी. लिट्., वेद-मार्तंड, गीतालंकार, ब्रह्मर्षि सारख्या अनेक पदव्या आपणास दिल्या आहेत; पण त्यांच्यामुळे आपण विभूषित काय होणार होता ? उलट त्या पदव्याच, आपल्या नावाला जोडल्या गेल्यामुळे, स्वतःच विभूषित झाल्या आहेत.

आपण प्राचीन भारताच्या ऋषिमुनींच्या सारखें शांत आणि पवित्र जीवन व्यतीत करीत राहिले आहात. पण भारतीयांच्या दृष्टीने तर, हे आपले, एकशे वीस वर्षाचे ( विंश शत वार्षिक ) अखंड चालणारे जीवनसत्रच आहे. या सत्राच्या तृतीय म्हणजे सायंसवनाच्या मध्यापर्यंत आता आपण येऊन पोहोचला आहात. या सत्राची योग्य वेळी समाप्ति होईपर्यंत, आणि त्यानंतरहि पण, भगवान् सविता आपणास उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य देवो, अशी प्रार्थना करणारे, आम्ही आहोत—

**आपल्या वात्सल्यपूर्ण आशीर्वादाचे अभिलाषी**
**समस्त गुजरातचे नागरिक**

समारंभाचे मुख्य पाहुणे गुजरातचे राज्यपाल माननीय श्री **नित्यानन्द कानूनगो** यांनी गुजरातच्या जनतेतर्फे पं. सातवळेकरांना मोढेरा येथील सूर्यमंदिराची नक्षी असलेले तोरण, मानपत्र व ५००१ रु. ची थली अर्पण केली. नंतर माननीय श्री राज्यपाल यांनी आपल्या भाषणात सांगितले—

' १९३० मध्ये जेव्हा सर्वत्र उदासीनतेचा अंधकार पसरला होता आणि लोकांचा आत्मविश्वास नाहीसा झाला होता, त्यावेळी पुढे येऊन महत्त्वाचे कार्य केलेल्या ज्या महान् पुरुषांची नावे इतिहासात नोंदविण्याला योग्य असतील, त्यापैकी राजकीय क्षेत्रात महात्मा गांधीजींचे नाव स्मरणपूर्वक लिहिले जाईल. त्याचबरोबर जेवढे संत आणि महर्षि यांनी लोकात आत्मविश्वास निर्माण करण्याचे जे भगीरथ प्रयत्नाचे कार्य केले, त्यात संत श्री सातवळेकर यांची सेवा अमूल्यच आहे. पंडितजींचे कार्य हे सर्व मानवजातीचे कार्य आहे. पंडितजींचे ज्ञान आणि सेवेचे कार्य चिरंजीव होईल.'

शेवटी सन्मानाचे उत्तर देतांना पं. सातवळेकर म्हणाले––

' जर मी वेदांची सेवा केली नसती तर आज आपण माझा सन्मान केला नसता. यासाठी हा सन्मान वेदांचाच सन्मान आहे, असे मी समजतो.

' वेदामध्ये विज्ञान, चिकित्साशास्त्र आणि राजनीति आदीहि आहेत. ३ दिवस आणि ३ रात्रीपर्यंत कोठेहि उतरल्याशिवाय निरंतर उडणाऱ्या विमानाचे वर्णन वेदामध्ये आहे. च्यवन नावाचा एक ऋषि होता. तो इतका म्हातारा झाला होता की त्याला आपल्या जागेवरून हालताहि येत नव्हते. शिवाय तो आंधळा होता. परंतु देवांचें वैद्य अश्विनीकुमार यांनी त्याची चिकित्सा केली आणि त्याला पूर्ण तरुण करून त्याचा विवाहहि करून दिला. याचप्रकारे एक स्त्री विश्पला युद्धात गेली आणि

लढाईत तिची एक टांग तुटली. अश्विनी कुमारानी तिला एक लोखंडाची टांग बसविली आणि तिला चालण्या–फिरण्यास योग्य बनविले. ही शस्त्रक्रिया आजच्या वैज्ञानिक युगातहि अशक्य अशी आहे.

' वैदिकयुगात राज्यपद्धति प्रजातंत्रात्मक होती. '

**आ यद्वामीयचक्षसा मित्र वयं च सूरयः । व्यचिष्ठे बहुपाय्ये यतेमहि स्वराज्ये ॥**

' अर्थात् प्रजेने जे दूरदर्शी, मित्राप्रमाणे प्रजेचे हित करणारे आणि विद्वान् आहेत, अशांच लोकांना लोकसभेत निवडणूक करून पाठवावे.

' भारत सदैव गोपूजक आहे. प्राचीन भारतात घरी आलेल्या अतिथीचा गोदुग्ध देऊन सत्कार केला जात होता. वेदामध्ये गाईला रुद्राची माता, वसूंची पुत्री, आदित्याची बहीण आणि अमृताचे केंद्र म्हटले आहे. गोदुग्धात आयुष्य दीर्घ करण्याची शक्ति आहे आणि ही शक्ति दुसऱ्या कोणत्याहि पशूच्या दुधात नाही; म्हणून देशातील प्रजेचे स्वास्थ्य–रक्षण करण्यासाठी गोसंरक्षण आवश्यक आहे. '

' वैदिक संस्कृति सर्वोत्कृष्ट आहे. त्यानेच जगताचे कल्याण होईल. यासाठी सर्व जगतात वैदिकधर्माचा प्रचार व्हावा आणि त्याने दाखविलेल्या मार्गाने सर्व विश्वाने चालावे, असे मी इच्छितो आणि यानेच विश्वशान्ति शक्य आहे. '

प्रि. एच्. के. त्रिवेदी यांनी निमंत्रितांचे आभार मानले आणि **' वन्दे मातरम् '** हे राष्ट्रगीत होऊन ही सभा संपली.

## पुण्यातील पंडितजींची सत्कार संभावना

महाराष्ट्राचे स्फूर्तिकेंद्र व पंडितजींच्या राजकीय गुरुंची कर्मभूमि जी पुण्यनगरी तीमध्ये पंडितजी ता. २८ एप्रिल १९६७ शुक्रवार रोजी रात्री पुणे–मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या व त्याने निर्माण केलेल्या सत्कारसमितीच्या खास निमंत्रणावरून आले. रात्री नऊ वाजले होते तरी पंडितजींच्या स्वागतार्थ हजारो हजार नागरिक जमले होते. पुणे ग्रंथसंग्रहालयाच्या द्वाराशी एकशेएक सुवासिनींनी पंडितजी व सौ. सरस्वतीबाई सातवळेकर यांना औक्षण करून नीरांजने ओवाळली.

शनिवार ता. २९ रोजी सकाळी दत्तदिगंबर–यात्रा–कंपनीतर्फे गोखले सभागृहात म. म. पोतदार यांचे अध्यक्षतेखाली पंडितजींचा सत्कार झाला. औंधास पंडितजींच्या वत्सल छायेत वाढलेल्या मंडळींचा हा घरचा आहेर होता. ' तरुणांनी संस्कृतचा अभ्यास केला पाहिजे व वैदिक जीवनाची ओळख करून घेतली पाहिजे ' असा संदेश त्यावेळी पंडितजींनी दिला. आणि ' अफगाणिस्तान–रशियापर्यंत पसरून असलेल्या वैदिक संस्कृतीच्या अवशेषांचे संशोधन, संगोपन आणि जगाच्या मेंदूवर संस्करण करणे भारतीयांचे कर्तव्य असल्याचे ' सांगितले.

*

त्या अगोदर श्री शन्तनुराव किर्लोस्करांच्या लकाकि बंगल्यावर पत्रपंडितांना पंडितजींनी सांगितले की ' मुसलमानांच्या आक्रमणामुळे भारतातील वेदकालीन कला व शास्त्रे नाश पावली, त्यांचे स्वतंत्र भारताने कालोचित पुनरुज्जीवन केले पाहिजे. मी शतायु आहे याचे मला आश्चर्य नाही. भगवान् श्रीकृष्ण सव्वाशे वर्षे जगले हे कोणास ठाऊक नाही ? एकशे वीस वर्षापेक्षा अधिक जगता आले तर तो काही पराक्रम म्हणता येईल. मात्र आपले जीवितकार्य पूर्णत्वाने करण्यासाठीच माणसाने जगले पाहिजे. केवळ जगणे हे आपल्या धर्मात नाही. मनुष्याने पुरुषार्थ करीतच जगले पाहिजे. वेदकालात विमानांचा उल्लेख आढळतो व औद्योगिक वाढही झाली होती. आजच्यासुद्धा राज्यकर्त्यांनी चाणक्यनीति स्वीकारल्याशिवाय देशाचा उद्धार होणार नाही. चीन आणि पाकिस्तान यांच्या मैत्रीविषयी काय बोलावयाचे ? एक उघड शत्रु आहे व दुसरा प्रच्छन्न आहे. उघड शत्रुपेक्षा प्रच्छन्न अधिक वाईट ! हे सर्व अभ्यासपूर्वक ओळखून वागले पाहिजे. शरीर, मन, बुद्धि व आत्मा परमेश्वराने मनुष्यास दिला आहे. त्यांची वाढ कशी करावयाची याचा धडा देणारे शिक्षण ते खरे शिक्षण होय. '

शनिवारी (ता. २९ एप्रिल १९६७) सायंकाळी श्री थत्ते यांच्या उद्यानप्रासादात साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्याच शुभहस्ते वेदमहर्षि सातवळेकरांना गौरवग्रंथ समर्पण करण्याचा समारंभ सत्कारसमितीतर्फे झाला. स्वागतगीत, श्री नानासाहेब पानसे यांचे प्रास्ताविक व डॉ. मधुसूदन पेठे यांचेकडून संदेशवाचन झाल्यावर गौरवग्रंथसंपादनसमितीचे अध्यक्ष डॉ. व. ग. राहूरकर यांनी गौरवग्रंथाची वैशिष्टये विशद केली. त्यानंतर ' शारदा ' या संस्कृत पाक्षिकाचे संपादक पं. वसंत गाडगीळ हे आपल्या संस्कृत भाषणात म्हणाले– ' परदेशी राष्ट्र-प्रमुखांच्या भारतदर्शनकार्यक्रमात भारतसरकार कुतुबमिनार, ताजमहाल, भाक्रा-नानगल दाखविते; पण प्राचीन महर्षिंचे जीवन जगणाऱ्या पारडीच्या पं. सातव-ळेकरांच्या रूपाने खऱ्या भारताचे दर्शन जगाला घडवावे, असे सरकारच्या मनातही येत नाही ! मुंबई, अहमदाबाद, दिल्ली येथे सत्कार–समित्या स्थापन झाल्या आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर पुणेशहरातील हा भव्य सत्कार देशाला एक कित्ता आहे. ' सत्कारसमितीचे अध्यक्ष उद्योगपति श्री शंतनुराव किर्लोस्कर यांनी अध्यक्षांना गौरवग्रंथ–प्रकाशनाची व समर्पणाची विनंती केल्यावर, साहित्याचार्य हरिदास म्हणाले की– ' हा ग्रंथ वंदनाग्रंथ आहे पंडितजींचा गौरवग्रंथ तयार करण्याची योग्यता त्यांच्याच तोडीच्या विद्वानास असणार. भारतसरकारचे कोटयवधि रुपये ठायी–अनाठायी खुशाल खर्च होत असता, पं सातवळेकरांच्या वेदप्रचाराच्या भगीरथ प्रयत्नाला सरकारचे पाठबळ मिळू नये, देणगी मिळावयाची नाही, हवे तर कर्ज मिळेल, असा जबाब मिळावा, हे आश्चर्य नव्हे काय ? आज भारतात वेदावर आधारित प्रखर राष्ट्रवाद निर्माण व्हावयाचा असेल तर पारडी या तेजस्वी जीवनाचे

प्रतीक असलेल्या नवीन तीर्थक्षेत्राला आपण भेट दिली पाहिजे. तेथे जीवनातील निराशावाद सर्वस्वी निघून जाईल.' नंतर पंडितजींना श्री बाळशास्त्रींनी वंदन करून गौरवग्रंथ समर्पण केला. त्यावर त्या सत्कारास उत्तर म्हणून पंडितजी म्हणाले– ' हा सत्कार वेदांचा आहे. वेदकाली राज्यकर्ते विद्वान् असावे लागत. आतां उलट चालते. पण वेदांच्या शिकवणीप्रमाणे आपणा सर्वांचे जीवन विद्यासंपन्नतेने तेजस्वी झाले पाहिजे. ' त्यानंतर चिरंजीव सुहास वसंत बहुलकर याने काढलेल्या पंडितजींच्या तैलचित्रांचे अनावरण साहित्याचार्यांनी पुणे मराठी ग्रंथालयाचसाठी केल्यावर, श्री न. गो. अभ्यंकर यानी आभार मानले व राष्ट्रगीत होऊन पंडितजींच्या सत्काराचा पूर्वार्ध समाप्त झाला.

रविवार ता. ३० एप्रिल रोजी सकाळी न्यू इंग्लिशस्कूल ( टिळकरोड ) चे क्रीडांगणावर संघशाखेस पंडितजी उपस्थित राहिले व ८ वाजता नारायणपेठेत पुणे मराठी ग्रंथालयाच्या आवारात पंडितजींच्या सन्मानार्थ सर्वशाखीय वेदपाठाचा कार्यक्रम झाला. यात पुणे, अलिबाग, नागाव, सांगली, इचलकरंजी, नाशिक, कुरुंदवाड, वाराणसी, धारवाड, मद्रास आणि सिनोर ( गुजरात ) येथून आलेल्या तेवीस वेदमूर्तींनी भाग घतला होता. मद्रासचे सामवेदी पट्टाभिराम शर्मा व गुजराथचे अथर्ववेदी वासुदेव रमणिकलाल पंचोली ही वेदाभ्यासींची आकर्षणे होती. सर्व वेदमूर्तींना पंडितजींच्या हस्ते अकरा अकरा रुपये दक्षिणा देऊन परामर्श घेण्यात आला. या कार्यक्रमास रँग्लर नारळीकर, सौ. नारळीकर, श्री शंतनुराव व सौ. यमूताई किर्लोस्कर, श्री वसंतराव व सौ. जयश्री वैद्य, श्री चिं. वि. जोग ही मंडळी प्रामुख्याने हजर होती. याच वेळी सौ. सरस्वतीबाई सातवळेकर यांची आंबेमोहोर तांदूळ, सुवर्णा गहू, सुवर्णा ज्वारी, कडवे वाल, हिरवा हरबरा या पंचधान्यांनी ओटी भरण्याचा कार्यक्रम कार्ला येथील विष्णुवाडीतर्फे झाला. सत्कारास प्रतिसाद देताना पंडितजी म्हणाले– ' वेदांचे पठण करण्यात एक आरोग्यदायक शक्ति आहे. वैद्यकशास्त्रानेसुद्धा वेदपाठ हा एक रोगप्रतिबंधक उपाय म्हणून सांगितला आहे. तेव्हा भारतसरकारने भारतात वेदपाठी प्रतिष्ठेने जगतील अशी योजना आखावी. '

वेदपाठाच्या या कार्यक्रमानंतर पंडितजी शान्तिमंदिर येथे जाऊन न्यायरत्न विनोद यांना व संध्याकाळच्या आपल्या मुख्य सत्कारसभेस रमणबागेत जाण्यापूर्वी आपले दीक्षागुरु योगिराज वामनरावजी गुळवणी यांना भेटले. गुळवणी महाराजांचा ऐंशिवा वाढदिवस त्यावेळी पुण्यात साजरा होत होता.

पं. सातवळेकर–सत्कार–समितीने रमणबाग क्रीडांगणावर आखलेल्या मुख्य समारंभाला सौ. ज्योत्स्ना भोळे यांच्या महाराष्ट्रगीतानें प्रारंभ झाला. समितीचे अध्यक्ष या नात्याने श्री शंतनुराव किर्लोस्कर यानी हजारो हजारानी रमणबागेचे मैदान फुलविणाऱ्या सातवळेकर–चाहत्यांचे स्वागत केले. श्री सुधीर फडके यांनी श्री ग. दि. माडगूळकर कृत—

हे ब्रह्मर्षे महामानवा, अजर अमर तूं हे भूदेवा !
वेदांताचा भाष्यकार तू उपनिषदांचा उद्घोकार तू
आर्यत्वाचा अविष्कार तू आर्षा आशय देसि नवनवा,
प्रापंचिक परि अनासक्त तू तत्त्वज्ञानी, कलासक्त तू
मुक्तात्मा तरि देशभक्त तू शब्द न पुरती तुझ्या गौरवा.
पुरातनातील चिरंतनाचा पुनर्घोष करी अमृतवाचा
प्रेषित का तू सुत स्वर्गाचा? ऋषिमालेंतील मणी आठवा ?
कर्मयोगि तू धर्मसमर्थक धर्मरथाचा प्रज्ञ प्रवर्तक
पदीं लोळते जीवन सार्थक कुठे वाहु मग या सद्‌भावा ?

हे कृतज्ञता-गीत म्हटल्यावर समितीच्या उपाध्यक्ष सौ. जयश्री वैद्य यांनी समारंभास आलेले, राष्ट्राध्यक्ष डॉ. राधाकृष्णन्, पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, उपपंतप्रधान मोरारजी देसाई, श्री यशवंतरावजी चव्हाण, डॉ. चिंतामणराव देशमुख, यांचे संदेश वाचून दाखवले. पुण्यातील व महाराष्ट्रातील विविधसंस्था व व्यक्तितर्फे पंडितजींना पुष्पहार अर्पण झाल्यावर पंडितजींच्या गुणगौरवपर भाषणे झाली.

'स्वतंत्रपणे वेदांचा अर्थ लावता येतो ही नवी दृष्टि पंडितजींनी दिली. वेदासंबंधी दिव्यदृष्टि देणारा महापुरुष ' असा पंडितजींच्याबद्दल आदर म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी व्यक्त केला. त्याअगोदर पुण्याचे उपमहापौर श्री सातव यांनी पूर्वोक्त सर्व ठळक प्रसंगाप्रमाणेच या प्रसंगीही पंडितजींना हार घालून एकशे वीसवर्षांचे कर्तबगार आयुष्य चिंतले. चित्रावशास्त्रीनंतर औंधचे श्री पंढरीनाथ इनामदार यांनी पंडितजींच्या बहुजनसमाजामधील जिव्हाळयाचे वर्णन करून भारतसरकारने पंडितजींना भारतरत्न ही पदवी द्यावी अशी अपेक्षा केली. त्यानंतर कऱ्हाडचे श्री पु. पां. ऊर्फ बाबूराव गोखले यांनी ' यः क्रियावान् स पंडितः । ' ही उक्ति पंडितजींनी, ' दीप कृतीचे उजळुनि उजळुनि ' सार्थ केली आहे, असे सांगून सार्वजनिक व खाजगी जीवनाचे अध्यात्मीकरणाचा कित्ता घालून दिला आहे असे प्रतिपादिले व पंडितजींस अभिवादन केले. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांनी स्पष्ट केले की जनतेने उत्स्फूर्त ब्रह्मर्षि ही पदवी ज्यांना दिली, त्या आधुनिक अगस्तिना भारत रत्न या पदवीची मातब्बरीच नाही ! ! नंतर सौ. यमूताई किर्लोस्कर यांनी स्पष्ट केले की पुण्यात पंडितजींचा होणारा सत्कार हा दक्षिणभारताचा प्रातिनिधिक सत्कार आहे. समितीचे कोशाध्यक्ष श्री अप्पासाहेब जोग यानी एक्कावन्न हजार रुपयांचा संकलित निधि आपण आज अध्यक्ष डॉ. शं. दा. पेंडसे यांचे हस्ते समर्पण करीत असल्याचे जाहीर केले आणि एकशे एकहजारांचा निधि पंडितजींना समर्पण करावा ही समितीची इच्छा सौ. जयश्री वैद्य व सौ. यमूताई किर्लोस्कर यांनी जाहीर केल्याप्रमाणे परिपूर्ण करण्याबद्दल जनतेस आवाहन केले. प्रयत्न करूनही इच्छित

रक्कम दहा हजारांनीच कमी पडल्यास श्री शंतनुराव किर्लोस्कर व श्री वसंतराव वैद्य पुरी करतील असेही समितीतर्फे प्रकट होताच टाळ्यांचा कडकडाट झाला. अध्यक्ष डॉ. पेंडसे यांचे हस्ते, मग, पंडितजींना एकावन्न हजारांची थैली, सरस्वतीची चांदीची मूर्ति, महावस्त्र व श्रीफल देण्यात आले, आणि सौ. सरस्वतीबाई सातवळेकर यांना सौभाग्यवायने सौ. यमूताई किर्लोस्कर यांनी लेबविल्यावर डॉ. व. ग. राहूरकर यांनी वाचून दाखविलेले हे--

ॐ

मानपत्र

शतायू कर्मयोगी पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर,

सा. न. वि. वि.

**मान्यवर पंडितजी**, आपण दि. १९ सप्टेंबर १९६६ या दिवशी शंभराव्या वर्षात पदार्पण केले आहे. वेदग्रंथ म्हणजे भारतीयांचा अमोल असा पैतृक वारसा. या वेदांचे संपादन, विवरण व संशोधन करून आपण विद्वन्मान्यता मिळविली आहे. उत्कृष्ट संस्कार करतील असे अनेक ग्रंथ आपण लिहिले आहेत. चित्रकलेतील आपले नैपुण्य नावाजण्यासारखें आहे पुणे विद्यापीठाने 'डी. लिट्' उपाधी देऊन आपल्या विद्वत्तेचा आणि वाङ्मयीन कार्याचा गौरव केला आहे. आपला सत्कार करण्याचे भाग्य आम्हांस लाभत आहे, हे आम्ही आमचे मोठे भाग्य समजतो.

**वेदवाचस्पति पंडितजी**, केवळ भारतीयांसाठीच नव्हे तर परराष्ट्रातील वेदप्रेमी लोकांसाठी आपण चारीही वेदांच्या संहिता उत्कृष्ट रीतीने छापून संपादित केल्या आणि अत्यंत अल्प मूल्यात त्या सर्वसामान्यांस उपलब्ध करून दिल्या. एवढेच नव्हे तर मराठी, हिंदी, गुजराथी या भाषामध्ये त्यांचा सविवरण, सुबोध व सरस असा अनुवाद आपण केला आहे. ऋग्वेदाची दैवत-संहिता तीन खंडांमध्ये छापून आपण प्रसिद्ध केली आहे. ती तर भावी संशोधकांना एक अमोल संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडेल. आपली ही सर्व वैदिक ग्रंथसंपदा भारतातील प्रत्येक घर संस्कार-संपन्न करील यात शंका नाही.

**ब्रह्मर्षि पंडितजी**, अतिशय परिश्रम घेऊन औंध नगरात आपण स्वाध्यायमंडळ स्थापन केले होते. परंतु भयंकर अपत्तीमुळे आपण तो सर्व पसारा पारडी येथे हलविला. आता तर तेथे एक पवित्र असे गुरुकुलच तयार झाले आहे. तेथील वेद-मंदिरात आपण आजही वेदांची व संस्कृत विद्येची निरलसपणे सेवा करीत आहात. अध्ययन, अध्यापन, संशोधन व प्रकाशन या स्वरूपांत अखंडपणे आपण हे ज्ञानसत्र चालवीत आहात. आपल्या या उत्साहाने खरोखर तरुणांनादेखील लाज वाटेल.

**गीतालंकार पंडितजी**, पुरुषार्थबोधिनी भगवद्गीता हा सहस्र पृष्ठांचा आपला गीताभाष्यग्रंथ भगवद्गीतेचे एक आगळेच दर्शन घडवितो. गीतेचे वास्तविक स्वरूप व उद्दिष्ट निष्काम कर्मयोग, वेद आणि गीता यांचा संबंध इत्यादि अनेक प्रश्नांचा

ऊहापोह यात आपण केला आहे. या ग्रंथाने गीताभ्यासात मोलाची भर घातली आहे. पारडी येथील गीताभवन आपल्या अविश्रांत परिश्रमाचे प्रतीक म्हणून आज उभे आहे.

**साहित्यवाचस्पती पंडितजी,** वाल्मिकी रामायणाची समालोचना व मराठी भाषेतील अनुवाद, उपनिषद् भाष्यग्रंथमाला, योगग्रंथमाला, महाभारतसंशोधन, इत्यादि विविध ग्रंथांत आपले पांडित्य, संस्कार करण्याची क्षमता व सांस्कृतिक मूल्यांची चिकित्सा दृष्टीस पडते. आपल्या या गंभीर वाङ्मय–समुद्राचे दोन अंतःप्रवाह आहेत. ते म्हणजे विशुद्ध राष्ट्रभक्ति आणि समाजसेवा. संस्कृत भाषेचे अध्ययन सोपे करण्यासाठी आपण संस्कृत–पाठ–मालेची चोवीस पुस्तके तयार केली आहेत. संस्कृत भाषेवरील आपले अलोट प्रेम आजच्या भारतीय तरुणांना प्रेरक ठरेल.

**चित्रकलाकुशल पंडितजी,** आपण चित्रकलेतही कुशल आहात व याही कलेत आपले असे एक वैशिष्टय आहे हे सर्वांना माहित असेलच असे नाही.' चित्रात नेहमी उच्च ध्येय प्रतिबिंबित व्हावे ' असे आपले मत आहे. ' कला आणि नीति यांचा अतूट संबंध असावा ' असे आपण म्हणता. या कलेत आपले काही शिष्य ख्यातनाम चित्रकार म्हणून आज मानले जातात.

**संघटक पंडितजी,** आपण विद्वान् आहात, पण कलहप्रिय नाही. समाजसंघटन करून राष्ट्र सामर्थ्यसंपन्न करावे यासाठी आपण सतत समाजामध्ये मिसळत आहात. ' वैदिक राष्ट्रगीत ' या आपल्या लेखामुळे आपण ब्रिटिश सरकारच्या रोषाला पात्र झाला होता. ' राष्ट्राची तयारी संरक्षणात्मक व वेळ पडल्यास आक्रमणात्मकही असावी, ' असे आपण सतत सांगत आला आहात. आपला हा सिद्धांत आपल्या राष्ट्राला दीपस्तंभासारखा मार्गदर्शक ठरेल. औंध संस्थानातही स्वराज्यस्थापना व संरक्षकदलस्थापना या कार्यात आपण त्यावेळी अग्रभागी होता.

**जीवनसंग्रामातील रणझुंजार पंडितजी,** आपल्या आजपर्यंतच्या जीवनात अनेक प्राणसंकटे आली. केलेले सर्व उद्ध्वस्त होण्याचे अनेक प्रसंग आपणांवर आले. पण आपण डगमगला नाही. झंझावातातही आपण निश्चल उभे ठाकलात. वयाच्या ८१ व्या वर्षी आपण पारडीचा आश्रम व आपले वाङ्मयीन कार्य पुन्हा उभी केली. जीवनाच्या संग्रामात आपण सतत झुंजत व महा भयंकर संकटांवर मात करीत आला आहात.

**जगन्मान्य पंडितजी,** आपल्या अंगच्या विद्वत्तेमुळे आत्तापर्यंत आपणांस महामहोपाध्याय, साहित्यवाचस्पति, डी. लिट्., वेदवित्कुलशेखर, गीतालंकार, वेदवाचस्पति, विद्यामार्तंड, ब्रह्मर्षि या सन्मानदर्शक उपाधी प्राप्त झाल्या आहेत. राष्ट्रपतींनी गौरवानुदान देऊन आपला सत्कार केला आहे. जागतिक धर्मपरिषदेसाठी रशिया व जपान या देशांकडून आपणांस निमंत्रणे आली होती. जागतिक शांतता–परिषदेच्या संघटकांनी आपणांस जिनीव्हा परिषदेचे निमंत्रण दिले होते.

मान्यवर पंडितजी, तेजस्वी आणि गुणसमृद्ध राष्ट्रजीवनाच्या उभारणीसाठी संपूर्ण वेदवाङ्मय आणि संस्कृतविद्या प्रादेशिक भाषातून व राष्ट्रभाषेतून सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवून समाजाला जागृत करण्याचे कार्य आपण आजही अनेक अडच॰ णींना तोंड देऊन आणि आर्थिक घस सोसून मोठ्या जिद्दीने चालविले आहे. वयाच्या शंभराव्या वर्षीही आपली चिकाटी पाहून आपल्या या सर्वमान्य कार्याला अल्पसा तरी हातभार लावावा म्हणून विद्याकेंद्र असलेल्या पुण्यातील व अन्य विविध ठिकाणच्या चाहत्यांनी आपला सत्कार करावा व संकल्पित निधि समर्पण करून आपल्या कार्याविषयी कृतज्ञता प्रकट करावी, असे ठरविले. हे कार्य करण्याचे भाग्य आम्हांस लाभले याबद्दल आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

महर्षि पंडितजी, आपले तपस्यापूत, ऋषितुल्य जीवन, साधी राहणी आणि उच्च विचारसरणी, अंगीकृत कार्याशी सर्व परिस्थितीत एकनिष्ठ राहण्याचा दृढ निश्चय, आपली वाङ्मयसंपदा, आपली राष्ट्रभक्ति, आपला कर्मयोग या सर्वच गोष्टींची आज आपल्या राष्ट्राला निकडीची गरज आहे. आपले चालते बोलते उदाहरण आणखी पंचवीस वर्षे आम्हांला प्रेरणा देत राहो व मार्गदर्शन करीत राहो, अशी ईशचरणी प्रार्थना करून आमच्या या मानपत्राचा स्वीकार करून आम्हांस उपकृत करावे, अशी आपणांस विनंती करीत आहोत.

आपले

सदस्य, वेदवाचस्पती पंडित सातवळेकर सत्कारसमिति,

पुणे मराठी ग्रंथालय, ४३७ ब, नारायण पेठ, पुणे २.

अध्यक्षांच्या हस्ते रौप्यकरंडकातून पंडितजींना अर्पण करण्यात आले. अशा तऱ्हेने पंडितजींचा सशवितक, सपत्निक व सादर सत्कार झाल्यावर अध्यक्ष डॉ. पेंडसे यांनी पुणे शहराने त्या वेदोभास्कराचा सन्मान घडवून आणून पुण्याची गुणपूजनपरंपरा राखली याबद्दल समाधान व्यक्त केले. पंडितजींचा सत्कार भारतातील निरनिराळ्या राज्यांच्या राजधान्यामधून व्हावा अशी अपेक्षा करून डॉ. पेंडसे म्हणाले की– 'पंडितजींच्या रूपाने प्राचीन ऋषींची परंपराच चालत आली आहे. साम्राज्ये आली आणि गेली पण अमृत प्यालेले हे वेदवाङ्मय अखंड राहिले आहे. पंडित सातवळेकर यांच्यासारख्या तेजस्वी वेदमूर्तींची परंपरा भारतात अखंड चालू राहिली, तर जिथे वेद निर्माण झाले, ती सप्तसिंधूप्रदेशातील वेदभूमि पुन्हा भारताच्या आधिपत्याखाली येईल.'

या सर्व सत्कारास उत्तर देताना पंडित सातवळेकरजी उद्‌गारले की– 'वैदिककाळातील मानव फार सुधारलेले होते. तेवढी आपली सुधारणा आज करणे असेल तर आजच्यापेक्षा आपणास प्रगतिच प्रगति करून दाखवावी लागेल. वृद्धाला तरुण बनविणे, आकाशातून संचार करणे, दुखावलेले अवयव लोहादिकांचे बसवून मनुष्याला युद्धक्षम करणे इत्यादि गोष्टीही वैदिककाळात होत. वैयक्तिक, सामाजिक

व राजकीय आणि शासकीय क्षेत्रामध्ये होणाऱ्या सुधारणांची सुसंबद्धता व समन्वय साधल्याशिवाय गत्यंतर नाही. ही आवश्यक सुधारणा आमच्या हातून होवो व आमची. प्रगतिशील आर्य म्हणून या जगात ख्याति होवो हीच आकांक्षा परमेश्वर सफल व सुफल करो.'

'स्वराज्यशासन हे लोकहित साधणारे व्हावे यासाठी दीर्घदृष्टीचे, मित्रदृष्टीचे व सूरी म्हणजे महाविद्वान्‌लोक लागतात; त्यायोगेच स्वराज्यशासन निर्दोष व सर्वोत्कृष्ट होते' हा वैदिक संदेश पंडितजींकडून घेऊन लोक घरोघर जाताना आढळले.

ता. १ मे १९६७ रोजी सकाळ कचेरी, महाराष्ट्रीय मंडळ भारतीय कलाप्रसारिणी या संस्थातही सत्कार झाला. या दिवशीचा सर्वात मोठा व पुण्यातील महत्त्वाचा समारंभ गुलटेकडी–सावरकर नगरातील वैदिक संशोधन मंडळाच्या भव्य वास्तूत टिळकमहाराष्ट्र विद्यापीठाचा खास पदवीदान समारंभ होय. विद्यापीठाच्या इतिहासात 'विद्वत्कुलशेखर' भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांच्यानंतर 'वेदवित्‌कुलशेखर' ही पदवी मिळविणारे पंडितजी सातवळेकर हेच एक वेदरत्न होत. तेथे वैदिकमंगल आणि डॉ. ल. शं. भावे व पं. गणेशशास्त्री लोंढे यांच्या स्वरचित पद्यसुमनांजली अर्पण झाल्यावर पं. ना. श्री. सोनटक्के यांनी समारंभास आलेले शुभसंदेश वाचले. विद्यापीठाचे कुलगुरु पोतदार यांनी सर्वांचे स्वागत करताना, प्रत्येकाने आपल्या संग्रही चारही वेदांची एक प्रत ठेवावी; पंडितजींनी ती अतिशय स्वस्त किंमतीत मिळण्याची सोय केली आहे. या गोष्टीकडे जनतेचे लक्ष वेधले. त्यानंतर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वेदाभ्यासी आचार्य वि. प्र. लिमये यांनी गुणगौरवपत्र व संस्कृत पदवीपत्र वाचून दाखविल्यावर पंडितजींना कुलपति डॉ. बापूजी अणे यांच्या हस्ते वेदवित्कुलशेखर ही विशेष पदवी, पंधराशे एक रुपयांची थैली, शाल, विद्यापीठाचे सर्व प्रकाशित ग्रंथ व श्रीफल अर्पण करण्यात आले. सत्काराबद्दल आभार मानताना पंडितजी म्हणाले– 'भारताला जागृत आणि तेजस्वी करावयाचे असेल तर वेदांचे ज्ञान समाजाच्या सर्वच स्तरापर्यंत पोचले पाहिजे. यासाठीच वेदांचे भारताच्या सर्व सोळा भाषात अनुवाद व्हावेत. या प्रचंड कामास आपण हात घालावा अशी माझी विनंति आहे.' शेवटी कुलपति डॉ. बापूजी अणे यानी समारोपात बजावले की– 'इंग्रेजी सक्तीचे चालेल, पण संस्कृतची सक्ति मात्र नको, अशा घातकी धोरणाचा प्रचार कृपा करून थांबवा.' आणि आभारप्रदर्शन व राष्ट्रगीत होऊन सर्व समारंभाची पूर्णता झाली.

ता. २ मे रोजी पंडितजींनी आपले राजकीय गुरु लो. टिळकांच्या केसरी संस्थेस भेट दिली आणि लोकमान्यांचे वाङ्मयदर्शन घेऊन लोकमान्यांच्या पुतळ्यास सगद्‌गदित अंतःकरणाने हार घातला व अभिवादन केले.

: २२ :

# पंडितजींच्या प्राज्ञोक्ति

१ पुराण काय किंवा बायबल व कुराण हे ग्रंथ काय, आर्यांच्या गूढ तत्त्व-दृष्टिनेंच पाहिले पाहिजेत, म्हणजे त्या त्या ग्रंथांतील ज्या ज्या गोष्टी सध्या समजत नाहीत, त्या समजूं लागतील. —पौराणिक गोष्टीचा उलगडा

२ लोकसभा, सैन्य व खजिना यावर वैदिककाळी जनतेचाच ताबा असे व जोपर्यंत राजा योग्य रीतीने वागेंल तोपर्यंतच वरील तीन शक्तीची अनुकूलता त्याला मिळत असे. राजाचे वर्तन प्रतिकूल झाले की, जनतेकडून त्याची उचलबांगडी होत असे.
—पौराणिक गोष्टीचा उलगडा

३ स्त्रियामध्ये जोपर्यंत आपलेंपणा राहतो तोपर्यंत त्या जातीची उन्नति होणे शक्य असते; पण एकदा का स्त्रियाना आपल्या जातीचे पति पसंत पडेनासे झाले व त्या दुसऱ्या देशांतील आपल्या लोकाना पराभूत करणाऱ्या लोकाशी विवाह करू लागल्या, म्हणजे समजावे की त्या जातीचा कायमचाच नाश होणार.
—पौराणिक गोष्टीचा उलगडा

४ विचारी लोक महायुद्ध सुरू झाले तरी आपल्या राष्ट्रातील कर्तेपुरुष ज्या योगाने वाचतील, त्या राजनीतीचे अवलंबन करतात व आपल्या राष्ट्राचा अधःपात एकाच पिढीत होऊ देत नाहीत. —पौराणिक गोष्टीचा उलगडा

५ अराजकतेचे बीज पराजित जातीच्या विचारसरणीत नसून ते दिग्विजयी जातीच्या अत्याचारात आहे. —पौराणिक गोष्टीचा उलगडा

६ निर्दयतेने संहार करणे हे आर्यवीराचे काम नव्हे. आपला कार्यभाग होण्याइतकीच शत्रूवर दहशत बसवावयाची हा आर्यांचा बाणा, —पौराणिक गोष्टीचा उलगडा

*

**७ आत्मसंरक्षणाची शक्ति** जशी व्यक्तिमध्ये तशीच ती समाजामध्येही पाहिजे. त्याशिवाय जगात निभाव लागणे नाही. —पौराणिक गोष्टींचा उलगडा

**८ राष्ट्राची** उत्तम स्थिति ठेवावयाची असल्यास अनुत्पादक वर्गामध्ये फाजील दाटी होऊ देता कामा नये व उत्पादक धंद्यामध्येही परस्पर स्पर्धा न वाढेल अशी व्यवस्था झाली पाहिजे. —पौराणिक गोष्टींचा उलगडा

**९ भगवद्गीतेचा उपदेश** मानवी जीवनामध्ये ओतप्रोत भरावा. वैदिक सनातन मर्यादेप्रमाणे 'धर्म' हा संपूर्ण मानवी व्यवहाराचे स्वरूप आहे.

मानवीजीवन हे एक अखंड व अविभक्त असे सर्वांगपूर्ण जीवन आहे.

—गीतेतील राजकीय तत्त्वज्ञान ( प्रस्तावना )

**१० अर्जुन** आणि हनुमान् हे दोन महाभवत आदर्शभूत आहेत. या दोघांच्या आयुष्याचा विचार केला असता असे कळून येते की, भगवान् रामचंद्रांनी आणि श्रीकृष्णानी समाजाची सुव्यवस्था स्थापन करण्यासाठी क्रमशः रावणादि राक्षस आणि कौरव याचा नाश करून तत्कालीन सज्जनाचे रक्षण करण्याचे ठरवले होते व त्या-नंतर राज्यशासनाच्या द्वारे चार वर्णाची सुव्यवस्था करण्याचे योजिले होते. या आयोजनातील जेवढा भाग हनुमान् आणि अर्जुन याना उचलता येण्याजोगा होता, तेवढा त्यानी उचलला. सज्जनाचे संरक्षण, दुष्टाचा नाश आणि धर्माची संस्थापना हे विविध कार्य ईश्वराचे स्वतःचे आहे. भक्तानी हे कार्य होईल तितके तनमनधन लावून केले पाहिजे आणि या कार्याच्या द्वारेच परमेश्वराची सेवा केली पाहिजे. हिचेच नाव भक्ति. —गीतेतील राजकीय तत्त्वज्ञान

**११ पृथ्वी,** आप, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धि, अहंकार, जीवभाव ही सगळी एकत्र मिळून आणि एकएकटी परमात्म्याची शरीरे असल्यामुळे परमात्मा हा विश्व-रूपाने चर्मचक्षूनाही दृश्य आहे. ज्याठिकाणी या नऊ वस्तूपैकी एखादी वस्तु दिसेल तेथे ते परमात्म्याचें शरीर आहे, असे समजावे. सर्व प्राण्यात ही नऊ तत्त्वे आहेत. म्हणून गीतेच्या सिद्धांताप्रमाणे जीवमात्राची शरीरे अर्थात् परमात्मरूपेच होत.

—गीतेतील राजकीय तत्त्वज्ञान

**१२ विश्व** हे अद्वितीय अशा परमात्म्याचे अखंड स्वरूप आहे, अशी प्रतीति येऊं लागता क्षणीच, 'मीही त्या परमात्म्याचाच एक अंश आहे' हे कळून येते व स्वतःला हीनदीन मानण्याचे काही एक कारण नाही असा निश्चय होतो. मी ईश्वरा-हून पृथक् आहे, ईश्वर पूर्ण आहे, मी अपूर्ण आहे 'अशी माझी पूर्वी असलेली भावना अज्ञानजन्य होती, मी निःसंदेह ईश्वरस्वरूप आहे' हे ज्ञान झाले, म्हणजे त्या योगे साधकाचा आत्मविश्वास निःसंशय वृद्धिंगत होणे शक्य आहे.

—गीतेतील राजकीय तत्त्वज्ञान

**१३ ज्याप्रमाणे** अनन्यभक्ति करणारे स्वतः देवतारूप होऊन तिची उपासना करतात,

त्याप्रमाणें स्वराज्यात प्रजा ही आपणास राज्यशासनयंत्राशी अविभक्त व एकरूप मानते आणि आपल्या हिताकरता आपला राज्यकारभार स्वतः चालविण्याचा अनुभव घेते, ती प्रजा स्वराट् पदवीला प्राप्त होते. --गीतेतील राजकीय तत्त्वज्ञान

१४ **व्यवहार** करीत असताही तोच परमार्थ घडला पाहिजे. हे केवळ अनन्य-भक्तीनेच शक्य आहे, --गीतेतील राजकीय तत्त्वज्ञान

१५ **गीताशास्त्र** राजाची ( राज्यकारभार करणाराची ) विद्या आहे. गीता-शास्त्र राजाचे ( शासन करण्याचे ) गुह्य ज्ञान आहे. हे पवित्र व उत्तम आहे. याचे फळ प्रत्यक्ष अनुभवात दिसून येणारे आहे. हा राजाच्या राज्यशासनाचा धर्म सहज आचरता येण्यासारखा आहे. त्यापायी फारसा व्ययही करावा लागत नाही.
—गीतेतील राजकीय तत्त्वज्ञान

१६ **आमचा** सनातन धर्म हा विश्वसेवेचाच धर्म आहे. सनातन धर्म हा संपूर्ण विश्वरूपाच्या सेवेने त्याचीं प्रसन्नता संपादन करण्याचा विचार करणारा धर्म आहे.
--गीतेतील राजकीय तत्त्वज्ञान

१७ **देशदेशांतरात** दैवीभावाची वृद्धि आणि आसुरीभावाचा नाश करणारी शिक्षण–पद्धतीच रूढ व्हावी. ज्यामुळे दैवीभाव अंगी असलेल्या लोकाच्या हाती राज्यकारभार येईल आणि आसुरीप्रवृत्तीचे लोक एक तर कमी तरी होतील किंवा वर तरी उठणार नाहीत, अशीच राज्यव्यवस्था निर्माण व्हावी. आसुरी प्रवृत्तीच्या लोकास मन मानेल ते करण्यास मुभा नसावी. भागवत राज्यपद्धतीत दैवीभावनेला उत्तेजन मिळेल, आसुरी भावनेला कमी केले जाईल, आणि सर्व लोक स्वतःच आपले नियंत्रण करतील अशी व्यवस्था होईल. --गीतेतील राजकीय तत्त्वज्ञान

१८ **राजा** हा राष्ट्राचा सखा ( मित्र ) असला पाहिजे; त्याने सभेच्या मताला मान दिला पाहिजे; त्याच्यावर सोपविलेल्या कामामध्ये त्याने यश संपादन केले पाहिजे; न्यायाने लोकव्यवहार पाहिले पाहिजेत; सर्व लोकाना अन्न मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे. राष्ट्राचे बल, वीर्य, शौर्य, नावलौकिक वाढविला पाहिजे व सर्वप्रकारे प्रजेचे हित केले पाहिजे. इतक्या गोष्टी करणारा राजा असेल तर त्याला लोकाचा प्रतिनिधि मानतात. --प्राचीन आर्यांचे राजकीय विचार

१९ **आपले राष्ट्र** सर्व राष्ट्रात उत्तम असले पाहिजे ही महत्त्वाकांक्षा येथे राष्ट्र-भक्तानी आपल्या मनात धरावी व सर्व राष्ट्रभक्तानी आपल्या राष्ट्राला सर्वोत्कृष्ट दशेमध्ये नेण्याविषयी आपली पराकाष्ठा करावी. --प्राचीन आर्यांचे राजकीय विचार

२० **मुलाचे** आईवर व आईचे मुलावर अकृत्रिम प्रेम असते. मोबदल्याची अपेक्षा न करता जे प्रेम असते तेच दिव्य प्रेम होय; त्यालाच अकृत्रिम प्रेम असे म्हणावे. मातृभूमिवरील प्रेमही असेच अकृत्रिम, निःसीम, आत्यंतिक व दिव्य असे असावे.
--प्राचीन आर्यांचे राजकीय विचार

२१ **सहमान** व असह्य बनावे म्हणजे आपलाच विजय होईल यात शंका नको. ( सहमान ) शत्रूचे हल्ले आले असता स्वतः आपले स्थान न सोडता ते परतविणारा आणि ( असह्य ) शत्रूवर हल्ला करून त्यास पळावयास लावणारा; असा जो असतो त्याचा विजय होतो.

आपली तयारी संरक्षणात्मक व आक्रमणात्मक असावी. ( अथर्व. १२।१।५४ ) असे स्पष्ट दाखविले आहे. **--प्राचीन आर्यांचे राजकीय विचार**

२२ **मनुष्य** जे काय करीत असेल, ते त्याने मानवी उन्नतिसाठी, मानवीशक्तीच्या सात्त्विक विकासासाठीच केले पाहिजे. एखाद्या रणशूराने निष्कारण आपलेच हात-पाय तोडण्यात कितीही कौशल्य दाखविले, तरी त्यामुळे त्याची प्रशंसा होणार नाही. मनुष्याचा विकास हा शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आत्मिक इतक्या क्षेत्रात तरी व्हावयाचा असतो व यापैकी जर कशाचा त्याग करावयाचा असेल, तर तो मागच्यासाठी पुढच्याचाच करावयाचा नसून पुढच्यासाठी मागच्याचा त्याग करावयाचा असतो. नीति म्हणजे मानवी विकास पूर्ण होण्यास सहाय्यक होणारी वागणूक. खरी कला आत्मिक विकासाला सहाय्यकच असते. कला ही खरोखर आत्म्याचीच लीला आहे.

**--जीवनप्रकाश ( चित्रकलाविषयक मते )**

२३ **व्यक्तीचे** व राष्ट्राचे ध्येय निश्चित ठरणे अगत्याचे आहे. राष्ट्रहिताच्या विरुद्ध व्यक्तीचे ध्येय कधीही असता कामा नये. राष्ट्राचे ध्येय राष्ट्रातील धुरीणानी ठरविले म्हणजे, त्याचा प्रसार हरएक व्यक्तीपर्यंत करणे, हेच चित्रकारानी करावयास पाहिजे. **--जीवनप्रकाश ( चित्रकलाविषयक मते )**

२४ **मोठेमोठे** विद्वान् गेली दोन हजार वर्षे कलेची पूर्ण व्याख्या करण्याची खटपट करीत आहेत; पण जशी लोकाची संस्कारसंपन्नता वाढत चालली आहे, तशी ती जुनी व्याख्या अपुरी वाटत आली आहे; यामुळे सर्वमान्य व सर्वतः परिपूर्ण अशी कलेची व्याख्या अजून होऊ शकली नाही. असे असले तरी ' आकार, रंग, स्वर, शब्द व गति याच्या द्वारे सौंदर्याचा व त्याबरोबरच अलौकिक ध्येयाचा विकास व प्रकाश जिच्या योगाने होतो, ती कला होय. '

**--जीवनप्रकाश ( वास्तववादी व ध्येयवादी चित्रकला )**

२५ **केवळ** अनुकरण ही कला नसून, त्यात चैतन्य दाखवणें ही कला आहे.

**--जीवनप्रकाश ( ध्येयवादी चित्रकला )**

२६ **खरा** व श्रेष्ठ चित्रकार होण्यास तो या विश्वरूपाशी एकरूप होऊन पुनः ती एकरूपता अनुभवावयास त्याच्या बाहेर दहा अंगुळे उरला पाहिजे.

**--जीवनप्रकाश ( ध्येयवादी चित्रकला )**

२७ **आमची** संस्कृति ही स्वातंत्र्यप्रिय संस्कृति आहे. स्वातंत्र्यप्रिय नसलेल्या लोकाचे ध्येय ' मोक्ष ' होऊच शकत नाही. ज्या संस्कृतिने ' **बन्धनान्मोक्षः** ' हे

आपले साध्य ठरवून ' ज्ञान ' हे त्याचे साधन आहे असे निश्चित केले व प्रत्येक मनुष्य हा ज्ञानाने आपली बंधने तोडून मोक्ष प्राप्त करून घेऊ शकतो, असा ज्या संस्कृतीने असंदिग्ध सिद्धांत ठरवला, त्या संस्कृतीची स्वातंत्र्यप्रियता किती उच्च दर्जाची होती हे काही निराळे सांगण्याचे कारण नाही.

--जीवनप्रकाश ( सांस्कृतिक सारस्वत )

## संस्कृतीचे स्वरूप

२८ ( १ ) सर्व विश्व एका सत्तत्त्वाचा पसारा आहे व मीही त्याचाच अंश आहे, असा अनन्यसंबंध पाहून आत्मीयतेच्या भावनेने आपले कर्तव्य करणे.

( २ ) प्रशस्तमय कर्मे करण्यासाठी आपले जीवित अर्पून अप्रशस्त कर्मापासून दूर राहणे.

( ३ ) यज्ञीय जीवनाने सर्व जगत् उन्नत होऊ शकते, हे पाहून आपले जीवन त्यासाठी पवित्र बनवणे.

( ४ ) काम–क्रोध–लोभादिक मर्यादेच्या बाहेर प्रबळ झाले तर ते हानि करतात, हे जाणून त्याना अमर्याद होऊ न देण.

( ५ ) धर्माने जनतेची सुस्थिति होते, हे जाणून त्या मर्यादेने आपली दिनचर्या मर्यादित ठेवणे.

( ६ ) वृत्ति दैवी व आसुरी असतात. हे जाणून दैवीवृत्ति आपल्यामध्ये वाढविणे.

( ७ ). दुःखातून व बंधनातून पूर्णपणे सुटका करून घेणे. हे आपले मोक्षरूप ध्येय आहे व ज्ञानानेच ते साध्य होते, असे जाणून ते ज्ञान मिळविण्यासाठी व वाढविण्यासाठी यत्न करणे.

( ८ ) केले तरच होते हे जाणून चतुर्विध पुरुषार्थाचे साधन करण्यात कसूर न करणे.

( ९ ) आपण जे करतो त्याचे संस्कार बीजरूपाने आपल्यामध्ये राहतात, हे जाणून अशुभ संस्कार न राहतील असे करणे.

२९ नीतीचा पाया ढासळला की, समाज विस्कळित झालाच म्हणून समजावे व एकदा का अशी घसरगुंडी लागली, म्हणजे पुढे ती सुधारणे कठीण ! म्हणून वक्ते, लेखक व इतर वाङ्मयसेवक यानी या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावे.

--जीवनप्रकाश ( प्रचंड शक्तीचा आवेश )

३० ( १ ) परमेश्वर सर्वत्र आहे असे मानणे. ( २ ) आपल्या शक्तीचे समर्पण करून परोपकार करणे. ( ३ ) लोभ न धरणे. ( ४ ) सर्व धन सर्व जनतेच्या कल्याणासाठी आहे असे मानणे, या रीतीने जी कर्मे होतात, तीच कर्मे मनुष्याचा उद्धार करू शकतात. मनुष्याला जर आपली उन्नति करून घेण्याची खरी इच्छा असेल तर त्याने अशा वृत्तीनेच कर्मे करीत राहिले पाहिजे. याशिवाय दुसरा उपाय नाही.

अशा वृत्तीने केलेली कर्मे मनुष्याला बंधन करू शकत नाहीत. इतकेच नव्हे तर मनुष्याला बंधनातून सोडवितात, दुःखातून पार करतात व अत्युच्च अवस्थेला पोचवू शकतात. --जीवनप्रकाश ( आर्यसंस्कृति )

३१ **शत्रूकडून** सज्जनाना प्रतिबंध झाल्याने स्वातंत्र्याचा उदय होतो, उन्नतीची बीजे अंकुरित होतात, ज्ञानाचे प्रवाह वाढू लागतात, नवीन तत्त्वज्ञानाचे स्रोत स्फुरतात व एकंदरीने जनतेचे हितच होते. तसेच जर का तेच सज्जन तुरुंगाच्या बाहेर राहिले, तरीही ते तेच आपले जागृतीचे काम चालू ठेवतात. कारण सज्जन हे आपल्या स्वातंत्र्याच्या किंवा पारतंत्र्याच्या कालामध्ये जगदुद्धाराचेच प्रशंसनीय कार्य करीत राहतात. --जीवनप्रकाश ( अत्रिऋषीचा कारागृहवास )

३२ **बली** हा जन्माने आर्यवंशीय नव्हता व तो तिबेटच्या देवजातीचाही नव्हता. हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु हे दोघे दैत्यजातीचे बादशाह फार प्राचीनकाळीं होऊन गेले. ते मूळचे इराणच्या उत्तरेकडील प्रदेशातील बलाढ्य राजे होते--हिरण्यकशिपुचा मुलगा प्रल्हाद, त्याचा मुलगा वैरोचन व वैरोचनाचा मुलगा बली होय.

--जीवनप्रकाश ( वामनावताराचा संदेश )

३३ **मातांच्या** मनात जो विचार घोळत असतो, तो मुलामध्ये उत्पन्न होत असतो. मातामध्ये जर राज्यक्रांतीचे विचार घोळले, तर एकदोन पिढ्यात खात्रीने राज्यक्रांति होते. --जीवनप्रकाश ( वामनावताराचा संदेश )

३४ **साम्राज्यवादी** लोक जेव्हा अधिकाराच्या, वैभवाच्या व पाशवी शक्तीच्या मदाने मत्त झालेले असतात, त्यावेळी ते कोणाचाही सदुपदेश ऐकण्यास तयार नसतात. भूतकाळातील साम्राज्यवादी समतेचा सदुपदेश ऐकण्यास तयार झाले असल्याची साक्ष इतिहास देत नाही; वर्तमानकाळचे साम्राज्यवादीही तसेच हट्टी दिसत आहेत; यावरून भविष्यकाळीही त्याचा स्वभाव बदलेल, हे संभवनीय दिसत नाही. ज्यावेळी हे पूर्ण पराभव पावतात, त्याचवेळी त्यास सत्य दिसू लागते व सदुपदेश ऐकण्यास हे तयार होतात; पण त्यावेळी त्याचा काही उपयोग नसतो.

--जीवनप्रकाश ( धृतराष्ट्राची चिंता )

३५ **सीमोल्लंघनाचे** तत्त्व पुढे दिल्याप्रमाणे आहे--

१ आपल्या अधिकारात जे क्षेत्र आहे, तेवढ्या क्षेत्राच्या चतुःसीमा अगदीं सुरक्षित ठेवाव्या; त्याच्या आत असा बंदोबस्त ठेवावा की कोणत्याही शत्रूचा प्रवेश होऊ नये.

२ नंतर बाहेरच्या क्षेत्रात प्रवेश करावा व ते क्षेत्र जितके आपल्या अधिकारात आणता येईल तितके आणावे व त्याच्यावर आपला अधिकार उत्तम रीतीने स्थापन करावा.

३ आपले क्षेत्र वाढवावे व विजय मिळवून आपले प्रभुत्व, धन, ऐश्वर्य व वैभव

वाढवावे व मिळालेले ऐश्वर्य आपल्या ताब्यात ठेवावे. -- **जीवनप्रकाश (विजयोत्सव)**

३६ **आपले** बहुतेक सर्व महोत्सव विशेषकरून राजकीय बोध देणारेच आहेत. **रामनवमीचा महोत्सव**–हद्दपार केलेल्या एका आर्य राजकुमाराने आपल्या देशाचे स्वातंत्र्य कसे स्थापन केले व या देशाला पारतंत्र्याच्या पंकात कोंबणाऱ्या परद्वीपस्थ राजाच्या साम्राज्याचा कसा नाश केला, ते सूचित करीत आहेत. **गणेशोत्सव**–हा गणरायानी स्वजातीयांची संघटना कशी केली व स्वदेशबांधवाचे सांघिक बळ वाढवून त्याचा दर्जा कसा वाढवला व देवराष्ट्राला वारंवार त्रास देणाऱ्या पाश्चिमात्य शत्रूचा नायनाट करून त्यानी कसे आपल्या राष्ट्राचें कल्याण केले, ते दाखवीत आहे. **कृष्णाष्टमीचा महोत्सव**–हृतराष्ट्रीयानी धृतराष्ट्रीयाकडून आपले गेलेले स्वराज्य कसे प्राप्त करून घेतले याची आठवण करून देत आहे व कंसासारख्या जुलमी, स्वार्थी संस्थानिकाचा जुलूम दूर करण्यासाठी बाल श्रीकृष्णाने त्याचा कसा वध केला व गोकुळातील प्रजेला त्याच्या जुलूमातून कसे सोडविले हे दाखवीत आहे.

--**जीवनप्रकाश ( विजयोत्सव )**

३७ **सप्तशतीच्या** सातशे श्लोकामध्ये स्त्रियानी केलेल्या दोन राज्यक्रांत्यांची वर्णने आहेत. महिषासुराचा पराभव करून पहिली व शुंभनिशुंभाचा पराभव करून दुसरी क्रांति केली. यावेळी या देवस्त्रिया व देवकुमारिका अत्यंत प्रवीण झाल्या होत्या; म्हणूनच त्यास या दोन्ही युद्धामध्ये यश मिळाले. महिषासुर व शुंभासुर हे कसलेले योद्धे होते. प्रथमतः जरी, या स्त्रिया आहेत म्हणून त्यानी तिकडे विशेषसे लक्ष दिले नव्हते, तरी जेव्हा त्यांची तयारी चांगली आहे असे त्यांच्या लक्षात आले, तेव्हा आपले सर्व असुर व राक्षस याना बोलावून आणून आपल्या युद्धकौशल्याची त्यानी शर्थ केली; पण देवसैन्यही तशाच त्वेषाने व सूडाच्या भावनेने लढले व शेवटी असुरांचा पूर्ण मोड झाला. — **जीवनप्रकाश ( विजयोत्सव )**

३८ **हिंदुधर्मामध्ये** कोजागिरीचे व्रत जे घातले आहे. ते केवळ नारळाचे पाणी किंवा दूध पिण्यासाठीच किंवा काही तास रात्री जागण्यासाठीच नव्हे; '**आत्मरक्षणासाठी नेहमी जागृत रहावे**' अशी सूचना ते व्रत देत आहे... **जो जागतो त्यास लक्ष्मी वर देते**, हा उत्सवातील सूक्ष्म आशय आहे. मनुष्याच्या पुढे वारंवार उत्तम संधि येत असतात, दक्षतेने त्या संधिपासून जो मनुष्य आपला फायदा करून घेईल, त्याला लक्ष्मी प्रसन्न होते. --**जीवनप्रकाश ( लक्ष्मीचा एकच प्रश्न )**

३९ **भारतवर्ष** ही अध्यात्मशक्तीची भूमि आहे, अनादिकालापासून या भूमिमध्ये अध्यात्मज्ञान वैभवाने सुभूषित झालेली अशी हजारो नररत्ने होऊन गेली. या देशातून हजारो उपदेशक गेले व त्यानी बाहेरच्या जगात अध्यात्म–ज्ञानाचा विजयी झेंडा रोवला; त्याचे अवशेष आजही दिसण्यासारखे आहेत. इतर देशातील वीरानी हिंसा करून जगभर राक्षसी विजय मिळविले. आपल्या देशातील धर्मवीरानी जगभर धर्माचा दिग्विजय केला, अहिंसेचा महामंत्र जगास दिला व सत्याचा संदेश सर्वत्र

पसरविला. हाच आपला मार्ग आजही आर्यराष्ट्राने आखावा, म्हणून त्या ( महात्मा गांधी ) अर्धनग्न फकीराचा सारखा प्रयत्न चालू आहे व त्यास आता यशही येऊ लागले आहे.

—जीवनप्रकाश ( फकीराचा विजय )

**४० जातिभेद** हिंदुधर्मात नाही; हिंदुधर्मात जातिव्यवस्था व वर्णव्यवस्था आहे. निसर्गतः असलेल्या भेदाची व्यवस्था लावण्याची खटपट आस्थेने झाली पाहिजे. काही जाति जरी निष्कारण उद्भवल्या आहेत असे दिसले, तरी ती काही मुख्य बाब नव्हे. सर्व हिंदूतील जाति मोडल्या, तरी हिंदूंची, मुसलमानांची व ख्रिस्त्यांची एकी कशी करावी, हा प्रश्न राहणारच. जर या तीन धर्मीयाची एकी, परस्परांच्या व्यक्तिमत्वाचा नाश न करता होणे शक्य असेल, तर त्याच तत्त्वाने अनेक जातीची एकी होईलच. जाति या मोडून मोडणार नाहीत. अनेक जातीची माणसे एका मोठ्या श्रेष्ठ कार्यात गोवली गेली, म्हणजे त्यांची परस्पर उच्च नीच भावना लयास जाते.

—जीवनप्रकाश ( हिंदूतील जातिभेद )

**४१ भारतीय** संस्कृतीचा अगदी जुना प्रवाह ' वैदिक विचार प्रवाह ' या नावाने ओळखला जातो. सहस्रावधि वर्षांचा हा प्रवाह आहे. हिला ' भारतीय सरस्वती ' असे नाव ऋषिंनी दिलेले दिसते. निर्लेप, निष्कलंक, शुद्ध स्फटिकासारखा हा प्रवाह चालू होता तोपर्यंत आचार–विचार–राजकीय परिस्थिति यामध्ये भारतदेश अग्रगण्य होता. बाहेरच्या देशातून तरुण येथे येत, ज्ञान विज्ञान प्राप्त करीत व आपल्या देशांत जाऊन तेथे त्याचा प्रचार करीत.

—**भारतीय संस्कृतीचे स्वरूप** ( ले. २; काळ, पुणें २१ मार्च १९५० )

**४२ वैदिक** ऋषींची जीवनाकडे पाहण्याची विचारसरणी– ( १ ) परमेश्वर विश्वरूपीं आहे. हा प्रत्यक्ष दिसणारा साकार ईश्वर त्याच्यासमोर प्रत्यक्ष होता. ( **पुरुष एव इदं सर्वम्** ।–ऋग्वेद ) ( २ ) हा ' सत्–चित्–आनंद ' आहे. मनुष्य या विश्वरूपाचाच एक अंश आहे. मनुष्य हा याशी अनन्य आहे; कारण, अंश व अंशी हे एकच असतात. ( ३ ) विश्वरूप सत् असून ते पूर्ण आहे. ( ४ ) हा विश्वरूप ईश्वर सेव्य आहे. अनेक यज्ञानी वैयक्तिक, सामूहिक, राष्ट्रीय व राष्ट्रांतरीय कल्याण ते साधीत असत. विश्वसेवा हाच त्यानी केलेल्या सर्व यज्ञाचा उद्देश असे. ( ५ ) ज्ञानप्रसार करून ब्राह्मण, संरक्षण करून क्षत्रिय, धनाने वैश्य व कर्म करून शूद्र या विश्वरूपाची सेवा करीत. ( ६ ) मनुष्य विश्वदेहाचा एक भागच. तो जेथे असेल तेथे तो समर्थ असला पाहिजे. यासाठी अनेक योगसाधने व अनुष्ठाने यामुळे मनुष्य अनुशासनशील बनो. ( ७ ) मनुष्याला उत्पन्न करणारी स्त्री ही फार मोठी शक्ति आहे. स्वर्गापेक्षा हिची योग्यता मोठी. ( ८ ) शरीर हे देवताचे मंदिर. जी येथे कल्पना करावी ती तेथे सिद्ध होते. ( ९ ) जीव हा ईश्वराचा अमृतपुत्र आहे. तो जन्माला येताना ईश्वरीय तेहतीस शक्ति आपल्या बरोबर घेऊन येतो. ( १० ) या पृथ्वीवर अनंत शक्तीचा अनुभव घ्यावयाचा हे मानवाचे ध्येय आहे.

—**भारतीय संस्कृतीचे स्वरूप** ( लेख २ रा ) **काळ, २१ मार्च १९५०.**

४३ संस्कृति ही संघ बनून केलेली कृति आहे... समूहातील व्यक्ति समूहाच्या शिस्तींप्रमाणेच व्यवहार करते हे खरे; पण तिच्यावर अनुशासन समाजाचे असते.

——भारतीय संस्कृतीचे स्वरूप ( लेख ३ रा ) काळ, पुणे २८ मार्च १९५०.

४४ विश्वशान्ति स्थापावयाची असेल तर आपल्या राष्ट्राचे राज्यशासन आपल्या हातात राहिले पाहिजे, तेथे आपणांस उत्तम शान्ति स्थापन करता आली पाहिजे. त्यासाठी उत्तम शीलसंपन्न व कर्तृत्ववान् प्रभावी पुरुष आवश्यक असतात, ते निर्माण केले पाहिजेत. ते ज्ञानसंपन्न, शीलसंपन्न, व प्रभावी पाहिजेत. प्रजा ही सुप्रजा बनविली पाहिजे. ती विशिष्ट तऱ्हेनेच केली पाहिजे. यासाठी कडक शिस्त आवश्यक असते. ती नसेल, योग्य अनुशासन नसेल तर राष्ट्र निर्माण होणे अशक्य आहे... यात एक बुद्धिपूर्वक राष्ट्रीय नियोजन आहे व हेच मुख्य आहे.

——भारतीय संस्कृतीचे स्वरूप ( लेख ४ था ) काळ, पुणे ३१ मार्च १९५०.

४५ आपली संस्कृति ही आहे. शस्त्रास्त्रानी सिद्ध व सज्ज असावे, इतर राष्ट्रापेक्षा युद्धाची तयारीही चांगली ठेवावी, पण स्वतः आक्रमकवृत्ति कधीही धरावयाची नाही. तर जो शत्रू आक्रमण करील त्याचा मात्र तात्काळ समूळ नाश करावयाचा. पण जर तो नीट वागावयास तयार झाला तर त्याला सुद्धा जीवदान द्यावे व सन्मानाने चाल असे सांगून त्यासही आपलासा करावा.

——भारतीय संस्कृतीचे स्वरूप ( ले. ७ वा ) काळ, पुणे १७ एप्रिल १९५०.

४६ गुरुकुल नामक शिक्षणसंस्था या अगदी स्वतंत्र शिक्षण संस्था तरुणाना तयार करीत. या शिक्षणसंस्था राजाच्या नियंत्रणाखाली नसल्यामुळे पूर्णपणे स्वतंत्र वातावरण तेथे असे व अशा संस्थामुळे तेजस्वी तरुण निपजत असत. गणेश, विनायक, कार्तिकेय, वामन हें सर्व तरुण गुरुकुलामध्ये तयार झाले होते. हे सर्व तरुणपणीच प्रसिद्धीस आले व लोकोत्तर नेते बनले. वैदिक संस्कृतीमध्ये शिक्षणसंस्थेचे पूर्ण स्वातंत्र्य हे वैशिष्टच म्हणून वर्णन करता येईल.

——भारतीय संस्कृतीचे स्वरूप ( काळ २७ जून १९५० )

४७ ऋषीनी शरीरामध्ये राष्ट्र पाहिले व राष्ट्राचे वर्णन करावे तसे शरीराचे वर्णन केले. सुरक्षित तटबंदीच्या आत त्या राष्ट्राच्या राजधानीची वसाहत झालेली आहे व त्यामुळे या राजधानीवर कोणाचाही हल्ला होणार नाही अशी ही ( अयोध्या देवानां पूः ) देवनगरी आहे असे म्हटले. मानवीशरीरामध्ये नगरी वा राष्ट्र पाहणारे ऋषि विश्वाला एका पुरुषाचे शरीर मानीत...अनंत वस्तूनी गजबजलेल्या विश्वाला ' विराट्पुरुष ' म्हणून—या विराटपुरुषाचे सूर्यचंद्र हे डोळे, अग्नि हे मुख, वायु हा प्राण, अंतरिक्ष हें उदर, दिशा हे कान, विद्युत् हे मन, वृक्ष—वनस्पति हे केस, पायाच्या ठिकाणी पृथ्वी, नद्या—नद या धमन्या, सागर—महासागर हे रुधिर—असे हे एकात्म शरीर ऋषि पाहतात.

——भारतीय संस्कृति स्वरूप, काळ, २६।५।१९५०

*

४८ वैदिककाळी मुलाला वीर व मुलीला वीरा असे म्हणत. हे शब्दच सुचवित आहेत की, संताने कशी बनविली पाहिजेत... फार प्राचीनकाळी नागरिक संरक्षणाची कामे स्त्रियानी करावी अशी व्यवस्था होती. याच कालामध्ये स्त्रियानाही शस्त्रास्त्रे वापरणे व युद्ध करणे याचे शिक्षण दिले जात असे व अशा शिक्षणामुळे वेळ येताच स्त्रिया सेनापतीचे काम करीत.

--भारतीय संस्कृतीचे स्वरूप ( ले. १६ ) काळ, पुणे १३ जून १९५०

४९ सर्व देशातील विचारी लोकास जागतिक युद्धे होऊ नयेत असे वाटते. पण त्यास आळा कसा बसेल हे त्याच्या ध्यानी येत नाही. भारतीय सभ्यता यावेळी पुढे येऊन सांगत आहे की, ' बाबानो, जर तुम्हाला जागतिक युद्ध थांबवून जगतामध्ये चिरशान्ति स्थापन करावयाची असेल तर या शान्तीचा पाया शिक्षणालयामध्ये घाला. ऋषीच्या गुरुकुलामध्ये योगसाधन व यमनियम शिकवीत, तो पाठ्यक्रम तुम्ही सुरू करा व यात जो शमदमसंपन्न बनेल त्यालाच महाशक्तीची विद्या शिकवा. '

--भारतीय संस्कृतीचे स्वरूप ( ले. २० ) काळ, ३०।८।१९५०

५० अनुत्पादक धंद्यात किती गर्दी व्हावी व किती होऊ नये याचे नियंत्रण ज्या राजाने करावयाचे तोच राजा व त्याचे तेच राज्यशासन, जेथे उत्पादक धंद्यातील जनसंख्या वाढविण्यास सहाय्य करू लागले, तेथे उत्पादक धंदे बसत चालले तर त्यात काहीच आश्चर्य नाही. सरकारी प्रोत्साहनाने उत्पादक धंदे ठार होऊ लागले तर ती राष्ट्रीय आपत्ति केवढी मोठी आहे !! --भारतीय संस्कृति ( लेख ८ वा )

५१ प्रजापति म्हणजे प्रजाचे पालन करणारा राजा. याला सभा व समिति अशा दोन लोकसभा सल्लामसलत देणाऱ्या असत. राजाने या निर्माण कराव्या व याच्या सल्लामसलतीने राज्य करावे. या सभाच्या सभासदाचा अधिकार पिता व गुरु याप्रमाणे आहे व राजाने तसे या सदस्याना मानले पाहिजे. एखादा राजा या लोकसभाचे ठराव धाब्यावर बसवीत असेल व त्याना जुमानीत नसेल, तर लोकसभेचे सदस्य अशा राजाचा वधहि करीत व नवा राजा निर्माण करीत व पहिल्याला पदच्युत करीत असत. प्रजापति ही वैदिक कालामध्ये राज्यशासनसंस्था होती. लोकशाही किंवा जानपदराज्य असे हे राज्यशासन होते.

--भारतीय संस्कृति ( ले. ९ वा. ) प्रजापतीची दुहिता.

५२ वेतन नाही व विश्रामही नाही अशा स्वयंसेवकावरच राष्ट्र चाललेले आहे. हे स्वयंसेवक हेच राष्ट्राचे खरे आधार आहेत. --भारतीय संस्कृति ( ले. ११ )

५३ गुरुकुलाचे वातावरण तरुण धट्टेकट्टे बनावे, कष्टाळू व्हावे, सुखांगी न व्हावे, स्वतंत्र विचाराचे व्हावे, ध्येयवादी व करारी बनावे, ओजस्वी, आशिष्ट, बलिष्ठ व दृढिष्ठ व्हावे, परमेश्वराशिवाय कुणापुढेंहि न वाकणारे तेजस्वी व्हावे असे असे.

--भारतीय संस्कृति ( ले. १२ )

५४ धर्मसंस्थापना म्हणजे नवा धर्मपंथ काढावयाचा नसून राष्ट्रामध्ये गुंडाचा

उपद्रव कमी करून उद्योगधंद्याची, व्यापारव्यवहाराची, अर्थव्यवस्थेची घडी उत्तम व स्थायी टिकेल असे करावयाचे. ज्ञानी लोकाना ज्ञानप्रसार करता येईल व कारागिराना आपल्या कारागिरीची उन्नति करता येईल अशी घडी बसविणे, ही व्यवस्था राष्ट्रामध्ये निर्माण करणे व ती टिकवणें ही धर्मसंस्थापना आहे.

--भारतीय संस्कृति ( ले. १४ ) ईश्वराचे मार्गदर्शक गुण

५५ **जन्मापासून** मरेपर्यंत, ब्रह्मचर्याश्रमापासून तो संन्यासाश्रमापर्यंत स्वसंरक्षणाचे व गुंडाच्या पारिपत्याचे साधन जवळ ठेवावे ही प्रथा वैदिकधर्माची आहे. स्वसंरक्षणासंबंधी उदासीन राहणारा वैदिकधर्म नाही.

--भारतीय संस्कृति ( ले. १९ ) स्वसंरक्षण झालेच पाहिजे

५६ **अहिंसा** हा निषेधवाचक शब्द आहे. याचा विधायक भाव सर्वाचे हित करावे हा आहे. यासाठीच वैदिकधर्मी झटत असतो. यज्ञ हा विश्वकल्याणासाठीच करावयाचा असतो. **मा हिंस्यात् सर्वाणि भूतानि।** हा याचा दृष्टिबिंदु आहे पण जर कोणी हल्लाच करील, तर मात्र हा गप्प राहणार नाही.

--भारतीय संस्कृति ( ले. २० ) संतप्त जगास स्थायी शांतिचा संदेश

५७ ( **पुरुषो वै यज्ञः** ) मनुष्य हा यज्ञ आहे, त्याचे सर्वस्व यज्ञासाठीच आहे. त्याचे धन यज्ञासाठीच आहे. म्हणून ते यज्ञासाठी खर्च होत राहिले पाहिजे. मनुष्याने शिक्षण प्राप्त करून तो ज्या आश्रमात असेल तेथें त्या आश्रमाला तो अनुकूल यज्ञ करील.

--भारतीय संस्कृति ( ले. २१ ) राष्ट्राची अर्थव्यवस्था

५८ **जपाने** मानसिक एकाग्रता होते व अर्थभावनेसह जप केला तर मनाची शक्ति वाढते... **अहं ब्रह्मास्मि**, मी निर्बल नाही, मी आनंदमय आहे हा अर्थ मनामध्ये सतत ठेवणे हे या जपामध्ये मुख्य आहे. मनाची अशी भावना होणे हेच शक्तिसंचयाचे साधन आहे. --भारतीय संस्कृति ( ले. २२ ) भक्तिमार्ग.

५९ '**भज सेवायां**' भज म्हणजे सेवा करणे. 'जनतारूपी जनार्दनाची सेवा करणे म्हणजेच ईश्वरभक्ति करणे होय. विश्वरूप हे परमेश्वराचे स्वरूप आहे. सध्याच्या भाषेमध्ये सार्वजनिक हितासाठी आपले जीवन अर्पण करणे ही भक्ति होय.

—भारतीय संस्कृति ( ले. २३ )

६० **अपहृत** कन्या या अपहृत होताच पतित झाल्या. त्याचे पुन्हा समाजात स्थान नाही, असेच जनता मानीत होती. पण भगवान् श्रीकृष्णाना हे जनमत संमत नव्हते. कन्यांचे अपहरण ही राष्ट्रीय आपत्ति आहे व या आपत्तीचे निवारण राष्ट्रहिताच्या दृष्टीनेच केले पाहिजे—ज्या पुरुषावर त्याच्या संरक्षणाचा भार असतो, त्या पुरुषाकडून त्याचे संरक्षण होऊ शकले नाही, हा त्या पुरुषाचा दोष आहे—अपहृत स्त्रियाना समाजामध्ये पुनः प्रतिष्ठेचे स्थान मिळाले पाहिजें. भगवान् श्रीकृष्ण अशा उदार मताचे होते. —भारतीय संस्कृति ( ले. २७ )

६१ ' नेह नानास्ति किंचन । य इह नानेव पश्यति, मृत्योः स मृत्युमाप्नोति । ' या विश्वामध्ये एकच जीवन आहे. जो येथे नानात्व पाहतो, त्यास दुःखामागून दुःखे भोगावी लागतात. इतक्या कडक रीतीने हे एक जीवन आहे, हे जाणावयाचे आहे. विश्वामध्ये अनंत वस्तु आहेत. पण त्या त्या जीवनाचीच निरनिराळी ' रूपे ' आहेत. सर्वांच्या आत एक अखंड आत्मा आहे. —भारतीय संस्कृति ( ले. ३१ )

६२ व्यक्ति स्वप्रयत्नाने दैनंदिन दुःखे दूर करते व संभूतीने अमरत्व प्राप्त करते. संभूति म्हणजे समष्टि, संघजीवन. संघजीवनात अमरपण आहे. यासाठी व्यक्तिने समष्टीची सेवा केली पाहिजे. समष्टि अमर आहे, व्यक्तिने समजले पाहिजे की, धन समष्टीसाठी आहे, व मी त्याचा विश्वस्त आहे. विश्वस्त राहून धन कितीही जमवावे व ते समष्टीच्या हितासाठी लावावे, याचेच नाव यज्ञ होय.

—भारतीय संस्कृति ( ले. ३२ )

६४ अनेक प्रकारच्या निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकाना व अनेक धर्मा-च्या लोकाना एका घरातील कुटुंबियाप्रमाणे धारण करणारी आमची मातृभूमि दूध काढतेवेळी न हलणाऱ्या गायीप्रमाणे धनरूपी दूधाच्या हजारो धारा आम्हास देवो.

—भारतीय संस्कृति ( ले. ३३ )

६४ अगस्ति ऋषि व त्याचे अनुयायी दक्षिण भारत, जावा, सुमात्रा आदि देशात गेले होते. काश्यप ऋषीचा आश्रम भारतापासून पश्चिमेकडे हजारो मैलावर दूर होता. उत्तरध्रुवापर्यंत कित्येक ऋषि जात, मोठमोठे कष्ट सहन केल्याशिवाय काहीही कार्ये झालेली नाहीत. —भारतीय संस्कृति ( ले. ३५ ) यक्ष व राक्षस

६५ ' एकोऽहं बहुस्याम् । ' ( उपनिषद् ) हा विश्व व्यापण्याचाच विचार आहे. मी लहान आहे, मी अनंत होईन. ज्ञानाने विश्व व्यापले, प्रजेने विश्व व्यापले, व बहुसंख्य बनून विश्व व्यापले हेच आनंत्य प्राप्त करणे होय. ' तदा आनन्त्याय कल्पते ' ( उपनिषद् )–वशिष्ठ, वामदेव, अत्रि, गौतम, विश्वमित्र, भरद्वाज व कश्यप हे गोत्रपरंपरेने मोठे झाले आहेत, काश्यपि पृथ्वि ' ज्ञानपरंपरेनेही अमरत्व या ऋषीकडे जाते. व्यास महाभारतामुळे, वाल्मीकि रामायणामुळे, वैदिक ऋषि त्याच्या सूक्तामुळे अमर झाले आहेत. दुसऱ्याचा नाश करून मोठे होणे येथे नाही. यालाच उद्धार, परमगति, उर्ध्वगति असे म्हणतात. नराचा नारायण, देवाचा महादेव, इंद्राचा महेंद्र, पुरुषाचा पुरुषोत्तम, जीवाचा शिव म्हणतात. हीच ब्राह्मीस्थिति होय.

—भारतीय संस्कृति ( ले. ३६ )

६६ हे सर्व विश्व ब्रह्माचे रूप आहे... सर्व प्राणी विश्वरूपामध्ये संमीलित आहेत. सर्वांचे मिळून एकच जीवन आहे. हे समजून विश्वसेवा स्वकर्माने करून विश्वरूपाची प्रसन्नता वाढवणे व यासाठी सर्व भूतांचे हित साधण्याच्या योजना आखणे व त्या यशस्वी करणे हे अनुष्ठान करावयास लावणारा वैदिकधर्म आहे. वैदिकधर्मी राजे जनक, रामचंद्र, मनु हे विश्वसेवा स्वकर्माने केली पाहिजे असे मान-

णारे होते. राजा हाच मोठ्यात मोठा विश्वसेवा करणारा असू शकतो... त्याचे उत्तम राज्यशासन हाच ' सर्वभूतहिते रत ' होण्याचा उत्तम साधनमार्ग होय .. ज्ञानप्रसार, संरक्षण, व्यापार उद्यम, व सुखसाधन–निर्मिती यानी जनसेवा होत राहिली तरच सर्वांची प्रसन्नता होईल... ' शासन व शासित या दोघांचेही जीवन एक आहे ' हे आपण मानू लागलो तर एका जीवनांतील घटकानी परस्पर सहाय्यकच झाले पाहिजे. वेदापासून तो गीतेपर्यंत ही एकात्मता दाखविण्याचा यत्न ऋषिमुनींनी केला आहे. या ज्ञानाचा प्रसार प्रथम भारतवर्षात करून मग पृथ्वीवरील सर्व देशात केला पाहिजे.

—**भारतीय संस्कृति ( ले. ३९ )**

६७ **ऐहिक** अभ्युदयाबद्दल इतका तिटकारा हिंदूस वाटत असे की त्यामुळे लूट करावयास आलेले डाकू येथे सम्राट् बनले ! तरी हे पारलौकिक निःश्रेयस् मिळवण्याच्या स्पर्धेत गुंतलेले होते. गेल्या दोन हजार वर्षांचा आपला इतिहास हा असा आहे.

—**भारतीय संस्कृति ( ले. ४० )**

६८ **राजाची** जी विद्या ती राजविद्या. राजाचे जे गुह्य ते राजगुह्य. अध्यात्मविद्या विद्यामध्ये श्रेष्ठ विद्या आहे व सर्व गुह्य ज्ञानामध्ये हेच परम रहस्य आहे, यात शंका नाही. या अध्यात्मज्ञानाच्या पक्क्या पायावर आपले आर्यांच्या राजशासनाचे व इतर जीवनाचे मंदिर उभे राहिलेले आहे. भगवद्गीता हा अध्यात्मशास्त्राचा ग्रंथ आहे असे मानताच तो आर्यांच्या वैयक्तिक, सामूहिक व राजकीय व्यवहाराचा पाया आहे हे स्पष्टच होते... चवथ्या अध्यायाच्या प्रारंभीच गीताज्ञानाची परंपरा सांगितली ती विष्णु, विवस्वान्, मनु, इक्ष्वाकु, अनेक श्रेष्ठ राजे, कृष्ण, अर्जुन अशी क्षत्रियाची आहे. हे प्रजापालनामध्ये तत्पर असे विख्यात राजे होते.

—**भारतीय संस्कृति ( ले. ४३ ) अव्यय राज्यशासन**

६९ **संभूय** समुत्थान म्हणजे अनेकानी मिळून एकजुटीने कामांची उठावणी करणे. हे व्यापारव्यवहार करण्याचे उत्तम स्थान असते. कुलीन, दक्ष, उद्यमी, ज्ञानी नाण्याचे ज्ञान असणारे, आयव्ययामध्ये प्रवीण, व्यापारव्यवहारामध्ये शुद्ध आचरण करणारे, तसेच शूर यामध्ये सहकार्य होऊ शकते. स्मृतिमध्ये असे नियम आढळतात. ज्ञानी, शूर, व्यापारी व शिल्पी या लोकाचे असे संभूय समुत्थानाचे संघ होऊ शकतात. वेदामध्ये ' पणी ' हे व्यापारी संघ असल्याचे दिसते.

—**भारतीय संस्कृति ( ले. ४५ )**

७० **भविष्यकाळामध्ये** देशावर फार मोठी जबाबदारी येऊन पडणार आहे. विश्वशांतिसाठी करावयाचे काम या राष्ट्राने करावयाचे आहे. आज दूसरा कोणी हे करील असे दिसते नाही. पण हे कार्य करण्याचे सामर्थ्य आपणामध्ये आणण्यासाठी मोठी तपस्या केली पाहिजे.

—**भारतीय संस्कृति ( ले. ४६ )**

७१ **जग** अनन्ययोगाकडेच टक्के टोणपे खात चालले आहे. सर्व राष्ट्रांचा संघ

झाला आहे. राष्ट्रे अनन्यभावाने राहिली तर युद्ध होणारच ! ती टाळावयाची असतील तर राष्ट्राराष्ट्रातील दुजाभाव, पृथग्भाव दूर झालाच पाहिजे. पण खऱ्या प्रेमाने जवळ येणारे राष्ट्र भारताशिवाय कोणी दिसत नाही.

—भारतीय संस्कृति ( ले. ४७ )

७२ **राष्ट्राचा** ध्वज हा राष्ट्रातील सर्व नागरिकानी अत्यंत सन्मान देण्यास योग्य असा परमपूज्य व परम आदरणीय केंद्रबिन्दु आहे. —**अशोकचक्र**

७३ **स्वातंत्र्यमन्दिरात** पोचल्यावर विश्वविजयाचे उद्योग करावयाचे आहेत. विश्वविजय म्हणजे निसर्गशक्तीवर विजय मिळवणे होय. यासाठी अनेक उद्योगधंदे जोराने सुरू करण्याचा समय आहे. —**अशोकचक्र**

७४ **सम्राटाचे** वर्णन तो राज्याचे संरक्षण व संवर्धन किती करू शकला व शैक्षणिक आणि आर्थिक उंची किती वाढवू शकला, यावरून केले जाणे योग्य आहे.

—**अशोकचक्र**

७५ **ज्याप्रमाणे** मनुष्य शरीरात मस्तक, बाहू, पोट आणि पायाचे सहकार्य आहे, तसेच विराट् पुरुषात द्यौ, अंतरिक्ष आणि पृथ्वीचे सहकार्य आहे, तसेच सहकार्य मानवसमाजात व्हावयास हवे. असा ध्येयवाद पुरुषसूक्ताने जनतेसमोर मांडला आहे.

—**पुरुषसूक्ताचे महत्त्व**

७६ **पुरुषसूक्तात** विराट्पुरुष आणि राष्ट्रपुरुषाचे वर्णन आहे आणि त्याचा संबंध राष्ट्राच्या कार्यकर्त्यासमोर आदर्श कार्यकर्ता कसा असावा हे समजण्यासाठी ठेवले आहे. विराट्पुरुष आदर्शपुरुष आहे आणि त्या आदर्शानुसार चालणे हे राष्ट्रपुरुषाचे कर्तव्य आहे. अखिल मानवसमाजरूपी पुरुषानी एक होऊन आपसात उत्तम सहकार्य करून सर्व मानवाचा अभ्युदय आणि निःश्रेयस् प्राप्त व्हावे, अशा शुभ कर्तव्यमार्गाने जाणे हा विराट्पुरुषाच्या वर्णनाने मानवास येथे बोध प्राप्त होत आहे.

—**पुरुषसूक्त ( स्पष्टीकरण )**

७७ **मानवशरीर** देवताचे मंदिर आहे. त्यात सर्व अवयव, सर्व अंगे आणि त्यात राहणाऱ्या सर्व देवतामध्ये उत्तम सहकार्य झाले तर ते येथील स्वास्थ्य राखू शकते. हें समजून मनुष्याने आपले जीवन शरीराच्या सर्व अवयवात उत्तम सहकार्याने कार्य करून उत्तम यज्ञरूप करावे, ...यामध्ये यज्ञाचा विध्वंस करणारे षड्रिपु आहेत, त्याना दूर करून मी हा यज्ञ सफल आणि सुफल करीन, असा विचार मनुष्याने करावा.

—**पुरुषसूक्त ( तीन पुरुष )**

७८ **पुरुषसूक्ताचा** उद्देश व्यक्तीची पूर्णता करणे तसेच राष्ट्रपुरुष आणि मानवसमाजाची अध्यात्मिक उन्नति आणि निःश्रेयस् साध्य करणे, हा आहे.

—**पुरुषसूक्त ( तीन पुरुष )**

७९ **विराट्पुरुषाचे** वर्णन आधिदैविक आहे; राष्ट्रपुरुषाचे वर्णन अथवा मानव-

समाजाचे वर्णन आधिभौतिक आहे आणि व्यक्तिपुरुषाचे वर्णन आध्यात्मिक आहे. तिन्हीं स्थानी देवता आहेत. आधिदैविकात देवतारूपाने, अधिभौतिकात गुणवान् मानवाच्या रूपाने आणि व्यक्तीमध्ये गुणरूपाने. वेदमंत्राचा अर्थ पाहण्यामुळे या तिन्ही स्थानाचा भाव समजू शकतो.

| ८० आधिदैविक | आधिभौतिक | आध्यात्मिक |
|---|---|---|
| विश्वात | राष्ट्रात | व्यक्तीत |
| अग्नि | वक्ता | वाणी |
| इंद्र | शूरवीर | शौर्य, वीर्य |
| भग | धनवान् | धन्यता, भाग्य |
| त्वष्टा | कारागीर | कर्मचारी |
| वायु | प्राणी | प्राण |
| अश्विनौ | वैद्य | श्वासोच्छ्‌वास |

याप्रकारे तीनही स्थानात तिन्ही पुरुषाचे दर्शन होऊ शकते.

--पुरुषसूक्त ( तीन पुरुष )

८१ **जे भूतकाळी** होऊन गेले आणि जे वर्तमानकाळी आहे, भविष्यकाळी व्हावयाचे आहे, हे सर्व तो पुरुषच आहे आणि तो पुरुष अमरपणाचा स्वामी आहे.–यासाठी व्यक्तीने अथवा राष्ट्राने वर्तमानकाळी असा पराक्रमपुरुषार्थ करावयास पाहिजे की, ज्याचे अत्यंत उत्तम फळ भविष्यकाळी त्याला भोगावयास मिळेल. मनुष्य हा अमरपणाचा अधिकारी आहे. प्रयत्न करण्यानेच अमरपद त्याला प्राप्त होते. मनुष्य येथे या भूमंडलावर यासाठी येतो की त्याने स्वप्रयत्नाने अमरपद प्राप्त करावे.

--पुरुषसूक्त ( अमृताचाच स्वामी )

८२ **पूजनीयांचा** सत्कार, आपसात संघटना आणि निर्बलाना दान देऊन सहायता करणे, त्यांस वर आणणे, त्यांची उन्नति साधणे याच मुख्य क्रिया यज्ञात होत्या.... स्थूलशरीर, वासनाशरीर, बहिर्मानसशरीर, अंतर्मानसशरीर, बुद्धि, पराबुद्धि, जीव, या सात त्याच्या परिधी म्हणजे कार्यमर्यादा आहेत. एकवीस समिधानी हा यज्ञ होतो. दोन डोळे, दोन नाकपुडया, दोन कान, दोन पाय, दोन हात, एक मुख, एक मूत्रद्वार आणि एक गुद्‌द्वार अशी आठ कर्मेंद्रिये; पंचप्राण, चैतन्य व अहंकार व बुद्धि मिळून एकवीस समिधा होतात.

—पुरुषसूक्त ( यज्ञ )

८३ **देवपूजा–संगतिकरण–दान** हे यज्ञाचे त्रिविध स्वरूप आहे. राष्ट्रात जे ज्ञानी, पुरुषार्थी, व्यवहारदक्ष तसेच कार्यकुशल असतात, त्यांचा सत्कार, आदर अथवा पूज्यभाव व्हावयास पाहिजे. यज्ञाचा हा महत्त्वाचा भाग आहे. संगतिकरणाचा अर्थ राष्ट्रातील निवासियांचे संघटन करणे, परस्पर–सहायता करून एकता प्रस्थापित करणे. राष्ट्राची शक्ति वाढविण्यासाठी याची फार आवश्यकता आहे. आणि जे

निर्बल आहेत, ज्ञानाने, धनाने अथवा कर्मशक्तीने जे अशक्त आहेत त्याना सहाय्य देऊन त्यांचे निर्बलत्व दूर करावयाचे... यामुळे राष्ट्र सुखपूर्ण होते. याच स्थानाला सुवर्ग अथवा स्वर्ग म्हणतात —पुरुषसूक्त ( यज्ञाचे शुद्ध स्वरूप )

८४ **क्रीडेमध्ये** कुशल, विजयाच्या इच्छेने स्वतःचा विजय व्हावा म्हणून प्रयत्न करणारे, व्यवहारात प्रवीण, तेजस्वी, स्तुतीला पात्र, आनंदयुक्त स्वभावाचे, हर्षयुक्त, उत्तम स्वास्थ्यसंपन्नतेच्या कारणाने उत्तम निद्रा घेणारे, आणि तेजस्वी व्यक्तीची तसेच राष्ट्राची प्रगति करणारे असे जे विबुध असतात, ते देव होत. यज्ञात अशांचा सत्कार व्हावयास पाहिजे. —पुरुषसूक्त ( यज्ञाची वृद्धि )

८५ **मुले**, तरुण, वयोवृद्ध व थोर थोर महंत या सर्वांमध्ये तो एकच परमेश्वर परिपूर्ण भरलेला आहे; ही सर्व त्याचीच स्वरूपे आहेत असे समजून ईश्वरभावनेने त्या सर्वांना नमस्कार करावा. जे थोर व सन्तमहन्त असतील त्यांच्या सद्गुणाची प्रशंसा करावी व अहंकाराने थोराच्या सद्गुणाकडे कधीही कानाडोळा करू नये. जेथे सद्गुण दिसतील, तेथून ते आपलेसे करावे, म्हणजेच आपली उन्नति होणे शक्य आहे, हे कोणीही विसरू नये. —देवे मंत्राचा अर्थ ( श्लोक २ )

८६ **पूर्वी** ज्ञानी लोक परमेश्वराचे पूजन परोपकारार्थ आत्मसर्वस्वाचे समर्पण करून करीत आलें आहेत. आत्मसर्वस्वाचे समर्पण करणे हाच पूर्ण व श्रेष्ठ यज्ञ आहे. यामुळे त्याचे अनुष्ठान जे करतात, ते महान् आत्मे बनून आनंदपूर्ण स्वर्गधामामध्ये अखंड आत्मानंदाचा उपभोग घेतात; तेथे पूर्वीपासूनचे सत्कर्म करणारे सत्पुरुष जाऊन स्वतेजाने चमकत आहेत. —देवेमंत्राचा अर्थ ( श्लोक ५ )

८७ **मनुष्यानी** प्रगतिशील, निष्कलंक, मिळूनमिसळून वागणारे उग्रवीर व मरेपर्यंत ( मर्+उत् ) उन्नतीसाठी पुरुषार्थ करणारे होऊन, असे आचरण करावे की, त्या योगाने आपल्या वाडवडिलांचे यश वाढावे व आपल्या मातृभूमिचा गौरव व्हावा. आपली कितीही जरी योग्यता मोठी झाली, तरी आपण साधारण मनुष्यच आहोत, असे समजून आपल्या जीवनसमर्पणाने आपल्या मातृभूमिला संतोषवावे.

—देवेमंत्राचा अर्थ ( श्लोक ६ )

८८ **क्षत्रियानी** एक विचाराने सर्वांचे उत्तम पालन करावे व सर्व प्रजा सुखासमाधानाने स्वदेशात राहतील अशी राज्यामध्ये व्यवस्था ठेवावी. क्षत्रियानी उत्तम पायदळ सैन्य ठेवावे, घोडदळ सज्ज ठेवावे, अन्यप्रकारचे स्वयंसेवकही तयार करावे; शत्रूचा अचूक नाश करणारे उत्तम निशाणबाज तयार करावे व जनतेचे रक्षण करण्याचे कार्य आपण मरेपर्यंत करीत राहू, असा विचार मनात नेहमी जागृत ठेवावा व आमच्या राष्ट्रात असे उत्तम कर्तव्यदक्ष क्षत्रिय असोत, अशी इच्छा मनात धरावी.

—देवेमंत्राचा अर्थ ( श्लोक ९ )

८९ **काही** वैयक्तिक धने आहेत. त्यापैकी कोणत्याही प्रकारची धने प्राप्त कराव-

याची असोत, किंवा कसल्याही प्रकारचा विजय करावयाचा असो, त्यासाठी विजय इच्छिणाऱ्या माणसाने आपला पाय मागे घेता कामा नये. वास्तविक पुढे पाय ठेवला पाहिजे; पण तसे होत नसले, तर निदान पाय मागे तरी घेता कामा नये. विजयाचा हा नियम आहे. तसेच जो राजा ज्ञानी श्रेष्ठ सज्जनाला योग्य सहाय्य करतो, त्यालाच देवाचे सहाय्य प्राप्त होते. अर्थात् जर एखादा राजा आपल्या शक्तीच्या घमेंडीने सज्जनाना छळू लागेल तर त्याला देवाचे सहाय्य न मिळाल्यामुळे त्याचा नाश होईल. **—देवेमंत्राचा अर्थ ( श्लोक १५ )**

९० **आम्हाला** धन पाहिजे, पण त्याबरोबरच तेजस्विता, बल, अन्न, वीरता व पुष्टी या सर्व गोष्टी असल्या पाहिजेत. यासाठी ज्या धनाबरोबर हे सर्व गुण येतील असे धन देण्याविषयी देवांची आम्ही प्रार्थना करतो. त्या देवानी द्युलोक, अंतरिक्ष व पृथ्वीवर राहून आमच्या वाणीची शुद्धता करून वरील प्रकारच्या सर्व गुणानी युक्त असे धन आम्हास द्यावे. आम्ही सर्व मनुष्यानीही हे गुण आमच्यामध्ये वाढतील. असा प्रयत्न नेटाने करावा. प्रयत्न करणारास देवाचे सहाय्य मिळतेच.

**—देवेमंत्राचा अर्थ ( श्लोक २० )**

९१ **पृथ्वीवर** औषधवनस्पति आदि देव आहेत, अंतरिक्षात मेघ, विद्युत् आदि देव आहेत व द्युलोकात सूर्यादि देव आहेत. हे सर्व देव आम्हाला पूर्ण आयुष्य देवोत, अशा आयुष्याचा उपयोग आम्ही योग्य रीतीने करून आम्हाला मिळवावयाची ऐहिक व पारमार्थिक संपन्नता आम्ही प्राप्त करून घेऊ व आम्ही सर्वांचे परमकल्याण एकजुटीने साधून घेऊ. **—देवेमंत्राचा अर्थ ( श्लोक २१ )**

९२ **जन्माला** आल्यापासून जो आत्मसमर्पणाचा मार्ग चोखाळतो, तोच लोकांचा पुढारी होतो. स्वार्थाने वागणारे जे असतात, ते लोकांचे खरे पुढारी नव्हेत. सत्याच्या व अहिंसेच्या मार्गाने जाऊन जनतेस उद्धाराचा मार्ग दाखवणाऱ्या या पुढाऱ्याच्या भाषणामधून जे काही घेण्यासारखे, स्वीकारण्यासारखे, सेवन करण्यासारखे असेल, त्याचा त्याच्या अनुयायानी स्वीकार करावा व त्याप्रमाणे वागून आपली उन्नति साधावी. ( अग्नि दुसऱ्यास प्रकाश देण्यासाठी स्वत: जळत असतो, म्हणूनच तो देवाचा पुढारी होतो व त्याचे अनुयायी सर्व देव हे त्याच्या तोंडातून जे मिळेल, त्यावरच संतुष्ट असतात. आपला सवता सुभा उभारीत नाहीत. असे पुढारी व असे अनुयायी असतील तेथे अभ्युदय नि:संशय होईल.) **—देवेमंत्राचा अर्थ (श्लोक ३०)**

९३ **नावाच्या** अक्षरांचा जप करणे, त्याच्या अर्थाचे मनन करणे, अर्थाचा भाव ध्यानात ठेवणे, त्याला जीवनात समाविष्ट करून तद्रूप करणे, तदनुरूप जीवनातील आचरण करणे आणि तदनुसार होणारे जीवन हे आपले स्वाभाविक जीवन बनविणे, इतक्या गोष्टी केल्याने योग्य जप होऊ शकतो आणि तो मनुष्य उन्नति करू शकतो.

**—विष्णुसहस्रनाम स्तोत्र**

*

९४ दीक्षा व तप ( दक्षता व शीतोष्ण सहन करण्याची शक्ति ) यानीच शरीर बनत असते. या शरीराच्या कांतीचे पोषण करीत, मी आपले उत्तम, सुंदर व निरोगी शरीर ठेवून, त्याचे पोषण करतो. ॥ १ ॥ --संध्याउपासना ( आचमनम् )

९५ सत्य, बल, सरळपणा, शौर्य, दक्षता, शीतोष्ण सहन करण्याची शक्ति, ज्ञान व जनतेच्या कल्याणासाठी अर्पण करण्याची तयारी हे आठ गुण मातृभूमीचे संरक्षण करीत असतात. आमची मातृभूमि आमच्या भूत, भविष्य व वर्तमानकाळच्या स्थितीचे पालन करणारी आहे. ती आमचे विस्तृत यश वाढवो. ॥ १७ ॥

--संध्याउपासना ( मातृभूमि प्रार्थना )

९६ हे मातृभूमि ! जो आमचा द्वेष करील, जो आमच्यावर सैन्यासह हल्ला करील, जो मनाने आमचा नाश करण्याची खटपट करील व जो आमचा वध करणार असेल, त्याचा नाश कर ॥ १९ ॥ --संध्याउपासना ( मातृभूमि प्रार्थना )

९७ हे मातृभूमे, तुझ्यापासून उत्पन्न झालेले सर्व पदार्थ आम्हालाच मिळोत व त्यापासून आमचे रोग दूर होऊन आमचे आरोग्य वाढो. आम्ही ज्ञानविज्ञानामध्ये पारंगत होऊन, दीर्घायु बनून, तुझ्या पायी आत्मसर्वस्वाचा बलि अर्पण करण्यास तयार आहो ॥ २ ॥ --संध्याउपासना ( मातृभूमि प्रार्थना )

९८ ज्या मातृभूमिमध्ये समुद्र, नद्या व अनेक जलप्रवाह आहेत, जिच्यामधील शेतकरी अन्न उत्पादन करून संघटित होऊन रहात असतात, जिच्यामध्ये श्वास घेणारे व चालणारे फिरणारे उत्साहाने कार्य करीत असतात, ती आमची मातृभूमि आम्हाला अपूर्व रसपानामध्ये धारण करो ॥ ३ ॥ --वैदिक राष्ट्रगीत

९९ जिच्यामध्ये आमच्या पूर्वीच्या काळातील पूर्वजनानी विशेष पराक्रम केले होते, जिच्यामध्ये देवानी असुरांचा पूर्ण पराभव केला होता, जिच्यामध्ये गाई, घोडे व पक्षी यांची विशेषस्थाने आहेत, ती आमची मातृभूमि आम्हाला भाग्य व तेज देवो. ॥ ५ ॥ --वैदिक राष्ट्रगीत

१०० आम्हाला पाठीमागून कोणी ढकलू नये, पुढूनही कोणी ढकलू नये, हे मातृभूमे, आमचे कल्याण करणारी तू हो. वाईट मार्गाने जाणारे आम्हाला न जाणोत, मारक शत्रू आमच्यापासून दूर होवो ॥ ३२ ॥ --वैदिक राष्ट्रगीत

१०१ ज्या मातृभूमीमध्ये मोठ्याने बोलणारे मनुष्य गातात व नाचतात, जिच्यामध्ये वीर युद्ध करतात, जिच्यामध्ये मोठ्याने आव्हान देतात, जिच्यामध्ये दुंदुभि वाजते, ती आमची मातृभूमि शत्रूना दूर करो, तसेच आमची मातृभूमि मला शत्रूरहित करो ॥ ४१ ॥ --वैदिक राष्ट्रगीत

१०२ अनेक प्रकारच्या भाषा बोलणाऱ्या लोकांना धारण करणारी ही मातृभूमि व अनेक धर्मांच्या लोकानाही एका घरातील माणसाप्रमाणे धारण करणारी ही मातृभूमि न हलणाऱ्या व स्थिर राहणाऱ्या गाईप्रमाणे धनाच्या हजारो धारा

दोहन करून देवो ।। ४५ ।। —वैदिक राष्ट्रगीत

१०३ राष्ट्राची भाषा कोणती असावी याच्या सर्व–सामान्य शास्त्रीय कसोट्या––

( अ ) राष्ट्रभाषेचे शब्द त्याच देशात झालेले असावे. कृत्रिमपणाने ते विदेशातून आणून बलात्काराने लादलेले नसावे.

( आ ) राष्ट्रभाषा समजणारांची संख्या अन्य भाषा समजणारांच्या संख्येहून पुष्कळच अधिक असावी. तसेच ती भाषा प्रांतिक बोली बोलणाराना सहज शिकता येणे शक्य असावे.

( इ ) राष्ट्रभाषेचा संबंध राष्ट्राच्या संस्कृतीशी व प्राचीन साहित्याशी विशेष असावा. —आमच्या राष्ट्रभाषेचा प्रश्न

१०४ भाषेचे लक्षण––

( अ ) स्वताची क्रियापदे असली तर ती भाषा स्वतंत्र आहे असे ठरेल;

( आ ) एका भाषेतील क्रियापदावर आधारलेली, पण शब्दासाठी सर्वस्वी विदेशी शब्दभांडारावर अवलंबून असणारी भाषा स्वतंत्र भाषा नव्हे.

—आमच्या राष्ट्रभाषेचा प्रश्न

१०५ आपल्या भारत–वर्षात नीचात नीच समजल्या जाणाऱ्या जातीचा मनुष्यही ईश्वर होण्याची महत्त्वाकांक्षा धरू शकतो व ' अहं ब्रह्मास्मि ' असा अनुभव घेण्यापर्यंत तो उन्नतही होतो ! असे उन्नत झालेले पुरुष बहुधा सर्व उच्च–नीच जातीत उत्पन्न झाल्यामुळे प्रत्येकाला ही महत्त्वाकांक्षा सफल झालेली पाहण्याची शक्यता आहे असे वाटते !! ...अध्यात्मामध्ये ' अध्यक्ष अथवा शासक ' बनणे व अधिदैवतामध्ये ' परमात्मा, नारायण किंवा शिव ' बनणे या पायऱ्या आहेत. एवढे सामर्थ्य देणारे अध्यात्मशास्त्र आहे. म्हणून यास ' सामर्थ्याचे शास्त्र ' असे म्हणणे योग्य आहे. ––प्रास्ताविक–ईश–उपनिषद्

१०६ एकएकटा मनुष्य मरणारा आहे, पण मनुष्यसमाज अमर आहे. ' संभूत्या अमृतत्वं अश्नुते ' = समाजरूपाने अमरत्व प्राप्त होत असते. ––ईश–उपनिषद्

१०७ जे काही येथें आहे ते सर्व समाजाचे आहे. त्यातून व्यक्तीने आपणासाठी अत्यावश्यक असेल तेवढे घेऊन जगावे व समाजसेवा करीत रहावे. समाजसेवेनेच व्यक्तीची उन्नति आहे. तसेच उलट समाजाने ही व्यक्तीच्या पोषणाकडे लक्ष्य पुरवलेच पाहिजे; तसे समाज न करील तर प्रत्येक व्यक्ति निर्बल बनून पुढे तो समाजही निर्बल बनेल व नष्ट होऊन जाईल. —ईश–उपनिषद्

१०८ ईश्वराचे म्हणून जे गुण प्रत्येक ठिकाणी सांगितलेले असतात ते मनुष्याच्या अंगी आणण्यासाठीच सांगितले असतात. कारण ' नर हा नारायण होणारा आहे. ' नारायण झाल्यावर त्याच्यामध्ये हे गुण येणारच आहेत. तेव्हा ते गुण किती अंशाने आपल्यामध्ये आले आहेत हे माणसाने पहावे व आपले आचरण त्या गुणाच्या अनु-

रोधाने सुधारत न्यावे. हा मार्ग त्या गुणवर्णनाने साधकाला समजू शकतो.

—ईश उपनिषद्

१०९ मनुष्यांनी ऐश्वर्यप्राप्तीचा प्रयत्न करावा, पण मार्ग मात्र चांगला शुद्धच असावा. कधीही वाईट मार्गाने धन प्राप्त करू नये. सर्व कर्माच्या चांगल्या–वाईट परिणामांचा विचार करावा. आपल्यामध्ये जे पाप व जी कुटिलता असेल ती प्रयत्नाने दूर करावी. —ईश उपनिषद्

११० प्राकृतिक विज्ञान व अध्यात्मज्ञान ही दोनही शास्त्रे योग्य प्रमाणात राष्ट्रामध्ये शिकवली जावी. केवळ प्रकृति विद्याच वाढवली तर भोगविलास वाढतील व अधोगति होईल. जर नुसती अध्यात्मविद्याच वाढवली तर ऐहिक उन्नतिकडे दुर्लक्ष्य होईल. ही दोनही अरिष्टें टाळण्यासाठी दोन्ही विद्यांचा समन्वय शिक्षणामध्ये करावा व प्रजाजनामध्ये दोन्ही अभ्युदय व निःश्रेयस यासाठी प्रयत्न समतोल प्रमाणात होत राहतील असे करावे. —ईश उपनिषद्

१११ सज्जनांचे पालन, दुष्टांचे निर्दालन व धर्माची स्थापना करणारा तारक पुरुष आपल्या पोटी जन्मास यावा व त्याने देशाचे दुःख दूर केले आहे असे आपल्या डोळयानी आम्ही पहावे, यापेक्षा दुसरी कोणती आनंदाची गोष्ट असणार आहे ?

—मंगलमूर्ति गणेश

११२ स्त्रियांच्या मनात जी इच्छा स्थिर असते, तीच गर्भामध्ये असते; म्हणून विशेष प्रकारची सुसंतति व्हावयास पाहिजे असेल, तर स्त्रियानीच विशेष निर्बंधाने राहिले पाहिजे. —मंगलमूर्ति गणेश

११३ थोर पुरुषांचा स्वभावच असा असतो की, ते सहज लीलेने जे कार्य करतात, त्यातच आपोआप सर्वांचे हित होते. —मंगलमूर्ति गणेश

११४ क्रांति करण्याच्या कामी गरीब जनतेमधूनच लोक मिळणे शक्य आहे; कारण त्यानाच खरा त्रास झालेला असतो; म्हणून जे गरीब आहेत, जे आपले जीवन पूर्णपणे अर्पावयास तयार आहेत, ज्यांच्यात चैनीची व विलासाची प्रवृत्ति नाही, तेच लोक पाहिजेत. —मंगलमूर्ति गणेश

११५ राज्यव्यवस्थेमध्ये गरीबांचा विचार प्रथम झाला पाहिजे. —मंगलमूर्ति गणेश

११६ कोणतीही गोष्ट वेळेवर झाली तरच तिचा काही तरी उपयोग होणे शक्य असते. —मंगलमूर्ति गणेश

११७ देशातील लोकांचा पाठिंबा नसेल तर कोणतेच साम्राज्य बाहेरच्या मदतीने टिकणे शक्य नसते. —मंगलमूर्ति गणेश

११८ ब्राह्मण हे ज्ञानसंपन्न असल्यामुळे ते अनेक प्रयत्न करून दुष्ट राजास गादीवरून पदच्युत करवतात, जनतेमध्ये क्रांतिचे विचार पसरविनात, जुलूम सहन करून उगी बसत नाहीत. यामुळे जुलमी सम्राटास ब्राह्मण नकोसे होतात. —मंगलमूर्ति गणेश

११९ वीर संतति निर्माण करण्याचे काम पुरुषांपेक्षा स्त्रियांचे अधिक आहे. स्त्रिया ज्यावेळी स्वातंत्र्याच्या उज्ज्वल विचाराने भारल्या जातील, त्यावेळी स्वतंत्र बाण्याची नवीन पिढी तयार होईल व त्यातूनच पुढारी उत्पन्न होईल.

—मंगलमूर्ति गणेश

१२० बारा वर्षांच्या मुलाचा आपल्या वडिलास विश्वास वाटावा इतके शौर्य कोणत्याहीं जातीत मुरले पाहिजे. —मंगलमूर्ति गणेश

१२१ शील पाहिल्यावाचून एकदम विद्या दिली तर ती घातक होते.

—मंगलमूर्ति गणेश

१२२ वास्तविक पाहता, सौंदर्य म्हणजे काही मोठा गुण नव्हे. मानवाची खरी परीक्षा त्याच्या अंगच्या गुणावरूनच झाली पाहिजे. —मंगलमूर्ति गणेश

१२३ जप म्हणजे मंत्राच्या अर्थाचे मनन होय. —गणेशाथर्वशीर्ष

१२४ जे लोक आपणास विश्वात्म्याहून पृथक् समजतात, ते विश्वभक्षक होऊन राक्षसी व आसुरी वृत्तीचे बनतात. विश्वामध्ये दुःख उत्पन्न करण्यास ही वृत्ति कारण होत असते. म्हणून ...विश्वहितासाठी आपले जीवन अर्पण करणे, हाच आपला जीवनोद्देश आहे, असे लोकांनी समजले पाहिजे. —गणेशाथर्वशीर्ष

१२५ प्रार्थनेने आपला अहंकार व गर्व दूर होतो व विश्वात्म्याशी एकतानता होते. हा लाभ आहे. —गणेशाथर्वशीर्ष

१२६ आपणामध्ये ज्या ज्या म्हणून शक्ति आहेत, त्या त्या सर्व शक्तीमध्ये विश्वात्म्याच्या दैवीसामर्थ्याचा भाव आहेच आहे. त्या दैवी ठेवणे व आसुरी होऊ न देणे, हेच काय ते आपले कर्तव्य आहे. —गणेशाथर्वशीर्ष

१२७ फसवे, लुटणारे, अत्याचारी लोक क्षणभर सुख मिळवण्यासाठी फसवणूक, लूट व अत्याचार करतात, क्षणभर सुखी झाल्यासारखे दिसतात, पण शेवटी तो त्यांचा भ्रम आहे असेच ठरते व त्या ( परमेश्वरी ) प्रत्यक्ष अतर्क्य शक्तीच्या कठोर न्यायाच्या पुढे त्यास आपली मान वाकवावीच लागते. —गणेशाथर्वशीर्ष

१२८ अखंड एकरसतेची वृत्ति ही दैवीसंपत्ति व निराळेपणाची वृत्ति ही आसुरी विपत्ति होय. —गणेशाथर्वशीर्ष

१२९ ( १ ) सर्व मनुष्यांची गणना करावी, त्यांचे गण किंवा गट बाधावे, हे गण विद्या, कला, संस्कार, राहणी, उद्योग, हुन्नर आदि उद्देश दृष्टिसमोर ठेवून बनवावे, गणांची कामे ठरवावी व त्यांनी त्यांचा योगक्षेम चालत आहे की काय, ते पहावे.

( २ ) सूक्ष्म दृष्टीने निरीक्षण करून या गणातील लोकांची स्थिति सुधारत आहे की नाही ते पहावे व त्यांचे कल्याण होण्यासाठी जे काम आवश्यक असेल ते करावे.

( ३ ) सर्व गणांना परस्परावर अवलंबून ठेवून अशारीतीने परस्पराशी सुसंघटित करून ठेवावे की, कधीही फुटून निराळे होणार नाहीत.

( ४ ) सर्वांचे प्राण, धन, घर, ऐश्वर्य, संपत्ति व इतर स्थिरचर सुरक्षित राहील, अशी उत्तम व्यवस्था गणमंडळाध्यक्षाने ठेवावी.

( ५ ) हे सर्वभूत हितकारी काम करण्याचा नाद ज्याना असेल अशा जवळ हे सर्व–भूतहिताचे कार्य द्यावे.

( ६ ) सर्व माहिती गणाध्यक्षाजवळ असली पाहिजे; अमुक गण कोठे आहे, काय काम करीत आहे व कोणत्या स्थितीत आहे हे त्यास प्रत्यही समजले पाहिजे.

( ७ ) उदार अंतःकरणाने सर्व गणकार्यव्यवस्था चालली पाहिजे. सर्वांचा मार्ग सर्वास यथायोग्य रीतीनं दिसावा, असा ज्ञानाचा प्रकाश चहूकडे पसरलेला असावा.

( ८ ) आपल्या प्रगतीसाठी सतत चळवळ चालत असावी.

( ९ ) आपले संरक्षण करण्यास हरएक गण सिद्ध असावा व एकंदर गणसंघाची सुरक्षितता नेहमी जागरूकतेने केली जाईल, अशी सर्वत्र सुव्यवस्था असावी.

( १० ) सर्वांचे कल्याण, सर्वांचे सुख, सर्वांचे शिवमंगल व्हावे, यासाठी सर्व गणाचा अखंड प्रयत्न चालत असावा. संक्षेपतः ही गणेश विद्या आहे.

—गणेशाथर्वशीर्ष

**१३० शिक्षणाने** ( १ ) स्वसंरक्षणाचे सामर्थ्य अंगी आले पाहिजे. ( २ ) पोटापाण्याचा प्रश्न सुटला पाहिजे. ( ३ ) पराक्रम करण्याची शक्ति वाढली पाहिजे. ( ४ ) तेजस्वीपणा वाढला पाहिजे. ( ५ ) आपसातील द्वेष कमी झाला पाहिजे. ज्या शिक्षणाने या पांच गोष्टी साधत नसतील, ते खरे व योग्य शिक्षण नव्हे, असे समजावे.

—गणेशाथर्वशीर्ष

**१३१ नाभिस्थानावर** 'सूर्यचक्र' आहे. जो मनुष्य त्याच चक्राच्या शक्तीचा विकास करतो, त्याचे शारीरिक आरोग्य उत्तम राहते. —सूर्यभेदन–व्यायाम

**१३२ हस्तपादासनाच्या** वेळी पाय ताठ ठेवण्याचा प्रयत्न होत असता पायांच्या मागील स्नायूवर बराच ताण बसत असल्यामुळे व कमरेच्या मागच्या स्नायूवर व पाठीच्या स्नायूवर बराच दाब बसल्यामुळे ते ते स्नायू निर्दोष होऊ लागतात व त्यात शुद्ध रक्त खेळू लागते. हेच त्या त्या स्नायूंच्या आरोग्याचे मुख्य कारण होय.

—सूर्यभेदन–व्यायाम

**१३३ पाठीचा** कणा ज्यांचा निरोगी असतो, त्याना शेकडा ऐंशी रोग होणेच शक्य नसते.

—सूर्यभेदन–व्यायाम

**१३४ अंगसंचालनाचा** व्यवसाय आरोग्यवर्धक व अंगसंचालनरहित व्यवसाय आरोग्यनाशक असतो; म्हणून बैठा व्यवसाय करणारांनी दररोज अंगसंचलनाचा

व्यायाम अवश्य घेतला पाहिजे. दररोज अधिकाधिक अर्धातास किंवा कमीत कमी दहा मिनिटे तरी हा व्यायाम नियमितपणे घेतल्यास खात्रीने आरोग्य वाढेल.

—**सूर्यभेदन-व्यायाम**

१३५ जसे ज्याचे विचार असतात, तसा तो मनुष्य बनतो. '**मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः**' मनुष्याच्या स्वातंत्र्याचे अथवा पारतंत्र्याचे कारण त्याचे मनच आहे. मनातले विचार वाणीच्या द्वाराने उच्चारले जातात व त्याच विचाराप्रमाणे मनष्य बनत असतो. —**वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१३६ जसे विचार तसे उच्चार, जसे उच्चार तसे आचार. यासाठी अभ्युदय इच्छिणाऱ्या मनुष्यानी आपले विचार स्फूर्तिदायक आहेत की नाहीत याकडे लक्ष द्यावयांस हवे. —**वैदिकधर्म खंड ( भार १ )**

१३७ जर ( **विश्वं विष्णुः** ) विश्व हे विष्णुचे रूप आहे, जर ( **सर्वं वासुदेवः** ) सर्व विश्व हें वासुदेवाचें रूप आहे व जर ( **सर्वं इदं ब्रह्म** ) हे सर्व ब्रह्माचे रूप आहे व जर ब्रह्म आनंदरूप आहे, तर हे विश्वही आनंदस्वरूपच आहे.

—**वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१३८ **वर्णनीयांचे** जे वर्णन केलेले असते, ते दुसऱ्यास मार्गदर्शक होऊ शकते. शिवाजीने स्वराज्य स्थापले, रामाने राक्षसांचा पराभव करून आर्यांना स्वातंत्र्य दिले, अशी वर्णने वाचली व ऐकली म्हणजे वाचणारास व ऐकणारास तशी शुभकृत्ये करावी, अशी स्फूर्ति उत्पन्न होते. —**वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१३९ **देवतावर्णनाच्या** मिषाने उत्तम पोषक कल्पना ऋग्वेदमंत्रात संग्रहित झाले-ल्या आहेत व त्या दैवी प्रासादिक आहेत. याचा विचार केला म्हणजे ऋग्वेदास 'सद्विचारवेद' म्हणावेसे वाटते. —**वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१४० **सद्विचार** नसते तर सत्कर्माकडे प्रवृत्ति होणार नाही, सत्कर्म केल्याविना सद्विचार स्थिर राहणार नाहीत, सद्विचारपूर्वक सत्कर्म केल्यावाचून सदुपासना होणें अशक्य आहे व या तिहीशिवाय ब्रह्म प्राप्त होणेही असंभवनीय आहे.

—**वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१४१ **वेद** निश्चित ज्ञान सांगतात, त्यांत संशयाला जागा रहात नाही. श्रुति असल्यापेक्षा वाढवून रसभरीत करून सांगतील. वेद तसे वाढवून सांगणार नाहीत. निगम तर्कशुद्ध विचारसरणीने सांगतील तर मंत्र सतत निदिध्यास करावयास लावतील व आम्नाय श्रद्धेने जप करा असे म्हणतील. —**वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१४२ **प्रार्थना** ही फार मोठी शक्ति आहे. मोकळ्या अंतःकरणाने आपले हृदय उघडे करून प्रार्थना करून पहावी, म्हणजे प्रार्थनेने मनाची शक्ति कशी वाढते, ते कळून येईल. प्रार्थनेच्या द्वारा मानवी आकांक्षा व्यक्त होत असतात, हा त्यांतील विशेष आहे. —**वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१४३ **मातांच्या** मनात जो विचार घोळत असतो तो मुलामध्ये उत्पन्न होत असतो. मातामध्ये जर राज्यक्रांतिचे विचार घोळले तर एक दोन पिढ्यात खात्रीने राज्यक्रांति होते. **--वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१४४ **राज्याची** भीक कोणी कोणास घालत नसतो व भिकेने मिळालेले राज्य भीक घेणारास चालविताही येत नाही. **--वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१४५ **शरीरामध्ये** अयोग्य अन्नसेवनामुळे मल व दोष निर्माण होतात, ते दूर करण्यासाठी निरशनसेवन, तपश्चरण, प्राणायाम, भस्मशयन, मौन, एकान्तवास आदि नियम आहेत. **--वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१४६ **बावळटपणा** संसारात उपयोगाचा नाही. पुरुष घरी नसला, तरी स्त्रियानी आत्मरक्षण करण्याचे धैर्य दाखवलेच पाहिजे. **--वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१४७ **पुरोहिताने** राष्ट्राची संघटना केली पाहिजे, लोकाना वीर बनविले पाहिजे, सैन्य तयार केले पाहिजे, त्यांची शस्त्रास्त्रे शत्रूपेक्षा अधिक प्रभावी केलीं पाहिजेत. शत्रूचा पराभव व्हावा व आपला जय व्हावा अशी आपली तयारी केली पाहिजे.
**--वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१४८ **सम्राटाची** शत्रुनिर्दालनाची शक्ति कमी होता कामा नये, पण त्याचे देवत्वही कमी होता कामा नये. शत्रुनिर्दालनाने बल वाढले म्हणजे त्याबरोबर असुरत्वही वाढू लागते. तसे होऊ नये तर उलट त्याचे देवत्वही वाढत रहावे हा आदर्श सांगितला आहे. **--वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१४९ **राष्ट्रगीत** हे जनतेच्या आकांक्षांचे द्योतक असते.
**--वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१५० **हे सात** गुण राष्ट्राच्या संरक्षणाला अत्यंत उपयोगी आहेत-सत्य, सरलता, वीरता, दक्षता, ज्ञान, विज्ञान व यज्ञरूप जीवन. हे गुण जनतेमध्ये वाढतील असे केले पाहिजे. हेच राष्ट्रीय शिक्षण आहे. **--वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१५१ **सैन्याबरोबर** साधारण मनुष्य जरी राहिला, तरी तो शूरवीर बनतो व शत्रूचा पराभव करण्यास समर्थ होत असतो. सैनिकीय शिस्तीने असा हा प्रभाव वाढत असतो. **—वैदिकधर्म खंड ( भाग १ )**

१५२ **मनुष्याचे** आयुष्य हा एक यज्ञच आहे. पहिली चोवीस वर्षे ही विद्याध्ययन करण्याची आहेत. हे या जीवनरूपी यज्ञातील प्रातःसवन् आहे. याला ब्रह्मचर्याश्रम म्हणतात. त्यानंतर चव्वेचाळीस वर्षाचे माध्यंदिन सवन आहे. हे आयुष्य गृहस्थाश्रमाचे आहे. यामध्ये विवाह करून गृहस्थाश्रमाच्या नियमाप्रमाणे वागून सुप्रजा निर्माण करावी. त्यानंतर तिसरा आयुष्याचा भाग वानप्रस्थाश्रमासाठी राखून ठेवला आहे. हा अठ्ठेचाळीस वर्षांचा आयुष्याचा भाग आहे. चोवीस वर्षांच्या ब्रह्मचर्या-

श्रमामध्ये जी विद्या आपण घेतली, ते कर्ज आपण घेतले आहे. हे आपण सव्याज फेडावयाचे आहे. विद्यादान करण्यासाठीच हा आश्रम आहे.

—वैदिकधर्म खंड ( भाग १ )

१५३ **आपल्या** सुखासाठी दुसऱ्यांचा बळी घेणारे ते राक्षस, आपल्यापुरते पाहणारे ते मनुष्य व दुसऱ्यासाठी आत्मसर्वस्व अर्पण करणारे ते देव होत. मनुष्य उन्नत होऊन त्यास देवत्व प्राप्त होईल अशा विधिनियमाना धर्म असे म्हणावयाचे व याच्या उलट मनुष्य हा राक्षस बनेल त्याला अधर्म म्हणावयाचे.

—वैदिकधर्म खंड ( भाग १ )

१५४ **हिंसया दूयते यस्मात् हिंदुरित्युच्यते बुधैः ।** अशी तंत्रग्रंथामध्ये व्याख्या दिलेली आहे. मनुष्याची सहजप्रवृत्ति हिंसेकडे आहे. ती दूर करून त्याला 'निर्वैर' बनविण्याचे कार्य हा ( हिंदु ) धर्म करीत असल्यामुळे व याचे हे शेंवटचें साध्य असल्यामुळे हिंदुधर्म हे नाव आहे. —वैदिकधर्म खंड ( भाग १ )

१५५ **उत्साहाने** युक्त मनुष्य पुष्कळ कर्मे उत्तम रीतीने करून सफलता प्राप्त करू शकतो. उत्साहहीन मनुष्यामध्ये कार्य करण्याची शक्ति जरी पुष्कळ असली, तरी तो उत्साहाशिवाय काही कार्य उत्तम रीतीने किंवा सफलतेने करू शकणार नाही... म्हणून मनुष्याचा जन्म सफल होण्यासाठीं उत्साहाची आवश्यकता आहे. —मन्युसूक्त

१५६ **द्वन्द्वे** सहन करण्याची शक्ति आपल्या अंगी वाढली म्हणजे शत्रूचा पराभव करणे सुगम होते. —मन्युसूक्त

१५७ **योग्य** कार्यामध्ये उत्साहाने भाग घेतला पाहिजें, म्हणजे पराभव होत नाही.

—मन्युसूक्त

१५८ **विचारी** लोक सर्वसाधारण माणसांच्या अनुभवाला संशोधनाच्या वेळी बरीच किंमत देतात. —एकादशीचा उपवास

१५९ **सूर्यचन्द्रांच्या** आकर्षणामुळें जो शरीरातील जीवनरसाच्या गतिमध्ये न्यूनाधिक परिणाम घडतो, त्यामुळे द्वादशीपासून तृतीयेपर्यंतचे दिवस आजारी माणसाच्या आरोग्यास उपायकारक असतात. जे सशक्त किंवा आजारी नाहीत, अशा माणसांच्या शरीरामध्येही वरील कारणामुळेच या दिवसात रोगबीजांची वाढ होणे स्वाभाविक आहे. शुक्लपक्षापेक्षा कृष्णपक्षामध्ये वरील वाढ अधिक होणेही अपरिहार्य आहे. —एकादशीचा उपवास

१६० **ब्रह्मचर्य** म्हणजे केवळ एकाच इन्द्रियाचा संयम नव्हे. सर्व इन्द्रियांना त्यांच्या त्यांच्या विषयाकडून हटवून ईश्वराच्या भक्तीमध्ये लावणे, हे ब्रह्मचर्यामध्ये मुख्य आहे. '**ब्रह्मचर्येण तपसा देवा मृत्युमुपाघ्नत ।**' ( अथर्व. ११।५।१० ) ब्रह्मचर्यरूप तपाने देवानी मृत्यूला दूर केले. —एकादशीचा उपवास

१६१ **अहिंसा**, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, शुद्धता, संतोष, तप, स्वाध्याय,

ईश्वरभक्ति या दहा गुणांची वाढही आपणामध्ये करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. निदान एकादशीच्या दिवशी तरी या दहा गुणांचे शक्य तितके अधिकात अधिक पालन करण्याचा निश्चय करावा. —एकादशीचा उपवास

१६२ **जेथून** कोठूनही बोध ( ज्ञान अथवा उपदेश ) प्राप्त होऊ शकेल तेथून प्राप्त करावा. —शतपथ बोधामृत

१६३ **सद्भावना** हेच देव, दुष्ट भावना हे असुर. दुष्ट भावनांचा बीमोड केला तरी त्या पुनः उद्भवतात. —शतपथबोधामृत

१६४ **आम्ही** स्तुति करण्यास योग्य असतील अशा देवांचीच स्तुति करू, नमन करण्यास जे योग्य असतील त्यानाच नमस्कार करू, व पूजा करण्यास योग्य असतील त्यांचीच पूजा करू. —शतपथबोधामृत

१६५ **विजय** प्राप्त करणाऱ्यानेच बोलावे आणि कर्म करावे. —शतपथबोधामृत

१६६ **सोळाव्यावर्षापासून** सत्तरवर्षापर्यंत यौवन आहे....यापुढे तीस वर्षे परिहाणी अवस्था, त्यापुढे वृद्ध व क्षीण अशा दहा दहा वर्षांच्या अवस्था आहेत. मिळून एकशे वीस वर्षांचे मनुष्याचे आयुष्य आहे. इतके जगण्याचा प्रत्येकाचा जन्मसिद्ध अधिकारच आहे. —आरोग्यखंड

१६७ **ब्रह्मचर्य** म्हणजे ( ब्रह्म + चर्य ) ब्रह्मप्राप्तीसाठी जे आचरण करावयाचे ते.... सर्व इन्द्रिये शुद्ध, पवित्र व यज्ञीय बनविता आली, तरच खरे ब्रह्मचर्य साधेल व हे साधले, तरच आपणासही एकशेवीस वर्षांचे अथवा याहीपेक्षा अधिक कार्यक्षम दीर्घ आयुष्य प्राप्त करता येईल. —आरोग्यखंड

१६८ **वास्तविक** रीतीने पाहता हिंदुस्थान ऊष्णदेश असल्यामुळे या देशामध्ये मुलांच्या शरीराची वाढ होण्यासाठी सकाळी ६ ते ८ पर्यंतच मुलाना व्यायाम देणे योग्य आहे. —आरोग्यखंड

१६९ **कलियुगात** ( भांडण्याच्या, आपसातील कलहाच्या युगात ) मनुष्याच्या आयुष्याची कमाल मर्यादा वीस ते तीस वर्षेपर्यंत असेल. अधर्माचे आचरण म्हणजेच कलियुग. धर्माप्रमाणे वर्तन म्हणजे सत्ययुग होय.... निश्चयपूर्वक सदाचार पालन केल्यास दीर्घायुष्य प्राप्त होते. —आरोग्यखंड

१७० **ज्या** देशातील विद्वान् लोक अल्पायुषी मरतात त्या देशाची उन्नति, राष्ट्राचे पुढारीपण स्वीकारण्यास वृद्ध, अनुभवी व विद्वान् लोक नसल्याने, होऊ शकत नाही. —आरोग्यखंड ( भाग १ )

१७१ सूर्यकिरणापासून जी इन्द्रशक्ति मिळते त्याची पहिली व मुख्य गोष्ट ही

आहे की, त्यामुळे सर्वप्रकारचे प्राण शरीरामध्ये सुरक्षित व बलवान् होतात. प्राणाच्या बलानेच सर्वप्रकारचे इतर बल सुस्थिर राहते. —आरोग्यखंड ( भाग १ )

१७२ **आपण** रोज ( संध्यावंदनानंतर ) आपल्या हृदयावर हात ठेवून ' येथे परमात्मा आपल्या संपूर्ण शक्तीने परिपूर्ण आहे ' या गोष्टीचे ध्यान करा. जितक्या वेळा होऊ शकेल तितक्या वेळा त्याच्याशी आपली एकतानता करा आणि सर्व जगाला विसरून जा. हा एक उपाय आहे की ज्यायोगे इन्द्रशक्ति आपल्यामध्ये संचारित व्हावयास लागते. मन जर शांत ठेवून याप्रमाणे आपण आपल्या उपासना करू शकाल तर आपल्याला नवीन शक्ति स्फुरण पावल्याचा अनुभव निःसंदेहपणे येईल. —आरोग्यखंड ( भाग १ )

१७३ **आपण** स्वताला व आपल्या राष्ट्राला दुसऱ्यापेक्षा मागे न ठेवता सदैव पुढे नेण्यात यत्नशील असले पाहिजे. प्रत्येक कार्यक्षेत्रात हा नियम लक्षात ठेवला पाहिजे की, आपणास पुढे जावयाचे आहे आणि संकटाबरोबर झगडून, मार्गातील विघ्नाना दूर करून आपला ( धर्म—मार्ग ) निष्कंटक करावयाचा आहे. —आरोग्यखंड (भाग १)

१७४ **मनुष्याची** शक्ति वाढविण्यासाठी वेळोवेळी दुःखे, कष्ट, मृत्यु यांचाही आनंदाने स्वीकार करणे भाग पडते. सत्पक्षावर असत्पक्षाचा हल्ला होण्याच्या वेळी सत्पक्षाच्या बाजूला मिळून असत्पक्षाबरोबर युद्ध करावे लागते....ही आवश्यक गोष्ट केली नाही तर उन्नति होणे शक्य नाहीं. —आरोग्यखंड ( भाग १ )

१७५ **निर्बल** मनुष्य कोणत्याही प्रकारची उन्नति करू शकत नाही. यासाठी वैदिकधर्मामध्ये बलसंवर्धनावर फार भर दिला आहे. शारीरिक, इन्द्रियविषयक, मानसिक व बौद्धिक बलासह जे योग्य प्रयत्न केले जातात, त्यांच्या द्वारा इन्द्रशक्ति वाढली जाते; आणि ही वाढलेली इन्द्रशक्ति पुन्हा वर उल्लेख केलेल्या बळाला द्विगुणित करते. —आरोग्यखंड ( भाग १ )

१७६ **स्वार्थभावनेला** दूर करणे आणि परोपकारी शील धारण करणे, सर्वांना आर्य म्हणजेच प्रगतिशील करणे आणि स्वतः नेहमी अविश्रांत श्रम करणे, हे तीन सद्गुण इन्द्रशक्तीला वाढविणार आहेत. —आरोग्यखंड ( भाग १ )

१७७ **खरे** मोठे लोक कठीण परिस्थितीला भीत नाहीत, रडत बसत नाहीत. परंतु पुरुषार्थ करून वर उठतात व दुसऱ्याला उठवतात. —आरोग्यखंड ( भाग १ )

१७८ **छातीच्या पुढे** बेंबी जाऊ लागली, म्हणजे समजावे की आपल्या शरीरात मृत्यु घर करीत आहे. —आरोग्यखंड ( भाग १ )

१७९ **आपल्या** देशाच्या शत्रूला अन्य देशातील सैन्य बोलावून हाकलून घालवण्या-

पेक्षा आपली अंत:शक्ति वाढवून शत्रूला घालवून देणे नेहमी अधिक श्रेयस्कर असते.
--आरोग्यखंड ( भाग १ )

१८० **मनाला** शान्ति नसली की कष्ट होतात व शान्ति प्राप्त झाली की तीपासून सुख प्राप्त होते. --आरोग्यखंड ( भाग १ )

१८१ **वेदमंत्रामध्ये** एक प्रकट अर्थ असतो नि दुसरा गुप्त वा गुह्यार्थ असतो. हा गुह्यार्थ मननाने व्यक्त होतो. हाच गुह्यार्थ साधकाना उन्नतीचा सरळ मार्ग दाखविणारा असतो. —वेदसुधा ( आदर्श पुरुषाचे दर्शन )

१८२ **आपल्या** जीवनाच्या अंतीम क्षणापर्यंत आत्मसमर्पण करून, विश्वाची सेवा करण्यासाठी प्रकाश देतच राहील. हा आत्मयज्ञ करण्याचा उत्तम आदर्श होय.
वेदसुधा ( आदर्शपुरुषाचे दर्शन )

१८३ **ज्ञानाचे** अभावी असणारी, शौर्य–धैर्य–वीर्य आदि क्षात्रगुणांच्या अभावी येणारी, धन–कृषि–वाणिज्य यांचे अभावामुळे होणारी आणि शिल्पाच्या अभावी येणारी- अशी निर्बलता व्यक्तिचा नि राष्ट्राचा घात करणारी आहे.
—वेदसुधा ( आदर्श पुरुषाचे दर्शन )

१८४ **राष्ट्रात** सज्जनांचे रक्षण व्हावे, संघटना वाढावी, अज्ञानी ज्ञानी व्हावे, निर्बल बलवान् व्हावे, शिल्पी वाढावे, सर्व जनतेच्या व्यवहारात हिंसा, क्रूरता, कुटिलता नसावी. अशा शुभ कर्मांना राष्ट्रशासनात उत्तेजन मिळावे. याविरुद्ध कुकर्मे राष्ट्रात होऊ नयेत. कोणी करू पाहील तर त्याला प्रतिबंध व्हावा.
—वेदसुधा ( आदर्श पुरुषाचे दर्शन )

१८५ **जोपर्यंत** सार्वजनिक हिताला बाधक होत नाही तोपर्यंतच व्यक्तीजवळ धन असणे हे चांगले आहे. —वेदसुधा ( वैदिक अर्थव्यवस्था )

१८६ **अत्यावश्यक** जीवन–निर्वाहाच्या वस्तु घेणे हा दोष नाही, हा लोभही नाही. अनावश्यक भोगसंग्रह करणे हा दोष आहे. हाच दोष समाजात उपद्रव वाढवितो.
—वेदसुधा ( वैदिक अर्थव्यवस्था )

१८७ **आपल्या** शरीरावर आपल्या मनाच्या इच्छाशक्तीने दृढ परिणाम होतो. यासाठी इच्छाशक्ति प्रबल केली पाहिजे —वेदसुधा ( वैदिक अर्थव्यवस्था )

१८८ **ईशनशक्तीने** जो विशेष योग्य असेल त्याला शासनावर नेमणे, व्यक्ति समाजासाठी आहे, म्हणून व्यक्तीच्या भोगावर स्वत: संयम ठेवणे, स्वत: त्यागाने भोग भोगणे, लोभ सोडणे आणि सर्व धन जनतेचे आहे, असे मानून आपले धन जनतेच्या कल्याणासाठी स्वस्फूर्तीने अर्पण करणे, हे वैदिक जीवनाच्या स्वयंशासनाचे स्वरूप आहे. —वेदसुधा ( वैदिक अर्थव्यवस्था )

**१८९ राष्ट्रशासनात** जे स्वयंसेवक राष्ट्राची सेवा अवैतनिक–केवळ सेवाभावनाने करतात तेच श्रेष्ठ आहेत. **—वेदसुधा ( आपले स्वराज्य )**

**१९० राष्ट्राचे** अधिकारी, राष्ट्रसभेचे सभासद, अन्य कार्यकर्ते, सर्वच्या सर्व सुशिक्षित, संयमी, स्वतः स्वतःवर नियमांचे बंधन घालणारे, निरोगी, बलवान, शत्रूला वश न होणारे पाहिजेत. हे जर असे नसतील तर राष्ट्रच्या राष्ट्र नष्ट होईल, यात संशय नाही. **—वेदसुधा ( आपले स्वराज्य )**

**१९१ आम्ही** आमच्या कर्मानी येथे कृतयुग निर्माण केले पाहिजे. सत्ययुग अथवा कलियुग निर्माण करणे हे आपल्या कर्मावर अवलंबून आहे. आपसात झगडे, तंटे करणारासाठीच कलियुग आहे. आपली संघटना, एकता, समता, करणारांचे कृतयुग होते; म्हणून हे पूर्णपणे आपल्या कर्मावर अवलंबून आहे.

**—वेदसुधा ( श्रेष्ठतर कर्म करण्याची शक्ति )**

**१९२ केवळ** दीर्घायुष्याने मनुष्याची शोभा वाढत नाही. तो उपहासाचा विषय होईल. पहिल्याने मनुष्याने कुशलतापूर्वक कर्म करण्याची पात्रता मिळवली पाहिजे; यासाठी आवश्यक तितकी ज्ञानविज्ञानसंपन्नता मिळवावी आणि अशा कर्म-कुशल पुरुषाने दीर्घायुषी होण्याची इच्छा करावी. त्यासाठी प्रयत्न अवश्य तो करावा आणि दीर्घायुषी व्हावे. **—वेदसुधा ( श्रेष्ठतर कर्म करण्याची शक्ति )**

**१९३ आपल्या** पद्धतीचा मनुष्याने विचार व प्रचार करावा; पण दुसऱ्या पद्धतीत जर काही गुण असतील तर त्यांचाही मनुष्याने अवश्य विचार केला पाहिजे.

**—वेदसुधा ( व्यक्तिवाद आणि समाजवाद )**

**१९४ राष्ट्रात** योग्यतेचे पुरुष नुसते असून चालणार नाही, तर त्या श्रेष्ठ पुरुषांनी राष्ट्राची अखंड सेवा करीत राहिले पाहिजे, तरच ते राष्ट्र सुखी होईल.

**— वेदसुधा ( व्यक्तिवाद आणि समाजवाद )**

**१९५ वैदिक** सभ्यता विश्वशान्ति स्थापन करण्यासाठी आहे, हे निर्विवाद आहे. तथापि मानवामध्ये काही लोक राक्षसी प्रवृत्तीचे असतात. त्यांच्या दुष्ट प्रयत्नांनी जनतेला उपद्रव होतात. या जनतेला सुख मिळावे असे करणे हे राज्यशासनाचे मुख्य कार्य आहे. यासाठी राष्ट्रामध्ये सैन्य असणे आवश्यकच आहे.

**—वेदसुधा ( वेदकाळची संरक्षण व्यवस्था )**

**१९६ प्रत्येक** मनुष्य आपण भाग्यवान् बनावे, अशी इच्छा करीत असतो. हे स्वाभाविक आहे; पण हे होण्यासाठी सज्जनांचे पालन करावे, सार्वजनिक हित करण्यात तत्पर असावे आणि युद्ध करण्याच्या वेळी ते त्वरेने करून शत्रूचा फडशा उडवावा. या योगाने प्रजाजनामध्ये मनुष्य भाग्यवान् बनत असतो.

**—वेदसुधा ( वेदकाळची संरक्षण व्यवस्था )**

१९७ **शरीराचा** सुन्दर वर्ण, विशाल धिप्पाड शरीर, संरक्षणकार्यात कुशल, शत्रूचा नाश करण्यास समर्थ, शारीरिक बलाने ऊग्र असे तरुण सैन्यात भरती करणे योग्य आहे. **—वेदसुधा ( वेदकाळची संरक्षणव्यवस्था )**

१९८ **प्रजाजन** सैनिक होतात व तेच प्रजेचे संरक्षण करीत असतात. प्रायः सर्वत्र कृषकही सैन्यामध्ये भरती होत असतात व तेच युद्धात भाग घेऊन प्रजेचे संरक्षण करीत असतात. **—वेदसुधा ( वैदिक काळची सैन्याची रचना )**

१९९ **ज्या** राष्ट्रातील लोक आपसात भांडत बसतील, एकमेकामध्ये वैमनस्ये वाढवित बसतील, परस्परांची हानि करण्याचा उद्योग करीत बसतील, ते राष्ट्र कधीही उन्नतीला जाणार नाही. **—वेदसुधा ( भारतीय संस्कृतीचे शुद्ध स्वरूप )**

२०० **भारतीय** संस्कृति ही वैदिक संस्कृति आहे व त्या संस्कृतिमध्ये व्यक्तिपुरुष, राष्ट्रपुरुष व विश्वपुरुष या तीन पदांनी सर्व विश्वाचे कोडे उलगडून दाखविले आहे. व्यक्तिपुरुष हा राष्ट्रपुरुषाशी अविरुद्ध असावा व राष्ट्रपुरुष हा राष्ट्रसंघाशी सहकार्य करणारा असावा व राष्ट्रसंघ हा विराट् पुरुषाचा एक भाग आहे, असे समजून कार्य करणारा असावा. हा या तिघांच्या समन्वयाचा आशय आहे.

**—वेदसुधा ( भारतीय संस्कृतीचे यथार्थ स्वरूप )**

२०१ **विद्याप्रसाराचा** असा कार्यक्रम आखावा की ज्याच्या योगाने ज्ञान व विज्ञान यांचा समविकास होऊन सर्व लोकांचे कल्याण होईल.

**—वेदसुधा ( भारतीय संस्कृतीचे यथार्थ स्वरूप )**

२०२ **व्यक्तीच्या** मस्तकात ज्ञान, बाहूत बल, मध्यभागी वीर्य आणि पायात गति आहे. हेच गुण समाजातसुद्धा असतात. समाजात ज्ञानी, शूर, धनी आणि कर्मचारी असतात. हेच समाजपुरुषाचे मुख्य चार अवयव होत.

**—वेदसुधा ( वैदिक राज्यशासनात आरोग्यमंत्री )**

२०३ **आरोग्यमंत्र्यांनी** दक्ष राहून सर्व कार्ये करावी. आपल्या हाताखालील लोकावर प्रेम करणारे हे होत. अधिकाऱ्यात हे गुण अवश्य असले पाहिजेत. निंदनीय अधिकारी नसावेत. त्यांचे आचरण सदैव प्रशंसनीय असावे.

**—वेदसुधा ( वैदिक राज्यशासनात आरोग्यमंत्री )**

२०४ **आरोग्यमंत्र्याने** उदार आणि दानशील असले पाहिजे. गरीबास त्याच्या दातृत्वाच्या गुणांचा लाभ व्हावा. **—वेदसुधा (वैदिक राज्यशासनात आरोग्यमंत्री)**

२०५ **राष्ट्रात** कोणी रोगी नसावे अशी व्यवस्था असावी.

**—वेदसुधा ( वैदिक राज्यशासनात आरोग्यमंत्री )**

२०६ **सर्व** विश्व परमेश्वरी सामर्थ्याने, शक्तीने उत्पन्न झाले आहे. जे काही येथे आहे ते त्याचेच सामर्थ्य आहे असे समजून सर्व पदार्थात त्याचे सामर्थ्य पाहिले पाहिजे.

प्रत्येक वस्तूस पाहून परमेश्वराच्या अद्भुत सामर्थ्यास जाणले पाहिजे.

—ब्रह्मविद्या प्रकरण ( भूमिका )

२०७ **स्वतःची** उन्नति करून घेण्याची ज्या विद्वानाची इच्छा आहे, त्याने जागृत राहून प्राप्त संधीचा योग्य लाभ घ्यावा, हे उचित आहे. यामुळेच निःसंदेह त्याची उन्नति होणे शक्य आहे. —ब्रह्मविद्या प्रकरण ( ब्रह्माची विद्या )

२०८ **स्वताच्या** उन्नतीचा मार्ग प्रतिबंधरहित होणे याचेच नाव मुक्ति.

—ब्रह्मविद्या प्रकरण ( ब्रह्मप्राप्तीचा मार्ग )

२०९ ' **सज्जनांचे** पालन आणि दुष्टांचे निर्दलन रूप परमात्म्याच्या कर्मात आपल्या कर्तव्याचा भाग आनंदाने पार पाडणे, ह्याचेच नाव त्याची भक्ति करणे आहे; आणि ती भक्ति करण्यासाठी ' दुःखी लोकांचे दुःख दूर करण्याचे कार्य आपल्या शिरावर घेतले पाहिजे. ' ईशप्राप्तीचा हा सरळ मार्ग.

—ब्रह्मविद्या प्रकरण ( एकच पूजनीय ईश्वर )

२१० **जीवन** नेहमी नवे आहे; ते कधीही जुने होत नाही आणि कधीही बिघडत नाही. —ब्रह्मविद्या प्रकरण ( जीवनरसाचा महासागर )

२११ **अत्यंत** बलवान् मनुष्य आपल्या सामर्थ्याने आदर्शरूप होतो. आत्मिक, बौद्धिक, मानसिक, शारीरिक वगैरे अनेक प्रकारची बळे आहेत. मनुष्यात जे बळ असेल ते जर तो लोकोद्धारासाठी खर्च करील तर लोकात आदर्श समजला जाईल.

—ब्रह्मविद्या प्रकरण ( भुवनात ज्येष्ठ देव )

२१२ **कविलोकांनी** काव्ये अशी करावीत की जी वाचण्याने, वाचणाऱ्याच्या मनात बलवृत्तीचे पोषण व्हावे, निर्बल अंतःकरणही बलशाली बनावे. उदासीन लोक उत्साही होतील आणि पुरुषार्थी होतील. —ब्रह्मविद्या प्रकरण ( भुवनात ज्येष्ठ देव )

२१३ **ज्यापासून** उग्र तेजस्विता निर्माण होते तो सर्व मनुष्यात श्रेष्ठ होय. सर्व संरक्षकगण त्याला स्वतःचा अग्रणी करून आनंदित होतात. ( २ ) जे स्वतःच्या बुद्धीला आणि कर्मशक्तीला दीर्घकाळपर्यंत एकाच कार्यात स्थिर करतात, ते दुप्पट आणि तिप्पट सामर्थ्य प्राप्त करतात. ( ३ ) विजय प्राप्त करणाऱ्या वीरांना ज्ञानी अनुमोदन देवोत, की ज्यामुळे वीर आणि ज्ञानी यांचे एक्य होऊन राष्ट्रात स्थिर बळ वाढेल आणि दुष्ट माणसे प्रबळ होणार नाहीत. ( ४ ) ज्या देशात लहान–मोठे एका घरात राहिल्याप्रमाणे समान भावनेने राहतात, त्या देशाचे स्वतः-च्या सामर्थ्याने रक्षण होते. —ब्रह्मविद्या प्रकरण ( भुवनात ज्येष्ठ देव )

२१४ **या लोकी** व्यवहार चालविण्यासाठी धन पुष्कळ पाहिजे. हे धन मिळविण्याचे मार्ग पुष्कळ आहेत; परंतु दोष न घडू देता आणि निंद्य कर्म न करता जितके धन मिळवणे शक्य आहे तेवढेच मिळवले पाहिजे. दोष आणि निंद्य कर्माचा अवलंब करून धन मिळवण्याचा व्यवहार करणारे सर्वथा दंडनीय समजले गेले पाहिजत.

—ब्रह्मविद्या प्रकरण ( श्रेष्ठ देव )

२१५ **भाग्य** प्राप्त करणे असेल, धन, ऐश्वर्याची वृद्धि करणे असेल, अथवा प्रभुत्व संपादन करणे असेल, तर या सर्वांसाठी पुरुषार्थ करण्यास समर्थ अशा धारणात्मक बुद्धिची आवश्यकता आहे. **—ब्रह्मविद्या प्रकरण ( प्रातःकाळची प्रार्थना )**

२१६ **आपणा** सर्वांच्या हृदयात आत्मज्योत प्रज्वलित आहे. सर्व प्रकारच्या उन्नतिसाठी तीच महान् सहाय्यक शक्ति आहे. जर तिला आपण साध्य करू शकला तर तीच निःसंदेह आपली सर्वप्रकारची उन्नति साध्य करील. सर्व जगाचा विकास अंतरंगातून होत आहे, बाह्यतः नव्हे. आपल्या उन्नतीसही हाच नियम लागू पडतो.
**ब्रह्मविद्या प्रकरण ( अंतर्यामी ईश्वरास नमन )**

२१७ **वेद** समजावून सांगतात की ज्याप्रमाणे एकेक अवयव हातपाय आदि शरीराशी जोडलेला आहे, तद्वत् एक शरीर–व्यक्ति समाजाशी आणि समाज जगाशी जोडलेला आहे. ' व्यक्ति, समाज आणि जग ' हे भिन्न होऊ शकत नाहीत.
**—ब्रह्मविद्या प्रकरण ( केनसूक्ताचा विचार )**

२१८ **ज्याच्याजवळ** ज्ञान असते तो स्वस्थानापासून कधीच भ्रष्ट होत नाही. हे व्यक्तिविषयी जितके सत्य आहे तितकेच समाज आणि राष्ट्राच्या बाबतीतसुद्धा आहे; म्हणजे ज्ञानामुळे एका व्यक्तिमध्ये एवढे सामर्थ्य एकवटते की ती व्यक्ति स्वतःच्या उच्च स्थानापासून खाली पतन पावत नाही; त्याचप्रमाणे ज्या समाजात अथवा राष्ट्रात भरपूर ज्ञान असते त्या समाजाची किंवा राष्ट्राची अवनति कधीच होत नाही. ज्ञानामुळे व्यक्तीची इन्द्रिये त्याप्रमाणेच राष्ट्राची अंगे उत्तम अवस्थेत राहतात. प्रजेची उन्नति होते, तिच्यात दुःख दूर करण्याचे सामर्थ्य येते, आणि ज्ञानाच्या उच्चस्थानावरून ती कधी पतन पावत नाही.
**—ब्रह्मविद्या प्रकरण ( केनसूक्ताचा विचार )**

२१९ **शिक्षणाची** व्यवस्था अशी असली पाहिजे की ज्यामुळे विद्यार्थ्यांची विचारशक्ति वाढेल, आणि त्याबरोबरच हृदयातील भक्ति पण वाढावी. मस्तक आणि हृदय याना एका मार्गावर आणून त्यास एकत्रित चालविण्याचा स्पष्ट उपदेश.
**—ब्रह्मविद्या प्रकरण ( केनसूक्ताचा विचार )**

२२० **जगातील** दुःख पाहून मनुष्यानी निराश होऊ नये, धर्मानुष्ठान करीत पुढे सरावे. ते अनुष्ठान परिपूर्ण होईल तेव्हा पापांचा नाश होऊन अमृतपुत्र त्या परमपित्याच्या वैभवाने परिपूर्ण होऊन जाईल. अनुष्ठानाची तीव्रता अथवा निर्दोषता या कारणानी अवधि थोडा लागेल अथवा जास्त लागेल, ही गोष्ट प्रत्येक उपासकाच्या स्वतःवर अवलंबून आहे. **—ब्रह्मविद्या प्रकरण ( आत्मज्योतीचा मार्ग )**

२२१ **आपले** शरीर केवळ आपणासाठी नाही परंतु ते सर्व विश्वाच्या चांगल्यासाठी आहे, म्हणून ते विश्वासाठी समर्पण केले पाहिजे. मी सर्व जगाचा एक अवयव आहे. अवयवाची पूर्णता अवयवीसाठी समर्पित होण्यात आहे. ज्याप्रमाणे शरीराच्या अवयवाची पूर्णता शरीराच्या कल्याणकार्यासाठी समर्पित होण्याने होऊ शकते, त्याच-

प्रमाचे एक मनुष्याची पूर्णता त्याने समष्टीसाठी आत्मार्पण करण्याने होते.

**—ब्रह्मविद्या प्रकरण ( आत्मज्योतीचा मार्ग )**

२२२ **जनतेचे** रक्षण आणि धारण केल्यावाचून म्हणजे जनतेच्या उद्धाराच्या प्रयत्नात आत्मसमर्पण केल्याशिवाय स्वतःच्या अदम्य आत्मशक्तीचा विकास होत नाही आणि आत्मविकासाची अंतीम भूमिकासुद्धा प्राप्त होत नाही.

**—ब्रह्मविद्या प्रकरण ( आत्मोन्नति विद्या )**

२२३ **मनुष्याने** स्वतःच आपण अमर जीवनशक्तीनी परिपूर्ण आहे असा अनुभव करावा. स्वतःच्या जीवनाच्या सार्थकतेसाठी प्रशस्त कार्ये करावी. सत्यपालनाने स्वतःच्या आत्मिकशक्तीस अदम्य करावे. जनतेचा रक्षक आणि आधार होऊन स्वतःच्या सर्व अवस्था स्वतःचे आधीन ठेवाव्यात.

**—ब्रह्मविद्या प्रकरण ( आत्मोन्नति विद्या )**

२२४ **स्वतःच्या** उन्नतीसाठी साधन प्राप्त करणे हे तर प्रत्येकास जरूरीचे आहे; परंतु त्यासाठी स्वतःच्या श्रेणीतील इतरापेक्षा पुढे जाण्याचे ध्येय लक्षात ठेवणे योग्य आहे. प्रथम श्रेणीतील मनुष्याने प्रथम ( अथवा दशम ) श्रेणीतील इतरांच्या पुढे जाण्याची महत्त्वाकांक्षा जरूर बाळगावी; परंतु त्याचवेळी दहाव्या श्रेणीच्या पुढे जाण्याच्या स्वतःच्या विचारामुळे प्रथम श्रेणीची कर्तव्ये विसरू नयेत. प्रायः असंभव ध्येय समोर ठेवून लोक स्वकर्तव्यापासून वंचित राहतात, असे कोणी न करावे. साध्य कोणतेही असो, त्याचा विचार न करता, त्या त्या वेळी ज्या श्रेणीत तुम्ही आहात त्या श्रेणीतच स्थिर होऊन त्यासमयी तुमची जी कर्तव्ये असतील ती दक्षतेने पार पाडा. याप्रकारे वर्तन केल्याने सर्वांची यथायोग्य उन्नति होत राहील आणि यथासमय सर्वच उन्नतीच्या परम सोपानावर जाऊन पोहोचतील.

**—ब्रह्मविद्या प्रकरण ( आत्म्याचे गुण )**

२२५ **यजुर्वेदात** शिवसंकल्पसूक्त आहे. त्याच्या प्रत्येक मंत्राच्या शेवटी **' तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु । '** असे सांगितले आहे; कारण हे आहे की मनच मनुष्याच्या बंधनाला वा मोक्षाला कारणीभूत होते. **—वेदांचे तत्त्वज्ञान**

२२६ **राष्ट्रनिर्मितीत** सुशिक्षणाचे महत्त्व फारच आहे. अतिप्राचीनकालापासून सुशिक्षणाबद्दल भारताची प्रसिद्धि आहे. मनूने म्हटले आहे की, **' एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः । स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥ '**

**—राष्ट्रीय शिक्षणाचे सुपरिणाम**

२२७ **इतिहासातल्या** व्यक्ति निघून गेल्या तरी त्यांची स्मृति कायम राहते व तीच मार्गदर्शन करते. ते मार्गदर्शन मानवाच्या उद्धारासाठी आवश्यक असते. भक्ति-रस मनुष्याच्या अंतःकरणाला पवित्र करीत असतो, तर इतिहासाचे स्मृतिशेष मनुष्या-साठी आचरणविषयक खरे मार्गदर्शन करीत असतात. **—रामचरितमानस**

*

२२८ वेदमंत्रामध्ये जीवित–संस्कृतीचे तत्त्वज्ञान आहे आणि ते केवळ कंठगत करण्यापुरतेच मर्यादित राहील तर ते ठीक नाही. वास्तविक या वैदिक तत्त्वज्ञानाच्या सुदृढ पायावर आपली समाजरचना आणि राष्ट्रनिर्मितीचे विशाल मंदिर उभे राहील, त्याचप्रमाणे वैदिक तत्त्वज्ञानाच्या आधारावर सामाजिक पुनर्रचना होईल तर आधुनिक युगाच्या अनेक जटिल समस्या सहजासहजी सुटू शकतील.

—वैदिक तत्त्वज्ञान

२२९ विष्णुसहस्रनामात विष्णुचे वर्णन 'अनिरुद्धोऽप्रतिरथः प्रद्युम्नोऽमितविक्रमः।' या शब्दात केले आहे. विष्णुची गति प्रतिबंधरहित आहे, त्याचेसारखा वीर कोणी नाही, तो तेजस्वी व अपरिमित पराक्रमाचा आहे. हे गुण सर्व कर्तव्यशील माणसात व राजात असणे आवश्यक आहे. —भारतीय संस्कृतीचा आदर्श पुरुष

ø ø ø

विद्याविलास–मनसो धृतशीलशिक्षाः ।
सत्यव्रता रहितमानमलापहाराः ॥
संसारदुःख–दलनेन सुभूषिता ये ।
धन्या नरा विहितकर्मपरोपकाराः ॥

पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकर या वेदमूर्तींचे जीवनविषयक एक स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे. ते पंडितजींच्याच शब्दात समजावे, म्हणून त्यांच्या निरनिराळ्या ग्रंथातून आलेल्या प्राज्ञोक्तिंना महत्व आहे. सेल्वीन लॉइड म्हणतो त्याप्रमाणे शेवटी जीवनतत्त्वज्ञानातील कल्पनासंघर्षात यश कोणते म्हणून काही ठरवावयाचे असेल तर त्या सात्त्विक संघर्षात सरळ हृदयाच्या माणसांना भिण्यासारखे काही नाही व ती कशालाच भीत नसतात. वरील श्लोकात सूचित केलेल्या वृत्तींची मूर्ति असलेल्या पंडितजींना समाजसन्मुख राहताना तसला विचार करण्याचेही कारण उरत नाही. म्हणून त्यांच्या प्राज्ञोक्ति नवीनांनी अभ्यासाव्या व स्वतःचे जीवनतत्त्वज्ञान ठरवावे व त्याबरोबरच आपल्या लेखन–वाचन–भाषणात जरूर तेथे त्यांचा उपयोग करावा, यासाठी त्या सादर केल्या आहेत.

ø ø ø

भाग : २ :

# वेदव्यास पंडितजी सातवळेकर
# विविध-दर्शन

जीवनपुष्प उमलते व विकासते. ते विकसित जीवनपुष्प 'श्रीशाय जनतात्मने' समर्पण करून आपला वंश, समाज व राष्ट्र धन्य करण्याचे कर्तृत्व साधून अमर यशःकाय ज्यांना लाभला, त्यांचा आदर्शच उगवत्या, उमलत्या व उफाळत्या पिढीपुढे ठेवून त्यांना नव्या कर्तृत्वाची स्फूर्ति द्यावयाची असते. तशी स्फूर्ति होण्यास कर्तृत्ववन्तांच्या जीवनौघाने भावोत्कटता निर्माण होते; त्याचबरोबर बुद्धि-वादी वा चिकित्सक होतकरूंसाठी कर्तृत्ववन्तांच्या जीवना-तील पैलूंचे विश्लेषण होऊन अंगप्रत्यंगाच्या शक्तिसौंदर्य-संपन्नतेचे दर्शन झाल्यास व त्या सर्वांच्या एकजिनसी मिळणी-तील सहकार-समन्वय प्रत्ययास आल्यास, नवीनांना जाणी-वेने स्फूर्ति घेता येते. पूज्य पंडितजींच्या जीवनौघाचे निरीक्षण येथवर केल्यावर आता त्यांच्या अंगप्रत्यंगाचे आविष्कार आणि समरस सम्मेलन समजून घेणे इष्टच ठरेल.

★

: २३ :

# पंडितजींचे व्यक्तित्व व व्यक्तिमत्व

तद्दर्शनाल्हादविवृद्धसंभ्रमः ।
प्रेम्णोर्ध्वरोमाऽश्रुकलाकुलेक्षणः ॥ ( भागवत १०।३८।२६ )

**पंडितजी** श्रीपाद दामोदर सातवळेकर याचे शतवार्षिक चरित्राची व अनुषंगिक चारित्र्याची ओळख करून घेतल्यावर त्यांचे व्यक्तित्व व व्यक्तिमत्व समजावून घेण्याकडे जिज्ञासुवृत्ति वळतेच वळते. स्वतः पंडितजीनी केलेल्या आत्मनिरीक्षणाने जे आपणाला समजते ते मनोरंजक तसे प्रबोधकही आहे. पंडितजी सांगतात—

'माझ्या लहानपणी कानात वा हातात काही सोन्याचे घातलेले नाही. कानात काहीं लहानपणी घातले ते काही कारणाने काढून टाकावे लागले. सातव्या वर्षी माझ्या अंगावर एकच दिवस १५ तोळ्याचे म्हणजे त्यावेळच्या ३०० रु. चे काही दागिने घातले होते. वीस रु. तोळा सोने त्यावेळी होते. हातात कडी, गळ्यात पुतळ्याची माळ असे काही दागिने घातले होते. सकाळी घातले, ते दिवसभर अंगावर होते व संध्याकाळी ते काढून नेले!'

'वडील कोणा व्यापाऱ्यास जामीन राहिले होते. त्यात यांची काही फसवणूक झाली म्हणून हे दागिने संध्याकाळी विकून, हे जामीन म्हणून त्यास ३०० रु. भरावे लागले. ही बोलणी झालेली मी ऐकली असल्याकारणाने ती मला स्मरत आहेत. यावेळी १२ तास माझ्या शरीरास सोन्याचा स्पर्श झाला होता. त्यानंतर विवाहाच्या वेळी सासरची आंगठी बोटात घातली, ती थोडी ढिली असल्याने रात्री जेवणानंतर हात धुवावयास झाडाच्या मुळावर गेलो, तेथे ती रात्रीच्या वेळी पडली. ती माझ्या लक्ष्यात आली नाही. मला यावेळी झोप डोळ्यात येत

होती, मध्यरात्र झाली होती, दररोज आंगठी घालण्याची संवय नसल्याने व ती ढिली असल्यामुळे ती केव्हा हरवली ते माझ्या ध्यानीही आले नाही. कोकणात रात्रीच्या वेळी सुद्धा झाडाच्या आळ्यामध्ये जाऊन तेथे हात धुतात. अशा रीतीने लग्नातील आंगठी लग्नातच गेली. ती घरी आल्यावर 'गेली' हे माझ्या ध्यानी आले. यावेळी ६ तास सोने माझ्या शरीराला लागले होते.'

'यानंतर सांगलीला गजाननमिलचे मालक विष्णुपंत वेलणकर यानी आपली तुला केली, तेव्हा मला बोलावून माझ्या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी माझा सन्मान केला. त्यावेळी त्यांनीं रोख १५० रु. दक्षिणा व एक सुवर्णमुद्रिका मला दिली. ती मी घरी डबीत ठेवलेली आहे.'

'याशिवाय माझ्या शरीराला सुवर्णस्पर्श झाला असल्याचे मला स्मरत नाही. मुंबईस स्कूल ऑफ् आर्टमध्ये मि. ग्रीनवुड प्रिन्सिपॉलच्या आग्रहामुळे मी व माझे मित्र श्री तासकर अशी दोघानी एकाच वेळी शिक्षकाची नोकरी पतकरली. माझ्या पहिल्या पगाराची मी वैदिक ग्रंथाची खरेदी केली व माझे मित्र श्री तासकर यानी पहिल्या पगाराची 'लाभाची आंगठी' करून हातात घातली.'

'शरीरावर सोने धारण करावे अथवा मूल्यवान् वस्त्रे वापरावी असे मला कधीही वाटले नाही. साधी खादीची वस्त्रे वापरण्यात मला आनंद वाटत असतो.'

'मी पंडित म्हणून मला औंधच्या राजेसाहेबानी एक शाल दिली व दुसरी इचलकरंजीच्या राजेसाहेबानी माझा सत्कार करून दिली. या दोनही शाली शंभर शंभर रु. किंमतीच्या होत्या व याबरोबर प्रत्येकाकडून ३०० रु. ची दक्षिणाही मिळाली होती. त्यानंतर ग्वाल्हेरच्या श्री माधवमहाराजानी गणेशोत्सवात बोलावून ५०० रु. दक्षिणा व ३०० रु. किंमतीची उत्तम जरीची शाल दिली होती. ही महावस्त्रे अशा रीतीने माझ्याजवळ गेली ४० वर्षे आहेत. ग्वाल्हेरची शाल इतकी किंमतीची असल्याने वापरावयासही थोडा संकोचच वाटतो.'

लहानपणापासून पंडितजीना सोनबा म्हणत. पण त्याचा व सोन्याचा संपर्क नाममात्रच झाला, हा एक योगायोग मानला किंवा— **'दैवानुसारच घडेल सुवर्णयोग'** असे धरून चालले तरी वस्त्रभूषण–लेण्यानी नटण्यापेक्षा स्वताःच्या गुणसंपदेने समाजजीवनाला भूषविण्याकडे पंडितजींचा कल आहे, हेच यावरून स्पष्ट होते.

स्वताःच्या गुणापैकी वक्तृत्व हे लेखणीप्रमाणे पंडितजीनी समाजाच्या सेवेकारणी लावले. त्यासंबंधी ते सांगतात की—

'मला आमच्या जन्माच्या कोलगावात १६ व्या वर्षीं सत्यनारायणाची कथा सांगण्याचा पहिला प्रसंग आला. सार्वजनिक वक्तृत्व करण्याचा हा पहिला प्रसंग! यावेळी माझे संस्कृत चांगले शास्त्रीय पद्धतीने झालेले होते. सत्यनारायणकथा

ही मी वाचून समजू शकत होतो. जनसमुदाय खेडवळ सुमारे शे–दीडशेच होता. असेल ! पण कथा वाचावयास बसून फार तर ५।७ मिनिटे झाली असतील, मला श्रोत्यांचे भय वाटू लागले. पहिला अध्याय होईपर्यंत घामाच्या धारा लागल्या. मी उपरणे पांघरून बसलो होतो. पुढे चौरंगावर पोथी ठेवलेली होती. श्लोक वाचून अर्थ सांगावयाचा, हे काम मुळीच कठीण नव्हते. पण मला भीतीने घेरले, शरीराला कंप सुटला. माझे डोके माडाइतके उंची वर आहे. असे वाटले ! तोंडा-तून कथा सुसंगतपणाने निघत होती, याचे कारण इतकेच की समोर श्लोक होते. शेवटी अतिघामामुळे तोंडाला कोरड पडली. पण कशीबशी कथा संपवली. श्रोते खेड्यातील असल्याने कोणालाही माझ्या भीतीची कल्पना झाली नसावी ! पण मला मात्र हा प्रसंग चांगलाच स्मरणात राहिला आहे. पुढे १५।२० कथा वाच-ल्यानंतर मग भीति कमी झाली.

' त्यानंतर व्याख्याने लिहून सभेमध्ये वाचलीं व त्यानंतर टाचणे जवळ ठेवून व्याख्यान देण्याची संवय झाली. मी बहुधा कधीही पूर्वतयारी केल्याशिवाय बोलत नाही. बहुधा वेळ असला तर सर्व व्याख्यान लिहूनच काढतो. नंतर त्याची टाचणे करतो व ती मी जवळ ठेवतो. श्रोते विशेष ज्ञाते असले तर टिपणे मी टेबलावर समोर ठेवतो व त्याकडे लक्ष देऊन बोलतो. त्यामुळे अप्रासंगिक भाषण होत नाही. '

' मुळीच विचार न करता एकदम हव्या त्या विषयावर मला बोलता येत नाही. ज्याप्रमाणे पट्टीचे वक्ते असतात ते एकदम उभे राहिले तरी फड मारून नेतात, तसे वक्तृत्व मला करतां येत नाही. '

' मी प्रथम शास्त्रवचने काढतो. नंतर पूर्वापर मुद्यांची जोडणी करतो. नंतर व्याख्यान लिहून काढतो. त्यानंतर टाचणे करतो. यामुळे तीन वेळा विचार होतो व व्याख्यानाच्या वेळी ठरविल्याप्रमाणेच मला बोलता येते. मी बहुधा एका तासा-पेक्षा अधिक बोलत नाही व तेवढ्यांत करावयाचे ते प्रतिपादन करतो. मला कोणत्याही विषयावर हवे तितके बोलताच येत नाही. '

' ठरल्याप्रमाणेच बोलावयाचे असल्याने मला वेळ मिळता तर मी हे सिद्ध केले असते, असे म्हणण्याचा प्रसंगच माझ्यावर येत नाही. '

' आजपर्यंत मी दोन हजारावर तरी व्याख्याने दिली असतील. त्यापैकी अधिक व्याख्याने पंजाबमध्ये हिंदीत झालेली आहेत. '

' प्रथम जरी मला श्रोत्यांची भीति वाटली तरी २५।३० व्याख्यानानंतर ती दूर झाली व त्यानंतर मी दहा वीस हजार श्रोत्यांच्या सभामध्येही सहजासहजी बोलतात त्याप्रमाणे बोललो आहे. '

' मी स्वभावतःच पहिल्या प्रतीचा वक्ता होण्यास योग्य नाही. अभ्यासाने तयारी करून साधारण वक्त्यात समाविष्ट होणारा वक्ता मी आहे. '

*

'२५।३० वर्षापूर्वी व्याख्यानासाठी केलेली टाचणे अजून मजकडे आहेत व तीही आज मला उपयोगी पडू शकतात. 'मला हिंदी व मराठी या दोन भाषातच व्याख्याने देता येतात. संस्कृतमध्ये व्याख्याने देण्याची सवय २० ते २५ या वयात होती. यानंतर संस्कृत बोलावयाचे प्रसंग कमी होत गेले. आजही थोड्या परिश्रमानंतर संस्कृत भाषण चांगल्या रीतीने करता येईल.'

'हैदराबादेस असताना थिऑसफीमध्ये विष्णुपुराणावर इंग्रजीमध्ये भाषण करण्याचा प्रसंग आला. माझे भाषण थिऑसफीच्या सदस्याचे प्रेम असल्यामुळेच त्यांनी ऐकून घेतले. अर्थात् प्रयत्न करूनही ते मला साधले नाही. कारण इंग्रजी-भाषेवर प्रभुत्व नव्हते.'

तेव्हा हे स्पष्ट आहे की **'मुखमस्तीति वक्तव्यम्'** असे पंडितजीनी कधीच केले नाही. उलट नेमक्या वेळात आपणास लोकाना सांगावयाचे ते नेमकेपणाने सांगण्याची पंडितजीनी दक्षता घेतली. स्वताच्या आणि श्रोत्याच्या 'कधीच परत न येणारा आयुष्याचा वेळ' किती घ्यावयाचा याचा हिशोब सावकारी कारकुनाच्या काटेतोलपणानेच केला पाहिजे. पंडितजीच्या सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभकाळात, **'नामूलं लिख्यते वा उच्यते किंचित्।'** या कडक शिस्तीने भारताच्या राजकारणात गोपाळ कृष्ण गोखले आपली नामदारी व लोकशिक्षण चालवीत. तोच कित्ता पंडितजीनी उचलला, असे जरी म्हणता आले नाही तरी त्यानी तो शिरस्ता खास खास पाळला, एवढे खरे! लोकशिक्षण साधताना वेळापत्रकासुद्धा बिनचूक चालण्याची जी स्वयंशिस्त पाळीत, तीच त्यांच्या खासगत व वैयक्तिक जीवनात सर्वत्र आढळून येते. त्या शिस्तीच्या आणि धीमेपणाच्या जोरावरच अनेक प्रसंगातून पंडितजी निभावले ते त्यांच्या **'अभयं सत्वसंशुद्धिः ज्ञानयोगव्यवस्थितिः'** च्या संमिलित सामर्थ्यानेच. स्वता पंडितजीच सांगतात की——

'आमची जोशीपणाची वृत्ति कोलगाव व कुणकेरी या गावात आहे. कुणकेरी दोन–तीन मैल दूर असून मध्ये मोठा थोरला डोंगर असून तेथे वाघही असतात. या कुणकेरी गांवात पुराण सांगावयास चार महिने चातुर्मास जावे लागे. मी २५ वर्षाचा असताना माझ्या १२ वर्षाच्या भावाला बरोबर घेऊन संध्याकाळचा तेथे जात असे. माझ्याने एकटयाने जाववले नसते. बरोबर लहान भाऊ असला तर तेवढी सोवत पुरी होते. या अनुभवामुळे अंगात किंचितसे धैर्य आलेले होते. पण अंधारातून एकटे जाण्याचे धैर्य माझ्या अंगी कधीही नव्हते.

'कोलगांवाहून एके दिवशी पहाटे निघून वेंगूर्ल्यास जावयाचे होते. १७ मैलाचा प्रवास होता. तो ४ वाजता निघून ९ वाजेपर्यंत करावयाचा होता. त्यावेळी गजराची घड्याळे नव्हती. वडिलानी ४ वाजले असे समजून १२॥ वाजताच उठवले. मी ४ वाजले असे समजून उठलो. शौचमुखमार्जन करून चालावयास

लागलो. आमच्या घरापासून रस्ता एक फर्लांग दूर आहे. मी रस्त्यावर पोचतो इतक्यात सावंतवाडीहून एक पुरुष व एक स्त्री तेथेच येऊन पोचली. पुरुषाने विचारले– तुम्ही कोठे जाणार? मी म्हटले वेंगुर्ल्यास. तेव्हा तो म्हणाला–हिला आकेरीस सोडा; मध्ये पर्वतात या स्त्रीला कोणी तरी सोबत हवी. असे म्हणून तो सावंतवाडीस परतला. रस्त्याच्या एकाबाजूने मी व दुसऱ्या बाजूने ती चालू लागलो. मध्ये भयंकर पर्वत लागला. अंधार होताच. पुढे ती स्त्री आकेरीस राहिली. मी पुढे चालु लागलो. सकाळी ५ वाजता वेंगूर्ल्यास पोचलो. १२॥ ते ५ पर्यंत रात्रीचा एकट्याने १७ मेलाचा प्रवास केला. पण भीति वाटली नव्हती.'

'मला अजूनही हे आश्चर्य वाटत आहे की इतक्या अपरात्री, बरोबर भयानक पर्वताच्या मार्गापुरतीच त्या स्त्रीची सोबत कशी मिळाली व तो पुरुष तरी अनोळखी पुरुषाबरोबर स्त्रीला सोडून कसा परत गेला!'

'औंधला असताना एकदा रात्री रहिमतपूर स्टेशनवरून १॥ वाजता एकटा निघून १४ मैल रातोरात चालून पहाटे ४॥ वाजता मी घरी औंधास पोचलो. रहिमतपूरच्या ओढ्यात त्यावेळी एक प्रेत जळत होते. मधल्या पठारावर भूत दिसते असे म्हणतात. मला मात्र काही दिसले नाही, की भीतिही वाटली नाही.'

'इतका अनुभव असताही माझी गणना धैर्यवान् पुरुषात होणार नाही, याची जाणीव मला आहे.'

**साहसे श्रीः प्रतिवसति।** या हिय्याने लोकमान्याचे मनापासून अनुयायी असलेले पंडितजी चालले नाहीत, याचे कारण त्याचे अंतरोत्थितप्रेरणाबल समरशौर्याने इतिहास रंगविण्यापेक्षा वैदिक ज्ञानाच्या तेजाने समाजजीवनाचे अग्निहोत्र सदैव धगधगित राखण्यासाठी लोकशिक्षणाच्या समिधा प्रज्वलित राखण्यासच, (राजकारणाच्या धकाधकीत गनिमीकाव्यास शोभेसे वागून) प्रेरक होते. म्हणूनच वेळप्रसंगी त्यानी नाकही मुठीत धरले. तेच सांगतात––

'हैदराबादेत असताना मी, केशवराव वकील, डॉ. अघोरनाथ चट्टोपाध्याय व तुळजापूरकर वकील यांना हद्दपारीची शिक्षा होण्याचा प्रसंग ओढवला होता. यावेळी हद्दपारी न पतकरता मी आधीच हैदराबाद सोडले व श्रद्धानंदाच्या गुरुकुलामध्ये जाऊन राहिलो. ही माघार मी घेतली याचे मुख्य कारण माझ्यामुळे इतर थोर तीन सज्जनाना त्रास होणार होता. श्री तुळजापूरकरही माझ्याप्रमाणेच हैदराबाद सोडून गेले. आम्ही सर्वांनी पूर्ण विचार करूनच यावेळची ही माघार मी घेतली होती.'

'दुसरी माघार पंजाबमधील हद्दपारीच्या वेळी घेतली. माझ्याबरोबर जे इतर तिघे पकडले जाणार होते, ते माझ्यापेक्षा फारच मोठे होते. मी फक्त आर्य-

समाजाचा एक प्रचारक पंडित म्हणून होतो. मी यावेळी पंजाबमध्ये चित्रकारीचे लाहोरमध्ये दुकान चालवीत होतो. आर्यसमाजाच्या उपदेशक पंडिताने असला धंदा करू नये असे मलाही वाटे व पुष्कळच माझ्या परिचिताना वाटत होते. यामुळे पंजाब सोडावे व दुसऱ्या कोठेतरी जावे अथवा लाहोरातच रहावे असे जवळ जवळ ठरले होते. पं. ठाकुरदत्त शर्मा अमृतधारी यानी मला घर देऊ केले होते व मी वेदानुवादाचे प्रकाशन करावे असे ठरल्यासारखे होते. मी पंजाबातच राहिलो असतो तर पकडला जाऊन हे वैदिक प्रकाशनाचे कार्य बंद पडले असते. हे कार्य बंद पडू नये असे मला मनापासून वाटत होते.'

'मला मनापासून वैदिकधर्मावर ग्रंथ लिहावे व ते प्रकाशित करण्याचे काम करावे असे वाटे. वैदिकधर्म उत्साह वाढविणारा धर्म आहे. सध्या हिंदु समाज बुद्धाच्या निराशावादी तत्त्वज्ञानाने ग्रासला आहे. हे याचे निराशेचे ग्रहण दूर केले पाहिजे. हे कार्य माझे आहे असे माझ्या मनाने घेतले होते. राजकीय नेतृत्व करण्याची हौस माझ्यामध्ये फार नव्हती. पण हे धर्मजागृतीचे कार्य करावे असे मनाला सारखे वाटत असे. यामुळे जेथे जेथे माझ्या धार्मिक जागृतीच्या कामात अडथळा होई, तेथे तेथे मी इतर कार्ये टाळून धर्मजागृतीचेच कार्य होईल असे करीत असे. पंजाबमधील माझी माघार याच केवळ एका उद्देशामुळे घेतली होती. तिसरी माघार औंधमध्ये घेतली व इंग्रजीमधील राजकीय कार्य बंद करून संस्थानापुरते कार्यक्षेत्र मी संकुचित केले. त्यातील मुख्य कारण धर्मजागृतीचे कार्य व्हावे हेच होते. दुसरे गौण कारण संस्थानातील कार्यास अधिक जोर यावा हे होते.'

'अशी तीन ठिकाणी मी माघार घेतली, ती मुख्यतः धर्मजागृति करता यावी या उद्देशाने होय.'

पंडितजीच्या अशा अंतरोत्थित प्रेरणाबलाच्या उद्रेकाचा विचार करता, विचारवंतापुढे त्याचे सम्यक् दर्शन उभे राहते. त्याचे सिंहावलोकन केले तर पंडितजीच्या व्यक्तित्वाचे व व्यक्तिमत्वाचे पैलू आणि त्याची चमक स्पष्ट होऊ लागतात. त्यांच्या साकल्याने पंडितजीची जी सगुणमूर्ति डोळ्यापुढे उभी राहते, तिचे रेखीव चित्रण भगवद्गीतेतील अठराव्या अध्यायाच्या ५१ ते ५३ या श्लोकानीच फक्त करता येईल.

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ।
शब्दादीन् विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ॥
विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥
अहंकारं, बलं, दर्पं, कामं, क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ॥

हे सर्व खरे. तरी पंडितजीच्या प्रथमदर्शनापासून सहवाससंवादोत्तर जनसामान्याना पंडितजी परिचित होत जातात, त्याचे शब्दचित्र काहीसे असे आढळेल--

जाड्यं धियो हरति, सिञ्चति वाचि सत्यम्
मानोन्नतिं दिशति, पापमपाकरोति ।
चेतः प्रसादयति, दिक्षु तनोति कीर्तिं
सत्संगतिः कथय किं न करोति पुंसाम् ॥

पारडी येथील आनंदाश्रमाच्या आवारात असलेले पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकर याचे निवासस्थान म्हणजे वेदमहर्षींचा आश्रम. स्वाध्यायमंडळाच्या कार्याने व कर्तबगारीने साजलेला आहे. चौफेर आंबराई, घरासमोर छोटीशी बाग, जवळच वेदमंदिर, अशा सर्व निर्मळ वातावरणात पंडितजीचे स्वास्थ्य तर राहतेच पण त्याना रोज भेटावयास जवळपासची वा लांबलांबची जी अनेक जिज्ञासु प्रतिष्ठित वा भाविक मंडळी येतात, त्याना घराबाहेरील झोपाळ्यावर बसलेल्या पंडितजीच्या सहवासाने, चर्चेने व माणुसपारखीने प्रारंभी दिलेल्या श्लोकातील सत्संगतिचा अनुभव मिळतो. समोर आलेली व्यक्ति वयाने वा अनुभवाने लहान, व्यासंगाने थिटी आणि आवाक्याने तोकडी असली तरी तिच्यातील सूक्ष्म गुणाचे आकलन पंडितजी बिनचूक करणार आणि तो गुण आकाराला व उन्नतीला यावा. म्हणून मार्गदर्शन करणार.

वेद म्हणजे ज्ञान. वैदिक वाङ्मयामुळे पंडितजीचे जीवनच वेदमय होऊन गेले आहे. आंब्यानी झाकलेली गर्द भूमि, निलगिरीची ऊंच वाढलेली झाडे, नाना पुष्पवल्लीतून वर डोकावणारे माड, हरतऱ्हेचा झाडोरा--अशा वनश्रीच्या टवटवीने प्रफुल्ल आश्रमाच्या फाटकातून आत जाताच, उजव्या हाताला आढळणारे भारतीय साधेपणाने विनटलेले वेदमंदिर व डाव्या हाताला प्रशस्त बंगलीसमोरील सागवानी खांबाची आगाशी, आणि या सर्वापेक्षाही पंडितजीचे आतिथ्य ! --अहो, पंडितजी औंधाहून १९४८ मध्ये या पारडीच्या विजनात आले, तर त्याच्या आतिथ्यशीलतेचा लाभ प्रथम भूदेवीलाच झाला. एकाद्या मजूरासारखे राबून त्यानी घरासमोरची बाग करवून घेतली ! सुरू, माड, गुलाब सर्व काही पंडितजीनी रुजविले व स्मशानाचे शांतिस्थान केले ! !

**विद्या विनयेन शोभते।** त्यामुळेच शहाण्याची राहणी साधीच साधी होते. जरूरीपुरती आसने, जरूरीपुरते कपडे, जरूरीपुरतीच साधनवस्तूची जुळणी पण ज्ञानभांडार मात्र विपुल. पंडितजींचा ग्रंथसंग्रह तत्त्वचिंतनाला पोषक व धर्मविचक्षणेला सहाय्यक अशा दुर्मिळ पुस्तकाचाच आढळला व तो बहुविध असला तर अस्वाभाविक काय ?

पंडितजीचे अक्षर डगळ, अतिशय नेटके, किंचित् तिरक्या लपेटीचे व जुन्या शुद्ध लेखननियमावलीच्या शिस्तीचे असे आहे. तसेच ते अंतर्बाह्य शुचिही आहे.

ऱ्हस्वदीर्घाचा विधिनिषेध, लिहिण्याच्या गडबडीत विचाराच्या भरधावेबरोबर लेखणी धावू शकत नसल्यामुळे, क्वचित् काटेकोरपणाने पाळला जात नसला तरी, अर्थाविर्भाव नेमकेपणाने होण्यास चुकत नाही. लिखावट ही व्यक्तित्वाची खुलावट असते. हे जर खरे असेल तर पंडितजी व्यवस्था व अनुशासन–आवडणारे गृहस्थ आहेत; समानान्तर ओळी लिहित असल्यामुळे ते विवेकशील, महत्त्वाकांक्षी पण कधीच निराश न होणारे आहेत; '**निर्बाद्यः प्रतिपन्नवस्तुषु**' हा त्यांचा दंडक; असेच अक्षरबोधक व्यक्तित्वशास्त्राचा परिचित म्हणू शकेल.

देवनागरी लिपीतील 'र' या वर्णासारखेच देश, काल व परिस्थिती यांचा आवाका घेऊन प्रत्येक सार्वजनिक कार्यकर्त्याने आपला व्याप व आटोप ठेवला पाहिजे, असे पंडितजीचे मत असावे. घर, पर्व, विप्र, राष्ट्र, चक्र, आर्द्र, ऱ्हस्व इत्यादि शब्दातून 'र' वर्ण जसा सहकार–समन्वयी व समावेशक आहे, तसाच आपले वैशिष्टच न सोडता, सर्वांशी समरस होणारा सार्वजनिक कार्यकर्ता हवा. पंडितजी अगदी तस्से आहेत. वृत्ति साधी, स्वभाव सौजन्यपूर्ण, चारित्र्य निर्मल, तिरस्कार दंभ–लौकिकाचा, त्यामुळे सहकार–समन्वयाने सर्वांशी ते वागू शकतात आणि तत्त्वाच्या बाबत जसे ते '**वज्रादपि कठोराणि**' हृदयस्पंदने करतात, तशीच '**मृदुनि कुसुमादपि**' व्यवहारात !

चहा, कॉफी, कोकोची सवय त्याना नाही. दूध व पोळीचे साधे सात्त्विक जेवण त्याचे असते. मिरची, मसाला याचा ते आहारांत पूर्वीपासूनच फार कमी उपयोग करतात. बारमहा थंड पाण्याने पहाटे स्नान करण्याची त्याची सवय वयाच्या पंचाऐंशीव्या वर्षापर्यंत कायम होती. त्या वयोमानापासून ते स्नानासाठी कोमट पाणी घेऊ लागले. स्नानानंतर त्यांचे सूर्यनमस्कार व्हावयाचे. उपासना, मंत्रजप झाल्यावर सकाळी आठ वाजता कार्यालयात जाऊन वेद, उपनिषदे यांच्या अनुवादाचे वा अन्य लेखन त्यांच्या हातून व्हावयाचे. बारा वाजतां जेवण झाल्यावर, झोप घ्यावयाची तर नाही; पण बिछान्यावर तासभर पडून पूर्ण विश्रांति घ्यावयाची. पुन्हा दीड वाजल्यापासून साडेपाचपर्यंत काम करीत रहावयाचे ! पंडितजींचे, हस्ताक्षर पहिल्यासारखेच सुवाच्य असून हस्तकंपासारखा वार्धक्यदोष नव्व्याण्णव्यावर्षी परिचिताना थोडासा जाणवू लागला. दुपारी चार वाजता दूध–केळे त्यानी घेतलेले असावयाचे. काम संपल्यावर थोडे फिरून आल्यानंतर संध्या झाल्यावर काही कौटुंबिक हितगुज, काही नातवंडाच्या मेळाव्यास संस्कारप्रदान व काही भेटभाऊशी सुखसंवाद व्हावयाचा. जेवण झाल्यावर रात्री नऊ वाजता पंडितजी विश्रांतीस जावयाचे.

हा नित्यक्रम खरा, पण पंच्चाण्णव वर्षे उलटेपर्यंत रोज आठ तास काम करणारे पंडितजी '**सुटला पितृदिशेचा वारा**' वयाच्या शहाण्णव्या वर्षापासून अनुभवू लागले. मनाच्या ताजेतवानेपणाबरोबर शरीर तग धरीनासे झाले. चालताना त्याना काठी

लागू लागली. संपूर्ण विश्रांति ते घेतील, तर ' काठीवाचूनि नेट ' व अवसान त्याना लाभेल. पण अखंड कर्मयोग हे व्रत आणि कोणतेही काम स्वतःच करण्याची संवय, त्यामुळे विश्रांतीचे पथ्य भिषग्वर्यांच्या अनुपानाप्रमाणे न जमणारे ! म्हणून ते सत्त्याण्णव्या वर्षापासून सकाळी आठ वाजता पेलाभर गाईचे दूध घेऊ लागले. दहा वाजता चार-पाच खारी बिस्किटे किंवा तितक्याच वेताचा अगोड सांजाही ! दुपारी बारा वाजता जेवताना पाऊण-एक पोळी व थोडी भाजी. दुपारी चार वाजता पुन्हा थोडे गाईचे दूध व रात्रौ आठच्या सुमारास अर्ध्या पोळीचे जेवण. पारडीच्या स्वाध्याय-मंडळाच्या आवारात फिरणे हा व्यायाम व 'भसरा' सारखा काही प्राणायाम. पंडितजी रात्रौ नऊ वाजता विश्रांतीला गेले म्हणजे पांच-सहा तास 'सुखे स्वस्थ निद्रा करून उठत.' पण अलिकडे त्याना घरातील मंडळीच पहाटे चार वाजता उठू देत नाहीत; म्हणून ते साडेपाच, सहाला उठतात. पंडितजीच्या सत्त्याण्णव्या वर्षापासून प्रवास व जाहीर व्याख्याने याना प्रकृतिसाठी जवळ जवळ पूर्ण-विराम घालण्यात आला आहे. जवळ जवळ एवढयाच करता म्हणावयाचे की स्वाध्यायमंडळाच्या वेदमंदिरात दर शनिवारी प्रार्थना व प्रवचन पंडितजी करतात.

आयुष्याची शंभरी हे पंडितजी दीर्घायुष्य मानीतच नाहीत. तीन-चार भाऊ अल्पायुषी ठरल्यावर नवसाने झालेला दुबळा मुलगा म्हणजे श्रीपाद; अशी पंडितजीची एक वेळची अवस्था लक्ष्यात घेतली आणि जन्मकुडलीतील जातक सोळाव्या किंवा अठराव्या वर्षी मृत्युयोग दाखवित होते, हा प्रकार ध्यानात आला म्हणजे शंभरीला दीर्घायुष्य म्हटलेच पाहिजे. पण--

**आषोडशात् सप्ततिवर्षपर्यन्तं यौवनम् ।**

म्हणजे सोळाव्या वर्षापासून सत्तराव्या वर्षापर्यंत माणसाच्या तारुण्याची मर्यादा वात्स्यायनाने कामसूत्रात सांगितली आहे. ती जमेस धरून, वेदानी--

**पश्येम शरदः शतम्, जीवेम शरदः शतम्, प्रब्रवाम**
**शरदः शतम्, अदीनाः स्याम शरदः शतम् ।**

यासारख्या मंत्रातून संपूर्ण शंभरीच्या आयुर्मर्यादेची प्रार्थना जी सर्वत्र केली आहे, तिच्यातील '**शरदः शतम्**' चा अर्थ पंडितजीनी असा लावला आहे की, 'आठ वर्षेपर्यंत मनुष्याचे बालपण असते; चोवीस वर्षे विद्याध्ययन, छत्तीस वर्षे गृहस्थाश्रमी होऊन अठ्ठेचाळीस वर्षे वानप्रस्थ करावयाचे; म्हणजे एकूण एकशे सोळा वर्षे होतात; त्यापुढील आठ वर्षे वार्धक्याची; म्हणून किमान् एकशे पंचवीस वर्षे पूर्ण आयुष्य मानवास आहे. हे पूर्ण आयुष्य मिळवण्याची पंडितजीची उमेद आहे. या उमेदीची गुरुकिल्ली पंडितजीच्या भाषेत अशी आहे की- 'हे सर्व मनाच्या विचारावर अवलंबून आहे. वेद, उपनिषदे, गीता या ग्रंथातील विचारानी मला रक्षिले

आहे. हे ग्रंथ जर मी अभ्यासिले नसते तर माझे काय झाले असते, याची कल्पनाच करवत नाही ! '

उज्ज्वल, विद्वज्जनमान्य आणि तात्त्विक दृष्टया आदर्श जीवन असलेल्या देश-भक्ताने देशाच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संस्कृतिसंरक्षणाचे कार्य छातीचा कोट करून केले, त्याची दैनंदिनी वर वर्णिल्याप्रमाणे साधीसुधी आहे. साधी राहणी नि उच्च विचारसरणी आणि विचारासारखीच करणी याचे वास्तविक उदाहरण पंडितजी आहेत.

**शरीर, वाचा, मानस । पियाली कृतनिश्चयाचा कोश ।**
**एक मी ( देवा ) वाचूनि वास । न पाहती आन ॥**

आणि असे असूनहि—

**शतेषु जायते शूरः, सहस्रेषु च पण्डितः ।**
**वक्ता दशसहस्रेषु, दाता भवति वा न वा ॥**

या सुश्लोक–सुभाषितात सांगितलेल्या सर्व स्तरात पंडितजीना अग्रमानाचे स्थान आहे, हे त्यांच्या परिचितास पूर्णपणे ठाऊक आहे. एवढेच नव्हे तर पूर्ण प्रज्ञाशील मनुष्याची निरभ्र पवित्रता, त्याचप्रमाणे उदात शांतता त्यांच्या जीवनात प्रतिबिंबली आहे; युक्ताहार–विहारी, अल्पभोगसंतोषी, संयतेन्द्रिय, '**दुःखेषुष्वनुद्विग्नमना, सुखेषु विगतस्पृहः**' सुशील व परहितरत अशाप्रकारचे प्रशंसनीय असे पावनजीवन म्हणजेच वेददृष्ट तत्त्वज्ञानाचे दैनंदिन जीवनामध्ये अनुसरण पंडितजींच्या चरित्रात घडल्याचा प्रत्ययबोध निरीक्षकाला झाल्याशिवाय रहात नाही.

: २४ :

# शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।

भारत वा हिंदुस्थान हे गरीब आणि गरीबाचे राष्ट्र आहे. येथे मनगट आणि एकंदर शरीरयष्टी यांची पोलादी कांब करण्याची साधना अल्पमोली व बहुगुणीच हवी. हिंदुस्थानात सोन्याचा धूर निघत होता, त्यावेळीसुद्धा अनाठायी व अनुपयोगी खर्च न करण्यावर कटाक्ष ठेवणाऱ्या दूरदृष्टीने नमस्कारासारखा घरातल्या घरात बारा महिने अठरा काळ करता येईल असा बिगर–आर्थिक–खर्चाचा व्यायाम भारतात सुरू झाला. त्याचे ते स्थान अजून कोणी डळमळवू शकले नाही. नमस्काराबरोबरच प्राणायाम व आसने हे दुसरे आरोग्यरक्षणाचे उपाय आहेत. या अशा साधनेचा उपयोग स्वतः करून पंडितजी सातवळेकरानी आपली प्रकृति तर निरामय राखलीच; पण लोकाच्या मार्गदर्शनासाठी त्याबाबत त्यानी लेखनही करून ठेवले आहे. पंडितजी लिहितात की—

" शंभर सूर्यनमस्कार घालण्यास सहा किंवा सात मिनिटे लागतात. या तऱ्हेने बाराशे नमस्काराचा व्यायाम करण्यास दीड किंवा दोन तास लागतात. पण सर्वसाधारणपणे शंभर किंवा दोनशे सूर्यनमस्कार लहानपणी घालणे योग्य आहे. परंतु हा सुगम आणि बिनसायासाचा व्यायाम करण्याची प्रवृत्ति फारच थोड्या तरुणात आढळते. अशाच तऱ्हेने माझे पंचवीस वर्षापर्यंतचे आयुष्य दुबळेपणात व आजारात गेले. धर्माचरण म्हणून संध्या केल्यानंतर मी बारा नमस्कार घालीत असे.

" मुंबईहून मी दक्षिण हैदराबादला गेलो. तेथे देखील योगाची आसने, सूर्य-नमस्कार व प्राणायाम मी करीत असे. त्यामुळे माझे स्वास्थ्य सुधारत गेले. हैद-राबादेहून मी गुरुकुल कांगडी व लाहोर येथे गेलो, तरीही तेथे तो व्यायाम रोज

करीत असे आणि माझ्या शरीराचे वजन एकशे पंचेचाळीस पौंडापर्यंत तेथे चढून गेले.

" माझे सूर्यनमस्कारादि व्यायामाचे रोजचे प्रमाण असे आहे—

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वय | ५ | ते | २५ | पर्यंत | रोज | सूर्यनमस्कार | १२ | | |
| ,, | २६ | ,, | २७ | ,, | ,, | ,, | ५० | | |
| ,, | २८ | ,, | ३० | ,, | ,, | ,, | १०० | | |
| ,, | ३० | ,, | ४० | ,, | ,, | ,, | ५०० | आसने व प्राणायाम | |
| ,, | ४० | ,, | ४५ | ,, | ,, | ,, | ३००; | ,, | ,, |
| ,, | ४५ | ,, | ५० | ,, | ,, | ,, | १००; | ,, | ,, |
| ,, | ५० | ,, | ८० | ,, | ,, | ,, | ५०; | ,, | ,, |
| ,, | ८० | ,, | ८५ | ,, | ,, | ,, | २५ | प्राणायाम | १०० |
| ,, | ८५ | ,, | ९० | ,, | ,, | ,, | १२ | ,, | २०० |
| ,, | ९० | ,, | ९५ | ,, | ,, | ,, | १२ | ,, | २०० |

" वयाची अट्ठ्याण्णव वर्षे झाली. सकाळ–संध्याकाळ प्राणायामच फक्त दोनशे, रोज संध्येच्यानंतर करतो. सूर्यनमस्कार वा आसनाचा व्यायाम आता होत नाही. योगाची आसने, सूर्यनमस्कार आणि प्राणायाम करण्यापासून मला मोठाच फायदा झाला आहे. मी पंचवीसाव्या वर्षी टेकडीवर चढू शकत नव्हतो, पण पन्नासावे वर्षी टेकडीवर ( यमाईच्या औंध येथील ) धावत–पळत जात येत होतो.

" माझा अनुभव म्हणूनच जर काही सांगावयाचे असेल तर ते हे आहे की रोज सूर्यनमस्कार, आसने, प्राणायाम लोक नियमितपणे करतील तर ते आजारणार नाहीत. रोज अर्धा तास शारीरिक व्यायामासाठी देतील तर त्याना उत्तम स्वास्थ्याचा लाभ होऊ शकेल. त्याचबरोबर दीर्घायुष्यही लाभू शकेल. आपल्या जीवनात ज्या नियमाचे मी पालन केले, अनुभव घेतला व दुसऱ्याना अनुभव दिला ते नियम हे—

( १ ) सकाळी आठ वाजण्यापूर्वी अर्धातास सूर्यनमस्कार, आसने, त्याचप्रमाणे प्राणायाम ( विशेषेकरून उज्जायी प्राणायाम ) करणे.

( २ ) रोज सकाळी व संध्याकाळी शक्य असेल तेथपर्यंत संध्या–उपासना करणे. **'ऋषयो दीर्घसंध्यत्वात् दीर्घमायुः अवाप्नुयुः ।'** ( महाभारत )

( ३ ) सुखदुःख, हानि–लाभ, शीत–उष्ण आणि द्वन्द्वे सहन करण्याचा अभ्यास वाढविणे.

( ४ ) काळजी म्हणून कशाची करावयाची नाही. **( ठेविले अनंते तैसेचि रहावे । चित्ती असो द्यावे समाधान ॥ )**

( ५ ) आपला काळ उत्तम उद्योगात घालवावयाचा; जेवण मोजके ठेवावयाचे.

( ६ ) **' पश्येम शरदः शतम् । '** या भावनेचा मंत्र व विचार मनात सदा घोळवावयाचा.

( ७ ) दुःखमय जगत्, क्षणभंगुर जगत् इत्यादि कुविचाराना मनात जागा करावयाची नाही.

( ८ ) ईश्वर आपल्या अंतःकरणात व चहूबाजूस आहे असे मानणे, त्याप्रमाणे त्याला सत्–चित्–आनंदस्वरूप समजणे. आपल्या अंतःकरणात व बाहेर सारा सच्चिदानंद आहे, असे समजत राहणे.

( ९ ) आपल्या पाठीचा कणा सरळ राखणे. **' सम–काय–शिरोग्रीवम् '** होणे. याची अत्यंत आवश्यकता असते.

( १० ) आपल्या आयुष्यभर चालणारा आपण एक यज्ञ करीत राहिलो आहो, असा विचार मनात वागवून तसा एक महायज्ञ हे आपल्या जीवनाचे ध्येय ठेवणे. ( वैदिकधर्म आक्टोबर १९६५ ) '

आध्यात्मिक ज्ञानाचा वटवृक्ष अनेक शाखानी बहरलेला आहे. योगशास्त्र ही त्याच वटवृक्षाची एक भव्य नि नेत्रदीपक अशी शाखा आहे. स्वामी कुवलयानंद व विशेषतः वामनरावजी गुळवणी हे योगमार्गाचे महाराष्ट्रातील अध्वर्यु व अधिकारी पुरुष होत. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद हे भारतीयांचे लाडके योगी होते. पंडितजी सातवळेकरांचाही योगशास्त्राचा अभ्यास सखोल आहे. 'योगासने' संपादित करून पंडितजींनी आधुनिक शास्त्रीय युगातल्या मंडळींना उत्तम खाद्य पुरविले आहे. योगशास्त्राच्या प्रायोगिक व उपचारांच्या बाजूकडे लक्ष देता देता, आसनांच्या बिनचूकपणाने बारकाव्यांचे टिपण त्यानी साधले. त्यामुळे त्यांची ती टिपणे तज्ज्ञांच्या पसंतीस येऊन अधिकृत ग्रंथ म्हणून गणली गेली. शरीररचना, आंतर–अवयवांचे आरोग्य व कार्य, प्राणायामादि कृतींचे कायिक व मानसिक सुपरिणाम वगैरे सोप्या भाषेत पण शास्त्रीय पद्धतीने पंडितजींनी मांडले आहेत.

आरोग्यसंपादनास योगाभ्यासासारखा उपाय नाही. सामाजिक व राजकीय उलाढालीस योगाभ्यासानेच मनःस्वास्थ्य उत्तम लाभेल असे स्वामी कुवलयानंदाप्रमाणेच पंडितजींचे मत असावे. संस्कृतिनिष्ठ जीवनशास्त्र हे मनाच्या उदात्तीकरणाचे अमोघ साधन आहे. जीवनशास्त्राने परमसत्याचा साक्षात्कार अपेक्षित आहे.

पण ते केवळ प्रयोगशरण नाही. समाधि साधून जो परमसत्य अनुभवितो त्याच्या अनुभूतीची बाह्य चिन्हे अवगत करून घेण्यासाठी काही कसोटचा लावून पाहणे निश्चितपणे शक्य आहे. श्वसन, हृदयस्पंद, त्वरा, मेंदूचे वर्तन यावाबतीत होणारे फरक खात्रीने टिपून घेता येतात. यासाठी, योगसाधनेत प्रगति केलेली माणसेच तज्ज्ञ होऊ शकतील. तथापि आत्मज्ञेय गोष्टींचा अभ्यास परज्ञेय पद्धतीनी चर्मचक्षूंच्या आटोक्यात आणण्याचा प्रयत्न सहजसाध्य नव्हे. पूर्वजन्मीच्या संस्कारांचा अभ्यास करणेसाठीही उपाय शोधून काढणे अगत्याचे आहे. कारण शास्त्रप्रगति परज्ञेय प्रयोगानीच सिद्ध होते.

प्रो. हाल्डेन व लिड्हार्ड यांची श्वसनविषमक विधाने प्राणायामात प्रयोगशरण करण्याचा प्रयत्न करणे विफल असल्याचेच जाणकाराना आढळून आले आहे. हृदयाचे स्पंदन चालू असते तेव्हा त्याच्या मधून विजेच्या ऊर्जांचे तरंग निघत असतात. विजेचे ऊर्ज व्होल्टाच्या सहस्रांश इतके असले तरी उपकरणाने मोजता येते. ऊर्ज–तरंग उसळत असताना त्यांचा आलेख निघतो. मेंदूतही ऊर्जतरंग उसळत असतात, त्यांचा आलेख काढणारी उपकरणे आता पाश्चात्यानी जगास उपलब्ध करून दिली आहेत. ती व्होल्टाचा दशलक्षांशही नोंदतात. त्यांचा उपयोग करून धारणा, ध्यान, समाधि यांच्याविषयी परज्ञेय प्रमाणे मिळू शकतील. पण त्यासाठी सेवायोगी होण्याच्या निश्चयाचा योगाभ्यासी हवा, असा पंडितजींचा कटाक्ष आहे.

योग साधू इच्छिणाराला भक्ति, कर्म व ज्ञान या सर्वांची आवश्यकता असते. त्यांच्या जोरावरच अष्टांग योगात मनःप्राण–निरोधन होऊन जीव आपल्या मूळ स्वरूपाकडे सन्मुख, निदान उन्मुख होतो आणि आपण जगच्चालक शक्तीचे प्रतिबिंब आहोत, ही संविदा ( जाणीव ) निर्माण होत जाते व शेवटी तो **'ब्रह्ममयो भवति।'** श्री टेंभे स्वामी यांचे ही मत पंडितजींच्या त्या विचार–धारणेस उचलूनच धरणारे आहे. योगाने कुंडलिनी जागृत व्हावी लागते. त्या कुंडलिनीचे ब्रह्मस्वरूप आणि साधकाचे मानसिक व शारीरिक रूपान्तर वगैरे गोष्टी **' प्रत्ययाचे बोलणे। प्रत्ययेचि पहावे ॥ '** अशा स्वरूपाच्या असल्या तरी योगसाधनेतील काही प्रक्रियानी सामान्य माणसाची प्रकृति, ' लोखंडाची कांब होण्यासारखी ' घडत जाते व दीर्घायुष्याची निकोप प्राप्ति साधते, हा स्वतः पंडितजींचा आणि अनेकांचा स्वानुभव आहेच आहे.

योगसाधना म्हटली की मुख्यतः पतंजलीच्या योगसूत्रातीलच समजण्यात येते. पातंजल योगात शुद्ध राजयोगाचीच प्रणाली असून त्यातील मर्यादित उपायानी क्रमशः चित्त शांत होऊन समाधि–स्थितीत जाता येते. **' दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः । '** अशा मनुष्यालाच **' समाधिस्थ '** म्हणतात. त्यापासून ऐहिक व चिरंतन असे द्विविध फायदे होतात. जीवाच्या ठिकाणी ज्ञानाचा आणि सामर्थ्याचा

विशेष प्रकारचा विकास होणे, हा ऐहिक फायदा व भगवंताशी ऐक्य हा चिरंतन फायदा; गीतोक्त योग हा पातंजल योगाहून निराळा असून तो उदार, बहुमुखी व सर्वसमावेशक असा आहे. राजयोग हे गीतायोगाचे अगदी सामान्य अंग आहे. कर्म कशाप्रकारे करावे, यासंबंधी काही सामान्य नियम पाळून सर्व आधाराचे रूपान्तर करणे, आधाराचे प्रत्येक अंग प्राचीन संस्कारापासून मुक्त करून अभिनव अशा दिव्य धर्माने युक्त करणे व अपरा प्रकृतीचा त्याग करून परा प्रकृतीत प्रतिष्ठित होणे, हे गीतोक्त योगाचे ध्येय आहे; अर्थात् पातंजल योगातील वर्णित यौगिक स्थितीहून गीतोक्त समाधि स्वतंत्र आहे. पतंजलीच्या मते चित्तशुद्धीसाठी व एकाग्रतेच्या प्राप्तीसाठी प्राथमिक स्थितीतच कर्माची आवश्यकता; पण गीता ही कर्मालाच योगाचे विशेष लक्षण असे समजते. कर्म हा फक्त योगाचा उपक्रम असे पतंजलि म्हणतात; तर गीतेच्या मते कर्म हाच योगाचा चिरस्थायी पाया. राजयोगानुसार उद्देश सिद्ध झाल्यानंतर कर्माचा वस्तुतः त्यागच होतो. म्हणजे उपनिषदांच्या वेदान्तिक समन्वयात मुख्यत: आंतरिक परिवर्तन करून आत्मदर्शन करण्याची जी साधना तोच गीतेचा योग होय. ज्ञानाने दृश्य होणाऱ्या सत्याचे साधन करणे याचेच नाव योग.

पंडितजी सातवळेकरानी गीतेचे मत मान्य करूनही योगसाधनांचाही, विशेषतः योगासनांचा पुरस्कार व आचार केला आणि करण्यास उपदेशिले. आपल्याकडून अंतर्बाह्य अशा ज्या ज्या क्रिया घडतात त्या सर्व निःस्वार्थबुद्धीने जनताजनार्दनाला अर्पण करणे हा कर्मफळ–त्याग–योग साधावयास जी मनाची ठेवण लागते, तिच्यासाठी शरीरही तसेच निकोप असावे लागते. '**शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।**' असल्याकारणाने, पंडितजींनी वेदगीतांच्या आधाराने जसा कर्मफलत्याग–योगाचा ठसा जनमनावर उमटविला, तशीच सेवा "योगासने" संपादून पंडितजींनी केली आहे. आपल्या योगासनांच्या संपादनाने आधुनिक शास्त्रीय युगातल्या मंडळीना उत्तम बौद्धिक खाद्य पुरविले असून, योगशास्त्राच्या प्रायोगिक व उपचारांच्या बाजूकडे लक्ष देता देता पंडितजींनी आसनांच्या बिनचूकपणाचे बारकावे टिपले आहेत. त्यामुळे त्यांची योगासने तज्ज्ञांच्या पसंतीस येऊन अधिकृत ग्रंथ म्हणून गणली गेली. शरीर–रचना, आंतर–अवयवाचे आरोग्य व कार्य, प्राणायामादि कृतींचे कायिक व मानसिक सुपरिणाम वगैरे सोप्या भाषेत पण शास्त्रीय पद्धतीने पंडितजींनी मांडले आहेत.

योग म्हणजे जोड किंवा बेरीज. चंद्रसूर्यांच्या गतींची बेरीज १३ अंश २० कला होण्यास जो काळ लागतो तितक्यात एक योग होतो आणि असे योग सत्तावीस आहेत, हे निसर्गदर्शन आहे. शकपूर्व ५५० वर्षे अगर इसवी सनापूर्वी ४७२ वर्षे हे कोणाचे लक्ष वेधू शकले नव्हते. ज्योतिर्विद शंकर बाळकृष्ण दीक्षितांसारख्यानी ह्या

सृष्टीतील योगात प्राविण्य मिळवले ते तपशीलांच्या गणिताचे सूक्ष्मपणावर मिळवले. त्या योगापेक्षा वेदकाळापासून लोकमानसात ज्या योगाची कल्पना दृढ आहे तो यापेक्षा भिन्न आहे.

अमरकोशात योग शब्दाची जी प्रतिबिम्बे आढळतात ती संहनन, उपाय, ध्यान, संमति, संगति, युक्ति ही व अशी होत. प्राचीन संस्कृत वाङ्मयात कोणत्याही गोष्टीला जोडून घेणे, वाहून घेणे असा जसा कर्मयोगादि शब्दात अर्थ रूढ आहे, तसाच पातंजलप्रभृतिनी समाधि अगर ध्यान असाही अर्थ रूढ करून ठेवला आहे.

महाभारत आणि विशेषतः तदन्तर्गत गीता यामध्ये दोन्ही अर्थानी तो शब्द वापरलेला सापडतो, '**योगः कर्मसु कौशलम् ।**' अशी व्याख्या गीता देते आणि भाष्यकार कर्मामध्ये गढून जाणे हेच त्यातील कौशल्य अशी मल्लीनाथी करतात. अगर कर्मामधील कौशल्य हाच योग होय, असे ते प्रतिपादन करतात. महाभारतात अन्यत्र '**प्रवृत्तिलक्षणो योगः ।**' असे म्हटले आहे. एवढेच धरून चालावे तर गीतेच्या दुसऱ्या अध्यायात सांख्यमताचा उपन्यास करून तिसऱ्यात कर्मयोग सांगितला आहे तर सहाव्या अध्यायात पातंजलाभिप्रायाचा समाधि सांगितला आहे. सूर्य आणि चंद्र यांच्या गतिसरणींच्या जुळणी मूळ म्हणून घेऊन ह ( सूर्य ) व ठ ( चंद्र ) असा हठयोगही परमार्थसाधनात रूढ आहे. या योगात प्राण व अपान याना प्राणायामाने ताब्यात घेण्याचे कार्य मुख्य असते. याची प्रारंभशूरता मंत्रयोग, तर सिद्धि राजयोग होय. राजयोग म्हणजे सहज समाध्यवस्था. राजयोगाने कैवल्य प्राप्त झाले पाहिजे. समुदाहृता, तनुमानसा, सत्त्वापत्ति, संसक्तिनामिका, परार्थाभाविनी, शुभेच्छा व तुर्वगा अशा ज्ञानाच्या सात भूमिका योगवासिष्ठात दिल्या आहेत. शेवटच्या भूमिकेत मनुष्य जीवन्मुक्त होतो अर्थात् त्यास कैवल्य प्राप्त होते.

योगशास्त्रात यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि अशी आठ अंगे असून पहिली पाच बहिरंगे तर दुसरी तीन अंतरंगे आहेत. या अष्टांग साधनात अहिंसा, सत्य, अस्तेय ( अंग न चोरणे, अंगचोरपणा न करणे, दुसऱ्याना चोरून न खाणे–भोगणे, दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार न करणे ), ब्रह्मचर्य, निर्मळता, संतोष, तपस्या, ईश्वरप्रणिधान, इंद्रियनिरोधन इत्यादि गुणांचा अंतर्भाव होतो. चौऱ्याऐंशी प्रकारच्या आसनानी शारीरिक कष्टांचे निरसन करून मनाची निश्चलता प्राप्त करून घेता येते. मगच सुखासन नावाची शेवटची आसनाची पायरी गाठता येते. त्यानंतरच ध्येयामध्येच ध्यानाचा लय होतो, चित्तवृत्ति म्हणून काही आहे, असा भासही रहात नाही, तेव्हा त्या स्थितीला समाधि म्हणतात.

यज्जीव्यते क्षणमपि प्रथितं मनुष्यैः ।
विज्ञानविक्रमयशोभिरभज्यमानम् ॥
तन्नाम जीवितमिह प्रवदन्ति तज्ज्ञाः ।
दीर्घायुरेव भुवि धन्यतमो हि गण्यः ॥

**' कठिण समय येता कोण कामास येतो ? '** असे उद्‌गार काढण्याचा प्रसंग येण्यात काय अर्थ आहे ? परिस्थिति, प्रसंग वा संकट कोणी आपणावर मुद्दाम ओढवून कशाला घेईल ? पण त्यातील काही ओढवलेच तर त्याला तोंड देण्याची तयारी हवीच. ती झाल्याशिवाय रहात नाही. कारण सूर्यनमस्कारातही आसनाआसनांचे मांड आहेतच, प्राणायामाच्या सवयीने तर खास चित्तशुद्धि होते आणि दमछाट करून काम केले जाते. अशी जर संवय असली तर कोणतेही काम करण्यास अवघड जात नाही. मोहवासनांना विरोध करून **' इष्ट–काम–प्रसिध्यर्थम् । '** आपल्या मनाला ध्येयसंलग्न सतत राखण्याच्या कलेला प्रत्याहार असे म्हणतात. धारणा–ध्यास तर काय, संसारात व जीवनात असलाच पाहिजे. ईश्वरप्राप्तिसुद्धा जे जे काही प्राप्तव्य वाटत असेल त्याच्या नादात मन सदैव रतिमान् व गतिमान् ठेवण्यानेच ते ध्येय साध्य झाल्याशिवाय चैनच पडत नाही. धारणेने इच्छाशक्ति वाढते. इच्छाशक्तीचे प्रवाह आपल्या भोवती पसरू लागतात. त्यांचा परिणाम दुसऱ्यावर होऊन त्यांच्या-कडून आपल्या कार्यास हातभार लागत असतो. ध्यानाबद्दल तर काय बोलावयाचे ? मन ज्याचा छंद घेईल, त्याच ध्येयाचे स्वरूप त्याला मिळेल ! **' तुका झालासे पांडुरंग '** असा प्रत्यय ध्यानाशिवाय दुसऱ्या कशाने येणार ? या सर्वांचा परिपाक मनाचा समतोल राहण्यात होतो. त्या समतोलाच्या जोरावर **' सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ, जयाजयौ । '** मनुष्य योगसाधनेने कसल्याही परिस्थितीला तोंड देण्याचे सामर्थ्य माणसाला येत असते. योगी होऊन संसार उत्तम, उज्ज्वल व आदर्श करता येतो. हे योगातील अष्टांग साधनाने साधते. अष्टांग साधनाने मन व शरीर ताब्यात राहते. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि ही ती अष्टांगे होत. पहिल्या सात गोष्टी साधल्या तर मनुष्याची योग्य तयारी होऊन मनुष्य समाधीत जाऊ शकतो व तेथला आनंद सेवू शकतो.

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे पाच यम असून क्षमा, धैर्य, दया, लीनता व मिताहार याही पाच गुणांचा ' यमात ' समावेश असतो. स्वच्छता, संतोष, तप ( पंचमहाभूतास तोंड देण्याची सहनशक्ति ), स्वाध्याय आणि ईश्वराची नवविधाभक्ति या पाच नियमांचा अवलंब माणसाच्या जडणघडणीत महत्त्व पावत असतो. आसनांच्या योगाने मनाची एकाग्रता व निश्चयीवृत्ति साधत अस-ल्याकारणाने आसनांचा शास्त्रशुद्ध व्यायाम वयापरत्वे आणि प्रकृतीस अनुसरून

करीत राहिल्याने सर्व अवयवाना पुष्टि व प्रमाणशीरपणाही आणता येतो. याबाबत सूर्यनमस्कारांचाही मोठ्या प्रमाणात उपयोग स्वतः ध्येयरूपच होऊन बसतो.

यात अनिर्वाच्य आनंद आहे. ज्याने हा आनंद गमावला तो पिकले पान ! ज्याने हा आनंद कमावला तो रसरसित ! हे म्हणताना एकजिनसी ध्येयपूर्तीसाठी समर्पणबुद्धीने मात्र जीवन चालवले पाहिजे. तरंग म्हणजे जीवन नव्हे.; जीवनाचा प्रवाह तुंबता नये म्हणून ते रसरशितपणे चाललेच पाहिजे.

पंडितजींनी योगासने, नमस्कार वगैरे व्यायामपद्धतींचा आणि प्राणायामादिकांचा वापर स्वतः करून दीर्घायुष्य स्वतःसाठी मिळवलेच. पण '**आधि केले मग सांगितले**' ही ते सर्व जनतेला, व्याख्यानानी, पुस्तकानी व प्रचारानी ! कारण समाजसेवा–सन्मुख पंडितजींना सर्वच राष्ट्रातील तरुणजीवन रसरसलेले व '**अणुपासूनि ब्रह्मांडा एवढे होत जातसे ।**' हवे आहे.

: ३५ :

# चित्रकार पंडितजी !

" साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः "

—असे एक संस्कृत सुभाषित आहे. अतिशयोक्ति वजा करता ते खरे आहे.

## चित्रकला व्यवसाय ठरवला होता

ब्रह्मर्षि श्रीपाद दामोदर सातवळेकर वेदोनारायण म्हणून वा पुरुषार्थादि नियतकालिकांचे यशस्वी संपादक म्हणून जितके प्रसिद्ध आहेत, तितकेच ते निपुण चित्रकार म्हणून नाव केलेले कलावंत आहेत. किंबहुना, चित्रकलेच्या आवडीतूनच त्यांनी दृष्ट व दृश्य देखाव्यांचे, निसर्गलीलांचे आणि मानवी जीवनातील घटनांचे आविष्कार आपल्या रेखाकलेने कागदा–कापडावर करण्यातच लहानपणापासून आनंद मानला. मुंबईच्या ' जे. जे. आर्टस् स्कूल ' चे विद्यार्थी व काही काळ शिक्षक होऊन, तेथे मिळविलेल्या प्राविण्यपदकांच्या व पात्रतासिद्धीच्या जोरावर चित्रकारी हाच आपला योगक्षेमाचा व्यवसाय आणि जीवितसाधना सातवळेकरजींनी आपल्या वयाच्या तिशीत निश्चित केली होती.

' मुंबईच्या चित्रशाळेत ( जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् मध्ये ) असताना ' श्रीपाद दामोदर सातवळेकर यांची, आम्ही मुंबईस लॉ टर्म्स भरत असताना लक्ष्मणराव किर्लोस्कर व बाजीराव गुत्तीकर यांनी आम्हास ओळख करून दिली ' असे औंधचे पंतप्रतिनिधि बाळासाहेब यांनी आपल्या आत्मचरित्रात सांगितले आहे. श्रीमंत पुढे लिहितात—

" म्हणून मुंबईत आमच्या परिचयाचे ते चित्रकार होते. त्याना आम्ही लिहून औंधास ड्रॉप व इतर तीन चार पडदे करून द्याल काय, म्हणून विचारले आणि पगार काय घ्याल आणि इतर खर्च काय येईल वगैरे चौकशी केली. पगाराचा

नक्की आकडा आता आठवत नाही; पण येथे औंधास मांजरपाट घेऊन त्याचे पडदे शिवावेत आणि काही पडदे काढून द्यावेत असे ठरले. त्याप्रमाणे श्रीपाद दामोदर सातवळेकर यांनी मुंबईहून रंग वगैरे लागणारे सामान घेऊन औंधास महिनाभर राहावे आणि काही पडदे काढून द्यावेत असे ठरले. त्याप्रमाणे श्रीपाद दामोदर सातवळेकर औंधास आले. त्यांना त्यावेळी लक्ष्मणराव किर्लोस्कर, बाजीराव गुत्तीकर वगैरे मंडळी सोनबा म्हणत असत. आम्हीहि अर्थात् त्यास त्याच नावाने संबोधित असू. सोनबानी मुंबईहून लागणारे भरपूर रंग, सरस, व्हायटिंग अथवा पांढरा सफेद रंग आणले होते. आम्ही मांजरपाटावर आधी पांढरे सफेद रंग न देता, तसेच पडदे रंगवीत होतो. या कारणाने पडद्यावरील रंग उठावदार मुळीच दिसत नसत. सोनबा सातवळेकरांनी पडदे तालमीतील फळ्यावर ठोकून आधी जेव्हा मोठमोठ्या चपट्या ब्रशाने त्यावर व्हायटिंग अथवा सफेता दिला तेव्हा पडदे रंगविण्यासाठी आधी काय करावे लागते हे आम्हाला समजले. आम्हाला आमचा चित्रे काढण्याचा उद्योग होता, म्हणून पडदे रंगविण्यामध्ये सोनबा सातवळेकरांना प्रत्यक्ष साह्य करण्यास गेलो नाही. पण गणपतीचे काम असतानाहि केव्हा केव्हा दत्तोपंत चितारी त्यांच्याकडे जाऊन त्याना थोडी बहुत मदत करीत."

दत्तोपंत चितारी हे औंध संस्थानचे सात रुपयापासून पंधरा रुपयापर्यंत चढलेले चितारी. मातीची, शाडूची चित्रे तयार करण्याचेही काम त्याना करावे लागे. दत्तोपंत चिताऱ्यानी अंबाबाईचे ( औंध येथील ) शिखरावरील चुन्याच्या गिलाव्याची चित्रे केली; काही माणसांचे शाडूमध्ये 'स्टॅच्यूज' केलेत. गणपतीच्या मूर्ति तर हमेशा केल्या. कॅन्व्हस्‌वर काही ऑईलपेंटिंगची चित्रेही केली. वॉटर कलरपेंटिंगही त्याना अवगत होते. चित्रकलेप्रमाणेच ते प्रवीण पगडबंद व तरबेज तबलजी होते.

कुकुडवाडचे मूळ हुद्देदार घराण्यातील कलावन्त हेरून, औंधकरानी प्रथम प्रत्यक्ष औंधचे यमाईच्या शिखरासाठी श्री बंडोपंत हुद्देदाराना औंधास आणले व वतन करून देऊन "चितारी" म्हणून कामास घेतले. त्यांचे चिरंजीव दत्तोपंत! दत्तोपंत चितारींचा जुना इतिहास असा असून दत्तोपंत १९०५ मध्ये परलोकवास घडेपर्यंत औंधकरांचे सेवेतच असत. नाटकाच्या पडद्यांचे काम करावयास सातवळेकर औंधास ( एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात ) येत असत, त्यावेळी त्यांचे मदतनीस म्हणून दत्तोपंत चितारीना श्रीमंतानी दिले, ते चितारींच्या अंगच्या कलेमुळेच होय. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधींचे वडील बन्धु तात्यासाहेब महाराज नाटकाचे शोकीन असल्यामुळे औंधास दरवर्षी नवीन नवीन नाटके होत. याकरता नवीन नवीन देखावे लागत असल्यामुळे दरसाल एकादातरी पडदा नवीन होई. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी पुढे सांगतात की--

"शाकुन्तल नाटकाच्या वेळीच पुढला ड्रॉप्‌चा पडदा, संगम–माहुली येथील श्री विश्वेश्वराच्या देवालयाचा, नदीचा वगैरे देखावा काढलेला एक फोटोग्राफ

होता, त्यावरून सोनबांनी रंगविला. तो पडदा पंचेचाळीस वर्षे झाली तरी आमचेजवळ अजून ( १९४१ ) आहे. बागेचा सीन, रस्त्याचा सीन, महालाचा सीन, जंगलाचा सीन वगैरे आणखीहि पडदे सोनबांनी त्यावर्षी काढले. एक महिन्यात साधारण तीन पड्यांचे काम झाले. त्यानीच नाटकाला फार रंग आणला. एक महिन्यानी पुन्हा सोनबा मुंबईस निघून गेले.

" या प्रमाणे दोन तीन वर्षे एक महिनाभर असे सोनबा या पड्याच्या कामासाठी औंधास येत असत."

## जुन्याप्रमाणे नव्याचेहि ज्ञान हवे

अशा रीतीने काम करीत राहिल्याकारणाने श्रीपादराव सातवळेकरांचा आत्म-विश्वास वाढत गेला.

" हे खरे की त्याकाळी ठरोतीने काम ( चित्रांचे ) मिळण्यास फारच मर्यादित वाव असे. मूठभर राजेरजवाडे हेच काय ते पोशिंदे होते, आणि प्रत्येकाजवळ एक मर्जीतला ( चित्रकार ) असे. त्याचप्रमाणे इंग्लिश राज्यकर्त्यांचा एका शब्दाचा पल्ला फार मोठा आणि मग साहजिकच त्यांनी तुम्हाला पुढे रेटावयाचे व पुरस्कारावयाचे, तर तुम्हाला 'भली पोरे' होणेच भाग होते. स्वभावशील स्वातंत्र्याचा अगर शैली आपलीशी करण्यातील पसंतीचा रुबाब त्यायोगे काही नीटनेटका होत नसे. त्याचबरोबर ध्यानात असू दे की राहणी स्वस्तच होती." ( मुंबई आर्ट सोसायटीचे जर्नल, एप्रिल १९६६, पं. सातवळेकरांची त्यांच्या स्नुषा सौ. कुसुमताईनी घेतलेली मुलाखत. )

त्या काळापासून ( एकोणीसाव्या शतकाच्या नव्वदीपासून ) चित्रकार सातवळे-करांचा अनुभव असा की हिंदी विद्यार्थ्यांत चित्रकला शिकतानाहि बुद्धिविकासाकडे दुर्लक्ष म्हणण्याइतकेच लक्ष असते. प्राचीन संस्कृतीची, धर्मग्रंथांची, पुराणांची त्यांना फारशी माहिती नसते, तशीच नव्या युगातील नवविचारांचीहि त्यांनी ओळख करून घेतलेली नसते. उच्च ध्येय असल्याखेरीज उच्च विचारांची ध्येयपूर्ण चित्रे निघणार तरी कशी ? उच्च ध्येयाला बुद्धिविकासाची आवश्यकता आहे. सृष्टि-सौंदर्याविषयीच्या आवडीमुळेच चित्रकलेत सर्वाहून अधिक गति होते. लँडस्केप, मॉडेलिंग, म्युरल–डेकोरेशन याबाबत रेषा व रंग यासंबंधी फार काळजी घ्यावी लागते. नवीन काळात टिकेल, असे ज्ञान जुन्यातील चांगल्यांची परंपरा तेजस्वी ठेवून निर्माण व्हावे लागते. चित्रे काढताना इतक्या तल्लीनतेने काढली पाहिजेत की अभिप्रेताशिवाय इतर मनोविकारांना थाराच मिळता कामा नये.

चित्रकलेला यथार्थदर्शना ( पर्स्पेक्टिव्ह ) ची लज्जत नसेल तर काय मजा येणार ? सपाट फलकावर घन पदार्थाचे चित्र, ते पदार्थ जसे डोळ्यांना दिसतात

तसे दिसतील अशा रीतीने काढण्याची चित्रकलेची ती शाखा आहे. याबाबतीतील त्रावणकोर राजघराण्यातील चित्रकार राजा रविवर्मा ( १८४८ ते १९०६ ) यांची बडोदा, म्हैसूर वगैरे ठिकाणी असलेली तैलचित्रे व सर्वपरिचित अशी लक्ष्मी, सरस्वती, शकुंतला–जन्म, शकुंतला–पत्रलेखन, कृष्ण–शिष्टाई वगैरे चित्रे अभ्यासण्यासारखी आहेत.

## क्लोद यांची इंप्रेशनिस्ट पद्धत

पण फ्रेंचचित्रकार मोने क्लोद ( १८४८ ते १९२६ ) याच्या 'इंप्रेशन' चित्राने जे जगाला और शिकविले, त्याचा वासही अजून भारतीय चित्रकार घेत नाहीत. १८६३ च्या प्रदर्शनात त्याने ते एका विशिष्ट पद्धतीचे चित्र मांडले होते. तेव्हापासून ती चित्रपद्धती 'इंप्रेशनिस्ट मुव्हमेंट' या नावाने प्रसिद्ध आहे. त्याने हेस्टॅक्स व रोएन कॅथेड्रल या दोन विषयांची अनेक चित्रे प्रकाशाची निरनिराळी स्थित्यंतरे दाखविणारी अशी काढली. त्याची पाठशिवणी करावयासहि प्रकाशकिरणांच्या वक्रीभवनातील बारकावे समजावून घेतल्याशिवाय फारसे यश येणारे नाही. चित्र काढणे म्हणजे स्वतःला झालेला साक्षात्कार दुसऱ्यांना रेखारंगांनी पटवून देऊन आपल्या आनंदात त्यांना वाटेकरी करणे होय. त्याला 'आत्म–अनुभवी चोखाळाव्या वाटा !' तेव्हा जमते.

आजकाल चित्रकला चार रेघोट्यांची राहिलेली नाही. "**व्यर्थी अधिकचि अर्थ असे । तो ज्यास दिसे त्या म्हणति पिसे ॥**" हे जसे शब्दसृष्टीत आहे, तसेच चित्रकला–सृष्टीतहि आहेच. जवळची वस्तु मोठी व दूरची लहान दिसावयाची, हा दृक्प्रत्यय प्रत्येक डोळस माणसाला येऊ शकतो. हे जसे दिसते तसे चित्रित करण्याचे वेळी आढळणारी शिस्तशीर टापटीप व त्या टापटीपीच्या आधाराने ठरणारे चित्रणतंत्र या दोहोस मिळून यथार्थदर्शन म्हणता येते.

## यथार्थ दर्शन आणि सौंदर्यकृति

चित्रकलेत यथार्थदर्शनाइतकेच सौंदर्याकृतीला महत्त्व आहे. सौंदर्यकृति म्हणजे आकार व रंग यांची सुसंगति व नयनरम्य आणि मनोवेधक नि विवेकस्पर्शक मांडणी. फार प्राचीनकाळापासून मानवाचा या शास्त्राचा अभ्यास पद्धतशीर चालूच आहे. वस्तु व वास्तु मानवाने अलंकारिक स्वरूपाने भूषविल्या आणि आपल्या सौंदर्याभिरुचिची ओळख करून दिली. त्यातूनच सौंदर्याकृतीचे एक वेगळेच शास्त्र निर्माण झाले असे म्हटले तरी चालेल.

## मुंबईतील प्रदर्शनात चित्रे

या सर्व प्रगतोन्नतिसाठी आवश्यक बारकाव्याकडे रसिकहृदयी श्रीपाद दामोदर सातवळेकरांचे उतारवयातहि लक्ष रहात आले आहे. कोणतीहि गोष्ट तारीखतागायत अभ्यासाने आटोपावयाची असा त्यांचा शिरस्ता असल्या कारणानेच, 'पश्चिम

भारतातील चित्रकलेची पंचाहत्तर वर्षे ' या १९६६ सालच्या प्रदर्शनात असा आढळ झाला की नव्व्याण्णव वर्षांचे तरुणमनस्क पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकर हेच चित्रकलाक्षेत्रातील ' भारताचे प्रपितामह ' आहेत. मोठ्या आदर–गांभीर्याने त्यांनी काढलेले एक तैलचित्र व ' स्केचेस ' चे एक संकलन त्या प्रदर्शनात समाविष्ट केले होते. चार तपापूर्वी पंडितजींची कीर्ति प्रतिमाकार म्हणून एवढी होती की राजे-महाराजे, सरदार–दरकदार त्यांच्याकडून एकेक जीवनदर्शी प्रतिमा रंगवून घेत व हजार हजार रुपये खुषीने देत. हैदराबाद, पीठापूरम्, जयपूर, जोधपूर आणि औंध येथे त्यांच्या प्रतिमाचित्रांचे अप्रतिम नमुने असून त्यांच्या कित्त्यावरून आपल्या कलेची वळणे घेणारे उदयोन्मुख चित्रकार कितीतरी सापडतील. तथापि ज्याचे त्याने एक वैशिष्ठ्य वा स्वतःची आकर्षक लकब निर्माण केली पाहिजे. सततोद्योगातील अभ्यासाने ती निर्माण होते, हे पंडितजीनीच एका लेखात सहज म्हणून सांगितले आहे.

' प्रतिमाचित्रात आमचे नेहमीचे प्रमाण चेहऱ्याचे साडेसात–आठपट उंची असे आहे. रविवर्मा यांनी अनेक ठिकाणी पुरुषांचे साडेनऊ दहापट व बायकांच्या चित्रात नऊ साडेनऊपट काढलेली आहेत. कारण नावाजलेल्या युरोपियन चित्रात तशी असे व असते. तथापि रविवर्मानी आपल्या चित्रात एक वैशिष्ठ्य राखले होते. ' आसेतुहिमाचल ' भरतखंडाच्या सर्व प्रांतातील पेहरावाच्या तऱ्हा पाहिल्या, त्यात स्त्रियांची लुगडे नेसण्याची पद्धति महाराष्ट्रीयांचीच उत्तम आहे, अत्यंत उपयोगी आहे, प्रत्येक अवयवाला उठाव देणारी आहे, ती आम्हाला आवडली म्हणून सर्वत्र आम्ही तिचा वापर केला, असे रविवर्माजी सांगत. '

आपले म्हणून काही प्रत्येक कलावंताने ठेवावयाचे असते, ते हे असे ! पंडित सातवळेकरांनी ' आर्ट जर्नल ' साठी दिलेल्या आपल्या मुलाखतीत आपले म्हणून जे काही सांगितले आहे, तेहि अभ्यासकांनी लक्षात धरण्यासारखे आहे. पंडितजी म्हणतात की—

" मोकळ्या मनाने बोलावयाचे तर, आधुनिक चित्ररंगतीने माझे समाधान नाही. प्रगतीचे मी मनापासून स्वागतच करतो, पण प्रस्तुत ( १९६६ ) चे वळण मला प्रगति वाटत नाही. त्याला मी अधोगति, परागति सुद्धा म्हणेन. चित्रकार जेव्हा आदिवासीसारखा अगर गुहचका ( cave man ) सारखा चित्रे काढतो, तेव्हा त्याला समाधान होणेच शक्य नाही. सभ्यतेचे किंवा सिव्हिलीझेशनचे त्याने विडंबन करू नये. सभ्यतेचा अत्यंत चमकदार व तेजस्वी असा दीपस्तंभ होऊन त्याने स्फूर्ति द्यावी, उन्नति साधावी आणि जग–जीवन उच्चतर होईल, असे नेतृत्व द्यावे. '

## भारतात चांगला चित्रकार नाही

यापूर्वीहि पंडितजीनी आपले चित्रकलेसंबंधी आणि विशेषतः भारतीय चित्र-कलेसंबंधी निरीक्षणपूर्वक बनलेले मत व आकांक्षा प्रकट केल्या आहेत. ते म्हणतात—

" चित्रकलेच्या पहिल्या वर्गात असलेला विद्यार्थी निसर्गाचे अनुकरण करण्याची खटपट करतो, करीत असतो, पण त्याला ते चांगले साधलेले नसते. तो फक्त खटपट करीत असतो.

त्याला आपण अनुकरणेच्छूंचा वर्ग अशी संज्ञा देऊ. ही चित्रकाराची अगदी प्राथमिक स्थिति आहे. मुंबईच्या आर्टस्कूलमधून आठ वर्षे शिकून तयार झालेले विद्यार्थी या वर्गात येतात.

( २ ) जे निसर्गाच्यासारखे चित्र रेखाटू शकतात, अशा चित्रकारांचा दुसऱ्या वर्गात समावेश होतो. अगदी मुळासारखे हुबेहूब चित्र काढण्यात यांची फार प्रविणता असते. पण हा हुबेहूबपणा चित्रात उतरविण्यास त्यास काळजीपूर्वक प्रयत्न करावा लागतो. हीच दुसऱ्या वर्गाची मर्यादा आहे. याला आपण ' अनुकरण–प्रविणांचा वर्ग ' असे म्हणू. यात बरीच वर्षे काम करीत असलेले चित्रकार येऊ शकतील. यांच्यात कलेचा अल्पसा प्रारंभ झालेला असतो.

( ३ ) जे लीलेने सहजगत्या फारसा प्रयत्न न करताच निसर्गासारखे चित्र काढू शकतात, अशा चित्रकारांचा चित्रकलेच्या तिसऱ्या वर्गात समावेश होतो. काळजीपूर्वक चित्र न काढताहि यांच्या चित्रात इतका हुबेहूबपणा येतो की, दुसऱ्या वर्गातील चित्रकारांनी महिन्यांचे–महिने खटपट केली तरीहि यांच्या चित्रांची सर त्यांच्या चित्रास येऊ शकत नाही. या वर्गातील चित्रकारास आपण ' अनुकरण–पारंगत चित्रकार ' असे म्हणू. या वर्गातील चित्रकारामध्ये कला अवतरलेली असली तरी त्यात कलेची परिपूर्णता झालेली नसते.

या तीनहि वर्गातील चित्रकार हे नियमांचे गुलाम असतात.

यावर आणखी एक चित्रकारांचा वर्ग आहे. त्याला आपण ' मुक्तात्म्यांचा वर्ग ' म्हणू. हे चित्रकार बंधनाच्या पलिकडे पोहोचलेले असतात, म्हणून त्यांचे स्थान फार वर आहे.

( ४ ) जे आपल्या इच्छामात्रेकरून रेखाविन्यास, वर्णविन्यास आदीमध्ये असे प्रभुत्व दाखवतात की, त्यांच्या चित्रांची नक्कलसुद्धा पूर्वीच्या तीन वर्गातील चित्रकाराना करता येणे शक्य नसते. असे चित्रकार कलेच्या चवथ्या वर्गात येतात. हे ' मुक्त ' च असल्यामुळे स्वैर, विहारी, नियमांची पर्वा न करणारे, ( पण यांच्यामागून नियम धावत येत असावेत ! ) असेहि म्हणता येईल. चित्रसृष्टीत स्वर्गीय चैतन्य खेळविणारे, जड–चित्रामध्ये सजीवपणाचा भास उत्पन्न करणारे असे असतात. हे करतील तो नियम व हे ठेवतील तो वर्ण–विन्यास आणि हे ठरवतील ती पूर्वदिशा असा यांचा अधिकार असतो. म्हणून याना ' चित्रकलासम्राट् ' असे आपण म्हणू. यांच्या चित्रात खरा ' कलाविलास '

दिसत असतो. ज्यांना आपण ' चित्र–कला–सम्राट् ' अशी येथे पदवी दिली, ते चवथ्या वर्गातील चित्रकार आपल्या हिंदुस्थानात मुळीच नाहीत. बहुतेक हिंदुस्थानातील चित्रकाराना मी ओळखतो. पण त्यात जो या चवथ्या वर्गात आहे, असे म्हणता येईल, असा एकहि चित्रकार नाही. आज आपल्या हिंदुस्थानात जे चित्रकार आहेत, ते फार तर दुसऱ्या वर्गात मोडणारे आहेत व अगदी थोडे तिसऱ्या वर्गात अगदी खाली बसण्याजोगे आहेत. सुप्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा हे सुद्धा तिसऱ्या वर्गात बसू शकतील की नाही, याबद्दल मला शंका आहे. ते दुसऱ्या वर्गातच सरासरी मध्याच्या थोडे वर बसू शकतील इतकेच. ओलेतीचे चित्रकार ठाकूरसिंह हे सुप्रसिद्ध चित्रकार आहेत खरे, पण ते फक्त आपण ठरविलेल्या दुसऱ्या वर्गात बऱ्याच वरच्या जागेवर बसू शकतील. यापेक्षा त्यास वरचे स्थान मिळणार नाही.

' ही जी वर्गवारी मी येथे केली आहे, ती युरोपचे सर्व चित्रकार लक्षात घेऊन केली आहे. आज फ्रान्समध्ये वर्णविन्यासाच्या दृष्टीने चवथ्या वर्गात बसू शकणारे काही चित्रकार आहेत व आकार–विन्यासाच्या दृष्टिने चवथ्या वर्गात बसू शकणारे काही चित्रकार इटलीमध्ये आहेत. त्यांच्या त्यांच्या पासंगास पुरेल इतकीसुद्धा चित्रकला आपल्याकडे अजून झालेली नाही. '

( पं. सातवळेकरकृत जीवन प्रकाश )

चित्रकलेसंबंधी पंडितजींची ही विचारधारा परिचित करून घेणारांच्या हे लक्षात आल्याशिवाय रहात नाही की, संसारात अडचण कशी ती ठेवू न देण्याइतकी चित्रकलाकुशलता पंडितजींच्या जवळ असली तरी, तिच्यापेक्षा त्यांचा विनय मोठा होता व आहे. त्या विनयेन शोभणाऱ्या विद्येचा हुकमी पत्ता हातात असलेले पंडितजी भारतीय चित्रकलेने केवढी मजल मारली पाहिजे, हे स्पष्ट करण्यास वरील प्रकारच्या विवेचनात विसरले नाहीत. पंडितजींच्या चित्रकलेसंबंधी बिनदिक्कत सांगता येते की, तीत वास्तवता, सौंदर्य व रेखीवपणा यांचा उत्कृष्ट मिलाफ आढळतो. पंडितजींच्या चित्रकलेने शंकररावजी किर्लोस्कर उत्स्फूर्त झाले आणि पंडितजींकडे दीड वर्ष चित्रकला शिकले. स्केच, लँडस्केप ( हिमालय वगैरे ), स्टिल् लाइफ ( फळ–फळावळ वगैरे ), लाइफ साइज ( जीवनसदृश पूर्ण प्रतिमा ) हे सगळे प्रकार पंडितजींच्या हातचे ' सहज रेखणे हित–उपदेश ' आहे.

## फोटोग्राफर म्हणून नावलौकिक

औन्ध, मद्रास, हैद्राबाद, पीठापुरम्, जयपूर, जोधपूर, लाहोर येथील संग्रहालयात पंडितजी सातवळेकरांची चित्रकारी वेदमूर्तिची म्हणून झळकत आहे. लाहोर–सिमला येथे पंडितजींनी फोटोग्राफर व प्रतिमा–चित्रकार म्हणून कमावलेला लौकिक एवढा मोठा होता की, पुढे त्यांनी तो व्यवसाय सोडला, तरी तो चालवावयास घेणारानी

सातवळेकर स्टुडिओ असेच नाव चालवून पंडितजींच्या लौकिकाचे भांडवल करावयास सोडले नाही.

महाराष्ट्रात चित्रकार म्हणून सर्वत्र गाजलेले सातवळेकरांचे समकालीन चित्रकार रा. ब. महादेव विश्वनाथ धुरंधर ( १८७१–१९४४ ) यांचीही मते बहुतांशाने पंडितजी सातवळेकरासारखीच होती. धुरंधर हे कोल्हापूरच्या आबालाल रहिमान यांच्या पाशी १८९० चे सुमरास चित्रकला शिकले. कोल्हापूर स्कूल ऑफ् आर्टस्मध्ये त्यानी मेयोपदकही मिळविले होते. चित्ररचना ( Picture-Composition ) या विभागातील प्रावीण्याबद्दल त्यांची विशेष ख्याति होती. जुन्या पिढीतील चित्रकार म्हणून त्यांची ख्याति असली तरी नवीन कल्पनांचे स्वागत करण्यात त्याना कमीपणा वाटत नसे. पं. सातवळेकर काय किंवा रा. ब. धुरंधर काय, कलेतील कुशलतेचे रसिक चाहते असल्यामुळे त्यांच्या चित्रकलेसंबंधाच्या मताना मोल आहे.

वर्णनपर चित्र–शिल्पे समजावयास सोपी. अशा प्रकारच्या चित्रशिल्पात माध्यमाचा फरक किंवा वैशिष्टच नजरेत भरतही नाहीत. पण खोलवर काही भावनाशय जेव्हा व्यक्त करावयाचा असतो, तेव्हा कलेला आपल्या माध्यमाच्या सर्वशक्तिपणाला लावाव्या लागतात. सर्वसाधारण रसिकाची ग्रहणशक्ति येथेच तोकडी पडते. रंग, रेषा, आकार, अवकाश यांचा तोल साधीत चित्र आपले रूप घेत असते. निव्वळ सौंदर्याकृति साधावयाची तर या घटकांचा समन्वय एका विशिष्ट संगति–विरोधाने केल्यास जमते. पण भावभावनांची अभिव्यक्ति करताना सर्व चित्रपृष्टाचे स्वरूप बदलून जाते. संगति, विरोध, तोल ही अंगे सहज मोजण्यासारखी सजत नाहीत. त्यांचे स्वरूप संमिश्र व गूढ भासते. रेम्ब्राँसारख्या वास्तववादी कलावन्ताची व्यक्तिचित्रे उदाहरणार्थ सांगता येतील. त्याच्या चित्रातील छाया, प्रकाश व रंग यांच्या उठावानी साधलेल्या मांडणीतील भावनाभिव्यक्ति समजणे " येरा गबाळाचे काम नोहे। " त्यासाठी प्रेक्षकाची रसिकता अभ्यासूपणे डोळस व मर्मभेदी असली तरच ठीक !

गतिमानता हा जीवनचा स्थायी भाव आहे; पण त्या गतिमानतेत सनातन मूल्यांची जपणूक हवी. सीझानी, फोगेन, व्हॅन् गॉग यानी बंड उभारले आणि स्वतःला प्रतीत झालेले वस्तुसौंदर्य स्वतःच्या प्रतिभेने आविष्कृत करण्याचे तंत्र सुरू केले, पण म्हणून सृष्टिचमत्कारातील सनातनत्व त्यानी डावललेले नाही ! भारतीय चित्रकला या तंत्राचा पुरस्कार करीतच विकास पावली आहे. कितीही वेळा आणि केव्हाही पाहिले तरी चित्रसौंदर्याचा हमखास पुनःप्रत्यय येण्यातच चित्राचे स्वारस्य असते. कला आंगिक ( परफॉमिंग ) असो वा पार्थिव ( प्लॅस्टिक ) असो, स्वतःची अभिव्यक्ति हेच तिचे मर्म असते. भारतीय संस्कृति ही समन्वयी व शुद्धसमावेशक संस्कृति असल्याकारणाने, भारतीय चित्रकलेनेही ग्रीक, पर्शियन, मोगल कला–प्रकाराना

साहचर्याने आत्मसात् केले आहेच. तेव्हा काळपालटीबरोबर किंवा कल्पनेच्या नवोद्भवाबरोबर धाव मारावयास भारतीय चित्रकला बिचकते, असे मानण्याचे कारण नाही ! राजा रविवर्मा यांची चित्रकला ही पाश्चात्य भौतिक व भारतीय धार्मिक कल्पना यांचा ' सुरेख संगम ' नाही काय ? म्हणून हे बिनचूक लक्ष्यात ठेवले पहिजे की, कलावन्त आजच्याबरोबर उद्याचा विचार करीत असतो तेव्हाच तो प्रगत राहतो. त्यामुळे काही चित्रकारांच्या काही लपेटी जनसामान्याला अनाकलनीयही होतात. " इम्प्रेशनिझम " या चित्रकलेतील प्रणालीचे उदाहरण येथे बस्स होईल. विवेचक सृजनता हेच शेवटी काळाला पुरून उरण्याचे अमोघ शस्त्र शास्त्रशुद्ध चित्रकलेजवळ असते.

अजंठा–चित्रावलीतील आविष्कारमर्यादा, रंगाची आटोपशीर लपेट, साधेपणा आणि कलेने तत्त्वज्ञान विंववण्याचा हेतुगर्भ या गोष्टी अमरपणे अनुकरणीयच नाहीत काय ? हे मान्य असूनही पश्चिमात्यांच्या चित्रकलेतील रसास्वाद स्वीकारून अवनींद्रनाथ टागोर, नंदलाल बोस, त्रिदाद, आबालाल रहिमान, माधवराव धुरंधर, बाबुराव पेंटर, आगासकर, हळदणकर वगैरे चित्रकारानी पौर्वात्य–पाश्चिमात्य कलानिकषातून आविर्भावाची एक नवी प्रणाली शास्त्रीय संशोधनाचा विषय करून सोडली. या प्रथेचा परमोच्च बिंदु म्हणजे परिस्थितिसापेक्ष क्रांति घडविण्याचे सामर्थ्य शाहीराप्रमाणेच चित्रकारात येण होय, असे एकाद्याने म्हटले तर चुकीचे ठरेल काय ? जर्मन युद्धाच्या वेळी बेल्जमच्या जॉन् डेलव्लिव्ह या चित्रकाराने काढलेले भेसूर आणि भयानक चित्र राष्ट्राच्या भावनांचा कर्कश कल्लोळ ठरले होते.

कलेची रसिकाला साद येते ती माध्यमे आणि साधने यातून फुललेल्या चैतन्याची. त्या चैतन्यात रंग, आकार, पोत व भावनाशय यांची एकजीव मिळणी असते. विश्लेषणानेच बोलावयाचे झाले तर पौर्वात्य चित्रकला भावनाप्रधान निष्ठेची, पाश्चिमात्य चित्र कला निसर्गप्रधान निष्ठेची आणि सर्व जगातच अलिकडे अनुसरले जाणारे तंत्र आत्मप्रधान निष्ठेचे आहे. आणि तरीही त्यांच्यातील सनातनत्व स्पष्ट आहे. ते हे की चित्र ही एक जिवंत वस्तु असून ती प्रेक्षकाशी डोळ्यानी बोलते. आकर्षण आणि जिव्हाळा ही त्या नेत्रपल्लवीची फुले–फळे होत. आधी माहीत असलेल्या गोष्टींचीच नवनव्या स्वरूपात अभिव्यक्ति, त्याचबरोबर माहीत नसलेले आकार आणि रोजच्या जीवनातील **" व्यर्थी अधिकच अर्थ दिसे । "** त्याला साकारणे ही चित्रकलेची महत्त्वाची अंगे मानली गेली, तर नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेचे चित्रकार त्या अपेक्षकाला नावे ठेवणारच नाहीत. निराकारातून साकार निर्मितीचा खटाटोप आणि म्हणून नवनिर्माण करण्याची असीम ओढ हे जगाच्या अनुभवातील एक शाश्वत सत्य आहे. अशी ओढ असली तरच **" हठादाकृष्टानां कतिपयपदानां रचयिता "** कवि न होता **" वाचमर्थोऽनुधावति । "** असा कवि निर्माण होतो. चित्रकलेतही तोच अनुभव येतो. सहज चार रेघोट्या मारल्या तरी अंतरीच्या ओढीचे चित्र साकार होत असते.

❀

असा नावलौकिक चित्रकलेत वैशिष्टयाने मिळवण्याचे भाग्य त्या १९१८ साली रेघोटया मारणाऱ्या एका मुलीने मिळवले. अमृता शेरगिल ( १९१२ ते १९४१ ) ही हिंदी महिला चित्रकार पॅरिसच्या कलाविद्यालयातून " शिस्तीची सौंदर्यभावना " घेऊन १९३४ साली हिंदुस्थानात आली. उत्तरप्रदेशातील गोरखपूर जिल्हयात सरय्या गावची ती. प्राचीन चित्रकलेतील चैतन्य तिने आत्मसात् केले होते. आकृति आणि रंग यांची विशिष्ट रचना करण्यात ती प्रवीण होती. अजंठा, महाबल्लीपुरम्, इत्यादितील शिल्पकृतीवरून तिने नुसते अनुकरण केले नाही. नवरीचा शृंगार, बाजारकरी दक्षिणी, ब्रह्मचारी, गोष्टी सांगणारी, उंट इत्यादि तिच्या चित्रातून मोंगलचित्रकला आणि बशोली चित्रकला यातील वैशिष्टये दिसतील. भावनादर्शक आकृति आणि रंग याकडेच तिने लक्ष पुरविले. तिची चित्रे प्रामुख्याने तैलचित्रे असत. आपल्या कलेची तिने कडकशिस्तीने व भक्तिने सेवा केली.

सेवायोगाशिवाय सिद्धि प्राप्तच होत नाही. हा पंडितजींचा सिद्धान्त चित्रकलेसंबंधातही खरा असल्याचे अमृता शेरगिलनेही नजरेला आणल्यावर चित्रकलेसंबंधीची शोधक नजर सांगते की—

चित्रकलेमध्ये जुनी चित्रकला, मध्यकालातील चित्रकला, आधुनिक चित्रकला, पुरोगामी चित्रकला ( Modern art of painting ) व अतिगामी चित्रकला ( Extra modern or ultra modern art of painting ) अशा पद्धति सध्या युरोपात प्रचलित आहेत. चित्रकलेत चित्रकार ज्या निश्चित बारकाव्यांच्या लक्ष्याने भाषेतील शब्द वापरीत असतात, ते लक्ष्य ललितलेखकांच्या लक्षात येणे तितकेसे सहज नाही; म्हणून चित्रकार व ललितलेखक वापरीत असलेल्या शब्दसाम्यावरून त्यांचे अभिप्रायसाम्य मानता यावयाचे नाही. गायनकलेप्रमाणे चित्रकलेतही अनुकरणाला स्थान नाही. अनुकृति ही नक्कल वा नाटय यांच्यापुरती मर्यादित वास्तवाच्या अर्थाने आभासात्मक कला ठरेल, पण अभिजात कला नव्हे. निरनिराळया स्वरांचे, शब्दांचे व आलापांचे अपूर्व समन्वयसंमेलन होऊन ते ऐकणारास आनंदमय स्फुरण देऊ शकले तरच ते गायन होऊ शकते. चिकलेतही वास्तवावर लक्ष केंद्रित करून वस्तुमात्राच्या व व्यक्तिमात्राच्या ठेवणीतील आणि स्वभावातील वैशिष्ठयविशदीकरण ( चित्रकाराला जे जे विशेष आढळले ते हुबेहुब प्रतिबिम्बित करणे ), चेहऱ्याच्या ढबीचे रेखाविष्करण करून किंवा डोळयाच्या नजरेतील रेखीव तेजस्विता दाखवून करताना, चित्रकार आपल्या हस्तकुशलतेचेही वैशिष्टय प्रगट करीत असतो. निसर्गाकडे पहावयाचे आणि स्वतःस त्यातील आकलन झालेले सौंदर्य रंगकुंचल्यानी जगास पटेल असे मांडावयाचे, ही चित्रकारी म्हणजे कवितेचे रसग्रहण करून त्यातील आनंद अन्य रसिकाना अनुभवू देणारी समजावणीच ! येथे कल्पनाशक्तिला आणि शिकवणीला भरपूर वाव असतो.

पंडितजी सातवळेकरांची चित्रकला स्वतंत्र व मनोवेधक पद्धतीची आहे. मुंबईस ते चित्रकलेच्या शिक्षणासाठी असताना, " ते जेव्हा सुटीत सावंतवाडीस परत येत

तेव्हां त्यांची कामे आम्हास बघावयास मिळत आणि आम्ही खरोखरीच थक्क होऊन जात असू. " असे पंडितजींच्या सावंतवाडी येथील परिसरातूनच उदयास आलेले सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सा. ल. हळदणकर यानी नमूद केले आहे. पंडितजींची व्यक्तिचित्रे आणि इतर कामे अत्यंत काटेकोरपणाने केलेली असत. त्यांची स्केचेस ( शीघ्रचित्रणे ) हजारो तऱ्हानी त्यानी बोलकी केली होती.

सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ( मुंबई ) मधील चित्रकला–शिक्षक, प्रशिक्षण–विभागाचे प्रमुख व प्राध्यापक श्री श्री. ह. शहाणे लिहितात की—

" सर जे. जे. कलाशाळेच्या सध्याच्या ( १९६६ ) डिप्लोमा वर्गात पावडरीने काळ्या–पांढऱ्या रंगात केलेली काही तत्कालीन ( १८९२ ते १९०० ) व्यक्तिचित्रे ( Life Drawings ) लावलेली आहेत. पंडितजींचे काम त्या स्वरूपाचे असे. बाह्यरेषेचा अचूकपणा, छायाप्रकाशाचे योग्य दर्शन, चित्र परिपूर्ण करण्याची हातोटी व नीटसपणा ही त्यांच्या कामाची खास वैशिष्ट्ये होती.

" व्यावसायिक चित्रकार म्हणून पंडितजींची जी चित्रे उपलब्ध आहेत त्यात प्रामुख्याने व्यक्तिचित्रांचा आणि निसर्गचित्रांचाच भरणा आहे. ती सर्व तैलरंगात रंगविलेली आहेत. त्यांनी काढलेली प्रसंगचित्रे ( Compositions ) पहावयास मिळाली नाहीत. त्यांच्या शीघ्र-चित्रणापैकी काही थोडीच सध्या उपलब्ध आहेत. पंडितजींनी चित्रकलेचा व्यवसाय म्हणून स्वीकार केल्यावर अर्थातच व्यक्तिचित्रे रेखाटणे हाच त्यातील प्रमुख भाग होणे साहजिकच होते. त्या काळी ( १९०० ते १९१८ ) भारतीय जनतेला पाश्चात्य चित्रकला–पद्धतीची ओळख नुकतीच झालेली होती. छायाप्रकाशांच्या चित्रणाने येणाऱ्या उठावदारपणाकडे व सादृश्याकडे जनतेचे आणि विशेषतः धनिकांचे लक्ष आकृष्ट झालेले होते. सरकारने निर्माण केलेल्या ठिकठिकाणच्या कला–शाळातून पाश्चात्य पद्धतीच्या चित्रकलेचेच शिक्षण दिले जात होते. राजा रविवर्मा यानी त्याच काळात अस्सल भारतीय विषय— धार्मिक, पौराणिक वा सामाजिक— पाश्चात्य पद्धतीने रेखाटून अखिल भारतात त्या पद्धतीबद्दल औत्सुक्य आणि आवड निर्माण केली होती. पंडितजींनीही ··· आपली व्यक्तिचित्रे···छायाचित्रणाचा आणि यथार्थदर्शनाचा उपयोग करून केली आणि परिणामतः त्यांना अमाप प्रसिद्धि आणि पैसा यांचा लाभही झाला. सादृश्य आणि वास्तववादी चित्रण ही त्यांच्या व्यक्तिचित्राची वैशिष्टये असली तरी केवळ बाह्य सादृश्यावरच त्यांचा भर नाही, हे मात्र येथे लक्षात घेतले पाहिजे. चित्रविषय पाहून चित्रकाराला जे काय वाटले ते व्यक्त करण्याचा प्रयत्न त्यानी आपल्या व्यक्तिचित्रातून केला आहे, हे त्यांची चित्रे सूक्ष्मपणे पाहिल्यास दिसून येईल. या दृष्टीने त्यांची शैली इम्प्रेशनिस्ट प्रणालीला जवळची आहे असे म्हणता येईल. व्यक्तीच्या चेहऱ्याला आणि भावदर्शनाला प्राधान्य, रंगसंगति इत्यादि दुसरी वैशिष्टये त्यांच्या व्यक्तिचित्रात आढळतात.

"पंडितजींच्या खास आवडीचा विषय म्हणजे निसर्गचित्रण.··· त्यांनी नगाधिराज हिमालयाच्या यात्रा पुष्कळ वेळा केल्या. तेथील अनुपम सृष्टिसौंदर्याची त्यानी पुष्कळ टिपणे केली. त्यापैकी काही औंधच्या श्री भवानी–म्युझियममध्ये लावलेली आहेत. ज्या निसर्गदृश्याचे चित्रण करावयाचे, त्या दृश्याच्या स्थळाची योग्य निवड प्रथम करावी लागते. पंडितजींनी ... निसर्गचित्रणासाठी केलेली विशिष्ट स्थळांची निवड अगदी निर्दोष आहे. भारतातील निसर्ग हा रंगाच्या बाबतीत समृद्ध आहे. विपुल सूर्यप्रकाशामुळे आपल्याकडील निसर्गातील रंग मूळच्या भडक छटातून दिसून येतात; उत्तरेकडील पाश्चात्य राष्ट्रात आढळणारे धूसर वातावरण येथे क्वचितच आढळते. पंडितजींच्या निसर्गचित्रात निसर्गाचे यथातथ्य प्रतिबिम्ब दिसून येते. योग्य व शोभणाऱ्या रंगांची उदारपणे केलेली उधळण त्यांच्या चित्रात पहावी !

"तैलरंगाने रंगविण्याच्या त्यांच्या पद्धतीत दोन प्रकार दिसून येतात. काही चित्रे मुद्दाम नीटसपणे पूर्ण केलेली आढळून येतात, तर काहीतील चित्रण जोरदारपणे कुंचल्याच्या फटक्याने केलेले दिसते. दोन्ही पद्धतीत वातावरणाचा भास निर्माण करण्याचे त्यांचे कौशल्य अप्रतिम आहे. औंधच्या म्युझिअम–मधील एवरेस्ट ( गौरीशंकर ) शिखराची दोन भव्य, अनुपम परंतु अपूर्ण चित्रे या विधानाची साक्ष देतील. मोठ्या कुंचल्याने मारलेल्या फटक्यातून पांढऱ्या, निळ्या, हिरव्या रंगाचा केलेला खेळ प्रेक्षकाला थक्क करतो. दुसऱ्या एका मोठ्या चित्रात त्यानी अमृतसरचे सुवर्णमंदिर चितारले आहे. मंदिराच्या सोनेरी पत्र्यावर सूर्यकिरण पडून निर्माण झालेली दिव्य शोभा, निळ्या, पारदर्शक पाण्यात पडलेले मंदिराचे प्रतिबिंब, रंगांची शुद्धता आणि वातावरणाची शुचिता, सर्वच काही अपूर्व !"

वेदविद्येच्या संशोधनासाठी १९१८ साली पंडितजींनी औंधास आल्यावर, चित्रकला हातावेगळी केली. तरीही श्री शहाणे लिहितात—

"वीस वर्षे चित्रकार या नात्याने संन्यासवृत्ति स्वीकारल्यानंतरही आपल्या चिरंजीवाना चित्रकलेचे धडे देत असताना त्यांचे काम पाहण्याचा योग अनेक औंधवासियाना आला. एवढ्या प्रदीर्घ कालानंतर हाती घेतलेला ब्रश पंडितजी तेवढ्याच ( पूर्वीच्याच ) आत्मविश्वासाने व सफाईदारपणे हाताळत असत. सुमारे १८"–२४" या आकाराची चित्रे ते बसल्या बैठकीत पूर्ण करीत. औंधच्या परिसरात— विशेषतः विशाळबागेत— त्यानी करून दाखविलेली निसर्गचित्रणाची प्रात्यक्षिके अनेक दृष्टींनी संस्मरणीय होती. त्यातील काही उत्कृष्ट चित्रे श्री शं. वा. किर्लोस्कर यानी आपल्या ( किर्लोस्करवाडी ) कारखान्याच्या दिनदर्शिकेवर छापली होती. श्रीमंत औंधकराबरोबर त्यांच्या बंगल्यात ते महाबळेश्वरी चारपाच दिवस खास निसर्गदृश्ये रेखाटण्यासाठीच राहिले होते. वर दिलेल्या आकाराची

( १८"–२४" ) तीन तैलरंगी चित्रे दर दिवशी ते पूर्ण करीत. त्यापैकी बागेतील फुलांच्या ताटव्याचे एक रमणीय चित्र गेल्या ( १९६५ ) वर्षी भरलेल्या मुंबई–आर्ट सोसायटीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त भरलेल्या प्रदर्शनात लावलेले होते. "

पंडितजींनी कलेसाठी केलेली तपश्चर्या अतुल्यच. श्री शहाणे लिहितात—

" एकदा औंधच्या राजेसाहेबाकडे दिलेल्या फोटोबरहुकूम हस्तिदंतावर व्यक्तिचित्रे रंगविणारा एक कलावंत दिल्लीहून आला होता. एकदोन दिवसात साधारणपणे ३"×२" आकाराच्या हस्तिदंताच्या सपाट तुकड्यावर तो एक रंगीत व्यक्तिचित्र हुबेहूब रंगवीत असे. तो असे चित्र एवढ्या थोड्या अवधीत कसा रंगवतो याचे सर्वांना आश्चर्य वाटे. त्यावेळी रा. ब. धुरंधरांचाही तेथे मुक्काम होता. फोटोग्राफीचा उपयोग करून तो कलावंत हे काम करीत असावा, अशी बऱ्याच जणाना शंका होती. पंडितजी, धुरंधर, औंधचे चित्रकार देवधर इत्यादि मंडळी राजेसाहेबापाशी बसली असता, बोलण्यात याची शहानिशा करणाचे ठरले. त्यापैकी एका चित्राचा भाग पुसून खरी गोष्ट काय ते पहावे या हेतूने तसे करण्यात आले. पण खाली फोटो वगैरे प्रिंट काही नव्हते. पण ते चित्र मात्र खराब झाले. राजेसाहेब त्यामुळे थोडे रुष्टच होते. पण करणार काय ? तो चित्रकार तर केव्हाच निघून गेलेला होता. मग दुरुस्ती कोण करणार ? शेवटी पंडितजींनी ते काम स्वतःकडे घेतले व अगदी लहान ब्रश घेऊन अत्यंत मेहनतीने ते चित्र होते तसे पूर्ण करून दिले. मिनिएचर चित्रातील बारकाव्यांची ज्याना कल्पना आहे, त्याना वयाच्या साठ वर्षानंतर तसले चित्र रंगविणे म्हणजे किती दुर्घट गोष्ट आहे याची कल्पना येईल.

" पंडितजी कलेच्या बाबतीत मुळीच सनातनी नाहीत. ··· मुंबईस भरलेल्या युरोपियन चित्रकारांच्या प्रदर्शनातून औंधच्या म्युझियमसाठी चित्रे विकत घेण्याच्या कामासाठी औंधच्या राजेसाहेबानी त्यांना पाठविले. एक सूर्यास्ताचे व एक पाणवठ्याचे अशी दोन चित्रे त्यानी घेतली. ··· ती अजूनही औंध–म्युझिअममध्ये आहेत. त्यांच्या उत्कृष्टपणाबद्दल कोणाचेच दुमत नाही.··· पंडितजी शिकत असता प्रि. ग्रिफिथसाहेबानी अजंठ्याच्या चित्रांच्या प्रतिकृति तयार करवल्या व भारतीय चित्रकलेचे महत्त्व जगाला पटविले. त्याचा पंडितजींच्या चित्रकलेवर परिणाम झाला. त्यांना भारतीय चित्रकलेचा रास्त अभिमान आहे. "

श्री शहाणे यानी चित्रकार सातवळेकरांचे काढलेले हे शब्दचित्र औंध येथेच श्री शहाणे यांचे सहवासी असलेले श्री पाटील या हल्ली महाराष्ट्रसरकारकडे क्रॅफ्ट्स् सुपरिंटेंडन्ट असलेल्या चित्रकलातज्ज्ञासही संमत आहे.

व्यक्तिचित्र किंवा प्रतिमाचित्रण ही पंडितजींच्या चित्रकलेची एक विशेष लकब आहे, हे श्रीमंत औंधकरांच्या लक्षात १८९५–१८९७ च्या काळातही आले होते;

म्हणूनच श्रीमंतानी प्रतिमाचित्रणाचा अभ्यास त्याकाळी व्यवहारशुद्धच केला. ते आपल्या आत्मचरित्रात सांगतात की—

" अनेक लोकांचे पोर्ट्रेट्स् पुढे बसवून काढले. परशुराम सखाराम दफ्तरदार, दत्तात्रय मेहेंदळे, नारायण गोसावी, संत भटजी जोशी, दत्तोपंत चितारी आणि त्यातच सोनबा सातवळेकरांचाही पोर्ट्रेट काढला. ··· हात वळविण्यासाठी, लाइट–शेड समजण्यासाठी पुढील अभ्यासाला पोर्ट्रेट–पेंटिंगच्या अभ्यासाचा उपयोग झाला. "

श्रीमंतांच्या या मताबरोबरच पंडितजींच्या मताचाही विचार अभ्यास–सहाय्यक होईल. पंडितजींचे सांगणे असे की— " कोणत्याही चित्रात मधल्या हवेचा आभास रंगानी दाखवता आला पाहिजे. " चित्रकाराला अभिजात सौंदर्यदृष्टी असेल तर त्याला साधे दृश्यही पुरेसे होते, असे पंडितजींचे मत आहे. **" काचेमधूनी दिसते जनांला । धोंड्यामधूनी दिसते कवीला ॥ "** तसेच चित्रकलेतही आहे. एकादे जुने झाड, घर, रस्ता पाहून त्यातील स्वतः अनुभवलेले सौंदर्य जगाला आपल्या रंगतीने प्रत्ययास आणून देण्यात चित्रकाराचे खरे कौशल्य आहे, असे पंडितजी सांगतात. मायकेल आंजेलो आणि राफायल या इटालियन चित्रकाराबद्दल पंडितजीस जिव्हाळा. अजिंठा–वेरुळाच्या चित्रामधील आकृतींच्या लहान मोठेपणाला त्यानी " स्पिरिच्युअल परस्पेक्टिव्ह " असे नाव दिले आहे. फ्रान्स हा सौंदर्याचा चाहता देश म्हणून तेथील चित्रकलोत्तम ओ. हेन्रीची प्राथमिक पुस्तके पाहून आपल्या कला-विलासाला सुरवात करणाऱ्या सातवळेकरांच्या चित्रणाचे वैशिष्टय हे की प्रतिमा-चित्रणात पंडितजींना जे त्या चित्रीभूत होणाऱ्या व्यक्तिचे व्यक्तिमत्व वा विशेष वाटले असेल त्याचा आविष्कार चित्रातील नजरेत ते करतात.

कलेने सर्वसाधारण माणसाला आनंद झाला पाहिजे. तशी आनंद देणारी चित्रे पंडितजींचे वडील काढीत असत. ती त्यांची भिंतीवरील चित्रे पाहून सहा वर्षांचा श्रीपादही चित्रे काढू लागला. ती विद्या वाढविता वाढविता मुंबईस चित्रकलेचे शिक्षण पुरे करीत असता, पॅरिसला जाऊन चित्रकला शिकावी अशी श्रीपादरावाना इच्छा झाली होती; पण **" उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः । "**

ऐतिहासिक, पौराणिक व आध्यात्मिक चित्रे काढण्याची मनापासूनची आवडही परिस्थितीने बाजूस सारून पंडितजींनी – व्यवहारी पंडितजीनी काढलेल्या चित्रात पीठापुरम् येथील व औंध येथील चित्रे सर्वोत्कृष्ट आहेत. कला ही खरोखर आत्म्याची लीला आहे, हे त्यावरून पटते. पंडितजी सांगतात, " कलाप्रेमी चित्रकारांचा काल महाराष्ट्रात अजून यावयाचा आहे. ··· प्रयत्न करावयाचा असेल, तर उच्च ध्येय चित्रात प्रतिबिम्बित होईल असा प्रयत्न करीत जावे. " ( जीवनप्रकाश पहा. ) इतके सगळे सांगूनही पंडितजींना आणखीही सांगावयाचे आहे, ते हे की—

" राष्ट्रीय कलेच्या पावित्र्यरक्षणासाठी चित्रकारानी व्यक्तित्वाची आहुति दिलेली जशी हिंदी चित्रकलेमध्ये दिसते, तशी ती इतरत्र कोठेही दिसत नाही. " ( जीवन-प्रकाश पहा. ) " जरी हिंदी चित्रकलेमध्ये महाराष्ट्र, रजपूत, मोगल, कांगडा, वगैरे दहापाच शाखा असल्या तरी त्या शाखामधील भेद डोळ्यांची ठेवण, रेषेचा नाजूकपणा वगैरे गोष्टीवर अवलंबून आहे. " ( जीवनप्रकाश. )

चित्रकलेच्या शिक्षणात हे उतरवून दाखवणे ही देखील एक कला आहे. एरवी, नुसत्या कल्पनेच्या भराऱ्या मारून शब्दांच्या फुलबाज्या उडविण्यात काय व्यवहारिक गम्मत असणार ? जे तत्त्वज्ञान अगर कलेतील कौशल्य व्यवहारात आणता येत नाही, ते ग्रंथालयाच्या कपाटात धीमेपणाने बसणाऱ्या सुंदर ग्रंथाप्रमाणेच शोभायमान ठरते. कलेला वा कलाविषयक वाङ्मयापासून सर्व सचोटचाना व कसौटचाना नुसते शोभायमान राहून चालत नाही. राष्ट्राची उंची जशी त्यातील विद्वानावरून अजमावतात, तशीच कलावन्तांच्या व्यावहारिक वितरणावरूनही अजमावतात. त्या दृष्टीने चित्रकला, शिल्पकला यांचे शिक्षणही देशातील होतकरू तरुणाना आपल्या कल्पनेप्रमाणे देता येणे आवश्यक असते. त्यासंबंधी पंडितजीच सांगतात–

" चित्रकला घरी शिष्य घेऊन शिकवता येते. फोटोग्राफीही तशीच शिकवता येते. या दोनही कलांचे शिक्षण मी पुष्कळ शिष्याना दिलेले आहे व ते त्या कलेवर आपली जीविका उत्तम रीतीने चालवीत आहेत, हे पाहून मला फार आनंद वाटतो. पंजाबमध्ये लाला हंसराज सबरवाल यानी फोटोग्राफीचे माझे दुकान विकत घेतले व ते उत्तमरीतीने चालवून हजारो रुपये मिळवले. हे आता प्रतिष्ठित नागरीक म्हणून पेप्सुमध्ये सुखाने रहात आहेत. श्री नारायणराव वीरकर हे असेच दुसरे शिष्य मुंबईस आपला धंदा उत्तम रीतीने चालवीत आहेत. तिसरे शिष्य म० रूपकृष्ण हे हिंदी चित्रकलेत प्राविण्य संपादून विलायतेत गेले. तेथे फ्रेंच रमणीशी विवाहित होऊन तिकडे ते आपल्या कलेवर नावारूपास आले आहेत. असे अनेक शिष्य पंजाबमध्ये होते. त्याचा फाळणीने सध्या पत्ता लागणे कठीण आहे.

" अजमीरच्या अनाथालयामधून आनंद व गोवर्धन ही दोन अनाथ मुले १५।१६ वर्षांच्या वयाची आणून त्यास फोटोग्राफीचे शिक्षण देऊन तयार केली. ती पंजाबमध्ये उत्तम धंदा चालवीत होती, पण सध्या ती कोठे आहेत ते समजत नाही. आनंद हा पेशावरचा अनाथ. तो रावळपिंडीला धंदा करून होता, व तेथे म्युनिसिपालिटीचा माननीय सभासद झाला होता. गोवर्धनाने फोटोग्राफीबरोबर पौरोहित्यही शिकून घेऊन तेही कार्य तो करीत असे व आर्यसमाजामध्ये प्रतिष्ठाही त्याने प्राप्त केली होती. असे नावारूपास आलेले २० तरी माझे शिष्य पंजाबमध्ये होते. त्यापैकी एक डॉक्टर होऊन दिल्लीस उत्तम दवाखाना काढून

तो तो उत्तम रीतीने चालवीत होता. डॉ. नीलाम्बर जोशी हेच ते सुप्रसिद्ध डॉक्टर होत. हे आल्मोडयाला जे महाराष्ट्रीय गेले त्यापैकी होत. माझ्या सर्व-शिष्यामध्ये वॉटरकलरचे चित्र तयार करण्यात यानी फारच प्राविण्य संपादन केले होते. फाळणीच्या दंग्यात एका यवन डॉक्टरने, यांचा उत्कर्ष सहन न झाल्या-मुळे, त्याना गोळी घालून दिल्लीच्या दवाखान्यातच, रोग्याची सेवा करीत असता, ठार केले ! हे ऐकून मला अत्यन्त वाईट वाटले व माझा बन्धुच गेला असे मला दुःख झाले.

" श्री शंकरराव किर्लोस्कर हे महाराष्ट्रीय शिष्यामध्ये अत्यंत बुद्धिमान व चित्रकला व फोटोग्राफीमध्ये जिवंत अक्कलहुषारीने अद्‌भुत कलेचे नाविन्य उत्पन्न करण्यात अत्यंत प्रवीण. लाहोरास हे माझ्याकडे सुमारे दोन वर्षे होते व ते कोठेही चित्रकलेमध्ये पुढे आले असते. यांची बुद्धिमत्ता कुशाग्र व सर्वतोगामी. यांच्या रेषेमध्ये कला स्वयंसिद्ध. किर्लोस्करवाडीच्या किर्लोस्कर–कारखान्याचे मॅनेजर म्हणून त्यानी उत्पाताच्या ( १९४८ ) काळातही कौशल्याने कारखाना सुरक्षित ठेवून सुव्यवस्थित केला.

" शिष्यामध्ये काही शिष्य नाठाळही भेटले. एक शर्मा नावाचा पंजाबी शिष्य. आमच्या घरी दोन वर्षे राहिला. वॉटरकलर, ऑईल--कलर व शेडिंगचे काम शिकला. तयार झाला व लाहोरभर आपण पार्टनर आहो असे सांगू लागला ! मी ऑर्डरी आणतो, काम करतो त्यामुळेच पंडितजींचे चालते, अशा कंड्या तो लाहोरात पिकवीत असे. शेवटी त्याला घरातून काढण्याचा यत्न केला. तो जाईना. मारामारीची पाळी त्याने आणली. त्याने आपले भाऊ व मित्र आणले. आरडाओरड केली. पोलीस आणून दुकानास कुलूप ठोकण्यापर्यंत पाळी आणली. माझा लाहोरमध्ये परिचय कमी, त्याचा मोठा; त्याचा त्याला फायदा मिळाला. दुकानाची किंमत पंचानी करून अर्धी किंमत १० हजार रु. त्यास देऊन त्याचा संबंध तोडावा लागला ! !

" वास्तविक त्याने काही एक काम केले नव्हते. पण त्याने अशी परिस्थिति मला न कळत, माझ्या घरात राहून बनवली, की शेवटी मला इतकी रक्कम देऊन भांडण तोडावे लागले.

" माझ्या एकंदर आयुष्यात असे नाठाळ शिष्य मला ४।५ भेटले. यांच्यामुळे माझी एकूण १८००० अठरा हजार रुपयांची हानि झालेली आहे; पण मी यात त्यांचा दोष समजत नाही. व्यवहारशून्यतेचा माझाच मोठा दोष त्यात मला स्पष्ट दिसत आहे. इंग्रजी सरकारच्या कोर्टात आपण म्हणून दाद मागण्यास जावयाचे नाही, हे माझे ध्येय ठरलेले होते. यामुळे मला हे नुकसान सोसावे लागले; पण मला त्याचे दुःख वाटत नाही. धन मिळत होते ते ध्येयासाठी खर्च झाले. मला त्याबद्दल कधीही वाईट वाटले नाही.

" कोर्टात इंग्रजाकडे न्याय मागावयाचा नाही या ध्येयाचा माझा हट्ट तारुण्यापासून होता. नोकरीसुद्धा इंग्रजांची करावयाची नाही, इंग्रजी कपडा वापरावयाचा नाही, असे माझे हट्ट होते. पुढे पुढे मी चित्रकलेसाठी फ्रेंच रंग पारीसहून मागवीत असे; पण शक्य ते करून इंग्रजी माल घेत नसे.

" लाहोर आर्यसमाजामध्ये काही कारणाने मारामारी झाली. आर्यसमाजाचे सर्व सभासद दाद मागण्यासाठी कलेक्टरकडे गेले होते. फक्त मीच एकटा गेलो नव्हतो. मी सर्व सभासदास सांगितले होते की, आर्यसमाजाच्या सदस्याने कोर्टात जाता नये. आपसात पंचायतीने निकाल लावून घेतला पाहिजे. इंग्रज कोर्ट आर्यांचा निकाल करणार नाही. हा माझा हट्ट होता. असो.

" माझ्या शिष्यापैकी श्री रामकृष्ण वामन देऊस्कर हे एक उत्तम व जीवश्चकंठश्च स्नेही हैदराबादला चित्रकार होते. हे उत्तम व निष्कपट स्नेही असून उत्तम चित्रकारही होते. यानी इटलीस जाऊन चित्रकलेमध्ये उत्तम प्राविण्य प्राप्त केले. तेथे त्यानी एका बंगाली मुलीशी स्वयंवर विवाह केला. तेथून येऊन हे पुष्कळ वर्षापासून हैदराबादेस स्थायी झाले होते. "

पंडितजींच्या शिष्यापैकी, ज्यांची आहुति फाळणीच्या दंग्यात पडली ते डॉ. जोशी हे विख्यात होते. दिल्ली येथील दंग्यात कुरेशी नावाच्या एका मुसलमान डॉक्टराने खून केला, ते डॉ. जोशी जलरंगात असामान्यपणे निपुण होते. कलकत्त्याचे शैलज मुकर्जी यांच्या चित्रात कल्पनेची तरलता व चैतन्य प्रामुख्याने आढळून परंपरा व तंत्र याना धरून चित्रसौंदर्य गाठण्याची हातोटी आहे, तशीच डॉ. जोशी यांचे जवळ होती.

## वेदवाङ्मयाकडे वळण्याची स्फूर्ति

मग, पंडितजींनी चित्रकला हातावेगळी करून वेदवाङ्मय प्रसाराला का वाहून घेतले, हा प्रश्न उत्सुकांना पडेलच पडेल. आर्टजर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या पंडितजींच्या मुलाखतीत ( एप्रिल १९६६ ) त्यांनीच स्पष्टीकरण केले आहे. ते सांगतात की—

" मी चित्रकला हातावेगळी केली ती कथा अगदीच वेगळी आहे. जेव्हा मी चित्रे काढीत असे, तेव्हासुद्धा माझा फुरसतीचा वेळ मी वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासात घालवीत असे. लाहोरला असताना स्वामी दयानंद आणि श्रद्धानंदजीसारख्या विभूतींचा मला संपर्क साधता आला. माझ्या भवितव्याच्या समतोलाचे ते टिपणच होते. चित्रकलेने माझ्या कर्तृत्वाला कुंपणेच पडतील असे मला वाटू लागले ! माझ्या चित्रांचा मोबदला देऊ शकतील अशा मूठभर लोकांचीच सेवा समाजात मी काय ती करू शकत होतो. पण वैदिक वाङ्मय म्हणजे महासागर व मी करीन ते काम थोडेच होते, म्हणून मी जो आता काही आहे, तो झालो— वैदिकाभ्यासात बुडी देऊन, प्रत्येक माणसाच्या आटोक्यात तो अभ्यास आणण्यासाठी मी जगू लागलो. "

*

पंडितजींची ही प्रेरणा व प्रवृत्ति स्फुर–प्रकाश ( फॉस्फोरेसेन्स ) या शास्त्रीय चमत्काराची आठवण करून देते. ज्वलंत न होता प्रकाशमय होण्याची पदार्थातील शक्ति म्हणजे स्फुर–प्रकाश. काजव्यांची चमक, समुद्रातळाच्या गाढ अंधारातील स्वयंप्रकाशी मासे, अशी त्याची परिचयाची उदाहरणे आहेत. पंडितजींच्या चित्रकलेचे व तिच्यातील चिकित्सेचे तेज बिलकूल कमी न होता, वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासाने पंडितजी सर्व जगभर गाजले.

चित्रकारी व तिचे विश्लेषण यातून बाहेर पडलेले पंडितजी वेदांच्या संशोधनात एवढे गढून गेले की, विवेकानंदांचा आणि मॅक्समुल्लर यांचा वारसा त्यांनी चालविला, तो तेजस्वीपणाने चालविला आहे. पंडितजी लिहितात की—

" मी वेद शिकणारे शिष्य मिळतील अशी अपेक्षा करीत आहे; पण तसा अभ्यासू शिष्य मला कोणी अजूनपर्यंत मिळाला नाही. जे आले ते मेहनत करण्यास कंटाळून निघून गेले. परिश्रमावाचून शिकण्यासाठी जशी पुस्तके पाहिजेत तशी ती अजून झालेली नाहीत. यामुळे काही वर्षे वेदाभ्यास हा कष्टदायकच वाटणार आहे. त्यास इलाज नाही. असे परिश्रमी विद्यार्थी वेद शिकण्यासाठी मिळावे अशी पुष्कळ इच्छा आहे. "

: ३६ :

# राजकारणी पंडितजी

माझे उपासनेचा बडिवार । ज्ञान सांगावे साचार ॥ —समर्थ रामदास

समहमेषां राष्ट्रं स्यामि समोजो वीर्यं बलम् ।
वृश्चामि शत्रूणां बाहूननेन हविषाहम् ॥ अथर्व. ३।१९।२

( ' यांच्या राष्ट्राला मी तीक्ष्ण करतो; यांचे सामर्थ्य, वीर्य व बल मी तीक्ष्ण करतो. मी शत्रूचे बाहू कापून टाकतो. या हवनाने मी हे सर्व करतो. ' — वसिष्ठ )

## लोकमान्यांच्या विचारसरणीचा प्रभाव

**पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकर** हे वेदोनारायण आहेत. पुष्कळांच्या परिचयाचे आहेत; पण ते राजकारणात प्रत्यक्ष भाग घेऊन " **यः क्रियावान् स पंडितः ।** " असे राष्ट्रभक्त पंडित आहेत, हे मात्र फारच थोड्या लोकांच्या गावी आहे. पंडितजींची मुंज नरसोबाचे वाडीस झाली. त्यावेळी वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र उठाव सुरू करून, गाणगापूरापर्यंत आपले नाव केले होते. ते श्रीपाद दामोदरांच्या कानावर होते. पुण्याहून कैदी म्हणून दोर लावून नेलेल्या वासुदेव बळवंतांकडे लोक मोठ्या आदराने पहात होते. केसरीच्या पहिल्या ( १८८१ ) वर्षात आलेले हे वर्णन श्रीपादांच्या कानावर आणि डोळ्यावर होते. १८९० साली चित्रकलेच्या शिक्षणासाठी मुंबईस मुक्काम करताना श्रीपादराव सातवळेकरांना स्वार्जिताने उर्जितावस्था आणावयाची होती. त्यामुळे त्यांना लोकसंपर्क साधावा लागे. तो साधताना लो. टिळक व ना. गोखले काँग्रेसच्या द्वारा जे राजकीय हक्क भारतीयास मागत होते, त्यातून सातवळेकरांची विचारधारा राजकीय क्षेत्रात संचार करू लागली होती. भिवंडी व येवले येथे १८९१ त जे हिंदु–

मुसलमानांचे दंगे झाले, त्यावरून "फोडा, झोडा व राज्य करा" या इंग्लिश नीतीवर विवेकी संपादकांनी ओढलेले कोरडे श्रीपादरावांच्या चित्ताचा वेध घेत होते. त्यातून १८९३ मध्ये लो. टिळकांनी सार्वजनिक गणपत्युत्सव सुरू केला. सार्वजनिक जीवनाला "परमेश्वराच्या अधिष्ठानाची"— अध्यात्माची जोड देण्याचा त्या उत्सवाचा जसा हेतु होता, तसाच "भारतीय तेवढा एक— जिव्हाळ्याच्या संस्कृतीने, ऐतिहासिक परंपरेने आणि निगडित हितसंबंधाने"— असे लोकशिक्षण करण्याचाहि टिळकांचा हेतु असून, लोकनेता लोकांच्या कर्तबगारीबद्दल पाठ थोपटणारा जसा पाहिजे, तसाच त्यांच्या घसरगुंडीबद्दल त्यांचे कान धरून वळण लावणारा पाहिजे; एवढेच नव्हे तर समाजाचा "निश्चल धृतिधारक" हि हवा. हे समाजमनात बिंबवण्याचाहि टिळकांचा हेतु होता, हे सातवळेकरांच्या लक्षात येऊ लागले होते. त्यातून १८९३ हे साल भारताच्या राजकारणाच्या दृष्टीने क्रांतिकारकच होते. त्यासाली दादाभाई नौरोजी ब्रिटिश पार्लमेंटात निवडून येऊन "हिंदुस्थानचे घोर दारिद्र्य" ब्रिटिश साम्राज्याने चालविलेल्या कायदेशीर लुटीमुळे झाले आहे, असे जागतिक लोकमतावर ठसवित होते. बाबू अरविंद घोष आय्. सी. एस्. ची परीक्षा नापास होण्याची व्यवस्था लावून हिंदुस्थानांत लोकजागृति करूं लागले; आणि "जुन्या जागी नव्या दिव्यांची" गरज प्रतिपादन करताना, नवा युगपुरुष लो. टिळक असल्याचा सूचक प्रचारहि करू लागले होते. लो. टिळकांनी १८९६ पासून शिवाजी उत्सव सुरू करून ऐतिहासिक परंपरेने लोकात स्वराज्य मिळविण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करण्याचा विडा उचलला होता. १८९७ साली दुष्काळ व विशेषत: प्लेग यानी ग्रस्त झालेल्या जनतेच्या नाकावर टिच्चून व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाला ( इंग्लंडातील ) साठ वर्षे झाली म्हणून उत्सव करणाऱ्या व करावयास लावणाऱ्या इंग्रज सरकारबद्दल जनतेत एवढी चीड उत्पन्न झाली होती की, प्लेगच्या निमित्ताने पुण्यात अरेरावी गाजविणारा कलेक्टर रँड याला इंग्रजी साम्राज्यशाहीचा प्रतिनिधि म्हणून राज्यारोहण समारंभाच्या दिवशीच चाफेकर बंधूनी ख्रिस्तवासी केला ! ! त्याने चिडलेल्या इंग्रजी अमदानीने लो. टिळकांवर राज्यद्रोहाचा खटला केला आणि चाफेकराना फासावर लटकाविले. उघडे डोळे व कान ठेऊन, या सर्व घटनांचे प्रबोधन घेणाऱ्या तरुण मेंदूना मग, "**असुनि खास मालक घरचा, म्हणति चोर त्याला।**" अशी पाळी आणणारे पारतंत्र्य, अस्तंगत करण्याची बुद्धि होऊ लागली. परिणामत: नाशिकला "अभिनव भारता" ची स्थापना झाली व बंगालकडे सशस्त्र उठावाचे गुप्त कट बीजरूपाने चमक घेऊ लागले. एवढेच नव्हे तर खुद्द पुण्यात श्री. शिवरामपंत परांजपे यांचा "काळ" सशस्त्र क्रांतीचे तंत्रमंत्र भावनाप्रधान तरुणाना शिकवू लागला. या सुमाराला बोअर युद्धातील गनिमी काव्याच्या लढाईचे पडसाद केसरीतून उमटू लागले. हरिभाऊ आपट्यांची 'उष:काल' कादंबरी तरुणांचा वेध घेऊ लागली आणि रूसो–जपानी

युद्धाचे पडघम वाजू लागल. या सर्व घडामोडीचे सादपडसाद मुंबईत आपल्या मेंदूवर चिकित्सापूर्वक घेऊन, १९०१ साली आपल्या चित्रेकलेच्या धंद्यासाठी श्रीपादराव सातवळेकर दक्षिण हैदराबादेस आले. तेव्हा त्या सादपडसादास अनुकूल असेच वातावरण त्याना तेथे आढळले.

## आधी केलेचि पाहिजे

चाफेकर बंधूपैकी 'बाळकृष्णा'स तिकडे एका डोंगरमाथ्यावर सुरक्षित संभाळण्याचे काम न्या. कोरटकरांनी लो. टिळकांच्या सांगीप्रमाणे केल्याचे सातवळेकरांना आढळले. "माझे रामायण" कर्ते दत्तो अप्पाजी तुळजापूरकर व सौ. सरोजिनी नायडूंचे पिताजी डॉ. अघोरनाथ चट्टोपाध्याय ही मंडळी इंग्रजी राज्याच्या कचाटयातून हिंदुस्थान लवकरात लवकर कसा मुक्त होईल, याची चिंता करताना आढळली. आणि त्यातच लो. टिळकांनी रूसो–जपानी युद्धात जपानने जय मिळवून आशियाटिक राष्ट्र युरोपीय राष्ट्राचा नक्षा उतरवू शकते, हे जपानच्या अभिनंदनाच्या निमित्ताने जनमनावर ठसविण्याचा प्रयत्न चालविला होता, तोहि सातवळेकरांचे मन ओढू लागला होता.भरीत भर म्हणून लो. टिळकांची स्वराज्य–चतुसूत्री प्रसिद्ध झाली; आणि "**प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता**" अशी हिंदुधर्माची व्याख्याहि युवकांचा वेध घेऊ लागली. त्यातून १९०५ सालच्या वाराणसीचे कॉंग्रेसमध्ये ना. गोखल्यांनी "माझ्या देशबांधवांच्या आकांक्षास मी मर्यादाच मानीत नाही" असे जाहीर केले. या सर्व वातावरणातील वाऱ्याचा संकलित परिणाम "**आधि केलेचि पाहिजे**" असा विवेकी युवकांवर झाला असल्यास नवल नाही.

## राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यास प्रारंभ

हैदराबादेतील थोरामोठयांच्या साहाय्याने श्रीपादराव सातवळेकरांनी मग 'कृती' ला सुरुवात केली. केदारेश्वरापासून कन्याकुमारीपर्यंत आणि सोमनाथापासून जगन्नाथापर्यंत पसरलेला हिंदुस्थान हा वैदिक परंपरेने आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीने एकसंघ, एकजिनसी आणि एकदिल राष्ट्र आहे; बुद्धोत्तर व विशेषतः सम्राट् हर्षानंतर ते राष्ट्र विस्कळित झाले; ते पुन्हा मन–मेंदू–मनगटाच्या सहकारसमन्वयाने एकदिल व निश्चित बुद्धीचे करावयाचे, म्हणून जी शिक्षणप्रणाली सुरू करावयाची, ते राष्ट्रीय शिक्षण, अशी मनाशी पक्की गाठ बांधून, चित्रकार सातवळेकर स्वतंत्र, स्वाभिमानी, संरक्षणक्षम, स्वावलंबी आणि सत्समावेशक हिंदुस्थानचे चित्र व्यवहारशुद्धतेने साकार करणारे तरुण तयार करावेत म्हणून कामास लागले. त्यांनी विवेकवर्धिनी शाळा सुरू केली, तिलाच जोडून कन्याशाळा काढली, आणि व्यायाममंडळ सुरू करून व्यायामशाळा उभारली. धी, श्री आणि स्त्री यांनी जगात सर्व काळी क्रांति घडविली आहे. दुसरी दोन साधने वापरावयाची नाहीत; "धी" परमेश्वराने दिली आहे तर तिचा उपयोग आपण क्रांतीसाठी केला व करविला पाहिजे, असे

सातवळेकरांच्या मनाने घेतले. म्हणून वरील तीन साधनाबरोबर आणखीहि काही योजना केल्या. विवेकवर्धिनीची व्यायामशाळा म्हणजे बंगालमधील जे तरुण देशा-करता तळहातावर बाँब व परिणामतः स्वतःचे शीर घेऊन " गुप्ते " होत, त्यांचे आश्रयस्थान होऊन बसली होती. स्वतः सातवळेकर वेदातील तेजस्वी ऋचांचा वेच करून, त्यांच्या आधारावर राष्ट्रीय मनाची बांधणी, व्याख्यानप्रवचनानी व लेखानी लोकशिक्षण साधून, उभारू लागले. स्वदेशी म्हणजे जे जे काही भारतीय होते, आहे व करता येईल, ते ते, असे सरळ प्रतिपादून त्याचे व्रत जनतेने एवढ्या कटाक्षाने घेतले पाहिजे की, जे जे म्हणून परकीय, भारतविरोधी, भारतीय होणेच शक्य नाही, त्या त्या मालावर, मनोवृत्तीवर व माणसावर बहिष्कार अगदी आपोआप पण कडकडीतपणे पडावा; एवढेच नव्हे तर जे जे काही आपले ( भारतीय ) नव्हे, त्याच्यावाचून आपले (हिंदुस्थानचे) चालू शकते आणि तरीहि हिंदुस्थान जगातील स्वतंत्र राष्ट्रात आपली प्रतिष्ठा प्रगत राखू शकतो, हे आपल्या वृत्ति–कृतीने जगास दाखवून देणे म्हणजेच स्वदेशी–बहिष्काराचे व्रत सफल करणे होय. सातवळेकरांची अशा अभिप्रायाची वेदाधिष्ठित व्याख्याने डॉ चट्टोपाध्यायांना जेथे जळजळीत निखा-ऱ्यासारखी वाटत, तेथे परकीय ब्रिटिश सरकारला कशी वाटत असतील त्याची कल्पनाच केलेली बरी !

स्वराज्यासंबंधी लोकशिक्षण देताना वैदिक ऋचांच्या आधारावर सातवळेकर लोकशाही स्वराज्यव्यवस्थेचा पुरस्कार तर करीतच; पण नुसता गोरा साहेब जाऊन काळा साहेब येण्याने स्वराज्य होणार नाही; तर भारतीय जनतेपैकी प्रत्येकाला चाललेला राज्यकारभार आपल्या व एकंदर भारताच्या कल्याणासाठी व स्वावलंबी प्रतिष्ठेसाठीच चालला आहे, असा मनोमन विश्वास वाटला पाहिजे; तरच ते खरे लोकशाही स्वराज्य ठरेल, असेहि सातवळेकरांचे प्रतिपादन असे. असे लोकाराधक स्वराज्य, व्हावयाचे तर राज्यसूत्रधार आणि आणि ते ज्यामधून निवडले जातात ते लोकनेते, " **स्नेहं दयां च सौख्यं च ...... आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा।** " असा 'राम' असलेले शीलवन्त लागतात. त्या शीलवन्तांनी " **राजी राखणे सकळ लोक। कठिण आहे।** " हे जागून गुणी जनांचा जसा गौरव केला पाहिजे तसाच शिस्त सुटलेल्याचा समाचार घेतला पाहिजे, तो अशा बेताने की, गौरव वा समाचार लोकांच्या व राष्ट्राच्या अंतीम हिताकरिताच आहे, अशी लोकांना खात्री वाटावी. या सेवायोगाने होणारा लोकसंग्रह लोकनेत्याला कीर्तिकर ठरून राष्ट्राच्या बळकटीचा मणकाच ठरेल.

लोकमान्यांच्या चतुःसूत्रीचे अशा रीतीने विवेचनात्मक अविष्करण वेदाधारे सातवळेकर करीत. ते इंग्रजी राज्यकर्त्यांना सलल्याशिवाय राहिले नाही. " दुही माजवा आणि राज्य करा " या त्यांच्या धोरणाने मग उचल करण्यास सुरुवात

केली. १९०७ च्या सुरत काँग्रेसनंतर लो. टिळकांच्या जहालपक्षीय हालचालींनी अस्वस्थ झालेले सरकार जसे टिळकांच्या पाठशी लागले, तसे टिळकांच्या सेनाग्रगींच्याहि पाठीमागे लागले. त्यातून सातवळेकर कसे सुटणार ? वेदोक्तीने सातवळेकर आपली व्याख्याने सजवितात, याचा अर्थ ब्रिटिश धूर्तांनी निजामशहाच्या मनात असा भरविला की, निजामाने पदच्युत व्हावे म्हणून तेथील काही उमरावांनी उठाव चालविला असून सातवळेकर हे त्यांचे प्रचारक आहेत. एका बाजूने अशी विष–पेरणी चालू ठेवली तरी सातवळेकरांच्या सात्विकतेवरचा कलाप्रिय निजामांचा विश्वास डळमळत नाही, असा अंदाज ब्रिटिशांना आल्याबरोबर, विवेकवर्धिनी प्रशाळा व तिची व्यायामशाळा ही "इंद्राय तक्षकाय स्वाहा" या न्यायाने निजामासह ब्रिटिशांचा शेवट करण्यात गुंतली असल्याचे निजामशहाच्या मनावर ठसविण्याचे प्रयत्न ब्रिटिश रियासतीने सातत्याने केले. ते चालू असतानाच "वैदिक प्रार्थनांची तेजस्विता" हा सातवळेकरांचा लेख कोल्हापूरच्या "विश्ववृत्त" मासिकात प्रसिद्ध झाला ! तो काडीचा आधार ब्रिटिश सरकारला काय कमी होता ? काळातील लेखाबद्दल पराजप्यांना एकोणीस महिन्याची शिक्षा देणारे व केसरीतील लेखाबद्दल लो. टिळकांना सहा वर्षे मंडालेस पाठविणारे ब्रिटिश सरकार सातवळेकरांच्या बाबतीतहि इरेला पेटले आणि सातवळेकरांच्या लेखाच्या निमित्ताने विश्ववृत्तावर कोल्हापूर दरबारकडून खटला भरवून बसले ! तेव्हा निजामशहाला ब्रिटिश सरकारचा चिमटा हुळहूळ करू लागला, आणि निजामशहाच्या सूचनेवरून श्रीपादराव सातवळेकरांनी विवेकवर्धिनी व तिच्या अनुषंगिक संस्था आपले बंधु सीतारामपंत सातवळेकर यांच्या सुपूर्द करून हैदराबाद सोडले ( व मद्रास इलाख्यातील पीठापुरम्‌चे एका जहागीरदाराकडे चित्रकलाधिष्ठित नोकरीसाठी दडी मारली ) आणि तेथून कांगडीस गुरुकुलात प्रयाण केले. सयाजीराव साहित्यमालेत अस्पृश्यताविनाशासंबंधी वेदाधारे ग्रंथ लिहून देणारे सातवळेकर यांच्यावर विश्ववृत्तातील लेखाबद्दल गायकवाड सरकारानी खटला भरावा, अशी फोडझोडीच्या धोरणाने चालणाऱ्या ब्रिटिश रियासतीने खटपट करण्यास कमी केले नव्हते ! ती फसली ! तेव्हा ब्रिटिश रियासतीने कोल्हापुरी यश मिळविले. विश्ववृत्तावरील खटल्यात हजर होण्यासाठी सातवळेकर कोल्हापूरकडे निघाले होते; पण काही धोरणबाजांनी 'पंडितजींना' हजर न होण्याचा सल्ला दिला. ते बेळगावजवळील अनगोळ या कुरुंदवाडकरांच्या गावी राहिले आणि विश्ववृत्ताच्या संपादकाना सरकारी पाहुणचार झाल्याचे ऐकून तेथून निसटले, ते कांगडीकडे रवाना झाले !

सातवळेकर 'गुप्त' झाले तरी सरकार त्यांचा माग का सोडील ? दया, चिकाटी, सूड या भावना जीवकोटीत सर्वत्र आढळून येतात. हीच पृथ्वीवरील समानता होय. या समानतेच्या चक्रात ब्रिटिश सरकारहि होतेच ! तारुण्यात मनुष्य भविष्याकडे पहातो; मध्यम वयात 'भयचकित' होतो आणि वर्तमानापुरत्याच

वाहणा कापतो; तर वृद्धापकाळी भूतकाळच्या फुशारक्या मारतो. " भयचकित " झालेल्या मध्यमवयीनाप्रमाणे ब्रिटिश सरकार आपल्याच इज्जतीची वहाण कापून सातवळेकरांच्या पाठीमागे लागले होते. मोर्ले–मिंटो–सुधारणांची सुरवात करून हिंदुस्थानातील लोकक्षोभ शमविण्याचा उपाय ना. गोखले मोर्लेना सुचवित असताहि मिंटो प्रभृति हिंदुस्थानातील ब्रिटिश नोकरशाहीला आपल्या दडपशाहीचा ' रोड-रोलर ' च चालू ठेवावयाचा होता. त्यामुळे, मद्रासमधून कांगडीच्या गुरुकुलात चित्रकला–शिक्षक म्हणून गेलेल्या ' पंडितजीं ' चा वास लागताच सरकारने त्यांस पकडण्यासाठीं सिंहाच्या शिकारीसारखे मोर्चे बांधले. आपल्यामुळे स्वामी श्रद्धानंद-जींच्या गुरुकुलास त्रास होऊ नये म्हणून सातवळेकर पोलिसांच्या स्वाधीन झाले.

तडक आणि टाचक्या वाटेने जाणाऱ्यांच्या पुढे कोणी सहसा जात नाही. सर्कशी-तील सिंहाप्रमाणे बंदोबस्ताने नेलेल्या सातवळेकरांना **" जो लोककल्याण साधावया जाण, वेई करी प्राण, त्या सौख्य कैचे ? । दुष्टान्न उपवास कारागृही वास, अर्थी विपर्यास हे भोग त्याचे ॥ "** या कविवचनाचे प्रत्यंतर चांगले वर्षभर आले आणि मग त्यांच्यावर विश्ववृत्तातील लेखावरून खुनाच्यासुद्धा सर्व खुनशी राजद्रोहाचे आरोप ठेऊन जेव्हा का कोल्हापुरास नेण्यात आले, तेव्हा त्या खास खटल्यापायी नेले जात असता, पुणे स्टेशनापासून त्यांना तरुण विद्यार्थी वर्गाने ( सुटीला आपा-पल्या गावी जाणाऱ्या ) दक्षिण रेल्वेत आदबीने असे वागविले की, त्यांना काढण्या लावणाऱ्या पोलीसांना आपल्या हातून काहीं पाप घडत असल्याचा भास झाला. **" प्रसादचिन्हानि पुरःफलानि । "** असाच तो अनुभव ठरला. कोल्हापुरास बंदी-शाळेत छत्रपति शाहू महाराज सातवळेकरांना भेटले आणि शेवटी न्यायमूर्तीनी सातवळेकरांना सर्वस्वी निर्दोषी म्हणून सोडून दिले. निर्णयपत्रात विश्ववृत्ताच्या संपादकाना शिक्षा दिल्या, त्यांच्यासंबंधी ' किंकेड ' साहेबांची सदर न्यायमूर्तीनी हजेरी घेतल्यामुळे मात्र त्या. पंडितरावांना न्यायासन सोडावयास ब्रिटिश आमदानीने लावले ! !

## वेदाधारे राजकीय व्याख्याने

कोल्हापूरच्या खटल्यातून निर्दोष सुटलेले श्रीपादराव सातवळेकर सरळ कांग-डीला परतले. १९०९ च्या अखेरीस फोटोग्राफर–चित्रकार म्हणून लाहोरास त्यांनी स्वतंत्र धंदा सुरू केला आणि संगीताचार्य विष्णु दिगंबर पलुसकरांप्रमाणे पंजाब-महाराष्ट्राची जवळीक आपल्या कलेने आणि आर्यसमाजातर्फे वेदावर व्याख्याने-प्रवचने देऊन फुलविली. पंजाबात हा कालखंड मोठ्या धामधुमीचा होता. देशभक्त लाला लजपतराय यांना दुसरी हद्दपारी झाली होती. पुढे ' गदर ' चळवळ म्हणून भारतीय इतिहासात गाजलेल्या प्रकरणाचा प्रारंभ होता. मतस्वातंत्र्य व लेखन-स्वातंत्र्य सप्तपाताळाखाली दडपून टाकण्यापर्यंत ब्रिटिश अंमलाची मजल गेली होती.

बंगाल, महाराष्ट्र व पंजाब यात सशस्त्र उठावानी पण शिस्तबद्ध गुप्ततेने ब्रिटिश सरकार उलथून पाडण्याचे कट शिजत होते. त्यांची सूत्रे लंडनहून बॅ. सावरकर हलवितात अशी ब्रिटिश सरकारची बालंबाल खात्री होती. अशा वातावरणात पंडितजी सातवळेकर प्रचार करीत होते की, "वेदवाङ्मय हा राजकारणाच्या शाखोपशाखाच्या ऊहापोहाचा संकीर्ण साठा आहे." त्यामुळे सातवळेकर म्हणजे सूफी अंबाप्रसाद, लाला हरदयाळ अशा प्रगमनशीलांपैकी होत असे मानले गेले व ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या झडपेचा विषय ठरले ! ! "भारी किंमतीच्या वस्तु फारच उपयुक्त ठरतात, अशी सामान्य समजूत असली तरी अनेकानेक कर आणि वाहतूक खर्च यांच्या ओझ्याखाली त्यांची किंमत वाढलेली असते; उपयुक्ततेच्या नावाने शून्यच !" अशी पंडितजींची टर उडविण्याची ही संधि ब्रिटिश रियासतीचे खुषमस्करे साधत राहिले. पण आपत्तींच्या निसण्यावरच साधनशुचितेची आणि ध्येयनिश्चितीची शस्त्रे धारदार होतात. पं. सातवळेकरांनी तेच साधले ! १९११ चे पंचम जॉर्ज बादशहाचे राज्यारोहण दिल्लीस झाले ते भावी कैसरीकंदनासाठी ( १९१४ ते १९१८ पहिले महायुद्ध ) यशस्वीपणे ब्रिटिश साम्राज्याला लढता येण्यास हिंदुस्थानचे लोकमत व रंगरूट सहाय्य ठरावे, म्हणून झाले. कलकत्याहून दिल्लीला राजधानी आणण्यात जर्मनीच्या महत्त्वाकांक्षी आक्रमणाच्या आटोक्यातून राजप्रतिनिधीला ( व्हॉईसरॉयला ) प्रतिष्ठेसह सांभाळण्याचा उद्देश होता; आणि वंगभंग रद्द करण्यात फ्लँडर्ससारख्या रणांगणावर भारत संरक्षणाच्या नावावर ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणासाठी जीवानिशी लढणारे वीर हवे होते, म्हणून हिंदुस्थानातील बहुसंख्यांकाना गोंजारण्याचा डाव होता. या गोष्टीची सूचक व्याख्याने पंडितजींनी वेदाधारे दिली आणि साम्राज्याची कपटनीति उघडी पाडली. पुढे कैसरीकंदन सुरू झाल्यावर, गदर चळवळीला जोर आला आणि समर्थ विद्यालयाचे विष्णुपंत पिंगळे प्रभृति फासावर लटकले ! एवढेच नव्हे तर, कलकत्यापासून लाहोरपर्यंत ब्रिटिश लष्करात नोकरीस असलेले भारतीय शूर गदरवाल्यानी भारले जाऊ लागले ! पारतंत्र्यातून निसटताना तसली दिव्येच्या दिव्ये करणे देशभक्तांना क्रमप्राप्तच असते, हे 'वेन' राजाने रथाला जुंपलेल्या ऋषिगणांचे उदाहरण देऊन आणि तसल्याच कथा विवरण करून पंडितजी लोकापुढे मांडीत. स्वतंत्र भारताचा शुभंकर मानदंड लोकमानसात पक्केपणी उभा करणे हा आपला जन्मसिद्ध हक्क, बुद्धिवादी देशभक्त म्हणून आणि भारतीयांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरांचा जाणकार म्हणून, आहेच आहे, असे पं. सातवळेकर मानीत. म्हणून एक दशकभर पंडितजींनी "**सत्ताबळे दास करी जो त्रिलोकास, त्याहि कृतांतास नमवीन पायी।**" या जिद्दीने तो हक्क बजावला. कुवत, कस, कर्तृत्व—कीर्ति आणि कृतिकारकता ( लोकांना स्फूर्ति देऊन कार्य करावयास लावणे ) या पांचहि प्रकारानी पंडितजी परिणामकारक ठरत आहेत, हे पंजाब सरकारला व हिंदुस्थान सरकारलाहि आढळून आले आणि त्यांची

आग आग झाली ! ! प्रत्यक्ष राजकीय उलाढाली करणारांना पंडितजींच्या आश्रया-पासून सार्थ साहाय्य होते. परंतु सरकारला हात चोळीत बसण्यापलीकडे, फक्त नजरबंदी प्रभृति उपायांनी पंडितजींचा छळ करता येत होता ! !

वयाची पन्नाशी उलटली तशी, आजपर्यंतच्या धकाधकीच्या मामल्यातून बाहेर पडावे आणि वैदिक संशोधनाचे कार्य चिरस्थायी करून जीवनाला विधायक स्थायी-भाव आणावा, अशी पंडितजींना इच्छा होऊ लागली. पंजाबातील दशवार्षिक तेजस्वी विवेक–जागृतीनंतर, वैदिक संस्कृतीचा पुनरावतार भारतीय समाजाच्या आचार-प्रणालीत शक्य तेवढा साधण्याची खटपट करण्यासाठी औंधचे पंतप्रतिनिधि यांनी पंडितजींना औंधास पाचारिले. आणि " ऋषीचे कार्य " करण्यासाठी १९१८ च्या मे महिन्यात पंडितजी औंधास स्थाईक झाले.

## वीरवृत्तीस उत्तेजन

औंधास राहिल्यावर, पंडितजी पुरुषार्थादि मासिकांच्या द्वारा वेदपरिशीलनातून राष्ट्ररचनेच्या तेजस्वी विचारधारा, प्राप्त परिस्थितीवर विदारक प्रकाश टाकीत, फैलावू लागले. १९१९ च्या जालियनवाला बाग प्रकरणापासून महात्मा गांधी सत्याग्रहाच्या निकराने आपल्या कार्याची दिशा आखत असताना काँग्रेस–अधिवेश-नाच्या निमित्ताने पंडितजींचा व महात्माजींचा स्नेहसंबंध वाढता राहिला. वेद-वाङ्मयाच्या विवेचनाला पंडितजींनी आता वाहून घेतले असले तरी, त्यांचा मूळ राष्ट्रभक्तीचा स्वभाव कसा जाणार ? तो सारखा डोके वर करीतच असे, आणि म्हणूनच असहकाराच्या आंदोलनापासून राष्ट्रीय सभेने भारताच्या स्वातंत्र्यासाठी जी जी उत्थाने केली, त्यांना त्यांचे उत्तेजक असे, वेदाधिष्ठित लेख पंडितजींनी पुरुषार्थादि मासिकात लिहिले. १९२१ साली असंख्य लोक कारागृहात देहदंड सोशीत असता, पंडितजींनी ऋग्वेदातील अत्रिऋषीच्या कारावासाचे व छळाचे विवेचन करून लोकांना स्फूर्ति दिली. क्रांतिकारक तरुण बाँबस्फोट करून परकीय राजसत्तेला हादरे देत असताना वेदातील बाँबगोळ्यांची वर्णने पंडितजींनी प्रसिद्ध करून वीर-वृत्तीस उत्तेजन दिले. क्रांतिकारकांचे कट शिजत असतानाच, परिक्षितीला सर्पांनी कट करून कसे ठार केले याचेहि विवेचन पंडितजींनी केले.

पंडितजींच्या प्रखर राष्ट्रीय वृत्तीला एवढेच करून राहवले नाही. महात्माजींच्या नेतृत्वाच्या कालखंडात स्वातंत्र्यांदोलनात संस्थानी प्रजाहि मागे राहिली नव्हती. एवढेच नव्हे तर, आपआपल्या संस्थानिकांनी प्रजेला संस्थानी लोकशाही स्वराज्य देऊन टाकावे, अशीहि त्या मंडळींनी प्रथम महाराष्ट्रात व नंतर अखिल भारतात चळवळ उभी केली. हिंदुस्थानातील ऐतिहासिक स्वराज्याचेच अवशेष म्हणून जर ब्रिटिश रियासतीतील संस्थानिकाना लोकांनी मानावयाचे, तर कालानुरूप लोकशाही स्वराज्याची स्थापना आपापल्या अखत्यारीत करून संस्थानिकांनी ब्रिटिश सर-

कारला उदाहरण घालून दिले पाहिजे, असा संस्थानी प्रजेचा नैतिक आग्रह होता. या संस्थानी प्रजेच्या चळवळीत पं. सातवळेकरांनी राष्ट्रीय सभेच्या स्वातंत्र्यांदोलनाचे तेज संभाळून भाग घेतला. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रात जी सांगली–फलटण वगैरे संस्थाने प्रगमनशील राहिली, त्यात औंध हे अग्रगण्य मानले जाऊ लागले. राष्ट्र-सेवेची बोधचिन्हे आणि सेवाव्रते औंध संस्थानात पंडितजींनी श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधींच्या संपूर्ण संमतीने प्रचलित करून सोडली. औंध संस्थानचा कालोचित कायाकल्प घडवून आणणारे पंडितजी पुढे औंध संस्थान–विधिमंळातील लोकमता-नुवर्ती राज्यकारभाराचे प्रचोदक बनले आणि रामशास्त्री प्रभुण्यांच्या निस्पृहतेने आपल्या सहकऱ्यांस व सत्तेस त्यांनी धडे दिले. पंडितजींच्या राष्ट्रीय वृत्तीतील सात्त्विक समतोलामुळेंच पुढे ते जमखिंडीस संस्थान–प्रजापरिषदेचे ( १९४३ ) अध्यक्ष निवडले गेले, यात आश्चर्य मानण्यासारखे काहीच नाही. १९३० साली सातारा जिल्हा परिषदेच्या ( अन्याय्य–कायदे–भंगाचा पुरस्कार करणाऱ्या ) संस्मरणीय अधिवेशनाचे पंडितजी अध्यक्ष निवडले गेले. त्यांनी भारतीय स्वातंत्र्यो-दयाचा प्रचार जारीने चालविला; आणि डॉ. हर्डीकरांच्या सेवादलाची संघटनाहि त्यांनी स्वागतार्ह मानली. त्याच कालखंडात औंधचे राजपुत्र आप्पासाहेब पंत बॅरिस्टर होऊन आले; आणि त्यांनी कष्टकऱ्यांच्या लोकशाहीचा एवढा पुरस्कार भारतीय संस्कृतीला धरून चालविला की लोक त्यांना " गरिबांचा कैवारी राजपुत्र " ( पॉपर–प्रिन्स ) म्हणून संबोधू लागले. पंडितजींना ती पर्वणीच वाटली. सातारा काँग्रेस समितीचे १९२० मध्ये ते अध्यक्ष होते अगर १९४३ साली महाराष्ट्र संस्थानी प्रजा–परिषदेचे ते अध्यक्ष झाले, यापेक्षा आप्पासाहेबांच्यासारखा नवचैतन्याचा राजपुत्र औंध संस्थानला लाभला, हा एक परमेश्वरी प्रसादच पंडितजींना वाटला.

पंडितजी औंधास येऊन राहिल्यापासून ब्रिटिश सरकारचा डोळा व दात पंडितजीं-प्रमाणेच औंध संस्थानावरहि वक्र झाला. " त्याचे वर्म जाणे " पंतप्रतिनिधि, अशी अवस्था होती. औंध संस्थानामध्ये संपूर्णतया ग्रामराज्यसंस्थापनेचा आराखडा पंडितजींच्या पसंतीने आखून आप्पासाहेब पंतानी प्रतिनिधि–मुलखात जारी करविला, तेव्हा इतर संस्थानिक चुळबुळले, आणि ब्रिटिश सरकार तर खवळलेच ! यावेळी १९३५ च्या सुधारणा कायद्यान्वये ब्रिटिश रियासतीत प्रांतोप्रांती काँग्रेसची मंत्रि-मंडळे ( अकरापैकी आठ ) झाली होती, त्या मानाने औंध संस्थानाने पुष्कळच पुढे आघाडी मारली होती. औंध संस्थानात ग्रामराज्य–संस्थापना झाल्यावर, पंडितजींनी प्रत्येक गावी संरक्षण–दलाची उभारणी केली. इशाऱ्यासरशी दहा मिनिटात गावातील प्रत्येक घरचा एकेक इसम चावडीवर हजर व्हायचाच, इतक्या शिस्तीचे प्रत्येक संरक्षक–दल होते. वैयक्तिक जीवनाला समाज–सन्मुख करण्याचा तो बळकट उपक्रम होता. त्याची कुणकुण व्हाईसरॉयपर्यंत जाऊन पोहोचली, तेव्हा वस्तुस्थिति पडताळ-ण्यास व्हाईसरॉय साहेबाचे लष्करी सेक्रेटरीच आले. आणि एका रात्री अनपेक्षित

क्षणाला, आटपाडी महालातल्या अळसुंदे या एका आडगावी जेव्हा का त्याना त्या शिस्तशील संघटनेचा साक्षात्कार झाला, तेव्हा त्यांच्या तोंडून सहजोद्गार निघाले की, " आता हिंदुस्थानात इंग्रजांनी राहण्याची सोयच नाही, "

दुसरे महायुद्ध उर्फ हिटलरी होरपळ ( १९३९ ते १९४५ ) चालू असता, काँग्रेसने वैयक्तिक युद्धविरोधाचा सत्याग्रह केला आणि पुढे " चले जाव " चीहि चळवळ उभारली. इंग्रजांवाचूनहि आम्ही आपल्या पायावर उभे राहू, असे आत्मविश्वासपूर्वक भारतीय देशभक्त जगाला एका बाजूने बजावीत असता, रणांगणावर गेलेल्या भारतीय रंगरूटानी असा पराक्रम गाजविला होता की, संधि मिळाली तर भारतीयांचा सिंहपराक्रम आपले तेज दाखवू शकतो, हे जगाला प्रत्यक्ष पटत होते. त्याचवेळी " चलो दिल्ली " म्हणून समांतर सरकार स्थापन करून देशगौरव सुभाषचंद्रांनी जे आक्रमक राजकारण आरंभिले होते, त्याला औंधसारखी आंतर्गत संघटनेची जोड मिळाली, तर परकीय सत्तेला हिंदुस्थानात जागाच नाही. या तर्कविशुद्ध विचारधारेनेच ( व्हाईसरॉयाच्या ) लष्करी सेक्रेटरीच्या सहजोद्गाराचे मूल्यमापन विवेकजागृतांनी केले पाहिजे.

सिंहाची सरळ भेट त्याच्या गुहेत घ्यावी आणि उद्याच्या कर्तृत्वाचे आराखडे आज आखावेत, त्याच दिमाखाने पंडितजींच्या औंध येथील हालचालींचे पृथक्करण केले तर त्यांनी हैदराबादेस व लाहोरास राजकीय आदोलनासंबंधी जे उपक्रम आरंभले होते, ते त्यांनी औंधासहि चालू ठेवले होते, असेच आढळून येईल. चले–जावच्या चळवळीतील सातारा जिल्ह्यामधील नाना पाटील प्रभृति गुप्त्या ( भूमिगता ) ना पंडितजींचे निवासस्थान बालेकिल्ल्यासारखे सुखरूप होते; गुप्त्यांची कित्येक पत्रकेहि पंडितजीकडील छापखान्यात मुद्रा घेत; आणि चळवळीस आवश्यक असलेली रसद वा चंदी याचा पुरवठाहि पंडितजींच्या कृपाकटाक्षाखाली होई. १५ ऑगस्ट १९४७ ला ब्रिटिश रियासतीच्या जागी स्वराज्य येईपर्यंत पंडितजींनी हे केले !

आणि त्यानंतर ? अगदीच अनपेक्षितपणे १९४८ च्या ३० जानेवारीला महात्मा गांधींचे निर्वाण झाले, त्याने सर्व देश हादरला व हळहळला ! ! यातून काही समाजकंटकांनी पेटवलेल्या आगीच्या ज्वाळा पंडितजींपर्यंत पोहोचू लागल्या. पंडितजींच्या वेदप्रिय मनाला वैदिक संस्कृतीवर भर देऊन आणि ऐतिहासिक अस्मितेचे पुनरुज्जीवन करून तरुणांना राष्ट्रीय वळण लावण्याची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची प्रणाली पसंत पडली होती. पंडिजींनी १९३६ पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य केले होते, आणि असे असूनहि १९४२–४५ च्या काँग्रेसी चळवळीतील गुप्त्यांना विधायक साहाय्य पंडितजींनी केले होते. पण भावनोद्रेकाच्या भरात पंडितजींच्या सात्विक विवेकशक्तीचे भानच जाळपोळ्यांना राहिले नाही ! भारताला ब्रिटिश रियासतीच्या जागी लाभलेली स्वदेशी रियासत आणि आपण जाताना ब्रिटिश

रियासतीने स्वयंनिर्णयी म्हणून राखलेली संस्थाने यानी औंधच्या ग्रामराज्यसंघटने-सारखी वा अन्य बळकट कारभार–कुशलता अंगिकारावी, अशी पंडितजींची अपेक्षा होती. ती जवळच्या भविष्यकाळात वास्तव होण्याचे पंडितजींना चिन्ह दिसेना; दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांनी भारतात विलिन होण्याचा स्वयंनिर्णय घेतला; आणि आता आपण ऐंशी वर्षांचे झालो तर '**विपदि धैर्य**' धरून आपले वैदिक-वाङ्मय–प्रकाशनाचे ध्येय साध्य करावे म्हणून पंडितजीहि गुजराथेतील पारडी येथे आश्रम करण्यास, प्रत्यक्ष राजकारणाच्या हालचालींना पूर्णविराम घालून सज्ज झाले.

पंडितजींच्या राजकीय जीवनाचा बोध हा—

**विद्या–विलासमनसो धृतशीलशिक्षाः ।**
**सत्यव्रता रहितमान– मलापहाराः ॥**
**संसारदुःख – दलनेन सुभूषिता ये ।**
**धन्या नरा विहितकर्म – परोपकाराः ॥**

देशभक्ति हा गुणदेखील शास्त्रशुद्ध शिक्षणानेच नागरीकांच्या मनामध्ये निर्माण करावयाचा असतो. देशावर संकट आले की देशभक्तिच्या भावनेला उधाण येते; पण ते समुद्राच्या भरतीप्रमाणेच प्रासंगिक असते. भरतीच्या त्या लाटा, सागराचे ते खवळणे या प्रासंगिकांचा उपयोग करूनही लोकशिक्षणाने जनतेत देशभक्ति स्थायी करावयाची आणि मुरवावयाची, हा व्यवहारवादी द्रष्ट्याचा पण असतो. देशकालपरिस्थितीची जागती जाणीव आणि तदनुषंगिक आपले प्राप्त कर्तव्य यांचे स्वाभाविक स्फुरण ज्या माणसाला होऊ लागते, त्याला सुशिक्षित नागरीक म्हण-ण्यात काही अर्थ आहे. देशाचे स्वातंत्र्य नाही तर काहीच नाही, अशी तळमळ राष्ट्रा-तील तरुणात उफाड्याने निर्माण करणे हेच केवळ नव्हे, तर ती तळमळ सातत्याने तेवत ठेवणे हे राष्ट्रीय लोकशिक्षकाचे आद्य कर्तव्य होय.

वेदवचनांच्या आधारे पंडितजी तसे लोकशिक्षण साधत असता, जनमनावर हेही ठसविण्यास ते विसत नसरत की सर्व वैदिक वा हिंदु देवता या सशस्त्र व सशक्तिक आहेत. पंचमहाभूतपैकी पाणी, वाफ, वायु, आकाश यावर जशी कोणाची वंशपरंपरा सत्ता नसते त्याप्रमाणेच जमिनीचा कबजाही कोणी यावच्चंद्रदिवाकरौ सांगू शकत नाही. देशादेशामधल्या सीमा शेजारधर्माच्या दृष्टीने, निसर्गकृत अपरिहार्यतेने वा स्वसामर्थ्याच्या तोलाने निश्चित मानलेल्या असतात. गैरसोयीच्या वाटू लागल्या की जबरदस्त त्या सीमानिश्चितीवर कृत्रिमपणाचा आरोप करून दुसऱ्या देशाचे सार्व-भौमत्व संकटात आणतात; म्हणून जग सुधारले असले तरी सीमोल्लंघने तारीख–तागायत विज्ञानजन्य शस्त्रास्त्रे पाजळून स्वसामर्थ्याचा प्रभाव दाखविण्यापुरतेच सुधारले आहे. शुद्ध नीतितत्त्वांच्या आणि माणूसकीच्या निर्भेळ प्रगतीच्या दृष्टीने सुधारलेले नाही. म्हणून "**कृण्वन्तो विश्वमार्यम् ।**" हे किंवा "हे विश्वचि माझे घर, ऐशी

थोर मति " व्हावी हे ध्येय असले, तरी आज–उद्याच्या व्यवहारकुशलतेत, भारतीयांनी तरी एवढेच पहावयाचे आहे की– आमचा धर्म कोणता का असेना, आमची बोली, आमचे जन्मस्थान कोणते का असे ना, आम्ही सर्व एकाच देशाची लेकरे आहोत; शेतकरी, कामकरी, शिक्षक, विद्यार्थी, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, उद्योगपति, धनपति, राजकारणी, समाजकारणी, पुढारी आणि अनुयायी, स्त्री व पुरुष, मुले नि बापई, तात्पर्य आम्ही लहान थोर सर्वांनी देशकल्याणावर व देशसेवेवर अढळ लक्ष ठेवून प्रयत्नवादी बनले पाहिजे. समर्थ, सहनशील, शिस्तशीर असे प्रत्येकाने बनणे व संयम नि शील यांनी व्यवहार करणे हाच अपेक्षित लोकशाही स्वराज्याचा पाया आहे. ती तपश्चर्या भारतीयांनी बिनचूक केली पाहिजे. हेच होते ध्रुपद पंडितजींच्या लोक–शिक्षण–प्रचाराचे. शास्त्रे, कला, विचार, कृति ही सारी तरुण भारतीयांची कर्मक्षेत्रे व्हावीत आणि त्यांनी ध्येयप्रवृत्त राहून ध्येयपरिपूर्ति साधताना राष्ट्रहित, राष्ट्राभिमान आणि राष्ट्रगौरव यांची हेळसांड करू नये वा ती होणार नाही, याचीही काळजी वहावी; हा होता त्या प्रचारात्मक लोकशिक्षणातील आग्रह. औंध संस्थानात संधि मिळताच पंडितजींनी त्या आग्रहाला स्वतःच साकार करून दाखविले. हेच पंडितजींचे राजकारणातील वैशिष्ट्य होय. ते वैशिष्ट्य सांभाळताना विजयानगरच्या साम्राज्यात जे माधवाचार्यांचे स्थान तेच औंध संस्थानात पंडितजींनी स्वतःला प्राप्त करून घेतले होते. **"मुख्य सूत्र हाती घ्यावे। करणे ते लोकाकरवी करवावे॥"** हाच त्यांचा राजकारणातील रामदासी बाणा होता.

ø ø ø

: ३७ :

# लोकभ्रमान्तक पंडितजी

"चुकल्या जनासि कोणी सांगुनि निजहित पथासि जो लावी।
धनदेही उपकृतिसी त्याच्या निजसंपदा न तोलावी॥"

"बहुजनसमाजात शिक्षणाचा प्रसार करणे हेच हिंदुस्थानच्या उन्नतीचे महत्त्वाचे साधन आहे, अशी अंतःकरणाशी खूणगाठ बांधून आपल्या चरित्राचा ओघ त्या दिशेने अनिरुद्ध वाहवणाऱ्या महाराष्ट्राच्या कर्तबगार सुपुत्रांची जी मालिका निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकरापासून निर्माण झाली, तीत पंडितजी सातवळेकरांचा क्रमांक डोळ्यात भरण्यासारखा आहे. लोकशिक्षणाच्या लागवडीत शिक्षकत्वाचा शेर उशीरा मिळतो. हैदराबादची विवेकवर्धिनी आणि कांगडीचे गुरुकुल येथील पंडितजींचा अनुभव त्या सामान्य नियमास अपवादच होता. तरीही विद्यार्थ्यांमधील लोकप्रियतेचा उपयोग करून आपले राजकारण वा व्यक्तिसाधना उभारीत राहणे हा सार्वजनिक जीवनात एक लोकभ्रम ठरेल. लोकभ्रमातून लोकाना बाहेर काढणे हेही एक लोकशिक्षणाचे अंग आहे, असे चिपळूणकरपरंपरेचे मत असल्याकारणाने, ती परंपरा नवा लोकभ्रम निर्माण करणे खासच पातक मानते. म्हणून आपल्या विद्यार्थीप्रियतेचा उपयोग आपल्या राजकारणासाठी वा तात्पुरत्या सुखरूपतेसाठी करून पंडितजींनी लोकभ्रम निर्माण तर केला नाहीच; पण उलट, आल्या प्रसंगाला धैर्याने तोंड देऊन नैतिक धीरतेचे उदाहरण हैदराबादेस व कांगडीस घालून दिले.

आगरकरानी विष्णुशास्त्री चिपळूणकरासंबंधी असे लिहिले आहे की "ते वास्तविक रीतीने अगदी पुढे सरसावलेल्या सुधारकाप्रमाणे होते." कारण शास्त्रीबुवानीच म्हटले आहे की— "आपल्या देशात जन्मभूमीचा अभिमान शिथिल होण्यास

या राष्ट्राचे विस्तीर्णत्व व जातिभेद ही मोठी कारणे झाली आहेत. दुसरा प्रकार जातिभेदाचा; याने तर या राष्ट्राची फूट अतिशयच पाडली आहे. अठरा पगड जातीस अठरा टोपकरानी गुंडाळून टाकले व साऱ्यांच्या हाती सारखीच करवंटी दिली." याकर वेदप्रणीत चातुर्वर्ण्य फक्त मानण्याचा व्यवहार करून प्रांतिक भेद आणि भाषाभेद यांच्यावर पंडितजींनी मात करून दाखविली आहे. आपल्या संस्कृत पांडित्याने आणि संस्कृतप्रधान हिंदीमुळे, ते निजामहैदराबादेत, लाहोरात व पंजाबातही आणि १९४८ पासून गुजराथेत बहुजनसमाजाशी महाराष्ट्रातील सावंतवाडी-औंध–प्रमाणेच इतके समरस होऊन राहिले की त्यांच्या भारतीय एकजिनसीपणाला प्रांतभेद, भाषाभेद वा आचारभेद आडवे म्हणून आलेच नाहीत ! त्यायोगे "**विद्वान् सर्वत्र पूज्यते।**" हे तर सिद्ध झालेच; पण "**दुर्लभ वस्तु न वांच्छी, न करी जो नष्ट वस्तुचा शोक। आपत्तीत न मोहे, त्या पंडित म्हणति जाणते लोक॥**" हे सुभाषितही भारतातील सर्व थरांच्या लोकांच्या प्रत्ययास आले.

विष्णुशास्त्रींच्या संबंधात आगरकरानी म्हटले आहे की, " इतके खरे आहे की ते या ( जातिभेदासारख्या ) विषयांच्या संबंधाने फारसे कधी लिहित नसत; पण लिहू लागल्यास वृद्धपिढीचा रोष होईल म्हणून आपली खरी मते पुढे करण्यास ते कधीही भीत नसत." पंडितजी सातवळेकरासंबंधीही थोड्या–फार काळजीने तसेच विधान करण्यास हरकत नाही. किंबहुना, " स्वभूमीत, स्वलोकात, स्वाचारात व स्वधर्मात राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भिता, त्यांच्याशी कधी भांडून, कधी युक्तिवाद करून, कधी लाडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधी त्याना दटावून त्यांची सुधारणा करणे यातच खरी देशप्रीति, खरी बन्धुता, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे." या आगरकरांच्या वचनाचे चालते–बोलते व कर्तेसवरते उदाहरण म्हणून पंडितजी सातवळेकरांच्याकडे कोणी अंगुलिनिर्देश केल्यास ते फारसे चुकीचेही ठरणार नाही. पंडितजींनीच सांगितलेल्या या गोष्टी पहा—

## १ विंचवाचा मंत्र

एकदा दक्षिण हैद्राबादमध्ये असताना डॉ. गंगाधरपंत किर्लोस्करांचा भोई ( नौकर ) विंचू चावला म्हणून रडत आला. वेळ संध्याकाळी साडेसात वाजण्याची होती, दिवे लागले होते. विंचू पाठीला वरच्या बाहुट्याजवळच्या बाजूला चावला होता. पाठीचा कणा व बाहुय्याचे हाड याच्या मधोमध दंशाची जागा होती. तो येताच त्याने दंशाची जागा दाखवली व मी गायत्रीमंत्र म्हणून दंशाच्या जागेवर शक्य तेवढ्या अधिक जोराने चापटी मारली. माझी बोटे बराच वेळ दुखत होती. इतका जोर मी वापरला होता. चापटी मारताच रडत असलेला भोई हसावयास लागला व विंचू उतरला असे म्हणून निघून गेला.

माझ्या मते हा चापटीचा प्रभाव होता; कारण मंत्राचा प्रभाव असण्याचा संभवच नव्हता.

## २ आगगाडीत विंचू

मी लाहोरहून हरिद्वारला चाललो होतो. तिसऱ्या वर्गाचा प्रवास होता. गर्दी आतोनात होती. वरच्या फळीवर ठेवलेल्या गठ्ठ्यातून एक लहानसा विंचू खाली बसलेल्या प्रवाशाच्या नेमका पायावर पडला. याचा हा पाय उजवा होता. पायावर पडताच विंचू चावला. विंचू सफेद रंगाचा व चिचुक्याएवढा फार तर होता. पाच सहा मिनिटात त्याच्या पायात तो विंचू चढू लागला. तो जांगेपर्यंत थोड्याच वेळात चढला व यावेळी तो प्रवासी फारच तडफडू लागला. त्याचा पाय यावेळी चार चार बोटे वर उडत होता व वेदनाहि फार होत होत्या. आपला प्रयोग करून पहावा असे माझ्या मनात आले. मी त्याला त्या डब्यातच समोर उभा केला. मी गायत्रीमंत्र मनात म्हणावा व त्यास पाय आपटावयास सांगावे, असे केले. सुमारे वीस–बावीस वेळा असा जोराने पाय आपटताच त्याचा विंचू उतरला व दंशाच्या ठिकाणीच तेवढ्या वेदना राहिल्या. डब्यातील लोकावर मंत्र–सामर्थ्याचा बराच प्रभाव बसला व मला बसावयास जागा मिळाली.

येथे हे स्पष्ट सांगितले पाहिजे की, हा मंत्राचा प्रभाव नसून पाय जोराने आपटल्यापासून त्याचा विंचू उतरला हे खरे आहे. पायाला अथवा हाताला विंचू चावला तर तो वर चढू लागतो. त्यावेळी पायाला चावला असेल तर पाय जोराने खाली झटकावा व हाताला चावला असेल तर हात झटकावा. या झटकण्यानेच विंचू उतरतो. तोंडाने मंत्र म्हटल्यासारखे हवे तर करावे पण त्याचा परिणाम काही नसतो; पण लोकावर मात्र हे मंत्राचे सामर्थ्य आहे असा प्रभाव पडतो. पण हा झटकण्याचा परिणाम असतो. शरीराच्या इतर भागावर विंचू चावला तर तो उतरणे कठीण असते. रक्तवाहिन्यांची थोडी माहिती असेल तर त्या दिशने चोळावे म्हणजे विंचू उतरतो. रक्तातून विष जात असते ते दंशाच्या ठिकाणी पुन्हा परत आले म्हणजे पुन्हा बहुधा चढत नाही. क्वचित् एखादेवेळी चढला तर तोच प्रयोग पुनः करावा. हातापायाचा विंचू मात्र झटकण्याने खात्रीने उतरतो. केवळ मंत्रानेच विंचू उतरण्याचा प्रयोग मी कोठेहि पाहिलेला नाही.

## ३ हाताचे दुःख

मी रेल्वेमधून प्रवास करीत होतो. माझ्या समोरच्या बाकावर एक माणूस बसला होता. मी जागा होऊन त्यांच्याकडे पहिले तो त्याने आपला बाहूपासून पंजापर्यंतचा हात धोतराने करकचून बांधला होता व हात फार ठणकत आहे असे म्हणून डोळ्यातून आसवे काढीत होता. माझा प्रयोग करून पहावे असे

माझ्या मनात आले. मी त्याच्या बाहूवर माझा उजवा हात ठेवला. मनात गायत्री मंत्र म्हणून परमेश्वराची प्रार्थना केली आणि त्याला हात सोडावयास सांगितले. त्याने सांगितले की " तुम्ही हात बाहूवर ठेवल्यापासून माझे ठणकणे कमी होऊ लागले आहे." मी म्हटले हात सोड व पहा. त्याने हातावरची वेस्टणे सोडली व सोडताच त्याचे दु:ख पूर्णपणे बरे झालेले होते. प्रवाशी लोकासहि मंत्रसामर्थ्य आहे असे वाटले. पण माझे याविषयी मत असे आहे की अधिक जोराने बांधला गेल्यामुळेच त्याचा हात अधिक दुखू लागला होता. वरची वेस्टने सोडल्यामुळे रुधिराभिसरण चांगले झाल्याकारणाने त्याचे दु:ख कमी झाले. प्रथम काही कारणाने दुखले असेल ! रुधिराभिसरण बंद झाल्यामुळे ते दु:ख वाढले. यामुळे बांधलेले सोडताच दुखणे कमी झाले.

## ४ भूतबाधा

भूतबाधा तरुण स्त्रियानाच बहुधा होत असते व म्हातारपणी होत नसते. या अनुभवावरून वास्तविक पुष्कळशा भूतबाधा खऱ्या नसाव्या व त्या स्त्रीसुख-विषयक असंतोषामुळे जो स्त्रियांचा मन:क्षोभ होणे शक्य असते त्यामुळे होत असाव्या असे माझे मत मी अनेक भूताने झपाटलेल्या तरुणींचा वृत्तांत पाहून व अभ्यासून झाले आहे.

कोलगावी आमच्या घरीच काशीबाई नावाची एक बाई अशीच भूताने झपाटलेली राहत असे. तिचे घर बांद्यास होते. तिचा पति बांद्यास राही व ही इकडे असे. लोक हिला भूतबाधा आहे असे म्हणत असत. जेव्हा हिला हा आवेग येई तेव्हा ही फार मोठी शक्तीची कामे करी. वेदाची सूक्ते म्हणे. जेव्हा हा आवेग कमी होई तेव्हा निर्बल झाली आहे असे वाटे. हिच्या सर्व हालचालींचा मी पुष्कळ अभ्यास केला तेव्हा माझे असे मत झाले की इंद्रियसुख हवे तसे न मिळाल्यामुळे हिचा मन:क्षोभ झालेला होता. शेवटी ही साठ वर्षाची वेडी होऊन वारली.

## ५ अजिंठ्याच्या जंगलात भूत

आम्ही पाच सात मंडळी अजंठ्याचे लेण्याचे अवलोकन करण्यासाठी गेलो होतो. यावेळी एका उंचावर असलेल्या बंगल्यात राहण्याची आमची व्यवस्था झाली होती. जेव्हां रात्र झाली तेव्हा समोरच्या डोंगरावरून वीस–पंचवीस मिनिटानी लहानमोठ्या ज्वाला दिसू लागल्या. तेथील नोकर व इतर लोकांनी सांगितले की ही भूतचेष्टा आहे. केव्हा ही ज्वाला तीन–चार फूट लांबीची दिसे व केव्हा पंधरावीस फूट उंचीचीहि दिसत असे. भूत असल्याचे मला खरे वाटेना. पण समोरच्या टेकडीवर रात्री जावयाचे कसे ?

दुसऱ्या दिवशी परत फिरावयाचे होते. आमच्या मंडळीपैकी दोन–तीन जण मजबरोबर त्या पर्वतावर यावयास तयार झाले. बारा–तेरा मैल वाहनातून

प्रवास करून व एक दोन मैलाची चढण चढून आम्ही तिघे तेथे गेलो. तेव्हा तेथे असे आढळून आले की तेथे वाफेचे यंत्र कापूस दाबण्यासाठी रात्रंदिवस चालत आहे व वीस पंचवीस मिनिटानी जळलेला कोळसा फेकतात त्याचा जाळ दिसत असतो.

सर्व लोक हा पिशाच्याचा खेळ समजत होते, पण हा केवळ इंजिनातील कोळशाचा जाळ होता.

## ६ दुसरी भूताटकी

हैद्राबाद येथे असताना हरिपंत वकिलांच्या घरी दोन तीन खोल्या भाड्याने घेऊन मी रहात होतो. त्यांच्याबरोबर बोलताना वारंवार भूताच्या गोष्टी निघत. त्याप्रमाणे गौळीगुड्यात एका तेलंगी ब्राह्मणाच्या घरात भूत दिसते असे ते म्हणाले. आम्ही दोघानी मिळून तेथे जावयाचे ठरविले व एके रात्री तेथे गेलो.

त्या घरात एक मोठा थोरला व लांबच लांब बोळ होता. या बोळाची लांबी शंभर–दीडशे फुटापेक्षाहि जास्त असावी. या बोळात आम्हास त्यानी नेले. तेथे आम्ही तास दीड तास बसलो. सुमारे रात्री एक वाजण्याच्या सुमारास भूत आले. अंधारात सुमारे तीन पुरुष उंचीवर एक तोंड दिसले. तोंड म्हणजे दात व दातातून बाहेर येणारा ज्वालांचा प्रकाश दिसला. " खिः खिः " असा आवाज होई व दातातून प्रकाश निघत आहे असे दिसे. यावेळी सध्याचे टॉर्च ( विद्युद्दीप ) नव्हते. ते असते तर बरे झाले असते असे आता वाटत आहे.

तीन पुरुष उंचीवर अगदी छपराजवळ खिः खिः करीत केवळ दातातून प्रकाश काढीत भूत आले, हे दृश्य मी त्या अंधारात पाहिले. प्रथमदर्शनी मला भीति वाटली हे खरे आहे. मी मनातल्या मनात गायत्रीमंत्र म्हणू लागलो, त्यामुळे मनाला धीर आला व विचार सुरु झाला. मी हरिपंतांना म्हटले दिवा आणवा. तेथे आम्ही चार पाच इसम होतो, पण कोणाजवळ काड्यांची पेटीहि नव्हती. मी दिवा मागवा असे दोन–तीन वेळा म्हटले. त्यानंतर त्या भूताचे तोंड खाली खाली येऊ लागले व मनुष्याच्या ऊंचीवर येताच ते अदृश्य झाले. यामुळे माझ्या मनातील संशय पक्का झाला.

दुसऱ्या दिवशी घरी येऊन तोंडात पेटविलेली उदबत्ती मी धरली व अंधारात उभे राहून तोंडाने खिः खिः म्हणताच लोकांना भूताचे दात व त्यातून निघणारा प्रकाश अगदी तसाच दिसला. तेथे कोणी तरी गुण्ड असेच करीत होता असे यावरून ठरले.

कोणीहि हा प्रयोग करून पहावा. चांगली जळणारी उदबत्ती तोंडाच्या आत जळणारी बाजू करून धरावी. खिः खिः म्हणताच तिच्यावर तोंडातील वायूचा आघात होतो, त्यामुळे उदबत्तीचा प्रकाश चार–पाच पटीने वाढतो. त्या हैद्रा-

बादच्या घरात दोन टेबलावर तो भूत दाखवणारा उभा राहिला होता म्हणून त्याचे तोंड तीन पुरुष उंचीवर दिसत होते.

मला कोलगावात व कोलगावाहून कुणकेरीला ग्रामोपाध्याचे काम व देवळात पुराण सांगण्याचे काम करण्यास रात्री जावे लागे. प्रत्येकवेळी जातेवेळी व येतेवेळी पर्वतावर चढून उतरावे लागे. रात्री आठ वाजता निघावे व रात्री एक दीड वाजता घरी परत यावे लागे. झाडी किर्र असे. प्रवासहि निर्जन वनातून असे. पण मला कधीहि व कोठेहि भूत दिसलेले नाही. आमचे वडिलोपार्जित घर स्मशानाजवळच आहे. लाहोरास राहिलो, पीठापुरास राहिलो, औंधास घर बांधले व आता पारडीस येऊन राहिलो. ही सर्व माझी वस्ती स्मशानाजवळच झालेली आहे. हा योगायोग म्हणावा पण असा हा योगायोग आहे. हे खरे पण कधी भूताचा वास आम्हास आलेला नाही.

रत्नागिरीस कै. नरसिंहशास्त्री घाटे ज्या घरात रहात होते ते वारल्यानंतर त्या घरात दुसरा भाडेकरी येऊन राहिला. तो राहिल्या दिवसापासून त्याच्या घरात ठिकठिकाणी लघ्वी व विष्टा पडू लागली. त्याना ही भूतबाधा आहे असे वाटले. पण पुढे असे आढळून आले की जो दुसरा भाडयाने तेथे येऊन राहू इच्छित होता त्याचे हे कार्य होते. असेच पुष्कळदा होत असते. कोणी त्याचा शोध करीत नाहीत. यामुळे भूतबाधा लोक म्हणतात. वास्तविक ती भूतबाधा नसतेच असे मी अनेक ठिकाणी पाहिले आहे.

लोकभ्रम दूर करण्याचे धोरण, महाराष्ट्राच्या पुनरुद्धाराचे कंकण हाती बांधून पुढे सरसावलेल्या निबन्धमालाकारापासून सर्व विचारवंतानी स्वीकारलेच आहे. पंडितजी सातवळेकर एवढेच करून थांबले नाहीत. अस्पृश्यतानिवारण किंवा शुद्धि यासंबंधी साधा उच्चार करण्याससुद्धा मोठाले अग्रणी ज्यावेळी भीत होते त्यावेळी पंडितजींनी निर्भयपणे त्या गोष्टींचा प्रचार केला व सक्रिय राहून लोकापुढे आदर्श निर्माण करून दिला. त्यांच्यासारखा निश्चयी बुद्धिचा पुढारी खरोखरीच विरळा ! काँग्रेसमध्ये असूनही राष्ट्रीय भावनेला पारखे असलेल्या अल्पसंख्यांकांचा फाजील अनुनय करण्याची जी थोरामोठ्यानी घालून दिलेली परंपरा तिला पंडितजींचा कडाडून विरोध असे. त्याकरता आपल्या पद्धतिप्रमाणे केवळ नापसंती दाखवून काँग्रेसमधल्या लोकात राहण्याचा त्यानी प्रयत्न केला नाही. प्रत्यक्ष साधार लेखन सादर करून मुसलमानांचे उघडेनागडे हीनस्वरूप काँग्रेसश्रेष्ठींच्या पुढे ठेवण्याचा निर्भयपणा त्यानी दाखवला. त्यांच्या चरित्रातला हा भाग कधीहि विसरता येण्यासारखा नाही.

पंडितजींच्या दिव्यदृष्टीने सर्व वैदिक देवता मिळून विश्वाचा कारभार चालवीत असतात. राष्ट्रपति, संसदध्यक्ष, संरक्षणमंत्री, आरोग्यमंत्री, वाहनमंत्री अशी संपूर्ण राज्यव्यवस्था पंडितजींनी समजावून दिली आहे. 'अ–च्युत' संरक्षमंत्री, व

वृद्ध च्यवनाला तारुण्य प्राप्त करून देणारा, अंध कण्वाला दृष्टिलाभ देणारा, विश्पलेला पोलादी मांडी देऊन रणांगणावर उभी करणारा आरोग्यमंत्री अशा विज्ञानमय ज्ञानाची वेदातून ओळख करून देणारा सातवळेकरांसारखा वेदानुवादक आहे कोठे ?

वैदिक आचरणात निवृत्तीला थारा नाही. संन्यास वैदिक नव्हे, असे पंडितजींचे ठाम मत आहे. हिंदुधर्मात अनेक दुष्ट चाली आणि वेडगळ समजुती बुद्धानुयायांच्या अपप्रचारामुळे शिरल्या असे स्पष्टपणे सांगणारे पंडितजी बहुजनसमाजात आणि सरकारदरबारात कसे मान्यतेला चढतील ? विवेकी लोकच त्यांना मानणार !

धार्मिकबाबतीतील लोकभ्रमाचा समाचार पंडितजींनी घेतला, तो एकदा रायचूर येथील यज्ञाच्यावेळी आणि १९२५ साली खुद्द औंध येथे श्रौताचार्य धुंडिराज दीक्षित बापटानी यज्ञ केला त्यावेळी, पशुहत्त्येला विरोध करून ! यज्ञात पशुहत्त्येला स्थान अनुभवान्ती उरलेलेच नाही, असे पंडितजींनी वैदिक यज्ञसंस्था या आपल्या पुस्तकात स्पष्ट केलेच होते. रायचूरचा यज्ञ वामनराव नाईकांच्या बंधूनी आरंभला होता व त्यात सात बकरे मारून हवन झाले होते. हैदराबादेस पंडितजींचे एक जिव्हाळ्याचे सहकारी व सहाय्यक असलेल्या वामनरावांचे बन्धु यज्ञकर्ते असूनही त्यास पंडितजींनी शास्त्रार्थ करण्याबद्दल आवाहन केले होते व पुढे आव्हानही दिले होते. त्यामुळे हैदराबादेस दोन पक्ष निर्माण झाले. आर्यसमाजी व पंडित जमले. उत्तरहिंदुस्थानातून पं. तुळशीराम स्वामी आले होते. " **बीजैर्यज्ञेषु यष्टव्यं इति वा वैदिकी श्रुतिः। अजसंज्ञानि बीजानि छागं नो हन्तुमर्हथः॥** ( महाभारत शान्तिपर्व ) अशा आधारावर निर्मांस यज्ञाचा पक्ष विजयी झाला.

हैदराबाद–रायचूरकडे या घटना घडत असता, इकडील दक्षिण महाराष्ट्रात त्याची दखलही नव्हती. उलट उत्तरहिंदुस्थानात पंडितजींच्या सिद्धान्त–प्रतिपादनाने त्यांची कीर्ति आर्यसमाजात व इतरत्रही पसरली होती. अशा अवस्थेतच कुरुंदवाड व कऱ्हाड येथे १९१० चे सुमारात जे याग झाले होते त्यात कऱ्हाड येथे कोल्हापूरच्या परांजप्यानी केलेल्या यज्ञात पशुबलि झाले असता बापट–दीक्षितच अध्वर्यु होते व त्याकाळी तेथे पशुबलीस कोणी विरोध केला नव्हता.

१९०१ सालापासून कोल्हापूरच्या वेदोक्तप्रकरणातून ब्राह्मण–ब्राह्मणेतरवादाची धुमश्चक्री सुरू झाली होती, तरी पशुबलियज्ञाला विरोध करावयास विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकाअखेर कोणी मातबर वैदिक पुढे आला नाही. तरी, मॉंटेग्यू–चेम्सफर्ड–सुधारणांच्या निमित्ताने जातवार प्रतिनिधित्वाची लाट उसळताच महात्मा फुल्यांच्या सत्यसमाजाच्या चळवळीचे पुनरुज्जीवन करण्याचे ठरवून ब्राह्मणी पुढारीपण व वर्चस्व याना नेस्तनाबूद करण्याचा चंग बांधण्यात आला आणि जे जे ब्राह्मण करतील त्यात खरेखोटे दोष काढण्याची प्रवृत्ति तमासगिरीनेही वाढू लागली.

माँटेग्यू–चेल्म्सफर्ड सुधारणात मराठ्याना स्वतंत्र जातवारीचे म्हणून प्रतिनिधित्व देण्याचा इंग्रजी मनसुबा प्रगट झाल्यावर तर ब्राह्मणावर तुटून पडण्याचे वारे १९१८ पासून असे संचारले की तेल्यातांबोळ्यांचे पुढारी म्हटले गेलेले लो० टिळक हे " बामणांचे पुढारी " म्हणून हिणवण्यात आले आणि नरसोबाची वाडी, सज्जनगड येथील उत्सवातील ब्राह्मणांच्या सोवळ्या पंक्ति भ्रष्टनष्ट करण्यात आल्या. अशा या सामाजिक वावटळी चालू असता १९२३ च्या फेब्रुवारीत अग्निहोत्र घेण्याचे पाचवडकर बापट दीक्षितानी केले आणि १९२५ साली एक यज्ञ करण्याचा घाट घातला.

" श्रुतिबोध " मासिकात महर्षि अण्णासाहेब पटवर्धनांचे चिरंजीव रामभाऊ आणि संदेशकार अच्युतराव कोल्हटकर यांच्याबरोबर काम करणाऱ्या बापट दीक्षिताना कालौघाचा तडाखा आकलन व्हावा तसा झाला नाही आणि त्यानी करावयाचा म्हणून ठरविलेल्या सोमयागास वेदमूर्ति पाठकशास्त्री ( धुळे ), नारायणशास्त्री मराठे ( वाई ), दिगंबरशास्त्री नेने ( इंदोर ), चित्रावशास्त्री प्रभृतींची साथ मिळाल्यामुळे बापट दीक्षितानी आपला सोमयाग निश्चितच केला. यावेळी ब्राह्मणेतर चळवळ नुसत्या हिंदुसमाजाच्या चतुष्कोणातच राहिली नव्हती तर तिने सर्वधर्मीय व सर्वपंथीय उग्रता धारण केली होती आणि राजकारणात १९२० सालापासून महात्मा गांधींच्या अहिंसात्मक असहकाराला स्थान मिळून ते परिपक्व झाल्याने, सामाजिक मनोवृत्ति ' हिंसा ' हा शब्द देखील ऐकून घ्यावयास तयार नव्हती.

अशा सामाजिक वातावरणात पशुबलिपूर्वक याग समाजात पुण्याईचा समजला जाणेच शक्य नव्हते. " **शास्त्रात्प्रवृत्तिः शास्त्रान्निवृत्तिः ।** " म्हणणारांनीही " **यद्यपि सिद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं, नाचरणीयं** " हे वर्तनसूत्र जर सांभाळावे लागते, तर महाभारतातील शान्तिपर्वपूर्व काळातील वहिवाट सांगून कोणी पशुबलिपूर्वक याग करू लागला तर तो जिभेची चवचाल धार्मिक अवडंबराने भागवत आहे, असा सामाजिक उठाव होण्यास आपोआपच जागा होत नाही काय ? म्हणून सोमयाग करण्याचे मनात आणल्यावर, सांगलीस तो करण्याचा घाट घालताच, जैनमंडळीनी विरोध उभारल्यावर तरी "**सर्वनाशे समुत्पन्ने, अर्धं त्यजति पंडितः ।** " या न्यायाने बापट दीक्षितानी पशुबलि रद्द करून याग करावयास हवा होता ! तसे न करता, श्रीमंत बाळासाहेब औंधकरांच्या स्नेहाळू सज्जनपणाच्या छत्राखाली औंधास तो सोमयाग करण्याचे त्यानी ठरविले व तसा प्रारंभ केला.

औंधकरांच्या राज्यात वैदिक धर्मप्रचाराचे व संशोधनाचे कार्य १९१८ पासून प्रारंभून बसलेल्या व रायचूरास पशुयज्ञास विरोध केलेल्या पं. सातवळेकरांच्या तत्त्वनिष्ठेस परिस्थितीने तो याग म्हणजे एक आव्हानच उभे केले होते. तेव्हा ते

पंडितजींनी कसे स्वीकारले ते त्यांच्याच पुरुषार्थातील **" औंध येथील सोमयाग "** या लेखातून आपण पाहू—

" माघ कृष्ण अमावास्या शके १८४६ ( मार्च १९२५ ) सोमवारी श्री. वे. शा. सं. आहिताग्नि धुंडिराज गणेश बापट दीक्षित यानी औंध ( जि. सातारा ) मुक्कामी सोमयागास प्रारंभ केला, तो याग निर्विघ्नपणे फाल्गुन शु. अष्टमी सोमवार रोजी समाप्त झाला.

" हा याग पूर्वी वाईस होण्याचे ठरले होते. पण याजुष हौत्र व ऋग्यौत्र या–संबंधीच्या वादामुळे तेथील ब्रह्मवृंदाचे सहाय्य या यागास मिळेनासे झाले, यामुळे श्रीयुत दीक्षित यानी हा याग सांगलीस करण्याचे ठरविले. पण तेथे पशुहिंसेच्या विरुद्ध लोकमत प्रक्षुब्ध झाल्यामुळे तेथील बेतही आयत्यावेळी रहित करणे भाग पडले.

" अशा प्रकारे दोनही ठिकाणी दोन निरनिराळी विघ्ने उत्पन्न झाल्यामुळे श्रीयुत दीक्षित हे औंधास आले व त्यानी येथे यागास आरंभ केला.

" इतर ठिकाणाप्रमाणे येथे दंगाधोपा होण्याची भीति मुळीच नव्हती. कारण येथे यागाची तयारी इतकी लवकर झाली की, इतर ठिकाणाप्रमाणे येथे पक्ष-प्रतिपक्ष बनण्यास वेळच नव्हता. तथापि कोणतीही बाह्य आपत्ति येऊ नये म्हणून यज्ञमंडपाच्या द्वारावर संगिनी–शिपायांचा सशस्त्र पहाराही ठेवण्यात आला होता !

" यज्ञाला प्रारंभ करण्यापूर्वी श्री. दीक्षित यानी यज्ञातील हिंसा अत्यावश्यक असल्याचे एक दोन व्याख्याने देऊन लोकामध्ये जाहीर केले. परंतु या व्याख्याना-मुळे लोकामध्ये बरीच चर्चा मात्र सुरू झाली. ही व्याख्याने न देता यज्ञास प्रारंभ झाला असता तर अशा प्रकारचे विरुद्ध मत बनलेही नसते. अशा प्रकारे कारण नसता दीक्षितानी आपल्याच व्याख्यानानी येथे दुसरी बाजू उभी केली.

" वेळेवर यज्ञास प्रारंभ झाला. दिवसा इष्टी व रात्रौ धार्मिक चर्चा असा कार्यक्रम ठेवलेला होता. धर्मचर्चेचा विषय लोकास समजण्यासारखा असल्यामुळे त्यावेळी बराच मोठा लोकसमुदाय जमत असे व दिवसाही काही लोक यज्ञदर्शना-साठी यज्ञमंडपामध्ये जमत असत.

" या यज्ञात 'पशुवध' निश्चयाने होणार ही बातमी गावात पसरताच पुष्कळ लोक या यज्ञाच्या विरुद्ध झाले. पण यज्ञमंडपावर संगिनी घेतलेल्या शिपा-यांचा पाहरा असल्यामुळे कोणीही विरुद्ध चळवळ करण्यास प्रवृत्त होईनात.

" शेवटी अगदी उदासीन राहणे अशक्य झाल्यामुळे श्री. श्री. दा. सातवळेकर यानी 'यज्ञामध्ये पशुहिंसा' आवश्यक आहे की काय, याची चर्चा करण्यास प्रारंभ करावा व अशी चर्चा करण्यास परवानगी असली, तर आपण दुसरी बाजू

चर्चेच्या वेळी मांडण्यास तयार आहो, असा निरोप श्री. दीक्षित यास पाठविला. याला श्री. दीक्षिताकडून असा जबाब आला की यज्ञ समाप्त झाल्यावर याचा विचार करता येईल. तोपर्यंत विरुद्ध बाजू मांडण्यास परवानगी मिळणार नाही.

" परवानगी देणे न देणे हे सर्व श्री. दीक्षित यांच्या मर्जीवर असल्यामुळे त्यानी रात्रीच्या धर्मचर्चेमध्ये ही विरुद्ध बाजू पुढे मांडण्यास परवानगी दिली नाही. शेवटी एका पशूचे बलिदान केल्यानंतर श्री. श्री. दा. सातवळेकर यास आपली बाजू मांडण्यास परवानगी मिळाली व त्यानी आपली बाजू जमलेल्या शास्त्री पंडित व इतर नागरीक यांच्यापुढे मांडली, ती अशी—

( १ ) यज्ञ ही वैदिक धर्माची एक अद्भुत संस्था आहे. यज्ञाचे सामर्थ्य फारच मोठे आहे. सामर्थ्य मोठे असल्यामुळेच हे कृत्य फार जपून करणे आवश्यक आहे.

( २ ) यज्ञामध्ये पशुहिंसा आवश्यक की अनावश्यक हा वाद बराच प्राचीन आहे व याचा विचार निःपक्षपातीपणाने झाला पाहिजे.

( ३ ) यज्ञवाचक शब्द हिंसेचा भाव दाखवीत नाहीत. ' यज्ञ ' शब्दाचा अर्थ "देवपूजा, संगतिकरण व दान " हा आहे. देवतांचे पूजन, विभिन्न असलेल्या जनतेचे संगति–करण किंवा संघटन, व परोपकार हा भाव सध्याही मनन करण्यासारखा आहे. " प्रजापति " हा यज्ञवाचक शब्द " प्रजांचे पालन करणे " हा भाव दाखवीत आहे. या शिवाय सर्वात महत्त्वाचा यज्ञवाचक शब्द " अ–ध्वर " हा आहे. अ–ध्वर शब्द " अ–हिंसा " हाच भाव दाखवीत आहे. यज्ञ हे कर्म हिंसारहितच आहे, असे या शब्दावरून स्पष्ट होत आहे व जनतेची संघटना हा यज्ञाचा अर्थ पूर्वीच्या शब्दावरून उघड होत आहे.

( ४ ) अ–ध्वर म्हणजे अहिंसामय कर्म. ते करणाऱ्याला अध्वर्यु असे म्हणतात. यजुर्वेदाला अध्वर वेदही एवढ्यासाठीच म्हणतात की त्यात हिंसामय-कर्मे करण्याचा उपदेश प्राधान्येकरून नाही.

( ५ ) ब्राह्मणग्रंथामध्येही पशुयज्ञाचे कार्य पुरोडाशाने होते असे स्पष्ट सांगितले आहे. शतपथ व ऐतरेय या ब्राह्मणामध्ये सांगितले आहे की— " पूर्वी देवानी क्रमाने मनुष्य, घोडा, गाय, मेंढा व बकरा यांचा बलि दिला. पण त्यास पुढे असे आढळले की या पशूतून हवनीय पवित्र भाग निघून गेला व तो भूमिमध्ये प्रविष्ट झाला व तांदूळ व यव यांच्या रूपाने वर उगवला. यांच्या पिष्टाच्या हवनानेही तेवढे कार्य होते की जेवढे वरील पाचही पशूंच्या बलीपासून होऊ शकते. म्हणून तांदूळ व जव यांच्या पिठाचेच हवन करावे, यापुढे मांसाच्या हवनाची गरज नाही ( शतपथ ब्राह्मण १।२।३।६–९ ). ऐतरेय ब्राह्मणातही असेच सांगितले आहे. ( ऐ. ब्रा. २।९ ) या धर्मवचनांचा आशय हाच आहे की आता या पुढे

पशुहननाची आवश्यकता नाही. ते कार्य वरील धान्यांच्या हवनाने सहज होऊ शकते.

( ६ ) महाभारतातील शान्तिपर्वामध्ये अश्वमेधासारखे महायज्ञही पशुघाताशिवाय केले गेले ( शान्ति. अ. ३३६ ). उत्तम पायसाचेच यज्ञामध्ये यजन करावे. वेदाच्या श्रुतिचा भाव धान्याचे हवन करावे असा आहे. 'अज' म्हणजे धान्य, बकरा नव्हे.

**अजसंज्ञानि बीजानि छागं नो हंतुमर्हथ ।**
**नैष धर्मः सतां देवा यत्र वध्येत वै पशुः ॥** ( म. भा. शां. ३३७ )

ही महाभारताची साक्षी मनन करण्यासारखी आहे.

( ७ ) सोमयागामध्ये सोमवल्ली ही मिळत नाही. तिच्या अभावी 'रानशेर' वापरली जाते. इतर ज्या ज्या इष्टी आपण केल्या त्यामध्येही सर्वांशाने लिहिल्याप्रमाणे कार्य केले नसून पुष्कळ ठिकाणी संक्षेप व अनेक ठिकाणी प्रतिनिधि ठेवूनच कार्य केले आहे. मग पशु मारण्यासंबंधानेच आग्रह न धरता वरील वचनाप्रमाणे धान्याच्या पुरोडाशावरच काम चालवावे हे उत्तम होय. देश–काल–परिस्थितीचा विचार करता सध्या पशुमांसाच्या यज्ञापेक्षा धान्याच्या पुरोडाशाचे यज्ञ करणे अधिक श्रेयस्कर आहे. देवीभागवता– ( १।३ ) मध्येही पशुहिंसेवाचून पुरोडाश यज्ञ होत असल्याचा उल्लेख आहे.

( ८ ) यासाठी आपण पशुयागाचा आग्रह न धरता सर्व यज्ञ पुरोडाशानेच करावा. म्हणजे तो अधिक लोकप्रिय होईल. सध्या आपल्या या पशुयागाच्या आग्रहामुळे सर्व जनता विरुद्ध झाली आहे. तेव्हा सर्व विद्वानानी याचा योग्य विचार करावा.

" याप्रमाणे दुसरी बाजू सभेपुढे मांडल्यावर यज्ञकर्ते दीक्षित व त्यांचे सहाय्यक इतर शास्त्री यानी याचे उत्तर यज्ञसमाप्तिनंतर देण्याचे अभिवचन दिले व आपल्या मताप्रमाणे यज्ञ समाप्त केला.

"दुसऱ्या दिवशी दुसरा पशु मारावयाच्या वेळी पशु मारावयास शूद्र मिळालाच नाही व ते काम स्वतः ब्राह्मणास करावे लागले. जो शूद्र पहिल्या दिवशी पशु मारण्यासाठी आणला होता त्याने दुसऱ्या दिवशी स्पष्ट सांगितले की बुक्क्या मारून बोकड ठार मारणे हे अत्यंत क्रूरतेचे काम आहे, ते माझ्याकडून होणार नाही. बोकडाची दया शूद्रास आली पण ती याजकास आली नाही हे खरोखर आश्चर्य आहे ! एकाने अंड पिरगळून ओढणे व दुसऱ्याने बुक्क्या मारून त्यास ठार मारणे, तोंड बांधून प्राण कोंडणे वगैरे जी रीति या पशुवधाची आहे ती क्रूर अंतःकरणासही पाझर फोडील अशी आहे. **पण स्वतःस स्वर्ग मिळावा म्हणून दुसऱ्याचा गळा दाबण्याचे व्रत ज्यानी एकदा 'स्वधर्म' म्हणून अंगिकारले, त्यास एवढी भूतदया तरी कशी सुचावी बरे !**

*

" असो. या यज्ञामुळे औंधच्या नागरीकावर जो अनिष्ट परिणाम झाला आहे तो लवकर विसरला जाणे अशक्य आहे. ब्राह्मणांचा मान इतरांच्या अंतःकरणातून पार नाहीसा झाला आहे; हे लोक ' ब्राह्मणानी धर्म सोडला ' असे उघड चव्हाठ्यावर बोलू लागले आहेत; कारण येथे कोणासही असे वाटत नव्हते की ब्राह्मण लोक अशा रीतीने बोकड मारून, त्याला चरावर फाडून त्याचे हवन करतील. इतरानी कधीही न ऐकलेली गोष्ट प्रत्यक्ष दिसल्यामुळे त्यांचे असे मत होणे अगदी स्वाभाविकच आहे.

" श्री दीक्षितानी यावेळी पुरोडाशाचे हवन करून यज्ञ केला असता तर सर्व जनतेचे पाठबळ त्यास मिळाले असते. पण स्वतः दुराग्रहाने यज्ञसंस्थेच्या रक्षणासाठी म्हणून जो प्रयत्न त्यानी केला त्याच प्रयत्नाने यज्ञाविषयी अश्रद्धा मात्र वाढली ! यज्ञ संस्थेच्या रक्षकानी या परिस्थितीचे नीट मनन करावे म्हणजे त्यास योग्य तो बोध मिळेल.

" औंध संस्थानात यापूर्वी सरकारी हुकमाने देवतास बकरा, रेडा वगैरेचा बलि देण्याची चाल बंद करण्यात आली होती. कित्येक वर्षापासून औंध संस्थानात असे बली दिले जात नसत. कारण कायद्यानेच त्याचा निषेध केलेला होता. पण हा यज्ञ झाल्यामुळे व ब्राह्मणानी प्रत्यक्ष दोन बकऱ्यांचा बलि दिल्यामुळे ब्राह्मणेतरासही आपापले बलि देण्यास एक प्रकारे मुभा झाल्यासारखेच झाले आहे. व एवढ्या थोड्या अवधीत एक दोन ठिकाणी रेड्याचे बलीही दिले गेले ! कोणत्या कृत्याचा कसा परिणाम होतो हे यावरून सहज ध्यानात येईल.

" जे आपणास धार्मिक म्हणवून घेतात त्यावर एक मोठी जबाबदारी आहे. ती जर त्यानी ओळखली नाही, तर त्यांच्या कृत्यापासून असे अनिष्ट परिणाम घडून आले तर त्यात काही आश्चर्य नाही.

" सूज्ञ धार्मिकानी याचा योग्य विचार करावा.

" [ हा यज्ञ समाप्त झाल्यानंतर या यज्ञाच्या ऋत्विजापैकीच एक उद्गाता बसल्या जागी मरण पावला व अशा रीतीने हा प्रसंग अत्यंत शोकपर्यवसायी झाला हे लिहिण्यास आह्मास अत्यंत दुःख होत आहे. परमेश्वर मृत आत्म्यास शान्ति देवो. ] "

—पुरुषार्थ ( वर्ष १ अंक ८, फाल्गुन शके १८४६, मार्च १९२५, पृ. १८२ ते १८५. )

दीक्षितांचे एक सहाय्यक वे. शा. सं. लक्ष्मणशास्त्री भावे याना ( अनेक वर्षांच्या पोटदुखीमुळे ) यज्ञसमाप्तीचे वेळीच मृत्यु आला, हा जरी **" अजापुत्रं बलिं दद्यात् । "** चा शाप मानला नाही तरी, पंडितजींनी केलेल्या विरोधाचा व लोकमताचा पुढे विजय असा झाला की बापटदीक्षितानी १९२७ पासून इंदोर वगैरे ठिकाणी जे यज्ञ केले त्यात व पुण्यास १९५५ साली केलेल्या वाजपेय यज्ञात पुरोडाशानेच हवन उरकण्यात आले.

: २८ :

# स्वाध्याय-मंडळाचे कार्य

**समाजसन्मुख** होऊन मनुष्याने आपले जीवितकार्य करावे तर त्याची प्रवाह-स्निग्धता कायम, निदान चिरकाल, राहण्यासाठी सामुदायिक सहकाराने चाललेली आणि जबाबदारी पेलणारी संस्था असलेली अधिक चांगली. वैदिक वाङ्मयाचा प्रचार आणि त्याच क्षेत्रातील संशोधन यांचा ध्यास पंडितजींच्या मनाने लाहोरास मुक्काम केल्यानंतर सार्वजनिक जीवनातील अनुभवावरून सारखा घेतला होता. तेथे त्यानी एक अभ्यासमंडळ सुरू केले होते व त्याचा फायदा अनंत लोकानी घेतलाही होता. तेव्हा " **नमस्ते चिते सर्वलोकाश्रयाय।** " म्हणून औंधास आल्यावर वैदिक वाङ्मय आणि वैदिक जीवन यांच्या संशोधनपूर्वक उभारणीसाठी स्वाध्याय-मंडळाची आपली कल्पना साकार करण्याचे त्यांनी ठरविले व त्याप्रमाणे ते कामास लागले. जुन्या चांगल्या गोष्टीचे पुनरुज्जीवन करताना अगर नव्या हितकारी प्रथा समाजात रुजविताना, लोकशिक्षणाच्या कार्यावर मुख्यतः भर द्यावा लागतो. ते लोकशिक्षण चांगल्याचे अभिनंदन व वाईटास विरोध करण्यात जेवढे साधते, त्यापेक्षा कितीतरी पटीने ते दैनंदिन विधायक व प्रगतिपर कार्यसातत्याने सतेज साधत असते. हाच अनुभव १९१८ साली औंधास स्वाध्यायमंडळ काढल्यापासून अगदी १९४८ साली ते पारडीस हलविल्यानंतरही येत राहिला आहे.

" अथातः स्वाध्यायप्रशंसा। प्रिये स्वाध्यायप्रवचने भवतः। युक्तमना भवति। अपराधीनो अहरहर अर्थान् साधयते। सुखं स्वपिति। परमचिकित्सक आत्मनो भवति। इंद्रियसंयमश्च एकरामता च। प्रजावृद्धिर्यशो लोकपक्तिः। प्रजावर्धमाना चतुरो धर्मान् ब्राह्मणमभिनिष्पादयति, (१) ब्राह्मण्यं (२) प्रतिरूपचर्यां (३) यशो (४) लोकपक्तिम्। लोकः पच्यमानः चतुर्भिः धर्मैं ब्राह्मणं भुनक्ति, अर्चया च दानेन च आज्येयतया च अवध्यतया च। "— ( शतपथ ब्राह्मण ११।५।७।१ )

स्वाध्यायाचे समर्थन करताना भगवान् याज्ञवल्क्य यानी या गुणसंपत्तिचा पुरस्कार केला. या साऱ्या गुणांचा आविष्कार पंडितजी सातवळेकरात झाला असून स्वाध्यायाचा उल्लेख झाल्याबरोबर वेदवाङ्मय डोळ्यापुढे येते. १९१८ मध्ये पंडितजींनी औंधास प्रथम स्वाध्याय–मंडळ स्थापले आणि पहिल्या दहा वर्षात विपुल प्रमाणात वेदग्रंथांची छपाई झाली. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद अशा चारी वेदांच्या संहिता उत्कृष्ट छापून त्या कमीत कमी किंमतीला ग्राहकास मिळताच जग आश्चर्याने पाहू लागले !!

पंडितजींच्या स्वाध्यायमंडळाने वेदप्रकाशनाच्या क्षेत्रात केलेल्या कार्यास दुसरी तोडच नाही. वेदग्रंथांच्या मुद्रणाबाबत पंडितजींचे प्रयत्न नुसते स्तुत्यच आहेत, असे नव्हे, तर वेदाच्या सर्वशुद्ध मुद्रणासाठी सर्व भारताचा त्यानी प्रवास केला आणि वे. येडूरकरांसारख्यांचे सहाय्य घेऊन चारही वेदांच्या संहिता पाच पाच रुपयात जनतेस दिल्या. आजपर्यंत पंडितजींनी हिंदीत २०००० चे घरात, मराठीमध्ये १०००० चे सुमारात, गुजराथीपोटी ५००० च्या अंदाजात, वेदसंहिता–सूचींचे कार्य केले आहे. त्यामुळे स्वाध्यायमंडळाची सर्वत्र प्रशंसा होऊ लागली. कारण पाश्चात्य विद्वानानी इंग्रजी शीर्षकाने वेदांची पुस्तके छापून एक–दोन पानांच्या इंग्रेजी टिपणीनेच वाचकांची बोळवण या पूर्वी केली होती. परंतु पंडितजी पडले भारतीय. त्यानी भारतीय "जनमनगणा" बद्दल नितान्त आदर व आपुलकी बाळगून काम केल्यामुळे, वेदांची पोहोच स्वयंपाकगृहापर्यंत व मुलांच्या क्रीडांगणापर्यंत व्हावी अशी त्यांची जिद्द निर्माण झाली. ही जिद्द म्हणजे त्यांचे वेड नसून उगवत्या नव्या काळासाठी ते 'दर्शन' आहे. चार तपांच्या वाङ्मयतपस्येने ठरून गेले आहे की पंडितजींची पुस्तकरूप प्रतिमा म्हणजे स्वाध्यायमंडळ. या चैतन्यमय संस्थेत वेदांचे व अनुषंगिक वाङ्मयाचे मुद्रण, प्रकाशन, वितरण, संपादन, लेखन, समर्थन, पुरश्चरण आणि वेद–गुणसंपत्तिचा प्रचार याचे सूक्ष्म शास्त्रच स्पष्ट कार्यान्वित झाले आहे.

पंडितजींच्या प्रज्ञाविकासात '**तदपश्यत् तदभवत् तदासीत्।**' (यजुर्वेद अ. २२) या मंत्राचे दर्शन होते. कीटकभ्रमर न्याय म्हणाना ! पंडितजींना वेदांचे दर्शन झाले, वेदांचे संपादन, प्रकाशन, मुद्रण, वितरण आणि वेदमूलक भाग्यसंपत्तिची प्राप्ति त्याना झाली आणि ते स्वतःच आता भगवान् वेदमूर्ति गणले गेले. वेदांच्या मूळ संहिता पंडितजींनी छापविल्यावर त्या संहितांच्या मुद्रणप्रकाशनात आर्षेय संहिता, दैवतसंहिता, सुबोध भाष्य, पदपाठ, पदार्थ इत्यादि प्रमुख गोष्टीवर भर दिला आहे.

पंडितजींच्या स्वाध्यायमंडळाचे कार्य अद्भूतच आहे. पंडितजींनी संशोधकाना सहाय्यक होतील असेही ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. गोज्ञानकोश ( २ भाग ), त्याचप्रमाणे दैवतसंहिता ( ३ भाग ) यांचा वैशिष्ट्याने उल्लेख केला पाहिजे. गोज्ञानकोशात गाईविषयीच्या वेदमंत्रांचे संकलन असून वेदामधील गाय हे कशाकशाचे

प्रतीक आहे, हे अभ्यासण्यासही त्या कोशाचा उपयोग, गाय या जनावराचे भारतीय महत्त्व कळण्याबरोबरीने होतो. दैवतसंहितेत प्रमुख देवतामंत्रांचे देवतानिहाय संकलन आहे.

वेदावरील सोप्या भाषेतील आपल्या भाष्याने पंडितजींनी वेद जसे सामान्य जाणकारांच्या समजूतीचे आटोक्यात आणून सोडले, तसेच त्यातील राजकीय, सामाजिक जीवनांचे आदर्शही लोकांच्या डोळ्यात व डोक्यात भरवले आहेत. वैदिक धर्म ( हिंदी ), वेदसन्देश ( गुजराथी ), पुरुषार्थ ( मराठी ) आणि अमृतलता ( संस्कृत ) या नियतकालिकांच्या द्वारा वेदप्रचाराचे कार्य जसे स्वाध्यायमंडळामार्फत पंडितजींनी चालविले; तसेच संस्कृत शिक्षणाचे कार्यही २४ पाठ्यपुस्तकांचे द्वारा केले आहे. ते भारताप्रमाणेच जोहान्सबर्ग प्रभृति विदेशातही लोकप्रिय झाले आहेत. संस्कृतपरीक्षांची १३०० केन्द्रे स्वाध्यायमंडळाने चालविली आहेत. त्यातून दरवर्षी ४२०००–४५००० विद्यार्थी निरनिराळ्या परीक्षांना बसतात. नेपाळापासून रामेश्वरापर्यंत पसरलेल्या स्वाध्यायमंडळाच्या संस्कृत परीक्षा केन्द्रांचे कौतुक महात्माजींनीही केले होते. शिक्षण देणारी व परीक्षा घेणारी अशी महर्षि कर्व्यांच्या नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाप्रमाणे पं. सातवळेकरांचे स्वाध्यायमंडळ हीही एक संस्था आहे, एवढा लौकिक स्वाध्यायमंडळाचा झाला.

भारतीय संस्कृति आणि सहकार–समन्वयाने जगाच्या बदलत्या जमान्याशी जुळते घेण्याचा अटोकाट प्रयत्न करून भारताचा सचेतन " इतिहास " प्रवाह " तुंबता न ये । " म्हणून त्या तेजस्वी संस्कृतीने चालविलेला प्रयत्नपुरुषार्थ यावरील लक्ष विचलित होऊ न देता, पंडितजीना शारीरिक व मानसिक श्रमानी स्वाध्यायमंडळाचे कार्य जेवढे नेटके करता येईल, तेवढे नेटके करण्यास त्यानी मुळीच कसूर केली नाही. " **सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः ।** " म्हणून व्यवहारविनिमयास लागणाऱ्या पैशाची चिन्ता पंडितजींना अजिबातच नव्हती, असे नाही ! पण " **तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।** " या गीतान्तर्गत भगवन्तांच्या आश्वासनावर पंडितजींचा नितान्त विश्वास होता व आहे. स्वाध्यायमंडळाकरता जागा आणि वेदमुद्रणाकरता सहा हजार रुपये औंध–अधिपतींनी प्रारंभास दिले आणि वेदाचे पहिले प्रकाशन केल्यावर, निराशेचा गडद अंधःकार, लोकजिव्हाळ्याच्या दृष्टीने, पसरला असता एक दिवस अकल्पितपणे वेदमुद्रण चालविण्यासाठी दोन हजार रुपयांचा चेक टपालाने आला, या गोष्टी पंडितजींना परमेश्वरी प्रसादासारख्या वाटल्या असल्या, तर नवल नव्हे ! पारडीची जागाही १९४८ साली ऐन नडीच्या वेळी स्वाध्यायमंडळाला मिळाली व जेथे हिंदुधर्माचा नाश करण्याचे कार्य सुरू होते, त्याच जागी वैदिक धर्माच्या अथवा हिंदुधर्माच्या जागृतीचे केन्द्र स्थापन झाले व वेदध्वनि घुमू लागले, हा ही " जगन्नाथाचा वरदहस्त " च नव्हे काय ?

तत्त्वनिष्ठेच्या सत्वपरीक्षांची दिव्ये सोसून पंडितजींनी चार तपे स्वाध्यायमंडळाचे संचालन केले, त्यात ऐहिक किफायत म्हणतात, तिचा स्वाहाकारच पंडितजींना बहुधा करावा लागला आहे. पण " ना खंत, ना खेद; ना कुरकुर, ना नाउमेद " हेच पंडितजींचे वर्तनसूत्र राहिले आणि वेद, उपनिषदे, गीता, महाभारत, रामायण, योगसाधना व अनुषंगिक विषयावरील चारशेहून अधिक लहान मोठी पाचशे रुपयाहून अधिक किंमतीची पुस्तके सोमनाथापासून जगन्नाथापर्यंतच्या व केदारेश्वरापासून कन्याकुमारीपर्यंतच्या भारतातच नव्हे, तर परदेशच्या वेदप्रेमी विद्वानातही मान्यता पावली.

सांस्कृतिक सेवा हाच पंडितजींच्या व्याप–आटोप–खटाटोपाचा केन्द्र असलेने, गुजरात राज्यातील बलसार जिल्ह्यात जो पारडी म्हणून गाव आहे, त्यापासून मैलाच्या अंतरावर पंडितजींनी आनंदाश्रम केला आहे. स्वाध्यायमंडळ या आपल्या संस्थेच्या जागेत पूर्वी ख्रिश्चन मिशनरी रहात असे. औंध सोडल्यानंतर पंडितजींनी या जागेत वेदवाङ्मयाचे तपोवन केले आहे. आंबराई असलेल्या स्वाध्यायमंडळाच्या चंद्राकृति प्रवेशद्वाराखालून आत प्रवेश केला की उजव्या बाजूला परमपवित्र, वेदमंदिर दिसते; डाव्या बाजूला पंडितजींच्या आश्रमासमोर भारतीय फुलानी सजलेला बागबगिचा नजरेस पडतो, वृक्षराजींचे मस्त हत्तीच दारी डुलताहेत जणु ! लता-पल्लवांच्या रंगीबेरंगी पताकाच फडकताहेत; हिरवा साज चढवून चारी दिशासुंदरी अभ्यागतांच्या स्वागताला उत्सुकतेने दंग दिसताहेत; मेदरहित मादकता, दंभविहीन सुंदरता, सजीव शांतता यांच्या एकजीव मनोहर मिळणीने स्वाध्यायमंडळ ही वैदिक संशोधनसंस्था पंडितजींच्या परिश्रमाचे व दृढनिश्चयाचे प्रतीक ठरली आहे.

" **न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः ।** " जोपर्यंत माणूस भरपूर परिश्रम करून दमत नाही, तोपर्यंत देव पण त्याच्या सहाय्यास धावून येत नाहीत. हे वेदवचन येथेही सत्य ठरले आहे. पंडितजींची या संस्थेमार्फत पंचवीस हजार हिंदी, वीस हजार मराठी, दहा हजार गुजराथी व दोन हजार इंग्रजी पृष्ठांची चारशे नऊ पुस्तके प्रसिद्ध झाली असून, वेदसंहितांचे प्रकाशन व भाषांतर यावरच येथे मुख्य भर आहे. महर्षि दयानंद सरस्वती आणि भट्ट मॅक्समुल्लर यांच्यानंतर वेदांचा उद्धारकर्ता म्हणून पंडितजी सातवळेकरांचेच नाव इतिहासाने आपल्या कपाळी कोरले आहे.

स्वाध्यायमंडळात आज उद्या ( १९६६–६७ ) ऋग्वेदाचे सुबोध भाषांतर आणि महाभारताचा हिंदी अनुवाद अशी कामे चालू आहेत. या दोन्हींचा प्रकाशनखर्च तीन–साडेतीन लाख रुपये होणार आहे. स्वाध्यायमंडळाची अशीही एक योजना आहे की चारी वेदांचे तीस भागात भाषान्तर काढावे, पैकी दहा एक भागच प्रकाशात आले आहेत, याशिवाय ब्राह्मणे आणि आरण्यके यांचीही भाषान्तरे प्रसिद्ध करावीत असे मंडळास वाटते.

चारही वेदांचा अनुवाद हिंदी, मराठी, गुजराती, सिंधी वगैरे भाषातून सुबोधातील सुबोध असा व्हावयाचा असून प्रत्येक भाषेतील अनुवादास सुमारे अडीच लक्ष रुपये साहजिकच लागणार आहेत. चार वेदात मिळून बावीस हजार पांचशे मंत्र सहज असून त्यात ध्यानांत ठेवण्यासारखी सुभाषित—सूक्ते कितीतरी आहेत. ही सूक्ते विषयवार लावून एक हजार पृष्ठांचा ग्रंथ काढण्याचा स्वाध्यायमंडळाला उद्योग करावयाचा आहे. त्यात व्यक्ति, राष्ट्र, समाज, कुटुंब, पुत्र, धन, वीरता, युद्ध, सैन्य, किल्ला, युद्धोपयोगी शस्त्रास्त्र इत्यादि अनेक विषयासंबंधी सुभाषिते ग्रथित केली जातील. अनुवादाच्यासह ही सुभाषिते प्रसिद्ध झाली म्हणजे त्यांचा उपयोग हरएक मनुष्याला शहाणे होण्याकरता तर होईलच; पण विशेषेकरून संपादक, लेखक, वक्ता, व्यवहारकर्ता, शिक्षक, उपदेशक यांना विपुल प्रमाणात होऊ शकेल.

## स्वतंत्र दृष्टिकोन

उपनिषदत्तील ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडुक्य, ऐतरेय आणि तैतिरीय ही मुख्य अकरांपैकी आठ भाषांतर करून प्रसिद्धहि झाली. यात पंडितजींनी अगदी स्वतःचा स्वतंत्र दृष्टिकोन स्वीकारला आहे. त्यामुळे या हजार पानांच्या उपनिषद् भाष्याच्या चुटकीसरशी तीन आवृत्ति निघाल्या आणि पंडितजींचे भाष्य हिंदी, संस्कृत, गुजराथी, मराठी, इंग्लिश आणि कन्नड इतक्या भाषातून अवतरले. उपनिषदाप्रमाणेच रामायण व महाभारत यांच्या पंडितजींनी संपादून भाषांतर केलेल्या ग्रंथांचेहि प्रकाशन स्वाध्याय मंडळाने केले असल्याकारणाने, संस्कृत वाङ्मयातील शिरोमणि ग्रंथांचे आविष्कार यशस्वीपणे मंडळाने जगापुढे केले आहेत, असे म्हटले तर अतिशयोक्ति नाही.

संस्कृत भाषेची आवड समाजात निर्माण व्हावी म्हणूनहि स्वाध्यायमंडळाने वेदप्रकाशनाचे आस्थेने प्रयत्न केले आहेत. जगातील सर्वच भाषांची आदिमाता संस्कृत आहे. वेदपरिचय, वेदप्रवेश, वेदप्राज्ञ, वेदविशारद, वेदपारंगत व वेदाचार्य अशा वेदाबाबत स्वाध्यायमंडळाच्या परीक्षा असून उपनिषदाबाबत परिचय, प्रवेश, प्राज्ञ व अलंकार अशा परीक्षा आहेत. उपनिषदाप्रमाणेच गीतेच्याहि चार परीक्षा असून त्या सर्व वर्षातून एक वेळ होत असतात.

## मानवसेवेसाठी—

संस्कृतभाषा प्रसाराला वेग यावा म्हणून एक पाठशाळा काढावी आणि विद्यार्थ्यांच्या योगक्षेमासाठी त्यांना शिष्यवृत्त्या द्याव्या, अशीहि एक योजना स्वाध्यायमंडळापुढे असून त्या पाठशाळेच्याबरोबरीने एक ग्रंथालयहि उभारावे म्हणजे विद्यार्थ्यांची ज्ञानदृष्टि सर्वच बाजूंनी विशाल होईल, असाहि आराखडा स्वाध्यायमंडळाने मार्गी केला आहे. आजकाल ब्राह्मणांच्या घरोघरी चालणाऱ्या वेदाभ्यासाला आळाच बसल्याकारणाने पदस्वरासुद्धा वेदाध्ययनाची सोय व्हावी आणि पठणासुद्धा सर्वांगानी

वेदरक्षण साधावे म्हणून वेदमहाविद्यालयहि चालवावे, त्यात मैत्रायणी, कण्व आणि इतर संहितासह अभ्यासक्रम ठेवावा व त्या विद्येस वाहून घेण्यासाठीहि शिष्यवृत्त्यांची नि मानधनाची तरतूद करावी, असाहि मनसुबा स्वाध्याय–मंडळाचा आहे. मानव्याच्या सेवेसाठी या सर्वांची आवश्यकता असून, लोकांची सहानुभूति, सहाय्य, सहकार आणि संरक्षण यानीच त्या गोष्टी साकार होणाऱ्या आहेत.

गांधीवधोत्तर महाराष्ट्रांतील गावोगावी जो जाळपोळीचा बाका वकत गुदरला, त्याचा फटका औंधासहि बसला. त्यातून संस्थानच्या विलीनीकरणाने स्वाध्यायमंडळावर फुले वेचली तेथे गोवऱ्या वेचण्याची पाळी येण्याची दुर्गंधी निर्माण झाली. तो सत्त्वपरीक्षेचा आणि दिव्याचा कालखंड होता. त्यातून सहिसलामत पार पडणे येरागबाळाचे काम नव्हते. पण " **अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥** " अशा दैवी गुणसंपदेने मंडित असलेल्या पंडितजींनी कुरकुर म्हणून कशी ती न करता, आल्या प्रसंगाला धैर्याने तोंड देऊन, प्रयत्नांच्या पराकाष्ठेने पारडीला थोडक्याच वेळात बस्तान बसविले. हसतमुखाने सर्व अडचणीना तोंड देऊन, पंडितजींनी पारडीस "पुनश्च हरिः ॐ" केले व स्वाध्यायमंडळ पहिल्या जोमाने कार्यप्रवण व कार्यक्षम झाले.

औंधाहून पारडीला स्वाध्यायमंडळासह आपले वेदवाङ्मयसंशोधन–प्रकाशनाचे उद्योग पंडितजींनी पहिल्यासारखेच तेजोवर्धनाने सुरू केले. ते आपल्या वयाच्या एक्क्याऐंशीव्या वर्षी. पंडितजींची ही धीरगंभीर वीरवृत्तीच त्यांच्या यशाचें बीज होय.

## भारताची अपेक्षा

आपापल्या कार्यक्षेत्रात यश मिळवणे आणि नवनवीन शक्तिसंचयाने राष्ट्रप्रतिष्ठेचे रक्षण करणे, हे कर्तव्य बजावण्यांत आपल्या प्रत्येक सुपुत्राने व प्रत्येक सुकन्येने दक्ष असावे, अशीच भारताची अपेक्षा असते. स्वाध्यायमंडळाच्या कार्याने पंडितजींनी ती आपल्या शंभरीपर्यंत पराकाष्ठेने शक्य तेवढी परिपूर्ण केली आहे. 'समष्टी–शरीरात जेव्हा व जितके' पंडितजींचें गूढार्थविवेचन " भिनेल तेव्हाच (व तितकाच) आमचा समाजपुरुष अभ्युदयसंपन्न, पौरुषयुक्त आणि ओजस्वी नि तेजस्वी होईल," असा पंडितजी सातवळेकरांचा दृढ विश्वास आहे.

गोपथ ब्राह्मणात देवचरित आचरावे अशी ऋषींची अपेक्षा आहे. देवतेप्रमाणेच आपण गुणवन्त व उदात्त व्हावे हीच पूजकाची इच्छा असते. आपल्या पूजनीयाचे अनुकरण हीच खरोखर पूजा असते. पंडितजींनी तयार केलेल्या देवतासंहिताचे महत्त्व आहे. वेदातील सुपर्णा विद्या, हिरण्यगर्भविद्या या संकेतानी प्रगट झाल्या आहेत. चिंतनाशिवाय त्यांचा गूढार्थ आकलन होणे अवघड होते. विश्वाचे राजगुह्य वैदिक ऋषींनी संकेतानीच प्रगट केले आहे. मातृत्व आल्याशिवाय " बाळा दुग्धाची उत्पत्ति " होत नाही; म्हणून दूध हा वेदात कित्येक ठिकाणी मातृत्वाचा संकेत

आहे. असेच दुसरे कित्येक संकेत वेदान आहेत. 'गो' हा दुधाचा, 'वृक्ष' हा वनाचा असेही संकेत वेदात आहेत. वेदार्थाचे वेळी त्यांचा संदर्भानुसार सखोल अर्थ पहावा लागतो. पंडितजींनी हिंदी, गुजराती, मराठीमध्ये सामवेद व अथर्ववेदांचे अर्थ दिले आहेत ते वरील सर्व अवधाने संभाळून ! ऋग्वेद–यजुर्वेदाचा अर्थही त्याच धोरणाने चालू आहे. वेदाचे तीस भागात जे प्रकाशन व्हावयाचे आहे, ते ब्रह्मविद्या, मातृभूमि व राज्यशासन, गृहस्थाश्रम, आरोग्य आणि दीर्घायुष्य, मेधाजनन–संघटन व विजय, अग्निदेवता ( ५ भाग ), इन्द्रदेवता ( ९ भाग ) मरुतदेवता, उषादेवता, अश्विनी, विश्वेदेवता, आयुर्वेद ( २ भाग ), सोम, रुद्र, आदित्य, अन्य देवता व ऋषि अशा तीस भागांचे आहे. प्रत्येक भाग पाचशे पाचशे पानांचा होऊन दोन हजार प्रतींच्या आवृत्तीला दहा हजार रुपये तरी घालावे लागतील.

डॉ. अनंतशयनम् अय्यंगार या विद्वद्वर्य खासदारांनी पंडितजींना लिहिल्याप्रमाणे " संस्कृत ही आपल्या ( भारतीय ) संस्कृतीची भाषा आहे. वेद, उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, गीता, महाकाव्ये, पुराणे, नाटके जी संस्कृतात प्रगट झाली आहेत त्यांचा अनुवाद बहुतेक सर्व भारतीय बोलभाषातून झाला असून माणसाने मातृभाषेत विद्वान् व्हावयाचे ठरविले तरी त्याला संस्कृतभाषेचा अभ्यास अपरिहार्य आहे. याच दृष्टीने भारतीय एकजिनसीपणासाठी संस्कृत भाषेला भारतसरकार महत्त्व देत असून स्वाध्यायमंडळाच्या संस्कृत परीक्षांची राष्ट्रसेवा मान्य होण्यासारखी आहे. प्राथमिक आणि साहित्यिक असे त्या परीक्षांचे दोन प्रकारही लहानापासून थोरापर्यंत संस्कृत भाषेच्या सहज परिचयासाठीच आहेत. या परीक्षासाठी नेमलेली पुस्तके आणि ती सहज समजावीत म्हणून पंडितजींनी चोवीस पुस्तकांची तयार केलेली अभ्यासक्रमणिका मराठी, गुजराती, इंग्रजी, कानडी, तेलगु भाषात असून तिच्यावरून एक वर्षात चांगलाच संस्कृतपरिचय घडतो. साहित्यिक परीक्षा चार असून साहित्यकोविद, साहित्यप्रवीण, साहित्यरत्न आणि साहित्याचार्य अशी त्यांची नावे आहेत. त्या अनुक्रमे एक एक व दोन दोन वर्षात उत्तीर्ण होता येत असून सहा वर्षांच्या अवधीत विद्यापीठाच्या एम्. ए. च्या तोडीने विद्वान् होता येते. स्वाध्यायमंडळाच्या या परीक्षाना राजस्थान, म्हैसूर, मध्यप्रदेश, गुजराथ, महाराष्ट्र ही राज्ये आणि दिल्लीचे मध्यवर्ती आयुर्वेदमंडळ यांची मान्यता मिळालेली आहे. स्वाध्यायमंडळातर्फे वेद, उपनिषदे व गीता यांच्या अभ्यासपूर्वक परीक्षा होत असून वेदपरिचय, वेदप्रवेश, वेदप्राज्ञ, वेदविशारद, वेदपारंगत आणि वेदाचार्य अशा वेदाबाबत, तर उपनिषद्परिचय, उपनिषद्प्रवेश, उपनिषद्प्राज्ञ व उपनिषदालंकार या उपनिषदाबाबत आणि गीतापरिचय, गीताप्रवेश, गीतारत्न व गीतालंकार या गीतेबाबत होणाऱ्या परीक्षा होत. या सर्व वर्षातून एकवेळ होतात.

स्वाध्यायमंडळाच्या कार्याचा आढावा हा असा आहे.

: ३९ :

## सम्पादक पंडितजी

उच्च भारतीय सांस्कृतिक जीवनाचा आदर्श ललित व कलात्मक वाङ्मयाच्या-द्वारा लोकापुढे ठेवून स्वधर्माची जागृति करावी आणि पुरुषार्थ साधण्यास वाचकास प्रवृत्त करावे, म्हणून लोकशिक्षणार्थ सन् १९२४ सालापासून पंडितजी सातवळेकरानी प्रथम औंधास "पुरुषार्थ" मासिक सुरू केले. भारतीय संस्कृतीचा व पौरुषप्रयत्नांचा जोरदार प्रचार व पुरस्कार करणारे मराठीतील एकमेव ज्येष्ठ व श्रेष्ठ मासिक ज्ञानांजनाने सर्वांगीण जीवनविकासाची गुरुकिल्लीच वाचकांचे हाती देत आले आहे. "**साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात्पशुः पुच्छविषाणहीनः ।**" जर माणूस ठरतो, तर त्यांचे बौद्धिक शिक्षण करणाऱ्या नियतकालिकाला त्या कलांचा आश्रय करणे कर्तव्यप्राप्तच ठरते. त्याचबरोबर साधकसाधना, आरोग्यविज्ञान इत्यादि विषयावर मुख्यत्वे भर देण्यात येत असला तरी लोकोपयोगी संस्था नि काँग्रेसच्या राजकारणा-पासून दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानी राजकीय चळवळीपर्यंत प्रसंगानुसार सगळ्या विषयावर पुरुषार्थात लेखही आले आहेत आणि संपादकीयेही यावयास चुकली नाहीत.

पुरुषार्थाची विशेषांगे म्हणून नियमितपणे कोणती आढळत आली, यांचा विचार सांगावयाचा तर प्रत्येक अंकाच्या पहिल्या व जरूर तर दुसऱ्या पानावर, एका मार्ग-दर्शक वा उद्बोधक अशा वैदिक ऋचेचा उतारा, त्या ऋचेचा अन्वयार्थ आणि सटीप निससंदर्भ स्पष्टीकरण या गोष्टी बिनचूक असावयाच्याच. "चलती दुनिया" या सदरात महिनाभरातील विशेष घडामोडींचा परामर्श घेऊन भारतीय सांस्कृतिक दृष्टचा प्रत्यक्ष वास्तवाची मोडमांडणी केलेली असावयाची. जागतिक युद्धाच्या काळात, युद्धविषयक घडामोडींचा आढावा स्वतंत्र लेखाने घेतलेला असावयाचा. कोणत्याही क्षेत्रातील कर्तृत्वंताचे स्फूर्तिदायक वा अनुकरणीय अगर आदर्श असे एक

चरित्र असावयाचे, हे ठरलेलेच ! तशीच एकादी पौराणिक, ऐतिहासिक, प्रस्तुत वा काल्पनिक अशी गोष्ट देऊन राष्ट्रात वा समाजात निर्माण झालेल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक वा धार्मिक समस्येसंबंधी उद्बोधन झालेले असावयाचे ! अभिप्रायास व भेटीस आलेल्या ग्रंथपुस्तकांचे सत्कारसमालोचनही आपली चिकित्सा वाचकांचा चित्तवेध केल्याशिवाय सोडावयाची नाही. आणि या सर्वाबरोबर वेदानुवादासह वेदविद्येच्या शिक्षणार्थ, प्रचारार्थ व प्रकाशनार्थ स्थापन झालेल्या स्वाध्यायमंडळाच्या मासिक कार्याची टिपणीही आपले टिपण साधण्यात धन्यताच मानावयाची. एवंगुणाविशेष पुरुषार्थाचे सर्वसाधारण स्वरूप लक्ष्यात आल्यावर, हेही स्पष्ट केले पाहिजे की पुरुषार्थातील कित्येक लेख व लेखमाला स्वतंत्र पुस्तकरूपाने लोकाहाती राहण्यासारख्या असल्यामुळे त्याना पुस्तकरूपाने स्थायी स्वरूपही पंडितजींनी दिले आहे.

पुरुषार्थ हे धर्मबुद्धिने चालविलेले ध्येयवादी मासिक. त्याचे वेदाङ्क, गणेशाङ्क, शिवाजीअंक, आत्मकथांक, उपासनांक, वीरकथांक, ईश्वरांक, साधनांक, छत्रपति विशेषांक, श्रीसमर्थांक, साधुसंतांक, भूदान–विशेषांक आणि रामराज्यांक हे सर्व अभ्यसनीय निघाले असून संदर्भ म्हणूनही उपयोगी पडण्यासारखे आहेत. पुरुषार्थ आवडीने, आदराने व अभिमानाने वाचणारे पुष्कळच आहेत. सांस्कृतिक विचारधनाचा प्रसार करण्यासाठी निघालेल्या या मासिकास हे भूषणास्पद असून पंडितजींच्या संपादनकुशलतेचे ते श्रेय आहे. साहित्य, संस्कृति, राजकारण आणि अध्यात्म यांचा संगम साधून पंडितजी पुरुषार्थादि आपली नियतकालिके चालवित असल्याकारणाने, ती उच्च बौद्धिक पातळीवरील वाचकांचीच आवडती असणार हे उघडच आहे. "पुढीला" मध्ये ज्ञान, उत्साह, स्फूर्ति वा प्रेरणा उत्पन्न करण्यासाठी निश्चयात्मक साहित्याची सर्वाहून अधिक गरज असते. असे साहित्यच डोळस विभूतिपूजेचे निदर्शक असते. ज्या समाजात वा राष्ट्रात **"यद्यद्विभूतिमत् सत्वं श्रीमदूर्जितमेव वा।"** असेल त्याची पूजा, स्मृतिसंगोपन आणि भावी पिढीपुढे त्याचे मर्मविवरण, यापैकी काही प्रयत्न होत नाही, त्याने कोणत्या आधारावर इतिहास करण्याची आकांक्षा धरावी ? जीवनासाठी आवश्यक स्फूर्ति वा उत्थानाचा जिव्हाळा बंद झाला तर **"मरावे परी कीर्तिरूपे उरावे !"** या वृत्तीची आशा म्हणजे मृगजळाने तृष्णाशमनच ठरेल. बंगाल, महाराष्ट्र, गुजराथ, मद्रास व पंजाबमध्ये "विभूतिपूजेची" भावना आहे. म्हणून एकाच विषयावरील परस्परविरुद्ध विचार असलेले लेखही पुरुषार्थात प्रसिद्ध झालेले आढळतात; इतकेच नव्हे, तर संपादकीया विरुद्ध असलेले लेखही सविस्तर दिलेले कित्येक वेळा दिसतात. याचे कारण कोणताही विषय सांगोपांग आणि पैलूपैलूनी आपल्या वाचकाना कळावा आणि त्यानी स्वतः आपल्या बुद्धीने त्या विषयीची आपली मते बनविण्याचे स्वातंत्र्य भोगावे, हाच पंडितजींचा बुद्धिवादाधिष्ठित दृष्टिकोन होय. अमेरिकेतून पुरुषार्थात लिखाण

करणाऱ्या प्राध्यापक शंकररावजी गोखले व सौ. उमाबाई गोखले यांची स्वानुभव-सिद्ध ग्वाही पंडितजींच्या संपादकीय उदारपणाबद्दल पुरेशी होईल.

" **न्यायनिष्ठुर बोलणे, जनास वाटे कंटाळवाणे।** " हे खरे; पण लोकशिक्षणार्थ नियतकालिके चालविणाऱ्या संपादकाना तसे प्रसंगवशात् बोलावेच लागते. पंडितजींनी तेही केले आहे. त्यांचे चित्रकलाशिष्य श्री शंकरभाऊ किर्लोस्कर यांच्या मासिकातून जेव्हा पुराण–कथांच्या विडंबनातून अश्लीलपणा डोकावू लागला आणि नवमतवादाच्या नावाखाली स्वैराचाराला प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागली, त्यावेळी त्या विचारधारेविरुद्ध मोहीम उघडपणे मांडावयास पंडितजींनी कमी केले नाही ! त्या हल्ल्यात किर्लोस्कराप्रमाणे मग प्रा. फडके व वीर सावरकरही सापडले.

पुरुषार्थाबद्दलचे जे हे धोरण आणि मांडणीतील वैशिष्टय तेच त्यांच्या अन्य भाषीय नियतकालिकासंबंधीही असावयाचे, हे स्पष्ट आहे. गीतेचा विचार व आचार करावयास शिकवणारे ( सुमारे तीन वर्षे औंधास चालविलेले ) भगवद्गीता मासिक असो, वैदिकधर्म ( १९१८ पासून ) हे हिंदीमध्ये चालविलेले जिज्ञासूना वेदविद्येची ओळख करून देण्याचे व्रत घेतलेले मासिक असो, वेदसंदेश ( १९४८ पासून ) हे गुजरातीतून चालविलेले वैदिकधर्माचे भावंड असो अगर संस्कृतमधून अमृतलता या सारखे चालविलेले त्रैमासिक असो, ती सारी निरनिराळ्या चेहऱ्यामोहऱ्याची व अंगलटींची पण पुरुषार्थाची भावंडेच आहेत, हे निरीक्षणपूर्वक अभ्यास करणाऱ्याला पटल्याशिवाय रहात नाही.

वैदिक वाङ्मयातून देशकाल–परिस्थितीशी संपादकीय सामंजस्य जोडण्याइतकी पंडितजींची प्रगाढ विद्वत्ता कशी तरबेज होती व रहात आली हे त्यानी केलेल्या राष्ट्रीय आन्दोलनांच्या वैदिक पुरस्कारावरून स्पष्ट होते. स्वातंत्र्यासाठी चालविलेल्या आंदोलनात असंख्य लोक कारागृहात देहदंड भोगीत असताना पंडितजींनी ऋग्वेदातील अत्रि ऋषींच्या कारावासाचे व छळाचे निवेदन करून लोकास स्फूर्ति दिली. क्रांतिकारक तरुण बॉम्बस्फोट करून परकीय राजसत्तेला हादरे देत असताना वेदातील बॉम्ब गोळ्यांचे वर्णन पंडितजींनी प्रसिद्ध केले. क्रांतिकारकांचे कट शिजत असतानाच परीक्षिताला सर्पांनी कट करून कसे ठार केले याचे त्यानी विवेचन केले. तात्पर्य, हैदराबादेस व लाहोरास पंडितजी जे वाणीने राजकारण खेळवीत–रंगवीत होते, तेच राजकारण संपादक म्हणून पंडितजी लेखणीने खेळवू–रंगवू लागले. आपल्याला हे साधते आणि कोणत्याही परिस्थितीत साधलेच पाहिजे, याचा आत्मविश्वास पंडितजींना त्यांच्या ' वैदिक राष्ट्रगीत ' आणि ' वैदिक प्रार्थनांची तेजस्विता ' या पुस्तक–लेखानी परकीय सरकारचे धाबे दणाणले होते या पूर्वानुभवापासूनच आला होता. इतका की, जनतेमध्ये जर वैदिक धर्माबद्दल जागृति निर्माण झाली तर ब्रिटिशाना भारतात नांदणे अशक्य होईल, असे त्यांचे ठाम मत बनले होते.

निष्ठावान् पत्रकार म्हणून पंडितजींचे स्थान उच्च आहे. अश्लील, कामुक वा शिमगाप्रवृत्तीचे बाजार चलतीने आवतीभोवती चालले असता, वेदसाहित्यासारख्या गंभीर साहित्याने भरलेली मासिके प्रतिष्ठेने चालवून लोकप्रिय करणे सोपे नाही.

पंडितजींच्या संपादनक्षमतेची तयारी अनेक बऱ्यावाईट अनुभवातून झाली होती. मुंबईला शिकत असता, त्यानी लिहिलेली भगवद्गीतेवरील टीका निर्णयसागरने छापण्याचे नाकारले होते; उलट काही वैदिक ऋचावरील भाष्य लो. टिळकानी केसरीच्या एका अग्रलेखातच समाविष्ट करून टाकले होते. त्यामुळे " **विद्वानेव परिजानाति विद्वज्जनपरिश्रमम् ।** " असा प्रत्यय पंडितजींना आला होता. त्यापुढे तसाच अनुभव त्यांना १९०० ते १९०७ च्या सुमारात चाललेल्या आर्यधर्म मासिकाचे आणि कोल्हापुरात निघणाऱ्या विश्ववृत्त मासिकाचे लेखक म्हणून, येऊन चुकला होता. रामायणमहाभारतावरील त्यांचे ज्ञानप्रकाशातील लेख, सामाजिक सुधारणावरील इन्दुप्रकाशातील लेखन, श्रीदास या टोपणनावाने ज्ञानप्रकाशमध्ये पंडितजींनी केलेले पुरीच्या जगन्नाथाचे वर्णन आणि केसरीकंदनाच्या कालखंडात, मुंबईस निघणाऱ्या नवयुग मासिकात पंडितजींनी लिहिलेली हिमालय–हरिद्वार यात्रांची वर्णने लोकप्रिय झाल्यामुळे आपले मनोगत नेमक्या जागेत नेमकेपणाने व्यक्त करण्याचा सराव पंडितजींच्या अंगवळणी पडला. त्याप्रमाणे वैदिक राष्ट्रगीत व वैदिक प्रार्थनांची तेजस्विता या लेखानी ब्रिटिश सरकारची उडवून दिलेली तारांबळ लक्ष्यात आल्यावर, काळकर्ते शिवराम महादेव परांजपे यांच्या धर्तीवर आपण सात्विकपणे ध्वनिगद्य लिहू शकतो , असा आत्मविश्वासही पंडितजींच्या मनी दृढ होऊन बसला. म्हणून मासिके काढून लोकशिक्षणार्थ आईच्या वत्सलतेने, पित्याच्या कर्तव्यकठोरतेने आणि " **वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि** " अशा साधुसदृश दक्षतेच्या अस्त्रानी, पंडितजी संपादक झाले व लोकेषणा वा वित्तेषणा यांच्यापेक्षा वाचकांच्या तेजस्वी धारणा साधण्यावर लक्ष देऊन यशस्वी झाले. " **पुराणमित्येव न साधु सर्वम् ।** " म्हणून " **यानि अस्माकं सुचरितानि तानि एव गृहितव्यानि ।** " या औपनिषदिक मार्गदर्शनास अनुसरून पूर्वेतिहासाच्या ओघापासून आणि पूर्वसूरीपासून योग्य ते धडे घेऊन ते कलात्मकतेने लोकांच्या अंतःकरणापर्यंत आणि मेंदूपर्यंत नेऊन भिडवावयाचे आणि त्यांच्यात स्फूर्ति उत्पन्न करावयाची; तसे करताना स्वतंत्र बुद्धि जोपासून नवे सांगावयाचे ते जुन्या साहित्यातून प्रभावीपणे उकलून वा उमलवून दाखवावयाचे; चकित झालेले वादास उभे राहिले तर तत्त्वापुरता कोणाशी व कोठेही सयुक्तिक वाद करावयाचा; पण आपल्या ध्येयनिष्ठ विजगीषु वृत्तिची छाप आपापल्या परी स्वाभिमानी असलेल्या सर्वांवर पाडावयाची. हा आहे पंडितजींच्या संपादकीय कलेचा पीळ ! सांस्कृतिक विचारधनाचा प्रचार करण्यासाठी कार्यकर्त्यांचा एक संच पुरुषार्थादि मासिकांच्या समर्थतेने तयार करावा, अशी अगदी १९५४ पर्यंत पंडितजींची मनीषा होती. पण मराठी नियतकालिकांची तशी रेषा उमटविण्यास

अजून काळाची अनुकूलता नाही, हे जाणून आपल्या मासिकाना जितक्या जास्त घरी जाता येईल तितक्या घरी ती पोहोचवून, आवडीने, अभिमानाने, आदराने पुरुषार्थादि मासिके वाचणारे जे सुदैवाने पुष्कळ समंजस आहेत, त्यांच्या सामाजिक कर्तव्यदक्षतेवरच सांस्कृतिक विचारधनाचा प्रचार सोपविण्याशिवाय गत्यंतर उरलेले नाही. धर्मबुद्धीने चालविलेल्या ध्येयवादी मासिकांचे व्यावहारिक जीवन स्वस्थ व स्थिर होणे त्या समंजसांच्याच स्वाधीन आहे.

आणि तरीही लोकशिक्षणार्थ व संस्कृतिसंगोपनार्थ मासिके संपादताना पंडित-जींच्या स्थायी धोरणाचा आधार होता, तो वैदिक वाक्सूत्राचा.

" ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळातील १२५ व्या वाक्सूक्तामध्ये वाणीच्या प्रचंड सामर्थ्याचे फारच बहारीचे वर्णन आहे. ते वाचकानी प्रथम पहावे—

" अहं राष्ट्री संगमनी वसूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम् ।
तां मा देवा व्यदधुः पुरुत्रा भूरिस्थात्रां भूर्यावेशयन्तीम् ॥ ३ ॥
मया सो अन्नमत्ति यो विपश्यति यः प्राणिति य ईं शृणोत्युक्तम् ।
अमन्तवो मां त उप क्षियन्ति श्रुधि श्रुत श्रद्धिवं ते वदामि ॥ ४ ॥
यं कामये तंतमुग्रं कृणोमि तं ब्रह्माणं तमृषिं तं सुमेधाम् ॥ ५ ॥
अहं रुद्राय धनुरा तनोमि ब्रह्मद्विषे शरवे हन्तवा उ ।
अहं जनाय समदं कृणोम्यहं द्यावापृथिवी आ विवेश ॥ ६ ॥
अहं सुवे पितरमस्य मूर्धन्मम योनिरप्स्वन्तः समुद्रे ॥ ७ ॥

" या सूक्तामध्ये वाणी स्वतःच आपल्या स्वतःच्या सामर्थ्याचे वर्णन करीत आहे, अशा वर्णनाचा प्रसंग आहे. ' मी स्वतः वाणी आहे. मी तेजस्वी राष्ट्रीय शक्ति आहे. सर्व धनांचे एकत्रीकरण करण्याचे सामर्थ्य मज वाणीमध्ये आहे. सर्व पूज्य देवतामध्ये माझी–वाणीची–पूजा प्रथम झाली पाहिजे. मी लोकामध्ये पुष्कळच आवेश उत्पन्न करणारी अशी प्रचंड शक्ति आहे, अनेक स्थितिमध्ये असणाऱ्या मानवांचे संरक्षण मी अनेक प्रकारानी करते; म्हणून देवसुद्धा मला विशेष मान देतात. ज्याला हे सर्व मी सांगत आहे ते समजते, त्यालाच अन्न खावयास मिळते. जे लोक माझा अपमान करतात, त्यांचा नाश होतो. मीच लोकाना उग्र, शूर, वीर, ऋषि, मुनी, ज्ञानी व बुद्धिमान् बनविते. मीच शूराला शस्त्रास्त्रे सज्ज करून देते व त्या शस्त्राने तो वीर ज्ञानद्वेष्टया घातक शत्रूचा वध करतो. मीच लोकहितासाठी युद्ध करते व सर्व जगात प्रचंड आवेश उत्पन्न करते. या राष्ट्रावर रक्षक अशा राजाला निर्माण करणे माझ्याच आधीन आहे.' अशा प्रकारचे हे वर्णन प्रत्येक वाङ्मयसेवकाने लक्ष्यपूर्वक पाहण्यासारखे आहे."

" ज्या वाङ्मयाने नीति स्थिर रहात नाही, वाचकांची व्यभिचाराकडे प्रवृत्ति होते व विचारी मनोभावना उत्तेजित होऊन आरोग्यही नाश पावते, त्या वाङ्म-

याचा सर्वत्र निषेध झाला पाहिजे. सर्व समाजाची स्थिरता स्त्रीपुरुषविषयक व्यवहाराच्या नीतीवर अवलंबून आहे, हे लेखकानी विसरता नये. नीतीचा पाया ढासळला की, समाज विस्कळित झालाच म्हणून समजावे व एकदा का अशी घसरगुंडी लागली, म्हणजे पुढे ती सुधारणे कठीण होणार आहे, म्हणून वक्ते, लेखक व इतर वांग्मयसेवक यांनी या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावे, अशी त्यांस विनंती आहे."

—पंडितजी सातवळेकर ( प्रचंडशक्तीचा आवेश )

वाणीचा तथा भाषेचा एवढ्या पवित्र जबाबदारीने उपयोग करावयाचा व शक्य तर करवावयाचा या जणु प्रतिज्ञेने पंडितजींनी आपली नियतकालिके चालविली. निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर ( १८५०–१८८२ ) यांनी मराठी भाषेत व विचारात क्रांति केली होती व समाजात स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांच्याविषयी अभूतपूर्व प्रेम निर्माण केले होते. त्या परंपरेला साजेल असेच धोरण पंडितजींनी आपल्या नियतकालिकांच्या बाबतीत धरले होते. संपादकीय खाते पंडितजींनी स्वतःच पुष्कळ दिवस एकटाकी सांभाळले असले तरी व्याप वाढव गेला, तसे ते श्रमविभागानेही चालवित आले. मिरजेचे देवधरशास्त्री यांचे सहाय्य त्यांनी पुरुषार्थाच्या संपादनास घेतले तसे कार्यकारी संपादक म्हणून वर्ध्याचे श्री व्यंकटेश शंकर वकील यांचे ही सहाय्य काही वर्षे त्यांनी घेतले. श्री केशव रघुनाथ काशीकर यांच्याकडे अलिकडे कित्येक वर्षे पुरुषार्थाच्या संपादकीय व्यवस्थेची जबाबदारी पंडितजींनी विश्वासाने सोपविली ती पुष्कळांच्या परिचयाचीच आहे. अशा श्रमविभागणीने लेखात व लेखकात विविधता साध्य करता येते. जे पुरुषार्थाच्या बाबत तेच इतरही नियतकालिकांच्या बाबत पंडितजींनी केले आहे.

भाषा हे शस्त्र पेलताना संपादकाची फार मोठी जबाबदारी म्हणजे सत्य व प्रामाणिकपणा या बरोबरच वैयक्तिक हेव्यादाव्यापासून अलिप्त राहून लोकशिक्षणातून लोककल्याणाच्या सोपान तयार करणे ही होय. त्या दृष्टीने निबंधमालेप्रमाणेच ओजस्वी भाषेने लोकजागर साधणारे विविधज्ञानविस्तार, विश्ववृत्त इत्यादि मासिकें असली तरी श्रुतिबोधानंतर वैदिक वांग्मयाच्या, विचारसरणीच्या व जीवनतत्त्वज्ञानाच्या आविष्काराने लोकशिक्षण करणारी मासिके पंडितजी सातवळेकरांचीच होत.

विष्णुबुवा ब्रह्मचारी ( १८२५–१८७१ ) यांना पाखंड मताचे खंडन करून वैदिक धर्माचा प्रसार करण्याचा आदेश मिळाल्यामुळे त्यांनी मिशनऱ्यांचा प्रचार आपल्या प्रभावी व्याख्यानानी मुंबईस हादरविला. पंडितजी सातवळेकरांनी आपल्या व्याख्यानानी व मासिकाच्या संपादनाने ते तर केलेच, पण त्याशिवाय आपल्याच धर्मबांधवांचे अपसमजही दूर केले. मासिकासाठी लेखांचे संपादन, संकलन व संशोधन करण्याच्या गुणाबरोबर वैदिक ऋचातून नवे नवे सिद्धान्त प्रतिपादण्याचा गुणही

पंडितजींनी प्रगट केलेला आहे. तसे करताना पुष्कळ वेळा सडेतोड, मर्मभेदक, प्रखर व जिवंत राष्ट्रभावना त्यांच्या लिखाणातून वाहताना व उचंबळताना दिसते.

संपादकाला हाती घेतलेल्या नियतकालिकाची मांडणी, जुळणी आणि लेखमिळवणीही आपल्या ब्रीदास व ध्येयास धरून करावी लागते. कित्येकवेळा तपासातपासानी शोध, टीपा व टीकाही द्याव्या लागतात. आणि हे सर्व करताना **" लोकास राखणे राजी । गाजी तेव्हाच होतसे ॥ "** म्हणून पुष्कळवेळा वेळ मारून नेण्यापासून अमर मूल्याने टिकेल असेही लिखाण करण्याची व प्रसिद्ध करण्याची छाती करावी लागते. प्रसंगवशात् अनवधानाने **" आपुलेचि बोल वावगे। '** गेल्यास **" त्याची संपादणी करणे लागे । "** किंवा दिलगिरीपूर्वक दुरुस्तीही साधावी लागते. मात्र हे सर्व इतक्या सावधपणे करावे लागते की आपळी ध्येयसाधनाही व्हावी व वाचक, जाहीरातदार, सहाय्यक कोणीही **" जिविचे तुटो देऊ नयेत । "** पंडितजींनी त्यालाही **" अचूक चुकेना कोठे, त्याची राज्ये समस्ताही । "** हे समर्थवचन डोळ्यात तेल घालून ठेवणे कर्तव्य येते, हे स्वतःच्या संपादकीय कारकीर्दीने पटवून दिले आहे.

आपल्या पुरुषार्थादि सांस्कृतिक मासिकांच्या मानाने कदाचित् गौण पण संपादकीय कौशल्याच्या, लोकजागृतीच्या व प्रत्यक्ष देशसेवेच्या मानाने सांस्कृतिक मासिकांच्या संपादनाइतकेच महत्त्वाचे संपादनकार्य पंडितजींनी औंध संस्थानातील प्रजापरिषदेच्या नियतकालिकाचे केले व करवले आहे. खेडयांची आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक अवनति झाली नसती तर राजकारणात ग्रामोद्धार हा शब्द ही डोकावला नसता ! हिंदुस्थानात शहरे व खेडी असंख्य; यास्तव ग्रामोद्धार देशसेवेचाच भाग होऊन बसतो. खेडयातील लोक अज्ञानी, अर्धपोटी, रोगग्रस्त आणि सरकार–सावकारानी दामटलेले असल्यामुळे त्याना वळण लावून, शिक्षण देऊन, कामास जोडून सुखी, निरोगी, स्वाभिमानी व खाण्यापिण्याची ददात नसलेले असे कसे करता येतील याचा विचार अगदी वैदिक ग्रामगणराज्याच्या धर्तीवर करावयास लावण्याचा प्रयत्न पंडितजींनी त्या संपादनात केला. प्रत्येक सज्ञान स्त्रीपुरुषाला मतदानाचा हक्क समंजसपणे बजावता आला पाहिजे व तसा बजावण्यास तो पात्र झाला पाहिजे; एवढेच नव्हे तर मध्यवर्तीसत्तेपर्यंत प्रत्येक खेडूताची सुखदुःखे, निदान खेडयाखेडयांच्या सामुदायिक सुखदुःखांचा दृढभाजक जाऊन पोहोचला पाहिजे व मध्यावर्ती सत्तेची धोरणे–तोरणे खेडयांच्या वल्लीबोळापर्यंत समजली पाहिजेत; असे त्या प्रजापरिषदेच्या नियतकालिकाचे संपादनातील लेख होते. ग्रामोद्धारात शेतकी सुधारणा, पाणीपुरवठा, पशु–वृक्षसंवर्धन, शिक्षणपद्धति इत्यादि अनेक गोष्टींचा विचार येणे अपरिहार्य; तेव्हा त्या संपादनात तो येतच असे. मात्र ही सर्व कामे लोकांची लोकानीच करणे इष्ट आहे, असा त्यात आग्रह असे.

दैनिक वा साप्ताहिक वृत्तपत्रांच्या संपादकाना जितक्या ताज्या घोडयावरच्या गोमाशा झाडावयाच्या असतात, तितक्या पाक्षिक–मासिक–त्रैमासिकांच्या संपादकाना

झाडावयाच्या नसतात. झटपट रंगतीपेक्षा जीवनातील अधिक टिकाऊ रंगाकडे व विचारतरंगाकडे मासिकादिकांच्या सम्पादकाना काळजीपूर्वक लक्ष द्यावे लागते. म्हणून काही सदोष घटना घडत असल्या तर त्याकडे दुर्लभ करावे असे नाही; असे होईल तर लाला–लजपतरायानी म्हटल्याप्रमाणे ती गुन्हेगारी खासच ठरेल! म्हणून नियतकालिकाचा कालखंड वा त्याच्या पृष्ठमर्यादा काही असल्या तरी, एकदा का त्याचा बाणा वा ब्रीद मुकरर केल्यावर त्याचे वेळापत्रकादि सर्व क्रम त्या ब्रीदाला व बाण्याला सोडून यत्किंचित्ही चळता कामा नयेत. असतील नसतील त्या सर्व शक्ति एकवटून त्या बाण्याची, ब्रीदाची व क्रमाची परिपूर्ति साधलीच पाहिजे; मग, तसे करण्यात दुसऱ्या कोणाकडून आपले हात बळकट झाले तरी ठीक आणि तसे न होता एकाकी पडावे लागले तरीही ठीकच ! असा संपादकाच्या इच्छाशक्तिचा मोहरा लागत असतो.

मराठीतील पुरुषार्थ व हिंदीतील वैदिकधर्म या मासिकांच्या नियमित प्रकाशनाबरोबर अनेक राष्ट्रीय महत्त्वाच्या ग्रंथांचे प्रसिद्धीकरण, गाजावाजा न करता आणि दमल्या भागल्याचा पुकारा न करता, पंडितजी करीत आले. कारण त्यांनी आपल्या लेखनातील चिरपरिणामी भागास जसे स्थायी स्वरूप पुस्तकरूपाने दिले, तसेच इतरांच्याही तशाच लेखनास स्थायी स्वरूप देऊन जनतेचा सेवायोग साधणे पंडितजींच्या निरागस मनास प्रशस्त वाटले. विचारधनाच्या मौलिकतेचा मक्ता फक्त संपादकाना वा फक्त लेखकाना दिलेला नाही. म्हणून निःपक्षपातीपणाने व समाजसेवाबुद्धीने पंडितजींनी योग्यच प्रथा पाडली, हे कबूल केलेच पाहिजे. फुकटचा प्रतिष्ठेचा उल्लूपणा किंवा स्वयंसिद्धतेचा ओढाळपणा पंडितजींच्याजवळ असणार तरी कोठून ?

लोकांच्या सांपत्तिक मगदुराला झेपेल तेवढ्या मर्यादेत शक्य तितक्या सुंदर सजावटीने जास्तीत जास्त वाचकांच्या नजरसेवेस आपले नियतकालिक जावे याची दक्षता संपादक घेतो. याचे कारण प्रसिद्ध झालेल्या व होणाऱ्या मजकुराने, संपादकाला विस्तृत लोकशिक्षण साधावयाचे असते. त्यासाठी आपण प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांच्या जाहीराती विनामोबदला समाविष्ट करावयाच्या, दुसऱ्यांच्या मालाच्या मोबदल्याने छापावयाच्या आणि अडत देऊन वर्गणीदार मिळवावयाचे, असेही उद्योग संपादकाना व त्यांच्या व्यवस्थापकाना उभारावे लागतात. पंडितजींनी तेही केले. पण त्यासंबंधात पंडितजींच्या प्रतिष्ठेवर पैसे जमा करून त्यांना मात्र दगा देणारेही हरिचे लाल भेटलेच !!

अशा सर्व प्रसंगाना तोंड देऊन कोमेजून गेलेल्या राष्ट्रवृक्षावर आपल्या वैदिक संस्कृतीचे सिंचन केल्याने त्यात नवचैतन्य येऊन स्वाभिमान, स्वत्त्व व कार्यनिष्ठा अशी फळे येत रहावी, अशा इच्छेच्या पंडितजी सातवळेकरांच्या मासिकांचा संसार योगक्षेमाचे दृष्टीने सरळ चालला; व्यापारी दृष्टीने वैभवाचा झाला नाही. आणि

×

यात नवल मानण्यासारखे काय आहे ? श्री. के. नटराजन् म्हणतात की– " धंद्यात धंदा पत्रकाराचा — मुलखाचा वेड लावणारा व मुलखाचा उदासवाणा ! वेड लावणारा अशाकरता की पहावे तेव्हा मन गुंतविणाऱ्या विविध विषयांचा तेथे आपला मुलुख मोकळा ! जर एकाद्या महत्कार्याची खूणगांठ बांधून ठेवली असली तर, योग्य वेळी ताव मारायला त्या धंद्यात संधि मिळते. आता, सदर धंदा उदासवाणा अशासाठी की तो काही वकिलीसारखा अगर वैद्यकीसारखा धंदा नव्हें, की केल्या श्रमाचा मोबदला काय झाला हे लवकर–उशीरा, केव्हा तरी पहावयास मिळेल ही खात्री; पण– पत्रकर्त्याला ते जन्मभरातही समजण्याची पंचाईतच पंचाईत ! एकाद्याच वेळी मात्र असा योग येतो खरा की, पत्रकर्त्याला आपल्या लिखाणाचा काही उपयोग झाला आहे, हे समजून येण्याचे भाग्य लाभते. " तुमच्या लिखाणाने माझ्या मनात अशी अशी शाश्वत भावना अगर विचारसरणी निर्माण झाली, " असे एकाद्या दूरच्या व बिनमाहितीच्या वाचकाकडून कळल्यावर पत्रकारास जो आनंद होतो, त्याची योग्यता काय विचारावी ?"

ते समाधान मात्र पंडितजींना जेवढे लाभले, तेवढे लाभण्याचे भाग्य फारच थोडयांच्या वाटयास आले असेल.

❂ ❂ ❂

: ३० :

# सातवळेकर सारस्वताचे सिंहावलोकन

**पंडितजींनी** पाऊणशे वर्षात ( १८९२ पासून ) निरनिराळ्या भारतीय नियतकालिकातून हिंदी, मराठी व संस्कृत भाषेत वैदिक धर्म, वैदिक तत्त्वज्ञान व वैदिक संस्कृति यात अतंर्भूत होणाऱ्या अनेकविध राष्ट्रीय विषयावर इतके महत्त्वपूर्ण, संशोधनात्मक, सर्वांगीण, अभ्युदयोन्मुख, अभिनव व स्वधर्मप्रेरक असे खास लेखन ( आणि व्याख्यानही ) केले आहे की ते सर्व संकलित केल्यावर, कोणताही अभ्यासू म्हणेल की, " बा सागरा, तुझ्या अफाट विस्ताराकडे पाहून जो जो विचार करू लागावे, तो तो मति अधिकाधिकच गुंग होऊन जाते ! "

आणि तरीही त्या अभ्यासूच्या नजरेतून एक चमक खासच सुटणारी नाही की वैदिक धर्माचे तेजस्वी तत्त्वज्ञान भारतीय समाजात रूढ व्हावे आणि स्वधर्माच्या शुद्ध नि सत्य आचारास प्रवृत्त होण्यासाठी त्यांना श्रुतिस्मृति–पुराणोक्त कथांचे व मतांचे मर्मज्ञान व्हावे. हा आहे ध्येयबिंदु सर्वच सातवळेकरसारस्वताचा. पण पंडितजींचा सारा प्रयत्न स्वतःच्या स्वतंत्र प्रज्ञेच्या प्रेरणाबलावर उभा असला तरी तो युगसापेक्ष विशदीकरणाकडे झुकलेला आहे, असा एक आक्षेप ही अभ्यासूंच्याच निरीक्षण शलाकेतून येत असतो. नुसती " **सांगे वडिलांचे कीर्ति ।** " एवढाच मोठेपणा ज्या लेखकाला, प्रवचनकाराला अगर भाष्यकाराला मिरवावयाचा असतो, त्याला लोक सांगतात की " **जुने जाउ द्या मरणालागुनि ।** " पण " **जुणे ठेवणे मीपणे ते कळेना ।** " म्हणून ते समजावून सांगून " **प्राप्त काल हा विशाल भूधर । सुंदर लेणी तयात खोदा ।** " असे ज्यावेळी इतिहासाचा हात पाठीवर घेऊन नवा इतिहास घडविण्याचे आवाहन, एकाद्या व्याख्यात्याला, लेखकाला, प्रवचनकराला, करावयाचे असते, तेव्हा " जुने ठेवणे " नव्या काळात कसे उपयोगी पडणारे आहे हे नव्या पिढी-

पुढे विशद करणे कर्तव्यच ठरते. भगवद्गीता व तिच्यातील नवनवोन्मेष अनेकानेक भाष्यकारानी अनेक कालखंडात अनेक तऱ्हानी प्रगट केले आहेत, त्यातील दुसरे रहस्य काय आहे ? पंडितजींनी सर्व जुन्या वांग्मयाचा नवा आविष्कार गीतेवरील " भाष्यकाराते वाट पुसतू " केला, एवढेच फार तर म्हणता येईल.

पंडितजींच्या लेखनाचे पृथक् वर्गीकरणच करावयाचे कोणी मनात आणले तर वैदिक, आरोग्यविषयक, गीताविषयक, औपनिषदिक, आणि विविध असे काहीसे करता येईल. वैदिकमध्ये वैदिक धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृति यांत अंतर्भूत होणारे सर्व विषय येतील आणि तो परधर्मीय आक्रमकांचा खरपूस समाचार घेऊ शकेल. आरोग्य-विषयात, व्यायाम, योगासने, नमस्कार, ब्रह्मचर्य आणि योगशास्त्र यातील सर्व अनुभव ( शक्य तर सचित्र ) येऊ शकतील. सर्वोपनिषदांचे मंथन करून भगवान् श्रीकृष्णानी काढलेल्या गीतामृताचे स्वरूप कसे पुरुषार्थबोधक आहे हे सिद्ध करणारे आणि गीता ही राष्ट्रधर्माची जागती ज्योति आहे हे अनेकविध प्रमाणानी पटवून स्वकर्तव्याचे सर्वांगीण प्रबोधन करणारे लेख " गीताविषयका " (चे) वैशिष्ठ्य म्हणून राहील. सर्व ज्ञानाचे एकमेव शक्तिकेंद्र म्हणून ज्यांचा पाश्चिमात्य पंडितानी जय-जयकार केला त्या अकरा उपनिषदांचा ( तरी ) प्रवृत्तिधर्मीय रहस्यार्थ आणि तत्संबंधी विवेचक लेख " औपनिषदिक " या सदरात समाविष्ट होतील. आणि विविधामध्ये ? इंद्रधनुष्यासारखे सप्त–रंगीच नव्हे तर बहुरंगी व बहुढंगी असे साहित्य, कला, नीति आणि अन्य राष्ट्रजीवनोपयोगी विषय आपापल्या प्रतिष्ठे-प्रमाणे स्थानापन्न करावे लागतील. पंडितजींच्या प्रेरक व बोधक सारस्वताची ही विल्हेवारी त्यांच्या स्वाध्यायाचे, त्यांच्या दीर्घोद्योगाचे, त्यांच्या स्वधर्मनिष्ठेचे, त्यांच्या कलाकौशल्याचे आणि त्यांच्या निर्मळतेचे यथार्थ दर्शन डोळसाना घडवीलच घडवील. यायोगे, वेदकालीन ऋषिमुनींनी संस्थापित केलेल्या आदर्श जीवनसिद्धांताचे सम्यक् ज्ञान वाचकांना होऊ शकेल; धर्माधर्माचे बाबतीत उत्पन्न होणाऱ्या व्यामोहाचे आणि अनेकविध संशयाचे निराकरण होऊन त्यांची स्वधर्मनिष्ठा " **न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।** " असे समाधान व्यक्त करील; आणि तशा प्रकाशमय जीवनात संकुचित स्वार्थाची, द्वैताची, वा द्वेषाची काळी रेघही कोठे दृष्टीसही पडणार नाही. मतमतांतराच्या संघर्षकाळात आपल्या धर्माचे निःसंदिग्ध ज्ञान अगत्याचेच असते. स्वतंत्र भारताच्या सर्वमंगलमांगल्यास त्याची नितान्त आवश्यकता आहे.

पंडितजींनी अनेक विषयावर अनेक लेख लिहून आपली म्हणून स्वतंत्र विचार-सरणी प्रगट केली. यावरून त्यांची बुद्धिमत्ता चौरस, राष्ट्रोन्नतिपोषक व सर्वांगीण आहे हे प्रत्ययास येतेच येते.

गवयाचे पोर रडले तरी सुरावरच रडावयाचे, त्याचप्रमाणे प्राचीन वांग्मयाचा पंडितजी राजकीयच अर्थ लावावयाचे. तेच सांगतात, पहा—

" आपले बहुतेक सर्व महोत्सव विशेषेकरून राजकीय बोध देणारेच आहेत.

' रामनवमीचा महोत्सव ' हद्दपार केलेल्या एका आर्य राजकुमाराने आपल्या देशाचे स्वातंत्र्य कसे स्थापन केले व या देशाला पारतंत्र्याच्या पंकात कोंबण्याच्या परद्वीपस्थ राजाच्या साम्राज्याचा कसा नाश केला, हे सूचित करीत आहे. ' गणेशोत्सव ' हा गणरायानी स्वजातीयांची संघटना कशी केली व स्वदेशबांधवांचे सांघिकबल वाढवून त्यांचा दर्जा कसा वाढविला व देवराष्ट्राला वारंवार त्रास देणाऱ्या पाश्चिमात्य शत्रूंचा नायनाट करून त्यांनी कसे आपल्या राष्ट्राचे कल्याण केले, ते दाखवीत आहे. ' कृष्णाष्टमीचा महोत्सव ' हृतराष्ट्रीयानी धृतराष्ट्रीयाकडून आपले गेलेले स्वराज्य कसे प्राप्त करून घेतले याची आठवण करून देत आहे व कंसासारख्या जुलमी, स्वार्थी संस्थानिकाचा जुलूम दूर करण्यासाठी बाल श्रीकृष्णाने त्याचा कसा वध केला व गोकुळवासीयाना त्याच्या जुलमातून कसे सोडविले, हे दाखवीत आहे. यावरून या उत्सवामध्ये राजकीय बोध कसा आहे, हे सहज समजून येईल.'' ( जीवनप्रकाश–विजयोत्सव पहा. )

## तशातूनच अभ्यासूच्या सूक्ष्म व चोखंदळ नजरेने

पंडितजींचा प्रज्ञाविलास पाहता. आठवतो अभंग तो हा !

'' सिंधुहूनि खोल सुरस तुझे बोल ।
आनंदाची वेल नित्य नवी ॥
ते मज सादर ऐकवी सत्वर ।
श्रवण क्षुधातुर झाले माझे ॥
ज्ञानदेव म्हणे तू भक्त-अंतरंग ।
न लगे तुज पांग बहुज्ञतेचा '' ॥

बहुज्ञ असूनही बहूज्ञता मिरवीत नाही, हा सिद्ध प्रज्ञेचा विशेष होय. चार तप.च्या अवधीत पंडितजींच्या प्रज्ञाप्रकाशाने जगाच्या सर्व भागांत आपले किरण फेकले आणि पंडितजींच्या ग्रंथाची प्रशंसा देशी–विदेशी अशा उच्च कोटीच्या सर्व विद्वानानी केली. पंडितजींचे कोणतेही लिखाण ही एक बौद्धिक मेजवानी असते. मिजासखोर, रंगदार, ढंगदार पुस्तके वाचून गंमतजंमत करण्याऱ्या खुशालचेंडूनी आपली सुखासीन वृत्ति टाकून आपली अक्कल तजेलदार करण्याचे मनावर मात्र घ्यावयास हवे ! त्यांना पंडितजींच्या ग्रंथासाठी खर्च केलेल्या पैशाचे व वेळाचे तर काही वाटणारच नाही; उलट, स्वतःला आलेली विशाल दृष्टी, बुद्धिला प्राप्त झालेली उंची व उदात्तता, आणि '' जीवनात काही जगण्यासारखे आहेच आहे '' असा निर्माण होणारा आत्मविश्वास याचे मोल पंडितजींबद्दलच्या कृतज्ञ अश्रूइतके दुसरे कोणतेच नाही, या जाणीवेने वाचक भारावून जातो व विनम्रच विनम्र होतो. पंडितजींचा लेख वा ग्रंथ सर्वसाधारणपणे एकजिनसी, बांधीव, रेखीव व जागृत जाणिवेचा होण्यासारखा सुसंपादित असतो. तो वाचनसुलभता व मनोरमणीयता यांचा अमृतपाझर असतो.

ग्रंथप्रकाशनाच्या प्रवृत्तीत भारतामध्ये अंतरंगाविष्करण वा संशोधन फारच कमी आहे. पण पंडितजी पडले भारतीय देशभक्त. भारत राष्ट्राबद्दल त्यांना नितांत आदर. भारताच्या घराघरात वेदग्रंथ जावेत, भारताची स्त्री–पुरुष व बालबालिका याना वेद कळावा, ही पंडिजींची तळमळ. पंडितजींचे हे स्वतंत्र "दर्शन" आहे. त्यामुळेच वेदासंबंधीच्या लाखो प्रति स्वाध्यायमंडळासारख्या चैतन्यमय संस्थेने प्रकाशनाचे सर्व सोपस्कार आपल्या अंगावर घेतले. यजुर्वेदाच्या ( २२ अ. ) मध्ये म्हटल्याप्रमाणे पंडितजींची प्रज्ञावृद्धि वेदाबाबत "**तदपश्यत् तदभवत्, तदासीत्**" अशीच झाली; त्यामूळेच ते वेदमूर्ति झाले.

पंडितजींची ही सेवा ब्राह्मण्याची सेवा आहे. म्हणूनच पंडितजीमध्ये राष्ट्राच्या ओजोबलाचे दर्शन लोकाना होत असते.

**भद्रमिच्छन्त ऋषय; स्वर्विदस्तपोदीक्षामुपनिषेदुरग्रे ।**
**ततो राष्ट्रं बलमोजश्च जातं, तदस्मै देवा उपसंनमन्तु ॥**

( अथर्व १९।४१५ )

स्वातंत्र्यासाठी राष्ट्राने चालविलेल्या आंदोलनात असंख्य लोक कारागृहात देहदंड सोशीत असता, पंडितजींनी ऋग्वेदातील अत्रिऋषीच्या कारावासाचे व छळाचे विवेचन करून लोकास स्फूर्ति दिली. क्रांतिकारक तरुण बॉम्बस्फोट करून परकीय राजसत्तेला हादरे देत असता, वेदातील बॉम्बगोळ्याची वर्णने पंडितजींनी प्रसिद्ध केली. क्रांतिकारकाचे कट शिजत असता, परीक्षितीला सर्वस्वी कट करून कसे यमसदनाला धाडण्यात आले, याचे पंडितजींनी विवेचन केले. या व अशा सर्व उदाहरणावरून वैदिक वाङ्मयातून देशकालपरिस्थितीशी सामंजस्य जोडण्याइतकी पंडितजींची प्रगाढ सिद्धत्ता जशी दिसून येते तशीच प्रखर राष्ट्रीयवृत्तीही दिसून येते. ,पुराणेतिहासातील कथांचा नि नावाचा उपयोग करून तरुणाच्या मेंदूत राष्ट्रीय उत्थानाची प्रेरणा देणाऱ्या काळ–कर्ते शिवराम महादेव परांजपे यांच्या लेखातील तेजाब पंडितजींच्या लेखांत नाही, हे खरे; पण परकीय जूलमशाहीच्या अंगाची लाही होऊन चडफडाट उत्पन्न करण्याइतका दावाग्नि पंडितजींच्या विद्वत्ताप्रचुर सूचकार्थात असे यात शंका कसली ? तसे नसते, तर विश्ववृत्तातील 'वैदिक प्रार्थनांची तेजस्विता' या त्याच्या लेखावर खटलाहि झाला नसता व त्यांचे ग्रंथहि सरकारने जप्त केलेच नसते !

पंडितजींनी लिहिलेले ग्रंथ सरळ, सुबोध व स्पष्ट शैलीचे असतात. त्यांच्या प्रत्येक वाक्यावाक्यात भाव भरून आलेला असतो. ते आपला प्रतिपाद्य विषय उलगडून, समजावून लिहिण्याच्या कलेमध्ये दक्ष आहेत. त्यायोगे काही काही का, पुष्कळवेळा पुनरुक्ति आढळतात. पण त्या अलंकाररूप ठरून प्रतिपादनाला जोम आणत असल्याचेच आढळते. "**एकः शब्दः सम्यग् ज्ञातः, सम्यक् प्रयुक्तः स्वर्गे.कामधुक् भवतीति**

**वैय्याकरणानां मतम्।** " तशीच अभिप्रेत कल्पना, विचार वा मत वाचकाच्या मनी, मेंदूत बिंबवून, मुरवून सोडण्यासाठी चतुर प्रचारकाच्या चिकाटीने आणि कुशल शिक्षकाच्या हळुवार ' चालीने ' पंडितजी पुनः पुनः त्याच त्याच गोष्टी सांगत असले, तरी वाचकाना त्यांचा कंटाळा, तिटकारा न येता, त्या ग्रहण कराव्याशा वाटतात. याचे कारण पंडितजींची प्रतिभा प्रखर सर्वतोमुखी व बृहस्पतिसमान आहे. त्यांची मेधा व स्मृति बिनतोड आहे.

पंडितजींनी चारहि वेदांच्या संहिता शुद्ध स्वरूपात छापून प्रसिद्ध केल्या आहेत. वेदांच्या अर्थाच्या दृष्टीने व अर्थास सहाय्यक अशा स्वरूपात प्रत्येक देवतांचे मंत्र निराळे काढून त्यांच्या संहिता प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांचे वेदभाष्य या स्वरूपात वैदिक व्याख्यानांचे चार संग्रह प्रसिद्ध झाले असून अथर्ववेद व सामवेद यांतील अर्थ नि स्पष्टीकरण यासह सहा खंड प्रसिद्ध झाले आहेत. हे वाङ्मय हिंदी, मराठी, गुजराथी, कानडी व थोडेफार इंग्रजीतूनही आहे.

उपनिषदापैकी बृहदारण्यकोपनिषदासुद्धा सर्व उपनिषदे सटीक प्रसिद्ध केली आहेत पंडितजींनी. त्याप्रमाणे संपूर्ण रामायण व संपूर्ण महाभारत हे ग्रंथ अर्थासहित प्रसिद्ध केले आहेत. गीतेवर पन्नास वर्षांच्या अभ्यासाने पुरुषार्थबोधिनी टीका लिहिली आहे. संस्कृत ग्रंथ प्रत्येकाला सहज वाचता यावेत व समजावेत म्हणून पंडितजींनी संस्कृत–वर्ग–शिक्षणाची सुलभ पद्धति पुस्तकरूपाने तयार केली. याशिवाय योगांचा अभ्यास, योगासने, सूर्यनमस्कार या विषयावरील सचित्र अभ्यासक्रमाची पुस्तकेही पंडितजींनी लिहून प्रसिद्ध केली आहेत. पंडितजींच्या अशा सर्व ग्रंथातील प्रत्येकाचे संस्करण अत्यंत शुद्ध, प्रमाणबद्ध, प्रसादपूर्ण, सस्वर, सुस्वर व स्वस्त आहे. त्यात प्रपन्न, उपयोगी अनुक्रमणिका, परिशिष्टे देऊन त्यांचे संपादन अद्ययावत् व तर्कपूर्णतेने झालेले असावयाचेच ! वैदिक वाङ्मयातील अग्नि हा विश्वचैतन्याचे प्रतीक असून प्राणिमात्रातील ' अंगिरस ' अग्निच्या रूपाने ते चैतन्य प्रत्ययास येत असते, **' तुझे आहे तुझ्यापाशी '** ते हे असे दयानंद सरस्वतीच्या धर्तीवर पंडितजींनी प्रतिपादिले आहे. **' जे पिंडी ते ब्रह्मांडी '** याची अशी उदाहरणानी खात्री पटविण्याची वाकबगारी पंडितजींनी अगणित ठिकाणी साधली आहे. वेदाभ्यासाकडे पंडितजींच्या वृत्ति पूर्णपणे वळण्यास दयानंद सरस्वती स्वामीचे ग्रंथ कारणीभूत झाले, असे म्हणतात. त्यांच्या सत्यार्थप्रकाश, ऋग्वेदादि भाष्यभूमिका इत्यादि ग्रंथांचे मराठी भाषांतरदेखील बडोद्याच्या सयाजीराव–साहित्य–मालेसाठी पंडितजींनी करून दिलेच होते.

पंडितजी खरे पहाता मराठीभाषी, परंतु त्यांचे जीवनच मुळी राष्ट्रीयतापूर्ण. म्हणूनच भावनात्मक एकतेने ते समर्पित झालेले असल्यामुळे राष्ट्रभाषेतीलही अग्रेसर लेखक ते झाले, यात काय नवल ? मातृभाषेइतकेच हिंदीवर गाढ प्रेम करताना अगर गुजराथी वगैरे भाषाभगिनीशी सहधर्मी होताना, देवनागरी लिपीच्या श्रेष्ठ-

तेवर पंडितजींनी भर दिला असून तिची शास्त्रशुद्धता पटवून देण्यास ते चुकले नाहीत. हिंदी आणि संस्कृत भाषांचा प्रचार देशव्यापी व्हावा म्हणून त्या भाषांच्या परीक्षाभ्यासाच्या योजना आखण्यातही पंडितजी मागे राहिले नाहीत.

समाजोद्धाराचे लक्ष ठेवून ज्ञानेश्वरादि संतांनी परमार्थशास्त्र देशीकार लेण्यानी लिहिण्यास सुरवात केली आणि **'वेदान्तीचा अर्थ आम्हासीच ठावा। इतरानी वहावा भार माथा॥'** असे बजावले. संतांच्या या परंपरेस अनुसरून वेद, वैदिक जीवन, वैदिक संस्कृति यांना देशीकार लेण्यानी सजविण्यांत पंडितजींच्या एवढी तपश्चर्या कोणाचीच नाही. आपल्या पन्नास–साठ वर्षांच्या प्रदीर्घ चिंतनाने व तपश्चर्येने वैदिक धर्म, वैदिक तत्त्वज्ञान आणि वैदिक संस्कृति यासंबंधीचे सखोल संशोधन करून पंडितजींनी काढलेला रत्नसंग्रह हजारो वर्षांचे वैदिक–विचार–मालिन्य नष्ट करण्यास व स्वधर्माचा सत्यार्थप्रकाश फैलावण्यास समर्थ झाला आहे. सामान्याला दीपस्तंभासारखे व विद्वान् विचारवंतांना विद्युत्प्रभेसारखे सातवळेकर–साहित्य आहे. भारताच्या अध्यात्मप्रधान आर्यसंस्कृतीची आचारशृंखला ज्या विचारांनी निर्माण झाली आहे, त्या वैदिक जीवनाचा शक्ति–शान्तियुक्त प्राचीन आदर्श सत्य स्वरूपांत संपूर्णपणे प्रगट करावा व सर्व जगास एके काळी प्रकाशित करणारे ते प्राचीन भारतीय तेज पुनः प्रगट करून त्याच्या प्रभावी व दैदीप्यमान लाटानी आधुनिक विज्ञानाच्या संशोधनाबरोबर सहकार–समन्वय साधून सर्व पृथ्वी पुनः एकदा प्रकाशित करून टाकावी, हेच पंडितजींच्या वैदिक व इतर धर्मसाहित्य–संशोधनाचे अपूर्वत्व आहे. या विचाराचे चिंतन–मनन सुकर व्हावे आणि दोन हजार वर्षांच्या ( परकीय आक्रमणादिकानी व पारतंत्र्याने निर्माण केलेल्या ) कुसंस्कारानी उत्पन्न झालेले हृदय–दौर्बल्य नाहीसे करून परंतपाप्रमाणे भारताने वैयक्तिक व राष्ट्रीय जीवनसंग्रामात नेतृत्व मिळवावे आणि विश्वसेवेस प्रवृत्त व्हावे, हाच सातवळेकर-साहित्याचा केन्द्र आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर पंडितवरेण्य सातवळेकरांच्या काही ठळक ग्रंथाची तोंड-ओळख उद्बोधक व प्रबोधकही ठरेल, पहा की—

**( १ ) अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद–** दीर्घ जीवन, आरोग्य आणि कमीत-कमी शतंजीवी होण्याचे साधन या ग्रंथात विशद सांगितले असून बुद्धीचे संवर्धन, मनाच्या शक्तीची वाढ, पंचमुखी महादेव, पंचप्राण, यमदूत, ब्रह्मलोकप्राप्ति, अयोध्येचा राम, मनुष्यशरीरातील तेहतीस देव, अमृतशक्ति, दुष्टपरिहार, नृत्य, हास्य, दुर्गतिनिवारण, रोगनिवारण इत्यादि विषयांचा ऊहापोह या ग्रंथात पंडितजींनी केला आहे. सहाशेसतरा मंत्रांचा हा संग्रह अभ्यासपूर्वक समजून घेतल्यास दीर्घायुष्य हे "देणे ईश्वराचे" आहे तसेच "भरणे मानवाचे" ही आहे हा पंडितजींनी आत्मविश्वास निर्माण केला आहे. त्याचबरोबर ब्रह्मविद्या, मातृभूमि व स्वराज्यशासन आणि गृहस्थाश्रम असे तीन विषय पंडितजींनी प्रामुख्याने विवरण करून

दाखविले आहेत. ज्या वेदोपनिषदांचे दोहन करून श्रीकृष्णानी जगाच्या कल्याणासाठी गीतामृत काढले त्याचे मूळ व परिशुद्ध रूप पहावयाचे, आणि निःश्रेयसाबरोबर मानवी जीवनाचे उत्कर्षाचे व अभ्युदयाचे उज्ज्वल पाठ शिकावयाचे तर या ग्रंथातील ब्रह्मविद्या हे प्रकरण आत्मसात करावे.

**( २ ) आरोग्यखण्ड—** ब्रह्मर्षि सातवळेकरांनी हा दीर्घायुष्याचा स्वयंशिक्षकच वाचकांच्या हाती दिला आहे. भरपूर चित्रांच्या सहाय्याने विषय अगदी वाचकांच्या मेंदूपर्यंत भिडविला आहे. डॉक्टर वैद्यांचे उंबरठे न झिजविता, योगासनाने व नियमित राहणीने आरोग्य कसे सांभाळावे याची स्वानुभवपूर्ण माहिती पंडितजींनी दिली असून हे **"प्रत्ययाचे बोलणें, प्रत्ययेंचि पहावे"** असे आवाहन केले आहे.

**( ३ ) गणेशाथर्वशीर्ष–** जप म्हणजे मंत्राच्या अर्थानें मनन केले तरच लाभ. विघ्नाची बाधा न होता सुख वृद्धिंगत होते.

**( ४ ) गीताखण्ड–** भगवद्गीतेतील समत्वयोगावर अभिनव प्रकाशझोत टाकून पुरुषार्थबोधिनी टीकेची छायाच पंडितजींनी येथे सादर केली आहे. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांची विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना हे या पुस्तकाचे वैशिष्टच आहे. श्रीमद्भगवद्गीता हा भारतीय वाङ्मयाचा अमर अलंकार असून मानवतेची पशुतेपासून सुटका करून दिव्यतेच्या प्रकाशाने जीवन प्रकाशित करणारा असा दुसरा ग्रंथ जगाच्या साहित्यात नाही. पंडितजी समत्वयोग हा गीतेचा प्रतिपाद्य विषय आहे असे सांगतात. अनासक्त पण दक्ष कर्मयोग समताशास्त्रावर आधारून गीतेत दिला आहे.

**( ५ ) देवेमंत्राचा अर्थ–** या प्रार्थनामंत्रास ऋग्वेदी देवे असेही म्हणतात. प्रत्येक मंत्राचा बोध यात आहे.

**( ६ ) दैवत-संहिता—** चारही वेदांत विखुरलेल्या इंद्रादि देवतामंत्रांचे एकीकरण करून वेदामध्ये उपासक ऋषींच्यापेक्षा पूजनीय देवतांचे महत्त्व अधिक आहे. कारण उपासक उपास्याचे गुण धारण करून उपास्यासारखा श्रेष्ठ होऊ इच्छितो, असे पंडितजींनी स्पष्ट केले आहे. या संहितेमध्ये देवताप्रमाणे चारही वेदांच्या मंत्रांचा संग्रह असून वेदांचे अध्ययन करणाऱ्याना सुटसुटीतपणे सोपेपणा सापडतो.

**( ७ ) पुरुषार्थबोधिनी—** भारतीय गीतासाहित्यात अढळस्थान मिळविणारी ही पंडितजींची टीका अत्यंत बुद्धिमत्तापूर्ण आणि उत्कृष्ट असून गीतेच्या वास्तविक स्वरूपाचा उलगडा करणारी असल्याचा निर्वाळा महात्मा गांधींनी दिला आहे. गीतेतील विशेषणेच काय पण विशेष नामेसुद्धा सहेतुक संदर्भानुसारी असून, निष्काम कर्मयोगाचे शिक्षण देताना गीता ही पूर्णतया एक आध्यात्मिक शास्त्र बनली आहे. उपासकाला जगापासून विन्मुख करून मोक्षमार्गाकडे गीता प्रवृत्त करते, अशी

बहुतेक टीकाकारांची भूमिका असताना, पंडितजी तीमधील पोकळपणा स्पष्ट करून, जगाच्या व्यवहारात वावरूनही, संन्यस्त मनाने पण कर्तव्यदक्षतेने मोक्ष साधता येतो, हे पंडितजींनी स्पष्ट केले आहे. पंडितजींची गीतेवरील पुरुषार्थबोधिनी टीका ही एक स्वतंत्र टीका असून तिचा ढंग हा तिचाच केवळ आहे. ज्याने ती एकदा वाचली तो तिची मुक्त कंठाने स्तुति केल्याशिवाय रहातच नाही. जवळजवळ हजारपानाच्या या ग्रंथाची पाचवी आवृत्ति निघाली आहे. " **पुण्यक्षेत्र कुरुक्षेत्र** " हे मानवी शरीरच असून, गीतेने दैनंदिन वैयक्तिक व्यवहारापासून राष्ट्राच्या राजकारणापर्यंत जे समरप्रसंग येतात, त्यातून समर्थपणे यशस्वी होण्याचा मार्ग गीतेने दाखविला आहे, हे पंडितजींनी स्पष्ट केले आहे.

( ८ ) **पौराणिक गोष्टींचा उलगडा**— प्रजापतीचा वध, परीक्षित राजाचा खून, बकासुर, तपश्चर्येचे पाप, भगवान् श्रीकृष्ण यांच्याबाबत चमत्कारिक वाटणाऱ्या गोष्टींचा तर्कशुद्ध व व्यवहारी उलगडा यात आहे.

( ९ ) **भगवद्गीता**— गीता व श्लोकार्धसूचि गीताश्लोकांची पंडितजींनी अकारादि क्रमानें दिली आहे ती अशी की सुरवातीस आद्याक्षरसूचि व नंतर अन्त्याक्षरसूचि.

( १० ) **मंगलमूर्ति गणेश**— अग्रपूजेचा मान गणेशाला प्राप्त होण्याचे कारण, ' भूतजातीच्या वीरांना ' त्याने मानाचे स्थान मिळवून दिले हे होय. गणेशासारखे संघटक प्रभावशाली हवेत, हे तरुणाना पटेल. या पुस्तकात विनायक, गुणेश व गणेश असे तीन अवतारवृत्तान्त गणेश पुराणाच्या आधाराने दिले असून या तिघांचेही चरित्र तरुणपणीच संपलेले असताना एवढयाशा अल्पावधीत त्या क्रांतिकारक विभूतींनी केलेले अद्वितीय पराक्रम सदैव स्फूर्तिदायकच ठरतील, अशी त्यांची मांडणी पंडितजींनी केली आहे. तरुण पिढीने आपल्या राष्ट्राची संघटना कशी करावी व राष्ट्राला ऊर्जितावस्था कशी आणावी याचा बोधपाठ देणारे हे संजीवक पुस्तक होय. भूतानात वीरांना मानाचे स्थान नव्हते ते गणेशाने प्राप्त करून दिले.

( ११ ) **वाल्मीकी रामायण**— वाल्मीकी रामायणाची बालकांड, अयोध्याकांड ( पूर्वार्ध व उत्तरार्ध ) सुंदरकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड, युद्धकांड ( पूर्वार्ध व उत्तरार्ध ) आणि उत्तरकांड अशी सात कांडे आणि युद्धकांड व उत्तरकांड समालोचना अशा दहा सचित्र पुस्तकात रामायणातील इतिहास स्पष्ट केला आहे. इतिहासाच्या समालोचना प्रत्येक कांडात कारणमीमांसेसह केल्या असल्याकारणाने प्रबोधक आहेत. रामायणातील सती सीता, मर्यादापुरुषोत्तम राम, भरतभाव, सेवादर्श हनुमान् यांच्या प्रभावी गुणसंपदेबरोबर रामराज्यातील समाजगुणवर्धक लोकाराधना समाजशास्त्रज्ञानी व राजकारण्यानी अभ्यासावीच.

( १२ ) **वेद**— हे मानवधर्माचे आद्य पवित्र ग्रंथ होत.

औंधसंस्थानात पंडितजींनी १९१८ साली " स्वाध्यायमंडळ " या विख्यात संस्थेची स्थापना केली, ती औंधचे राजेसाहेब श्रीमंत बाळासाहेब यांच्या सहकार्याने. " वेदांच्यासारख्या अखिल मानवधर्मास परमपूज्य अशा धर्मग्रंथांचे " मुद्रण परिशुद्ध सुंदर व्हावे व अभ्यासकांना आणि वेदानुयायाना ते ग्रंथ अत्यंत अल्प किंमतीत खरेदी करता यावेत या एकाच ध्येयाने शंभरीत आलेला सातवळेकरांसारखा महापुरुष कष्टाचे डोंगर उपसताना पाहणे हे जिवंत काव्य आहे. त्याचा रसास्वाद कल्पनेने घेणेही भाग्याचे होय. अखिल भारतात स्वाध्यायमंडळाचा गूढार्थ विवेचनाचा प्रथम वैदिक प्रयत्न होय. ( मराठी ) वेदानुवाद ( भाग १ ) हे विवेचन समष्टि शरीरात जितके भिनेल, तितका समाजपुरुष अभ्युदयसंपन्न, पौरुषयुक्त आणि ओजस्वी–तेजस्वी होईल. चार वर्ण, तीन लोक, चार आश्रम, भूत–वर्तमान–भविष्याचे सर्व व्यवहार वेदाने सिद्ध होत. सेनापति, राज्यशासक, न्यायाधीश, लोकेंद्र यांची कार्ये सगळे काही वेदशास्त्रवेत्ता करूं शकतो. " **कृण्वन्तो विश्वमार्यम् ।** " समुद्रापर्यंत जितकी पृथ्वी आहे, पृथ्वीला एक राजा होऊ दे आणि त्याचे राज्यशासन वैदिक पद्धतीने चालू दे, ही ऋषींची आकांक्षा होती. वेदांच्या प्रकाशनाने आणि अनुवादाने, त्याचप्रमाणे वैदिक धर्माच्या जागृतीने, त्या दृष्टीचे कार्य व्हावयाचे आहे. जर्मन आणि अमेरिकन विद्वानांनी वेदाबाबत जे परिश्रम केले ते पाहिले म्हणजे भारतीयाना काहीच करता आले नाही, असे म्हणावे लागते. त्यांनी फार मोठा वेद–कोश तयार केला. अमेरिकेच्या हार्वर्ड–विद्यापीठातर्फे वेदांची चरणसूचि तयार झाली. ऋग्वेदाच्या पुनरुक्त मंत्राची सूचिही उत्तम तेथे निघाली. असे तिकडे वेदसंशोधन चालू असता भारतीयाने मागे पडण्यात काय अर्थ ? चार वेदात वीस हजार मंत्र आहेत. त्यात पंचवीसशे सूक्ति ध्यानात धरण्यासारख्याच आहेत. या सुभाषितांची विषयवार विल्हे करून व्यक्ति, राष्ट्र, समाज, कुटुंब, पुत्र, धन, वीरता, युद्ध, सैन्य, किल्ले, युद्धसाधना इत्यादि संबंधात सुभाषित–संग्रह अनुवादासह पाहिल्यास तो हरएक मनुष्यास जीवनोपयोगी ठरेल. प्रा. मॅक्समुल्लर यांनी छापलेल्या वैदिक संहितानंतर पंडितजींच्याच वैदिक संहिता शुद्ध व निर्दोष म्हणून जगन्मान्य झाल्या आहेत.

**( १३ ) वेदपरिचय–** म्हणूनही पंडितजींनी वेदाध्ययन परीक्षेसाठी पाठविधी तयार केले असून वेदांच्या संहिता, वैदिकाना व वेदाभ्यासकाना नित्यनैमित्तिक वेदपाठासाठी व संदर्भासाठी तयार केल्या असून अथर्ववेदसंहिता, यजुर्वेद ( वाजसनेयी ) संहिता, यजुर्वेद [ तैत्तिरीय ] संहिता आणि सामवेद यांचा त्यात अंतर्भाव आहे. सामवेद संहिता या पुस्तकाच्या प्रारंभीच्या विस्तृत भूमिकेत सामवेद–साहित्याविषयीचे फार उत्तम विवेचन असून प्रत्येक अध्यायाच्या शेवटी विस्तृत स्पष्टीकरण आहे. मूळ मंत्र आणि त्याचे अर्थ एकाखाली एक दिले असून सामवेद–सुभाषितांचा संग्रहही शेवटी जोडलेला आहे. कौथुम शाखीय सामवेदात ग्रामगेय गानात्मकाचे संपादन पंडितजींचा

चतुर आविष्कार आहे. सामवेदसंहितेवर भाष्य करताना, ' सोम ' या शब्दाचा पंडितजींनी शास्त्रपूत उलगडा केला असून त्याचे सुरा, मद्य, औषधि, चन्द्र असे अर्थ लावल्याने वाचकाचा जो गोंधळ होतो, तो पंडितजींनी दूरच दूर केला आहे.

( १४ ) **वेदसुधा**— या वेदकालीन परिस्थितीची तोंड ओळख करून देणाऱ्या पुस्तकात वैदिक ऋषींचे महत्त्व, वैदिककाळची सैन्यव्यवस्था, वैदिक राज्यशासनात आरोग्यमंत्र्यापासून कारभार कुशलाची कर्तव्यदक्षता इत्यादि व्याख्याने असून त्यात भारतीय संस्कृतीची मीमांसा आहे. वैदिक राष्ट्रगीत हे अथर्ववेदामध्ये भूमिसूक्त बाराव्या कांडात पहिलेच आहे. " **माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः ।** " असे त्यात स्पष्ट म्हटले आहे. लोकांनी व विशेषतः राज्यकारभार करणारानी आपणामध्ये मायभूमिचे धारण करणाऱ्या सात शुभ गुणाचे धारण करावे व ते वाढवावेत. "जो आमचा द्वेष करतो, त्याचा नाश आमची मातृभूमि करो " असे चवदाव्या मन्त्रात आहे, तो प्रत्येक राष्ट्र भक्ताने अभ्यासावा. ' अनेक भाषा बोलणारे व अनेक धर्माचे लोक आमच्या मातृभूमिमध्ये एका घरात राहणाऱ्या लोकाप्रमाणे सलोख्याने राहतात ' असे पंचेचाळिसाव्या मंत्रात आहे. त्यावरून राष्ट्रीय संघटन कसे झाले पाहिजे ते कळते. मातृभूमिचे पुत्रात ज्या सात गुणाची उपासना व्हावयास हवी, त्याचे उज्वल वर्णन त्रेसष्टाव्या मंत्रात उर्फ गीतात असून ती गीते निरनिराळ्या प्रसंगी म्हणावयाची आहेत. मूळ सस्वर मंत्र व प्रत्येक मंत्राचा सुबोध अर्थ दिल्यामुळे कुणालाही आपल्या मायभूमिची रोज मानसपूजा करता येण्यास या पुस्तकाचा उपयोग आहे. वेदातील उपमासूचि हे पंडितजींचे पुस्तकही ललित वाङ्मयाच्या लेखकानी डोळ्याखालून घालणे आवश्यक आहे, पंडितजींची वैदिक व्याख्यानमाला वेद अंगोपांगानी समजावून देणारी असून त्या अनेक विद्यांच्या महासागरातून पंडितजींची व्याख्यान–पन्नाशी व्यवहारदर्शन स्पष्ट करते. वेदांचे अध्ययन, अध्यापन, श्रवण, श्रावण आणि त्यास अनुसरून वागणूक व वागवणूक आर्यांचा परमधर्म मानला जातो, तो सुगम व्हावा म्हणूनच वैदिक वाङ्मयाचा एवढा प्रपंच पंडितजींनी केला आहे. वैदिक धर्म विशद करताना विविधतेतील एकरूपता आणि यज्ञमय जीवन यांची इतकी बारकाव्यानी फोड केली आहे की वैदिक धर्म परिणत प्रज्ञेला " **हे विश्वचि माझे घर । ऐशी** " थोर मति व्हावयास लावतो यात शंका रहात नाहीं.

( १५ ) **श्रीमद् भगवद्गीता**— गीतेतील राजकीय तत्त्वज्ञान या ग्रन्थाने तर " **वेदत्रयी–परानंदा तत्त्वार्थज्ञानसंयुता ।** " अशी ' **सुखकरणी दुखहरणी जननी ज्ञानाची** ' श्रीमद् भगवद्गीता दैनंदिन जीवनाचा केवढा परीघ व्यापते, याची स्पष्ट कल्पना पंडितजींनी दिली आहे. महर्षि अरविंद घोषप्रभृति गीताभ्यासकांच्या निबंधाचे सात भाग प्रसिद्ध करून पंडितजींनी विशाल दृष्टीचा अभ्यास वाचकांपुढे मांडला आहे. श्रीमद्भगवद्गीतेत अनेक गूढ विषय आले आहेत त्यांच्या स्पष्टीकरणाबरोबर

भगवद्गीतासमन्वय पंडितजींनी तर्कशुद्ध करून दाखविला आहे. या सर्व प्रकारानी मनावर एकच ठसा उमटतो की, कर्त्याच्या, साधनांच्या व कृतीच्या तेजस्वी वैशिष्टयाने लोकसंग्रह साधून लोक आणि लोकसेवक कर्मयोगी उत्तरोत्तर उन्नत होत गेले पाहिजेत. मानवी प्रकृतीत भागवत प्रकृतीचे प्रगटीकरण म्हणजेच अवतार होय. तो सुष्टसंरक्षणासाठी व दुष्टनिर्दाळणासाठी आणि समाजाची बैठक उठून जाऊ नये म्हणून आवश्यक असतो. **" गीता सुगीता कर्तव्या "** ती याचसाठी. उत्कट-भव्य असे माणसाचे मन व्हावे आणि त्याचे कोने-कंगोरे एवढे उजळून निघावेत की त्याची प्रत्येक कृति जीवनाचा चमकदार पैलू ठरावी. तशा योगानेच माणसाला **" आहे तरी सर्वां ठायी । "** होता येते. यापरते भाग्य आणखी कोणते ?

( १६ ) याशिवाय संस्कृत नामरूपावली, सनातन धर्माचे स्वरूप ( निबंधावली ) आणि संस्कृतस्वयंशिक्षक ही पंडितजींची पुस्तके मोठ्या प्रमाणात लोकसेवेस आली आहेत. सरदार वल्लभभाई पटेल, महात्मा गांधींसारख्या अनेक वयस्कर मंडळींनीही संस्कृत-स्वयं-शिक्षकाच्या चोवीस भागाचे सहाय्याने संस्कृत भाषेत प्रवेश केला. त्याचा अगदी फुरसतीने अभ्यास केला तरी एका वर्षात रामायण, महाभारत इत्यादि ग्रंथ उत्तम प्रकारे समजू शकतात. पंडितजींनी केलेले मनुस्मृतीचे संशोधन सामाजिक पुनर्रचनेची कालोचित काळजी करणाराच्या अभ्यासातून सुटता कामा नये, हे उघड आहे, याच अनुसंधानात गाईसंबंधी वेदमन्त्रात जो उत्तम उपदेश आला आहे, त्याचा समावेश पंडितजींनी गो-ज्ञान-कोशात करून तो एक संदर्भ ग्रंथच तयार केला आहे. या कोशाहूनही उपनिषद् भाष्य ग्रंथमाला पंडितजींनी गुंफली ती महत्त्वाची असून तीत ब्रह्मज्ञानाच्या बरोबरीने अध्यात्माधिष्ठित व्यवहार अर्थात् वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, त्याचप्रमाणे जागतिक व्यवहार निर्दोष रीतीने कशा तऱ्हेने चालू शकतील हेही दाखविण्यात आले आहे. मन्युसूक्त, जीवनप्रकाश, एकादशीचा उपवास, शतपथबोधामृत, संध्याउपासना, प्राचीन आर्यांचे राजकीय विचार, भारतीय संस्कृति, असे पंडितजींचे लहान थोर ग्रंथ प्रतिपाद्य विषयाचे मर्म सोप्या भाषेने व तर्कसोपानाने वाचकांच्या अंतःकरणापर्यन्त नेऊन भिडविणारे आहेत.

पंडितजींनी अशा तोलामोलाने लिहिलेली मराठीची वाग्भूषणे ऐंशी तरी असतील. त्यांच्या जोडीला त्याच धोरणाने लिहिलेली गुजराथीतीत पासष्ट एक पुस्तके, इंग्रजीतील तीन ग्रंथ आणि हिंदीमधील एकशे ऐंशी रचना यांचा विचार केला तर भारताच्या एकजिनसी जीवनासाठी साडेतीनशे तरी पुस्तकांचा प्रपंच उभारून आंतर्भारतीची सेवा करणारा दुसरा सरस्वतीपूजक क्वचित आढळेल. प्राचीन मराठीतील एक प्रचंड ग्रंथकार गोविंद नरहरि ( भागवतच टीकाकार ) यांची आठवण, पंडितजींनी निर्माण केलेल्या ग्रंथसंपदेकडे नजर जाताच झाल्याशिवाय रहात नाही. आपल्या सर्व ग्रंथात व पुरुषार्थ ( मराठी ), वैदिक धर्म ( हिंदी ), वेदसंदेश ( गुजराथी ), भगवद्गीता आणि अमृत-लता ( संस्कृत ) इत्यादि स्वतःच्या नियतकालिकातून आणि इतरही प्रसिद्ध केलेल्या लेखात पंडितजींनी

" नामूलं लिख्यते किंचित् । " ही प्रतिज्ञा स्पष्ट दिसते तरीही **" बाबावाक्यं प्रमाणम् । "** हे पंडितजींना मान्य नसून ऋषिमुनींचेही मार्गदर्शन बुद्धिवादाच्या कसावर उतरेल तरच ते मान्य करतात, किंवा पूर्वसूरींचा मान ठेवून त्यांच्या सारस्वताचा बुद्धिवादी आविष्कार पंडितजी करतात.

भारतीयानी आपल्या घरची संस्कारसंपन्नता साधावी म्हणून भारताच्या प्राचीन ऋषिमुनींचे विचारधन आत्मसात् करून अपूर्व आनंद करावा, ही पंडितजींची मनीषा. संस्कृत, हिंदी, मराठी, गुजराथी व कानडी या भारतीय भाषात पंडितजींचे अनेक ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. काही ग्रंथाचे इंग्रजीतही भाषान्तर झाले आहे. त्यामुळे जर्मनी, फ्रान्स, रशिया, इंग्लंड व अमेरिका या देशातील वेदपंडितांनी त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे. परकीय टाचेखाली दबलेल्या, पिचलेल्या जनतेला स्वाभिमानाने संघटित होण्यासाठी, अंतिम त्यागास व सामुदायिक समर्थ उठावास चालना देण्याचे कार्य पंडितजींच्या लेखणीने केले. दिमाग ताळ्यावर ठेवून भाषा करीत गेल्याने, व्यवहारात माणसामाणसांची दानत हेरता येऊन वाचकश्रोत्यांची समाजसन्मुखता वज्रदेही हनुमंताप्रमाणे सेवायोगी रहावी याची दक्षता पंडितजींच्या लेखनप्रेरणेने सदैव घेतली आहे. महाभारतकारानी राजनीतिचा सांगितलेला स्वभाव–

**" प्रवक्तव्यं न दातव्यं, आशामेव प्रदापयेत् ।**
**आशां कालवतीं कुर्यात्, कालं विघ्नेन योजयेत् ॥ "**

असाच कोणत्याही राजवटीत चालणारा असल्या कारणाने, कालकारण असणाऱ्या राजाला वा राजवटीला, ( समर्थांच्या म्हणण्याप्रमाणे **' दुसरे ते राजकरण । '** लक्षपूर्वक पाहून ) ताळ्यावर ठेवण्यासाठी पंडितजींनी लोकाहाती जीवनसाधना दिली आहे.

प्रयोजक सृजनशक्तिच्या कलाकाराला शास्त्राप्रमाणेच अनंताची व अज्ञाताची गूढे उकलून दाखवावी लागतात. पंडितजींची लेखनकला शुभ्रवस्त्रा व एकालंकारा महाराज्ञीसारखी असून गूढांचा आविष्कार वाचक हृदयापर्यंत सहजपणे पोहचविण्यात कर्तव्यदक्ष आहे. शास्त्र व कला यांच्या असिधारांचा समन्वय पंडितजींच्या लेखणीने स्वतःच केलेला आढळतो. व्यवहार आणि सिद्धांत, दर्शन आणि सदाचरण यांचा एकमेळ ध्येयप्रवणतेने पंडितजींच्या लेखणीने नेहमीच घातला आहे. त्यामुळे पंडितजींच्या लेखास व ग्रंथास विद्वत्तेची वजनदारी, व्यवहाराची प्रवाहक्षमता आणि परंपरेची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. वादावादाच्या जंजाळात न सापडता आधुनिक प्रवृत्तिचा परामर्श वैदिक जीवनमार्ग–दर्शिकेच्या प्रकाशात पंडितजींच्या लेखणीने घेऊन ठेवला असल्याने, वैदिक तत्त्वज्ञान–परंपरा आचारशुद्ध राखण्याची गुरुकिल्ली विचारवन्ताना पंडितजींच्या सारस्वतात सापडते.

**" जीवनसंजीवनी ही तो पंडितानी विनिर्मिली ।**
**अभ्यासील तया होई कर्तव्यामृत–माउली ॥ "**

पंडितजींचा प्रज्ञाप्रसाद हा असा आहे.

ø ø ø

## परिशिष्ट

पंडितजींचे प्रमुख ग्रंथ त्यांच्या ४०९ पुस्तकातून निवडावयाचे असल्यास असे निवडून अभ्यासता येतील.

| इंग्रजी | Pages |
|---|---|
| 1 BHAGWAT GEETA ( Cantoes 1 to 18 ) | 2810 |
| 2 ENGLISH TEACHER ( parts 1 to 4 ) | 302 |
| 3 Gandhi Readers 1 to 4 | 277 |

| गुजराथी | पृष्ठे |
|---|---|
| १ केटलिक पौराणिक कथाओ | ९६ |
| २ पृथ्वीपरनुं अमृत–गायनुं दूध | ५२ |
| ३ बाळकोनी धर्मशिक्षा भाग १ व २ | ४८ |
| ४ भारतवर्षना हिंदु सम्राट् | ११४ |
| ५ मन्युसूक्त | २२ |
| ६ वेदमां रोगजंतु शास्त्र | ४२ |

| मराठी | |
|---|---|
| १ अग्नि देवता | ३२ |
| २ अथर्ववेद ( सूक्ष्म अक्षर ) | ५६७ |
| ३ अशोकचक्र | ६४ |
| ४ अक्षरविज्ञान | १७० |
| ५ आगाखानी सांप्रदाय | २७ |
| ६ आमचा राष्ट्रभाषेचा प्रश्न | २४ |
| ७ आरोग्यखंड भाग १ | ३०३ |
| ८ ईशोपनिषद् | ८० |
| ९ ईशोपनिषदातील राजकारण | ५३ |
| १० उपनिषद् भाष्य ग्रंथमाला | १०५३ |
| ११ ऋग्वेद–संहिता | ९५२ |
| १२ ऋग्वेद–मंत्रसूचि | १४६ |
| १३ एकादशीचा उपवास | ५० |
| १४ गीताखंड | ३४३ |
| १५ गीता लेखमाला भाग १ ते ७ | १४३४ |
| १६ गीताश्लोकार्धसूचि | १२८ |
| १७ गोज्ञानकोश भाग १ | ३०३ |
| १८ गोज्ञानकोश भाग २ | २०१ |
| १९ जीवन प्रकाश | २६७ |
| २० देवे मंत्राचा अर्थ | ५० |

| | |
|---|---|
| २१ दैवत संहिता | १०४८ |
| २२ दैवत संहिता भाग १ | ८११ |
| २३ दैवत संहिता भाग २ | ८३२ |
| २४ दैवत संहिता भाग ३ | ११५४ |
| २५ पुरुषसूक्त | ४७ |
| २६ पुरुषार्थबोधिनी | ९७८ |
| २७ पौराणिक गोष्टींचा उलगडा | ११२ |
| २८ प्राचीन आर्यांचे राजकीय विचार | १२७ |
| २९ प्राणसूक्त | ३२ |
| ३० ब्रह्मचर्य | १२३ |
| ३१ भगवद्गीता निबंधमाला ( भाग १ ते ७ ) | १३४४ |
| ३२ भारत | ८० |
| ३३ भारतीय संस्कृति | २८८ |
| ३४ मंगलमूर्ति गणेश | १६४ |
| ३५ मन्युसूक्त | २० |
| ३६ मरुदेवतामंत्रसंग्रह | २५५ |
| ३७ मराठी–हिंदुस्थानी कोश | १९१ |
| ३८ महाभारत | २२३८ |
| ३९ मानवी आयुष्य | ५२ |
| ४० यजुर्वेद ( काण्व, तैत्तिरीय, मैत्रायणी, काठक ) | १६६३ |
| ४१ यजुर्वेद पादसूचि | १२७ |
| ४२ यजुर्वेद सर्वानुक्रम | १०४ |
| ४३ यजुर्वेद संहिता | १६७ |
| ४४ यज्ञोपवीत–संस्कार–रहस्य | २०४ |
| ४५ वायुदेवता | ८८ |
| ४६ वाल्मीकि रामायण | ४५४० |
| ४७ विजयादशमी | ४२ |
| ४८ विष्णुसहस्रनाम | १४५ |
| ४९ वेद परिचय | ५७२ |
| ५० वैदिक अग्निविद्या | २१६ |
| ५१ वैदिक चिकित्सा | १६० |
| ५२ वैदिक धर्मखंड | २७८ |
| ५३ वैदिक व्याख्यान माला ( १ ते ४८ ) | ७७७ |
| ५४ वैदिक राष्ट्रगीत | ३१ |
| ५५ वैदिक सर्पविद्या | ७२ |

५६ वैदिक स्वराज्यमहिमा ८७
५७ शतपथबोधामृत ४६
५८ सनातन धर्माचे स्वरूप ( भाग १ ते ३ ) ६७
५९ सन्ध्योपासना १७६
६० संस्कृत–स्वयं–शिक्षक ( भाग १ ते २४ ) १२४६
६१ सामवेद १६१
६२ सामवेद ( सूक्ष्म ) १५०
६३ सामवेदसंहिता ६२१
६४ सामवेदाचा सुबोध अनुवाद ६२१
६५ सूर्यभेदन व्यायाम ६४
६६ स्वराज्यसंबंधाने ऋषींचे संदेश २४

### हिंदी

१ अथर्ववेदका सुबोध अनुवाद १६३९
२ अथर्ववेदका सुबोध भाष्य २०६८
३ आर्योंका भगवा ध्वज ३९
४ ऋग्वेदका सुबोध भाष्य १४९६
५ ऋग्वेदमें रुद्रदेवता ८७
६ छूत और अछूत २५२
७ दीर्घायु कैसे प्राप्त हो १५९
८ बालकोंकी धर्मशिक्षा ( भाग १ ते ३ ) ९६
९ यजुर्वेदका सुबोध भाष्य ७१३
१० योगके आसन २५१
११ योगसाधनकी तैयारी ११०
१२ विश्वराज्यमें देवताओंका कार्य ५४
१३ वेदका स्वयंशिक्षक ( भाग १ ) १३८
१४ वेदका स्वयंशिक्षक ( भाग २ ) २२४
१५ वेदमें कृषिविद्या २४
१६ वेदमें चर्खा ८४
१७ वैदिक स्वराज्यकी महिमा ११२
१८ संस्कृत पाठमाला ( भाग १ ते २४ ) १२४४

**आकारसदृशा प्रज्ञा, प्रज्ञया सदृशागमः ।**
**आगमैः सदृशारंभः, आरंभसदृश उदयः ॥**

या कालिदास– दिलीपांच्या उद्‌गाराप्रमाणे पंडितजींच्या हातून निर्माण झालेल्या ग्रंथापैकी, जे वाचल्याशिवाय सहसा अभ्यासकाने राहूच नये तेवढ्याच ग्रंथाची ही यादी येथे दिली आहे.

: ३१ :

# समकालीनात पंडितजी

**बरोबरीच्या** माणसातील मागसलेल्याना बरोबर घेऊन, बरोबरीच्याना बरोबर ठेवून आणि पुढे पुढे करणारांची घायकुती थांबवून, सर्व सहचरांची प्रगति सारखीच तोलामोलाची ठेवणारा महात्मा अजून तरी जन्माला आलेला नाही. अगदी एका घरात, एका दिवसात वा एका वर्षात जन्माला आलेल्या माणसात जर " सर्वधर्मी समानत्व आढळत नाही, तर जन्माचे साल एक असले तरी भिन्न भिन्न परिस्थितीत जन्मलेल्यामध्ये समानता बेताचीच असावी हे साहजिक नाही काय ? वय आणि वैशिष्टय यानी पंडितजी आपल्या समवयस्कामध्ये कसे ठळकपणे पुढे आहेत, हे पाहणे मौजेचे आहे.

माणसाची योग्यता पुष्कळ वेळा त्याच्या स्नेह–संबंधावरूनही मापली जाते. स्नेह-संबंधी पुष्कळसे समवयस्क असले तरीही त्यांच्यात एक दोन वर्षांचे सुद्धा अंतर असते व ते निरीक्षकाचे लक्ष्यात येतेच असे नाही. शिवाय अगदी जवळजवळच्या तारखास जन्म असलेले आणि अगदी जवळजवळ राहणारे देखील स्नेहसंबंधी असतातच असेही नाही. ज्योतिषानी मनावर घेऊन एकाद्या दिवशी वा एकाद्या वर्षी जन्मलेले बालक कसे निपजेल असा अन्दाज दिलाच, तरीसुद्धा त्या तारखेस अगर त्या वर्षात जन्मलेले प्रत्येक मूल त्या ज्योतिषांच्या ठोकळ्यात बरोबर कसे बसावयाचे ? प्रत्येकाच्या जन्माचे स्थल–काल–विशेष आपापले परिणाम करीत असतातच ! या दृष्टीने समवयस्कांची चरित्रे विहंगमावलोकनाने मनोरंजकही ठरतील आणि काही काही बाबतीत साम्य–वैषम्यांचा दृढभाजक काढून दाखवून समानशील असल्याचे ही थोडेफार दाखवता येईल. कालमहात्म्य तसे असण्याचा संभव नाही, असे ठामपणे सरसि कसे म्हणता येईल ? त्यातून कोणत्या ही मोठ्या व धाकट्या माणसाच्या

चरित्रात प्रत्यक्ष संपर्क साधलेली माणसे आपापल्या कर्तृत्वतुलनानी जशी प्रबोधने देतात, तशीच क्वचित् संपर्क आलेली वा मुळीच संपर्क न आलेली समकालीन वा समवयस्क माणसेही आपापल्यापरी प्रबोधने द्यावयास चुकत नाहीत. या दृष्टीनी अभ्यासाच्या कक्षेत पंडितजींच्या जन्मसालातच जन्मलेली व पुढे आपापल्यापरी मोठी झालेली माणसे, सहजासहजी आठवतात ती जरी मनापुढे धरली तरी विविधतेतही विधायक हुडकणाऱ्या मनाला नवा हुरूप आल्याशिवाय रहात नाही. पंडितजींच्या बरोबर जगाचे तोंड पाहणारी व जगाला आपले तोंड दाखविणारी ही पहा मंडळी ! !

( १ ) डॉ. अनी बेझंट ( १८६७–१९३४ ) ही हिंदुस्थानातील थिऑसफीची अधिष्ठात्री व राजकारणी विदुषी. मूळ आयरीश. एका पाद्र्याशी विवाह झालेला. पण ख्रिस्तीधर्माविषयी शंकेखोर बनलेल्या या बाईंना घरादारास मुकावे लागल्या-कारणाने, त्यानी पंधरा वर्षे इंग्लंडमध्ये सार्वजनिक कामात पुढाकाराने काढल्यावर हिंदुस्थान ही आपली कर्मभूमी केली. फेबियन सोशालिस्ट पंथास त्या मिळाल्यामुळे संततिनियमन, वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य, मजूरांचे संप हे त्यांच्या चळवळीचे स्वरूप ठरून गेले होते. १८८९ त म्हणजे टिळकगोखले कॉंग्रेसमध्ये चमकू लागले त्या साली योगविद्यापारंगत ब्लॅव्हॅटास्की यांच्या प्रेरणेने त्यानी थिऑसफी पन्थ काढला. त्यांचा स्वतःचा राजयोगाचा अभ्यास दांडगा होता. त्यांनी अदृश्य सृष्टीचे प्रत्यक्ष अवलोकन केले व प्राचीन विद्येवर अनेक ग्रंथ लिहिले. १८९३ पासून म्हणजे बाबू अरविंदघोष हिंदुस्थानात येऊन " जुन्या जागी नवे दिवे " अशी नवयुगप्रवर्तक विचारसरणी मांडू लागलेल्या वर्षापासून त्या हिंदुस्थानातील सार्वजनिक जीवनात आस्थेने लक्ष घालू लागल्या. १८९८ मध्ये काशी येथे त्यानी हिंदुधार्मिक शिक्षण देणारे पहिले कॉलेज काढले. त्यातूनच १९१६ साली पं. मालवीयांनी बनारस हिंदुयुनिव्हर्सिटी उभी केली. १९१४ पासून हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या प्रश्नात त्यानी लो० टिळका-बरोबरीने लक्ष घातले व १९१७ च्या कलकत्ता कॉंग्रेसचे अध्यक्षपदही त्यानी भूषविले. थिऑसॉफिकल सोसायटीचे अध्यक्षपद त्यांच्याकडे सत्तावीस वर्षे होते.

पं. सातवळेकर हैदराबादेस असताना तेथील थिऑसॉफिकल सोसायटीच्या अंत-रंगातील विश्वासाचे ते सभासद होते. म्हणूनच कोल्हापूरच्या विश्ववृत्तातील " वैदिक प्रार्थनांची तेजस्विता " या पंडितजींच्या लेखावर खटला होताच पंडित-जींना आदराने वागविण्याबद्दल डॉ. बेझंट यानी कोल्हापूरच्या महाराजाना पत्र लिहिले होते.

( २ ) सर अब्दुल रहिम– या हिंदी मुसलमान पुढाऱ्याने १८९० साली बॅरिस्टर झाल्यावर कलकत्ता येथे वकिली केली व पुढे मद्रास हायकोर्टात ते न्यायाधीश झाले. १९१३–१५ च्या रॉयल कमिशनवर हे ना. गोखल्यांचे बरोबर सभासद होते. १९२० ते २५ मध्ये बंगाल सरकारच्या कार्यकारिणीत होते. दिल्लीच्या मध्य-वर्ती विधिमंडळात १९३१–३४ या कालखंडातील विरोधी पक्षाचे अध्वर्यु म्हणूनही

नांदले. १९३५ ते १९४५ त हे मध्यवर्ती विधिमंडळाचे अध्यक्ष म्हणूनही काम पहात होते.

( ३ ) अर्नाल्ड बेनेट– हा ब्रिटनचा एक ग्रंथकार व वृत्तपत्रसंपादक या जगात १८६७ ते १९३१ मध्ये होता. आपल्या गावातील मातीची भांडी करण्याच्या उद्योगापासून त्याने अनेक धडे घेतले व ते त्याने आपल्या लेखनातून जगासमोर मांडले. 'ओल्ड वाइव्ह्‌ज्‌ टेल' व 'हिल्डा लेस वेज' या त्याच्या कादंबऱ्या हृदयंगम आहेत. माइल्स स्टोन, मि. प्रोहॅक्‌ वगैरे त्याची काही नाटके ही प्रसिद्ध आहेत.

( ४ ) एसनेर कुर्ट ( १८६७–१९१९ )– हा बव्हेरियातील एक क्रांतिकारक पुढारी. त्याने समाजसत्तावादी लेखन केले. १९०७ ( सुरत काँग्रेस वर्ष ) मध्ये 'त्याने दि फॉल्‌ ऑफ्‌ दि एम्पायर' हे पुस्तक प्रसिद्ध केले. १९१८ च्या राज्यक्रांतिमध्ये त्याने प्रत्यक्ष भाग घेतला व नंतर तो बव्हेरियाचा मुख्य प्रधान नेमला गेला. तो राज्यसत्ताधारी असला तरी बोल्शेव्हिझम्‌ला त्याचा विरोध असे. त्याने न कचरता त्यावर जोराचा हल्ला केला. म्हणूनच कदाचित्‌ कचेरीतून घरी परत येत असता त्याचा गोळी झाडून खून करण्यात आला. जालियनवाला बागेच्या सालातला हा खून म्हणजे जगाच्या इतिहातील गान्धीकेनेडी खुनांचा प्रारंभतंतु !!

( ५ ) दिवाण बहाद्दूर ( १९२८ ) झालेले कृष्णलाल मोहनलाल हे गुजराथी साहित्यसभांचे सार्वजनिक कार्यकर्ते. १९०५ नंतर मुंबई हायकोर्टाचे जज्ज होते. १८९३ सालापासून एक तप ते मुंबईविद्यापीठातील 'परशियन' चे परीक्षक होते. १९२६ साली मुंबईस भरलेल्या गुजराथी साहित्यपरिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली होती. कलकत्त्याच्या मॉडर्नरिव्ह्युमध्ये ते गुजराथी ग्रंथांची परीक्षणे लिहीत.

हे दिवाणबहाद्दूर वेदवाङ्मयाचे अभिमानी होते वेदांचा थोडाफार अभ्यासही त्यांनी केला होता. तथापि त्यांची वेदाबाबतची दृष्टी संशोधनात्मक वा चिकित्सक नसून, चालत आलेला ओघ तसाच पुढे चालविण्याची होती.

( ६ ) मुंबई येथे १८९३ मध्ये अमृतांजन डेपो सुरू करणारे आंध्रपत्रिकेचे यशस्वी संपादक के. नागेश्वरराव हे पंडितजींच्या बरोबरीचे असून १९२४ मध्ये आंध्रमहासभेकडून त्यांना देशोद्धारक ही पदवी मिळाली होती. "आंध्रविज्ञानसर्वोत्तम्‌" या तेलगू ज्ञानकोशाचे ते संपादक होते. १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहात त्यांना शिक्षा झाली होती व १९३५ साली ते दिल्लीच्या विधिमंडळाचे सभासद ही होते.

( ७ ) हिंदुमिशनरी सोसायटी (१९१७) मुंबईचे संस्थापक व शुद्धीचे पुरस्कर्ते गजानन भास्कर वैद्य ( १८६७–१९२१ ) यांनी बी. ए. झाल्यानंतर १८९८ सालापासून मुंबईस थिऑसफीच्या प्रचारकार्यास सुरवात केली. दादाभाई नौरोजींच्या स्टूडंट्स्‌ लिटररी अँड सायंटिफिक रीसर्च सोसायटीच्या विद्यालयात ( १९०४ ते

१९२१ ) अध्यापक असलेले हे गृहस्थ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे वीस वर्षे अध्यक्ष होते. अज्ञानामुळे व फसून परधर्मात गेलेल्या मूळच्या हिंदूना परत स्वधर्मात घेण्याबद्दल त्यांनी शंकराचार्यांच्या पीठाना आळविले पण शेवटी ५ जुलै १९१७ रोजी स्वतःच ते कार्य त्यांना हाती घ्यावे लागले. त्या दिवशी त्यांनी हिंदुमिशनरी सोसायटी स्थापन करून शंभर स्त्रीपुरुषाना त्यांनी हिंदु करून घेतले. महाराष्ट्रात या शुद्धिकरणाचे अनुकरण सर्वत्र झाले. वैद्यानी हिंदुमिशनरी हे साप्ताहिक व विनायक कोंडदेव ओकांचे मागे बाल–बोध मासिकही चालविले. रेखात्मक यथादर्शन चित्रविद्या, देहदानमीमांसा, प्रश्नोपनिषद्, विष्णूचे अवतार, आश्रम व आश्रमधर्म, वैदिक विवाहविधि हे वैद्यांचे सुप्रसिद्ध ग्रंथ.

( ८ ) रत्नागिरी जिल्ह्यातील आडिवरे येथील गणेश कृष्ण जोशी ( १८६७ ते १९२२ ) हे सुप्रसिद्ध नट वयाच्या दहाव्या वर्षीच पोरकेपणाने मधूकरी मागून विद्या शिकण्यास ते कंटाळले व कार्लेकरांच्या नाटक मंडळीत गेले. नट म्हणून नाव मिळवता मिळवता १८८१ साली केसरीच्या जन्माबरोबरच स्थापन झालेल्या शाहू नगरवासी नाटकमंडळीत ते शिरले. प्रसंगवशात् ते तिचे पुढे मालकही झाले. १८९१ त या मंडळीने शेक्स्पीअरची हॅम्लेट वगैरे नाटके मराठीतून रंगभूमीवर आणली व १८९२ पासून राणा भीमदेवादि ऐतिहासिक नाटकेही चालू केली. गणपति उत्सव, शिवाजीउत्सव, हरिभाऊ आपट्यांच्या उषःकाल प्रभृति कादंबऱ्यानी लोकशिक्षण साधलेल्या त्या कालखंडात गणपतराव जोशांच्या भूमिकानीही लोकजागृति केली. हॅम्लेट मध्ये राजपुत्र चंद्रसेनाची भूमिका जेवढी परिणामकारक गणपतराव करत तेवढीच आपल्या वीररसानुकूल पहाडी आवाजाने राणा भीमदेवाचीही भूमिका करीत. प्रेक्षकाना गुंग करणाऱ्या या गद्य नटानें तुकारामाची भूमिका तल्लीनतेने केलेली आहे; इतकी की भाविकाला तो विसाव्या शतकातील रंगभूमीवर स्वतः संत तुकारामच अवतरल्यासारखे वाटे. बहिऱ्या प्रेक्षकालाही केवळ हावभावांच्या जोरावर ते नाटकाचे मर्म समजावीत.

( ९ ) जोसेफ क्लेयन्स पिल्सुडस्की ( १८६७–१९३५ ) या पोलंडच्या सुप्रसिद्ध सेनापति व मुत्सद्याचे लक्ष विद्यार्थीदशेपासूनच राष्ट्रीय समाजवादाकडे होते. त्यामुळेच त्याला चार वर्षे हद्दपारी भोगावी लागली. १९०१ साली सेंट पीटर्सबर्गच्या तुरुंगातून पळून जाऊन तो ग्रेटब्रिटन व पूर्वेकडील देशात हिंडला. कैसरीकंदन ( १९१४–१८ चे जागतिक पहिले महायुद्ध ) सुरू झाल्यावर पोलंडमध्ये तो परत आला व रशियावर स्वारी करून बसला. १९१९ मध्ये पोलंडला लोकशाही स्वराज्य लाभले. तेव्हा पिल्सुडस्की अध्यक्ष निवडून आला. तीन वर्षांच्या आपल्या अध्यक्षीय कारकीर्दीवर संतुष्ट न राहता, १९२६ साली असलेल्या सरकारचा पराभव करून) स्वारी पोलंडची मुख्यमंत्रीच झाली. तेव्हा तो हुकूमशहाच झाला म्हणाना ! पोलंडच्या स्वातंत्र्ययुद्धावर याने अनेक ग्रंथ लिहिले आहेत.

( १० ) राजा रामपालसिंग हा अलिगड येथे शिक्षण घेतलेला हिंदुसमाजसेवक. १९०८ मधील संयुक्तप्रांताच्या दुसऱ्या सामाजिक परिषदेचे अध्यक्ष, व १९१० मध्ये अखिल भारतीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष अशी मानाची स्थाने त्यांनी भूषविली. सन १९०९ पर्यंत अलाहाबाद विद्यापीठाचे ते फेलोही होते. लखनौच्या क्षत्रिय कॉलेजचे हे चिटणीस, बनारस हिंदु युनिव्हर्सिटी कोर्टाचे हे सभासद अलाहाबाद बँकेचे एक नियामक आणि हिंदु धार्मिक व धर्मादाय संस्थांचे अध्यक्ष म्हणूनही राजा रामपालसिंग यांचे नाव सर्वतोमुखी झाले होते.

( ११ ) डॉ. शंकर आबाजी भिसे ( १८६७–१९३५ ) या मुंबईस जन्मलेल्या महाराष्ट्रीयाने संशोधक म्हणून नाव कमावले. बॉम्बे पेपरमिलचे व्यवस्थापक व आग्रा लेदर वर्क्सचे प्रमुख डायरेक्टर म्हणून काम करता करता, १८९७ त इंग्लंडमध्ये गेल्यावर स्वयंचलित ( वजन ) तोलकरी यंत्रे तयार करून त्यानी नाव मिळविले. पुष्कळ जाहिरातींचे एकदम प्रदर्शन करणारा दिवा, समुद्राच्या तळाशी प्रकाश देणारा दिवा, इत्यादि त्यांचे नवे शोध लोकप्रिय होताच १९०८ साली एकाच वेळी अनेक टाइप पाडणाऱ्या यंत्राचा त्यानी शोध लावला. १९१० त अॅटॉमिक आयोडिन व पुढे बेसलिन यांचा शोध लावल्यावर डॉ. भिसे यांचे नाव जगभर झाले. लंडन रॉयल सोसायटीने व न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीने त्यांना पदव्या देऊन त्यांचा सत्कार केला. आध्यात्मिक क्षेत्रात विवेकानंद व रामतीर्थ यांनी परदेशी नाव केल्यावर आधिभौतिक संशोधनात डॉ. भिशानीच पाश्चिमात्यात नाव केले.

( १२ ) प्रख्यात चिनी क्रांतिकारक व सुधारणावादी मुत्सद्दी सन्–यत्–सेन ( १८६७ ते १९२५ ) हा क्वान्टुंग प्रांतातील हॉम्–रुण येथे जन्मला. याचा बाप खिरस्ती झालेला होता. १८९३ मध्ये याने चिनी क्रांतिकारकांचा पक्ष स्थापन केला होता. अनेक झटापटीनंतर चीनचे मांचू राजघराणे तीनशे वर्षांचे जुने होते, ते जाऊन चिनात लोकराज्य स्थापन झाले. डॉ. सन्–यत्–सेन हा त्या लोकराज्याचा पहिला अध्यक्ष निवडला गेला. ( १९११ ). पण आपला कुओमिटंग हा नवा सुधारणावादी पक्ष स्थापन करताना, त्याला आपल्या पूर्वीच्या क्रांतिकारक सहकाऱ्यांच्या विरुद्ध जावे लागले. नव्या चिनी लोकराज्याचा पाया आर्थिक दृष्ट्या चांगला सुस्थिर रहावा म्हणून सन्–यत्–सेन फार झटला. पण यादवीमाजून त्याच्या पक्षाचा पराभव झाला. साम्यवादाला त्याचा पाठिंबा असे.

( १३ ) स्टॅन्ले बाल्ड्विन ( १८६७–१९४५ ) हा ब्रिटनचा एक युद्धमंत्री. बोनर लॉच्या मंत्रिमंडळापासून कारभारीमंडळात हा निवडून येत असे, १९२३ त मग हाच मुख्यमंत्री झाला. १९२९ च्या जानेवारीत सेन्ट अॅड्र्युज युनिव्हर्सिटीचा तो व्हाइस चॅन्सेलर बनला. १९३२ च्या ओटावा परिषदेत ब्रिटिश शिष्टमंडळाचा तो पुढारी होता. १९३५ मध्ये मॅकडोनाल्डनंतर फिरून तो ब्रिटनचा मुख्यमंत्री झाला. आठव्या एडवर्डने सिम्प्सन् बाइशी लग्न करण्याचे ठरविल्यावर बाल्डविनने फार शहाणपणाने राजाची व राज्याची अब्रू सांभाळली .

( १४ ) स्वामी अभेदानंद ( १८६७–१९३९ ) स्वामी विवेकानंदांच्या या गुरुबंधूनी हिंदुतत्त्वज्ञानाची माहिती युरोप, अमेरिका इत्यादि खंडात दिली. हिमालयात पायी प्रवास करून व तिबेटात जाऊन बौद्धधर्म आणि लामापंथ यांचाही अभ्यास केला. न्युयॉर्कच्या वेदान्तसोसायटीचे नेतृत्वही काही काळ यानी केले. १९२३ मध्ये यानी कलकत्त्यास 'रामकृष्ण-वेदान्त-सोसायटी' सुरू केली, १९३४ त तसाच उपक्रम त्यानी दार्जिलिंग येथे केला. १९३७ साली कलकत्त्यास जी धर्मपरिषद् झाली तिचे अध्यक्ष स्वामीजीच होते. वेदान्तावर त्यांचे काही ग्रंथ आहेत.

( १५ ) हरविलास सारडा– अजमेर येथील गव्हर्नमेंट कॉलेज मधील हे शिक्षक वयाच्या पंचविसाव्या वर्षी म्हणजे १८९२ साली न्यायखात्यात घेतले गेले. १८९४ मध्ये जेसलमीर येथील महाराजांचे पालक म्हणून यांची नेमणूक झाली. १९०२ मध्ये म्हणजे ना. गोखले लॉर्ड कर्झनच्या कायदेमंडळाचे सभासद झाले, त्या सालीं हरविलास सारडा हे फिरून ब्रिटिश नौकरीत आले. १९२३ पर्यंत बिआवर येथे व अजमेर येथे न्यायमूर्ति म्हणून कार्य केल्यावर ते सेशनजज्ज झाले. त्या साली सेवानिवृत्त होऊन जोधपूरसंस्थानचे चीफजस्टिस झाले. १९२४ ते १९३३ मध्ये मध्यवर्ती ( दिल्ली ) असेम्ब्लीचे सभासद होते. १९२९ मधील लाहोरच्या भारतीय सामाजिक परिषदेचे व १९३० तील बरेलीच्या वैश्य परिषदेचे ते अध्यक्षपदी विराजमान झाले. भारतीय परोपकारी सभेचे ते कर्तबगार चिटणीस म्हणून प्रसिद्धि पावले. त्यांनी बालविवाहप्रतिबंधक विधेयक १९२९ साली तयार करून त्याचा कायदा करून घेतला. बी. बी. सी. आय. रेल्वेचे सल्लागार व पोस्टल परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही सारडानी कामे केली. १९३६ साली राजपुताना प्रांतिक हिंदुपरिषदेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांची कामगिरी गाजली आहे.

( १६ ) भगिनी निवेदिता ( १८६७–१९११ ) हिंदी संस्कृतीचे श्रेष्ठत्व सर्व जगाला पटवून देणारी हिंदी संस्कृतीची अभ्यासक होती ही युरोपियन महिला. आयरिश धर्मगुरु एस्. आर्. नोबल यांची ही कन्या मार्गारेट्. लंडनमध्ये एका शाळेची मुख्याध्यापिका म्हणून काम करीत असता १८९५ साली तिच्या मनावर स्वामी विवेकानंदांच्या प्रवचनांचा एवढा परिणाम झाला की स्वामींच्या दुसऱ्या सफरीच्या वेळी ती त्यांची शिष्या झाली व १८९८ त हिंदुस्थानात आली. एक वर्षभर स्वामीजीबरोबर भारतयात्रा केल्यावर तिने भारतीय संस्कृतीच्या व जनतेच्या सेवेस स्वत:स वाहून घेतले. कालीमाता, हिंदी जीवनाचे धागे, मी पाहिलेले गुरुदेव अशी तिची इंग्रजी पुस्तके लोकप्रिय आहेत.

आधुनिक जगातील व्यवहाराचे स्वरूप अनेकानेक समस्यानी गुंतागुंतीचे झाले असता, जगाकडून आपणास व आपल्या देशास काय घ्यावयाचे आहे व जगास काय द्यावयाचे आहे, हा महत्त्वाचा विचार आपल्या बुद्धीने मांडून कसकसा वर्तनांतरित

केला, हे पंडितजींच्या समवयस्कांच्या सोळा ठळक उदाहरणावरून अभ्यासणे मानव्याच्या परिणतीचे दृष्टीने मनोरंजक तसेच प्रबोधक ठरणारे आहे. यातील कित्येकांचा पंडितजींशी वा पंडितजींच्या जीवनकार्याशी **"समानशीलव्यसनेषु सख्यम्।"** म्हणण्याइतकाही संपर्क नाही. तरीही ज्योतिषी व सार्वजनिक सेवायोगींनी विचार करण्यासारख्या कितीतरी गोष्टी आहेत.

पंडितजीप्रमाणेच १८६७ साली जी ठळक माणसे जन्मास आली, त्यांच्यातील सहजासहजी लक्ष्यात येणाऱ्या मंडळीपैकी डॉ. बेझंट यांचा व पंडितजींचा जिव्हाळा थिऑसफीमुळे निर्माण झाला होता. तथापि या सर्व महाशयांचा समुच्चयवाचक विचार करतां सर्वांच्या जीवनोत्क्रांतीला १८९३ मध्ये सुरवात झाल्याचे प्रत्ययास येते. या मंडळीपैकी प्रत्येकाचा विशेष जो जगाच्या प्रत्ययाला आला, तो पंडितजींच्या चरित्रात थोडाफार तरी पहावयास सापडतोच सापडतो. सनदशीर राजकारण, क्रांति, संशोधन, ग्रंथलेखन, वृत्तपत्रसंपादन, लोकजागरण, सत्ताधाऱ्याकडून छळ, धर्मप्रेम, नाट्य हे एकेकाच्या चरित्रात आलेले विशेष पंडितजींच्या चरित्रात उमटले आहेतच. पण बाकीच्या सर्वांनी आपले जीवितकार्य म्हणून काही आखून घेऊन त्याचा ध्यास, अभ्यास व तपस्या केल्याचे डॉ. भिसे, डॉ. बेझंट यांच्यासारख्यांच्या चरित्रातच तेवढे आढळते. पंडितजींनी समर्पणबुद्धीने वेदप्रचाराचे ध्येय पतकरले यात त्यांचे महत्त्व आहे.

आता, ज्या भारतीय वैदिक संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाने हिंदुस्थान स्वतंत्र व तेजस्वीच तेजस्वी रहावा म्हणून पंडितजींनी एक प्रकारे जीवनसमर्पण केले, त्याचा विचार करता, त्या वैदिक संस्कृतीच्या सेवकांच्या कार्याचा व पंडितजींच्या जीवनकार्यास प्रत्यक्ष अगर पर्यायाने हातभार लावणाराच्या जीवनिकाशी पंडिजींची जीवनिका तोलून पाहण्याचाही प्रयत्न अभ्यासू मने केल्याशिवाय राहणार नाहीत. भारतीय संस्कृतीचे बाह्य जगावर झालेले परिणाम राजकीय आक्रमण अगर साम्राज्य–प्रसार या मार्गांनी बहुश: झालेले नाहीत. भारतीय संस्कृतिच्या उपासकाजवळील ज्ञान, शील व त्या संस्कृतीचा जीवनोन्नतिस उपयोग यामुळेच ते परिणाम झाले आहेत, हा इतिहास आहे. सांस्कृतिक परंपरेचा वाहक समाज असतो. धर्म, भाषा, इतिहास इत्यादिमुळे समाजाच्या सर्व घटकातील व थरातील एकतेची भावना जेवढ्या प्रमाणात वाढेल, तेवढ्या प्रमाणात समाज एकजिनसी बनतो. या अंतरीच्या जाणीवेमुळेच, भारतीय वैदिक संस्कृतीची सेवा आपापले क्षेत्र आखून घेऊन आपापल्या कुवतीप्रमाणे व स्वतंत्र मार्गाने करीत असलेले महाभाग दिसावयास दूरचे व भिन्न प्रकृतीचे वाटले तरी एककुटुंबीय वाटतात. एवढेच नव्हे, तर प्रत्यक्ष भारतीय वैदिक संस्कृतिच्या संरक्षण, संगोपन, संवर्धन इत्यादि क्षेत्रात सेवाकार्य न करणारे पण तसे सांस्कृतिक सेवाकार्य करणारांचा आपापल्या अन्य कार्यक्षेत्राशी सहकार मिळवणारे आणि सांस्कृतिक सेवाकार्याला

आपली सहानुभूति, सहाय्य वा सहकार देणारे, असे सर्वच सर्व, **" सह वीर्यं करवावहै । "** या जीवनप्रणालीचे पाईक म्हणून परस्पराना निकटसंबंधीच वाटत असतात. एवढचा व्यापक दृष्टिकोनातून, पंडितजींचा सहव्यवसायी, सहकारी, सहाय्यक, सहानुभूतिक म्हणून ज्यांच्याशी संपर्क आला, त्यांच्यामध्ये पंडितजींचे स्थान हुडकून काढणे हेही अभ्यासकांचे लक्ष्य असावयास हवे. त्या स्तरावरून आवतीभोवती आणि कालौघावर नजर टाकताच, अभ्यासकांच्या नजरेला ज्या मूर्ति आढळतात, त्याना समवयस्कच म्हणता आले नाही तरी समकालीन खास म्हणता येईल. पंडितजींच्या समकालीनांची याद करावयाची म्हटली, तर ती, शीघ्र स्मृतिगतिने, अशी काहीशी करतां येईल व ती अनेक पर्यायानी उद्‌बोधकही ठरेल. पहा की—

**१ पं. विष्णु गोविंद पलुसकर** ( १८७२–१९३१ ) बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचे हे संगीतज्ञ शिष्य. आवाजाची नैसर्गिक अनुकूलता नसताही हिंदी संगीत आत्मसात् करून प्रवीणतेने १८९६ पासून त्यानी उत्तर हिंदुस्थानवर छाप पाडली. लाहोर येथे गांधर्व महाविद्यालयाची स्थापना करून हिंदी शास्त्रीय संगीताचा प्रसार त्यानी चोहोकडे केला. संगीताचे यशस्वी स्वरलेखन निर्माण करणारे संगीतशास्त्री म्हणून त्यांचा लौकिक पंडितजी सातवळेकरांच्या चित्रकारीच्या लौकिकाप्रमाणेच पंजाबात दिगंत झाला.

**२ विष्णु गणेश पिंगळे**– ( १८८८–१९१५ ) तळेगावदाभाडचाच्या समर्थविद्यालयाचा हा विद्यार्थी १९११ साली यंत्रशास्त्राच्या अध्ययनासाठी अमेरिकेत गेला व बिनतारी तारायंत्राचा अभ्यास करता करता बाबा गुरुमुखसिंगाच्या गदर चळवळीत सामील झाला. मीरत येथे येऊन सशस्त्र बंडासाठी हिंदी फौज अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न करण्याबद्दल १९१५ साली १५ नोव्हेंबरला त्यास फाशी झाली. तो लाहोरकटात सामील होऊन अमेरिकेतून हजारो लोक हिंदुस्थानात आणण्याची त्याने तयारी केली होती, असा रोलटरिपोर्टात उल्लेख आहे.

**३ सिल्व्हन् लुई लेव्ही** ( १८६३–१९३६ ) हा सुप्रसिद्ध फेंच प्राच्यविद्यापंडित व इतिहाससंशोधक. १८९० मध्ये हा डॉक्टर ऑफ् लेटर्स झाला. १९०४ साली हे " एकोल दे होत एत्यूद " व नंतर ' कॉलेज द फ्रान्स ' मध्ये संस्कृतचे प्राध्यापक म्हणून काम करू लागले. " एकोल फ्रान्सेझ देक्सत्रीम ओरिआन्त " ही यांची संस्था हिंदी संस्कृतीचे अध्ययनासाठीच निघाली आहे. जावा, कंबोडिया, सुमात्रा, बोर्निया यासारख्या दूर दूरच्या देशात स्थापन झालेली हिंदु राज्ये व ब्रह्मदेश, सयाम, चंपा, जावा इत्यादि ठिकाणची लिपी, भाषा व वाङ्मय यावर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकण्याची कामगिरी यांनी केली आहे. भारतीय नाटच, यज्ञ, भारत यासारखे ग्रंथ यांनी फ्रेंचमध्ये लिहून भारताचा मोठा गौरव केला आहे.

**४ भाई परमानन्द** ( १८७४–१९४७ ) पंजाबमधील दयानंद अँग्लो वैदिक कॉलेजचे आजीव सभासद. आर्यसमाजाचे मिशनरी म्हणून दक्षिण आफ्रिकेत गेले होते.

नंतर दक्षिण अमेरिकेचा दौरा ते करून आल्यावर १९१५ मध्ये 'गदर' कटात सामील असल्याबद्दल त्यांना देहान्ताची शिक्षा देण्यात आली. पण पुढे ती हद्दपारी होऊन १९२० पर्यंत त्यांना अंदमानात रहावे लागले. पंजाबच्या राष्ट्रीय शिक्षण-मंडळाचे ते अध्यक्ष होते. १९३३ पासून हे हिंदुमहासभेत होते.

५ **लाला लजपतराय** ( १८६५–१९२८ ) लाल–बाल–पाल या विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातील राष्ट्रीय त्रिमूर्तिपैकी पंजाबचे अध्वर्यु. १८८८ पासून ते काँग्रेसमध्ये भाग घेऊ लागले. ना. गोखले यांच्याबरोबर हे इंग्लेंडमध्ये काँग्रेसतर्फे १९०५ मध्ये शिष्टाईस गेले होते. यांचे मागे आर्यसमाजिस्ट व राजकीय चळवळे म्हणून गुप्तहेरखात्याचा एवढा लकडा होता की कैसरीकंदनाच्या ( १९१४–१८ ) काळात ते अमेरिकेत जाऊन राहिले. असहकाराचा ठराव पास करणाऱ्या कलकत्त्याच्या १९२० मधील जादा काँग्रेसचे ते अध्यक्ष होते. १९२८ साली सायमन कमिशनला विरोध करीत असता, त्यांचे वर जो लाठीमार झाला, त्यानेच त्यांचा शेवट ओढवला.

६ **विष्णु गोविंद विजापूरकर** (१८६३–१९२६) महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षणाचे आद्यपुरस्कर्ते. राजाराम कॉलेजात संस्कृत व इंग्रजीचे प्राध्यापक असता यांनी विद्यार्थ्यांना स्वदेशीची चळवळ शिकवली. कोल्हापूरास त्यांनी १९०६ साली राष्ट्रीय शिक्षणासाठी समर्थविद्यालय काढले. ह्यानी चालविलेल्या " विश्ववृत्त " मासिकात पंडितजी सातवळेकरानी " वैदिक प्रार्थनांची तेजस्विता " हा लेख लिहिताच, खटला झाला व विजापूरकरांना साडेतीन वर्षांची शिक्षा झाली.

७ **लाला हरकिसनलाल**— पंडितजी सातवळेकरांपेक्षा एकाच वर्षानी मोठे असलेले हे पंजाबातील एक पुढारी. लाहोर व केंब्रिज येथे शिक्षण झाल्यावर १८९९ पासून यांनी उद्योग धंदे व व्यापार या क्षेत्रात पदार्पण केले. लाहोर येथील इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी व इतरही कंपन्या यांनी स्थापल्या. १९१० च्या काँग्रेसचे हे स्वागताध्यक्ष होते. १९१२च्या बांकीपूर येथील औद्योगिक परिषदेचे हे अध्यक्ष. १९१६ साली इंडियन इंडस्ट्रिअल कमिशनपुढे सडेतोड व माहितीपूर्ण साक्ष देऊन येताच ब्रिटिश सरकारात खळबळ उडाली. पंजाब युनिव्हर्सिटीचे हे फेलो पंजाब विधिमंडळाचे सभासद होते. १९१९ च्या लष्करी अमदानीत यांना जन्मठेप हद्दपारीची सजा झाली. पण डिसेंबर महिन्यात माँटफोर्ड सुधारणांच्या ब्राह्ममुहूर्तावर यांना सोडण्यात आले. पंडितजींचे हे मवाळपक्षीय सहकारी. ब्रिटिश सरकारच्या रोषाला असे पात्र झाले होते. मग १९२० ते १९२३ पर्यंत पंजाब सरकारात कृषिमंत्री झाले. १९२७ मध्ये दिल्लीस भरलेल्या व्यापारी परिषदेचे अध्यक्ष व १९३४ साली लाहोर येथील विमापरिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यानी केलेल्या विधायक कामगिऱ्या आदर्श ठरल्या आहेत.

८ **डॉ. गोपीचंद्र भार्गव**– हे पंडितजीपेक्षा बावीस वर्षांनी लहान असूनही, लाहोर येथील मेडिकल कॉलेजातील शिक्षण १९१२ साली संपवल्यावर ते धंद्यात व सार्व-

जनिक कामात पडले. १९१९ तर राजकारणासाठी त्यांनी आपला किफायतशीर धंदाही सोडून दिला. अखिलभारतीय ग्रामोद्धारसंघाच्या पंजाबशाखेचे आणि लाहोर हरिजनसेवासंघाचे ते अध्यक्ष झाले.

९ वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी ( १८५४–१९१४ ) हे सावन्तवाडी संस्थानातील माणगावचे सत्पुरुष व ग्रन्थकार. तेथील सिद्ध पर्वतावरील गुहा ही त्यांची तपोभूमी होती. त्यांचे वेदाध्ययन लहानपणापासून झाले होते व वेदपठण जन्मभर चालू होते. नरसोबाच्या वाडीस त्यांना दत्ताचा साक्षात्कार झाला होता. श्रीदत्तपुराणादि त्याचे चारपाच ग्रन्थ प्रसिद्ध आहेत.

१० सौ. सरोजिनी नायडू ( १८७९–१९४९ ) स्वराज्य आल्यावर संयुक्त प्रांताच्या राज्यपाल झालेल्या व १९२५ च्या काँग्रेसच्या अध्यक्ष झाल्या होत्या त्या डॉ. अघोरनाथ चट्टोपाध्यायांच्या कन्या हैदराबादेस पंडितजी सातवळेकरांची स्वदेशीवरील व्याख्याने ऐकून त्यातील जहालपणामुळे अगदी चमकून उठत. आशियाखंडातील राष्ट्रांची जी पहिली महिला परिषद् भरली होती, तिचे अध्यक्षपद सरोजिनीदेवीनाच मिळाले होते.

११ वामन मल्हार जोशी– ( १८८२ ते १९४३ ) हे तत्त्वज्ञ साहित्यिक पुणे जिल्ह्यातील रायरी गावचे. १९०६ मध्ये एम्. ए. झाल्यावर, कलकत्ता–काँग्रेस मधून परत येताच कोल्हापूरच्या समर्थ विद्यालयाचे ते आजीव सेवक झाले. त्याबरोबर विजापूरकरांच्या "विश्ववृत्त" मासिकाच्या संपादनाचेही काम ते पाहू लागले. पण १९०८ साली पं. श्री. दा. सातवळेकरांचा "वैदिक प्रार्थनांची तेजस्विता" हा लेख प्रसिद्ध होताच त्या मासिकावर राजद्रोहाचा खटला होऊन विजापूरकर व वामनराव जोशी यांना साडे तीन वर्षांची शिक्षा झाली. पण पं. सातवळेकरांवरील खटला वर्षभर रेंगाळून बंगालमधील बाबू अरविंद घोषावरील खटल्यात ते जसे निर्दोषी सुटले तसेच सातवळेकरही सुटले !! वामनराव जोशी मात्र १९११ मध्ये सुटल्यावर टिळकांचा "मराठा," अच्युतराव कोल्हटकरांचा "मेसेज" चालवून १९१८ सालापासून जोशी महर्षि कर्व्यांच्या महिलाविद्यापीठात सामील झाले. उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून आणि रागिणी, सुशीलेचा देव अशा तत्त्वप्रधान कादंबऱ्यांचे कर्ते म्हणून मग जोशी गाजले. १९३० च्या साहित्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते.

१२ चार्लस् फ्रिअर अँड्रूज ( १८७१–१९४० ) यांचे शिक्षण बर्मिंगहॅम् व केंब्रिज येथे झाल्यावर १८९९ मध्ये ते केंब्रिजच्या आपल्याच कॉलेजात प्राध्यापक झाले. १९०४ नंतर ते दिल्लीच्या सेंट–स्टीफन् कॉलेजात प्राध्यापक म्हणून आले असता, पंजाब युनिव्हर्सिटीचे १९१३ पर्यंत फेलो होते. कांगडीच्या गुरुकुलात राहून तेथे राजद्रोहात्मक काही शिकवले जात नाही, अशी ग्वाही इंग्रज सरकारास त्यानी दिली होती. महात्मा गांधींच्या दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहात अँड्रूज यानी आस्थेने भाग घेतला होता. ते दीनबंधु म्हणून ओळखले जातात.

१३ पंडितजीपेक्षा तेरा वर्षानी लहान असलेले मुंबईचे धर्मशास्त्रग्रंथकार पंडित **पांडुरंग वामन काणे** एल्एल्. एम्. पर्यंतच्या पदव्या पारितोषिकासह मिळविणारे असून प्राध्यापकी व वकिली ही त्यानी व्यवसाय म्हणून केली असली तरी त्यानी धर्मशास्त्राचा त्रिखंडात्मक लिहिलेला इतिहास हा त्यांचे नाव अमर करून बसला आहे. ते महामहोपाध्याय झाले असून **१९४७** मध्ये मुंबई विद्यापीठाचे कुलगुरुही होते. यांच्याबरोबरच निरुक्तचे भाषांतर ( १९३५ ) प्रसिद्ध करून " वेदातील शब्द " हे शास्त्रशुद्ध पुस्तक लिहिणाऱ्या प्राचार्य वैजनाथ काशीनाथ राजवाडे **( १८६०–१९४४ )** याना स्मरले पाहिजे.

**१४ हरिराज गोपीराज**– हे महानुभावी पंजाबी महंत पंडितजीपेक्षा तेरा वर्षानी लहान. कसील गावच्या या मुलाला महानुभावी दीक्षा १८९४ साली मिळाली होती. नंतर त्यानी मराठीचा चांगला अभ्यास केला. १९२६ साली ऋद्धिपूर येथील श्री गोपीराज मठाचे ते महंत झाले, पंजाबातील आपल्या मठातून त्यानी महानुभावी पोथ्यांचा मोठा संग्रह केला होता. पण स्वराज्यांत **१९४७** साली पंजाबची फाळणी झाल्यावर बरीच महानुभाव मंदिरे व ग्रंथालये नष्ट झाली. मग त्यांनी महाराष्ट्रातच महानुभावी संशोधन चालू ठेवले.

**१५ लाला हंसराज** ( १८६४–१९३८ ) हे आर्यसमाजाचे निष्ठावंत कार्यकर्ते पंजाबातील दयानंद अँग्लो वैदिक सोसायटीचे आधारस्तंभ. शिवाय आर्यसमाजाच्या प्रचारकार्याप्रमाणेच दुष्काळ, पूर, भूकंप व दंगे यांनी ग्रस्त झालेल्याची सेवा हा त्यांचा स्थायी भाव. अनाथ, अस्पृश्य व विधवा यांना त्यांचा आधार वाटे. सामान्य लोक त्यांच्या सेवासामर्थ्यामुळे त्यांना महात्माच समजत. त्यांच्या स्मरणार्थ काढलेल्या संस्थात ' महात्मा हंसराज वेदप्रसारनिधि ' ही संस्था सर्वात महत्त्वाची आहे, हे लक्ष्यात राहण्यासारखे आहे. आर्यसमाजातील कॉलेजपक्षाचे एक अग्रणी गुरुकुलपक्षीयाइतकेच पंडितजींचे चहाते होते.

**१६ लाला दुनीचंद**– हे पंडितजींच्यापेक्षा सहा वर्षानी लहान, वयाच्या सव्वीसाव्या वर्षापासून म्हणजे **१८९९** पासून ते आर्यसमाजाचे कार्य करू लागले. अंबाला येथील अँग्लो संस्कृत कॉलेजचे ते **१९०६–२१** या काळात व्यवस्थापक होते. १९३५ अखेर पंजाबात ते एक पहिल्या दर्जाचे राजकीय पुढारी म्हणूनही गाजले.

१७ पुण्याचे ( प्राचीन, मध्यकालीन व अर्वाचीन ऐतिहासिक ) चरित्रकोशाचे कर्ते पं. **सिद्धेश्वरशास्त्री चित्राव** यांनी १९२८ मध्ये समग्र ऋग्वेदाचे भाषांतर केले. तेही श्री रामचंद्र विनायक पटवर्धनकृत भाषान्तराइतके अभ्यसनीय आहे.

१८ लोकमान्य टिळकांच्या चतुःसूत्रीचा पुरस्कार करणाऱ्या हैदराबाद येथील पंडितजींच्या सहकारी मंडळीत डॉ. **अघोरनाथ चट्टोपाध्याय** या ना. गोखल्यांच्या स्नेह्यांचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. चट्टोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखालीच हैदराबाद संस्थानात पंडितजींनी वेदवचनांच्या आधारे केलेला स्वदेशीचा पुरस्कार

हैदराबाद येथील ब्रिटिश रेसिडेंटच्या मेंदूत सलला, ही गोष्ट लक्ष्यात घेतली व त्यापायी हैदराबादेतून हद्दपार करावयाच्या यादीत चट्टोपाध्यायांचे नाव एक वेळ होते हे पाहिले म्हणजे डॉ. चट्टोपाध्याय हे **" उदंड करावे परी गुप्तरूपे।"** देशभक्त होते हे पटते.

१९ हैदराबादचे पंडितजींचे प्रतिष्ठित सहकारी म्हणजे **केशवराव ( कोरटकर )** वकील हे आर्यसमाजी. राजकीय दृष्टया ते नामदार गोखल्यांच्या पक्षाचे. पण लो. टिळकाच्याविषयी अत्यंत आदर बाळगणारे. लोकमान्यांच्याच संदेशावरून बाळकृष्ण चाफेकराच्या भूमिगतावस्थेत त्याच्या शुश्रुषेची व्यवस्था वकीलामार्फत झाली होती. पंडितजींनी केलेल्या स्वदेशीच्या पुरस्कारास त्यांचा आधार होताच होता.

२० **" माझे रामायण "** कर्ते **तुळजापूरकर** वकील हे लोकमान्यांचे अनुयायी. हेही हैदराबादेस पंडितजींचे सहकारी होते. हैदराबादेतून हद्दपार करावयाच्या देशभक्तात पंडितजींच्याबरोबर प्रामुख्याने तुळजापूरकरांचेच नाव होते. पंडितजी आणि तुळजापूरकर यांनी हैदराबाद सोडल्यावर बाकीच्या हद्दपारीच्या नोटिसा निघाल्याच नाहीत, यातील रहस्य जाणणाराना अधिक विवरण नलगे !

याशिवाय, पंडितजी औंध येथे येऊन राहिल्यावर त्यांच्या संस्थानी चळवळीत दे. **बालकृष्णपंत शिखरे, अनंत विनायक पटवर्धन,** आटपाडीचे **दर्शने.** औंधचे **रामभाऊ इंगळे** वगैरे सुप्रसिद्ध मंडळी होती तीही कमी महत्त्वाची नाहीत. हैदराबाद, लाहोर, औंध कोठेही काम करीत असले तरी पंडितजी वैदिक संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाने राष्ट्रीय जीवनाला वळण लावण्याचा प्रयत्न करीत होते. भारताच्या नव राष्ट्रजीवनाला भारताचे राजकीय स्वातंत्र्य हा एक आवश्यक सामर्थ्यांचा भाग असल्याकारणाने पंडितजींनी शक्य तितका सक्रिय आणि पुष्कळसा विवेकप्रवर्तनाचा भाग घेतला आणि ठिकठिकाणच्या ( राजकीय ) स्वातंत्र्योपासकांनी पंडितजींच्या वेदवाणीचा आपल्या कार्यसिद्धीची एक साधना म्हणून उपयोग करून घेतला, या परस्पर–सहकारात विविधतेतील एकता किंवा समन्वयवृत्तिच अभिमानास्पद रीतीने आपला प्रत्यय देते. वैदिक संस्कृतीच्या अगर वेदविद्येच्या अंगोपांगाची सेवा त्या त्या मर्यादित क्षेत्रातच करीत राहणाऱ्या महाभागांसही आपल्या त्या सेवेचा सदुपयोग जनताजनार्दनाच्या सेवेत व्हावा, अशी भूक असणे स्वाभाविकच आहे. पंडितजी आणि हे वेदसेवक यांच्यामध्ये काही ठिकाणी मतवैचित्र्य असले तरी समाजाचे विवेकोत्थान साधण्यात ते सर्व एकच आहेत. कारण त्या सर्वांना पंडितजीप्रमाणेच वैदिक संस्कृति भारतात आचरणशुद्ध रहावी अशीच आकांक्षा असणार. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांसही जगाच्या जमान्यात कालोचितपणे भारतीय संस्कृतीने तेजोधारणा करणे इष्टच होते व आहे.

आधुनिक, सामाजिक, राजकीय व आर्थिकव्यवस्था, काही युरोपियन कल्पनांचा स्वीकार करून, भारतात घडत आल्या आहेत. इंग्रजीराज्यामुळें पाश्चात्य संस्कृतीचा परिचय जो भारतीय विचारवन्ताना झाला, त्याचा तो अपरिहार्य परिपाक

आहे. ( १ ) उपासना, पंथ वगैरे गोष्टीस समाजजीवनात विशेष महत्त्व न देणे, ( २ ) स्थलांतर, धंद्यांची चालचलणूक, उपासनाप्रकार इत्यादि बाबत व्यक्तिस्वातंत्र्यास निर्वेध वाव देणे, आणि ( ३ ) राजकीय व सामाजिक व्यवहारात सर्व माणसे समतोलाची नि समान संधीस पात्र आहेत असे तत्त्वतः मानणे, या गोष्टी भारतीय जीवनातदेखील आता स्थिर झाल्या आहेत. धर्मोपासनापंथाबाबत भारतीय सहिष्णुता इतिहाससिद्धच आहे. हिंदु, बौद्ध, जैन राजानी ख्रिस्ती, पारसीक, इस्लामी, यहुदी इत्यादि अभारतीय पंथांच्या उपासकास समान वागवणूक व आश्रयही दिला होता. सबल, स्वाभिमानी व स्वयंसिद्धांची ही आश्रयदानाची वृत्ति उदारतेची ठरली; पण वडिलार्जित परंपरेच्या नावाखाली दुर्बळानी जेव्हा ती चालविली, तेव्हा आश्रयासाठी ओसरी मिळालेल्या धूर्तानी हातपाय पसरावयास सुरवात केली व भारताची धर्मशाळा बनविली ! त्याबाबत ना खंत, ना खेद वाटणारे उपासना-पंथाना समाजजीवनास विशेष महत्त्व न देण्यात आपण भारतीय परंपरा पाळित असल्याचा अभिमान बाळगतात. सबलांची उदारता आणि बावळटांचा निरुपाय एक नव्हत आणि त्यांचा प्रारंभ जरी आतिथ्यासारखा दिसला तरी उदारतेने पाहुण्यास सहकारशरण रहावे लागते तर निरुपायाने पाहुणे आक्रमणी अरेराव बनत असतात. हे राष्ट्रीय जीवनात क्षणमात्र विसरून चालणार नाही. तथापि धर्मोपासनाला भारतीय घटनेने आता सर्वत्र समान दर्जा देऊन टाकला असल्याकारणाने घटनेतील 'सेक्युलर' शब्दाला "वेदान्ती हे भाषांतर ( निधर्मी, अधर्मी, सर्वधर्मातीत असे काही नव्हे ) सुचवून आचार्य विनोबा भावे यानी भारतीयांच्या सांस्कृतिक वारसा आत्मविश्वासाच्या सबलतेने स्थायी करण्यास सुचविले होते. पण 'वेदान्ती' म्हटले की आजच्या भारतीय नेत्यापैकी अनभ्यस्ताना अजून डोकेदुखी होण्याइतका जन्मसिद्ध 'जातिभेदाचा झटका येत असल्याकारणाने विनोबांचे सेक्यूलर' चे वेदान्तीकरण त्याना रुचलेले नाही. पण त्यांच्यासुद्धा सर्वानी व्यक्तिस्वातन्त्र्य व समानता ही तत्त्वे सर्वच भारतस्थानी सन्मानिली आहेत. याचे कारण गीतेने प्रतिपादिलेली **"गुणकर्मविभागशः"** वर्णव्यवस्था सर्वानाच इष्ट वाटते. **"धन्यो गृहस्थाश्रमः"** मानून प्रत्येकाने अनृणी होण्याकरता आपली ऐहिक कर्तव्ये बजावण्याची कसोशी समाजस्थैर्याशी सन्मुख होऊन कर्तृत्वपूर्तीच्या फलत्यागाने दाखवावी, अशी निष्काम कर्मयोगाची, अनासक्तियोगाची किंवा सेवायोगाची संसिद्धि हा जीवनोत्कर्ष मानण्यात येऊ लागला. स्वामी दयानंद, विवेकानंद, लो. टिळक. अरविंद घोष, महात्मा गांधी, विनोबाजी भावे या महामतीनी वेदोपनिषद्-गीतांच्या आधारेच नवविचारांचे स्वागत केले. तात्पर्य, युरोपीय विज्ञानमय संस्कृतीने विस्कळित झालेल्या व भांबावलेल्या भारतीय समाजास क्रमशः धीर देऊन राजा राममोहनरॉयपासून आचार्य विनोबापर्यंत सर्वांनी परंपरागत धर्मनीतिकल्पनास उजळा देऊन व जरूर तर त्यावर नवी भाष्ये करून आधुनिक युगास अनुरूपता आणली. पंडितजींनी या कार्यास भरपूरच हातभार लावला आहे. तिकडे मग अभ्यासक साहजिकच वळतो. ❁ ❁ ❁

: ३२ :

# वेदसेवा आणि वेदोक्त सन्देश

ब्रिटिश रियासत प्रस्थापित झाल्यावर, भारतात सर्वांगीण क्रांतीची बीजे पेरणारे पहिले थोर गृहस्थ म्हणजे राजा राममोहन रॉय हे होत. त्यांनी प्रथम हिंदुधर्मातील कालबाह्य रूढीवर प्रखर टीका केली. विकृत धर्मकल्पनापासून समाज मुक्त झाल्यावाचून भारतात कसलीही क्रांति होणे शक्य नाही, असा त्यांचा हिशोब होता.

ईस्ट इंडिया-कंपनीसरकारने कलकत्त्यास संस्कृत पाठशाळा काढून येथल्या न्याय-मीमांसा, वेदान्त इत्यादि जुन्याच विद्यांचे अध्यापन करण्याचे ठरविले होते. कारण राज्यकर्त्यांबद्दलचा परकेपणा भारतीयांच्या मनातून बोथट व्हावा, हा त्यांत त्यांचा हेतु होता. त्यावर राममोहन यांनी टीका केली की, 'या पाठशाळेंत हिंदी लोकांना गणित, भौतिक विद्या, रसायन, शारीर व इतर ज्या शास्त्रांना पूर्णत्वास नेल्यामुळे युरोपीय राष्ट्रे जगात अग्रेसर आहेत, ती शास्त्रे शिकवण्यासाठी बुद्धिवान् व विद्वान् युरोपियनांची नेमणूक होऊन लॉर्ड बेकनच्या काळापासून ज्या भौतिक दृष्टिकोनाचा अवलंब युरोपने केला त्याच दृष्टिकोनातून आधुनिक भारताचे जीवन घडविल्याशिवाय भागणार नाही.' भारतीय मान्यतेच्या या पुढाऱ्याचा आग्रह सरकारने मानला आणि भारतीय पंडितांनी अनन्य भक्तीने त्या पाश्चात्त्य विद्यांची उपासना केली.

एकोणिसाव्या शतकातील दुसरे मोठे सुधारक म्हणजे न्यायमूर्ति रानडे होत. मानवी प्रतिष्ठेचे पुनरुज्जीवन हे त्यांच्या सुधारणेचे आद्य सूत्र. भारतीय अधःपाताचे कारण त्याच्यावर आलेली, लादलेली बाह्य व अवजड बंधने होत; स्वयंशासन, आत्मसंयमनामुळे येणारी मानवी प्रतिष्ठा चंद्रगुप्त-हर्षानंतरच्या काळात आलीच नाही, असे त्यांचे ठाम मत होते. ( कलकत्ता १० वी सामाजिक परिषद् ). स्वामी दयानंद सरस्वतींनी पंजाबात जे धार्मिक क्रांतिचे कार्य केले, त्याच्या बुडाशी न्याय-

मूर्तींच्या सारखाच दृष्टिकोन होता. वेदाध्ययनाचा अधिकार मनुष्यमात्राला आहे, चातुर्वर्ण्य हे जन्मसिद्ध नसून ते ' **गुणकर्मविभागशः** ' आहे, वैदिकधर्माचे प्रसाद मनुष्यमात्राला घेण्याचा अधिकार आहे; अशी तत्त्वप्रणाली दयानंदानी व त्यांच्या आर्य-समाजाने रुजविली. मूर्तिपूजा, बालविवाह, स्त्रीदास्य, अस्पृश्यता अशा रूढीवर त्यानी कडकडून हल्ला चढविला. लाला हंसराज, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद या-सारखे थोर अनुयायी मिळाल्यामुळे पंजाबात शीखधर्मस्थापनेच्या वेळेसारखीच धर्म-क्रांतिची बीजे पेरली गेली.

दयानंदांच्या नंतर स्वामी विवेकानंदांच्या धर्मसेवेकडे साहजिकच लक्ष वेधते. ' इंग्रजी राज्याबरोबर भारतात भौतिकवाद आला तो एका दृष्टीने आपल्या उद्धा-रार्थच आला. त्यामुळे जन्मनिष्ठ उच्चनीचता नष्ट होईल. बुद्धिप्रामाण्य निर्माण होऊन धर्मग्रंथाची ठेव सर्वांच्या वापरात येईल. पश्चिम ही धनिकांच्या टाचेखाली चिरडली आहे. आता केवळ अध्यात्माने जगाची प्रगति होणार नाही. अध्यात्म आणि ऐहिकता यांच्या समन्वय–सहकारांची आता आवश्यकताच आहे. ' या विचारधारे-वर विवेकानंदांनी क्रांतिची कास बळकट धरली.

या सर्व भारतभक्तांना अर्थातच सर्वांगीण क्रांति अभिप्रेत होती. ते बोलत होते ते तत्त्वज्ञान म्हणजे प्रान्तोप्रान्तीच्या लहानमोठ्या समाजसुधारकांच्या मनात उद्भवले-ल्या आशा–आकांक्षांचा आविर्भाव होता. ईश्वरचंद्र विद्यासागरापासून–आगरकर–आनंदाचार्लूपर्यंत भारतातील अनेकानेक कार्यकर्त्या विचावंताना आपल्या समाजाचे अवनत स्वरूप पाहून सगळ्या भारतभर ब्राह्मोसमाज, आर्यसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधकसमाज, महाजनसभा, भार्गवसमाज, हिंदु युनियनक्लब काढले आणि त्याच-बरोबर अमृतबझारपत्रिकेपासून आर्यावर्त–इंदुप्रकाशसारखी वृत्तपत्रे काढून नव–विचारानी समाज फुलून जाण्यासाठी लोकशिक्षण केले.

त्या लोकशिक्षणातूनच राष्ट्रनिष्ठा व लोकशाही यांच्या भारतीय कल्पना विकसित झाल्या. लोकमान्य टिळक, देशसेवक गोखले आणि महात्मा गांधी यांना अखिल भारताची संघटना साधून ब्रिटिशसाम्राज्यशक्तिशी प्राणपणाने लढा देण्याचे सामर्थ्य भारतीय ताज्या तरुणांच्या रक्तात निर्माण करता आले. विचारस्वातंत्र्य हा लोक-शाहीचा आत्माच होय. ते स्वातंत्र्य नष्ट करू पाहणारा राष्ट्राचा शत्रु होय. त्या विचारस्वातंत्र्याला कर्मयोगाची जोड देऊन निष्कामतेचे अध्यात्म त्यास जोडावयास गीतारहस्यद्वारा शिकवून अभ्युदय निःश्रेयसाचा प्रीतिसंगम जीवनात उभारण्याचे वळण टिळकानी राष्ट्राला लावले.

लोकमान्यांचेच धुरीणत्व पेलण्याची जबाबदारी महात्मा गांधींनी स्वीकारली. मानवत्वाची प्रतिष्ठा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे स्पंदनसूत्र. एक व्यक्ति आपल्या विवेक-निश्चित सत्यासाठी अखिल विश्वाविरुद्धसुद्धा त्या विश्वासह स्वतःच्या कल्याणासाठी

लढा देऊ शकते, हे महान् तत्त्व गांधीजींनी आपल्या चरित्रचारित्र्यानी प्रस्थापित केले. दुबळ्या झालेल्या व तसेच म्हणविणाऱ्या भारतीयांना व्यक्तित्वाचे नि व्यक्तिमत्वाचे असामान्य सामर्थ्य प्राप्त झाले. महात्माजींच्या सत्याग्रहाचे हे रहस्य इतिहासाला विसरतां येणारे नाही !

सर्व राष्ट्रपुरुषांनी वेद, उपनिषदे, महाभारत, गीता यांचाच आधार घेऊन लोकशिक्षण केले. जुन्यातून वा जुन्यावर नवे उभारण्याने—

**जें जे काही आपणास ठावे । ते हळूहळू शिकवावे ।**
**शहाणे करून सोडावे । सकळ जन ॥**

या धोरणास सुलभ जाते. आगरकरासारख्याना असे आधार घेणे पसंत नव्हते, तरी भारतीय आर्यत्व न सांडताच पाश्चिमात्य सुधारणांचा अंगीकार करावयाचा, असेच त्यांचे मत होते. भारतीय आर्यत्व सांडावयाचे नाही, म्हणजे त्याचा परिचय करून घेणे जरूरच आहे. तो बुद्धिवादाच्या निकषाने घेतला तरी, जुन्याचा आधार घ्यावा म्हणणारे, आणि घेऊ नये, म्हणणारे, एका भूमिकेवरच स्थिर होतात. कारण जुने पुढे चालवावे, म्हणणारेही आग्रहाने—

**यानि अस्माकं सुचरितानि, तान्येव गृहितव्यानि, नो इतराणि ।**

असेच सांगत आले आहेत.

स्वधर्म, स्वपरंपरा, स्वराष्ट्र आणि त्याचे स्वराज्य यांचा सत्त्वशुद्ध अभिमान ही राष्ट्रधर्माची एक खंबीर बाजू असते. आक्रमक, सत्ताधारी, परकीय राज्यकर्त्याबद्दलचा जहरी तिटकारा, ही त्याची दुसरी बाजू असते. आचार्य जावडेकरानी म्हटल्याप्रमाणे 'परकीय सत्तेच्या आक्रमणामुळे दारिद्र्य व बेकारी वाढत आहे याची जाणीव सर्वांना होत होती. ही जाणीव आणि आपल्या परंपरागत संस्कृतीचा अभिमान यांची गाठ पडताच, क्रांतिवादी व जहाल राजकारणाचा जन्म झाला. ही गाठ घालून देण्याचे काम लोकमान्यांनी केले.' ( आधुनिक भारत. )

राष्ट्राचा उत्कर्ष साधावयास समाज संघटित करण्यासाठी व समाजाचे सामर्थ्य प्रवाहीपणे वाढते ठेवण्यासाठी, ध्येयवाद ही अमोघ शक्ति आवश्यक असते. यासाठी, ज्यांच्यापासून धडे घ्यावेत असे आचरण करणाऱ्या आदर्श व्यक्तींची जरूर असते. बुद्धानुयायांच्या ज्ञानप्रसारापासून शेकडो वर्षे समाजमनात दृढपणे खोल रुजून बसलेली निवृत्ति, '**शास्त्रात्प्रवृत्तिः शास्त्रान्निवृत्तिः**' या नावाखाली शास्त्रमर्म न समताच शब्दप्रामाण्यावर पडलेला भर, व्यक्तिची समाजसन्मुख कृतिप्रवणता सुटून मोक्षसाधनेचा हव्यास, दैववाद, कर्मकांडाचे अवडंबर वगैरे अधर्मतत्त्वे अथवा विधर्म–मृगजळे पार नष्ट करून राष्ट्रनिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, ऐहिकता, प्रयत्नपुरुषार्थ, विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्य, समष्टिधर्म–निदान समाजसन्मुखता यांचे संस्कार उमलत्या नि उफाड्या पिढीच्या मनावर सातत्याने होत राहिले पाहिजेत.

*

पण ' **नायं आत्मा प्रवचनेन लभ्यः ।** ' व्याख्यान, प्रवचन, निरूपण, कीर्तन, मार्गदर्शन, शिक्षण यांच्या वाणीमागे करणीची पुण्याई असेल तरच ती वाणी समाजात कार्योत्थापक आणि संघटक ठरणार; एरवी नाही. उन्नतीस चढलेल्या आज–उद्याच्या व आजकालच्या युरोपीयन राष्ट्रांचा इतिहास तरी दुसरा काय बोध देतो ? आदिवासी, अस्पृश्य, उपेक्षित, परित्यक्त, बहिष्कृत, अनाथ, पतित यांच्या उद्धारासाठी निघालेल्या संस्थामधील ' **सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ।** ' पेलणाऱ्या समाजसेवकांच्या वृत्तींचा दृढभाजक काढला, तर भारतीय समाजाचा मोहरा नव्या दिशेने वळल्याचे प्रत्ययास येते; पण शंकराच्या जटेतून बिंदुबिंदुने स्त्रवणाऱ्या या गंगेचा ओघ आणि ओत लागावयास हवा, तसा अजून लागलेला नाही. तो लागावयास भारतसेवक–समाजासारखी अखिलभारतीय एकसूत्री संस्था तरी अस्तित्वात येऊन जागरूकतेने कार्यक्षम ठरली पाहिजे किंवा सेवाभावी सर्व संस्थांचे सुसूत्र असे सहकारी, सहजीवी आणि समर्थ संघजीवन निर्माण केले पाहिजे. निष्ठावंत, ध्येयवादी, निस्पृह व दमदार तरुणांनी मनावर घेतले आणि त्यांच्यापैकी शेकड्यांनी ते व्रत घेतले तर भारताचे सांस्कृतिक, सांसारिक आणि सामर्थ्यशाली संघटन अशक्य नाहीच नाही ! स्वामी विवेकानंदांची स्पष्ट सांगीच नाही काय ?–की ' एक हजार तरुण संन्याशी मिळाले तर भारतात क्रांति खास होईल. '

अशी किमया भारतात पूर्वी झालेली आहे. रामायणकाळी भारतात उत्तरेकडून दक्षिणेकडे भारद्वाज, अत्रि, अगस्त्यादिकांनी येऊन संघटना उभारल्या होत्या आणि दक्षिणेतील जनता आर्यसंस्कृति वा वैदिकधर्म यांच्या पावनतीर्थावर आणली होती. बुद्धाच्या आणि शालिवाहनाच्या काळातही तशीच सेवासंघटनांची कार्ये झालेली आहेत. या व अशा इतिहासाचा हात पाठीवर घेऊन नवा इतिहास घडविण्याचे मनावर घेतल्यास नव्या काळातही ते अशक्य नाही. मिसर देशातील ' असिरीस व आयोसीस, ' ग्रीसमधील ' बेसक व बेयसस, ' स्कॉट्लंडमधील ग्लास्गो शहरातील ' सुवर्णविशिष्ठ, ' ऑस्ट्रिया–हंगेरीतील ' तंत्रीस्वक, ' असिरिया देशातील बिर्ल शहरातील तीनशे घन हाताचे ' महालिंग, ' अरबस्थानातील मक्केश्वर ऊर्फ ' सगे असबद, ' इराणातील ' ज्वालामय, ' पेरूदेशातील ' पार्थिवेश्वर, ' अमेरिकेच्या पेंब्रुको शहरातील ' द्विमुख ' व टेन्स शहरातील ' घन ' अशी जगाच्या सर्व भागातील शिवलिंगे नजरेस आली, म्हणजे ' **कृण्वन्तो विश्वमार्यम् ।** ' च्या नव्या प्रयत्नास आत्मविश्वास का निर्माण होऊ नये ?

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या सर्वांचा हिंदी, गुजराती, मराठी, सिंधी, इंग्रजी भाषात संपूर्ण अनुवाद करण्याचा हिय्या पंडितजींनी धरला, तो वर उल्लेखलेल्या जिद्दीनेच. वेदांच्या शुद्धतम संहिता, मंत्र, त्यांचे अनुवाद, त्यांचे रहस्यार्थ, प्रत्येक सूक्ताचे त्याच्या गूढार्थबोधक स्पष्टीकरण, वैदिक सुभाषितांची विषयवार विल्हे लावून त्यांचे अर्थ संस्कृत न जाणणारासही कळावेत इतक्या सोप्या भाषेत देण्याचा

पंडितजींचा प्रयत्न, भगीरथाने पृथ्वीवर गंगावतरण साधले, त्यासारखाच सर्व जगात पहिल्या प्रतीचा आहे. ऋग्वेदाचे वीस, यजुर्वेद–सामवेदांचे चार आणि अथर्ववेदाचे सहा असे तीस ग्रंथ ( प्रत्येकी पाचशे पाचशे पृष्ठांचे ) स्वस्तात स्वस्त देण्याची पंडितजींची ईर्षा निखालस बिनतोड आहे.

या कार्यास त्यांनी लेखणीपूर्वी वाणीने सुरवातले होते. पंडितजींचे वेदभाष्य या स्वरूपात वैदिक व्याख्यानांचे चार संग्रह प्रसिद्ध झाले असून सर्व उपनिषदे सटीक प्रसिद्ध झाली आहेत. तुर्कस्थानात व्याघ्रचर्मधारी गणपतिमूर्ति, तिबेटात द्विभुज गणपति, जपानात सहा हाताच्या व दोन किंवा तीन तोंडाचे ‘ कांगोटन ’ या नावे असलेले गणपति, चीनमध्ये आढळणाऱ्या भारतसदृश गणपतीमूर्ति, इंडोचायनातील चार–चार, पाच–पाच तोंडाच्या व पायांच्या गणेशदेवता, मलाया–सिंगापूर येथील गणपतींची ध्याने, असा प्रत्यक्षानुभव घेतला व ‘ केल्याने देशाटन ’ आढळणारा इतिहास पाहिला, तर पूर्वेतिहासाची पुनरावृत्ति अवघड का वाटावी ? पाच हजारवर्षापूर्वीपासून दीनावस्थेला पोचता पोचता गेल्या हजारवर्षात घरंगळत घरंगळत हिंदुस्थान परवशतेच्या पराकोटीला पोहोचला ! त्याला आर्यांच्या व्यष्टि आणि समष्टि अशा दोन्ही नात्यानी बलवान्, शीलवान् आणि संघटित करणे हाच एक उपाय आहे आणि तो वैदिक संस्कृतिइतका सोपा दुसरीकडे नाही. संघटित आणि शक्तिसंपन्न समाजाने असंघटित आणि कमजोर समाजावर अनाचार, अत्याचार वा आक्रमण करणे पाप असून मुळात कमजोर वा कातर बनणे हेही पातकच आहे. यापैकी भारतीय समाजाकडून कोणतेही पातक होऊ नये, म्हणूनच वैदिक संस्कृति समाजाच्या व व्यक्तिच्या रोमरोमात मुरवण्याची आवश्यकता निर्माण झाली. वैदिक संस्कृतिचे ओढे व्यापक आणि स्वतःसिद्ध आहेत. त्याप्रमाणे आचरण करणे हा ते अंगी मुरविण्यास परिणामकारक उपाय आहे. कारण आचरणानेच ते सर्वसामान्य जनतेसमोर राहणारे आहेत. तथापि आचार हा विचारोच्चारासारखा झाला पाहिजे किंवा आधी केले, मग सांगितले ’ पाहिजे. तरीही वैदिक संस्कृतिचा विचारोच्चार व आचार व्हावयास तिची आंतर्बाह्य ओळख झाली पाहिजे. पंडितजी सातवळेकरांनी वेदांचे व वेदविद्येचे विवरण शब्दाशब्दांच्या बारकाव्याने स्पष्टीकरण करून केले. याचे कारण वैदिक संस्कृतीचे मर्म लोकांचे लोकानी ओळखावे नि आत्मसात् करावे. पंडितजींनी हे काम इतक्या हळुवारपणे केले आहे की—

**जे जे काही आपणासि ठावे । ते ते हळूहळू शिकवावे ।**
**शहाणे करून सोडावे । सकल जन ॥**

ही समर्थ ओवी पंडितजींसारख्याच वेदोनारायणाच्या उदाहरणावरून लिहिली गेली आहे की काय, असेही वाटावयास लागते. त्यामुळे खरोखर ज्या काळात भारताकडे एका मृतसंस्कृतीचे अवशेष म्हणून पाहण्याची व एकाद्या निर्जीव नि अचेतन वस्तूप्रमाणे त्यातील शब्दांचे पृथक्करण करण्याची वृत्ति बळावलेली होती,

त्या काळात वेदांच्या अभ्यासाची ' ऋषिमुनींची दिशा ' कोणती होती हे निर्भीडपणे, अधिकाराने आणि सयुक्तिकपणे प्रतिपादन करणारे पंडित सातवळेकर हे आधुनिक काळातील वेदाचार्यच म्हटले पाहिजेत.

अमेरिकेचा तत्त्वदर्शी डेव्हिड याने वैदिक संस्कृतिला, भूमंडळावरील सर्व सामाजिक, धार्मिक, त्याचप्रमाणे राजनैतिक धूळधाण भस्मसात् करण्याचे सामर्थ्य असणारा ' अग्नि ' अशी उपमा दिली आहे. तो प्रज्ज्वलित करून पंडितजींनी आपला ज्ञानयज्ञ आरंभिला. कारण त्याना वेदकालीन समाजव्यवस्थेची तत्त्वप्रणाली नव्या काळाला उचितपणे व्यवहारशुद्ध व्हावी असेच वाटत असते.

वेदकाली समाजव्यवस्था निसर्गनिर्मित न्यायाच्या पायावर उभारली होती. समाजाच्या हक्कांची व आचारविचारांची उभारणी व्यक्तिगत स्वतंत्र विचारसरणीच्या दृढबाजकाशी मूळ धरून होती. समाज हा एक विराट् पुरुष म्हणून धरून—

' यत्पुरुषं व्यदधुः कतिधाव्य कल्पयन् ।
मुखं किमस्यासीत् किं बाहुः किमरुपादा उच्येते ॥

असे प्रश्न उत्पन्न झाल्याबरोबर त्यांची उत्तरे ठरली ती अशी की— या विराट् पुरुषाचे मुखापासून ब्राह्मण झाला. म्हणजे ज्ञानादि श्रेष्ठ गुणानी जो नेहमी सुशोभित असतो व अध्ययन–अध्यापनादि पवित्र व्यवसायात आपले आयुष्य जो निर्लोभवृत्तीने खर्च करतो, तो ब्राह्मण. शौर्य आणि पराक्रम हा ज्यांचा विशेष ते क्षत्रिय होत. समाजरूपी विराट्पुरुषाचे ते बाहु. शेतकी आणि व्यापार करतात ते वैश्य; आणि या सर्व व्यवसायात व या व्यवसायाबाहेरही जे केवळ घाम गाळतात, ते शूद्र. या सर्वांच्या सहकाराने, समन्वयाने आणि सहजीवनाने समाज चालत असतो. या व्यवस्थेला वेदात वर्णव्यवस्था म्हटले आहे. वर्ण या शब्दाची फोड निरुक्तातील अध्याय दुसरा–खंड तीनमध्ये केली आहे. ज्याची त्याच्या पात्रतेप्रमाणे निवड करून ( वृ = 'निवड करणे' वरून ) त्यास समाजसन्मुख कामास लावावयाचे, हे वर्णव्यवस्थेचे बीज असून ज्याची त्याची योग्यता *गुणकर्म–विभागशः ठरवावयाची* असते. जन्मावर माणसाचा सामाजिक दर्जा ठरविणे वैदिककाळी मानीतच नसत. यजुर्वेदातही असाच अभिप्राय आहे.

देशातील तरुणाना धर्माचे व राजकारणाचे शिक्षण देण्यात ज्याला जास्त भूषण वाटते, समाजाचे नेतृत्व जो डोळ्यात तेल घालून पेलतो व आपण नेहमीच कर्मफलत्यागाच्या वृत्तीने राहून वेळप्रसंगी शास्त्यांच्या डोळ्यातसुद्धा क्षणक्षणीत अंजन घालण्यास मागे पहात नाही तोच ब्राह्मण; राष्ट्रीय सत्तासिंहासनाचे स्वास्थ्य अढळ राखणे आणि अंतर्गत बेबंदशाहीला वाव करूच न देता, बाहेरील हितशत्रूना पायबंद घालणे हेच जो आपले इतिकर्तव्य ( गतिमान् जीवनात केल्यावाचून राहणे शक्यच नाही असे कार्य ) मानतो, तो क्षत्रिय; राष्ट्राची आर्थिक बळकटी बिघडू तर द्यावयाची नाहीच, तर उलट प्रगतिपथावर ठेवावयाची हे जीवितसाधना म्हणून

पाहणारा तो वैश्य; आणि त्या त्रैवर्णिकांच्या कार्यात आणि अन्य क्षेत्रातही काया-वाचामनाने झटून सहकार्य करणारा आणि केवळ श्रमोत्पादनाची उभारणी करणारा तो शूद्र. या समाजव्यवस्थेने आर्यावर्त ऊर्फ हिंदुस्थान वैभवाच्या शिखरावर होता आणि नैतिक प्रतिष्ठेने, अलोट ज्ञानाने व आचारबुद्धीने जगद्वंद्य झाला होता.

माणसामाणसांची स्वाभाविक प्रतिष्ठा त्यांच्या त्यांच्या अंगी असणाऱ्या कर्तबगारीवर आणि आचार–विचारार न ठरता, ती जन्माची मिरास आहे, असे रहाटगाडगे ज्या दिवसापासून अरेरावीनी सुरू केले, त्या दिवसापासून दैववाद बोकाळला आणि स्वाभिमानी कर्तृत्व भीष्माप्रमाणे शरपंजरी पडले ! चिकित्सक बुद्धीच्या निकषावर बावनकशी उतरेल ती प्रत्ययप्रामाण्यबुद्धि पहावयास मिळेनाशी झाली व वेद फक्त पोथींत व थोडा फार तोंडात राहिला !! अशा तऱ्हेने भारतीय समाज कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही, अशा वावटळीत सापडल्यावर पूर्वी संतमहंतानी व गुरु–गोविंदसिंग आणि छत्रपति शिवाजीमहाराज प्रभृतींनी केलेल्या प्रयत्नांची पुनरावृत्ति व्हावयास वैदिकसंस्कृतीच्या ज्ञानप्रसाराचा व्यापकपणे अवलंब केल्याशिवाय गत्यंतर नाही, असे भारतीय विचारवंताच्या डोक्यात भिनले. हे कार्यवाहीत आणण्यासाठी ज्यानी आपली जीविते समर्पणबुद्धीने दिली, त्यात पंडितजी सातवळेकरांचे स्थान कृतिभव्यतेने तेजस्वीच तेजस्वी आहे.

वेद हे जगातील, विशेषतः भारतीयांचे प्राचीनतम वाङ्मय आहे. वैदिक वाङ्मयात संहिता, ब्राह्मणे व आरण्यके हे तीन भाग येतात. भारताच्या व बऱ्याच युरोपीयनांच्या पूर्वजांच्या प्राचीनतम स्थितिबोधक वाङ्मयात वेदाना अग्रस्थान आहे. वेद हे मोठें थोरले ग्रंथभांडार असून ते तयार होण्यास कित्येक शतके लागली असे कित्येक संशोधकांचे मत आहे. वेदांच्या ' संहिता ' या भागात स्तोत्रे, प्रार्थना, मंत्र-प्रयोग, आशीर्वादात्मक सूक्ते, यज्ञविधीसंबंधांचे मंत्र, अरिष्टशान्त्यर्थ प्रभु–आळवणी; ' ब्राह्मणे ' या भागात देवादिकांच्या कथा, यज्ञासंबंधी विचार, निरनिराळ्या क्रतुतील क्रियांचे आध्यात्मिक व आधिभौतिक महत्त्व; ' आरण्यके ' या भागात, परमेश्वर, जग व मनुष्य यासंबंधीचे तत्त्वज्ञान आहे. वेदांच्या शेवटच्या भागाला ( वेदान्ताला ) उपनिषदे म्हणतात. पुढे स्मृतिकाळी—

पितृदेव–मनुष्याणां वेदचक्षुः सनातनम् । ( मनुस्मृति १२।९४ )

एवढे महत्त्व वेदाना होते. हिंदुस्थानात निघालेल्या तत्त्वज्ञानाच्या सर्व संप्रदायात वेदांचे प्रामाण्य मानले आहे.

वेदप्रामाण्यवादी लोकानी अंधश्रद्धेने बुद्धि मंद होऊ न देता वेदाविषयी आपले विचारस्वातंत्र्य कायम ठेवले आहे. वेदविद्येचे परा व अपरा असे दोन विभाग असून परा या भागास अधिक महत्त्व दिले जाते. मूळ एक असलेल्या वेदाचे वेदव्यासाने ( वेदांच्या आरपार जाऊ शकणाऱ्या सूक्ष्मबुद्धिमत्तेच्या ऋषीने ) चार भाग केले व

ते अनुक्रमे पैल, वैशंपायन, जैमिनी व सुमंतु या चार शिष्याना पढविले.

वेदांचे ऐतिहासिक व समाजशास्त्रीय महत्त्व सर्व जगातील अभ्यासकाना पटलेले आहे. वेदकालाबद्दल विद्वानात अतिशय मतभेद आहेत. मॅक्समुल्लरने ऋग्वेदाचा काल ख्रिस्तपूर्व बाराशे वर्षे, श्रॉडरने ख्रिस्तपूर्व दोन हजार वर्षे, याकोबीने ख्रिस्तपूर्व पंचेचाळीसशे वर्षे वेदांचा काळ ठरविला आहे. लोकमान्य टिळकांच्या मते वेदांचा काळ ख्रिस्तपूर्व सहा हजार वर्षांचा आहे. संशोधकात असे थोडेफार मतभेद असले तरी भारताच्या उत्थानासाठी वेदानुवाद मुद्रित होण्याची आवश्यकता पंडितजींना पटली. कारण ' वेदासंबंधी थोडी माहिती ' देताना त्यानी आपला अनुभव नमूद केला आहे की– ' आम्ही हिमालयाच्या प्रवासात प्रत्यक्ष पाहिले आहे की अर्ध्याअधिक हिमालयातील हिंदूंची धर्मकृत्ये आज (विसाव्या शतकाच्या ऐन भरात) सुद्धा तिबेटातील लामा येऊन करीत असतात. ' कारण वेदाचे मर्म समाजाच्या वरच्या थरातच जर समजून घेतलेले नसते, तर बाकीचे काय बोलावयाचे ?

स्वत: पंडितजींनीच आपला अनुभव दिला आहे की—

' सागराच्या खोलीचे ज्ञान केवळ मंदराचलाला होऊ शकते; त्याप्रमाणे जो साधक वा अभ्यासक आपली तपस्या नि प्रज्ञाबळ या दुहेरी साधनानी वेदसागराच्या तळाशी जाण्याचा प्रयत्न करतो त्यालाच सागर आपल्या गर्भातील रत्नांचा प्रसाद देतो. पुरीच्या धर्मपीठाचे एक थोर आचार्य पूज्यपाद भारती कृष्णतीर्थजी महाराज हे यासंबंधीचे अगदी अलिकडचे उदाहरण. वडिलानी मृत्यूच्या वेळी दिलेल्या गूढ चोपडयाचा अर्थ लावण्यासाठी सहा वर्षे तपस्या करून ह्या महापुरुषाने गणिताची सोळा संस्कृतसूत्रे शोधून काढली. त्यांचे असे सार्थ आव्हान होते की, केवळ या सोळा सूत्रांचे नीट मर्म समजलेल्या कोणत्याही सामान्य व्यक्तीस गणित शास्त्रातील कोणतेही उदाहरण अद्ययावत् पाश्चात्य पद्धतीपेक्षा कमी वेळात सुलभरीत्या सोडविता येऊ शकेल. या वैदिक गणिताचे प्रयोग अमेरिकेतील निरनिराळ्या विश्वविद्यालयात करून आचार्यांनी सर्वांना स्तिमित केले. असा हा वेद म्हणजे गूढ विद्यांचा रत्नाकर आहे. '

आणि असे असूनही—

**चातुर्वर्ण्यं त्रयो लोकाश्चत्वारश्चाश्रमाः पृथक् ।**
**भूतंभव्यं भविष्यश्च सर्वं वेदात्प्रसिद्धति ।। १ ।।**
**सेनापत्यं च राज्यं च दण्डनेतृत्वमेव च ।**
**सर्वलोकाधिपत्यं च वेदशास्त्रविदर्हति ।। २ ।।**

( मनुस्मृति अ. १२ श्लोक ९७ व १०० )

असे जर आहे तर ' **कृण्वन्तो विश्वमार्यम्** । ' हे सिद्ध व्हावयास जनतेला वेद समजले तर पाहिजेत ! वेदाभ्यासाचे प्रयत्न जर्मनीत आणि अमेरिकेत होत राहिले. जर्मनीत वेदांचा फार मोठा कोश तयार झाला व अमेरिकेच्या हार्वर्ड विद्यापीठात

वेदांची चरणसूचि तयार झाली. भट्ट मोक्षमुल्लर ऊर्फ मॅक्समुल्लर या एका अँग्लो-जर्मन भाषाशास्त्रज्ञाने ( १८२३ ते १९०० ) वेदांच्या बाबतीत एवढे काम करून ठेवले की स्वामी विवेकानंदासारख्यानी आपल्या दौऱ्यात त्याची मोठ्या आदराने भेट घेतली. भाषा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींच्या तुलनात्मक अभ्यासात तरबेज असलेल्या मॅक्समुल्लरला १८९२ साली ओरिएंटल काँग्रेसचे अध्यक्षस्थान मिळाले होते. चिप्स् फ्रॉम् ए जर्मन वर्कशॉप्, या त्याच्या ग्रंथाचे तीन खंड असून त्यात ऋग्वेद, झेंदावेस्ता, बौद्धधर्म, तुलनात्मक देवताशास्त्र, प्राचीन वाङ्मय, चरित्रे इत्यादिसंबंधी विवेचन आहे. ओल्ड लँगसाइन् या त्याच्या पुस्तकात हिंदी व युरोपियन पंडितांची व त्यातही विशेषेकरून टागोर, केशवचंद्र सेन, दयानंद सरस्वती, रामकृष्ण परमहंस, बेहरामजी मलबारी, पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी वगैरेंची चरित्रे आहेत. ' इंडिया, व्हॉट् कॅन् इट् टीच ? ' फिजिकल रिलिजन, षड्दर्शने, दि सेक्रेड बुक्स ऑफ् दि ईस्ट या मॅक्समुल्लरच्या पुस्तकावरून हिंदुस्थान व त्याची प्राचीन संस्कृति याबद्दल मॅक्समुल्लरला नितांत आदर होता हे सुस्पष्ट होते.

एक परकीय पाश्चिमात्य वेदाबद्दल आदर बाळगून त्याच्या संहिता आपल्या मते जास्तीत जास्त शुद्धतम छापून जगाला देतो, तर त्याच्याहीपेक्षा नितांत भक्तीने मॅक्समुल्लरचाही उरलासुरला उणेपणा दूर करून, वेदांचा वारसा सांगणाऱ्या भारतीयाने जगाला वेद आणि वेदानुवाद कर्तव्यबुद्धीने पुरवावयास नकोत काय ? या विचाराने पंडितजींना घेरले आणि मग पंडितजींनी त्याचा ध्यासच घेतला.

**तदेतत्सत्यं मंत्रेषु कर्माणि कवयो यानि पश्यंस्तानि त्रेतायां बहुधा संतानि ।**
**तान्याचरथ नियतं सत्यकामा एष वः पंथाः सुकृतस्य लोके ॥**

मुंडकोपनिषद् ( १-२-१ ).

प्राचीनकाळापासून हे मान्य आहे की जो मनुष्य वेदांची पर्वा न करता अन्यत्र रमतो, तो भारतीय संस्कृतीपासून दुरावलेला असतो. वेदाध्ययन हा तर महत्त्वाचा कर्तव्याचा भाग म्हणून भारतीय परंपरेने कित्येक शतके मानला. पण त्या अध्ययनाचा उपयोग लोकसेवेस करून सर्वसाधारणाना प्रेरणेचा जिव्हाळा निर्माण करण्यात त्या वेदाध्ययनाचे अधिक महत्त्व आहे. वेद जीवनज्ञानसंपन्न आहेत, पण कृपण आहेत. निदान कालांतराने ते तसे झाले म्हणून भगवान् श्रीकृष्णांनी भगवद्गीतेच्या रूपाने त्यांचे सार अर्जुनाला व परिणामतः जगास सांगून त्यांना उदारपण दिले आणि ब्राह्मण-क्षत्रियांच्याप्रमाणेच ' **स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम् ।** ' असा भरंवसा दिला. उदारता धारण केलेले हे भगवद्गीतारूपाने राहणारे वेद तरीही संस्कृतभाषेच्या मंजुषेत राहिल्याकारणाने, प्रचारातील संस्कृतभाषा जाऊन लोकव्यवहारात आलेल्या प्राकृत भाषात त्यांचा आविष्कार करणे जरूर होते. ते कार्य ज्ञानेश्वरादि संतमंडळींनी केलें. तरीही गीतेला निमित्त करून समाजाला जीवनज्ञानसंपन्न करताना पोटात होते ते सर्व ओठानी व लेखणीनी ज्ञानेश्वरादिकाना मांडता

न आल्याकारणाने त्याची पूर्तता करून सोडण्याची जबाबदारी, भागवताच्या एकादश स्कंधावरील भाष्यनिर्मितीने एकनाथानी केले तसे आविष्कार संतानी करून पार पाडली. तशा आविष्कारांची हजारो पारायणें ( भंडाऱ्याच्या डोंगरावर तुकारामानी केली तशी ) करून, नव्या संतमंडळीनी ' आत्मानुभवाच्या वाटा चोखाळताना व चोखाळविताना ' लब्धप्रतिष्टांस सांगितले की—

**वेदान्तीचा अर्थ आम्हासीच ठावा । इतरानी वहावा भार माथा ॥**

म्हणूनच संतानी अभंगादि स्वतंत्र रचना केली. तुकारामांच्या अशा या प्रकृतिप्रवृत्तीचा उत्कट आविष्कार—

**वेदान्तसंमतीचा काव्यसिंधु भरला । श्रुतिशास्त्र–ग्रंथगीता साक्षसंगम केला ।**

असा अभ्युदयनिःश्रेयसाचा झेंडा उभारणारा दासबोधासारखा ग्रंथ समाजाला समर्पून समर्थ रामदासानी केला. उत्तरेत गुरुगोविंदसिंगादिकानीही तसेच संसृति–कृतिचे आविष्कार केले. याच वेळी युरोपीय व्यापारी कंपन्यांच्या निमित्ताने येथे हिंदुस्थानात पाश्चात्य संस्कृति आपली किरणे फेकू लागली होती. इंग्रजी राजवटीबरोबर त्या पाश्चात्य संस्कृतीने आपले पाय रोवून आपल्या जाळचात भारतीय समाजास ओढण्याचा प्रयत्न आरंभला. ' **प्रज्ञाहतास्तु रिपवः सुहता भवन्ति ।** ' हे आक्रमकांचे तत्त्वज्ञान पाश्चात्य अमलात आणीत आहेत याचे प्रबोधन विचारवंताना झाले. संग्राहक, समावेशक आणि समन्वयी अशा आपल्या वैदिक संस्कृतीचे आमूलाग्र पुनरुज्जीवन करून पाश्चात्य संस्कृति भारताच्या पचनी पडावी म्हणून ब्राह्मो, प्रार्थना, आर्य या नावानी समाजांची स्थापना झाली. त्यात आर्यसमाजाच्या कार्याने सर्वात मोठा उठाव घेतला. वेदार्थयत्न एवढचा तेजस्वीपणाने केले गेले की त्यानी जगाचे लक्ष वेधले. वेदरसायन सेवन करण्यास पाश्चात्त्य संस्कृतीच्या दिमाखाने भुललेल्या प्रज्ञादेखील तयार झाल्या. पंडितजी सातवळेकरांनीं स्वामी दयानंदाप्रमाणेच त्याना वैदिक संस्कृतीचा ओजस्वी आविष्कार सादर करून त्यांची सेवा साधली.

वेदांचे आस्थापूर्वक अध्ययन करणारा आंग्ल पंडित विल्यम् जोन्स म्हणतो की– ' वेदांचे प्राचीनत्व सापेक्षतेने वर्णन करण्यापलिकडचे आहे.' लुइस ज्याकोलियट् हा गाढा फ्रेंच धर्मवेत्ता ' हिंदुस्थानातील बायबल ' या ग्रंथात सांगतो की– ' जगातील जुन्यात जुन्या लिखाणात अग्रपूजेचा मान वेदांचा आहे. हा वेदांचा आर्यावर्तात परमेश्वरासमान मान इतक्या प्राचीन काळापासून होत आला आहे की, त्यावेळी प्रशिया, आशियामानर, इजिप्त व युरोप येथे माणसांची वसतिसुद्धा झाली नव्हती !... या ( हिंदुस्थान ) मायभूनेच सर्व सुधारणांची न्हाणीधुणी केली, रुसणीफुगणी काढली आणि पाळण्यात घालून प्रेमळ अंगाईगीते गायली. आपली लाडकी लेकरे जगत्कल्याणार्थ पश्चिमेकडे अतिदूर दूर धाडण्यास तिने मागेपुढे पाहिले नाही. सहस्रमुखाने सागरास मिळणाऱ्या गंगेचे उगमस्थान, भूभागाचा मानदंड म्हणून शोभणारा हिमालय, यांच्याप्रमाणेच या जगात वावरणाऱ्या जनगंगेचे

उगमस्थान व मानदंड भारतवर्षच आहे. भाषा, न्यायनिबंध, नीतिशास्त्र व धर्मशास्त्र या सर्वांचे दान आर्यावर्ताच्या वेदाचार्यांनी सर्व जगास आनंदाने केले आहे. आर्यांच्या उज्ज्वल संस्कृतीने इराण, अरबस्थान व इजिप्त हे देश काबीज केले होते; उत्तरेकडच्या दूर दूरच्या हिमाच्छादित व मेघाच्छादित प्रदेशात ती संस्कृति आनंदाने नांदली व तिने दुसऱ्याही संस्कृतीस नांदवून घेतले..... घडामोडींच्या सर्व दिव्यातून पार पडून आपली अस्सल वारसदारी कायम ठेवणारी तिची काही अवशिष्टे दिमाखाने झळकत आहेतच.... जुनींपुराणी समजली जाणारी ग्रीस, रोम व इजिप्त ही राष्ट्रे ! पण त्यांनीसुद्धा खरोखर वेद-ब्राह्मणांची समाजव्यवस्था अंगिकारिली होती, त्यांचीच कार्यकारणपरंपरा स्वीकारली होती व त्यांचीच धर्ममते पसंत करून आचारात आणली होती.'

अशा या जगावर छाप व थाप ठेवणाऱ्या वेदांनी पंडितजी सातवळेकरांच्या मनाची ओढ घेतली बिजनौरच्या कैदखान्यात ! तेथे ऋग्वेदाची पोथी अभ्यासल्यावर सातवळेकरांना आढळ झाला की जे जे काही जीवनोपयोगी आहे, त्या त्या संबंधीच्या उत्तमोत्तम गोष्टी त्या ऋग्वेदात सांगितल्या आहेत. त्या पाहून वेदांचा छंदच सातवळेकरांना लागला. शतपथब्राह्मण ( ११।५।७।१ ) मध्ये सांगितल्याप्रमाणे स्वाध्यायप्रशंसा त्यांना पटली. स्वाध्यायाने—

**युक्तमना भवति । अपराधिनो अहरहर अर्थान् साधयते । सुखं स्वपिति । परमचिकित्सक आत्मनो भवति । इंद्रियसंयमश्च एकारामता च । प्रज्ञावृद्धिर्यशो लोकपक्तिः । प्रज्ञा वर्धमाना चतुरो धर्मान् ब्राह्मणमभिनिष्पादयति । ब्राह्मण्यं, प्रतिरूपचर्यां, यशो, लोकपक्तिम् । लोकः पच्यमानः चतुर्भिः धर्मैः ब्राह्मणं भुनक्ति, अर्चया च दानेन च आज्येयता च अवध्यतया च ।**

हे परिणाम होतात.

पण वेद आणि वेदविद्या हिंदुस्थानात सुलभ राहिली होती कोठे ? ठराविकाबाहेर ते वेद उच्चारावयाचे नाहीत, दिसावयाचे नाहीत, दाखवावयाचे नाहीत, असा जो अट्टाहास इसवी सनाच्या दहाव्या शतकापासून सुरू झाला होता, त्याच्याविरुद्ध बंड उभारून संत मंडळींनी वेद नसले तरी वेदांचा अर्थ प्राकृतभाषेत खालच्या थरापर्यंत समाजात पोहोचविला. तरीसुद्धा राजकीय पारतंत्र्याच्या लाटावर लाटा उसळून ब्रिटिश तागडीवाल्यांनी तलवार आणि तख्त बळकावल्याचे सिद्ध होऊन गेले ! पण शहाणपणाचा मक्ता घेतलेल्या वेदरक्षकांनी आपली चित्तकंजुषी सोडली नाही ! परिणाम असा की जर्मनादि विद्वानांनी वेद अक्षरशः छापून पानादोन-पानांच्या अंग्रेजी प्रस्तावनांनी वेदविद्येची गंगा लोकसमाजात आणून सोडली आणि गयावळ वा पंडे यांच्यापेक्षाही प्रतिष्ठेने स्वतःच्या तुंबड्या भरल्या ! तरीसुद्धा जनसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठीच पंडितजी सातवळेकरांनी ' स्वाध्यायमंडळा ' ची प्रस्थापना केली आणि पहिल्या दहा वर्षांत चारी वेदांच्या संहिता पाच पाच रुपयां-

च्या मोबदल्यात लोकाहाती दिल्या. भारतात व इतरत्र ही एक आश्चर्यकारक घटना मानली गेली आणि तिचे स्वागतच स्वागत झाले. वेदांच्या शुद्धतम संहिता देताना पंडितजींनी पदे, स्वर इत्यादिंच्याबाबत कुरुंदवाडचे सुप्रसिद्ध येडूरकरशास्त्री यांच्यासारख्या घनपाठीचे चातुर्मास्य सहकार्य स्वीकारले आणि भारतीयाने वेदाची पूजा यथार्थदीपिकेने कशी करावी याचे उदाहरण घालून दिले.

महाराष्ट्रात वेदार्थाचे प्रयत्न मिरजेचे विष्णुशास्त्री देवधर यानी प्रथम केले. त्यानंतर श्रुतिबोधकार अच्युत बळवंत कोल्हटकर, अप्पासाहेब तुळजापूरकर ( माझे रामायणकर्ते ), महर्षि अण्णासाहेब पटवर्धनांचे चिरंजीव व धुंडिराज दीक्षित बापट ( सोमयाजी ) यानी केले. आहिताग्नि शंकर रामचंद्र राजवाडे पुणे व मीमांसाविद्यालयाचे कल्पक किंजवडेकरशास्त्री यांच्या वेदार्थप्रयत्नांची पुण्याई महाराष्ट्राजवळ आहे. डोंबिवलीचे धर्ममणि बालस्वामी आणि पुण्याचे वैदिक-संशोधन-मंडळ यांची कामगिरी शिकस्तीने चाललेली महाराष्ट्राच्या संग्रही आहे. पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्या प्रयत्नांची खुलावट सर्वापेक्षा निराळ्या स्वरूपाची असून चारही वेदांचे संशोधन, संगतिकरण, सम्यक् प्रकाशन आधी साधावे, म्हणजे आंग्लविद्याविभूषितापैकी काहीनी व परप्रत्ययवाद्यानी वेदास धनगरी काव्ये, ग्रामगीते, भारुडे म्हणून बालिशपणे जे संबोधिले आहे, त्यास चोख उत्तर मिळेल आणि नानासाहेब पावगी म्हणत तसे ' वेदात आगगाडीची कल्पना आढळते ' हे अक्षरशः खरे नसले तरी वेदकालात विमाने होती, ' लढाईच्या प्रसंगी ' अनश्वरथाः ' तत्कालीन योद्धे वापरीत ' वगैरे गोष्टी विचारवंतांला पटवता येतील, त्या सप्रमाण पटवता येतील, असा पंडितजींचा रोख आहे. मूळ संहितामधून अग्नि, इन्द्र, द्यौः, उषा, पृथ्वी, सोम, वरुण वगैरे वैदिकदेवतांचे मंत्र एकत्र करून ' दैवत-संहिता ' नावाचे तीन खंड ही त्यांनी प्रकाशित केले आहेत. वेद हे पतित, पराभूत व निर्माल्यवत् झालेल्या भारतीय समाजात आत्मविश्वास, विजगीषा, महत्त्वाकांक्षा, सामर्थ्य, पराक्रम, वैभवपूर्ण सात्त्विक जीवन निर्माण करणारे असाधारण ग्रंथ असल्याने त्यांचे अध्ययन, मनन व तदनुसार आचरण झाले तर जीर्णारण्याप्रमाणे झालेल्या भारतीय समाज-जीवनाचे आनंदवन फुलल्यावाचून राहणार नाही, अशी पंडितजींची दृढ धारणा आहे व त्या दृष्टीनेच त्यांनी आपल्या सूक्ष्मदर्शी राष्ट्रनिष्ठेने वेदाचे आलोचन केले आहे.

' वेद, रामायण व महाभारत या ग्रंथांतील ऊर्जस्वल आशीर्वाद जोपर्यंत हिंदुसमाजाच्या रोमरोमात भिनून जात नाही, तोपर्यंत या ( भारत ) राष्ट्राचे शाश्वत कल्याण होणे सुतराम् अशक्य आहे.' असा पंडितजींचा ठाम सिद्धांत आहे. अनेक वैदिक पंडित सायणाचार्यादि प्राचीनानी जो काही अर्थ सांगून ठेवला तो जशाचा तसा जाणून घेणे एवढीच इतिकर्तव्यता मानीत. राष्ट्रीय आणि सामाजिक जीवनाशी वेदांचा काही संबंध, सूचक मार्गदर्शन करण्यापुरता तरी आहे का, असा

विचारही त्याना सुचत नसे. ' **प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु** ' मानणाऱ्या समाजाने वेदातील उत्कट, भव्य तितुके घेऊन चालवावे, असे मनातही न आणता, ' **सर्वं दुःखम् , सर्वं क्षणिकम्** । ' सांगणाऱ्या बौद्धसांप्रदायाची छाप त्या वैदिकावर आणि संतावरही इतकी का पडावी याचा आणि त्यायोगे प्रकट होणाऱ्या मनोदौर्बल्याचा पंडितजींना उद्वेगपूर्वक आर्चबाच वाटत आला आहे ! इंद्रियाइंद्रियागणिक देवतांचें ( तेजस्वीपणाच्या निरनिराळ्या पैलूंचे ) वास्तव्य असल्याचे वेद सांगत असता, वेदानुयायी हा ' **पापोऽहं, पापकर्मात्मा, पापात्मा, पापसंभवः** । ' म्हणण्याइतका आत्मघातकी होतो तरी कसा ? वेदानुयायाने कर्मसांगतेनंतर असाच आत्मविश्वास दृढ करीत गेले पाहिजे की– ' **गतं पापं, गतं दुःखं, गतं दारिद्र्यमेव च । आगता सुखसमृद्धिः पुण्योऽहं नवदर्शनात्** । ' कारण –

१ ' **कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविशेत् शतं समाः** ।

२ **अहमिन्द्रो न पराजिग्ये । न मृत्यवे अवतस्थे कदाचन । अहं ब्रह्मास्मि । तत्त्वमसि** ।

३ **पश्येम शरदः शतम् , जीवेम शरदः शतम् , श्रुणुयाम शरदः शतम् , प्रब्रवाम शरदः शतम् , अदीनाः स्याम शरदः शतम् , भूयश्च शरदः शतम्** । '

( वा. य. ३६–२४ )

यासारख्या वेदोपदिष्ट ऊर्जस्वल आकांक्षा विसरतात तरी कशा ?

वेदांतर्गत राजकीय, सामाजिक, नैतिक व राष्ट्रीय विषयावर पंडितजींनी अव्याहत लेखन चालू ठेवले. वेदातील गहनगूढ सिद्धांतही अगदी सोप्या व्यावहारिक दृष्टांतानी पटवून देण्याची हातोटी पंडितजींच्या जवळ असल्याचे प्रत्यंतर कोणासही येते. विचारसरणीच्या दृष्टीने पंडितजींनी कोणाचेच शिष्यत्व पतकरलेले नाही. आर्यसमाजी वातावरणात तारुण्याची अठरा वर्षे गेली तरी आर्यसमाजाच्या आचारविचारप्रणालीशीं पंडितजी सर्वथैव एकरूप कधीच झाले नाहीत; किंवा गतानुगतिक पढीक पंडिताची प्रथाही त्यानी पाळली नाही. वेदावर आधारलेले स्वतःच्या स्वतंत्र बुद्धीला सुचतील ते विचार पंडितजी आपल्या प्रज्ञेने मांडित आले. आपले काही काही विचार विद्वानांना किती परितोष देतील किंवा लोकप्रिय होऊन जनमनाची किती पकड घेतील, याची चिंता करीत पंडितजी कधीच बसले नाहीत. जगाचा वीट आणणारा ' निवृत्तिपर वेदांत ' त्यांना मान्य नाही. पुरुषार्थाने जगण्याची, आणि समाज व राष्ट्र आणि तसेच जमेल तर, विश्व उन्नत करण्याची ईर्षा प्रत्येकाने बाळगावी, असाच पंडितजींचा हरएक ठिकाणी कटाक्ष आढळतो.

वेदच वेदांचा अर्थ सांगतील या श्रद्धेने पंडितजींनी त्यातील ज्ञान ग्रहण केले. वैदिक तत्त्वज्ञान ऐहिकाकडे पाठ फिरविणारे नसून ऐहिकाचा उत्कर्षच साधणारे आहे, वैदिक परंपरा मायजातीबद्दल परमादर दर्शविणारीच आहे, असे त्यानी सप्रमाण समाजमानसावर ठसविले. ' **कृण्वन्तो विश्वमार्यम्** । ' हा आदेश ' अचूक

**चुकेना कोठे** ' अशा प्रयत्नपुरुषार्थीला खासच साकार करता येईल, असा आत्मविश्वास पंडितजींनी आपल्या वाचकात निर्माण केला आहे. मानवी जीवनात दुःख भरलेले असले तरी ' **दुःखी दुःखच आपुल्याच चुकिचे ग्रासोनि टाकी मन ।** ' असा एक प्रकार त्यात असतो. आपल्या चुका सुधारून वा त्याबद्दल प्रायश्चित्त घेऊन ते दुःख सोसूनच त्याचे निराकरण होते. अनपेक्षित परिस्थिति निर्माण झाल्याने वा आपल्या हितसंबंधाशी निगडित असलेल्या दुसऱ्याच्या हितसंबंधामुळे उत्पन्न होणाऱ्या सत्य अथवा काल्पनिक विरोधानेही दुःख होते. तथापि कसल्याही परिस्थितीत त्या दुःखापुढे हार खाऊन दैवायत्त होणे अगर परलोकाकडे डोळे लावून बसणे हा भ्याडपणा आहे, ही गोष्ट पंडितजींसारख्या हिंदुधर्माभिमानी वेदपुरुषाच्या तोंडून समाजास ऐकावयास मिळणे, हे समाजाची भाग्यरेषा उमटलेल्याचेच खरोखर चिन्ह होय. लोकाना जीवनाभिमुख करण्याची करामत पंडितजीसारखे धर्मनिष्ट सुधारकच करू शकतात. भारतात एक अभूतपूर्व आर्थिक आणि सामाजिक क्रांति घडून येत असता, देशात विद्वेषाचे वातावरण वाढू नये म्हणूनच शांतपूर्ण क्रांतिविचारांचा वेदार्थयत्न पंडितजींनी केला आहे.

वैदिक वाङ्मयासाठी स्वतंत्र छापखाना चालवून लाखो रुपयांचे ग्रंथ निर्माण करणारी पंडितजीसारखी व्यक्तिमत्वाने बहरलेली मूर्ति हे महाराष्ट्रीय नव्हे, तर भारतीय समाजाला ' **देणे ईश्वराचे** ' आहे. पाश्चात्त्य शिक्षण, पाश्चात्य संस्कृति आणि परकीय सत्ता यापैकी कशाच्या, वा त्या सर्वांच्या मिळून संकलित परिणामांच्या आहारी न जाता, आपल्या भारतीय, वैदिक संस्कृतीचा निर्भयतेने आचारप्रचार करणारे राष्ट्रीय पंडित म्हणून जसे पंडितजींनी स्वतंत्र तेज दाखविले आहे, तसेच स्वराज्यातही पारडी येथील मिशनऱ्यांच्या चर्चच्या जागी वेदमंदिर स्थापून पंडितजींनी एक निराळेच वलय दाखवले आहे. परकीय सत्तेखाली असता स्वराज्यप्राप्तीची वैदिकसूत्रे जशी पंडितजींनी जनतेला दिली, तशीच स्वराज्यामध्ये सुराज्याची वैदिकसूत्रे पंडितजी जनतेला देत राहिले आहेत; कारण, निःसंशय त्यांच्या हृदयाची प्रेरणा ही आहे की, देशसेवा करणे हे तर प्रत्येक देशवासीयाचे कर्तव्यच आहे; ते करताना देशातील निर्धनता व दुःख यांच्या बुडाशी जसे पारतंत्र्य होते, तशीच ( वैदिकधर्मास अनुसरून ) आपल्या मनातील, वाचेतील, क्रियेतील निर्भय निर्मळता सांभाळण्याची बेफिकिरीही कारण होती, हे सर्व आपण दक्षतेने लक्षात बाळगले पाहिजे.

' **वेदे प्रकाशिले सर्वही । वेदविरहित काही नाही ।।** ' असे समर्थांचे वचन आहे. उच्च–नीच, जवळचा–दूरचा, असे भाव दूर करून सर्व ज्ञात जगत् आत्मसात् करण्याच्या इच्छेनुरूप आर्यांच्या स्थितिस्थापकीय वृत्तीने जी वेदप्राधान्य संस्कृति हजारो वर्षे हिंदुस्थानात नांदत आली ती वैदिक वा भारतीय संस्कृति. या संस्कृतीच्या सरणीप्रमाणे परमेश्वर विश्वरूप आहे, अशी भावना असून त्याचा साक्षात्कार वैदिक

ऋषींना झाला होता. ' पुरुष एव सर्वमिदम् । ' ( ऋग्वेद ) हा ईश्वर सच्चिदानंद-कर असून मनुष्यच काय, पण प्रत्येक प्राणिमात्र आणि वस्तुमात्र त्या ईश्वराचाच ' अव–तार ' आहे. ' जे जे भेटे भूत । ते ते जाणिजे भगवन्त ॥ ' असे संतानी त्याचें वर्णन केले आहे. म्हणूनच विश्वरूप सत्य असून ते पूर्ण आहे. त्या विश्वरूप भगवंताची सेवा अनेक यज्ञांचे द्वारा होते. शरीर हे देवतांचे मंदिर असून त्याच्या निरनिराळ्या भागावर विविध देवतांचे अधिष्ठान असते. जीव हा ईश्वराचा अमृत-पुत्र असून जन्मतःच तेहत्तीस शक्तीनी तो संपन्न असतो. या दैवीसामर्थ्याचा उपयोग करणे व करविणे आणि अनुशासनशील होऊन अभ्युदय–निःश्रेयस यांची जोड मिळवणे ही जीवनाची सार्थकता मानली जाते. त्यामुळेच भारतीय आर्य सतत निय-माने व शिस्तीने वागतो व आत्मतेजाने युक्त, शारीरिकसामर्थ्यसंपन्न व स्वसंरक्षण-क्षम होऊन बाह्यशत्रूवर मात करतो. अशा ब्रह्मविद्येच्या योगानेच ज्ञान आणि विज्ञान यांचा समन्वय कार्यान्वित होतो. तेव्हा आपल्या पूर्वज ऋषींच्या देणगीची तीं ज्योत पुन्हा प्रज्वलित करून भारताने ज्ञान–विज्ञान–प्रकाश पाडावा या हेतूने, ज्ञानविज्ञानां-च्या म्हणजेच परा–अपरा विद्यांच्या जोरावर माणसे ' अमृता भवन्ति। ' ती गेल्या अडीच हजार वर्षांच्या काळात न होण्याचे कारण म्हणजे वैदिक तत्त्वांची अभिजात ओळख अजिबात जात चालली व त्यांच्या पालनात बुद्धिभेद झाला. हे पंडितजी सातवळेकरानी इतिहाससिद्ध पटविले आहे. बुद्धपूर्वकाली वैदिक आर्य विजयी व विजगीषु होते. तेच बुद्धोत्तर काळात मुमुक्षु बनले. मानवी शरीर म्हणजे देवऋषीं-च्या आश्रमासारखी पवित्र असलेली आठ चक्रांची व नवद्वारांची ' अयोध्या ' नगरी आहे, या कल्पनेचें उच्चाटण होऊन, शरीर म्हणजे ' पूयविण्मूत्राचा गोळा ' असे मानण्यात येऊ लागले व एकशे–वीस वर्षे जगण्याच्या आत्मविश्वासाने असणारी ' आनंदो ब्रह्मेति । ' ही मनोधारणा गेली ! तेथपासून भारताचे राष्ट्रीय ' बद्धपरि-करत्व ' नाहीसे होऊन त्यात विस्कळितपणा आला. मग, हिंदुस्थानात सोन्याचा धूर निघतो तर तेथे धूर तेवढा ठेवून, सोने पळविण्यासाठी आक्रमण करून आलेल्या ख्रिस्ती व महंमदीय पांथस्थानी भारताची दुर्दशा उडविली ! पंडितजींच्या प्रति-पादनांचा हा गोषवारा आहे. यावर एकमेव उपाय म्हणून वैदिक संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी पाच तपे ते ' उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत। ' असा आदेश देत राहिले आहेत.

कारण वेद अपौरुषेय म्हणजे अत्यंत पुरुषार्थी आहेत. पंडितजींचा हा प्रत्ययबोध आहे. वेदांचे अध्ययन, मनन व विशेष म्हणजे तदनुसार आचरण झाले, तर पर-मेश्वरी निःश्वसिताने जशी अनंत सृष्टि निर्माण केली तशी कर्तृत्वाची कीर्तिशाली सृष्टि मनुष्याला निर्माण करता येईल. या अर्थाने वेद हे परमेश्वराची निःश्वसिते होत. पंडितजींच्या या धारणेमुळेच त्यांनी आपल्या सूक्ष्मदृष्टीने वेदांचे राष्ट्रनिष्ठ आलोडन केले व जनतेचे लोकशिक्षण साधले. १९०१ च्या ' वेदोक्त ' प्रकरणी हिंदु-

मात्राला वेदाध्ययनाचा व वैदिक संस्काराचा अधिकार आहेच आहे, असे पंडितजींनी स्पष्ट सांगितले होते, त्यातील मर्म वरीलप्रमाणे आहे.

मानवी व्यवहाराचे दिव्य संदेश वेदात सर्वत्र विखुरलेले असून त्यामध्ये शाश्वत सत्य ओतप्रोत भरलेले असल्याने, ते संदेश युगानुयुगे कल्याणप्रद ठरणारे आहेत. आपल्या ' वैदिकधर्म ' मासिकात वेदांतर्गत राजकीय, सामाजिक, नैतिक व राष्ट्रीय विषयावर पंडितजींनी अव्याहत लेखन चालू ठेवले व देशभर व्याख्याने दिली. ' **वेदोऽखिलो धर्ममूलम् ।** ' धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारही पुरुषार्थांच्या शास्त्रीय ज्ञानाचे उगमस्थान वेदच. गणितासारख्या व ज्योतिषासारख्या विषयांचे अत्यंत प्रगत व परिपूर्ण ज्ञान वेदात असल्याचे एवढे प्रगट झाले आहे की विसाव्या शतकातील विज्ञानी थक्क होतात. पृथ्वी गोल असल्याचा शोध चारशे वर्षापूर्वी युरोपात लागला नसून वेदकालपूर्व आहे; राजकीय आणि राष्ट्रीय विचारांचे परिणत स्वरूप वेदात एवढे आहे की ते एकविसाव्या शतकापर्यंतही प्रगत ठरेल ! वैदिककाळचे पुरोहित राजकारण करीत, हे आपले मत पंडितजींनी—

**ऋषिं नरावंहसः पांचजन्यमृबीसादत्रिं मुञ्चथो गणेन ।**
**मिनन्ता दस्योरशिवस्य माया अनुपूर्वं वृषणा चोदयन्ता ।।** ( ऋग्वेद १।११७।३ )
**आ यद् वामीयचक्षसा मित्र वयं च सूरयः। व्यचिष्ठे बहुपाय्ये यतेमहि स्वराज्ये ॥**
( ऋग्वेद ५।६६।६ )

**भद्रमिच्छन्त ऋषयः स्वर्विदः तपो दीक्षामुपनिषे दुरग्रे ।**
**ततो राष्ट्रं बलमोजश्च जातं तदस्मै देवा उपसंनमन्तु ।।** ( अथर्व. १९।४१।१ )

आदिकरून ऋचांच्या आधारे मांडले असून त्यांच्या स्पष्टीकरणासाठी अत्रि, गौतम, कश्यप, वशिष्ठ यांच्या चरित्रांचे पुरावे पंडितजींनी दिले आहेत. हे सर्व ऋषि अत्यंत महत्त्वाकांक्षी व लोकोन्नतीसाठी नि देशरक्षणापायी प्रयत्नपुरुषार्थी होते. ' आम्ही सर्व विद्वान् मंडळी एकत्र होऊन विस्तृत बहुजनसमाजाच्या संमतीने पालन होणाऱ्या अशा स्वराज्यात सर्व प्रजेच्या कल्याणासाठी प्रयत्न करू. ' या ऋग्वेदातील ( ५।६६।६ ) ऋषिघोषणेवरून ऋषींच्या आकांक्षेची कलपना नीट बांधता येते. ऐतरेय ब्राह्मण आणि शतपथ ब्राह्मण यामध्ये थोड्या फरकाने आलेल्या प्रजापतीच्या वधाची कथा म्हणजे ग्रामसभा किंवा राष्ट्रसभा या लोकसंस्थांच्या अधिकारावर अतिक्रमण करणाऱ्या प्रशासकाला देहांतप्रायश्चित्ताची शिक्षा, हे पंडितजींनी सिद्ध करून दाखविले आहे. मंत्री, राष्ट्रपति यासारखे अधिकारी निवडताना कोणती दृष्टि असावी हे पंडितजींनी—

' **प्रजापते न त्वदेतान्यन्यो विश्वा जानाति परिता बभूव ।** ' या मंत्राच्या आधारे दाखवले आहे. ऋषीनी प्रजापतीची निवडणूक त्याच्या गुणावरून केली, हे स्पष्ट आहे. ( ' ऋषींच्या राज्यशासनाचा आदर्श ' हा लेख पहा. ) वशिष्ठानी भारत राष्ट्राची संघटना करून त्याला अत्यंत प्रभावी बनविले. त्याचप्रमाणे ऋषीनी कल्पि-

लेला परमेश्वर हा विश्वाचा प्रशासक असल्याकारणाने त्याच्या वर्णनात राष्ट्राच्या प्रशासनाचे ज्ञान वेद देतात. एरवी, '**ना विष्णुः पृथिवीपतिः ।**' या वचनाची मातब्बरी तरी कोणती ? 'वेदातील देवतांची वर्णने ही त्या त्या ध्येयवादी, आदर्श पुरुषांची वर्णने आहेत; म्हणूनच मनुष्य आपल्यापुढे तो आदर्श ठेवू शकतो' असे पंडितजींचे म्हणणे आहे.

'**शरीरं ब्रह्ममंदिरम् ।**' ही मानवी देहासंबंधी अत्यंत उदात्त कल्पना वेदामध्ये प्रतिपादन केलेली आहे. देह मर्त्य असला तरी त्याच्या आश्रयाने असणारा आत्मा अमर आहे. हा आत्माच सर्वव्यापी परमात्मा आहे ही कल्पना वेदातून व उपनिषदातून सर्वत्र प्रतिपादन केलेली असताना, त्यातील तेहत्तीस कोटी देवांची नावे अथर्ववेदाने स्पष्ट केली आहेत. वेदानी जी देवतांची उपासना सांगितली ती त्या देवतांची सांगितली असून उपासना करणाऱ्या व्यक्तींचे किंवा राष्ट्राचे अकल्याण कालत्रयी कोणी करू शकणार नाही ! वयाच्या सोळाव्या वर्षापासून सत्तरीपर्यंतचा काळही माणसाच्या तारुण्याची मर्यादा वात्स्यायनाने सांगितली असून वेदानी तर '**पश्येम शरदः शतम् । जीवेम शरदः शतम् ।**' यासारख्या मंत्रानी शंभरवर्षांच्या आयुर्मर्यादेची प्रार्थना सर्वत्र केली आहे. ( ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, तैत्तिरीय, आरण्यक पहा ) आठ वर्षे बालपण, चोवीस वर्षे वेदाध्ययन, छत्तीस वर्षे गृहस्थाश्रम, अठ्ठेचाळीस वर्षे विद्येचे अध्यापन ( छांदोग्य उपनिषद् २।१२ पहा ), यातच एकशे सोळा वर्षे होतात. त्याच्यानंतर जास्तीत जास्त आठ वर्षे फार तर म्हातारपण !! असे सव्वाशे वर्षांचे आयुष्य सहज होते.

चारही वेदामध्ये मानवी जीवनाचे दैन्य दाखविणारी एकही ऋचा आढळणारी नाही. ऋग्वेदात, '**अहमिन्द्रो न पराजिग्ये इद्धनम् न मृत्यवे अवतस्थे कदाचन ॥**' म्हणजे 'कदापि पराजित न होणारा व मृत्यूला वश न होणारा इन्द्र मी स्वतः आहे.' असे म्हटले आहे. अर्थात् मी म्हणजे जर इन्द्र तर इन्द्रसभा म्हणजे माझे शरीर हे उघडच आहे. स्वतःच्या देहासंबंधी अशी उदात्त कल्पना समाजात एकदा रुजली म्हणजे समाजातल्या प्रत्येक व्यक्तीला त्याचे कर्तव्य स्पष्ट करून सांगण्याची आवश्यकता नाही. समाजाच्या अंतःकरणात दृढमूल झालेल्या धारणाच समाजाचा इतिहास बनवीत असतात. मनुष्याचे शरीर सर्वसामर्थ्यसंपन्न असेल, समर्थांनी म्हटल्याप्रमाणे '**नरदेह असता अव्यंग । आणि चांग ॥**' तर दुसऱ्याच्या शरीरातील दोष, ऋग्वेदात म्हटल्याप्रमाणे, केवळ स्वताच्या स्पर्शाने किंवा मंत्रोच्चाराने तो दूर करू शकतो. मनुष्याच्या शरीरातील तेहत्तीस प्रकारची सामर्थ्ये जागृत होऊन '**विवेके पैसावतील**' तर तो '**अवतारचि बोलिला ।**' पंडितजींनी वेदवाङ्मयाच्या आलोडनाने वैयक्तिक जीवनाच्या उदात्तीकरणाचे असे विचार पुनरुक्तीचा दोष पतकरूनही सामाजिक मनात मुरवण्याची पराकाष्टा केली आहे. कारण '**बुडते हे जन देखवे न डोळा । येतो कळवळा म्हणोनिया ॥**'

जगातील प्रत्येक राष्ट्र आपले तेजस्वी वाङ्मय सुरक्षित ठेवून पुढील पिढयाना वारसा म्हणून देत असते. वेदांचे रक्षण भारतीय समाजाने अनादिकालापासून आपले व्रत मानलेले आहे. छत्रपतींच्या विरुदावलीतील 'गो–ब्राह्मण–प्रतिपालक' हे विशेषण त्या परंपरेचेच द्योतक आहे. '**ब्राह्मणेन निष्कारणो धर्मः। षडंगो वेदोऽध्येयो ज्ञेयश्च।**' हे शास्त्रवचन शिरोधार्य मानून धन, मान, प्रतिष्ठा वगैरे वैयक्तिक लाभालाभांचा विचार न करता, वेदविद्येचे केवळ जिह्वाग्रावर ब्राह्मणवर्गाने अत्यंत निष्ठेने ( अर्थ न समजला तरीही ) रक्षण केले ही जगाच्या इतिहासातील एक अपूर्वाई असून इंग्लंड, जर्मनी, रशिया, अमेरिकेतील विद्वान् शतकानुशतके त्या वेद-वाङ्मयाचा अभ्यास करू लागले असता, वेदातील ऊर्जस्वल विचारानी भारतीय समाजही नेटकेपणानेच उभा राहिला पाहिजे, म्हणूनच पंडितजींनी आपले सर्व 'वेदार्थयत्न' उभारले. '**जटा, माला, शिखा, रेखा, ध्वजो, दण्डो, वनो रथः। अष्टौ विकृतयः प्रोक्ताः क्रमपूर्वा महर्षिभिः ॥**' या प्रकाराने यापुढे वेदांची रक्षण-व्यवस्था व्हावयास नुसती मुद्रणकला अपुरी असून ध्वनिमुद्रिकांचेही सहाय्य घ्यावे लागेल व ते राज्यसत्तेशिवाय कसे शक्य ?

वेदमंत्राचे अर्थज्ञानपूर्वक अध्ययन करण्याची आवश्यकता व्यावहारिक होण्यास इसवी सनाच्या अकराव्या शतकात उवटाचार्यांनी केलेले भाष्य, त्यानंतरचे महीधराचार्यांचे भाष्य, एकोणिसाव्या शतकातील दयानंद सरस्वतींची विवरणे आणि विसाव्या शतकातील पंडितजी सातवळेकरांची सोपपत्तिक विवेचने, अशी कितीतरी साधने भास्कराचार्यांच्या निरुक्तानंतर व प्रजापति कश्यपाच्या निघंटुनंतर उपलब्ध झालेली आहेत. वेदव्यासानी महाभारताची रचना वेदांचा अर्थ समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत पोहोचविण्यासाठीच केली. संतमंडळीनी देशीकार भाषेत साहित्य-निर्मिती केली, तीही वेदांचा अर्थ विशद व व्यवहारशुद्ध करण्यासाठीच ! '**एक एव पुरा वेदः प्रणवः सर्ववाङ्मयः ॥ देवो नारायणो नान्य एकोऽग्निर्वर्ण एव च ॥**' ( श्रीभागवत ९।१५ ). व्यासानी वेदाचे चार खंड केले व खंडशः वेदाध्ययन करण्याची प्रथा सुरू केली, श्रमविभागणीच्या तत्त्वावर ! कोणताही यज्ञ मात्र चारही वेदांच्या सहकाराशिवाय होऊ शकत नाही, असा दण्डक घातला. कारण यज्ञ हा चतुर्मुखी ब्रह्मा आहे. चार वेद ही या यज्ञपुरुषाची चार तोंडे होत. अर्थपूर्ण श्रमसातत्यासाठी अध्ययनस्वातंत्र्याची सोय ठेवून वैदिकधर्मी आर्यांच्या संघाचा एकजिनसीपणा राखण्याची ही सारी दक्षता होती.

यज्ञवेदी ( **इयं वेदिः भुवनस्य नाभिः ।** ) हा आर्यांच्या कार्यक्षेत्राचे केंद्र असे. जेथे आर्य यज्ञ करीत ती भूमि आर्यांच्या ताब्यात राहिलीच पाहिजे असा दण्डक फार प्राचीनकाळापासून चालत आलेला ! त्यामुळे ऋषींच्या यज्ञात विघ्न होऊ लागले की आर्यराजे त्यांच्या रक्षणास धावून जात. यज्ञसंस्था अशा रीतीने आर्यांच्या प्रगमनशीलतेस सहाय्यक झालेली होती. याप्रमाणे ब्रह्मक्षात्र एकवटले म्हणजे या

विश्वात यश मिळण्यास उशीर काय ?

**यत्र ब्रह्म च क्षत्रं च सम्यञ्चौ चरतः सह । तं लोकं पुण्य प्रज्ञेषं यत्र देवाः सहाग्निना ॥**
( वा. यजु. २०।२५ )

यज्ञमय प्रसरणशीलतेमुळे वैदिक आर्य हे अर्ध्याहून अधिक भूपृष्ठावर पसरले होते. भारताच्या आर्यसंस्कृतीला वैदिक, भारतीय, हिंदु अशा नावानीही निरनिराळया कारणानी जग ओळखत आले आहे. सर्व ज्ञात जगत् आत्मसात् करण्याच्या इच्छेनुरूप आर्यांच्या स्थितिस्थापकीय वृत्तीने ती संस्कृति हजारोवर्षे अखिल आर्यावर्त व्यापून राहिली. मनुष्याची चिच्छक्ति सदानंदरूप असून मनुष्य विश्वरूपाचीच आपल्या परीने प्रतिमा आहे. विश्वाचा घटक व प्रतिमा असलेला मनुष्य विश्वाला संसेव्य मानतो. म्हणून '**याचि देही याच डोळा।**' ऐहिक जगाचा स्वर्ग बनविण्याचे ध्येय वैदिक संस्कृतीने भारतीय तरुणापुढे ठेवले आहे. धर्म, अर्थ काम, मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थाने अभ्युदय व निःश्रेयस साधण्यासाठी, दैनंदिन जीवनाच्या वेळापत्रकी आराखड्यांचा क्रम घालून देऊन, वैदिक संस्कृतीने आर्यांना सामर्थ्यसंपन्न, वैभवसंपन्न व बुद्धिनिश्चयसंपन्न करून समुद्रवलयांकित पृथ्वी 'एकराट्' करण्याचा व्यवहार शिकवला. या शिकवणीने आर्य विजयी व विजिगीषु वृत्तीचे झाले.

पंडितजी सातवळेकरांना वैदिकमंत्रातून 'सत्यं, शिवं, सुंदरम्' चे दर्शन होते. त्या दर्शनाची प्रत्ययकारी शब्दचित्रे ते लोकाना सादर करतात. भारताच्या गणराज्याच्या दैनंदिन कार्यप्रणालीसाठी वेदकालीन गणराज्य चालविण्याचे तंत्र पंडितजींनी अगाऊच प्रसिद्ध केले होते. वेद हे केवळ गहन तत्त्वे सांगणारे व काही विशेष अधिकार प्राप्त झालेल्या लोकासच ते वाचणे शक्य आहे, ही कल्पना पंडितजींनी मूळासकट उखडून टाकली. वैदिकधर्माची तेजस्विता लोकांच्या लक्ष्यात आणून देऊन त्यांनी ( १९०८ ) देहदण्ड सोसला; देशाकरता लोक भराभर तुरुंगात जाऊन हाल भोगीत असता ( १९३०–३२ ) अत्रिऋषीच्या कारागृहवासाचे उदाहरण सांगून पंडितजींनी उत्तेजन दिले. परकीय सत्तेला क्रांतिकारक बाँबने धक्के देत असता ( १९०४ ते १९१० व १९२९–३० ) पंडितजींनी वेदोक्त बाँब लोकापुढे मांडला. जिकडेतिकडे राजकीय कट सुरू असता परीक्षितीच्या विरुद्ध सर्पानी केलेल्या कटाची कथा पंडितजींनी उलगडून दाखविली. महात्मा गांधींची चरख्यावर सूत कातून वस्त्रस्वालंबनाची ( १९२०–२२ ) चळवळ चालू असता पंडितजींनी 'वेदातील चरखा' लोकाना समजावून दिला. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातही पंडितजींनी स्वच्छच दाखवून दिले होते की अस्पृश्यतेला वैदिकशास्त्राधार नाही. यज्ञात पशुहिंसा झाली तरी ती हिंसाच नव्हे, असे मानणाऱ्या प्रबल पक्षाला झणझणीत उत्तर ज्ञानेश्वरानंतर पंडितजींनीच दिले. श्रीनिवास अय्यंगार यानी ( १९२३–२६ ) वरिष्ट विधिमंडळात प्राचीन ऋषिमुनि गोमांस भक्षण करीत, असे विधान केले तेव्हा पंडितजींनी 'गोमेध' हे विद्वत्ताप्रचुर व साधार पुस्तक लिहून त्याना उत्तर दिले.

*

पंडितजींचे वेदविवरण जसे पांडित्यप्रचुर तसेच लोकचित्ताकर्षक असे. आर्यसमाजात पंडितजी प्रवचने करावयास लागल्यापासून 'ज्ञानादेव तु कैवल्यम् ।' म्हणजे आत्यंतिक दुःखनिरास होऊन अखंड आनंदसमापत्ति हा जो आत्मधर्म त्याचे दर्शन घडून येण्यासाठी प्राणिमात्राला वेदांत हवा, हेच पंडितजींनी ठसविले आहे. मीमांसाकारानी वेदाच्या गद्यसंग्रहाचे नाव यजुर्वेद ( शेषे यजुः । ), गानात्मक पद्यसंग्रहाचे नाव सामवेद ( **गीतिषु सामाख्या** ) व पादबद्ध मंत्रसंग्रहाचे नाव ऋग्वेद व अथर्ववेद असे ठेवले. ऋग्वेदाने सत्स्फूर्ति, यजुर्वेदाने सत्कर्माकडे प्रवृत्ति, सामवेदाने सदुपासनेमध्ये स्थिति करून अथर्ववेदाने ज्येष्ठ ब्रह्माचा साक्षात्कार करून घेण्यास मार्ग सापडतो. मानवाची पूर्णता हेच वेदांचे कार्य आहे. अंतःशुद्धिद्वारा सद्‌गुणांच्या आविष्काराने कोणत्याही संकटाला वा शत्रूला न जुमानता मनुष्याने विजयी, वर्धिष्णु व प्रभविष्णु व्हावे.

पंडितजी सांगतात की वेदसंहितांच्या भूमिकेत अग्नि हा आद्य मननकर्ता, बुद्धीचा अग्रणी, ब्राह्मण, क्षत्रिय, अमृतत्त्व, दिव्यजन्मकर्ता, शक्तिप्रदाता, पुरोहित, गणराज, पुराणा मित्र, अविनाशी, अनेक देवांचा प्रेरक, जीवनरस, प्रजारक्षक अशा विविध स्वरूपानी परिचित आहे. सप्तनद, जिव्हा, घोडे यांच्यावर व्याख्यान करताना अग्निला परमात्माही मानण्यात आले आहे. तात्पर्य अग्नि हा चेतनाशक्तीचा वाचक आहे. अंगिरस अग्नि हा व्यक्तिमात्राचा अंगरस होय.

इंद्रदेवतेच्या अनेकविध स्वरूपात विद्युत् हेही एक रूप आहे. जीवात्मा हेही त्याचे एक स्वरूप असून व्यक्तिमात्राच्या इंद्रियद्वारा तो प्रतीत होत असतो. विश्वात परमात्मा इंद्र आहे. शरीरमात्रात प्राण हाच इंद्र आहे. सूर्य, डोळयाचे तेज, अशानी तो प्रतीत होतो. त्याला सर्व बिचकून असतात. तो शूरवर असून शत्रूना असह्य होतो.

चंद्र हा ऋग्वेदाचा सोम आहे. तो औषधींचा राजा. सर्व विजयी कालवान् सोम होय. तो त्रैलोक्याचा सरळ, सत्य व श्रद्धावान् आहे.

रुद्र ही परमेश्वराची विश्वव्यापक शक्ति आहे. देवांचा कोश, अयोध्यानगरी आदि प्राणसंबंधी आख्यानांचे सुंदर व्याख्यान वेदात आहे.

ब्रह्मोदन म्हणजे ज्ञान वाढविणारे अन्न. ब्रह्मचारी म्हणजे व्यापकच व्यापक होण्यासाठीं जो पुरुषार्थ करतो तो. ब्रह्म म्हणजे वृद्धि, महत्त्व, ज्ञान, मोठेपण, अमृत.

पंडितजीनी वेदार्थ करताना काय दृष्टि ठेवली आहे, हे वरीलसारख्या त्यांच्या निष्कर्षावरून कळून चुकेल. पंडितजींच्या अभ्यासात यज्ञ म्हणजे सृष्टि–प्रक्रिया; गोमांस म्हणजे जिभेचा 'तालु' मध्ये प्रवेश; अशाच व्युत्पन्न पद्धतीने पंडितजी अर्थ करीत गेले आहेत. वेदार्थ करताना पंडितजींनी व्याकरण, व्युत्पत्ति आदि शास्त्रे जरूर पाहिली आहेत. पण सर्वांत, पूर्वग्रहवर्जित शुद्ध व सोज्ज्वळ मन ठेवले आहे. अशा पवित्र मनाने, ज्ञानेश्वरानी गीतेवर ज्या हळुवारपणाने भावार्थदीपिका लिहिली,

त्याच हळुवारपणाने पंडितजी सातवळेकरांनी वेदसंदर्भ पाहून वेदानुवाद लोकास दिला. पहा की—

**जैसे शारदीचिये चंद्रकळे । माजी अमृतकण कोवळे ।**
**ते वेचिती मने मवाळे । चकोरतलगे ॥ १०५६ ॥**
**तयापरी श्रोता । अनुभवाची ही कथा ।**
**अति हळुवारपणा चित्ता । आणुनिया ॥ १०५७ ॥**
**जैसे भ्रमर पराग नेती । परी कमळदळे नेणती ।**
**तैसी आहे सेविती । इये ग्रंथी ॥ १०५८ ॥**
**का आपुला ठावो न सांडता । आलिंगिजे चंद्र प्रकटता । ।**
**हा अनुराग भोगिता । कुमुदिनी जाणे ॥ १०६० ॥**
**ऐसेनि गंभीरपणे । स्थिरावलेनि अंतःकरणे ।**
**आथिला तोचि जाणे । मानू इये ॥ १०६१ ॥**

अशा नर्मसचिवत्वाने वेदार्थ लावून पंडितजींनी स्वच्छ केले आहे की ब्रह्म, परमात्मा, नारायण, वासुदेव, परमेश्वर म्हणजे वेदमते ' विश्वरूपी देव. ' या सर्वव्यापी अमूर्त देवाचे जे या पृथ्वीवर मानवी बुद्धिला प्रत्यक्ष पटणारे मूर्तस्वरूप आहे ते म्हणजे चातुर्वर्ण्यदेही मानवी समाज. तो मानवजातीच्या व्यापकतेइतक्या विस्फारित दृष्टिने ज्याला पूजता येईल आणि ' **हे विश्वचि माझे घर। ऐसि मति जयाची थोर। किंबहुना सचराचर। आपणचि जाहला ॥** ' असा जो असेल तो ' **विश्वात्मक देवाचीच** ' पूजा करीत राहील. पण एवढा व्यापक पल्ला ज्याला एकदम पेलणार नाही, त्याने आपल्या राष्ट्रात्मक मानवसमाजाला देव मानून आपले प्रत्येक कर्म त्या राष्ट्रदेवाला सन्मुख होऊन करावे. त्याचाही प्रारंभ कोवळ्या बुद्धीला ' आपल्या भोवतीच्या वर्तूळातील मनुष्यमात्राला ' सन्मुख होऊन करता येतो. अकलेच्या आणि आवाक्याच्या झेपेप्रमाणे मानवसमूहाला मूर्त परमेश्वर समजून, त्याला सन्मुख होऊन त्याची पूजा करावयाची तर ती ' **स्वकर्मणा** ' च. आपल्या अभिप्रेत मानवसमूहाबद्दल नितांत आदर बाळगून त्याची प्रतिष्ठा शंभर नंबरी सोन्यासारखी सांभाळण्यासाठी ' **सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चिद् दुःखमाप्नुयात् ।** ' या दक्षतेने आपले प्रत्येक पाऊल टाकावयांचे, प्रत्येक शब्द उच्चारावयाचा, प्रत्येक विचार मेंदूत स्थिर होऊ द्यावयाचा. अशी तपश्चर्या वाढत वाढत गेली म्हणज माणसाची बुद्धि एकवेळ ' **स्थिरचर व्यापुनि दशांगुळे उरलेल्या परमेश्वराशी** ' एकरूप होईल. अर्थात् ' **जे जे भेटे भूत । ते ते भगवंत ।** ' मानू लागेल.

मानवतेला ' **स्वकर्मणा** ' पूजले तर त्या पूजेचेही एक व्रत आहे. ते म्हणजे कर्मफलत्याग—योग. तो उत्कृष्ट साधतो त्याला पंडित म्हणतात. वेदांची ही शिकवण ज्याच्या रोमरोमात मुरलेली असते, त्याला ' **पंडितजी** ' होता येते. ज्याला कर्माच्या

फलाचा स्वतः उपयोग घेण्याची इच्छा नाही, त्याचे सर्व कर्मदोष ज्ञानाच्या योगाने जळून जातात. कर्माचे फळ मला भोगावयास मिळावे अशी इच्छा बिलकुल न धरतां, नित्य संतुष्ट राहून व दुसऱ्यावर अवलंबून ना राहता आपले प्राप्त, इष्ट आणि विवेकशुद्ध कर्तव्य करीत जावे, म्हणजे पाप म्हणून कसे ते माणसाला शिवतच नाही !! कारण तो सर्व भूत–हित–रत असतो.

पंडितजीच्या मते वेदांची महती अशी आहे की– ' वेद सर्वांत जुने. वेद म्हणजे ज्ञान. हाच वेदाचा अर्थ आहे. इंद्र हा वेदात आहे. तो देवांचा राजा आहे. डोळे, कान, नाक ही इंद्रिये आहेत.

> **डोळ्यांनी बघतो, ध्वनी परिसतो कानी, पदी चालतो ।**
> **जिव्हेने रस चाखतो मधुरही, वाचे अम्ही बोलतो ॥**
> **हातानी बहुसाल काम करतो, विश्रांतिही घ्यावया ।**
> **घेतो झोप सुखे, फिरोनि उठतो; ही ईश्वराची दया ॥**

ही इंद्राची शक्ति. याना आपण इंद्रिये म्हणतो. आमचे शरीर हीच इंद्रसभा आहे. हे राज्य स्थापन झाले म्हणजे खरी शांति मिळते. जगाकडे आम्ही कोणत्या दृष्टीने पहावे हे तत्त्वज्ञानावरून कळते. तत्त्वज्ञान म्हणजे विश्वाचे छायाचित्र आहे. आमचा धर्म हा शास्त्रावर आधारलेला आहे, केवळ विश्वासाने त्याचे आचरण करावे असे नाही. वेदाचे ज्ञान लोकाना कळावे व त्यांचे कल्याण व्हावे असे वेदातच आहे. वेद हा अखिल मानवधर्माचे मूळ आहे. **वेदोऽखिलो धर्ममूलम्** । मनुष्याने कसे वागावे हे वेदात सांगितले आहे. ते वर्णन देवतांच्या रूपाने आहे. प्रत्येक शास्त्र हे वेदाच्या आधारानेच उभे आहे. महाभारताचे युद्ध चालू असताना अर्जुनाने बॉंब वापरले आहेत. श्रीकृष्णाने सांगितले की– सर्वांनी जमीनीवर पडा म्हणजे मी हे शस्त्र वापरतो. असे वर्णन युद्धपर्वात आहे. पूर्वी विमाने होती. इतकी आपली संस्कृति व शास्त्रे प्रगत होती.

**अनारम्भणे तदवीरयेथां अनास्थाने अग्रभणे समुद्रे ।**
**यदश्विना ऊहथुर्भुज्यमस्तं शतारित्रां नावमातस्थिवांसम् ॥** (ऋग्वेद १।११६।५)

समुद्रावर अंतरिक्षाप्रमाणे ज्याला अंत नाही, आरंभ नाही, अशा यानातून भुज्यु या तरुणाला अश्विनीदेवानी आपल्या घरी पोचविले. त्यावेळी त्याची नौका होती. तिला शंभर साधने होती. आकाशातून पोचविले म्हणजे एवढी विमानविद्या होती. ' तुमचा रथ आहे. त्याला घोडा नाही. धूळ उडविणारा ' असे ऋग्वेदात वर्णन आहे. याचा अर्थ मोटार असाच होतो... ' [ नाशिकचे वझे इंजिनेर यांचे मत असेच असे ] ' सूर्य प्रेरणा करतो हे सांगण्यास केवढे शास्त्र पाहिजे. पण ते कार्य आपला मंत्र सांगतो. आज अमेरिकेत अशा गोष्टी नाहीत पण त्या वेदात आहेत.... स्वीडिश-भाषेत स्वीडनला स्वर्ग म्हणतात म्हणजे आपले लोक तिथे रहात होते. याही गोष्टी

ऋग्वेदात आहेत. असे जे सर्वांगीण उन्नत झालेले ऋषि हेच आपल्या धर्माचे आद्य-पुरुष होत.... '

सप्तसिंधूंच्या प्रदेशात निर्माण झालेले वैदिक वाङ्मय कंठगत ठेवण्याच्या परंपरेमुळे सप्तसिंधूवरील यावनी आक्रमणाने नष्ट झाले नाही. उत्तरेच्या यावनी आक्रमणानंतर दक्षिणेतील विजयनगरच्या हिंदु साम्राज्यात ते सुरक्षित व उत्तेजित राहिले. याच काळात सायणाचार्यानी वेदावर भाष्ये लिहून वेदांचा अर्थ शक्य तेवढा स्पष्ट केला. विजयानगरच्या साम्राज्यानंतर शिवाजीमहाराजांच्या हिंदवी स्वराज्यात वेदविद्या आश्रय मिळून राहिली. महाराष्ट्रीय व आंध्रप्रांतीय वैदिकानी काशीपासून रामेश्वरापर्यंत वेदविद्या टिकवल्यामुळे, स्वराज्यात विद्यापीठे आणि स्थानिक स्वराज्ये यानी तिचा थोडा फार आदर चालविला आहे. वेदमंत्रामध्ये काही मूलभूत सामर्थ्य आहे. हजारो मैल एकमेकापासून दूर असणाऱ्या अभ्यासकात जिव्हाळा उत्पन्न होतो. भट्ट मॅक्समुल्लर, लो. टिळक आणि येरवड्याचा (१८९७) एम्. ए. झालेला जेलर यांचे याबाबतीतील उदाहरण सुप्रसिद्धच आहे. वैदिक उपासना ही सवित्याच्या तेजाची उपासना आहे. हजारो वर्षे गायत्री छंदातील हा सावित्रीमंत्र पंडितजींच्या दृष्टीस पडताच, त्याची तेजस्विता त्यांनी जनतेच्या नजरेस आणली. पंडितजीप्रमाणे वेदांचा स्वतंत्र बुद्धीने अभ्यास करण्याची आवश्यकता सर्वांसच वाटेल. या अत्यंत प्राचीन वाङ्मयाच्या अर्थासंबंधाने एकमत झाले नाही तरी गेल्या दीड शतकांत पाश्चात्य संशोधकानी वेदविषयक प्रचंड वाङ्मय निर्माण केले आहे. पण त्यात पुष्कळच अपसिद्धांत आल्याचा वास लागल्यामुळे, पंडितजींनी स्वयंतंत्र स्वतंत्र अभ्यास करून वेदाची गोडी जनसामान्यापर्यंत नेली. त्यांची कामगिरी अविस्मरणीय आहे. वेदांचा खरा व्यावहारिक अर्थ समजावून सांगून वेदाकडे पाहण्याची अभिनव दृष्टि पंडितजींनी समाजाला व अभ्यासकाना दिली आहे. पेशवाईत पर्वतीवर श्रावणमासी दक्षिणा ज्या वेदशास्त्रसंपन्नांला मोठ्या आदराने वाटत, त्यांनी आपल्या घोकंपट्टीने वेद शाबूत ठेवले; त्याचबरोबर ते समजावून घेऊन जर त्यांतील रहस्य आणि सैन्यरचनेसुद्धा सर्व व्यूह राज्यसूत्रधाराना सांगितले असते आणि उलट पेशव्यांनीं वेदाविष्काराशिवाय दक्षिणा मिळणार नाहीं, असा कोठेतरी दण्डक घातला असता तर इंग्रजाला येथे महाराष्ट्रात तरी पाय रोवताना तंगडींमोडीचा अनुभव चाखावा लागला असता, असा पंडितजींचा स्पष्ट अभिप्राय आहे.

फ्रान्स, इटाली, अमेरिका, रशिया इत्यादि देशांच्या इतिहासातील राज्यक्रांत्यांची वर्णने रंगवून अनेक देशभक्तानी भारतीय समाजात राजकीय क्रांतीची ज्वलंत आकांक्षा उद्दीपित करण्याचा प्रयत्न केला. ते लोक जर स्वराज्यासाठी एवढे दिव्य करू शकले तर आपले पवित्र ग्रंथ देखील त्याच दृष्टीने समाजाने वाचावेत व त्यातून स्वराज्य व सुराज्य निर्माण करण्याची आकांक्षा समाजाने घ्यावी हाच पंडितजींचा वेदातील राजकीय किंवा राष्ट्रीय विचार आग्रहपूर्वक सांगण्याचा हेतु होय,

हे स्पष्ट आहे. वैदिक ऋषि मुख्यतः राज्य, राष्ट्र, आदर्श राजा, विश्वसाम्राज्य, विश्वशांति यांचा विचार करीत होते, हे पंडितजींचे मत सकृद्दर्शनी असंभव, निदान दूरान्वित वाटत असले तरी ते जेव्हा ब्राह्मण–ग्रंथकार किंवा भागवतकार यांच्या अर्थातील त्रुटि वेदांच्याच आधारे उघड करून दाखवतात, तेव्हा त्या मतात केवळ आग्रह भरला आहे, असे म्हणावयास जागा रहात नाही. वेदानी सांगितलेले राज्य-व्यवस्थेचे किंवा समाजव्यवस्थेचे सिद्धांत विसरल्यामुळे भारतीयांची राष्ट्रीय, राज-कीय किंवा सामाजिक दृष्टया दुर्गति झाली हे पंडितजींनी आपल्या वेदसंबंधित लिखाणातून परोपरीने सिद्ध केले आहे.

गेले ते गंगेला मिळाले, असे मानून आपल्या हातून होईल ते करावे म्हणून पंडित-जींनी जो प्रचंड उद्योग आरंभला, त्यात आजउद्या ( १९६७–६८ ) चालू राहणारा कार्यक्रम म्हणजे ऋग्वेदाचे सुबोध भाष्य आणि महाभारताचा हिंदी अनुवाद होय. महाभारतही पाचवा वेदच. पाचही वेद निवृत्तिपर नसून प्रवृत्तिपर आहेत. त्यांचे तत्त्वज्ञान ऐहिकाकडे पाठ फिरविणारे नसून ऐहिकाचा उत्कर्ष साधणारे आहे व स्त्रीजातिबद्दलही परमादर दाखविणारे आहे. ही सत्य दृष्टि समाजात निर्माण व्हावी ही पंडितजींच्या अंतःकरणाची आच आहे. वैदिककाळामध्ये **' यद्देवा अकुर्वन् तत् करवाणि । '** जसे देवांनी केले तसे आम्ही करू, असे साधक म्हणत व देवाप्रमाणे आचरण ठेवीत. ईश्वरच कर्म करून मोठा झाला. सर्व मानवजाति मिळून प्रजापतीचे रूप आहे. या अखंड विश्वरूपाची सेवा झाली पाहिजे. असा एकंदरीने रोख आहे. सर्व लोक हेच प्रकट परमेश्वराचे स्वरूप आहे. यालाच मानवी रूपात प्रकट झालेला ' विश्वरूप ईश्वर ' असे म्हणतात. म्हणून प्रत्येक व्यक्तीने समर्थ बनावे व सर्व समाजासाठी आपल्या जीवनाचा यज्ञ करावा. हा जीवनाचा नियम आहे. ' समा म्हणजे सेवा. ' सेवाभावाचा विस्तार करून विश्वरूप ईश्वराची आराधना करणे वेदप्रतिपादित सनातनधर्म होय.

आपला हा भारतदेश आपल्या अनुपम संस्कृतिविषयी नेहमीच सगळयाच जगाचे लक्ष वेधून बसलेला आहे. शतकानुशतकांच्या गुलामीनंतर आज जगाला देण्यासारखे काही भारताजवळ असेल तर त्याची संस्कृतिच होय. मुसलमानानी आणि फिरंग्यानी शेकडो–हजारो अत्याचार, अनाचार व छळ केले तरी भारताची संस्कृति खुरटली नाही, दुरमुखली नाही की तुरमुडली नाही. सगळया जगाचे डोळे उघडण्यापूर्वी भारत आपल्या संस्कृतिनिशी जगाच्यापेक्षा वैभवात होता. जगाच्या रंगपटातून युनानी, मिसर, रोमन अशा संस्कृति दूर झाल्या; पण भारतीय सस्कृति जीव धरून आहे. याचे कारण या संस्कृतिच्या मागे जिव्हाळा आहे. तो त्या संस्कृतीचा स्रोत सुकू नये त्याची काळजी घेत असतो. तो जिव्हाळा म्हणजे वैदिक साहित्य होय. **' इह चेदवेदीदथ सत्यमस्ति न चेदिहावेदीन्महती विनष्टिः । भूतेषु भूतेषु विचिंत्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति ॥ '** यावरून असे समजणे आवश्यक आहे की

भौतिक सृष्टीचा अभ्यास ब्रह्मविद्येच्या अभ्यासाला अत्यंत आवश्यक आहे. ही गोष्ट केनोपनिषदाला पूर्णपणे मान्य आहे. विद्युच्छक्तिप्रमाणे आधिदैविक तत्त्व आणि अंतःकरणाप्रमाणे आधिभौतिक तत्त्व ही ब्रह्मतत्त्वाला ओळखण्याची चिन्हे आहेत. सर्व उपनिषदांचे मूळ जे ईशावास्योपनिषद् त्यात प्रतिपादिलेले सर्व सिद्धांत ब्रह्म-विद्येचे मूळ सिद्धांत ठरले आहेत. या उपनिषदांत ब्रह्मज्ञानाला विज्ञानशास्त्राची अत्यंत आवश्यकता असल्याचे निःसंदिग्धपणे प्रतिपादन केले आहे. जीवनात क्षुद्र-पणा उत्पन्न करील असा एकही विचार वेदामध्ये मांडलेला नाही. म्हणून बलसंपन्न, आत्मनिर्भर, व निर्भय मनोवृत्तीमुळे शकहूणादि असहिष्णु आक्रमकाना भारतीय उज्ज्वल परंपरेने स्वतःशी समरसवून टाकले, त्याच मनोवृत्तीचे रसायन भारतीयानी व विशेषतः वेदानुयायानी सातत्याने सांभाळले पाहिजे. ' कोणाच्या धर्मास विरोध करणे हे आपले धर्मापासून सुटणे व ईश्वराचे लिहिले रद्द करून त्याजवर दोष ठेवणे आहे. ' ही शिवाजीमहाराजांची सहिष्णुधारणा पराक्रमी जीवनाच्या पार्श्व-भूमीवर उठून दिसली, हा इतिहास आहे. स्वाधीनतेने जगामधील सर्व सुखांचा उपभोग घेण्याची उत्कट इच्छा बाळगणे वैदिक आर्यांच्या निकोप व उमद्या मनाचे लक्षण आहे. आयते मिळालेले धन तिरस्कारार्ह आहे अशी भावना ऋग्वेदात ऋषींनी प्रकट केली आहे.' **न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः।** ' हा त्यांचा महामंत्र. अविश्रांत परिश्रम करण्याची तयारी असणाराना संकटांची व अडचणींची काय मातब्बरी ? धैर्याने व धीमेपणाने पाऊल पुढे टाकत राहण्यासाठी अथर्ववेदात बहारीचे उद्गार असे आहेत की– ' ज्याप्रमाणे द्युलोक व पृथ्वी, दिवस व रात्र आणि सूर्य व चंद्र ही द्वंद्वे कोणालाही न भिता असंदिग्धपणे पुढेच चाललेली असतात, त्याचप्रमाणे माझ्या प्राणा, तू कधीही भय न बाळगता निरंतर प्रगमनशील रहा. '

वैदिकानी शास्त्रीय प्रगति करून समृद्धीचे सुवर्णयुग निर्माण केले होते. त्यांचे यज्ञ हे शक्तींचे संचय आणि शास्त्रांचे उगमस्थान ठरत. रोगराई व दारिद्र्य यांच्या संपर्कापासून संरक्षण होऊन पृथ्वीवरच स्वर्गाचा साक्षात्कार झाला पाहिजे या हिय्याने वैदिक आर्य चालत. ते वर्धिष्णु प्रागतिक होते. इहलोक व परलोक यांचा सांधा त्यानी सांधलेला होता. जगाला गवसणी घालणारे, ' **एकेन विज्ञातेन, सर्वमिदं विज्ञातं भवति।** ' हे उपनिषद् वचन सार्थ करून, समर्थतेच्या व संपन्नतेच्या पार्श्वभूमीवरच वैदिक आर्यांच्या त्यागाच्या भाषेला तेज चढते. वेदकालीन आर्यांच्या युयुत्सु व प्रयत्नपुरुषार्थी दृष्टिकोणाचा अंगीकार करणे, त्यांची परंपरा सांगणाऱ्या भारती-यानी आपले अचूक कर्तव्यच मानले पाहिजे. हे केवळ पुरुषापुरतेच नाही. भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण स्थान असलेले वेद सांगतात की, शिक्षण आणि सामाजिक संस्कार यात स्त्रियांच्या मनबुद्धीच्या विकसनाला आणि वापराला पुरुषांच्या बरोबरीने प्राधान्य मिळाले पाहिजे. भारतीय संस्कृतीचा इतिहास पाहिला तरी तेथे पुरुषांच्या बरोबरीने स्त्री तत्त्वज्ञानी, स्त्री संशोधक, स्त्री कवयित्री, आणि स्त्री प्रशासक बहु-

संख्येने आढळतात. स्त्रीच्या अंगभूत गुणकर्तृत्वाच्या जोरावर स्त्री मोठेपणाचे कोणतेही शिखर गाठूं शकते.

स्त्रीपुरुषासारखे नैसर्गिक किंवा माणसामाणसांच्या '**गुणकर्मविभागशः**' निर्माण होणारे चातुर्वर्ण्यादिक, मनुष्यकृत काही भेद असले तरी सर्वच सर्व हिंदुस्थान, एकच एक राष्ट्र मानून, सर्व व्यवहार करावयाचे असा वैदिक आर्यांचा शिरस्ता होता. त्याची साक्ष म्हणजे वैदिक राष्ट्रगीत. पहा त्यातला एक एक शब्द—

'**आ ब्रह्मन् ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायताम् । आ राष्ट्रे राजन्यः शूर इषव्योऽतिव्याधी महारथो जायताम् । दोग्ध्री धेनुर् वोढानड्वान् आशुः सप्तिः पुरन्ध्रिर् योषा जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवास्य यजमानस्य वीरो जायताम् । निकामे निकामे नः पर्जन्यो वर्षतु फलवत्यो न ओषधयः पच्यन्तां । योगक्षेमो नः कल्पताम् ॥**' ( वा. यजु. २२।२२ )

'हे ब्रह्मन्, आमच्या राष्ट्रात अध्यात्मशास्त्रात निष्णात असा ब्राह्मण जन्माला येवो, शत्रूला धैर्याने तोंड देणारा क्षत्रियवीर जन्माला येवो, तसे दुधाळ गाई व शक्तिशाली बैल आणि वेगवान् घोडे निर्माण होवोत, आमच्या राष्ट्रात विदुषी स्त्रिया निर्माण होवोत; हसतमुख निरोगी, सुदृढ व हुशार मुले जन्माला येवोत. वेळच्या वेळी पाऊस पडो. आमच्या श्रमाने वाढविलेल्या वनस्पतिना गोड फळे येवोत. राष्ट्रात सुखशांतीचें साम्राज्य नांदो.' आणखीही अशी प्रार्थना की—

'आमच्या राष्ट्राची समाजधारणा '**सत्यं, शिवं, सुंदरम्**' याच त्रयीवर आधारलेली ध्रुव असो. समाजधारणेच्या स्वकर्तव्याची जाणीव प्रत्येकाच्या अंतःकरणात सदैव ठसत राहो. ज्याने आपण शहाणे, शहाणे होत जातो, ज्याने आपण आजच्यापेक्षा उद्या व उद्यापेक्षां परवा प्रगत होत राहू आणि ज्याने आपले व्यक्तित्व व व्यक्तिमत्व प्रगट होत राहील ती विद्या हे '**विद्याधनम् सर्वधनप्रधानम्**' हे आमच्या सदैव सदैव लक्ष्यात राहो.

**प्राणानामनिलेन वृत्तिरुचिता सत्कल्पवृक्षे वने ।**
**तोये कांचनपद्मरेणुकपिशे धर्माभिषेकक्रिया ॥**
**ध्यानं रत्नशिलातलेषु विबुधः स्त्रीसंन्निधौ संयमो ।**
**यत्कांक्षन्ति तपोभिरन्यमुनयस्तस्मिंस्तपस्यन्त्यमी ॥**

'जी स्वर्गसुखे मिळवण्याकरता पृथ्वी व इतर मुनिजन घोर तपश्चर्या करीत असतात, ती सर्व सुखे यांच्या सन्निध असूनही त्यांच्याविषयी पूर्णपणे निस्पृह बनून, हे आपली थोर तपश्चर्या चालूच ठेवतात; असे ज्यांच्यासंबंधी सर्वत्र हृदयस्पंदन होत राहील, असे आदर्शपुरुष आमच्या राष्ट्रात सातत्याने झळकोत.'

या वैदिक राष्ट्रगीतावरून स्पष्टच आहे की ऐहिक उन्नतिकडे पूर्णपणे लक्ष देण्यात वैदिक कमीपणा न मानता अभिमानच बाळगत होते. धर्मकारण, राजकारण

आणि आध्यात्माधिष्ठित समाजजीवन यांच्या सहकारसमन्वयावर येथे भर असून अभ्युदय आणि नि:श्रेयस यांची प्राप्ति म्हणजेच जीवनसार्थकता मानली आहे.

मानव हा इतर भौतिक वस्तुप्रमाणे निसर्गाचा एक घटकच आहे; पण तो केवळ जड नाही. 'अस्थिचर्मांचा एक गोळा' एवढाच त्याचा मालमसाला असता तर सात 'बार' साबण करण्याएवढी चरबी, नऊ हजार पेन्सिली करता येतील एवढा कार्बन, बावीसशे आगकाड्या करावयास पुरेल एवढा फॉस्फरस, मोठासा खिळा करण्यास सापडेल एवढे लोखंड, व पंचवीस विड्याच्या पानांला लावता येईल इतका चुना, एवढ्यांच्या रसायनाची जी किंमत तेवढेच त्याचे मूल्यमापन सर्रास झाले असते. पण निसर्गानेच त्याच्या ठिकाणी जी बुद्धि दिलेली आहे, तिचा वापर करून तो निसर्गनिर्मित सर्व वस्तूंचा वापर बऱ्यावाईट तऱ्हेने करू शकतो आणि आपल्या सारख्याच दुसऱ्या मंडळीशी सहकाराने वा तेढीने वागू शकतो. म्हणून त्याला 'समाजसन्मुख' वा 'सामाजिक' अथवा 'राजकारणी' किंवा 'अर्थव्यवहारी' प्राणी असे शास्त्रज्ञ म्हणत आले आहेत. तरीही माणसाची यथातथ्य कल्पना यावयाची असल्यास यमाने नचिकेतास सांगितल्याप्रमाणे, जो बहिर्गामी इंद्रियाना आवरून अंतर्मख होतो व स्वत:ला जाणतो, तो अमृतत्त्व मिळवतो (कठोपनिषद् २।१।१). ही माणसाची व्याख्या समजून घेतली पाहिजे. मनुष्य सामाजिक प्राणी झाला तरी, त्याला स्वत:ला चांगल्या तऱ्हेने जगता येऊन समाजातील तेजस्वियांचा तेजोभंग न करता व न होता, त्याने चांगले जीवन जगले पाहिजे; म्हणजे तो धर्म पाळतो, असे चालले पाहिजे. त्याचा प्रारंभ प्रपंचापासून होतो. '**आधी प्रपंच करावा नेटका**' तर कुटुंबातील व्यक्तिशी जमवून घ्यावे लागते; एकंदर समाजाचे हिताहित पहावे लागते; तेव्हा या साऱ्या गोष्टींचा नीट सारासार विचार करून स्वतःच्या व समाजाच्या अभ्युदयाचा मार्ग कोणता, हे माणसाने निश्चित ठरविले पाहिजे. तरच भौतिक वैभवही मिळेल व चित्तशांतिही लाभेल. वेदोपनिषदापासून रामायण–महाभारत–गीतांचा हा उपदेश भारतीयाना आहे.

अभ्युदय–नि:श्रेयसांचा जीवनांत लाभ करून घेण्यासाठी भारतीयांच्यापुढे व त्यांच्याद्वारा मानवसमाजापुढे वेदाने ज्या महान् जीवनाचा आदर्श ठेवला आहे आणि ज्याने भारतीय मृत्युंजय संस्कृतीला जन्म दिला आहे, त्याची मूलतत्त्वे १५ असून प्रबुद्धानी त्याचे सतत चिंतन व मनन करणे आवश्यक आहे.

१ सर्वत्र एकच चैतन्यतत्त्व भरून राहिले आहे. ( **एकमेवाद्वितीयं ब्रह्म** ).

२ सर्व काही परब्रह्मच आहे.

३ सर्व काही गतिमान् आहे.

४ सर्व काही ज्ञानमय आहे.

५ गति नियमबद्ध असून ती कर्मतत्त्वाने नियंत्रित आहे. पुनर्जन्म हे तत्त्व या कर्मतत्त्वाशीच संलग्न आहे.

*

६ सप्तलोकात्मक विश्व आणि त्याचे घनविरल अवस्थानुसार विभाजन.
७ विश्वातील घटकांचा परस्पराश्रय.
८ योग आणि यज्ञ.
९ अनुभूतिवाद.
१० साधनांना अनेकता.
११ विश्वात्म होणे व मानवमात्राला विकसित करणे हे ध्येय ( कृण्वन्तो विश्व-मार्यम् । )
१२ ईश्वरस्वत्ववाद.
१३ चातुर्वर्ण्यात्मक समाजरचना आणि त्या रूपाने बुद्धिबल, शरीरबल, धनबल आणि श्रमबल समष्टिरूप परमेश्वराच्या चरणी समर्पण करण्याची सूत्रबद्ध योजना.
१४ भोगत्यागात्मक समाजरचना आणि वर्गसमन्वय.
१५ भौतिक आणि आधिदैविक सामर्थ्यसंपन्नता आणि देवजीवन–निर्मितीसाठी सामर्थ्यसंपन्नतेचा सदुपयोग.

या मूलतत्त्वांचा विचार करून ती आचरणशुद्ध राखण्याचा आटोकाट प्रयत्न करणारांचा प्रत्ययप्रबंध समाजात, राष्ट्रात व मानवजातीत होत राहण्यानेच केव्हा-तरी ' पितृत्व परमेश्वराचे व बन्धुत्व मानवांचे ' ही विश्वैक्याची परिस्थिति निर्माण होणार आहे. ' कृण्वन्तो विश्वमार्यम् । ' असा भारतीय वेदादि वाङ्मयाचा आदेश साकार करावयास भारतीयानीच पुढाकार घेतल्याशिवाय कसे भागेल ? भारतीय संस्कृति सर्वशुभसमावेशक आहे. ' आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतो । ' ( विश्वा-च्या चारी दिशातून शुभ नि सुंदर विचार आम्हाला प्राप्त होवोत ) हे ऋग्वेद-कालापासूनचे भारतीय संस्कृतीचे ब्रीद आहे. तेच पुढे चालविण्याची जबाबदारी भारतीयांचीच सर्वप्रथम आहे. हे संशोधनपूर्वक सिद्ध झालेले आहे.

पंडितजीच्यापूर्वी शंकर पांडुरंग पंडित ( १८४०–१८९४ ) यानी अथर्ववेदाचे मोठ्या परिश्रमाने संपादन करून विद्वानांना उपकृत केले होते. तसेच ऋग्वेदाचे इंग्रजी व मराठी सटीप भाषांतर करण्यासही प्रारंभ केला व पहिली चार मंडळे पुरी केली. वैदिक वाङ्मयाच्या संपादनाच्या या सार्वजनिक पूर्वपीठिकेबरोबरच पंडितजींच्या जन्मभूमी-तीलच पूर्वपीठिका येथे उल्लेखली तर अधिकच उचित ठरेल. दत्तात्रय वासुदेवशास्त्री निगुडकर ( १८६३ ते १९१८ ) या महाराष्ट्रीय व्युत्पन्नाचे घराणे सावंतवाडीस याज्ञिक, ज्योतिषी व वेदांती म्हणून प्रसिद्ध असे. दत्तात्रेयशास्त्र्यांचे प्रारंभीचे शिक्षण वे. बाळकृष्णशास्त्री माइणकर यांच्यापाशी झाल्यावर पुढील शास्त्राध्ययन इंदुरास साठे–पाध्येशास्त्री व महामहोपाध्याय कऱ्हाडकर याजजवळ झाले. मग दत्तात्रेय-शास्त्री निगुडकरानी राजापुरास संस्कृत पोथ्यांचा मोठा संग्रह करून संशोधकीय अभ्यासाची सोय करून दिली. डॉ. भांडारकरानी राजदक्षिणा देवविलेल्या विद्वानात

निगुडशास्त्री होते; याच संदर्भात वैदिक पंडित महादेव मोरेश्वर कुंटे ( १८३५ ते १८८८ ) यांचा उल्लेख न करणे अनुचित ठरेल. ' आर्यसंस्कृतीची स्थित्यंतरे ' या अर्थाचा त्यांचा इंग्रजी ग्रंथ त्यांच्या वैदिक संशोधनातील तज्ज्ञतेची साक्ष आहे. त्यानी ' षड्दर्शनचिंतनिका ' हे मासिक ही चालविले होते. त्यात ते दर्शनावर इंग्रजी–मराठी भाष्य लिहित. या सर्व पूर्वसूरीवर खरोखर ताण कोणी केली असेल तर सर जॉर्ज आब्राहाम ग्रियर्सन ( १८५१–१९४१ ) यानी होय. वयाच्या तेविसाव्या वर्षी सनदी नोकर म्हणून हिंदुस्थानात आलेल्या या इंग्रजाने या देशातील दोनशे भाषांचा अभ्यास करून त्यांच्या पाहणीचे पुस्तक प्रसिद्ध केले व त्यांची व्याकरणे लिहिली. निबंधमालेच्या जन्मकाली हिंदभूमीवर पाय ठेवलेल्या या अभ्यासकाने १८७७ सालीच म्हणजे पंडितजींच्या दहाव्या वर्षीच कालिदासावर पहिला निबंध प्रसिद्ध केला होता. तेथपासून त्याच्या ग्रंथमालेने त्याला ' मूर्ध्नि वै लोकस्य ' स्थान मिळाले. भारतीय माणसाने तसे स्थान मिळविले पाहिजे, ही निबंधमाला प्रवर्तित नवजागृतीची अपेक्षा होती. त्या दिशेने पाऊल टाकण्याचा प्रयत्न अगदीच झाला नव्हता असे नव्हे; पण महादेव चिमणाजी आपटे ( १८४५–१८९४ ) यानी पुण्यास काढून ठेवलेल्या आनंदाश्रमात संस्कृत ग्रंथांच्या जीर्णोद्धारार्थ दहा–बारा अभ्यासूंची सोय असली तरी त्या संस्थेकडून ग्रियर्सनच्या सारखा कामाचा उठाव डोळयात भरण्यासारखा झाला नाही. त्यामानाने डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर ( १८८४–१९३७ ) यानी आपल्या ज्ञानकोशाच्या पाच प्रस्तावनाखंडातून प्राचीन वेदविद्येचा व प्राचीनकाळातील संस्कृतीचा विस्तृत परिचय करून दिला आहे, तो कितीतरी उद्बोधक ठरलेला आहे.

पंडितजी सातवळेकरानी या आपल्या पूर्वसूरींच्या दृष्टिकोनांचे सूक्ष्म ग्रहण केले असून आपला म्हणून हातचा घातला आहे. तो असा की वैदिकदेवतांची संहिता वेगळी काढली आहे. संस्कृतीच्या अभ्यासात व इतिहासात देवतांच्या उदयाचा व विकासाचा विचार अत्यंत महत्त्वाचा असतो. एकाद्या देवतेच्या उदयापासून तो थेट तिच्या अत्युच्च विकासापर्यंत समाजमानसातील सर्व प्रक्रियांचा डोळस आढावा घेतल्यास त्या समाजाची उन्नति कसकशी होत गेली आहे, हे सहज समजते. म्हणजे मानवी मनाच्या वैचारिक आंदोलनातूनच त्याची भावनिक मूर्तिही पडताळता येते. पंडितजींनी तयार केलेल्या वैदिक देवतासंहितेवरून आणि अन्यत्रीच्या विषयवारीने केलेल्या मंत्रसंग्रहावरून, पंडितजींनी वेदवाङ्मयातून एक गोष्ट स्पष्ट केली आहे. ती ही ' **जे पिंडी तेच ब्रह्मांडी** ' हे सत्य असून मानवी व्यक्तिने व्यतीत करावयाचे जीवन परमेश्वराच्या अमृतपुत्राचे जीवन असल्याकारणाने, ' **युवा स्यात् साधु युवा स्यात् आशिष्टो वरिष्टो बलिष्टः, तस्य इयं सर्वा पृथ्वी वित्तेन पूर्णा स्यात्... स एको मानुषानंदः ॥** ' अभ्युदयाची ही विचारसरणी मानुषानंदाचे हे सामर्थ्य व्यक्तिच्या आटोपाबाहेरचे नाही.

व्यक्तिजीवनात मानुषानंदाची सर्व सामर्थ्ये प्रगट होण्यास व्यक्ति ज्या समाजात व राष्ट्रात नांदत असते, त्या समाजात व राष्ट्रात समरस व सादर होऊन सामुदायिक सामर्थ्याची तेजस्विता वाढविण्याचाही प्रयत्न व्यक्तिवैशिष्टयाने त्या व्यक्तिकडून व्हावा लागतो. तसे करताना आपल्यातील ' उत्कट, भव्य, दिव्य, असेल नसेल ते समर्पण-बुद्धीने समाजसेवेला व राष्ट्रसेवेला लावावे लागते. म्हणून व्यक्तिने स्वतःला ' **मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव ।** ' एवढेच म्हणून भागणार नाही; तर ' **राष्ट्रदेवो** भव । ' असेही निक्षून म्हटले पाहिजे. याचीच परिणति पुढे पाठीमागें ' निरीच्छ बुद्धीने मनुष्यमात्राच्या कल्याणासाठीं झटणे हेच धर्माचे खरे तत्त्व होऊन बसण्यात होईल.' म्हणजेच '**हे विश्वचि माझे घर।**' ऐशी थोर मति माणसा–माणसाची होत जाईल. तिचा साक्षात्कार व्हावयास, मनुष्याच्या अंतःकरणात परमेश्वराने प्रेरिलेल्या न्याय-वासनेमुळे मनुष्यामनुष्यामधलाच काय, पण राष्ट्राराष्ट्रामधला प्रत्येक व्यवहार एकमेकांच्या संमतीने चालावा लागेल. त्यासाठीच ' विश्वराज्यातील देवतांचे कार्य ' ( विश्वराज्यमें देवताओंका कार्य ) पंडितजींच्या सूक्ष्मदृष्टीतून समजावून घेतले पाहिजे आणि व्यष्टि–समष्टि जीवनाची वेदानी जी साखळी जोडून दाखविली आहे, तिचा अभ्यासपूर्वक आचार केला पाहिजे. त्याचबरोबर, दृश्य, दृष्ट आणि अदृष्ट अशा सर्व स्वरूपानी प्रतीत होणारा परमेश्वर ओळखण्याची आणि त्याची ओळख पटल्यावर त्याच्याशी जीवेभावे समरसच नव्हे, तर तल्लीन होण्याची संवय लावून घेतली पाहिजे. ती संवय व्हावयास वेदातील समाजव्यवस्थेची आणि राज्यकारभाराची व विश्वसंचालनाची सूक्ते आणि सूत्रे नीट समजावून घेतल्यास, ' **जे का व्यर्थ परार्थहानि करिती, ते कोण की दुर्मति ।** ' अशी माणसे चुकूनही होणार नाहीत. पण उलट, आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्याला हानि पोचविण्याचा तमोगुण हळूहळू ती सोडू लागतील. आपला स्वार्थ साधताना दुसऱ्यांचाही फायदा होऊ दे म्हणणाऱ्याना रजोगुणातून बाहेर पडून जे काही करावयाचे ते चांगलेंच, कल्याणकारी करीत राहू या सात्त्विक वृत्तीवर येऊन ' **स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमान् एकः सतामग्रणीः ।** ' होण्याची आकांक्षा बाळगावी लागेल. स्वतःच्या आत्मिक उन्नतीच्या पाठीमागेच माणसे लागतील आणि शेवटी या सज्जनपणाचे पर्यवसान ' **आता । उरलो उपकारापुरता ॥** ' या वृत्तीत होऊन ' **आहे तरी सर्वाठायी । पाहो जाता कोठेच नाही ॥** ' अशा निर्गुण अवस्थेला माणसे पोहोचतील. विश्वरूपे नटलेला परमेश्वर अर्थात् जगच्चैतन्य याच्यात लीन, होऊन जाण्याची ती अवस्था म्हणजेच मोक्ष, निर्वाण, ' **तुका झालासे पांडुरंग ॥** '

पंडितजींच्या वैदिक संशोधन–सूक्ष्मतेचे प्रस्तुत लेखकास प्रतीत झालेले उद्‌बोधन हे असे आहे. ते समर्थ रामदासांच्या उद्‌बोधनाशी मिळते जुळतेही आहे. प्रपंच हा परमार्थाच्या इतकाच मोलाचा आहे, असा स्पष्ट व सविस्तर विचार आपल्या ' **वेदान्तसंमतीचा काव्यसिंधु भरला** ' अशा दासबोधात रामदासानी सांगितला आहे.

प्रपंच व परमार्थ अशा वेगळ्या कल्पना घेऊन या जगाबद्दलच्या दृष्टिकोणाची स्पष्टता रामदासाइतकी कोणीच केली नाही. आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या आधारे प्रपंच व परमार्थ यांच्यात सुसंगति स्थापन करणे हे समर्थ वाङ्‌मयाचे मुख्य वैशिष्टच होय. ' **प्रपंच नेटका करता, फिका होत जातो.** ' किंबहुना प्रपंच परमार्थ ज्याच्या योगाने होतो, असा मार्ग स्वामींनी आपल्या ग्रंथात मांडला आहे. राज्यधारी तत्त्ववेत्ता असावा; माणसाचे न्यायनीतीचे राज्य तोच निर्माण करू शकतो; अशी रामदासांची धारणा आहे. ' **मनु चक्रवर्ती झाले येणेचि न्याये ।** ' असा जाणिवेच्या अधिष्ठानासंबंधी दृष्टांत त्यानी दिला आहे. जाणिवेच्या अधिष्ठानाचे विवरण म्हणजे विश्वाच्या परमेश्वरी अधिष्ठानाचे विवरण. तिला रामदासांनी राजसत्ता म्हटले आहे. त्याचा अभिप्राय असा—

' विश्वाचा अनंत पसारा आहे. त्यात अव्यवस्था नाही. उत्पत्ति व लय यांचा क्रम अगदी व्यवस्थित रीतीने बांधला गेला आहे. अनंत प्राणि व अनंत मनोवृत्ति आहेत. परंतु त्यात नियमबद्धता आहे. या विश्वव्यवस्थेचे सूत्रसंचालन करणारी एक गुप्त राजसत्ता आहे. ती ईश्वरीसत्ता. स्वामी म्हणतात—

**अनंत राजकारणे धरणे । कुबुद्धि सुबुद्धि विवरणे ।**
**कळी नेदणे चुकावणे । प्राणिमात्रासी ॥** ( दा. १६।८।२० ).

अशा त्या परमेश्वरी सत्तेचे अनुकरण करून, मनुष्यमात्राशी निष्काम मैत्री ठेवून, मानवी समुदाय न्यायनीतिने वर्तविण्याची, सामुदायिक जीवन पवित्र ठेवण्याची, आणि सामाजिक अनवस्था नष्ट करण्याची ' **विवेके कार्यसाधना** ' करणे हे समाजाच्या नैतिक नेतृत्वाचे कर्तव्य आहे. महंताला शस्त्र हाती धरून दुर्जनसंहार करता येणार नाही असे नाही; पण त्याने तसा करू नये. महंताची व विवेकसंपन्नाची चाल मानव्याच्या श्रद्धेची, क्षमेची व स्वतः सर्व आघात सोसून दुर्जनांचा हृदयपालट करण्याची असते. निःस्पृहपणे व अलिप्तपणे सर्वत्र समभाव, अद्रोह, नातिमानिता, अहिंसा यावर अवलंबून महंताला, विचारवंताला वा विवेकीला हृदयपरिवर्तन करावयाचे असते ते अगदीच गुप्तरीतीने ! पंडितजींनी मांडलेली विश्वराज्याची कल्पना आणि तीमधील विवेकी भक्तीने विचारवंतानी करावयाचे कार्य यांचा स्वामी समर्थांच्या प्रतिपादनाशी पुष्कळसा मेळ बसत नाही काय ?

: ३३ :

# उपनिषदांचे उत्कीर्तन

**वेदाविषयी श्रद्धा,** वेदोक्त मंत्रानीच सर्व संस्कार साधणे, चातुर्वर्ण्याला अनुसरून गुणकर्मविभागशः आपापली कर्तव्ये करणे व वैदिक आश्रम–सुव्यवस्था मान्य करून त्यातून शक्य तितक्यांचे पालन करणे, हिला सर्वसामान्यतः वैदिक परंपरा म्हणता येते.

या वैदिक परंपरेने जगात माणसाने नुसते वागावयाचेच नसून आपल्या वैदिक परंपरेचा प्रभाव सगळ्या जगावर आपल्या चारित्र्याने आणि ऐहिक व पारमार्थिक प्रगति–वैभवाच्या तेजाने पाडून, जगालाही त्या परंपरेने वागण्यातच सार्थकता वाटावी, असे करण्याबद्दल वेदांचा आदेश आहे तो अमलात आणावयाचा तर त्या परंपरेने साधावयाचे ध्येय किंवा सत्य स्वतःला प्रतीत झालेले असावयास हवे आणि जगाला पटवून देता आले पाहिजे. ध्येय किंवा अंतिम सत्य शोधू गेल्यास वेदांचा सूक्ष्म अभ्यास हवा. सूक्ष्म अभ्यास करणारांचा आढळ असा आहे की वैदिक परंपरेचे अंतीम सत्यही ऋषिमुनींच्या वैचारिक दृष्टिपथात संपूर्णतेने आले होते व त्याचे विशदीकरण त्यानी उपनिषदातून बिनचूकपणे केले आहे.

अंतीम सत्य हा उपनिषदांचा विषय आहे. अंतीम सत्याच्या ज्ञानाने परमपद किंवा मोक्ष प्राप्त होतो. म्हणून अंतीम सत्याचा शोध करून घेतला पाहिजे, असा उपनिषदांचा अभिप्राय आहे. अंतीम सत्याचे ज्ञान म्हणजे परतत्त्वाचे दर्शन. परतत्त्वाचे दर्शन हीच परमप्राप्ति. हाच मोक्ष. उपनिषदे म्हणजे वेदांचा गुह्यार्थ प्रकट करणारे आणि ऐहिक बंधने तोडून व अज्ञानाचा नाश करून मुख्य चैतन्यतत्त्वाची ओळख करून देणारे वेदाचेच भाग ! त्याविषयी श्रीशंकराचार्यच म्हणतात की—

**' यथा य इमां ब्रह्मविद्यामन्त्यात्मभावेन श्रद्धाभक्तिपुरः सराः सन्तस्तेषां**

गर्भजन्मजरारोगाद्यनर्थपूगं निशातयति परं वा ब्रह्म गमयति, अविद्यादिसंस्कारकारणं चात्यन्तमवसादयति विनाशयतीत्युपनिषद् उपनिपूर्वस्य सदेरेवमर्थस्मरणात्।'

ही उपनिषदे मुख्यत्वे करून ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडूक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, श्वेताश्वेत व कौशितकी त्यात मुख्य आहेत. या प्रमुख उपनिषदांचा उहापोह जितका दक्षतेने होतो तितका एकंदर एकशे आठ उपनिषदांचा होत नाही.

औपनिषद् वाङ्मयावरील प्रसिद्ध झालेल्या समीक्षणात्मक ग्रंथात गुरुदेव रा. द. रानडे ( १८८६ ते १९५७ ) 'The Constructive survey of the Upanishads' आणि डॉ. श्री. कृ. बेल्वल्कर यांच्या The creative period या दोन ग्रंथांचा प्रामुख्याने विचार केला पाहिजे. बेलवलकरांच्या ग्रंथात औपनिषदिक वाङ्‌याचे चिकित्सापूर्वक संशोधन करून त्याचे ब्राह्मण, ब्राह्मण–औपनिषद्, औपनिषद् आणि नवऔपनिषद् असे चार भाग ऐतिहासिक दृष्ट्या पाडले आहेत. त्यातील विवेचनामागील शास्त्रीयदृष्टि व बारकावा अत्यंत प्रशंसनीय आहे. रानड्यांच्या ग्रंथात विचारांच्या दृष्टीने उपनिषदांचे पृथक्करण झाले असून, विश्वोत्पत्ति, मानसशास्त्र, प्रमाणशास्त्र, नीतिशास्त्र, प्राण्यांची मरणोत्तर गति इत्यादि विषय–विभागवार सुसूत्र मांडणी झाली आहे. गूढवादाच्या किंवा साक्षात्कारवादाच्या मध्यवर्ती सूत्रात औपनिषदिक विचारांची गुंफण झाली असून तेच त्या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. वाईच्या प्राज्ञपाठशाळेच्या तर्कतीर्थ जोशीनी 'उपनिषत्कांड' प्रसिद्ध केले असून, उपनिषदातील विचार मुख्यत: ज्याभोवती फिरतो त्या पुरुष–ब्रह्म–आत्मा या तीन कल्पनांची प्राचीन कालापासून ऐतिहासिक उत्क्रांति दाखविली आहे. वैदिक संशोधनमंडळ ( पुणे ) तर्फे आचार्य वि. प्र. लिमये व प्रा. रं. द. दांडेकर यानी संपादिलेला '१८ मुख्य उपनिषदे' या ग्रंथातील सूचिप्राचीन भारतीय संस्कृति व तत्त्वज्ञान यांच्या अभ्यासकाना आवश्यक अशीच आहे. या सर्वापेक्षा 'उपनिषदांचा वास्तविक बुद्धिवादी अर्थ' या विद्वान के. ल. दप्तरी ( १८८०–१९५५ ) यांच्या ग्रंथात अध्यात्मविषयक विचारांचा ऐहिकनिष्ठ विचारशीलतेची द्योतक अशी जीवननिष्ठा विशद केलेली आढळते. आचार्य विनोबा भावे यांची औपनिषदिक प्रवचने आधुनिक जीवनातही स्फूर्ति देणारी ठरलेली आहेत. विद्यावाचस्पति सदाशिवशास्त्री भिडे यांचा 'उपनिषद्प्रकाश' आणि श्रीधरशास्त्री पाठक यांच्या ईश–केन–कठ–मुंडकोपनिषदावरील व्याख्या या ग्रंथांचा 'उपनिषदे' समजण्याच्या दृष्टीने अभ्यास होणे जरूरच होऊन बसते. आहिताग्नि राजवाडे यांचे 'ईशावास्योपनिषद्भाष्य' प्रवृत्तिवादी जीवनदर्शन देते, तेही अभ्यासनीयच आहे.

या सर्व विद्वत्ताप्रचुर ग्रंथांच्या मार्गदर्शनाने उपनिषदांचा संकलितपणे आढावा काढून विचार केला तर असे आढळते की ऐहिक व पारमार्थिक जीवनात 'आब्रह्मस्तंबपर्यंत' एकच ब्रह्म सर्वत्र भरून राहिले आहे असे वेदांत दोन्ही बाहु

उभारून सांगतो. ' **विश्वी विठ्ठल विस्तारला** ' असे तुकाराम महाराज सांगतात. सर्वभूतानुकंपा, ' **सर्वभूतहिते रतः,** ' आत्मौपम्यबुद्धि अशा असीम वैचारिक श्रीमंतीचे अंतीम सत्य वेदानी जगाला दिले. गगनचुंबी उंचीच्या हिमालय पर्वताप्रमाणे वैदिकधर्म हा सर्वात प्राचीन व श्रेष्ठ असून त्यातील अध्यात्मशास्त्राचा अखेरचा सारभूत आणि शिरोमणि सिद्धांत लोकमान्यांच्या शब्दानी सांगावयाचा तर ' परमेश्वर-स्वरूपाची पूर्ण ओळख होण्यास व त्याच भावनेने संकटकालीही सर्वांशी समतेने वागण्याचा अचल देहस्वभाव बनण्यास, अनेक संस्कारांची, इंद्रियनिग्रहाची, दीर्घोद्योगाची व ध्यान आणि उपासना यांचीं जरूर सततची असते. ' असा आहे. तोच अंतीम सत्य आहे. महात्मा गांधी तेच या शब्दानी सांगतात– ' अन्यायनिर्मूलनाच्या जनसेवेने आत्मशुद्धि होते, आत्मशुद्धीने अहिंसेचे पालन करता येते आणि अहिंसेने म्हणजेच प्रेमभावाने सत्याचे संपूर्ण दर्शन घडते व सत्य हाच परमेश्वर आहे. अखिल मानवजातीशी तादात्म्य पावल्याशिवाय मला माझ्या धर्माचे आचरण करता येत नाही. ' ठीक आहे. ते आचरण तरी कोणत्या धोरणप्रणालीने करावयाचे ? तर— ' **न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः ।** ' निढळाचा घाम गाळणारालाच परमेश्वर सहाय्य करतो.

' **नार्यमणं पुष्यति नो सखायं, केवलाघो भवति केवलादी ।** ' समाजाकरता जो देह झिजवीत नाही, केवळ स्वतःकरताच ज्याची दृष्टि मर्यादित आहे, असा खादाड हा पापी जीवन जगतो.

**ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ।**
**तेन त्यक्तेन भुंजीथाः, मा गृधः कस्यस्वित् धनम् ॥**

सर्व चराचर वस्तु या विश्वेश्वराच्या आहेत, स्वतःचे काही नाही; ही भावना दृढ करून तुझ्या योग्य वाटयाचा उपभोग घे. दुसऱ्याच्या वाटयाची हाव धरू नकोस.

' **अभयं मित्राद्, अभयं अमित्राद्, अभयं ज्ञाताद् अभयं पुरो यः ।** ' खोटया मित्रापासून अभय प्राप्त होवो. माहित असलेल्यांच्यापासून आणि माहित नसलेल्यांच्यापासून अभय प्राप्त होवो.

' **पश्येम शरदः शतम् । जीवेम शरदः शतम् ॥** ' शंभर पावसाळे पहावयास सापडोत, शंभर पावसाळे जगावयास सापडो.

आचारसंहितेची वरीलतऱ्हेची धोरणप्रणाली साकार करताना अभ्यासकाने जरूर लक्ष्यात वागविले पाहिजे की—

गुरूजींच्या अगदी संनिध बसून शहाणे होणे अथवा गुरूजींच्या जवळ जवळ स्थान मिळण्याची पात्रतासिद्धि हा ( उप + नि + सद् ) उपनिषद् याचा अर्थ असून कालांतराने त्या ज्ञानालाच तो शब्द रूढ झाला, असे दिसते. अर्थात् येथे ज्ञान अभिप्रेत आहे ते पारमार्थिक ज्ञान आहे. ' **अविद्या–विध्वंसिनी ब्रह्मविद्या** ' म्हणजे परा-

विद्येचा लाभ असा व्यापक अर्थ उपनिषदाचा प्रचलितच झाला. उपनिषदे ही भारतीयांच्या प्राचीन बुद्धिमत्तेची व अध्यात्मविषयक अलौकिक विचारवैभवाची अमर स्मारके आहेत. त्यातील विचारसरणी, प्रतिपादनशैली व भाषाशैली यांचे वैभव पाहून पाश्चात्य पंडित थक्क होऊन गेले व त्यानी भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व कबूल केले आणि करतात. पाश्चात्य राष्ट्रात अठराव्या शतकापासून जे जे महान् तत्त्ववेत्ते होऊन गेले त्या सर्वांच्या विचारावर उपनिषदातील तत्त्वज्ञानाची छाप पडलेली दिसून आली आहे.

' **सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः** ' होऊन जी गीता तयार झाली तिचे मूळ संस्कृतवरून इंग्रजी भाषांतर करणारा पहिला इंग्रज चार्ल्स विल्किन्स होय. गीतेतील विचारवैभव पाश्चात्त्यांच्या नजरेस त्यामुळे येताच, १७८५ नंतर संस्कृत भाषेचा अभ्यास युरोपात नेटाने झाला. १८१८ नंतर फ्रान्समधील पहिला संस्कृत प्राध्यापक ए. एल्. चेझी याचे हाताखाली फ्रान्सबॉप् या जर्मन पंडिताने संस्कृत शिकून संस्कृत व्याकरण व भाषाशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास प्रचलित केला. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धाचे शेवटी शेवटी फ्रान्समध्ये रुडोल्फ रॉथ हा वेदोपनिषदांच्या संशोधकी परंपरेचा जनक म्हणून प्रसिद्ध झाला. हिंदुस्थानातील प्रबोधन–कालखंडाचे जनक राजा राममोहन रॉय यानी १८१६–१८१९ या अवधीत केलेला प्रमुख उपनिषदांचा अनुवाद स्फूर्तिदायकच ठरला. श्री महादेव मोरेश्वर कुंटे ( १८३५ ते १८८८ ) यानी १८८० साली ' हिंदुस्थानातील आर्यसंस्कृतीची अवस्थांतरे ' हा ग्रंथ इटालीतील एका पारितोषिक स्पर्धेसाठी लिहून प्रसिद्ध केला. त्यात ऋग्वेदकालापासून अर्वाचीनकाळापर्यंत भारतीय जीवनाचे एक विशाल ऐतिहासिक समालोचन स्थूलमानाने आलेले आहे. ' वेदार्थयत्न ' च्या रूपाने डेक्कन कॉलेजातील प्रा. शं. पां. पंडित ( १८४०–१८९४ ) यानी ऋग्वेदाची काही मंडले अनुवादिली; प्रा. आबाजी विष्णु काथवटे ( १८४६–१९०७ ) यानी ऐतरेय व श्वेताश्वतर या उपनिषदांचा अनुवाद केला; आणि राजारामशास्त्री भागवत यानी वेद संस्कृत व प्राकृतभाषा, दैवते यावर स्वतंत्र विचाराने लेखनच लेखन केले. लो. टिळकानी ज्योतिःशास्त्रविषयक वचनांच्या आधारे ऋग्वेदाचा काळ ख्रिस्तपूर्व ४५०० वर्षे ठरविला.

' **वेदान्तो नाम उपनिषत्प्रमाणम् ।** ' मूळ रूपातील उपनिषद–वाक्येच वेदांतात प्रमाण असतात. उपनिषद् वाक्यास अनुकूल असतील ती शारीरिक सूत्रादिकेही ' वेदांतात ' समाविष्ट करण्याची चाल आहे. वेद–वेदांगांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणारा, नित्यनैमित्तिक कर्मांनी आणि उपासनेने ज्याचे अंतःकरण शुद्धच शुद्ध झालेले असते, तोच वेदांताचा अधिकारी होय. विवेक, वैराग्य. शमादि षट्कसंपत्ति व मोकळे मोकळे होण्याची इच्छा यानी जो तेजस्वी झाला, तो वेदांताचा पूर्णाधिकारी होय. वेदांताचा विषय असतो जीव–ब्रह्मांचे ऐक्य; शुद्ध चैतन्याचा साक्षात्कार

*

हे आहे वेदांतवाक्यांचे तात्पर्य. जीवमात्राच्या अज्ञानान्धकारास दूर करून स्वस्वरूपानंदाची प्राप्ति त्यास करून देणे हे असते वेदांताचे प्रयोजन. अज्ञानान्धकार आहे तो हा की आत्मा हा वास्तविक सुखीदुःखी, परिच्छिन्न अथवा जड काही नसून शरीरसहवासाने तोच तसा आहे असे वाटत राहणे ! स्फटिक मण्याच्या शेजारी जपाकुसुम ठेवले तर स्फटिक लाल दिसतो; हा सहवासाचा परिणाम असतो. तसेच सुखदुःखे मनामुळे होतात ती आत्म्याची आहेत, असा भ्रम होणे हेच अज्ञान होय. ते घालविण्यासाठी एकनाथांनी उपदेशिल्याप्रमाणे ' उपनिषद्–भागेसी वेदान्त । त्याचा मतितार्थ सेवावा ।। ' व ' कर्म म्हणजे ते निवृत्त । जे आशापाशफळारहित । का क्रिया जे उपकारार्थ । ' ( भागवत १३।७९ ) याची पक्की जाणीव ठेवून जीवनक्रम चालवावा. ' अचिन्त्याः खलु ये भावाः न तांस्तर्केण चिंतयेत् । ' ज्या गोष्टी चिंतनाच्याच्या पलिकडील, त्यांची तर्काने सुसंगति लावण्याचा प्रयत्न करू नये, असे सांगितले आहे; आणि पुनर्जन्म व पूर्वकर्म यांचा प्रश्न निर्माण करून ठेवल्याकारणाने, पूर्वकर्माला परमेश्वराची बरोबरी दिली आहे. या जन्मात माणसाला जे काही बरे–वाईट अनुभव येतात, ते पूर्वकर्माचा परिणाम होत, नाहीतर ' अकृताभ्यागम ' म्हणजे न केलेले भोगावयास लागणे व पूर्वजन्म नाही मानला तर जिवंत असताना केलेल्या बऱ्यावाईट कर्माचा मृत्युनंतर नाश होणे, म्हणजे ' कृतप्रणाश ' हे दोष निर्माण होतात. म्हणून मग पुनर्जन्माचे अनुषंगाने मोक्षाची भाषाही सुरू होते. ' मी या जन्मात चांगले कार्य करीत आहे, मी मोक्ष मिळविणार ' वगैरे विचार व भाषा ' मरावे परी कीर्तिरूपे उरावे । ' या दृष्टीने चांगलीच आहे. पण जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटण्याच्या कल्पना म्हणून सत्कर्माचा उपयोग या सौद्याच्या तऱ्हेने ' मी मोक्ष मिळवणार ' असे कोणी म्हणू लागला तर ती भाषा अहंकाराचीच होते. मी दुसऱ्यापेक्षा कोणीतरी वेगळाच आहे, हा ' अहंतेचा वारा ' त्या भाषेच्या कल्पनेतूनच सुरू होतो. परमार्थ करताना ' अहंतेचा वारा न लागो कदाकाळी । ' म्हणावयाचे, याची संगति कशी लावावयाची ? शिवाय, विश्वरूपाने परमेश्वरच सर्वत्र नटला आहे व आपण ( माणूस ) त्या विश्वरूपाचा एक जर घटक आहे, तर मोक्षाच्या कल्पनेने जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच विकृत असल्याचे प्रत्ययास येत नाही काय ? तेव्हा खरा विचार खोलवर केला तर कळून चुकते की उपनिषदांच्या विवेकविकासाप्रमाणे, भगवंत म्हणजे विश्वात्मा. त्याला स्फूर्ति झाली म्हणून त्याने आपल्या लीलेने, मायेने, सृजनशक्तीने ही सारी चराचर सृष्टि निर्माण केली. त्याला वाटले ' बहुस्यां प्रजायेय । ' ( पुष्कळ प्रजा निर्माण करावी. ) त्याने ती निर्माण केली. त्या निर्मिलेल्या प्रजेने सामुदायिक रीत्या अन्न, वस्त्र, आसरा निर्माण करावा; हवा, पाणी भरपूर प्रमाणात उपलब्ध, तेव्हा सर्वांनी गुण्यागोविंदाने आपले जीवन कंठावे व त्या ( विश्वेश्वरा ) चा निरोप आला की त्याच्यात विलीन व्हावे. या विश्वेश्वराने आखलेल्या क्रमाविरुद्ध मानव जाऊ शकतो काय ? विश्वात्म्यापासून काही गुणांश घेऊन या जगाच्या रंगभूमीवर यावयाचे, आपली भूमिका योग्य

रीतीने मनापासून वठवावयाची व शेवटी ब्रह्मार्पण म्हणून त्या विश्वेश्वराच्या चरणी, विश्वेश्वरामध्ये लीन व विलीन व्हावयाचे, हाच कर्मविपाक व कर्मसिद्धान्त, परमार्थाच्या दृष्टीने सार्थ वाटतो. सत्त्व, रज, तम या त्रिगुणापैकी सत्त्वाची वाढ रज आणि तम याना पार जिरवून टाकण्याइतकी झाली की सर्वभूती आत्मभाव झालेल्या विदेही जीवन्मुक्ताचे मरायला उरतेच काय ? देहाचा नाश झाला तरी 'आहे तरी सर्वाठायी। पाहो जाता कोठेच नाही।' हे त्याचे ब्रह्मस्वरूप अबाधित राहतेच राहते.

उपनिषदाच्या एका श्लोकात, एक त्रिवर्णी अजा आहे. त्रिगुणमयी स्त्रीधर्मी प्रकृति. ही सर्वकाली उत्पत्तिकार्य करते. दोन अजपुरुष आहेत; यापैकी एक प्रकृतीला धरून उपभोग घेतो. आणि दुसरा तिचा संपूर्णपणे उपभोग घेऊन सोडून देतो. आणखी एका श्लोकात एका वृक्षावर दोन पक्षी बसल्याचे वर्णन केले आहे. त्यापैकी एक वृक्षाचे फळ खात आहे. प्रकृतिस्थ पुरुष प्राकृतिक लीलेचा उपभोग घेत आहे; दुसरा पक्षी फळ खात नाही. पण आपल्या सोबत्याला पहात आहे, मौनी व अलिप्त आहे. पहिला दुसऱ्याला पाहतो आणि सर्व महत्त्व आहे ते दुसऱ्याचेच आहे, हे जेव्हा त्याला समजते, तेव्हा तो दुःखापासून मुक्त होतो. वरील दोन श्लोकांचा हेतु जरी भिन्न असला तरी त्यात एक सामान्य अर्थ भरला आहे. दोन पक्षापैकी एक अगदी चिरकाल मौन; मुक्त आत्मा अथवा पुरुष. आपणच व्यापलेल्या जगाकडे हा पहात असतो. दुसरा पक्षी म्हणजे प्रकृतिबद्ध पुरुष. पहिल्या श्लोकावरून दोन्ही पुरुष एकच, एकाच चैतन्यदेवाच्या बद्ध व मुक्त अशा भिन्न भिन्न अवस्था !! कारण श्लोकोक्त अज पुरुष प्रकृतीत अवतीर्ण होऊन तिचा आस्वाद घेतो आणि त्यानंतर तिला सोडून देतो. दुसऱ्या श्लोकावरून एकाच आत्म्याच्या उच्च आणि नीच अशा दोन अवस्था असून उच्च अवस्थेत ते चिरकाल मुक्त व नीच अवस्थेत तो प्रकृतीच्या ठायी अनेक जीवरूपाने अवतीर्ण होऊन आणि विशिष्ट जीवात प्रकृतीच्या लीलेसंबंधी विरक्त होऊन उच्च अवस्थेला प्राप्त होतो. अशाप्रकारे एकाच सनातन आत्म्याच्या दोन अवस्था मानल्या म्हणजे समाधानाचा एक मार्ग सापडतो खरा; पण एक हे अनेक कसे होते ? तर भिन्न स्थलकाल सापेक्षतेने अनेक दिसते.

उपनिषदातील इतर श्लोकांचे रहस्य लक्षात घेऊन गीतेने या दोन पुरुषावर आणखी एका पुरुषाचीं कल्पना केली आहे. हा सर्वश्रेष्ठ पुरुष म्हणजे पुरुषोत्तम होय. म्हणजे क्षर, अक्षर आणि उत्तम असे गीतेच्या मते तीन पुरुष झाले. आत्म्याचे बहुभूतत्त्व अर्थात् अनेक जीवरूपाने प्रगट होणे यालाच 'क्षर' असे नाव आहे. याठिकाणी पुरुष भगवंताचे बहुरूप; अर्थात् हा पुरुष प्रकृतीहून निराळा नसून तो प्रकृतिस्थ पुरुष आहे. अक्षर पुरुष हा क्षराप्रमाणे चल नसून अचल व निष्क्रिय पुरुष आहे. हा प्रकृतीचा साक्षी पण प्रकृतीच्या कार्याने बद्ध नसून प्रकृतीपासून मुक्त आहे. परमेश्वर, परब्रह्म, परमपुरुष हाच उत्तम पुरुष होय. क्षरपुरुषाचे परिणामी बहुरूपत्व व अक्षर पुरुषाचे अपरिणामी एकरूपत्व हे दोन्ही उत्तम पुरुषाचे ठिकाणी

आहे. आपल्या प्रकृतीच्या, आपल्या शक्तीच्या विराट् क्रियेच्या बळावर आपल्या इच्छेने हा उत्तम पुरुष जगात प्रगट होतो व आपल्या महान् अचलतेच्या जोरावर तो स्वतंत्र आणि अलिप्त असतो. तथापि पुरुषोत्तम स्वरूपात तो प्रकृतीहून स्वतंत्र व प्रकृतीने बद्ध या उभय परिस्थितींच्या पलिकडे असतो. पुरुषोत्तमासंबंधीची ही कल्पना प्राय: उपनिषदात सूचित असली तरी गीतेनेच पहिल्याने या स्वरूपाचे वर्णन केले आहे व त्यानंतरच भारतीय धर्मविचारावर या समजूतीचा विशेष पगडा बसला आहे. सर्वोत्तम भक्तियोगाचा पाया ही पुरुषोत्तमविषयक समजूत होय. भक्तिरस-प्रधान पुराणेही या पुरुषोत्तमविषयक समजूतीवरच उभारलेली आहेत.

उपनिषदातील ( गीता हेही एक उपनिषद् मानले जाते ) या व अशा विचार-धारांचा पंडितजी सातवळेकरांनी आपल्या लेखनप्रपंचात आत्मीयतेने उहापोह केला असून, त्यांतून जे वाचकांच्या मनी उत्कटत्वाने ठसविण्याचा प्रयत्न केला आहे, ते आधुनिक अधिकारी संत व तत्त्वज्ञानाची मूर्ति प्रा रा. द. रानडे तथा गुरुदेव यांच्या मनाशी जुळते आहे. गुरुदेव रानडे म्हणतात– ' उपनिषदात नैतिक मूल्ये नेहमी साक्षात्काराशी निगडित झालेली आहेत. नीतिचा भक्कम पाया असल्यावाचून साक्षात्कार शक्य नाही, त्याचप्रमाणे नीतिला पूर्णता येण्यासाठी, तिची परिणति साक्षात्कार–मार्ग धरण्यात झाली पाहिजे. त्यांची परिणति आत्मसाक्षात्कारात होत नाही, अशा केवळ नैतिक जीवनाला ध्येय मानणारा माणूस उपनिषदात सापडणार नाही. आत्मानुभूतीच्या शाश्वत सत्यसिद्धांताच्या आधाराने मुख्य नैतिक प्रश्न उप-षदानी सोडविलें आहेत; म्हणून त्यांचे विचार चिंतनीय आहेत.'

हे चिंतनीय विचार आचरणीय व्हावयास त्यांचा समन्वय करून सुसूत्र आचार-संहिता ज्याची त्यास करता आली पाहिजे. भगवद्गीता हा एक असा महान् प्रयत्न होता म्हणूनच तो ' उपनिषद् ' या प्रतिष्ठेने जगात नांदत आला आहे. भगवान् कृष्णासारख्या पूर्णावताराच्या मुखातून उपनिषद्–दृष्ट आचारसंहिता वदविणाऱ्या महाभारतकाराची पात्रता, प्रतिष्ठा आणि प्रकर्ष प्रत्येकाजवळ असणेही शक्य नसते. म्हणून व्यासासारख्या चिंतनसंपन्न समन्वयकारावरच भिस्त ठेवून जनसामान्य चालत असतात.

' वेद, उपनिषदे आणि गीता... विशेष मनन केल्याशिवाय त्यांचे हृद्गत कळणे अतिशय कठीण काम आहे. वस्तुत: पाहिले असता, ही गोष्ट तेव्हाच लक्षात येईल की, असलें ग्रंथ विशेष प्रकारची उच्च मनोभूमिका प्राप्त झालेल्या लोकानी विशिष्ट मानसिक अवस्थेत लिहिलेले असतात व तसेच त्या लेखकांचे लिहावयाच्या वेळचे दृष्टिकोनदेखील अगदीच भिन्न असतात. म्हणून जोपर्यंत त्याचा दृष्टिकोन जशाचा तसा आपणास प्राप्त झालेला नसतो, तोपर्यंत त्याच्या वचनातील गंभीर उपदेश आपणास पूर्णपणे कळणे देखील अगदी कठीण होते. ' अशा सत्याधिष्ठित विनम्र

भावनेनेच व्यासादिकांच्या शब्दाधारे जनसामान्य चालतात ते अगदीच डोळसपणाने. अंधानुकरण वा अंधविश्वास असा यात काहीच भाग नसतो. सर्व ज्ञात्यांच्या एकमताने जर भगवद्गीता हा प्राचीन वैदिक परंपरांचा समन्वय व संस्कृतिसार आहे तर जनसामान्य त्यांच्यावर डोळस विश्वास ठेवूनच म्हणत असतात की भारतीय अध्यात्मविद्येचा उत्कृष्ट परिपाक म्हणजे गीतोपनिषद्. जीवनाचे, कर्माचे, मानवी अस्तित्वाचे व मानवसेवेचे महत्त्व ठसविणारा संदेश गीतोपनिषद् देते. महर्षि अरविंद घोष तसेच सांगतात.

जीवनात संगोपन हा संरक्षणाचा पाया, किंबहुना पाठकणा आहे आणि '**समानो मंत्रः** । ' ( तुमचे विचार एक असू द्या ) हा संगोपन–संरक्षणाचा श्रीगणेश आहे.

**सदं वेत्ति द्रुहो रक्षसः पाति जागृतिः** । ( ऋ. ९।७१।१ )

जो जागतो, तो द्रोह करणाऱ्या दुष्ट राक्षसापासून आपल्या घराचे रक्षण करतो. आपल्या संरक्षणासाठी जागणे हा प्रत्येकाचा धर्मच आहे. जो नियम घराला लागू आहे, तोच राष्ट्राला लागू आहे.

**ब्रह्मणा पयसा वावृधानो विशि राष्ट्रे जागृहि** । ( अथर्व. १३।१।९ )

ज्ञानाने व दुधाने पुष्ट होत आपल्या राष्ट्रातील प्रजेमध्ये जागृत रहा, हा आदेश पाळणे मनुष्याचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. त्यापेक्षाही—

**वयं राष्ट्रे जागृयामा पुरोहिताः** । ( वा. यजुर्वेद ९।२३ )

आम्ही आपल्या राष्ट्रात अग्रभागी राहून जागू या; म्हणजे राष्ट्राचे नेते होऊन राष्ट्राचे भवितव्य आपल्या उघड्या डोळ्यांच्या प्रयत्नाने अधिक उज्ज्वल करू या, अशी अहमहमिका तरुणात लागावी लागते.

आणि कर्तव्यपरायणेत अहमहमिका चांगली असली तरी वृत्तीत ती उपयोगी नाही. '**ईश्वरोऽहं, अहं भोगी, सिद्धोऽहं बलवान् सुखी** । ' ही असुरीसंपत् कोणाजवळच शक्य तर असू नये; '**अयं निजः परो वेति, गणना लघुचेतसाम्** ।' म्हणून अलौकिक गुणाचे असणारानी ही '**अलौकिक नोहावे लोकाप्रति** ।' आणि '**लोकांच्या चालीने चालावे । लोकांच्या बोलीने बोलावे** ।' एवढेच नव्हे, तर '**समूळ फलाशा त्यागुनी । निर्विकल्प निरभिमानी** । ' होऊन स्वकर्तव्याचरण करावे.

पंडितजींच ' पुरुषार्थबोधिनी ' च्या प्रस्तावनेत ( आवृत्ति ३ री १९६६ ) लिहितात की—

' वेद हेच प्राचीन परंपरेने चालत आलेले अनादि ( तत्त्व ) ज्ञान होय. परंतु मनुष्य आपल्या अज्ञानामुळेच धर्ममार्गापासून दूर दूर जात असतो. म्हणून लोकाना जागे करणारे ' उत्तम पुरुष ' वारंवार अवतरतात, ते येऊन लोकांना जागे करतात व परंपरागत ज्ञान त्यांना देतात. '

म्हणून ( १ ) **उपनीय तमात्मानं ब्रह्मापास्तद्वयं यतः । निहत्य विद्यां तज्जं च तस्मादुपनिषद् भवेत् ॥ ( २ ) निहत्यानर्थमूलं स्वाविद्यां प्रत्यक्तया परं । नयत्य पास्तसंभेदमतो वोपनिषद् भवेत् ।। ( ३ ) प्रवृत्तिहेतून्निःशेषांस्तन्मूलोच्छेदकत्वतः । यतोवसादयेद्विद्या तस्मादुपनिषद् भवेत्** ॥ अशाही उपनिषदाच्या व्याख्या स्वीकाराव्या लागतात. पंडितजींनी अशाही व्याख्यांचा खोल विचार केला असून स्वच्छ सांगून टाकले आहे की मुक्तकोपनिषदात एकशे आठ उपनिषदांचा उल्लेख असून अलिकडे अल्लोपनिषदापर्यंत त्यात आणखीही भर पडली आहे. तरीही या सर्वांतून तत्त्वज्ञानाची म्हणजे वेदांततत्त्वज्ञानाची जी षड्दर्शने आहेत, त्यांचाच मुळवा आहे. राजगुह्य आणि मंत्रपारायण असे काहीही उपनिषदांचे रोख असले तरी परमात्म्यासंबंधाचे सम्यक्ज्ञान, ' **अध्यात्मविद्या विद्यानां** ' म्हणून पावित्र्याचे प्रचीतिस्थान दाखवून देणारी जाणीव, अद्वैत साधनेचा परमोच्च बिंदू गाठण्याची व्रतसांगता करवू शकणारी ज्ञानगंगा हाच सरतेशेवटी सर्व उपनिषदांचा केंद्रबिंदु व मानबिंदू ही आहे. तो माणसाला गाठता यावा म्हणून सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदांत अशी सहा वैदिक तत्त्वज्ञानाची सहा दर्शने जन्मास आली. परमात्म्याचा ठावठिकाणा दाखवून मनुष्याने त्यांच्याशी अद्वैत कसे साधावे याचे मार्गदर्शन ती करीत असतात. म्हणून ' **सांख्ययोगौ पृथक् बालाः प्रवदन्ति, न पंडिताः** ॥ कारण, अद्वैत जर व्यवहारतः साधावयाचे तर देश काल, परिस्थितिप्रमाणे प्राप्त कर्तव्य उत्कटत्वाने पार पाडून परमात्म्यासारखेंच ' **आहे तरी सर्वा ठायी । पाहो जाता कोठेच नाही** ॥ ' असा प्रयत्नपुरुषार्थी पण कर्मफल त्यागयोगी होऊन राहणेची संवय व परिणामतः स्वभाव साध्य करणे इकडेच मनुष्याचे लक्ष हवे. इतकी सगळी काळजी घेऊन साधावयाचे काय ? तर अंतर्बाह्य प्रमाणानी परतत्त्वाची सिद्धि. विश्वाचे संपूर्ण कारण परब्रह्म. पण विश्वकारणता हे ब्रह्माचे तटस्थ लक्षण असून ब्रह्माचे स्वरूप–लक्षण सच्चिदानंद हे होय. अंतर्बाह्य विश्वाच्या अनुभवाचा निर्णय सत्, चित् आणि आनंद यांच्या साक्षात्कारात आहे ' **आत्मानुभवी चोखाळल्या वाटा** । ' म्हणजे आत्म्याची अर्थात् स्वतःची सत्ता सिद्ध आहे. चिद्रूपता स्वतः सिद्ध आहे तशीच आनंदरूपता म्हणजे परमप्रेमास्पदता स्वतः सिद्ध आहे.

उपनिषदातील ही परतत्त्वमीमांसा अद्वैत सिद्ध करते. सृष्टी ही जीवात्म्याच्या कर्मभोगार्थ आहे. या कर्मबंधाचा नाश म्हणजेच मोक्ष होय. तो मोक्ष या विश्वातच माणसाला साध्य करून घ्यावचा आहे.

ø ø ø

: ३४ :

# गीतेतील पुरुषार्थ-प्रबोधक पंडितजी

## गीताधर्म

वेदोपनिषदांचा उपदेशच गीतेने विशद केला आहे. त्यागाचे महत्त्व व आत्मसमर्पण हाच गीतेचा श्रेष्ठ भाग आहे. समता, अनासक्ति, कर्मफलत्याग, आत्मसमर्पण, स्वधर्मसेवा हेच गीतेचे मूलतत्त्व होय. यालाच श्रीकृष्ण गुह्यज्ञान व परमरहस्य म्हणतात. जगाच्या भावीधर्माचे सर्वजनसंमत शास्त्र होण्याजोगा जर एकादा अद्वितीय ग्रंथ असेल तर तो भगवद्गीताच होय. सर्व प्राणिमात्राचे ठिकाणी ईश्वराचे दर्शन घेणे, सर्वकाळी त्याचे स्मरण करणे व सर्व घडामोडीत परमेश्वराच्याच सामर्थ्याची, ज्ञानाची व प्रेमाची क्रीडा चाललेली आहे हे ओळखून परमानंदात रममाण होणे हाच गीताधर्म होय. हा गीताधर्म काही विशिष्टगुणसंपन्न अशा अल्पसंख्य लोकाकरता नसून भगवंतानी सांगितल्याप्रमाणे या धर्माच्याद्वारे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, पुरुष, स्त्री, इतकेच नव्हे तर महापातकी जीवही या धर्माच्या आचरणाने ईश्वरप्राप्ति करून घेऊ शकतो.

ईश्वरप्राप्ति करून घेणे म्हणजे जगदात्म्याशी मिळून अद्वैत होणे होय. ती कला ऐहिक जीवनाच्या रोजच्या धकाधकीतून मनुष्याने साध्य करावयाची तर त्याला व्यवहारशुद्ध मार्ग मोकळा असला पाहिजे. तोच नीट दाखविण्याचा नेटका प्रयत्न गीतेने केला आहे.

भगवद्गीता हा भारतीय तत्त्वपर व नीतिपर असा अत्यंत प्रभावी संस्कृत ग्रंथ आहे. पाश्चात्य लोकांना पौरस्त्य तत्त्वज्ञानाची गोडी या ग्रंथानेच लावली. महाभारतकाली जी सामाजिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक अशी परिस्थिती होती, तिचे परिणत फल गीतातत्त्वज्ञानाच्या रूपाने बाहेर पडलेले आहे. ' **जय नामेऽतिहासोऽयं श्रोतव्यो विजिगीषुणा** । असे म्हटले आहे. भगवद्गीतेत कर्मसंन्यासाचा व

क्लैब्यावलंबाचा निषेध केला आहे. कौशल्याने कर्म करून दुष्टदंडन करावे हे गीतेचे धोरण. या धोरणाचे महत्त्व पटले म्हणूनच शकयवनादि म्लेंच्छाना हाकून लावून शातवाहनादि हिंदु राजानी आपली राज्ये स्थापली. गीतापूर्वकालचा समाज हा विजिगीषु, प्रवृत्तिपर व आक्रमणावश्यकता सांभाळणारा होता. प्रत्येक मनुष्याने आपले संस्कार, स्वभाव व परिस्थिति यांचा विचार करून समाजाच्या धारणपोषणा करता उत्कट व उत्कृष्ट कर्तव्य कौशल्याने करावे, अशी गीतेची सारभूत सांगी आहे. भारतीय तत्त्वज्ञानात उपनिषदांच्या बरोबरीने गीतेला मान आहे. उपनिषद्पूर्व वैदिक वाङ्मय आणि वैदिक संस्कृति यांचे गीता हे परिणत फल आहे. समाजाच्या ऐहिक कल्याणातच व्यक्तीचा परमार्थ सिद्ध व्हावा; राजसंस्था किंवा समाजसंस्था जेव्हा न्याययुक्त व कर्तव्ययुक्त असतात, तेव्हाच राष्ट्र वा समाज स्वर्ग बनतो. गीता ही आनंदमय कर्मयोग प्रबोधिनी असून सत्यसृष्टीत धृत्युत्साहसमन्वित जीवनप्रत्यय देणारी आहे.

श्रीमद्भगवद्गीता ग्रंथाचा विस्तार सातशे श्लोकांचा. ते श्लोक अठरा अध्यायात विभागलेले. याप्रमाणे गीतावृक्षाचा हा विस्तार अठरा डहाळ्यानी वाढत, सातशे गुच्छानी विस्तार पावत, सर्व जगाला परिपूर्ण उन्नतीचे ज्ञान देण्यासाठी आपल्या धर्मविस्ताराने केवढे अनंत रूप धरीत, सर्व पृथ्वीवर निरनिराळ्या भाषेत फोफावत चाललेला आहे, याचे दिग्दर्शन करण्यासाठीच औंध येथे पंडितजींच्या भगवद्गीता या मासिकाचा अवतार होता. कोणताही अवतार आपले उद्दिष्ट कार्य हळूहळू व क्रमानेच करीत असतो. या आरंभीच्या स्थितीत त्याच्या कार्याची रूपरेखा लहान स्वरूपात पण विस्तृत ज्ञान देणारीच असणार. त्याशिवाय ते ज्ञान एकदम आकलन करण्यास कठीण जाते. म्हणून '**जे जे काही आपणासि ठावे। ते ते हळुहळू दुसऱ्यासी शिकवावे । शहाणे करून सोडावे । सकळ जन ।।**' ही समर्थ शिकवण पंडितजींनी कार्यवाहीत आणली. गीतेच्या श्लोकांचे पार्श्वभूमीसह त्यांतील शब्दमहतीनेही वर्णन-विवेचन करून त्याचे रहस्य सांगत पंडितजी गेले आणि गीतेत आलेल्या विषयांची विविधता दाखवूनही त्यांतील एकसूत्रावर त्यांनी भर दिला.

## श्रीमद्भगवद्गीतेत आलेले एकोणतीस विषय

| विषय श्लोक | अध्याय | श्लोक |
|---|---|---|
| १ अवतार | ४ | ४ ते ९, ११, १२; |
| (११) | ७ | २४ ते २६. |
| २ इंद्रिये | २ | १४, १५, ५८ ते ६५, ६८ |
| (१४) | ३ | ३४ |
| | ५ | २२ |
| | ६ | ४ |

| विषय श्लोक | अध्याय | श्लोक |
|---|---|---|
| ३ ईश्वर | ४ | ११ |
| ( ३५ ) | ५ | २९ |
| | ७ | ७ |
| | ८ | १ ते ४ |
| | ९ | ४ ते ६, २४ |
| | १० | १ ते ५, ८ ते ११ |
| | ११ | ४, ५. |
| | १३ | १२ ते १७, २३, २७, ३१, ३२ |
| | १५ | १५ ते १९ |
| ४ उपसंहार | १८ | ७२ ते ७८ |
| ( ७ ) | | |
| ५ ॐ तत्सत् | ८ | १२, १३; |
| ( ८ ) | १७ | २३ ते २८ |
| ६ कर्ममार्ग | २ | ४२ ते ४४, ४७, ४८ |
| ( ८९ ) | ३ | ५,८ ते १६. १९,२७,३०,३३,३५ |
| | ४ | १२ ते १८, २० ते २३; |
| | ५ | १, २, १०, ११, १२, १४, २२ |
| | ६ | १, २ |
| | ७ | २० ते २३ |
| | ८ | १६ |
| | ९ | २३ ते २८, २७, २८, २०, २१ |
| | १३ | १५, ३१ |
| | १४ | १६, १९ |
| | १६ | २३ २४ |
| | १८ | ५, ६, १६ ४१ ते ४८, ५९, ६०, १७, १८, २३ ते २१ |
| ७ काम | २ | ७०, ७१ |
| ( १९ ) | ३ | ३६ ते ४३ |
| | ४ | २१ |
| | ५ | २६ |
| | ७ | २७ |
| | १६ | १० ते १२, १६, २१, २२ |

| विषय श्लोक | अध्याय | श्लोक |
|---|---|---|
| ८ गीतामहात्म्य | ३ | ३१, ३२ |
| (१९) | ४ | १ ते ३, |
| | ७ | १, २ |
| | ९ | १ ते ३ |
| | १२ | २० |
| | १४ | १, २ |
| | १५ | २० |
| | १८ | ६७ ते ७१ |
| ९ गुणत्रय | २ | ४५ |
| (७०) | ३ | २७ ते २९ |
| | ७ | १२ ते १४ |
| | १३ | २१ |
| | १४ | ५ ते २७ |
| | १७ | ४, ७ ते १३, १७ ते २२ |
| | १८ | ७ ते ४० |
| १० जीव | २ | १२,१३,१५ ते २४,२६,२७,२९,३० |
| (२५) | ३ | २७ |
| | ५ | १३ |
| | १३ | २१ |
| | १४ | ५, २० |
| | १५ | ७ ते ११ |
| ११ तप (८) | १७ | ५, ६, १४ ते १९ |
| १२ तरणोपाय | २ | ७,८,३८ ते ४०,४९ ते ५३,७१,७२ |
| (१९) | ३ | १ ते ३ |
| | ५ | ४, ५ |
| | १३ | २४, २५ |
| १३ दान | ८ | २८ |
| (६) | १७ | २० ते २२ |
| | १८ | ५, ६ |
| १४ दैवासुर स्वभाव | ७ | १५ |
| (२१) | १६ | १ ते २० |
| १५ ध्यानयोग | ५ | २७, २८ |
| (१८) | ६ | १० ते २९, ४६, ४७ |

| विषय श्लोक | अध्याय | श्लोक |
|---|---|---|
| १६ पुनर्जन्म | ४ | ५ |
| (२२) | ६ | ३७, ४० ते ४५ |
| | ८ | १६, २५ |
| | ९ | ३, २०, २१ |
| | १३ | ६, ७, २१ |
| | १४ | १४, १५ |
| | १६ | ७, १८ ते २० |
| १७ प्रार्थना | १० | १२ |
| (५) | ११ | ३९, ४०, ४३, ४४ |
| १८ भक्तिमार्ग | ६ | ३७ ते ४० |
| (३६) | ७ | २७, २८ |
| | ९ | २२, २६, २९ ते ३४ |
| | १२ | १, २, ६ ते ११, १३ ते २० |
| | १३ | १४, २२ |
| | १७ | १ ते ४ |
| १९ मन | २ | ४१, ५६, ६६, ६७ |
| (१८) | ३ | ६, ७ |
| | ५ | ७, १९ |
| | ६ | २४ ते २७, ३३ ते ३६ |
| २० मरणकाल | ७ | ३० |
| (१६) | ८ | ५ ते १०, १२, १३, २३ ते २७ |
| | १४ | १४, १५ |
| २१ मोक्ष | ७ | ३, ७, १६ ते १९ |
| (१८) | ८ | ११, १५, २१ |
| | ११ | ५५ |
| | १२ | ३, ४ |
| | १४ | २७ |
| | १५ | ६, १५ |
| | १८ | ६४ ते ६६ |
| २२ यज्ञ | ४ | २४ ते ३२ |
| (१२) | १७ | २, १२, १३ |
| २३ विभूति | ७ | ८ ते ११ |
| (४२) | ९ | १८, १९ |

| विषय श्लोक | अध्याय | श्लोक |
| --- | --- | --- |
| | १० | ७, १२ ते ४२ |
| | १५ | १२ ते १५ |
| २४ विश्वरूप (५४) | ११ | १ ते ५४ |
| २५ विषाद | १ | २ ते ४७ |
| (६३) | २ | १ ते ६ |
| | ९ | ११, ३० ते ३७ |
| २६ सृष्टि | २ | २८ |
| (१५) | ७ | ४ ते ६ |
| | ८ | १७, १८, २० |
| | ९ | ७ ते १० |
| | १० | ६ |
| | १३ | २६ |
| | १४ | ३, ४ |
| २७ संन्यास | २ | ४७ |
| (२३) | ३ | ४ |
| | ५ | ३, ६, १३ |
| | ६ | १, २, ३, ४ |
| | १२ | १२ |
| | १८ | १ ते १२, ४९ |
| २८ क्षेत्रक्षेत्रज्ञ (१५) | १३ | १ ते ६, १८ ते २३, २६, ३३, ३४ |
| २९ ज्ञानमार्ग | २ | १४, १५, ४६, ५४, ५७, ६१, ६९ |
| (८३) | ३ | १७, १८ |
| | ४ | १०, १९, ३३ ते ४२ |
| | ५ | ७ ते ९, १५ ते १८, २० ते २४, २६, २८, २९ |
| | ६ | ८, ९, २८ ते ३२ |
| | ७ | ३, २९ |
| | ८ | २८ |
| | ९ | १३ ते १५, १७ |
| | १० | ३ |
| | १२ | ५ |
| | १३ | ७ ते ११, १९, २८ ते ३० |
| | १५ | १ ते ५ |
| | १८ | २० ते २२, ५० ते ५८, ६१ ते ६३ |

गीतेत अशी एकोणतीस प्रकरणे असली, तरी त्यातील विषयांच्या ऊहापोहाचा निष्कर्ष शेवटी ऐहिक जगातील जीवनात येणाऱ्या भल्याबुऱ्या प्रसंगातून जाताना व्यवहारशुद्ध ठरला पाहिजे हे उघडच आहे. अर्जुनासारख्या वीरवराला भगवान् कृष्णासारखा पूर्ण पुरुष उपदेश करीत असताही त्या मुद्याच्या गोष्टीवरील लक्ष चळलेले नाही.

संसार हा जड जगांत ब्रह्माचेच व्यक्तरूप होय. तो केवळ आंतरिक उत्क्रांतीचाच व्यापार नव्हे. त्याठिकाणी जीवनाची बाह्यपरिस्थितिही आंतरिक विकासाला सहाय्यक म्हणूनच स्वीकारली पाहिजे व त्यासाठी परस्परांना सहाय्यही केले पाहिजे. आणि ? जरूर तर परस्पराशी झगडलेही पाहिजे. जीवनाच्या चक्रव्यूहात अगदी शांततेने, सुखाने व निश्चितपणाने कोणालाही पुढे जाता येणार नाही. एक पाऊल पुढे टाकावयाचे तर वीराप्रमाणे सज्ज होऊन अडचणी–संकटाशी झुंजावे लागते. जे अंतर्बाह्य द्वंद्वाशी झगडण्यास तयार होतात, इतकेच नव्हे तर बाह्यद्वंद्वाचे अंतिम स्वरूप जे युद्ध, तेही करण्याकडे प्रवृत्त होतात, तेच क्षत्रिय व तेच वीरपुरुष होत. युद्ध, साहस, सामर्थ्य व अंतःकरणाचा थोरपणा हा क्षत्रियाचा स्वभाव आणि न्यायाचे रक्षण करण्यासाठी मरण हे निश्चित असताही युद्धापासून परावृत्त न होणे, हेच त्याचे कर्तव्य. संसारात धर्म–अधर्म, न्याय–अन्याय, आततायी–रक्षणकर्ता यांचे परस्पराशी अव्याहत युद्ध चालू असतेच. या युद्धाला बाह्यतः जेव्हा महायुद्धाचे स्वरूप प्राप्त होते, तेव्हा धर्मपक्षाचा नायक म्हणून, धर्माचे निशाण जो फडकावितो त्याला कठोर कर्तव्यापुढे कंपित होऊन चालणार नाही. युद्धत्याग नव्हे, तर युद्ध करणे हाच त्याचा धर्म, हेच त्याचे कर्तव्य. '**रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग ।**' असे संत तुकारामांचेही म्हणणे. मग सामान्यजनाला काय दुसरे वाटचास येणार आहे ?

गीतेच्या सातशे श्लोकात गहन विषयांचा अंतर्भाव झालेला आहे, एवढेच नव्हे तर काही काही अशा सिद्धांतांचा समन्वय करण्यात आला आहे की, तो विशेषज्ञाच्या दृष्टीने परस्परविरोधी दिसणाऱ्या विषयांचा समन्वय आहे. असा समन्वय हा भारतीयांचा एक विशेष असल्याचे वेदांतसूत्रावरूनही दिसून येईल. तशा विशेषामुळेच गीता, उपनिषदे व ब्रह्मसूत्रे या तिहीस वेदांत्याकडून प्रस्थानत्रयी मानण्यात आले.

प्राचीन उपनिषदांनी ज्ञानमार्गाने ब्रह्माचा शोध लावला होता. गीतेच्या प्रणेत्यानी त्या प्राचीन व प्रशस्त मार्गाकडे मोठ्या आदराने पाहिले; पण जाणूनबुजून अधिक सुगम असा दुसरा मार्ग दाखविला. तो भक्तिमार्ग होय. डॉ. रा. गो. भांडारकरांच्या संशोधनाप्रमाणे इसवीपूर्व दोनशे वर्षे भारतवर्षाच्या पश्चिमेकडील देशात तो मार्ग प्रचलित होता. त्याचा गीतेने ज्ञानमार्गाशी समन्वय साधला होता; आणि या दोहोंचाही समन्वय कर्ममार्गाशी साधण्यास गीतेने कमी केले नव्हते. 'कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे; फळ मिळणे न मिळणे केव्हाही तुझ्या अधिकारातले नाही; म्हणून माझ्या कर्माचे फळ मलाच मिळावे अशा हावरेपणाने काम करणारा होऊ

नको आणि कर्म न करण्याचाही आग्रह धरू नको. मात्र जीव ओतून कर्तव्य कर. ' हाच 'कर्मण्यकर्म' पाहण्याचा समन्वय गीतेने केला आहे यात निवृत्ति आणि प्रवृत्ति यांची समान प्रतिष्ठा राखण्यात आली आहे. 'संसार साधुनी परमार्थाचा लाभ जयाने केला, तो नर भला, भला, भला ॥ ' होण्याची गुरुकिल्ली गीतेने दाखवून दिल्याकारणानेच जनसामान्यातही गीता प्रिय झाली.

गीतेने माणसाला निश्चितार्थी मार्गदर्शन केले आहे ते असे—

( १ ) **क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप।** एका इंग्रज ग्रंथकाराने म्हटल्याप्रमाणे ' कमकुवत आहे गुलामी; गुलामी म्हणजे नरक ! आणि नरक म्हणजे मरण !!! यासाठीच, समर्थांनी म्हटले आहे की–' **मना, श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे।** '

( २ ) संकट ओढवून घेऊ नये, पण संकटाला तोंड दिल्याशिवाय राहू नये. म्हणून ' **प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ।** ' जशी माणसे आक्रामक शत्रूशी लढतात, तशाच तयारीने संकटाशीही मुकाबल केला पाहिजे. **तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ।** या सामन्यात तुझा शेवटच झाला तर ' **मरणात खरोखर जग जगते ।** ' म्हणून तू ' कीर्तिरूपे उरशील; पण जर का तू संकटावर मात केलीस तर विजयी वीराचे अभिनंदन गौरवांचे सुखसोहाळे भोगशील. तेव्हा घे देवाचे नाव आणि जीव लावून सामना दे

( ३ ) जीव लावून जीवनाच्या झगड्यात उतरावयाचे तर त्यासाठी ' **विचारोनि बोले, विवंचोनि चाले ।** ' हे व्रत पतकरावे लागते. तसे करावयास साधले आहे की नाही, हे हाती घेतलेल्या कामातील कौशल्यावरून आणि प्रक्षुब्ध न झालेल्या समतोल व शांत अशा कर्त्याच्या बुद्धीवरून प्रत्ययाला येते, हा प्रत्यय जगाला पटावा, इतका हाती घेतलेल्या कर्तव्यात गढून जा. ' **योगस्थः कुरु कर्माणि ।** '

( ४ ) ' **अशान्तस्य कुतः सुखम् ?** । ' म्हणून फलाकांक्षा सोडून निर्मम, निरहंकार होऊन वागण्यानेच शांति मिळत असते हे लक्ष्यात ठेव आणि ' **कार्यं कर्म समाचर ।** '

( ५ ) ' **यत्न तो देव जाणावा ।** ' कर्तव्याची उंची भूमिका, ' केल्याने होत आहे रे। ' हा आत्मविश्वास, कर्तृत्वाच्या निरनिराळ्या साधना आणि त्या वापरण्याच्या वेगवेगळ्या करामती या चार माणसाच्या हातातील गोष्टी आणि पाचवी म्हणजे परिस्थितिसुद्धा ' **सर्वेषामविरोध** ' यानी कर्माची सांगता किंवा यश होत असते. तेव्हा ' **अचूक चुकेना कोठे, त्याची राज्ये समस्तही ।** ' हे जाणून, आपल्या कर्माचे समर्पण परमेश्वराला ऊर्फ जनताजनार्दनाच्या सेवेला कर. कारण ' जनसेवा ती ईश्वरसेवा ' होय. यासाठी ' **लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि ।** ' तो लोकसंग्रह का फुकाचा आहे ? त्याची गुरुकिल्ली ही की—

**सक्ताः कर्मण्यविद्वान्सो यथा कुर्वन्ति भारत ।**
**कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥**

विश्वरूप हे गीतेचे अत्यावश्यक अंग आहे. अर्जुनाला ते दाखवण्यात ' स्थिरचर व्यापुनि दशांगुळे उरला परमेश्वर ' प्रतीत व्हावा, एवढाच हेतु नसून परमेश्वर शांत सौम्य, स्नेहाळू दर्शन जसे देतो तसेच भीषण, उग्र आणि भयानक दर्शन देत असतो, हेही ठसवावयाचे आहे. हेतु असा की ' जे जे भेटे भूत ( व्यक्तिमात्र व वस्तुमात्र । ते ते जाणिजे भगवंत ।। ' असे अर्जुनाने त्यावेळी व नंतर प्रत्येक गीतावाचकाने आपल्या मनी ठसवून घ्यावे. असे तो ठसवून घेईल तर ' अभयं सत्वसंशुद्धि ' वगैरे दैवीसंपत्तिने तो युक्त होईल. पंडितजी सातवळेकरांनी इतर गीताभाष्यकाराप्रमाणे आपल्या वाचकांच्या मनावर हे सर्व ठसविले आहेच. पण त्यापेक्षाही विशेषत्वाने आणखी ठसविले आहे की —

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः । लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि ।। १ ।।
यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः । मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ।। २ ।।
उत्सीदेयुरिमे लोका: न कुर्यां कर्मचेदहम् । संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः।।३।।
सक्ताः कर्मण्यविद्वान्सो यथा कुर्वन्ति भारत । कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम्४
( श्रीमद् भगवद्‌गीता अध्याय ३ )

भारतवर्षात समाजनीती ही व्यक्तीला समाजाधीन करू इच्छित नाही, तर समाजसन्मुख करू इच्छिते. आध्यात्मिक अर्थाने व्यक्तीला द्रष्टा बनवून मानवजातीला उन्नत करणे हे प्राचीन काळापासून भारती संस्कृतीचे ध्येय आहे. त्यासाठी श्रीमद् भगवद् गीतेइतका स्पष्ट मार्गदर्शक दुसरा ग्रंथ नाही.

केवळ भारतवर्षातच नव्हे, तर इतर अनेक देशात गीताग्रंथाची दूरवर इतकी प्रसिद्धि झाली आहे की त्याची नऊशे निरनिराळ्या भाषांत, भाषांतरें व भाष्ये झाली आहेत. इतक्या अनुपम व उच्च लोकप्रियतेसारखे त्यात काय आहे ? गीतेचे प्रतिपादन सर्वदेशीय व सर्वांगीण आहे. गीतेत अशा सिद्धांतांचा समन्वय करण्यात आला आहे की, एकाच विशेष विषयातील तज्ज्ञाच्या अगर विशेषज्ञाच्या दृष्टीने ते सिद्धांत परस्परविरोधी मानले जावे ! समन्वय हा भारतीय स्वभावाचा एक विशेष आहे. गीतेनंतर काही वर्षांनी उदयास आलेल्या वेदांतसूत्रातही तो विशेष दिसून येतो. गीता, उपनिषदे व ब्रह्मसूत्रे या तिहीस वेदांत्याकडून वेदांताची प्रस्थानत्रयी असे मानण्यात येऊ लागले. याचे कारण गीता व ब्रह्मसूत्र यांचे साम्यच होय. गीतेत दोन द्वंद्वांचा समन्वय करण्यात आला आहे. एका द्वंद्वात मुक्तीच्या मार्गाचे निरूपण केले आहे व दुसऱ्या द्वंद्वात द्विविध कर्तव्याच्या परस्पर विरोधासंबंधीचा विचार आहे. आणि शेवटी या सर्वांचा समन्वय साधला आहे.

उपनिषदानी ज्ञानमार्गाचा शोध लावून ब्रह्मस्वरूपाचे सहज ज्ञान झाल्यावर सुलभतेने ब्रह्मप्राप्ति होऊ शकेल, असा मार्ग ती शोधू लागली. गीतेच्या प्रणेत्यानी जरी या प्राचीन व प्रशस्त मार्गाकडे मोठ्या आदराने पाहिले, तरी त्यानी जाणून-

बुजून दुसरा मार्ग सांगितला. तो बहुजन–समाजाच्या बुद्धीचे आटोक्यातील होय. हा भक्तिमार्ग होय. डॉ. रा. गो. भांडारकरांच्या संशोधनावरून इसवीसनापूर्वी दोनशे वर्षे भारतवर्षाच्या पश्चिमेकडील प्रदेशात भक्तिमार्ग प्रचारात होता. गीतेत भक्तिमार्गाचे प्रतिपादण्यात आलेले स्वरूप ज्ञानमार्गाशी जुळते घेणारे आहे. अशा प्रकारे मुक्तीच्या जुन्या व नव्या मार्गाचा समन्वय करून गीतेने एक मोठी नैतिक समस्या सोडविली आहे. ज्ञानमार्गाचा शोध लागल्यावर कर्ममार्गासंबंधी लोकादर ओसरू लागला आणि यज्ञयागादि कर्मकांडाच्या क्रियांचाच नव्हे तर सर्व हालचालीचाच त्याग आवश्यक मानण्याइतपत मनोवृत्ति घसरल्या. कर्म म्हटले की बंधन वाटू लागले. निवृत्तीचाच हा प्राचीन आदर्श तपस्वी जीवनापेक्षा आळसात परिणत होईल आणि समाजातील सर्व माणसे ' असुनि जिवंतहि मेली ' होतील, अशा संकराची त्यात भीति असते. म्हणून समाजात समाजसन्मुख राहूनच आपल्याला आपल्या कर्तव्यकर्माचे कसे पालन करता येईल व तसे करून अनादि अशा सांसारिक बंधनांचा दंड कसा चुकवता येईल, याचे समर्पक उत्तर गीतेमध्ये श्रीकृष्णाच्या मुखी आहे की,– ' कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे; फळावर केव्हाच नाही. ( फळ मिळणे, न मिळणे, मध्येच गळून पडणे हे मनुष्याच्या आवाक्याप्रमाणेच बाह्य वातावरण व अन्य शक्ति यांच्या अनुकूल–प्रतिकूलतेवर अवलंबून असते. ' **सर्वेषामविरोधेन** ' च व्हावयाचे ते होते. म्हणून ) कर्माचे अमुकच फळ मिळावे असा ( हावरेपणाचा ) हेतु ठेऊन काम करणारा होऊ नको; आणि कर्म न करण्याचाही हट्ट करू नको. ' अशा प्रकारे जिच्यामुळे स्वधर्मा ( प्राप्त कर्तव्या ) कडे लक्ष व भक्तवत्सल परमेश्वराकडे दृष्टि लागून जी फलासक्तिरहित प्रवृत्ति होते तिचा दर्जा निवृत्तीबरोबरीचा होय आणि हाच अकर्मण्यतेचा प्राचीन सिद्धांत होय. हाच गीतेचा समन्वय. यातच ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग, निवृत्ती नि प्रवृत्ति याना समानता दिली आहे. जो ज्ञानी केवळ ज्ञानासाठीच देह धारण करतो व संसारात आपल्या विहित कर्तव्यास जागतो, त्यांना समान लेखून संन्यस्त मनाने स्वकर्तव्ये पार पाडणारा खरा योगी होय. असे गीतेने ठरविले आहे. ब्रह्मज्ञान व भगवद्भक्ति ही अंती एकच; कारण ब्रह्मच भगवान् वा ईश्वर होय. त्याच्याकडे जाणाऱ्या मार्गाच्या प्रस्थानाचे स्वरूपातच काय तो भेद !!!

गीतेतील योगाचेही स्वरूप समन्वयाचेच आहे. समाधि व मुक्ति यांच्या उपदेशाच्या शास्त्राला सामान्यतः ' योग ' समजण्यात येते. पण नियत वा प्राप्त कर्तव्यात प्रयत्नपूर्वक निमग्न होणे, म्हणजेच कर्म–परायणता हाही एक योगच आहे. सांख्य हे केवळ एका विशिष्ट दर्शनाचे नाव होते; त्याला गीतेने व्यापकता आणली. जगातील पदार्थांच्या विषयी सामान्य अनासक्ति किंवा विमर्श यालाही सांख्य असे नाव देऊन सांख्य व वेदांत यांचा समन्वय सामान्य समानतेच्या आधारावर केला आणि तीच समानता दोन्ही दर्शनात असल्याचे प्रत्ययप्रबोधन गीतेने केले. गीतेने हे सुबोध

व काव्यमय भाषेत विवेचिले असून बुद्धिची उपेक्षा न करता हृदयातील भावनांना हात घालण्यात गीतेने यश मिळविले आहे. जर्मनीतील ब्रेसलाऊ युनिव्हर्सिटीतील प्रो. ऑटो स्ट्रौस यांचें मत जें अभ्यासपूर्वक बनले, त्याचे स्वरूप वरील प्रमाणेच आहे.

हिंदुमात्राचा एकमेव धर्मग्रंथच जगापुढे ठेवावयाचा झाल्यास, गीतेशिवाय दुसरा नाही. गीतेने अध्याय २ मध्ये ४७ व्या श्लोकात कर्माचा नियम जो सांगितला. त्याचे पंडितजी सातवळेकरांचे विवरण असे आहे की– ' ( १ ) कर्म करण्याचा तुला अधिकार आहे ( २ ) कर्माच्या फलावर तुझा अधिकार नाही. ( ३ ) कर्माचे फल आपणासच मिळावे असा हेतु धरून कर्म करू नको. ( ४ ) कर्म न करण्याकडेही तुझ्या मनाचा कळ होऊ देऊ नको.

( १ ) सर्व मनुष्यानी त्यांना जे काय उत्तम कर्म करता येत असेल ते शक्य जितक्या उत्तम रीतीने करावे. त्यात काही एक कसूर करू नये. आपले कर्तव्य पूर्णपणे उत्तमात उत्तम करण्याची पराकाष्टा प्रत्येकाने करावी. ( २ ) हे काम केल्याने जो काय मोबदला मिळेल, तो आपल्या जवळच साठवून ठेऊ नये. सर्वांच्या कल्याणासाठी जनताजनार्दनाच्या चरणी त्याचे समर्पण करावे. ( ३ ) माझ्या कर्माचे फळ फक्त मलाच उपभोगासाठी मिळावे असला क्षुद्र हेतु धरू नये; तर आपल्या कर्माच्या फलाचा जनताजनार्दनाला उपयोग व्हावा असा उच्च हेतु मनात धरावा. ( ४ ) ' मी काही कर्म करणार नाही ' असे कोणी म्हणू नये. प्रत्येकाने प्रत्यही काही तरी उत्तम कर्म केलेच पाहिजे. '

कर्मफल–त्यागाचा सिद्धांत गीतेमध्ये विशेष प्रामुख्याने सांगितला आहे. पूर्वीच्या वैदिक वाङ्मयात तो एक वा अन्य स्वरूपात आला असला तरी गीतेमधील महत्त्वाइतके प्रतिष्ठेचे स्थान त्याला इतरत्र नव्हते. मनुष्याने कर्म केलेच पाहिजे; कारण त्याचा तो स्वभावच असतो अगर अधिकारापरत्वे कर्म करणे त्याच्याकडे येते. म्हणून मनुष्याने आळस म्हणून कसा तो करता कामा नये व कर्माचा योग्य मोबदला आपणास मिळाला तरच मी कर्म करीन, असा जीवनाचा सौदाही त्याने करू नये. गीतेच्या अध्याय ३ श्लोक ३ ते ५ व २७, अध्याय ५ श्लोक १४, अध्याय १३ श्लोक २९, अध्याय १४ श्लोक ९, १२ व १५, अध्याय १८ श्लोक ११ व ६० यामध्ये गीतेने स्वच्छच केले आहे की– ' या जगतामध्ये दोन प्रकारचे लोक आहेत. एक स्वभावतः कर्माकडे प्रवृत्त असणारे व दुसरे स्वभावतः ज्ञानाकडे प्रवृत्त असणारे. हे स्वभाव बदलता येत नाहीत. नुसता कर्माचा आरंभ केला नाही, म्हणून तेवढ्याने संन्यास साधतोच असे नाही. कोणताही प्राणी क्षणभरसुद्धा कर्म केल्याशिवाय राहू शकत नाही; कारण त्याच्या प्रकृतिस्वभावाच्या गुणाधर्माप्रमाणे प्रत्येकाकडून कर्म हे होतच असते. प्रकृतीच्या गुणाप्रमाणेच सर्व कर्मे होत असतात. अहंकाराने मूढ झालेलाच मात्र ' मी करतो ' असे म्हणत असतो. ईश्वर कोणाचे कर्तृत्व किंवा

कोणाची कर्मे उत्पन्न करीत नसतो. हा ज्याचा त्याचा प्रकृतिस्वभाव आहे. तो त्याच्याकडून कर्मे करवीत असतो. प्रकृतिचें गुणच सर्व कर्मे करीत आहेत असे पाहणे हेच खरे पाहणे आहे. रजोगुण वाढल्याने कर्मामध्ये प्रवृत्ति होते. रजोगुण वाढला म्हणजे लोभप्रवृत्ति ' कर्मे सुरू करण्याची बुद्धि, अशांति व इच्छा ही होत असतात. रजोगुण वाढल्यानंतर मरण आले तर पुढील जन्म सतत कर्म करणाऱ्यामध्ये होतो. ज्याला ज्याला म्हणून शरीर आहे, त्याला त्याला संपूर्ण कर्मे टाकणे शक्यच नाही. आपल्या देहस्वभावाप्रमाणे प्रत्येक मनुष्य कर्माने बांधला आहे. जरी त्याने (कर्म) करणार नाही असे म्हटले तरी अंगस्वभावाप्रमाणे त्याच्याकडून कर्म हे घडणारच. ' ( पं. सातवळेकर ). कर्म न केले, तर गीता अध्याय ३ श्लोक सांगतो त्याप्रमाणे, देहव्यापारसुद्धा चालणार नाही.

आळस टाकून कर्म करीत रहावयाचे तर ज्याच्या योगाने भूतमात्रांच्या अस्तित्वाचा विकास होतो, त्या व्यापाराला कर्म म्हणतात ( गीता अ. ८ श्लो. ३ ) हे लक्षात ठेवले पाहिजे. अस्तित्वाचा विकास वा उन्नति ( भूतभावोद्भव ) करणारा व्यापार ' वि–सर्ग ' ( दान ) स्वरूपाचाच झाला पाहिजे. ज्या वस्तूवर आपला अधिकार आहे ती वस्तु सामुदायिक उन्नतिसाठी पूर्णपणे अर्पण करणे हे त्या कर्माचे मर्म राहिले पाहिजे. ' सर्वं यज्ञे प्रतिष्ठितम् । ' कर्माचे अकर्म वा विकर्म होता कामा नये. अ–कर्म म्हणजे आळस, कर्म करूनही न केल्यासारखे होणें, भाराभर, किंवा कामाला हातच न घालणे; आणि वि–कर्म म्हणजे करायला नको ते करणे, विरोधी वा घातक काम करणे ! उघडच, ' अचूक चुकेना कोठे ' असे कर्म ' उद्भवकर विसर्गाने ' म्हणजे उत्पादक श्रमदानाने व्हावयाचे तर जे काही घडले ( भूत ) वा प्राणिमात्र, यांचे अस्तित्व, आहेरेपण वर उमटून येईल अशी कृति घडली पाहिजे. तसे होण्यास ' योगामध्ये राहून व फलासक्ति सोडून कृति केल्याशिवाय गति नाही. ( गीताध्याय २ श्लोक ४८ )'

योगामध्ये राहून कर्मे करावयाची ती कशी ? गीता अध्याय २ श्लोक २९ ते ४१, ४८, ५० व ५३, अध्याय ४ श्लोक १८ व ४२, अध्याय ५ श्लोक ८, अध्याय ६ श्लोक २, ८, १८, १९, २३ व ३६, अध्याय ८ श्लोक ८, अध्याय १० श्लोक ७, अध्याय १२ श्लोक ६ आणि अध्याय १७ श्लोक १७ या ठिकाणी त्याचा उलगडा होतो. पंडितजी सातवळेकरांच्या भाषेत त्यांचा सारांश असा की ' योगबुद्धि म्हणजे काय ते सांगतो ऐक. या योगदृष्टीने कर्मे केली असता कर्माचा काही दोष लागत नाही. या मार्गात क्रम नाश पावला तरी काही बिघडत नाही. विघ्नाची भीति नाही. याचे थोडे जरी आचरण घडले तरी त्यापासून मोठे भय दूर होते. या योगात सतत काही करण्याचीच काय ती बुद्धि पाहिजे. ( २ ) योग म्हणजे समता, ( ३ ) योग म्हणजे काम करण्याचे कौशल्य व ( ४ ) योग म्हणजे काम आणि क्रोध याचा वेग सहन करणे म्हणजे त्या वेगामुळे आपला मार्ग न सुटणे, ( ५ ) ऐकीव भोगासाठी

चंचल झालेली तुझी बुद्धि जेव्हा स्थिर होईल तेव्हा योग साधेल. ( ६ ) सर्व संशय सोडून योग कर. योग म्हणजे संन्यासच. कारण संकल्पाचा त्याग केल्याशिवाय योग होत नसतो. ( ७ ) असंयमी मनुष्याकडून योग होणे नाही. ( ८ ) योग म्हणजे अविकंपन, अचांचल्य; योग म्हणजे अनन्य होणे. हाती घेतलेल्या कर्माशिवाय दुसऱ्याकडे मन न जाणे. योग म्हणजे इंद्रियाची स्थिरता. ( ९ ) मनुष्यामध्ये जो विशेष बुद्धिमान् असतो, तो योग आचरून सर्व कर्म यथास्थिति करतो. ( १० ) तत्त्वाचे ज्ञान जाणणारा योग करू शकतो. ( ११ ) ज्ञानी व विज्ञानी, जितेंद्रिय, तिऱ्हाइताप्रमाणे वागणारा, ज्याला माती व सोने सारखी आहेत अशा माणसाला योगी असे म्हणतात. ( १२ ) सर्व भोगाविषयी जो अगदी निःस्पृह असतो, त्याला योगी असे म्हणतात. ( १३ ) निर्वात जागी असणारा दिवा जसा हालत नाही, तसे संयमी योग्याचे मन निश्चल असते. ( १४ ) योग हा मन खिन्न नसताना करता येतो. ( १५ ) अभ्यासाच्या वेळी चित्त चंचल होऊन भलभलतीकडे भटकू नये. ( १६ ) फलाची इच्छा न धरणारे योगी करतात ते सात्त्विक तप होय.'

या योगाने कर्मे केली पाहिजेत म्हणजे ती निर्दोष होतील, शक्य तितकी उत्तमातील उत्तम होतील. तरीही फलावर आसक्ति ठेवू नये, किंवा फलाचें दान करावे, फलाचा त्याग किंवा संन्यास करावा, असेही गीता सांगते. गीता म्हणते— फलाच्या हेतूने कर्म करणारे कृपण होत. ( अ. २ श्लोक ४९ ), त्यांची उन्नति होणे शक्य नाही. कृपणतेच्या दोषामुळे उपजत गुण नाहीसे होतात व कर्तव्याविषयी चित्त भ्रांत होत असते. ( गीता अ. २ श्लो. ७ ) ज्ञान होईल तर मनुष्य फळाचा हेतु ठेवणार नाही. फलासक्तीचा त्याग करण्यासंबंधी गीतेमधील अ. २ श्लोक ४७ व ४८; अ. ३ श्लोक ९, व १९, २५, २९, ३०; अ. ४ श्लोक १४, १९ ते २१, व २३; अ. ५ श्लोक १० व ११, १२; अ. ६ श्लोक ३, ४, व २४; अ. ९, श्लोक ९; अ. १२ श्लोक ६; अ. १७ श्लोक १२, २१, २५; अ. १८ श्लोक २, ६, ९, १२ व २२, आणि ५७ यात विवरण आहे. त्यावरून कर्मफलत्यागाचा सिद्धांत पंडितजी मांडतात तो असा— ' ( १ ) फळावर मनुष्याचा अधिकार केव्हाही नाही. फळाचा हेतु मनात धरून कर्म करू नको. फळावरील आसक्ति सोडून कर्म कर. ( २ ) फळावरील आसक्ति सोडून सतत कर्म कर. फळावरील आसक्ति सुटली म्हणजे मनुष्याला श्रेष्ठता प्राप्त होते. ( ३ ) ज्याला कर्माच्या फलाची इच्छा नाही, त्याला कर्माचा दोषही लागत नाही. भोगवासना न धरता जो सर्व कर्मे करतो, त्याचे सर्व कर्मदोष ज्ञानाच्या योगाने जळून जातात; अशा मनुष्याला शहाणे लोक पंडित असे म्हणतात. कर्माचे फळ मला भोगावयास मिळावे अशी इच्छा न करता नित्य संतुष्ट राहून व दुसऱ्यावर अवलंबून न राहता मनुष्याने कर्म करावे. म्हणजे त्याचा दोष त्याला लागत नाही. भोगेच्छा सोडून, इंद्रिय संयम करून, आपल्यापाशी भोगसाधने जमवून न ठेवता, कर्म करावे. म्हणजे त्यास पाप लागत नाही. फलभोगाची इच्छा न करता

ज्ञानी मनुष्य यज्ञासाठी म्हणजे सर्वजनहितासाठी जे कर्म करतो त्यामुळे दोषच उत्पन्न होत नाही. ( ४ ) आपली सर्व कर्मे परमेश्वराला अर्पण करावी, फलाची इच्छा धरू नये म्हणजे पाप लागत नाही. फलभोगाची इच्छा सोडून योगी लोक आपल्या पवित्रतेसाठी शरीर, मन, बुद्धि व इंद्रिय यांच्या योगाने कर्म करीत असतात. अशा कर्मामुळे ते अधिकाधिक पवित्र होत असतात. ( ५ ) मी केलेल्या कर्माचे फळ मला मिळालेंच पाहिजे अशी भोगेच्छा मनात न धरता जो आपले कर्तव्यकर्म करतो तोच संन्यासी व तोच योगी होय. जेव्हा इंद्रियाच्या विषयामध्ये व कर्मांच्या फळामध्ये मनुष्य गढून जात नाही तेव्हा त्याला योगाची वरची भूमिका प्राप्त होते. उदासीन असल्याप्रमाणे कर्मफलावर आसक्त न होता जो कर्म करतो, त्याला दोषाची बाधा होत नाही ( ६ ) म्हणून फल व आसक्ति सोडून कर्मे करावी. कर्तव्य कर्म करीत असताही फलाचा त्याग करणे हा सात्त्विक त्याग असल्यामुळे तो उत्कर्षाला नेणारा आहे. ( ७ ) अज्ञानी लोक फलभोगाच्या आसक्तीने कर्मे करतात म्हणून ते कर्मांच्या दोषाने दोषी होतात. आसक्तीने केले जाणारे कर्म तामस असल्यामुळे ते अधोगतीला नेते. फलाचे दान करून निरोगी अशा उच्च पदाला मनुष्य जातो, त्याला शांति मिळते. ( ८ ) फलाच्या उद्देशाने कर्म करणे हे राजसवृत्तीचे म्हणजे भोगवृत्तीचे लक्षण आहे. फलावरची आसक्ति सोडून मोक्षाची इच्छा करणारे अनेक प्रकारची दाने करीत असतात. जे फलाचा त्याग करीत नाहीत, त्याना त्याच्या कर्माचे इष्ट, अनिष्ट व मिश्र असे तीन प्रकारचे फळ भोगावे लागते; पण फलाचा त्याग करणाऱ्याना त्याचा काही संबंध रहात नाही. ( ९ ) योगाच्या नियमाप्रमाणे फलासक्ति सोडून कर्मे करावी व सर्व भोगसंकल्प सोडावे. सर्व कर्मांच्या फळांचे दान करावे. हे दान श्रेष्ठ आहे. सर्व कर्मे ईश्वराला अर्पण करावी, फलाशा धरू नये, ममत्व सोडावे व चिंता सोडून सर्व कर्म करावे. सर्व कर्मांच्या फलांचा मनापासून असा संन्यास केला म्हणजे संयम साधतो व सुख मिळते. सर्व कर्मे ईश्वराला अर्पण करावी व स्वतः ईश्वराचे कार्य करण्यासाठी तयार असावे. '

हा कर्मयोग आहे, कर्ममार्ग आहे. कर्ममार्ग सर्व जनतेसाठी आहे. गीतेच्या उपदेशाप्रमाणे सर्व जनतेचे दोन भाग आहेत; सांख्यनिष्ठ व कर्मनिष्ठ ( गीता अ. ३ श्लो. ३ ) जी सामान्य जनता आहे, जे चित्तशुद्धीसाठी कर्म करण्याचे अधिकारी आहेत, त्याच्यासाठी कर्ममार्ग आहे. हा सर्वांत सोपा व अगदी तळच्याही लोकास करता येण्यासारखा आहे. ( गीता अ. ९ श्लो. ३२ आणि अ. १२ श्लो. ८ ते ११ ). राष्ट्रामध्ये सर्व कर्मांचे शिक्षण उत्तमात उत्तम मिळावे अशी शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे; कारण प्रत्येकाला आपले काम कौशल्याने करता आले पाहिजे. ( गीता अ. २ श्लो. ४८ व ५० ) कारण प्रत्येकाने आपल्या कर्माने परमेश्वराला पूजून सिद्धि मिळवावयाची आहे. ( गीता अ. १८ श्लो. ४६ ) उत्तम शिक्षक, उत्तम सैनिक, उत्तम व्यापारी, उत्तम कारागिरी, उत्तम सेवा, उत्तम निसर्गकृपासंरक्षण,

उत्तम संतति अशा विविध अंगानी परमेश्वराची पूजा करून जन्माचे सार्थक्य साधावयाचे, ही परमेश्वराची विविध पूजा होय.

ईश्वर निर्गुण निराकार आहे. पण तो अमूर्त असताही अनेक मूर्तींच्या रूपाने प्रत्ययास येतो. गीतेमध्ये अकराव्या अध्यायात विश्वरूप दर्शन आहे, त्यावरून सर्व भूतमात्राची समष्टि हेच परमेश्वराचे रूप आहे ' **वासुदेवः सर्वं** ' ( गीता अ. ७ श्लो. १९ ) असे सांगितले आहे. आपापल्या कर्तव्यकर्माने त्याचीच पूजा करावयाची आहे. ती कर्मफलसमर्पणाने होते.

कर्माचे फळ म्हणजे लाभ कोणत्याही स्वरूपात असला तरी लौकिक व्यवहारात ते धन होते. पैसा, रत्ने, गाई, भूमि, धान्य, कपडेलत्ते यांच्या प्रमाणेच मान, पत, मनाची शांति, लौकिक इत्यादि धनच होत. ज्याच्या योगाने मनुष्य धन्य समजला जातो व होतो, ते धन होय. या धनाचा त्याग परमेश्वरपायी झाला पाहिजे. म्हणजेच कर्मफळाचा संग कायमपणाने सोडला पाहिजे, तो ' **स्थिरचर व्यापुनि वशांगुळे उरला** ' अशा परमेश्वरापायी. व्यवहारात उतरण्यासाठी, जनताजनार्दनापायी. मनुष्याच्या उपासनेच्या कक्षेत निदान स्वतःच्या राष्ट्रातील मनुष्य–समाज तरी येऊ शकेल ना ? ' त्या राष्ट्रदेही जनताजनार्दनाला आपल्या कर्माचे फळ अर्पण करणे हे संग सोडणे किंवा फलासक्ति टाकणे या निषेधलक्षणाचे ' विधिलक्षण ' आहे ' असे पंडितजींचे प्रतिपादन आहे. नरांच्या समूहात जाणारा ( नर + अयन ) नारायण राष्ट्र तरी खास होय. कर्मांच्या फलाचा संन्यास म्हणजे कर्माच्या फलाची ठेव राष्ट्राहाती कायम देऊन टाकणे होय. अनन्यभावाने असे होईल तर गीता अ. ९ श्लो २२ मध्ये सांगितल्याप्रमाणे जनता जनार्दनसेवायोगी माणसाच्या योगक्षेमाची चिंता खास वाहील. पंडितजी सांगतात की—

' आमच्या मते गीतेमधील हा कर्मफलत्यागाचा उपदेश राष्ट्रीय दृष्टीने सर्वाच्या आचरणात आणण्याजोगा आहे. जर तो आणला गेला, तर फलसंग्रहामुळे उत्पन्न झालेली आजच्या जगातील बहुतेक दुःखे नाहीशी होतील व सर्व मानवसमाज अधिक सुखी होईल. '

मनुष्यानी ' नराचा नारायण ' बनावे म्हणून गीता भगवंतानी नराला ( अर्जुनाला ) सांगितली आहे. उन्नति प्राप्त करून घेण्यासाठीच मनुष्याचा जन्म आहे. मनुष्याचे हे ध्येय ' ब्रह्मप्राप्ति ' या शब्दाने अ. ८ श्लो. २४, अ. १३ श्लो. १०, अ. १८ श्लो. ५० येथे गीतेने सांगितले आहे. उपासना म्हणजे जवळ बसणे, सान्निध्यात राहणे. जर लोखंड किंवा लाकूड अग्निच्या सान्निध्यात राहण्याने अग्निसारखे होत असते, तर मनुष्य हा ईश्वराच्या सान्निध्यात राहू लागल्यावर ईश्वर का बनणार नाही ? नराचा नारायण होणे याचा अर्थ पुरुषोत्तम, पूर्ण पुरुष होणे होय. मी लहान आहे, मी मूढ आहे असे वाटताच नर आपल्याच शरीररूपी रथात बसणाऱ्या नारायणाला

( ईश्वराला ) आपली शक्ति वाढविण्याची युक्ति विचारतो. ' अर्जुनरूपी नराने भगवान्‌रूपी नारायणाला हाच प्रश्न गीतेच्या प्रारंभी केला आहे. याच प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी गीतेचा अवतार आहे. मनुष्याने ' पूर्ण पुरुष ' कसे बनावे, कोणत्या उपायानी मनुष्यामधील अपूर्णत्व जाऊन तेथे पूर्णत्व येऊ शकेल, याचा विचार गीतेने केला आहे. ' असा पंडितजींचा दृष्टीकोन आहे. गीतेत अ. ९ श्लो. ३२ व ३३ मध्ये म्हटल्याप्रमाणे, पुरुष कर्मयोगाने वागला तर तो पूर्णत्वास पोहोचू शकतो; हा उन्नतीचा मार्ग सर्वांना सारखा मोकळा आहे. नारायण, पूर्ण पुरुष, उत्तम पुरुष होणे यालाच ब्रह्मप्राप्ति, परमात्मप्राप्ति, ईश्वरप्राप्ति, देव मिळणे इत्यादि नावे आहेत. सर्व प्रकारची अपूर्णता दूर केली म्हणजे पूर्णता प्राप्त होणे शक्य आहे. ' परमेश्वराचा अंश या लोकी सनातन जीव होऊन राहिला आहे ' ( गीता अ. १५ श्लो. ७ ) तो मनुष्य विघ्नाना न जुमानता पुन्हा परमेश्वर स्वरूपात निश्चयाने विस्तारणार. हा आत्मविश्वास मनुष्याच्या मनात स्थिर झाल्यावर तो समर्पण–बुद्धीने आपल्या आयुष्यातील प्रत्येक पाऊल टाकू लागेल व त्याला ' **आहे तरी सर्वाठायी । पाहो जाता कोठेच नाही ॥** ' असे परमेश्वरी अधिष्ठान खास प्राप्त होईल. पंडितजींनी श्रीमद् भगवद्‌गीतेवर लिहिलेल्या ' पुरुषार्थबोधिनी ' टीकेचा हा कटाक्ष आहे.

**हरिरेव जगत् जगदेव हरिः । हरितो जगतो नहि भिन्नवपुः ॥**
**इति यस्य मतिः परमार्थमतिः । स नरो भवसागरमुद्धरति ॥**

हे मग वैयक्तिक सेवाभावी व समर्पित जीवनाचे लक्ष्य राहते. त्या दिशेने वाटचाल करताना, लोकमान्य टिळकानी म्हटल्याप्रमाणे माणूस ' देह व देव याच्यामध्ये देश आहे. ' हे विसरू शकत नाही. अर्थात् समाजसन्मुख होऊन स्वकर्तव्याची परिपूर्ति करताना नागरिक म्हणून आणि आपल्या कर्तव्यक्षेत्रातील, कर्तृत्वकीर्तिव्यापी वर्तुळातील अगर त्या दोहोमुळे लोकांच्या हृदयात फुललेल्या आशाआकांक्षाच्या परीघातील, नेतृत्व आपल्या कुवतीप्रमाणे सांभाळून माणसाला आपला देश आणि जग कोठे आहेत हे पहावे लागते आणि आपल्या राष्ट्राची प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी मनुष्याला व्यावहारिक राजकारणापासून सर्व व्यवधाने राखावी लागतात.

श्रीमद् भगवद्‌गीतेसारखा जगद्वंद्य सार्वभौम ग्रंथ ज्याने निर्माण केला त्या व्यासकृत महाभारताचे ' **म्हणून जे महाभारती नाही । ते नोहे लोकी तीही ॥** असे ज्ञानेश्वरानी वर्णन केले आहे. त्या विद्वन्मान्य, सर्वंकष स्वरूपाच्या महाभारताला पाचवा वेद म्हणतात. मानवी स्वभावातील छटांचे यथार्थ बोधक बारकाईचे वर्णन, नव्हे बहुरंगी चित्रण, कर्तव्याकर्तव्याचे सूक्ष्म विश्लेषण, मानवधर्माचे मार्मिक उद्‌बोधन महाभारतासारखे कोणत्याही जागतिक महत्त्वाच्या ग्रंथात आढळणार नाही. या मृत्युंजय ग्रंथाने भारताला विनाशाच्या गर्तेतून वाचविणारे अनेक महापुरुष निर्माण केले असल्यामुळे, तो ग्रंथ भारताचा मानबिंदु होऊन बसला आहे. त्यातील भगवद्‌गीताग्रंथ धर्माधर्माचे विवरण करणारा, केवळ तत्त्वज्ञानात्मक नसून तो

प्रामुख्याने राजनीतिशास्त्राचा आहे. हे पंडितजींचे मत अभिनव व विलक्षण मानणारे चिकित्साप्रभाकर काही कमी नाहीत. गीतेतील साम्ययोग म्हणजे राज्यशासनयोग होय, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न पंडितजींनी केला. गीतोपदेशामुळे, '**किं नो राज्येन गोविंद, किं भोगैर्जीवितेन वा ।**' असे म्हणणारा अर्जुन राज्याचा विचार करू लागला, हा आधार पंडितजींनी आपल्या मांडणीस घेतला आहे. विश्वरूप दर्शनाच्या अकराव्या अध्यायात गीतेचे सर्वसार आले आहे, असा पंडितजींचा निष्कर्ष आहे. राजविद्या, राजगुह्य या गीताशब्दांचा राज्यशासनपर अर्थच पंडितजी प्रमाण मानतात. आपल्या पुरुषार्थ–बोधिनी गीताटीकेमध्ये गीतेतील सिद्धांत प्राचीन ग्रंथातून कोणत्या स्वरूपात विशद केले आहेत, ते पंडितजींच्या टीकेइतके कोणीच उलगडून दाखविलेले नाहीत.

**मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।** ( गीता ९।१० )

**प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।** ( गीता ३।२० )

**प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः यःपश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥**
( गीता १३।२९ )

या सारख्या श्लोकातील अध्यक्ष, प्रकृति, कर्ता, अकर्ता या शब्दाचे प्रसिद्ध अर्थ गृहीत धरून राजकीय अर्थ पंडितजी विशद करताना दिसतात. कारण युद्धाचे तात्कालीन परिणाम आणि परंपरेने होणारे परिणाम याचे भडक चित्र अर्जुनाने ( अ. १ मध्ये ) मोठ्या विचाराने काढले आहे. त्याचेही कारण युद्धातील जयापजय हा सारा संभव असून, रणांगणावर भारताच्या संरक्षक शक्तीचा संहार होऊन पितामहापासून पौत्रापर्यंत पाच पिढ्या कामास आल्या तर जय मिळवून राज्य हाती आले तरी त्याचा उपयोग काय ? अशी विचारसरणी युद्धपूर्व संजय–शिष्टाईने अर्जुनाच्या मनी बिंबवली होती. ती दोन सैन्यामध्ये कृष्णाने अर्जुनाचा रथ उभा करताच एवढ्या जोराने उसळून आली होती की युद्धात बेफिकीरपणे दंड थोपटून उठणारा व शेकडो युद्धे जिंकणारा सव्यसाची धनुर्धर अर्जुन '**क्लैब्यं मा स्म गमः पार्थ, नैतत्त्वय्युपपद्यते क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥**' अशा कृष्णाच्या कानउघाडणीस पात्र ठरला. '**क्लैब्या**' कडे झुकू लागलेल्या नरवीर अर्जुनाला पुरुषार्थ-पराक्रमाकडे वळण्यासाठीच गीतेचा अवतार झाला. कर्म व्यक्तिदृष्टचा गुणयुक्त किंवा दोषयुक्त असलें तरी समाजदृष्टचा ते केवळ गुणमय असू शकेल इकडे लक्ष देऊन मनुष्याने ते करावे, पापाची त्यास भीतिच नको, असा आरंभ करूनच कृष्णानें अर्जुनाला कर्तव्यप्राप्त युद्धाला तयार केले वर, त्या प्राप्त कर्तव्याच्या फळाला ईश्वरार्पणबुद्धीने पहावयास सागून '**कुर्वन्नाप्नोति किल्बिषं ।**' असा निर्वाळा दिला. अशा निर्वाळ्यामुळेच '**शिष्यस्तेऽहं**' म्हणून अर्जुनाने आपल्या सर्व शंका फेडून घेतल्या आणि '**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत । स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥**' असे म्हणून नुसता युद्धास तयार झाला नाही, तर ते युद्ध

त्याने श्रीकृष्णाच्या वचनाप्रमाणे ईश्वरसमर्पण–बुद्धीने केले.

क्लीबत्वाकडे झुकलेल्या अर्जुनात युद्धप्रवृत्ति निर्माण झाली; म्हणूनच गीता पुरुषार्थप्रवोधिनी आहे. त्याच पार्श्वभूमीवरून पंडितजींनी गीतेतील प्रत्येक शब्द तोलून चिकित्सेने टीकाप्रबोधन केले आहे.

**जैसे शारदीचिये चंद्रकले । माजी अमृतकण कोवळे । ते वेचिती मने मवाळे । चकोरकलगे ॥ १०५६ ॥ तियापरी श्रोता । अनुभवावी ही कथा । अति हळुवारपण चित्ता । आणुनिया ॥ १०५७ ॥ जैसे भ्रमर पराग नेती । परी कमळदळे नेणती । तैसी आहे सेविती । इये ग्रंथी ॥ १०५८ ॥ का आपुला ठावो न सांडता । आलिंगिजे चंद्र प्रगटता । हा अनुराग भोगिता । कुमुदिनी जाणे ॥ १०६० ॥ ऐसेनि गंभीरपणें । स्थिरत्वेलेनि अंतःकरणें । आथिला तोचि जाणें । मानू इये ॥ १०६१ ॥**

ज्ञानेश्वरीने गीतार्थसेवन कसे करावे याबद्दलचे रसाळ, सात्त्विक व मार्मिक मार्गदर्शन वरीलप्रमाणे केले आहे. त्यास अनुसरूनच पंडितजी सातवळेकरांनी गीतेकडे लक्ष पुरवले आहे.

वैदिक काळाच्या आर्यऋषींचा आत्मानुभव आर्य, वैदिक वा हिंदुधर्माचा मूळ पाया होय. त्या आत्मानुभवाची ज्योत प्रत्येक आर्यव्यक्तीच्या अंतःकरणात सदैव तेवत रहावी अथवा ते ध्येय पुढे ठेवून प्रत्येक भारतीयाने आपले दुसऱ्याचे, समाजाचे, राष्ट्राचे, व मानवजातीचे हित साधावे, आणि निदान तरी राष्ट्रीय एकोपा रहावा; या उच्च, उदात्त, भव्य, दिव्य व उदार विचारानी प्रेरित होऊन त्या महर्षींनी अध्यात्माचा दिवा सजवून प्रकाशित केला. ही योजना सृष्ट असल्यामुळे, ऱ्हासोपऱ्हासाला क्षम ठरली. सृष्टिनियमानुसार मतिविभ्रमाने प्रकाश मंदावण्याचे वा लोपण्याचे प्रसंग पूर्वकाळी अनेक वेळा आले.

**यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥१॥**
**परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् । धर्मस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥२॥**

अशी वहिवाट सांगूनच कृष्णानी ( वा व्यासानी ) गीतेचा अवतार साधला आहे.

सांख्य व योगज्ञानाचा समन्वय विसरून केवळ वेदवादरतिने ख्रिस्तीसनाअगोदर एकतीसशे वर्षांपूर्वी आत्मज्योत मंदावलेली दिसताच, ती पेटेशी करण्याचे कार्य भगवद्‌गीतेने केले. तिने तो समन्वय स्थापून, योगयुक्त अंतःकरणाने केलेले कर्म व्यक्तिला व राष्ट्राला, स्वपराक्रमाने दिव्य गाठावयास सहाय्यकच ठरते, असा लोकमानसावर ठसा उमटविला. त्यामुळे शब्दज्ञानांधाला डोळसपणा आला आणि धर्माचे पुनरुज्जीवन झाले.

‘ **स कालेनेह महता योगो नष्ट परंतप ।** ’ कारण कर्मलोलुपानी कर्मबंध टाळ-

ष्याचा उपदेश सोयीस्करपणे डावलला. परिणामतः गर्व, विषयासक्ति, उन्मत्तपणा वगैरेमुळे तपश्चर्या, शुद्धता याचे नावही निघेना आणि धर्मदीप मंदावण्याचा प्रसंग येण्यास चुकला नाही. या धर्मग्लानीचे यथातथ्य वर्णन श्रीमद् भागवतामध्ये ( स्कंध १ अध्याय १६ व १७ ) आढळते ती स्थिति भागवताने सुधारली. त्या राष्ट्रीय ग्रंथाने गीतांतर्गत उपदेशाचे राष्ट्राला पुनः स्मरण देऊन योगयुक्त भक्ति-विशिष्ट ज्ञानमार्गानेच कर्मे करावीत म्हणजे स्वानुभवात्मक आत्मज्योति प्रज्ज्वलित राहील असे पटवून दिले.

पुढे ही देखील आध्यात्मिक बुद्धिविशिष्टता मागे पडून शब्दपांडित्य बळावले. ' **यो बुद्धेः परतस्तु सः ।** ' हे परमेश्वरी तत्त्व गौतमबुद्धाने जाणले होते. म्हणून तो ' निर्वाणा ' चा प्रचार करीत होता. पण दृश्य जगत् चंचल माया आहे व दुःखाने भरलेले आहे, ते जगच्चालक चैतन्यशक्तिच्या शाश्वतीच्याच दृष्टीने होय, हा त्याचा साक्षात्कार त्याच्या अनुयायाना नसल्यामुळे, बुद्धाचे हृद्गत समजून न घेताच, त्याचे अनुयायी शून्यवादाच्या भरीस पडले. त्यामुळे वेदशास्त्रप्रणीत धर्म थोतांड ठरला; पाखंड मताना ऊत आला. ख्रिस्ती सनाच्या प्रारंभी तीनशे मतमतांतरे प्रचलित होती. त्या बुजबुजाटामुळे भारताच्या आर्यभूमीतच वेदपरंपरा कोणी मानीनासे झाले. कित्येक वैदिक कर्मकांड व त्यातीलही तंत्र यावर मात्र भर देऊन आत्मज्योति प्रज्ज्वलित राखण्याचा मूळ मंत्र विसरले. अशावेळी आद्य शंकराचार्य अवतीर्ण झाले. त्यानी सर्व बखेडा आपल्या अध्यात्मज्ञानसामर्थ्याने मोडून काढला व आत्मज्ञान-ज्योति प्रज्ज्वलित ठेवली.

श्रीमत् शंकराचार्यानंतर जे पंथ निघाले व मतमतांरे निर्माण झाली त्यात बुद्धि-वाद, वेदवाद आणि आत्मवाद याची भ्रमोत्पादक भेसळ होऊन आर्यधर्म म्हणजे अठरा धान्याचे कोडबोळे बनले. कोणाच्या कसल्याही वितंडवादाला वेदोपनिषदात, पुराणात व धर्मशास्त्रात आधार नाही असे होईना. त्यामुळे खरा धर्म कोणता याची समाजाला भूलच पडली. तेव्हा, ज्योतिसाक्षात्कारी ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, राम-दासप्रभृति महाराष्ट्रीय साधुसंतांचा व तुळशीदास, कबीर, कनकदास, पुरंदरदास इत्यादि अन्यप्रांतीय संताचा उदय होऊन दंभाचारावर, कर्मांधतेवर, तंत्रप्रस्थावर जोराचे कोरडे बसले. त्यामुळे अनेकाचे डोळे उघडले.

त्यातूनही त्या संतापैकी ज्यांच्या अनुयायांच्या मानसींचा अहंभाव विरला नव्हता, त्यांनी ( आपल्या संत-महंताना व ' **धर्मसंस्थापनेचे नर । झाले आहेत पुढे होणार ॥** ' ते विसरून ) आपापल्या पंथमठाचे सवते सुभे केले आणि स्वयंप्रतिष्ठेचे डोले मिरवले. त्यातून इंग्रजी राज्य आल्यावर, आर्यसंस्कृतीला विसंगत अशा पाश्चात्यांच्या आचार-विचारापैकी मोहिनीचा लोंढा सामाजिक मन ग्रासून बसला. त्याचबरोबर पाश्चि-मात्य विद्येने जागृत केलेली विचिकित्सा व तिच्या पकडीत धर्माविषयी अश्रद्धा यांच्यामुळे, माणसाने मोक्ष वा पूर्णस्वातंत्र्य अनुभवावे ही जीवाची मनीषा हिंदु-

धर्मांचा पाया आहे, हे भानच राहिले नाही. आत्मदृष्टीने व समाजाचा घटक या नात्याने माणसाला शीलवान् बनविणारे सर्व विचार, हेतु, विधि, नियम, आणि प्रवृत्ति, धर्म या सदराखाली येतात व अभ्युदयनिःश्रेयसाचा समन्वयसहकार साधून नीति नि अध्यात्म समाजात स्थायी करतात. धर्म, अर्थ काम आणि मोक्ष हे पुरुषार्थ एकमेकाला साधक व पूरक आहेत. या सर्वांची आठवण कोठल्याकोठे गडप होऊन निसर्गावर वा प्रकृतिवर सत्ता चालविण्याचेच ध्येय माणसानी धरले. '**विद्युल्लता नरे ती केली संदेशहारिका दासी** ॥' हा अभिमान मानव धरू लागला. पण मनुष्य त्रिगुणात्मक प्रकृतीची व बुद्धिमनांची निर्मिती निसर्गापासूनच आहे, हे मानव क्षणभर विसरला. निसर्गावर मानव सत्ता चालवू शकतो, मात करू शकतो; कोठपर्यंत? निसर्गाला त्याने प्रक्षुब्ध केले नाही तोपर्यंत. घरधनीण आपले पोर पाठीवर टाकून सगळ्या घराचा केर काढते, तेव्हा ते पोर घरधनीण आईचा घोडा करून खेळते; पण पोराच्या टाचा मारण्याने आईच्या बरगड्या दुखू लागल्या तर ती पोराला खाली उतरवून केरसुणीचा प्रसाद देते. तशीच गत आहे मानवी बुद्धीने निसर्गावर वा प्रकृतीवर सत्ता चालविण्याची किंवा मात करण्याची ! हे सर्व लक्षात वागवून, मानवाचे अंतीम ध्येय, परम स्वतंत्रता आहे; प्रकृतीपार म्हणजेच निसर्गात व निसर्गामागील चैतन्यशक्तीशी, तिचा साक्षात्कार घेऊन, समरस होऊन जाण्याची सहजता प्राप्त करून घेणे हे ध्येय आहे. आर्य धर्मीयाचा सर्व जीवनक्रम या मुख्य ध्येयाला अनुलक्षून असला पाहिजे, हे विसरून चालणार नाही. हा विवेक जनमनावर ठसविण्यासाठी ब्रह्मोसमाज, आर्यसमाज, प्रार्थनासमाज आणि स्वामी विवेकानंद, रामतीर्थ प्रभृतीनी कमालीचे प्रयत्न केले व गीतेचा निष्काम-कर्मयोग आचरून त्याचे उदाहरण घालून दिले. तरीही '**उद्धरेदात्मनात्मानं**' या गीता-सुत्रोधातील रहस्य उत्क्रांति वा आत्मोद्धार असून आत्मनियमन हा एकच उपाय, धनार्जन व धनोपभोग याचा दुरुपयोग थांबविण्यास आहे व तो धर्मपालनानेच सिद्ध होणारा आहे. हे भल्याभल्याच्या हातून आचरणशुद्ध राहिले नाही. ज्यांचेमध्ये विवेकबुद्धि जागृत आहे, ज्यांचेमध्ये पराक्रम व देशभक्ति तल्लख आहे, ज्याचेमध्ये व्यवसाय-व्यवहार सूक्ष्म हिशोबाचा आहे आणि ज्यांचेमध्ये दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची आस्थाच आस्था आहे, या सर्वांनी सहकार्य करून सर्वांच्या उन्नतीला व हिताला अग्रमान द्यावा; वैयक्तिक अभिमान आणि महत्त्वाकांक्षा याना सद्सद्विवेक व न्यायनिष्ठुरता याच्या आधीन ठेवून 'समदर्शित्व' साधावे; हीच परमेश्वराची सेवा होय, असे विष्णुपुराण व गीता याचे सांगणे होय. असे सेवायोगी होण्यानेच सर्वांतर्यामीचा सर्वव्यापक परमेश्वर प्रसन्न होईल. उघडच जनताजनार्दन सर्वसमर्थ दिसेल. समाजाच्या, राष्ट्राच्या, मानवजातीच्या स्थिरतेला आणि ऐहिक नि पारमार्थिक स्वास्थ्याला दुसरे काय हवे? स्वकर्तव्यपूर्तीने साधावयाच्या सेवायोगातील अध्यात्माने निर्भयता येते. आणि '**अभयं, सत्वसंशुद्धिः ज्ञानयोगव्यवस्थितिः**' असली म्हणजे स्वातंत्र्यप्राप्ति अर्थात् मोक्ष सहज

प्राप्त होतो. म्हणून गीतेतील निष्काम–कर्मयोगाचे रहस्य लोकमान्य टिळकानी आपल्या विद्वत्तापूर्ण विवेचक ग्रंथाने विषद करून सांगितले. महात्मा गांधीनीही 'अनासक्तियोग' म्हणून गीतेचे विवरण केले. तथापि क्लीबत्वाकडे झुकलेल्या अर्जुनाला, समर्पणबुद्धिची दीक्षा देऊन कृष्णानी कर्मयोग शिकवला एवढाच महत्त्वाचा भाग नसून प्रत्येक कर्म समाजोन्नतिकडे पाऊलटाक करणारेच असले पाहिजे व ते तेजस्वी असले पाहिजे, ही त्या कर्मयोगाची पुरुषार्थबोधिनी आहे. हे पंडितजींनीच प्रथम निदर्शनास आणले. त्यासाठी गीतेच्या प्रत्येक शब्दातील सामर्थ्यासह प्रयोजन स्पष्ट करून पंडितजींनी आपले वैशिष्टय प्रगट केले आहे. गीताप्रबोधन करताना संकर, यज्ञ, नियतकर्म अशा कितीतरी शब्दाचे पूर्व टीकाकारापेक्षा अगदी निराळे अर्थ संदर्भानुरोधाने पंडितजींनी ठसविले असून गीतेत आलेल्या सर्व विषयाचा ( उहा-पोहाने ) समन्वय असा साधला आहे की पाश्चिमात्य तत्त्वज्ञानात प्लेटोला जे महत्त्व आहे, ते गीताटीकासंबंधातील विषयापुरते पंडितजी सातवळेकराना आहे. हृदयदौर्बल्य म्हणजे जिवंत मृतावस्था असल्याकारणाने '**श्रेष्ठ धारिष्ठ जीवो धरावे।**' '**आपुला विश्वास जतन करावा॥**' आणि '**योगः कर्मसु कौशलम्।**' हे लक्ष्यात ठेवून जीवन-संग्राम यशस्वी रीतीने पार पाडावा; मात्र निर्भय आणि निरहंकार वृत्तीने आणि समर्पण बुद्धीने सर्व फलिते जनताजनार्दनाच्या चरणी वहावी. अशी करून अकर्त्याची भूमिका अंगवळणी पडत गेली तर त्या परमेश्वरी अधिष्ठानावरून गीतेचे अद्वैतसार मनुष्याच्या अंगी मरेल आणि मग तो '**मनी धरावे ते होते। विघ्न अवघेचि नासोनि जाते॥**' हा अनुभव चाखीत राहील.

ठ ळ ठ

: ३५ :

# रामायण-महाभारतातून राष्ट्रनिर्माण

भारताच्या प्राचीन साहित्यात वाल्मीकी रामायणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतीय संस्कृतीचे परमोज्ज्वल स्वरूप रामायणातच प्रकर्षाने प्रगट झाले आहे. भारताचे ते आदिकाव्य व महाकाव्य आहे. त्याचा कर्ता वाल्मीकि ऋषि त्यालाही आदि-कवि म्हणूनच संबोधले जाते. रामायणाची लोकप्रियता दोन हजार वर्षांच्यावर चिकित्सक अभ्यासकातही टिकून आहे. रामाचे उदात्त चारित्र्य, सीतेची पतिनिष्ठा, लक्ष्मणाचे बंधुप्रेम, हनुमंताचा सेवाभाव, वानरासारख्या अप्रबुद्धांची भक्ति व कार्यतत्परता इत्यादि आदर्श सारखे लोकाच्या डोळ्यापुढे आहेत. रामायणातील वचने, उदाहरणे, गोष्टी या सर्व भाषांच्या वाङ्‌मयात उतरल्या असून लोकांच्या तोंडी खेळत, घोळत, रहात आल्या आहेत. तुळशीदासांचे रामचरितमानस व श्रीधराचा रामविजय ही रामायणस्फूर्त काव्ये अनुक्रमे उत्तर भारतात व महाराष्ट्रात आबाल वृद्धाची आवडती आहेत.

वाल्मीकिच्या संस्कृत रामायणात सात कांडे असून त्यात एकूण चोवीस हजार श्लोक आहेत. रामायणकालीन दंडकारण्यातील ऋषि रावणवधाचाच विचारप्रामुख्याने करीत होते. '**दसग्रीव-वधोद्यताः अप्रमेयबलाः वीराः।**' अशा प्रकारचे लोक ऋषींनी निर्माण केले होते. म्हणूनच रावणाने ऋषींचा उच्छेद मांडला होता. त्यातून भारतवर्षाणी सुटका कशी झाली हे श्रीवाल्मीकि रामायणावरून स्पष्ट कळते. वाल्मीकि रामायण हा स्फूर्तिदायक राष्ट्रीय महाकाव्याचा ऋषिप्रणीत अद्‌भूत ग्रंथ आहे. प्राचीन काळच्या तपस्वी ऋषींच्या राष्ट्रीय आकांक्षा काय होत्या, हे या ग्रंथाच्या अभ्यासाने कळून येणारे आहे. यात रामकालीन इतिहास आहे खरा; पण तो काव्यमय स्वरूपात आहे. इतिहास व काव्यमय इतिहास यातील भेद लक्षात घेऊन या

ग्रंथाचे मननपूर्वक वाचन झाले, म्हणजेच कवीचे हृद्गत वाचकाच्या मनात उतरू शकेल. या रामायणाचे लेखक आदिकवि श्रीवाल्मीकि ऋषि, या ग्रंथाच्या वाचनाने, श्रवणाने व मननाने राष्ट्रावर कोणता परिणाम व्हावा अशी अपेक्षा करीत होते हे त्यांच्याच शब्दात येथे दाखवणे, इष्ट आहे.

इदं पवित्रं पापघ्नं वेदैः पुण्यैश्च संमितम्।
यः पठेद्रामचरितम् सर्व-पापैः प्रमुच्यते ।। ९८ ।।
पठन् द्विजो वागृषभत्वमीयात् स्यात् क्षत्रियो भूमिपतित्वमीयात् ।। ९९ ।।
वणिग्जनः पण्यफलत्वमीयात् जनश्च शूद्रोऽपि महत्त्वमीयात् ।। १०० ।।

( वा. रा. बा. स. १ )

पुन्हा युद्धकांडाच्या शेवटी तेच ऋषि लिहितात—

धर्म्यं यशस्यमायुष्यं राज्ञां च विजयावहम् ।
आदिकाव्यमिदं चार्षं पुरा वाल्मीकिना कृतम् ।। १०५ ।।
यः शृणोति सदालोके नरः पापात् प्रमुच्यते ।
पुत्रकायश्च पुत्रान् वै धनकामो धनानि च ।। १०६ ।।
लभते मनुजो लोके श्रुत्वा रामाभिषेचनम् ।
महीं विजयते राजा रिपूंश्चाप्यधितिष्टति ।। १०७ ।।
राघवेण यथा माता सुमित्रा लक्ष्मणेन च ।
भरतेन च कैकेयी जीवपुत्रास्तथा स्त्रियः ।। १०८ ।।
श्रुत्वा रामायणमिदं दीर्घमायश्च विंदति ।
रामस्य विजयं चेमं सर्वमक्लिष्टकर्मणः ।। १०९ ।।
शृणोति य इदं काव्यं पुरा वाल्मीकिना कृतम् ।
श्रद्दधानो जितक्रोधो दुर्गाण्यतितरत्यसौ ।। ११० ।।
महीं विजयते राजा प्रवासी स्वस्तिमान् भवेत् ।
स्त्रियो रजस्वलाः श्रुत्वा पुत्रान् सूयुरनुत्तमान् ।। १११ ।।
भक्त्या रामस्य ये च मां संहितामृषिणा कृताम् ।
ये लिखन्तीह च नरास्तेषो वासस्त्रिविष्टपे । ।। १२० ।।
कुटुंबवृद्धिं धनधान्यवृद्धिं स्त्रियश्च मुख्याः सुखमुत्तमं च ।
श्रुत्वा शुभं काव्यमिदं महार्थं प्राप्नोति सर्वां भुविचार्थसिद्धम् ।। १२१ ।।
आयुष्यमारोग्यकरं यशस्यं सौभ्रातृकं बुद्धिकरं शुभं च ।
श्रोतव्यमेतन्नियमेन सद्भिराख्यानमोजस्करमृद्धिकामैः ।। १२२ ।।

( वा. रा. युद्ध. १२ )

शेवटी, उत्तरकांडाच्या शेवटीही लिहिलेले आढळते—

**इदमाख्यानमायुष्यं सौभाग्यं पापनाशनम् ।**
**रामायणं वेदसमं श्राद्धेषु श्रावयेत् बुधः ॥ ४ ॥**
**अपुत्रो लभते पुत्रं, अधनो लभते धनम् ।**
**सर्वपापैः प्रमुच्येत पादमप्यस्य यः पठेत् ॥ ५ ॥** ( वा. रा. उ. १११ )

वरील श्लोकावरून ( १ ) हे रामायण वेदासारखे पूज्य व धर्माचा उपदेश देणारे आहे, ( २ ) याच्या वाचनाने व श्रवणाने अंतःकरण पवित्र होते व उत्तम कर्मे करावी, अशी प्रेरणा होते. हे पापी विचाराना दूर करणारे आहे. आत्मशुद्धिसाठी रामायणाचे पठन सर्वांनी आवश्य करावे. ( ३ ) पापवृत्ति दूर झाली, शुभप्रवृत्ति वाढली म्हणजे आरोग्य वाढते. रामायणाने अशाप्रकारे आरोग्य वाढते. आरोग्य प्राप्त झाले म्हणजे दीर्घायुष्य प्राप्त होणेही स्वाभाविक आहे. ( ४ ) पृथ्वीवर जे भाग्य मिळण्यासारखे आहे व जी सिद्धि प्राप्त होण्यासारखी आहे, ते सर्व रामायणाच्या वाचनाने प्राप्त होते. ( ५ ) याच्या योगाने भावाभावामध्ये प्रेम वाढते, कुटुंब मोठे होते व त्यात प्रेम वाढते. ( ६ ) रामाने जशी कौसल्या, लक्ष्मणाने जशी सुमित्रा, भरताने जशी कैकेयी शोभली त्याप्रमाणेच सर्व स्त्रिया दीर्घायु व शूर अशा पुरुषानी युक्त होतील व ते मातांचे यश वाढवतील. ( ७ ) सर्वांची सर्व संकटे दूर होतील. ( ८ ) ब्राह्मण उत्तम प्रभावशाली श्रेष्ठ वक्ता होईल, ( ९ ) क्षत्रिय विजयीच विजयी होईल, ( १० ) वैश्याला सर्वत्र धनधान्याची समृद्धि होईल, ( ११ ) शूद्रालाही मोठे पद प्राप्त होईल. ( १२ ) रामायणाचा प्रसार करणाराना स्वर्गसुख मिळेल. अशा होत्या अपेक्षा श्रीवाल्मीकींच्या. प्रत्येक राष्ट्रात नेहमी घडाव्यात अशाच या अपेक्षा आहेत.

म्हणून रामायणाच्या प्रत्येक कांडाचे काळजीपूर्वक निरीक्षण करून त्यात आलेल्या प्रत्येक बारीकसारीक विषयाची पंडितजींनी सूची तयार केली; प्रत्येक कांडातील श्लोक व त्याखाली त्याचा अर्थ विशद करून सांगितला आहे आणि प्रत्येक कांडाच्या शेवटी त्याचे तपशीलवार समालोचन वेदश्रुतींतील साम्यस्थळासह करून प्रत्येक कांडात आलेल्या कथाचे विश्लेषण इतर पुराणातही आलेल्या त्याच कथांच्या स्वरूपदर्शनासह आणि तुलनासह वाचकाच्या पुढे ठेवले आहे. त्याचे प्रबोधन असे केले आहे की हिंसा वा मानवसंहार होऊ नये म्हणून शेवटच्या क्षणापर्यंत शांतिचे, समन्वयाचे निदान अविरोधाचे प्रयत्न करणारी भारतीय संस्कृति नाइलाज झाला, प्रयत्नवैफल्य प्राप्त झाले किंवा सहनशीलता दाखवूनही तिचा अंत बघणारी आक्रमणशीलता चालूच राहिली, तर शूराच्या अहिंसेचा शेवट झाला असे समजून, अन्यायाचा प्रतिकार निकराच्या प्रखरतेने केल्याशिवाय सोडत नाही.

अशा या आद्य महाकाव्याची पंडितजी सातवळेकर यांनी भाषांतर व परीक्षण यासहित समग्र आवृत्ति मराठी व हिंदी अशा दोन भाषातून काढली असून तिचे दहा

खंड आहेत. त्यातून वाल्मीकीच्या सात कांडाचे सविस्तर व मर्मग्राही दर्शन तर होतेच होते; पण शिवाय त्यावेळचे म्हणजे रामायणकाळचे राजकारण, समाजकारण, अर्थकारण आणि अशाच दुसऱ्या अंगोपागानी सजलेले सर्वच्या सर्व राष्ट्रीय जीवन याचेही साकल्याने आकलन होते.

रामायण हे महाभारतासारखे वीरमहाकाव्य आहे. रामचंद्राचे दक्षिणेत आगमन हे आर्यांच्या दक्षिण भारतावरील आक्रमक विजयाने दस्युदमनाचे रूपक आहे. अगस्ति ऋषीने दक्षिणेत वसाहत करण्याचा प्रयत्न केला होता पण शस्त्रसज्ज सैन्याच्या अभावी तो व्यर्थ झाला. रामाने दक्षिणेतील असंख्य राक्षस मारले. रावणाने सीतेला पळवून नेल्यावर तर सबंध राक्षसकुळाचा रामाने संहारच केला. या महायुद्धाचे विस्तृत वर्णनविवेचन म्हणजे रामायण. पण यापेक्षाही रामायणाचा एक काव्यमय अर्थ आहे.

ऋग्वेदात इंद्र हा सूर्य व वरुण या दोन देवतांचा प्रतिनिधि आहे. सीता या शब्दाचा अर्थ नांगरलेली जमीन. लव म्हणजे धान्य व कुश म्हणजे दर्भ किंवा गवत, रामाचा प्रमुख सेवक मारुति म्हणजे वायुपुत्र. रामाचा एक मोठा शत्रु इंद्रजित्. सीता ही भूमीची मुलगी. याप्रमाणे या महाकाव्यातील सर्व विभूतींचा संबंध निसर्गाशी जोडलेला असल्यामुळे रामायण हा इतिहास असूनही उत्प्रेक्षामय काव्य झाले आहे. मूळ काव्यात रामरावणयुद्धाचा आविष्कार मांडता मांडता नीति, धर्म, तत्त्वज्ञान, राजघराण्यातील भानगडी, इत्यादि विषयाचा त्यात उहापोह झाला आहे. मानवी संसारात अनेक सद्‌गुणाचा विकास कसा होतो हे रामायणाने दाखवले आहे. काव्य एकट्या वाल्मीकिचेच आहे. ते वाल्मीकिच्या उदात्त व गंभीर काव्यप्रतिभेने सर्वत्र अलंकृत आहे. संस्कृतातील अभिजात वाङ्‌मयाचा प्रारंभ रामायणाने केला.

**आदौ रामतपोवनाधिगमनं हत्वा मृगं कांचनम् ।**
**वैदेहीहरणं, जटायुमरणं, सुग्रीवसंभाषणम् ॥**
**वालीनिर्दलनं समुद्रतरणं लंकापुरीदाहनम् ।**
**पश्चाद्रावणकुंभकर्णहननमेतद्धि रामायणम् ॥**

असे रामायणाचे थोडक्यात वर्णन असले तरी सज्जनसंरक्षणार्थ रावणादिकाचा नाश केल्यावर त्याचे राज्य त्याचा भाऊ बिभीषण यास देऊन राम अयोध्येस परतले, या त्याच्या त्यागातील उदात्तता हा त्याचा कलशाध्याय आहे. किंबहुना, '**सर्वं यशे प्रतिष्ठितम् ।**' हेच रामायणाच्या हरएक कथाप्रसंगाचे प्रबोधन आहे.

हे प्रबोधन करताना रामायणाने वसाहतवाद आणि साम्राज्यशाही राजकारण याचे धागेदोरे उकलून दाखविले आहेत. आपल्या व राष्ट्राच्या सत्त्वशीलात्मक उन्नतिकरिता, दुर्लक्षित राहिलेले अगर मानवी उपयोगास न आलेले भूभाग कारणी लावून कोणाच्या अध्यामध्यात न पडणाऱ्या वसाहतवादी ऋषीमुनीना, आयत्या पीठावर

रेघोट्या मारणारे सत्तांध छळू वा उध्वस्त करू लागले, तर ते ऋषिमुनीही आपली शांति सोडून दंडकारण्याचे महाराष्ट्र करू पाहणाऱ्या स्वधर्मीय क्षत्रियकुलावंतासाला आक्रमक साम्राज्यवाद्यांच्या परिपूर्ण पराभवासाठी कशी झटून मदत करतात व त्यायोगे राजकारणाचे कसे आध्यात्मीकरण होते हेही पहाण्यासारखे आहेच आहे.

रामायण म्हणजे रामाचे साहसी जीवन. त्यावर वाल्मीकीने सात कांडांचे व चोवीस हजार श्लोकांचे एक महाकाव्य लिहिलेले आहे, त्यालाही रामायण या नावानेच संबोधतात; अशा पोरसमजुतीने त्या ग्रंथाला जे दुरून नमस्कार करतात, त्याना आपला वारसा केवढा मातबर आहे, याची कल्पनाच आलेली नाही, असे इतिहास स्पष्टच म्हणेल ! भारताच्या राष्ट्रीय नैतिकतेचा चिरेबंद पाया रामायणाने घातला असून, हे अधिष्ठान अभ्यासले नाही तर भारतराष्ट्र स्वाभिमानाने खडेखंब राहूच शकणार नाही. जगातील प्रमुख राष्ट्रांचा इतिहास काळजीपूर्वक अभ्यासत राहून राष्ट्रीय नेतृत्व करण्यासाठी, काळ–काम–वेगाने आपली पदसिद्ध कर्तव्यदक्षता सेवायोगी कशी करावी, हे ठायी ठायी शिकविणाऱ्या रामायणाचे परिशीलन भारतीयांच्या जागतिक प्रतिष्ठेस पोषकच ठरेल. मर्यादापुरुषोत्तम प्रभुरामचंद्राची मातृपितृभक्ति आणि आर्तत्राणाची आतुरता, उर्मिळेची प्रसिद्धिविन्मुख गुरुजनसेवा आणि कुलप्रतिष्ठेसाठी अबोल स्वसुखनिरपेक्षता याना जगाच्या वाङ्मयात कोठे जोड नाही.

रामायणातील सीता म्हणजे मूर्तिमती भारतमाताच; सहिष्णुतेजा उच्चतम आदर्श असेच स्वामी विवेकानंद मानीत. हनुमंताची निष्ठा सर्वकाळी इष्टच ठरणारी आहे. रामायणकाली दंडकारण्यात वसाहत होऊ लागली होती; पण तिच्यावर राक्षसांचे हल्ले होत असत. रामचंद्राने राक्षसांचा बीमोड करून दंडकारण्य निर्भय केले. त्याने लंकेचे राज्य जिंकले पण त्याचा अपहार न करता, विभीषणासारख्या सत्त्वशील अशा रावणाच्या भावालाच ते देऊन आपला निष्काम कर्मयोग जगाच्या प्रत्ययास आणला. त्याचा सहाय्यक हनुमंत कोणतेही साहस अशक्य समजणाराच नव्हता; प्रसंग कितीही बाका आला तरी त्यातून पार पडण्याइतका बरकंदाज होता. तरीही रावणवधाचे कष्ट रामास पडले म्हणून कष्टी होणारी हनुमानाची आई अंजनी मुलांच्या कर्तृत्वाबद्दल महत्त्वाकांक्षा बाळगणारी धारदार पिळाची माउली होती. तिने आपल्या लेकराला वज्र हनुमान् बनविले होते. लक्ष्मण–भरतांचा बंधुभाव आणि आपले वचन प्राणपणानेही सत्य व्हावे असे इच्छिणारा दशरथ–अशी कितीतरी तोलामोलाची सरस व आदर्श उदाहरणे ऐतिहासिक सत्याने रामायण मानवजातिपुढे ठेवून बसले आहे. श्रेष्ठश्रेयस्करांचा हा भारतीय वारसा अनमोलच आहे.

रामायणाइतकेच भारताचे दुसरे महाकाव्य म्हणजे कृष्णद्वैपायनकृत ( व्यासकृत ) महाभारत होय. त्यातील ज्ञानसागरामुळे ते पंचमवेद ठरले आहे. धृतराष्ट्र आणि

पांडु यांच्या चिरंजीवातील वैमनस्ये आणि हातघाई यांचे वर्णन करणारे महाकाव्य म्हणजेच महाभारत. त्याची अठरा पर्वे असून महर्षि व्यासांची ती निष्पत्ति आहे. महाभारत हे भारताचे अत्यंत लोकप्रिय असे राष्ट्रीय महाकाव्य आहे. ते गेली शेकडो वर्षे अखिल भारतीयांच्या प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे श्रवणमननाचा एक अंगभूत भाग बनून राहिले आहे. रीत सांगून गणित सोडवून दाखवावे त्याप्रमाणे या ग्रंथात धर्मोपदेशा-बरोबर त्याचा आचार व त्याचे फळ त्यांत दिग्दर्शित केलेले आहे. त्यामळे महाभार-ताचा वाचक व्यवहाराला व अनुभवाला प्राधान्य देतो. आपत्काळात तात्विक विचाराला कशी मुरड घालावी हे तो जाणतो. त्याचप्रमाणे आपत्तिने खंगून न जाता आपत्तीतून डोके वर कसे काढावयाचे हेही तो जाणतो. महाभारत हा सर्व प्राचीन विद्यांचा प्रतिनिधिभूत ग्रंथ आहे. राजकारणाच्या दृष्टीने त्यांत विदुरनीति, कणिकनीति अशा कितीतरी नीति आहेत; एवढेच नव्हे, तर द्यूतापासून चक्रव्यूहा-पर्यंत अनेक पेच व त्यांच्या उकली आहेत.

महाभारतातील अस्त्रे व तोफा, त्यातील उदात्त चरित्रे, त्यातील युद्धनीति, त्या-तील संस्कृतिसभ्यतेचे आदर्श, स्वामी विवेकानंदानाही अभ्यासासाठी नवतरुणाना शिफारावेसे वाटले. महाभारत हा सर्व प्राचीन विद्यांचा प्रतिनिधीभूत ग्रंथ आहे, असे म्हटल्याने त्यातील शहाणपणा इसवीच्या विसाव्या–एकविसाव्या शतकाला पुरून उरण्यासारखाच आहे. मनुष्यस्वभावातील सूक्ष्म, सूक्ष्मतर छटांचे आविष्कार, धर्म, कर्ण, भीष्म यांची उदात्तच उदात्त जन्मभरीची व्रते, सहनशक्तीच्या परमाव-धीने आपले सत्त्वपणास लावूनही आपल्याच सत्तांध चुलत भावांचा हृदयपालट न झाल्याने अपरिहार्य म्हणूनच युद्धास तयार झालेले पांडव, पांडवांची बाजू न्यायाची आहे असे निःस्पृहपणे सत्ताधारी कौरवाना बजावणारा व ' कण्या ' वर गुजराण कर-णारा विदुर, आपल्या गुणग्राहकतेने मयाकडून मयसभा उभारणारी आणि कसल्याही परिस्थितीत युगपुरुष भगवान् कृष्णाला 'आपला ' म्हणून राखून ठेवणारी पांडवांची निष्ठा, आपल्या सतीत्वाचे विडंबन करू पाहणाऱ्या मदांधाना प्राणांतिक शिक्षा दिल्या-शिवाय आपल्या पतींना स्वस्थ बसू न देणारी द्रौपदी, अशी कालचक्राशी झगडणारी वीरश्रीची उदाहरणे महाभारतातच विपुल ! ! महाभारत हे एक राष्ट्रीय महा-काव्य आहे. वीरकथांचा यात प्रचंड संग्रह असून तो ज्ञानभांडार आहे. कौरव–पांडवां-च्या इतिहासावर आधारलेल्या या महाकाव्यात तत्त्वज्ञान, धर्म, अध्यात्म, परमार्थ आणि राजनीतिसुद्धा सर्व व्यवहार असून मनुष्यस्वभावाच्या बारीक बारीक छटांचे त्यात व्यक्तित्व व पृथक्करण आले आहे. म्हणून त्याचा रचनाकार कृष्णद्वैपायन व्यास याबद्दल **' व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम् । '** असे वचन प्रचलित आहे. जनमेजय राजाच्या सर्पसत्राच्या वेळी वैशंपायनाने ते प्रथम सर्व म्हणून दाखविले. त्यानंतर कित्येकानी त्याच्या अगणित आवृत्त्या केल्या. महाभारताच्या भीष्मपर्वात आलेली अठरा–अध्यायी गीता हिंदुधर्माचा एकमेव ग्रंथ म्हणून प्रसिद्ध आहे. महाभारताच्या

*

अठरा पर्वातील बहुतेक श्लोक अनुष्टुप् छंदात असून पुष्कळ गद्यभागही आहे. तरीही **' यदिहास्ति तदन्यत्र, यन्नेहास्ति न तत्क्वचित ।'** असा सार्वभौम ग्रंथ महाभारत आहे. **' जे महाभारती नाही । ते नोहे लोकी तिही ॥'** असे ज्ञानेश्वरानीही म्हटले आहे. अशा सर्वंकष स्वरूपामुळे महाभारताला जीवनप्रबोध मानण्यात येतो. कर्तव्या-कर्तव्याचे सूक्ष्म विश्लेषण व मानवीधर्माचे मार्मिक उद्बोधन महाभारतासारखे कोण त्याही जागतिक ग्रंथात नाही. भारतापुरतेच बोलावयाचे तर या मृत्युंजय ग्रंथाने त्याला विनाशाच्या गर्तेतून वाचविणारे अनेक महापुरुष निर्माण केले असल्यामुळे तो भारताचा मानबिंदु होऊन बसला आहे. मूळ महाभारताच्या ८४००० श्लोकाचे आलोडन, पंडितजींनी वाङ्मयक्षेत्रात अधिकारवाणीने लेखनीन्यास करण्यापूर्वी, भारताचार्य म्हणून संबोधले गेलेल्या चिंतामणराव वैद्यानी व जनार्दन सखाराम तथा तात्यासाहेब करंदीकरानी केले होते.

आरंभीच्या ' जय ' नामक ग्रंथाचे ' महाभारत ' होईपर्यंत बृहतीकरणाची प्रक्रिया चालू होती. सूत्रवाङ्मयापासून या प्रक्रियेत परिवर्तन होऊ लागले. त्यामुळे महाभारत हा एक संशोधनविषय ग्रंथ होऊन बसला. डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे भारतातील अग्रगण्य संशोधक ( १८३७–१९२५ ) ! यांचा विषयांचा सांगोपांग, सखोल सूक्ष्म व सहानुभूतिपूर्ण अभ्यास ! त्याच्याबरोबर त्यानी अंगिकारलेली युरोपीय पंडितांची ऐतिहासिक व तौलनिक दृष्टि त्याच्या कठोर कसौटीला तेज चढविण्यासच कारण झाली. त्यांच्या ८१ व्या वर्षी स्थापन झालेले भांडारकर प्राच्यविद्या संशोधन-मंदिराने ४९ वर्षांच्या प्रदीर्घ तपश्चर्येने महाभारताचे संशोधन पुरे केले आहे.

प्रत्येक राष्ट्रास काही वीरकाव्ये असतात. त्यामध्ये त्या राष्ट्राची संस्कृति, वैभव, परंपरा, धर्म, वीर्य इत्यादि गुणांचा उत्कटत्वाने समावेश झालेला असतो. त्या राष्ट्रावर अशा ग्रंथाचा अतिशय परिणामही झालेला असतो. महाभारतास पहिले स्वरूप प्राप्त होऊन पाच हजाराच्यावर वर्षे होऊन गेली. त्यावेळी वैदिक देवता, वैदिकधर्माचार याचे महत्त्व पुष्कळ कमी झाले होते. महाभारताच्या आरंभापासून आजपर्यंत देशाच्या प्रत्येक भागात, शहरात व खेड्यात, बाल–तरुण–वृद्ध या सर्वावर महाभारताचा दैनंदिन परिणाम चालू आहे. देशातील सर्व कवीना आपल्या काव्यास महाभारताचा आधार तर सापडला आहेच; पण धर्म व नीति, व्यावहारिक शास्त्रे, सुखोपभोग व आध्यात्मिक उन्नति या चारही पुरुषार्थास साधनीभूत असे एकूण एक सर्व विषय महाभारतात विस्तृतपणे सांगितले आहेत. म्हणूनच या ग्रंथास पंचमवेद म्हणतात ते सार्थच सार्थ आहे.

महाभारत एकाच ऋषीचे नाही व एकाच पिढीत सबंध रचले गेले नाही. पहिलें जय नावाचे भारत अठ्ठ्याऐंशीशे श्लोकाचे होते. सूत्राचा रचनाकाळ व बुद्धधर्माचा प्रारंभकाळ यामध्ये या जय भारताची रचना झाली असावी. पुढे प्रसंग, भावना,

विचार यास अनेक विद्वानानी अधिक भव्य व तीव्र स्वरूप देऊन ग्रंथात पुष्कळ भर घातली. ते चोवीसहजार श्लोकाचे झाले. यानंतरचे स्वरूप ख्रिस्तपूर्व दोनशेच्या सुमारास प्राप्त झाले. त्यात पुष्कळ लहानमोठी उपाख्याने घालण्यात आली. काव्य-दृष्टयाही पुष्कळ अलंकार मूळ ग्रंथावर चढविण्यात आले. एक लक्ष श्लोकाचा तो ग्रंथ इसवीसनाच्या दुसऱ्या शतकात सिद्ध झाला, असे सर्वसाधारणपणे समजण्यात येते. अनेक लहान लहान राज्यातून एक मोठे साम्राज्य स्थापन झाल्याचे वर्णन महाभारतात आहे. उपनिषदामध्ये जशी गंभीर तत्त्वचर्चा आहे, तशीच साम्राज्य-स्थापनेच्या अनुषंगाने महाभारतामध्येही आहे. हा ग्रंथ वैविध्यपूर्ण व वैचित्र्ययुक्त अशा विश्वाचे व मानवी आयुष्याचे प्रगल्भ विवेचन करणारा आहे, असे पाश्चात्य चिकित्सकाचेही मत आहे.

ऋग्वेदात भरत या नावाचा उल्लेख तिसऱ्या, सहाव्या व सातव्या मंडलात वरचेवर येतो. पण ते लोकवाचक आहे. भरतलोक तृत्सूप्रमाणे पुरूंचे शत्रु आहेत, असे म्हटले आहे. ( ऋ. ७।८।४ ). ऋग्वेदातील दाशराज्ञयुद्धात भरताचे वर्णन येते. त्यावरून भरतकुल फार प्राचीन असून भरतकुलोत्पन्न राजा शिवोदास हा गांधार देशापासून दिग्विजय करीत आला. त्याने वसाहत थाटलेमुळे ते कुल गंगायमुनाच्या या देशात स्थैर्य पावले व देशाला भरतखंड असे नाव पडले. याच भरतकुळातील दुष्यंत–शकुन्तलाचा भरत हा पुत्र पराक्रमी निघून सार्वभौम सम्राट् झाल्यामुळे वशिष्टा-च्या चतुराईने तृत्सूचे व भरतलोकाचे एकीकरण झाले व देशालाही भरतखंड हे नाव मिळाले. दुष्यंत–शकुन्तलाच्या भरताचेच वंशज कौरव व पांडव असल्याने त्यानाही 'भारत' म्हणून लोक ओळखू लागले. त्यातल्या त्यात सत्वशीलता व पराक्रम याच्या तेजामुळे पांडवाना 'भारत' म्हणून विशेषप्रतिष्ठा मिळाली. अर्जुनाचा उल्लेख 'भारत' या संबोधनाने भगवद्गीता ग्रंथामध्ये कितीतरी वेळा आहे. कौरवपांडवां-च्या तांडव संगराला भारतीय युद्ध म्हणून संबोधण्यात येते, याचे कारण कौरव–पांडवाचे वजन सर्व देशावर असल्याकारणाने भारतदेशाची सर्व संरक्षकशक्तिच–सर्व क्षत्रियकुलावतंस–कुरुक्षेत्रावर गोळा झाली होती. त्या युद्धाच्या कारणमीमांसेसह इतिहासाला त्या वजनदारीमुळे महत्त्व आल्याने त्याचे महाकाव्य झाले व त्याला महाभारत हे नामाभिधान मिळाले. यमुनाद्वीपात जन्मल्याने द्वैपायन म्हटला गेलेला पराशर ऋषींचा सुपुत्र व्यास हा त्या महाभारत महाकाव्याचा कर्ता असून सर्वोप-निषदाचे दोहन करून त्या महाभारतात समाविष्ट केलेल्या भगवद्गीतेमुळे त्याचे नाव अजरामर ठरले आहे. त्याने कौरवपांडवांच्या तांडव संगराचे लिहिलेले काव्य 'जय' म्हणून जन्मास आले आणि अनेक शतकानुशतके अनेक जीवनावर प्रभाव गाजवित राहिले आहे.

मूळ जय ग्रंथाचे महाभारत झाले आणि त्यात जगात सापडणारे मनुष्यस्वभावाचे सर्व नमुने तर प्रगट झालेच; पण शिवाय कणिकनीति, विदुरनिति, शल्यनीति असे

राज्यशासनाचे व मनुष्यव्यवहाराचे चतुर पवित्रेही प्रगट झाले. आणि ?' **कालो वा कारणं राज्ञः, राजा वा कालकारणम् । इति ते संशयो मा भूत्, राजा कालस्य कारणम् ॥** ' असे त्रिकालाबाधित कितीतरी सिद्धांत अभ्यासकाच्या संग्रही संचित झाले. महाभारताच्या या साकारतेला त्यायोगे फार मोठा अर्थ प्राप्त झाला आहे. या महाभारताचा कर्ता व्यास असे म्हणण्यात ते एका स्थानमहात्म्याचे नाव आहे. जो विल्हेवारी करतो, विस्तार करतो, त्याला व्यास म्हणतात.

महाभारताच्या विस्तारविकासाने जीवनातील अंगोपांगाचा त्यात सूक्ष्मत्वाने समावेश झाला आणि महाभारताप्रमाणेच सर्व पुराणोपपुराणांचे कर्तेपण व्यासाकडे चिकटले. वेद हे अपौरुषेय म्हणताना, नावासकट नाहीसे स्वत होऊन आपले ज्ञान व कर्तृत्व तेवढे जगाच्या उपयोगाला देऊन जाण्यातील समाधान मानणाऱ्या निर्गुणकर्तृत्वाच्या ऋषींचीच परंपरा डोळ्यापुढे राहते. जयाचे महाभारत करणाऱ्या ऋषींच्या उदाहरणावरूनही तीच परंपरा आठवते. या अर्थाने महाभारतही अपौरुष आहे, म्हणूनही ते पंचमवेद म्हणून मानले गेले असेल.

महाभारतातील ज्ञानचक्र म्हणजे एक दिश्वकोश आहे. भारतातील तसा दुसरा ग्रंथ म्हणजे अग्निपुराण. सायणमाधवानी रचलेले भाष्यग्रंथ त्या त्या विषयाचे तेवढे ज्ञानकोश म्हणता येतील. महाभारत या ज्ञानकोश ठरणाऱ्या महाकाव्याचा कर्ता व्यास आणि ग्रीसची ईलियड व ओडिसी ही राष्ट्रीय महाकाव्ये रचणारा होमर यांची तुलना पुष्कळच होण्यासारखी आहे. ख्रिस्तपूर्व १२ व्या शतकापासून ख्रिस्तपूर्व ७ व्या शतकपर्यंत होमर केव्हातरी होऊन गेला, असा पुष्कळाचा समज आहे. उलट होमर म्हणजे संकलनकार असा अर्थ असल्याने व्यासासारखेच ते एक व्यापक टोपण नावही कित्येक मानतात. उपयुक्ततावादाच्या दृष्टीने महाभारतकार व्यासाची तुलना करताच आली तर, ख्रिस्तपूर्व आठव्या शतकात ग्रीसमध्ये झालेल्या हेसियड या कविशी करता येईल. जगाच्या उत्पत्तिपासून पौराणिक कथानी जीवनोपयोगी ज्ञानभांडार आपली काव्ये ठरावीत असा त्याचा प्रयत्न होता. पण देव व टिटन यांच्या मधील युद्धाचे मनोहर वर्णन त्याने दिले असले तरी महाभारताच्या काव्यशैलीत आणि जीवनतत्त्वज्ञानात जे ' उत्कट, भव्य, दिव्य ' आहे त्याच्या एक सहस्रांशही हेसियडच्या काव्यात नाही.

या अशा तुलना सुचतात याचे कारणही महाभारतातच आहे. हिंदुस्थानच्या ( भारताच्या ) बाहेरच्या देशांची बरीच माहिती भारतीयास होती असे महाभारतावरूनच दिसते. दिल्लीच्या ईशान्येस सत्तावन मैलावर गंगेच्या जुन्या प्रवाहाजवळ जे हस्तिनापूर होते, ते मीरत जिल्ह्यातील प्राचीन शहरच कौरवांच्या राजधानीचे शहर; सोमवंशीय गुरुकुलोत्पन्न जो हस्ती राजा त्याने स्थापले म्हणून ते हस्तिनापूर असे काही अभ्यासकाचे मत आहे. पण महाभारत व विष्णुपुराण यात

याला ' हत्तीचे नगर असे म्हटले आहे येथील गादी करताच भारतीय युद्ध झाले !

पंडितजी सातवळेकरांच्या अफाट लिखाणात प्रसंगाप्रसंगाने महाभारतासंबंधीच्या वरील सर्व गोष्टींचा थोडा फार परामर्श घेतला असून रामायणाप्रमाणेच महाभारत हे महाकाव्य आहे, तसा तो गतिमान जीवनातील महाप्राण असणारा ( इति + ह + आस ) इतिहासही आहे, हे स्पष्ट केले आहे. भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान व सुभाषिताशिवायही अन्य विभागात महाभारताने जशी विविध जीवनदर्शने दिली आहेत तशीच प्रबोधनेही विपुलतेने दिली आहेत. त्यात मनुष्याने आपला जीवनक्रम योग्य मार्गाने घालविला पाहिजे म्हणून प्रत्येक मनुष्याने सद्‌गुणी व सद्वर्तनी बनले पाहिजे, अशी स्पष्ट शिकवण आहे.

शिष्टांचा आचार हे एक धर्म ओळखण्याचे व्यावहारिक साधन आहे. त्याच दृष्टीने रामायण–भारतादि, ग्रंथ स्मृतिग्रंथापेक्षा मार्गदर्शक वाटतात. वेद अपौरुषेय मानले जातात तरी देखील एकेका मंडलातील वेगवेगळ्या सूक्तांचे द्रष्टे म्हणून त्यावर ऋषींची नावे आहेत. हल्लीच्या स्वरूपात असलेली पुराणे ( प्राचीन इतिहास ) ही बौद्ध व जैन यांच्या धर्मप्रसाराची प्रतिक्रिया मानण्यात येते, तशीच ती असली, तरी देखील ती कोणी लिहिली याचा पत्ता नाही, ही अद्‌भूत गोष्ट होय. पुराणात रामायण तेवढे वाल्मीकीचे म्हणून प्रसिद्ध आहे. पण महाभारत व अठरा महापुराणे व अनेक महापुराणे ही सगळी महर्षि व्यासांच्या नावावर मोडतात. उपनिषदात व भारतात पुराणांचा उल्लेख असल्याकारणाने आणि वेदातही दशराज्ञ-युद्धाच्या संदर्भाने अनेक राजकुलांचा उल्लेख असल्यामुळे अतिप्राचीन काळीही प्रथितयशाच्या कथा परंपरेने टिकवण्याची प्रथा असली पाहिजे. या सर्वांचे लक्ष्य एकच असते व ते म्हणजे माणसाचा नैतिक वर्तनक्रम. जो शहाणा मनुष्य आपले रागलोभादि षड्रिपु मनोविकासार्थ आपल्या ताब्यात ठेवतो आणि मानवी स्वातंत्र्याच्या त्या शत्रूवर मात करून विजय मिळवतो, त्याचा वर्तनक्रम म्हणजेच नैतिक वर्तनक्रम. ' **यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।** ' म्हणून शहाणे, नेते आणि सेवायोगी संशयातीतपणे शीलवंत असले तरच समाज वा राष्ट्र सकस, स्वावलंबी व स्वाभिमानी होते. रामायण–महाभारत ही दोनही महाकाव्ये राष्ट्र निर्माण करणारी आहेत व राष्ट्रीय विभूति निर्माण करण्याचे सामर्थ्य या ग्रंथात आजही आहे. रामायण–महाभारतांचे घरोघरी पठण झाले पाहिजे. या अपूर्व ग्रंथाकडे जर दुर्लक्ष होईल तर भारताची संस्कृति म्हणून काही जाग्यावर राहणार नाही. छत्रपति शिवाजीमहाराज आपल्या देशात झाले ते रामायण आणि महाभारत या दोन ग्रंथानी निर्माण केले.

' **धकाधकीचा मामला । सोसवेना अशक्ताला ।** ' असा राजकारणाचा मामला रामायण–महाभारतात खचून आणि खेचून भरलेला आहे. म्हणूनच ऐहिक जीवनातील चित्रकला, वास्तुकला, खोदकला इत्यादिकांच्या सौंदर्यापासून एकजिनसी सामाजिक व राष्ट्रीयजीवनाच्या सबलतेपर्यंत सर्व विषयांचा मार्मिक उहापोह

रामायण–महाभारत या दोन्ही राष्ट्रीय महाकाव्यात झाला असून सौंदर्य व कल्याण ही दोन्ही सत्याधिष्ठित असली म्हणजे बाकीची ऐहिक व पारमार्थिक सबलतेची साधना आपोआप जुळून येते, असेच त्या दोन महाकाव्यांनी अभ्यासकाचे मनावर बिंबवले आहे. प्रमाणबद्धता, व्यवस्था, स्पष्टता आणि त्यापासून होणारा सच्चिदानंद ही जीवनात मुसमुसून आली तरच त्या महाकाव्यांचा अभ्यास झाला !!

'कित्येक समजतात की, मयसभेतील व लंकेतील शिल्प होते, ते आर्यशिल्प होते. पण मय हा असुर होता व रावणी लंकेतही असुरच शिल्पी होते. असुर हे हिंदी आर्य नव्हते. ते असीरियन असावे. ते येथे येऊन राहिले व त्यांना आर्य राजांनी धन देऊन अद्‌भुत कारागिरी करवून घेतली. मयासुराने मयसभा बनविण्यासाठी सर्व रंगसामान, सर्व कारागीर असुर देशातून आणले होते; इतकेच नव्हे तर मय-सभेच्या चारही बाजूस पहारा करण्यासाठी हजारो असुरही विदेशीच आणलेले होते ! पांडवांच्या खजिन्यातून त्यांचा खर्च झाला, पण एकही आर्यशिल्पकारास या कारागिरीचा अनुभव मिळालेला नाही. मयासुर पूर्ण स्वदेशाभिमानी होता, पण आपले सर्व सम्राट् मात्र तसे नव्हते.' —( **जीवनप्रकाश** )

पंडितजी सातवळेकरांनी रामायण–महाभारताच्या काव्येतिहासातून सामाजिक व राष्ट्रीयजीवनातील ही त्रुटि भारतीयांची भारतीयांना दाखवली. याचे कारण सकस सौंदर्याबरोबर आणि शोभन–सामर्थ्याबरोबरच स्वाभिमान आणि स्वावलंबन शीलवंतपणे राष्ट्रीय जीवनाच्या धाग्यादोऱ्यातून बिनचूक चमक मारूनच बसले पाहिजे, असे त्यांना अंतःकरणासून वाटते. सैन्यरचनेपासून शस्त्रागारापर्यंत आणि लोकसंग्रहापासून लोककल्याणापर्यंत सगळीकडे सत्त्वशुद्ध सामर्थ्याचा संचार सातत्याने होत राहण्यात व राष्ट्रीय जीवनाचा प्रवाह अखंड सदभिरुचीने आणि माणुसकीने चालू राहण्यातच राष्ट्र रसरशितपणे जिवंत ठरत असते. शौर्य, कर्तृत्वाची आवड, भारदस्तपणा व शालीनता हे गुण व्यक्ति–व्यक्तिच्या जीवनाचे सर्वसामान्य घटक बनून, प्रत्येक व्यक्ति आपापली प्राप्त वा पदोचित कर्तव्ये समाजसन्मुख होऊन करू लागेल आणि आपल्या कर्तृत्वाच्या फलसमर्पणाने राष्ट्राची व परिणामतः मानव्याची पूजा बांधत राहील, तेव्हाच भारत जगाच्या स्वावलंबी व स्वतंत्र राष्ट्रात प्रतिष्ठे-च्या पुढाकाराने नांदू शकेल. त्यासाठी जिजाई मातोश्रींनी व दादोजी कोंडदेवांनी रामायण–महाभारताची शिकवण–नव्हे बाळकडू जसे शिवाजीराजांना दिले, तसेच प्रत्येक आईने आपल्या पाल्याला व गुरुने आपल्याला शिष्याला बिनचूक दिले तर '**होवो जगाचा गुरु आर्यधर्म।**' ही प्रार्थना सफल होईल व भारताचा तेजस्वी इतिहास काळाच्या कपाळावर आपले सतत शिक्कामोर्तब करीत राहील.

## अनुषंगानें स्मृति

मनुस्मृति ऊर्फ मानवधर्मशास्त्र कृष्णयजुर्वेदाच्या मैत्रायणीशाखेच्या मानवधर्मसूत्रा-च्या आधारे तयार झाले आहे. भृगूने मानवधर्मसूत्रात भर घालून मनुस्मृति तयार केली. मनुस्मृतिचा काल ख्रिस्तपूर्व दोनशे तो इसवीसन दोनशेपर्यंतचा असावा.

जगाची उत्पत्ति, संस्कारविधि, गृहस्थाश्रमातील महायज्ञ, उपजीविकेचे नियमबद्ध साधन, भक्ष्याभक्ष्य-निर्णय, वानप्रस्थ व यतिधर्म, राजधर्म, न्यायनिरूपण, दायविभाग, संकरजाति व आपद्धर्म, प्रायश्चित्त आणि शुभाशुभ-कर्मफल असे मनुस्मृतीचे बारा अध्याय असून तिच्यावर मेधातिथि, सर्वज्ञनारायण, कुल्लूकभट्ट, राघवानंद, नंदनाचार्य इत्यादींच्या टीकावरून मनुस्मृतीची लोकप्रियता लक्ष्यात भरल्याशिवाय रहात नाही. भृगूनी मनुस्मृतीत लिहिले की, शिल्पकारवर्ग शूद्र, असंस्कृत, वेदयज्ञादि संस्थापासून दूर ठेवण्यालायक असला तरी '**दुष्कुलादपि स्त्रीरत्नम्**' प्रमाणेच शिल्पज्ञान संपादन केलेच पाहिजे. तथापि मनूसारख्या सामाजिक सुधारकानी स्त्रीला स्वातंत्र्य असता कामा नये असा दण्डक निर्माण केला, तो काळाच्या ओघात आक्रमणांना तोंड देताना पुरुषानी आपले कर्तव्य टाळू नये म्हणून ! स्मृतिग्रंथ हे वेदांच्या पूर्ततेकरताच निर्माण केले गेले आहेत. मानव्याच्या अधिकारी मंडळीनी घालून दिलेली आचारनियमावली, सांगितलेली पारंपरिक शिस्त, सामाजिक व धार्मिक प्रथा यांची संहिता म्हणजे स्मृतिग्रंथ असून त्या संहितेची परिणति आपोआप माणसाला स्वयंप्रेरणेने व समजून उपजून आत्मोन्नति करून घेण्यास प्रेरक ठरत असते; ती विवेकवर्धिनी असून '**विवेके करावे कार्यसाधन ।**' अशी शिकवण देणारी असते. प्राचीन ऋषीनी केलेले धर्मशास्त्र-विवेचक ग्रंथ म्हणजेच स्मृति. आजकालच्या कायद्यातून त्यांचा आधार घेतला जातो. म्हणून ब्रिटिश रियासतीपासून प्रमाणभूत मानल्या गेलेल्या मनुस्मृतीचेही कालसापेक्ष संशोधन करण्याचा पंडितजी सातवळेकरानी प्रयत्न आरंभला. कदाचित् ते संशोधन नवीनच स्मृतिग्रंथाच्या अवतारास कारणही झाले असते !! हे संशोधन पंडितजींना एवढ्याकरताच आवश्यक वाटले असावे की जी हिंदुधर्मीयांची आचारसंहिता म्हणून स्मृति नांदावयाची ती प्रस्तुतकालसापेक्ष आचारांना विसंगत राहू नये !! ती युगधर्मसापेक्षच हवी. वैदिकधर्मानुष्ठानालाही ती विसंगत असता कामा नये. याच दृष्टीने मनुस्मृतीचे संशोधन पंडितजींच्या हातून होते तर बरे होते ! पण ते मागें पडले ते पडलेच ! !

ईश्वर व त्याचे अवतार, आत्म्याचे अमरत्व व पुनर्जन्म यावर माझी श्रद्धा आहे; वेद-उपनिषदावर माझा विश्वास आहे; वर्णाश्रमव्यवस्था मला मान्य आहे आणि गोरक्षणावर माझी भक्ति आहे, असे म्हणणारा सनातनी हिंदु गणला जातो. महात्मा गांधी त्याच कारणामुळे सनातनी हिंदु मानले जात. पंडितजी सातवळेकरही त्याच दृष्टीने सनातनी हिंदुच आहेत. एवढेच नव्हे तर लोकमान्य टिळक आणि महात्मागांधी यांच्याप्रमाणेच पंडितजींही चिकित्सक श्रद्धाशील, हिंदुत्वनिष्ठ सुधारक आणि प्रगतिप्रवण सनातनी आहेत. वैदिकधर्माची शाश्वत तत्त्वे भारतीय समाजात सातत्याने आचरणशुद्ध रहावीत आणि त्या आचरणप्रकाशात जगाने जीवनाचे धडे घेत रहावे, ही '**कृण्वन्तो विश्वमार्यम् ।**' या महत्त्वाकांक्षेला पायाभूत असलेली पंडितजींची प्रवृत्ति जशी दुर्दमनीय आहे तशीच ती सत्कार्यप्रेरक असून काळाची शेंडी धरून त्याला वाकवणारी आहे.

: ३६ :

# पंडितजींची धर्मश्रद्धा

हरिरेव जगत् जगदेव हरिः । हरितो जगतो नहि भिन्नवपुः ।।
इति यस्य मतिः परमार्थगतिः । स नरो भवसागरमुद्धरति ।।

अशी वृत्ति होणे हे परमार्थदृष्ट्या व्यावहारिक आहे. आपण दीर्घायुषी होण्यास जे आपले आचरणनियम कारण आहे; त्यात ' ईश्वर आपल्या अंतःकरणात व चहूं-बाजूस आहे असे मानणे, त्याचप्रमाणे त्याला सत-चित्-आनंद समजणे म्हणजेच आपल्या अंतःकरणात व बाहेर सारा सच्चिदानंद आहे, असे समजत राहणे. ' हा दहा नियमापैकी एक नियम असल्याचे पंडितजींनी आपल्या वयाच्या अठ्याण्णवव्या वर्षी सांगितले आहे. हा नियहाने पाळल्यानेच प्रथम सांगितलेली परमार्थदृष्टया व्यावहारिक असलेली वृत्ति साध्य होईल. सुखदुःख, हानिलाभ, शीतउष्ण अशी द्वंद्वे सहन करण्याचा अभ्यास करणे, वाढविणे, काळजी म्हणून कशी ती करावयाची नाही आणि दुःखमय जगत् इत्यादि कुविचाराना मनात जागाही द्यावयाची नाही, असेही आणखी तीन नियम दीर्घायुष्याचे आधार असल्याचे पंडितजींनी सांगितले आहे. त्याचा परिपाक इच्छाशक्ति समर्थ करण्यात होईल. पण त्याचे मूळ, विश्वरूप-दर्शन म्हणजेच परमेश्वरदर्शन मानणाऱ्या प्रल्हादसदृश भावभक्तिच्या जोपासनेत नाही काय ? आपल्या कर्मफलत्याग-योग या गीतेवरील एका निबंधात पंडितजी लिहितात की ' ब्रह्म, परमात्मा, नारायण, वासुदेव व ( अहं ) मी या शब्दाचा गीतेमध्ये विश्वरूपी देव असा अर्थ आहे. या अमूर्त देवाचे या पृथ्वीवर मूर्तस्वरूप आहे, तोच हा चातुर्वर्ण्यदेही मानवी समाज म्हणजे पृथ्वीवरील मनुष्यसमाज होय. एवढ्या सर्वांची उपासना शक्य नसेल, तर मनुष्याच्या उपासनेच्या कक्षेत एका राष्ट्रातील मनष्यसमाज येऊ शकेल. ज्याचे तोंड ज्ञानी, ज्याचे बाहू शूरवीर, ज्याचे

पोट शेतकरी व ज्याचे पाय कारागीर लोक आहेत, तो हा राष्ट्रात्मा वासुदेव आपल्याला तसाच प्रत्येकास प्रत्यक्ष आहे. त्या राष्ट्रदेही जनताजनार्दनाला आपल्या कर्माचें फल अर्पण करणे, हे संग सोडणे किंवा फलासक्ति टाकणे या निषेध–लक्षणाचे विधि-लक्षण आहे. आपल्या कर्माचे जे काही फल आहे, होईल, ते कर्त्याने आपणाकडे न साठविता या राष्ट्रपुरुषाला अर्पण केले पाहिजे.'

कविवर्य केशवसुतानी म्हटल्याप्रमाणे 'विश्वाचा विस्तार केवढा ? ज्यांच्या त्यांच्या डोळ्या एवढा !!' म्हणून विश्वरूप परमेश्वराचे दर्शन राष्ट्रदेही मानवसमाजाच्या सेवेत घ्यावे, असे पंडितजी व्यवहारशुद्ध सांगतात. त्याचाही खरा प्रारंभ माणसाने आपली विचार–उच्चार–आचारादि सर्वच कर्मे समाजसन्मुख होऊन केली पाहिजेत, या एका व्रतानेच होतो, हे उघड आहे.

पंडितजी सातवळेकर राष्ट्रधर्माचे सर्वश्रेष्ठ उपासक आहेत. राष्ट्र तेजस्वी व शहाणे झालेले पाहणे हा त्यांचा ध्यास आहे. राष्ट्राला बलशाली, निर्भय, मनस्वी, उदार आणि रणनोवरे करण्यासाठीच ते आपल्या साधनाचा उपयोग करीत आले आहेत. आपल्या अवर्णनीय धर्मश्रद्धेस अनुसरून १९५७ च्या जूनमध्ये पंडितजींनी दीड कोटी गायत्रीजप सामूहिक पद्धतीने करवून घेऊन गायत्री यज्ञाचा मोठा समारंभ ब्रह्मवृंदाच्या सहाय्याने पार पाडला. ख्रिस्ती–मुसलमानांच्या धर्मप्रसारासाठी होणाऱ्या हीनदर्जाच्या कारवायावर पंडितजींनी डोळे दीपविणारा प्रकाशझोत टाकून लंडनपर्यंत हादरा दिला. पुराणादि ग्रंथातील विलक्षण वाटणाऱ्या कथांचा आपल्या जागृत प्रतिभेने उलगडा करून दाखविला. नीटनेटके आणि ठसठशितपणे आपले प्रतिपादन लोकाच्यापुढे मांडणारा त्यांच्यासारखा समाजोपासक विरळा ! वेद हे अखिल मानवाचे असून त्यात मूलभूत मानवधर्माची तत्त्वे ग्रथित केली आहेत. एवढ्याकरता वेदाचा प्रचार व्हावयास पाहिजे, हा त्यांचा ध्यास त्यांचा अलौकिक दूरगामी दृष्टीचा द्योतक आहे.

'**कृण्वन्तो विश्वमार्यम्**' हा वैदिक आदेश एरवी कसा साध्य होणार ?

सत्यवादित्व हा पंडितजींचा अभिजात गुण आहे. वैदिक संस्कृति रोमरोमात मुरलेले ते हिंदु असले तरी इतर धर्मीयाची ते घृणा करीत नाहीत. भारतीय परंपराबद्दल जिव्हाळ्याचा आदरभाव ठेवून त्या इतर धर्मीयानी राष्ट्रीयत्व स्वीकारून भारतात बंधुभावाने रहावे, असेच ते मानतात. पामरता, दुबळेपणा, लाचारी, खुषमस्करी, दृष्टीत पडली की पंडितजींच्या अंतःकरणास वेदना होतात. कारण '**अभयं सत्वसंशुद्धिः ज्ञानयोगव्यवस्थितिः**' ही भारतीय संस्कृतीची ध्वजा आहे. म्हणूनच भारतीयाचे लक्ष खेचून आणून तेथे केंद्रित करण्याचे कर्तव्यकठोर धोरण ते स्वीकारतात. विज्ञानमय पाश्चात्त्य संस्कृतीचा परिचय इंग्रजी राजवटीने फिरून एकदा नव्यानेच करून दिला आहे. त्या संस्कृतीतील दिव्य, उदात्त, भव्य, मानवसुखसाधक जे जे असेल त्याच्याशी संपर्क साधून समन्वयाने आपल्या भारतीय जीव-

*

नात त्याचा समावेश करता येणे शक्य असेल, तेवढा करण्यास पंडितजींचा बिलकुल विरोध नाही. पण आगरकरानी म्हटल्याप्रमाणे मूळ भारतीय संस्कृति निकोप राखून !

भारतीय संस्कृति निकोप राखावयाची तर तिची महान् तत्त्वे सदैव डोळ्यापुढे असलीच पाहिजेत, ती—

( १ ) जगातल्या प्राणिमात्राचा आत्मा एकच आहे व तो भगवंताचा ऊर्फ जगच्चालक चैतन्याचा अंश आहे, हे ओळखून प्रत्येक प्राणिमात्राचा सन्मान करावा. सर्वांना सुख होईल असे वागावे आणि सर्वांचे हित साधावे.

( २ ) कोणाचेही अनहित व्हावे असे मनातही आणू नये. अर्थात् अनहित होईल असे कोणतेही कार्य करू नये.

( ३ ) मनात, बोलण्यात आणि वागण्यात पुण्यपीयूषपूर्ण असावे.

**सत्यापरता नाही धर्म । सत्य तेचि परब्रह्म ।।**

याची तीव्र जाणीव दर क्षणी असावी.

( ४ ) उपकाराच्या श्रेणी उभारून सात्त्विक, राजस, तामस अशा त्रिभुवनाला म्हणजे तिन्ही तऱ्हाच्या लोकाना संतुष्ट करावे.

( ५ ) आपल्या दशेन्द्रियाचा उपयोग अप्रमाण सुख भोगण्यासाठी करू नये. जनताजनार्दनाच्या सेवेसाठी त्याचा जेवढा उपयोग होईल, तेवढा जास्तीत जास्त करावा.

( ६ ) अधाशीपणाने कोणत्याही वस्तुमात्राचा वापर करू नये. चोरी, फसवणूक, राबवणूक, उघड्या डोळ्यानी दुसऱ्याचे हाल पहात असता, त्याकडे डोळेझाक करणे ही महान् पातके होत.

( ७ ) आपल्याजवळ जे जे काही चांगले, भव्य, दिव्य, उत्कट आहे, ते '**तेणे ईश्वराचे आहे**' असे मानावयाचे व त्याचा विनियोग ईश्वरासाठी म्हणजेच त्याचे दृश्य स्वरूप असलेल्या जनताजनार्दनासाठी करावयाचा.

( ८ ) आपल्या वैयक्तिक गरजा कमीत कमी राखाव्या. स्वतःस नको असलेल्या वस्तूची साठेबाजी तर करू नयेच; पण आपणास हव्या असलेल्या वस्तूदेखील प्रमाणाबाहेर असतील तर त्या लोकाकारणी लावाव्या.

**आपण यथेष्ट जेवणे । उरले ते दुसऱ्यास वाटणे ।**
**परन्तु वाया दवडणे । हा धर्म नव्हे ।।**

( ९ ) अपकारकर्त्याला देखील शक्य तेव्हा तेव्हा उपकाराने जिकावे.

( १० ) **मरणाचे स्मरण असावें । आणि—**

**नग्न झाला भूता । तेणे कोंडिले अनन्ता ।।**

हे अचूकपणे मनात वागवून 'यत्न तो देव जाणावा ॥' व कर्मयोगी होऊन सेवायोग साधावा.

इतक्या सरळपणे वागूनदेखील कोणी आक्रमक, अनैतिक वा पैशाचिक भेटलाच तर त्याचा समाचार—

**ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।**

या भगवद्वचनांप्रमाणे घ्यावयाचा व तो घेतानाही स्वयंप्रतिष्ठेपेक्षा समाजस्वास्थ्या-बरच नजर ठेवायची !

अशी ही भारतीय संस्कृति जोपासणाऱ्या हिंदुधर्मात—

**प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता । उपास्यानामनियमः ।**

ही लोकमान्य टिळकांनी सांगितलेली लक्षणे तर आहेतच; पण शिवाय—

**हिंसया दूयते यस्मात् हिंदुरित्युच्यते बुधैः ।**

ही तंत्रग्रंथामध्ये दिलेली व्याख्याही सार्थ ठरते.' मनुष्याची सहज प्रवृत्ति हिंसेकडे असते, ती दूर करून त्याला निर्वैर बनविण्याचे कार्य 'आर्यधर्म किंवा वैदिकधर्म करीत असल्यामुळे त्यास हिंदुधर्म म्हणतात, 'असे पंडितजींचे म्हणणे आहे. हाच धर्म ईश्वराचे पितृत्व व मानवाचे बंधुत्व प्रस्थापित करण्यास कधीकाळी उपयोगी पडला तर पडण्यासारखा असून त्याने ऐहिकतेकडे मुळीच दुर्लक्ष केलेले नाही. म्हणूनच त्यात ऐहिकाधिष्ठित अध्यात्मवादाचा किंवा अध्यात्मनिष्ठ ऐहिकवादाचा ( Secularism ) समावेश होतो. पहा की ' गुणकर्मविभागशः चातुर्वर्ण्य असलेल्या आर्य, वैदिक वा हिंदुधर्मातील वाजसनेयि यजुर्वेदात ( २२।२२ ) प्रार्थना आहे की—

**आ ब्रह्मन् ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायतामा आ राष्ट्रे राजन्यः शूर इषव्योऽतिव्याधी महारथो जायताम्। दोग्ध्री धेनुर्वोढाऽनड्वानाशुः सप्तिः पुरंधि-र्योषा जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवाऽस्य यजमानस्य वीरो जायताम् । निकामे-निकामे नः पर्जन्यो वर्षतु, फलवत्यो न ओषधयः पच्यन्तां योगक्षेमो नः कल्पताम् ।** ' अर्थात्—

' हे परमात्मा, आमच्या राष्ट्रातील ब्राह्मण ज्ञान व विज्ञानसंपन्न होऊ देत. शत्रूचा निःपात करणारे महारथी व शूरवीर असे क्षत्रिय आमच्या राष्ट्रात होऊ देत. आमच्या राष्ट्रातील वैश्यसमाज धनधान्यसंपन्न होऊ दे. त्यच्याजवळ उत्तम दूध देणाऱ्या गाई व बलवान् बैल आणि चपळ असे घोडे असू देत. आमच्या राष्ट्रातील स्त्रिया विद्वान् व गावाचे नेतृत्व करणाऱ्या होवोत. आमच्या राष्ट्रातील तरुण विजय संपादन करणारे व सभात ज्यांचा सत्कार करावा असे व्हावेत. राष्ट्रात वेळेवर पाऊस पडू दे व वृक्षलताना भरपूर फुले नि फळे येऊ देत. आमच्या राष्ट्रातील सर्व लोकाचा योगक्षेम चांगल्या रीतीने होऊ दे. '

आणखी अशाच कितीतरी प्रार्थना आहेत आणि धार्मिक विचारस्वातंत्र्याचा परीघ कितीही विस्तृत कल्पिला तरी, अशा प्रार्थनांना आक्षेप उठण्याचे कारण नाही. अशा प्रार्थना 'स्थिरचर व्यापुनि दशांगुळे' उरलेल्या परमेश्वरालाच असल्याकारणाने त्या परमेश्वराची एकमेव मूर्ति नसते, ही गोष्ट खरी; पण परमेश्वराची मूर्ति नसली तरी स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे प्रत्येक मूर्तीत परमेश्वर असतो. तेव्हा मूर्तिपूजा करणाराला मूर्तीभूत देवतेच्या प्रत्ययास आलेल्या व प्रगट झालेल्या गुणाची पूजा करावयाची असते. हे जाणून मूर्तिपूजेपासून निर्वाणादात्म्यापर्यंत मजल मारणारापर्यंतच्या सर्वांचा समावेश वैदिक ऊर्फ आर्यांच्या हिंदुधर्मात होणे अवघड नाही.

पंडितजींच्या अशा मतप्रणालीला एक परंपराही सांगता येण्यासारखी आहे. ती अशी की—

वेदान्तस्तोत्रात श्रीकृष्णानंदसरस्वतींचे श्रेयस्करीस्तोत्र आहे—

श्रेयस्करि, श्रमनिवारिणि, सिद्धविद्ये, स्वानन्दपूर्णहृदये करुणातनो मे ।
चित्ते वस प्रियतमेन शिवेन सार्धं, मांगल्यदा सततं सर्वद भुर्दव माता ॥

अशी त्यात प्रथमच प्रार्थना आहे. ऐहिक जीवनातील अशी श्रेये अनुभविता अनुभविताच कृष्णानंदसरस्वतींच्या 'तत्वमसि' या वेदवाक्याचा पल्ला गाठावयाचा आहे.

ॐ मनःकल्पितमेवेदं जगज्जीवेशकल्पनम् । तदेकं संपरित्यज्य निर्वाणमनुभूयताम् ॥

असेच कृष्णानंदांनी आदेशिले आहे. त्याचे निगमस्तोत्र व ते त्यांचा मानवी जीवनाचे दुसरे ध्येय सांगत नाही; मात्र ते गाठावयास 'गुरु' हवा, हे ते निर्विवादपणे सांगतात. गुरुची व्यावहारिक परंपरा त्यांच्या मते अशी आहे—

अंधस्य गुरुरेकाक्षस्तस्य द्व्यक्षो गुरुर्मतः ।
द्व्यक्षाणामपि सर्वेषां गुरुस्त्र्यक्षो न तत्समः ॥
सहस्राक्षादयः सर्वे द्व्यक्षा एव हि केवलम् ।
कार्यध्येयदृशो यस्मात्त्र्यक्षशिष्यपदे स्थिताः ॥

म्हणून त्रिनेत्र शंकराप्रमाणेच गुरु परमेश्वर होय याच प्रकाशात कृष्णानंदांनी केलेली शिवमानसपूजा अभ्यासनीय आहे.

जनतारामविस्तारी रमस्वात्र यथासुखम् ।

असे त्या पूजेत शेवटी शंकराला व भक्तमनाला सांगितले आहे. जनतारामावर लक्ष ठेवण्यासाठी आपल्या प्रश्नोत्तर मालिकेत दैनंदिन जीवनासाठी व्यवहारसोपानाचे धडे दिले असून इतर तत्त्वज्ञान्यांनी ज्याला माया म्हणून धिक्कारले, ते ते सर्व ईश्वररूप असल्याचे मानूनच म्हणतात—

जे जे काही दृश्य, भास । तो तोही एक जगन्निवास ॥

असे मानून माणसाने परमेश्वरी अधिष्ठानावरून कर्तव्ये करीत राहिले पाहिजे,

असे कृष्णानंदानी मार्गदर्शन केले आहे

आहे तरी सर्वा ठायी । पाही जाता काठेच नाही ।

असा जसा परमेश्वराचा प्रत्यय येतो, तसाच भूमिकेने म्हणजे निष्काम कर्मयोगानेच मानवी जीवनाचे सार्थक होणारे आहे.

भगवान् शंकराचार्यांनी देखील 'परापूजा' स्तोत्रात 'स्थिरचर व्यापुनि दशांगुळे उरल्या' ब्रह्माचे सर्वव्यापकत्व विशद केले असून आपल्या 'वाक्यवृत्ति' मध्ये—

कर्मणां फलदातृत्वं यस्यैव श्रूयते श्रुतौ । जीवानां हेतुकर्तृत्वं तद्ब्रह्मेत्यवधारय ।

असे स्पष्ट केले आहे. 'आत्मबोधा' त आचार्यांनी म्हटले आहे की—

संसारः स्वप्नतुल्यो हि रागद्वेषादिसंकुलः । स्वकाले सत्यवद् भाति प्रबोधे सत्यसद् भवेत्।।
तावत्सत्यं जगद्भाति शुक्तिका-रजतं यथा । यावन्न ज्ञायते ब्रह्म सर्वाधिष्ठानमद्वयम् ।।

सच्चिदात्मन्यनुस्यूते नित्ये विष्णौ प्रकल्पिता ।
व्यक्तयो विविधाः सर्वा हाटके कटकादिवत् ।।
यथाकाशो हृषीकेशो नानोपाधिगतो विभुः ।
तद्भेदाद् भिन्नवद् भाति तन्नाशे सति केवलः ।।

यात आचार्यांना एवढेच ठसवावयाचे आहे की जगात वस्तुमात्र व त्याचे रूप-रस-गंध आदि गुण यांच्या स्वरूपात ब्रह्मच नांदत असते, आणि त्यात होणारे बदल ब्रह्माला बाधत नाहीत. म्हणून ब्रह्म अमर आहे आणि वस्तुमात्र नि तीमधील बदल हे अस्थिर असले तरी त्यामुळे ब्रह्माच्या अढळपणाला आणि अमरत्वाला बाध येत नाही. म्हणून काळकामवेगाने मापता येण्यासारखी वस्तुमात्र व तिचे गुण व त्या सर्वात होणारे बदल 'माया' ऊर्फ मोजमापास योग्य असतात. पण त्या सर्वांच्या बुडाशी व त्या सर्वांत असलेले ब्रह्म शाश्वत रहात असते. म्हणून मनुष्याने मापता येण्याजोग्या मायेत वावरावे लागले तरी त्याच्या बुडाशी परब्रह्म आहे त्यावर लक्ष केंद्रित करावे. एवढेच नव्हे तर ते वस्तुमात्र व त्यांचे फरक टिकतील, तेवढा वेळ ते परब्रह्मच मानावेत. आचार्यांच्या 'पंजरीकां' चा रोख केवळ तसाच आहे. अगदी 'हरि मीडे' स्तोत्राचा विचार केला तरी वस्तुमात्र आणि त्यातील नैसर्गिक वा कृत्रिम फरक यांनी बावचळून न जाता, त्यात, त्याच्या बुडाशी व एकंदर जगात परब्रह्म भरून उरले आहे, ते रूपरसगंधादिंच्या पलिकडचे परब्रह्म शाश्वत आहे. ते ओळखत रहावे आणि आपल्यातील चैतन्यही ते परब्रह्मच आहे हे ओळखत राहून अद्वैताचा आनंद भोगावा, हाच प्रमुख कटाक्ष आहे.

एवढ्या व्यापकपणे आपला मांड मांडणाऱ्या वैदिक संस्कृतीला आणि आर्यधर्माला भौगोलिक मर्यादेत कोंडून न ठेवता त्याला विश्वव्यापी करण्याचा प्रयत्न त्याच्या संतानानी केला होता असाही इतिहास आहे. वैदिकधर्म-संस्कृतीच्या नंतर जे धर्मपंथ जन्मास आले त्यांच्यावर वैदिकधर्म संस्कृतीच्या छाप-छाया पहावयास

सापडतात. आर्यावर्ताला किंवा भारताला जगातील बहुतेक सर्व प्रचलित धर्मांचे प्रवर्तक स्थान मानण्यात येते तेही त्यामुळेच !

हिंदूचे राजे नि ऋषि हिंदुस्थानातून निरनिराळ्या प्रदेशी राज्यवर्धन व संस्कृति-प्रसारार्थ जगभर जात होते. प्राचीन इतिहासाचे खोल अभ्यासक श्री रमेशचंद्र दत्त ( सी. आय्. ई. ) यानी १९०७ साली बौद्धाचा हिंदुस्थानातील ऱ्हासकाल या आपल्या व्याख्यानात सांगितले होते की– ' बुद्धाने बौद्धपंथ स्थापल्यावर थोड्याच वेळाने हिंदुस्थानात त्याचा खूप प्रसार होऊन अशोक सम्राटानेही त्याचा स्वीकार केला. त्या पंथाच्या प्रसारार्थ पूर्व, उत्तर, पश्चिम देशात प्रसार नि प्रचारार्थ अनेकशः प्रचारक त्याने पाठविले. पश्चिमेकडे पॅलेस्टाईन, इजिप्त ( मिश्र वा मिसर ), पायरस, ग्रीस आणि त्या पलीकडेही हे लोक गेले होते. हे सर्व प्रचारक खरेखुरे निर्लोभ, निरपेक्ष नि स्वार्थत्यागी असून केवळ धर्मकार्याच्या शुद्ध बुद्धिनेच प्रेरित झालेले असल्यामुळे त्या पंथाचा प्रसार तत्प्रदेशी फार सुलभ होऊ लागला.' प्रख्यात ज्यू इतिहासकार फिलो लिहितो की– ' येथील मठातून अनेक पंथाचे लोक रहात त्यात कृष्णभक्त ब्राह्मणही पुष्कळ होते. ' बौद्ध पंथ हा पूर्वी हिंदुस्थानातील अंतर्गत असलेल्या शैव, वैष्णव इत्यादिप्रमाणेच एक समजला जात असे. त्यामुळे बौद्ध व शैव हे ईशान या ख्रिस्ती पंथात आढळतात.

या प्राचीनकालातच नव्हे तर अगदी अलिकडील काळातही आर्यधर्मप्रसाराच्या खुणा आहेत. इसवीचे सोळाव्या शतकाच्या आरंभापासून सर्व जगावर युरोपीय देशवासियाचा धुडगूस झाला. युरोपव्यतिरिक्त ऑस्ट्रेलियासुद्धा चारही खंडात एकही देश असा उरला नाही की ज्याला युरोपियनाच्या पायाचा उपसर्ग पोहोचला नाही ! जपानमध्ये युरोपियन पाय पसरले पण स्थिर होऊ शकले नाहीत; एवढेच अपवादा-दाखल सांगता येईल फार तर ! युरोपीय वा ख्रिश्चन संस्कृतीपुढे भारतीय वा वैदिक नि हिंदुसंस्कृति कुचकामाची आहे, हे देशात घुसलेल्या युरोपीयानी उद्घोषित करण्याचा व जनमनावर ठसविण्याचा अट्टाहासच अट्टाहास केला असला तरी सर्व जगात हिंदुजाति नि वैदिक वा हिंदुधर्म, भगवान् ख्रिस्ताचे जन्मस्थान असलेल्या पॅलेस्टाइनसुद्धा अपवाद न करताच, पसरलेला होता, हे ऐतिहासिक सत्य कोणत्या डोळसाला नाकारता येईल ? आर्यसमाजाचे वैदिक प्रचारक पंडित रुचिराम हे अरबस्थानच्या विविधभागात हिंडले आणि ' आरबमें सात साल ' हे पुस्तक लिहून त्यानी सिद्ध केले की बलुचीस्थानात पहिल्यानेच लागणाऱ्या ' पसनी ' बंदरात सिंधी व गुजराथी हिंदूची वसती दोन हजार वर्षांची जुनी आहे; इराणमधील ' ग्वानर ' नावाच्या बंदरात दोन हजारवर्षांपूर्वीपासून हिंदु वसति असून अरबस्थानच्या दक्षिण-किनाऱ्याला असलेल्या ' मोकल्ला ' अथवा ' मोकला ' बंदरात वैदिकधर्मीयाची वसती अडीच हजार वर्षांपूर्वीपासूनची असून बिसाव्या शतकातील व्यापारटापार भारतीय शियापंथीय मुस्लीमाच्या हाती आहे; ' यमन ' निवासी तर हजरत

महंमद पैगंबराचे कालापर्यंत अव्वल हिंदु होते; सिरीयामध्ये ' दुर्जा ' नावाच्या क्रूर व पराक्रमी हिंदूलोकाचे एक राज्य फ्रेंचाच्या मांडलिकीखाली एकोणिसाव्या शतकात नांदत होते व त्याची लोकसंख्या पंचवीस हजारापर्यंत तरी होती. या संबंधात फिलिप् स्मिथचे ' स्टुडन्ट्स् एन्शन्ट् हिस्टरी ', डॉ. डि. ए. सी. ओलियरी याचे ' महंमदापूर्वीचे अरबस्थान ' आणि डॉ. बुचानन् याचे ' दि अन्नोन लाइफ् ऑफ् ख्राइस्ट ' ही पुस्तके अभ्यासण्यासारखी आहेत. अरबस्थानच्या निकटवर्ती आफ्रिकाखंडात मिश्र, सूडान नि एथिओपिया ऊर्फ अबिसीनिया या देशात महाभारतीय ( कौरवपांडवसंगरतांडवानंतर ) हिंदुस्थानातून झुंडीच्या झुंडी जाऊन राहिल्या; एवढेच नव्हे तर युरोप आशियातील पूर्वपश्चिमोत्तर देशातही वसाहती करून राहिल्या. महाभारतीय युद्ध शालिवाहन शकापूर्वी ३१७९ वे वर्षी अगर विक्रमसंवत्सरापूर्वी ३०४४ वे वर्षी झाले, असे *ज्योतिषशास्त्राधारे मानण्यात येते. कर्नल अल्काट व ब्रुगशवे यांच्या म्हणण्याप्रमाणे तर इतिहासाला निश्चितपणे सांगता येत नाही, इतक्या पुरातनकाळी हिंदुस्थानातील हिंदुलोकानी सुएज उल्लंघून इजिप्तमध्ये नाईल नदीचे काठी आपले निवासस्थान बनविले होते. या संदर्भात ' इंडिया इन् ग्रीस ' हे पुस्तकही अभ्यासण्यासारखे आढळले. पोकाक हा इतिहासकार तर सांगतो की हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीतून आणि हिमालयाच्या आसपासच्या भागातून आफ्रिकेत उतरलेल्या हिंदूनी तेथील प्रांतांची व नद्यांची नावे हिंदुस्थानातील महानद्यांच्या नावावरून आणि भारतीय नगराप्रांतावरून ठेवली असून रामेशिअ ( रमेश ) सारखी राज्यकर्त्यांची नावे, खोदकामातील व स्थापत्यातील भारतीय कलेशी साम्ये आणि इजिप्शिअन भाषेची संस्कृतावरून केलेली साधना यावरून भारतीय संस्कृतीचा प्रभाव कोणाही विचारवंतास स्पष्ट होतो. प्रोफेसर हीरन, सर डब्ल्यू. जोन्स, युसेबियस, आणि फिलास्टेट्स् यांच्या ग्रंथातही वरील विधानास आधार असून कर्नल टॉडने उल्लेखून ठेवले आहे की ' अब्दुल गाझीने तमक, तुरेचा मुलगा आणि त्याचे बरोबरीचे लोक यानी टॉचरिस्थान ऊर्फ तुर्कस्थान वसविले. ' तुरेनियन, तुरुष्क वा तुर्क याचा महाभारतात अभिशप्त ( शापभ्रष्ट ) असा उल्लेख असून जसलमरिच्या परंपरागत इतिहासात यदु आणि क्लीक हे लोक खोरासानमध्ये महाभारतीय युद्धानंतर राज्य करू लागले. त्यास ग्रीक इतिहासकारानी इंडोसिथिक व ओटोरोकुरानी म्हणून संबोधिले आहे. ' आशिया पोलिगोता ' चा कर्ता क्याप्रोथ तर सांगतो की आशियामायनरात नि तुर्कस्थानात प्राचीन हिंदुराजांच्या सांपडलेल्या नाण्यावर चंद्र, सूर्य व शिव–नंदी याची चिन्हे असून तत्कालीन आणि तत्रस्थ हिंदुराजांची नावे आढळली. अमेरिका व युरोप यांचे कित्येक प्रदेश भारतीयानी व्यापल्याचा पुरावा ' हिंदु अमेरिका ' या पुस्तकात श्री चमनलाल यानी दिला आहे.

वैदिककाळाच्या आर्यऋषींचा आत्मानुभव आर्यधर्माचा मूळ पाया होय. त्या आत्मानुभवाची ज्योत प्रत्येक आर्य व्यक्तीच्या अंतःकरणात सदैव तेवत रहावी व

तिच्या प्रकाशात प्रत्येक व्यक्तीने आपले व दुसऱ्याचे हित साधावे आणि राष्ट्रीय एकोपा रहावा या उच्च, उदार नि उदात्त विचारानी प्रेरित होऊन जीवनाच्या प्रथा ऋषीनी घालून दिल्या. तोच धर्म होय. त्याचे दैनंदिन आचरण करताना आपल्या परिस्थितिसापेक्ष आणि आपल्या व्याप–आटोपाच्या शक्ति लक्ष्यात घेऊन, आपली कर्तव्ये माणसाला निश्चित करावी लागतात. त्या निश्चित कर्तव्याचे परिपालन अचूकपणे केल्यावर त्याची निष्पत्ति वा कर्मफल ईश्वराला अर्पण करीत पुढे गेल्यानेच ईश्वराची खरी पूजा होते. त्या ईश्वराचे दृश्य स्वरूप जनताजनार्दन आहे. त्याला कर्मफल समर्पण करणे हाच कर्मफल–त्याग–योग होय. त्यालाच लोकमान्यानी ( निष्काम ) कर्मयोग म्हटले आहे. आर्यधर्म–संस्कृतीच्या प्रचारार्थ भूप्रदेश व्यापणाराच्या पुढे याच मानवधर्म–प्रसाराचे ध्येय होते. ' कृण्वन्तो विश्वमार्यम् ' चे व्यावहारिक स्वरूप ते ! कर्मफलत्याग–योग हा काही निव्वळ ' परलोकासाठी ' नाही. ' त्याचा मोठा वाटा आपल्या राष्ट्राच्या दैनंदिनीय वागणुकीमध्ये उतरला पाहिजे... वैयक्तिक कर्मफलत्याग राष्ट्रीय दृष्टीने कसा सर्वांनी मिळून करावा, हे सांगण्यासाठी एखादा थोर महात्माच अवतीर्ण व्हावा लागेल.' असे जे पंडितजींनी गीतेवरील कर्मफलत्याग या निबंधात म्हटले आहे, ते अक्षरशः खरे आहे.

कारण भारतीय संस्कृति आणि वेदप्रणीत आचारधर्म हा ( आपले नावसुद्धा जगाला कळण्याची जरूरी नाही; कारण नाव देहाचे असते; पण देहासुद्धा आपल्या जवळच्या सर्व शक्ति परमेश्वरी कृपाप्रसाद असल्यामुळे कर्ताकरविता परमेश्वरच आहे. या भावनेने ) ऋषिगणानी प्रवर्तिला असल्याकारणाने सर्व ' सृष्टा ' प्रमाणे ऱ्हासोदयाला पात्र ठरतो, यात नवल नाही. भगवान् कृष्णानीही गीतेत

स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ।

असे सांगितल्याचा दाखला आहे. सांख्य व योगज्ञानाचा समन्वय विसरून वेदवादरतानी आर्यधर्मावर मालिन्य आणले ते झाडून टाकण्याचे कार्य गीतेने केले. सर्व कर्म योगयुक्त अंतःकरणाने करून व्यक्ति व राष्ट्र स्वप्रभावाने दिव्य गांठतील, असे गीतेने ठसविले. कालचक्राच्या फेऱ्यात पुनः धर्मावर मालिन्य आल्याचे आढळताच. श्रीमद्भागवतामध्ये ( स्कंध १ अध्याय १६ व १७ ) वर्णन केलेली स्थिति सुधारण्यासाठी श्रीकृष्णाचे गीतांतर्गत उपदेशाचे पुनःस्मरण देऊन स्वानुभवात्मक आत्मज्योति प्रज्वलित ठेवण्याचा धडा दिला. तरीही शब्दपांडित्याने भक्तिविशिष्टतेतील अध्यात्म मागे पडले. ते अध्यात्म पुनः प्रस्थापित करण्यासाठी ' **यो बुद्धेः परतस्तु सः** ' सांगत भगवान् गौतमबुद्ध सरसावले. पण त्यांच्या अनुयायानी त्याचे हृद्गत समजावूनही न घेता शून्यवादाचा पुरस्कार केल्यामुळे, शब्दच्छळातून अनीश्वरवाद बळावण्यापलिकडे राष्ट्राच्या पदरात काही पडले नाही ! श्रीमच्छंकराचार्यांनी कुशाग्रतेने मग, आत्मज्ञानज्योति पुनः प्रज्वलित केली. पण गुणकर्मविभागशः असलेल्या चातुर्वण्यावर जातिनिष्ठेचे खवले चढत गेल्याकारणाने बुद्धिवाद, वेदवाद

व आत्मवाद यांची भ्रमोत्पादक भेसळ होऊन वैदिकधर्म किंवा आर्यधर्म अठरा धान्याचे कोडबोळे ठरण्याची वेळ आली.

तेव्हा—

**हे विश्वचि माझे घर। ऐशी मति जयाची थोर। किंबहुना सचराचर। आपणचि झाला।।**

हे आध्यात्मिक पुरुषार्थाचे ध्येय माणसापुढे ठेवून विश्वात्मक देवाचा प्रत्यय आपल्या गीतेवरील प्रबोधनाने करणारे ज्ञानेश्वरादि संताना पुढे यावे लागले. त्यांच्या-मागून एकनाथ, तुकाराम, रामदास, यानी महाराष्ट्रात व तुळशीदास, कबीर, कनकदास, पुरंदरदास यानी महाराष्ट्राबाहेर कर्मफलत्याग–योगाचे पाठ भारतीय समाजास दिले. पण चंद्रगुप्त हर्षानंतर भारताची जी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक निस्तेजता झाली होती, तिला तोंड देता देता, दैनंदिन आचाराचा मूलभूत हेतु जे अध्यात्म त्याच्या झालेल्या उपेक्षेने दंभाचार वाढत गेले. त्या मिजासखोरीचे डोळे इंग्रजी रियासतीच्या प्रस्थापनेने साफ साफ उघडले. ब्राह्मोसमाजाची स्थापना ही त्याची पहिली निशाणी आहे. आर्यसमाज व प्रार्थनासमाज या त्याच्यापुढील खुणा होत. पण इंग्रजी रियासतीच्या प्रस्थापनेपूर्वीच, पाश्चिमात्याचे येथे जे आगमन झाले होते, त्यामुळे त्याचाही संपर्क भारतातील जनतेबरोबर भारतीय धर्मप्रथालीशी आला होता व आपली राजवट प्रस्थापित करताना, नीतिअनीतिचा विधिनिषेध फारसा न मानणाऱ्या वॉरन् हेस्टिंग्जलाही भगवद्गीतेतील कर्तव्यकर्तृत्वाच्या अध्यात्मनिष्ठ मार्गदर्शनाने वेडे केले होते. मग पुढे एकोणिसाव्या शतकातील मॅक्समुल्लरला वेदानी मंत्रमुग्ध केले असले तर अस्वाभाविक काही नाही. इकडे भारतातही आर्य–ब्राह्मो–प्रार्थनासमाजापेक्षाही स्वामी रामकृष्ण परमहंसांचे शिष्य स्वामी विवेकानंद प्रभृतीनी मूळ वेदाना हात घालूनच वैदिकधर्माचा फैलाव चालविला. ब्रिटिश रियासत येथे स्थिर झाल्यावर, स्वाभिमानोत्थित प्रेरणाबलाच्या जोरावर जशी, राजकीयादिकरून स्वाधीनता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला. तो यशस्वी न होण्याचे कारण त्या प्रयत्नाला 'परमेश्वरी अधिष्ठान' नाही, अशी समजूत झाली होती. तशीच वैयक्तिक व राष्ट्रीय दैनंदिन जीवनात आध्यात्मिक प्रतीत झाले पाहिजे, ही जाणीवही त्याच स्वाभिमानोत्थित प्रेरणाबलातूनच निर्माण झाल्याकारणाने विवेकानंद प्रभृतीनी जगाच्या धर्मपरिषदेत वैदिकधर्माचा झेंडा फडकविला व पुढे अमेरिका नि इंग्लंडमध्ये आपले अनुयायी निर्माण करून 'आचारप्रभवो धर्मः।' अशी वैदिकधर्माच्या तेजस्वितेची खात्री पटविली. स्वामी विवेकानंदाच्या नंतर स्वामी रामतीर्थांनी तेच कार्य निरलसपणे केले. पण भारतात आणि भारताच्या बाहेरही वैदिक संस्कृतीच्या व धर्माच्या शुद्ध स्वरूपाचा वर्तनशुद्ध आविष्कार व्हावयांचा असेल, तर भट्ट मोक्षमुल्लर (मॅक्समुल्लर) यानी छापलेले वैदिकग्रंथ प्रमाण न मानता, ते भारतीय वेद-निष्णाताकडून नीट तपासून व जरूर तेथे शुद्धि साधून ते शुद्धतम वैदिकग्रंथ अभ्यासकाच्या स्वाधीन करणे जरूर होते आणि त्याचे अर्थही 'ज्ञानं विज्ञासहितम्'

*

जनतेला मिळण्याच्या दृष्टीने लोकापुढे ठेवणे कर्तव्य होते. तेच कर्तव्य पंडितजी सातवळेकरांनी आपले जीवितकार्य म्हणून स्वीकारले व घनपाठी येडूरकरासारख्या वेदशास्त्रसंपन्नाच्या ज्ञानसहकाराने वेद शुद्धतम छापून, त्याचे अर्थ आणि विवेचन जनतेसमोर मांडले.

अशा रीतीने ' भारतीय संस्कृतिके संवर्धन, विवेचन एवं प्रचारमें, पंडित सातवळेकरका अजोड, योग रहा है । ' असे ना. हितेंद्र देसाई सांगतात. एवढेच नव्हे, तर ' मानवधर्माचे प्रतिपादक म्हणून वेदांना धर्मग्रंथ मानतात, ' हे ध्यानात येताच पंडितजीनी वेदाच्या प्रचाराला सुरवात केली आणि वेद हे बालबोध आहेत हे दाखविण्याच्या कामात ते यशस्वी झाले. उपनिषदाचे आदेश त्यानी अक्षरशः पाळले आहेत. ' मनुष्य जे काय करीत असेल ते त्याने मानवी उन्नतीसाठी, मानवी शक्तीच्या सात्त्विक विकासासाठीच केले पाहिजे ' हे पंडितजींचे मत त्यानी आचरणशुद्ध ठेवले आहे. ' आपल्या देशावरील परकीय सत्तेचे आक्रमण व आपली अवनति याचे कारण आपल्या जुन्या श्रेष्ठ आचार-विचारापासून आपण परावृत्त झालो आहो, असे त्यास वाटे व त्यासाठी आपल्या आदर्श जीवनाची राष्ट्राला पुन: ओळख करून द्यावी, ही त्याची फार कळकळीची इच्छा. एवढ्यासाठीच त्यानी आपल्या प्राचीन वेद, उपनिषदे व पुराणे याचा सखोल अभ्यास तर केलाच, पण ती विचारसरणी आपल्या समाजाने आचरणात आणावी या उद्देशाने त्यानी आजन्म अविश्रांत प्रयत्न केले. ' अशी ग्वाही शंकररावजी किर्लोस्करानीच दिली आहे. हैदराबादेस असताना अस्पृश्यतेचे खंडन करणारे त्यानी पुस्तक लिहिले, त्याचप्रमाणे वैदिक यज्ञसंस्था हे पुस्तक प्रसिद्ध करून यज्ञात पशुहत्या करण्याचे कारणच नाही, हेहि सिद्ध केले. पारडीला स्थापलेल्या वेदमंदिरात कोणत्याही देवतेची मूर्ति नसून निरनिराळ्या धर्माचे पवित्र ग्रंथ ठेवण्यात आले आहेत; कोणत्याही धर्माने मानवाचे कल्याणच व्हावयाचे असल्याने, सर्वांनी बंधुत्वाने वागावे, हे ठसविण्याचाच त्यात हेतु आहे, हे स्पष्ट आहे. तात्पर्य, पंडितजींचे जीवन एका निःस्पृह कर्मयोग्याची जीवनयात्रा. मानवी शरीर हा सप्तर्षींचा निवास असून आनंदमय जीवनाची अनुभूति घेण्यासाठी धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारी पुरुषार्थ करण्याचा प्रयत्नवाद स्वतः अनुसरून साऱ्या विश्वाला आर्य करण्याचा निश्चय दृढ करावा हा ध्यास पंडितजींच्या कर्मयोगाचा मुळवा आहे. ईशावास्योपनिषदात प्रापंचिक सुख विज्ञानाने व आध्यात्मिक सुख ज्ञानाने प्राप्त होते, अशी स्पष्ट शिकवण आहे. तीच पंडितजींनी प्रमाण मानली आहे. तीस अनुसरून वेदप्रामाण्याने चालत असता, पंडितजींनी आपल्या मनाचा समतोल असा राखला आहे की त्यास खुशाल ' स्थितप्रज्ञ ' म्हणून संबोधावे. घरच्या देव्हाऱ्यात परंपरेप्रमाणे अनेक देवतांची सुगंधी फुलानी पूजा बांधलेली असली तरी तेथे पंडितजी रमतात आणि मानवी जीवनातील मंगलमय भाव जो ईशशरणता तोच ते तेथे साधत असतात.

पारडीस दर शनिवारी सायंकाळी वेदमंदिरात पंडितजींची आप्तेष्ट-मित्र-सेवक परिवारासह सार्वजनिक प्रार्थना होत असते. त्या प्रार्थना संस्कृत व गुजराथीतून होतात आणि महर्षि वेदव्यास व आद्य, वेदप्रतिपाद्य, स्वसंवेद्य, आत्मरूप, सर्वमति-प्रकाश गणेशदेव याना स्मरून होतात. मनुष्याच्या शरीरात असणाऱ्या तेहत्तीस ( कोटी ) देवताची स्थाने दाखविणारी वेदमंदिरात लावलेली चित्रे निरीक्षून 'धन्य धन्य हा नरदेहो' असे वाटल्यावाचून राहणार नाही. म्हणून पंडितजींच्या सार्व-जनिक प्रार्थनेस बसणाराना एक आगळाच आनंद होत असतो.

वेद हे अखिल मानवधर्माचे मूळ असल्याकारणाने, विवेकानंदानी परदेशात केले-ल्या वैदिकधर्माच्या प्रचाराला आता चांगली फळे येत असून वैदिकधर्माचा भविष्य-काळ उज्ज्वल आहे असाच पंडितजींचा विश्वास आहे. भारतातही आज अंधश्रद्धा जाऊन डोळस श्रद्धा तरुण मंडळीत येत आहे, हे नव्या पिढीचे वैशिष्टयही पंडितजीं-च्या लक्ष्यात आले आहे. या डोळस श्रद्धेने जीवनकार्य आपापल्या कुवतीप्रमाणे प्रत्येक तरुणाने ठरवून घेतले पाहिजे व—

**केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ॥**

म्हणून प्रयत्नपुरुषार्थाची कास धरली पाहिजे.

**यो यच्छ्रद्धः स एव सः ।**

जो जशा श्रद्धेचा तसाच तो होतो, हे जितके खरे, तितकेच—

**कर्मानुगो गच्छति जीव एकः ।**

आपल्या कर्मातून तयार झालेल्या रस्त्यानेच प्राण्याणी वाटचाल होत असते, हेही खरे. म्हणून डोळस श्रद्धेनेही माणसाच्या हातून कर्म झाले पाहिजे, ते भगवद्गीतेच्या ( अध्याय ८, श्लोक ३ ) व्याख्येतच बसणारे हवे. गीता सांगते की—

**भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्म संज्ञितः ।**

जे जे काही झालेले वा घडलेले असेल, त्यातील मर्म उत्कटतेने उठाव घेण्यासाठी जो ( बुद्धीचा, शक्तीचा, वेळेचा ) त्याग घडतो, त्याला कर्म म्हणतात; आणि कर्म सिद्धीस जाण्यास—

**अधिष्ठानं तथा कर्ता, करणं च पृथग्विधम् ।**
**विविधाश्च पृथक्चेष्टा दैवमेवात्र पंचमम् ॥**

लागतात. कर्माची भूमिका वा पातळी, करणाची कुवत आणि मनोवृत्ति, निर-निराळी सर्व साधने आणि त्या साधनाचा हरतऱ्हानी कुशल वापर ही कर्मसिद्धीची चार साधने तरी ( दैवाचा विचार बाजूस सारला तरी ! ) माणसाच्या आटोक्या-तील ' भूते ' अथवा तयारी असतात. त्याचा भाव अथवा मर्म ओळखून, त्या प्रत्येकातील—

**उत्कट, भव्य तितुके घ्यावे । मिळमिळित अवघेचि टाकावे ॥**

आणि त्या सर्व उत्कट-भव्यांचा योजकतेने समन्वय करून आपली ' इष्टकाम

प्रसिद्धि ' साधावी. मग दैव तरी प्रतिकूल राहतेच कशाला ?

**. भाग्यासी काय उणे रे ! यत्नावाचोनि राहिले ।।**

या समर्थवाणीचा रोख वरीलप्रमाणे आहे. तो लक्ष्यात वागवून एकदा कां **इष्टकाम-प्रसिद्धि** झाली की ती मात्र समाजपुरुषाला, राष्ट्रदेवाला, मानवजातीला म्हणजेच विश्वात्मक देवाला समर्पण करावयाची आणि आपण सर्वस्वी मुक्त व्हावयाचे.

**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ।**

ती अशी.

अशी सिद्धि मनुष्य हरएक कामात मिळवित गेला, म्हणजे तो हळूहळू जगच्चैतन्याशी अथवा परमेश्वराशी समरस होऊ लागतो व विकासवादाने ती 'याची सवय स्व–भाव होते. परमेश्वर जसा—

**स्थिरचर व्यापुनि दशांगुळे उरला ।**

असा आहे, एवढेच नव्हे, तर प्रत्येक वस्तुमात्राच्या अंतर्बाह्य असतो, तशीच कर्मफलत्याग–योग्याची अवस्था होते.

**मरावे परी कीर्तिरूपे उरावे ।**

ते असे ! यालाच परमेश्वराशी मिळून जाणे किंवा मोक्ष असे म्हणता येते. ' **तुका झालासे पांडुरंग।** ' याचा अनुभव हा ! गीताच ( अध्याय २, श्लो. ५३ ) सांगते—

**कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।**
**जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम् ।।**

पण धर्म हा अंतर्बाह्य शुद्धतेचा मार्ग आहे, असेच व्यवहारतः समजण्यात येते. माणसाला आत्मदृष्टीने व समाजाचा घटक या दृष्टीने शीलवान् बनविणारे सर्व विचार, हेतु, विधि, नियम व प्रवृत्ति ' धर्म ' या सदराखाली येतात. म्हणून लोकसंग्रहार्थ—

**अलौकिक ( असूनही ) नोंहावे लोकाप्रति ।**

या धोरणाने शीलसंवर्धक व निष्पाप प्रथापरंपरा समाजात मिळूनमिसळून पाळावयास काहीच हरकत नाही. पंडितजीही तसे रीतरिवाज पाळतात. मात्र—

**धारणद्धर्म इत्याहुः । धर्मो धारयते प्रजाः ।।**

या सिद्धांताची बळकट कास माणसाने धरलीच पाहिजे. आपण स्वतः चांगल्या तऱ्हेने जगणे अणि त्याचबरोबर तेजस्वियांनाही चांगल्या तऱ्हेने जगविण्यासाठी जे—

**विचारूनि बोले । विवंचोनि चाले ।।**

हे व्रत घ्यावयाचे, ते कडक रीतीने सांभाळलेच पाहिजे; निदान कोणत्याही क्षेत्रातील तेजस्वियाचा तेजोभंग होताच कामा नये, ही दक्षता विवेकी मंडळीनी चालविण्यास हवी. तरच समाजाची नि राष्ट्राची मान सदैव उंचच राहिल. पंडितजी सातवळेकर यानी—

' **आत्मअनुभवी घोसाळल्या वाचा ।** ' त्याच पंखी आहेत.

✪ ✪ ✪

: ३७ :

# लोकदृष्टीतून पंडितजी

उत्सवसमारंभातून होणाऱ्या आतषबाजीचा जो आनंद असतो, तोच आनंद जीवनात लोकदृष्टीतून होणाऱ्या गुणग्राहक गौरवाचा असतो. भारतभूमीवर आकाशातील तारे एकाद्या प्रगाढ रात्री भरमसाट चमचमाट करतात–तांबूस, निळसर, सोनेरी अशा किरणांनी गंगादि नद्यांच्या पाण्यात आपली प्रतिबिंबे झळकवितात आणि त्याचवेळी पाण्यावर भक्तिभावाने लोकांनी लावलेल्या दीपज्योति ( पणत्या ) पण त्यातून तरंगत राहतात, तेव्हा होणारा रसरंग आपल्या भारत–देशाच्या इतिहासात फार प्राचीनकालापासून नवरात्रात, दसरा–दिवाळीला, त्रिपुरीपौर्णिमेस आणि कार्तिकस्नानाच्या पहाटेस आपण अनुभविला आहे. युरोपला अशा रसरंगाचा परिचय चवदाव्या शतकापासूनच झाला. त्या रसरंगातील खुसखुशितपणाप्रमाणेच जीवनातील लोकगौरवाचा खुसखुशितपणा माणसाला दुहेरी पोषक असतो. कर्तृत्ववंताच्या आत्मविश्वासाला तो दृढ करतो आणि कर्तृत्वाचे नवे पैलू व तेज तो वाढवितो. शिवाय, समाजात गुणकर्तृत्वाचे मूल्यमापन करण्याची कुवत आहे, असा प्रत्यय आल्याकारणाने होतकरूंना कर्तृत्ववंत व्हावयास प्रेरणा मिळते.

वॉलपोलने आपल्या चित्रकाराला सांगितले की, ' मी आहे तसाच मला रंगव. ' पण ' **माझा मीच मला कळे न पुरते, मी कोण, कसा असे ।** ' अशी जेथे हजारात नऊशे नव्याण्णव माणसांची अवस्था असते, तेथे वॉल्पोलप्रमाणे सांगणारापैकी किती जणांना अंतरंग–बहिरंगासह प्रामाणिकपणे चित्रकारानी वा शब्दचित्रकारानी वा शिल्पकारानी रंगविण्याचे मनावर घेतले तरी, ते साध्य आहे ? बहिरंग, बैठक, दर्शन, याबाबत वास्तववाद शंभर टक्के पाळणे चित्रकारास वा शिल्पकारास साधेलही; पण जेव्हा का तो आपल्या चित्रमूर्तीचे भावदर्शन घडवतो वा अंतःकरणाचा आवि-

ष्कार एकाद्या रंगछटेने अगर कोरणीने करतो, तेव्हा त्याने त्या चित्रमूर्तीला जसे पाहिले असेल, तसेच स्वतःच्या नजरेने तो चितारतो. शब्दचित्रकाराच्या बाबत तर ते नेहमीच घडत असते. त्यांचा श्रेष्ठी जो चरित्रकार तो जर वरील अनुभवाला सहसा अपवाद ठरत नाही, तर यशोलोचनाकार, स्वभाविष्कारक, प्रसंगोत्कट-भाव-दर्शक तरी अन्यथा कसे ठरतील ? म्हणून लोकदृष्टीच्या विविधतेतून आदर्श वा नायक असलेल्या श्रेष्ठाचे जे एकजिनसी चित्र डोळ्यापुढे उभे राहील, त्याचा पडताळा त्या श्रेष्ठाच्या कर्तृत्वाच्या, चरित्राच्या आणि चारित्र्याच्या दृढभाजकाशी कितपत जमतो, हे पाहणेदेखील अभ्यासकांना प्रबोधकच ठरते. या दृष्टीने पंडितजींच्या संबंधी येथे सादर केलेल्या लोकदृष्टीतील अंतरोत्थित प्रेरणोद्गारांचा खास उपयोग होईल. स्वत. अभ्यासपूर्वक केलेल्या मूल्यमापनाचा बिनचूकपणा पडताळता येईल पंडितजींच्या चाहत्यांना व उपासकांना ! दात घासताना ते आतून, बाहेरून, मूळातून व मध्यंतरातून असे चहूबाजूनी स्वच्छ व्हावे लागतात. कोणाही श्रेष्ठाच्या गुणग्राहकतेची व मूल्यमापनाची पूर्णता तशीच व्हावी लागते.

पण यापेक्षाही, लोकदृष्टीतील मूल्यमापनाचा दृढभाजक संशोधन-बुद्धीच्या अभ्यासकाला संबंधित श्रेष्ठाचे सर्वांगीण चरित्र साकल्यसमन्वयाने लिहिण्याची स्फूर्ति देईल. लोकदृष्टीतील बारकाव्याचे पृथक्करण कोठे, कसे व कितपत बरोबर आहे याचे विवेचन करून, त्या चरित्रपुस्तकाने भाषेचे ग्रंथभांडार समृद्ध करता येते. ज्यावर बिनधोक विश्वास ठेवावा, असे समुद्रातील दीपस्तंभाप्रमाणे ते चरित्र होईल.

पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकरांसंबंधी हे पहा, लोक काय बोलतात, ते !

## श्रीवेदमूर्तीनां सातवलेकरमहोदयानां अभिनन्दनम् ।

( १ ) जीवनस्यास्य कालो येन प्रौढरूपेण प्रतिक्षणं ब्राह्मण्यसंस्कारेण कर्मनैष्ठिकतया तैर्व्यतीतः, तादृशं कर्मकुशलतासंपन्नं जीवनं प्रायो विरलमेवाधुनिके समये दृश्यते । एतेषां महानुभावानां सर्वस्मिन् कर्मक्षेत्रे नैपुण्यं, प्रौढिः, निर्भयत्वं, दृढता, कर्मनिष्ठा, आत्मविश्वासश्चावलोक्यते । ईदृशमेव जन्म सफलम् ।

—महामहोपाध्याय डॉ. श्री उमेशमिश्रः । प्रयाग

( २ ) दिने पंचदशे जाताः । मासे नाम्ना सितम्बरे ।
तस्माज्जन्म-दिने दिष्टया । वर्धन्ते विजयेन ते ।। १ ।।
मासे भाद्रपदे नाम्ना । कृष्णपक्षे तथैव च ।
तिथौ षष्ट्यां च जातैस्तैः । कृतोऽपूर्वो पराक्रमः ।। २ ।।
अभ्यासश्च प्रसारश्च । तस्य संशोधनं च तैः ।
संस्कृतस्य कृतं तस्मात् । 'वेदमूर्ति' र्बभूविरे ।। ३ ।।

वाङ्मये वै महाराष्ट्रे । सत्कार्यं ख्यातमेव हि ।
' पुरुषार्थ '–प्रसिद्धचा च । पुरुषार्थः कृतो महान् ॥ ४ ॥
—श्री या. वि. देवासकर, ' वटोदरपुरम् '

( ३ ) ये काव्याम्भोनिधि–महापोत, गुरुकर्णधार ते नमोनमः ।
कविहंसकुलानां मानसमसि कविताजगति–नव–विरंचिरसि ॥ १ ॥
त्वं कविप्रणय–रस–भूरि–भरो, भूयो भूयसो नमोनमः ।
अभिलषतां विदुषामभिलाषोऽनवलम्बानामस्यवलम्बः ॥ २ ॥
निर्भय–ललाट–पटले, कविता–रस–वाहिनो विधिना ।
समर्पितासीत्तस्याः स्रोतो–मार्गः कृतो भवता ॥ ३ ॥
जागरिष्यते कविसमाजाय, सुरगवीचरण–समुपासकाय ।
वितरता बलं, हरता च तमः, कृतमुदंचिया भवता सुदिनम् ॥ ४ ॥
अविकलां त्वदीयां काव्यकलामवलोकयतां यत्प्रशंसनम् ।
यावदपि विधियैतात्पमेव तत्प्रतिपत्तव्यं महाकवेः ॥ ५ ॥
पाणिनिमहार्णवोद्गतशब्द–महारत्नमालया भवता ।
वाचालंकृतहृदय–स्थलार्थ–सुमनो निगम्कया विहिता ॥ ६ ॥
तव पुरः कोटिशो नमोनमः । शिरसा पुनरपि पुनरपि च नमः ।
—साहित्याचार्य डॉ. हरिदत्त पालिवाल, ' निर्भय '

( ४ ) जयतु जयतु देवो भूरि विद्यार्कशोभः । जयतु जयतु विद्वान् वेदतत्त्वार्थदर्शी ।
जयतु जयतु लक्ष्मीस्थानयोग्योऽस्ति योऽसौ । जयतु जयतु चार्यो वैदिकायुश्च धृत्वा ॥१॥
निगमविचार एव न हिं मार्ग इहा न इति ।
ऋषि–परिपाटि–पुष्टिकरणे स्वमुखं हि भवान् ।
परहित–रक्षणे खलु विहाय मुदा सततम् ।
ऋषिगणभूषणोऽसि समुहन्मतिदार्ढ्यमहो ॥ २ ॥
विश्वामित्रसमानशक्तियुक्तमहात्मन् । परमात्मवर–कृपासु ' वर्धमाना ' ।
भवतु सकलमनुजोपकृतिरिह च भवताम् । गुरुवर, परमपुरुषविस्मय–वाञ्छा ॥ ३ ॥
स्वाध्याये च भवान् तपोधनार्जनशक्तौ । मुनिपुंगव इह चेशभक्तिवित्ते ।
सुगतिरिह भवतु सा सकलमनुजसमये । भवभयहारि विभुकृपयेति च याचे ॥ ४ ॥
– डॉ. श्री विश्वामित्र

( ५ ) अथावनौ भारतभूमिरेषा । नूनं सुपुत्रप्रसवेन धन्या ॥
वसिष्ट–वाल्मीकिसमान् मुनींद्रान् । यथा पुरा सा सुषुवेऽधुनापि ॥ १ ॥
ईदृङ्मुनिष्वद्य सतोऽग्रगण्यः । श्रीपादशर्मा जरठस्तपोभिः ॥
जातः कुले सातवलेकराख्ये । दामोदरिर्गुर्जरदेशसंस्थः ॥ २ ॥
—श्री. विश्वनाथ केशव छत्रे

( ६ ) येषां चित्ते भरतधरणीसंस्कृतिर्जागरूका ।
नैजी गोत्रप्रवरसरणिः स्मारयत्वाढचतां स्वाम् ॥
येषां वेदध्वनिमुखरितं भाति चार्षोऽन्तरात्मा ।
श्रीपादार्ये द्विजकुलमणौ तेऽधमर्णा हि सर्वे ॥ १ ॥
यन्निश्वासमया गिरोऽतिगुरवो नैजप्रमाणायितः ।
धर्माधर्मविवेचनैक-निकषाः कालत्रयेऽप्यक्षराः ॥
सोऽयं सर्वगतः पुराणपुरुषः स्वाम्नातमारक्षितुं ।
श्रीपादाङ्कितदामपूर्वमुदरं पायात् सहस्रं समाः ॥ २ ॥

—श्री. सी. आर्. स्वामीनाथन्

( ७ ) यावत्पाश्चात्यविद्वन्मणिगणविलसन्मौलिविश्रान्तपादः ॥
श्रीपादो वाङ्मयज्ञो व्यजयत नितरां वेदवाणी प्रकाश्य ॥
राष्ट्रे दामोदरे सत्यपि च बहुविधैः शान्त्युपायैरनेकैः ।
योऽक्षरक्षत् वेदधर्मं, वयमखिलजनास्तं नमो वेदमूर्तिम् ॥ १ ॥
विद्वन्मंडलमण्डनाधिकयशो, धान्मासुविद्वद्वराः ।
स्वाध्यायाभिरता जयन्तु सततं श्रीपाद-दामोदराः ॥
नित्यं वेदवचोऽभिरक्तमनसा यज्जीवनं पावनम् ।
तेषां सातवलेकराख्य-विदुषां कुर्मो वयं स्वागतम् ॥ २ ॥
तिलक-गान्धिवरादिभिरर्चितम् । निखिल-विश्वजनैरभिनन्दितम् ॥
भवति वैदिक-संस्कृति-संस्कृतम् । विबुधसातवलेकर-जीवितम् ॥ ३ ॥
निगम-नीति-धृति-स्मृतिशालिनः । विदित-वैदिक-पद्धति-गामिनः ॥
स्फुरति-सुस्थचिरंतनजीविनः । प्रथित-सातवलेकरमानिनः ॥ ४ ॥

—आचार्य प्रभाकर मिश्रः

( ८ ) व्युत्पन्नः खलु व्याकृतौ प्रखरधीस्तर्के नये न्यायविद् ।
वेदान्ते परमात्मतत्त्वसगुणं तं निर्गुणं ज्ञानवान् ॥
गीता-वेद-पुराण-भाष्य-भगवच्चर्चा-प्रबोधाश्रयात् ।
शब्दे ब्रह्मणि तिष्ठतो विजयते श्रीपाद-दामोदरः ॥ १ ॥

—विद्याभूषण श्रीगणेशराम शर्मा

( ९ ) गम्भीरतायां सलिलाधिराजं, धैर्येऽतिशेते सततं हिमाद्रिम् ।
यस्तेजसादित्यसमो विभाति, तस्मै नमः सातवलेकराय ॥ १ ॥

—श्री जनमेजयः विद्यालंकार, शास्त्री, एम्. ए.

( १० ) वार्धवयेऽपि युवेव कर्मनिरतो योगस्य शक्त्या सुधीः ।
मान्यः सातवलेकरो विजयते सत्कर्मयोग्याग्रणीः ॥ १ ॥

—श्री धर्मदेव विद्यामार्तंड, ज्वालापूर

( ११ ) पंडित सातवलेकरजीने अपने जीवनमें संस्कृत वाङ्मय, विशेषतः वैदिक वाङ्मयकी बहुत बडी सेवा की है। वह सभी संस्कृतप्रेमियोंके आदरके पात्र है।

डॉ. संपूर्णानन्द

( १२ ) श्री सातवलेकरजीके समान भक्त–सन्तोंके प्रेरणाओंकी आज देशको अत्यंत आवश्यकता है।

—डॉ. रा. क. शर्मा ( संस्कृत ) विद्याधिकारी, दिल्ली

( १३ ) श्री सातवलेकरजी देशके प्रकाण्ड विद्वान्, सक्रिय एवं उत्साही समाज-सेवक, तथा प्रखर एवं समर्थ साहित्यकार हैं और उन्होंने समाज एवं साहित्यकी श्लाघनीय सेवा की है। —श्री बलवन्तराय मेहता ( नामदार )

( १४ ) श्री सातवलेकरजीका जीवन त्यागमय रहा है और उन्होंने अपनी विद्वत्ता, विनम्रता एवं कर्तव्यपरायणता एक अनुपम उदाहरण किया है।

—ना. हितेन्द्र देसाई

( १५ ) मैंने स्वयं ' संस्कृत–स्वयं–शिक्षक ' से संस्कृत आरंभ की थी और दूसरोंसे इसकी शिफारस की है। —आनंद कौसल्यायन विद्यालंकार, कोलंबो

( १६ ) पूज्य पंडितजीने अपने दीर्घ जनसेवाके कार्यकालमें सरल, सुन्दर, सुलभ व न्यून मूल्यमें उपलब्ध, इस प्रकार जो वेद और वैदिक साहित्यका विशाल परिणाममें प्रचार व प्रसार किया है, उन सबके लिये शब्दोंद्वारा प्रशंसा असंभव है। ऐसे ज्वलन्त उदाहरण युगोमें विरले ही दृष्टिगोचर होते हैं। सबसे विशेष यह कि उन्होंने जिन सिद्धान्तोंका प्रचार व उपदेश किया, उन्हें उन्होंने अपने जीवनमें भी दृढतासे पालन किया हैं।

—श्री सेठ प्रतापसिंह शूरजी वल्लभदास, अध्यक्ष सार्वदेशिक आर्यसभा.

( १७ ) आपके विद्या और तपके प्रभावसे आपके द्वारा किये गये, सनातन धर्मप्रचारके लिये तथा जनताके आरोग्यके लिये, वेद–योग-व्यायामादि विविध विषयोंके प्रकाशनसे आकृष्ट मनवाले सज्जन अगणित है। अपने बालपनसे लेकर सदाचारका पालन करके अनेक कष्ट सहन कर जो धर्मका संरक्षण किया, वह भगवान्‌को प्रसन्न करनेवाला हुआ हैं।

—श्री जनार्दनस्वामी ( अध्यक्ष योगाभ्यासी मंडळ )

( १८ ) आधुनिक भारतमें जिन आधुनिक ऋषियोंने प्राचीन परंपराका ज्ञान नयी पिढीको कराया, उनमें पूज्य ऋषि सातवलेकरजीका नाम प्रथम श्रेणीमें रहेगा।

—श्री निरंजन छ. जमीदार, महासचीव गीतासमिति, इंदोर

( १९ ) श्रद्धेय आचार्यवर पं. श्रीपाद दामोदर सातवलेकर वेदकी शिक्षाको अपने जीवनद्वारा सार्थक कर रहे हैं, वह सबके लिये गौरवका विषय है। आचार्य-जीका एक गुरुतर एवं श्लाघनीय कार्य इसाई मिशनको आर्यमिशनमें परिणत कर

देना है। आचार्यने गिरजाघरमें वेदमंदिरकी स्थापना की है।

डॉ मुन्शीराम शर्मा ' ओम् ' कानपूर

( २० ) श्री पंडित–सरदार कौन है ? जिनमें समत्व है भरपूर।
दान ज्ञानका देते रहते, भेदभाव रखते है दूर ॥
सात्त्विक वैदिक विश्वधर्मका प्रचार करनेवाले कौन ? ।
तनमनधनसे पुरुषार्थी मानवको दिखनेवाले कौन ? ॥
वचन–मनन और कर्म–रूपमें एकरूप रखते है कौन ? ।
लेखक वेदव्यास हि के सम वेदव्यवस्थापक है कौन ? ॥
कहो, मुक्त मनसे हे ' उद्धव, ' वह है श्री सातवलेकर।
रचना मिलती रहे वर्ष सौ–से ज्यादा जीवन ले कर ॥

—श्री. र. बा. उद्धव

( २१ ) श्रीमत् श्रीसंपन्न सातवलेकरजी प्रभा–प्रदाता।
दाक्षिण्य–दया–परिपूर्ण और जनजीवमें सुखदाता ॥
सात्त्विकताकी सरलमूर्ति, शम–दम–उपरतिसे कर्मदूत।
तन–में प्रकाश भरनेवाले, महाव्रती तापस अवधूत ॥
वचनामृतसे पालनकर्ताकी अमर रहे जीवन–रेखा।
लेखनशैली अरु कृतियोंमें हमने जगका वैभव देखा ॥
कल्याण विश्वका करनेको ही कर्मयोग अपनाये है।
रत सरस्वतीकी सेवामें, जो अनुपम ज्योति जमाये है ॥

—श्री शोभनाथ पाठक, एम्. ए.

( २२ ) वेदवाङ्मय हा संस्कृतीचा खजिना आहे आणि पं. सातवळेकर हे वेद-प्रणीत जीवन व्यतीत करणाऱ्या ऋषीचे प्रतीकात्मक आदर्श आहेत.

—डॉ. कन्हय्यालाल मुनशी, मुंबई

( २३ ) पंडित सातवळेकरांनी वेदगीत सामान्यापर्यंत पोहोचवले, ही त्यांची अतुलनीय कामगिरी असून ती सर्वधर्मसमान राज्याशी विसंगत नाही...आध्यात्मिक मूल्यांच्या शिकवणीनेच सहिष्णुवृत्ति निर्माण होते व ' जगा आणि जगू द्या ' अशी स्वभावधारणा तयार होते. —डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर

( २४ ) पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर हे महान् संस्कृत पंडित आहेत. वेदांचा जीवनसंदेश प्रचारित करण्याच्या कार्याला त्यांनी स्वतःचे जीवन समर्पित केले आहे. —महात्मा गांधी

( २५ ) ज्या काळात भारताकडे एका मृत संस्कृतीचे अवशेष म्हणून पाहण्याची आणि एकाद्या निर्जीव व अचेतन वस्तूप्रमाणे त्यातील शब्दार्थ–पृथक्करण करण्याची वृत्ति बळावलेली होती, त्या काळात वेदाच्या अभ्यासाची ऋषींची दिशा कोणती

होती व ती कशी अभ्युदय व निःश्रेयस या उभयविध पुरुषार्थाच्या प्राप्तीस सहाय्यक होती हे निर्भीडपणे, अधिकाराने आणि सयुक्तिकपणे प्रतिपादन करणारे पंडित सातवळेकर हे आधुनिक काळातील वेदाचार्य होत. —लोकनायक **अणे**

( २६ ) देशाच्या भाग्यानेच अशी अमौलिक रत्ने लाभतात. देशाने मात्र पंडितजी-सारख्यांच्या कर्तृत्वाचा लाभ करून घेतला पाहिजे.—श्री **रवीन्द्र रामदास, एम्. ए.**

( २७ ) चित्रकार, छायाचित्रकार, सनातन धर्मप्रचारक, क्रांतिकारक, राष्ट्र-हितैषी, वेदपंडित, संपादक, योगासनाचे शिक्षक, प्रवचनकार, वक्ता आणि साहित्यिक अशा विविध व चमकदार पैलूंनी पंडितजींचे जीवन समृद्ध आहे.

—श्री **जीवन किर्लोस्कर** ( केसरी )

( २८ ) उपमासूची ही सूक्ष्म अभ्यासासाठी आवश्यक आहे. भगवद्गीतेची अन्त्याक्षरसूची हा त्यांचा प्रयत्न, मला वाटते, पुष्कळाना ठाऊकही नसावा. आधी कर्तबगार माणसे फार थोडी आणि जी आहेत त्यांची जानपहचानही पुष्कळांना नसावी याचे वाईट वाटते. —**डॉ. ना. गो. चापेकर**

( २९ ) साधी राहणी, शुद्ध सात्त्विक विचारसरणी, स्वतःपेक्षा व्यापक समा-जाची–राष्ट्राची अधिक काळजी, वैदिक वाङ्मयाचा सदैव ध्यास आणि अभ्यास, नागरी जीवनापासून अलिप्तपण, गृहस्थाश्रमाचे यथातथ्य पालन, यांची मूर्ति म्हणजे श्रीपाद दामोदर सातवळेकर. —श्री **श्री. रा. टिकेकर**

( ३० ) विशाल विचारांतील निर्भयपणा हा पंडितजींच्या स्वभावाचा स्थायी-भाव आहे. अचूक निदान ही त्यांच्या बुद्धीची झेप आहे. याहीपेक्षा त्यांचा सर्वात मोठा गुण म्हणजे ते नुसते बोलके नाहीत, लेखक नाहीत, तर प्रत्यक्ष पुढारीपण घेऊन कौशल्याने कार्य पार पाडण्याची अचाट शक्ति ईश्वराने त्यांना दिली आहे. इतका असामान्य योग्यतेचा महापुरुष भारतात दुसरा क्वचितच आढळेल.

—विद्यानिधि **सिद्धेश्वरशास्त्री चित्राव**

( ३१ ) वेदोद्धारकात स्वामी दयानंदांचे पश्चात् पंडितजींनाच मोजावे लागेल. समाजसुधारक या नात्याने स्पृश्य, त्याचप्रमाणे अस्पृश्य यांच्यामध्ये पशुहत्त्येविरुद्ध प्रचंड आंदोलन पंडितजींनी उठवले. भारतीय संस्कृतीचे पंडितजी तर महान् पुजारी आहेत. —श्री **दुर्गाशंकर त्रिवेदी**

( ३२ ) स्वाध्यायमंडळद्वारा पंडित सातवळेकरांनी संस्कृतभाषा, वेदविद्या आणि भारतीय संस्कृति याच्या प्रचारासाठी अनन्यनिष्ठेने जे परिश्रम केले ते आज-काल तर अद्वितीय आहेत. —श्री **काका कालेलकर**

( ३३ ) पंडितजींचे जीवन वेदमय असून ते वेदाचे केवळ पुजारी नाहीत तर वैदिक संस्कृतिचे जागते पहारेकरी आहेत. हजारो भारतीय व भारतीयेतर तरुणात

वैदिक संस्कृतीचे प्रेम मुरवण्यात त्यांना यशच यश लाभले आहे.

—पं. श्री रामचंद्र आर्य मुसाफिर

( ३४ ) पंडितजींची वाणी ओज आणि मधुरता सांभाळून सत्यच असते. त्यांचे सारे जीवनच ऋषितुल्य आहे. आधुनिक जगाची त्यांना चांगलीच ओळख आहे आणि तरीही त्यांना लोभ नाही की ते भारतीय संस्कृतीला पारखे नाहीत.

—ना. काकासाहेब गाडगीळ

( ३५ ) आजन्म श्रुतिसार चिंतुनि जना सस्नेह ते अर्पिले ।
लोकी पंडित ही यथार्थ पदवी दीर्घोद्यमे पावले ॥
तत्त्वज्ञान असे जगी सुलभसे सांगावयाला जना ।
वागे त्यापरि साधु तो, जनमना दे तत्कृति प्रेरणा ॥

—श्री वि. के. छत्रे

( ३६ ) 'पं. सातवळेकर हे ज्याप्रमाणे वेदवेदांगे यांचे अभ्यासक आहेत, त्याचप्रमाणे ते चित्रकलेचेही उपासक अगदी लहानपणापासून आहेत. तसेच भरतखंडाच्या हिताच्या दृष्टीने आधुनिक काळाला अनुसरून ज्या निरनिराळ्या बाजूनी आपल्या मायभूमीची प्रगति व्हावयास पाहिजे, त्या अनेक बाजूंचा अभ्यास आणि विचार त्यांनी परिश्रमपूर्वक केला आहे. केवळ सनातनी अगर केवळ सुधारक असे त्यांचे विशिष्ट मत नाही व आचरणही नाही. आचरणात साधेपणा, पूर्ण अभ्यासूवृत्ति, मनमोकळेपणा आणि समाजकार्य व राष्ट्रकार्य यात समरस होऊन, शक्य तो राष्ट्रकार्याच्या उत्क्रांतीला पूर्ण मदत करणे, हे त्यांचे नेहमीचे ब्रीद आहे.'

—श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी

( ३७ ) 'वेदांचे संशोधन व त्यांचे प्रकाशन अशा एका मागे पडलेल्या कामाचा सतत ध्यास घेऊन आयुष्यभर ते करीत राहणारी महाराष्ट्रातील परंपरा सातवळेकरांनी उजळून काढली आहे.'

—ना. यशवंतराव चव्हाण

( ३८ ) 'त्यांच्याच आशीर्वादाने व प्रेरणेने औंधराज्यात ग्रामोद्धाराचे कार्य होऊ शकले.'

—बॅ. अप्पासाहेब पंत.

( ३९ ) 'सन् ( १९ ) ६० च्या वेळेस मी होशियारपूर ( पंजाब ) मध्ये होतो. हिंदीचे एक मोठे लेखक श्री महेंद्र कुलश्रेष्ठ यांच्या द्वारे पं. सातवळेकर यांना काही कार्यकरांची आवश्यकता आहे, असे मला समजले. मी एक पत्र टाकले. नंतर पत्रव्यवहार सुरू झाला आणि शेवटी बाबांच्या चरणी हजर झालो. पटले तर ठीक, नाही तर मी तेथे जास्त दिवस टिकणार नाही, अशा भावनेने मी येथे आलो होतो. पण आता ( १९६६ ) मात्र बाबांच्या प्रेमाच्या रज्जूने असा बांधला गेलो आहे की बाबांना सोडून जाण्याची भावना कल्पनेत सुद्धा येत नाही. कारण आता आम्हा दोघांचा संबंध बाबा आणि नातू असा झालेला आहे. सरळ, निष्कपट हृदयाची

निःस्वार्थ प्रम करणारी, विद्वान् महान् लेखक, यशस्वी अशी बाबा ही व्यक्ति आहे. अशा व्यक्तीचे दर्शनसुद्धा पूर्वजन्मकृत पुण्याचे फळ होय.'

—श्रुतिशील शर्मा

( ४० ) ' पंडितजी सरळ हृदयी आणि सरळ स्वभावाचे सदैव आढळतात. मी पंडितजींबरोबर २।३ वर्षे काम करीत आलो; माझा अनुभव आहे. मी ( स्वाध्याय ) मंडळ सोडून जाताना पंडितजींना आशीर्वाद मागितला. पंडितजी म्हणाले– ज्यांनी माझे वाईट केले, त्यांनासुद्धा मी हार्दिक आशीर्वादच देत आलो आहे. तुम्ही तर काय माझ्याजवळच राहिला होता आणि स्वतःच्या कल्याणाकरताच येथून जात आहा; तेव्हा तुम्हाला माझे शुभाशीर्वाद आहेतच. असे निश्चल हृदयी गृहस्थ आजच्या युगात दुर्मिळच ! '

—नरोली हायस्कूलचे प्रधानाचार्य श्री. य. कृ. पटवर्धन, ( १९ सप्टेंबर १९६५ )

( ४१ ) पंडितजींच्या विद्वत्तेने आणि कीर्तीने आकर्षित होऊन मी येथे आलो. माझी योजना थोडे–वर्षभर येथे राहण्याची होती. पण पंडितजींच्या गुणांनी मी येथे इतका रमलो की ४॥ वर्षे होऊन गेली तरी मला येथून जावेसे वाटत नाही. पंडितजींच्या छत्रछायेमध्ये माझे जीवन येथे सुखाने चालू आहे. हे माझे महान् भाग्य आहे.

—पं. श्री भास्करानन्दजी ( स्वाध्यायमंडळ )

वरीलसारख्या लौकिकातून प्रत्ययप्रबोध होतो तो सारांशाने नमूद करावयाचा तर असे म्हणता येईल की, भारताच्या अध्यात्मप्रधान आर्यसंस्कृतीची आचारप्रणाली ज्या विवेकाने निर्माण झाली, त्या विवेकातील वैदिक जीवनाचा शक्तियुक्ति–शांतिपूर्ण प्राचीन आदर्श सत्यस्वरूपात संपूर्णपणे प्रगट करावा आणि सर्व जगास एकेकाळी प्रकाशित करणारे ते भारतीय तेज पुनः प्रगट करून त्याच्या प्रभावी व दैदिप्यमान् लाटांनी सर्व पृथ्वी पुनः एकदा प्रकाशित करून टाकावी, हेच पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्या वैदिक व इतर धर्म–साहित्य–संशोधनाचे अपूर्वत्व आहे. त्याच्या चिकित्सेने चिंतन–मनन सुकर व्हावे आणि हर्षोत्तर कालातील कुसंस्कारांनी उत्पन्न झालेले हृदयदौर्बल्य नाहीसे करून परंतपाप्रमाणे वैयक्तिक व राष्ट्रीय जीवनसंग्रामात जेतृत्व मिळवावे व विश्वसेवेस प्रवृत्त व्हावे, हाच सातवळेकर–साहित्याचा केंद्रबिन्दु होय. साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि पुण्यकरणी यांच्या जोरावरच पंडितजींना ' **विपदि धैर्य** ' धरून शांतिब्रह्म होता आले आहे !

**मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोनि जाते ॥**

अशी त्यांच्यावर जगन्नियंत्याची कृपा आहे. कारण पंडितजी वैदिक वाङ्मयाचे नुसते पढिक पंडित नसून वैदिक संस्कृतीचे ते आचारशुद्ध प्रतीक आहेत.

पंडितजींचे चरित्र हे असे स्वयंप्रकाशी दीपस्तंभाप्रमाणे आहे. वयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय आणि मानव्यमय जीवनाच्या वाटा आत्मानुभवी होऊन चोखाळणारांना ते मार्गदर्शक होऊ शकेल. हाताशी असलेला स्नेहार्द्र जिह्वाळा तेथे असल्या-

कारणाने त्याचे तेज किमपिही कमी होणारे नाही. कार्याकडे मने वळवण्याचे आणि मनापासून करावयाचे कार्यक्षेत्र पुरवण्याचे सामर्थ्य त्या चरित्रात आहे.

**अजरामरवत् प्राज्ञो विद्यामर्थं च चिन्तयेत् ।**

या सुभाषिताची मूर्तीच जणु पंडितजी आहेत.

**दीर्घसूचनेचे नर । झाले आहेत, पुढे होणार । देणे ईश्वराचें ।**

अशा श्रेणीचे ते जीवन ! ' जाते घडी ही अपुली साधा, करा काय ते अता करा ' असा संदेश देऊन क्षणाक्षणाची आणि उत्साहाची नि कुवतीची बचत करावयास वळण लावणारे असे पंडितचरित्र आहे.

' लोकमताच्या गणितशास्त्रात दोन आणि दोन चारच होतात, असे नाही. ते कधी पाचही होतात व कधी तीनही होतात. तरी पण लोकमत डावलून चालत नाही ' असे सुधारकप्रभु आगरकरांनी म्हटले आहे; कारण निरनिराळ्या लोकांच्या मूल्यमापनात फरक असला तरी त्या सर्वांचा म्हणून एक दृढभाजक येतोच. पं. सातवळेकरांच्या बाबत प्रगट झालेल्या लोकदृष्टीत बारकावे अनेक असले तरी अभिप्राय एकच आहे. स्तुतीचा वर्षाव गाराच्या पावसासारखा झाला तर तो सोसतो फार थोड्यांना !! तसा प्रकार येथे काहीच नाही. बहुशः वास्तवाचे दर्शनच आहे आणि स्तुतीने किंवा निंदेने—

**हुराळे ना, उराळे ना, ज्याची प्रज्ञा स्थिरावली ।**

असा स्थितप्रज्ञ पंडितजी आहेत. त्यांच्या जीवनाचा आस्वाद घेणे म्हणजे काटे टोचून न घेतां, गुलाबातील मध अलगत् सेवन करण्याचे दिव्य आहे. त्यामुळे लोकदृष्टीतून झालेल्या पंडितजींच्या यशोलोचनेत वास्तवापेक्षा अन्य काही आढळतच नाही. ते वास्तव मग विचारवंताच्या मनी ठसविते की भूतकाळातील इतिहास-संस्कृतीचा वर्तमानाशी सहकारसमन्वय साधून भविष्यकाळाचा बळकट बालेकिल्ला बांधू इच्छिणारांनी पंडितजींच्या चरित्राचा आणि चारित्र्याचा कित्ता पुढे ठेवावा आणि आपापले वळण गिरवावे.

व्यतीपेक्षा विचारसरणी, विचारसरणीतील विवेकविनिमय, त्यातून उत्पन्न होणारा बंधुभावाचा सहकार यांचे युग म्हणजे उद्याचे युग आहे. एकमेकापासून अलग असलेल्या संस्काराच्या, चालीरीतीच्या आणि भाषाभाषांच्या विविधतेने भरलेल्या भारतात, ' विविधतेतही एकता ' असल्याचा साक्षात्कार घडण्यात वैदिक संस्कृतीचा नवा विजय असून त्याचा प्रभाव जगावर पडण्यात भारताचे अमर वैभव आहे. ते वाढविण्यासाठी वैदिक वाङ्मयातून शास्त्रशुद्ध उभारलेल्या संस्कृतीची मूर्ति म्हणूनच पंडित सातवळेकर निरीक्षकांच्या डोळ्यापुढे उभे रहात नसून त्यांचे व्यक्तिमत्व हे नवजीवनाला एक आवाहन आहे, यात तिळप्राय शंका नाही.

: ३८ :

# पंडितजी सातवळेकरांची यशोलोचना

निष्ठा भारतसंस्कृतौ सुविदुषो यस्याचला विद्यते ।
कार्यैर्यो विविधैः प्रसार–करणे गीर्वाणवाण्या रतः ॥
वार्धक्येऽपि युवेव कर्मनिरतो योगस्य शक्त्या सुधीः ।
मान्यः सातवलेकरो विजयते, सत्कर्मयोग्यग्रणीः ॥ १ ॥
मेधावी सुपरिश्रमी धृतियुतः ख्यातः कलावृद्वरो ।
वेदानां मननेऽनिशं रत इह, स्वार्थं विहायाखिलम् ॥
पत्रं वैदिकधर्मसंज्ञमिह यः सम्पाद्य लेभे यशः ।
मान्यः सातवलेकरो विजयते, सत्कर्मयोग्यग्रणीः ॥ २ ॥

—श्री धर्मदेव विद्यामार्तण्ड, ज्वालापूर.

भारताच्या आर्यसंस्कृतीला वैदिक, भारतीय, हिंदु संस्कृति अशा नावानीही निरनिराळ्या कारणानी जग ओळखत आले आहे. 'कृण्वन्तो विश्वमार्यम् ।' या ब्रीदाप्रमाणे, परिस्थितिसापेक्ष उच्चनीच, किंवा जवळचा–दूरचा हे भाव दूर करून सर्व ज्ञात जगत् आत्मसात् करण्याच्या इच्छेनुरूप आर्यांच्या स्थितिस्थापकीय वृत्तीने ती संस्कृति हजारो वर्षे अखिल आर्यावर्त व्यापून राहिली. वैदिक विचारसरणीप्रमाणे 'पुरुष एव सर्वं इदम् ।' ( ऋग्वेद ), म्हणून विश्वरूप सत्य असून ते पूर्ण आहे; त्याची चिच्छक्ति सदानंदरूप असून मनुष्य त्या विश्वरूपाचीच आपल्या परीने प्रतिमा आहे; विश्वाचा घटक आणि प्रतिमा असलेला मनुष्य विश्वाला संसेव्य मानतो. विश्वाचे काय, किंवा माणसाचे काय, शरीर हे देवतांचे मंदिर असून, त्याच्या निरनिराळ्या भागावर विविध देवतांचे अधिष्ठान आहे. जीव हा चिच्छक्तीचा ऊर्फ ईश्वराचा अमृतपुत्र असून जन्माला येताना ईश्वराच्या तेहत्तीस शक्ति तो

आपल्याबरोबरच घेऊन येतो. या शक्तीचा अनुभव ' याचि देही याचि डोळा । ' ऐहिक जगात घेऊन पृथ्वीचा स्वर्ग बनविण्याचे ध्येय वैदिक संस्कृतीने भारतीय तरुणापुढे ठेवले. चतुर्विध पुरुषार्थाने अभ्युदय व निःश्रेयस साधण्यासाठी मनुष्यास अनुशासनशील बनविण्याची शिस्त वैदिक संस्कृतीने घालून दिली आहे. दैनंदिन जीवनाच्या वेळापत्रकी आराखड्याचा क्रम आखून देऊन, वैदिक संस्कृतीने आर्यांना सामर्थ्यसंपन्न, वैभवसंपन्न व बुद्धिनिश्चयसंपन्न करून समुद्रवलयांकित पृथ्वी ' एकराट् ' करण्याचा व्यवहार शिकवला. या शिकवणीने आर्य विजयी व विजगीषु वृत्तीचे झाले.

या वैदिक संस्कृतीचे व्यवहारशुद्ध पुनरुज्जीवन व प्रस्थापन करावे, हा पंडितजी सातवळेकरांच्या सर्व पुरुषार्थ–प्रयत्नाचा प्रकर्ष आहे. पंडितजींच्या चरित्राचे सिंहावलोकन केले असता वरील विधानाची सत्यता प्रत्ययाला आल्याशिवाय राहणार नाही.

सह्याद्रिच्या दक्षिणेच्या टोकात हिरण्यकेशी नदी माधवगिरीच्या बाजूने वहात जाते, त्यावरील पठाराच्या पायथ्याने दक्षिणेकडे जाणारा मार्ग ज्या खिंडीतून खालच्या बाजूने जातो, त्या खिंडीत पाऊल टाकताच, निसर्गाचे भव्य स्वरूप निदर्शनास येते. तो फोंडाघाटाचा रमणीय प्रदेश म्हणजेच भूतपूर्व सावंतवाडी संस्थान. तिकडील प्राणिमात्र स्वाभाविकच भव्य व तेजःपुंज शरीरयष्टिचा, प्रत्युत्पन्नमतीचा व निरलस उद्योगशीलतेचा आढळतो. तशातच स्वच्छ आणि टापटिपीचे असे सातवळेकरांचे घराणे नाव करून राहिले आहे. सावंतवाडीजवळच्या कोलगावी स्थायी झालेल्या सातवळेकर घराण्यातील दामोदरभट्ट व सौ. लक्ष्मीबाई या दंपतीच्या पोटी शके १७८९ चे भाद्रपद वद्य षष्ठीस म्हणजे ता. १९ सप्टेंबर १८६७ रोजी जो कुलदीपक जन्मास आला तोच श्रीपाद पुढे आपल्या वैदिक घराण्याची तेजस्वी परंपरा चालवित चालवित पंडितजी सातवळेकर म्हणून जगास माहित झाला.

श्रीपादाचे बालपण सावंतवाडीसच गेल्यामुळे प्राथमिक शिक्षणही तेथेच झाले. अनुवंशिक संस्कार व परंपरागत शिक्षणक्रम यामुळे श्रीपादाचा ओढा वेदाभ्यासाकडे असावा हे साहजिकच होते. त्यामुळे प्राथमिकाबरोबर संस्कृतचे शिक्षण सावंतवाडीस झालेवर ' अंतरीं असाव्या नाना कळा । ' म्हणून त्यांच्या साधनेसाठी श्रीपादाला मुंबईस जावे लागले. व्यवसायानिमित्त व शिक्षणानिमित्त मुंबईकडे धाव घेण्याचा शिरस्ता कोकणच्या मंडळीत त्यावेळेस पडलाच होता. मुंबईस ' स्कूल ऑफ् आर्टस् ' मध्ये प्रवेश मिळवून श्रेणीपरंपरेने श्रीपादाने चित्रकलेचा उच्चांक गाठला. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात म्हणजे ' विशी विद्या ' केल्यावर ' तिशी धन ' या न्यायाने श्रीपादरावांचा बहुतेक व्यवसाय व ध्येय चित्रकला–मनोहारित्वात निपुणता हेच होते. त्यामुळेच, त्यावेळी मुंबईस शिक्षणासाठी राहिलेले व चित्रकलेचे चाहते श्रीमंत भवानराव श्रीनिवास पंत ( औंध ) यांचा दाट परिचय होऊन तो उत्तरोत्तर दृढ होत गेला.

घरातील आचारविचाराची छाप बालपणापासून श्रीपादरावावर असल्याकारणाने,

नरसोबाच्या वाडीस सातव्या वर्षी मौंजीबंधन झाल्यापासून वेदविद्येविषयी श्रीपादरावांना जडलेला प्रेमा व घरच्या परिस्थितीमुळे ओढाताणीतून श्रमसहनशीलतेने आवश्यक तो स्वावलंबनाने करावा लागलेला इंग्रजीचा अभ्यास आणि त्याचबरोबर चित्रकलेतील निष्णाती यांचा बेबनाव न होईल याची काळजी घेतघेतच श्रीपादरावांना पुढे पुढे पावले टाकावी लागत होती. तरीही ज्या तोलामोलाने वे. केळकरशास्त्रीनी त्यांच्याकडून सिद्धांतकौमुदी, मनोरमा, शेखर, महाभाष्य या व्याकरणग्रंथाचे आणि त्याचबरोबर वैज्ञानिक शाखेचे अध्ययन करवून घेतले होते, तितक्याच तोलामोलाने इंग्रजी भाषेतील तत्त्वज्ञान व इतर वैज्ञानिक शाखेतील हृद्‌गत श्रीपादरावांनी आत्मप्रयत्नाच्या जोरावर आत्मसात् केले. चित्रकलेची उपासनाही निर्मळपणाने त्यांनी अव्याहत केली. सावंतवाडीस त्यांच्या लहानपणी नवीनच सुरू झालेल्या चित्रकला शिक्षणाच्या दोन्ही परीक्षात ते पहिल्या क्रमांकाने चमकल्यामुळेच मुंबईच्या 'स्कूल ऑफ् आर्टस्' मध्ये त्यांना सुसंवादित्व सहज प्राप्त झाले होते, त्याचा त्यानी भरपूर लाभ उठविला.

मुंबईस १८९० त मुक्काम करताना श्रीपादराव सहकुटुंबच आले होते. मुंबईस घरून जरी थोडे पैसे येत असले तरी स्वार्जनाचा धोपटमार्ग पत्करूनच श्रीपादरावाना मुंबईस आपला संसार चालविणे कर्तव्य होऊन बसले होते. 'धनिक वणिक बाळांची' प्रतिमाचित्रे तर त्यानी बघत राहण्यासारखी करून दिलीच, पण मुंबईच्या आणि इतर ठिकाणच्या प्रदर्शनातूनही त्यांच्या चित्रांना पारितोषिके मिळाली! अशा नाव कमावणाऱ्या विद्यार्थ्यास मग १९०० साली मुंबईच्या 'स्कूल ऑफ् आर्टस्' ने शिक्षक म्हणून नेमून घेतले असले, तर नवलच कसले ?

मुंबईस सरासरी एक वर्ष नौकरी होऊन ती कायम व्हावयाच्या आतच (निजाम) हैदराबादेस कलायोगी सातवळेकरजींना जाणे आले. हिंदुस्थानातील पहिल्या श्रेणीचे संस्थान व त्याच्या तोलाचे जहागीरदार, सरदार, शेटसावकार आणि सुसंपन्नावस्थेतील राजधानी ! त्यामुळे रसिक कलाविलासाची चहा व्हावयास तेथे खूपच अवसर होता. चित्रकलेचे विशेष पोषण परंपरागत धनसंपन्नाकडून होऊन कलाकुशल सातवळेकर तेथे सुस्थित होण्याचा योग येत असताच, हैदराबादेस नवीनच एक वावटळ असे निर्माण झाले की, निजामाने पदच्युत व्हावे म्हणून तेथील अनेक अमीर उमरावांनी कट केल्याचा संशय बळावला. अशा अवस्थेत सातवळेकरांच्या कलेची चहा कोण करणार ? तेव्हा हैदराबादेवरून तळ हलविण्याचा विचार सातवळेकरांच्या मनी जोर करू लागला. तथापि त्या निर्णयाला येईपर्यंत सातवळेकर गप्प तरी कसे ? त्यानी हैदराबादेस एक व्यायामशाळा, मुलामुलींची शाळा व व्यायाम–मंडळ सुरू केले होते. डॉ. सीतारामपंत सातवळेकर हे पंडितजी सातवळेकरांचे धाकटे बंधु ज्या विवेकवर्धिनी–महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून व सुविख्यात संचालक म्हणून लोकविख्यात आहेत, त्या विवेकवर्धिनीचा मूळवा वरील तीन संस्थांच्या संस्थापनेत साप-

डेल. त्या संस्था पंडितजींनी प्रथम एका भुताटकीने पछाडलेल्या नबावी वाड्यात वीस रुपये दरमहा भाडे पत्करून सुरू केल्या. व्यायामशाळा त्या विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात बंगाल्यापासून सर्व सशस्त्रक्रांतिवाद्यांचे आश्रयस्थान होती. १८९५ त मुंबईस झालेल्या 'लॉर्ड हॅरिसच्या आरती ' पासून आणि त्या वेळपासून गर्जू लागलेल्या गणपति–शिवाजी–उत्सवापासून व अण्णासाहेब विजापूरकरांच्या स्वदेशी–उठावापासून पंडितजी राष्ट्रीय वृत्तीने मुसमुसून निघाले होते. तरीही विवेकवर्धिनीला राष्ट्रीय–शिक्षण–संस्थेचे स्वरूप आणण्यापुरतीच त्यांनी आपल्या राजकारणी सेवेची मर्यादा त्यावेळी राखली होती.

रायचूर येथे एक सोमयाग त्या सुमारासच झाला व यज्ञाचेवेळी पशुहननाच्या आवश्यकता–नावश्यकतेचा प्रश्न उपस्थित झाला.तेथील विद्वत्–परिषदेपुढे पंडितजींनी आपले मत मांडले. स्वामी दयानंदजी हे वैदिकधर्माचे पुरस्कर्ते आणि त्यांचे मते पशुहत्त्या हा वैदिकविधि मानण्याचे कारण नाही. स्वामीजींच्या आर्यसमाजाची हीच भूमिका असल्याने, पंडितजींच्या व्याख्यानानंतर आर्यसमाजात त्यांची प्रतिष्ठा तर वाढलीच, पण आर्यसमाजानेच त्याना ' पंडितजी ' ही पदवी अर्पण केली. त्यानंतर पंडितजींच्या ' वैदिक यज्ञसंस्था ' वगैरे पुस्तकांनी बडोद्याच्या गायकवाड सरकाराचा लक्षवेध केला. त्यामुळे बडोद्यास पंडितजींचे व्याख्यानसत्रही झाले आणि पंडितजींनी काही ' स्पर्शास्पर्श ' आदि ग्रंथही सयाजीमालेस लिहून दिले. पंडितजींच्या अशा तेजोवर्धनामुळे व विचारसाम्यामुळे त्यांचा व थिऑसॉफिकल सोसायटीचा स्नेहसंपर्क होऊन तो दृढतम होत गेला.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात वाराणसी काँग्रेसपासून लोकमान्यांच्या स्वराज्यचतुःसूत्रीला महत्त्व येऊन पंडितजींचे राष्ट्रीयत्व प्रखरपणे स्वदेशीच्या चळवळीत भाग घेऊ लागले. १९०७ च्या सुरत–काँग्रेसमध्ये पंडितजी लोकमान्यांच्या गोटात असल्यामुळे, ब्रिटिश सरकारकडून त्याचा बभ्रा हैदराबादेस झाला आणि तेथील विवेकवर्धिनीची व्यायामशाळा क्रांतिकारकाची जी धर्मशाळा झाली आहे, ती इंग्रजासह निजामाला निजधामाला पाठविण्यासाठीच, असे वातावरण पसरले. आपण उभारलेल्या राष्ट्ररचनेच्या विधायक संस्था आपल्या सहकाऱ्याकडे सुपूर्त करून, पंडितजी मग कांगडी येथील गुरुकुलात चित्रकलाशिक्षक म्हणून कार्यतत्पर झाले. विविध बिकट प्रसंगातून निभावून नेणारे अर्थसिद्ध सुदर्शनचक्र म्हणूनच त्यांच्या हाती सहजसुंदर चित्रकला होती. शस्त्राप्रमाणेच तिचा प्रसंगोचित उपयोग करून पंडितजींनी जीवनाचा मुख्य भर कर्तव्यबुद्धिने वैदिक स्वास्थ्य व त्याची दृढमूल प्रतिष्ठापना यांच्या प्रयत्नपुरुषार्थावरच दिल्याकारणाने, त्यांनी त्या काळच्या दाहक वातावरणातही आपले ' वैदिक राष्ट्रगीत ' प्रसिद्ध केले. त्यानंतर ' वैदिक प्रार्थनांची तेजस्विता ' हा त्यांचा लेख कोल्हापूरच्या ' विश्ववृत्तात ' प्रसिद्ध झाला. ' वैदिक राष्ट्रगीता ' च्या प्रति जप्त करून आंग्लसत्तेने भस्मसात् केल्या होत्या. विश्ववृत्ता-

वर कोल्हापूर दरबारकडून खटला भरवून संपादक विजापूरकर, सहसंपादक वामन मल्हार जोशी आणि मुद्रक जोशीराव यांच्यासह पंडितजी त्या खटल्यात परकीय सत्तेने गोवले. कोल्हापुराहून कांगडीस आपल्यावर वॉरंट सुटल्याचे पंडितजींना समजताच, त्यानी कांगडीहून कोल्हापुरची वाट धरली; परंतु दक्षिणेतील कित्येक मित्रांच्या सूचनेवरून कोल्हापूर येथे हजर न होता, बेळगावाच्या शेजारील अनगोळ येथे एका मित्राकडे पंडितजींनी मुक्काम केला.

कोल्हापुरास खटला चालून संपादकप्रभृतींना साडेतीन वर्षांच्या शिक्षा झाल्या. पण त्या खटल्याच्या सहामाहीत पंडितजींनी, पूर्वी ज्ञानप्रकाशात वर्णव्यवस्था वगैरे विषयावर जसे लिखाण केले होते, तसेच, भारत, भागवत, रामायण या ग्रंथासंबंधी लेखमाला लिहिल्या. कोल्हापूर खटल्याचा निकाल लागताच, पंडितजी अनगोळ सोडून मद्रासकडील कोकोनाडानजीकच्या पीठापुरम् या गावी एक वर्ष राहिले. तेथे त्याच्या चित्रकलेने पाच हजार रुपये प्राप्ती दिल्यानंतर ते कलकत्तामार्गाने पुन्हा गुरुकुलात–कांगडीस–दाखल झाले. त्यांच्या मागोव्यावर इंग्रज असल्याने, हरिद्वार येथे पंडितजींचा वास लागताच, शंभर पोलिसानी गुरुकुलाला वेढा दिला आपल्यामुळे संस्थेतील कोणाला व संस्थेला त्रास होऊ नये म्हणून पंडितजी पोलिसाचे स्वाधीन झाले. त्यांचेवर खून व राजद्रोह असे दोन आरोप असल्यामुळे हातबेड्या ठोकून व दंडाना दोऱ्या बांधून त्यांना नेण्यात आले व तुरुंगात पोहोचल्यावर पायातही बेड्या बसल्या. पुढे कोल्हापुरास रवानगी झाली. प्राथमिक चौकशीतच खुनाचे आरोपातून ते मुक्त झाले. राजद्रोहाच्या आरोपाखाली खटला सेशन् कमिट झाला. न्यायमूर्ति पंडितराव यांनी पंडितजींना निर्दोषी म्हणून सोडून दिले. आपल्या निर्णयपत्रात न्या. पंडितरावानी, न्या. किंकेड यांनी विश्ववृत्तावरील खटल्यात दिलेल्या निर्णयावर खरमरीत टीका केली. परिणामतः न्या. पंडितरावांना आपल्या नौकरीस मुकावे लागले !

याप्रमाणे वयाच्या चाळिशीअखेर पंडितजींचा काळ ओढाताणीतच गेला. तेव्हा फिरून पंजाबात जाऊन १९०९ चे अखेरीस पंडितजींनी लाहोरास मुक्काम केला. तेथे त्यांचा जम इतका चांगला बसला की संगीताचार्य विष्णु दिगंबर पलुसकर या महाराष्ट्रीय कलावंताप्रमाणेच पंडितजींचे नावही तेथे ऐन घरोब्याचे झाले. पंजाब–महाराष्ट्राची जवळीक या पंडितद्वयांच्यामुळे मग केवढी तरी फुलली.

पंजाबात राहून पंडितजी सातवळेकरानी हिमालयाच्या निसर्गरमणीयतेत पुष्कळच प्रवास केला आणि अनुभवसिद्ध लेखमाला लिहिल्या. पंजाबात आर्यसमाजाशी घनिष्ट संबंध येऊन वेदवाङ्मय हा राजकारणाच्या शाखोपशाखांच्या ऊहापोहाचा संकीर्ण-साठा आहे, याचे प्रतिपादन पंडितजींनी अनेक व्याख्यानातून केले. त्यावेळचा पंजाब राजकीय खळबळीने उफाळलेला होता. लाला लजपतराय, सूफी अंबाप्रसाद, लाला हरदयाळ अशा प्रगमनशील नेत्यांचा त्यावेळचा पंजाब ! सार्वजनिक भावना ज्यां-

च्या चळवळीनी उत्तेजित होत, अशा व्यक्ति व संस्था ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या झडपेचे विषय ! त्या भोवऱ्यात पंडितजींही सापडले.

तथापि पंजाबात दहा वर्षे पंडितजींनी तेजस्वी विचारजागृति वेदवाङ्मयाधारे केल्यावर विरक्तस्थळी स्थायी व्हावे व आपल्या आवडत्या वेदविद्येचे सर्वांगीण विवेचन जगापुढे मांडावे आणि वैदिक संस्कृतीचा पुनरवतार भारतीय समाजाच्या आचारप्रणालीत शक्य तितका साधण्याची खटपट करावी, ही पंडितजींच्या अंतःकरणाची तळमळ होतीच. कैसरीकंदना ( १९१४–१८ ) चा शेवट दृष्टिपंथात यावयाच्या सुमारास औंधचे पंतप्रतिनिधि यांच्याकडून मित्रत्वाचे निमंत्रण आल्यामुळे, पंडितजींनी त्यांचा मान राखला आणि १९१८ चे मे महिन्यात ते औंधास स्थायी झाले.

औंध येथून वेदपरिशीलनातून राष्ट्ररचनेच्या तेजस्वी विचाराचा फैलाव, मग, पंडितजी पुरुषार्थादि मासिकाच्या द्वारा जोमाने करू लागले. दक्षिण आफ्रिकेहून आलेले सत्याग्रही गांधी हिंदुस्थानात राहूनच भारतीय राजकारणी उत्थापनात लक्ष घालू लागले होते. काँग्रेस–अधिवेशनानिमित्ताने त्यांचा स्नेहसंबंध वाढता राहिला. तथापि राजकारणापेक्षा वैदिक तत्त्वज्ञानप्रसारावर पंडितजींचे मन गुंगले असल्याकारणाने, त्यावर आणि त्यातूनच होणाऱ्या अर्थप्राप्तीवर पंडितजींनी आपली वास्तु व मुद्रणालय औंधास निर्माण केले.

सातारा जिल्हापरिषदेचे १९३० साली अध्यक्ष होऊन पंडितजींनी भारतीय स्वातंत्र्योदयाचा प्रचार जारीने केला आणि डॉ. हर्डीकरांच्या सेवादलाची संघटनाही त्यांनी स्वागतार्ह मानली. पण त्यांच्या वेदप्रिय मनाला वैदिक संस्कृतीवर भर देऊन आणि ऐतिहासिक अस्मितेचे पुनरुज्जीवन करून तरुणाना राष्ट्रीय वळण लावणाऱ्या डॉ. हेडगेवारांच्या ' स्वयंसेवक संघाची ' प्रणाली जास्त मानवली. म्हणून १९३६ पासून त्या संघाचे कार्यही पंडितजींनी हाती घेतले. प्रांतिक काँग्रेस अधिवेशनाचे ( १९२२ ) अध्यक्ष अथवा महाराष्ट्र संस्थानी प्रजापरिषदेचे ( १९४३ ) म्हणून पंडितजींनी राजकारणाची सेवा केली असली, तरी त्यांची मुख्य कार्यक्षमता कुशलतेने वैदिक संस्कृतीवरच केंद्रित झाली होती. सर्व शक्तिशस्त्रे पणाला लावून हाती घेतलेल्या कार्याचा यशोध्वज फडकविण्यात पंडितजींचा हातखंडा आहे, हे सर्व प्रसिद्धच आहे.

औंध येथे पंडितजींचे कार्यक्रम वेळापत्रकाने चालावयाचे. पंतप्रतिनिधींच्या प्रत्येक प्रागतिक प्रयत्नात पंडितजी संपूर्ण सहकार देत व श्रीमंतही घेत. संस्थानामध्ये संपूर्णतया ग्रामराज्य–संस्थापना, संरक्षकदलाची उभारणी वगैरे त्या सहकाराची उदाहरणे आहेत. इशाऱ्यासरशी दहा मिनिटात गावातील प्रत्येक घरचा एक इसम चावडीवर हजर होण्याइतक्या शिस्तीचे संरक्षकदल औंधसंस्थानातील गावोगाव उभारलेले पाहून आणि तेही एका रात्रीच्या अनपेक्षित क्षणाला, व्हासरॉयचे लष्करी सेक्रेटरीच म्हणाले होते की, ' आता हिंदुस्थानात इंग्रजानी राहण्याची सोय नाही. '

ब्रिटिश रियासतीचे स्वराज्य १५ ऑगष्टला झाले व त्यातही काही वरीलसारखी शिस्त लागेल असा आशावाद चालू असता, अगदीच अनपेक्षितपणे १९४८ चे ३० जानेवारीस म. गांधींचे निर्वाण झाल्याने सर्व देशच हादरला व हळहळला. तीव्र व्याधीला तीव्र उपाय हा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे. सार्वजनिक दुःखे व क्लेश असह्य झाले म्हणजे दुसरे काय ? सार्वत्रिक जाळपोळ व घातपाती लाट उसळली व त्याच सुमारास दक्षिणमहाराष्ट्रातील संस्थानानी स्वतः होऊन भारतात विलीन होण्याचे ठरविल्याने, औंधास यापुढे राहून वैदिक वाङ्मयप्रकाशनाचे काम दुष्कर आहे, असे पंडितजींच्या मनाने घेतले. ' विपदि धैर्य ' हा पंडितजींचा स्वभाव असल्याकारणाने, स्थलांतरासाठी गुजराथेतील पारडी येथील ख्रिस्ती मिशनची अठरा एकर जागा विकाऊ असल्याची माहिती मिळताच, पंडितजींनी खरेदीचा सर्व व्यवहार करून औंध येथील सर्व पसारा हलविला व ते पारडीस प्रस्थापित झाले. एक्यांऐशीव्या वर्षी हा पंडितजींचा व्यापआटोप अनेकाना आश्चर्यविषय झाला ! पारडीस आश्रमसदृश जीवनाचा मांड पंडितजींनी मांडताच, लोकाना खात्री पटली की—

**न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति ।**

साधी राहणी, उच्च विचारसरणी आणि पुण्य करणी यांच्या जोरावरच पंडितजींना '**शान्तिब्रह्म**' होता आले आहे. '**मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोनि जाते ।**' अशी त्यांच्यावर जगन्नियंत्याची कृपा आहे. कारण पंडितजी वैदिक वाङ्मयाचे नुसते पढिक पंडित नसून वैदिक संस्कृतीचे ते आचारशुद्ध प्रतिक आहेत. महामहोपाध्यायच ते नाहीत, तर धर्मपीठपुरस्कृत व लोकमान्य असे ते वेदविद् '**ब्रह्मर्षि**' आहेत. '**शतायुर्वै पुरुषः**' हा वैदिकांचा दंडक आपल्या विद्वत्तेने व चारित्र्याने पंडितजींनी एवढ्या मोठ्या प्रमाणात भारतीयांच्या पुढे ठेवला आहे की '**वेदमूर्ति**' म्हणून या तपोनिधीला प्रणिपात करताना कोणताही निरीक्षक, अभ्यासक वा उपासक '**धन्यकाळ, हा दिवस !**'— असेच समाधान प्राप्त करून घेत असतो.

# सूची

[ 'वेदव्यास पं. सातवळेकर' या चरित्रग्रंथाचे, अभ्यासाच्या व छपाईच्या दृष्टीने दोन भाग केले असून, पहिला बावीस प्रकरणांचा 'जीवनौघ' आहे, तर दुसरा तेविसाव्या प्रकरणापासून 'विविध-दर्शना' चा आहे. दोहोंचे पृष्ठांक १ पासूनच आहेत. तेव्हा प्रत्येक संदर्भास पृष्ठांक देताना, दुसऱ्या भागातील पृष्ठांकांचे प्रारंभी [ अ ] असे द्योतक घातले आहे. ]


अक्कल्कोट १९, ४०, १२३, १३८ १६३.
अक्कलकोट स्वामी ४०.
ॲक्सिडन् ९३.
अगस्ति ( स्त्य ) ८६; [अ] १०८.
अंगरेजी राज्य ८९.
अग्रवाल श्रीकृष्णजी २६३, २६४.
अजंठा ४७. [ अ ] २७, २८, ३१, ३२, ५२.
अजमी ( मे ) र [ अ ] ३३, ९७
अजितसिंह ९५.
अठराश अठरा ६, ११, [ अ ] १३९.
अठराशे अठ्ठावन १३.
अठराशे अठ्ठेचाळीस ११.
अठराशे अठ्ठ्याऐंशी १. [ अ ] ९९, १००, १३९.
अठराशे अठ्ठ्याण्णव [ अ ] ९३, ९४ ९७.
अठराशे अडुसष्ठ ३९.
अठराशे एकसष्ठ १२.
अठराशे एक्कावन [ अ ] १३३.
अठराशे एक्काहत्तर [ अ ] २६, ७३, १०१.
अठराशे एकूणऐंशी [ अ ] १०१.
अठराशे एकूणचाळीस ११.
अठराशे एकूणतीस १४.
अठराशे एकूणनव्वद १, १५, २१८. [ अ ] ९३.
अठराशे एकूणपन्नास १२.
अठराशे एकूणसाठ १३.
अठराशे एकोणीस १०, [ अ ] १३९
अठराशे एक्क्याऐंशी [ अ ] ३७, ९५.
अठराशे एक्क्याण्णव [अ] ३७ ९५.
अठराशे ऐंशी [ अ ] १३७, १३९.
अठराशे चव्वेचाळीस १०.
अठराशे चाळीस [ अ ] १३९.
अठराशे चोपन्न [ अ ] १०१.
अठराशे चौऱ्याऐंशी १, २०. [ अ ] १३३.
अठराशे चौऱ्याण्णव १, [ अ ] ९७, १०२, १३३, १३९.

अठराशे चौऱ्याहत्तर ११, १२, १४, ३६, ६१, [ अ ] ९९.
अठराशे चौसष्ठ १२, [ अ ] १०२.
अठराशे छत्तीस १४.
अठराशे छप्पन १४.
अठराशे तेवीस [ अ ] ११३.
अठराशे त्रेसष्ठ [ अ ] २२, ९९, १००.
अठराशे त्र्याऐंशी १, १३.
अठराशे त्र्याण्णव ६२, ८६, [ अ ] ३८, ९३, ९४, ९६, ९८.
अठराशे त्र्याहत्तर १२.
अठराशे दोन १३.
अठराशे नव्याण्णव ८९, [ अ ] १००, १०१, १०३.
अठराशे नव्वद ३५, ३७, १२८, [ अ ] २६, ३७, ९३, ९९.
अठराशे पंचवीस [ अ ] ७३.
अठराशे पंचाऐंशी १५.
अठराशे पंचाण्णव ३९, ८६, १११, [ अ ] ३१, ९७, २०४.
अठराशे पंचावन ११०
अठराशे पंचाहत्तर १, १५, ३५ ५२,
अठराशे पंचेचाळीस १०, [ अ ] १३३.
अठराशे पन्नास १४, ११०, [ अ ] ७३.
अठराशे पसतीस १३, [ अ ] १३९.
अठराशे पासष्ठ [ अ ] १००.
अठराशे बत्तीस १४.
अठराशे बारा ६, १११.
अठराशे बाहात्तर १२, [ अ ] ९९.
अठराशे ब्याऐंशी १, [ अ ] ७३, १०१.
अठराशे ब्याण्णव १, [अ] २९, ७६, ९५, ९७, ११३.
अठराशे शहाऐंशी [ अ ] १३७.
अठराशे शहाण्णव [ अ ] ३८.
अठराशे शहात्तर १३.
अठराशे सतरा १०.
अठराशे सत्तर १२.
अठराशे सत्तावन १०, ११, १३, १५, ८९, १७१
अठराशे सत्त्याऐंशी ३५.
अठराशे सत्याण्णव १, ४३, ५४, १११, [ अ ] ३१, ३८, ९६.
अठराशे सत्त्याहत्तर १३, १४, [ अ ] १३३.
अठराशे सदतीस १२.
अठराशे सदुसष्ठ १, ६, [ अ ] ९४, ९७, २०२,
अठराश सहासष्ठ १२.
अठराशे साठ १४ [ अ ] १०२.
अठराशे सेहेचाळीस [ अ ] १३९.
अठराशे सोळा [ अ ] १३९.
अँड्रचूज ( रेव्ह. ) ७०, [ अ ] १०१.
अणे (लोकनायक डॉ.) माधव (राव) श्रीहरि ५, ११४, १३७ ते १४०, २७४, [ अ ] १९७,
अत्रि २८६ [ अ ] ४४, ८०, १०८, १२३.
अथर्ववेद ५१, ६२ ते ६४, ६६, ७६, ७७, ७९ ते ८२, १४३, १५०, १५१, १५८, १८३, २०७, २३७, २४१ ते २४५, २४९, २५८, [ अ ] ३७, ८०, ८२, १०८, १०९, १२१, १२९, १३२.
अथर्ववेदाचा स्वाध्याय २३५.
अथर्ववेदी १७८.
अंदमान ९३, १६० [ अ ] १००.
अदिति २१०
अनगोळ ८६, [ अ ] ४१.

अनंताचार्य १८८.
अनाथबालिकाश्रम ५०.
अफगाणिस्तान २६७.
अंबाबाई [ अ ] २०.
अंबाला [ अ ] १०२.
अभिनवभारत ८४, [ अ ] ३८.
अभेदानंद ( स्वामी ) [ अ ] ९७.
अभ्यंकर न. गो. २६९.
अमरगंगा १०५.
अमरनाथ १०४, १०५.
अमळनेर २५०.
अमृतकला २३२.
अमृतबझार [ अ ] १०६.
अमृतलता [ अ ] ८७.
अमृतसर ८९, १२६, २३४, [अ] ३०.
अमृते १७९.
अमेरिका ३३, ४७, ९३, ९७ ते ९९, १०५, १४९, १६०, १८४, १८६, २५९, [ अ ] ९७, ९९, १००, १०८, ११०, ११२, १२२, १२६, १२७, १८५.
अय्यंगार अनंत शयनम् [ अ ] ६७.
अय्यर ( डॉ. ) रामस्वामी २३६, [ अ ] १९६.
अरबस्थान [ अ ] १०८, १८४, १८५.
अरविंद ( बाबू ) घोष ५७, ६२ ९३, २३८, [ अ ] ३८, ९३, १०१, १०४, १४३.
अर्जुन ६, ७४, ८१, २७६.
अलाहाबाद २, ६२, ९५, ९६, २३८, [ अ ] ९६.
अलिगड [ अ ] ९६.
अलिबाग २६९.
अल्काट ( कर्नल ) [ अ ] १८५.
अश्विनीकुमार २६६, २६७.
अष्टपुत्रे ११७.
असहकार १३०, १५५, [ अ ] ४४,
असिरिया [ अ ] १०८.
असिरीस [ अ ] १०८.
अहमदनगर ८६.
अहमदाबाद १६६, १७१, १७७, १८१, २०१, २३१, २५०, २६२, २६३, २६८.
अळसुंदे [ अ ] ४६.
आकेरी [ अ ] ५.
आगरकर ( गो. ग. ) १३, १६, २२४, [ अ ] ४९, ५०, १०६, १०७, १८०, २००.
आगाशे चंद्रशेखरराव १२१.
आगासकर ४२, [ अ ] २७.
आग्रा ९०, [ अ ] ९६.
आजेली मायकेल [ अ ] ३२.
आझाद ( मौ. ) २००, २०३.
आटपाडी १११, ११४, १२०, १३४, १३८, १६१, [अ] ४६, १०३.
आठल्ये ( वेदमूर्ति ) १७९.
आठवले (प्रा.) १०१, २०१, २०२.
आडिवरे [ अ ] ९५.
आडेकर १९.
आणंद १६६.
आत्माराम सनातनी ९५.
आत्रे त्र्यं. ना. ११८.
आंध्र १९९.
आंध्रपत्रिका [ अ ] ९४.
आंध्रविज्ञानसर्वोत्तम [ अ ] ९४.
आनंद [ अ ] ३३.
आनंदाचार्लू [ अ ] १०६.
आनंदाश्रम १६८, १७९.

आपटे ( डॉ. ) २३६.
आपटे महादेव चिमणाजी [अ]१३३.
आपटे हरिभाऊ [ अ ] ३८.
आफ्रिका ९६, १०३, १०५, १८५, २३२. [अ] ९९, १०१, १८५.
आबालाल रहिमान [ अ ] २६, २७.
आमचा गाव [ बदलापूर ] ११८.
आयर्लंड १४१, १४२.
आयोसीस [ अ ] १०८.
आय्यंगार श्रीनिवास [ अ ] १२३.
आरण्यके १५५, [ अ ] १२१.
आर्कटिक् होम् इन् दि वेदाज २०१.
आर्ट् जर्नल् ४५, [ अ ] ३५.
आर्टस्कूल् ३५, ४१, ४४, ४५, ६०, २१८, [ अ ] १९, २३, २९.
आर्य ७५.
आर्यधर्म [ अ ] ७१.
आर्य वेणीभाई १६७.
आर्यसमाज २, ११, १३, ४९ ते ५३, ५९, ६०, ६२, ९१, ९३ ते ९७, १००, १०१, ११२, ११३, २३८, [अ] ५, ६, ३३, ३५, ४२, ९९, १०२, १०३, १०६, १२४, १८७.
आर्यावर्त [ अ ] १०६.
आर्षेयसंहिता १६८.
आल्काट् ( कर्नल ) ५२.
आल्मोडा [ अ ] ३४.
आवेस्ता १८४.
आशिया ५५, [ अ ] १०१.
ऑस्ट्रिया [ अ ] १०८.
ऑस्ट्रेलिया [ अ ] १८४.
आळसंद ३.
इंगळे भगवान १८८.
इंगळे रामभाऊ १२०, [ अ ] १०३.
इंग्रज २, ९, १०, ११, १३, ७२, ७३, ८५, ८८, १०३, ११३, ११६, १६१, १६२, १८३, १९९, [ अ ] ४१.
इंग्रजी ( राजवट ) ६, ६२, ८७, ९३, ११६, १३०, १६२, [ अ ] ४१ ते ४४, ४६.
इंग्लंड ११, १२, १४, ९५, १२२, १४१, १४२, १४९, १५९, १६०, १८३, २५९, [ अ ] ९६, १००, १२२.
इचलकरंजी १३८, १५८, २३२, २६९ [ अ ] २.
इचलकरंजीकर बाळकृष्णबुवा [ अ ] ९९.
इजिप्त [ अ ] ११५, १८४.
इटाली ५६, २३२, [ अ ] २५, ३५, ११५, १२७, १३९.
इंडियन् आर्ट् इन्स्टिटयूट् २३२.
इंडोचायना [ अ ] १०९.
इंदुप्रकाश १२, ८६, ९१, [ अ ] ७१, १०६.
इंदू ( दो )र १३८, [ अ ] ५६, ६०, १३२.
इनामदार पंडितराव २७०.
इराण [ अ ] १०८, १८४.
इलाहाबाद ( अलाहाबाद पहा )
इलियड [ अ ] १७४.
ईशावास्योपनिषद् [ अ ] १२९.
ईश्वरचंद्र विद्यासागर [ अ ] १०६.
ईस्ट इंडिया कंपनी [ अ ] १०५.
उगार १३८.
उत्तरप्रदेश १२६, [ अ ] २८.
उदवाडा ( संजाण ) १७३, १७७, १८०.

उद्धव र. वा. [ अ ] १९६.
उधनपूर १०६.
उपनिषदे ३६, ५०, ५१. ५९. ७४, १५३. १५४, १८३, २३९, [ अ ] ८, ९, १५, ६५, १०७, १२१.
उपाध्ये कृष्णराव १८.
उपाध्ये बाळकृष्णपंत १८.
उबरगाव २४९ २५०
उमाजी नाईक १०.
उमेशमिश्र [ अ ] १२२.
उवटाचार्य [ अ ] १२२
उषःकाल [ अ ] ७८.
उषाप्रकाशन २३१.
उह्यगान १५९.
ऊहगान १५९.
ऋग्वेद ८०, ९४. १५५. १५८, १८३, २४१ ते २४३. २४६. २५२, [ अ ] ६४, १०२, १०८, १०९, ११२, ११३, ११५, ११९ ते १२१, १२८, १२९, १३२, १३९, १७३.
ऋग्वेदसूक्ते ६५.
ऋग्वेदादिभाष्यभूमिका ४९, ६०.
ऋद्धिपूर [ अ ] १०२.
एकनाथ ७, [ अ ] ११४, १६३.
एकनाथी भागवत १५१.
एकलव्य २५०
एकोणीससे २, ४४, ४६, [ अ ] २९, ७१ ११३.
एकोणीससे अकरा १०२, [ अ ] ९६. ९७, ९९, १०१.
एकोणीससे अठरा २, १०, ५०, ९६, १११, ११२, १५०, १६६, २२६, २३१, २३९, [ अ ] २८ ते ३०, ४३, ४४, ५६ ६१, ८५, ९४, ९५, १००, १०१, २०६.
एकोणीससे अठ्ठावीस १२०, १२१, [ अ ] ९४, १००, १०२.
एकोणीससे अठ्ठेचाळीस ३, १११, १५९, १६२ ते १६४, १६६, १६७, १७५, [ अ ] ७, ३४, ४६, ५०, २०७.
एकोणीससे अडतीस १२०, १२२, १२३, १५६, [ अ ] १० .
एकोणीससे आठ २, ७२, ७३, ८४, ९६, [ अ ] ९९, १०१
एकोणीससे एक ४६, ५०, ५३, ५९, २३८, [ अ ] ५५, ९५, ११९.
एकोणीससे एकतीस १ ९, १३६, १५६, [ अ ] ९४, ९९.
एकोणीससे एकवीस ११७, ११८. १२१. [ अ ] ४४, ९४, ९५ १०२.
एकोणीससे एकसष्ठ २९, ३०, २३४.
एकोणीससे एकूणचाळीस २. ११५, ११८. १२१ ते १२३. १२८, १५६, १५९, १६१ ते १६३, [ अ ] ४६.
एकोणीससे एकूणतीस ११९, १२३, [ अ ] ९६, ९७.
एकोणीससे एकूणपन्नास २३२, [ अ ] ९७, १०१.
एकोणीससे एकूणसाठ ३, २३४.
एकोणीससे एकेचाळीस १५९, १६०, [ अ ] २८, ३९, १३३.
एकोणीससे एकोणीस २, १५५, १५८, १५९, [ अ ] ४४, ९४, ९५, १००, १०१.

एकोणीसशे एक्कावन १८७.
एकोणीसशे एक्क्याऐंशी २९.
एकोणीसशे चव्वेचाळीस १६२, १६३, [ अ ] २६, १०२.
एकोणीसशे चार ५५, [ अ ] ९४,९९
एकोणीसशे चाळीस १२३, १२९, १५९ ते १६१, २३२ [ अ ] १०१.
एकोणीसशे चोपन्न ३, २०, २१, १६७, १७९, १८०, १८९, २३२, २३५.
एकोणीसशे चोवीस २,६, १२३, १५५, [ अ ] ६८, ९४, ९७.
एकोणीसशे चौतीस १२०,१५६, [अ] २८, ९७, १००.
एकोणीसशे चौदा १०२, १०५, ११२, १७४, [ अ ] ४३, ९३, ९५, १००, १०६.
एकोणीसशे छत्तीस १२६, १६४, [अ] ९७, ९९, २०६.
एकोणीसशे तीस २, ११३, ११९, १३०, १३१, १३४, १५६, [ अ ] ४५, ९३, ९४, ९७, १०१, २०६.
एकोणीसशे तेरा ९६, १७४, २३१ [ अ ] ९३, १०१.
एकोणीसशे तेवीस १२३, [ अ ] ५६, ९६, ९७, १००.
एकोणीसशे तेहत्तीस १२०, [ अ ] ९७, १००.
एकोणीसशे त्रेचाळीस ३, ११४, १३६, १३७, १५९, १६१, [ अ ] ४५, १०१, २०६.
एकोणीसशे त्रेपन २४, १७६, १७८, १८६.
एकोणीसशे दहा २, [ अ ] ९६, १००.
एकोणीसशे दोन २०, ५०, ९५, [ अ ] ९७.
एकोणीसशे नऊ २, ५३, ८४, ९२ [ अ ] ४२, ९६, २०५.
एकोणीसशे पंचवीस १२९, १५०, २३५ [ अ ] ५५, ५७, ९३, ९६, १०१.
एकोणीसशे पंचावन ३, ५३, [ अ ] ६०, १३७.
एकोणीसशे पंचेचाळीस ३, १२४, १६२,२३२, [ अ ] ४६, ९६.
एकोणीसशे पंधरा १०२,११३, २३२, [ अ ] ९३, ९९, १००.
एकोणीसशे पन्नास १७६, २३४.
एकोणीसशे पसतीस १२०, १५६, १५९, २३१, २३२, [ अ ] ४५, ९३, ९५, ९६, ९९, १०२.
एकोणीसशे पाच २, ५५, ८४, ९५, [ अ ] ३९, ९४, १००.
एकोणीशे पासष्ठ [ अ ] १३, ३१.
एकोणीसशे बत्तीस १२३, १२९, १५६, २३१, २३२ [अ] ९६,
एकोणीसशे बारा ९७, १०२, [ अ ] २८, १००.
एकोणीसशे बावीस २, ११८, १२१, १३४, २४०,[अ]९५, २०६.
एकोणीसशे बेचाळीस ११६, १२४, १३६, १५९, १६०,१६२, [अ] ४६, ९३.
एकोणीसशे वीस २, ११३, ११७, १३०, १३४, १६८, [ अ ] ४५, ५६, ९३, १००, २०६.

एकोणीसशे त्रेहेचाळीस १६१, १६२, २३१.
एकोणीसशे सतरा २, ९९, [ अ ] ९३ ते ९५.
एकोणीसशे सत्तावन १९९, २०१, २३५, [ अ ] १३७, १७९.
एकोणीसशे सत्तावीस २, १२३, १५६, [ अ ] ६०, १००.
एकोणीसशे सत्तेचाळीस १६३, १७५, २३२, [ अ ] ४३, ४६, ९९, १०२.
एकोणीसशे सत्त्याऐंशी २९.
एकोणीसशे सदतीस २०, २१, ११९, १२०, १२३, २३२, [ अ ] ९७, १३३.
एकोणीसशे सदुसष्ठ ४०, २६७, २६८, २७४, [ अ ] ६४.
एकोणीसशे सव्वीस ११९, १२३, [अ] ९४, ९५, १००, १०२.
एकोणीसशे सहा ५५, ८४, २३७, [ अ ] १०० ते १०२.
एकोणीसशे सहासष्ठ ३, १४, २१, ४५, २१८, २३१, २४७, २५०, २५१, २६२, २७१, [ अ ] २३, २९, ३५, ६४.
एकोणीसशे साठ २३४.
एकोणीसशे सात २, ५०, ५५, ८४, ९५, ९६, [ अ ] ४१, ७१, ९४, १३९, १८४, २०४.
एकोणीसशे सोळा १०२, ११३, [अ] ९३, १००.
एकोल फ्रान्सिस देक्स्त्रीम ओरिआन्त [ अ ] ९९.
एडवर्ड ( आठवा ) ९६.
ऐतरेय उपनिषद् २४२, २४४, [ अ ] १३९.
ऐतरेय ब्राह्मण ९७, [ अ ] ५८.
ऐय्यर नारायणस्वामी ५९.
ओक विनायक कोंडदेव [ अ ] ९५.
ओम् [ अ ] १९६.
ओंकारमांधाता १५२.
ओगले १२०.
ओटावा परिषद् [ अ ] ९६.
ओडवायर २, ९९, १०३, २३९.
ओडिसी [ अ ] १७४.
ओलियरी ( डॉ. ) डी. ए. सी. [अ] १८५.
ओल्ड्–लँग–साईन् [ अ ] ११३.
ओ हेन्री [ अ ] ३२.
औद्योगिक शाळा ३५.
औंध १, २, ३, ४३, ४४, ९२, १०१, १११, ११२, ११४ ते १२४, १२६, १२७, १३०, १३६, १३८, १४१, १४८, १५०, १५१, १५६ ते १५८, १६१ ते १६४, १६६ ते १६९, १७५, १७७, १७९, १८१, १८९, २२२, २२३, २२६, २२८, २३१, २३२, २३९, २६७, २७० ते २७२, [ अ ] २, ५, ६, ७, १, १९, २०, २३, २५, ३०, ३१, ४४ ते ४८, ५०, ५५, ५७, ६०, ६१, ६६, ७४, १०३, १४६, २०२, २०६, २०७.
औंधकर ( राजेसाहेब, श्रीमंत )
औंधचे ( अधिपति राजेसाहेब ) ४३, ४४, ११४, ११५,

१६१ ते १६४. २२७, [ अ ] ३० ते ३२, ५६, ५७.
औंध बँक १२८.
औंध बाँबकेस ९२, ११२.
औंध म्युझिअम १२७.
औरंगझेब १३.
औरंगाबाद ४७.
कठाळकर रामचंद्र ६५, ७४.
कणवूर गोविंदराव १३७.
कण्व [ अ ] ५५.
कनकदास [ अ ] १६३.
कनखल ७२.
कन्याकुमारी १५९, १६८, २२१, २३९, [ अ ] ३९.
कन्यागुरुकुल १८८.
कपूर पृथ्वीराज २३६.
कबीर [ अ ] १६३.
कंबोडिया [ अ ] ९९.
करंदीकर ज. स. [ अ ] १७२.
करवीर ८५.
करवीरपीठ २३७.
कराची ९५.
कर्झन ( लॉर्ड ) ५३, ९२, [ अ ] ९७.
कर्ण ९, ६६.
कर्दळीवन ११०.
कर्नाटक १२६.
कर्नूल ४८.
कर्वे ( महर्षि ) अण्णा [ अ ] १०१.
कऱ्हाड ११८, १३१, [ अ ] ५५.
कऱ्हाडकर [ म. म. ] १३२.
कलकत्ता ८४, ८७, ९६, १५९, १६८, [ अ ] ४३, ९३, ९४, ९७, १००, १०१, १०५.
कलेश्वर ( कलोबा ) १७, १८.
कल्याण ९०.
कवठे १३८.
कवीश्वर ( पं. ) २३७.
कश्यप [ अ ] १२२.
कसील [ अ ] १०२.
कस्तुरबा २१८.
कस्तुरीमृग १०९.
कांगडी २, ६८, ७१, ७२, ८९, ९३, ९६, २२६, २३१, २३४, २३८, [ अ ] ११ ४१, ४२, ४९, १०१, २०५.
कांगोटन [ अ ] १०९.
कांग्रा १०९.
काँग्रेस १५, ५७, ६२, ६८ ८४, ११३, ११४, १३१ ते १३३, १५६, १५९, [ अ ] ३७, ४४, ४६, ९३, १००.
कांचनगंगा ११०.
कांची १८८.
काजरकोंड १९.
काझी अहमदखान ३७.
काठेवाड ४२, १२६.
काणे ( म. म. ) पांडुरंग वामन [ अ ] १०२.
कात्यायन ७४.
काथवटे आबाजी विष्णु [ अ ] १३९.
कानुनगो नित्यानंद २५२, २६६.
कान्हेरे अनंत ५३.
कामा ( मॅ. ) ८४.
कार्ला २६९.
कालिदास [ अ ] ९१.
कालेलकर काका [ अ ] १९७.
काशी ८४, १८६, २६९, [ अ ] ३९, ९३, ९६.
काशीकर के. र. [ अ ] ७३.

काशीकर ( डॉ. ) चिं. ग. २३६.
काशीराज २१०.
काश्मीर ९६, ९७, १०२, १०५, १०९, ११०, १८३, २२१, २३२.
काश्मीर–सरकार १०५.
काळ [ अ ] ३८, ४१.
काळे दि. वि. ७३.
किंकेड ८६, ९२, [ अ ] ४२.
किंजवडकरशास्त्री [ अ ] ११६.
कित्तूर नारायणराव २२९.
किन्हई १११.
किर्लोस्कर ( डॉ. ) गंगाधरराव [ अ ] ५०.
किर्लोस्कर सौ. यमुताई २६९, २७०.
किर्लोस्कर लक्ष्मणराव [का.] ३९,४७, ११९, १२०, [ अ ] १९, २०.
किर्लोस्कर शंकरराव [ अ ] २५, ३०, ३४, १८८.
किर्लोस्कर शंतनुराव २६८ ते २७१.
किर्लोस्करवाडी १३८, [अ] ३०, ३४.
किश्चलू ( डॉ. ) ९६, ९९, ११२.
किस्तवाड १०५, १०६.
कीचकवध १२.
कुंटे महादेव मोरेश्वर [ अ ] १३३.
कुणकेरी १७, [ अ ] ४, ५४.
कुतुबमिनार २६८.
कुतुबशाही ४८.
कुंदगोळ १३८.
कुंभार रत्नाप्पा १२२.
कुराण १६७, १८४, २६३, २७५.
कुरुंदवाड ८६, ८७, १२३, १३८, १५८, १६३, १७९, २६९, [ अ ] ४१, ५५.
२८ अ ( पं. सातवळेकर )
कुरेशी ( डॉ ) [ अ ] ३५.
कुर्ट एसनेर [ अ ] ९४.
कुलकर्णी हणमंतराव ८४.
कुलश्रेष्ठ महेन्द्र २३६. [ अ ] १९८.
कुलूकभट्ट [ अ ] १७७.
कुवलयानंद ( स्वामी ) १३.
कूपवाड १२२.
कृष्णजी १०१.
कृष्णतीर्थ भारती [ अ ] ११२.
कृष्णलाल मोहनलाल [ अ ] ९४.
केतकर ( चित्रकार ) २३२.
केतकर (डॉ.) श्री. व्यं. [ अ ] १३३.
केदारेश्वर [ अ ] ३९.
के. नटराजन् [ अ ] ७६.
के. नागेश्वरराव [ अ ] ९४.
केनेडी [ अ ] ९४.
केंब्रिज [ अ ] १००, १०१.
केशवराव ( वकील, न्या. ) कोरटकर ४९,५३ ते ५५, ५७, ५९, ६७, २३८, [अ] ५, ३९, १०३.
केशवसुत [ अ ] १७९.
केसकर ( डॉ. ) १८१.
केसरी १, १६, ५४, ६१, ७३, १०१, १७८, २७४, [ अ ] ३७, ४१. ९५.
केसरीप्रबोध १६.
केळकर चिंतामणशास्त्री १, ३५. ३७, [ अ ] २०३.
केळकर न. चिं. १२१.
केळकर श्री. के. २५, ३१.
कैलास १०४, १०७, १०८.
कैसरीकंदन १०२, १०३, [अ] ४३, ९५, १००, १०६.

कोंकण १२, ३७, १११, २२५, [अ]१,
कोकोनाडा २, ८७, १६०, [अ]२०५.
कोठावळे काशीनाथ १८८.
कोलगाव १, ६, ८, ९, १५, १६, १९, २१, २३, ३५, ४०, ४१, २१८, २२५, [ अ ] २, ४, ५२, ५४, २०२.
कोल्हटकर अच्युतराव [ अ ] ५६, १०१, ११६.
कोल्हापूर २, ५, १०, ३०, ४१, ६२, ७२, ७३, ८४, ८५, ९० ते ९२, ९५, १०१, ११२, १२१, ते १२३, १३८, १५९, १६२, १६३, १८८, २३८, २३९, [ अ ] २६, ४१, ४२, ५५, ९३, १००, १०१, २०५.
कौजलगी हणमंतराव १४७.
कौशीतकी सूत्र ६३.
कौसल्यायन आनंद [ अ ] १९५.
क्रांडिगल गुहा ४७.
क्रिप्स १६०.
क्लाइव्ह ( लॉर्ड ) १३.
क्लोद मोने [ अ ] २२.
क्वाटुंग [ अ ] ९६.
क्वेट्टा १२६.
खटाव १११.
खाडीलकर कृष्णाजीपंत ५४.
खानापूर १११.
खापर्डे दादासाहेब ५७.
खेडेगावच्या यात्रा ११८.
खेर (ना.) बाळासाहेब ११५, १८१. १८७.
गजानन मिल् [ अ ] २.
गजेंद्रगडकर वसंतराव २५०.
गज्जर बी. सी. २६३.
गणपत्युत्सव ६२.
गणेशपुराण २१०.
गणेशाथर्वशीर्ष [ अ ] ८३.
गदर २, ९३, १२८, १६१, [ अ ] ४२, ९९, १००.
गाडगीळ काकासाहेब [ अ ] १९८.
गाडगीळ वसंत २६८.
गाणगापूर [ अ ] ३७.
गांधर्व महाविद्यालय १०१, [अ] ९९.
गांधी–अर्विनकरार १५६.
गांधी इंदिरा २७०.
गांधी ( म. ) मो. क. २, ३, ९६, १०३, ११२ ते ११६, ११८, १२३, १२७, १३० ते १३४, १६०, १६३, १६४, १७९, २००, २०३, २१८, २३४, २६६. [ अ ] ४४, ४६, ५६, ८७, ९४, १०१, १०४, १०६, १२३, १३७, १६६, १७७, १९६, २०७.
गायकवाड (सरकार श्रीमंत सयाजीराव बडोदेकर ) ४९, ६०, ७३, ९१, २३९, [ अ ] ४१.
गायत्री महायज्ञ ३, २१७.
गावगाडा ११८.
गिरधर ११०.
गीता ( भगवद्गीता ) ६, ७, ४६, ५४, ५९, ७४, ८१, १०३, १५१, १५३ ते १५५, १६८, २३८, २५३, २६४, २७१, २७६, २७७, [ अ, ] ६, ९,

१५, १६, ८४, ८६, १०७, १४६.
गीताखंड [ अ ] ८३.
गीताधर्ममंडळ २३४.
गीतारहस्य [ अ ] १०६.
गुजरात ( थ ) १८९, १२९, १७१, १९९, २४८, २५०, २५१, २५४, २६२, [ अ ] ४७, ५०, ६७.
गुजराथ विद्यापीठ २४७, २४८, २६३.
गुजराथ समाचार २६३.
गुजरांवाला ८९.
गुणदाळ ११४, १३८.
गुत्तीकर बाजीराव [ अ ] १९, २०.
गुप्ते ११५.
गुरुकुल २, ५७, ६८ ते ७२, ८७ ते ९०, ९३, ९६, ९८, ११२, ११३, २२०, २२६, २३१, २३४, २३८, [ अ ] ११, १२, ४२, ४९, १०१.
गुरु गोविंदसिंग [ अ ] १११, ११४.
गुरुमुखसिंग ( बाबा ) [ अ ] ९९.
गुर्जरप्रदेश १६५.
गुलमर्ग १०४, १०५.
गुलामगिरी ७.
गुळवणी ( योगीराज ) वामनराव २६९, [ अ ] १३.
गोखले ( ना. ) गो. कृ. १५, ६२, ८४, ९६, [ अ ] ४, ३७, ३९, ९३, ९७, १००, १०२, १०३, १०६, १४५, १५१, १५४ ते १६४, १७१, १७३, १७५.

*

गोखले पु. पां. ( बाबूराव ) २७०.
गोडसे नथुराम १६३.
गोंधळेकर रामजी शिवराम ४३.
गोपीराज हरिराज [ अ ] १०२.
गोमेध १५५.
गोरखपूर [ अ ] २८.
गोरक्षण ५०.
गोलमेजपरिषद् १५६.
गोवर्धन २३४, [ अ ] ३३.
गोविंद ( शाहीर ) १.
गोसईस्थान ११०.
गोसावी नारायण [ अ ] ३२, ४२.
गोज्ञानकोश १५५.
गोळवलकर ( गुरुजी ) माधवराव २३५, २५१ ते २५४, २६१, २६४.
गौरीशंकर ११०.
ग्रहनक्षत्र फलादेश संशोधनमंडळ २५.
ग्रामसंरक्षकदल २, ११५.
ग्रिअर्सन् ( सर ) जॉर्ज अब्राहाम [ अ ] १३३.
ग्रिफिथ्स ( प्रि. ) जॉन् ३९, ४१, ४५, [ अ ] ३१.
ग्रीनवुड ४१, ४५, [ अ ] २.
ग्रीस [ अ ] १०८, ११५, १७४ १८४.
ग्लासगो [ अ ] १०८.
ग्वानर [ अ ] १८४.
ग्वाल्हेर ९६, १३८, [ अ ] २.
घाटे नरसिंहशास्त्री [ अ ] ५४.
घोड्यावरील बाजीराव ९५.
घोरपडे बाबासाहेब १५८.
चक्रवर्ती राजगोपाळाचारी २००, २०१, २०३, २३६.

चटो (ट्टो) पाध्याय (डॉ. अघोरनाथ) ५४, ५५, २३८. [अ] ५, ३९, ४०, १०१, १०३.
चतुर्भुजदास चिमणलाल २६२.
चंद्रगुप्त ९, [अ] १०५.
चंपारण्य १०३.
चंबा १०४, १०८, [अ] ९९.
चमनलाल [अ] १८५.
चलेजाव ३, १६०, १६१, १६५, [अ] ४६.
चलो-दिल्ली १६०, १६१, १६५, [अ] ४६.
चव्हाण (ना.) य. व. १८१, २५२, २७०, [अ] १९८.
चांदोद (ड) २००, २०१.
चापेकर (ना. गो.) नानासाहेब ११५, ११८ [अ] १९७.
चाफेकरबन्धु ५४, [अ] ३८, ३९.
चाफेकर बाळकृष्ण ५४, [अ] ३९, १०३.
चार्लस विल्किन्स् [अ] १३९.
चितारी दत्तोपंत [अ] २०, ३२.
चित्रशाळा ४१, ४५.
चित्राव सिद्धेश्वरशास्त्री २३५, २७०. [अ] ५६, १०२, १९७.
चिपळूणकर विष्णुशास्त्री ११ ते १३, ३६, ६१, [अ] ४९, ५०, ७३.
चिप्स् फ्रॉम् ए जर्मन वर्क् शॉप् [अ] ११३.
चिमणाजी अप्पा १७४.
चिरोल (सर) व्हॅलेंटाईन ९५.
चीन १६०, २०६, २५९, २६८, [अ] ९६, १०९.
चेझी ए. एल् [अ] १३९.
चेंदवणकर सदानंद २५३.
चेरिअन (डॉ.) पी. वी. २५२.
चौदाशे अठ्याण्णव ९.
चौदाशे एकूणसाठ १७१.
चौधरी (पं.) राजभुजदत्त ८९, १०१.
च्यवन २६६, [अ] ५५.
छगनलालजी भट्ट २००, २०१.
छत्रे वि. के. [अ] १९३, १९८
छोटी काँग्रेस ६२.
छोटी माई १०८.
छोडो हिंद १६०.
छत्रपति शाहूमहाराज ७३, ८४, ९१, १२२, [अ] ४२.
छत्रपति शिवाजी २, ५, ६२, १२१, १२७, १३२, १५६, १६२, १७४, [अ] १११, १२२, १२७, १२९, १७५, १७६.
छांदोग्य १२१.
जॅक्सनखून खटला ५३, ९२.
जगन्नाथ [अ] ३९.
जंजिरा १२३, १६३.
जत १३८, १६३.
जतींद्रनाथ १३१.
जनमेजय [अ] १९४.
जन्मकुंडली २५.
जन्मशताब्दि २.
जन्मोत्सव (त्रिशतसांवत्सरिक शिव) २.
जपान ५४, ८४, १४९, १६०, २३४, २५९, २७२, [अ] ३९, १०९, १८४.

जमखं ( खि ) डी ११४, १३७, १३८, १४०, १४१, १४८, १५९, १६१ ते १६३, [ अ ] ८५.
जमदग्नि २१३.
जमना १७०.
जमीदार निरंजन छ. [ अ ] १९५.
जम्मू १०५, १०९, ११०, १२६.
जयकर ( बॅ. डॉ. ) १६१, २३६.
जयपूर ५७ ते ५९, ९३, ९५, ९६, २२०, [ अ ] २३, २५.
जय सातारा १६२.
जयसिंगपूर १२२.
जयसिंह वर्मा १७१.
जर्मनी ५६, १४९, १५९, १६०, १६८, १८३, २३२, २५९, २६१, २६२, [ अ ] ४३, ११२, १२२, १५५.
जाधव भास्करराव ४८.
जाधव माधवराव ८४.
जॉन् स्मॉल् मेमोरिअल् हॉल् १६५.
जांभेकर बाळकृष्णपंत बाबा ३९, ४०, ४७.
जॉर्ज (पंचम) बादशहा १०३, [ अ ] ४३.
जालंधर ६८.
जालियनवाला बाग १५५, [ अ ] ४४, ९४.
जावडेकर अनंत गणेश २५४.
जावडेकर ( आचार्य ) शं. द. [ अ ] १०७.
जावा २८६ [ अ ] ९९.
जिना ( बॅ. ) १०२, १०३.
जिनीवा २३४, २७२.
जे. जे. स्कूल ऑफ् आर्टस् [ आर्ट्स्कूल पहा ]
जेसलमीर [ अ ] ९७.
जैमिनी [ अ ] ११२.
जोग चि. वि. ( अप्पासाहेब ) २६९, २७०.
जोधपूर [ अ ] २३, ९५, ९७.
जोन ऑफ् आर्क ८९.
जोन्स विल्यम् [ अ ] ५४.
जोशी आनंदीबाई [ अ ] ११३.
जोशी उमाशंकर २६३.
जोशी गणेश कृष्ण [ अ ] ९५.
जोशी गो. वा. १३१.
जोशी ( तर्कतीर्थ ) लक्ष्मणशास्त्री [ अ ] १३७.
जोशी नीलांबर [ अ ] ३४.
जोशीराव विनायक नारायण ८६, ९२, २३८.
जोशी वामन मल्हार ८६, ९२, १२२, २३८, [ अ ] १०१, २०५.
जोशी विठ्ठलराव १३१, १३८.
जोशी सन्तभटजी [ अ ] ३२.
जोशी ह. मो. १२३.
जोहान्नी बस्तीयानीनी (प्रो.) २३२.
जोहान्सबर्ग १८५, १८६.
ज्याकोलिएट् लुइस [ अ ] ११४.
ज्वालापूर २४०, [ अ ] २०१.
ज्वालामय [ अ ] १०८.
झांजीबार १८५.
झेंद अवेस्ता १६७ [ अ ] ११३.
टागोर अवनींद्रनाथ [ अ ] २७.
टागोर ( डॉ. ) रवींद्रनाथ १८५, [ अ ] ११३.

टॉड ( कर्नल ) [ अ ] १८५.
टिकेकर श्री. रा. २५१, [ अ ] १९७.
टिळक ( लोकमान्य ) १, १३, १५, ५२, ५४, ५५, ५७, ६२, ६८, ८४, ९३, १०१ ते १०३, ११२, १३१, १३३, २०१, २२४, २३८, २७४, [ अ ] ५, ३७, ३८, ४०, ४१, ५६, ९३, १०२ ते १०४, १०६, १०७, ११२, १२७, १३७, १३९, १६०, १६५, १७७, १८१.
टिळक-महाराष्ट्र विद्यापीठ २७४,
टेन्स [ अ ] १०८.
टेंभे (स्वामी) वासुदेवानंद सरस्वती ४०, २१९, [ अ ] १४, १०१.
ठगी १४.
ठाकूरसिंह [ अ ] २५.
डच ९.
डहाणू २४९, २५१.
डिलामोटी १०.
डी. वेल्ट २६२.
डेलब्लिव्ह जॉन् [ अ ] २७.
डेव्हिड [ अ ] ११०.
डोंबिवली [ अ ] ११६.
तख्तसुलेमान १०५.
तळेगाव ९३, १६६, [ अ ] ९९.
ताजमहाल २६८.
तात्यासाहेब महाराज [ अ ] २०.
तासकर [ अ ] २.
तिकोटा १३८.
तिबेट १०७, ११०, २८०, [ अ ] ९७, १०९.
तुकाराम [ अ ] ११४, १३८, १६३.
तुंगभद्रा ४७.
तुर्कस्तान [ अ ] १०९.
तुळजापूरकर द. अ. ( वकील ) ५२, ५४, ५५, [ अ ] ५, ३९, १०३, ११६.
तुळशीरामस्वामी ( पं. ) [ अ ] ५५, १६३, १६६.
तेरदाळ १३८.
तेलंग १७९.
तोरगळ १३८.
त्रावणकोर [ अ ] २२.
त्रिदाद [ अ ] २७.
त्रिनिदादे ४२.
त्रिवेदी दुर्गाशंकर [ अ ] १९७.
त्रिवेदी ( प्रि. ) एच्. के. २६७.
त्रिशूळ ११०.
थत्ते २६८.
थिऑसफिकल् सोसायटी २.
थिऑसफी ५०, ५२, ५३, ५९, २३८, [ अ ] ४, ९३, ९८.
थोरली माई १०९.
दक्खन ११.
दण्डधारी ९३.
दत्तदिगंबर यात्रा कं. २६७.
दत्त रमेशचंद्र [ अ ] १८४.
दफ्तरदार परशुराम सखाराम [ अ ] ३२.
दफ्तरी के. ल. १३७.
दयानंद-कॉलेज ९६.
दयानंद सरस्वती ( महर्षि, स्वामी ) ४९, ५२, ५९, ६८, ७२, ८८, ९५, ९७, १०१, २३५, २३८, [ अ ] ३५, १०४, १०६, ११३, १२२, १९७.

दर्शने १२०, [ अ ] १०३.
दक्षिण महाराष्ट्रातील विलीनीकरणाची कथा ११९.
दांडीमोर्चा १३१.
दांडेकर रं. द. [ अ ] १३७.
दातार बी. एम्. १४७.
दादाभाई नौरोजी ६२, ८४, १३१, [ अ ] ३८, ९४.
दाभोळ १११.
दार्जिलिंग [ अ ] ९७.
दासबोध [ अ ] ११४.
दिलीप [ अ ] ९१.
दिल्ली ५१, ९३, १०१ ते १०३, ११०, १२६, १२७, १५९, १६३, १६६, २३०, २६८, [ अ ] ३३, ३४, ४३, ६७, ९३, ९४, ९७, १००, १०१.
दिल्लीदरबार १०२.
दीक्षित बापू ( बापट धुं. ग. ) १५०, १५१, [ अ ] ५५ ते ५८, ६०, ११६.
दीक्षित शंकर बाळकृष्ण [ अ ] १५.
दीक्षितार ( पं. ) २३६.
दुधियाकरण ९६.
दुनीचंद ( लाला ) [ अ ] १०२.
देऊसकर रामकृष्ण वामन ४७, [ अ ] ३५.
देवधर ( शास्त्री ) द. र. २००, २०१, [ अ ] ७३.
देवधर विष्णुशास्त्री ११६.
देवरहवाबाबा २३४.
देवरिया २३४.
देवल ९२.
देव शंकरराव १२३, १६२.
देवासकर वा. वि. [ अ ] १९३.
देशपांडे द. ए. २४८, २५०, २५३.
देशमुख केशवराव २५०.
देशमुख गोपाळराव हरि ( लोकहितवादी ) १२.
देशमुख (डॉ.) चिंतामणराव २३६, २७०.
देशमुख पंजाबराव २३६.
देसाई गुलाबभाई १८४.
देसाई दिनकर के. १८८.
देसाई ( ना. ) दिनकरभाई १६७, १८०, १८४.
देसाई मोरारजी १८१, २३६, २७०.
देसाई रणछोडजी १८१.
देसाई सरलाकुमारी १८८.
देसाई सुशीलचंद्रजी १८५.
देसाई ( ना. ) हितेंद्र २५२, [ अ ] १८८, १९५.
दैवतसंहिता १६८, [ अ ] ८३.
द्विमुख [ अ ] १०८.
धनुष्कोटि २११.
धरमसी (काचवाले) हरगोविंददास १६७.
धर्मदेव [ अ ] १९४.
धर्मपूर ( संस्थान ) १७१.
धर्ममणि बालस्वामी [ अ ] ११६.
धवलगिरी ११०.
धारवाड २६९.
धाराश्रम १७१.
धुरंधर ( रा. ब. ) महादेव विश्वनाथ ४२, [ अ ] २६, २७, ३१.
धुळे [ अ ] ५६.
धौति ४६.
नंगापर्वत ११०.

नंदकोट ११०.
नंदनाचार्य [ अ ] १७७.
नंदादेवी ११०.
नरवणे ( डॉ. ) १८१.
नरसोबा ( ची ) वाडी १, ८, २१, २३, ३३, ३६, ४१, [ अ ] ३७, ५६, १०१.
नर्मदा १५३.
नवमांशकुंडली २६.
नवयुग (मासिक) १०८, [ अ ] ७१.
नवसारी २४७.
नाईक वामनराव ५३, ५७, ६०, [ अ ] ५५.
नागनगौडा ( डॉ. ) १२३.
नागपूर १२९, १६६, २००, २३६.
नागाव २६९.
नानक ( गुरु ) ९६.
नाना शंकरशेठ ४, १५.
नामवर्मा १७१.
नायक लालभाई २४७, २४८.
नायडू सरोजिनीदेवी ५४, २३८, [ अ ] ३९, १०१.
नारळीकर ( डॉ. ) २६९.
नॉर्दर्न सरकार ८७.
नाशिक ५६, ८४, ९२, १६६, १७१, १७२, २३५, २६९, [अ] ३८.
निगुडकर दत्तात्रय वासुदेवशास्त्री [ अ ] १३२, १३३.
निजाम २, ४७ ते ४९, ५३, ५५, ५६, २३८, [ अ ] ४१.
निबंधमाला ११, १८८, [ अ ] ४९, ७३.
निंबाळकर ( ना. ) १८१.
निरुक्त ७२, [अ] १०२, ११०, १२२.
निर्णयसागर ११२.
निर्भय [ अ ] १९३.
निर्याणधाम १७३.
निवेदिता ( भगिनी ) [ अ ] ९७.
निष्कलंकी नारायणराव १७८.
नृसिंहवाडी ( नरसोबावाडी पहा )
नेने दिगंबरशास्त्री [ अ ] ५६.
नेपाळ ८४, ११०, १५९, १६८.
नेहरू ( पं. ) जवाहरलाल ११३, ११८, १५६, १६२, २००, २०१.
नेहरू ( पं. ) मोतीलाल ११३.
नेहरूरिपोर्ट १५६.
नोबल् एस्. आर्. [ अ ] ९७.
न्यू इंग्लिशस्कूल १३१.
न्यूयॉर्क १४, [ अ ] ९६, ९७.
पंचचुल्ही ११०.
पंचोली वासुदेव रमणिकलाल २६९.
पंजाब २, ४९, ६९, ८९, ९२, ९३, ९५ ते १०४, १०९, १११ ते ११३, ११९, १२६, १५१, १६१, १६६, १६८, २२०, २३९, [अ] ३, ५, ६, ३३, ४२ ते ४४, ५०, ९९, १०० ते १०२, १०५, १०६, १०५, २०६.
पटवर्धन अ. वि. ( वामनराव ) १२०, १२१, १३६, [अ] १०३.
पटवर्धन ( पागे ) तात्या ४३, ४४.
पटवर्धन य. कृ. [ अ ] १९९.
पटवर्धन विनायक रामचंद्र [ अ ] ५६, १०२, ११६.
पटवर्धन विश्वनाथ अनंत (बाबासाहेब) ८४, १४८.

पटेल डाह्याभाई २५२.
पटेल वल्लभभाई १२७, १३१, १६०, [ अ ] ८७.
पटेल विठ्ठलभाई १५६.
पट्टाभिसीतारामय्या ( डॉ. ) ५५, १२२, २३६.
पंडितजी ( श्री. दा. सातवळेकर ) १ ते ३, ५, ९, ११, १२, १४ ते १९, २१, २३ ते २५, २८, ३१ ते ६२, ६८ ते ७३, ८५ ते ८८, ९० ते १०८, १११ ते १२०, १२२ ते १२४, १२६ ते १२८, १३०, १३१, १३५ ते १३९, १४७ ते १६१, १६४ ते १६७, १७५, १७६, १७८, १७९, १८१, १८२, १८५ ते १८९, १९९ ते २०८, २१७ ते २३८, २४६ ते २५६, २५७, २५८, २६१ ते २७५.
[ अ ] १ ते १६, १८ ते २५, २८ ते ४७, ४९ ते ५७, ६० ते ६७, ७३ ते ७५, ७७ ते ८९, ९१ ते ९४, ९८ ते १०४, १०८ ते ११५, १२१ ते १२४, १२७, १२८, १३२ ते १३४, १३७, १४२ ते १४४, १४६, १५३, १५५ ते १५७, १५९, १६१ ते १६५, १६८, १७२, १७५ ते १८०, १८२, १८८ ते २०७.
पंडितराव ( न्यायाधीश ) ९१, ९२, [ अ ] ४२.
पंडित विष्णु ( शास्त्री ) परशुराम १२, २०२.
२९ अ ( पं. सातवळेकर )
पंडित शंकर पांडुरंग [ अ ] १३२, १३९.
पंढरपूर ६, १११, २५३.
पंत ( बॅ. ) अप्पासाहेब २, ११५, ११८ ते १२०, १६१, १८१. [ अ ] ४५, १९८.
पंत ( प्रतिनिधि ) तात्यासाहेब ४४.
पंत ( प्रतिनिधि ) बाळासाहेब भवानराव श्रीनिवास ) १, ४३, ४४, ५५, ५६, १०१, ११२, ११७, ११८, १२७, १२८, १६४, [ अ ] १९, २०, ४४, ४५, १९८, २०२.
पतंजलि १३४ [ अ ] १४, १५.
पतियाळा ९६, ९७, १२६.
पंधराशे अकरा १७१.
पंधराशे अठ्ठावन १७१.
पंधराशे अडुसष्ठ १७१.
पंधराशे एकूण नव्वद ४८.
पन्हाळा १११.
परचुरेशास्त्री ११८.
परमानंद ( भाई ) ९५, ९८, [ अ ] ९९.
परशुराम त्रिंबक १११.
परांजपे ( डॉ. ) र. पु. २३६.
परांजपे शिवराम महादेव ८६ १३१, [ अ ] ३८, ४१, ७५, ८०
पॅरिस [ अ ] २८, ३२, ३५.
परीक्षिति [ अ ] ४४, ८०.
पर्ल हार्बर १६०.
पलुसकर (पं.) विष्णु दिगंबर १०१, [ अ ] ४२, ९९.
पॅलेस्टाईन [ अ ] १८७.
पशुपतेश्वर १०९, ११०.

पसनी [ अ ] १८४.
पाकिस्तान १६३, २६८.
पाचवड १५०.
पाटणकर १७९.
पाटणकर विठोबा ३४.
पाटील ( क्रॅफ्ट्स् सुपरिटेंडंट ) [ अ ] ३१.
पाटील नाना [ अ ] ४६.
पाटील स. का. २५२.
पाठक श्रीधरशास्त्री [ अ ] ५६, १३७
पाठक शोभनाथ [ अ ] १९६.
पांडव १०, ६६.
पांडिचरी ९३, २३६.
पांडे मंगल १९९.
पाणंदीकर ३४, ३७.
पाताळगंगा ११०.
पाद्री ११ ते १३.
पाध्ये शास्त्री [ अ ] १३२.
पानसे ग. मा. १२१, २६८.
पायरस [ अ ] १८४.
पार १६९.
पारडी ३, ११६, १२७, १६५ ते १७३, १७५ ते १७७, ८०, १८१, १८४, १८९, १९९, २२०, २२२, २३०, २३२, २४७, २४८, २५१, २६८, २७१, २७२, [ अ ] ७, ४७, ६४, ६६, ११८, १८८, १८९, २०७.
पारद १८३.
पारनेरा १६९ ते १७१.
पार्थिवेश्वर [ अ ] १०८.
पावगी नानासाहेब [ अ ] ११६.
पिंगळे ( पेशवे ) मोरोपंत १६९, १७१.
पिंगळे विष्णुपंत [ अ ] ४३, ९९.
पिप्पलादसंहिता १८३.
पिल्सुडस्की जोसेफ कोयल [अ] ९५.
पीठापुरम् २, ८७, २२०, २२६, [ अ ] २३, २५, ३२ ४१.
पीठावाला ४२.
पुणे ( पुण्यनगरी ) १२, १४, १५, ३३, ४१, ४७, ५३, ५४, ५६, ८६, ८७, ९१, ९२, ११२, ११६, १३८, १६२, १६४ ते १६६, २०१, २३१, २३६, २४२, २६२, २६७, २७०, २७३, [ अ ] ३८, ४२, १०१, १३३.
पुणे मराठी ग्रंथसंग्रहालय २६७, २६९, २७३.
पुणे विद्यापीठ २४७, २४८, २७१.
पुरंदरदास [ अ ] १६३.
पुरी १८९, २००, [ अ ] ११२.
पुरुषार्थ २, १५१, १५५ ते १५७, २३१, २३२, २३९, [ अ ] ४४, ६०, ६८, ७३, ७४, ८७, २०६.
पुरुषार्थबोधिनी ५१, १५१, १५४, २३४, २३९, २६४, २७१, [ अ ] ८३, १४३.
पुष्करयोग २८.
पूर्णा ४७.
पेन्टर बाबुराव [ अ ] २७.
पेठ १७१.
पेठे ( डॉ. ) मधुसूदन २६८.
पेंडसे ( डॉ. ) शं. दा. २७०, २७१, २७३.

पेंढारकर ( मामा ) १, ३२, ३५,
३७.
पेप्सु [ अ ] ३३.
पेंब्रूको [ अ ] १०८.
पेरू [ अ ] १०८.
पेशवाई ११, १२.
पेशवे ९३, २६१.
पेशावर ९६, १०२, १२६, [अ] ३३.
पैल [ अ ] १११.
पोकाक [ अ ] १८५.
पोतदार ( म. म. ) द. वा. २३५,
२४६, २६७, २७४.
पोतनीस गोपीनाथपंत २२१.
पोफॅम् १०.
पोर्तुगीज ९, १०, १७१, १७४.
पोलंड १५९, [ अ ] ९५.
प्रकाश १०१.
प्रतापसिंह (महाराणा) ११, १२७.
प्रतिवादी भयंकर मठ १८८.
प्रभावती ९२.
प्रभुणे रामशास्त्री [ अ ] ४५.
प्रयाग २३४, २३५.
प्रसिद्धगड १०.
प्रार्थनासमाज ११, १३, [ अ ] १०६
१८७.
प्लासी ९.
प्लेटो [ अ ] १६५.
फडके ( सौ. ) आशाताई २४६.
फडके वासुदेव बळवंत १३, [ अ ] ३७.
फडके सुधीर २६२, २६९.
फलटण १२३, १३८, १४८, १५९,
१६२, १६३, [ अ ] ४५.
फिन्लंड १८६.
फिलो [ अ ] १८४.
फुले ( म. ) ज्योतिराव १२, ६१,
[ अ ] ५५.
फोंडाघाट ६, [ अ ] २०२.
फोमेन [ अ ] २६.
फोर्ड एफ् ८९.
फ्रान्स ९५, २३२, [ अ ] २५, ३२,
१२७, १३९.
फ्रान्सवॉप् [ अ ] १३९.
फ्रीडमन् मॉरिस ११५.
फ्लँडर्स [ अ ] ४३.
फ्लॉरेन्स २३२.
बंगाल १३, ५३, ५६, ७०, ८६, ९३,
११३, १२६, १८८, [ अ ]
३८, ४०, ४३, ९३, १०१.
बजानाचे नवाबसाहेब १६७, १८४.
बटाणे गणपतराव १३१.
बडी माई १०८.
बडोदा ८४, ११६, १६६, १६७,
१७९, २४७, २४८, [अ] २२.
बडोदेकर ( बडोदे ) सरकार
( गायकवाड पहा )
बद्रिकाश्रम ११०.
बनहट्टी १३८.
बनारस ( काशी पहा )
बरेली [ अ ] ९७.
बर्मिंगहॅम् [ अ ] १०१.
बर्वे शंकरराव ७३.
बलसाड १२७, १६५, १६८ ते १७१,
१७७, १८४, २४९.
बलि २८०.
बलुचिस्तान १५९, १६८, [ अ ] १८४.
बहुलकर सुहास वसंत २६९.
बव्हेरिया [ अ ] ९४.
बांकीपूर [ अ ] १००.

बाकू १०८.
बागल ( भाई ) माधवराव ११२.
बाणासूर १०६, १०७.
बापट ( धुंडिराज ) बापू दीक्षित ( दीक्षित बापू पहा )
बावा बुढणगिरी ११०.
बावा महाराज २५३.
बॉम्बे ७०.
बॉम्बे आर्ट सोसायटी ४५, [ अ ] ३१.
बॉम्बे क्रॉनिकल् ९२.
बायबल १३, २७५.
बार्डोली १३३.
बाळकृष्ण शर्मा ( डॉ. ) १८१.
बालबोध [ अ ] ९५.
बालाघाट ४७.
बाल्डविन् स्टॅन्ले [ अ ] ९६.
बास्करव्हिले १३४.
बिऑवर [ अ ] ९७.
बिजनौर ८९, ९०, [ अ ] ११५.
बिझांट ( डॉ. ) ॲनी ९१, २३९ [ अ ] ९३, ९८.
बिद्री १३८.
बिरला जुगलकिशोर २५२, [ अ [ १०८.
बिलिमोरा २४९.
बिहार १२६, २३४.
बुचानन ( डॉ. ) [ अ ] १८५.
बुधगाव १३८.
बेकन ( लॉर्ड ) [ अ ] १०.
बेगश महंमद १७१.
बेनेट अर्नाल्ड [ अ ] ९४.
बेयसरा [ अ ] १०८.
बेलवलकर ( डॉ. ) श्री. कृ. [ अ ] १३७.
बेल्जम ] अ ] २७.
बेसक [ अ ] १०८.
बेहरामजी मलबारी [ अ ] ११३.
बेळगाव ६, ८५, ८६, ९२, ९३, १३८, १४७, २२९, २४९, [ अ ] ४१.
बोअरयुद्ध (वॉर) ५४, [ अ ] ३८.
बोनर लॉ [ अ ] ९६.
बोर्निया अ ] ९९.
बोस ( डॉ. ) २३६.
बोस नंदलाल [ अ ] २७.
बोस ( दे. गौ. ) सुभाषचंद्र १६०, [ अ ] ४६.
बौद्ध ११.
बौद्धधर्म [ अ ] ११३.
ब्रह्मदेश १६०, [ अ ] ९९.
ब्रह्मोसमाज ११, १३, [ अ ] १०६, १८७.
ब्राह्मण ७५, १५५.
ब्रिटिश ( इंग्रज पहा )
ब्रिटिश अमदानी ( रियासत, सरकार ;–(इंग्रजी राजवट पहा)
ब्रिटिश साम्राज्य [ अ ] ४३.
ब्रुग्शवे [ अ ] १८५.
ब्लॅव्हटस्की ( मॅडम् ) एच्. पी. ५२, [ अ ] ९३.
भगवद्गीता ( गीता पहा )
भगवद्गीता मासिक १५१, १५५, २३९.
भगीरथ [ अ ] १०९.
भट्ट अमृतलाल १८४.
भट्टाचार्य हृषिकेश १८८.
भंडारी २५१.
भरद्वाज २१३.

भवानी म्युझिअम् [ अ ] ३०.
भवितव्यम् ( साप्ताहिक ) १८६.
भाक्रानानगल २६८.
भागवत ८, ४८, ८७, १३०, [अ] १.
भागवत राजारामशास्त्री [ अ ] १३९.
भांडारकर ( डॉ. ) रा. गो. ३४ [ अ ] १३२, १५१, १५४, १७२.
भारत ५ ते ७, ९ ते ११, १३ ते १५, ५२, ८४, ८९, ९३, ११६, १३०, १५०, १५५, १६० ते १६३, १६५, १८३, ते १८६, १८८ ते १९२, १९८, २०१ ते २०३, २०६, २०८, २२६, २३२, २३४, २३६, २३८, २४८ २५३, २६१ ते २६३, २६५ ते २६८, २८१, २८६. [ अ ] ४४, ४६, ४७, ९९, १०३, १०५, १०८, १११, १६३, १६६, १७२, १७४, १७६, १८९, १९१.
भारतमुद्रणालय १५८, १६७.
भारतसंरक्षण [ अ ] ४३.
भारतसेवकसमाज [ अ ] १०८.
भारतीयकला प्रसारिणी २७४.
भारतीया गिरिधरभाई १६७.
भारतीय विद्याभवन २३६.
भारद्वाज [ अ ] १०८.
भार्गव ( डॉ. ) गोपीचंद [ अ ] १००.
भार्गवसमाज [ अ ] १०६.
भावे ( डॉ. ) ल. शं. २७४.
भावे लक्ष्मणशास्त्री [ अ ] ६०.
भावे ( आचार्य ) विनोबा [ अ ] १०४, १३७.
भास्कराचार्य [ अ ] १२२.
भास्करानंदजी [ अ ] १९९.
भिडे बाबूराव १३१.
भिडे सदाशिवशास्त्री [ अ ] १३७.
भिवंडी [ अ ] ३७.
भिसे ( डॉ. ) शंकर आबाजी [ अ ] ९६.
भूतान ११०.
भृगु [ अ ] १७७.
भृगुपत्रिका ५५.
भोर ११५, १२१, १३८, १६३.
भोसले चतुरसिंग १०, १३.
भोळे ज्योत्स्ना २६९.
भौम-महादशा २९.
भ्रातृमिलाप ५०.
मक्केरूर [ अ ] १०८.
मॅक्डोनाल्ड [ अ ] ९६.
मॅक्समुल्लर ५४, १८४, [ अ ] ३६, ११२, १२७, १८७.
मंगलमूर्ति गणेश [ अ ] ८४.
मंगळवेढे १३७, १३८.
मंगळवेढेकर पी. व्ही. २६५.
मंडलिक रामभाऊ १८१.
मंडाले ९३, १०२, [ अ ] ४१.
मथुरा २३५.
मद्रास ४१, ४७, ५७, ८७, ९३, १०२, १३७, १८६, १८८, २६९, [ अ ] २५, ४१, ४२, ९३.

मधुभाषिणी १८८.
मध्य-प्रदेश } १२६, १७८, [अ] ६७.
मध्य-प्रांत } ५३, १२९, १५१.
मनसंतोषगड १०.
मनु ७४, २०९, २११.
मनुस्मृति १५४, २०१, २०९, २४६, [ अ ] ८७, १७६.
मनोरमा ३५.
मनोहरगड १०.
मराठवाडा ५६.
मराठा १०१.
मराठी ग्रंथसंग्रहालय २३५.
मराठे नारायणशास्त्री [ अ ] ५६.
मराठे भास्करराव १३८, १४७.
मराठे मोरोपंत ८५.
मलकापूर १३८.
मलाया [ अ ] १०९.
मसूरकर नानासाहेब ( वि. अ. ) १२३, १३८, १४७.
महंमदकूली ( मुलतान ) ४८.
महाजनसभा [ अ ] १०६.
महाड २१.
महात्मा ( जी )-' गांधी ' पहा.
महाबळेश्वर [ अ ] ३०.
महाभारत ८७, १५४, १६८, १८६, २३९, २५२, [ अ ] १६, ५६. ५९, ४५, ८७, १०७, ११६, १२६, १२८, १६०, १६९ ते १७६.
महाभाष्य ४६.
महाराज सयाजीराव विद्यापीठ (विश्वविद्यालय) २४७, २५४.
महाराष्ट्र ५, १०, ११, १५, ३६, ९२, ९३, ११६, १२१, १२६, १२७, १३०, १६४, १६५, १८८, १९९, २४८, २६७, २७०, [ अ ] ३३, ४२ ते ४५, ४७, ५५, ६६, ६७, १००, ११६, १६६.
महाराष्ट्रकलव ५९.
महाराष्ट्रीयमंडळ २७४.
महालिंगपूर १३८.
महावल्लीपुरम् [ अ ] २८.
महिम्न ३३.
महीधराचार्य [ अ ] १२२.
माईणकर ( डॉ. ) त. गो. २४७.
माईणकर बाळकृष्णशास्त्री [ अ ] १३२.
माचणूर २५३.
मांचू ( राजघराणें ) [ अ ] ९६.
मांजरा ४७.
माझें रामायण ५२, [ अ ] १०३.
मॉंटफोर्ड सुधारणा [ अ ] १००.
माडगूळकर ग. दि. २६९.
मॉडर्नरिव्ह्यू [ अ ] ९४.
माण ११९.
माणगाव १, ४०, २१९, २२४, [ अ ] १०१.
माताजी २३६.
माधवगिरी ६.
माधवमहाराज [ अ ] २.
माधवाचार्य [ अ ] ४८.
मानस-सरोवर ११०.
मॉयसी १०७, १३४.
मायानंद चैतन्य १५२.
मालगाव १३८.
मालवणकर गुरुजी ३८.

मालवीय ( महामना, पं. ) २३४, [ अ ] ९३.
मावळंकर ११५.
मिंटो ( लॉर्ड ) [ अ ] ४२.
मित्रगोष्टी १८८.
मिरज ११, १११, १२३, १३८, १४०, १४७, १५९, १६२, १६३, २००.
मिरजमळा १२३, १६३.
मिर्झा ( डॉ. ) ह ( हो ) रमोस डियरकयोजी १६७, १८४.
मिशनरी ( पाद्री पहा )
मिश्र प्रभाकर [ अ ] १९४.
मिसर [ अ ] १०८.
मीर कासीम १५५.
मीरत [ अ ] ९९, १७४.
मुकर्जी शैलज [ अ ] ३५.
मुधोळ १२३, १३८, १४७, १६३.
मुनशी कन्हय्यालाल २३५, २३६, [ अ ] १९६.
मुन्शीराम ( लाला, महात्मा ) ६८ ते ७०, ७२, ८७, ८९, ९२, ९८, १००, २३८, [अ] ३५, ४२, १०६.
मुंबई १ ते ३, ६, १२, १६, १८, ३५, ३७ ते ४४, ४६, ४७, ५५, ६० ते ६२, ८५, ८७, ९२, १०१, १०२, ११२, ११४, ११६, १३८, १६४, १६६ ते १६८, १७०, १७५, १७९ ते १८१, १८७, १८९, २१८, २२०, २२५, २२६, २३०, २३२, २३५, २३७, २४८, २४९, २५१, २६८, [अ] २, ११, १९, २०, २२, २३, २८, ३१, ३३, ३७, ३९, ७१, ९४, ९६, १०२, २०२, २०४.
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय [अ] ९५.
मुंबई विद्यापीठ २३६.
मुंबई वैभव ११२.
मुंबईसरकार ७२, ७३, ११४, ११५, १८५.
मुलतान ९६, १२६.
मुसा ४८.
मुसाफीर रामचंद्र आर्य [ अ ] १९८.
मुस्लीमलीग १०३.
मूळपीठ १११, २२८.
मेकॉले ( लॉर्ड ) १३.
मेढे १११.
मेधातिथी [ अ, ] १७७.
मेयोपदक ( मेडल् ) १, १४५, २३२, [ अ ] २६.
मेहता जीवराज १८१.
मेहता बळवंतराय [ अ ] १९५.
मेहेंदळे दत्तात्रय [ अ ] ३२.
मोकल्ला [ अ ] १८४.
मोंगल ४८.
मोढोरा २६६
मोहन मोरटल्ली १५२.
मोर्ले [ अ ] ४२.
मोहनलालजी ( सेठ ) १७३.
म्हैसूर १५८, [ अ ] २२, ६७.
यजुर्वेद ७५, १५१, १५८, २४०, २४४, [अ] ५८, ६२, ९०, १०८, १०९, १२१.

यदे शेटजी ८६.
यम व पितर ५१.
यमाई १११.
यशवंतगड १०.
याकोबी [ अ ] ११२.
याज्ञवल्क्य २००, [ अ ] ६२.
युक्तप्रांत ५५, ११२, १५१.
युगांडा २३२.
युगान्तर ५३, १२८, १६१
युरोप ५, १०५, १४४, १८४, १८६, [ अ ] २५, ९७, १०५, १८५, १९१.
येडुरकर (सखाराम) शास्त्री १५८, १७९, १८४, [ अ ] ११५, १८८.
येवले [ अ ] ३७.
योगतत्त्वादर्श ६०.
योगसूत्र [ अ ] १४.
योगवासिष्ट [ अ ] १६.
योगेश्वरानंदतीर्थ १८९, २००.
रंग अवधूत महाराज २५१, २५४.
रंगो बापूजी ११.
रॅंड ५४, [ अ ] ३८.
रत्नागिरी ३, ६, ८, १०, [ अ ] ५४, ९५.
रबकवि १६८.
रमाबाई ( पंडिता ) [ अ ] ११३.
रविशंकर महाराज २६४.
रशिया ५४, १०८, १४३, १४८, १४९, १६०, १८३, २३४, २५९, २६१, २६७, २७२, [ अ ] २५, ११२, १२७.
रहिमतपूर १६८, १६९, [ अ ] ५.
रहिम ( सर ) अब्दुल [ अ ] ९३.
राकामल [ अ ] ३२.
रांगणा १०.
रांगणेकर ४२.
राघवन् ( डॉ. ) व्ही. २३५.
राघवाचार्य [ अ ] १५७.
राजकारणी रामदास ११७.
राजगोपालाचारी ( चक्रवर्ती पहा )
राजपुताना [ अ ] ९७.
राजवाडे ( इतिहासाचार्य ) २२३.
राजवाडे वैजनाथ काशिनाथ [ अ ] १०२.
राजवाडे ( आहिताग्नि ) शंकर रामचंद्र [ अ ] ११६, १३७.
राजस्थान १२६, [ अ ] ६७.
राजापूर १११, [ अ ] १३२.
राजा रविवर्मा ४२, [ अ ] २२, २३, २५, २७, २९.
राजाराम १२२.
राजाराम कॉलेज [ अ ] १००.
राजाराम मोहन रॉय [ अ ] १०४, १०५, १३९.
राजेन्द्र प्रसाद २००, २०३, २३२.
राणा भीमदेव [ अ ] ९५.
रॉथ रुडोल्फ [ अ ] १३९.
राधाकृष्णन् ( डॉ. ) २३६, २७०.
रानडे ( न्या. माधवराव ) म. गो. १२, १३, १५, [ अ ] १०५.
रानडे ( गुरुदेव ) रामभाऊ [ अ ] १३७, १४२.
रामकृष्ण परमहंस [ अ ] १३, ११३, १८७.
रामगड १५९.
रामचरितमानस [ अ ] १६६.
रामतीर्थ [ अ ] ९६, १८७.

रामदास ५, [अ] ३७, ११४, ११८, १३४, १३५, १६३.
रामदास रवींद्र [ अ ] १९७.
रामदुर्ग १३८, १६३.
रामदेव ८९.
रामपालसिंग [ अ ] ९६.
रामपूर १०६, १०९.
रामविजय [ अ ] १६६.
रामायण ( वाल्मीकी ) ८७, १५४, १६८, २३९, २७२, [ अ ] ६५, ८४, ८७, ११६, १६६ ते १६९, १७५, १७६.
रामेश्वर २११, २१२.
रायचूर ६०, ११०, [ अ ] ५५, ५६, २०४.
रॉय राजा राममोहन १३.
रावण ६५, ८२.
राववाजी ११.
रावळपिंडी ९५, ९६, १२६, [ अ ] ३५.
राशिकुंडली २७
राशिवडेकर अप्पाशास्त्री १८८.
राष्ट्रपति २.
राष्ट्रभाषा समिती २३४.
राष्ट्रभृत्य ७८, ८०.
राष्ट्रशक्ति १८६.
राष्ट्रीयशिक्षण ६७.
राष्ट्रीय सभा- ' काँग्रेस ' पहा
राष्ट्रीय-स्वयंसेवक-संघ १२६ ते १२९, १६४, [ अ ] १४६.
राहूरकर (डॉ.) व. ग. २३६, २६८, २७१.
रुईकर उद्धव विष्णु २५, २६.
रुईकर भालचंद्रपंत २५, २६.
रुचिराम ( पं. ) [ अ ] १८४.
रूपकृष्ण ( म. ) [ अ ] ३३.
रूसो-जपानी युद्ध ५४, ८४, [ अ ] ३९.
रेन्ऑं [ अ ] २६.
रौगीं १०९.
रौलट रिपोर्ट [ अ ] ९९.
लखनऊ ( नौ ) ८९, १०२, १०३, [ अ ] ९६.
लखनऊ पॅक्ट १०२.
लजपतराय ( लाला ) ९३, ९५ ते ९९, ११३, १७८, [ अ ] ४२, ४३, ७५, १००, १०६.
लंडन [ अ ] ४३, ९७, १७९.
लंडन टाइम्स ९२.
लंडन रायल सोसायटी [ अ ] ९६.
लंडन साँडर स्कूल २३२.
लडाख ११०.
लाल-बाल-पाल १०२.
लाहोटी १३९, १४९.
लाहोर २, ५०, ९२ ते ९७, १०० ते १०२, ११७, १२६, १२८, १६१, २१८, २२१, २२६, २३१, २३२, २३९, [अ] ६, ११, २५, ३४, ३५, ४३, ४६, ५०, ५१, ९७, ९९ ते १०१, १०३, २०५.
लिंगसुगूर ४८.
लिटन् ( लॉर्ड ) ११.
लिडहार्ड [ अ ] १४.
लिन्लिथगो ( लॉर्ड ) १६१.
लिमये ( आचार्य ) वि. प्र. २७४, [ अ ] १३७.
लुकतुके बळवंतराव १, ३५, ३९.
लेव्ही सिल्वन लुई [ अ ] ९९.
लोकापूर १३८.
लोंढे ( पं. ) गणेशशास्त्री २७४.
लोणावळा १६६.
वकील व्यं. शं. [ अ ] ७३.
वंगभंग [ अ ] ४३.
वणीकर ( डॉ. ) १८१.

वर्णेकर ( प्रा. ) श्री. भा. १८५, १८६, २००, २३६.
वर्धा ५३. [ अ ] ३०.
वऱ्हाड ५३.
वल्लभदास प्रतापसिंह शूरजी [ अ ] १९५.
वल्लभदास विक्रमसिंह शूरजी १८४, १८५.
वशि ( सि ) ष्ठ ७४, २११, [ अ ] ३७, १२०.
वसई १३, १७४.
वाई १११, १३१, १५०, [अ] ५६, ५७, १३७.
वाटर्लू १२८.
वाडी ( संस्थान ) १२१.
वात्स्यायन [ अ ] १२८.
वानप्रस्थी लालचंदजी २४०.
वापी २४९.
वारसाहक्क १४.
वाराणसी ( ' काशी ' पहा )
वारेशास्त्री २०२.
वॉलपोल [ अ ] १९१.
वालावल ( ली ) १८, २१.
वाली ६५, ६६.
वाल्मीकि [ अ ] १६६ ते १६९.
वाल्मीकि रामायण (रामायण पहा)
वास्को ड गामा ९.
वाळवे ६२.
विजगापट्टण १६०.
विजयानगर [ अ ] ४८, १२७.
विजापूर १११, १३८, १४५.
विजापूरकर ( प्रो. ) विष्णु गोविंद ( अण्णासाहेब ) ७२, ८६, ८७, ९२, १२२, २३८, [अ] १००, १०१, २०१.
विठ्ठलभाई रामजीभाई १८५.
विदुला ७३.
विद्याभवन १८९.
विद्यामार्तंड धर्मदेव [ अ ] २०१.
विद्योदय १८८.
विधवाविवाहाचा कायदा १४.
विधुशेखर ( पं. ) १८८.
विनायक २१०.
विनोद ( न्यायरत्न ) २६९.
विरजानंद ( स्वामी ) ७२.
विरोचन २८०.
विलायत ( ' इंग्लंड ' पहा )
विलेपार्ले १७०.
विविधज्ञान विस्तार [ अ ] ७३.
विवेकवर्धिनी ( विद्यालय, कॉलेज) २, ३३, ५३, २१८, २३०, [अ] ३९ ते ४१, ४९, २०४.
विवेकानंद ( स्वामी ) ६२, १८४, [ अ ] १३, ३६, ९६, ९७, १००, १०६, १०८, ११३, १७०, १८२, १८७, १८९.
विशाळगड १११.
विश्पला ९४, २६६, [ अ ] ५५.
विश्ववृत्त २, ६२, ७२, ७३, ८५, ८६, ९३८, [ अ ] ४१, ४२, ७१, ७३, ८०, ९३, १००, १०१, २०५.
विश्वामित्र २१३, [ अ ] १९३.
विश्वेश्वरानंद २४०.
विष्णुपुराण ४.
विष्णुबुवा ब्रह्मचारी ११, १७७, [अ] ७३.
विष्णुवाडी २६९.
विष्णुस्मृति ७४.
विसापूरकर २१.
विज्ञानशाळा १५२.
विज्ञानाश्रम १५३.
वीरकर नारायणराव [ अ ] ३३.
वुड्रॉफ् ( जस्टिस ) २०१.

वेंगुर्ला ३९, [ अ ] ४, ५.
वेडर्नबर्न ( सर ) ९६.
वेद ४, ४६, ४९, ५०, ५३, ५९, ७५, ७७, ८२, ८३, ९२, ९७, ९८, १०१, ११६, १५०, १५१, १५३, १५५, १५८, १६४, १६८, १७५, १८५, २०१, २०२, २०९, २११, २३७ ते २४०, २५३, २५९, २६०, २६२ ते २६४, २६७ ते २६९, २७१, २७४, [ अ ] ७, ८, ९, ८४, ९४, १०७, १०८, ११० ते ११३, ११५, ११७, १२१, १२२, १३६, १३८.
वेदचरित्य [ अ ] ८५.
वेदभाष्य ५०.
वेदमंदिर १६७, १६८, १८०, १८५, १९९, २५०.
वेदव्यास [ अ ] १११.
वेदशास्त्रोत्तेजक सभा १५.
वेदसंदेश २३९, [ अ ] ८७.
वेदसुधा [ अ ] ८६.
वेदोक्त ९१.
वेन ७३, [ अ ] ४३.
वेरूळ ४७, [ अ ] ३२.
वेलणकर ( डॉ. ) ४४.
वेलणकर ( धनी ) विष्णुपंत [अ]२.
वेलस्ली ( ले. ) १७१.
वेव्हेल ( लॉर्ड ) १६२.
वेस्ट्रॉफ् ३७.
वैदिक धर्म ( मासिक ) २. १५१, १५५, १५७, २३१, २३२, २३९. [ अ ] १३, १०८.
वैदिकधर्म १४, ४७, ४८, ८०, ९३, ९४, २३७, २५८, [अ] ८७.
वैदिकधर्म परिषद् २०१, २०९, २१७, २६३, २६५, २६७.
वैदिक प्रार्थनांची तेजस्विता २, ७२ ते ८० [ अ ] ४१.
वैदिक यज्ञसंस्था ६०, ६८.
वैदिक राष्ट्रगीत २, ६२ ते ६७, ७२, २३७, २४९.
वैदिक संशोधनमंडळ २७४, [ अ ] ११६.
वैद्य गजानन भास्कर [ अ ] ९४, ९५.
वैद्य चिंतामणराव ( भारताचार्य ) २७४, [ अ ] १७२.
वैद्य ( सौ ) जयश्री २६९, २७०.
वैद्य बाबुराव १३१.
वैद्य वसंतराव २६९ -७१.
वैनगंगा ४७.
वैशंपायन २००, [ अ ] ११२.
व्यंकम्मा ( श्रीमती ) ९३.
व्यास (महर्षि) ७३, १८४, [अ] १२२, १७०, १७१, १७३.
व्हॅनगोग [ अ ] २६.
व्हिक्टोरिया राणी १३, ५४, [ अ ] ३८.
शंकराचार्य ( श्री ) २२, ३६, १०५, २५८, [ अ ] १८३, १८६.
शतपथब्राह्मण १४३, [अ] ६१.
शंभुपंत ( वकील ) २२.
शरच्चंद्र ( बाबू ) दास ११०.
शर्मा गणेशराम [ अ ] १९४.
शर्मा पट्टाभिराम २६९, [ अ ] ३४.
शर्मा ( डॉ. ) रा. क. [ अ ] १९५.
शर्मा श्रुतिशील २४८, २५० ते २५२, [ अ ] १९९.
शर्मा ( डॉ. ) सूर्यकांत २३६.
शहाणे ( प्रा ) श्री. ह. २९.
शहापूर १३८.
शान्तिनिकेतन १८८.
शामजी कृष्णवर्मा ९५.

शारदा ( नाटक ) ९२.
शारदा ( पाक्षिक ) २६८.
शालिवाहन [ अ ] १०८.
शाहू ( छत्रपति ) सातारा १११.
शाहूनगरवासी [ अ ] ९५
शिकंदर ( सुलतान ) ११०.
शिकागो ६२.
शिखरे बा. वि. १२३, १४७, अ ]
१०३.
शिंगरेजी ४८.
शिरहट्टी १३८.
शिरोल ( वृत्तपत्र ) ९६.
शिवराज्याभिषेक ९३.
शिवाजी ('छत्रपति शिवाजी 'पहा)
शिवाजी उत्सव [ अ ] ३८.
शिवाजी क्लब ८४, ९२.
शिवानन्द ( स्वामी ) ५३.
शीशनाथ १०५.
शुक्ल चंद्रकांत १७९, २५१, २५४.
शेक्सपीअर [ अ ] ९५.
शेख महंमद ३४.
शेखर ३५.
शेटचे भाऊसाहेब १२१.
शेंडेशास्त्री २०१. २०२.
शेरगिल अमृता [ अ ] २८
श्यामराव कृष्ण भंडळीं ६०.
श्रद्धानंद ( स्वामी )– ' मुन्शीराम '
पहा.
श्रॉडर [ अ ] ११२.
श्रीआर्य सार्वदेशिक सभा ५१.
श्रीकृष्ण ६ ५२, ७३, ८१, ८२,
२६२. २६८, २७६.
श्रीकृष्णानंद [ अ ] १८२, १८३.
श्रीकृष्णाभीमासंगम ११०.
श्रीदास ८७.
श्रीधर [ अ ] १६६.
श्रीनगर १०४. १०५. १८३.
श्रीप्रकाश २३६.
श्रीपाद दामोदर–' पंडितजी ' पहा
श्रीमल्लिकार्जुन ११०
श्रीशैल ११०.
श्रुतिबोध [ अ ] ५६, ७३.
श्वेताश्वतर [ अ ] १३९.
षड्दर्शने ५९.
सकाळ २७४.
संकेश्वरमठ ३६.
सगे असवंद [ अ ] १०८
सच्ची शांतिका सच्चा उपाय १५८
सज्जन–गड [ अ ] ५६.
सतराशे एकूणपन्नास १११.
सतराशे चाळीस १७१.
सतराशे पंचाऐंशी [ अ ] १३९
सतराश सत्तावन ९.
सतराशे सात १११.
सतीबंदी १४.
सत्यदेव विद्यालंकार ८९.
सत्यपाल ( डॉ. ) २६, ९८, ९९,
११२.
सत्यशोधकसमाज १२. [ अ ] १०६.
सत्यसमाज ६१.
सत्यार्थप्रकाश ४९, ६०, ८८ ८९
९५.
सन् यत् सन् [ अ ] ९६
संपूर्णानंद ( डॉ. ) [ अ ] १९५.
सप्ततीर्थ ७१.
सप्तशती १०८.
सप्रे १०१.
समर्थ– ' रामदास ' पहा.
समर्थ ( साप्ताहिक ) ५.
समर्थ ( छापखाना ) ७३.
समर्थ विद्यालय ९३. [अ] ४३, ९९,
१००.

सम्राटजी ५८, ५९.
सयाजीराव महाराज– 'गायकवाड' पहा.
सयाजीराव साहित्यमाला [अ] ४१.
सयाम [ अ ] ९९.
संयुक्तप्रांत ९६, [ अ ] ९६, १०१.
सरदेशपांडे २४७.
सरय्या [ अ ] २८.
संरक्षकदले [ अ ] ४५.
सर्प [ अ ] ४४.
सर्वधर्म परिषद् ६२.
सर्वे ऑफ् इंडिया ११०.
सलक्ष्मीदास १७०.
सलोखापंथी १७८.
संस्कृतचंद्रिका १८८.
संस्कृतभाषाप्रसारिणी ३७.
संस्कृतवाग्वर्धिनी १, ३६.
संस्कृत व्याख्यानमंडळ ३५, ३६.
संस्कृत स्वयंशिक्षक १५५, १८२.
संस्थानातील लोकशाहीचा लढा११३.
सहस्रबुद्धे म. व्यं. २३६.
सहाशे एकूणसत्तर १७१.
सहाशे एक्क्याण्णव १७१.
सहृदया चंबा १८८.
सह्याद्रि ६, ४७.
साईदास १०१.
साखरे वासुदेवराव २३०.
सागर विद्यापीठ २३६.
सांगली ९२, ९३, ११५, १२२, १२३, १३१, १३७, १३८, १४६, १५०, १६२, १६३, २३१, २६९., [अ ] २, ४५, ५६, ५७.
साठेशास्त्री [ अ ] १३२.
सांडेसरा ( डॉ. ) भोगीलाल २४७.
सातव उपमहापौर पुणे ) २७०.
सातवळेकर ४, ११.
सातवळेकर अनंतराव १८ ते २०.
सातवळेकर आर्ट स्टुडिओ १०२.
सातवळेकर आशा २३०.
सातवळेकर उषा २३०.
सातवळेकर ( सौ. ) कुसुमताई ४१, २३०, [ अ ] २१.
सातवळेकर कृष्णराव ( पणजोबा ) १८, १९
सातवळेकर कृष्णराव ( चुलते ) १८.
सातवळेकर गोपिकाबाई १८.
सातवळेकर दामोदर ( भट, पंत ) ६, ८, १८ ते २२, २४, ३३, ३५ ते ३९, २२३ २२३, २३२.
सातवळेकर दीपक २३१.
सातवळेकर नारायण ६९, १२०,२३१.
सातवळेकर माधवराव २२१, २३०, २३२.
सातवळेकर ( सौ. ) लतिकाबाई १७९, १९९ २२५, २२७ ते २३०, २५२.
सातवळेकर लक्ष्मीबाई ( पणजी ) १८.
सातवळेकर लक्ष्मीबाई ( आई ) ६, ८, १८, २३ ३६, २२५.
सातवळेकर वसंतराव १७, २५, १७६, १७९, १९९, २२१, २२६, २३१, २३२, २४८, २५१, २५२.
सातवळेकर विकास २३१.
सातवळेकर श्रीपाद दामोदर ( पंडितजी पहा )

सातवळेकर सखारामपंत १८, ३३, २१८.
सातवळेकर सरस्वतीबाई ( आजी ) १८.
सातवळेकर सौ. सरस्वतीबाई (पत्नी) १, २१८, २२०, २२१, २२४ ते २२९, २३१, २३५, २३६, २५०, २५२, २६७, २६९, २७१.
सातवळेकर सीतारामपंत ( चुलते ) १८.
सातवळेकर सीतारामपंत ( बंधु ) १८, ३३, ५३, २१८, २३०, [ अ ] ४१, २०३.
सातवळेकर सुनीता २३०.
सातवळेकर क्षमा २३०.
सातारा ११, १२, ६२, ९२, ९३, १११, ११४, ११६ ते ११८, १२४, १२६, १२७, १३० ते १३२, १५०, १५९, १६०, २३९, [ अ ] ४६, २०६.
साताराजिल्हा काँग्रेसकमिटी २, [ अ ] ४५.
सातारा जिल्हापरिषद् २, १३०, १३१, १३४, [ अ ] ४५.
साधले १, २१९.
साधले आऊताई २२४.
साधले बनुताई २२४.
साधले रामभाऊ २२४.
साधले हरिपंत २२४.
साने १७९.
सान्तेरी १७, १८.
सावडे अ. वा. १३७, १३९, १४८.
सावडेसमिती १३७, १४६, १४७, १४९.
सामवेद १५८, १५९, १८४ [ अ ] १०८, १०९.
सायणाचार्य [ अ ] १२७.
सायमन कमिशन १५६, [ अ ] १००.
सारडा हरविलास [ अ ] ९७.
सार्वजनिक सभा ११, १४.
सॉलोमन २३२.
सावंत संभाजी १०.
सावंतवाडी १, ३, ९, १०, १५ ते १७, ३४ ते ४०, ६१, १३८, १६३, २२४, [ अ ] ५, ५०, १०१, २०३.
सावनूर १२२, १६३.
सावरकर ( बॅ. ) [ अ ] ४३.
सावशी १३८.
सिकलीकर लाडुभाई १८८.
सिक्किम २३२.
सिंगापूर [ अ ] १०९.
सिंध ७१, १६८.
सिनोर २६९.
सिम्प्सन [ अ ] ९६.
सिमला ४१, ४७, १०९, [ अ ] २५.
सियालकोट ८९, १२६.
सिंहासनयोग २८, ३१
सीझानी [ अ ] २६.
सीरिया [ अ ] १८५.
सुधारक ६१.
सुमंत [ अ ] ११२.
सुमात्रा २८६, [ अ ] ९९.
सुरत ५७, ६८.
सुरत काँग्रेस २, [ अ ] ४१, ९४, २०४.
सुवर्णमंदिर [ अ ] ३०.

सूफी अंबाप्रसाद ९७, ९८, [ अ ] ४३.
सूर्यनमस्कार ३४.
सेंट अँड्रयूज युनिव्हर्सिटी [ अ ] ९६.
सेंट पीटर्सबर्ग १८३, [ अ ] ९५.
सेन केशवचंद्र [ अ ] ११३.
सेनगुप्त १३१.
सोनटक्के ( पं. ) ना. श्री. २७४.
सोनबा ( पंडितजी पहा )
सोनी गोवर्धनदास १७०.
सोनी छगनलाल मथुरादास १७०.
सोमण (भाऊसाहेब) ११७, १३०, १३१.
सोमनाथ [ अ ] ३९.
सोमयाग १५०.
सोमरस १५५.
सोलापूर ११८.
सोळाशे शहात्तर १६९ १७१,
सोळाशे सत्त्याऐंशी ४८.
स्कूल ऑफ् आर्ट्स् [ अ ] २, २०२.
स्टूटगार्ड ८४.
स्ट्रौस ( प्रो. ) ऑटो [ अ ] १५५.
स्पर्शास्पर्श ६०.
स्मृति ५९.
स्वदेश हितचिंतक मंडळी ९३.
स्वदेशी २, ५४, ५५, ६२.
स्वराज्य चतु:सूत्री १६, ५४,५५, [अ] ३९.
स्वाध्यायमंडळ २, ३, १४३, १५०, १५४ ते १५६, १६१, १६५ ते १६७, १७२, १७५ ते १७७, १७९, १८०, १८४ ते १८६, १८८, १८९, १९९, २३१, २३२, २३९, २५० ते २५२, २७१, [ अ ] ६१ ते ६७ -५, ११५.
स्वामीनाथन् सी. आर्. [ अ ] १९४.
स्वित्सर्लंड ८४, १८३, २०६.
स्वीडन् [ अ ] १२६.
हक्क (धर्मांतरितांचे वारसा) ९.
हंगिरगे ८६.
हंगेरी [ अ ] १०८.
हब्बू ( वकील ) १३८, १४७.
हॅम्लेट ६८ [ अ ] ९५.
हरकिसनलाल ( लाला ) ९६,९८, ९९, १०१, १११, ११३, अ ] १००.
हरगोविंदसिंग ९६.
हरदयाळ ( लाला ) ९७, ९८, [अ] ४३.
हरदास बाळशास्त्री २०१, २०२, २१७, २६८, २६९. २७०.
हरिद्वार ५७, ७०, ७२, ८५, ८६, ९६, १०२, ११३, १५८, [ अ ] ५१, २०५.
हरिवरदा ९७.
हॅरिस ( लॉर्ड ) ८६, [अ] २०४.
हर्डीकर ( डॉ. ) [ अ ] ४५.
हर्ष ९, [ अ ] १०५.
हंसराज ( लाला ) १००, [ अ ] १०२, १०६.
हस्तिनापूर [ अ ] १७४.
हळदणकर शा. ल. [ अ ] २७. २९.
हळबे कृष्णभट १९ ते २२.
हळबे व्यंकटेशभट २१, २२.

हॉपरूण [ अ ]९६.
हार्डिज ( लॉर्ड ) १०२.
हॉल्डेन ( प्रा. ) [ अ ] १४.
हावर्ड ३५.
हावर्ड युनिव्हर्सिटी १८३.
हिंगे माधवराव ११२.
हिटलरी होरपळ १५६, १५९, १६०, १६१, १६५, [ अ ] ४६
हिंदसेवकसमाज १६२.
हिंदी साहित्यसंमेलन २३४.
हिंदु ( पत्र ) १३५.
हिंदुधर्म–' वैदिकधर्म ' पहा
हिंदुमिशनरी ( साप्ताहिक ) [ अ ] ९५.
हिंदुमिशनरी सोसायटी [ अ ] ९४, ९५.
हिंदु युनिअन क्लब [ अ ] १०६.
हिंदुस्थान ९, १०, १४, १५, ६२, ८४, १०९, ११०, १२६, १२९, १३२, १४२, १५९, १६०, १६२, १६३, १७६, १७७, [ अ ] २५, २८, ३१, ४०, ४२ ते ४४, ४९, ९३, ९७, १८५.
हिमाचलप्रदेश १०२.
हिमालय १०२. १०८ ते ११०, १७७, २३२, [ अ ] ९७, २०५.
हिमालय क्लब ११०.
हिरण्यकेशी ६.
हिरे ( ना. ) १८१.
हीरन [ अ ] १८५.
हुजूर रामचंद्रराव ५५.
हुद्देदार वंडोपंत [ अ ] २०.
हुन्नूर १३८.
हेडगेवार ( डॉ ) केशव बळिराम १२८.
हेमराज ( लाला ) सबरवाल १००, [ अ ] ३३.
हेसियड [ अ ] १७४
हेस्टिंग्ज [ अ ] १८७.
हैदराबाद २, ३३, ४४ ते ५०, ५२ ते ५७, ५९ ते ६१, ६८, ७२, ८७, ९२, ९३, ९६, ९७, १०१, ११२, ११७, १२८, १५०, १६१, १६६, १७९, १८९, २१८, २२०, २२६, २३०, २३५, २३८, २४९, २६३. [ अ ] ४, ५, ११, २३, २५, ३५, ३९, ४१, ४६, ४९, ५०, ५३, ५५, ९३, १०१ ते १०३, १८८, २०३.
होमर [ अ ] १७४.
होमरूल लीग २.
होशियारपूर १०८, १२६, [ अ ] १९८.
ह्यूनोव्हाल्यान् १८६.
ह्यूम् ए. ओ. ६२.
ज्ञानकोश [ अ ] १३३.
ज्ञानप्रकाश १२, ६०, ८७, [अ] ७१.
ज्ञानेश्वर ७, [ अ ] ८२, १६०, १६३, १७२.
ज्ञानेश्वरी ७.

पंडितजींचे चाळीस वर्षांपूर्वीचे एक निसर्गचित्र (मूळ रंगीत)

